UNIVERSAL
LIBRARY

OU_184406

UNIVERSAL
LIBRARY

OUP—880—5-8-74—10,000.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M923.2 B29N Accession No. PGM105

Author

Title

This book should be returned on or before the date last marked below

आपटे, स. वि.
नरसिंह चिंतामण केळकर यांच्या
आठवणी.

देशभक्त-साहित्यसम्राट

नरसिंह चिंतामण केळकर

यांच्या

आठवणी

★

संपादक व संग्राहक

सदाशिव विनायक बापट

★

प्रस्तावना-लेखक

श्री. ज. म. करंदीकर,

बी. ए., एल्एल्. बी.,

विश्वस्त, केसरी-मराठा संस्था, पुणें.

★

शके १८७०] प्रथमावृत्ति [सन १९४८

★

किंमत ८ रुपये

प्रकाशक :

सदाशिव विनायक बापट,
केसरी कार्यालय, ५६८ नारायण पेठ,
पुणें २.

या ग्रंथाचे सर्व हक्क संपादकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

मुद्रक :

आ. रा. भट, एम्. कॉम्.,
केसरी मुद्रणालय, ५६८ नारायण पेठ,
पुणें २

अर्पण-पत्रिका

परमवंद्य – पवित्र भारतमातेस लाभलेल्या

अभिनव श्रीस्वातंत्र्य-लक्ष्मीस

आणि

तदर्थ अवतरलेल्या व लहानपणापासून विशिष्ट रीतीचें वळण लावून मातृभूमीची सेवा करण्यास मला स्फूर्ति दिलेल्या महनीय

केसरी-मराठा संस्थेस

ही 'नरसिंह'स्मृति-कुसुमांजलि कृतज्ञताबुद्धीनें अर्पण केली आहे.

– सदाशिव विनायक बापट
आठवणीकार

'आठवणीं'चें हृद्‌गत

न खलु स उपरतो यस्य वल्लभो जनः स्मरति ।

— मालतीमाधव

दे. भ. तात्यासाहेब केळकर यांना दिवंगत होऊन एक वर्ष होत आलें. या कालावधींत त्यांच्याविषयींचा आदरभाव अनेकांनीं अनेक प्रकारांनीं व्यक्त केला. कोणीं स्मारक-फंड उभारले, कोणीं खास अंक प्रसिद्ध केले, कोणीं तैल-चित्रांचें अनावरण केलें; ज्यांनी त्यांनी आपापल्या परीनें त्यांच्या स्मृतीस आदरांजलि वाहिली. पण तात्यासाहेबांचे एकनिष्ठ सच्छिष्य सदाशिवराव बापट यांचा 'आठवणी' प्रसिद्ध करण्याचा उपक्रम सर्वांत अधिक यशस्वी झाला असून, तो अधिकांशानें आदरणीय वाटतो. इतर स्मारकें तात्यासाहेबांची स्मृति जागृत ठेवण्यास उपयुक्त आहेत व त्या दृष्टीने तीं अभिनंदनीयहि आहेत; तथापि त्या स्मारकांत तात्यासाहेबांचें यथार्थ स्वरूप प्रकट होत नाहीं. स्मारकफंडांतून केळकर-सभागृह निर्माण झालें, शिष्यवृत्त्या ठेवण्यांत आल्या, केळकर-पदक देण्याची योजना झाली अथवा आणखी असलेंच दहावीस स्मृतिजागृतीचे प्रकार घडवून आणले तर त्या योगानें तात्यासाहेबांची स्मृति चिरस्थायी होईल, नाही असें नाहीं; पण केळकर-सभागृह पाहणाऱ्या प्रेक्षकांस, शिष्यवृत्ति पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांस, पदक मिळविणाऱ्या पदवीधरांस जर विचारलें कीं, या स्मृतिचिन्हांवरून तुला काय बोध होतो, तर तो एवढेंच सांगेल कीं, 'तात्यासाहेब केळकर नांवाचे एक मोठे प्रसिद्ध पुरुष होऊन गेले, त्यांच्या थोरपणाचें हें स्मृतिचिन्ह आहे.' ते थोर होते म्हणजे ते कसे होते, त्यांचा थोरपणा कशांत होता, त्यांनीं राष्ट्रकार्य काय केलें, समाजाच्या उत्कर्षाला ते कसे कारणीभूत झाले इत्यादि प्रश्न विचारल्यास त्यांची उत्तरें देण्याला त्या स्मृतिचिन्हांपासून त्याला कांहीं स्फूर्ति प्राप्त होणार नाहीं. सदूभाऊ बापटांनीं प्रसिद्ध केलेल्या 'आठवणीं'चें पुस्तक हें अशा प्रकारचें स्मारक आहे कीं, त्यावरून तात्यासाहेबांची नुसती 'निर्विकल्प स्मृति'च जागृत होणार नसून 'सविकल्प स्मृति' सदैव जागृत राहणार आहे. आठवणींच्या या पुस्तकानें तात्यासाहेबांच्या स्वभावासंबंधाच्या



श्री. ज. स. करंदीकर

आणि त्यांच्या कर्तृत्वासंबंधाच्या कोणत्याहि प्रश्नास त्वरित उत्तर देण्याचें साधन उपलब्ध झालें आहे आणि म्हणूनच असें साधन निर्माण करून वाचकांच्या हाती देण्याची सदाशिवराव बापटांची कामगिरी विशेष अभिनंदनीय व स्वागतार्ह आहे.

चरित्र व आठवणी यांतील तारतम्य

चरित्र-ग्रंथानेंहि चरित्रनायकाच्या स्वभावाची व गुणांची ओळख पटते. तरी पण चरित्राला कांहीं एक ठराविक ठशाची ठेवण राखावी लागते आणि त्यामुळें चरित्रांतील महत्त्वाचे तेवढे सर्व भाग ठळकपणें वाचकांपुढें येतातच असें नाहीं. आणि दुसरा मुख्य फरक असा कीं, चरित्र-लेखक हा आपल्या एकट्याच्याच विशिष्ट चष्म्यांतून चरित्रनायकाकडे पाहात असल्यानें, त्याच्या स्वतःच्या मताची छाप चरित्रनायकाच्या कृतीवर पडलेली दिसते. आठवणींचे लेखक शेंकडों असून 'भिन्नरुचिर्हि लोकः' या न्यायाने प्रत्येकाची आवडनिवड वेगळी असणारच. अर्थातच चरित्रनायकाची कोणतीहि कृति इतक्यांच्या दृष्टींतून निसटूं शकत नसल्याने, प्रत्येक लहानसान कृत्यावर अनेकांनीं आपापल्या दृष्टिकोनांतून प्रकाश पाडल्यानें, चरित्रनायकाचें अंतरंग वाचकांपुढें अगदीं निःसंकोचपणें, आडपडदा न ठेवतां, मांडलें जातें, आणि न्यायालयांत ज्याप्रमाणें एकाच्या साक्षीपेक्षां अनेकांची साक्ष सत्यत्वानें ग्राह्य धरली जाते, त्याप्रमाणें अनेकांच्या परीक्षणाच्या कसोटीला उतरलेले गुण निर्विवादपणें वाचकांना ग्राह्य धरावे लागतात; इतकेंच नव्हे तर, वाचकांच्या मनावर ते आपोआपच आपला ठसा त्याला न कळत पाडतात. एवंच कोणाच्याहि एकटाकी चरित्रापेक्षां अनेकांच्या आठवणींनीं गुंफलेला हा हार चरित्रनायकाचें गुणवैभव अधिक खुलवितो यांत शंकाच नाही.

कोणतीहि चांगली गोष्ट अतिरेकानें बिघडवून टाकतां येते, त्याप्रमाणें आठवणी लिहिण्यांतहि अतिरेक करून हा प्रकार हास्यास्पद करून दाखवितां येईल व त्याप्रमाणें कित्येकांनीं न कळत असा प्रकार केलाहि असेल. तसें झाल्यास संपादकाला आपली विवेकबुद्धि चालवावी लागते व तसा त्याला स्वतःसिद्ध अधिकार असतोच. कोणतीहि आठवण लिहावयाची झाल्यास ती सत्याला व औचित्याला धरूनच असली पाहिजे. त्याचबरोबर लेखाच्या लांबी-रुंदीला कांहीं प्रमाणबद्धता पाळली गेलीच पाहिजे. नाहीं तर 'मिया मूठभर तर दाढी हातभर' असला विसंगत प्रकार व्हावयाचा. ही सर्व धोरणें सांभाळून लेखकांनीं जर महत्त्वाच्या तेवढ्या व आठवणी नेटक्या, मोजक्या शब्दांत, ठसठशीतपणें मांडल्या तर आठवणींचा ग्रंथ हा केव्हांहि सरसपणांत चरित्रग्रंथाला हार खावयाला लावील.

दुसऱ्याहि एका दृष्टीनें आठवणींचा ग्रंथ चरित्रग्रंथापेक्षां अधिक उपयुक्त ठरतो. चरित्रग्रंथाचे वाचक थोडे तरी पोक्त व समानधर्मी असावे लागतात; त्यामुळें

त्याच्या वाचकांची संख्या बरीचशी मर्यादित होते. आठवणींचा ग्रंथ आबालवृद्धांना सारखाच चित्ताकर्षक वाटणारा असल्यानें वाचकांची संख्या तर अमर्याद वाढतेच; पण त्यांतल्या त्यांत तरुण, होतकरू वाचकांना त्यांत अधिक गोडी वाटूं लागून त्यांच्या मनावर चरित्रनायकाच्या गुणांचा ठसा अधिक लवकर उमटतो. आठवणींतून प्रतीत होणारा कोणताहि गुण एक प्रकारें इतका सहजसुलभ वाटतो कीं, तरुण वाचकाला आपण त्याचें अनुकरण करावें अशी ईर्षा वाटूं लागते. चरित्रांतलें गुणवर्णन हें न सोडविलेल्या कोड्यासारखें आपल्या आटोक्याबाहेरचें वाटलें तर आठवणींतलें गुणवर्णन हें सोडवून दाखविलेल्या कोड्याप्रमाणें असल्यानें वाचकाला वाटतें कीं, हें कोडें मीहि सोडवूं शकलों असतों. अर्थातच आठवणींच्या वाचनानें होतकरू वाचकांचें मन त्या त्या गुणाचें अनुकरण करण्याकडे वेधलें जातें आणि हाच असल्या ग्रंथप्रकाशनाचा खरा उपयोग होय. नाहींतर, तसें पाहूं गेल्यास, या आठवणींच्या प्रसिद्धीकरणाने तात्यासाहेब केळकरांना आतां काय नवा मोठेपणा मिळावयाचा आहे ? जन्मभर देशकार्यार्थ देह झिजवून त्यांनीं प्रतिपक्षाच्याहि मनांत भरेल आणि मत्सरग्रस्तांच्या हृदयांत सलेल इतका मोठेपणा प्राप्त करून घेतलाच होता; तेव्हां त्यांच्या कीर्तीत आणखी कांही भर घालण्यासाठीं हा प्रयत्न नसून, एका अर्थी आपली कृतज्ञता व्यक्त करून आनृण्यसंपादनाचें सुख स्वतःस लाभावें आणि भावी पिढीपुढें एक अनुकरणीय आदर्श मांडून त्या पिढीच्या आचरणाला उचित वळण लावावें एवढीच मनीषा या प्रयत्नाच्या मुळाशीं असणार.

दिवंगत व्यक्तीला असल्या ग्रंथप्रकाशनापासून प्रत्यक्षतः कांहीं लाभ नसला तरी जोंपर्यंत या लोकांत तिची स्मृति जागृत आहे तोंपर्यंत त्या व्यक्तीवर मृत्यूची मात चालत नाहीं अशी भावना असते. "**न खलु स उपरतो यस्य वल्लभो जनः स्मरति**" असा दंडकच भवभूतीनें मालती-माधव नाटकांत मालतीच्या तोंडून वदविला आहे. त्यावरून पाहतां आठवणींचे ग्रथ म्हणजे त्या त्या चरित्रनायकाला अक्षय्य कीर्तिलाभ करून देण्यासारखेच आहेत; आणि जोंपर्यंत या जगांत एखाद्याची कीर्ति गाजत असते तोंपर्यंत त्याची परलोकांतहि कीर्ति दुमदुमत असते.

यावद्धि प्रथते लोके पुरुषस्य यशो भुवि ।
तावत्तस्याक्षया कीर्तिर्भवतीत्यनुशुश्रुम ॥

यांत म्हटल्याप्रमाणें इहलोकांत कीर्ति असेंपर्यंत परलोकांत त्याचा रहिवास अक्षय्य असतो आणि जोंपर्यंत त्याची आठवण ताजी आहे तोंपर्यंत त्याची कीर्ति अभंग असते हेंहि वर सांगितलेंच आहे. एतावता इहपर लोकांत कीर्ति अखंड गजता राहण्याला आठवणी ताज्या राखणें हा सुफलदायी मार्ग आहे. याच मार्गानें श्रीयुत बापट यांनीं लोकमान्य टिळकांच्या कीर्तीला अक्षय्यपद लाभून दिलें आहे

व तींच महत्त्वाकांक्षा मनांत बाळगून तात्यासाहेबांच्यांहि आठवणी प्रसिद्ध करण्याचें धाडस त्यांनींच केलें आहे !

आठवणींनी नांवाला चिरस्थायीपणा सारखाच येत असला तरी प्रत्येकाचे गुण सारखेच नसल्यानें, ज्याची त्याची कीर्ति अखेरीस ज्याच्या त्याच्या अंगच्या गुणांवरच अवलंबून असते. नसते गुण अंगीं चिकटविण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी ते गुण चिकटणार कसे आणि अल्पांशानें असलेल्या गुणांचा फुगा फुगविला तरी तो कितीसा फुगेल आणि किती दिवस टिकेल ! कालासारखा खऱ्या-खोट्या नाण्यांची पारख करणारा दुसरा कोणी परीक्षक नाहीं. लुंग्या-सुंग्या व्यक्तींच्या गुणांचा फुगा कालाच्या तावडींत सांपडला कीं तेव्हांच फुटून नष्टप्राय होतो. तशी अवस्था लोकमान्यांच्या आठवणींची झाली नाहीं आणि तात्यासाहेबांच्या आठवणींचीहि गत तशी होणार नाहीं.यावरून कोणीहि असा गैरसमज करून घेऊं नये कीं, लोकमान्यांच्या अंगीं जे जे गुण उत्कटत्वानें वास करीत होते ते ते सर्वच गुण तात्यासाहेब केळकरांच्याहि अंगीं वसत होते. उभयतांच्या गुणांत पुष्कळच तफावत होती. तरी पण गुणभिन्नता असली म्हणून कांही कीर्तीच्या व्यापकपणांत नि टिकाऊपणांत इमखास फरक पडलाच पाहिजे असें नाहीं.

लोकोत्तरता व लोकप्रियता यांतील भेद

लो. टिळकांच्या गुणगौरवाची सर केळकरांच्या गुणांना येणार नाहीं असें म्हणण्यांत आपण केळकरांचा अपमान करतों असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. लोकमान्य हे लोकोत्तर होते आणि लोकोत्तर पुरुषाची बरोबरी कोणीहि करूं शकत नाहीं, म्हणूनच तर त्यांना लोकोत्तर म्हणावयाचे. परंतु लोकोत्तर नसलेले पुढारीहि लोकप्रिय असूं शकतात; किंबहुना लोकोत्तर पुढाऱ्यापेक्षां लोकोत्तर नसलेले पुढारी अधिक लोकप्रिय असूं शकतात. हें विधान कित्येकांस चमत्कारिक आणि विसंगतहि वाटेल. यास्तव त्याचें थोडेसें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. लोकोत्तर पुरुष सामान्य जनतेपेक्षां इतक्या उंचीच्या पातळीवर असतो की, सामान्य लोकांना त्याजकडे दुरूनच पाहून त्याविषयीं आपला आदर व्यक्त करतां येतो. त्याची बरोबरी करणें तर राहोंच, पण त्याच्याशीं सलगी करणें, त्याच्याशीं मनमोकळेपणानें चार शब्द बोलणें हें देखील अनेकांना साध्य होत नाहीं. त्यामुळें अशा लोकोत्तर पुरुषाविषयीं कितीहि मोठा आदर भाव मनांत बाळगला तरी त्याला लोकप्रियतेचें स्वरूप क्वचितच येते. उलटपक्षी जो पुढारी इतका लोकोत्तर नसतो त्याच्याशीं सलगी करणें सामान्य माणसासहि शक्य वाटते व त्यामुळे त्याच्या लोकप्रियतेचें क्षेत्र वाढतें

या मुद्द्याची अधिक फोड करण्यासाठीं व्यवहारांतला सामान्य दृष्टान्त घेऊं. कुटुंबांत पिताहि असतो आणि माताहि असते. पित्याच्या अंगीं लोकोत्तर

गुण असल्यास त्याच्या योगानें कुटुंब मोठ्या पदवीला चढतें; म्हणून त्या कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीस पित्याविषयीं अत्यंत आदर वाटतो. तथापि पित्याच्या प्रेमळपणाचा लाभ व्यक्तिशः प्रत्येक व्यक्तीस मिळतोच असें नाहीं. अर्थातच प्रत्येक व्यक्तीस त्या पित्याविषयीं प्रेम वाटेलच असें म्हणवत नाहीं. परंतु मातेची गोष्ट वेगळी आहे. तिच्या प्रेमळपणाच्या छायेचा लाभ कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीस होतो, त्यामुळें प्रत्येक व्यक्तीला मातेविषयीं प्रेम वाटतेंच वाटतें. मातेच्या अंगच्या गुणांमुळें कुटुंबाच्या मोठेपणांत किती भर पडली याचा विचार कुटुंबांतील व्यक्ति करीत बसत नाहींत. लोकमान्य टिळक हे महाराष्ट्रालाच नव्हे तर अखिल भारताला पित्यासारखे होते आणि त्यांच्या लोकोत्तर गुणांमुळें भारताला गौरवसंपन्नता आली, म्हणून प्रत्येक भारतपुत्राच्या चित्तांत लोकमान्यांविषयीं निरपवाद अत्यंत आदरभाव वसत होता. त्या आदरभावाला लोकप्रियतेची जोड मिळणें वा न मिळणें हें त्या त्या व्यक्तीचा लोकमान्यांशीं जशा प्रकारचा संबंध आला असेल त्या प्रकारावर अवलंबून असणार हें उघड आहे. याचा निष्कर्ष थोडक्यांत सूत्ररूपानें सांगावयाचा झाल्यास असें म्हणतां येईल कीं, 'प्रत्येक भारतीयाच्या मनांत लोकमान्यांविषयीं आदरभाव आणि ज्यांची त्यांच्याशीं निकट संबंध आला त्यांच्या मनांत प्रेमभाव वसत असे.' तात्यासाहेब केळकरांच्याविषयीं जनतेला काय वाटत असे याचें पृथक्करण केल्यास त्याचा निष्कर्षहि सूत्ररूपानें असा मांडतां येईल कीं, 'प्रत्येक भारतीयाच्या मनांत तात्यासाहेबांविषयीं प्रेमभाव आणि ज्यांना त्यांच्या मताचा थोरपणा पटला त्यांच्या मनांत त्यांच्याविषयीं आदरभाव वसत असे.'

स्पष्टीकरणार्थ एक-दोन दृष्टान्त

वरील परिच्छेदांतील भेद आणखी एका दृष्टान्तानें अधिक स्पष्ट करूं. वराहावतार धारण करून श्रीविष्णूने बुडालेल्या पृथ्वीला वर काढलें. त्याबरोबर पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांचाहि उद्धार झाला. लो. टिळकांनीं पारतंत्र्याच्या डोहांत बुडालेल्या भारतखंडाचा उद्धार केला; त्याबरोबर प्रत्येक भारतवासीयाला मोठेपणा प्राप्त झालाच; पण हा फायदा सामुदायिक असल्यानें कोणीहि विशिष्ट व्यक्ति माझा लोकमान्यांनीं उद्धार केला म्हणून लोकमान्यांविषयीं वैयक्तिक कृतज्ञता दर्शविण्याविषयीं तळमळीनें पुढे येणार नाहीं. परंतु एखाद्या पाणबुड्यानें बुडणारीं शेंपन्नास माणसें पाण्यांतून वर काढून वाचविलीं असतील, तर तीं सर्व माणसें जन्मभर त्याचे गुण कृतज्ञतेनें आठवीत राहातील. लो. टिळकांची कामगिरी वराहावतारासारखी राष्ट्रोद्धार करणारी असून, तात्यासाहेबांची कामगिरी पाणबुड्यानें अनेकांचे प्राण वांचविण्यासारखी होती.

वरील पौराणिक दृष्टान्ताऐवजीं चालू व्यवहारांतला दृष्टान्त अनेकांना अधिक

लवकर पटेल; म्हणून तसा दुसरा एक दृष्टान्त देऊं. समजा, आधुनिक काळांतल्या एखाद्या मंत्र्यानें ऋणमोचक कायदा करून प्रांतांतल्या हजारों ऋणग्रस्तांना ऋणमुक्त केलें, तर ऋणमुक्त समाज सामुदायिक रीतीनें त्या मंत्र्याविषयीं धन्योद्गार काढील; मात्र कोणीहि एक ऋणको व्यक्तिशः याने माझ्यावर उपकार केले अशी भावना बाळगणार नाहीं. उलटपक्षीं एखाद्या कर्णासारख्या दात्यानें गांवांतील अनेक ऋणकोंना, द्रव्यदान देऊन ऋणमुक्त केलें तर ते व्यक्तिशः त्या दात्याचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतील; पण त्या आभारांना सामुदायिक स्वरूप येणार नाहीं. सारांश, लोकमान्यांचे लोकोत्तर गुण राष्ट्रोद्धारक असल्यानें त्यांचा सामुदायिकरीत्या मोठा गौरव होऊन गेला. तात्यासाहेबांच्या गुणांचा लाभ असंख्य व्यक्तींना, पण व्यक्तिशः, लाभ झाल्यानें त्यांचे वैयक्तिक चाहाते व भक्त असंख्य होते व त्यामुळें त्यांची लोकप्रियता व्यक्तिदृष्टीनें अधिक उठावदार दिसून आली.

वरील विवेचन लक्षांत घेतल्यावर लो. टिळकांच्या आठवणी आणि तात्यासाहेबांच्या आठवणी यांच्यांतील भेद कोणत्या स्वरूपाचा असेल हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. लोकमान्यांच्या आठवणींत राष्ट्रोद्धारक गुणांविषयींचा आदरभाव व्यक्त करणाऱ्या आठवणींचा भरणा भरपूर असून, वैयक्तिक प्रेमभावदर्शक आठवणी त्या मानानें कमी आढळतात. उलटपक्षीं तात्यासाहेबांच्या आठवणींत वैयक्तिक प्रेमळपणाच्या गुणगानाचा भरणा भरपूर असून, लोकमान्यांच्या गुणांसारख्या लोकोत्तर गुणांविषयीं आदरभाव व्यक्त करणाऱ्या आठवणी त्या मानानें कमी आढळतात.

लोकमान्य टिळक नि तात्यासाहेब केळकर यांच्या आठवणींची तुलना केली तर त्यांत वर निर्दिष्ट केलेला फरक दृग्गोचर होतो. तथापि त्यांतहि हें लक्षांत बाळगलें पाहिजे कीं, हें जें गुणांचें वर्गीकरण केलें त्यांतून कोणत्याहि एका गुणाचा संपूर्ण अभाव कोणांतच आढळणार नाहीं. कारण जर कोणांत एखाद्या वर्गाच्या गुणाचा अगदीच अभाव असेल, तर तो राष्ट्रपुढारीच मानतां येणार नाहीं; मग त्याच्या आठवणींचा संग्रह करण्याचा खटाटोप तरी कोण करील ? आणि कोणी तसा उपद्व्यापी संग्राहक भेटलाच तरी त्याच्या मागणीला भीक घालण्याइतकी कळकळ तरी कोणास वाटणार ? सारांश, वर जो ऊहापोह केला तो सापेक्षताभाव लक्षांत ठेवण्यासाठीं केला; कारण जगांतील व्यवहाराकडे नेहमीं सापेक्षताभावानेंच पाहावें लागतें.

आठवणींना कात्री कां लाविली ?

वरील विवेचनावरून हें साहजिकच लक्षांत येईल कीं, वैयक्तिक स्नेहसंबंधांच्या आठवणींचा, केळकरांच्या बाबतींत खरोखरच पाऊस पडेल इतका

सांठा जनतेच्या स्मृतींत असणें शक्य आहे. तरीपण त्याच त्या स्वरूपाच्या आठवणींची द्विरुक्ति होणार नाहीं, इतकी खबरदारी घेतली गेली असल्यानें आठवणींची संख्या पूर्वसंकल्पाच्या आटोक्यांत ठेवली गेली आहे. त्यामुळें आठवणी पाठविणाऱ्यांचा आंकडा मर्यादेच्या आंतच राखतां आला. वास्तविक पाहतां ज्याला ज्याला म्हणून केळकरांच्याविषयीं, जें कांहीं सांगावयाचें असेल तें सांगण्याला वाव ठेवला जाणें हें स्वाभाविक होतें. तथापि सांप्रतच्या काळांतल्या इतर कोणत्याहि संपादकाला ज्या अडचणी नडतात, त्याच या आठवणींच्या संपादकालाहि नडत असल्यामुळें, द्विरुक्ति टाळण्यासाठीं कित्येक आठवणीना फांटा द्यावा लागला.

दुसरी दृष्टि औचित्याची व महत्त्वाची. आठवणीत काय सांगावें नि काय सांगूं नये यालाहि कांही तारतम्य चालवावेंच लागतें. पुढारी झाला म्हणून काय झालें, तो नेहमींच पुढारीपणाच्या वेषभूषेनें नटून सदासर्वकाळ रंगभूमीवरच वावरत असतो असें नाहीं. त्यामुळें त्याची कोणती उक्ति वा कृति पडद्याबाहेरची समजावयाची व कोणती 'जनान्तिकं' समजावयाची याचा विवेक करूनच त्यासंबधाची आठवण प्रकट करावयाची कां न करावयाची हे ठरविले पाहिजे. इंग्लिश कादंबरीकर्त्री जेन ऑस्टेन हिनें आपल्या एका पात्राच्या तोंडून असें वदविलें आहे कीं, "If we remember all the silly things that one has said in the morning and repeat them in the evening then–" (सकाळीं सहज बोलून गेलेल्या सगळ्या बावळट गोष्टी लक्षांत ठेवून, तुम्ही संध्याकाळी त्या गोष्टी जर त्याच्या अंगीं लावूं लागला तर संपलेंच म्हणावयाचें !) यांतील तात्पर्य हेंच कीं, आठवण म्हणून नमूद करावयाची घटना थट्टेतील नसावी, महत्त्वाची असावी आणि त्या आठवणीतून चरित्रनायकाच्या कोणत्या तरी गुणदोषावर प्रकाश पडेल अशा स्वरूपाची ती असावी. वर्तमानपत्रांत देण्यासारखी वार्ता कोणती, हिचें विवरण करतांना लॉर्ड नॉर्थक्लिफ यांनीं दिलेलें उदाहरण मार्मिक आहे. ते म्हणतात, 'एका रस्त्यांत एक कुत्रा एका माणसाला चावला' ही घटना सत्य असली तरी ती प्रसिद्ध करण्यासारखें तिच्यांत वैशिष्ट्य काय आहे ? पण याच्या उलट जर 'एखादा मनुष्य बेफाम होऊन कुत्र्याला चावला' तर ती 'वार्ता' हटकून प्रसिद्ध करण्याजोगी आहे. हीच कसोटी लावून तात्यासाहेबांच्या संबंधाच्या आठवणींकडे पाहूं लागल्यास, 'तात्यासाहेब आमच्या घरी आले व त्यांनीं चहा घेतला, सभेचे अध्यक्ष व्हा अशी विनंती केली गेली व ती त्यांनीं मान्य केली, सभेला ते ठरल्या वेळीं आले,' असल्या आठवणी अगदीं मामुली अतएव नीरस ठरतील. याच्या उलट जर कोणीं असें सांगितलें कीं, 'तात्यासाहेबांना चहा देऊं केला असतां कांहीं गंभीर प्रसंगानें त्यांचें चित्त वेधलें गेल्यानें चहा घेण्यालादेखील ते विसरले,

त्यांना अध्यक्षपद देऊं केले असतां, त्यांनी स्वतः तो मान नाकारून दुसऱ्या कोणाचें नांव सुचविलें, सभेस वेळेवर यावयाचें खरें, पण तिकडे 'मँडीसाहेबांचे पिंड पाडावयाचे होते म्हणून त्यांना सभेला येण्याला उशीर झाला', अशा स्वरूपाच्या आठवणी औचित्याच्या आणि गुणदर्शकत्वाच्या दृष्टीने खरोखरच सरस ठरतील; आणि हें लिहिण्यास आल्हाद वाटतो कीं, या ग्रंथांतील बहुतेक आठवणी अशा महत्त्वाच्या स्वरूपाच्याच आहेत, आणि त्यांतील कित्येक आठवणी फारच सुरस आहेत. याचें श्रेय त्या आठवणी पाठविणारास तर आहेच, पण आलेल्या आठवणींची सरस-नीरसतेच्या दृष्टीनें छाननी करून औचित्याचा भंग न होईल, अशाच आठवणी निवडून काढण्याचे जे परिश्रम श्रीयुत बापट यांनी केले त्यांनाहि त्या श्रेयाचे वांटेकरी केलें पाहिजे. अशी निवड करतांना त्यांनीं चाळण आणि कात्री या दोहोंचाहि उपयोग केलेला दिसतो. चाळून पाखडून घेतांना कित्येक आठवणी अर्जाबात गाळाव्या लागल्या असतील आणि निवडून घेतलेल्या आठवणींचींहि शिंगे, शेपटे उपसर्गदायक होऊं नयेत म्हणून त्यांची छाटाछाटहि त्यांस करावी लागली असेल. असें केल्याबद्दल त्यांना अनेकांचा रोष पत्करावा लागला असेल; परंतु जे कार्य ज्या उद्देशानें हातीं घेतले असेल त्याला बाधक होणारें सर्व प्रकार टाळणें क्रमप्राप्तच असतें. त्यांतूनहि आठवणी पाठविण्याविषयी विनंती करतांना बापटांनी आपलें धोरण जाहीर करून, आठवणींचें स्वरूप व त्यांचा विस्तार कसा व किती असावा हेंहि आगाऊ कळविले होतें; त्याचप्रमाणें आठवणी पाठविण्याची मुदतहि दिग्दर्शित केली होती. या सर्व मर्यादा सांभाळून ज्यांनी आठवणी पाठविल्या त्यांच्या त्या तशाच स्वीकारल्या गेल्या; आणि ज्यांच्यांत थोडीबहुत छाटाछाट करून भागेल असें वाटलें तेथें त्यांनी तशी शस्त्रक्रियाहि केली; पण ज्या आठवणी अशा चौकटीत बसूं शकल्या नाहीत त्या परत करण्यांत आल्या, याबद्दल त्यांना दोष देणें अन्यायाचें ठरेल.

आपण जीव तोडून लिहावें आणि त्याची संपादकांनी अशी वासलात लावावी हें ज्यांच्या मानी स्वभावाला मानवलें नाहीं त्यांनी आपल्या आठवणी पाठविण्याचेंच टाळले. याबद्दल त्यांनाहि तत्त्वतः दोष देतां येत नाहीं; कारण प्रत्येकाला मतस्वातंत्र्य आहेच. तथापि त्यांनी आपल्या आठवणी न पाठविल्यानें तात्यासाहेबांच्या गुणगौरवांत कांही अपुरेपणा राहिला अशांतला भाग नाहीं. कारण इतरांनी त्याचा वचपा भरून काढला आहेच. मात्र आठवणी न पाठविणाऱ्यांच्या मनाचा प्रांजलपणा व्यक्त होण्याची संधि त्यांनी दवडली असें म्हणावेसे वाटतें. समेटप्रियता हा तात्यासाहेबांतला एक विशेष गुण होता व त्या गुणाची जाणीव आपल्यालाहि आहे हे दाखविण्याला ही उत्तम संधि होती. "धर्मं शुश्रूषमाणेभ्यः प्रष्टेन च सता पुनः । वक्तव्यं विदुषा नित्यं धर्ममाहुर्मनीषिणः ॥ अप्रतिब्रुवतः कष्टो दोषो हि भविता प्रभो ॥" असें व्यासमहर्षींनी महाभारतांत म्हटलें आहे.

असो; ज्यांनीं ज्यांनी आठवणी पाठविल्या आणि त्यांत जरूर तशी छाटाछाट करण्याचीहि परवानगी बापटांना दिली त्यांचा तात्यासाहेबांविषयींचा हा आदर प्रशंसनीय आहे; आणि प्रस्तुतचा ग्रथ अशा प्रांजलबुद्धीच्या सहकार्यांचें फळ आहे.

संकटग्रस्तांस साहाय्य करण्याची तत्परता

कोणीहि कोठलाहि मनुष्य कसाहि असला तरी त्याची संकटग्रस्त स्थिति पाहून तात्यासाहेबांना कळवळा येई व ते आपल्याकडून त्याच्या संकटमुक्ततेसाठी शक्य ती खटपट करीत व त्याकरितां अधिकारी वर्गाकडे भीड खर्चावी लागली तरी ती खर्चण्यास कांकू करीत नसत. या संबंधांत अक्कलकोटच्या मंगरूळकर पुजारीबंधूंचें उदाहरण नमुनेदार म्हणून देण्याजोगे आहे. सदर पुजाऱ्यांची जमीन संस्थानांतून जप्त करण्यांत आली होती. त्या प्रकरणांत तात्यासाहेबांनी मध्यस्थी करावी अशी पुजाऱ्यांनी विनंती केल्यावरून तात्यासाहेबांनी संस्थानच्या दिवाणांकडे खासगी रीतीनें पत्र लिहिलें. त्या पत्राला दिवाणांकडून आलेल्या पत्राचा उताराच पुढे देण्यांत येत आहे. त्यावरून तात्यासाहेबांची परोपकार-तत्परता व्यक्त होते.

दिवाणांच्या पत्राचा उतारा

श्री अक्कलकोट,

ता. १६।३।१९३८

श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर, मु. पुणे, यांसी –

कृ. सा. न. वि. वि.

आपण ता. ७।१०।३६ चें खासगी पत्र लिहिलें. त्यांत मि. पुजारीबंधु मंगरूळकर यांच्या सारीबाकी-वसुलीसाठीं सरकारजमा केलेल्या जमिनी, त्यांच्या गरिबीकडे व पुढे ते चांगल्या वर्तणुकीनें राहतील अशा कबुलीनंतर व त्यांच्या चुकीमुळें त्यांच्या मुलाबाळांचें नुकसान होऊं नये म्हणून, परत द्याव्यात अशा आशयाचें लिहिलेलें होतें.

पुजारीबंधूंचें वर्तन अक्कलकोट संस्थानांतच नव्हे तर इतर कोठेंहि अक्षम्यच ठरलें असतें. अशा परिस्थितींत सुद्धां त्यांची गरिबी, त्यांना झालेला पश्चात्ताप व त्यांच्या नुकसानीचें मान हें सर्व श्रीमंतांनीं लक्षांत घेऊन, दयार्द्र अंतःकरणानें पुजारीबंधूंवर मेहेरनजर करून त्यांच्याकडे येणें असलेली तगाई-बाकी सर्व वसूल दिल्यावर व आपली वर्तणूक सुधारण्याची कबुली दिल्यावर, त्यांच्या जमिनी त्यांना परत देण्याचा हुकूम केला आहे. कळावें, ही विनंती.

सही इंग्रजी

दिवाण, सं. अक्कलकोट.

सदरहू पुजारीबंधूंचा व त्यांच्या चळवळीचा आणि संस्थानच्या जप्ती-हुकुमाचा तात्यासाहेबांशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसतां, आपल्या पत्रानें त्या कुटुंबावरील आपत्ति टळत असल्यास तें साहाय्य करणें आपलें कर्तव्य होय असें मानून, केवळ दयार्द्रबुद्धीनें व कनवाळूपणानें त्यांनीं पत्र लिहिलें व त्याचा वर दर्शविल्याप्रमाणें सुपरिणाम झाला. अशाच रीतीनें तात्यासाहेबांनीं किती लोकांवर किती प्रकारांनीं उपकार केले असतील याची गणतीच करवत नाहीं !

तात्यासाहेब केळकर यांचें चरित्र विद्यमान पिढीला तरी संपूर्णपणें अवगत आहे. भावी पिढ्यांकरितां त्यांनीं स्वतःच आत्मवृत्त लिहून ठेवलें आहे. त्याचबरोबर त्यांच्यासंबंधीच्या आठवणींच्या पुस्तकांतून त्यांचें चरित्र शोधून काढण्याचा द्राविडीप्राणायाम कोणीहि करूं नये असें स्वतः तात्यासाहेबांनींच वाचकांना बजावलें असल्यामुळें, प्रस्तुतच्या आठवणींच्या संग्रहांतून त्यांचें चरित्र शोधून काढण्याचा खटाटोप कोणी करूं नये. तर मग या आठवणींच्या संग्रहांतून पाहावयाचें काय असें जर कोणी विचारील, तर त्याच्या समाधानार्थ असें उत्तर देतां येईल कीं, या आठवणी म्हणजे तात्यासाहेबांच्या चरित्राची पार्श्वभूमि होय.

मनाशीं प्रतारणा केली नाहीं

अशा या पार्श्वभूमीवरून पाहिल्यास तात्यासाहेबांच्या अंगच्या अनेक सद्गुणांपैकीं त्यांचें बुद्धिवैभव, त्यांचा प्रेमळपणा, त्यांची परोपकारतत्परता, त्यांचें रसिकत्व, त्यांचा विनोदीपणा, त्यांची समेटप्रियता इत्यादि गुण अत्यंत ठळकपणानें प्रतीतीस येतात. त्यांचें सौजन्य ज्यांत चमकत नाहीं अशी एकहि आठवण सहसा आढळणार नाहीं. त्यांच्या मनांत कपटभाव हा कितीहि शोधला तरी आढळणार नाहीं. त्यांचा दरबार अगदीं खुल्लमखुल्ला असा असे. ते जें बोलत तेंच करीत, आणि जें करीत तेंच ते आपल्या व्याख्यानांतून प्रतिपादीत असत. जाहीर सभेंत एक मत, खाजगी चर्चेंत दुसरेंच, स्वतःच्या आचरणांत तिसरेंच आणि कोणीं सल्ला विचारला तर चौथेंच, असें त्यांच्या मतांचे भिन्न भिन्न कप्पे नसत. सरकारी अधिकाऱ्यापासूनहि त्यांनीं आपलीं मतें कधीं लपवून ठेवलीं नाहींत. असा त्यांचा उघडा कारभार असल्यानें आपलें मत बनवितांनाच ते दूरवर विचार करीत आणि एकदां पूर्ण विचारांतीं आपलें मत बनविल्यावर त्याला ते ठाम चिकटून राहात.

आपल्या मताच्या ठामपणामुळें त्यांचा आत्मविश्वासहि दृढतर झाला होता. तरी पण ते दुसऱ्याच्या मताची हेटाळणी करीत नसत. आपलें मत स्वतंत्रपणें बनविण्याचा प्रत्येकाला हक्क आहे, असें ते मानीत आणि त्या मतस्वातंत्र्याचा मान राखण्याकरितां आपल्या मताची ते कोणावरहि सक्ति

करीत नसत. मतस्वातंत्र्याचा हक्क बजावल्याबद्दल ते कधी कोणावर रुष्ट झाले नाहींत. एवढेंच नव्हें तर त्यांची उलट अशी तक्रार असे कीं, अनेक मोठीं माणसें-देखील आपलें मत स्वतंत्रपणें न बनवितां, दुसऱ्याचीं मतें, स्वतःला पटत नसतां उसनीं घेतात, आणि स्वतःचें खरें मत सांगण्याला कचरतात. तात्यासाहेबांनीं स्वतःच्या मनाशीं अशी प्रतारणा कधींहि केली नाहीं. अर्थातच इतर कोणीं तशी ती केल्यास त्याची त्यांना चीड येई.

तात्यासाहेबांची समेटप्रियता हा कित्येक शिष्टांना एक थट्टेचा विषय होऊन बसला होता. परंतु कोणत्याहि वेळीं त्यांनीं समेटासाठीं स्वतःची तत्त्वच्युति होऊं दिली नाहीं. तत्त्वाला धक्का लागूं न देतांहि सौजन्यानें वागल्यास निष्कारण माजणारा कलह टाळतां येतो हेंच त्यांनीं आपल्या आचरणानें दर्शविलें.

'नरसिंह'-नामावळी

या ग्रंथांतील आठवणी म्हणजे एकेक गुणबोधक नामकरण असेंच मानतां येईल. आठवणींच्या लेखकांची संख्या पांचशेंच्या आंतच असली, तरी त्यांतल्या कित्येकांच्या आठवणी दोन अगर दोहोंहून अधिक असल्यानें एकंदर आठवणींची संख्या एक हजाराहून अधिक भरते. अशा या एक सहस्र आठवणी म्हणजे एक-प्रकारें विष्णुसहस्रनामावळीप्रमाणें 'नरसिंह'-नामावळीच होय. ही उपमा वाच्या-र्थानें शब्दशः खरी धरावयाची नाहीं हें सांगावयास नकोच. कारण प्रत्येक आठवणींत अगदीं वेगवेगळ्या गुणाचें दिग्दर्शन असेलच असें म्हणवत नाहीं. कांहीं आठवणींत तर परस्परविरुद्ध गुण दिग्दर्शित केलेले असतील. उदाहरणार्थ, न्याय आणि दयार्द्रबुद्धि, कडक शिस्त आणि क्षमाशीलता, समेट-प्रियता आणि स्वमताभिमान, काटकसर आणि औदार्य, निरहंकारवृत्ति आणि स्वाभिमान अशा या जोड्या परस्परविरोधी भासतात. तथापि तो खरा विरोध नसून, विरोधाभासच होय. स्थल, काल, व्यक्तिसंबंध यांच्या भिन्नतेमुळें यांतील कोणत्याहि गुणाला दोषत्व येत नसून, त्या प्रसंगीं तद्विरुद्ध गुणच दोषावह झाला असता. प्रेमळ माता आपल्या मुलाचे लाडहि करते आणि प्रसंगविशेषीं त्याला शासनहि करते. तिचें हें परस्परविरुद्ध भासणारें वर्तन त्या त्या प्रसंगानुरोधानें उचितच ठरत असल्यानें, दोन्ही प्रकार गुणांतच समाविष्ट होतात. त्याचप्रमाणें तात्यासाहेब केळकर हे कधीं रागावून कडक शासन करीत नसत असेंहि नाहीं आणि चुकीची क्षमा करीत नसत असेंहि नाहीं. अर्थातच त्या त्या परिस्थितींत त्यांचें तें वर्तन त्यांना शोभूनच दिसें. विष्णुसहस्रनामांत 'भयकृत्' आणि 'भयनाशन' अशा विरोधी नांवांप्रमाणेंच हें समजावें.

इंग्रजी आठवणींचें वैशिष्ट्य

मराठींत व हिंदींत ज्या आठवणी प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांच्यांत सकृद्-

शंनीं कांहीं ठिकाणी विरोध दिसण्याचा संभव असल्यामुळें हा खुलासा करावा लागला. इंग्रजी आठवणींसंबंधानें अशा खुलाशाची गरजच भासणार नाहीं. इंग्रजी आठवणींत विशिष्ट प्रसंगाचें वर्णन थोडेंच आढळतें. त्यांतील वर्णन हें सामान्यपणें गुणांचें चीज करण्याच्या स्वरूपाचेंच असल्यामुळें, त्यांत त्यांच्या वर्तनावरून वाचकांनीं गुणानुमान करावें अशी अपेक्षाच त्या त्या लेखकांनीं ठेवली नसून, लेखकांनीं स्वतःच तात्यासाहेबांच्या गुणांचें वर्णन मुक्तहस्तानें केलें आहे. मराठी आठवणींत तात्यासाहेब घरीं, दारीं, शेजारीं कसे दिसत याचा ऊहापोह आहे; तर इंग्रजी आठवणींत सार्वजनिक कार्यकर्ते या नात्यानें परस्थ लोकांस ते कसे दिसले याचें वर्णन आहे. त्यांच्या सार्वजनिक कार्याचा संबंध हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांतील प्रमुख पुढाऱ्यांशीं तर आलाच, पण त्याशिवाय विलायतेंतील कित्येक पुढाऱ्यांशींहि त्यांचा स्नेहसंबंध आला होता. अशा अनेक प्रमुख व्यक्तींनीं तात्यासाहेबांच्या कर्तृत्वासंबंधानें जे अभिप्राय व्यक्त केले आहेत ते वाचून त्यांच्याविषयींचा आदर किती तरी पटींनीं अधिक वाढतो.

विशेषतः डॉ. जयकर, बॅ. मेथा, लाला दुनीचंद, सर मिर्झा इस्माइल, एन्. सी. नरसिंहाचार्य, सर सी. पी. रामस्वामी अय्यर, डॉ. गोकुलचंद नारंग, डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी, हेलिना नॉर्मटन, देवेंद्रनाथ मुकर्जी, कॅप्टन केशवचंद्र इत्यादींचे गुणगौरवपर लेख अत्यंत मार्मिक आणि मननीय आहेत. तात्यासाहेबांचें पुढारीपण किती विविध स्वरूपाचें आणि उच्च कोटीचें होतें याची प्रतीति त्यांच्या लेखांवरून चांगली येते.

याप्रमाणें स्वकीय व परकीय, स्वपक्षीय आणि परपक्षीय, हिंदु, मुसलमान, पारसी, अँग्लोइंडियन, युरोपिअन या सर्वांनाच तात्यासाहेब सारखेच आदरणीय व अनुकरणीय वाटत होते याचा पुरावाच या सहस्रावधि आठवणींच्या रूपानें श्रीयुत सदाशिवराव बापट यांनीं वाचकांच्यापुढें ठेवला आहे.

सद्वर्तनाचा आदर्श

अशा रीतीनें या आठवणी म्हणजे बोधप्रद तत्त्वें मनावर ठसविणारे ठसेच होत. अशा आठवणींच्या द्वारां चरित्रनायकाच्या अंगच्या विविध गुणांवर तर प्रकाश पडतोच, पण त्याबरोबरच तो तो सद्गुण आपल्या अंगीं बाणण्यास आपण व्यवहारांत कसें वागावें ही शिकवणूक मिळते आणि कोणतीहि शिकवणूक आपल्या आहाराबाहेरची नसल्यास, ती कृतींत उतरविण्याचा प्रयत्न आपल्या हातून सहजासहजीं घडूं लागतो, हा असल्या आठवणींपासून मोठाच लाभ होय. याकरितांच असें आग्रहपूर्वक सांगावेसें वाटतें कीं, वयातीततेमुळें ज्यांचा स्वभाव अद्यापि पक्का ताठर बनला नसून, ज्यांच्यांत थोडा तरी लवचिकपणा उरला आहे, अशा मध्यमावस्थेंतल्या वाचकांनीं या आठवणी अवश्य वाचून आपल्या

स्वभावाला शक्य तेवढे चांगले वळण लावण्याचा यत्न करावा. बाल व तरुण वाचकांनीं तर या आठवणी म्हणजे आपल्यापुढें ठेवलेला सद्वर्तनाचा आदर्शच आहे असें मानून, हा कित्ता गिरविण्याचा अभ्यास करून भलेपणा संपादावा. असो; श्री. सदाशिवराव बापट हे असले आठवणींचे ग्रथ संपादन करण्यांत किती परिश्रम करतात याची नव्यानें जाणीव करून देण्याचें कारण नाहीं. लो. टिळकांच्या आठवणींचे तीन खंड प्रसिद्ध करून त्यांनीं एक विक्रम पूर्वी करून दाखविलाच आहे. त्या मानानें प्रस्तुतचा विक्रम छोटा भासत असला तरी लोकमान्यांविषयींचा जनतेंतला आदर व त्या वेळची महाराष्ट्राची परिस्थिति आणि तात्यासाहेबांच्याविषयींचा आदर व या वेळची महाराष्ट्रांतली विपरीत परिस्थिति या दोहोंची तुलना केल्यास सद्यःस्थितीत त्यांना इतकें यश लाभले हाच त्यांचा मोठा विक्रम होय. या संबंधांत त्यांच्या मार्गात किती अडचणी उभ्या राहिल्या त्यांचें वर्णन त्यांनीं आत्मनिवेदनांत केलेंच आहे. पण कोणत्याहि परिस्थितींत निराश व्हावयाचें नाहीं असा त्यांचा कृतनिश्चय असल्यानें त्यांच्या चिकाटीला एवढं यश लाभलें. एकनिष्ठ भक्तीवांचून एवढी यातायात कोणी करूं शकत नाही. अर्थातच लो. टिळकांविषयी जसा नितान्त आदर बापटांच्या चित्तांत होता तसाच आदर तात्यासाहेबांच्याविषयींहि त्यांच्या मनीं वसत असल्यामुळें त्यांनीं मनोभावानें ही वाङ्मयअर्चा केली. या अर्चनकार्यांत तात्यासाहेबांच्या दृष्टीनें कांही मंत्रतंत्र, विधिविधान, आचारोपचार चुकला असला तरी तात्यासाहेब हे आपल्या स्वभावजन्य सौजन्यानें, सामप्रियतेनें आणि गुणग्राहक वृत्तीनें या कृतीकडे पाहतील आणि त्यांना आत्मस्तुति जरी मनापासून आवडत नसली, तरी श्रीयुत बापटांच्या मनांतील सद्भाव जाणून त्यांचा आत्मा या वाङ्मयपूजेनें संतुष्ट होईल असा भरंवसा वाटतो.

केसरी कार्यालय,
आश्विन शुद्ध १
दि. ३।१०।४८

ज. स. करंदीकर

आत्मनिवेदन

मत्कथाश्रवणे श्रद्धा मदनुध्यानमुद्धव ।
सर्वलाभोपहरणं दास्येनात्मनिवेदनम् ॥
एवं धर्मैर्मनुष्याणामुद्धवात्मनिवेदनम् ।
मयि संजायते भक्तिः कोऽन्योऽर्थोऽस्यावशिष्यते ॥
– श्रीमद्भागवत

आपणास निवेदावें । आपण विवेकें नुरावें ।
आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ॥ – श्रीसमर्थ

कै. देशभक्त साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या आठवणींचा हा ग्रंथ आज त्यांच्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं वाचकांस सादर करण्यास मला आनंद – दुःखमिश्रित आनंद – होत आहे ! वस्तुतः हें त्यांचें वाङ्मय-श्राद्ध कोणा अधिकृत व्यक्तीकडून होतें तर तें योग्य झालें असतें व त्यामुळें मला विशेष आनंद झाला असता. तथापि आपल्या धर्मकल्पनेप्रमाणें दिवंगत व्यक्तीच्या कुलांतील कोणीहि हें कृत्य करण्यास अधिकारी असतो.त्याप्रमाणें कै. तीर्थस्वरूप तात्यासाहेबांच्या सार्वजनिक किंबहुना राजकीय परिवारांतील एक अत्यंत विनम्र घटक मी आपणांस समजत असल्यामुळें, श्रद्धापूर्ण अंतःकरणानें करावयाचें हें वाङ्मयश्राद्ध करण्याचें पुण्य माझ्या वांट्यास आलें हें मी माझें भाग्यच समजतों.

हें सत्कर्म करण्याचें पुण्य मला लाभेल अशी मला कल्पना नव्हती. कारण खुद्द तात्यासाहेब यांस अशा प्रकारची योजना मुळींच अभिप्रेत नव्हती, व त्यांचा स्वभाव लक्षांत घेतां असें असणें हें अगदीं स्वाभाविकच होतें. लो. टिळकांच्या आठवणींच्या पहिल्या खंडास त्यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. त्या ग्रंथाची त्या वेळीं जाहिरात मीं 'केसरी'त दिली; तींत त्यांच्या नांवामागें ' साहित्य-सम्राट्' असें उपपद मीं लिहिलें होतें. 'केसरी'च्या सदर जाहिरातीचें स्टीरिओ केलेलें पान त्यांनी आदल्या रात्रीं सहज पाहिलें. जाहिरातींतील 'साहित्यसम्राट्' हा शब्द पाहून त्यांना राग आला व तेवढा तो शब्द त्यांनीं छिनीनें उडवून लावला ! दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी 'केसरी' पाहतों तों हा प्रकार दिसला. चकित झालों. चौकशी करतां तात्यासाहेबांकडे बोट दाखविण्यांत आलें. त्यांस विचारतां ते म्हणाले, " अहो, माझा स्वभाव तुम्हांस माहीत आहे. माझ्या माणसानें, माझ्या पत्रांत, माझी अशी स्तुति करणें बरोबर आहे का ! हें मला बिलकुल मंजूर नाहीं; म्हणून मीं तो शब्द काढून टाकला." " प्रभवो ह्यात्मनः स्तोत्रं जुगुप्सन्त्यपि विश्रुताः " (समर्थपुरुष आपल्या वर्णनीय गुणाचीहि स्तुति करवीत नाहींत; ती ऐकण्याच

त्यांस कंटाळा येतो.) हें श्रीमद्भागवतांतील वचन तात्यासाहेबांना कसें लागू पडतें ते दिसून येतें. अर्थात् अशा विनयसंपन्न पुरुषाला प्रस्तुत ग्रंथासारखा प्रयत्न कसा मंजूर होणार ? आत्मस्तुतिसंबंधानें ते स्वतः जरी इतके विनयसंपन्न होते, तरी त्यांच्या सार्वजनिक मताविषयीं कोणीं कांहींहि टीका करूं नये अगर बरें-वाईट म्हणूं नये असा त्यांचा स्वभाव नव्हता; अथवा स्वतःविषयीं मतप्रदर्शन करण्यांत ते पाय मागें घेत असें मुळींच नव्हतें. त्यांच्या या स्वभावाविषयीं माझा विचार मीं रस्किनच्या शब्दांतच व्यक्त केलेला बरा. तो म्हणतो –

" The first test of a truly great man is his humility. I don't mean by humility, doubt of his power or hesitation in speaking his opinions, but a right understanding of the relation between what he can say and do and the rest of the world's sayings and doings. "

तात्यासाहेब म्हणतात ' हें मला मंजूर नाहीं '

तात्यासाहेब यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, " स्वतःचें मूल्यमापन स्वतःच करणें यासारखी कठीण पण आवश्यक गोष्ट दुसरी नाहीं, " आणि याप्रमाणें त्यांनीं हें कठीण व आवश्यक कार्य करून दाखविलें आहे. तें म्हणजे त्यांचें आत्मचरित्र होय. " गतगोष्टी – अर्थात् माझी जीवनयात्रा " हा त्यांचा ग्रंथ छापून त्याची पहिली प्रत त्यांच्या टेबलावर आलेली मीं पाहिली; तेव्हां त्यांस मी हंसत हंसत सहज पण जरा लावून बोलण्यासारखें साभिप्राय म्हणालों, " स्वतःच्या वाङ्मयाचे सर्व प्रकार आपण आपल्या हातानेंच प्रसिद्ध करीत आहांत. आतां त्यांत आपल्यासंबंधानें करण्यासारखें दुसऱ्यास कांहींहि उरूं देण्याचा आपला बेत दिसत नाहीं, असेंच ना समजावयाचें ! " हें ऐकून थोडे गोरेमोरे होऊन त्या महामर्मज्ञ पुरुषानें चटकन उत्तर दिलें, " समजलों; दुसऱ्यास आपणासंबंधानें प्रसिद्ध करण्यासारखें कांहींहि ठेवूं नये असें मीं ठरविलें तरी तुमच्यासारखीं कांहीं हट्टी माणसें नियम मोडून आपला हट्ट पुरविणार नाहींत कशावरून ? मला ही भीति आहेच ! " असें म्हणत त्यांनीं तो आत्मचरित्राचा ग्रंथ उघडून त्यांतील विशिष्ट मजकुरावर बोट ठेवून मला त्यांनीं वाचण्यास सांगितलें. तो मजकूर असा :– " उद्यां माझ्या पश्चात् आधुनिक चरित्रकोशांत ग्रंथकार, वर्तमानपत्रकार, राजकीय पुढारी या नात्यांनीं माझ्या चरित्राचा थोडा-फार उल्लेख होण्याचा संभव आहे, ही गोष्ट विनय सोडल्याशिवायहि मला नमूद करण्यास हरकत वाटत नाहीं. तेव्हां अशा प्रसंगीं माझी साधार माहिती जितकी अधिक प्रसिद्ध होईल तितकें बरें. कारण मग कल्पना चालवून मजविषयीं कोणीहि कांहींहि लिहावें असें तरी घडणार नाहीं. अनेक सार्वजनिक स्वरूपाच्या गोष्टी, या

एकप्रकारें निमसार्वजनिक मिळकत समजल्या जाण्याइतकें सार्वजानिक महत्त्व महाराष्ट्रांतील एक पुढारी या नात्यानें मला अखेर-अखेर आलें होतें, असें मीं मानलें तर मी गर्विष्ठ किंवा अहंकारी बनलों असें कोणी मला म्हणेल असें वाटत नाहीं. मग असल्या गोष्टींसंबंधानें कोणी तरी कांहीं तरी सांगितलेली अर्धवट बातमी, हकीकत, आठवण, माझ्या पश्चात् प्रसिद्ध होणें यांत इतर कोणाचा फायदा नसून माझा मात्र तोटा आहे. तो वांचावा याकरितां या आत्मवृत्तासारखें कांहींतरी लिहून ठेवणें बरें अशी कल्पना दृढ झाली." हा मजकूर वाचून संपतांच झटकून मी त्यांस म्हणालों, 'पण शेवटीं असें एक दालन शिल्लक राहीलच कीं, ज्याचा आपणांस कांहीं केल्या उपयोग करतां येणार नाही; तो इतरांनींच करावा!' हें ऐकून माझी समजूत पटेल अशा स्वरांत गंभीर मुद्रेनें ते म्हणाले, "आलें; माझ्या लक्षांत आलें; तुमच्या मनांत काय आहे तें मी समजलों. छे, तसें कांहीं होऊं नये. माझी ती योग्यता नाहीं. फक्त टिळकच त्यास योग्य. त्यांच्या जोडीस बसण्याला निराळीच पात्रता लागते. निदान मी तरी त्यास पात्र नाही. बाकी हेंहि मी बोलणें व्यर्थच आहे म्हणा. कशाला भविष्यकाळाच्या पोटांत आपण शिरा!"

प्रस्तुत ग्रंथाचें कारण

पुराणांत अशी कथा आहे कीं, प्रभुरामचंद्राच्या नांवाचा महिमा म्हणून त्याच्या नांवानें इतरांनीं पाण्यांत टाकलेले दगड तरंगले व संकल्पित कार्य झालें; पण प्रत्यक्ष त्यानें टाकलेला दगड बुडाला! या गोष्टींतील रहस्य तात्यासाहेबांच्या बाबतींतहि प्रतीत होतें! स्वतःसंबंधानें कांहींतरीच मोजमाप घेणाऱ्या या थोर पुरुषाची वरील विचारसरणी लक्षांत घेऊन, त्या अत्यंत विनयशील, गुणी, परोपकारी व खऱ्या देशभक्त पुरुषासंबंधानें प्रस्तुत ग्रंथासारखा प्रयत्न न करणें म्हणजे एकतर कृतघ्नपणाचें पाप समाजानें आपल्या माथीं घेण्यासारखें आहे; इतकेंच नव्हे तर, त्यांच्या ठायीं असलेल्या सद्गुणसंपदेचें संरक्षण व जोपासना करून पुढील पिढ्यांस तिचा लाभ न देतां ती विस्मृतीच्या व उपेक्षेच्या मातींत मिसळविण्यासारखें आहे! आणि हें पाप आपल्या राष्ट्रानें आजपर्यंत कांहीं थोडेंथोडकें केलेलें नाहीं. पण ही जाणीव सुदैवानें आतां सर्वत्र उत्पन्न झाली आहे ही समाधानाची गोष्ट होय. कै. तात्यासाहेब हे लोकमान्यांचे पट्टशिष्य व अंतेवासी होत. त्यांचें सार्वजनिक जीवन लोकमान्यांच्या जीवनांत अनुस्यूत आहे; किंबहुना लोकमान्यांच्या सार्वजनिक जीवनापैकीं फार मोठा भाग तात्यासाहेबांच्या साहाय्यानें व्यापलेला आहे. या दृष्टीनें तात्यासाहेबांचें सार्वजनिक जीवन हें लोकमान्यांच्या सार्वजनिक जीवनाचें पूरक असल्यामुळें, त्यांचें चरित्र जनतेच्या पुढें आल्याशिवाय लोकमान्यांचें चरित्र पूर्ण होणार नाहीं, याहि दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथाचा उपक्रम होणें क्रमप्राप्तच आहे. शिवाय तात्यासाहेबांचें चरित्र हें लोकमान्यांच्या चरित्राला पूरक

असलें तरी, तात्यासाहेब या महनीय व्यक्तीच्या दृष्टीनेंहि पण त्यांचें स्वतंत्र असें स्थान आहे यांत शंका नाहीं. तात्यासाहेबांच्या चरित्रापैकीं निम्मा भाग लोकमान्यांच्या चरित्रांत समाविष्ट होतो, तसा त्यानंतरचा भाग अगदीं स्वतंत्र होतो; व त्यांतील सर्व कार्यकर्तृत्व त्यांचें स्वतःचें ठरतें. तात्यासाहेबांच्या कार्याचा व्याप फार दांडगा होता. वाङ्मयदृष्ट्या तर लोकमान्यांच्यापेक्षांहि तात्यासाहेबांचा व्याप अधिक होता असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. तात्पर्य, तात्यासाहेबांसारखा सर्वगामी, सर्वव्यापी पुरुष महाराष्ट्रांत गेल्या अर्धशतकांत न्या. रानडे यांच्याशिवाय दुसरा कोणी झाला नाहीं अशी एका थोर गृहस्थानें अनेक वेळां केलेली घोषणा सर्वश्रुत आहेच. पण विशेष नवलाची व चटका लागण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांच्या जीवितयात्रेंतील शेवटच्या अंतकालाच्या प्रसंगाची होय. 'अनिष्टं सर्वभूतानां मरणं नाम भारत। मृत्युकाले हि भूतानां सद्यो जायति वेपथुः।' भीष्म धर्मराजाला सांगतात, 'खरोखर कोणत्याहि प्राण्याला मरण नकोसें वाटतें; मृत्युकाळ जवळ आला कीं, सर्वांना कांपरें भरतें.' पण या वचनाविरुद्ध तात्यासाहेबांचें मृत्युसमयीं धीरोदात्त वर्तन दिसून आलें. कारण या पुरुषाला काल-पुरुष दिसूं लागतांच त्यांनी एखाद्या सिद्धकोटीतील पुरुषाप्रमाणें केलेलें वर्तन पाहून सर्वांच्या तोंडून धन्योद्गार निघाले! आणि म्हणूनच श्रीसमर्थ म्हणतात – मरणाचें स्मरण असावें। मरोन कीर्तीस उरवावें। येणेप्रकारें॥ (स्वतःच्या मृत्यूच्या बाबतींत आत्मवृत्ताच्या प्रस्तावनेंत व प्रस्तुत ग्रंथाच्या पान ४९६ वर तात्यासाहेब यांनीं काढलेले उद्गार चिंतनीय असल्यामुळें त्यांकडे मी वाचकांचें लक्ष वेधितों.)

ग्रंथ करण्यास पात्र कोण?

अशा सत्कीर्तीच्या 'नरा'च्या संबंधानें आपलें कर्तव्य काय, याचा विचार त्यांच्या प्रेतयात्रेंत मी चाललों असतांना माझ्या डोक्यांत चालूं होता. तो विचार अर्थातच प्रस्तुत ग्रंथाच्या योजनेबद्दलचा. वस्तुतः हें कार्य प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें, गुरुवर्य तात्यासाहेब यांच्या कौटुंबियांकडून म्हणजे त्यांचे मुलगे, मुली, पुतणे, बंधु, नातू यांच्या हातून व्हावें अशी माझी मनापासून इच्छा होती. कारण अधिकार, विद्या, वाङ्मयप्रेम, रसिकता, सहृदयता, कळकळ, साधनानुकूलता आदि सर्व दृष्टींनीं ही मंडळी सत्पात्र असल्यामुळें हें कार्य त्यांच्या हातून नमुनेदार होईल, अशी माझी भावना होती. म्हणून त्यांच्याजवळ प्रथम मीं हा विषय काढला. त्यांच्याहि मनांत हा विषय घोळत होताच. पुढें या बाबतींत बराच विचारविनिमय करण्यांत आला. ती सर्वच मंडळी सुज्ञ, सुबुद्ध, विचारी, पारेस्थितिप्रज्ञ व मजविषयीं प्रेम, कळकळ, सहानुभूति बाळगणारी असल्यामुळें अखेर त्या सर्वांनीं मिळून मींच हें कार्य अंगीकारणें सर्व दृष्टींनीं कसें उचित व सयुक्तिक आहे हें मला पटवून देण्याचा प्रयत्न केला व अखेर तें मलाहि मान्य झाल्यामुळें तें करण्यास मी आनंदानें प्रवृत्त झालों.

तात्यासाहेबांची आशा खरी ठरली !

'आठवण' ही चीज अशी आहे कीं, जसजसा काळ जातो, तसतशी ती कापराप्रमाणें किंवा बर्फाप्रमाणें नाहीशी होते, मनुष्य ती विसरतो. हा सिद्धान्त व या कार्यातील पूर्वानुभव लक्षांत घेऊन ताबडतोब मीं या कार्यास प्रारंभ केला व पुढें आठ दिवसांतच म्हणजे दि. १८-१०-१९४७च्या 'केसरी'त एतद्विषयक जाहीर विनंतीपत्रक प्रसिद्ध केलें. या पत्रकाकडे जनतेचें विशेष लक्ष वेधावें म्हणून तात्यासाहेबांच्याविषयीं विशिष्ट आत्मीयत्व बाळगणारे, लोकमान्यांचे पौत्र व दौहित्र म्हणजे अनुक्रमें रा. जयंतराव टिळक व रा. गणपतराव केतकर व शिवाय मी, अशांच्या नांवांनीं तें प्रसिद्ध करण्यांत आलें व महाराष्ट्रांतील ठळक अशा बहुतेक सर्व वृत्तपत्रांत तें छापण्यांत आलें. त्याचबरोबर निरनिराळ्या व्यक्तींशीं खासगी पत्रव्यवहारहि मीं सुरू केला. 'टिळक-आठवणी' ग्रंथांच्या वेळेपेक्षां या वेळीं आठवणी मिळण्याच्या बाबतींत फारच अनुकूल असा अनुभव आला, हे येथें प्रथमदर्शनींच जाहीर करण्यास मला आनंद होतो. त्या वेळीं ती कल्पना अगदीं नवीन होती; वाट मळावयाची होती. पण त्यानंतर गेल्या पंचवीस वर्षांत अनेक प्रसिद्ध व्यक्तींच्या आठवणी प्रकाशित होऊन हा प्रकार आतां आठवणी पाठविणारांच्याहि चांगलाच अंगवळणीं पडला आहे याचें मला प्रत्यंतर आलें. पंचवीस वर्षांपूर्वीं लोकमान्यांच्या आठवणी मिळविण्यास जितके सायास पडले तितके या वेळीं न पडतां, कार्य बरेंच सुकर झालें, ही समाधानाची गोष्ट होय. या बाबतींत गु. तात्यासाहेब यांनीं त्या काळीं टिळक-आठवणीच्या पहिल्या खंडास लिहिलेल्या विद्वत्तापचुर (लिटररी) प्रस्तावनेंत व्यक्त केलेली आशा येथें नमूद करणें योग्य होईल. ते लिहितात – " आठवणी मिळविण्यास परिश्रम पडण्याची कारणें बापट यांनीं अनुमानिलीं तीं खरींच आहेत. तथापि त्यांतल्या त्यांत माझ्या मतें मुख्य कारण हेंच कीं, आठवणी स्मरणांत ठेवणें व त्यांचे महत्त्व मनाला पटवून त्या लिहिणें हा वाङ्मयव्यासंगाचा प्रकार आपल्याइकडे अगदीं अभिनव असून, तो लोकांच्या अंगवळणीं पडला नाहीं. वाङ्मयलेखनाचा हा नवा प्रकार यानंतर रूढ होऊन तो वाढतच जाईल व पुढें येणाऱ्या अशा प्रकारच्या ग्रथकारास तरी रा. बापट यांस पडले इतके परिश्रम पडणार नाहींत अशी आशा वाटते." तात्यासाहेब यांची ही आशा खरी ठरली, पूर्ण झाली ! शिवाय योगायोग असा कीं, प्रत्यक्ष त्यांच्याच बाबतींत हा अनुभव जाहीर करण्याचें भाग्य माझ्या वांट्यास आलें !

आठवणींचें वेड !

काय कारण असेल तें असो; 'आठवण' ही चूष मला लहानपणापासूनच फार प्रिय आहे. विद्यार्थिदशेंतील गोष्ट मी सोडून देतों; पण वयाच्या एकोणिसाव्या वर्षापासून महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या सान्निध्यांत माझे दिवस गेल्यामुळें,

त्यांच्या बोलण्यांत आलेल्या व त्यांच्या समकालीन असलेल्या कांहीं गृहस्थांनीं सांगितलेल्या कै. सार्वजनिक काकांच्या थोड्या विशेष गोष्टी – आठवणी – मीं त्या वेळीं टिपून ठेवल्या होत्या. पुढें अण्णासाहेब समाधिस्थ झाल्यावर त्यांच्यासंबंधींच्या कांहीं आठवणीहि मीं लिहून काढल्या व तें लहानसें चोपडें गु. तात्यासाहेब केळकर यांस दाखविलेंहि होतें. पण अनेक अडचणीमुळें तें काम मागें पडलें, तसेंच राहून गेलें व शेवटीं तें चोपडेंहि गहाळ झालें ! तात्पर्य, आठवणींचें हें माझें वेड असें फार जुनें आहे, एवढे सांगून त्याविषयीं माझें ममत्व व भावना काय आहे हें टेनिसनच्याच शब्दांत नमूद करतों. तो म्हणतो –

"As the dew to the blossoms,
The bud to the bee,
As the scent to the rose,
Are those memories to me."

आठवणींचें माहात्म्य व त्यांचा उपयोग

'आठवणी' या वाङ्मयविषयक प्रकारासंबंधानें लो. टिळकांच्या आठवणींच्या खंडद्वयांस लिहिलेल्या आपल्या सुंदर प्रस्तावनेंत तात्यासाहेब केळकर व लोकनायक बापूजी अणे या उभयतांनीं तात्त्विक दृष्ट्या फार मार्मिक विवेचन केलेलें आहे. विशेषतः तात्यासाहेब यांनीं तर प्रत्यक्ष चरित्रापेक्षांहि 'आठवणी'च्या वाङ्मयप्रकारास जास्त महत्त्व दिल्याचें दिसून येतें. ते लिहितात, "प्रकरणवार लिहिलेला एखादा चरित्रग्रंथ वाचून चरित्रविषयाच्या कार्यक्षेत्राची सुसंगत व व्यापक कल्पना येऊं शकेल; पण त्याचा स्वभाव व त्याचे गुणदोष यांची कल्पना आठवणीवजा हकीकती किंवा संवाद प्रसंग यांनीं जितकी येऊं शकते तितकी एखादें संपूण चरित्र वाचल्यानेंहि कदाचित् येऊं शकणार नाहीं." तात्यासाहेब यांच्या तोलाचे पाश्चात्य ग्रंथकार यांचें तसेंच म्हणणें आहे. चॅनिंग लिहितो, 'One simple anecdote of a great man is worth a volume of biography.' अखिल आंग्ल वाचकवर्गाला प्रिय व मान्य होऊन बसलेल्या बॉस्वेलचे असे उद्गार आहेत कीं, 'More knowledge may be gained of a man's real character by a short conversation with one of his servants than from a formal and studied narrative.' 'आठवणी'चें असें हें स्वयंभू माहात्म्य असलें तरी, त्यांचा ऐनजिनसी चरित्रग्रंथासच खरा उपयोग होणारा आहे. याच दृष्टीनें थिल्मॉट याचा अनुभव लक्षांत घेण्यासारखा आहे. तो म्हणतो, 'Occasionally a single anecdote narrated by any perosn opens a character : reminiscences enable the skilful hand to construct the skeleton.' अशाच प्रकारचे उद्गार खुद्द गु. तात्यासाहेब यांनीं लिहिलेल्या लो.

टिळक यांच्या चरित्रग्रंथाच्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडांच्या प्रस्तावनेंत त्यांनी काढले आहेत. ते म्हणतात, " या ग्रंथांस बापट यांच्या आठवणींच्या पुस्तकांचाहि उपयोग झाला आहे. आठवणींच्या तिन्ही खंडांच्या साहाय्यानें आणखी एक वेगळ्या रीतीनें टिळक-चरित्र कोणास लिहिण्याची स्फूर्ति झाली तर त्याला हें साधन उपयोगी पडण्यासारखें आहे. " अनुभवाचे हे सर्व बोल लक्षांत घेऊनच आम्हीं प्रस्तुत ग्रंथाबद्दल जें विनंतीपत्रक प्रसिद्ध केलें होतें त्यांत असेंच म्हटलें होतें कीं, " तात्यासाहेबांनीं स्वतःचें आत्मचरित्र लिहिलें असलें तरी, प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या आठवणीच्या आधारानें त्यांचें एक स्वतंत्र चरित्र लिहिलें जावयास पाहिजे व तसें लिहिणारा लवकरच कोणी पुढे येईलहि ! " ही आमची इच्छा पूर्ण होवो अशी प्रार्थना आहे.

'आठवणी' व 'आख्यायिका' यांची मीमांसा

प्रस्तुत ग्रंथ फक्त 'आठवणीं'चा आहे; त्यास नांवहि तसेंच दिलें आहे. यांत आख्यायिकांचा समावेश करण्यांत आला नाहीं. ' लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका ' असें ज्या ग्रंथांचे नांव होतें; व त्यांत थोड्याबहुत आख्यायिकांचा समावेश करण्यांत आलाहि. ज्या वेळीं नुसत्याच आठवणी थोड्या मिळतील असें प्रथम वाटलें, म्हणून ज्या ग्रंथाची तशी सजोड योजना केली; पण त्या वेळींहि पुढें अनुभव असाच आला की, नुसत्या आठवणींचाच आला तसा मजकूर छापला असता तर, आणखी दोन-तीन खंड सहज भरले असते, व त्याशिवाय आख्यायिकांचा मजकूर वेगळाच ! म्हणून हा पूर्वानुभव लक्षांत घेऊन व गु. तात्यासाहेबांविषयीं येणाऱ्या मजकुराचें क्षेत्र लक्षांत आणून, त्यांच्या नुसत्या आठवणीच प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. पक्कान्न ताटभर असल्यावर इतर पदार्थांची इच्छा कोण करतो ? किंवा सुंदर हाराकरितां उत्कृष्ट सुवासिक फुलें भरपूर मिळाल्यावर, त्यांत घालण्यांत येणाऱ्या पाल्यास कोण विचारतो ? शिवाय आख्यायिका ही किती झालें तरी 'आठवणी'ची चुलत-सावत्र बहीण ! आख्यायिका म्हणजे फुगीर किंवा खोलगट भिंगाच्या आरश्याप्रमाणे असते. त्यांत खरें प्रतिबिंब कसें दिसणार ? यासंबंधानें तात्यासाहेब केळकर यांनी केलेली विचिकित्सा व दिलेला अभिप्राय मार्गदर्शक ठरतो. ते लिहितात – " आठवण ही प्रथमतः घडलेली गोष्ट ज्यानें प्रत्यक्ष पाहिली त्यानेंच तीं ' चक्षुर्वै सत्यं ' म्हणून सांगितलेली असावी; ऐकीव माहिती प्रायः त्याज्यच. निदान तशा प्रकारची आठवण ही दुय्यम प्रतीची समजावी. अशा दुय्यम प्रतीच्या आठवणींचा समावेश 'आख्यायिका' या सदराखाली होऊं शकतो. परंतु आख्यायिकांना इतिहासाचें स्वरूप नसून बखरीचें स्वरूप असतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. शिवाय आख्यायिका झाली तरी ती ' खुद्द पाहणारानेंच खुद्द मला सांगितली ' येथपर्यंत तरी तिचा मुळाशीं प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे. पण यापली-

कडे जाऊन सांगोवांगीच्या नात्यांत चुलतपणाच्या जितक्या अधिक चुली येतील, तितकी सत्याची राख अधिक झालेली आढळेल. पुराव्याच्या दृष्टीनें म्हणजे शास्त्रीय सत्यकथनाच्या दृष्टीनें आख्यायिका, आठवणींपेक्षां गौणच ठरते." साहित्य-सम्राटांच्या या अभिप्रायावरून आख्यायिका हें नांव वर्ज्य करून तें कलम या ग्रंथांत अजिबात गाळण्यांत आलें आहे.

तात्यासाहेबांचें कार्यक्षेत्र

तात्यासाहेबांचें कार्यक्षेत्र विशाल व दीर्घकालीन असल्यामुळें सहस्रावधि लहान-थोर कार्यकर्त्यांशीं त्यांचा संबंध आलेला होता. नुसत्या एका पुण्यापुरतेंच बोलावयाचें तर गेल्या पन्नास वर्षांतील पुण्यांतील असें एकहि सार्वजनिक कार्य दाखवितां येणार नाही कीं, तात्यासाहेबांचा त्याच्याशीं प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आलेला नाहीं. महाराष्ट्रांतील सार्वजनिक चळवळींविषयींहि असेंच स्थूलमानानें म्हणतां येईल. अशाच प्रकारचें विधान अखिल हिंदुस्थानासंबंधानें करणें केव्हांहि न्यायाचें व वस्तुस्थितीस धरून व्हावयाचें नाहीं हे खरें; तथापि 'मराठ्या'चे दीर्घकाल सपादक, लोकमान्यांचे प्रमुख साहाय्यक, वरिष्ठ कायदेमंडळाचे सभासद, राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य, स्वराज्यसंघाचे चिटणीस व तिच्या विलायतेंतील शिष्टमंडळाचे एक प्रमुख सभासद, लंडन येथील 'इंडिया' पत्राचे संपादक व तेथील गोलमेज परिषदेचे सभासद इत्यादि विविध नात्यांनीं अखिल भारताशीं व विलायतेशींहि त्यांचा संबंध आला होता. तसेंच वाङ्मयक्षेत्रांतील ग्रंथकार, वृत्त-पत्रकार, नाटककार, कादंबरीकार, चरित्रकार, टीकाकार, इतिहासकार, तत्त्वज्ञान-लेखक, लघुकथालेखक, प्रस्तावनालेखक व कवि इत्यादि विविध अंगांनी त्यांनीं बहुमोल सेवा केली असल्यामुळें, त्या त्या क्षेत्रांतील शेंकडों व्यक्तींशीं त्यांचा निकट संबंध आला होता. याशिवाय मुख्य म्हणजे राजकारण, समाजसुधारणा, स्थानिकस्वराज्य संस्था, शैक्षणिक व इतर सार्वजनिक संस्था, विमाकंपन्या व बँका यांची स्थापना, व्यापार, साखरेच्या व इतर कारखान्यांची उभारणी इत्यादि राष्ट्रीय जीवनाचीं जीं अनेक अंगोपांगें आहेत त्यांतहि त्यांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून त्यांतील शेंकडों लोकांबरोबर कार्य केलें आहे. अशा प्रकारच्या विस्तीर्ण क्षेत्रांतील लोकांशी पत्रव्यवहार करून व समक्ष गांठीभेटी घेऊन त्यांच्या आठवणी मिळविण्याचा मीं आटोकाट प्रयत्न केला आहे.

आठवणी किती व कशा मिळाल्या ?

माझ्या शक्तिबुद्धीप्रमाणें मीं सुमारें दीड हजार लोकांचा ठावठिकाणा काढून त्यांस आपल्या आठवणी पाठविण्याबद्दल पुनः पुनः पत्रें लिहिलीं तीं सुमारें २१०० झालीं व अशा रीतीनें पत्रव्यवहार करून सुमारे ५०० लोकांकडून आठवणींचा

मेवा हातीं आला. प्रत्येकाला आपली वस्तु चांगली वाटणे हा मनुष्यस्वभावच आहे. पण हा मेवा निवडून पाहतां त्यांत अग्राह्य असा दुर्दैवानें सुमारें १२५ जणांचा निघाल्यामुळें तो सर्व बाजूस ठेवावा लागला! बाकी सुमारें ३७५ जणांचा मेवा निवडून, साफसूफ करून, वाचकवृंदास सादर करीत आहें. लोकमान्यांच्या आठवणींच्या तिन्ही खंडांकरितां १५६७ लोकांना ६००० पत्रें लिहून ७०० जणांकडून मजकूर मिळाला. देशभक्त तात्यासाहेबांच्या या ग्रंथाकरितां १५०० लोकांना २१०० पत्रें लिहून ५०० जणांकडून मजकूर आला. या फलनिष्पत्तीवरून कांहीं अनुमानें काढतां येतील. पण त्या खोल पाण्यांत मी शिरत नाहीं! तथापि येथें एकदोन गोष्टींचा निर्देश करणें आवश्यक आहे. तात्यासाहेब कालवश झाल्यावर अनेक वृत्तपत्रांत व मासिकांत त्यांच्या मृत्युलेखांबरोबर त्यांच्या आठवणीहि प्रसिद्ध करण्यांत आल्या. कांहीं नियतकालिकांचे विशेष अंक निघून त्यात आठवणींचें मुख्य सदर घालण्यांत आलें होतें. अशा रीतीनें बऱ्याच जणांच्या बऱ्याच आठवणी प्रसिद्ध होऊन गेल्या. एकदा इतरत्र प्रसिद्ध झालेली आठवण प्रस्तुत ग्रंथांत घ्यावयाची नाहीं असा माझा दंडक असल्यामुळें, त्या पाठविणारांना तो मजकूर साभार परत पाठविण्यांत आला. पण यामुळें त्यांची मजवर इतराजी होऊन मलाहि त्या मजकुरास मुकावें लागलें! कांहीं गृहस्थांनीं पूर्वी कोठेंहि प्रसिद्ध न केलेल्या आपल्या आठवणी पाठविल्या; पण त्याबरोबरच्या पत्रांत ठासून लिहिलें कीं, "आमच्या मजकुरावरून संपादकीय लेखणी फिरतां कामा नये, त्यास बिलकूल धक्का लावतां कामा नय. मजकूर आहे तसाच छापण्यांत आला पाहिजे!" मजकूर चांगला व निरपवाद असला तर तो संपादकास हवाच असतो; किंबहुना तो उत्तम असल्यास जशाचा तसा घेण्यास त्यास आनंदच होतो. पण सदर मजकूर जशाचा तसा घेतला असता तर संपादकावर खुशाल अब्रूनुकसानीचे व राजद्रोहाचे खटले भरण्यास पंचाईत पडती ना व तशींच इतर खेंकटींहि निर्माण झाल्याशिवाय राहती ना! म्हणून तो मजकूर साभार परत करणें भाग पडल. वर दिलेल्या कारणांमुळें आठवणी व त्या देणाऱ्यांची संख्या थोडीबहुत कमी होऊन एकंदर ग्रंथावर त्याचा कांहींसा परिणाम व्हावा हे अगदीं स्वाभाविक होय.

पण उलटपक्षीं सांगावयाचें तर, अशीहि कांहीं मंडळी भेटलीच कीं, 'यत् रोचते तत् ग्राह्यम्। यन्न रोचते तत् त्याज्यम्।' असें म्हणून विश्वासपूर्वक त्यांनीं आपल्या आठवणींचा मजकूर माझ्या हवाली केला व त्या बाबतींत एक अक्षरहि न बोलतां त्यांची सर्व जबाबदारी त्यांनीं मजवरच टाकिली! अर्थात् त्याचा योग्य तो परामर्श घेण्यांत आला हें सांगावयास नकोच. तसेंच विशेष विश्वासाच्या व अगत्याच्या कांहीं मंडळीकडून आठवणी मिळणार अशी माझी खात्री होतीच. त्याप्रमाणें त्यांस विचारतां, 'आपण मजकूर देणार आहां, पण तो दमानें पुढें सावकाश देऊं',

असें त्यांचें म्हणणें पडलें. पण अनेक कारणांस्तव मला दम निघत नसल्यामुळें त्यांचें हें म्हणणें मीं न ऐकतां, त्यांच्यामागें लागून त्यांजकडून मी अखेर मजकूर मिळविला. पण दुर्दैवानें, तो ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाल्याचें पहाण्यापूर्वीच त्यांनीं – उदाहरणार्थ डॉ. मुंजे, गु. भाऊसाहेब लवाटे, रा. बाबूराव साळवे . लक्ष्मीबाई कोल्हटकर यांनीं – इहलोक सोडला ! यामुळें माझ्या जिवास हळहळ लागून राहिली यांत शंका नाहीं. असो.

कांहीं अवघड ठिकाणचा मजकूर केवळ पत्रव्यवहारानें मिळणें कठीण होतें, व तीं ठिकाणें तर विशेष महत्त्वाचीं असल्यामुळें त्याकरितां हिंडावें लागलें, प्रवास करावा लागला, त्या त्या व्यक्तीकडे पुनः पुनः गेल्यानें त्यास होणाऱ्या त्रासामुळें त्यांजकडून झालेला अपमान गिळावा लागला व स्वतःच्या क्वचित् तत्त्वभ्रष्टतेकडेहि कानाडोळा करणे प्राप्त झालें. पण आपला इष्ट हेतु साधण्याकरितां ' न जावेंचि तेथेंचि लागेल जावें । वदावेंचि ना तेचि लागे वदावें । ' अशी स्थिति पत्करावी लागेल ही मनाशीं खूणगांठ मीं प्रथमच बांधली होती. पण नमूद करण्यास आनंद वाटतो कीं, या प्रयत्नांतहि, माझ्या अपेक्षेपेक्षांहि, जास्त यश मला मिळालें.

विचित्र अनुभव !

पण मान सांगावा जनांत, अपमान सांगावा मनांत, या म्हणींतील पहिल्या तत्त्वान्वयें वर उल्लेख झाला. आतां दुसऱ्या तत्त्वान्वयें उल्लेख खाली होत असला तरी, तो स्वगत आहे असेंच समजावें ! निदान मी तरी असेंच समजतों. तात्यासाहेबांचा गोड स्वभाव, त्यांची थंड व प्रशांत वृत्ति, त्यांची समतोल दृष्टि, त्यांची खिलाडू वृत्ति, त्यांची निर्लेप व पक्षनिरपेक्ष परोपकारिता व त्यांचें अजातशत्रुत्व यामुळें त्यांच्या आठवणी मिळविण्यास फारशी पंचाईत पडेल असें मला प्रथम वाटलें नाहीं; कोणाकडूनहि नाखुषी येईल अशी कल्पना झाली नाहीं व विरोध होईल हें मनींध्यानींहि आलें नाहीं. पण दुर्दैवानें प्रत्यक्ष अनुभव मात्र थोडा उलट आला खरा ! हें कार्य करीत असतां, कोठें विश्वासाच्या उंच जागेवर हेवा–मत्सर-अहंकारांचें तृणाच्छादित खळगे दिसले, कोठें कृतज्ञतेच्या प्रकाशाऐवजी कृतघ्नतेचा काळोख पाहावयास सांपडला, कोठें निःपक्षत्वाच्या मऊ बैठकीऐवजीं पक्षाभिमानाचे कांटे बोचले, कोठें सहकारितेच्या गोड झऱ्याच्या जागीं विरोधाचे खारट प्रवाह अनुभवास आले व कोठें तर फक्त कामापुरते स्वार्थी मामा भेटले ! तात्यासाहेबांच्या हयातींत वर वर्णन केलेल्या जातींच्या लोकांचें वर्तन त्यांच्याशीं कसें होत असे व त्यांचें सौजन्य आणि परोपकारिता यांची लूट अशा लोकांनीं कशी केली हें मीं प्रत्यक्ष पाहिलें असल्यामुळें, स्वाभाविकच त्यांच्याकडे मी मोठ्या आशेनें गेलों. पण या वेळीं तावातावानें त्यांनीं काढलेले उद्गार व मला दिलेलीं उत्तरें ऐकून मी अगदीं थिजू-

नच गेलों; नमुन्याकरितां त्यांपैकी फक्त एकाचाच येथें उल्लेख करतों. एक 'सत्पुरुष' म्हणाले, "तुम्ही आठवणी जमविल्या; आख्यायिका गोळा केल्या; आतां फक्त 'आफवा' तेवढ्या राहिल्या; त्या प्रसिद्ध करा म्हणजे जन्माचें सार्थक झालें!!" अशा प्रकारचे आहेर स्वीकारून, पण तोंड न उघडतां, 'नीच उत्तर साहाणें। प्रत्योत्तर न देणें॥' हा सद्गुरूंचा उपदेश आठवून मी गप्प बसलों व 'Everyone salutes the rising Sun, but he is rare who salutes the setting Sun" ही असलेली जगाची स्वाभाविक प्रवृत्ति लक्षांत घेऊन अशा लोकांशीं बुद्धिवाद न करतां अगर संबंध न ठेवतां, 'उदंडाचें उदंड ऐकावें। परि ते प्रत्यय पहावें। खरें खोटें निवडावें। अतर्यामीं॥' असा बोध घेऊन मी मनाचे सांत्वन केलें!!

तात्यासाहेबांशी कोणत्या ना कोणत्या कारणामुळें विशेष संबंध आलेल्या अगर परिचय असलेल्या गृहस्थांना आठवणी देण्याबद्दल मी समक्ष विनंती करी अगर पत्रें पाठवी. त्यांत ज्यांच्याकडून त्या देण्याबद्दल प्रथमच नकार मिळे, त्यांना अर्थातच पुन्हा विचारण्याचे कारणच नसे. पण ज्यांच्याकडून आरंभीच होकार येई त्यांच्याकडून मात्र त्या मिळेपर्यंत त्यांचा नाद मी सोडत नसे. कारण मला वाटे, सहजा-सहजीं त्यांच्याकडून मजकूर न आल्यानं आपण तो नाद सोडला तर, न जाणो, कदाचित् त्यांत एकादी महत्त्वाची गोष्ट अगर एखादा अति मौल्यवान् प्रसग राहून जावयाचा! याच केवळ विचाराने भारून जाऊन मजकूर पदरांत पडेपर्यंत, समक्ष गांठी-भेटी घेऊन अगर पत्रव्यवहार एकसारखा चालूं ठेवून त्यांचा पिच्छा मी पुरवीत असे. तथापि याहि बाबतीत दुर्दैवानें मी तोटका पडलों व मला अखेर कांहीं ठिकाणी हार खावी लागली हे मी कबूल करतों! श्रीयुत प्र. के. अत्रे, विद्वद्वर्य प्रो. रामभाऊ रानडे, दे. भ. अच्युतराव पटवर्धन, दे. भ. स. का. पाटील अशांसारख्या नामवंत बऱ्याच जणांपैकी प्रत्येकास मीं स्वतः कमींत कमी सात-आठ पत्र पाठविलीं व शिवाय त्यांच्यावर वजन पडेल अशा थोर गृहस्थांचा वशिला लावून त्यांच्याकडूनहि त्यांस विनंती करविली; पण उपयोग झाला नाहीं, यश आलें नाहीं! रा. अत्रे समक्ष मला म्हणाले, "बापट, आतां मात्र मी तुमचा अंत पाहात नाहीं. दोनतीन दिवसांत मजकूर न चुकतां पाठवितों." पण दुर्दैवानें अखेर तो हातीं पडला नाहीं तो नाहींच!! तसेंच देशांतील अव्वल दर्जाच्या अनेक थोर गृहस्थांकडून आठवणी पाठविण्याबद्दल प्रथम तत्परतेनें अनुकूल उत्तरें आलीं. पण राज्यकारभार अंगावर पडून त्या कामाच्या दडपणाखालीं सांपडल्यामुळें असलें काम करण्यास त्यांस उसंत होत नसावी असेच अखेर मला दिसून आलें व त्याप्रमाणें कांहींनीं मला कळविलेंहि. याहिमुळें माझी मोठी निराशा झाली. तात्पर्य, प्रस्तुत ग्रंथांत ज्या कोणा थोरा – मोठ्या माणसाचें नांव आठवणी देणारांत नसेल त्यांस विनंती न केल्यामुळें त्यांच्याकडून

मजकूर आला नाहीं असें न समजतां, त्यांच्या बाबतींत विश्वप्रयत्न होऊनहि तो यऊं शकला नाही, असेंच वाचकांनी निःशंक समजावें अशी माझी विनंती आहे. तसेंच, तात्यासाहेब यांचा विलायतेतील प्रमुख लोकांशी संबंधहि थोडाथोडका आला नव्हता. लोकमान्यांच्या आठवणींच्या वेळीं विलायतेंतील त्यांस परिचित अशा प्रत्येक व्यक्तीशी मला पत्रव्यवहार करावा लागला. पण सुदैवानें या वेळी लंडन येथें माझे जुने मित्र रा. दत्तोपंत ताम्हनकर हे 'केसरी'चे प्रतिनिधि म्हणून वास्तव्य करीत असल्यामुळे त्यांच्यावर मी हें काम सोपविलें. यामुळे माझे ते श्रम वांचले. मला माहीत असलेल्या तिकडील लोकांच्या नांवांची विस्तृत यादी तेवढी मी त्यांच्याकडे पाठविली. पण दरम्यानच्या महायुद्धाच्या प्रलयामुळें व विशेषतः बराच काळ लोटल्यामुळें बहुतेक मंडळी दिवंगत झाली असल्याचें त्यांनीं कळविलें. तथापि विद्यमान लोकांचा पत्ता-सुगावा लावून त्यांजकडून मजकूर मिळविण्याचा त्यांनी बहुत प्रयत्न केला हें नमूद करण्यास आनंद होतो.

भयंकर उल्कापात व त्याचे परिणाम

अशा रीतीनें आठवणी मिळविण्याचें काम तीन महिने सतत एकसारखे चालू होतें. एवढ्या अवधींत हाताशीं इतका मजकूर आला कीं, तो पाहून ११ मार्चला येणाऱ्या पाडव्यास हा ग्रंथ प्रसिद्ध करावा असे वाटूं लागण्यापर्यंत मजल गेली ! कारण आम्हीं प्रसिद्ध केलेल्या जाहीर विनंतीपत्रकांत असें म्हटलें होतें की, "सदर आठवणी पुरेशा हातीं येतांच लगेच त्या ग्रंथरूपानें छापून प्रसिद्ध करण्याचें काम आम्ही हातावेगळें करणार आहों. त्यासाठी एखाद्या विशिष्ट ठरीव कालाची अगर प्रसंगाची वाट न पाहण्याचाहि आमचा मानस आहे." हा सकल्प सिद्धीस जाण्याचा काल आम्हांस स्पष्ट दिसूं लागला. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, ३० जानेवारीस देशांत येवढा अभूतपूर्व, भयंकर उल्कापात झाला – महात्मा गांधींचा वध झाला – व त्यानें देश हादरून गेला ! लोकक्षोभाच्या ज्वालामुखी पर्वताचें रौद्र रूप प्रकट झालें. प्रत्यक्ष पुणें शहरांत दंगल झाली व तींत टिळक-मंदिराहि सांपडलें ! या मंदिराच्या कचेरीतच आठवणींचें कामकाज मी करीत असें. दंगेखोरांनीं टिळक-मंदिराच्या आंत व बाहेर आग पेटविली. ती पाहून मी बेभान झालों ! तशा स्थितींत मी तेथें गेलों व टिळक-मंदिराच्या मौल्यवान् कागदपत्रांच्या दप्तरांत आठवणींचें सर्व साहित्य बांधून टांगा अगर मजूर न मिळाल्यामुळे, तें भलेमोठें जड दप्तर डोक्यावर घेऊन बाहेर पडलों. तें घेऊन घरीं येण्याची सोयच नव्हती ! म्हणून टिळक-मंदिराजवळील विश्वासाच्या एका मित्राच्या घरीं तें ठेवण्यास गेलों. त्यांनीं सांगितलें, 'तुमचा हा जळका वांसा येथें ठेवूं नका !' म्हणून दुसऱ्या स्नेह्याकडे गेलों. ते म्हणाले, 'आतांच आमच्या घराची झडती झाली; पुनः होण्याचा संभव आहे; तुमचा तुम्ही विचार करा.' म्हणून तिसऱ्या स्नेह्याकडे गेलों. त्यांचें घर आज पेटविलें जाण्याचा

संभव आहे असें तेथें कानावर आलें ! जसें, कोणी पाठीशीं लागल्यास कावरीबावरी होऊन मांजरी तोंडांत पिल्लूं घेऊन त्यास ठेवण्यास निवाऱ्याची जागा शोधते तशी माझी गत झाली ! अखेर एकदांचें सुरक्षित ठिकाणीं तें दप्तर ठेविलें तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला !

प्रतिकूल परिस्थिति

देशांतील या भयंकर प्रकाराचा सर्वच व्यवहारावर परिणाम झाला तसा माझ्या या कार्यावरहि झाला असल्यास नवल नाहीं. स्तब्धता, नैराश्यता, उदासीनता, अविश्वास यांच्या कुंद व रोगट वातावरणांत कांहीं दिवस गेले. पुढें आस्ते आस्ते ते कमी झालें. संकटांचे ढग वितळूं लागले, आशेचा वारा वाहूं लागला व सत्कर्माचा सूर्य प्रकाशला. म्हणून मी माझ्या कार्यास पुन्हां सुरुवात केली. पण आतां मात्र दुर्दैवानें निराळाच अनुभव येऊं लागला. पत्रव्यवहार व गांठीभेटी यांचा उपयोग होईनासा झाला; नवीन मजकूर मिळणें बाजूसच राहिले; उलट मिळालेला मजकूर कांहीं अति नाजूक प्रकृतीच्या लोकांनी परत मागितला !! ३० तारखेपूर्वी मजकूर पाठविण्याच्या बाबतींत वचनबद्ध झालेल्या कांहीं शिष्टांनीं " आतां तुम्हांस आठवणी पाठविणें शक्य नाहीं " असें रागानें कळवून अंग झाडून टाकलें ! अशांतच कांहीं स्वकीयांपैकीं, कोणी घाबरटपणानें तर कोणी वैषम्यबुद्धीनें प्रस्तुतचा हा प्रयत्न मीं आतां अजीबात सोडून द्यावा असा खासा पोक्त सल्ला दिला !! या शल्यनीतीचा कितपत उपयोग झाला हें सांगणें सोडून दिले तरी, ग्रंथाच्या एकंदर स्वरूपावर वरील परिस्थितीचा थोडाबहुत परिणाम होणें अपरिहार्यच होतें. हातीं आलेल्या व येऊं घातलेल्या मजकुराच्या प्रमाणावरून जेथें ६००–६०० पृष्ठांचे दोन खंड निघावेत असा प्रथम अदमास होता, तेथें ६०० पृष्ठांचा एकच खंड प्रसिद्ध करावा अशी परिस्थिति निर्माण झाली व त्याप्रमाणेंच करावें, असें अखेर ठरवावें लागलें ! तदनुसार कागदाची परवानगी देण्याबद्दल सरकारकडे अर्ज करण्यांत आला. पुढें देशांतील राजकीय वातावरण जसजसें निवळत चाललें, तसतसें आठवणी मिळविण्याच्या पुनः चालविलेल्या प्रयत्नास यश येत चाललें. फार काय, पण प्रस्तुत आत्मनिवेदनाचा मजकूर लिहीत असतांहि अजून आठवणी येण्याचा प्रवाह चालूंच आहे ! यामुळें संकल्पित ६०० पानांत सर्व मजकूर बसणार नाहीं या भीतीनें पुनः जास्त पृष्ठें छापण्याकरितां सरकारची परवानगी मागितली व १२० पृष्ठें जास्त छापण्यास ती मिळाली. अशा रीतीनें मजकूर व पानें यांचा पाठशिवीचा खेळ चालू असतां, " घट्ट झालें पाणी घाल, पातळ झालें पीठ घाल " या ग्राम्य महिला-म्हणीची आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं !

संपादकीय संस्कार

तथापि अशा प्रकारच्या ग्रंथांतील मजकुरावर संपादकीय हात फिरला जाणें आवश्यकच असतें; आणि प्रस्तुत ग्रंथाच्या बाबतींत तर तो हात दमेपर्यंत त्यास काम करावें लागलें! ग्रंथांतील जागेची मर्यादा, औचित्य, महत्त्व, अभिरुचि वगैरे लक्षांत घेऊन, तारतम्यबुद्धि चालवून, निःपक्षपाती मनानें मजकुरास नाइलाजास्तव कात्री लावावी लागली. कित्येकांच्या मजकुराचा संक्षेप करावा लागला. ज्यांनीं आपल्या आठवणी लेखी न देतां तोंडींच मला सांगितल्या त्या मी घरीं येऊन लिहून काढून त्यांवर त्यांच्या संमतीच्या सह्या घेतल्या. तसेंच परगांवाहून आलेली मोडी लिपीचीं बाडें बालबोध करणें, कित्येकांमध्यें सन, तारखा भरणें, त्रुटित मजकुरानें लिहून पाठविलेल्या आठवणींचीं बाडें पूर्ण लिहून काढून पुन्हा तीं ज्यांचीं त्यांच्याकडे पसंतीकरितां पाठवून परत मिळविणें, अत्यंत दुर्वाच्य असलेला मजकूर खिळे जुळविणाऱ्यांच्या सोयीकरितां पुन्हा सर्व सुवाच्य लिहून काढणें वगैरे जिकीरीचीं कामेंहि करावीं लागलीं. तथापि प्रसूतिवेदनेसारखें हें काम मला वाटे यांत शंका नाहीं! एकदां एकाच्या मजकुरांत येऊन गेलेली सामान्य गोष्ट पुन्हा दुसऱ्याच्या मजकुरांत आली तर द्विरुक्तीचा दोष टाळण्याकरितां ती गाळण्यांत आली आहे. पण तींच गोष्ट विशेष महत्त्वाची असली व ती अनेकांच्या मजकुरांत आली असली तरी ती बुद्धिपुरस्सरच ठेवण्यांत आली आहे. कारण एका थोर ग्रंथकाराच्या मताप्रमाणें अशी पुनरुक्ति म्हणजे ती गोष्ट खरी असल्याचा एक उत्कृष्ट पुरावाच होय. तो लिहितो – "दहांनीं दहा प्रकारांनी एकच गोष्ट सांगितली असतां ती शास्त्रीय दृष्टया 'सिद्ध' म्हणून सहजच ठरते". उलटपक्षीं, जागेच्या अभावीं व काटकसरीच्या दृष्टीनें कांही चांगल्या बाबींसहि फांटा द्यावा लागला. उदाहरणार्थ, प्रत्येक आठवणींतील मजकुराचें द्योतक असें त्या त्या लेखकानें घातलेलें आकर्षक शीर्षक काढून टाकावें लागलें. शिवाय आठवणी पाठविणारांच्या बहुतेक सर्व लिखाणांत कांहीं ठराविक गोष्टींविषयीं आलेला सर्वसामान्य पण रसभरीत मजकूर पुनरुक्तीचा दोष टाळण्याकरितां गाळावा लागला. उदाहरणार्थ – (१) स्वतःची ताल्यासाहेबांविषयींची भक्ति, (२) त्यांचें प्रथमदर्शन व त्याचा आपल्या नावर झालेला परिणाम, (३) आपल्या स्वतःची माहिती, (४) मिरवणुकी, सभा, संमेलनें, मेजवान्या वगैरेंचीं थाटामाटाचीं वर्णनें, (५) तात्यासाहेबांची सर्वसामान्य स्तुति, (६) त्यांच्या मृत्यूबद्दल दुःखोद्गार, (७) आठवणी पाठविण्याबद्दल बापटांचा विलक्षण आग्रह इत्यादि. वस्तुतः ज्याच्या त्याच्या दृष्टीनें वरील प्रकारचा मजकूर ज्याचा त्यास महत्त्वाचा व अगत्याचा वाटणें स्वाभाविक आहे. फार काय, पण मलाहि त्यांत एकप्रकारची लज्जत आहे असेंच वाटतें. पण लज्जतदारपणा झाला म्हणून त्यासहि कांहीं सीमा आहेच. म्हणून याहि दृष्टीनें तो कमी करणें भाग पडलें हें लिहिण्यास दुःख होतें.

काटकसरीचा कमाल !

मजकूर व जागा यांनीं परस्परांस सामावून घेण्याच्या दृष्टीनें करण्यांत आलेल्या विशिष्ट काटकसरीचें आणखी थोडें दिग्दर्शन येथें करणें आवश्यक आहे. माझ्या अतिआग्रहाच्या विनंतीमुळें ज्या कांहीं सुहृदांनीं आपला मजकूर देण्याची कृपा केली, त्या प्रत्येकाच्या मजकुरांपैकीं फक्त एकचतुर्थांशच मजकूर घेऊन बाकीचा सर्व बाजूस ठेवावा लागला ! प्रत्यक्ष केळकर-कुटुंबीयांतील मंडळींनीं खरोखर आपल्या आठवणींचा पाऊस पाडला असता हें मला माहीत आहे. पण त्यांजकडूनहि हाताच्या बोटांच्या संख्येपेक्षां जास्त आठवणींच्या संख्येचा मजकूर घ्यावयाचा नाहीं असेंच मला निरुपायानें ठरवावें लागलें ! फार काय, पण प्रत्यक्ष मीं माझ्या नांवानें एकहि आठवण घातली नाहीं !! लो. टिळकांच्या तिन्ही आठवणी-खंडांत माझ्या नांवावर माझ्या स्वतःच्या आठवणींचीं १४२ पृष्ठें खर्चीं पडलीं आहेत ! पण केवळ परिस्थितीमुळें मला येथें संयम करणेंच भाग पडलें. स्वतःच्या घरीं घालण्यांत आलेल्या प्रयोजनांत प्रथम सर्वांना सन्मानपूर्वक संतुष्ट करणें व त्यांचा योग्य तो परामर्श घेणें हेंच कोणीहि झालें तरी आपलें आद्य कर्तव्य समजतो, व मगच स्वतःची सोय झाल्यास पाहतो, किंवा तसें कांहीं न जमल्यास त्याची क्षितीहि तो बाळगत नाहीं. विशेष सांगावयाचें म्हणजे, हाच न्याय या प्रत्यक्ष आत्मनिवेदनाच्या मजकुरासहि लावण्याचें मीं योजिलें होतें; पण कळकळीच्या कांहीं हितचिंतक सल्लागारांनीं व सहानुभवी मित्रांनीं व्यावहारिक दृष्टीनें तसें करणें अनिष्ट व अयोग्य आहे असें माझ्या मनावर बिंबविल्यामुळें संक्षेपतः वस्तुस्थितिकथनाचा मीं हा नम्र प्रयत्न केला आहे. शिवाय कै. गु. तात्यासाहेब यांच्या आठवणींचा ग्रंथ तयार करणें हें मी माझें खासगी काम समजत नसून, तें एक जबाबदारीचें, पवित्र व सार्वजनिक काम आहे असेंच मी मानीत असल्यामुळें, हें इतिवृत्त संक्षेपानें वाचकांस निवेदन करणें हेंहि मी आपलें कर्तव्यच समजतों.

इंग्रजींतील आठवणींचें स्वरूप

या ग्रंथांत संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांत आठवणी लिहिण्यांत आल्या आहेत. त्यांपैकीं पहिल्या तीन भाषांतील मजकुराविषयीं कांहीं न लिहितां, ग्रंथाच्या शेवटीं घालण्यांत आलेल्या फक्त इंग्रजी मजकुरासंबंधानें एवढेंच म्हणतों कीं, त्यांपैकीं कांहीं भाग फारसा आठवणीच्या स्वरूपाचा नसून तो निव्वळ गुणवर्णनपर (appreciation) असतांहि घेतला आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे; पण त्याचें कारण मी सांगण्यापेक्षां लो. टिळक यांच्या इंग्रजींतील आठवणींच्या माझ्या पहिल्या खंडाच्या पुस्तकास प्रस्तावना लिहिणारे कै. दे. भ. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या मार्मिक प्रस्तावनेंत जें कारण दिलें आहे तेंच येथेंहि लागूं पडणारें असल्यामुळें तें येथें उद्धृत करतों. तात्यासाहेब लिहितात :—

" The reminiscences contained in this book are mostly by those who came into contact with Lok. Tilak, but comparatively at a distance; and therefore they may look more like appreciations than reminiscences. But even these have their own value as coming from illustrious men and women, who were his contemporary judges and in a few cases also his co-workers. "

या स्मृति-मंदिराचे धनी कोण ?

अशा रीतीने उभारण्यांत आलेलें हे ' नरसिंह-स्मृति-मंदिर ' आहे. ' लो. टिळक-स्मृति-मंदिर ' तीन मजली (तीन खंड) असून हें ' केळकर-स्मृति-मंदिर' एकमजली असलें तरी तें आकारानें विस्तृत आहे. याचा अर्थ असा कीं, लोकमान्यांच्या आठवणींच्या तीन खंडांची पृष्ठसंख्या १८७५ असून त्यांच आठवणी-लेखक ७०० आहेत, तर प्रस्तुतच्या या एकाच ग्रंथाची पृष्ठसंख्या सुमारें ६७५ असून त्याचे आठवणी-लेखक सुमारें ३७५ आहेत. अर्थात् याचें श्रेय केवळ आठवणीदारांनाच आहे, मी फक्त निमित्तमात्र आहें; म्हणून म्हणतों – " आतां ग्रंथाचें दूषण-भूषण । सर्वस्व त्यांचे त्यांसी ॥ " तथापि, ग्रंथविषयक कामांत मी कांहीं केलें असेन तर तें मी न सांगतां एका ग्रंथकाराच्या खालील शब्दांतच व्यक्त केलेलें बरें. तो म्हणतो – " I have here made only a nosegay of culled flowers and have brought nothing of my own except the string that ties them. I am but a gatherer, and a disposer of other men's stuff." हाच विचार किंबहुना माझी खरी मनो-भावना टिळक-आठवणींच्या तिसऱ्या खंडाच्या आत्मनिवेदनांत शेवटीं मीं व्यक्त केली आहे. म्हणून पुनरुक्तीचा थोडा दोष पत्करूनहि पुन्हां तेच शब्द येथें उद्धृत करतों. "आठवणींच्या रूपानें हें वाङ्मयस्मारक ज्या अनेक स्त्री-पुरुषांच्या साहाय्यानें मला उभारतां आलें, त्या सर्व बंधुभगिनींस एकवार शेवटचें अभिवादन करून त्यांनी मजकडून हा सेवा करून घेतली याबद्दल प्रथम त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. वस्तुतः या स्मृति-मंदिराचे धनी त्यांचे तेच आहेत. फार तर त्याचे 'विश्वस्त' इतकेच कदाचित् माझें नातें असूं शकेल ! येवढेंच नव्हे, तर या बाबतीताल माझ्या अंतःकरणांतील सदैव जागृत असणारी भावना मी माझ्या शब्दांनीं व्यक्त न करतां, सत श्रीतुकाराम-महाराजांच्या शब्दानें सांगतों कीं, फोडिलें भांडार । धन्याचा हा माल । मी तव हमाल । भारवाही ॥

केळकर-मुक्तिसंग्रह प्रसिद्ध होणार काय ?

आठवणींच्या ग्रंथासंबंधानें जें काय थोडक्यांत म्हणावयाचें होतें त्याचें येथ-

वर निरूपण झालें. आतां एका गोष्टीसंबंधानें खुलासा करितों. वस्तुतः प्रस्तुत ग्रंथ तयार करण्याच्या आधीं 'टिळक-सूक्ति-संग्रह' या ग्रंथासारखा 'केळकर-सूक्ति-संग्रह' ग्रंथ तयार करण्याची माझी मनीषा होती. कारण एक तरं त्यासंबंधीं मीं पूर्वीच थोडीबहुत तयारी करून ठेविली होती. दुसरें असें कीं, आठवणींच्या ग्रंथाचें काम परावलंबी, दीर्घसूत्री व सर्वस्वी परेच्छाधीन असल्यामुळें तें सावकाश व यथाकाल होणारें आहे. उलट, 'सूक्ति-संग्रह' ग्रंथाचें काम हें एकहातीं, स्वावलंबी व सर्वस्वीं स्वाधीनचें आहे. तथापि हा ग्रंथ झाला तरी, तो ताबडतोब प्रसिद्ध होणें कठीणच होतें. कारण तात्यासाहेब यांनीं आपल्या पन्नास वर्षांच्या राजकीय चळवळीच्या उद्योगाबरोबरच श्रीसरस्वतीदेवीची उपासना कांहीं थोडी-थोडकी केलेली नाहीं. किंबहुना मुख्यतः या देवतेच्या सेवेच्या द्वारेंच त्यांनीं आपलें जीवितकार्य पूर्ण केलें आहे. यामुळें त्यांच्या अगाध वाङ्मयोदधींचें अवगाहन करून त्यांतून ओजस्वी, दीप्तिमान्, संग्राह्य व संस्मरणीय अशा सूक्तींचीं पाणीदार मौक्तिकें गोळा करण्याचें अवघड कार्य झटपट होणारें नाहीं, हें अगदीं उघड आहे. तथापि, इतस्ततः पडलेले आठवणींच्या पाण्याचे थेंब एकत्र करून त्यांच्या सुंदर सरोवराचा ग्रंथ निर्माण करण्यास लागणाऱ्या प्रदीर्घ काळापेक्षां 'सूक्ति-संग्रह' बनविण्याचें कार्य अल्प काळांत जनतेच्या सेवेस सादर करतां येईल असें मला वाटतं होतें; परंतु हेंहि खरें कीं, जसजसा काळ निघून जातो तसतसें लोकांना आठवणींचें विस्मरण होतें, व्यक्ति नाहींशा होतात व एकंदर परिस्थितींतहि बदल होतो. या अशा अनेक कारणांमुळें हें कार्य अधिकच बिकट होतें, हा लोकमान्यांच्या आठवणींचे ग्रंथ तयार करतांना आलेला पूर्वानुभव लक्षांत घेऊन, प्रस्तुतचा ग्रंथ प्रथम प्रसिद्ध करून नंतर मग 'केळकर-सूक्ति-संग्रह' हा ग्रंथ प्रसिद्ध करावा असें मीं मनाशीं निश्चित ठरविलें आणि त्या उद्योगास लागलों. त्याप्रमाणें दि. २१ नोव्हेंबर १९४७ च्या 'केसरीं'त "केळकर-सूक्ति-संग्रह प्रसिद्ध होणार" या शीर्षकाखालीं मीं खालील मजकूर प्रसिद्ध केला आहे :- "आठवणींचा ग्रंथ प्रसिद्ध होतांच त्याच्या पाठोपाठ 'केळकर-सूक्तिसंग्रह' हा ग्रंथहि प्रसिद्ध होईल असें मी नम्रपणें जाहीर करतों. वास्तविक एक टप्पा सोडून पुढील लांबच्या टप्प्याविषयीं आगाऊ बोलणें, त्याची परिस्फुटता करणें, माझ्या मनास व स्वभावास मानवणारें नाहीं. परंतु गेल्या 'केसरीं'तील अग्रलेखांत एतद्विषयक आलेला मजकूर लक्षांत घेऊन माझ्या सुहृदांच्या व मित्रमंडळींच्या सल्ल्यावरून नाइलाजास्तव ही नम्र घोषणा आजच करणें मला भाग पडलें आहे." या घोषणेप्रमाणें प्रस्तुत आठवणींचा ग्रंथ आतां हातावेगळा झाल्यानंतर त्या उद्योगास लागण्याला मी मोकळा होत आहें. परंतु वयोमान व मुख्यतः गेल्या चार-सहा महिन्यांत जडलेल्या कांहीं विशिष्ट व्याधीमुळें भासूं लागलेली शक्तिक्षीणता व त्यामुळें उत्पन्न होणारा स्वतःविषयींचा

अविश्वास यांमुळें माझ्या हातून हें कार्य कसें काय पार पडेल या भीतीनें मात्र मन अस्वस्थ आहे. प्रभुकृपें काय घडेल तें खरें ! असो.

ग्रंथाची प्रस्तावना म्हणजे पृथ्वीस आधारणारा शेष !

शेवटचें काम म्हणजे आभार-प्रदर्शनाचें. क्रमांकानें हें कलम शेवटचें मानण्यांत येत असलें तरी, वस्तुतः मनोव्यापारांत त्याचें आद्यस्थान आहे. प्रथम, हा ग्रंथ वाचकांच्या हातीं देण्यास प्रामुख्येंकरून जे कारणीभूत झाले त्या सर्व आठवणी-लेखकांचे मी पुन्हां एकवार मनापासून आभार मानतों. तसेंच ज्या सहृदय स्वकीयांनीं हस्तें-परहस्तें आठवणी मिळवून देण्याची मला मदत केली त्या अनेक परोपकारी सज्जनांचे उपकार मी विसरणे अशक्य आहे. अर्वाचीन काळच्या वाङ्मय-युगांतील ग्रंथरचनेंत ग्रंथाइतकाच किंबहुना अधिकच ग्रंथाच्या प्रस्तावनेस मान व महत्त्व देण्यांत येत असतें; आणि त्यांत प्रस्तावना-लेखक जितका थोर, विद्वान् व प्रसिद्ध, आणि त्यांची प्रस्तावना जितकी मोठी, मार्मिक व विवेचक असेल तितकें त्या ग्रंथास स्वाभाविकच मोठेपण येत असतें. फार काय पण, छत्रीचा जसा दांडा, फुलाचा जसा देठ, शरीराचें जसें नाक, मंदिराचा जसा कळस, सभेचा जसा अध्यक्ष, सैन्याचा जसा सेनानायक, वाद्यांच्या मिरवणुकींतील जसा चौघडा, इतकेंच नव्हे तर, नक्षत्रांत जसा चंद्र, तेंच स्थान ग्रंथाच्या प्रस्तावनेचें होय असें अर्वाचीन काळीं सर्वत्र समजण्यांत येतें. या दृष्टीनें 'केसरी'चे माजी संपादक व गीतामंजरीकार विद्वद्वर्य श्री. जनार्दन सखाराम ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेल्या विद्वत्ताप्रचुर प्रस्तावनेबद्दल मी त्यांचा ऋणी आहें. लोकमान्यांच्या आठवणींच्या पहिल्या खंडास तात्यासाहेब केळकर यांनीं प्रस्तावना लिहिली. त्या तात्यांच्या आठवणींच्या ग्रंथास या तात्यांनीं प्रस्तावना लिहिण्याच्या आलेल्या योगाबद्दल मला फार आनंद होत आहे. तसेंच या ग्रंथाच्या शेवटच्या सर्व मुद्रितांवरून त्यांची सराईत नजर फिरून ती सर्व मुद्रितें बारकाईनें तपासण्याचें कार्य त्यांनीं केलें असल्यामुळें माझें मन या बाबतींत निश्चित आहे. अशा रीतीनें तात्यासाहेब करंदीकर यांनीं केलेल्या द्विविध व जबाबदारीच्या कार्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

केळकरांचें घर म्हणजे माहेरघर !

प्रस्तुतसारख्या ग्रंथाचें स्वरूपच असें आहे कीं, त्यास अनेकांचे हात लागल्याखेरीज तो सिद्ध होऊंच नये. म्हणून विनंती केली असतां अनेकांनीं अनेक रीतींनीं साह्य केलें हें तर खरेंच; पण विनंती करण्यापूर्वीच आपणहून स्वयंस्फूर्त मदत करण्याची ज्यांनीं उत्कट इच्छा दर्शविली, त्यांच्या निरपेक्षपणाबद्दल कसें उतराई व्हावें हेंच मला समजत नाहीं. कै. तात्यासाहेबांचे भक्त व माझे जुने स्नेही श्रीयुत रा. द. ऊर्फ पंतपराडकर हे या श्रेणींतील असून, त्यांनीं केवळ तात्यासाहेबांच्या प्रेमाखातर या ग्रंथाचीं दुसरीं

मुद्रितें तपासण्याचे श्रम घेतले व आपल्या मुद्रणकलाभिज्ञतेचाहि लाभ दिला याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतों. कै. गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचें घर म्हणजे माझें स्फूर्तिस्थान व माहेरघर असल्यामुळें आभारप्रदर्शनाच्या कलमांत त्यांच्या घरच्या मंडळींचा उल्लेख येथें झालेला पाहणें हें त्या सदभिरुचीच्या व निरपेक्ष मंडळींना मुळींच आवडणार नाहीं; त्या मंडळींचे आंभार मानणें म्हणजे मी माझे स्वतःचेच आभार मानण्यासारखें होणार आहे, अशी वस्तुस्थिति आहे. पण हें जाणूनहि, केवळ माझ्या समाधानाचा स्वार्थ साधण्याकरितां ह्या मंडळींपैकी व्यक्तिशः कोणाचाच उल्लेख न करतां, समष्टिरूपानेंच त्या सर्व मंडळींचे, त्यांनीं केलेल्या हरेक मदतीबद्दल, मी मनोभावें आभार प्रदर्शित करतों.

मदतनिसांचे आभार

वर म्हटल्याप्रमाणें या ग्रंथास ज्यांच्या मदतीचे हात लागून हा ग्रंथ हातावेगळा होण्याचें मला समाधान होत आहे, त्या मंडळींत 'केसरी'चे माजी संपादक रा. वासुदेव कृष्ण भावे, रा. दामोदर विश्वनाथ गोखले, केसरीचे उपसंपादक रा. जयंत श्रीधर टिळक, इतिहाससंशोधक रा. शंकर नारायण जोशी, राष्ट्रीय कीर्तनकार रा. वासुदेव शिवराम कोल्हटकरबुवा, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे चिटणीस रा. गोपाळ आबाजी ऊर्फ तात्यासाहेब देशपांडे, विलायतेंतील 'केसरी'चे प्रतिनिधि रा. दत्तात्रय विश्वनाथ ताम्हनकर, वैदिक-संशोधन-मंडळांतील कार्यकर्ते रा. दिगंबर वासुदेव नेनेशास्त्री, रा. कुंज-विहारी लक्ष्मण भोपटकर, केसरी-मराठा संस्थेचे व्यवस्थापक रा आत्माराम रावजी भट, चिरंजीव प्रभाकर दत्तात्रय दामले, रा. यशवंत कृष्ण ठकार, रा. ग. र. वैशंपायन, रा. शं. दा. चितळे, मुंबईचे सह्याय-ऑफिसर रा. श्रीपाद नरहर सप्रे, 'सह्याद्रि' मासिकाच्या जुळणी-विभागाचे प्रमुख रा. भास्कर महादेव कुलकर्णी व त्यांचे सहकारी व मुद्रितें तपासणारे श्री. त्र्यं. रा. दामले, ग. भा. क्षीरसागर, द. वि. जोग, न. भा. काळे, हे प्रमुख असल्यामुळे त्यांचे मी मनापासून आभार मानतों. तसेंच ग्रंथाच्या मलपृष्ठावरील तीनरंगी चित्र श्री. जनार्दन दत्तात्रय गोंधळेकर यांनीं अगदीं लवकर तयार करून दिल्याबद्दल त्यांचेहि आभार मानणें उचित आहे.

विश्वस्त-त्रयींचें ऋण

खरोखर आभार मानण्यासारखें गोड काम दुसरें कोणतेंहि नसेल. कारण आभार मानणें म्हणजे आपली कृतज्ञता व्यक्त करणें होय; आणि कृतज्ञता व्यक्त करणें म्हणजे ऋणमुक्ततेचें कांहींसें समाधान मिळविण्यासारखें आहे. पण कृत-ज्ञतेची व्याख्या 'अधिक मदतीची अपेक्षा' अशी मर्मज्ञ लोक करतात. तेव्हां हे आभार म्हणजे व्याजी लावलेलें भांडवलच होय असें कोणी म्हणेल! परंतु तशी भावना मनांत न बाळगतां निर्लोभीपणानें हें आभारप्रदर्शनाचें काम मी करीत

आहें. सर्वांत शेवटचे पण अत्यादरपूर्वक व कृतज्ञताबुद्धीनें अंतःकरणापासून आभार मानावयाचे ते 'केसरी-मराठा' संस्थेचे विश्वस्त यांचे होत. रा. जनार्दन सखाराम करंदीकर, रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर व रा. गजानन विश्वनाथ केतकर या विश्वस्तत्रयीच्या झालेल्या साहाय्याबद्दल त्यांचे आभार मला शब्दांनीं व्यक्त करतां येणें अशक्य आहे. या त्रयमूर्तीनें मिळून व शिवाय व्यक्तिशः, विशिष्ट प्रकारचें जें अमूल्य साहाय्य केलें आहे, त्या योगानें त्यांनीं मला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे; इतकेंच नव्हे तर, हा ग्रंथ सर्वतोपरी त्यांचाच आहे असें म्हणण्यांत काडीमात्राहि अतिशयोक्ति मी करीत नाहीं अशी माझी भावना आहे.

तात्यांचे आशीर्वाद

प्रस्तुत ग्रंथाची योजना गुरुवर्य तीर्थस्वरूप तात्यासाहेब केळकर यांना अभिप्रेत कशी नव्हती हें आरंभीं मीं सांगितलेंच आहे. अर्थात् त्यांना अभिप्रेत नसतांना, म्हणजे त्यांच्या कांहींसें मनाविरुद्ध, पण त्यांच्याविषयी वसत असलेल्या गाढ, थोर व अकृत्रिम प्रेमामुळें आणि केवळ कृतज्ञताबुद्धीमुळेंच हा ग्रंथ तयार करण्यांत आला आहे. पण तो तयार होत असतां झालेले खटाटोप वगैरे त्यांच्या अतींद्रिय ज्ञानास गोचर होऊन, शेवटीं त्यांनीं मजवरील विशिष्ट ममत्वबुद्धीमुळें आशीर्वादात्मकच उद्गार काढले असले पाहिजेत अशी माझी दृढ श्रद्धा आहे. हे त्यांचे आशीर्वाद खालीं दिलेल्या 'श्रीसमर्थहृदयांतील' शब्दांतच सांगितलेले बरे :–

जें जें त्वां कांहीं केलें । तें तें सर्व आम्हां पावलें ।
तुजकडे त्यांतील कांहीं न उरलें । येणें तुज घडलें आत्मनिवेदन ॥

प्रस्तुत आत्मनिवेदनात्मक लेखाच्या आरंभीं श्रीमद्भागवतांत उद्धवास उद्देशून भगवंतांनीं काढलेले उद्गार अवतरित केले आहेत त्यांतीलहि बीज हेंच होय !

वाचक-वृंदास प्रार्थना

शेवटीं, सद्गुरु श्रीसमर्थांच्या शब्दांत वाचकांची प्रार्थना करून हें लांबलेलें आत्मनिवेदन समाप्त करितों.

इतुकें बोलिलें स्वभावें । त्यांत मानेल तितुकें घ्यावें ॥
श्रोतीं उदास न व्हावें । बहु बोलिलें म्हणोनी ॥
चुकत बाकत आठवलें । इतुकें संकलित बोलिलें ॥
न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ॥

केळकर प्रथम श्राद्ध-दिन :
आश्विन वद्य ३०, शके १८७०
केसरी कार्यालय, पुणें २.

सर्वांचा नम्र सेवक,
सदाशिव विनायक बापट

जीवन-संदेश

अर्थात्

तात्यासाहेबांचा अखेरचा लेख



तीर्थरूप तात्यासाहेब केळकर यांच्या निर्याणानंतर, त्यांच्या कांहीं पुऱ्या व कांहीं अपुऱ्या हस्तलिखितांची जुळवाजुळव करीत असतां, 'ऐलथडीचा मोक्ष' हा अप्रतिम लेख माझ्या हातीं आला. या लेखाच्या पहिल्या दहापांच ओळी वाचल्यावर एकदम असें वाटलें कीं, जणूं कांहीं त्यांनीं आपला जीवन-संदेशच, आपणांमागें लोकांस पहावयास सांपडावा म्हणून आपल्या हातानें लिहून ठेवला आहे! जीवन ही एक चमत्कारिक समस्या आहे; त्याचें उत्तर सर्वांनाच सांपडत नाहीं. १९४६ च्या ऑगस्टमध्ये आमच्या घरीं 'मोक्षाची कल्पना' या विषयावर त्यांची ध्वनि-मुद्रिका घेतली गेली. त्यांत त्यांनीं सांगितलें कीं 'मोक्षाची पेठ' म्हणून या जगाच्या पलीकडे कांहीं वस्तु आहे असें नाहीं. मोक्ष हा या जगांत, इतकेंच नव्हे तर, याच देहीं याच डोळां अनुभवावयास सांपडतो. या पुस्तकांत आठवणी लिहिणारांच्या मनांत, मानवी आयुष्याच्या पैलथडीला गेलेले तात्यासाहेब आपला संदेश म्हणून एक-दोन शब्द तरी सांगतील काय, अशी भावना खात्रीनें येत असेल. त्यांचें कांहीं अंशीं तरी समाधान होईल अशा अपेक्षेनें, हा लेख इतरत्र कोठेंहि प्रसिद्धीला न देतां, मी याच पुस्तकाकरितां देत आहें.

— काशिनाथ नरसिंह केळकर

ऐलथडीचा मोक्ष

(ने. न. चिं. केळकर)

आजच्या निबंधाला मीं 'ऐलथडीचा मोक्ष' असें शीर्षक दिलें आहे. पण एक काना कमी करून 'ऐलथडीच मोक्ष' असें दिलें असतें तरी योग्य झालें असतें. इतकेंच नव्हे तर, मोक्ष हा ऐल व पैल अशा दोन थडींस असतो असें म्हणण्यापेक्षां तो पैलथडीला नसून ऐलथडीसच आहे, असें प्रतिपादन मला किंचित् आग्रहानें करावयाचें आहे. तथापि ऐल व पैल या थडी म्हणजे काय व कशाच्या, याचा थोडा विचार प्रथम करूं. थडी म्हणजे कांठ व तीर. हे शब्द सामान्यतः नदीच्या दोन कांठांना, बाजूंना लावतात. मग या दोन कांठांच्या मध्यें काय आहे? तर नदीचा प्रवाह. लाक्षणिक अर्थानें हे शब्द घ्यावयाचे तर, ऐलथडीचा मोक्ष म्हणजे मृत्यूपूर्वी इहजन्मरूपी नदीच्या अलीकडे लाभणारा मोक्ष; व पैलथडीचा मोक्ष म्हणजे मृत्यूनंतर पलीकडे लाभणारा मोक्ष. मध्यंतरींच्या या जलसमूहाला किंवा प्रवाहाला 'मायानदी' किंवा 'भवसागर' असे रूढ शब्द आहेत. पावसाळ्यांतल्या नदीच्या पात्रापेक्षां उन्हाळ्यांतील पात्र लहान असतें. परंतु हें नित्य कोरडें व प्रसंगविशेषीं भरून राहणारें असें मिळूनच इहजन्मरूप नदीचें पात्र म्हणतां येतें. त्याचा प्रारंभ जन्मापासून होतो व शेवट मृत्यूंत ठरतो. ही मायानदी किंवा हा भवसागर तरून जाणें या दोनहि गोष्टी मोठ्या, सामान्य माणसाच्या लागी नाहींत, असें समजण्यांत येतें. प्राकृत कवि म्हणतो, "उलट उलट माधारी सखया फिर गोते खाशी। हरिमायेचा खेळ कळेना टांगिल उफराटी। या मायानदीचं पाणि गड्यार बिगीच वसरना" इत्यादि. संस्कृत वाङ्मयांत भवसंसार, संसृति, माया यांना समुद्राची उपमा दिली आहे.

ज्ञानेश्वरीच्या सातव्या अध्यायांत या माया नदीचें रूपक अनेक अंगांनीं वर्णिलें आहे; तें असें. ही माया नदी ब्रह्मरूप पर्वताच्या कड्यावरून संकल्परूप उडी घेऊन निघाली. प्रथम तिजमध्यें पंचमहाभूतांचा बुडबुडा आला. प्रवृत्ति व निवृत्ति या दोन कांठांबाहेर पडून ती वाहते. तिजवर त्रिगुणांचा पर्जन्य पडून मोहरूप पूर येतो. त्यानें यमनियमांचीं गांवें वाहून जातात. तिला मत्सररूपी वळणें पडतात. तिच्यांत द्वेषादि मोंवरे उठतात. कामविकारांचे मासे चमकतात. तिजवर सुखदुःखरूप

वोसाणं तरंगत फिरतात. निजमध्यें जीवरूप केसाचे पुंजके दिसतात. तिला अहंकाराची मोठी धार आहे. विषयरूप लाटा उठतात. जन्ममृत्युरूप खळगे पडतात. हिच्यांतून तरून जाण्याकरितां बुद्धिरूप हात टाकून कोणी पोहतात. कोणी वेदरूपी सांगाडीवर बसतात. कित्येकांनीं यज्ञरूप नांवा लोटल्या. " तया पाणियाचे निवाहिले पणें। अजुनी न धरिती वोभाणें। ऐसा मायापूर हा कवणें। तरि जल गा ॥ येथ एक नवलावो। जो जो कीजे तरणो पावो। तो तो अपावो। होय ते ऐक ॥ पाडस वागुर करांडी। जरी मेरू मुंगी वोलांडी। तरी मायेची पैलथडी। देखती जीव ॥ "

समष्टिदृष्ट्या, सामुदायिकरीत्या ही सर्व सृष्टि मिळून मायानदी होते.त्याप्रमाणें व्यक्तिदृष्ट्या जन्मापासून मरणापर्यंतचें मनुष्यजीवन हा त्या मायानदीचाच एक फांटा ठरतो. पण तोहि तरून जाणें हें, ती मोठी नदी तरून जाण्याइतकेंच कठीण ठरतें. व्यक्तिजीवनाची लौकिक यशस्विता ही परमार्थदृष्ट्या यशस्विता नव्हे. तिची खूण वेगळीच होय आणि ती खूण म्हणजे मोक्षप्राप्ति किंवा मोक्षपात्रता.

प्रस्तुत लेख मोक्षाविषयीं असला तरी त्याची भूमिका बुद्धिप्रामाण्यवादीच आहे. कारण मोक्ष म्हणजे जीवाची अंतिम किंवा उत्तमांत उत्तम स्थिति व गति. मग ती जिवंतपणीं असो किंवा मरणोत्तर असो. बुद्धिप्रामाण्यवादी म्हटला म्हणजे तो नास्तिक किंवा चार्वाकमतानुयायीच असला पाहिजे अशी सामान्य समजूत असते; पण ती खरी नाहीं. कारण त्यालाहि विश्वकर्ता ईश्वर म्हणून कोणी आहे हें मान्य करावेंच लागतें. त्याला देहभोगाच्या व्यतिरिक्त इतर कांहीं ध्येय म्हणून असतेंच. चार्वाकाला कोणतींच नैतिक मूल्यें मान्य नव्हतीं. बुद्धिप्रामाण्यवादीयांमध्येंहि मतभेद असतो तो या ईश्वराचें स्वरूप आणि ईश्वर व मनुष्यजीव यांचे परस्पर संबंध काय आहेत यापुरताच असतो. तथापि या दोघांचे मार्ग दूरवर एकच कसे आहेत, आणि फुटतात तेथून पुढें कसे जातात, व हें पुढील अंतर किती थोडें असतें, हें या लेखांतील विवेचनावरून पुढें दिसून येईलच.

प्रथम मोक्ष या शब्दाचा अर्थ काय हें पाहूं. त्याची सर्वसंमत व्याख्या एकच अशी नाहीं. पण सामान्यतः यांत दोन कल्पनांचा अंतर्भाव होतो. (१) ईश्वरप्राप्ति व (२) जन्म-मरणाच्या बंधनापासून सुटका. स्वतः शंकराचार्यांनीं गीतेच्या १३ व्या अध्यायांतील ११ व्या श्लोकावरील भाष्यांत मोक्षाचा अर्थ दिला आहे तो असा – ' अध्यात्मज्ञाननित्यत्वं न तत्त्वज्ञानार्थदर्शनं। एतज्ज्ञानमिति प्रोक्तं अज्ञानं यत् अतोऽन्यथा ' हा श्लोक. त्यावरचें भाष्य असें – " आत्मादिविषयं ज्ञानं। तस्मिन् नित्यभावः। अमानित्वादीनां

ज्ञानसाधनानां भावनापरिपाकनिमित्तं तत्त्वज्ञानं । तस्य अर्थः मोक्षः संसारस्य उपरमः । तस्य आलोचनं तत्त्वज्ञानार्थं दर्शनं । तत्त्वज्ञानफलालोचने हि तत्साधनानुष्ठाने प्रवृत्तिः " लोकमान्य टिळकांनीं हा अर्थ गीतारहस्यांत खालीलप्रमाणें सांगितला आहे – " ज्ञान म्हणजे क्षेत्र-क्षेत्रज्ञ किंवा प्रकृति व पुरुष यांच्या विवेकाचें ज्ञान. विभक्त दिसणाऱ्यांमध्यें अविभक्तता एकत्व पाहणें. पण हें ज्ञान केवळ बुद्धीनें जाणणें एवढाच अर्थ मोक्षशास्त्रांत विवक्षित नसतो. त्या ज्ञानाचा देहस्वभावावर साम्यबुद्धिरूप परिणाम घडला असला पाहिजे. एरवीं तें ज्ञान अपुरें किंवा कच्चें होय. म्हणून ज्ञान म्हणजे ' बुद्धीला अमुक अमुक कळणें ' असें न सांगतां ' मान व दंभ सुटणें; अहिंसा, अनासक्ति, समबुद्धि इत्यादि वीस गुण मनुष्याच्या अंगांत दृष्टीस पडूं लागले म्हणजे त्याला म्हणावें ' असें वरील श्लोकानें गीतेंत सांगितलें आहे ". हे वीस गुण कोणते हें कळणें इष्ट आहे. ते असे :– (१) अमानित्व (२) अदंभित्व (३) अहिंसा (४) शांति (५) आर्जव (६) आचार्योपासना (गुरुभक्ति) (७) शौच (८) स्थैर्य (९) आत्मविनिग्रह (१०) वैराग्य (११) अहंकाराचा अभाव (१२) जन्ममृत्युजराव्याधि हे दोष आहेत अशी जाणीव (१३) अनासक्ति (१४) संसारांत लंपट होऊन न राहणें (१५) इष्ट व अनिष्ट फलप्राप्तीविषयीं समबुद्धि (१६) ईश्वराविषयीं अनन्यभक्ति (१७) एकांतवासाची आवड व (१८) जनांच्या गर्दीत मिसळून राहण्याची नावड (१९) अध्यात्मज्ञानाच्या नित्यत्वावर विश्वास (२०) तत्त्वज्ञानाचें परिशीलन.

या सर्वांवरून हें दिसून येईल कीं, मोक्ष म्हणजे (१) (बुद्धीनें) विशिष्ट अध्यात्मज्ञानसंपन्न आणि (अंतःकरणानें) विशिष्ट मानव (नैतिक) गुणसंपन्न अशी स्थिति होय. म्हणूनच ' मोक्षस्य न हि वासोऽस्ति न ग्रामांतरमेव वा ' – ' मोक्ष नांवाचें वसतिस्थान म्हणून कोठें (बांधलेलें) नसतें; किंवा मोक्षाला जाणें म्हणजे आपण उठून परगांवीं जातों तसें ग्रामांतर करणें नव्हे ' हें वचन सार्थच होय. याचा अर्थ मोक्ष हा मनुष्याला (याच जन्मीं) अनुभवसाध्य असतो.

बुद्धिप्रामाण्यवादी झाला तरी मोक्षाच्या वरील व्याख्येला तो काय म्हणून नांवें ठेवील ? कारण विश्व हें विविध विचित्र अनेक असलें तरी अंतिमस्वरूपी तें एकात्मच होय, अशी कल्पना (Unity of the Universe) समन्वयपद्धतीनें (Synthesis) त्याला करतां येते व तो करतोहि. त्याच्या या एकात्मतेच्या कल्पनेंत सूक्ष्म भेदछटा राहात असली तर, आपल्या वैदिक द्वैत-वेदांत्यांच्या तत्त्वज्ञानांत जी सूक्ष्म भेदबुद्धीची छटा असते, तिच्याहून ही अधिक नाही खास; आणि ज्ञानसंपन्नतेच्या यथार्थपणाला अवश्य अशा ज्या

वीस गोष्टी वर सांगितल्या आहेत त्यांत तर बुद्धिप्रामाण्यवादी हा जी नीति म्हणून समजतो तिचा बहुतेक सर्वसंग्रहच आहे.

वैदिक तत्त्वज्ञानाप्रमाणें जीवाला मोक्षप्राप्ति होण्याला ज्या शिडीवरून चढावे लागतें त्याच्या पायऱ्या – पायंडे खालीलप्रमाणें आहेत – (१) जीव धारण व रक्षण करणें याला अजाणतें कर्म म्हणतां येईल. (२) जाणतें कर्म म्हणजे संसारप्रयोगी कर्म. तें वर्णाश्रमधर्माच्या नियमाप्रमाणें म्हणजे 'विहित' या शब्दानें वर्णन करण्यासारखें असावें. हें नित्यकर्म, कर्मयोगांतील कर्म. (३) हें कर्म करतांना कर्त्यानें त्याच्या फलाची इच्छा ठेवूं नये. निदान त्या-विषयीं आसक्ति तरी नसावी. (४) आपण करतों तें सर्व कर्म ईश्वराप्रीत्यर्थ व ईश्वरार्पण असें समजावें. (५) असें केल्यानें चित्तशुद्धीला प्रारंभ होतो. (६) मग या चित्तशुद्धीला विशेष साहाय्य म्हणून, ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें, हठयोग किंवा ईश्वरभक्ति, भजन (पूजाअर्चा, नामस्मरण इत्यादि) यांचा अभ्यास करावा. (७) यानें समत्वबुद्धि म्हणतात ती प्राप्त होते. (८) आणि समत्वबुद्धि प्राप्त झाल्यानें सम्यक् ज्ञान होतें. (९) या ज्ञानसंपन्नतेची स्थिति हाच मोक्षहीच जीवन्मुक्ति; परंतु (१०) मरणोत्तर विदेहमुक्तिहि आत्म्याला लाभते. तिचेचार प्रकार मानण्यांत येतात, ते असे – (१) सलोकता (२) समीपता (३) सरूपता (४) सायुज्यता. यांपैकीं द्वैतमत वादी पहिल्या तीन प्रकारच्या मोक्षावर संतुष्ट असतात; पण अद्वैतवादी केवळ सायुज्यतेचाच मोक्ष मानतात.

अशा रीतीनें ही दहा पायंड्यांची शिडी तयार होते; परंतु एका जुन्या वैदिक तत्त्वज्ञानशास्त्राप्रमाणें (मीमांसा) या शिडीवर चढतांना प्रथम जवळच एक आडवाट फुटते, आणि तिजवरून बाजूला जाणारा जीवात्मा स्वर्गलोक, पितरलोक म्हणून जीं वसतिस्थानें आहेत तेथें जाऊन राहतो. या स्वर्गलोकांत जाण्याची इच्छा असेल तर त्याला यज्ञ हें साधन सांगितलें आहे; आणि पितरलोकांत जाण्याची इच्छा असेल त्याला श्राद्धादि कर्में हें साधन सांगितलें आहे; परंतु हीं दोन्हीहि कर्में बोलूनचालून काम्यकर्मेंच होत. म्हणजे विशिष्ट फलप्राप्तीची इच्छा मनांत ठेवूनच केलेलीं कर्में होत. अर्थात् वेदान्त (द्वैत असो, अद्वैत असो) शास्त्रांत सांगितलेला मार्ग हा नाहीं; आणि मीमांसा-शास्त्र निरीश्वर मानण्याचें कारण हेंच कीं, त्या शास्त्रानें विहित म्हणून सांगितलेल्या शास्त्राची फलश्रुति स्वर्गप्राप्तींतच समाप्त होते. प्रत्यक्ष ईश्वरप्राप्तीपर्यंत जातच नाहीं.

यावरून हें दिसून येईल कीं, स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी म्हणवून घेणारे लोक वैदिक मीमांसकांपेक्षां वेदांती मोक्षवाद्यांनाच अधिक जवळचे आहेत. कारण मोक्षप्राप्तीच्या शिडींतला क्रम व कार्यक्रम या दोघांनाहि

सारखाच मान्य आहे. कसें तें पहा. त्यांना जीवधारण हें कर्तव्य वाटतें. ते कर्मयोगवादी आहेतच, मात्र ते सर्वस्वीं सनातन पद्धतीचा वर्णाश्रमधर्म मानीत नाहींत. पण आतां तो धर्म हिंदुसमाजांत कितीसा उरला आहे? जन्मसिद्ध वर्ण म्हणजे जाति असें मानण्यापुरताच तो उरला आहे, किंवा त्याचें तसें विकृत रूपांतर झालें आहे. गुणाप्रमाणें वर्णकर्म आणि आश्रमधर्माचें तत्त्व बुद्धिप्रामाण्यवादीहि तें चांगलें ध्येय म्हणून मान्यच करतात. बुद्धिप्रामाण्यवाद्यांना निष्कामता अनासक्तीपुरती तरी मान्य असतेच. मात्र ते प्रयत्नवादी, प्रगतिवादी, उत्कर्षवादी, उत्क्रांतिवादी असल्यामुळें, उद्योग केल्यासारखें कर्माचें कांहीं फल मिळावें असें ते मानतात. स्वार्थत्यागानें होणारी बुद्धीची शुद्धता त्यांना इष्ट व मान्य आहे; आणि प्रत्यक्ष मोक्ष म्हणजे काय याची त्यांची कल्पना अद्वैतवाद्यांशीं मिळती नसली तरी, जीवन्मुक्ताला लागणारे गुण हे नीतिगुण म्हणून त्यांना मान्य असतात. फरक पडत असला तर मरणोत्तर जीवाची – आत्म्याची काय स्थिति होते या विषयापुरता पडतो. त्याला आत्म्याचा पुनर्जन्म मान्य असो नसो. परंतु जीव हा आत्मरूप असला व त्याला ईश्वराशीं तादात्म्य मिळवितां येते हा सिद्धान्त खरा असला, तरी त्याशीं बुद्धिप्रामाण्यवाद्याला कांहीं कर्तव्य नाहीं. मुख्य मुद्दा हा आहे कीं, (१) जीवस्थितींत 'मोक्ष' मिळविण्याचा वेदान्ती मार्ग आणि बुद्धिप्रामाण्यावर आधारलेला नीतिनिष्ठ मनुष्यजीवनमार्ग यांत अभेदच आहे, एकरूपताच आहे. पण मला प्रस्तुत विशेषेंकरून सांगावयाचें तें हें कीं, (२) ईश्वराव्यतिरिक्त वेगळे असे स्वर्गलोक व पितरलोक वेदान्ती तत्त्वज्ञानानें निर्मूळ किंवा अमान्य केले नसले तरी, त्यांची त्यानें जी निंदा व जो निषेध केला आहे त्यांत बुद्धिप्रामाण्यवादी सहमतच आहे. मात्र तो एक पायरी आणखी पुढें जातो व असेंहि मानतो कीं, स्वर्गलोक व पितरलोक इत्यादि लोक मुळी अस्तित्वांतच नाहींत; केवळ मानीव आहेत. मनुष्यापुरतें जें काय आहे तें एक ईश्वर आणि ईश्वरनिर्मित सृष्टि व त्यांतील मनुष्याचें स्थान.

पण शेवटचा मुद्दा म्हणजे मूलभूत भेद सोडून देऊन स्वर्गलोकादिकांच्या निंदानिषेधांत उभयतांचें जें ऐकमत्य आहे तें कसें हें पाहूं. बुद्धिप्रामाण्यवादी असें मानतो कीं, स्वर्ग-नरक, पितरलोक, भूतपिशाचलोक, यक्षगंधर्वलोक हे खरे नाहींत. आतां उत्क्रांतितत्त्वाप्रमाणेंहि कृमिकीटकापासून पुढें परिणति होऊन मनुष्य झाला त्याप्रमाणेंच, मनुष्याहून श्रेष्ठ म्हणजे अधिक परिणत, अधिक अध्यात्मगुणसंपन्न अशा अतिमानुष प्राण्यांच्या जीवांचाहि वर्ग असावा; तो कां नसेल असा तर्क चालवित्यास तो चालण्यासारखा आहे.

आणि सुशिक्षित आधुनिक अशा वर्गांमध्येंहि (उदा. थिऑसॉफिस्ट) अशा अतिमानुष श्रेष्ट वर्गांचें अस्तित्व मान्य करून त्यांशीं संबंध जोडणारे, त्याचा अनुभव येतो, आम्ही घेतों, असे मानणारे, म्हणणारे लोक असतात. त्यांना आम्ही नांवें ठेवूं इच्छित नाहीं. हीं ज्याच्या त्याच्या अनुभवाची गोष्ट आहे. तथापि मीमांसक व पुराणपद्धतीचे अनुयायी जो स्वर्गलोक मानतात तसा हे थिऑसफिस्ट मानीत नाहींत, ही मुद्द्याची गोष्ट आहे.

मनुष्यबुद्धि चिकित्सक असली तरी, जन्मापूर्वी आपण कोण, काय, कोठें, कसे होतों यापेक्षां, मृत्यूनंतर आपण कोठें जाणार, काय होणार, कसें राहणार, किंवा सर्वथा नष्ट होणार, या चिकित्सेकडेच त्याचें मन अधिक झुकतें. ' इहजन्म हा आपल्या जीवाच्या प्रवासामधला एक मधला मुक्काम असावा, ही गोष्ट त्याला स्थूलपणें पटते; पण प्रवासामध्यें आपली दृष्टि चालून आलेल्या मागच्या मार्गावर असत नाहीं; पण पुढच्या म्हणजे चालून जाण्याच्या मार्गावर असते. जन्मापूर्वी असूं नसूं किंवा कसेंहि असूं. पण या जन्मीच्या सुखदुःखादि भोगांच्या अनुभवामुळें मरणोत्तर काय गति होणार या विचाराचा ध्यास त्याला लागतो. आतां ही गोष्ट सर्वच माणसांना लागूं आहे असें नाहीं; कारण कांहीं लोक याच जन्मीच्या संसारांत इतके गढून गेलेले असतात कीं, इतर दूरच्या अदृश्य गोष्टींच्या विचारांत गेलेला वेळ हा त्यांना अपव्यय वाटतो. पण इतर कांहीं लोक तसे नसतात. कदाचित् त्यांना हा जन्म इतका दुःखाचा गेलेला असतो. पुढच्या जन्मीं कांहीं सुख लागून या दुःखाचा वचपा निघावा, भरपाई मिळावी, अशी आर्तता त्यांना उत्पन्न होते किंवा इतर कांहींना सुखच इतकें लाभलेलें असतें कीं, तसेंच सुख पुढील जन्मींहि मिळावें, या सुखी जीवनाची परंपरा वाढावी, याकरितां त्यांना पुढील जन्मीची आस्था वाटते. पण इतरहि आणखी दोन वर्ग आहेत. एक संसाराविषयीं उदासीन व विरागी (सुखी किंवा दुःखी नव्हे) आणि दुसरे म्हणजे या जन्मीच्या जीवनांत आनंदानें रमणारे उत्साही; तथापि निवान्त वेळीं जिज्ञासा चालवून तात्त्विक विचार करणारे. या चार वर्गांपैकीं पहिल्या दोहोंना स्वर्ग-पितरादि 'लोकांची' कल्पना सुचली व पटली. पण तिसऱ्या व चवथ्या वर्गांच्या लोकांना सृष्टि, आत्मा व ईश्वर म्हणजे काय, त्यांचा परस्पर संबंध कांहीं आहे कीं नाहीं, याच्या ज्ञानाचें महत्त्व वाटून त्यांनींच मननपूर्वक शोध केला व कल्पना चालविल्या व उपपत्ति बसवल्या. या लोकांचें लक्ष प्रथम भोंवतालच्या सृष्टीकडे गेलें आणि तिजमधील ईश्वरशक्ति हुडकून काढतांना, त्यांनीं भिन्नभिन्न देवता, उपदेवता यांची निर्मिति मनानें केली. त्यानंतर ही उपपत्ति खोटी वाटून असमाधानानें त्यांनीं स्वतः अंतर्मुख होऊन

योगशास्त्र, मानसशास्त्र यांवर सर्व तत्त्वज्ञान आणून ठेवलें. पण त्यानंतर फिरून डोळे उघडून बहिर्मुख होऊन त्यांनीं सर्व सृष्टीची एकवाक्यता करून सर्वांतर्यामीं ईश्वर भरला आहे, तथापि व्यक्ति-(मनुष्य) जीवालाहि स्वतंत्र म्हणून कांहीं कर्म कर्तव्य आहे असें त्यांना पटलें. मात्र हें कर्तव्य करूनहि शिवाय जीवाचा व ईश्वराचा संबंध अखंड आहे व त्या संबंधाच्या सूत्राला चातीवर फिरणाऱ्या सुताप्रमाणें पीळ पडून दृढता येऊन तें त्या चातीवर अखेर गुंडाळलें जाऊन पुनः एकरूप व्हावें, हीच तत्त्वज्ञानाची खरी उपपत्ति असें त्यांना वाटून म्हणजे हाच मोक्ष ठरून, ज्ञान, योग, भक्ति, प्रार्थना, नैष्ठिक आचरण, नीति, समताबुद्धि इत्यादि साधनें म्हणून त्यांनीं ठरविलीं.

आत्म्याचें सत्य स्वरूप अद्यापि ठरलेलें नाहीं. आत्म्याला आकार, रूप, रंग असेल काय? थिऑसफिस्ट तत्त्वज्ञानाप्रमाणें आत्म्याचा फोटो (छायाचित्र) निघूं शकतें. उपनिषत्काळीं आत्मा हा काळजाच्या भागांत असे असें मानीत. हठयोगी व तांत्रिक यांच्या मतें आत्मा हा मेंदूच्या संनिध असतो. आत्मा मोहरीएवढा आहे असें कोणी मानतात. अंगुष्ठमात्र असतो असें कित्येक मानतात. काळजांतला आत्मा मनोमय पुरुष, तर मेंदूतलें ब्रह्म हा मनस्पति व आत्म्याहून वरिष्ठ असेंहि मत आहे. आत्म्याला शरीर नसलें तरी त्याला स्थानिक व्यापकता आहे असें मानीत. आत्मा सर्व शरीर व्यापून राहतो असेंहि एक मत आहे. अर्थात् अशी सर्वव्यापकतेची शक्ति असणाऱ्या आत्म्याला हवें तितकें लहान व हवें तितकें मोठें होतां येणें शक्य होईलच. तें कसेंहि असो, आत्मा हा मरणोत्तर शिल्लक राहतो असें वाटणें स्वाभाविक आहे. मग त्यामागून परिभ्रमण-संक्रमण यांची कल्पना आली. पण तो वृक्षजल इत्यादिकांत राहण्यापेक्षां फिरून मनुष्यदेह घेऊनच अवतरित होणें हें अधिक पटण्या-आवडण्यासारखें आहे. मग हा नवावतार चांगला कीं वाईट होईल? याचें उत्तर ओघानेंच आलें कीं, पूर्वजन्मांत त्याचें आचरण असेल व त्याच्या उर्वरित वासना चांगल्या किंवा वाईट असतील त्याप्रमाणें हा नवा अवतार होईल.

मनुष्याला आपण कां, कसें जन्मलों या चिकित्सेपेक्षां मरणोत्तर आपलें काय होणार ही चिकित्सा अधिक वेधून राहते यांत शंका नाहीं. मागें काय गेलें यापेक्षां पुढें काय येणार याकडे त्याचें लक्ष अधिक असतें. आगगाडीच्या उघड्या खिडकीशीं बसणारा प्रवासी मागच्या वाटेकडे तोंड करून बसत नाहीं. तो पुढच्या वाटेकडे तोंड करून बसतो. जें पूर्वजन्मीं किंवा या जन्मीं होऊन गेलें तें संपलें किंवा पदरांत पडलें. त्याचा विचार

करून काय उपयोग ? पण जें पुढें येणार आहे त्याची वार्ता जितकी आगाऊ कळेल तितकी हवी असें त्याला वाटतें; आणि कल्पना करावयाची तरी देखील तो पुढच्याविषयींच करील. या न्यायानें मरणोत्तर आपलें काय होणार याचा विचार मनुष्य जिवंतपणीं करतो तेव्हां मरणोत्तरहि आपण हे आपणच राहूं व राहावें असें त्याला वाटतें; इतकेंच नव्हें तर आज ज्यावर आपली सत्ता, स्वामित्व वा अधिकार चालतो, त्यावर पुढच्या जन्मींहि तो तसाच चालावा अशी आकांक्षा त्याला राहते. मनुष्य मृत्युपत्र करतो, तेव्हां त्याची हीच अपेक्षा असते; आणि अशा मृत्युपत्रांत तो आपल्या मिळकतीचा वारसा पुढील पिढ्यांकडे एकामागून एक कसा जावा व तिची व्यवस्थाहि त्यांनीं कशी करावी, याविषयीं तो बंधनेंहि आपल्याकडून घालतो. हिंदुधर्मव्यवहारशास्त्राप्रमाणें असे निर्बंध फक्त स्वार्जित मिळकतीवरच घालतां येतात. इंग्रजी विशिष्ट कायद्याप्रमाणें वडिलार्जित मिळतीवरहि हा अधिकार चालतो. त्या सनिर्बंध वारसा-हक्काला 'इस्टेट इनटेल' असें म्हणतात. मात्र या हक्काला मर्यादा पडावी, किंबहुना एकाकडून दुसऱ्याला मिळणाऱ्या मिळकतीवर फाजील निर्बंध असल्यास तिच्या उपयोगाचें स्वारस्य जातें म्हणून इंग्रजी कायद्यांत 'परपेच्युइटी' म्हणजे 'निरंत बंधन' कायदा चालू देत नाहीं. तसेंच हिंदुस्थानांतील 'ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी'च्या कायद्यांतहि अशीं कांहीं बंधनें घातलेलीं आहेत. असो.

मरणोत्तर जन्म मिळावयाचा तर तो सुखाचा मिळावा, दुःखाचा नसावा अशी इच्छा असणें स्वाभाविक आहे. वैदिक धर्माच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें मरणोत्तर जीवाच्या तीन गति संभवतात. स्वर्ग, नरक, मोक्ष या कल्पना कोणीं काढल्या, कोणाला सुचल्या, कोणीं कशा बसविल्या असा विचार केला तर वाटतें कीं, (१) या जन्मांतील जीविताबर नाराज झालेल्या लोकांनीं मोक्षाची कल्पना काढली. (२) जीवनावर खूष, संतुष्ट असून या जन्मांतील सुखोपभोग मरणोत्तरहि मिळावे असें ज्यांना वाटलें त्यांनीं स्वर्गाची कल्पना बसविली, आणि (३) या जन्मांत मनुष्यांकडून सत्कर्म करवावें, त्यांना सन्मार्गावर ठेवावें अशी इच्छा असणाऱ्या परोपकारी नीतिवेत्त्यांनीं मनुष्याला भीति दाखविण्याकरितां नरकाची कल्पना बसविली. मनुष्य-जन्मावर संतुष्ट असलेले व असंतुष्ट असलेले असे मुख्य दोन विभाग सहजच होतात. असंतुष्टांमध्यें (१) ज्यांच्या वांट्याला दुःखच आलें, आणि (२) ज्यांना दुःख भोगावें लागत नाहीं, परंतु तात्त्विक दृष्ट्या ज्यांना जन्माचें व्यर्थत्व वाटलें, असे फिरून दोन विभाग होतात. या जन्मांत दुःखच ज्यांच्या गांठीं पडलें तो म्हणणार, असला जन्म फिरून घेऊन

फिरून दुःखाचाच संभव किंवा धोका पत्करावयाचा त्यापेक्षां, जन्मच न घेतां आला तर काय वाईट ? पण तात्त्विक दृष्ट्या विचार करणारा म्हणणार दुःख मिळो वा सुख मिळो, एकंदरीनें ती उठाठेवच, म्हणजे असंतोषालाच कारण. ती उठाठेव हवी कशाला ? त्याऐवजीं ज्या ईश्वर-तत्त्वांतून मी निघालों व जन्म पावलों त्या तत्त्वांत परत जाऊन मिसळतां आलें तर तें किती चांगलें ! आणि असें होण्याचा उपाय त्यांनीं विचारान्तीं शोधून काढला तो हा कीं, ईश्वर व जीव हे दोन्ही एकच होत आणि हें ज्ञान झालें व मनांत बिंबलें तर यापुढचा जन्म मिळणार नाहींच व या जन्माची उठाठेवहि फारशी त्रासदायक होणार नाहीं. देशांतराला गेलेला, नोकरीवर गेलेला मनुष्य हा नेहमीं मनांत आपल्या घरची आठवण ठेवून, उदासवृत्तीनें पण कर्मकुशल पद्धतीनें, नोकरीचे दिवस काढून, ती संपतांच पुढें कायमची स्वस्थता भोगण्याकरितां परत घरीं घेऊन राहतो. त्याप्रमाणें जीवाला उत्कंठा लागणें स्वाभाविक आहे व ईश्वरी तत्त्वांत लीन होणें संभवनीय आहे, असें ज्यांना वाटलें त्यांनीं ही मोक्षाची कल्पना निश्चित बसाविली असावी.

सामान्य मनुष्याच्या मोक्षाच्या कल्पना निश्चित नसतात. परंतु वर दर्शविल्याप्रमाणें ज्यांनीं उपपत्ति बसाविली व ज्यांना ती इष्टता पटली त्यांनीं मात्र हेंहि सांगितलें कीं, मोक्ष हा सत्यज्ञानानें मिळणारा असून, तें ज्ञान या जन्मांत करून घ्यावयाचें म्हणजे तो मोक्षहि याच जन्मांत मिळवावयाचा. त्यांचें म्हणणें ' मोक्षस्य न हि वासोऽस्ति न ग्रामांतरमेव वा ' या वचनांत चांगलें व्यक्त होतें. त्यांना या जन्मापलीकडे कांहीं दिसत नाहीं. तें इतकें कीं, मरणोत्तर आत्म्याचें परिभ्रमण, पुनर्देहधारण इत्यादि गोष्टी जवळजवळ नाकबूल करणारे म्हणून त्यांना कदाचित् स्वतःला नास्तिक म्हणवून घेण्यासहि तयार झालें पाहिजे. आणि एक ईश्वर व एक जीव या दोहोंचाच नित्य निकट संबंध असून त्यांच्यामध्यें दुसरा कोणी येऊं शकत नाहीं अशी त्यांची शुद्ध व तात्त्विक भूमिका असते. ज्ञानाप्रमाणें भक्ति हें ईश्वर-प्राप्तीचें साधन असें ज्या द्वैतवादी तत्त्वज्ञान्यांनीं ठरविलें त्यांनीं देखील पुनर्जन्माची इच्छा किंवा अपेक्षा केली नाहीं. ज्ञानवादी व भक्तिवादी यांत असला तर फरक इतकाच कीं, ज्ञानवाद्याच्या मताप्रमाणें मोक्ष-प्राप्तीला मरणाचीहि वाट पाहाण्याचें कारण नाहीं; आणि भक्तिवादी म्हणणार कीं, ईश्वरप्राप्ति व्हावयाची ती मरणोत्तरच होईल. ती होण्याकरितां आपण जन्मभर भक्ति करीत राहावें. मोक्षाच्या कल्पनेंत पुनर्जन्माचा अभाव गृहीत धरलेला असतो. तसेंच ज्ञानवादी व भक्तिवादी मुमुक्षु या दोघांची दृष्टि पुढें असल्यामुळें, मागील जन्माचा विचार किंवा चिकित्सा ते फारशी करीत बसत नाहींत.

मोक्षनामक जी गति तिचें हें विवेचन झालें. पण स्वर्ग व नरक यांच्या कल्पनांचें विवेचन उरलें व तें असे. नरकाची कल्पना जीवाला शिक्षेचें. भय घालण्याकरितां काढलेली असावी हें वर सांगितलें आहे. परोपकारी नीतिवेत्ता हें जाणतो कीं, मनुष्याला सन्मार्गावर ठेवण्याला एखाद्या पारितोषिकाची लालूच दाखविण्यापेक्षांहि शिक्षेचें भय दाखविलें असतां तें अधिक परिणामकारक ठरतें. राजकीय समाजांत देखील आपण हेंच पाहतों. कारण समाजधारण व्हावयाचें तर त्यांतील घटक-व्यक्तिमात्राला अन्याय, अपाय न घडेल, त्याजवर अतिक्रमण न होईल, त्याला स्वतंत्र व शांततेनें राहून आत्मसाधन करतां येईल, विचारस्वातंत्र्य, आचार-स्वातंत्र्य भोगावयास मिळेल, तरच ती धारणा होईल. म्हणून अपराध करणारापासून त्याचा बचाव केला पाहिजे. याकरितां पिनल कोडासारखे कायदे करून त्यांत राजसत्तेच्या दृष्टीनें, अपराध, गुन्हे कोणते आणि ते केले असतां अपराध्याला काय शिक्षा कराव्या हें सांगितलें असतें. पण याच्या उलट असा एखादा कायदा नसतो कीं, ज्यांत मनुष्य सदाचाराचीं कृत्यें करीत राहिल्याम त्याला अमुक एक बक्षीस-पारितोषिक यावें. तात्पर्य, अनुग्रहाचा कायदा नाहीं, पण निग्रहाचा मात्र आहे. धर्माच्या दृष्टीनेंहि हीच विचारसरणी ओघानें येते. म्हणून परोपकारी नीतिवेत्ते मनुष्याला सांगतात कीं, तूं दुराचार केलास तर तुला पुढील जन्मीं नरकवास म्हणजे दुःख व यातना भोगाव्या लागतील. पण राज्यशास्त्र व धर्मशास्त्र यांत एक फरक पडतो तो हा कीं, राज्यशास्त्रांतील विधि फक्त पिनल कोड करून शिक्षा सांगतात. ज्यांना वर सांगितलेली मोक्षाची कल्पना सुचत नाहीं, पटत नाहीं, किंवा आपल्या कार्याला पुरी पडेलशी वाटत नाहीं असे धर्मशास्त्रप्रणेते नरकवासाचें पिनल कोड व प्रोसीजर सांगतात. त्याबरोबर दुसरे पक्षी स्वर्गाचें आमिष दाखवून त्याला लोभवूनहि सत्कृत्यें करण्याला सांगतात. मात्र या दोनहि गोष्टी करणारांत निःस्वार्थी, परोपकारी नीतिवेत्त्यांबरोबरच स्वार्थसाधु, लोभी धर्माधिकारीहि असूं शकतात. असें म्हणण्याचें कारण हें कीं, नरक व दुर्गति यांच्या वाङ्मयापेक्षां स्वर्ग व स्वर्गांतील सुखसंपन्नता याविषयींचेंच वाङ्मय अधिक भरतें. धर्मग्रंथांतील दानाध्याय पाहिला म्हणजे याची खात्री पटेल. वर्षांतील असा एकहि दिवस नाहीं कीं ज्या दिवशीं कांहीतरी दानविधि विहित म्हणून सांगितलेला नाहीं; आणि या प्रत्येक दानाला कांहीं ऐहिक व कांहीं पारलौकिक सुखलाभ सांगितलेले असतात. ग्राम्य शब्दांनीं बोलावयाचें तर "देवा, मला हें दे म्हणजे मी तुला हें देईन" असा मजकूर दानखंडांतील वाङ्मयांत असतो. या अनुयोगी-प्रतियोगी भाषेनें येथून तेथून सर्व लिहिलेलें

असतें; आणि दानाला सत्पात्र कोण तर ब्राह्मण ! असें ठरून गेल्यामुळें या दानखंड-वाङ्मयाची जबाबदारी किंवा दोष हा कोणी सर्वस्वीं ब्राह्मणांवर लादला तर त्यांत काय चूक ? नुसती नरकवासाची शिक्षा सांगणाराला हा स्वार्थाचा दोष तरी लागूं शकत नाहीं.

मोक्षाची कल्पना कशी निघाली हें पाहण्याला प्रथम या जीवन-संसाराची चिकित्सा करणें प्राप्त आहे. कारण मोक्ष म्हणजे या संसारापासून सुटका. जन्ममरणाच्या उपाधींचें निर्मूलन अशी व्याख्या व समजूत दृढमूल राहिलेली आहे. जीवन हें वाईट वाटल्याशिवाय जन्माचा फेरा नको कोण म्हणेल ? जीवनाचें वर्णन अनेक लोकांनीं अनेक प्रकारांनीं केलेलें आहे. हें वर्णन करणारा मनुष्य बहुधा आपल्या अनुभवावरून तें करतो आणि हे अगदीं स्वाभाविक आहे. परंतु असेहि कांहीं लोक असतात कीं, त्यांना स्वतःला जीवनाचा अनुभव कसाहि आला असला तरी ते जीवनाकडे आत्मनिरपेक्ष व स्वतंत्र दृष्टीनें पाहूं शकतात. खेळ खेळण्यापेक्षां खेळ पाहणाराला खेळ अधिक चांगला दिसतो अशी म्हणच आहे. म्हणून दोहो प्रकारच्या लोकांनीं जीवनाचें वर्णन कसें केलेलें आढळतें तें पाहूं.

मोक्षाच्या सर्व सनातनी कल्पनांत ईश्वरज्ञान गृहीत धरलेलें असतें. पण वस्तुतः मोक्षाच्या कल्पनेंत ईश्वराचा संबंध कांहींच येत नाहीं. मोक्षाची जुनी सामान्य कल्पना म्हणजे जीवानें ईश्वराशीं तादात्म्य पावून जन्ममरणापासून मुक्तता करून घेणें. पण या तादात्म्याचा अर्थ लावतांना किती तरी वाद निर्माण होतात. सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता अशा तादात्म्याच्या पायऱ्या मांडलेल्या पाहिल्या म्हणजे हातांत फूटपट्टी, इंचपट्टी घेऊन अंतर मोजणारा आधुनिक इंजिनियर आपलें सूक्ष्म गणितज्ञान बरोबर घेऊन अवतरला असें वाटतें. सलोकतेमध्यें ईश्वराचें म्हणून एक निवासस्थान आहे अशी कल्पना करावी लागते. समीपता हा शब्द उच्चारला म्हणजे जुन्या राजदरबारांतील उच्चनीच स्थानांचा मानक्रम (Rank and Precedence) संभाळणाऱ्या अधिकाऱ्यांची (चोपदार, दरबार-कामगार) आठवण होते. पण ईश्वर दूरचा व जवळचा असा सूक्ष्म भेद मानणारा आहे, म्हणजे पक्षपाती आहे असें मानल्यास आपण त्याचा अपमान करतो असें वाटतें. सरूपतेचा तर अर्थच कळत नाहीं. ईश्वराच्या घरीं ईश्वरस्वरूपाचे मुखवटे तयार करून ठेवले आहेत कीं काय, म्हणून एकेक सत्पात्र मुमुक्षूनें त्यांतला एकेक घेऊन आपल्या तोंडावर चढवावा, म्हणजे एकाच प्रकारचे छापील मुखवटे घालण्याचा कट करून ' फॅन्सी ड्रेस बॉल 'मध्यें घुसणाऱ्या खेळियांप्रमाणें हा कोण, तो कोण हें ओळखतां येऊं नये. सायुज्यता ही समजण्याला अशीच अवघड आहे. द्वैत तत्त्वज्ञानांत ईश्वर व जीव

यांमधील अंतर नेमकें मोजणारा सर्वेश्वर गृहीत धरावा लागतो. विशिष्टाद्वैत तत्त्वज्ञानांतील भेदाभेद मोजणें, मापणें यांहून अवघड आणि सायुज्यमुक्ति म्हटली म्हणजे तें कार्य केवळ घटक-संमेलन (मेकॅनिकल मिक्श्चर) आहे कीं, गुणधर्म-संमिश्रण (केमिकल कांपाउंड) आहे हें ठरवावें लागतें.

पण मोक्षाची खरी कल्पना या सर्वांहून वेगळी आहे. तींत ईश्वराचा संबंधच येत नाहीं. तींत पुनर्जन्म नाहीं किंवा परलोक नाहीं. स्वर्ग नाहीं, नरक नाहीं. तत्त्वतः मोक्षाची साधी व्याख्या अशी आहे. मोक्ष म्हणजे ईश्वर-निर्मित मनुष्यजीवाला निःस्वार्थी कर्मयोगाचें आचरण करितांना कर्तव्यविषयक कृतकृत्यतेच्या जाणिवेनें लाभणाऱ्या 'आनंदाची ऊर्मि व तन्मयता' आणि ऐलथडीच मोक्ष यांतील ऐलथडीचा अर्थ 'याच जन्मीं' असा आहे. ऐलथडी म्हणजे मायानदीचें अलीकडचें तीर.

या व्याख्येवरून 'मोक्ष-कल्पनेची व्याप्ति व पर्यवसान' केवळ नैतिक आहे असें सकृद्दर्शनीं वाटेल. पण कोणी जुन्या वळणाचा श्रद्धाळू धर्माळू नसला तरी, जीवनमूल्यांची परिसमाप्ति नीतींत होते, त्यापलीकडे कांहीं उरत नाहीं असेंहि मानणारा तो नसतो. नीति ही बहुतांशीं परसापेक्ष तर मोक्ष हा बहुतांशीं आत्मसापेक्ष आहे असें मानणें योग्य होईल.

१ मोक्षाचा संबंध ईश्वराशीं पोंचत नाहीं. २ जन्ममृत्यूचा फेरा सोडविणें ही मोक्षाची कल्पना चुकीची आहे. ३ मोक्ष हा परतंत्र किंवा परलोकांत अनुभवावयाचा आहे या खोट्या कल्पनेमुळें विद्यमान जीविताचें महत्त्व जीवाला वाटत नाहीं. ४ मोक्ष ही या जन्मांतच शक्य तर अनुभवण्याची स्थिति होय. ५ ही स्थिति आनंदमय तन्मयतेची आहे. ६ आणि ही स्थिति मनुष्यानें कर्मयोगाचें ध्येयनिष्ठ व निर्दोष आचरण केलें असतां या जन्मांतच लाभूं शकते; आणि सुदैवानें ऐलथडीच्या मोक्षाचा हा सिद्धान्त हिंदु लोकांचे धर्मग्रंथ, तत्त्वज्ञानग्रंथ व धार्मिक कवि यांच्याच आधारानें पटवून देतां येण्यासारखा आहे.



देशभक्त–साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांच्या आठवणी

वर्णानुक्रमणिका

लेखक	आठवणींची संख्या			पृष्ठ
	श्री			
१ श्रीखंडे रामचंद्र चिंतामण	(३)	...	...	४२३
२ श्रीगोंदेकर गणेश नरहर	(४)	...	...	२८८
	अ			
३ अणे माधव श्रीहरी ...	(२)	...	...	३१९
४ अभ्यंकर गोविंद दत्तात्रय	(४)	...	...	४५३
५ अभ्यंकर न. गो. ...	(१)	...	...	२८५
६ अभ्यंकर मनुताई ...	(१)	...	...	१७२
७ अवळसकर शां. वि. ...	(५)	...	...	४७४
८ अत्रे गोविंद रामकृष्ण ...	(३)	...	...	३३५
९ अरगडे मारुती गणेश ...	(३)	...	...	४०४
१० अंबेवाडीकर कल्याणराव	(१)	...	...	४२४
	आ			
११ आगरकर य. सी. ...	(४)	...	...	५२६
१२ आगाशे धोंडो श्रीधर ...	(१)	...	...	३१३
१३ आगाशे लक्ष्मण विनायक	(२)	...	...	१७९
१४ आचरेकर श्रीधर गणपत	(२)	...	...	३५३
१५ आठवले येसुताई ...	(६)	...	...	७८
१६ आठवले रा. ब. ...	(५)	...	...	२०४
१७ आपटे गो. ल. ...	(१)	...	...	१८२
१८ आपटे पां. श्री. ...	(३)	...	...	३२२
१९ आपटे शांता ...	(३)	...	...	३१३
२० आपटे दाजी नागेश ...	(८)	...	...	३६५
२१ आपटे विनायक महादेव	(३)	...	...	३९२
	उ			
२२ उपाध्याय गोपीवल्लभ ...	(४)	...	...	५२७
२३ उपासनी मुरलीधर गणेश	(१)	...	...	२८७

ओ

२४ ओंक शांताबाई ...	(२)	...	...	३३६
२५ ओंकार काकासाहेब ...	(३)	...	...	१४५
२६ ओगले पु. ल. ...	(४)	...	...	४९२
२७ ओतुरकर रा. वि. ...	(१)	...	....	२०६

क

२८ कमतनूरकर नरहर गणेश	(२)	...	...	३७९
२९ कमतनूरकर सरोजिनी ...	(३)	...	...	३८१
३० करंदीकर ज. गं. ...	(२)	...	...	२८९
३१ करंदीकर जनार्दन सखाराम	(५)	...	...	५३
३२ करमरकर वि. पां. ...	(३)	...	...	३२९
३३ करमळकरशास्त्री गजानन रामचन्द्र	(१)	...	...	३००
३४ कवडे कृष्णशास्त्री नारायण	(३)	...	...	५०६
३५ कशाळकर नागेश दत्तात्रय	(२)	...	...	५०४
३६ काणे पां. वा. ...	(२)	...	...	१८४
३७ कानिटकर बाळुकाका ...	(१)	...	...	४५०
३८ कानिटकर रा. अ. ...	(२)	...	...	२५६
३९ कानेटकर शंकर केशव (गिरीश)	(६)	...	...	३४३
४० कालेलकर काकासाहेब ...	(६)	...	...	१९७
४१ काळे सदाशिव कृष्ण ...	(२)	...	...	१६४
४२ किनखेडे गोविंद माधव ...	(१)	...	...	२९१
४३ किबे माधवराव वि. ...	(२)	...	...	१२१
४४ कुमठेकर कोंडो महादेव ...	(५)	...	...	३२६
४५ कुलकर्णी बाबुराव वामन	(४)	...	...	४७२
४६ कुलकर्णी मास्तर द. रा. ...	(२)	...	...	४६१
४७ कुलकर्णी यशवंत गणेश ...	(२)	...	...	५१३
४८ कुलकर्णी विश्वनाथ केशव	(१)	...	...	४१०
४९ कुलकर्णी शंकर कृष्ण ...	(१)	...	...	४४४
५० कुलकर्णी हळदीकर गं. र.	(४)	...	...	४६६
५१ कुलकर्णी हरीभाऊ ...	(१)	...	...	४३६
५२ केतकर गजानन विश्वनाथ	(६)	...	....	६३
५३ केळकर काशिनाथ नरसिंह	(५)	...	...	८४
५४ केळकर केशव ऊर्फ विठ्ठल नारायण	(४)	...	...	५१७

५५ केळकर गिरजाबाई ...	(३)	...	...	७५
५६ केळकर तात्यासाहेब यांचें पत्र	(१)	...	...	५२१
५७ केळकर द. के. ...	(३)	...	...	७६
५८ केळकर दुर्गाताई ...	(१)	...	...	५२२
५९ केळकर त्र्यंबक बाळकृष्ण	(५)	...	...	३०९
६० केळकर नारायण बाळकृष्ण	(१३)	...	...	९८
६१ केळकर नारायण रामचन्द्र	(२)	...	...	४१३
६२ केळकर नीलकंठ महादेव	(३)	...	...	४७१
६३ केळकर मधुकर केशव ...	(१)	...	...	५१६
६४ केळकर महादेव चिंतामण	(३)	...	...	७५
६५ केळकर मालतीबाई ...	(१)	...	...	५१९
६६ केळकर यशवंत नरसिंह ...	(३)	...	...	८९
६७ केळकर शांताबाई ...	(१)	...	...	५२०
६८ केळकर सीताराम विष्णु ...	(४)	...	...	३४९
६९ कोकजे दामोदर सीताराम	(४)	...	...	३८८
७० कोकजे रघुनाथशास्त्री ...	(३)	....	...	४६९
७१ कोवाडकर गो. शां. ...	(२)	...	...	४८४
७२ कोल्हटकर बाळकृष्ण श्रीधर	(१)	...	...	१३५
७३ कोल्हटकर लक्ष्मीबाई ...	(१)	...	...	१८०
७४ कोल्हटकर वासुदेव शिवराम	(३)	...	...	२३४
७५ कौजलगी ग. वि. ...	(१)	...	...	२३८

ख

७६ खांडेकर कृ. श्री. ...	(१)	...	...	४५३
७७ खांडेकर वि. स. ...	(४)	...	...	३२४
७८ खांडेकर भालचंद्र द. ...	(२)	...	...	२७३
७९ खानविलकर काशीनाथ विष्णु	(५)	...	...	४२९
८० खरे नारायण भास्कर ...	(४)	...	...	१८८
८१ खरे नीळकंठ बाळकृष्ण ...	(१)	...	...	५००
८२ खापर्डे बाळकृष्ण गणेश	(२)	...	...	२५०
८३ खेर बाळ गंगाधर ...	(५)	...	...	४९
८४ खोले यशवंत दत्तात्रय ...	(१)	...	...	४४१

ग

८५ गजेन्द्रगडकर के. बा. ...	(२)	...	...	४३९

८६ गद्रे रा. ना. ...	(२)	...	...	१४१
८७ गर्दे वि. त्र्यं. ...	(१)	...	...	४२४
८८ गलगले रामाचार्य ...	(३)	...	...	४
८९ गाडगीळ धनंजय रामचंद्र	(३)	...	...	२१५
९० गाडगीळ नरहर विष्णु	(८)	...	...	७१
९१ गायकवाड चिमणाबाईसाहेब	(३)	...	...	१७
९२ गांधी नीलकंठ भाऊ ...	(१)	...	...	४९६
९३ गोखले केशवराव ...	(१)	...	...	३६३
९४ गोखले गंगाधर नीलकंठ	(१)	...	...	९३
९५ गोखले चिंतामण जनार्दन	(४)	...	...	३३२
९६ गोखले दामोदर विश्वनाथ	(६)	...	...	६६
९७ गोखले पुरुषोत्तम पांडुरंग	(५)	...	...	२७५
९८ गोखले रामचंद्र जनार्दन	(४)	...	...	२३७
९९ गोखले शं. वि. ...	(५)	...	...	४०३
१०० गोगटे वासुदेव बलवंत ...	(३)	...	...	२०९
१०१ गोगटे पांडुरंग मोरेश्वर ...	(३)	...	...	४७९
१०२ गोडबोले गणपतराव ...	(२)	...	...	१७७
१०३ गोडबोले र. द. ...	(२)	...	...	३७९
१०४ गोरे ना. अ. ...	(२)	...	...	२०५

घ

१०५ घारपुरे भा. वि. ...	(५)	...	...	३०३
१०६ घारपुरे न. का. ...	(३)	...	...	२२४
१०७ घारपुरे वा. ह. ...	(१)	...	...	४९८
१०८ घोरपडे अनुबाई ...	(३)	...	...	१०२

च

१०९ चाफेकर द. वा. ...	(१)	...	...	४५७
११० चितळे कमलाबाई ...	(४)	...	...	३६४
१११ चितळे दत्तात्रय दिवाकर	(१)	....	...	३१७
११२ चित्राव सिद्धेश्वरशास्त्री...	(४)	...	...	२
११३ चोळकर गो. रा. ...	(२)	...	...	२९५
११४ चंद्रात्रेय मुरलीधर रामचंद्र	(२)	...	...	२८३
११५ चौंडे बाळकृष्ण मार्तंड...	(२)	...	...	१६८

ज

११६ जाधव भास्करराव ... (२) २०३
११७ जाधवराव रामचंद्र गोविंद (४) २२६
११८ जिज्ञासु (फलटण) ... (१) ३०७
११९ जेजुरीकर कृ. न. ... (६) ३४२
१२० जोग श्रीपाद बाजी ... (२) ३७३
१२१ जोगळेकर धोंडो केशव... (३) ४९०
१२२ जोशी कृ. ग. ... (३) २८२
१२३ जोशी दामोदर दत्तात्रय (२) ४८८
१२४ जोशी नारायण सदाशिव (३) १३२
१२५ जोशी पुरुषोत्तम दिनकर (५) ४५८
१२६ जोशी विठ्ठलराव ... (७) २९२
१२७ जोशी रा. स. ... (५) २७१
१२८ जोशी वासुदेव बळवंत ... (१) १७३
१२९ जोशी एस्. एम्. ... (५) २४२
१३० जोशी शंकर नारायण ... (१) २५४
१३१ जोशी व्ही. आर. ... (१) ३०९
१३२ जोशीराव नारायण विनायक (२) ४९३

ट

१३३ टिल्लू ग. दा. ... (१) ४५६
१३४ टिळक जयंत श्रीधर ... (२) ५१५
१३५ टिळक सीताराम विश्वनाथ (४) २९६

ड

१३६ डावरे पुरुषोत्तम विश्वासराव (२) ४१७
१३७ डावरे विश्वास बळवंत ... (३) २२९
१३८ डोळे शं. स. ... (२) १६९

ढ

१३९ ढमढेरे कृ. ह. ... (३) १२३
१४० ढमढेरे मोरेश्वर रामचंद्र (७) ३९३

त

१४१ तर्खडकर भास्करराव सदानंद (२) ३८३

१४२ तपासे ग. दे. ... (२) १९६
१४३ ताह्मनकर द. वि. ... (६) २५५
१४४ तुळजापूरकर दत्तो अप्पाजी (४) २६६
१४५ तुळपुळे शंकर गोपाळ ... (१) ४०६

द

१४६ दवणे शंकर गणेश ... (१३) १५७
१४७ दांडेकर मालतीबाई ... (२) १७८
१४८ दांडेकर वि. पां. ... (५) ११०
१४९ दांडेकर शं. वा. ऊर्फ सोनोपंत (२) ३५२
१५० दांडेकर सदाशिव आबाजी (३) ४६३
१५१ दाते शंकर रामचंद्र ... (२) ११८
१५२ दातार ग. द. ... (२) ४२१
१५३ दामले गंगाधर शिवराम (२) ४४६
१५४ दामले शि. वि. ... (६) ३३७
१५५ दिवेकर महादेवशास्त्री (४) २८४
१५६ दिवेकर दिनकर वासुदेव (३) ७०
१५७ दीक्षित द. गो. ... (४) ४७७
१५८ दुगवेकर गोविंदशास्त्री... (६) ५२७
१५९ देवधर इंदिराबाई ... (४) १९९
१६० देवधेकर नारायण दामोदर (२) ४२०
१६१ देशपांडे श्रीधर गोपाळ (५) ९१
१६२ देशपांडे कमलाबाई ... (४) ८१
१६३ देशपांडे गंगाधर बाळकृष्ण (५) १५२
१६४ देशपांडे नरहर हणमंत (२) ४९८
१६५ देशपाडे पांडुरंग हरी ... (४) ४६४
१६६ देशपांडे वामन हरी ... (४) ९६
१६७ देशपांडे वि. घ. ... (३) ३६९
१६८ देशपांडे यशवंत व्यंकटेश (१) ४१८
१६९ देशपांडे सरोजिनी ... (१) ३६०
१७० देशमुख चिं. द्वा. ... (१) १४०
१७१ देशमुख रा. भ. ... (२) ४४८
१७२ देसाई गोविंद गोपाळ ... (२) २६५

ध

१७३ धडफळे भा. वा. ... (३) ४८२
१७४ धारप काशीनाथ नारायण (२) १०४
१७५ धोंगडे वासुदेव सीताराम (३) २६९

न

१७६ नरदेवशास्त्री ... (१) ५२५
१७७ नलावडे गणपत महादेव (२) २९८
१७८ नवरे प्रभाकर नीलकंठ ... (६) ३५७
१७९ नवरे नीलकंठ शंकर ... (४) २०१
१८० नवले डॉक्टर ... (५) २२७
१८१ नाईक नारायण भास्कर (१) २७५
१८२ नाईक लक्ष्मीदेवी ... (३) १४
१८३ नाशिककर शांताबाई ... (२) १७३
१८४ नियोगी भवानीशंकर ... (२) २१२
१८५ नेऊरगांवकर स. के. ... (४) ४५५
१८६ नेने दिगंबर वासुदेव ... (२) ३७०

प

१८७ पटवर्धन ग. वि. ... (२) १८७
१८८ पटवर्धन नारायणराव गंगाधरराव (४) २५३
१८९ पटवर्धन लीलाबाई ... (३) १७६
१९० पटवर्धन वि. ग. ... (४) २३२
१९१ पटवर्धन विनायकबोवा (५) ४३७
१९२ पटवर्धन रामचंद्र विनायक (सांगली) (५) ४३
१९३ पटवर्धन रामचंद्र विनायक (पुणें) (५) १३६
१९४ पटवर्धन लक्ष्मीबाईसाहेब (३) ८
१९५ पटवर्धन शिवाजीराव ... (२) ४४३
१९६ पतके पु. शं. ... (२) ४७६
१९७ परांजपे द. वि. ... (३) १४३
१९८ परांजपे वामन-कृष्ण ... (३) ११५
१९९ परांजपे बाबासाहेब ... (२) ३१६
२०० पाटील बाळा रामा ... (१) ४१०
२०१ पाटणकर श्री. ब. ... (१) २६९

२०२ पाटसकर ह. वि. ... (५) ३२८
२०३ पाटील सुंदराबाई ... (२) ४१२
२०४ पाटील मल्लिकार्जुन अप्पाराव (४) २४९
२०५ पारखे दत्तात्रय विष्णु ... (२) ४८६
२०६ पांडे गोविंद केशव ... (१) ४९७
२०७ पुराणिक वा. रा. ... (४) २२०
२०८ पुराणिक गंगाधर विष्णु (१) २९८
२०९ पुरोहित चिंतामण विश्वनाथ (२) ३६०
२१० पुरंदरे कृष्णाजी वासुदेव (२) ४५२
२११ पुरंदरे य. वि. ... (२) ३९८
२१२ पेंडसे मालतीबाई ... (२) १३९
२१३ पेंडसे शंकर दामोदर ... (५) १३७
२१४ पेंडसे सरस्वतीबाई ... (८) ९४
२१५ पोतदार दत्तो वामन ... (६) २२२
२१६ पोतदार वामन मोरेश्वर (२) ४२८
२१७ पंडित जगन्नाथ महाराज (३) १८
२१८ पंढरपुरे गोविंद नरहर (१) १४२
२१९ पंतपराडकर रा. द. ... (७) ५०९
२२० पंतप्रतिनिधि बाळासाहेब (५) ६
२२१ पंतसचिव बाबासाहेब ... (९) ९
२२२ प्रधान भा. कृ. ... (१) ४५१

फ

२२३ फडणीस अनंत वासुदेव (११) ४०७
२२४ फडणीस रामकृष्ण नारायण (१) ४१६
२२५ फाटक हरी गणेश ... (१) २४५
२२६ फिरोदिया कुं. सो. ... (२) १९७
२२७ फुलंब्रीकर कृ. ग. ऊर्फ मास्टर कृष्णा (८) १९०

ब

२२८ बर्वे गोविंद नारायण ... (१) ४०१
२२९ बर्वे द. बा. ... (५) ३३३
२३० बर्वे शंकर नारायण ... (२) ३७१
२३१ बनारसवाले राजाराम जगन्नाथ (५) ३९९
२३२ बल्लाळ सदाशिव हणमंत (१) ४३९

२३३ बांदिवडेकर सी. ग. ...	(१)	...	...	२७३
२३४ बापट गणेश त्र्यंबक ...	(१)	...	...	४४३
२३५ बापट धुंडिराज गणेशशास्त्री	(२)	...	...	३७४
२३६ बाबूरामजी सक्सेना ...	(१)	...	...	५२४
२३७ बामणगांवकर नारायण रामलिंग	(५)	...	...	२४७
२३८ बाळ गो. रा. ...	(१)	...	...	४१९
२३९ बाळ रामचंद्र केशव ...	(५)	...	...	१३४
२४० बुधकर बा. सा. ...	(१)	...	...	२५९
२४१ बुर्ली श्रीनिवासाचार्य ...	(४)	...	...	५
२४२ बेडेकर शंकर रामचंद्र ...	(१)	...	...	३६२
२४३ बेलवलकर श्री. कृ. ...	(८)	...	...	१४७
२४४ बेलापुरकर वि. दि. ...	(३)	...	...	४६२
२४५ बेळवी दत्तात्रय व्यंकटेश	(३)	...	...	१२१
२४६ बोले सी. के. ...	(४)	...	...	३०७

भ

२४७ भट दामोदर मोरेश्वर ...	(७)	...	...	३८५
२४८ भट भा. मो. ...	(३)	...	...	५०१
२४९ भट भास्कर वामन ...	(३)	...	...	४३४
२५० भट विष्णु महादेव ...	(४)	...	...	१७०
२५१ भडकमकर हरी कृष्ण ...	(१)	...	...	५००
२५२ भडभडे गंगाधर रघुनाथ	(३)	...	...	३३१
२५३ भागवत गोविंद गणेश ...	(१)	...	...	२३६
२५४ भागवत वि. वि. ...	(३)	...	...	२९०
२५५ भानु वा. चिं. ...	(१)	...	...	१६५
२५६ भावे वासुदेव कृष्ण ...	(२)	...	...	२४४
२५७ भावे महादेव अनंत ...	(१)	...	...	३३९
२५८ भावे ग. ग. ...	(२)	...	...	२७१
२५९ भांडारकर देवदत्त रामकृष्ण	(३)	...		२१९
२६० भिडे गो. म. ...	(१)	...	...	४८७
२६१ भिडे भि. गो. ...	(३)	...	...	४४९
२६२ भिडे दत्तात्रय भिकाजी	(३)	...	...	५०७
२६३ भिडे नानासाहेब ...	(२)	...	...	४८१
२६४ भिडे शंकर परशुराम ...	(२)	...	...	४१४

२६५ भिडे हरी भास्कर ...	(२)	...	...	३८४
२६६ भूसरथ वि. रा. ...	(१)	...	...	३०४
२६७ भोपटकर यशोदाबाई ...	(९)	...	...	२५
२६८ भोपटकर लक्ष्मण बलवंत	(६)	...	...	२७
२६९ भोंडे नारायण विनायक	(४)	...	...	४०२

म

२७० महाबळ भास्कर बहिरो	(४)	...	...	३४६
२७१ महाजन गोपाळ पांडुरंग	(२)	...	...	१३१
२७२ महाजन यशवंत पांडुरंग	(१)	...	...	५०४
२७३ महाजनी ग. स. ...	(५)	...	...	१८२
२७४ मावळंकर गणेश वासुदेव	(४)	...	...	४७
२७५ मांढरे ज्ञानेश्वर उद्धव ...	(३)	...	...	२४०
२७६ मिश्र द्वारकाप्रसाद ...	(६)	...	...	२१
२७७ मुजुमदार गो. गो. ...	(३)	...	...	२११
२७८ मुंजे बा. शि. ...	(२)	...	...	२१६
२७९ मोहगांवकर वि. प्र. ...	(१)	...	...	२०८

र

२८० रबडे मो. वि. ...	(२)	...	...	३४१
२८१ राजहंस नारायणराव (बालगंधर्व)	(२)	...	...	४२६
२८२ रानडे कृष्णाजी महादेव	(४)	...	...	३२३
२८३ रानडे पुरुषोत्तमशास्त्री	(२)	...	...	१
२८४ रामदासी अनंतदास ...	(१)	...	...	३४८

ल

२८५ लवाटे शंकर गणेश ...	(४)	...	...	४१
२८६ लेले के. भा. ...	(३)	...	...	२७८
२८७ लॉर्ड सँर्का ...	(२)	...	...	२५८

व

२८८ वर्तक गोविंदराव धर्माजी	(४)	...	...	१९४
२८९ वाटवे के. ना. ...	(८)	...	...	६०
२९० वाकसकर वि. स. ...	(२)	...	...	३१५
२९१ वेलणकर कृष्णाजी लक्ष्मण	(६)	...	...	३७७
२९२ वेलणकर वि. रा. ...	(२)	...	...	४६८

२९३ वेलणकर सुधा ... (२) ३७६
२९४ वेलणकर गोपाळ कृष्ण... (६) ४९०
२९५ वेलकर मोतीराम बाळकृष्ण (७) १२६
२९६ वैद्य गोविंद गणेश ... (३) ४४५
२९७ वैद्य खडीवाले ... (२) ३०५
२९८ वैद्य महादेवबुवा ... (१) २६२
२९९ वैद्य व्यंकटेश विष्णु ... (३) ७०२
३०० वैद्य सुंदरराव भास्कर (१) २८१

श

३०१ शहा माणिकचंद वीरचंद (६) २७९
३०२ शारंगपाणी विनायक मोरेश्वर (१) १७५
३०३ शिखरे दा. न. ... (७) २६०
३०४ शिखरे बा. वि. ... (१) ४४७
३०५ शिंदे शिवाजीराव महाराज (१) १६
३०६ शिंदे बाबू रामचंद्र (टांगेवाला) (७) २१४
३०७ शिरगांवकर दत्तात्रय गोपाळ (४) ४९५
३०८ शिराळकर पांडुरंग केशव (३) २८६
३०९ शेंडे गणेशशास्त्री ... (५) ३

स

३१० सहस्रबुद्धे बी. एन्. ... (२) ४८९
३११ सहस्रबुद्धे का. म. ... (१) ४४०
३१२ सबनीस शांताराम आ.... (२) ४२५
३१३ सबनीस रा. प. ... (१) २०७
३१४ सर पाटील मारुति सादु (३) ३४५
३१५ साठे रघुनाथ विष्णु ... (१) २३९
३१६ साठे बाळासाहेब ... (२) ४४१
३१७ साठ्ये दामोदर गोविंद... (२) ४२०
३१८ साने ल. र. ... (५) १०७
३१९ साळवेकर ग. वि. ... (३) १०३
३२० सुलाखे उषा ... (१) ३५४
३२१ सुंठणकर सदाशिव रंगनाथ (५) ३८९
३२२ सोमण म. ग. ... (१) ४८०

३२३ सोमण रामचन्द्र गणेश... (९) ५७
३२४ संपूर्णानंदजी ... (१) ५२४

ह

३२५ हर्डीकर त्र्यंबक भिकाजी (५) ३०१
३२६ हणमंतराम रामनाथ ... (४) १२२
३२७ हरीप शंकर नारायण ... (९) ३१
३२८ हरीदास बाळशास्त्री ... (२) ३४०
३२९ हुद्दार श्री. ना. ... (४) ४६०
३३० हुसेन कलिमुद्दीन अबदुल (३) २६३
३३१ होनप रं. न. ... (१) ४४७
३३२ होळकर यशवंतराव महाराज (२) १५२


क्ष

३३३ क्षीरसागर एन्. एन्. ... (२) ४१५
३३४ क्षीरसागर देवदत्त भालचंद्र (२) ३७१
335 Vaikunth Lallubhai Mehta (2) 529
336 M. R. Jayakar (2) 530
337 Lala Duni Chand (3) 533
338 Jairamdas Daulatram (1) 535
339 B. Pattabhi Sitaramayya (2) 535
340 Mangaldas Pakvasa (1) 536
341 Jamnadas M. Mehta (5) 537
342 L. M. Patil (1) 541
343 Kshamabai Rao (2) 541
344 Purshottamdas Thakurdas (1) 543
345 G. A. Natesan (1) 543
346 C. Rajagopalachari (1) 544
347 Mirza M. Ismail (3) 544
348 K. Sivanandy Thevar (1) 547
349 Gunde Rao Harkare (2) 548
350 R. P. Paranjpye (2) 550
351 N. C. Narsimha Acharya (9) 550
352 Devadas M. Gandhi (1) 560
353 C. P. Ramaswami Aiyar (2) 560
354 Ramdeo A. Podar (3) 563
355 Ambika Prasad Wajapeyi (2) 564

356	Gokul Chand Narang	(2)	....	....	565
357	Syama Prasad Mookerjee	(2)	....	....	566
358	Narajan Dutta	(1)	....	....	568
359	Helena Normanton	(2)	....	....	568
360	Debendranath Mukerjee	(2)	....	....	569
361	A. B. Latthe	(1)	....	....	571
362	Lord Halifax	(1)	....	....	571
363	Sir Francis Low	(1)	....	....	571
364	Capt. Keshav Chandra	(1)	....	....	572
365	I. S. Pawate	(3)	....	....	572
366	K. M. Munshi	(1)	....	....	575
367	Kunwar Chanda Karan Sarda	(1)	....	....	575
368	P. Kodanda Rao	(1)	....	....	576
369	R. V. Gogate	(3)	....	....	577
370	N. V. Sahasrabudhe	(1)	....	....	579
371	Dr. Rajendra Prasad	(2)	....	....	580
372	K. F. Nariman	(2)	....	....	581
373	Ivor S. Jehu	(1)	....	....	582
374	S. A. Brelvi	(1)	....	....	583
375	Sardar Vallabhbhai Patel	(1)	....	....	584

चुकीची दुरुस्ती

पान ४४७ वर रा. रं. न. होनप यांच्या नांवावर दोन आठवणी छापण्यांत आल्या आहेत. पण त्यांपैकीं फक्त क्रमांक एक रा. होनप यांची असून, क्रमांक दोन ही रा. बाळकृष्ण विठ्ठल शिखरे, मिरज, यांची आहे. झालेल्या या चुकीबद्दल दिलगिरी वाटते. त्या उभयतांनीं क्षमा करावी – संपादक.



नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर

श्री

देशभक्त – साहित्यसम्राट्

नरसिंह चिंतामण केळकर

यांच्या

आ ठ व णी



पुरुषोत्तमशास्त्री रानडे

(शास्त्री, आनन्दाश्रम, पुणें)

(१) मम कै. केळकरमहाशयैः समं यो हि संबन्धो घटितः स संस्कृत-विषयककार्ये एव । तेषामेव सहायतया पुण्यपुरे १८६३ तमशकाब्दे द्वितीयसंस्कृत-साहित्यसंमेलनस्याधिवेशनमभवत् । आसंश्च ते तत्संमेलनस्य कार्याध्यक्षाः । वेणु-(बेळगांव) ग्रामे प्रथमसंस्कृतसाहित्यसंमेलनस्याधिवेशनावसरे द्वि. सं. सा. संमेलनस्य निमन्त्रणं तत्र तैरेवोद्घोषितम् । तेषामेव च महीयसा लौकिकमहिम्ना तत्तत्संस्था-माधिपतिभ्योऽन्येभ्यश्च संपत्तिमद्भ्यः संमेलनार्थं प्रभूतं द्रव्यं लब्धम् । संमेलनेऽस्मिन् तात्यामहोदयानां विशेषतस्तावद् द्वौ गुणौ मयाऽसकृदनुभूतौ । तयोरेकस्तेषां प्रतिक्षणं समेधमान उत्साहः, अपरश्चावसरपरिपालनदक्षता । संमेलनाध्यक्षान् प्रण्डितद्रविडराजेश्वरशास्त्रिणः पुण्यस्थानात् (पुणें स्टेशन) आनेतुं तात्यामहानु-भावादिभिरस्माभिर्गन्तव्यमासीत् । तात्यामहाशयास्तु उष्णीषं उत्तरीयं च धार-यित्वा यथावसरं निर्धारितस्थले संनद्धा एव । संमेलनस्थितसकलकार्येष्वपि ते सर्वेभ्यः प्रागेवोपस्थिता भवन्ति स्म । एकदा तु स. प. महाविद्यालयस्य 'रमाबाई हॉल' नामके सभागृहे, संमेलनस्यैकः कार्यवाह इत्यहं निश्चितकालान्मनागिव पूर्वं गतवान् । यावत्पश्यामि तावन्मदपेक्षयाऽपि प्रागुपस्थितास्तात्यामहाभागाः ।

(२) अस्माकं गीर्वाणवाग्वर्धिनीं सभामपि तात्यामहोदयाः परमयाऽऽत्मीय-तया पश्यन्ति स्म । एकदा वार्षिकोत्सवस्य नियोजिताध्यक्षेभ्यः 'केनाप्याकस्मिकेना-परिहार्यकारणेनाहमायातुं न शक्नोमि' इति तन्त्रसंदेशः प्राप्तः । वार्षिकोत्सव-दिवसश्च सुनिश्चित आसीत् । एतादृश्यां विप्रतिपत्त्यां सभाचालकैर्वार्षिकोत्सवाध्यक्ष-पदार्थं प्रार्थितास्तात्यामहानुभावा अल्पीयस्येवावसरेऽध्यक्षभाषणं विद्वन्मनोहारि कल्पं कृत्वा यथावसरमागम्य भूषयित्वा चाध्यक्षासनं समारम्भमरञ्जयन् । हर्षं ।

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
(विद्यानिधि, पुणें)

(१) एकस्मिन् दिने केचन नियोजिताः केळकरमहोदयानां गृहे संमिलिता आसन् । समयश्च माध्याह्ने द्वादशवादनात्मक आसीत् । संमिलिता जनाः स्वकीयं कार्यं महत्तमं मत्वा स्वीयान् विचारान् प्रकटयितुं प्रारभन्त । केळकरमहोदया अपि श्रावं श्रावं मध्य एव कंचन प्रश्नं प्रकटयित्वा वक्तुराशयस्य स्पष्टीकरणार्थं प्रायतन्त । एते भूयशः न्यायाधीशभूमिकामङ्गीकृत्य वक्तुराग्रहस्य शिथिलीकरणमेव स्वकर्तव्यं मन्वते स्म ।

अस्मिन्नेवावसरे केचन कार्यार्थिनः परिचिता अपरिचिता वागन्तुका आगत्य नामपत्रिकां प्रेष्य घण्टानादं वा कृत्वा स्वागमनं निवेदयन्ति स्म । एतेऽपि झटिति बहिर्गत्वा तेषां कार्यं निर्वर्त्य पुनः प्रत्यागच्छन्ति स्म । तदानीं कश्चन स्वकन्यार्थं वरं संशोधयितुं प्रयतमानः एतान् प्रष्टुं समागत आसीत् । एभिर्महाभागैर्बहिर्गत्वा तस्याशयमाकलय्य तस्मै कन्योचितानि स्थलानि निवेद्य कथयित्वा चावश्यकं पुनरप्यन्तरागत्य पूर्वप्रक्रमानुसारं कार्यं प्रारभ्यते स्म । एतादृशी अवधानशक्तिः संग्राहकता क्वचिदेव दृश्यते ।

(२) कार्यभारग्रस्तोऽयं महापुरुषः केवलमात्मदृष्टयैव कार्याणि न करोति स्म । कोऽपि कदापि वागच्छतु हस्तस्थितं कार्यं दूरमपसार्यागन्तुकस्यैव कार्यं निर्वर्तयितव्यमिति स्वभाव एवास्य महाभागस्य । स्थातव्यं, श्व आगन्तव्यम्, इदानीं कार्यव्याप्तोऽस्मि, लेखनीं व्यापारयामि, समयो नास्तीति निमित्तानि एतेन महाभागेन कस्मैचिदपि कदापि न निवेदितानि । कस्याप्यागमनानन्तरमव्यवधानेनैव परकीयं कार्यं पारयितव्यमिति न केऽपि विमनायिता अनेन नरसिंहेन । स्वकीयं संचलत् कार्यं मध्ये एवापसार्य झटित्यागन्तारं समाहूय सहासं स्वागतं विधाय, कर्तव्यांशं ज्ञात्वा ताटस्थ्येन समालोच्य, स्वार्हं कार्यांशं निश्चित्य तं च कर्तुं सन्नद्धोऽस्मीत्याश्वास्य द्विचतुर्भिः शब्दैः परिचितमपरिचितं वागन्तुकं संतोष्य सविनयं विसर्ज्य च नित्यशः स्वकीयं कार्यमावर्जितमेतेन लोकाराधकेन । नूनं लोकान् समाराधयितुमेव एतादृशः महाभागाः प्रभवन्ति भूमौ ।

(३) प्रायेण लोकाराधनं मदिरेव मूर्धानं घूर्णयति । असंबद्धालापान् वक्तुं प्रसह्य चेतयति । सत्याधिष्ठितां वास्तविकीं भूमिं स्थातुमसमर्थयति । पदे पदे स्वस्थानात् स्खलनभीत्या आन्दोलयति चेतश्च । परमेतेन महाभागेन लोकमान्यस्थानं वैप्राप्यापि युक्तायुक्तविचारशक्तिः कदापि न विसर्जिता । केसरीपृष्ठमधिष्ठायापि सामान्यजनविमुखता न कदापि संपादिता । राष्ट्रसागरं क्षोभयित्वापि मर्यादापुरुषोत्तमत्वं न कदापि हापितम् ।

संग्रामे कस्य शस्त्रस्य कीदृशी कियती वा शक्तिरिति ज्ञानस्य विशेषत आवश्यकता वर्तते सैनिकस्य । तथैव लोकक्षोभस्यापि कीदृशी कियती वा शक्तिरिति ज्ञानस्य विशेषतोऽपेक्षा वर्तते लोकनेतुः । तादृशी शक्तिः येषु लोकाग्रणीषु विशेषत आसीत् तेषु केळकरनरसिंहाः मूर्धन्यभूता आसन् । एतद्विषये न विवादावसरः ।

(४) ज्ञानशक्तितोऽपि ज्ञानमाकलय्य तत्पराङ्मुखस्य समाजस्याग्रतस्तत् प्रतिपादनं विशेषतो दुष्करम् । लोकक्षोभभयभीता असामान्या अपि तत्र प्रायेण विरज्यन्ते का कथा सामान्यानां लोकोपजीविनां वराकाणाम् । तेषु सामान्येषु वराकेषु अस्य नरसिंहस्य गणना न केनापि कृता । असहकारः, विद्यालयविधिमंडळयोस्त्यागः, खादीपरिधानम्, कारावासप्रवेशः, इत्यादयो बहवः प्रसङ्गाः प्रादुरभवन् । तदानींतनेषु विवादेषु बुद्धिमारुह्य, व्यवहारं समालोच्य, राष्ट्रहितं मनसि कृत्वा, तारतम्यं विविच्य चैतेन महाभागेन लोकविरोधमविगणय्य यत्प्रतिपादितं तदेवेदानीं यौथार्थ्येनानुभूयते, अनुस्मियते च तत्प्रतिपादकैरपि । अहो वैदग्ध्यं महाभागस्य ।

❋

गणेशशास्त्री शेण्डये
(व्याकरणकोविद, पुणें)

(१) एकदा तात्याराया मद्गृहे उपाहारार्थं निमन्त्रिता आसन् । तैः साकमन्येपि सन्मान्याः केचन जनाः आहूता आसन् । तत्र तावत् सर्वेभ्यः पूर्वं तात्यारायाः समागताः । ततस्तैः साकं काश्चन कथाः समभूवन् । तत्र त एवं मया पृष्टा यद्हो भवदीयाः समवयस्काः पुरुषाः प्रायो विनष्टाः । यत्र भवद्भिर्गम्यते तत्र भवदपेक्षया सर्वेऽपि युवान एव तिष्ठन्ति । तैः साकं भवद्भिः कथं व्यवह्रियते तदा ते ऽकथयन् । मदीयं वयोगतं श्रेष्ठत्वं विस्मृत्याहं तैः साकं व्यवहरामि । तेन तेऽपि संतुष्टा जायन्ते मदीयं यत्कार्यं राजकारणरूपं तदपि निर्वर्तयामि ।

(२) कथाप्रसंगेन कोंकणप्रांतस्थानां केषांचन कुलानां कथाः प्रारब्धास्तदा तेऽब्रुवन् । अहो प्रतिदेशं प्रतिकुलं प्रतिपुरुषमुत्पात्तिः स्थितिर्विनष्टिरिति तिस्रो ऽवस्था भवन्ति तत् प्रथमः पुरुषः कुलमुत्कर्षयति द्वितीयस्तद्रक्षति तृतीयस्तु प्रायो नाशयत्यतस्तत्र कुशलेन खेदो न कार्यः ।

(३) उपाहारोत्तरं हस्तमुखं प्रक्षाल्योपविष्टेषु जनेष्वित उत्तरं चहापानं वर्तत इति केनचिदुक्ते सति तात्याराया अब्रुवन्नस्मदीयानि यानि कर्णनेत्रादीनींद्रियाणि वर्तन्ते तानि मुक्त्वा केवलमुदरसंतोषण एव भवतां कुत आग्रहः । एतावंतं कालमुदरसमाननं समभूत् । अत इत उत्तरमन्येषामिन्द्रियाणां संतोष एवोचितः । ततोऽहमुक्तवान् शरीर उदरस्य सर्वेन्द्रियपोषकत्वात्तदेव सभाजयामि । तत ओमित्युक्त्वा ते चहामगृह्णन् ।

(४) एकदा सत्याद्रिपत्रे मुद्रितस्य श्रीमतां तात्यारायाणां लेखस्य मधुरवाण्यां मुद्रणार्थमहं संस्कृतभाषया रूपान्तरमकरवम् । ततश्च तेषामाज्ञा प्रकाशने अपेक्ष्यते इति तेषां गृहं गतवान् । तैः सर्वोऽपि लेखो वाचित उक्तवंतश्च कस्यापि मदीयस्य लेखस्य संस्कृतभाषायामनुवादितुं ममानुज्ञा वर्तत एवेति भवन्तो जानन्तु । तदानी लेखनकुशलत्वं संपादयितुं किं करणीयमिति पृष्टास्तेऽवोचन् स्वमनसि प्रादुर्भूतान् सर्वानपि विचारान् यः कागदेऽवतारयति स एव लेखनकुशलो भवति ।

(५) कै. महामहोपाध्यायानां वासुदेवशास्त्रिणां मम गुरुचरणानां किंचित् पुण्यपत्तने स्मारकं विधेयमिति विचार्यैकां योजनां तात्यारायेभ्यो निवेदयितुमहं गतवांस्तद्गृहम् । सर्वाऽपि योजना तेभ्यो निवेदिता । तां तेऽन्वमोदन्त परन्तु तत्र एको विषय एवमासीत् ' पुणें संस्कृतपाठशाला ' इति यन्नामधेयं वर्तते तत्परिवर्त्य म. म. अभ्यंकरवासुदेवशास्त्रिपाठशाला इति नामकरणीयम् । तच्छ्रुत्वा तेऽवदन् अहो एवं न करणीयं यतो यैरेतन्नाम पूर्वं स्थापितं तेषां तत्र के वा हेतवो भवन्ति तान् न वयं विद्मोऽतः कस्या अपि संस्थाया नामविपरिणामो न विधेयस्तर्हि म. म. वासुदेवशास्त्रिमंदिरं गृहस्य नाम विधाय तत्रैवेयं पाठशाला स्थापनीया तेन चोभयमपि सिध्येत् । दुर्दैववशात्तत् किमपि नाभूदेतदन्यत् ।

❋

गलगली रामाचार्यः

(मधुरवाणी-सम्पादकः, बेळगांव)

(१) त्रिंशद्वर्षेभ्यः प्राक्तनः प्रसङ्गः । तदा ' सौदामनीं ' नाम संस्कृतमासपत्रिकां प्रकाशयितुं व्यवसितमस्माभिः । मुहुर्मुहुः कृतायामपि बहुविधप्रार्थनायां, तदानीन्तनो मोहमयीयो ब्रिटिशसर्वकारो द्विसहस्ररूप्याणां प्रातिभुवं (जामीन) निष्कारणमारम्भ एव समादिशत् । तदा कारणवशात्पुण्यपत्तनं गतेन मया साक्षात्कृताः श्रीलोकमान्याः । निवेदिता संस्कृतपत्रिकायाः कर्मकथा । ततस्तैरभिहितम् " वृत्तमेतत्सर्वं श्रीकेळकरमहोदयाय कथ्यताम् । स सर्वकारं प्रचोदयेद्भवदभिमतविषये " इति । तदनु श्रीकेळकरमहोदयानां मन्दिरमुपेत्य सर्वं कथितं तेभ्यः । तदा मृदुमन्दस्मितमवदंस्ते " चौर्यकारिणः सौदामन्याः प्रकाशादपि बिभ्यति । भवतु । सर्वं विलिख्य दीयताम् । 'केसरी'पत्रे स्फुटलेखेनान्यायमेतत्प्रकाश्य प्रबोधयेयं सर्वकारं स्वदोषपरिमार्जनायेति । तेषां विनोदेऽपि गूढं भावगाम्भीर्यं, व्यवसायबन्धुष्वात्मीयताभावनोत्कर्षं च विभाव्य विस्मयस्तिमितोऽभवम् ।

(२) तदनन्तरं वत्सरे श्रीमदुत्तरादिमठाधीश्वराः श्रीसत्यध्यानतीर्थश्रीमच्चरणाः श्रीतिलकमहाभागैर्गीतारहस्ये श्रीमध्वाचार्यमतविषये कृताक्षेपनिरासार्थं चर्चोद्देशेन पुण्यपुरीं समागच्छन् । तदा पत्रिकाकारमिषेण श्रीकेलकरैर्गृहीतः

श्रीस्वामिनां दर्शनलाभः। भाषणप्रसंगे श्रीस्वामिपादैरादिष्टम् – " 'केसरी'पत्रे तदा तदा धर्मप्रचोदका अधर्मप्रचारनिरोधका लेखाः प्रकाशनीयाः " इति। श्रीकेलकरमहोदयैरुत्तरितम् – " न कदापि सहते जनमतविरुद्धं धर्मध्वंसबलात्कारं केसरी। " तच्छ्रुत्वा श्रीस्वामिनः सन्तुष्टाः सानन्दमभ्यनन्दन् श्रीकेलकरान्।

(३) तस्मिन्नेव समये कस्याश्चित्पुण्यतिथौ देवपूजादर्शनार्थं प्रसादग्रहणार्थं च श्रीस्वामिभिः श्रीरङ्गीरङ्गाचार्यमुखेन समामन्त्रिताः केलकरमहाशयाः। तैः समागतैश्च देवदर्शनं गृहीतम्। केलकररङ्गीशास्त्रिणश्च श्रीस्वामिनां समक्षमेकपङ्क्तावुपविष्टा भोजनार्थम्। तदा श्रीरङ्गीशास्त्रिभिर्विनोदेन श्रीकेलकराणामङ्गे केशरगन्धनामानि, ललाटे भव्याङ्गाराक्षते चेति वैष्णवचिन्हानि विन्यस्तानि। श्रीकेलकरैः सहासमनुमोदितं तत्सर्वम्। पुनर्गृहगमनसमये पथि श्रीकेलकराणां शरीरेऽदृष्टाश्रुतपूर्वाणि वैष्णवचिन्हानि विलोक्यानभिज्ञैर्बालकैरुद्घोषितम् 'श्रीनरसोपंता नरसिंहाचार्याः सम्पन्ना' इति। प्रथममेव हसन्मुखे महती हास्यलहरी समुद्गता श्रीकेलकराणाम्। एवं श्रीकेलकरमहोदयानां सर्वमतसहिष्णुतां सर्वमतीयैः सहयोगोदारतां च प्रत्यक्षमवेक्ष्य मनसा सहस्रशो धन्यवादान् व्यतरामिति शम्।

❁

बुर्ली श्रीनिवासाचार्यः

(मधुरवाणी-सम्पादकः, बेळगांव)

(१) एकदास्मिन् बेळगांवनगरे गीर्वाणवाग्वर्धिनीसभायां आध्यक्ष्ये त आमंत्रिता आसन्। सर्वासु विद्यासु चतुरस्रमतयोऽप्येते निरन्तराभ्यासवैधुर्यात् मातृभाषायामेव भाषन्त इत्यासीदस्माकमभिप्रायः, परामिमेऽतिसरलया सरसया च संस्कृतभाषयोक्त्वा सर्वानपि सदस्यानत्यानन्दयन्।

(२) दक्षिणभारतीयं संस्कृतसाहित्यसम्मेलनं प्रथममेव बेळगांवनगरे यदास्माभिः प्रवर्तितं कथं यशस्वि स्यादिति साशंकमस्माभिराप्टृष्टाः 'प्रेमातिशयेन' यद्यत् कर्तव्यमस्माभिस्तत्तत् सर्वं सुव्यवस्थिततया दिशा सविस्तरं पत्रद्वारादिश्य सत्यपि कार्यबाहुल्ये प्रार्थिताः सम्मेलने सर्वेष्वपि कार्यप्रसंगेषु समुपस्थाय समुदतेजयन्नस्मान्।

(३) द. भा. सं. सा. सम्मेलनमिदं पुरताश्चिरायापि सुरसरस्वतीसेवायां समर्थं यथा प्रवर्तेत तथानुष्ठातुं द्वितीयं सम्मेलनमिदं पुण्यपत्तने भवद्भिरामंत्रणीयमिति प्रार्थयत्सु अस्मासु अथ किं अवश्यं वयमामंत्रयामहे मास्तु भवतां चिन्ता इत्यावेद्य सपद्यामंत्रितं च। तथा च पुण्यपत्तने यशस्वितयात्युत्तमतया च सम्मेलनं प्रवर्त्य " भवत्प्रार्थितमनुष्ठितमिति सास्मितमावेदयंश्च "।

(४) एवमेवैकदा प्रार्थिता मधुरवाणीकार्यालयमुपेत्य संस्कृते पत्रप्रकाशनसाहसं यशस्वितां चाभिनंद्य पुण्यपत्तनमागच्छत अहमस्मि भवतां साहायकृदिति

यदाश्वासयंस्तत् स्मारं स्मारमिदानीं वयं मधुरवाणी च संततमविरलान् नयन-सलिलबिन्दून् वर्षाम इत्यलम्।

❋

श्रीमंत भवानराव ऊर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधि

(बी. ए., राजेसाहेब, संस्थान औंध)

(१) कै. तात्यासाहेब केळकरांचा व आमचा संबंध आम्ही दोघेहि डेक्कन कॉलेजांत विद्यार्थी असल्यावेळीं आला व त्याचें रूपांतर पुढें स्नेहांत होऊन तो स्नेह ते मरेपर्यंत, अगदीं अखेरपर्यंत, कायम टिकला.

तात्यासाहेब हे लहानपणीं दिसावयाला मोठे देखणे व नाजुक दिसत. त्यामुळें आम्ही दोघेहि ज्युनियर बी. ए. मध्यें असतांना गॅदरींगसाठीं मृच्छकटिक नाटक करावयाचें ठरलें त्या वेळीं तात्यासाहेबांना मदनिकेचा पार्ट देण्यांत आला, व तें काम त्यांनीं फार चांगल्या रीतीनें केलें. कै. सरदार तात्यासाहेब मेहेंदळे हेहि आमचे सहाध्यायीच होते. त्यांच्यामार्फत पुढें तात्यासाहेबांची व आमची चांगली दोस्ती झाली व पुढें मोठेपणींहि आम्ही तात्यासाहेबांना मदनिकेच्या कामाबद्दल गमतीनें चिडवीत असूं !

(२) तात्यासाहेब हे मूळचेच प्रकृतीनें धिम्या वृत्तीचे व दोन्ही बाजूंनीं सारासार विचार करणारे. त्यामुळें कोणतीहि गोष्ट आवेशयुक्त अविचारानें ऊर्फ धिटाईनें करण्याचा त्यांचा स्वभावच नव्हता. ही गोष्ट केसरीचे संपादक म्हणून त्यांनीं लिहिलेल्या लेखांतच नव्हे तर त्यांच्या प्रत्येक ग्रंथांत पदोपदीं दिसून येते. कोणत्याहि गोष्टीला दोन बाजू असतात व त्या दोन्हींचाहि विचार तात्यासाहेबांनीं अखेरपर्यंत केला व महाराष्ट्रियांचें बुद्धिवादी वैशिष्ट्य कायम राखलें. एका दृष्टीनें तात्यासाहेब हे नाना फडणिसासारखे अर्धे शहाणे होते. कै. लोकमान्य टिळक हे बुद्धीनें तीव्र व कार्य करतांना धडाडीनें पुढें होणारे. कै. तात्यासाहेबांनीं लोकमान्यांचा बौद्धिक वारसा चालवला. त्यामुळें तात्यासाहेबांच्या हयातींत केसरीची बौद्धिक उंची कमी झाली नाही; इतकेंच नव्हे तर त्यांनीं कोणत्याहि गोष्टीचें निरपेक्षपणानें केलेलें विवेचन कालांतरानें प्रत्ययाला आलें.

(३) १९०१ सालीं आम्ही आमच्या वडिलांच्या निधनानंतर साताऱ्यास गेलों ते १९०८ पर्यंत पुणें, मुंबई वगैरे ठिकठिकाणीं कामकाजाच्या निमित्तानें येथें गादीवर येईपर्यंत बाहेर होतों. या आमच्या अज्ञातवासाच्या कालांतहि तात्यासाहेबांचा व आमचा स्नेह अखंड होता व तो आम्ही गादीवर आल्यावरहि कोणत्याहि कारणानें कमी झाला नाहीं. कै. वामनराव पटवर्धन व कै. तात्यासाहेब केळकर यांचें आम्हांस औंध संस्थानांत लोकशाही सुरू करण्याच्या कामीं आरंभीं फार

साहाय्य झालें; व या दोन पुढाऱ्यांच्या प्रयत्नांनींच महाराष्ट्रांतील संस्थानांतून लोकशाही संस्था सुरू झाल्या.

(४) यानंतर आमच्या रौप्यज्युबिलीच्या प्रसंगीं कै. तात्यासाहेबांचा व आमचा विशेष संबंध आला. डेक्कन कॉलेजच्या आमच्या वेळच्या माजी विद्यार्थ्यांचें आम्हीं गॅदरिंग केलें.त्या वेळींहि कै.तात्यासाहेबांच्या सहवासांत आमचा काळ आनंदांत गेला. आमचे त्या वेळचे आणखी सहाध्यायी म्हणजे कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बाबासाहेब कामत, बॅ. गोविंदराव गाडगीळ, बापूसाहेब जठार वगैरे होते. त्यांपैकीं बॅ. गाडगीळ व बापूसाहेब जठार विद्यमान आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळ, भांडारकर इन्स्टिटयूट या संस्थांच्या कारभारांत आम्हीं कै. तात्यासाहेबांच्या बरोबर भाग घेतला. त्यावरून त्यांना या सर्व कार्यांची कशी आस्था होती हें आम्हांस वेळोवेळी दिसून येत होतें. अगदीं अलीकडे दक्षिणी संस्थानी संघराज्य स्थापन करण्याची भाषा १९४५ सालीं सुरू झाली व पुण्यास सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या इमारतींत पहिली सभा झाली. त्या वेळी भोर दरबारचे सल्लागार म्हणून कै. तात्यासाहेब हजर होते. परमपूज्य कै. महात्मा गांधीहि त्या सभेस हजर होते. त्या वेळीं त्यांनीं थट्टेनें कै. तात्यासाहेबांना आपण कोणत्या संस्थानचे राजे म्हणून विचारलें. तेव्हां तात्यासाहेबांनी तितक्याच तत्परतेनें सर्वच राजांचा हितचिंतक म्हणून उत्तर दिलें. दक्षिणी संस्थान संघराज्याची स्थापना दिरंगाईवर टाकूं नये, चांगली गोष्ट करण्यासाठीं मुहूर्ताची वाट नको, हें त्यांचें नेहमींचें म्हणणें; परंतु आमच्यापैकीं अनेकांना ती गोष्ट त्या वेळीं पटली नाहीं व त्याचा अखेर व्हावयाचा तोच परिणाम झाला.

(५) औंध संस्थानांतील ग्रामपंचायत कारभाराची तात्यासाहेबांना पुरेशी कल्पना पाहिजे होती. म्हणून दीड वर्षापूर्वी त्यांनीं आम्हांस त्यांच्या पुष्करणी बंगल्यावर मुद्दाम चहास बोलाविलें होतें, व दीड तास आम्हीं भरपूर मनमोकळेपणानें चर्चा केली. अडाणी लोक स्वतःचें कसें राज्य करणार ही त्यांची काल्पनिक शंका व " शहाणे करून सोडावें सकळ जना " हें त्यांना आमचें उत्तर होतें. कोणतीहि चांगली गोष्ट ताबडतोब ग्रहण करण्याची तात्यासाहेबांची तयारी होती व त्यांनीं लागलीच आमच्याकडून ग्रामपंचायतीचे रिपोर्ट मागून घेतले.

एकंदरींत तात्यासाहेबांची बुद्धि विवेचक, सर्वगामी व सहिष्णु होती व त्यांची आठवण होतांच त्यांचा इतका दीर्घकाळ सहवास घडलेल्या आम्हांस दुःख होणें अगदीं स्वाभाविक आहे.

❋

श्रीमंत सौ. लक्ष्मीबाईसाहेब पटवर्धन
(राणीसाहेब, संस्थान मिरज)

(१) दे. भ. तात्यासाहेब केळकर मिरजेस आल्यावेळीं सुधारणा, सुख व सदाचार या पुस्तकाचीं प्रुफें तपासण्यास पुण्याहून आलीं होतीं. सहज सर्व मंडळी बोलत बसलों असतां त्यांनीं मला प्रश्न केला :–

"आपल्याला यांत्रिक सुधारणांविषयीं काय वाटतें ? त्यांपासून मनुष्यास सुख होऊं शकतें किंवा नाहीं ? "

मीं उत्तर दिलें, "सर्व सुधारणांपासून सुख होतेंच असे निश्चितपणें कसे म्हणतां येईल ? "

त्यावर ते म्हणाले, "कां बरें नाहीं होऊं शकणार ? विजेच्या चुलीवर स्वयंपाक अतिशय जलद होतो हें स्त्रियांच्या दृष्टीनें सुख नव्हें काय ? "

मी म्हणालें, "जर वीज बंद पडली तर सुख बाजूला राहून दुःख मात्र होतें. सर्पण आणून चूल पेटविण्यापासून तयारी करावी लागते. तेव्हां असल्या सुधारणा सर्वस्वीं सुखदायी कशा म्हणतां येतील ? "

तात्यासाहेब बोलले, "असें कसें म्हणून चालेल ? जी विजेची चूल आपल्याला रोज अल्प काळांत सुग्रास व रुचकर पदार्थ बनवून देते ती एखाद्या दिवशी बंद पडल्यास तेवढ्यामुळें ती सुधारणा दुःखदायी कां म्हणावी ? संसारामध्यें आपण रोज अनेक सुखें भोगतों, क्वचित् प्रसंगी कांहीं कारणानें त्या सुखांत व्यत्यय आल्यास तेवढ्यामुळें भोगलेलीं सुखें व्यर्थ आहेत असें म्हणून चालणार नाहीं. मनुष्यांनीं अशा प्रसंगींहि समाधान राखलें पाहिजे."

(२) त्यांचा मुक्काम येथें असतांना एके दिवशी रात्री जेवावयास मी खालीं येतें तों डायनिंग हॉलमध्यें टेबलासमोर पूर्व बाजूला एक नोकर चांदीची सरस्वतीची मूर्ति कपाटावर ठेवीत होता. ती नीट बसली कीं नाहीं हे तात्यासाहेब जवळ उभे राहून पाहत होते. तेव्हां मीं विचारलें, "हें काय चाललें आहे ! ही मूर्ति कसली ! " त्यावर ते उत्तरले, "आपण आपल्या बंगल्याला देवीभवन नांव ठेवलें आहे ना ? तेव्हां मी ही देवीची मूर्ति ठेवून देवीभवन नांव सार्थ करतों ! "

(३) सहज एकदां जेवणानंतर गप्पा मारत असतांना, नशीब व उद्योग या विषयावर चर्चा निघाली. तात्यासाहेबांना मी विचारलें, "कुटुंबांत कोणाच्या भाग्यानें कांही गोष्टी भाग्यप्रद अशा घडतात का ? आपला यावर विश्वास कितीसा आहे ? " तेव्हां ते म्हणाले, "होय, माझा विश्वास आहे. स्वतः माझीच गोष्ट मी सांगतों. माझें लग्न झाल्यानंतरच माझ्या भाग्योदयास सुरवात झाली. यावरून

माझ्या बायकोचा पायगुण असें मी कां समजूं नये? मात्र यावरून प्रयत्नाला मी कमी लेखतों असा मुळींच अर्थ नाहीं. प्रयत्नाला दैवाची जोड पाहिजे असें माझें म्हणणें."

❋

श्रीमंत रघुनाथराव ऊर्फ बाबासाहेब पंतसचीव
(राजेसाहेब, संस्थान भोर)

(१) आतां आम्ही कै. तात्यासाहेब यांच्याविषयीं जी आठवण नमूद करणार आहों ती बरीच मागील म्हणजे सन १९३१ मे मधील गोष्ट असल्यामुळें त्याबद्दलची माहिती पुष्कळांना नवीन म्हणून वाटेल अशी समजूत आहे. सन १९२८ सालीं आम्ही भोर संस्थान कायदेमंडळ प्रथम स्थापन केलें आणि तीन वर्षांचा अनुभव जमेस धरून त्यांत काय सुधारणा करावी, यासंबंधीं खासगी रीतीनें विचारविनिमय करण्याच्या हेतूनें आम्हीं भोर येथें कांहीं निमंत्रित लोकांची सभा बोलाविली. या सभेचें काम ता. २९ व ३० मे १९३१ रोजीं तात्यासाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं चाललें व त्या वेळीं आम्ही समक्ष उपस्थित होतों. "सभेचें काम सुमारें १० तास चाललें; त्या वेळीं सर्व वादविवाद श्री. बाबासाहेब यांनीं अत्यंत आस्थेनें व दक्षतेनें ऐकला आणि सभेंत झालेल्या सर्व समाधानकारक चर्चेचें सर्व श्रेय बाबासाहेब यांसच दिलें पाहिजे" असें त्यांनीं आपल्या रिपोर्टांत नमूद केलेलें आहे. वाटाघाटींत आलेले विषय अनेक तऱ्हेचे म्हणजे कायदेमंडळाची सुधारणा, राज्यकारभारांतील सुधारणा व त्यांतील अंगें व उपांगें असे बहुविध होते व त्याबाबत तात्यासाहेब यांनीं त्यांच्या नेहमींच्या धोरणास अनुसरून दरबारनें काय करावें व प्रजापुढाऱ्यांनीं काय करावें याविषयीं निःसंदिग्धपणें रिपोर्टांत मार्गदर्शन केलें होतें. त्यांनीं सदरील रिपोर्टांत त्यांच्या स्वतःच्याविषयीं अत्यंत निर्भीडपणें जे विचार नमूद केले आहेत ते येथें आम्ही मुद्दाम देत आहोंत. त्यावरून तात्यासाहेबांचा मोठेपणा स्पष्ट दिसून येतो. ते म्हणतात –

"एकांतिक चळवळीशीं एकजीव झालेल्या माझ्या पूर्वीच्या कांहीं सहकारी प्रजाजनांना मी श्रीमंतांचा पाहुणचार खाऊन सरकारजमा झालों असें वाटण्याचा संभव आहे; उलट संस्थानचे अधिकारी मनांत म्हणत असतील कीं, राजकारणांत पडणारे हे पुस्तकी पंडित अशाच योजना सुचवावयाचे. ते संभावितीमुळें मला वरकरणी आदर दाखवून मनांत मला व्यवहारशून्य म्हणत असतील; पण कोणीं कांहीं म्हटलें म्हणून मी जोंपर्यंत खऱ्या निःस्वार्थी व निःपक्षपाती बुद्धीनें वागेन तोंपर्यंत माझ्या मनाची खंबिरी हेंच समाधान व बक्षीस असें मी समजतों. श्रीमंतांच्या सान्निध्यानें मला सभेचें काम करतांना अत्यंत आनंद झाला व खंबिरी वाटली."

वर नमूद केलेली विचारसरणीच कै. तात्यासाहेब यांनीं अगदीं अखेरपर्यंत तंतोतंत पाळली होती, हें अलीकडे वर्षदीडवर्ष भोर राज्यकारभाराशीं जो त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला व त्यांनीं ज्या प्रकारें काम केलें त्यावरूनहि स्पष्ट होईल.

(२) तात्यासाहेब केळकर यांचा व आमचा संबंध फार जुना म्हणजे जवळ-जवळ पन्नास वर्षांचा. तात्यासाहेबांचे वडील बंधु नारायणराव हे आम्हांस आम्ही पूना हायस्कूलमध्यें शिकत असतांना खासगी शिक्षक होते व त्यांनीं आम्ही महाबळेश्वरास असतांना त्यांचे बंधु कै. नरसिंह चिंतामण केळकर हे तेथें आमच्या बंगल्यांत रहाण्यास आल्यावर त्यांची प्रथम ओळख करून दिली. तें साल १८९७–९८ असावें असें वाटतें. पुढें कांहीं वर्षांनीं नारायणरावांची तब्येत आजारी असल्यामुळें, त्यांच्या प्रकृतीसंबंधानें काळजी वाटत असल्यामुळें, आम्हीं त्यांची प्रकृति कशी काय आहे याजबद्दल त्यांना पत्र पाठविलें होतें. त्या पत्राला तात्यासाहेब यांच्याकडून जें उत्तर आलें आहे तें ता. ३०।८।१९०४ चें पत्र शेवटीं दिलें आहे. त्यांत बंधु जरी गेले असले तरी पूर्ववत् आपला संबंध राहावा वगैरे मजकूर होता. हाच आमचा व तात्यासाहेब यांच्या संबंधाचा प्रत्यक्ष पहिला दुवा होय. तेव्हांपासून निरनिराळ्या प्रसंगीं व निरनिराळ्या कामांनिमित्त त्यांचा व आमचा संबंध जास्त जास्त निकट होत गेला. प्रस्तुत लेखांत आम्ही त्यांचा अगदीं अलीकडे भोर-राज्यकारभाराशीं जो संबंध आला त्याबद्दल थोडक्यांत माहिती देणार आहोंत.

(३) कै. तात्यासाहेब हे भोर-राजकारणांत १९२० सालापासून लक्ष घालूं लागले. हिंदी संस्थानांबद्दल त्यांचें धोरण सहानुभूतीचें असेंच होतें. १९४५ च्या अखेरीस आम्हीं एकदां मुद्दाम कै. तात्यासाहेब यांस भेटावयास बोलाविलें. भेटीचा उद्देश इतकाच कीं, त्यांचा कांहीं बाबतींत सल्ला घ्यावा. भोर प्रजासभेच्या विशिष्ट व्यक्तींकडून ज्या हालचाली चालूं होत्या त्याबद्दल त्यांच्याशीं आम्हीं मोकळ्या मनानें विचारविनिमय केला. त्यांच्या मनमोकळ्या स्वभावानुसार त्यांना जें योग्य वाटलें तें त्यांनीं सांगितलें. त्यावरून मला असें वाटलें कीं, ते जर आपलें प्रेसिडेन्टचें (एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचें) काम पत्करतील तर त्यांच्या व आमच्या स्वभावाचा मेळ बसून ते निरपेक्षबुद्धीनें काम करतील व जें काम करतील त्यामुळें ते मोठ्या दर्जाचे लायक पुढारी असल्यामुळें लोकांवर वजन पडेल व भोरचा राज्यकारभार चांगला चाललेला नाहीं असा जो गैरसमज होत आहे तो दूर होऊन राज्यकारभार खरोखरच चांगल्या प्रकारचा व लोकांना विश्वासांत घेऊन चालेल.

त्याप्रमाणें त्यांना पुन्हां विचारल्यावर त्यांनीं थोडासा विचार करून होय म्हणून सांगितलें. परंतु त्यांनीं तीन अटी घातल्या – १. कोणत्याहि महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें वाटाघाट करावयाची व शेवटीं ते म्हणतील तसें आम्हीं वागावयाचें.

२ या कामाबद्दल त्यांनीं कांहीं मोबदला स्वीकारावयाचा नाहीं. ३ एक वर्षपर्यंत काम करावयाचें. या तिन्ही अटी आम्हीं मान्य केल्या व त्याप्रमाणें त्यांची नेमणूक एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे प्रेसिडेन्ट म्हणून तारीख ६ माहे फेब्रुवारी १९४६ रोजीं केली. याप्रमाणें त्यांनीं काम करण्याचें कबूल करून आपल्या तारीख ३०-८-१९०४ च्या पत्रांत शेवटीं लिहिल्याप्रमाणें आपले शब्द खरे केले.

(४) कै. तात्यासाहेब यांनीं केलेल्या कामाबद्दल विस्तृत विवेचन करण्याचें हें स्थल नाहीं. स्थूलमानानें एवढें म्हणतां येईल कीं, त्यांची काम करण्याची हातोटी फारच थोड्यांस साधेल. कोठलाहि का प्रश्न असेना, दोन्ही बाजूंच्या लोकांना बोलावून, त्यांचें म्हणणें अत्यंत शांतपणानें ऐकून घेऊन मग न्याय्य व योग्य तो निकाल करावयाचा. त्यांचा एक मोठा कटाक्ष असे, तो म्हणजे ते म्हणत कीं, कामाचा निकाल शक्यतों सत्वर व्हावा, मग क्वचित् प्रसंगीं तो पक्षकारास पटो वा न पटो. कार्यकारी मंडळाच्या सभा वारंवार घेऊन त्यांनीं कामाचा निकाल पुष्कळच केला, हें नमूद करण्यास आम्हांस आनंद वाटतो. त्यांच्या सल्ल्यानुसार आम्हीं आमच्या प्रिय जनांना संपूर्ण जबाबदार राज्यव्यवस्था करून देण्याचें ता. २४ जानेवारी सन १९४७ रोजीं जाहीर केलें.

(५) कै. तात्यासाहेब यांनीं १९४७ च्या जानेवारींत लवकरच वर्ष पुरें होत असल्यानें आपणांस मुक्त करावें म्हणून विनंती केली; पण आम्हीं त्यांना सांगितलें कीं, त्यांच्याच सल्ल्याप्रमाणें राजकीय सुधारणा आम्हीं दिल्या असल्यानें व त्यांचा पूर्ण अम्मल ता. १८ ऑगस्ट १९४७ पासून होणार असल्यानें तोंपर्यंत त्यांनीं आपलें काम पूर्ववत् चालू ठेवावें म्हणजे त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा लाभ आमच्या नूतन लोकनियुक्त मंत्रिद्वयांस मिळेल. हीहि विनंती त्यांनीं लगेच मान्य केली. अशा तऱ्हेनें १८ ऑगस्ट १९४७ पर्यंत त्यांनी अत्यंत यशस्वी प्रकारें अत्यंत जबाबदारीचें अध्यक्षाचें काम करून ते आपल्या शब्दांतून कृति करून मोकळे झाले. मोठ्या कष्टी अंतःकरणानें आम्हीं त्यांना मोकळें केलें.

पुढें यानंतरहि नवीन भोर घटना कायद्याप्रमाणे आम्हीं त्यांना आमचे सल्लागार 'ॲडव्हायसर' म्हणून नुकतेंच नेमलें होतें. पण त्या निर्घृण कालानें त्यांच्यावर अकस्मात् झडप घालून त्यांना मृत्युलोकांतूनच हिरावून नेलें!

(६) ह्या दीड वर्षांच्या अवधींत त्यांचा व आमचा संबंध सतत येत गेला. या कालखंडांत संस्थानी राजकारणांतहि मूलगामी, महत्त्वाचे असे फरक विद्युत्-वेगानें होत गेले. निरनिराळे प्रश्न उपस्थित होत व त्यांचा निर्णयहि ताबडतोब घेणें जरूर असे. अशा वेळीं आम्हीं कै. तात्यासाहेब यांना वेळीं अवेळीं बोलवावें व त्यांनीं अत्यंत निरलसपणानें आम्हांस सल्ला द्यावा असा जणूं

कार्यक्रमच झाला होता. कै. तात्यासाहेब यांचा स्वभाव अत्यंत सरळ, निगर्वी, वागणूक साधी व सच्छील, कधींहि हेका धरावयाचा नाहीं ह्या अशाच गुण-समुच्चयामुळें ते कोणालाहि प्रियच वाटत. त्यांचा आम्हीं यथोचित गौरव केला त्या वेळींहि त्यांनीं एकंदर राज्यकारभाराविषयीं अत्यंत सौजन्यपूर्ण उद्गार काढून आपली आमच्याविषयींची तळमळ व्यक्त केली व आम्हांलाहि अशा तऱ्हेचें एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलच्या प्रेसिडेंटचें व ॲडव्हायसरचें काम करण्यास थोर व्यक्ति लाभली हें आमचें महत् भाग्यच आम्हीं समजत असूं. म्हणून आम्हांस ते निवर्तल्याबद्दल धक्काच बसला व आम्हीं त्यांचें शेवटचें दर्शन घेण्या-करिता गायकवाडवाड्यांत जाऊन त्यांना पुष्पांजलि अर्पण केली व स्मशानांत जाऊन सुद्धां शेवटचें दर्शन घ्यावें असें विशेष वाटत होतें; परंतु तें लोकांच्या गर्दीमुळें व आमच्या प्रकृतीमुळें जमलें नाहीं याबद्दल आम्हांस वाईट वाटलें.

(७) कै. तात्यासाहेब यांच्याबद्दल गुणगौरवपर जितकें बोलावें तितकें अपुरेंच पडणार आहे. त्यांचें शेवटचें पत्र ९।८।१९४७ चें आलेलें सोबत जोडलेलें आहे. तें पत्र खाजगी असल्यामुळें लिहावें कां न लिहावें याबद्दल मी विचारांत होतों, परंतु तें द्यावें असेंच मीं ठरविलें. त्यावरून त्यांचा आमच्याशीं कशा प्रकारचा संबंध होता हे समजून येणार आहे. ते आम्हांस स्नेही समजत व तो स्नेह टिकावा ही इच्छा दर्शवीत होंहि आमचें भाग्यच आम्ही समजतों.

(८) आणखी एकच त्यांच्याविषयीं आठवण नमूद करतों. यंदाच्या सालीं जानेवारीत कोल्हापूर व दक्षिणी संस्थानचे रेसिडेन्ट कर्नल हार्वे हे आम्हांस आमच्या पुण्याच्या बंगल्यांत भेटावयास आले. त्या वेळीं एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष या नात्यानें तात्यासाहेब हेहि उपस्थित होते. रेसिडेन्टची व त्यांची ही पहिलीच मुलाखत. पण तात्यासाहेब यांच्या अष्टपैलू ज्ञानाची छाप कर्नल हार्वे यांच्यावर इतकी पडली कीं बोलावयाची सोय नाहीं.

(९) PRIVATE.

Dhulia, 30–8–1904.

Dear Shrimant Babasaheb,

I am extremely sorry to let you know that your friend and my brother Nanasaheb died last night owing to a fever, and consequently I have to reply to your letter to him. I hasten to inform you of the sad event. Vague and unconfirmed rumours are otherwise sure to reach your ears and cause you a good deal of mental distress.

Your letter of anxious inquiry shows that you will feel, at hearing of the sad news, the same kind of grief that has fallen upon us, his surviving brothers. Your relations with him, – relations which I may say were, so far as little experience went, of confinding and respectful friendship on your part and sincere and disinterested well-wishing on his part – were quite unique; and your respect and affection for him was always a source of pride to me. It is possible, his death will prove a loss to you in more ways than one, and I may assure you that I shall always hold myself at your service for such assistance in advice and conversation as I may be able to give you, though, I may say that I cannot claim to have even a fraction of that farsightedness and levelheadedness which you must often have marked in my brother. Nobody can be more aware, than I am, of the natural difference and distance between an heir-apparent to a great gadi and an humble editor of a newspaper which is in bad order in official quarters. But I will always endeavour to regard it as my duty to bear in mind the friendship that existed between my late lamented brother and yourself, and to esteem it a privilege to be able to do any small service to you in my own humble way, whenever an opportunity may occur.

Yours truly,

NARSINH C. KELKER.

श्री

पुणें, ता. ९।८।४७

(१०) श्रीमंत राजे बाबासाहेब पंतसचीव यांच्या सेवेसी..

कृ. सा. न. वि. वि.

काल रोजीं माझ्या ७६ व्या वाढदिवशीं आपण स्मरणपूर्वक शुभेच्छादर्शक पत्र व देणगी पाठविली त्याकरितां मीं आपला अत्यंत आभारी आहें. आपला माझा पन्नास वर्षांचा स्नेह अखंडित जन्मभर टिकावा अशी प्रार्थना आहे.

सही – न. चिं. केळकर

❋

श्रीमंत सौ. लक्ष्मीदेवी नाईक, निंबाळकर

(राणीसाहेब, संस्थान फलटण)

(१) १९४६ च्या मार्च महिन्यांतील गोष्ट. मी 'गद्यगुच्छ' हें पुस्तक वाचावयास घेतलें होतें. या पुस्तकांत श्री. तात्यासाहेब केळकरांच्या निवडक गद्य लेखांचा संग्रह आहे. पहिलाच लेख 'वाङ्मयं म्हणजे काय?' हा मी वाचण्यास सुरुवात केली; परंतु तो मला नीटसा कळेना. मी दुसऱ्या दिवशीं आमच्या शेजारींच राहणाऱ्या श्री. तात्यासाहेब केळकरांच्या घरीं गेलें व तो लेख समजावून देण्याविषयीं त्यांना विनंती केली. त्यांनी मोठ्या आपुलकीनें, हौसेनें व आनंदानें तो लेख मला अतिशय सुलभरीतीनें समजावून दिला. त्या लेखाचें विवेचन करीत असतां गद्य व पद्य यांतील फरक समजावून देण्यासाठीं त्यांनी जवळच टेबलावर पडलेला एक कागदाचा तुकडा घेऊन त्यावर पुढील गद्यवाक्यें व पद्यपंक्ति लिहिल्या –

गद्य – चंद्र आभाळांत प्रकाशतो. त्याच्याभोंवतीं तारे आहेत व त्यांच्यामधून चंद्र फिरत असतो. त्या चंद्रावर हरणाकृति काळा डाग दिसतो.

पद्य – चंद्र फिरतसे आभाळांतुनि । त्या भोंवतिं गृह-तारे ॥ त्यावरि दिसते डाग । असाति ते डोंगरपर्वत सारे ॥

गद्यकाव्य – हें आकाश नव्हे तर समुद्र आहे. त्यांत दिसणाऱ्या या तारका नसून तो समुद्रांतला फेस आहे. त्यांत प्रकाशणारा हा चंद्र नसून ती एक नांव त्या समुद्रांत चालली आहे. त्या चंद्रावर दिसणारा डाग नसून तें त्या नावेवर लावलेलें शीड आहे.

पद्यकाव्य – न हें नभोमंडळ वारिराशी । न तारका फेनाचि हा तयासी ॥ न चंद्रमा नावचि चालताहे । न अंक तो त्यावरि शीड आहे ॥

तो कागदाचा तुकडा साहित्यसम्राटाचा प्रसाद म्हणून मी माझ्याजवळ अगदीं जपून ठेवला आहे!

(२) त्यानंतर सुमारें एक आठवडाभर सकाळीं तास दोन तास आमच्या बंगल्यावर येऊन त्यांनी गद्यगुच्छांतील सर्व लेख मला अतिशय सोप्या भाषेंत हसत खेळत समजावून दिलें. श्री. तात्यासाहेब हे एक कुशल, मनमिळाऊ, नामवंत व अभिजात शिक्षकहि असल्याविषयीं माझी खात्री पटली. त्यांच्या अध्यापनाचा लाभ, अल्प का होईना, मला घडला हें मी माझें मोठें सद्भाग्य समजतें.

साहित्यसम्राट् श्री. तात्यासाहेब यांच्या विविध क्षेत्रांतील बहुमोल कामगिरीचा गौरव अनेक लोकांनीं केला आहे, परंतु अभिजात शिक्षक म्हणून त्यांच्या-

विषयीं कोणींहि उल्लेख केलेला नसेल. स्वानुभवानें तो उल्लेख करण्याचा योग मला लाभल्याबद्दल मी स्वतःला धन्य समजतें.

आमच्या दारावरून बहुतेक रोज सकाळीं काठी आपटीत आपटीत खाकरत खाकरत जाणारी व भेट झाली असतां आपुलकीने विचारपूस करणारी तात्यासाहेबांची ती भव्य, हंसतमुख, गोड व सात्त्विक मूर्ति आतां दिसत नाहीं, म्हणून आम्हांला चुकल्या-चुकल्यासारखें वाटतें आणि मनाला अतिशय खेद होतो. तात्यासाहेबांची नुसती मूर्ति पाहिली तरी बघणाऱ्याच्या मनावर त्यांच्या ठिकाणीं असलेल्या सत्प्रवृत्तीची छाप पडे. त्यांची मूर्ति जशी भव्य व तेजस्वी होती तशीच त्यांची वाणी मधुर व शुद्ध होती.

श्री. तात्यासाहेब हे मानधन महाराष्ट्रियांचे सत्प्रवृत्त सुशिक्षक होते. ते अखिल भारताचे कळकळीचे मार्गदर्शक नेते होते. त्यांचें जीवन खरोखरच अद्वितीय होय. अशा तऱ्हेचा पुरुष देशांत निर्माण होणें हें देशाचें एक मोठें सद्भाग्य होय. हा सत्पुरुष काळानें आमच्यामधून ओढून न्यावा हे आमचें मोठें दुर्दैव होय.

(३) १९४७ चा जून महिना मी कधींहि विसरणें शक्य नाही. अमेरिकेंत शिक्षण घेत असलेले माझे चिरंजीव श्रीमंत विजयसिंह यांना भेटावें व अमेरिका देश पाहून यावें अशा दुहेरी हेतूनें मीं माझ्याबरोबर माझे चिरंजीव श्रीमंत उदयसिंह यांस घेऊन अमेरिकेस जाण्याचें ठरविलें. प्रवास विमानानें करण्याचें ठरविलें होतें.

हा प्रवास कसा पार पडणार याविषयीं मला सारखी चिंता वाटत होती. मी पुण्याहून निघण्यापूर्वी ती. तात्यासाहेब केळकर आमच्या बंगल्यावर आले व त्यांनी मला उत्तेजनपर शुभाशीर्वाद दिला. त्यामुळें मला बरीच उमेद वाटूं लागली. आमचा विमानाचा प्रवास कराचीहून सुरू होणार होता. ती. तात्यासाहेबांचे नातू (ती. तात्यासाहेबांच्या कन्या श्री. डॉ. कमलाबाई देशपांडे तथा अक्का यांचे चिरंजीव) श्री. श्रीधरपंत देशपांडे हे त्या वेळीं कराची येथील विमानतळावर मुख्य अधिकारी होते. ती. तात्यांच्या सांगण्यावरून श्रीमती अक्कांनीं आपल्या मुलाला आमची योग्य ती सर्व सोय लावण्याविषयीं तार करून ठेविली होती. श्री. श्रीधरपंतांनीं मोठ्या आपुलकीनें आमची सर्व व्यवस्था केली, यानिमित्त त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

विमान रात्रीं ९ वाजतां कराची-विमानतळावरून निघणार होतें. विमान निघण्यापूर्वी श्रीमंत महाराजसाहेब यांचा श्री. श्रीधरपंतांनीं विमानाच्या कप्तानाशीं परिचय करून दिला व त्यांना सर्व विमान दाखविलें. विमानांत माझी व माझ्या मुलाची बसण्याची जागा पुढच्या भागांत राखून ठेवलेली होती. श्रीधरपंतांनीं आमची जागा पाहिली, व त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक, त्यांनीं

लगेच आमची जागा बदलून विमानाच्या मागच्या भागांत अगदीं शेवटच्या सीटवर आमची बसण्याची व्यवस्था करून दिली. विमानांत पुढच्या भागांत बसावयास मिळावें अशी आमची मायलेकांची इच्छा होती. आमची जागा कां बदलली असें मीं श्रीधरपंतांस विचारलें. परंतु मागच्या बाजूस दिलेली जागाच ठीक आहे असें त्यांनीं फक्त हातांनीं आत्मविश्वास पूर्वक खूण करून सुचविलें!

ठरल्याप्रमाणें रात्रीं ९ वाजतां कराची विमानतळावरून विमान निघालें. ती अमावास्येची रात्र होती! सुमारें पांच-सहा तास आकाशांतून प्रवास केल्यावर तें विमान एकाएकीं पेटलें व ऐन मध्यरात्रीं बैरूटजवळ वाळवंटांत पडलें! विमान जमिनीवर आदळल्याबरोबर विमानाचे दोन तुकडे झाले! विमानाच्या पुढील भागांत बसलेले सर्व लोक जळून भस्मसात् झाले! मागच्या भागांतील बहुतेक सर्व उतारू सुरक्षित राहिले!! माझ्या मुलास परमेश्वरकृपेनें मुळींच दुखापत झाली नाहीं. मी जखमी होऊन बेशुद्ध झालें होतें, परंतु लवकरच माझीहि प्रकृति सुधारली. आम्हीं आमच्याबरोबर नेलेल्या सामानांतून जर कांहीं परत आलें असेल तर फक्त कांहीं कपडे व जळकी ज्ञानेश्वरीची पोथी!

परमेश्वराची लीला खरोखरच अगाध आहे! एवढ्या भयंकर अपघातांतून मी व माझा मुलगा सुरक्षित परत आलों ही केवळ परमेश्वराची कृपा होय! श्री. श्रीधरपंतांनीं विमानांतील आमची दोघांची जागा न बदलतां पहिल्याच जागीं आम्हांस बसूं दिलें असतें तर कोणता प्रसंग ओढवला असता याचा मनांत नुसता विचार आला तरी अंतःकरण दाटून येतें व मति कुंठित होते. परमेश्वराने ती. तात्यांचे नातू श्री. श्रीधरपंत यांच्या रूपानें आमचे मायलेकांचे प्राण संकटांतून रक्षण केले अशी आमची श्रद्धा आहे!

प्रवासास निघण्यापूर्वी स्वयंस्फूर्तीनें उत्तेजनपर शुभाशीर्वाद देणारे ती. तात्यासाहेब, शक्य ती सर्व सक्रिय सहानुभूति दाखविणाऱ्या त्यांच्या सुविद्य नि सुशील सुकन्या श्री. अक्का व अत्यंत आपुलकीनें नि आस्थेनें आमच्या प्रवासाची व्यवस्था करणारे श्री. श्रीधरपंत यांच्याविषयीं वाटणारी कृतज्ञता आम्हांस शब्दांनीं व्यक्त करणें शक्य नाहीं.

❋

श्रीमंत जिवाजीराव महाराज शिंदे
(ग्वाल्हेर संस्थानचे अधिपति)

कै. साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या निधनानें महाराष्ट्राची अपरिमित हानि झाली आहे, असें इतरांप्रमाणे मलाहि वाटतें.

लोकमान्य टिळक दिवंगत झाल्यानंतर त्यांचें कार्य पुढें चालविण्याची जबाबदारी केळकरांकडे आली व ती त्यांनीं उत्कृष्ट रीतीनें पार पाडली, इतकेंच नव्हे, तर आपल्या प्रखर बुद्धिवादानें त्याला कालानुरूप नवें वळण लावलें.

व्यक्तिमहात्म्यापेक्षां, खऱ्या राष्ट्रहिताकडे जनतेला त्यांनीं असामान्य धैर्यानें कार्यप्रवण केलें. त्यामुळें निर्माण झालेल्या विरोधानें, त्यांच्या मनाची शांति, निर्मत्सर वृत्ति व विचाराचा समतोलपणा ढळला नाहीं. म्हणून प्रतिपक्षांतहि केळकरांबद्दल नेहमीं आदर होता.

राजकारणाशिवाय सामाजिक, आर्थिक व साहित्यिक क्षेत्रांत केळकर महाराष्ट्राच्या गुरुस्थानीं होते. इतके व्याप स्वखुषीने संभाळूनहि मराठी साहित्याची त्यांनीं केलेली सेवा फार मोठी आहे.

म्हणून केळकरांचें स्मरण करून, अखिल महाराष्ट्र मनोभावांची जी आदरमय श्रद्धांजलि त्यांना वाहत आहे त्यांत मीहि सहभागी होत आहें.

❋

श्रीमंत चिमणाबाईसाहेब गायकवाड

(हर हायनेस, राणीसरकार; बडोदें)

(१) कै. श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांचा व आमचा परिचय फारा दिवसांचा होता. त्यांची विद्वत्ता, सौजन्य, देशभक्ति, परमतसहिष्णुता व विनोदाचा भारदस्तपणा यांविषयीं आम्ही अनेक वेळां प्रशंसनीय उद्गार काढलेले आहेत. सुमारें दोन वर्षांपूर्वी श्री. जगन्नाथ महाराज यांच्या घरीं चहाच्यावेळीं आमची व तात्यासाहेबांची गांठ पडली होती. तो प्रसंग आमच्या डोळ्यापुढें उभा आहे. त्या वेळीं श्री. कमलादेवी राजे, श्री. विमलादेवी राजे उपस्थित होत्या. तात्यासाहेब यांचें त्यावेळचें खेळीमेळीचें व विनोदी पण विद्वत्ताप्रचुर गंभीर संभाषण आम्हां सर्वांस व विशेषतः वरील दोघींना फारच आवडलें.

(२) चार-पांच महिन्यांपूर्वी आमच्या पुण्याच्या मुक्कामांत श्री. तात्यासाहेबांना व श्री. जगन्नाथ महाराज यांना आमच्याकडे चहाला येण्याविषयीं निमंत्रण केल्याप्रमाणें ते उभयतां आले होते. त्या वेळीं आमची नात श्री. उषादेवी राजे यांच्या व विद्वद्वर्य तात्यासाहेब यांच्या झालेल्या संभाषणावरून उषादेवी यांनीं तात्यासाहेब यांच्या बहुमोल वाङ्मयाचा बराच अभ्यास व मार्मिक व्यासंग केला आहे हें आम्हांस दिसून आलें हें येथें नमूद करण्यास आम्हांस फार आनंद होतो. येवढ्या मोठ्या विद्वान् ग्रंथकाराच्या प्रचंड वाङ्मयाशीं आमच्या नातीनें केलेला परिचय पाहून व त्या वेळीं त्या दोघांनीं केलेली चर्चा ऐकून त्या दोघांच्याबद्दल आम्हांस

कौतुक वाटलें. श्री. उषादेवी राजे यांचें हें अभिजात विद्याप्रेम पाहून रसिकवर्य तात्यासाहेब यांनीं मोठ्या आनंदानें आपल्या सर्व वाङ्मयाचा एक सबंध संच (सेट) – त्यांतील सर्व पुस्तकांवर स्वाक्षरी करून – नजर केला हीहि गोष्ट आम्हांस येथें नमूद करावीशी वाटते.

(३) आमच्या नांवानें चालू असलेल्या म्हणजे गायकवाडवाड्यांतील 'केसरी-मराठा संस्थेस' आम्हीं भेट द्यावी अशी तात्यासाहेब यांची फार दिवसांची इच्छा होती व ती त्यांनी अनेकवार आमच्याजवळ व्यक्तहि केली होती; परंतु तो योग त्यांच्या हयातीत घडून आला नसल्यामुळें आम्हांस त्याबद्दल फार वाईट वाटतें; म्हणून ही गोष्ट लक्षांत ठेवून, ते गेल्यानंतर, त्यांच्या इच्छेनुसार, श्री विमलाराजे व श्रीजगन्नाथ महाराज यांच्यासह आम्ही 'केसरी मराठा संस्थे'स नुकतीच भेट दिली. तात्यासाहेब यांच्या तेथील साक्षात् अनुपस्थितीमुळें आम्हांस त्या वेळीं किती वाईट वाटत होतें त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. तथापि त्यांची तीं गंभीर व गोड मूर्ति आमच्यां ज्ञानचक्षूंस तेथें दिसत होती खास! शेवटीं आम्हांस येवढेंच म्हणावयाचें कीं, ज्या संस्थेचें लोकमान्य टिळक यांनी बीजारोपण करून तिचें संवर्धन केलें व आपल्या देशाकरितां अत्यंत हालअपेष्टा सोसून जिच्याद्वारां चंदनाप्रमाणें देह झिजवून त्यांनीं राष्ट्रकार्य केलें व ज्या संस्थेंत तात्यासाहेब यांनीं आपली अनुपम व अमूल्य अशी सर्व हयात खर्च करून अत्यंत परिश्रमानें व मोठ्या कौशल्यानें जिच्यावर गगनचुंबित असें वैभवशाली शिखर चढविलें, त्या महाराष्ट्रास ललामभूत झालेल्या संस्थेचें दिव्य ध्येय सतत डोळ्यापुढें ठेवून त्यांच्या अनुयायांनीं व विशेषतः लोकमान्यांचे उभयतां नातू श्रीयुत केतकर व श्रीयुत जयंतराव यांनीं आपल्या मातृभूमीची सेवा अखंड करावी यापेक्षां आमची अधिक इच्छा व अपेक्षा काय असणार!

❋

श्रीमंत जगन्नाथ महाराज पंडित
(सरदार, पुणें)

(१) परमपूज्य श्री. तात्यासाहेब केळकर यांना मीं प्रथम औरंगाबाद येथें पाहिलें. त्या वेळेस माझें वय सुमारें ६/७ वर्षांचें असावें लोकमान्यांनीं मजकरितां ठेवलेल्या मास्तरांकडून मला पुण्याच्या श्रीमंत पेशव्यांची माहिती सांगण्यांत आली होती. माझ्या जनक-वडिलांबरोबर मी लोकमान्यांकडे जात असतांना श्री. तात्यासाहेब खालीं चौकांत स्नान करीत होते. एक मोठें घंगाळ होतें, ब्राह्मण पाणी देत होता. श्री. तात्यासाहेब गौरवर्ण असून, त्यांच्या कानांत, त्या वेळीं एक भिकबाळी असावी असें स्मरतें. श्री. तात्यासोहब माझ्या जनक-वडिलास हंसून

म्हणाले, "भाऊसाहेब, हाच का मुलगा–?" वगैरे. मला वाटलें पुण्यांतले श्रीमंत पेशवे म्हणतात ते हेच असावेत, व तो सर्व दिवस मी श्रीमंत पेशवे म्हणूनच श्री. तात्यासाहेबांच्याकडे लक्षपूर्वक पाहत राहिलों व हीच भावना २/३ दिवस मनांत असावी असें वाटतें. कळत नसल्यामुळें कोणास विचारण्याचें कुतूहल वाटलें नसावें. त्यानंतर श्री. तात्यासाहेबांची व माझी गांठ पडण्याचें फारसें कांहींच कारण नव्हतें, व लोकमान्य स्वतः आमचें सर्व पाहत असल्यामुळें, श्री. तात्यासाहेबांचा तितकासा संबंध त्या वेळी येत नसे. सिंहगडास लोकमान्य उन्हाळ्यांत असतांना श्री. तात्यासाहेब सुमारें एक आठवडा राहण्यास आले होते. त्यांनीं बरोबर खूप जाड जाड पुस्तकेंहि आणलीं होतीं. सकाळीं थोडें फिरावयास येत, गणेश टाक्यांत पोहत व दुपारीं जे वाचावयास बसत ते संध्याकाळपर्यंत. सहासात दिवसांनंतर लोकमान्य त्यांना सहज म्हणाले, "कायहो संपलें का सर्व वाचून?" श्री. तात्यासाहेब हंसून म्हणाले, "सर्व पुस्तकें वाचून झालीं; आतां उद्या मी जाणार आहें." तदनंतर त्यांची व लोकमान्यांची बराच वेळ चर्चा चालली, पण त्यांत फारसें कांहींच कळत नसल्यामुळें आम्हीं बाहेरचा पाय काढला, त्या वेळीं लोकमान्य एवढेंच म्हणालें कीं, "बघा, किती थोड्या वेळांत त्यांनी पुस्तकें वाचून संपविलीं. अशा बैठकीची संवय पाहिजे. त्याशिवाय कार्य होत नसतें". पुढें मी मुंबईस युरोपियन शाळेंत 'सीनियर केम्ब्रिज'-चा अभ्यास करण्याकरितां २।३ वर्षे असल्यामुळें श्री. तात्यासाहेबांचा व माझा, "कसा काय अभ्यास चाललाय वगैरे" याव्यतिरिक्त फारसा संबंध आला नाहीं. लोकमान्यांनीं श्री. तात्यासाहेबांस सांगितल्यामुळें, त्या शाळेंत माझें नांव घालण्याची खटपट मि. हॅच, आय्. सी. एस्. (त्या वेळीं पोर्टट्रस्टचे चेअरमन) यांच्यामार्फत त्यांनींच केली.

(२) लोकमान्यांच्या निधनानंतर मला फार दुःख झालें व मुंबईहून पुण्यास आल्यावर दीड दिवस न जेवतांच मी निजून होतों. तें श्री. तात्यासाहेबांना समजल्यावर ते दुपारीं मजकडे आले, व त्यांना पाहिल्यावर मला खूप रडूं कोसळलें. त्या वेळेस त्यांनीं जे उद्गार काढले, ते आमरण, कोणाचीहि पर्वा न करतां पाळिले. ते त्यांचे प्रेमळ उद्गार, मी जन्मभर विसरणें शक्य नाहीं. त्या वेळीं श्री. तात्यासाहेब निश्चयात्मक चेहरा करून एवढेंच म्हणाले कीं, "लोकमान्याइतकें मजकडून जरी तुमचें पालन झालें नाहीं, तरी मला शक्य आहे त्या सर्व तऱ्हेनें तुमचें मी पाहीन." आणि तेव्हांपासून आजतागायत, त्यांनीं मला पुत्रवत् मानिलें व हा त्यांचा भाव, स्वभावाचा प्रेमळपणा, आनंदी वृत्ति, मी कधींहि विसरणें शक्य नाहीं. पुष्कळशा अशा घरगुती गोष्टी मला सांगतां येतील कीं, ज्यांत त्यांनीं पूर्ण लक्ष घालून, प्रेमळपणाचा उपदेश करून, आपलेपणानें महत्त्वाचीं कामें केलीं व मजकडून करवून घेतलीं. सार्वजनिक बाबतींतहि मला त्यांच्याच प्रोत्साहनानें थोडेंबहुत काम करतां आलें. कौन्सिल ऑफ स्टेटच्या

निवडणुकीपासून सुमारें सात वर्षें मी मध्यवर्ती वरिष्ठ कायदेमंडळांत असतांना वेळोवेळीं मला सल्ला देऊनच नव्हे, तर निरनिराळे ठराव मांडणें, भाषणासंबंधीं सर्व तयारी करवून घेणें वगैरेहि सर्व कामें त्यांनीं आस्थापूर्वक मजकरितां केली; हें सर्व मी जर लिहीत बसलों तर छोटासा निराळा ग्रंथच होईल. ह्या सर्व बाबतींत मी एवढेंच म्हणेन कीं, जें त्यांनीं केलें तें पुत्रवत् समजूनच अंतःकरणपूर्वक केलें व ह्याबद्दल त्यांच्याविषयींचा आदर व पूज्यभाव व्यक्त करण्यास माझी लेखणी समर्थ नाहीं. माझ्या जन्मांत, स्वप्रकाशाची ज्योत सदैव तेवत ठेवणारी अशी एकच छोटीशी आठवण देऊन व त्याच स्मृतिसुमनांजलीनें त्यांचें पूजन करून हें आठवणी-प्रकरण संपवीत आहें.

(३) माझें मन ६-७ महिन्यांपूर्वी एकदां फारच उद्विग्न झालें होतें व ही उद्विग्नता तीनचार दिवस तरी चालूं असतांना, मला वाटलें, श्री. तात्यासाहेबांकडे जावें. असें कांहीं झालें म्हणजे मी बहुतेक त्यांच्याकडे जाऊन बसत असे. मला पाहिल्यावर ते म्हणाले, " काय हो ! तुमचा चेहरा असा उतरून कां गेला आहे ! " मनःस्थितीचा थोडा खुलासा केल्यावर ते म्हणाले, " हे बघा, संसारामध्यें असे थोडे चढउतार व्हावयाचेच. तुम्ही माझें एक ऐकाल ? " मी म्हणालों, "जरूर". तेव्हां त्यांनीं मला श्रीज्ञानेश्वरी वाचीत जा असें सांगितलें. मी म्हणालों, " तात्यासाहेब, मी थोडा पूर्वी प्रयत्न केला, परंतु भाषा फार जुनी आहे व त्यामुळें समजण्यास अवघड पडतें. " त्यांनीं सांगितलें, " अहो, कांहीं नाहीं. माझी साखरेमहाराजांची प्रत घ्या व सुरुवात करा. खात्री देतों कीं, तुम्हांला समाधान वाटेल; कारण त्यांतील बोधच तसा आहे. " मीं त्यांची प्रत त्याच वेळीं घेतली व श्रीज्ञानेश्वरी वाचनास सुरुवात केली. सुमारें एक महिन्यानें, मला श्रीसाखरेमहाराजांचीच, श्रीज्ञानेश्वरीची (पुण्यांत एकच शिल्लक असलेली) प्रत विकत मिळाल्यामुळें त्यांची प्रत परत करण्यास गेलों, तेव्हां ते म्हणाले, " काय हो, कंटाळला काय ? " मी म्हणालों, "नाहीं, मला आपल्यासारखीच प्रत एकच शिल्लक असलेली मिळाल्यामुळें, आपली परत करण्यास आलों आहें. " ते म्हणाले, " किंमत काय पडली ? " मी सांगितलें, " तीस रुपये ". तेव्हां श्री. तात्यासाहेब हसून म्हणाले, " आतां मात्र तुम्हांला खरोखरच गोडी लागलेली दिसते. किती वाचून झालें ? " मी म्हणालों, " जवळ-जवळ संपतच आली आहे. " " बरं सांगा, काय वाटलें अत्तापर्यंतचें वाचून ? " मी म्हणालों, " श्रीज्ञानेश्वरींतलीच ओवी सांगतों –

तरी बाह्य आणि अंतरा । आपुलिया सर्वव्यापारा ।
मज व्यापकातें वीरा । विषयो करीं ॥ १ ॥
कीं श्लोकाक्षर द्राक्षलता । मांडव जाली आहे गीता ।
संसारपथश्रांता । विसंवावया ॥ २ ॥

ते हंसून म्हणाले, "वा ! तुम्ही तर या ओव्या पाठहि केल्यांत." मी म्हणालों, "मला वाटलेंच कीं, आपण कांहीं विचारलें तर दोन ओव्या तरी पाठ असाव्यांत." यावर ते खूप हंसले.

साहित्यसम्राटपद भूषविलेली व श्रीसरस्वतीच्या तेजानें झळकणारी श्री. तात्यासाहेबांची हंसरी मूर्ति आपणांस यापुढें स्मृतीनेंच गोचर होणारी आहे.

माझी दृढ भावना श्रीज्ञानेश्वरींतील दोन ओव्यांनीं व्यक्त करून ही स्मृति-सुमनांजलि अत्यंत प्रेमादरानें त्यांच्या आत्म्यास समर्पण करीत आहें.

"कां झांकलिया घटीचा दिवा ।
नेणिजे काय जाहला केव्हां ।
या रीतीं जो पांडवा । देह ठेवी ॥ १ ॥
तैसी भक्तां गीतेसी । भेटी करी जो आदरेसीं ।
तो देहापाठीं मजसी । येकचि होय ॥ २ ॥

❋

नामदार द्वारकाप्रसाद मिश्र

(मंत्री, मध्यप्रांत व वऱ्हाड सरकार, नागपूर)

(१) माझा श्री. केळकरांशीं प्रथम परिचय घडून आला तो १९२७ च्या जानेवारी महिन्यांत व दिल्लींत वरिष्ठ असेंब्लीगृहांत. हा झाला प्रत्यक्ष परिचय. तसें पाहिलें तर मी त्यांना तत्पूर्वी बऱ्याच वर्षांपासून ओळखत होतों. हा अप्रत्यक्ष परिचय त्यांच्या वाङ्मयानें घडवून आणला होता. मराठी भाषेचे अष्टपैलु लेखक व केसरीचे प्रमुख आधारस्तंभ या दृष्टीनें प्रथमपासूनच मीं त्यांच्याकडे आदर-बुद्धीनें पाहिलें आहें. १९२७ च्या जानेवारींत त्यांच्या भेटीचा योग आला. त्या-वेळीं त्यांना पाहण्याची, भेटण्याची व त्यांच्याशीं प्रत्यक्ष बोलण्याची माझी इच्छा बळावली होती.

(२) वरिष्ठ असेंब्लीगृहांत ते आणि मी बरोबर होतों. त्यावेळच्या माझ्या अवलोकनावरून श्री. केळकरांनीं जीं भाषणें केलीं तीं अगदींच मोजकीं होतीं, पण प्रत्येक वेळीं त्यांचें भाषण ऐकण्यास सभागृह उत्सुक असे. इतरांस सभागृहांत इतकी उत्सुकता व एकाग्रता निर्माण करण्याचें भाग्य लाभलें नसेल असें नाहीं; पण असे भाग्यवान् थोडे होते !

मध्यवर्ती असेंब्लींत पूर्वलिखित भाषणें सहसा वाचूं देत नाहींत. त्यासाठीं सभापतीची (Speaker) परवानगी घ्यावी लागते. श्री. केळकरांना तशी परवानगी देण्यांत आली होती. कारण, ते भाषण करण्यापूर्वी कांहीं प्रसंगीं भाषणें लिहून काढीत असत. वरिष्ठ सभागृहांत त्यांनीं केलेलें प्रत्येक भाषण सुसंबद्ध, मुद्देसूद, विद्वत्ताप्रचुर

व बिनतोड असे. त्यांच्या भाषणावर सभागृहांतील कोणासहि विरोधी बोलतां येत नसे. ज्या ज्या वेळीं श्री. केळकर भाषण करण्याची इच्छा दर्शवीत त्या त्या वेळीं त्यांना तत्परतेनें परवानगी देण्यांत येत असे. याला कारणहि तसेंच सबळ होतें. एखाद्या विषयाला धरून चाललेल्या वादविवादांत त्यांच्या भाषणानें निःसंशय भरीव भर पडणार याबद्दल सभापतीला खात्री वाटत असे. कै. विठ्ठलभाई पटेलसारखा कडवा सभापति देखील श्री. केळकरांस दृष्टिसूचनेनें भाषण करण्यास सुचवीत असे. चमकदार व म्हणून स्पृहणीय बुद्धिस्वातंत्र्य हाच त्यांच्या भाषणांचा विशेष असे.

(३) श्री. केळकरांना पाहिल्यानंतर ते मोठ्या गंभीर प्रवृत्तीचे असावेत असा माझा ग्रह बनला; परंतु त्यांच्या गांभीर्यामागे विनोदबुद्धीचा अखंड झरा वाहत आहे, हें त्यांच्या सहवासानें हळूहळूं माझ्या लक्षांत आलें. त्यांच्या बुद्धिनिष्ठ विनोदाचें एक उदाहरण येथें मी नमूद करून ठेवणार आहें.

कबिरुद्दिन अहमद या नांवाचा एक बंगाली जमीनदार त्या वेळीं सेंट्रल असेंब्लीत निवडून आला होता. तो कुबेराप्रमाणें श्रीमंत होता; पण तो दिसण्यांत विलक्षण कुरूप होता. खर्व पण स्थूल शरीर, कोळशासारखा रंग असलेली ही कबिरुद्दिन व्यक्ति सरकारपक्षीय होती. त्यामुळें सरकारविरोधी राष्ट्रीय वक्त्यांना त्यांच्या भाषणांत तिच्याकडून वारंवार कटकट होत असे. या व्यक्तीची थट्टा करण्याचा प्रत्येकास हुरूप वाटत असे. एकदां दिवाण चमणलाल, षण्मुखम् चेट्टी, मी आणि इतर चार-दोन सदस्यांनीं मिळून कट करून कबिरुद्दिनच्या विजारीत मागील बाजूनें बर्फाचा तुकडा टाकण्यास कमी केलें नाहीं ! त्या वेळी त्या हास्य विनोदमूर्तीचे जे चाळे झाले त्यांनी सर्वांची हंसून हंसून मुरकुंडी वळली.

याचवेळीं एक इंग्रजी विनोदी कविता प्रसिद्ध झाली. तिच्या प्रती मध्यवर्ती सभागृहांतील सदस्यांना वाटण्यांत आल्या. त्या कवितेचा कवि अज्ञात होता. कोणाहि सभासदास (अर्थात् एक अपवाद वगळून) ही विनोदी कविता कोणी केली हें माहीत नव्हतें. फक्त लोकनायक अणे यांना कवि कोण हें ठाऊक होतें व त्यांनींच तें माझ्या कानांत सांगितलें. त्या कवितेचा वर्ण्य विषय 'कबिरुद्दिन अहमद' असून तिचे जनकत्व श्री. केळकरांच्या विनोदबुद्धीकडे आहे. त्या कवितेवरून त्यांचें विनोदी शीघ्रकवित्व चांगलेंच प्रत्ययास आलें.

(४) श्री. केळकर वरिष्ठ कायदे कौन्सिलांत नॅशनॅलिस्ट पक्षातर्फे निवडून आले होते. माझ्यासारखे इतर अनेक काँग्रेसतर्फे निवडले गेले होते. कौंसिलांत सरकार पक्षाची लॉबी व सरकारविरोधी पक्षाची लॉबी परस्परसमोर असतात. त्या वेळीं तेथें विशेष सभ्यतेचा असा एक प्रकार आढळून येत असे कीं, विरोधी गटाच्या लॉबींतून उठून व लांबचा वळसा घेऊन देखील कांहीं काँग्रेसचे सभासद सरकारी सभासदांच्या लॉबींत जाऊन त्यांच्याशीं गप्पा मारीत, हस्तान्दोलन करीत – फार

काय पण आपण इंग्रजांचे मित्र आहोंत असें दाखविण्यासाठीं त्यांच्या गळ्यांत हात घालण्याचीहि लगट करीत ! इतर सदस्य असल्या गोष्टी करतील तर नवल वाटण्याचें कारण नव्हतें. पण कॉंग्रेस सभासदांची ही वृत्ति आश्चर्यकारक खरी ! फक्त श्री. केळकर हेच असे एक सभासद होते कीं, ज्यांनीं सरकारपक्षाच्या इंग्रज सदस्याशीं हस्तांदोलन करण्यास देखील कधीं हात पुढें केला नाहीं. मग लगट करणें कोठलें ! श्री. केळकरांच्या या बाणेदार वृत्तीबद्दल मला फारच अभिमान वाटला व तसें मी त्यांना बोलूनहि दाखविलें.

(५) हिंदुमहासभेच्या जबलपूर अधिवेशनाचें अध्यक्षस्थान श्री. केळकरांना देण्यांत आलें होतें. अधिवेशनास प्रारंभ होण्यापूर्वी सुमारें दहा दिवस त्यांनीं मला आपल्याकडे बोलावून माझ्याजवळ हिंदुमहासभेच्या अधिवेशनाबाबत व व्यक्तिशः अध्यक्षांबाबत स्थानिक कॉंग्रेस कार्यकर्त्यांचें काय धोरण आहे, याची पृच्छा केली. त्यांना मी लगेंच उत्तर दिलें –

" हिंदुमहासभा व कॉंग्रेस यांच्यांत कितीहि मतभेद असले तरी आपण या वेळीं आमच्या शहरांत – जबलपुरांत – पाहुणे आलां आहांत. तेव्हां आपणांसंबंधी आमची वृत्ति आदराचीच राहील. यानंतर त्यांनीं आपलें छापील अध्यक्षीय भाषण मला वाचावयास दिलें. त्यांत एक विरोध माझ्या दृष्टोत्पत्तीस आला तो असा :– त्यांनीं त्या भाषणांत शौकात उस्मानिया नामक एका मुसलमान प्रवाश्याच्या ' Kabul to Mascow ' या ग्रंथांतून, ' १९२१ हिजरतमध्यें मीं सर्व मुसलमान देशांतून सफरी केल्या, त्यांत माझ्या असें अनुभवास आलें कीं, तिकडचे मुसलमान हिंदुस्थानी मुसलमानास कमी लेखतात, त्यांचा तिरस्कार करतात, ' अशा अर्थाचा एक उतारा घेतला होता व तो संमतिदर्शक स्वरूपांत घेतला होता. पुढें त्याच भाषणांत मुसलमानांना उद्देशून " त्यांनीं हिंदुस्थानांतून निघून जावें; या देशाबाहेर मुसलमानी प्रदेश कितीतरी आहेत; तेथें त्यांची सोय होऊं शकते " अशा अर्थाचीं विधानें होतीं. अर्थात् वरील उतारा खरा मानला तर हिंदुस्थानांतील मुसलमान हिंदुस्थान सोडून कां म्हणून जातील ? हा त्यांच्या भाषणांतील विरोध मीं त्यांना दाखवून दिला व तो त्यांनीं प्रांजलपणें कबूल केला. इतकी क्षमाशीलप्रांजलवृत्ति दर्शविणारे कितीसे पुढारी आपल्या पाहण्यांत आहेत ? जबलपूरचें हिंदुमहासभेचें अधिवेशन यशस्वी करण्यास माझे मित्र शेठ गोविंददास व मीं – दोघांनीं मनापासून खटपट केली हें वेगळें सांगण्याचें कारण नाहीं. श्री. केळकरांची मिरवणूक आम्ही चांदीच्या रथांतून काढली होती.

(६) श्री. केळकरांनीं जबलपुरांत माझ्याकडून जें स्वागत स्वीकारलें व माझ्या अगत्याचा स्वीकार केला त्याची परतफेड १९३२ च्या सुमारास झाली. मी त्या वेळीं पुण्यास कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या बैठकीस हजर राहण्यासाठीं गेलों होतों व

माझा मुक्काम श्री. केळकरांकडे होता. या वेळीं त्यांनी माझ्या आदरातिथ्याची सव्याज भरपाई केली !

ता. १५-१-४७ रोजीं केळकरांनीं मला एक फार सुंदर पत्र पाठविलें. तें अस्सल पत्रच सोबत जोडलें आहे; तें संपूर्ण छापावें अशी विनंती आहे.

Prabhat Road, Poona.
15-1-47.

My dear Misraji,

It was very kind of you to remember your old Assembly friend, Kelkar, enough to present him with a copy of your *Krishnayan*. What a big and beautiful task accomplished ! You have done for Shri Krishna what Valmiki and Goswami Tulshidasji have done for Shri Ram. The Awadh and Brij language is sonorous and sweet, though you could not have escaped using modernisms in its use. Language always changes with time but retains its main characteristics. The life of Shri Krishna has to be put together from three works (1) Mahabharata, (2) Harivansha, and (3) Shrimat Bhagwat -- all in Sanskrit. The late Mr, C. V. Vaidya has written a good life of Krishna in Marathi prose, making use of all these three sources.

Personally, I am a worshipper of Shri Ram and would like to say to Krishna *jokingly* –

काहे बरनवुं छबि आज की
भले बिरा जेऊ नाथ
तुलशी (नृसिंह) मस्तक तब नमै
धनुख बाण लेवू हाथ.

But I am enlightened enough to regard both Krishna and Ram as one.

I did not know before that you were a poet of this high order.

I can understand the language in which you have written this Mahakavya, enough to appreciate the spirit of the letter and may write to you again after some time on the subject.

Thanking you once more for your very valuable literary present.

I remain,

Yours sincerely,

N. C. Kelkar.



सौ. यशोदाबाई लक्ष्मण भोपटकर

(धर्मवीर अण्णासाहेब भोपटकर यांच्या पत्नी, पुणें)

(१) १९३९ सालीं अण्णासाहेब औरंगाबादेच्या तुरुंगांत असतांना " अण्णा साहेब आजारी असून त्यांची प्रकृति फारच खालावलेली आहे, ताबडतोब या, " अशी तार एकदम आमच्याकडे आली असतांना ती तार घेऊन माझा थोरला मुलगा डॉ. चारुचन्द्र तात्यासाहेबांच्या घरीं गेला व आम्ही घरची मंडळी उद्यांच्या गाडीनें त्यांना भेटावयास जात आहोंत असें म्हणाला; तेव्हां लगेच तात्यासाहेब गहिंवरून म्हणाले, " मीहि पण तुमच्याबरोबर अण्णासाहेबांना भेटावयास येतों व आपण आपल्याबरोबर आपल्या घरचे डॉक्टरहि घेऊं " असें म्हणून डॉ. सोमण व डॉ. जेजुरीकर ह्यांना बरोबर घेतलें. प्रवासांतसुद्धां त्यांचा कोमल व विनोदी स्वभाव, खेळकर बुद्धि, सर्वांशीं हंसत-खेळत बोलणें, चालणें या सर्वांचा अनुभव आला. औरंगाबादेस आम्ही ज्या घरीं उतरलों होतों त्यांनीं अत्यंत अगत्यपूर्वक व प्रेमानें आमचा आदरसत्कार केला. दुसऱ्या दिवशीं बरोबर तीन वाजतां अण्णासाहेबांना भेटण्याची परवानगी आम्हांस मिळाली होती. परंतु त्या दिवशीं आंबरस-पुरीचा बेत असल्यामुळें जेवण तयार होण्यास फारच उशीर झाला. जेवणामुळें अण्णासाहेबांच्या मुलाखतीची वेळ टळते कीं काय अशी आम्हां सर्वांनाच मनांत धाकधुक वाटत होती. त्या वेळेस तात्यासाहेब तर मनांतून फारच चिडले होते व त्यांनीं आम्ही ज्यांच्या घरीं उतरलों होतों त्यांना हंसत हंसत टोमणा दिला, " नानासाहेब, आम्ही इथें कांहीं आंबरसपुरीचें जेवण झोडावयास आलों नाहीं." अत्यंत आग्रहाची त्यांना मनस्वी चीड होती. ह्या प्रसंगामुळें मला तात्यासाहेबांच्या " माझी आगगाडी कशी चुकली " ह्या गोष्टीची फार आठवण झाली व मी त्यांना त्या वेळेस तसें बोलूनहि दाखविलें.

(२) औरंगाबादच्या तुरुंगांत आम्ही सर्व मंडळी भेटावयास गेलों असतांनां आम्हां सर्वांना अण्णासाहेबांना एकदम भेटण्याची परवानगी दिली नाहीं व तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं एकेक नांव पुकारण्यास सुरुवात केली. प्रथमच तात्यासाहेबांचें नांव पुकारलें गेलें. आंत जाऊन पुरतीं दोन मिनिटेंहि झाली नाहींत तोंच अत्यंत संतापून लाल झालेले तात्यासाहेब बाहेर आलेले आमच्या दृष्टीस पडले. ह्या अन्यायाची त्यांना मनस्वी चीड आलेली होती व ह्याबद्दल त्यांनीं ताबडतोब तेथल्या मुख्य अधिकाऱ्यापुढें रास्त तक्रारहि केली. त्यामुळें मला व डॉ. सोमण ह्यांना जास्त वेळ भेट दिली गेली.

(३) औरंगाबादच्या तुरुंगांत तेव्हां असलेले इतर कैदी मामा दाते, मामा साठेप्रभृति मंडळींनीं तुरुंगाच्या अधिकाऱ्यांना अशी विनंती केली कीं, 'आम्हांला तात्यासाहेबांचें दुरून तरी दर्शन द्या. ते आमचे पूज्य व वंदनीय पुढारी आहेत". परंतु हा दुरून दर्शनाचा आनंदसुद्धां तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनीं लाभूं दिला नाही.

(४) जेव्हां जेव्हां अण्णासाहेबांना तुरुंगवासाची शिक्षा झालेली होती तेव्हां तेव्हां पहिले जर कोण माझें सान्त्वन करण्यास आलेले असतील तर ते तात्यासाहेबच व जणूं कांहीं आपल्या पाठच्या भावाच्या पत्नीला धीर द्यावा त्याप्रमाणें धीर देऊन जात असत व त्यामुळें मला धीर येऊन माझें दुःख पुष्कळच हलकें होत असे.

(५) स्वातंत्र्यवीर सावरकरांचा एकसष्टावा वाढदिवस पुण्यांत साजरा झाला, तेव्हां एक जंगी मेजवानी अण्णासाहेबांनीं निवडक मंडळींना दिली. जेव्हां मी तात्यासाहेबांना आग्रहाचें पक्वान्न वाढावयास म्हणून गेले तेव्हां ते म्हणाले, "अहो, आज ह्या तात्यांचा वाढदिवस नाहीं आहे," व सावरकरांकडे बोट दाखवून म्हणाले, "ह्या तात्यांचा वाढदिवस आहे, तेव्हां त्यांनाच आणखीन् लाडू वाढा." आणखी असेंच पुष्कळसें विनोदी भाषण करून त्यांनीं ती पंगत चांगलीच रंगविली.

(६) एकदां असेच पुष्कळ वर्षांपूर्वी तात्यासाहेब सकाळीच आमच्याकडे आले व "मला चहा पाहिजे आहे; पण 'केळकर-कप' करा हो" असें म्हणाले. मी 'केळकर-कप' म्हणजे काय असें विचारतांच ते म्हणाले, "तुम्हांला नाहीं कां माहीत 'केळकर-कप'! अहो, 'केळकर-कप' म्हणजे दोन कप चहा!" दे. भ. सुभाषचंद्र बोस हे नेहमींच पुण्यास आले कीं आमच्या घरीं उतरत असत. स्टेशनवरून घरीं आल्याबरोबर ते मला म्हणत, "तुम्हाला माहीत आहे ना, मी तात्यासाहेबांचा शिष्य आहें. तात्यासाहेबांच्याप्रमाणेंच मला पण 'केळकर-कप' चहा लागतो हो!" इतका 'केळकर-कप' सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे!

(७) जेव्हां आमचें घर बांधलें गेलें, त्या एकवीस खोलीची गोष्ट, त्या वर्षी अण्णासाहेबांनीं हौसेनें ग्रामोफोन विकत घेतला. तेव्हां तात्यासाहेब एक दिवस

दुपारींच आमच्या घरीं आले व म्हणाले "मला आज पोटभर गाणें ऐकावयाचें आहे." व त्यांनीं सतत सहा तास त्यांच्या आवडीप्रमाणें ध्वनिमुद्रिका लावल्या. त्यांना गायनाचा एवढा जबरदस्त शोक आहे हें मला त्या दिवशींच कळलें. तसेंच स. प. कॉलेजच्या म्युझिक सर्कलतर्फे होणाऱ्या गाण्यांना तात्यासाहेब येत असत, हें माझ्या मुलांकडून मला समजलें असे.

(८) एकदां कसली तरी एक बैठक आमच्याकडे बेतली गेली व त्या वेळेला खूप मोठा गारांचा पाऊस पडला. तेव्हां माझी लहान मुलगी मीनाक्षी हिनें खूप गारा वेचल्या. त्यांतल्यां पुष्कळशा गारा तात्यासाहेबांनीं इतक्या आवडीनें खाल्ल्या कीं, सर्वांना तेव्हां फारच आश्चर्य वाटलें. कारण, तेथील पुष्कळशा मंडळींना वयपरत्वें गारा खातां येणें अशक्य झालें होतें.

(९) माझे वडील सीताराम बाबाजी गुर्जर हे पंधरा वर्षें माझ्याकडेच होते व ते 'आजोबा' ह्या नांवानेंच प्रसिद्ध होते. तात्यासाहेब जेव्हां जेव्हां आमच्या घरीं येत तेव्हां तेव्हां कामाची अत्यंत निकड असूनसुद्धां आजोबांशी पांच मिनिटें बोलल्याशिवाय तात्यासाहेब बंगल्याबाहेर जात नसत. दारांत जर आजोबा उभे असले (तात्यासाहेब तेव्हां टिळकरोडवरच्या बंगल्यांत राहत असत) व ते दारावरून शिवाजी मंदिरांत किंवा दुसरीकडे जात असले तरीसुद्धां "काय आजोबा, कसें काय ठीक आहे ना ?" व आजोबा ह्यावर "आंत येतां का ?" असें म्हणाले कीं, "नको, जातों आतां, येईन परत कधींतरी" असें म्हणून हंसतमुखानें डुलत डुलत व भराभरा दृष्टिआड होत असत. अशी ही प्रेमळ मूर्ति परत कांहीं आपल्या डोळ्यांसमोर आतां दिसणार नाहीं म्हणून, ह्या व ह्यांहून अनेक आठवणींनीं मन खिन्न झाल्याशिवाय राहत नाहीं.



लक्ष्मण बलवंत भोपटकर

(एम्. ए., एलएल्. बी., ॲडव्होकेट; विश्वस्त, केसरी-मराठा संस्था, पुणें.)

गेलीं पंचवीस-तीस वर्षें कै. नं. चिं. तथा तात्यासाहेब केळकर व मी यांचा अनेक कार्यक्षेत्रांत इतका निकटचा संबंध आला कीं, तसा इतरांच्या नशिबीं क्वचितच आलेला असेल. तेव्हां मला तात्यासाहेबांच्या स्वभावाच्या निरनिराळ्या छटा व विचारांचे बारीकसारीक पापुद्रे हीं सारीं अनुभवायास मिळालीं ! त्या सर्वच गोष्टी मी देईन म्हटलें तर तो एक ग्रंथच होईल. परंतु तसें न करतां मी फक्त कांहीं थोड्याच निवडक आठवणी खाली देत आहें.

(१) एकाद्यानें मनांत भरण्यासारखी एखादी कामगिरी केली किंवा एकादें सत्कार्य केलें, तर त्याबद्दल हेवादावा न वाटतां उलट त्याचा गौरव करण्यास

मनाचा जो उपजत थोरपणा लागतो, तो तात्यासाहेबांजवळ भरपूर होता व म्हणूनच ते शेवटपर्यंत आपले निस्सीम अनुयायी संपादूं व कायम टिकवूं शकले !

(अ) मला तो प्रसंग स्पष्टपणें आठवतो. १९०४ सालीं मी एम्. ए. चा अभ्यास करीत होतों. 'तत्त्वज्ञान' हा माझा विषय होता. अभ्यासाच्या ओघांत मी 'मराठा' पत्रामध्यें " दी पर्मनंट एलिमेंट्स् ऑफ् रिलिजन " या विषयावर एक लेखमाला लिहिली. ती तात्यासाहेबांना इतकी आवडली कीं, त्यांनीं पत्र पाठवून मला मुद्दाम भेटीस बोलाविलें व मला मनःपूर्वक शाबासकी दिली. केसरी व मराठा पत्रांचे नामवंत संपादक म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या तात्यासाहेबांनीं एका चोवीस वर्षांच्या अप्रसिद्ध तरुणाचा गौरव केलेला पाहून मला किती धन्यता वाटली असेल बरें !

(आ) तात्यासाहेब ता. १४ ऑक्टोबर १९४७ रोजीं दिवंगत झाले. त्याच्या आदल्याच रविवारीं म्हणजे ता. १२ ऑक्टोबर रोजीं टिळक मंदिरांत श्री. धोंडुमामा साठे यांचा सत्कार करण्याकरितां जी सभा भरली होती तिचे ते अध्यक्ष होते. श्री. धोंडुमामांनीं दोन वर्षेपर्यंत अविरत श्रम करून सांगलीचें इंजिनिआरिंग कॉलेज जें मूर्त स्वरूपांत आणलें, त्याबद्दल त्यांचा सत्कार करावयाचा होता. त्या वेळीं तात्यासाहेबांनीं धोंडुमामांबद्दल जे गौरवाचे उद्गार काढले व त्यांच्या श्रमाचें चीज करण्याबद्दल महाराष्ट्राला जी तळमळीची विनंती केली, ते उद्गार व ती विनंती आम्हां श्रोत्यांच्या कानांत अजूनहि घुमत आहेत ! माझी खात्री आहे कीं, त्या उद्गारांनीं धोंडुमामांच्या साऱ्या श्रमांचा परिहार झाला असला पाहिजे !

(२) परसुखाने सुखित व परदुःखानें दुःखित होणारा असा तात्यासाहेबांचा आत्मा होता ! १९०५ साली बंगभंगावरून महाराष्ट्रांत सुरू झालेल्या आंदोलनांत 'भाला' पत्राचे संपादक माझे ज्येष्ठ बंधु भालाकार, ती. स्व. भाऊसाहेब भोपटकर, यांचा सरकारच्या रोषास पहिला बळी पडला ! माझ्या बंधूंना पकडलें त्या दिवशीं मी मुंबईत एल्एल्. बी. च्या टर्म्स भरण्याकरितां होतों. मी लगेंच पुण्यास आलों. हें समजतांच तात्यासाहेब आमच्या घरीं येऊन मला म्हणाले, " घाबरूं नका. पैसे, भाल्यांत लिहिणें, याबद्दल कांहीं मदत लागली, तर खुशाल माझ्याजवळ मागा. " आम्ही बंधूंनीं त्यांच्याजवळ कोणतीच मदत मागितली नाहीं, हा भाग निराळा. पण एकट्या तात्यासाहेबांनींच न मागतां ती देऊं केली, हा निःसंशय त्यांच्या मनाचा मोठेपणा होता !

(३) तात्यासाहेब हे शिस्तीचे मोठे भोक्ते असत. ते दुसऱ्यावर शिस्त चालवीत, तशीच स्वतःवरहि चालवून घेत असत !

(अ) सन १९२० सालीं सोलापूर येथें भरलेल्या प्रांतिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. त्या नात्यानें त्यांनीं परिषदेचें काम अत्यंत शिस्तीनें पार पाडलें.

एका महत्त्वाच्या ठरावावर भाषण करणारे अनेक वक्ते असल्यामुळे त्यांनीं प्रत्येक वक्त्याला वेळ ठरवून दिलेला होता. वक्त्यांमध्यें लोकमान्य टिळक हे एक वक्ते होते. लोकमान्य भाषण करीत असतांना ठरवून दिलेली वेळ संपत येतांच तात्यासाहेबांनी सूचनार्थ पहिली घंटा वाजविली व वेळ संपल्याबरोबर दुसरी घंटा वाजविली, आणि लोकमान्यहि असे शिस्तखोर कीं, घंटा वाजविल्याबद्दल कोणताहि राग न मानतां ते चटकन् खालीं बसले ! याबद्दल आमच्यापैकीं कांहींजण मनांतून नाराज झाले. ही नाराजी लोकमान्यांजवळ व्यक्त केल्यावर, लोकमान्यांनी तात्यांना दोष देण्याऐवजीं उलट नाराजी दर्शविणारांची चांगलीच खरडपट्टी काढली !

(आ) केसरी-मराठा ट्रस्टसंबंधानें टिळकबंधूंनीं केलेल्या दाव्यांत ट्रस्टी तात्यासाहेब केळकर व बाबासाहेब विद्वांस यांच्यातर्फे मी वकील होतों. मी दोघांनाहि असा निर्बंध घातला होता कीं, सदरील दाव्यांचा निकाल होईपर्यंत टिळकबंधूंनी अगर इतरांनीं वर्तमानपत्रांतून कांहीहि लिहिलें तरी त्याला उत्तरादाखल अगर खुलासा म्हणून केसरींत व मराठ्यांत त्यांनीं कांहींहि लिहावयाचें अगर प्रसिद्ध करावयाचें नाहीं. तेव्हां कांहीं वर्तमानपत्रांतून या दोन्ही ट्रस्टीसंबंधानें अत्यंत गलिच्छ व खोडसाळ असें लिखाण प्रसिद्ध होत असें व त्यामुळें तात्यासाहेबांची लेखणी फुरफुरत असल्याचें मला स्वच्छ दिसत असे. तरीपण आपल्या वकिलानें आपणांवर निर्बंध घातलेला आहे ना, तर मग तो आपण अवश्य पाळलाच पाहिजे, असा विचार करून त्यांनीं त्या निर्बंधाचें उल्लंघन रतिमात्रहि केलें नाहीं ! दाव्यांचा निकाल ट्रस्टीसारखा झाल्यावर माझें अभिनंदन करण्यासाठीं ते जेव्हां माझ्याकडे आले तेव्हां मी तात्यासाहेबांना म्हणालों, " तात्यासाहेब, मीं घातलेल्या निर्बंधामुळें तुमच्या मनास यातना होत होत्या हें मी जाणून होतों, परंतु पुराव्या होईतोंपर्यंत मला झाकली मूठ उघडी करावयाची नव्हती. आतां तुम्हांला जें कांहीं व जितकें लिहावयाचें असेल तें खुशाल लिहा. माझा निर्बंध मीं मागें घेतला आहे. "

(४) कै. तात्यासाहेब तुरुंगवासाला भीत नसत; पण त्यासाठीं मोठेसे हपापलेलेहि नसत ! सन १९३० सालीं मीठ – सत्याग्रहांत सामील होण्याचें आमच्या पक्षानें ठरविल्यावर एके दिवशीं सकाळीं तात्यासाहेब व बाबूराव गोखले माझ्या घरीं येऊन मला म्हणाले, " आम्ही मीठ-सत्याग्रहाला आज दुपारच्या गाडीनें निघणार आहोंत, तुम्हीहि आपली तयारी करा. " तेव्हां मी नागपूर युनिव्हर्सिटीच्या सेकंड एल्एल्. बी. चा परीक्षक असल्यामुळें परीक्षेचे पेपर तपासीत होतों. मी म्हणालों, " तुम्ही पुढें व्हा. मी चार-आठ दिवसांत सारे पेपर तपासून व परत करून सत्याग्रहाला जातों. " तेव्हां तात्यासाहेब विनोदानें म्हणाले, " जाऊं द्या हो, पेपर तुरुंगांत नाहीं का तपासतां येणार ! " ठरल्याप्रमाणें आम्ही

तिघेजण दुपारच्या गाडीनें तीन केंद्रांकडे निघालों. तात्यासाहेब पेणला जाऊन त्यांनीं तेथें सत्याग्रह केला, मी कल्याणला सत्याग्रह केला व बाबूरावांनीं आपल्या केंद्रावर सत्याग्रह केला. आम्हां तिघांपैकी मी व बाबूराव यांना पकडण्यांत येऊन आम्हांला शिक्षा झाल्या, पण तात्यासाहेबांना पकडण्यांत आलें नाहीं! त्यांचा मोठेपणाच त्यांच्या आड आला! त्याला ते तरी काय करणार? तरी पण त्यांनी सोलापूर येथील लष्करी कायद्याविरुद्ध जी बहुमोल कामगिरी बजाविली, ती वर्ष-सहा महिन्यांच्या तुरुंगवासापेक्षां किती तरी भरीव होती!

(५) तात्यासाहेब एकदां ज्याला आपला म्हणत, त्याचा सतत शक्यतों पाठपुरावा उल्हासानें करीत असत! सन १९३५ च्या निवडणुकीच्या वेळीं मी लोकशाही स्वराज्य पक्षाचा अध्यक्ष होतों. तात्यासाहेबांचें म्हणणें असें की, "कायदेमंडळांत जाण्याचें आतां काँग्रेसनें ठरविलें आहे ना, तर मग या निवड-णुकी आपण लढवूं नयेत." माझें म्हणणें असें की, "पक्ष म्हटला की त्यानें यशापयशाचा विचार न करतां निवडणुकी ह्या लढविल्याच पाहिजेत. काँग्रेसला अगदींच मोकळें रान सोडतां कामा नये." त्याप्रमाणें निवडणुकी लढण्याचें ठरलें. सभा संपल्यावर मी थट्टेखोरपणानें तात्यासाहेबांना म्हणालों, "अध्यक्ष या नात्यानें मी तुम्हांस फर्मावितों कीं, या निवडणुकीच्या बाबतींत तुम्ही कायावाचामनेंकरून पक्षास साहाय्य केलें पाहिजे." तात्यासाहेबहि कांहीं कमी विनोदी वृत्तीचे नव्हते. तेहि विनोदानें म्हणाले, "अध्यक्षमहाराज, हें आपलें फर्मान मला सर्वस्वीं मान्य आहे. बोला, कोणतें साहाय्य अन् कसं करूं तें." आणि पाहतों तों दुसऱ्या दिवशीं उजा-डतांच स्वारी माझ्या घरीं दत्त उभी! तेव्हां त्यांचा एक गुडघा सुजला असल्या-मुळें त्यांना चालवतहि नव्हतें. तरीपण तशाहि स्थितींत माझ्याजवळून मत-दारांची यादी घेऊन मतदारांना भेटण्याचा त्यांनीं जो उपक्रम केला तो शेवट-पर्यंत अव्याहत चालविला!

(६) प्रसंगीं तात्यासाहेब जरी कठोर वृत्तीनें वागत, तरी खरोखर जात्या ते हळव्या मनाचेच होते! १९३९ सालीं भागानगरच्या सत्याग्रहांत मीं भाग घेण्याचें जें ठरविलें तें त्यांना मान्य नव्हतें. त्यांचें म्हणणें असें कीं, "अगोदर माझें म्हातारपण झालेलें, आणि त्यांत तुरुंग पाहावयाचा तो निजामी राज्यांतला! तेव्हां माझी कांहीं धडगत लागावयाची नाहीं. म्हणून मी स्वतः सत्याग्रहांत जाऊं नये." शेवटीं खास गाडीनें अडीचशें स्वयंसेवक बरोबर घेऊन, सत्याग्रहास निघण्याचा दिवस ठरला. त्याच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं ते माझ्याकडे येऊन मला म्हणाले, "उद्यां स्टेशनला निघण्यापूर्वी माझ्याकडे या, तुम्ही दोघेहिजण या, म्हणजे मी व ती असे आम्ही दोघेजण तुम्हांला आमच्या कुलदैवताचा तीर्थप्रसाद देणार आहोंत." तात्यासाहेबांची इच्छा ही मला

केव्हांहि हुकुमाप्रमाणें असे! त्याप्रमाणें आम्ही दोघेजण त्यांच्या घरीं गेलों. तात्यासाहेबांच्या पत्नीनें (श्रीमती ताईंनीं) माझ्या पत्नीच्या कपाळास हळदकुंकू लाविलें व माझ्याहि कपाळास कुंकू लाविलें आणि आम्हा दोघांसहि तीर्थप्रसाद दिला. तेव्हां त्यांना एवढा हुंदका आला कीं, त्यांच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा पाझरल्या! तात्यासाहेबहि अत्यंत गहिवरले व त्यांचे नेत्रहि पाण्यानें डबडबून आले! माझी पत्नी रडूं लागली आणि या सर्वांचा परिणाम माझ्या मनावर होऊन जर माझे डोळे ओलेचिंब झाले, तर त्यांत आश्चर्य तें काय! या एकंदर प्रकारावरून मी आपल्या मनाशीं असा कयास बांधला की, तात्यासाहेब व ताई यांना मी कांहीं आतां जिवंत परत येत नाही असें वाटलें असावें व या विचारानेंच त्यांचें मन कासावीस झालेलें असावें!



शंकर नारायण हर्राप

(सेवानिवृत्त सरकारी नोकर; केळकरांचे लेखक, ज्योतिर्विद्या परिसंस्थेचे कार्यवाह, पुणें)

कै. गुरुवर्य तात्यासाहेब केळकरांच्या आठवणी सांगावयाच्या म्हणजे त्यांच्याबरोबर लेखकाचा आलेला संबंध थोडक्या शब्दांत कां होईना पण सांगणें अपरिहार्य आहे; एरवीं त्या आठवणींचें मर्म नीट लक्षांत येणार नाहीं असें वाटतें. सबब थोडक्यांत तो संबंध आधीं सांगतों. माझ्या स्वतःच्या विद्यार्थीदशेपासून तात्यासाहेबांच्या मृत्यूपर्यंत सुमारें ४०-४५ वर्षें कांहींना कांहीं माझा नैमित्तिक संबंध त्यांच्याशीं आलेला आहे. केसरीचे एक उपसंपादक कै. दत्तोपंत लिमये यांच्याबरोबर मी केसरी-कार्यालयांत अनेक कामानिमित्त जात असें, त्यावेळीं तात्यासाहेब केळकर यांच्याबरोबरहि किरकोळ कामें करण्याचा मला हमेशा प्रसंग येई. केसरी-कार्यालयांतील सर्व कपाटें चाळून पाहिलीं, यादी करण्याचें काम मजकडेच होतें व त्यावेळीं खुद्द तात्यासाहेब केळकर यांचीच माझ्या कामावर मुख्यतः देखरेख असे. त्याचवेळीं सतत ३-४ वर्षें त्यांचा मी लेखक होतों; पण हें लेखन रात्रीं ९ नंतर त्यांच्या स्वतःच्या घरीं चाले. एकसारखा कामानिमित्त भेटण्याचा संबंध मात्र यापुढें सुटला. तदनंतर त्यांच्याकडे मी फक्त कार्यपरत्वें सल्लामसलत विचारण्याकरितां जात-येत असे व हा क्रम मात्र शेवटपर्यंत चालूं होता.

(१) कै. गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांची स्मरणशक्ति तीव्र होती. १९०४-५ सालची गोष्ट असावी. सध्यां जेथें नूतन मराठी विद्यालयाचें हायस्कूल आहे तेथें त्या वेळीं "न्यू प्रिपरेटरी क्लासेस" नांवाची राष्ट्रीय शाळा होती. सुपरिंटेंडेंट कै० शंकर गणेश ऊर्फ भाऊसाहेब लवाटे किंवा श्री. विनायकराव करंदीकर

आलटून पालटून असत. त्या सालीं शाळेच्या शिवाजीउत्सवामध्यें 'शिवरायाचें चरित्र' हा विषय विद्यार्थ्यांच्या वक्तृत्वाच्या चढाओढींत ठेवला असून, विद्यार्थी या नात्यानें मी त्यांत भाग घेतला होता. परीक्षकांत तिघांची समिति होती. एक भाऊसाहेब लवाटे, दुसरे तात्यासाहेब केळकर व तिसरे वामनराव तळवळकर. तिघांनींहि त्या वेळीं मला सर्वांत जास्त मार्क देऊन पहिल्या क्रमांकानें माझी निवड केली होती. विशेषतः तात्यासाहेब केळकरांना माझें भाषण फार आवडल्याचें दिसून आलें. कारण, समारंभानंतर बक्षीस देण्याच्या वेळीं त्यांनीं मला जवळ बोलावून घेतलें, माझें नांव विचारलें व इतर कांहीं किरकोळ प्रश्न विचारले. नंतर भाऊसाहेबांकडे वळून ते म्हणाले, "मुलगा तरतरीत दिसतो, त्यानें काढलेले मुद्दे व ते मांडण्याची पद्धति चांगली असून, तो बोललाहि चांगला." पुढें २ वर्षांत स्थित्यंतरें बरींच झालीं. आमच्या शाळेचें नांव "महाराष्ट्र विद्यालय" ठेविलें जाऊन शाळा पांजरपोळाच्या बोळांत श्रीधर विठ्ठल दाते यांच्या वाड्यांत नेण्यांत आली. त्या सालच्या शिवाजीउत्सवांत तानाजी मालुसरे नाटक विद्यार्थ्यांनीं केलें, त्यांत तानाजीचें काम मजकडे होतें. शाळेचे शिक्षक, निमंत्रित मंडळी वगैरे बरीच त्या रात्रीं उपस्थित होती. माझें काम सुबक झाल्याबद्दल सर्वांनींच तारीफ केली, त्यांत तात्यासाहेब केळकरहि होते. शेवटीं सांगण्याची गोष्ट इतकीच कीं, दोन वर्षांपूर्वीचा मी व माझें नांव स्मरणांत ठेवून त्या वेळीं नेमक्या माझ्या नांवाचा पुनरुच्चार केला व शाबासकी दिली! या त्यांच्या स्मरणशक्तीबद्दल मला अद्यापहि कौतुक वाटतें व ती लहानपणची गोष्ट अद्यापि माझ्या चांगली स्मरणांत आहे. पूर्वी तात्यासाहेब यांनीं मला कधीहि पाहिलें नव्हतें व माझें नांव तर त्यांना मुळींच माहीत नव्हतें. हीच आमची पहिली ओळख.

(२) तात्यासाहेबांच्या ममताळूपणाचा व दयाळुत्वाचा अनुभव अनेक वेळां मला चांगला आला. केसरीचे उपसंपादक कै. दत्तोपंत लिमये त्यांच्या दृढ-परिचयामुळें माझें त्यांच्याबरोबर केसरी-कार्यालयांत जाणें येणें नेहेमीं घडे. त्या-वेळीं माझें कॉलेजचें शिक्षण पुण्यांतील दोघा नामांकित धनिकांच्या आश्रयावर चालूं होतें; पैकीं कांहीं आकस्मिक कारणानिमित्त एका आश्रयदात्याची मदत एकाएकीं बंद पडली. घरची गरिबी व इतर कोणाचाहि आधार नसल्यानें तें मजवर चांग-लेंच संकट आलें असें मला वाटलें व काय करावें याबद्दल दत्तोपंत लिमयांना गोष्ट काढून त्यांचा सल्ला विचारला. ते म्हणाले, "हरीप, तुला देतां येण्यासारखें मजजवळ काम नाहीं; पण तूं आज मजबरोबर आलास म्हणजे तात्यासाहेब केळकर यांच्याजवळ गोष्ट काढ व कांहीं जमतें का पाहा." मी नित्याप्रमाणें श्री. लिमये यांच्याबरोबर केसरी ऑफीसमध्यें गेलों. तात्यासाहेब केळकर जवळच आपल्या टेबलावर कांहीं कामांत निमग्न असल्याचें दिसलें. तात्यासाहेबांना आपण गोष्ट काय काढावी, कशी काढावी, ते काय म्हणतील इत्यादि धास्ती मला एक-

सारखी वाटत होती. त्यांच्याशीं निवांत बोलण्याची संधि कशी मिळवावी याची मी वाटच पाहत होतों. इतक्यांत सुदैवानें ते खुर्चीवरून उठले व लगबगीनें ऑफिसला लागून असलेल्या लायब्ररींत पुस्तक शोधण्याकरितां गेले. लायब्ररीची खोली त्या वेळीं मोकळीच असे व तेथें कामाशिवाय सहसा कोणी जात नसत. तात्यासाहेब खोलींत एकटेच असलेले पाहून मी त्यांच्या पाठोपाठ लगेच गेलों व माझी अडचण त्यांना निवेदन केली. मला कमींतकमी महिना १०-१५ रु. ची मदत ताबडतोब न मिळाल्यास मला कॉलेजचें शिक्षण अर्धवट सोडावें लागेल, आजवर फी-पुस्तकें यांचा केलेला खर्च फुकट जाईल, शिवाय एक वर्ष विनाकारण गेलें तें गेलेंच; तेव्हां केसरी ऑफिसमध्यें फावल्या वेळीं आपण सांगाल तें मी काम करतों; पण कसेंहि करून मला १५ रुपयांची मदत पाहिजे, तिची आपण व्यवस्था करा, असें दीनवाणीनें मीं त्यांना सांगितलें. त्याच वेळीं इतर कांहीं प्रश्न घरगुती नात्यानें त्यांनीं मला विचारलें. शेवटीं ते म्हणाले, तुम्ही ऑफिसमध्यें बसा; जातांना मी तुम्हांला सांगतों, असें मजबरोबर बोलून ते आपल्या स्वतःच्या कामाला पुनः लागलें. दोन तासांनंतर त्यांनीं दत्तोपंत लिमये यांना आपणाकडे बोलावून घेतलें व कांहीं विचारविनिमय केला. शेवटीं लो. टिळकांच्या मधल्या दिवाणखान्यांत जीं पुस्तकांचीं मोठीं कपाटें होतीं त्यांतील पुस्तकें काढून तिची विषयवारी यादी करण्याचें काम त्यांनीं मजवर सोंपविलें व अशा रीतीनें त्या वेळचें माझें आर्थिक संकट एका क्षणांत दूर झालें. त्या वेळचा माझा आनंद गगनांत मावेना व तात्यासाहेबांना त्यांच्या मदतीबद्दल मी स्वाभाविकच अंतःकरणपूर्वक धन्यवाद दिले. त्या वेळचा परिस्थित्यनुरूप आलेला मजवरचा पेचप्रसंग फार मोठा होता व केवळ तात्यासाहेबांच्या दयाळू स्वभावामुळें तो दूर झाला याची आठवण आजतागायत मला आहे.

(३) गु. तात्यासाहेबांचा सल्ला अचूक, स्पष्ट व परिस्थित्यनुरूप योग्य असाच असे. त्याचीं थोडीं उदाहरणें देतों.

(अ) प्लेगच्या दुर्धर दिवसांत आमची एक अत्यंत जवळची नातलग मुलगी वैधव्याच्या फेऱ्यांत सांपडली, व तिचें पालन-पोषण करण्याची जबाबदारी मजवर येऊन पडली. माझें स्वतःचें कुटुंब बरेंच मोठें, पगार थोडा व त्यांत ही नवीन आपत्ति येऊन पडली. पण कांहीं झालें तरी संकटांतून मार्ग तर काढला पाहिजे. त्या वेळीं अशा विधवांच्या चरितार्थाचे दोनच मार्ग शिल्लक असत. एक लोकांच्याकडे स्वैपाकपाणी करून जन्मभर कष्टांत दिवस काढण्याचा किंवा शाळेतलें शिक्षण घेऊन कोठें शाळामास्तरणीची १५-२० रुपयांची नोकरी करण्याचा. पण दुसरा मार्ग अवलंबिण्याससुद्धां दोन मोठ्या अडचणी होत्या. पहिल्या अडचण घरांतील वृद्ध मातुश्री व जवळचे सनातनी नातलग यांच्या परवानगीची. कारण तरुण मुलींनीं घरच्या घरीं लिहिण्या-पुसण्यांचीसुद्धां जेथें

मनाई तेथें शाळेंत ४ वर्षें शिकून मास्तरीण होणें व नंतर अशा मुलींनीं स्वतंत्र नोकरपेशा पत्करणें ही कल्पनाच त्या वेळीं असह्य होती. दुसरी अडचण अशी होती कीं, मनाचा हिय्या करून शिक्षणाचा मार्ग ठरविलाच तरी सतत ४ वर्षें शिक्षण देण्याला व तेथपर्यंत खर्च झेपण्याला मला स्वतःला शक्ति नव्हती. त्या वेळीं मी अनेक मित्रांचा सल्ला घेतला, पुष्कळ विचारविनिमय केला गेला, पण कोडें कांहीं सुटेना. शेवटीं मनांत आलें कीं, आपण तात्यासाहेबांच्याकडे तर नित्यशः जातोंच, मग त्यांना याबाबतींत विचारायला काय हरकत आहे ! श्री. दत्तोपंत लिमयांना मी काय करूं असें विचारलेंच होतें व त्यांनीं शिक्षणाचा मार्ग सुचविला होता. त्यानंतर एके दिवशीं रात्रीं मोकळ्या वेळेला मुद्दाम तात्यासाहेबांकडे गेलों व सर्व इत्थंभूत हकीकत त्यांना सांगितली. त्यावर त्यांनीं इतका झटपट व स्पष्ट सल्ला दिला कीं, माझें कोडें एका क्षणांत उलगडलें गेलें. ते म्हणाले " हरीप, तुम्ही आपल्या मातुःश्रींची नीट समजूत घाला; इतर कोणी दुसरे दुराग्रही नातेवाईक असलेच तर त्यांच्या बोलण्याकडे बिलकूल लक्ष देऊं नका. तुमच्या मुलीला तुम्ही हिंगण्याला कर्वे यांच्या अनाथबालिकाश्रमांत ठेवा, मी कर्व्यांना चिठ्ठी देतों व लगेचच्या लगेच उद्यां मुलीला घेऊन त्यांना तुम्ही भेटा." असें म्हणून त्यांनीं आपल्या हातानें ताबडतोब त्याच वेळीं एक पत्र लिहिलें व मजजवळ दिलें. ठरल्याप्रमाणें मी अनाथबालिकाश्रमाच्या त्यावेळच्या मुख्याध्यापिका मिसेस कर्वे यांना तात्यासाहेबांचें पत्र दिलें व माझी असह्याय्य स्थिति बाईना निवेदन केली. तात्यासाहेबांच्या चिठ्ठीला त्यांनीं मान देऊन निम्या खर्चांत आमची शिक्षणाची सोय केली व अशा रीतीनें आमची कायमची अडचण दूर झाली. आतां त्या बाई हेड् मिस्ट्रेस असून त्यांना ७५ रु. पगार आहे.

(आ) प्लेगच्या दिवसांत पुण्यांत कहर उसळत असे हें सर्वश्रुतच आहे. एके वर्षी पुष्कळ परिश्रम केले तरी झोंपडींत राहण्याची आमची कांहीं एक सोय लागेना. आळींत व राहत्या वाड्यांत उंदीर पहूं लागले व केसेस होऊं लागल्या. जागा सोडण्याचें अगदीं निकडीचें होऊन बसलें. काय करावें सुचेना. तात्यासाहेबांना गोष्ट काढण्याचें अनेकवार मनांत आलें. पण माणसाला स्वतःचींच पंचाइत तेथें तो दुसऱ्याची कशी सोय लावणार ? त्यांना शब्द टाकून कांहीं काम होणार नाहीं अशी खोटीच कल्पना मी उराशीं बाळगून ७-८ दिवस फुकट घालविले, असें त्या वेळीं पाठीमागून मला वाटलें. असो. घरांत अगदीं जवळ प्लेग-केस झाली व पाठीमागें निकड लागली. तेव्हां घाईघाईनें जाऊन एकदांचें त्यांच्या कानांवर घातलें व मला कोठेंतरी झोपडींत एकादी जागा द्याल कां असें विनविलें. त्यांनीं किंचित् विचार करून कै. वासुकाका जोशी यांना एक चिठ्ठी दिली व त्यांनींहि मोठ्या कृपेनें आपल्या कँपांत माझी सोय केली. पहिल्यानें चिठ्ठी पाहून वासुकाका

मनांतल्या मनांत कांहीं पुटपुटले पण शेवटीं तात्यासाहेबांच्या शब्दाचा मान राखला गेला व माझी त्या वर्षीची अडचण दूर झाली.

(इ) सुमारें सन १९०८ सालीं मी महाराष्ट्र विद्यालयांत शिक्षक होतों व पगार सारा १२ रु. होता. शाळा जहाल म्हणून गाजलेली व ती सरकार केव्हां लेखणीच्या एका फटकाऱ्यानें उखडून टाकील याची शाश्वति मुळींच नव्हती. त्यां वेळचे माझे व्यवसायबंधु श्री. सदाशिवराव बापट, भावे, दिवेकर इत्यादि मंडळी असून कै. दिनकरराव भोपटकर शाळेचे सुपरिंटेंडेंट होते. घरची गरिबी तर होतीच, पण हाच मिळत असलेला चतकोर भाकरीचा तुकडाहि सरकारी रोषामुळें केव्हां हातांतून जाईल याची शाश्वति नव्हती. सरकारी खात्यांत त्या वेळीं नोकरी मिळणें अत्यंत दुरापास्त व आमच्यासारख्या सरकारच्या नेहमीं डोळ्यांवर असणाऱ्या संस्थांमधून वावरणाऱ्या व्यक्तींना तर कोणी जवळपासहि उभे करीत नसत, मग नोकरी-चाकरीची गोष्ट तर अत्यंत लांबची. अशाहि परिस्थितींत आमच्या एका लांबच्या नातेवाइकाकडून, इरिगेशन खात्यांत २० रु. पगाराची शेवटची क्लार्कची जागा रिकामी आहे व त्या खात्याचे मुख्य साहेब श्री. विष्णु नारायण ऊर्फ अण्णासाहेब वर्तक आहेत अशी बातमी मला समजली व तेथें खटपट करावी असा मला सल्ला मिळाला. रीतीप्रमाणें १।२ दिवसांत मी त्यांना भेटलों. परिस्थिति, शिक्षण, वय, जात वगैरे आवश्यक लागणारी माहिती दिली व नोकरी मिळण्यास अडचण नाहीं येथपर्यंत प्रकरण आलें. पण शेवटीं त्यांनीं एकच अट ठेवली. ती ही कीं, मी चांगल्या वर्तणुकीबद्दल एखादें शिफारसपत्र दाखल करावें म्हणजे नोकरी मिळेल. वास्तविक त्या वेळीं माझे पुण्यांत अनेक स्नेही होते व मला एकच काय अनेक शिफारसपत्रें मिळणारीं होतीं; पण मीं मनांत असें हेरलें कीं, अण्णासाहेब वर्तकांना जर तात्यासाहेब केळकरांसारख्यांचें स्वदस्तुरचें सर्टिफिकेट मीं दिलें तर उत्तम; कारण तात्यासाहेबांचा व अण्णासाहेब वर्तक यांचा चांगला स्नेहहि आहे ही गोष्ट माझ्या कानावर होती, अर्थात् केळकर यांच्या शिफारसपत्रानें फारच उपयुक्त कामगिरी होईल असा कयास मीं बांधला. माझ्या या धोरणानें एका दगडांत दोन पक्षी मारल्याचें श्रेय मिळणारें होतें. एक तर नोकरी हमखास मिळेल यांत शंकाच नाहीं; पण मी केळकरांच्या शिफारसीचा मनुष्य म्हणून वर्तकसाहेबांकडून मजवर जरा अधिक लक्ष राहील. तात्यासाहेब केळकरांनीं त्यांच्या नेहमींच्या दयाळू स्वभावानुसार मीं गोष्ट काढतांच मला पत्र तर दिलेंच, पण तें केवळ औपचारिक न देतां जरा तिखट-मीठ लावून दिलें. त्याचा त्या वेळीं तर उपयोग मला झालाच पण अण्णासाहेब वर्तक पुण्यांत असेतोंपर्यंत अनेक वेळां नोकरींत माझा फायदा झाला.

(ई) तात्यासाहेब सर्वच प्रकारची योग्य ती मदत देण्यास नेहमींच तत्पर असत. केसरी कार्यालयांतील पुस्तकांची यादी तयार करण्याचें काम चालू असतां

ते मधूनमधून मजवर देखरेख करीत असत व वेळोवेळीं सूचना देत, हें मीं वर निवेदन केलेंच आहे. एके वेळीं संधि साधून आणखी कांहीं कामगिरी मला देतां येण्यासारखी असल्यास सांगा अशी मीं मागणी केली. आठवल्यासारखें करून लगेच त्यांनीं मला सांगितलें कीं, रात्रीं १।२ तास एका लेखकाची मला जरूरी आहे. तुम्हांला माझ्या घरीं येऊन काम करण्यास सवड होईल ? मी त्या वेळीं शनीच्या पारापाशीं राहत असून तात्यासाहेब गायआळीच्या राममंदिरासमोर आपल्या स्वतःच्या घरीं राहत असत. अर्थात् त्यांच्या घरापासून माझें घर जवळच होतें ही एक सोय. दुसरी महत्त्वाची सोय म्हणजे रात्रीच्या वेळीं मुकाट्यानें जाऊन काम करण्याची अनायासें संधि लाभली ही होय. दिवसा ही गोष्ट त्यांच्या घरीं जाऊन करणें अगर केसरी कार्यालयांत जाणें या बाबी त्या वेळीं अत्यंत कठीण व दुरापास्त होत्या. केसरी संस्थेशीं संबंध ठेवणें, केसरी कार्यालयांत काम करणारीं अगर संबंधी माणसें यांच्याबरोबर स्नेह ठेवणें, गायकवाड-वाड्यांत जाणें, फार काय, नारायण पेठेंत त्या बाजूला फिरकणें – विशेषतः सरकारी नोकरांना – तर फारच जाचक असें, असा तो काळ होता ! सारांश, खुद्द तात्यासाहेबांनींच मला रात्रीची सवलत दिल्यानें माझें आयतें काम भागलें. मी तात्यासाहेबांचा रात्रीचा लेखक बनलों व तें काम मीं सतत ३–४ वर्षे केलें तरी त्याचा थांगपत्ता सरकारी देवदूतांनाहि लागला नाहीं किंवा इतरेजनांना तर मुळींच लागला नाहीं. तात्यासाहेबांचा मी लेखक आहें ही गोष्ट त्या वेळीं त्यांचे दोन चिरंजीव, त्यांचे कुटुंब ताई, दत्तोपंत लिमये व सदाशिवराव बापट इत्यादि ५–७ माणसांशिवाय कुणासहि माहीत नव्हतें. स्वतःचा लेखक नेमून तात्यासाहेबांनीं त्या वेळीं मला उपकृत करून ठेवलें व त्या वेळची माझी आर्थिक अडचणहि अंशतः दूर केली, यांजबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहें. शिवाय अशा थोर पुरुषाचा सतत रोजच्या रोज सहवास घडला हा लाभ तर मी विशेषच समजतों.

(उ) तात्यासाहेबांचा लेखक बनल्यावर त्यांचे कितीतरी सद्गुण माझ्या नजरेस आले. त्या प्रत्येकाचें तपशिलवार वर्णन केलें तर "आठवणी"चीं आणखी १०–१५ पानें सहजीं अडलीं जातील, व शिवाय सर्व कांहीं सांगितलें असें होणारच नाहीं. तरी या भानगडींत न पडतां थोडक्यांत त्यांच्या सद्गुणांचें दिग्दर्शन करतों. अर्थात् रसिकांना त्यामुळें शितावरून भाताची परीक्षा होईलच.

लेखक असतांना पहिला जो मला अनुभव आला तो त्यांच्या नियमितपणाचा. मजकूर सांगण्यास सुरवात त्यांनीं रात्रीं ९। च्या सुमारास करावयाची तें रात्रीं बरोबर १०॥ ला उठायचें, रात्रीं जागरण मला सोसत नाही असें ते वारंवार सांगत असत. त्यांच्या लिखाणांत केसरी–मराठ्याचा वर्तमानपत्री मजकूर, निबंध, प्रबंध, टीकात्मक लेख, चरित्र, गोष्टी, नाटकांचे प्रवेश व आल्यागेल्यांच्या

लिखाणांचीं आयत्या वेळचीं कामें इत्यादि विषय आलटून पालटून असत. वरील-पैकीं रोज निदान ४–५ विषयांवर लिखाण होई. फक्त काव्य टिपून घेण्याचा मात्र मजवर कधीं प्रसंग आला नाहीं.

लेखनाचा मजकूर ते कधींकधीं फेऱ्या घालून सांगत असत; पण विशेषतः खुर्चीवर बसूनच मजकूर सांगण्याचा त्यांचा क्रम असे. मजकूर इंग्रजी असो किंवा मराठी असो, लेख संपेपर्यंत एकसारखा पण संथपणें सांगण्याचा ओघ असे. विशेष घाई नसे किंवा अडखळणें, खोडाखोडी किंवा शोधहि नसत. वर्तमानपत्री मजकूर असला म्हणजे टेबलावरची ४–२ वर्तमानपत्रें उगीचच मधून उलटींपालटीं करीत असत. मजकुराकरितां आवर्जून तीं चाळावयाचीं असें क्वचित् वेळेला होई. लेखन झाल्यानंतर मला किती तरी वेळां त्यांच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेचें व चौफेर ज्ञानाचें कौतुक वाटत असे. वर्तमानपत्री रोजचा ठराविक मजकूर संपला म्हणजे ते नाटकाचे प्रवेश लिहावयास घेत. नाटकाच्या प्रत्येक प्रवेशाचा बनाव वास्तविक निराळा; म्हणजे एका प्रवेशाचीं पात्रें लगेच पुढच्या प्रवेशांत नसायचीं व निर-निराळ्या प्रवेशांच्या संवादांचे प्रसंगहि निरनिराळे असावयाचे. पण सांगण्याचें कारण असें कीं, यत्किंचित् संगति न सोडतां, प्रत्येक प्रवेशांत पात्रांच्या तोंडीं येणारी भाषा अगदीं ठसकेदार, मार्मिक व प्रसंगोचित् अशीच असावयाची. शिवाय त्यांत गमतीदार कोट्या, उपमादि अलंकार, ठसकेदार संवाद भरपूर असून अश्लीलता मुळी-सुद्धां दिसावयाची नाहीं. भिन्नभिन्न गुणावगुणांचें चित्रीकरण तात्यासाहेब मार्मिकतेनें करीत. त्यांचें कोणतेंहि नाटक चालून पाहिल्यास या गोष्टी सहज नजरेस पडतील.

इतके विविध विषय व निरनिराळ्या प्रश्नोपप्रश्नांवर त्यांना रोजच्यारोज लिहावें लागे तरी त्यांची संगति कशी सुटत नाहीं, याचें मला राहूनराहून आश्चर्य वाटे व रात्रीं घरीं येतांना अनेक वेळां या प्रश्नावर मनांतल्या मनांत मी विचार करीत असें. एके दिवशीं लेखन-कार्य आटोपल्यावर संधि साधून माझ्या मनांत डवचणारा हा प्रश्न शेवटीं मीं त्यांना विचारलाच. त्यावर ते म्हणाले, "निर-निराळ्या विषयांवर मजकूर सांगावा लागतो, हें तुम्ही पाहतांच; पण मजकुराची गोष्ट काय किंवा नाटकांच्या प्रवेशाची गोष्ट काय, एकदां त्यावर अमुक अमुक लिहावयाचें किंवा अशी अशी मांडणी करावयाची हें मी प्रथम मनाशीं ठरवितों. तें एकदां ठरल्यानंतर भाषेची मांडणी करणें एवढेंच काम उरतें व तें सोपेंच असतें." या त्यांच्या उत्तरानें मी चकितच झालों. मला स्वतःला ही गोष्ट अत्यंत अवघड भासे; पण त्यांना तें काम अगदींच सुलभ वाटे. हा केवळ त्यांच्या प्रति-भेचा व प्रगल्भ बुद्धीचा प्रभाव होय यांत शंका नाहीं. कित्येक वेळां आमचें लिखाण चालूं असतांनाच अनेक माणसें भेटण्यास येत व येतांना कांहीं कांहीं कामेंहि खिशांत आणीत. पण त्याहि कामांचा झटकन् परामर्ष घेऊन, त्यांना वाटेस

लावून पुनः आपलें मजकूर सांगण्याचें काम सुरू करीत; एकंदरींत त्यांना कामाचा उरक फार जलद असे.

मी त्यांचा लेखक अर्थात् माझा त्यांच्याकडे नित्य जाण्याचा परिपाठ असल्यामुळें व मी अगदीं जवळ बसून लिहीत असल्यामुळें तात्यासाहेबांचे कांहीं ठळक ठळक स्वभावविशेषहि माझ्या नजरेस आल्यावांचून राहिले नाहींत. पैकीं बसावयाची जागा वारंवार बदलण्याची त्यांना फार हौस असे. आज टेबल येथें मांडलें तर चार दिवसांनीं दुसरीकडे; एक दिवस मांडणी अशी तर दुसऱ्या वेळीं दुसऱ्या प्रकारची असें त्यांचें वारंवार चाले. पोषाखांत छानछोकी कधींच दिसावयाची नाहीं व मजकूर सांगत असतांना अंगांत एक सदरा – तो बहुधा गुंड्या न घातलेला – असावयाचा किंवा जवळ एक साधें उपरणें असावयाचें. मजकूर सांगतांना त्यांना मधूनमधून नेहमीं ठसका येत असे. शेंगदाणे त्यांना फार प्रिय असत. अनेक वेळां तो त्यांना खातांना मीं पाहिलें आहें. रागीट स्वभाव त्यांचा नसे. एकदोन वेळ कामानिमित्त मजवर ते रागावलेहि आहेत; पण तो राग अगदीं क्षणिक व तेवढ्यापुरतांच असावयाचा. एकंदरींत तात्यासाहेबांचा स्वभाव फार गोड, भारदस्त व सौजन्ययुक्त असें असाच मला शेवटपर्यंत अनुभव आला.

(४) चित्ताकर्षक नाटक मंडळीचे नानबा गोखले व दत्तोपंत लिमयांचे धाकटे बंधु ओबा लिमये हे कंपनीतील प्रमुख नट असून कंपनीची अंतर्गत व्यवस्था त्यांच्याकडेच असे. हे दोघेहि माझे चांगले स्नेही होते. तात्यासाहेबांचीं बहुतेक नाटकें हीच मंडळी करीत असून, त्या वेळीं हीं नाटकें अत्यंत लोकप्रिय असत. ज्या ज्या वेळीं या दोघा नटांना प्रवेशांत फेरफार किंवा कांहीं सूचना कराव्या लागत, त्यावेळीं आम्ही सर्वजण तात्यासाहेबांच्याकडे जात असूं. त्यांनीं शांतपणें त्यांच्या सूचना लक्षांत घेऊन योग्य ते फेरफार प्रवेशांतून तरी करावेत किंवा योग्य ती सल्लामसलत त्यांना देऊन त्यांची समजूत पाडावी. त्या वेळचीं त्यांचीं प्रश्नोत्तरें मला ऐकावयास मिळत. त्यांवरूनहि तात्यासाहेबांचा शांत स्वभाव, रेखीव कल्पना व कामाचा उरक यांचा प्रत्यय येत असे.

सन १९१५ सालीं दत्तोपंत लिमये वारले. तेव्हांपासून केसरी कार्यालयांत सकाळीं तास दोन तास जाण्याचा माझा जो परिपाठ असे तो बंद पडला. त्यानंतर तात्यासाहेबांच्याकडे निव्वळ लेखक म्हणून मी लिहिण्यास जाई. तेवढाच माझा संबंध येई. पण पुढे १९१७–१८ च्या सुमारास राजकीय क्षेत्रांत निरनिराळ्या उलाढाली झाल्या, त्यांत त्यांना रात्रींहि निवांत वेळ मिळेनासा झाला व माझेंहि काम अशा रीतीनें सुटलें तें कायमचेंच सुटलें. यापुढें केवळ मी कार्यपरत्वें मात्र त्यांच्याकडे जात-येत असे; पण आमचा नित्याचा आणि नियमित असा संबंध सुटला.

(५) फलज्योतिष शास्त्राचा माझा व्यासंग असून पुण्यांतील अनेक फलज्योतिष व गणित ज्योतिष संस्थांचा मी कार्यवाह आहें, ही गोष्ट तात्यासाहेबांना अवगत होती. आमच्या भेटींत जेव्हां ज्योतिषासंबंधानें गोष्ट निघे त्या वेळीं अनेकदां ते मला म्हणत कीं, " हरीप, ज्योतिषशास्त्राचा तडकाफडकी प्रत्यय दाखविण्यास लढाईचे प्रसंग, माझ्या मतें फार उपयोगी; कारण त्यांत नित्य उलाढाली होत असल्यानें ग्रहादिमान पाहून ठळक ठळक गोष्टींचें अचूक भविष्य तुम्हां लोकांना आधीं कां वर्तवितां येऊं नये ?" तात्यासाहेबांचा हा प्रश्न सर्वसाधारण माणसें विचारतील असाच असे; पण या सोप्या दिसणाऱ्या प्रश्नाचें उत्तर भविष्य सांगून पडताळा घालून देणें किती अवघड व कठीण काम आहे हें तज्ज्ञाशिवाय मुळींच समजणारें नाहीं. त्याची सांगोपांग चर्चा करणें अगर स्पष्टीकरण करण्याचें हें स्थळहि नव्हे व प्रसंगहि नव्हे. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, कोणातरी ज्योतिषाकडून आपल्या शंकेस बिनचूक उत्तर मिळावें ही त्यांची मनापासूनची इच्छा होती. सुदैवानें असा एक बिनतोड व सोळा आणे उत्तर मिळण्याचा प्रसंग आला. खुद्द तात्यासाहेबांचे थोरले चिरंजीव बापूराव केळकर यांनीं हिटलरच्या मृत्यूचें भविष्य आधीं वर्तवून छापून प्रसिद्ध केलें होतें व तें शेंभर टक्के बरोबर उतरलें. त्याची सविस्तर माहिती ताजी असल्यानें पुनः सांगण्याची जरूरी नाहीं; पण अशा रीतीनें तात्यासाहेबांस अखेर घरच्याघरींच अचूक व निश्चित भविष्यवादी भेटला व त्यानें परस्पर उत्तर दिलें !

(६) पुण्यांत शिक्षणविषयक अनेक संस्था जरी असल्या तरी ज्योतिर्गणितविषयक संस्था नाहीं, ही उणीव येथील अनेक विद्वानांना भासत होती. श्री. तात्यासाहेब करंदीकर, प्रिन्सिपॉल केशवराव कानिटकर, प्रो. मो. ल. चंद्रात्रेय, प्रा. सखारामपंत आपटे, श्री. बाबासाहेब पटवर्धन, पं. रघुनाथशास्त्री इत्यादि विद्वानांनीं विचारविनिमय करून " ज्योतिर्विद्या-परिसंस्था " नांवाची केवळ गणितविषयक संस्था स्थापन करण्याचें ठरलें व एक विनंति-पत्रक तयार करण्यांत आलें. त्या विनंति-पत्रकावर जेव्हां मी तात्यासाहेब केळकर यांच्याकडे सही मागण्यास गेलों तेव्हां त्यांनीं पाहिल्यानें तपशिलवार माहिती व जरूर ती विचारपूस केली व त्या वेळीं त्यांना अत्यंत समाधान वाटल्याचें माझ्या निदर्शनास आलें. कारण त्याच वेळीं त्यांनीं संस्थेबद्दल कळकळीनें अनेक उपयुक्त सूचना केल्या व संस्थेकरितां देणग्या किंवा वर्गणी रूपानें फंड कसा उभारावा इत्यादि सल्ला दिला व नंतर पत्रकावर खुषीनें स्वाक्षरी केली. लोकोपयुक्त कोणतीहि गोष्ट अगर कोणतेंहि सत्कार्य असो तें हातीं घेण्यास तात्यासाहेबांचें पाऊल सदैव पुढें असें.

(७) "सह्याद्रि" मासिकांत ज्योतिर्विद्या परिसंस्थेचें इतिवृत्त देण्याबद्दल त्यांनीं आपण होऊन माझ्यामागें तगादा लावला होता व मजकडून लेख येतांक्षणींच

तो आवडीनें छापण्याची व्यवस्था केली. तसेंच आमच्या संस्थेचे एक प्रमुख सभासद श्री. आनकचंद्र यांचें "वेदांतील कांहीं गोष्टींचा ज्योतिष्यक दृष्टया विचार" या विषयावर फर्ग्युसन कॉलेजमध्यें उपरिदर्शाच्या (एपिस्कोपच्या) साहाय्यानें व्याख्यान झालें. त्या वेळीं तात्यासाहेब केळकर मी येणार आहें असें आधीं कळवून उपस्थित राहिले. त्यांना हें व्याख्यान इतकें आवडलें कीं, त्यांनीं त्या व्याख्यानाचा अनुवाद आपल्या "सह्याद्रि" मासिकाच्या एप्रिल १९४६ च्या अंकांत स्वहस्तें केला.

(८) आमच्या संस्थेच्या स्मरणांत कायमची राहील अशी तात्यासाहेबांच्या आठवणीची एक दुर्दैवी घटना सांगावयाची आहे. त्यांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशीं आमच्या ज्योतिर्विद्या परिसंस्थेची एक छोटी सभा झाली, व तींत असें ठरलें कीं, एका प्रश्नावर अधिकारयुक्त वाणीचा सल्ला घेण्याकरितां मी, मो. ल. चंद्रात्रेय व प्रो. गं. चिं. परांजपे यांनीं दुसऱ्या दिवशीं दुपारीं ४ च्या सुमारास तात्यासाहेबांच्या घरीं जाऊन त्यांची गांठ घ्यावी व त्यांना सल्ला विचारावा. योगायोग असा चमत्कारिक आला कीं, नेमक्या त्याच वेळीं त्यांच्या बंगल्यावर त्यांच्या शवाचें अंत्यदर्शन घडलें! त्या वेळीं आम्हां सर्वांना ज्या मृतप्राय वेदना झाल्या त्यांचें वर्णन करणें दुस्तर आहे.

(९) तात्यासाहेबांच्याकडे गेल्यावर त्यांना "प्रकृति कशी काय आहे?" असें मी सहजच पण नित्य विचारीत असें व तेहि "बरी आहे" म्हणून उत्तर देत. त्यांच्या निकोप व सुदृढ प्रकृतीबद्दल कोणालाहि हेवा वाटावा अशीच ती होती. त्यांना शेवटपर्यंत जिवावरचा आजार असा झालेला माझ्या पाहण्यांत नाहीं. साऱ्या आयुष्यांत चार-दोन वेळा ते आजारी असतांल तेवढेंच. एरवी मोठें दुखणें-बहाणें त्यांना अजिबात ठाऊक नाहीं. एके दिवशीं आमचें यासंबंधानें सहज बोलणें झालें. मीं त्यांना त्यावेळीं विचारलें कीं, चारचौघांपेक्षां तुमची प्रकृति, स्वभावाची प्रसन्नता व शरीरयष्टि केव्हांहि पाहिली तरी एकसारखी दिसते, यांतील इंगित काय! त्यांनीं उत्तर असें दिलें कीं, "हरीप, तुम्ही तर ज्योतिषी आहांत, तुम्हांला याचें उत्तर आधीं ठाऊक पाहिजे," इत्यादि बोलून ते म्हणाले, "कुंडलींत ग्रहांचा योग काय आहे तें मला माहीत नाही किंवा त्याकडे मीं कधींहि लक्ष दिलें नाहीं; पण आरोग्याकरितां कोणताहि व्यायाम मुद्दाम असा मीं केव्हांच घेतला नाहीं किंवा करीताहि नाहीं. कामापुरते जे श्रम पडतात तेवढेच. बाकी एरवी प्रकृतीकरितां खास अशी माझी योजना नसते किंवा यम-नियमांचें बंधन मीं पाळीत नाहीं." पुढें ते म्हणाले, "प्रकृति सुदृढ लाभणें ही गोष्ट दैवाधीन आहे पण ती तशी टिकविणें मात्र मनुष्याधीन आहे."

❁

कै. शंकर गणेश लवाटे

(बी. ए., माजी सहसंपादक केसरी; माजी चिटणीस, पुणें सार्वजनिक सभा)

(१) लोकमान्य मंडालेला होते. 'काळा'चे संपादक शिवरामपंत परांजपे हेहि तुरुंगांत असून त्यांचें पत्र बाबासाहेब सोमण चालवीत होते. त्या वेळीं गणेशोत्सवांत मीं एक व्याख्यान दिलें, तें 'काळांत' छापलें गेलें. तें त्या वेळच्या अधिकाऱ्यांना न पटून त्यांनीं मला नोटीस काढली, व राजद्रोहाचा खटला कां करूं नये अशी विचारणा झाली. माझे मुख्य सल्लागार तेव्हां तात्यासाहेब होते. हरिभाऊ आपटे यांनींहि त्या कामांत मन घातलें; व माझें छापलेलें भाषण सीताराम पंत दीक्षित सॉलीसिटर यांच्या मार्फत फेरोजशहा मेथांकडून पाहवून आणविलें. सरकारला वाटेल तो लेख राजद्रोही ठरवितां येतो अशी स्थिति आहे असा अभिप्राय आला. त्या काळीं एकदां राजद्रोही ठरलें म्हणजे त्या मनुष्यास पुनः डोकें वर काढण्याची मुळींच सोय नव्हती. लोकमान्यासारख्या अलौकिक पुरुषाची गोष्ट वेगळी होती. मी तेव्हां सार्वजनिक सभेचा असिस्टंट सेक्रेटरी होतों. तात्यासाहेब मुख्य चिटणीस होते. सार्वजनिक सभेचे त्या वेळचे इतर नेते, अण्णासाहेब पटवर्धन, कृष्णाजीपंत खाडिलकर, वासुदेवराव जोशी या सर्वांची माझ्याविषयीं सहानुभूति होती. परंतु सभेला भानगडींत पाडावयाची नाहीं असें ठरवून त्यांनीं माझ्या भाषणाचा सार्वजनिक सभेच्या माझ्या नोकरपेशाशीं कांहीं संबंध नाहीं असा ठराव केला. त्याच वेळेस बडोद्यास साहित्य संमेलन होतें, तिकडे सगळी मंडळी निघून गेली. तात्यासाहेबांनाहि जावयाचें होतें; पण ते माझ्यासाठीं अगदीं शेवटीं गेले. सरकारास ताड द्यावयाचें कां त्याची माफी मागावयास तयार व्हावयाचें यांतलें कोणतें करावें असा प्रश्न होता. तात्यासाहेब मीं कोणतेंहि केलें तरी त्याला अत्यंत समाधानानें समति देण्यास तयार होते; व तसें मला सांगून ते बडोद्यास गेले. मागें, माझ्यावर स्नेह करणारे लक्ष्मणराव गोखले वकीलप्रभृतींच्या विद्यमानें मी कलेक्टरसाहेबांपुढें हजर झालों. अेक वर्षभर मद्यपाननिषेधाशिवाय दुसऱ्या कोणत्याच राजकीय विषयावर मीं व्याख्यान देणार नाहीं एवढेंच त्यांनीं मजपासून लिहून घेऊन माझा खटला निकालांत काढला, माफी वगैरे कांहीं मागावयास लाविलें नाहीं. 'नेमस्तां'चा आश्रय घेऊन मीं हें कृत्य केलें असें झालें! मंडळी बडोद्याहून परत आली. तात्यासाहेबहि आले. मी नारायण पेठेच्या गुत्त्यापाशीं पिकेटिंग करीत होतों तेथें ते मला भेटले, व सर्व मंडळी तुमच्यावर फार खवळली आहेत व कदाचित् मला सार्वजनिक सभेची नोकरीहि सोडावी लागेल, असें त्यांनीं मला सांगितलें. पण त्याबरोबर हेंहि सांगून ठेवलें कीं, जर मला सभेची नोकरी सोडावी लागली तर त्याबरोबर आपणहि आपल्या मुख्य चिटणीसाच्या जागेचा राजीनामा देऊं. परंतु इतर पुढारी मंडळींचा राग तितक्या पल्ल्यापर्यंत गेला नाहीं व सर्वच जागच्या-

जागीं शांत झालें. तात्यासाहेबांच्या या वेळच्या प्रेमाचा मला कधींहि विसर पडणें शक्य नाहीं.

(२) १९१२-१३ सालची गोष्ट असावी. मी म्युनिसिपल निवडणुकीकरितां उभा राहिलों; तात्यासाहेबहि एक उमेदवार होते. मतदारांना विनंतिपत्रें पाठविण्याचा खर्च मला पडूं नये म्हणून तात्यासाहेबांचें व माझें असें एकच जोडसहीचें विनंतिपत्र काढलें. निवडणुकीचा दिवस आला. तेव्हां मत देण्याची पद्धति उघडी होती; कोणाला किती मतें पडलीं हें ताबडतोब कळे. आम्ही दोघे उमेदवार एकाच पक्षाचे, त्यामुळें मतें वांटलीं जाऊं लागलीं; त्यामुळें कदाचित् दोघेहि पडूं असें भासावयास लागलें. ही गोष्ट,त्या वेळचे चाणाक्ष चीफ ऑफिसर रा. ब. कुमठेकर यांच्या नजरेस प्रथम आली; व त्यांनीं ती आपली शंका तात्यासाहेबांना सांगितली. तेव्हां तात्यासाहेब मला म्हणाले, 'का शंकरराव, आतां कसें काय करावयाचें!' त्याबरोबर मी चटदिशीं उत्तर दिलें, 'केसरीचा मान राहिला पाहिजे; हा मी मागें सरलों.' इतकें सांगून मी आपली उमेदवारी लगेच परत घेतली. पिकेटिंगच्या ताजेपणामुळें मी लोकांना कांहींसा प्रिय होतों; तेव्हां मी नांव परत घेतल्यामुळें मतदारांपैकीं कांहींना बरें वाटलें नाहीं. मी मागें सरल्यामुळें माझी अडचण तात्यासाहेबांस उरली नाहीं; ते सर्व उमेदवारांत पहिले आले. निवडणुकीचा निकाल लागल्याबरोबर तात्यासाहेबांनीं मला सांगितलें कीं, 'शंकरराव, पुढील निवडणूक तुमची; मी तिला उभा रहावयाचा नाहीं; व या तीन वर्षांत म्युनिसिपालिटींत काय व्हावें अशी तुमची इच्छा असेल तें मला सांगा.' त्याप्रमाणें तीन वर्षें लोटलीं व नवी निवडणूक आली. तात्यासाहेब उभे राहिले नाहींत व मतदारांकडे स्वतः जातीनें हिंडून सर्व प्रचार केवळ माझ्याकरितां केला. निवडणुकींत मी पहिला आलों. हें त्यांचें प्रेमाचें व सरळ वर्तन मी कधीं कसा विसरेन!

(३) १९२४-२५ साल असेल. मी तेव्हां लोकसंग्रह नांवाचें दैनिक चालवीत होतों. त्यांत माझ्या शक्तीच्या बाहेर बुडालों. कर्ज फार झालें. जवळ तारण कांहीं नाहीं. केसरींत मागें मी कामावर असतांना माझी एक हजार रुपयांची पॉलिसी उतरलेली होती व शिवाय १८९७ सालीं मी सन् लाइफ इन्शुअरन्स कंपनीची एक कूपन-पॉलिसी उतरली होती. अशा माझ्याजवळ दोन पॉलिस्या होत्या. त्या जेव्हां पक्व होतील तेव्हां अडीच हजार रुपये मिळावयाचे; पण वरील प्रसंगीं त्यांची किंमत अगदींच थोडी उगवण्यासारखी होती. दोन्ही पॉलिस्या घेऊन कोणी फार झालें तर ५००-६०० रुपये देतील अशी स्थिति होती; पण त्यानें माझें कर्जाचें भगदाड अंशतः देखील भरणें शक्य नव्हतें. तेव्हां मी तात्यासाहेबांना गांठलें; त्यांना हकीकत निवेदन केली. त्यांनीं उदार मन करून,

त्या दोन पॉलिस्यांवर केसरीतून मला पंधराशे रुपये देववितले; हे त्यांचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही.

(४) १९२२ सालची गोष्ट असेल. माझ्या मुलीचें लग्न निघालें. आमच्याजवळ पैशाचा खणखणाट ! सर्व पुढाकार माझे परमपूज्य परममित्र सदाशिवराव बापट यांनी घेतला; पण ते तरी एकटे काय करणार ? तेव्हां केसरीचा मी ऋणानुबंधी म्हणून मदतीदाखल तात्यासाहेब यांच्याकडून शंभर रुपये मुलीच्या लग्नाप्रीत्यर्थ मजकडे रवाना झाले ! इतकें तात्यासाहेबांचें निर्व्याज प्रेम मी भोगीत होतों; परमेश्वर त्यांना सद्गति देवो !

❋

रामचंद्र विनायक पटवर्धन

(सर्कस मॅनेजर, सांगली)

(१) साहित्यसम्राट् कै. तात्यासाहेब केळकर यांचा व माझा प्रथम परिचय ते कोल्हापुरास सन १८८९ सालीं राजाराम कॉलेजमध्यें उच्च शिक्षण घेण्यासाठीं आले तेव्हां झाला. त्या वेळीं राजारामियन मंडळींचा जेवणाचा एक क्लब होता. त्यांत ते सभासद म्हणून दाखल झाले. या क्लबांत त्या वेळीं मी एक सर्वांत लहान सभासद होतों. या गोष्टीचा उल्लेख कै. तात्यासाहेबांनीं आपल्या 'गतगोष्टी' नामक पुस्तकांत केलाच आहे. तात्यासाहेबांच्या डोक्यावर त्या वेळीं सर्वांचें विशेष लक्ष जाईल असा भला मोठा शेंडीचा झुबका होता. त्याची सर्व सभासद अतोनात थट्टा करीत असल्याचें मला पक्कें आठवतें. परंतु तात्यासाहेबांचा स्वभाव जात्या प्रेमळ, मनमिळाऊ व सोशीक असल्यानें ही सर्व थट्टा ते न रागावतां शांतपणानें सहन करीत असत. पुढें राजकारणांत पडल्यावर त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांकडून वेळीं-अवेळीं होणाऱ्या टीकेला धैर्यानें तोंड देऊन आपल्या समतोल व कुशल विचारसरणीनें टीकाकारांचा खरपूस समाचार ते घेत असत, हें त्यांचे लेख वाचणाऱ्यांच्या प्रत्ययाला आलेंच आहे. उच्च शिक्षण पुरें झाल्यावर कै. तात्यासाहेब केसरी-मराठा संस्थेंत दाखल झाले व मी देवल सर्कशींत शिरलों. तथापि त्यांचा व माझा परिचय त्यांच्या अंतकालापर्यंत कायम टिकला. केसरी संस्थेंत काम करीत असतांना एकदां सर्कशींत राहून कांहीं दिवस देशपर्यटन करावें, अशी इच्छा त्यांना झाली व त्यांनीं मला तसें पत्र लिहिलें. लगेच मी 'अवश्य या' असें उत्तर घातलें. परंतु माझें पत्र पोंचण्याला व त्यांच्यावर केसरीची विशेष जबाबदारी आकस्मिक येऊन पडण्याला एकच गांठ पडल्यामुळें त्यांना आपला देशपर्यटनाचा बेत रहित करावा लागला. आम्ही एकमेकांपासून दूर होतों तरी मधून मधून होणाऱ्या पत्रव्यवहारानें आमचा स्नेह जागृत रहात असे. मी सर्कशीच्या धंद्यांत शिरलों म्हणून त्यांनीं मला कधीं कमी लेखलें नाहीं.

उलट सर्कशीसारख्या विकट धंद्यानें नेतृत्व पत्करून तें यशस्वी करून दाखविल्याबद्दल ते माझें नेहमीं कौतुकच करीत असत. याचें प्रत्यंतर त्यांनी मला लिहिलेल्या एका पत्रांतील वाक्यावरून कळून आलें. तें वाक्य असें:– "You are a lucky chap and a plucky manager." सर्कशीच्या धंद्यावर विशेषतः देवल सर्कशीवर त्यांचा फार लोभ होता. जेव्हां जेव्हां मी त्यांना 'सर्कस पहावयास येण्याबद्दल निमंत्रण करी तेव्हां तेव्हां त्यांचा आदरपूर्वक स्वीकार करून ते सर्कशीला भेट देत असत. एकदां तर देवल सर्कस खडकीस असतांना कै. तात्यासाहेबांच्या मनांत सर्कशीला जावें असें आलें. ते आपली मोटार घेऊन मी उतरलों होतों तेथें म्हणजे कै. डॉ. गोपाळराव पळसुले यांच्या घरीं आले व मला खडकीला सर्कस बघावयास जाऊं या असें म्हणाले. मी लगेच कपडे घालून निघालों व मजबरोबर डॉ. पळसुलेहि आले. खडकीस जातांना वाटेंत बुधवारांत मोटार थांबवून मी एक पुष्पहार व गुच्छ विकत घेऊन निघालों. त्या वेळीं तात्यासाहेब म्हणाले, 'हा पुष्पहार कोणासाठीं?' मी म्हटलें, 'तुमच्यासाठी'. त्यावर ते बोलले कीं, "मी आज बोलावण्यावांचून सर्कशीला जात आहें; तेव्हां माझा सत्कार करणें उचित नाहीं.' त्यावर मी म्हणालों कीं, 'तात्यासाहेब, आपल्यासारखे थोर देशभक्त व पुढारी आमच्या सर्कशीला अनाहूत येतात तेव्हां अशा प्रसंगीं आम्हीं आपलें स्वागत अधिक आदरानें व आनंदानें केलें पाहिजे.' या उत्तरानें तात्यासाहेबांचें समाधान कसें होणार! खडकीस आम्ही तंबूत शिरतांच तात्यासाहेबांना अचानक आलेले पाहून प्रो. विनायकराव देवलांना अतिशय आनंद झाला व त्यांनीं तात्यासाहेबांचें यथोचित स्वागत केलें. तात्यासाहेबांचा स्वभाव जात्या विनोदी असल्यामुळें सर्कशीतील विदूषकांच्या नकला पाहून त्यांना मोठी मौज वाटे. खेळ संपण्यापूर्वी दोन शब्द बोलण्याविषयीं तात्यासाहेबांना मी विनंती केल्यावरून ते बोलावयास उठले. त्यांनीं पहिल्या वाक्यांतच सांगितलें कीं, 'देवल सर्कशीला येणें म्हणजे आपल्या घरीं आल्यासारखें मला वाटतें.' या एका वाक्यावरूनच देवल सर्कसबद्दल त्यांना किती आपुलकी वाटत होती हें कळून येईल. मला ते नेहमीं 'अरे रामभाऊ' या नांवानें संबोधीत असत. एकदां भेटीच्या वेळीं ते मला विनोदानें म्हणाले, 'अरे रामभाऊ, तूं आतां सर्कसचा मॅनेजर म्हणून प्रसिद्धीस आलास; तेव्हां मी तुला अरे म्हणतों याबद्दल तुला राग येत नाहींना?' हें वाक्य ऐकून मी सद्गदित अन्तःकरणानें म्हटलें कीं, 'तात्यासाहेब, मला राग तर येत नाहींच; पण मला आपण आपल्या कुटुंबीयांपैकीं एक मानून प्रेम करतां याबद्दल उलट सानंद अभिमानच वाटतो.'

(२) कै. तात्यासाहेबांना आपल्या भाषणांत नेहमीं विनोद करण्याची हौस असे. देवल सर्कसचा मुक्काम पुण्यास असतांना हिंदुमहासभेच्या मंदती-

प्रीत्यर्थ एक खेळ करण्यांत आला. तो खेळ कळंब साखर कारखान्याचे चालक शेठ गुलाबचंद यांच्या अध्यक्षतेखाली झाला. ह्या खेळास स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर, दे. भ. अण्णासाहेब भोपटकर, कै. तात्यासाहेब केळकर वगैरे बडी बडी मंडळी उपस्थित होती. त्या दिवसाच्या कार्यक्रमांत तात्यासाहेबांचें भाषण ठेवलें नव्हतें. तथापि माझ्या आग्रहाच्या विनंतीवरून त्यांनीं भाषण केलें, पण तें सर्वांच्या शेवटीं केलें. अध्यक्ष शेठ गुलाबचंद हें भाषण करतांना बरेच अडखळले व सर्कसच्या वर्तुळांत भाषण करावयास येतांना तात्यासाहेबांच्या पायांतील जोडा निसटला. या गोष्टीचा फायदा घेऊन तात्यासाहेबांनीं आपल्या भाषणांत सहज विनोद केला. ते म्हणाले, "देवल सर्कशींतील सिंहव्याघ्रादि हिंस्र पशूंनी आतांच केलेलीं कामें पाहून आम्ही इतके आश्चर्यचकित झालों कीं, शेठ गुलाबचंद यांची जीभ भाषण करतांना एकसारखी अडखळली व माझ्या पायांतील जोडा वर्तुळांत येतांना निसटून पडला!" हें वाक्य ऐकतांच प्रेक्षकांत एकदम मोठा हंशा पिकला.

(३) कै. तात्यासाहेब हे दिलेलें वचन पाळण्यांत अत्यंत दक्ष असत. तात्यासाहेब एकदां मिरजेस आल्याचें समजल्यावरून मी व कै. वैद्य गोविंदरावजी बिनीवाले असे मिळून त्यांना भेटण्यासाठीं सांगलीहून मिरजेस गेलों. भेटींत बऱ्याच गप्पा झाल्यानंतर सांगलीस येऊन एक व्याख्यान देण्याविषयीं आम्ही त्यांना विनंति केली. ती त्यांनीं प्रथम नाकारली; पण आमचा सत्याग्रह पाहून शेवटीं त्यांनीं ती मान्य केली. त्यांचा निरोप घेऊन निघतांना ते मला म्हणाले कीं, उद्या सांगलीस मी तुझ्याच घरीं उतरेन; तें ऐकून मला मोठा आनंद झाला व सांगलीस परत आल्यावर त्यांच्या स्वागताची सर्व तयारी मी करून ठेवली. कै. तात्यासाहेब केळकर सांगलीस येणार ही बातमी सांगलीचे विद्वान् व सुप्रसिद्ध वकील क. केशवरावजी छापखाने यांना कळतांच त्यांनीं तात्यासाहेबांची उतरण्याची व भोजनाची सर्व कडेकोट तयारी मला न कळवितां करून ठेवली होती. तात्यासाहेबांच्या स्वागतार्थ कै. छापखाने हे सांगली स्टेशनवर आपला टांगा घेऊन आले होते. स्टेशनवर उतरल्यावर बोलत बोलत आम्ही सर्वजण स्टेशनच्या बाहेर आलों. छापखाने यांनीं केळकरांना आपल्या टांग्यांत बसण्याविषयीं विनंति केल्यावरून ते टांग्यांत बसले. पण लगेच त्यांना मला दिलेल्या वचनाचें स्मरण होऊन ते टांग्यांतून खालीं उतरले व छापखान्यांना म्हणाले कीं, "मी रामभाऊंच्या घरीं उतरण्याचें वचन दिलें असल्यानें मी आतां तुमच्या घरीं येऊं शकत नाहीं, माफ करा.' छापखान्यांनीं आग्रहाची शिकस्त केली; पण त्या आग्रहाला बळी न पडतां तात्यासाहेब माझ्या घरींच आले व माझा पाहुणचार आनंदानें स्वीकारून संध्याकाळीं व्याख्यानानंतर छापखान्यांच्या घरीं भोजन करून पुढें पुण्यास रवाना झाले. तसेंच दुसऱ्या एका प्रसंगीं सांगलीस आल्यावेळीं तासगांवच्या पाटीलकुलकर्ण्यांची सर्कस सांगलीस

खेळ करीत होती. अर्थात् तात्यासाहेबांसारख्या थोर देशभक्ताचे पाय आपल्या सर्कशीला लागावे या बुद्धीनें सर्कसच्या मालकांनीं तात्यासाहेबांना निमंत्रण केले. तात्यासाहेबांनीं सर्कशीला जाण्याचें कबूल केलें. त्या दिवशीं रात्रीं खासगी बैठकींत महत्त्वाच्या विषयांवर चर्चा चालू होती. त्यामुळें सर्कशीला जाण्याचें तात्यासाहेबांना विस्मरण झालें. सर्कसच्या मालकांनीं बराच वेळ वाट पाहिली व तात्यासाहेब येत नाहींत असें समजून ते मजकडे आले. लगेच मी बैठकीच्या जागीं जाऊन श्री. अंतुकाका फडणीस यांना बोलावून तात्यासाहेबांना निरोप कळविला. त्याबरोबर तात्यासाहेबांना दिलेल्या वचनाची आठवण होऊन चर्चा ऐन रंगांत आली असतांना ती तशीच थांबवून ते चटकन उठून सर्कशीकडे गेले व तेथें थोडा वेळ बसून परत आले. सर्कसच्या मालकांनीं तात्यासाहेबांचा यथोचित गौरव केला, या गोष्टीवरून कै. तात्यासाहेब हे आपल्या शब्दाला किती तत्परतेनें जागत असत हें कळून येण्यासारखें आहे.

(४) स्वतः ग्रंथ लिहिणें व दुसऱ्याकडून लिहून घेणें याची कै. तात्यासाहेबांना मनापासून फार आवड असे. त्यांच्याकडे केव्हांहि गेलें तरी तें वाचनांत व लेखनांत निमग्न असलेले आढळून येत. सर्कशीच्या धंद्यावर मी एखादें पुस्तक लिहावें अशी तात्यासाहेबांची फार इच्छा होती, व त्या कामीं सर्व प्रकारचें साहाय्य करण्याचें आश्वासन त्यांनीं मला अत्यंत आपुलकीनें दिलें होतें. ज्या ज्या वेळीं त्यांची व माझी भेट होई त्या त्या वेळीं त्यांनीं मला अत्यंत कळकळीनें पुस्तक लिहिण्यासंबंधीं आठवण करावी. ते नेहमीं म्हणत कीं, सर्कससारख्या अगदीं नव्या विषयावर पुस्तक प्रसिद्ध केल्यास मराठी वाङ्मयांत एका नवीन व उपयुक्त ग्रंथाची भर पडणार आहे, परंतु हें काम तात्यासाहेबांच्या हयातींत माझ्या हातून झालें नाहीं याबद्दल मला मोठा खेद वाटतो. सर्कशीवरील ग्रंथांत कोणकोणते मुद्दे प्रतिपादिले जावे याचें एक विस्तृत टिपणहि तात्यासाहेबांनीं मला करून दिलें होतें. यावरून प्रत्येकानें आपापल्या आवडत्या विषयावर पुस्तक लिहावें याबद्दल तात्यासाहेबांना किती तळमळ वाटत होती हें कळून येईल.

(५) पुण्याच्या 'शिवाजी मंदिरा'च्या मदतीसाठीं १९२३ सालीं देवल सर्कशीनें मुंबईच्या आपल्या मुक्कामांत एक खेळ दिला. त्याप्रसंगीं भाषण करतांना तात्यासाहेब बोलले कीं, 'शिवाजी मंदिर पुण्यांत व त्याच्या मदतीचा खेळ मुंबईत होतो ही गोष्ट सकृद्दर्शनीं चमत्कारिक वाटेल; परंतु घार जशी आपल्या घरट्यापासून व पिलांपासून आकाशांत कितीही दूर फिरत असली तरी तिचें सर्व लक्ष आपल्या घरट्याकडे व पिलांकडे असतें, तद्वत् प्रो. देवल यांचें प्रेम पुण्याच्या शिवाजी मंदिराकडे असल्यामुळें त्यांनीं मुंबईत खेळ दिला हें योग्यच झालें.'

गणेश वासुदेव मावळंकर

(बी. ए., एल्एल्. बी., अध्यक्ष, सेन्ट्रल असेंब्ली, दिल्ली)

(१) साहित्यसम्राट् कै. तात्यासाहेब केळकर म्हणजे स्वर्गस्थ लोकमान्य टिळकांचा उजवा हात, महाराष्ट्राचे नामवंत पुढारी, प्रसिद्ध साहित्यिक, केसरी व मराठा पत्राचे संपादक, या नांवलौकिकामुळें कै. तात्यासाहेबांची माहिती १९०५ मध्यें मी कॉलेजांत दाखल झालों तेव्हांपासून मला चांगलीच झालेली होती. त्यांच्याविषयीं प्रेम व आदर वाटत असे; परंतु निकट दर्शनाचा व परिचयाचा योग मात्र १९१६ मध्येंच आला.

१९०७ सालीं सुरतेस देशनेत्यांचे भिन्न भिन्न विचारप्रवाह वेगळे पडून कॉंग्रेसमध्यें दुफळी झाली व या दुफळीचा फायदा घेऊन सरकारनें दडपशाहीचें सत्र सुरू केलें व त्यांत कै. लोकमान्य वगैरे थोर लोकनेत्यांच्या आहुति सरकारच्या दडपशाहीसत्रानें घेतल्या. त्या कठीण काळांत कै. तात्यासाहेबांनीं जें धैर्य, समतोलपणा व चातुर्य दाखवून लोकमान्यांच्या ध्येयाची ज्योत महाराष्ट्रांत व एक प्रकारें सर्व हिंदुस्थानांत तळपत ठेविली त्याबद्दल वाटणारा आदर व प्रेम कोणत्या तऱ्हेनें व्यक्त करावा ! त्यांच्या त्यावेळच्या अपूर्व कामगिरीची कल्पना, तो काळ ज्यांनीं पाहिला नाहीं त्यांस येणार नाहीं. त्या पिढींतील पुढाऱ्यांनीं जे प्रयत्न केले, त्याग केले, हाल-अपेष्टा भोगल्या, त्या सर्वांच्या पायावर कॉंग्रेसची पुढील प्रगति रचली गेली हीं गोष्ट विसरून चालणार नाहीं. असो.

(२) सुरतेची १९०७ ची दुफळी कांहीं काळ तशीच चालू राहिली व १९१६ पर्यंत मुंबईच्या राजकीय प्रांतिक परिषदा पण वेगवेगळ्या दोन होत होत्या. १९१६ सालची राष्ट्रीय पक्षातर्फे भरणारी प्रांतिक परिषद बेळगांव येथें झाली. त्या परिषदेच्या कामासाठीं कै. तात्यासाहेबांनीं त्यावेळीं गुजराथेंत दौरा काढला होता, त्यांच्याबरोबर बहुतकरून डॉ. मुंजे असावेत असें वाटतें; पण नक्की स्मरत नाहीं. तात्यासाहेब सुरतेस आले होते व तेथून ते अहमदाबादेस आले. त्यांचा मुक्काम सुमारें १॥ दिवस माझ्याघरीं होता. कै. तात्यासाहेबांच्या प्रत्यक्ष व निकट परिचयांत येण्याचा हा पहिला योग !

कै. तात्यासाहेबांचें विनम्र, साधें व स्वाश्रयी वर्तन पाहून आम्हां घरच्या सर्व मंडळींना फार आश्चर्य व कौतुक वाटलें. सर्व दृष्टींनीं एवढे थोर पुरुष, परंतु राहणी किती साधी व सोकळी ! मोठ्याशीं मोठे, लहानाशीं लहान, कोणालाहि त्यांच्याशीं कसें बोलूं असा संकोच वाढावयाचाच नाही. या त्यांच्या साधेपणाची व स्वाश्रयी वर्तनाची एका लहानशा गोष्टीनें कमाल वाटली. स्नान उरकल्यानंतर त्यांनीं आपले कपडे धुण्यास सुरवात केली. त्या वेळीं हल्लीच्याप्रमाणें नोकरचाकरांची

वाण नव्हती व सुदैवानें आमच्या घरीं गडी, शागीर्द वगैरे माणसें होतींच. कोणाहि पाहुण्यानें स्वतःचे कपडे स्वतः धुण्याचें कांहींच कारण नव्हतें. घरच्या मंडळीस धुवावे लागले तरीहि त्यांत वावगें नव्हतें. देशांतील थोर नेत्यांची सेवा करण्याची संधि क्वचितच मिळते व तशी सेवा करण्यांत एक प्रकारचा आनंदहि असतो. तरीपण आपल्यामुळें कोणासहि त्रास होऊं नये व जेथें जावें तेथें पुनः पुनः प्रेमानें मंडळींनी आपणास जवळ करावें, आपल्यासाठीं कोणास तसदी पडल्यामुळें आपला कोणी कंटाळा करूं नये, आपण नेहमीं स्वाश्रयी असावें अशा विचारसरणीमुळें कै. तात्यासाहेबांनीं आपले कपडे आपणच धुण्यास सुरवात केली असली पाहिजे.

अर्थात् त्यांनीं सुरुवात केलेली पाहिल्याबरोबर त्यांस मी तें काम करूं थोडेंच देणार होतों ? त्यांना तें न करण्याची विनंती करतांना, "आहेत माणसें तीं करतील" असें मी सांगितलें. तरी पण ते म्हणाले, "त्यांत काय हरकत आहे ? आतां काम नाहीं; वेळ आहे. माझें धोतर मी धुतलें तर काय अडचण आहे ?" अडचण काय आहे ती आम्हांस माहीत होती. आमच्या मनाची अडचण मोठी होती ! त्यांच्याविषयींच्या आमच्या मनांतील आदरामुळें त्यांनीं कपडे धुणें हें आम्हांला कसें खपणार ? ह्या एका लहानशा गोष्टीवरून कै. तात्यासाहेबांच्या अंगच्या अनेक गुणांचें व त्यांच्या विचारसरणीचें दर्शन होतें.

(३) त्यानंतर कै. तात्यासाहेबांना भेटण्याचे पुष्कळ प्रसंग आले. जेव्हां जेव्हां मी पुण्यास जाई तेव्हां तेव्हां त्यांस मी अवश्य भेटत असे. कै. तात्यासाहेबांना भेटणें म्हणजे त्यांच्याशीं चर्चा करण्यासाठीं किंवा बोलण्यासाठीं जाणें नव्हे, तर त्यांना नमस्कार करून त्यांच्याविषयीं वाटणारा आदर व्यक्त करण्यासाठीं. इंग्रजींत ज्याला Call करणें असें म्हणतात – तें करण्यासाठीं मी त्यांच्या घरीं जात असें. त्यांच्याकडे जाण्यांत पुष्कळच मनोरंजक व विविध अशी माहिती सहज बोलण्यांत मिळत असे, हाहि एक लाभ असे; पण तो आनुषंगिक.

(४) सन १९२४–२५ सालीं कै. तात्यासाहेब मध्यवर्ती विधिमंडळाचे सभासद असतांना माझे मित्र शेठ कस्तुरभाई लालभाई हेहि सभासद होते. कापडावरची जकात (Excise Duty) काढून टाकण्याचा ठराव त्यांनीं विधिमंडळामध्यें १९२४–२५ च्या बैठकींत आणला होता. त्या ठरावाच्या पुष्टयर्थ सरकारी दप्तरांतून माहिती गोळा करण्याच्या कामासाठीं व त्या माहितीची मांडणी कशी करावी तें ठरविण्याच्या कामीं शेठ कस्तुरभाईंना मदत करण्यासाठीं मी दिल्लीस सुमारें १०-१२ दिवस राहिलों होतों. त्या वेळीं मध्यवर्ती विधिमंडळांतील महाराष्ट्रीय मंडळी – कै. तात्यासाहेब, लोकनायक अणे, सरदार मुतालीक, श्री. बेळवी, नागपूरचे कै. अभ्यंकर वगैरे मंडळी दिल्लीस एका बंगल्यांत एकत्र रहात असत. तेव्हां त्यांच्याकडे

२-४ वेळां जाण्याचा व बोलण्या-भेटण्याचा मला योग आला होता. अनेक विषयांवर विस्तृत माहिती, विनोदप्रचुर बोलणें, भाषासौष्ठव व पावलोपावलीं दिसणारे त्यांचे गुण – साधेपणा, बहुश्रुतता, मार्मिकता – वगैरेमुळें त्यांच्याजवळ पुनः पुनः जावें व कांहीं वेळ त्यांच्यासंनिध घालवावा असें वाटे.

कै. तात्यासाहेबांनीं आपलें तारुण्य ज्या प्रकाराच्या राजकीय काळांत देशसेवेसाठीं अर्पण केलें, तो काळ एक प्रकारें धकाधकीचा होता. ती धकाधकी केवळ सरकारशींच होती असें नसून लोकशाहीची प्रगति करण्यासाठीं जुन्या पिढीच्या कार्यकर्त्यांशींहि कांहीं अंशीं धकाधकी करणें आवश्यक होतें. नव्या-जुन्यांचा झगडा हा नेहमींचाच आहे. परंतु त्या काळांत म्हणजे १८९०–९५ ते १९२५ पर्यंतच्या काळांत तो जास्त तीव्र होता. कै. तात्यासाहेबांची देशभक्ति किंवा कष्ट सोसण्याची तयारी कमी होती असें मला केव्हांहि वाटलें नाहीं. परंतु त्यांच्या स्वभावाची व मनाची ठेवण अशा प्रकारची होती कीं, पक्षाभिमान व त्यामुळें येणारा दृष्टीचा कलुषितपणा अगर संकुचितपणा त्यांच्यांत नव्हता. ते न्याय-निष्ठुर व समदृष्टि असत व कोणत्याहि प्रश्नाकडे पहाण्याची त्यांची दृष्टि समतोल-पणाची असे. त्यामुळेंच त्यांची भाषा मुद्देसूद व ठसकेदार असली तरीहि ती कटु प्रहार करूं शकत नव्हती.

१९३७ सालीं मी विधिमंडळाचा अध्यक्ष निवडला गेल्यानंतर कै. तात्या-साहेबांना भेटण्याचे प्रसंग कमी आले. कै. रावबहादूर ग. व्यं. जोशी यांच्या तैल-चित्राचा अनावरण-समारंभ भारत इतिहास संशोधक मंडळांत माझ्या हस्तें झाला. त्या वेळीं कै. तात्यासाहेब मंडळाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांनीं त्या वेळीं मनोरंजक जुन्या आठवणी सांगितल्या. त्यांच्या "गतगोष्टी" वाचण्याचा व त्यांचें लो. टिळकांचें चरित्र पुनः वाचण्याचा योग १९४२ च्या तुरुंगवासांत आला. त्यांच्या वर्तनांत "आधीं केलें मग सांगितलें" हें तत्त्व होतें याची मनोरंजक व उद्बोधक हकीकत श्री. कमलाबाईंच्या "स्मरणसांखळींत" सांपडते. साहि-त्याच्या सर्व प्रकारच्या क्षेत्रांत ते किती निमग्न होते याची जाणीव त्यांच्या वाङ्मयाचे १२ भाग प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून कोणासहि सहज होते.

❋

बाळ गंगाधर खेर

(बी. ए., एल्एल्. बी., पंतप्रधान, हलाखा मुंबई)

(१) मोठ्या लोकांच्या आठवणी लिहितांना त्यांतून परावर्तित होणारा मोठे-पणा स्वतःच्या अहंकाराला पोषक असतो असा एक आठवणी लिहिणाऱ्यांवर आक्षेप येतो. या कारणामुळें मी मोठ्यांच्या आठवणी लिहिण्यास फारसा उत्सुक नसतों.

परंतु लोकमान्य टिळकांच्या आणि आतां तात्यासाहेबांच्या आठवणी लिहिण्याच्या वेळीं श्री. बापटांचा प्रेमाचा अनिवार्य आग्रह नाकारणें अशक्यच झालें म्हणून चार ओळी लिहून पाठवीत आहे. तात्यासाहेबांच्या स्मृतीला एक पुष्पांजलि या दृष्टीनेंच त्यांजकडे पाहावें; नाहीं तर त्याजवरहि वादविवादाचें रण माजल्यास दुर्दैव! तात्यासाहेबांच्याच शब्दांत म्हणतों, "करायला जावें चांगल्या शुद्ध हेतूनें आणि व्हावें कांहीं तरी विपरीत, यापेक्षां तें न करणें बरें!"

(२) तात्यासाहेब केळकरांना मी प्रथम महाराष्ट्र प्रांतिक कमिटीच्या बैठकींत पाहिलें; परंतु त्यांचा व माझा परिचय लोकमान्यांच्या मृत्यूनंतर स्वराज्य पक्षाच्या संघटनेच्या प्रसंगी झाला. त्यावेळीं आमच्या मणिलाल आणि खेर सॉलिसिटर्स या फर्मचें ऑफिस ५३ मेडोज स्ट्रीट येथें होतें. परंतु ज्या इमारतींत तें होतें तीवर नवा नंबर ६५ असा घातलेला होता. जुना नंबर ५३ होता. एक दिवस तात्यासाहेब पत्ता शोधीत शोधीत आमच्या ऑफिसांत दाखल होऊन हुश्श करीत म्हणाले, "अहो, तुमच्या पत्रांत तुमचा पत्ता ५३ मेडोज स्ट्रीट असा छापतां, परंतु वास्तविक घरावर नंबर ६५ आहे. तुमचें ऑफिस शोधतांना दमलों बुवा!" मी म्हटलें, "पण, ५३ मेडोज स्ट्रीट, या पत्त्यावर पाठविलेलीं पत्रें बरोबर पोंचतात". त्यावर नेहमींच्या विनोदी पद्धतीनें ते उद्गारले, "अहो, पण मी पोस्टानें नाहीं आलों!" त्यांची माझी तेव्हां नुकतीच ओळख झालेली असल्यानें मला त्यांचा हा मनमोकळेपणा व विनोद हृदयंगम वाटला. कारण फार थोड्या हिंदी गृहस्थांत विशेषतः पोक्त वयाच्या हिंदी गृहस्थांत विनोदी वृत्ति आढळून येते. क्षणभंगुर संसारांत बिचारे पर्वताएवढ्या दुःखानें इतके दबून गेलेले असतात कीं, त्यांना "जवापाडें सुख" कधीं नजरेसच पडत नाहीं आणि सदा दुःखी-कष्टी जीवास विनोद कसा सुचणार! तात्यासाहेब या नियमाला मला अपवाद वाटले. विनोद, चित्त स्वस्थ असल्यावांचून सुचत नाहीं. दृढ विश्वासावांचून चित्ताला शांति प्राप्त होत नाहीं. हरिपंत पंडित वारले त्या वेळीं अगदीं शेवटच्या क्षणीं त्यांची मुद्रा शांत होती. ती पाहून कोणीतरी त्यांना विचारलें "कसें काय वाटतें?" तेवढ्या क्षीण अवस्थेतहि पांच बोटें जुळवून, नैवेद्य दाखवितांना करतात तशीं करून ते म्हणाले, "समारोप चालला आहे समारोप!" आतां आपल्या ध्यानांत येईल – स्थितप्रज्ञ टिळकांच्या अंतेवासी तात्यासाहेबांनीं श्लोक लिहून कां मृत्यूची तयारी करून तनु त्यागिली!

(३) इसवी सन १९२१ मध्यें लोकमान्यांची स्मृति टिकविण्यासाठी व त्यांचें कार्य चालू ठेवण्यासाठीं म्हणून केसरीच्या आकाराचें "लोकमान्य" दैनिक मुंबईत सुरूं करण्यांत आलें. त्याचे संपादक १९२३ पर्यंत श्री. काकासाहेब खाडिलकर होते. १९२३ मध्यें श्री. राममाऊ मंडलीक संपादक झाले. १९२४–२५ मध्यें स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमाचा जोरानें पुरस्कार करण्यासाठीं म्हणून मला

संपादक नेमण्यांत आलें. अर्थात् मी नांवाचाच संपादक होतों. श्री. मंडलीक व श्री. ओगले सर्व काम चालवीत. मी एखादे वेळीं लिही; परंतु रोज तास दोन तास येऊन देखरेख करण्याचा व मजकूर पाहण्याचा प्रयत्न करीत असे. मंडलीक हे जमदग्नीचे अवतार! तेव्हां उपसंपादकांत चकमक व्हावयाचीच. बहुतेक काम श्री. ओगलेच करीत. पर्वते, जोगळेकर वगैरे मंडळी स्टाफमध्यें होती. त्यावेळीं तात्यासाहेब, श्री. जयकर व श्री. भोपटकर ही मंडळी महाराष्ट्र स्वराज्य पक्षांत प्रामुख्यानें होती. त्यामुळें पक्षाच्या व "लोकमान्यां"च्या कार्याच्या निमित्तानें माझा तात्यासाहेबांशीं थोडासा संबंध आला. तीन महिन्यांची माझी एडिटरी संपल्यानंतर कांहीं दिवस पुण्याहून श्री. अण्णासाहेब भोपटकरांनीं एडिटरचें काम केलें. मग 'पेपर' आटोपला. या थोड्या काळांतहि तात्यासाहेबांचा मोठेपणा प्रतीत झाला.

(४) पुढें प्रतिसहकार वादाच्या निमित्तानें माझी आणि तात्यासाहेबांची काँग्रेस पक्षांत फारकत झाली. परंतु त्यांच्याविषयीं माझा आदर – स्नेहभाव म्हणा हवा तर – कमी झाला नाहीं. १९३७ मध्यें अधिकारस्वीकार केल्यानंतर पहिल्या प्रथम मीं केलेल्या गोष्टींत पुण्यांत तात्यासाहेबांच्या घरीं जाऊन त्यांच्या घेतलेल्या भेटीचा उल्लेख केला पाहिजे. त्यावेळी तात्यासाहेबांनीं माझ्याशीं अत्यंत मोकळेपणानें व कळकळीनें चर्चा केली, ती मला मोठी बोधप्रद वाटली.

(५) यानंतर अगदीं परवापरवाची आठवण म्हणजे १९४६ सालीं टिळक-पुण्यतिथीच्या वेळीं काँग्रेस व इतर सर्व पक्षांनीं एकमतानें पुण्यतिथि साजरी करावी अशी योजना ठरली. तींत तात्यासाहेबांनीं आनंदानें भाग घेण्याचें कबूल केलें होतें. माझ्याकडे पत्र लिहून त्यांनीं मला हें कळविलें, तेव्हां मीहि मोठ्या उत्साहानें त्यांच्या सहकार्याचें स्वागत केलें. पुढें (सर्वांस ठाऊक असलेल्या कारणांनीं) हा बेत फिसकटला! त्या वेळचीं त्यांचीं मला आलेलीं दोन पत्रें मजजवळ आहेत. हीं पत्रें त्यांच्या दिलदार आणि निष्कपटी स्वभावाची उत्कृष्ट साक्ष देतात. विनाकारण कोणाच्या भावना दुखावल्या जाऊं नयेत म्हणून आजवर कोणासहि न दाखविलेलीं हीं पत्रें, आतां त्यांत त्यांच्या स्वभावाचें प्रतिबिंब पडलेलें आहे म्हणून, प्रसिद्ध करण्यास हरकत नाहीं.

तात्यासाहेबांचीं दोन पत्रें

(१)

'पुष्करिणी', प्रभात,
पुणें ४.
दि. २५ जुलै १९४६.

रा. रा. बाळासाहेब खेर, पंतप्रधान, इलाखा मुंबई, यांसी सा. न. वि. वि.

रा. शंकरराव देव आज सकाळीं मला भेटले. भेटींत असें ठरलें कीं, ता. १

ऑगस्ट गुरुवारी सायंकाळीं साडेपांच वाजतां सर परशुरामभाऊ कॉलेजच्या मैदानावर लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीची सभा तुमच्या अध्यक्षतेखालीं भरावयाची. सभेचें निमंत्रण (१) टिळक-स्मारक-मंडळ (टिळक-स्वराज्य संघ), (२) पुणें शहर काँग्रेस कमिटी, (३) महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटी या तीन संस्थांच्या वतीनें द्यावयाचें. सभेंत इकडील वक्ते सर्व पक्षांचे मिळून सुमारें तीन-चार पूर्वनियोजित असेच बोलतील. आपल्या शिक्षण-परिषदेस आलेल्या परप्रांतीय पाहुण्यांपैकी कोणी प्रमुख व्यक्ति येणार किंवा बोलणार असतील तर तसें कळवावें. आपल्या मंत्रिमंडळांतील गृहस्थांनाहि आमच्याकरितां निमंत्रण देऊन आपण बरोबर आणावें. सभेची सर्व व्यवस्था व खर्च करण्याचें टिळक-स्मारक मंडळानें आपल्याकडे घेतलें आहे. आपण निमंत्रण स्वीकारलें याबद्दल आभार मानतों. कळावें.

(सही) न. चिं. केळकर

(२)

केसरी आणि मराठा कार्यालय,
५६८ नारायण पेठ, पुणें २.
दि. २९–७–४६

श्री

रा. रा. बाळासाहेब खेर, पंतप्रधान, यांस कृ. सा. न. वि. वि.

आपलें ता. २७ शनवारचें पत्र आज ता. २९ रोजीं आतां दोन प्रहरीं अडीच वाजतां मिळालें. पण त्यापूर्वीच ज्या प्रतिकूल घटना झाल्या त्यांचा परिणाम म्हणून मी पूर्वी आपल्या पत्रांत लिहिलेली योजना फुकट गेली!! मौज ही कीं, काल रात्रीं महात्मा गांधी यांनाहि देवांनीं आमंत्रण दिलें! परंतु कालपासून मला आलेलीं पत्रें, निरोप व असंतोषपर संदेश इत्यादि लक्षांत घेतां वाटलें कीं, करायला जावें चांगल्या शुद्ध हेतूनें आणि व्हावें कांहीं तरी विपरीत! यापेक्षां तें न केलेलेंच बरें. शंकरराव देव यांनीं आपल्या भेटींतील हकीकत व निरोप पंधरा मिनिटांपूर्वीच येऊन सांगितला. कारण आज सकाळीं मी त्यांजकडे जाऊन संयुक्त सभेचा बेत रहित झाल्याचा निर्णय अत्यंत खेदयुक्त मनःस्थितींत कळवून आलों होतों. अद्यापि सार्वजनिक जीवनांत आम्हां लोकांना पुष्कळ शिकावयाचें आहे इतकाच धडा या गोष्टीनें पुन्हां मनावर ठसला. कसेंहि असो; ज्या शुद्ध भावनेनें मी आपणाला निमंत्रण दिलें होतें त्याच भावनेनें आपणहि तत्परतेनें तें स्वीकारलें याकरितां मी आपले मनःपूर्वक आभार मानतों.

(सही) न. चिं. केळकर

❋

जनार्दन सखाराम करंदीकर

(बी. ए., एल्एल्. बी., माजी संपादक केसरी; विश्वस्त, केसरी-मराठा संस्था, पुणे)

(१) १९१६ च्या डिसेंबरांत लखनौची सुप्रसिद्ध काँग्रेसची बैठक झाली. तें अधिवेशन म्हणजे टिळकांच्या उत्कर्षाचा उच्चबिंदु होय. सुरतेच्या बखेड्यानंतर प्रथम त्यांस काँग्रेसमध्यें प्रवेश मिळाला आणि प्रवेश मिळतांच त्यांनीं ती संस्था हस्तगत केली. हिंदु-मुस्लिम पॅक्ट घडवून आणून स्वराज्याची एखमुखी मागणी ब्रिटिशां-पुढें याच अधिवेशनांत मांडण्यांत आली. तत्पूर्वी लो. टिळकांनी होमरूल लीगची स्थापना करून ठेवलीच होती. हेतु हाच कीं, जें काँग्रेसमधून न साधेल तें होमरूल लीगमार्फत साधतां यावें. पण लखनौ काँग्रेसमध्यें होमरूल लीगच्या चळवळीलाच पाठिंबा देण्यांत आला. सारांश, लखनौच्या काँग्रेसनें होमरूल लीगच्या चळवळीला मुक्तद्वार ठेवल्यानें टिळकांचे दोन्ही हेतु साधले. काँग्रेसचा त्यासंबंधाचा ठराव होतांच लोकमान्य, केळकरांना म्हणाले, 'तुम्ही आत्तांच्या आत्तां पुण्याला जा आणि येत्या केसरीत यावर अग्रलेख लिहा. येथून मजकूर लिहून पाठवून तें काम नीट होणार नाहीं. तुम्ही येथली सर्व चर्चा समक्ष ऐकली आहेत, तेव्हां या सर्वांचा इत्यर्थ काय तो तुम्हीच नीट जाणतां व तो तुमच्या भाषेंत नीट उठून दिसेल; याकरितां तुम्ही अगदी पहिल्या गाडीनें ताबडतोब निघा आणि हें काम करा'. त्यावर केळकर हंसून म्हणाले, 'काँग्रेसच्या ठरावांच्या बजावणीच्या कामाला तुमच्या चळवळीचें इंजन आतांपासून जोडलें गेलें, असाच याचा अर्थ ना!' लोकमान्य म्हणाले, "होय, हेंच यांतलें रहस्य आहे व तें तुम्हीं जाणलें आणि तें तुमच्या भाषेनें तुम्ही चांगलें खुलवून पटवून द्याल; एवढ्याचकरितां तुम्हाला जलदीनें जाण्याचा मी आग्रह करीत आहें."

झालें; टिळकांची ती आज्ञा शिरोधार्य मानून लगेच केळकरांनीं गाशा गुंडा-ळला, रेल्वेचें तिकिट आणविलें आणि ते पुण्याच्या वाटेला लागले आणि त्यांनीं 'केसरी'त 'स्वराज्याचें निशाण रोवलें' हा अर्थपूर्ण लेख लिहिला. इकडे काँग्रेसचें मांडव-परतणें अद्यापि व्हावयाचेंच होतें; त्याशिवाय इतर कितीतरी आनुषंगिक कार्यक्रम चालूच होते. याखेरीज अनेकांनीं काशी, प्रयाग, अयोध्या वगैरे स्थळें पाहण्याचे दौरे मनांतून योजिले होते. स्वतः टिळकांना व केळकरांना कानपूर वगैरे ठिकाणीं व्याख्यानाला जावयाचें होतें; परंतु हें सर्व सोडून केळकर मुकाट्यानें पुण्यास आले; कां तर 'तुमच्याशिवाय दुसरा कोणी येथील ठरावांचें रहस्य जाणणारा, पटवून देणारा नाहीं' असा टिळकांचा केळकरांच्यावरचा पूर्ण विश्वास म्हणून!

(२) मुलीच्या लग्नाचा हुंडा देण्याचें तर सामर्थ्य नाहीं, आणि चांगलें स्थळ मिळण्याची तर तीव्र इच्छा, अशा पेंचांत सांपडल्यामुळें आपले वडील अपत्य-

मोहानें कर्जाच्या भोंवऱ्यांत उडी घालून आत्मघात करून घेतील; यास्तव ही आपत्ति टाळावी म्हणून स्नेहलता नांवाच्या एका बंगकन्येनें आत्महत्या करून घेतल्याचें दुःखद वृत्त प्रसिद्ध झालें. ही वार्ता प्रसृत होतांच बंगाली वृत्तपत्रांनी हुंड्याच्या चालीवर जारीनें मोहीम सुरू केली आणि इकडील वृत्तपत्रांतूनहि तिचा प्रतिध्वनि उमटूं लागला. केवळ तीक्ष्ण शब्दप्रहारानें जर एखादी दुष्ट चाल नष्ट होण्यासारखी असती तर हुंड्याची चाल त्या आठवड्यांतील वृत्तपत्रांच्या हल्ल्यानें समूळ उच्छिन्न झाली असती ! पण तात्कालिक उचंबळलेल्या भावना आणि लौकिक व्यवहार यांच्यांतलें तारतम्य तात्यासाहेब केळकर हे बरोबर ओळखत असल्यानें, केवळ भावनावश न होतां त्या प्रश्नाच्या मुळाशीं जाऊन व शक्याशक्यतेचा विचार करून त्यांनीं 'हुंड्यावर बहिष्कार' हा मार्मिक अग्रलेख केसरींत अत्यंत समतोल विचारानें लिहिला आणि केवळ भावनावश होऊन शिव्यशाप देण्यानें हा प्रश्न सुटणार नाहीं, त्याचीं मुळें समाजरचनेंत फार खोलवर रुजलीं आहेत; तेव्हां समाजाचा एकंदर आर्थिक व्यवहार समूळ बदलेल तेव्हांच ही चाल नाहींशी होईल, असा त्यांनीं त्या लेखांत निष्कर्ष काढला. तो अग्रलेख दृष्टान्तादि अलंकारांनीं व विनोदप्रचुर भाषेनें तर नटलेला आहेच, पण त्याशिवाय सामाजिक चालीरीतींचा विचार केवळ उथळपणानें करून चालत नाहीं; अर्थशास्त्र, समाजशास्त्र व मानसशास्त्र इतक्या शास्त्रांचा त्यांत खोलवर विचार करावा लागतो; शिवाय विवाह हा शुद्ध धार्मिकविधि आहे, ही धार्मिक दृष्टीच प्रचलित झाली पाहिजे, अशा प्रकारचें गंभीर प्रतिपादन त्यांनीं त्या लेखांत केलें आहे. भाषासौंदर्य व विचारगांभीर्य या दोहोंचा तंर या लेखांत उत्तम मिलाफ आहेच; पण त्याशिवाय आपल्या समाजाची मनोरचना तात्यासाहेब किती बरोबर जाणत याचेंहि प्रत्यंतर त्या लेखावरून येतें. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं, 'स्नेहलतेच्या मूठभर चितेच्या आगीनें क्षणांत तापलेलें वैराग्याचें भांडें किती वेळ निवावयाचें थांबेल हा प्रश्नच आहे.' सारांश, 'हुंड्यावरील बहिष्कारा' ची ही मोहीम वळवाच्या पावसाच्या सरीसारखी आहे; तिचें अवडंबर कितीहि मोठें दिसत असलें तरी अल्पावधीतच तिचा भर ओसरून सर्वत्र सामसूम होईल. हें त्यांचें भविष्य तंतोतंत खरें ठरलें. दोन आठवड्यांनीं तो विषय इतका मागें पडला कीं, आतां इतिहाससंशोधकांसच अशी एक चळवळ एकदां निघाली होती, असा शोध लावावा लागेल!

असो. गेल्या वर्षीच कांहीं प्रसंगानें पूर्वीचे लेख वाचीत असतां केळकरांनीं स्वतः तो लेख वाचला व त्यांचा त्यांनाच इतका आनंद झाला कीं, 'हा लेख फारच चांगला साधला आहे' असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडले. त्यावर प्रस्तुत लेखकानें उत्तर केलें कीं, "तो लेख वाचून आतां तुमची स्मृति जागृत झाली; पण आम्ही तर तो लेख प्रसिद्ध झाल्या दिवसापासून त्याला अप्रस्थान दिलें आहे व त्याची आमची आठवण कधींच बुजली नाहीं."

(३) 'नावडतीचें मीठ आळणी आणि आवडतीचें ×× गोड' या म्हणीचा अनुभव व्यवहारांत हरघडी येतो. एकदां एखाद्या व्यक्तीविषयीं चांगलें मत प्रचलित झालें म्हणजे मग त्याचें कसलेंहि कृत्य चांगलेंच दिसूं लागतें; उलटपक्षीं ज्याच्याविषयीं एकदा मनांत अढी बसली त्यानें जीव तोडून केवढेंहि महत्कृत्य केलें तरी त्याचें श्रेय त्याला मिळत नाहीं. असला विपरीत अनुभव केळकरांच्या बाबतींत अनेक वेळां आला आहे. लो. टिळक मंडालेला गेल्यावर केळकरांनीं केसरी पत्र आपल्याकडे घेतलें. यामुळें कित्येक खाडिलकरभक्त अगदीं चिडून गेले होते. त्या वेळेपासून केळकरांच्या लेखाकडे काकदृष्टीनें पाहून त्याला दूषण ठेवण्यासाठीं ते अगदीं डोळ्यांत तेल घालून टपून बसलेले असत. त्या-संबंधांत त्यांची निराशाच झाली हें सांगावयास नकोच. परंतु या निराशेचें उट्टें ते उलट्या प्रकारानें काढीत याचेंच नवल वाटे. एकदा केसरी पत्रांत केळकरांनीं लिहिलेला एक उत्कृष्ट अग्रलेख प्रसिद्ध झाला. तो वाचतांच एका खाडिलकर-भक्तानें मला लिहून कळविलें कीं, "आजच्या केसरींतला सडेतोड अग्रलेख पाहा; 'तुमच्या' केळकरांचे पिळपिळीत लेख वाचून डोकें उठत असे; आज खाडिल-करांचा लेख वाचून मोठें समाधान वाटलें."

हें पत्र वाचून मला आश्चर्याचा धक्काच बसला. मी त्या गृहस्थास उलट पत्र लिहून एवढेंच मोघम कळविलें कीं, 'मागील केसरींतील लेख तुम्हांस फार आव-डला हें ठीकच झालें. मात्र तो अग्रलेख खाडिलकरांचा नसून केळकरांचाच आहे.' एवढ्यानें त्याचें समाधान झालें असतें तर मग 'पूर्वग्रहदूषितत्वा'ची मौज कसली! माझें हें पत्र वाचतांच त्या गृहस्थानें मला उलट उत्तर लिहिलें, "अहो, मी केस-रीचा वीस वर्षांचा वाचक आहें. मी येथें घरीं बसून कोणता लेख टिळकांचा, कोणता केळकरांचा व कोणता खाडिलकरांचा हें नेमकें ओळखतों. माझा अंदाज चुकावयाचाच नाहीं. गेल्या आठवड्यांत रा. केळकरांचे जामात वारले, त्या दुःखांत ते असल्यामुळें खाडिलकरांनीं हा लेख लिहिला, म्हणूनच तो इतका सरस वठला!"

जामाताच्या मृत्यूचा दुःखावेग विवेकानें आवरून केळकरांनीं आपल्या कर्त-व्यांत खंड पडूं न देतां अविचलित मनानें उत्कृष्ट लेख लिहिला, या स्थितप्रज्ञतेचें त्यांना श्रेय मिळावयाचें तें बाजूलाच राहून, उलट हे उंटावरचे शहाणे आपल्या मन:-कल्पित तर्कानें तो लेख खाडिलकरांच्या गळ्यांत बांधतात व केळकरांच्याविषयीं त्यांचें मन किती पूर्वग्रहदूषित झालें आहे त्याची प्रचीति आणून देतात, हें पाहून मला अत्यंत विषाद वाटला; आणि 'ब्रह्मापि च तं नरं न रंजयति' अशा कोटी-तल्या या गृहस्थाशीं वाद करण्यांत अर्थ नाहीं असें ओळखून मी त्यावर प्रत्युत्तर लिहिलेंच नाहीं. परंतु या व असल्याच आणखी कांहीं उदाहरणांवरून प्रारंभीं-प्रारंभीं, लोकमत केळकरांच्या किती विरुद्ध होतें, याची प्रचीति आली. अर्थातच

लोकमताची एवढी जोराची लाट विरुद्ध असतां त्या लाटेंतून बचावून अखेरीस त्याच विरुद्धमतवाल्यांकडून केळकरांनीं शाबासकी मिळविली यांतच त्यांच्या कर्तबगारीचें खरें महत्त्व सांठविलेलें आहे.

(४) एकदां बंगाल सरकारनें हिंदुमहासभेच्या पुढाऱ्यांस बंगाल प्रांतांत येण्याची बंदी करणारा हुकूम प्रसिद्ध केला. त्याबरोबर पं. मदनमोहन मालवीय यांनीं तो निर्बंध तोडण्याचा निश्चय केला व त्याबरोबरच डॉ. जयकर, तात्यासाहेब केळकर इत्यादि पुढाऱ्यांनींहि बंगालमध्यें जाण्याचा सत्याग्रह करावा असें ठरलें. त्याप्रमाणें तात्यासाहेब केळकर निघणार होते; इतक्यांत त्यांच्या मातोश्रींची प्रकृति विशेष बिघडली व त्यांतच त्यांचा अंतहि झाला. अर्थातच केळकरांचें जाणें लांबणीवर पडलें. तात्यासाहेब केळकरांच्या टीकाकारांना तेवढ्यांत त्यांच्यावर टीका करण्यास फावलें, आणि त्यांनीं ' थोर तुझे उपकार, आई ! थोर तुझे उपकार ' या मथळ्याखालीं एक लेख लिहून, आईच्या मृत्यूची सत्याग्रह टाळण्याला आयतीच चांगली सबब सांपडली, अशा अर्थाची टीका केली ! परंतु सत्याग्रहाचा बेत लांबणीवर पडला तरी तो केळकरांनीं सोडून दिला नव्हता. अर्थातच मातुःश्रींच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनीं ते बंगाल्यांत गेलेच ! पण मध्यंतरींच्या काळांत पं. मदनमोहन यांच्या सत्याग्रहाचें प्रकरण चालून बंगाल सरकाराला आपला हुकूम परत घ्यावा लागला, त्यामुळें केळकर यांच्यावर खटला भरला गेला नाहीं; परंतु ते सत्याग्रह टाळीत होते ही टीका वायफळ ठरली.

(५) स्वतःच्या मनाला पटल्याशिवाय कोणत्याहि चळवळींत स्वतः भाग घ्यावयाचा नाहीं, हा तात्यासाहेबांचा निर्धार असे व तो अगदीं स्वाभाविक व रास्त आहे. असें असून देखील अनेक चळवळींचे पुढारी तात्यासाहेबांवर निष्कारण व निराधार टीका करीत. तात्यासाहेबांचें त्यांस जाहीर आव्हान असें कीं, तुम्ही मजशीं युक्तिवाद करून जी गोष्ट मला पटवून द्याल ती मान्य करण्याला मी तयार आहें; परंतु केळकरांच्या युक्तिवादापुढें आपला युक्तिवाद लंगडा पडतो याची त्यांस जाणीव असल्यानें ते युक्तिवादाच्या भानगडींत न पडतां ' शेषं अपशब्दैः पूरयेत् ' या न्यायानें केवळ शिव्या देऊन आपल्या मनाचें समाधान करून घेंत; परंतु तेवढ्यानें त्यांचें काम कसें भागणार ! तात्यासाहेबांचा पाठिंबा नाहीं, म्हणजे पैशाचाहि पाठिंबा नाहीं अशी त्या वेळीं स्थिति असे. अर्थातच तात्यासाहेबांशीं वादविवाद करून आपली बाजू सिद्ध करतां न आली तरी अनेक चळवळींतले पुढारी तात्यासाहेबांकडे आर्थिक मदत मागण्यास येतच असत. एकीकडून त्यांच्यावर अपशब्दांची झोड उठवावयाची व दुसरीकडून त्यांच्याकडे मदत मागावयास जाण्याचा लोचटपणा करावयाचा असला विलक्षण प्रकार चालू असे ! परंतु केळकरांची उदारमनस्कता एवढी मोठी होती कीं, त्यांनीं प्रत्यक्ष आपल्या

हाडवैऱ्यांसहि त्यांच्या जिवावरच्या अडचणींत मदत देण्याचें नाकारलें नाहीं. तात्यासाहेब, आज आमच्या रिक्रूट कँपांतील चूल अडली आहे अथवा आज सोलापुराला सत्याग्रही पाठवावयास रेल्वेच्या तिकिटाला पैसे नाहींत, असें गाऱ्हाणें कानीं पडतांच, हा इसम आपल्याविषयीं कोठें काय बोलतो आणि लिहितो याचा विचारहि मनांत न आणतां, तात्यासाहेब हे शक्य त्या प्रकारें मदत करून अडचण भागवीत असत. सारांश, तात्यासाहेबांनीं आपलें 'बुडत्यास हात द्यावा' हें व्रत अखेरपर्यंत कधीं सोडलें नाहीं!



रामचंद्र गणेश सोमण

(स्पीकर वरिष्ठ कायदेमंडळ, मुंबई; वकील, सातारा)

(१) कै. तात्यासाहेबांविषयीं माझी सर्वांत जुनी आठवण म्हणजे सन १८९३ ची आहे. त्या वेळीं तात्यासाहेब कायद्याचा अभ्यास करीत होते. त्या वेळीं त्यांनीं 'लीगल प्रोफेशन' या विषयावर एक निबंध लिहून तो त्या वेळची सातारा येथील वकील मंडळी व इतर स्नेही यांच्यासमोर सातारा हायस्कूलच्या असेंब्ली हॉलमध्यें वाचून दाखविला होता. त्या निबंधाची प्रत तात्यासाहेबांच्या लेखसंग्रहांत समाविष्ट आहे कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. मी त्या वेळीं हजर होतों व त्या वेळच्या प्रमुख वकील मंडळींनीं व इतर स्नेही मंडळींनीं त्या निबंधाची चांगली वाहवा केल्याचें मला पक्कें स्मरतें. त्या वेळींहि कै. तात्यासाहेब सातारच्या स्थानिक पत्रांतून क्वचित् प्रसंगीं इंग्रजी व मराठी लेखन करीत असत.

(२) कै. तात्यासाहेब एल्एल्. बी. पास होऊन साताऱ्यास वकिली करीत असतांना लोकमान्यांनीं स्थानिक स्नेह्यांच्या शिफारशीनें होतकरू तरुण म्हणून त्यांस उचललें व सन १८९५–९६ मध्यें पुण्यास नेलें. तात्यासाहेब लेखणीचे जसे बहादर होते त्याप्रमाणें वक्तृत्वकलेंत त्या वेळीं तरी ते मुळींच निपुण नव्हते म्हटलें तरी चालेल. सन १८९९ सालीं सातारला आल्यावेळीं त्यांनीं त्या वेळच्या शिवाजी क्लबच्या जागेंत म्हणजे आजच्या गजानन व्यायाम शाळेच्या जागेंत कै. कृष्णाजीपंत तुळपुळे यांच्या अध्यक्षतेखालीं एक व्याख्यान दिलें होतें व व्याख्यान संपल्यानंतर 'वक्ता या नात्यानें आपली कांहीं प्रगति झाली आहे काय'? असा आम्हां स्नेही मंडळींस त्यांनीं प्रश्न केला. अर्थात् पुण्याच्या केसरी ऑफिसमध्यें राहिल्यामुळें त्यांची त्यासंबंधांत पूर्वीच्या मानानें बरीच प्रगति झालेली होती असें आम्हांस मोकळेपणानें त्यांस सांगावें लागलें.

(३) सन १९०८ सालीं, लोकमान्यांना मंडालेची शिक्षा झाल्यानंतर तात्यासाहेब हे 'केसरी'चे संपादक झाले; त्यानंतर साताऱ्यास ते आले असतां,

कै. डॉ. भिडे ह्यांच्या माडीवर "लोकमान्यांची केसरींतील धडाडी आपल्या लेखांत अंशतः तरी उतरते कीं नाहीं?" असा प्रश्न स्नेहीमंडळीस केला असतां, तात्यांच्या त्या वेळच्या 'केसरी'तील लेखांची सडेतोड व तर्कशुद्ध भाषा याबद्दल आम्हांस समाधानच व्यक्त करावें लागलें. आमचा हा अभिप्राय ऐकून तात्यांनाहि समाधान वाटलें.

(४) एकदां मी पुणें येथें गेलों असतां तात्यांशीं बोलत बसलों होतों. अशा वेळीं तात्यांनीं मुंबई सरकाराचे पूर्वीचे एक्झिक्यूटिव्ह कौंसिलर व त्या वेळीं हिंदुस्थान सरकाराकडे गेलेले हिलसाहेब यांचें एक पत्र त्यांस आलेलें मला दाखविलें. 'तात्यासाहेबांसारख्या संथ व नेमस्त मानल्या जाणाऱ्या गृहस्थानें 'केसरी'शीं असलेली आपली संगत सोडली तर त्यांचा हिंदुस्थानच्या सरकारांत मोठा बडेजाव होऊन नेमस्तांचे अग्रणी म्हणून त्यांचा लौकिक होईल' असा मजकूर सदर पत्रांत होता असें मला आठवतें. सदर पत्र अर्थात् तात्यांच्या संग्रहीं असेलच. तात्यांनीं सदर पत्रास कांहींहि विचार न करितां एकदम नकारार्थी व सडेतोड उत्तर दिलें हें सांगावयास नकोच.

(५) सन १९२० सालीं लोकमान्यांच्या भेटीस मी गेल्या वेळीं कांहीं गोष्टींबाबत त्यांचा सल्ला विचारला असतां, ती गोष्ट क्षुल्लक असल्यामुळें तात्यांनींच आपल्या अधिकारांत या गोष्टींत तुम्हांस सल्ला देऊन मोकळें कां केलें नाहीं असें आम्हांस विचारिलें. ही गोष्ट तात्यांच्याजवळ येऊन बोललों असतां "आपण कोणतीहि गोष्ट लोकमान्यांच्या सल्ल्याशिवाय आपल्या अखत्यारींत करीत नाहीं" असें तात्यांनीं आम्हांस सांगितलें. लोकमान्यांशीं किती निष्ठेनें व नम्रतेनें ते वागत असत याची आम्हांस त्या वेळीं साक्ष पटली.

(६) लोकमान्यांच्या निधनानंतर 'गांधीयुग' सुरू झालें. अशा वेळीं मुंबईचे गव्हर्नर जॉर्ज लॉईड यांनीं तात्यांस मुलाखतीस बोलावून पुष्कळ वेळ त्यांच्याशीं संभाषण केलें. त्या संभाषणाचा आशय "गांधी-युगांत त्यांच्या राजकारणांत तात्यांनीं सामील होऊं नये व त्यांचें राजकारण हाणून पाडण्यास त्या वेळच्या केसरीनें मदत करावी" असा होता. अर्थात् गव्हर्नरसाहेबांना "गांधींचीच विचारसरणी सरकारच्या धोरणाला तोंड देण्यास योग्य आहे व आपण गांधींच्या विरुद्ध सरकारला मदत करूं शकणार नाहीं" असें तात्यांनीं स्पष्ट सांगितलें. गव्हर्नरसाहेब साताऱ्यास आल्या वेळीं त्या वेळचे लोकलबोर्डांचे अध्यक्ष यांची मुलाखत होत असतां "प्रत्यक्ष गांधीवादी असलेला मनुष्य मला पत्करेल; परंतु गांधींशीं मतभेद असूनहि सरकारला मदत करण्यास तयार नसलेला केळकरांसारखा अस्तनींतील निखारा आपणांस पटत नाहीं; यामुळें केळकरांच्या नादीं तुम्हीं कोणी लागतां कामा नये"

असा गव्हर्नरसाहेबांनीं अध्यक्षांस उपदेश केला व त्यानंतरच तात्यांच्या गव्हर्नरसाहेबांशीं झालेल्या सडेतोड मुलाखतीचें वृत्त मला समजलें !

(७) तात्यांच्या मृत्यूपूर्वी सुमारे २–३ आठवडे तात्या मोटारीनें सांगलीस निघाले असतां साताऱ्याजवळ त्यांची मोटार नादुरुस्त झाली व ती दुरुस्त होईपर्यंत सुमारें दोन तास माझ्या घरीं ते व मी अनेक गोष्टींवर बोलत बसलों होतों. इंग्रज सरकार हिंदुस्थानच्या पदरांत स्वातंत्र्याची मोटळी टाकून येथून आपला पाय स्वखुषीनें कां काढून घेऊं लागले याबद्दल बोलत असतां, तात्यांच्या आवडीचा विषय म्हणजे आयर्लंडचा इतिहास याचा उल्लेख करून व अगदीं ताज्या काळापर्यंत तो इतिहास वाचल्यानंतर आयर्लंडनेंच इंग्लंडच्या मुत्सद्दयांच्या मनांत असें वागण्याची प्रेरणा केली व मुख्यतः आंतरराष्ट्रीय राजकारणांत इंग्लंडला अब्रू राहिली नसल्यामुळें त्यांनीं हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देण्याबाबत खुषीनें पाऊल टाकलें आहे असें तात्यांनीं आपलें मत सांगितलें.

(८) वरील आठवणी ह्या सार्वजनिक स्वरूपाच्या आहेत. माझ्याबद्दल तात्यांचें वैयक्तिक प्रेम होतें, व एकदोन गोष्टींमध्यें तें विशेष व्यक्त झालें. त्या गोष्टींचा उल्लेख मी आतां करणार आहें. २६–२७ सालच्या हिंदुस्थान सरकारच्या कायदे-कौन्सिलाच्या निवडणुकींस तात्या उमेदवार म्हणून उभे होते. त्याच वेळीं माझे गुरु कै. दादासाहेब करंदीकर हेहि स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे होते. मी कांग्रेसचा अनुयायी असलों तरी स्वराज्य-पक्षाबद्दल मला सहानुभूति होती व त्या पक्षातर्फे तात्या उभे असल्यामुळें मी दादासाहेब यांना पाठिंबा न देतां तात्यांनाच पाठिंबा दिला. या गोष्टीबद्दल त्यांनीं माझ्यापाशीं मोठ्या प्रेमानें उल्लेख करून माझे आभार मानले.

(९) गेल्या वर्षांत माझ्या तोंडून कै. तात्या व अण्णासाहेब भोपटकर यांच्याबद्दल विशेष अनुदार व नीचपणाचे उद्गार निघाले, असा माझ्याबद्दल तात्यांच्या भोंवतीं असलेल्या हिंदुमहासभेच्या प्रभावळींत एक वृथा प्रचार सुरू झाला होता. ही गोष्ट माझ्या कानीं आल्यावर मीं तात्यांना पत्र लिहिलें व त्याचें उत्तर म्हणून त्यांनीं आपल्या मनांत हा प्रवाद ऐकूनहि कांहीं विकल्प आलेला नाहीं अशी माझी खातरजमा केली. व्यक्तिशः अनेक ट्रस्टच्या बाबतींत तात्यांचा सल्ला मी विचारीत असे. सार्वजनिक कामाचा ट्रस्ट करतांना ट्रस्ट करणारानें ट्रस्टच्या रकमेवर असलेलें आपलें स्वत्व केव्हांहि आपल्या हातीं ठेवूं नये असा त्यांनीं मला सल्ला दिला व त्या सल्ल्याचा मलाहि पुष्कळ उपयोग झाला. आमच्या दोघांच्या प्रेमांत राजकारणांतील आमच्या स्वतंत्र भूमिकेमुळें केव्हांहि विकल्प आला नव्हता ही गोष्ट मी येथें आनंदानें नमूद करतों व यावरूनच तात्यांच्या मनाच्या मोठेपणाची साक्ष सर्वांस पटो अशी अपेक्षा करतों.

के. ना. वाटवे

(एम्. ए., पीएच्. डी., प्राध्यापक, पुणें)

(१) माझा तात्यासाहेबांशीं प्रत्यक्ष संबंध १९२२ सालीं आला. त्यांच्याच एका नातेवाइकाच्या विवाहासंबंधीं वधूपक्षाकडून बोलणें करण्यासाठीं मी त्यांजकडे गेलों होतों. ते बोलणें ताबडतोब अनुकूल निकालांत काढून त्यांनीं माझी चौकशी केली. मी नुकताच एम्. ए. झालेला – व मराठी घेऊन झालेला – असें त्यांना कळतांच त्यांनीं मला 'केसरी'त कांही लिहीत चला ' असें सांगितलें. त्या वेळीं बनारस हिंदु युनिव्हर्सिटीत मराठीची एक जागा व्हावयाची असें घाटत होतें. ही गोष्टहि मी काढतांच तात्यासाहेब तत्परतेनें म्हणाले, ' ठीक आहे. महाराष्ट्रियांनीं अवश्य, बाहेर जावें; मी तुम्हांला पंडित मदन मोहन मालवीय यांस देण्यासाठीं चिठी देईन. मी त्या दिवशीं त्यांच्या घराबाहेर पडलों तो त्यांच्या परहिततत्परतेनें भारूनच ! तात्यासाहेबांनीं त्या दिवशीं माझ्यासारख्या होतकरू तरुणाला दिलेलें प्रोत्साहन त्या नाहीं तरी अन्य तऱ्हेनें मला कसे उपकारक झालें हें मी पुढें सांगणार आहेंच.

(२) १९२४ सालीं मोरोपंतांच्या पुण्यतिथीचे अध्यक्ष तात्यासाहेब होते. पुणें येथील नू. म. वि. हायस्कूलच्या सभागृहांत व्याख्यानें झालीं. त्यांत रा. मोडकशास्त्री व भिरजकरशास्त्री यांच्या बरोबर माझेंहि ' पंतांची संस्कृत कविता ' या विषयावर भाषण झालें. या माझ्या भाषणाची तात्यासाहेबांनीं 'मार्मिक' अशी स्तुति करून मला आत्मप्रत्यय आणून दिला. यानंतर संस्कृतसंबंधींचीं पुस्तकें व इतर विषय यांजवर त्यांनीं परीक्षण रूपानें व निबंधाच्या द्वारां मजकडून 'केसरी' व 'सह्याद्रि' यांमध्यें लिहवून घेतलें. त्यांच्या 'हास्यविनोदमीमांसे'साठीं त्यांनीं मला ' संस्कृतांतील विनोद ' हा १०० पृष्ठांचा निबंध लिहावयास सांगितला. ग्रंथ लिहावयास घेतला कीं तो शक्यतों लवकर लिहून टाकून मोकळें व्हावयाचें हा तात्यांचा स्वभाव असल्याने माझ्या वरील निबंधाचें लेखन चालूं असतां ते माझ्या घरीं वारंवार येत व ' हां ! कुठपर्यंत आलें ? ' म्हणून ढोंसणी देत. संपूर्ण झालेला तो निबंध मी स्वतः त्यांस माझ्या घरींच वाचून दाखविल्यावर त्यांना फार समाधान झालें. ' वाः. वाः फार छान ' असें त्यांनीं त्या वेळीं काढलेले उद्गार माझ्या कानांत सदैव घुमत राहतील व मला प्रोत्साहन देतील !

(३) या ' संस्कृत विनोद ' प्रकरणांतूनच माझ्या पीएच्. डी. चा प्रश्न निघाला. तात्यासाहेब मला म्हणाले, ' तुम्ही आतां फुटकळ लिहिणें सोडून द्या व एकाच विषयावर एकादा ग्रंथ तयार करा. तुम्ही हास्यरसाला हात घातलाच आहे. त्याबरोबर इतरहि रस घ्या व एक रसविषयक प्रबंध लिहा ! डॉ. माधवरावांनीं महाराष्ट्र साहित्य पत्रिकेंत व इतरत्र एकदोन लेख लिहून ' रस-व्यवस्था हें शून्य-

संशोधन आहे' असें मत मांडलें. यावरहि स. प. कॉलेजांत तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं चर्चा झालीं. नंतर मी 'रसविमर्श' पीएच्. डी. साठीं लिहावा असें ठरलें व तात्यासाहेबच त्याचे मार्गदर्शक अर्थातच झाले. १९४० सालीं 'मार्गदर्शक' म्हणून त्यांनी माझ्या अर्जावर सही केली. त्या वेळीं ते हंसत हंसत मला म्हणाले, 'ह्या माझ्या सहीनें माझें सनदशीर गुरुत्व तुम्ही पत्करलें असें झालें!' मीं लागलीच उत्तर केलें, 'पण यापूर्वी पंचवीस-तीस वर्षें तरी मी तुमचें बिन-सनदशीर गुरुत्व पत्करूनच होतों हें तुम्हांला कुठें माहीत आहे!'

(४) १९४१ साली बेळगांवास पहिलें संस्कृत साहित्य संमेलन झालें. तात्यासाहेबांचा उत्साह एवढा दांडगा कीं, त्यांना तेथें उपस्थित राहण्याची विनंती करतां क्षणींच त्यांनी एक सुंदर संस्कृत भाषण तयार केलें व बेळगांवास संमेलनासाठी येऊन त्यांनी तें भाषण तेथें वाचन दाखविलें. तें विनोदप्रचुर व सुलभ असल्यानें सर्वांस मोठें पसंत पडलें. त्यापुढचें अधिवेशन पुण्यास व्हावें असा बेळगांवच्या शास्त्रीमंडळींनीं आग्रह धरला व मला तात्यासाहेबांना यासंबंधी विचारावयास सांगितलें. मी तात्यासाहेबांस म्हणालों, 'पुण्यास आपण दुसरें संमेलन कां बोलावूं नये!' यावर ते म्हणाले, 'कोण म्हणतो नको म्हणून! माझ्यातर्फे निमंत्रणाचें भाषण करा, ठोकून टाकूं. त्यांत काय आहे!' मी मोठ्या उत्साहानें झोकदार निमंत्रण दिलें, व सांगितलें कीं, 'आम्हां पुणेकरांमागें एक 'नरसिंह' उभा असून तो पुन्हां 'चिन्तामणि'सुत आहे!! त्यामुळें आमचें संमेलन द्वितीय असलें तरी तें अद्वितीय करून दाखवूं'. माझ्या भाषणानें तात्यांना फार आनंद झालेला दिसला. ते मला विनोदानें म्हणाले, 'माझ्या नरसिंह व 'चिंतामण' या नांवावर तर कोट्या ठीक केल्यात; पण 'केळकर' येवढाच शब्द आतां शिल्लक राहिला!' मीं म्हटलें 'थांबा. ही कोटिप्रिय संस्कृत पंडितांची सभा आहे; त्यामुळें शिल्लक राहिलेल्याहि शब्दावर कोटी होणार नाहीं म्हणून काय नेम!' मौज ही कीं, आम्हां दोघांना फार वेळ थांबावें लागलें नाहीं. पुणेकरांनीं निमंत्रण दिलें याचें वर्णन करतांना तात्यासाहेबांना एका पंडितानें जातां जातां 'सरस्वतीसदन-केलिकाराः' (सरस्वतीच्या मंदिरांत क्रीडा करणारे) असें म्हटलेंच!! आम्हा दोघांच्या अपेक्षा सफल झाल्या म्हणून आम्ही खूप हंसलों! १९४२ सालीं पंडित राजेश्वरशास्त्री द्रविड यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें भरलेलें द्वितीय साहित्य संमेलन केवळ तात्यासाहेबांच्या नेतृत्वामुळें खरोखरच अद्वितीय झालें, हें सर्वांस माहीतच आहे.

(५) विशेषतः वाङ्मयचर्चेत तात्यासाहेबांचें मन खुलें, मोकळें आणि आग्रहरहित असे. त्यामुळें 'बुद्धेः फलमनाग्रहः' ही म्हण त्यांना लागू पडत असे. 'सुभाषित आणि विनोद' या त्यांच्या पुस्तकांत तात्यांनीं सुभाषित हा शब्द

Wit या अर्थी वापरला होता व सुभाषित Wit शीं समव्याप्त व्हावें म्हणून सुभाषिताच्या अर्थाची त्यांनीं छाटाछाट केली व सुभाषिताची व्याप्ति वाढविणाऱ्यांना बोल लावला. या विषयावर त्यांच्याच अध्यक्षतेखालीं झालेल्या माझ्या व्याख्यानांत मीं या गोष्टीस हरकत घेतली. 'एखाद्यास एक साधी नराणी नखें कापण्यासाठीं पाहिजे असतां त्यासाठीं त्यानें शस्त्रागारांत जावें व तेथील तरवार, भाले, बरच्या, जंबिया इत्यादिकांना तीं शस्त्रें अवजड म्हणून-नांवें ठेवूं लागावें त्यापैकीं तात्यासाहेबांचा प्रकार आहे' असें मी म्हटलें. पण ही माझी धिटाई त्यांनीं मानली. 'तुमचें म्हणणें ठीक दिसतें; मी विचार करतों' असें ते दिलदारपणें म्हणाले व 'हास्य-विनोद-मीमांसे'च्या प्रस्तावनेंत सुभाषित शब्द वापरण्यांतील अडचण त्यांनीं प्रांजलपणें कबूल केली.

●

त्यांच्या या खुल्या वृत्तीमुळें त्यांच्याशीं वादविवाद अगदीं मोकळेपणानें करण्यांत आम्हांस संकोच वाटत नसे. 'सविकल्प समाधि', 'हास्यरस हा रसराज आहे' इत्यादि अनेक विषयांवर त्यांचा आमचा मतभेद होई. शेवटीं ते म्हणत, "अहो, हीं वाङ्मयांतील मतें. ज्याला जें पटेल तें त्यानें मांडावें. त्यांत भीड कसली!" 'तोतयाच्या बंडा'च्या शेवटीं सुखनिधानाच्या 'अधःपात' या दुःखोद्गारानंतर नाना व पार्वतीबाई यांच्या तोंडचीं दोन दोन वाक्यें तात्यांनीं घातलीं आहेत. "या वाक्यांची जरूरी नाहीं. 'अधःपात' या शब्दांतील ध्वनीनें तें सर्व सूचित होतें," असें कै. गडकऱ्यांनीं एकदां त्यांना म्हटलें होतें. ते त्यांना पटल्यामुळें पुढील आवृत्तींत तात्यांनी तीं भाषणें गाळलीं व ही गोष्ट तात्यांनींच मला सांगितली.

(६) तात्यासाहेबांच्या व माझ्या उण्यापुऱ्या बावीस-तेवीस वर्षांच्या संबंधाचा शेवट घरोब्यांत झाला होता. त्यांच्याबद्दल आदर बाळगणाऱ्या इतर अनेक लोकांप्रमाणें मला व आमच्या घरच्या मंडळींना तात्यासाहेब हे घरच्या वडील माणसासारखे वाटत. १९४७ च्या मे महिन्याच्या १२ व्या तारखेस आमच्या विवाहाला पंचवीस वर्षें पुरीं झालीं. म्हणून आमच्या कुटुंबांत असें ठरलें कीं, त्याबाबत एक छोटासा घरगुती समारंभ करावा आणि ज्या भाग्यशाली दांपत्याच्या विवाहाला साठ वर्षें झालीं त्या श्री. तात्यांना व सौ. ताईना भोजनास बोलावून त्यांचा आशीर्वाद घ्यावा. मी जरा संकोचानेंच तात्यांजवळ ही गोष्ट काढली. त्याबरोबर त्यांनीं आनंदानें यावयाचें मान्य केलें. आहेराच्या वेळीं मुलगे, मुली, जांवई, नातवंडें यांनीं गजबजलेलें माझें कुटुम्ब पाहून व विशेषतः आम्ही पतिपत्नींनीं तात्यांना लवून नमस्कार केला. त्या प्रसंगीं, तात्यांना गहिवर आला आणि ते म्हणाले, 'भरलेलें घर' म्हणतात तसें तुमचें घर आहे. आनंद होतो. तुमचा संसार ईश्वरकृपें सुखाचा होवो.'

(७) माझ्या दोन्ही कन्यकांच्या विवाहाच्या वेळीं – दादर व पुणें येथें – तात्या आवर्जून उपस्थित राहिले. पुण्याचा विवाहसमारंभ सदाशिव पेठेंतील ब्राह्मणकार्यालयांत झाला. त्यासाठीं आपल्या डेक्कन जिमखान्यावरील 'पुष्करणी' बंगल्यांतून विवाहस्थळीं येत असतां त्यांना वाटेंत टांगा मिळाला नाहीं. तात्या व सौ. ताई दोघेहि चालतच आले ! त्यासंबंधानें बोलतांना विनोदानें ते म्हणाले, "आमच्या विवाहाच्या वेळीं सप्तपदींतली कांहीं पावलें चुकूनमाकून राहिलीं असलीं तर त्यांची फेड आज आम्ही दोघांनीं बरोबर चालून ५६–५७ वर्षांतील व्याजासुद्धां केली !!"

(८) तात्यासाहेबांचा 'हास्यविनोदमीमांसा' ग्रंथ एम्. ए. परीक्षेसाठीं नेमलेला आहे. त्यावर मीं सप्टेंबर १९४७ मध्यें स. प. कॉलेजमध्यें एम्. ए. च्या विद्यार्थ्यांसाठीं व्याख्यानें दिलीं. त्या वेळीं एका व्याख्यानास ते मुद्दाम उपस्थित राहिले व सप्टेंबर २३ व २४ रोजीं त्यांनीं स्वतः दोन चर्चात्मक व्याख्यानें दिलीं. त्या वेळीं 'अमक्या विनोदी वाक्यांत विनोद कशामुळें उत्पन्न झाला' असा प्रश्न ते करीत होते, व विद्यार्थि-विद्यार्थिनींनीं दिलेल्या उत्तरांच्या विश्लेषणांत ते रंगून गेले होते. ही गोष्ट त्यांच्या मृत्यूपूर्वी फक्त एकोणीस दिवसांची होय. ता. २४ सप्टेंबर रोजीं सायंकाळीं तात्यांना 'पुष्करणी' पर्यंत टांग्यांतून पोहोंचवून त्यांच्याशीं मी बोलत बसलों. तोच त्यांचा माझा शेवटचा सहवास. तेंच मला मिळालेलें शेवटचें संभाषणसुख. आक्टोबर १४ रोजीं सकाळीं मी त्यांच्या भेटीला गेलों होतों. पण अखेरच्या विश्रांतीसाठीं पहुडलेले तात्या त्या दिवशीं कोणाशींच बोलत नव्हते !

गजानन विश्वनाथ केतकर

(बी. ए., एल्एल्. बी., संपादक नि विश्वस्त, केसरी-मराठा संस्था, पुणें)

(१) गुरुवर्य कर्वे यांच्या महिला-विद्यापीठाचें पहिलें प्रसिद्धक निघालें. त्या योजनेवर लो. टिळकांनीं "स्त्रियांची युनिव्हर्सिटी" हा अग्रलेख लिहिला. टिळकांचा या योजनेस पाठिंबा हा अर्थातच मुक्तकंठ नव्हता; बराच मर्यादित होता. केळकरांनीं आपला अधिक अनुकूल अभिप्राय कर्व्यांना लिहून दिलेला होता व तो प्रसिद्धहि झालेला होता. टिळकांनीं केळकरांना आपला अग्रलेख वाचून पाहण्यास सांगितलें. केळकर वाचून 'ठीक आहे' असें म्हणाले. टिळक म्हणाले, तुमचें स्वतंत्रपणें मत प्रकट झालें आहे त्या दृष्टीनें कांहीं फरक वाटल्यास सुचवा. एव्हांना केळकर नेहमींच्या लगबगीनें जिना उतरावयास लागले होते. तेथूनच ते म्हणाले, "माझें स्वतंत्र मत प्रसिद्ध झालेंच आहे. पेपर (केसरी) तुमचा आहे हें लोक

ओळखतात; म्हणून हें आर्टिकल (अग्रलेख) आहे तसेंच राहूं द्या. लोकांचा माझ्यासंबंधीं कांहीं गैरसमज होणार नाहीं; झाला तर मी पाहून घेईन."

(२) मराठ्यांतील कांहीं लिखाणांसंबंधानें एकानें मानहानीचा अभियोग सुरू करण्याची सिद्धता केली होती. प्रकरण नगरपालिकेसंबंधाचें होतें. तडजोडीचीं बोलणीं करण्यासाठीं मध्यस्थांनीं दोन्ही पक्षांना एकत्र आणलें होतें. गायकवाड वाड्यांतील अंगणांतल्या चौरस लांकडी पीठावर ही बैठक चालूं होती. उलट पक्षानें एक पत्रक काढलें होतें. त्याला तोडीस तोड म्हणून मराठ्यानें उत्तर दिलें असें केळकरांनीं समर्थन केलें. पत्रक काढलें हें प्रतिपक्षास मान्यच होतें. तेव्हां प्रतिपक्षी म्हणाले, "आमचे आरोप पत्रकांत राहिले; पण तुमच्या लेखांतील उलट आरोप मात्र वर्तमानपत्रांत (मराठ्यांत) आले." केळकर म्हणाले "'मराठा' हें माझें पॅम्प्लेटच आहे. माझ्या हातांत वर्तमानपत्र नसतें तर मीं पत्रकच काढलें असतें आणि तुमच्या हातांत वृत्तपत्र असतें तर तुम्हीहि त्यांतून पत्रक प्रसिद्धिलें असतें. तें नाहीं म्हणून तुम्हांला पत्रक काढून वाटावें लागलें. यांत फिट्-फाट झाली असें समजा."

(३) टिळकांच्या केसरींतील लेखांच्या पहिल्या दोन भागांत दोन लेख केळकरांचे असतांहि चुकून टिळकांचे म्हणून छापले गेले आहेत. भाषेवरून हें कोणासहि उमगण्यासारखें आहे. यांपैकीं एका लेखांत चिमणीला सांपडलेल्या दाण्याची मुलांची गोष्ट मनोरंजक भाषेंत दाखला म्हणून घेतलेली आहे. यासंबंधीं शहानिशा करून घ्यावी म्हणून १९२५-२६ च्या सुमारास दिल्लीस असेंब्लीच्या बैठकीसाठीं मुक्काम असतांना मीं तात्यांना मुद्दामच म्हटलें कीं, "टिळकांच्या एका लेखामध्यें लहान मुलांची चिमणीला सांपडलेल्या मोत्याची गोष्ट फार चांगली वर्णिली आहे." तेव्हां ते म्हणाले, "अरे, ती गोष्ट असणारें आर्टिकल टिळकलेखसंग्रहांत नजरचुकीनें छापलें गेलें! ती गोष्ट असलेलें आर्टिकल माझें आहे हें मला नक्की आठवतें, पण हें बोलणें आतां बरें नाहीं!"

(४) तोंडी लेख सांगून दुसऱ्याकडून लिहून घेण्याच्या प्रसंगीं केळकर कधीं कधीं या लिहिणाऱ्याचें मत विचारीत. रॅमसे मॅक्डोनाल्ड हे संयुक्त मंत्रिमंडळांत प्रथम मुख्य प्रधानपदावर आले असतां हिंदुस्थानानें त्यांच्या अडचणीची परिस्थिति लक्षांत घ्यावी असा भाग एका अग्रलेखाच्या शेवटीं आला. तो लिहून झाल्यावर त्यांनीं माझें मत विचारलें. मॅक्डोनाल्ड यांच्या बाजूच्या अडचणी आपण काय म्हणून सांगाव्या असें माझें मत मीं स्पष्टपणें सांगितलें. तेव्हां ते माझ्या हातून येणाऱ्या लेखांत प्रतिपक्षाच्या बाजूचा थोडा तरी विचार होणारच. ती बाजू मी बगळण्यास तयार नाहीं. माझ्या हातून येणारा लेख हा केवळ एकेरी विचाराचा होणार नाहीं. पण त्यास इलाज नाहीं. एकदां डॉ. जयकरांनीं वरिष्ठ

न्यायाधिशाची जागा सरकारनें देऊं केली असतां त्यांनीं ती घेतली नाहीं. या त्यांच्या त्यागाबद्दल त्यांनीं स्फुट सांगितलें. पण त्यानंतर लगेच दुसऱ्या स्फुटांत त्यांनीं जागा घेतली असती तरी तें लोकहिताचें झालें असतें आणि त्यांचा आर्थिक स्वार्थत्यागहि झाला असता, अशी दुसरी बाजूहि त्यांनीं मांडली. मला सहज मत विचारलें, तेव्हां मी या दुसऱ्या स्फुटानें पहिल्यावर पाणी पडलें इत्यादि सांगितलें. अर्थात् त्यांच्या दुहेरी लिहिण्यांत कांहीं वावगें आहे हें त्यांना मुळींच पटलें नाहीं. पण अनिच्छेनें आणि ढोबळ विचार करणाऱ्या जनतेची प्रवृत्ति लक्षांत घेऊन त्यांनीं शेवटीं हें दुसरें स्फुट गाळण्यास संमति दिली.

(५) १९२८ मध्यें तात्यांनीं रजा घेतली होती. हंगामी संपादकत्व मजकडे होतें. पहिल्या अंकाच्या आधींच्या सोमवारीं सायंकाळीं ७॥–८ च्या सुमारास ते कार्यालयांत माझ्या टेबलाशीं आले. मी मुद्रितांची एकेक प्रत त्यांच्याकडे घरीं होईल तशी पाठवीत होतों. मीं त्यांना विचारलें, "दुपारीं मुद्रितें (प्रुफें) पाठवलीं तीं मिळालीं का? त्यांत कांहीं फमीजास्त सुचवावयाचें आहे काय?" ते म्हणाले, "प्रुफासंबंधीं किंवा उद्याच्या अंकासंबंधीं मला कांहीं सांगावयाचें नाहीं. पण कित्येक वर्षांत सोमवारीं संध्याकाळीं मोकळ्या मनानें फिरून आल्याचें मला आठवत नाहीं. आज इतक्या वर्षांनीं सोमवारीं सायंकाळीं मी फर्ग्युसन कॉलेजकडे फेरफटका मोकळ्या मनानें करून आलों, याचा आनंद सांगण्यासाठींच फक्त मी येथें आलों आहें" (त्या वेळीं मंगळवारचा आठवडिक केसरी होता). या बोलण्यामें सूक्ष्मरीत्या वृत्तपत्रकारानें किती जबाबदारी मानली पाहिजे हेंहि कदाचित् त्यांना सुचवावयाचें असेल. मला मात्र या त्यांच्या उद्गारांवरून ते किती जबाबदारी मानीत असत याची कल्पना आली.

(६) माझ्या हंगामी संपादकत्वानें १९२८ मध्यें केसरी निघत असतां बार्डोलीचा लढा निकरावर आला. तडजोडीचीं बोलणीं चालूं होतीं. त्यांत चुनीलाल मेहतांचा हात होता. ते तात्यांना भेटले आणि तडजोडीच्या अटींसंबंधीं विश्वसनीय माहिती त्यांच्याकडून तात्यांना समजली. त्यांनीं तडजोड कोणीं, कधी कशी यासंबंधीं विवेचक अग्रलेख लिहून कंपोजलाहि दिला. मी प्रुफें घेऊन त्यांच्याकडे गेलों व आरंभीं व शेवटीं कांहीं शाब्दिक फरक सुचविले. मला हा सर्वच लेख घेऊं नये असें वाटतें हें त्यांना सहजच उमगलें. ते एकदम म्हणाले, "हें आर्टिकल तुला छापावेंसें वाटत नाहीं असाच याचा अर्थ आहे." मी म्हणालों, "होय. शेवटीं तुम्ही सांगतां तशींच कांहीं तडजोड निघेलहि. परंतु आधीं आपण लिहिलें तर चळवळीचे पाठिराखे म्हणतील आम्हीं त्यांचे पाय ओढले. ही संधि त्यांना कशाला द्यावी!" तात्यांनीं सुचवलेली तडजोडच पुढें झाली हें खरें; पण त्यांनीं त्या वेळीं

हा तडजोडवादी अग्रलेख काढून ठेवण्यास संमति दिली, या त्यांच्या उदारपणाचें मात्र मला अद्यपिहि आश्चर्य वाटतें !

❋

दामोदर विश्वनाथ गोखले

(बी. ए., एल्एल्. बी., पुणें)

(१) लो० टिळकांना साठ वर्षें संपून एकसष्टावें वर्ष लागत होतें. त्या वेळीं त्यांचा सन्मान कसा करावा यासंबंधीं विचार करण्याकरितां पुणें येथील सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत पुढाऱ्यांची सभा भरली होती. सभा, भाषणें, मेजवानी वगैरे मामुली प्रकारच्या सूचना पुष्कळ आल्या. श्री. केळकर हे जवळ जवळ प्रथम गप्पच होते. यवतमाळचे तपस्वी डॉ. बाबासाहेब परांजपे यांना जाहीर सभांचा कार्यक्रम पटेना. त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, लोकमान्य जिवंत परत येतील अशी आमची कल्पना नव्हती. ते सुखरूप परत आले याबद्दल आनंद व्यक्त करण्याकरितां त्यांच्या चळवळीला मदत होईल असा समारंभ पाहिजे. या भाषणानंतर श्री. तात्यासाहेब केळकर हे त्या सभेंत जोरानें भाग घेऊं लागले. त्यांच्या बोलण्यावरून असें स्पष्ट दिसलें कीं, ते कांहीं तरी योजना मनांत ठरवून आले होते. त्यांनीं हळूहळू आपली कल्पना पुढें मांडली. ती म्हणजे, एकसष्ट्याव्या वाढदिवसानिमित्त एक लाख रुपयांची थैली लोकमान्यांना आपल्या पक्षातर्फे अर्पण करावी, ही होय. यापूर्वी अशा तऱ्हेची थैली महाराष्ट्रांत कोणाला अर्पण केली नव्हती; व त्या काळीं एक लाख रुपये म्हणजे फार मोठी रक्कम असें वाटत होतें. श्री. तात्यासाहेब केळकर यांची कल्पना सभेंत जमलेल्या लोकांना पटली. पण एक लाख रुपये जमविण्याची हिंमत कोणासहि वाटली नाहीं. श्री. केळकर यांनीं मात्र पूर्ण आत्मविश्वासानें हें कार्य हातीं घेतलें, व अगदीं अल्पावधींत म्हणजे दहा बारा दिवसांतच अत्यंत परिश्रम करून, अनेक सहकाऱ्यांचे दौरे ठरवून व स्वतः ठिकठिकाणीं जाऊन ही कल्पना यशस्वी केली. सभेंतच त्यांनीं स्वतःचा एक हजाराचा आंकडा टाकला; व त्यांच्या प्रोत्साहनानें तेथेंच मोठी रक्कम जमली. अनेकांनीं आपल्या शक्तीबाहेर त्या वेळीं रकमा दिल्या. ही रक्कम लोकमान्य स्वतः कधींहि घेणार नाहींत, ते एक लाख रुपये राष्ट्रीय चळवळीलाच देतील, ही श्री. केळकर यांची खात्री होती व तसेंच पुढें झालें. त्यामुळें महाराष्ट्रांत थैल्या देण्याचा पायंडाहि पडला. पण श्री. केळकरांची सत्त्वपरीक्षा यापुढेंच या बाबतींत व्हावयाची होती. पैशाचा पाऊस पडूं लागला. समारंभाचा दिवसहि ठरला. त्या वेळीं मुंबईतील कांहीं वडिलधाऱ्या पुढाऱ्यांनीं बातमी आणली कीं, सरकारला हें पाहवत नसल्याकारणानें समारंभाच्या पूर्वीच लोकमान्यांना अटक केली जाणार आहे. यावर उपाय म्हणून त्यांनीं तोडहि अशी सुचविली कीं, हा निधि जमविण्याचें

काम बंद करावें व समारंभ खाजगी रीतीनें करावा. श्री. तात्यासाहेबांच्या निश्चयाच्या परीक्षेची ही वेळ होती. मुंबईतील व पुण्यांतील हें मत असणारे पुढारी चडील तर होतेच, पण वजनदारहि होते. पण श्री. केळकरांनीं या पुढाऱ्यांचें म्हणणें मान्य केलें नाहीं. त्यांनीं थोडेसें रागावून पण आवेशानें जाहीर केलें कीं, "लोकमान्यांना अटक झाली तर लाख रुपयांची थैली त्यांच्या तसबिरीच्या पायाशीं अर्पण करीन, पण हा उपक्रम सोडणार नाहीं." अखेर केळकरांचा विजय झाला, हें सांगणें नकोच. वाढदिवसाच्या दिवशीं लोकमान्यांवर राजद्रोहाच्या गुन्ह्याबद्दल नोटीस बजावण्यांत आली. पण समारंभ मात्र फारच बहारीचा झाला. लोकमान्यांनीं एक लाख रुपये जनतेस परत केले व येथूनच त्यांच्या कार्याच्या वाढीस सुरुवात झाली. महाराष्ट्रातील हाच सर्वांत मोठा पहिला निधि; व त्याचें ब्रह्मदेवत्व श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याकडे जातें.

(२) लो. टिळक चिरोल खटल्याच्या कामाकरितां विलायतेस जाण्यास निघाले, ती वेळ महायुद्धाची होती. आगबोटीहि बुडत होत्या, म्हणून कोलंबोच्या मार्गें विलायतेस जाण्याचें ठरलें. लोकमान्यांनीं आपल्या चळवळीसंबंधींचीं धोरणें जवळच्या मंडळींस सांगितलीं. सार्वजनिक कामाची इतरहि पुष्कळ आवराआवर केली. पण 'केसरी-मराठा' छापखान्यांची व वृत्तपत्रांची त्यांना समाधान होईल अशी व्यवस्था मात्र झाली नव्हती खरी. त्यांना तितका वेळ व उसंतहि नव्हती. कोलंबोस गेल्यानंतर ज्या दिवशीं संध्याकाळीं आगबोटीनें विलायतेस जावयास निघावयाचें, त्या दिवशीं दुपारीं वर उल्लेखिलेल्या व्यवस्थेतील एका उणीवेनें लोकमान्य बेचैन होते. त्यांचे भाचे व 'केसरी' चे व्यवस्थापक कै. श्री. बाबासाहेब विद्वांस हे कांही तरी मृत्युपत्र अगर व्यवस्थापत्र करून ठेवणें बरें असा लोकमान्यांना सल्ला देत होते. तथापि त्यांचा निश्चय होत नव्हता. शेवटीं त्यांनीं श्री. तात्यासाहेबांचें मत विचारलें. श्री. तात्यासाहेब हे लोकमान्यांच्या खाजगी प्रकरणांत त्यांना विचारल्याशिवाय कांहीं बोलत नसत; व तें थोडें अवघडहि होतें. त्या वेळीं लोकमान्यांनीं विचारलें म्हणून त्यांनीं सांगितलें कीं, "काय धोरण ठरवावयाचें असेल तें मनाशीं ठरवा. पण मृत्युपत्र मात्र करून टाकावें हें उत्तम." श्री. केळकर यांच्या या सल्ल्याचा परिणाम होऊन लोकमान्य व कै. विद्वांस हे लोकमान्यांच्या खोलींत गेले व दोन तास विचारविनिमय करून त्यांनीं मृत्युपत्र लिहिलें. कोलंबोस लोकमान्यांच्या बरोबर त्यांचे कायदेपंडित स्नेही होते. पण हें मृत्युपत्र मात्र कोणालाहि दाखविलें नव्हतें. 'केसरी' व 'मराठा' हीं पत्रें आणि छापखाना व त्याबरोबर गायकवाडवाड्यांतील पश्चिमेकडील जागा यांचा 'पब्लिक ट्रस्ट' केल्याचें त्या मृत्युपत्रांत लिहिलें होतें. हें मृत्युपत्र करण्याचा निश्चय त्यांनीं केला हेंच ठीक झालें. कारण त्यामुळें श्री. केळ-

कर व श्री. विद्वांस यांना पुढची सध्यां चालू असलेली व्यवस्था करतां आली. नाहीं तर काय झालें असतें हें कल्पनेवरच सोडणें बरें. या श्रेयाचा मोठा वांटा श्री. केळकर यांच्याकडे जातो.

(३) श्री. केळकर यांच्यावर, टिळकांना त्यांच्या एकसष्ट्याव्या वाढदिवसानिमित्त जो आहेर करण्यांत आला, त्याबाबत अनेक प्रसंग आले. त्या वेळीं एक सद्गृहस्थ लोकमान्यांकडे आले व त्यांनीं लोकमान्यांना वरील निधींतून कांहीं रकमा दडपल्या गेल्या, असें सांगितलें! उघड उघड त्यांचा कटाक्ष श्री. केळकरांना बदनाम करण्याचा होता. लोकमान्यांच्या लक्षांत ती गोष्ट ताबडतोब आली. ते संतापले व त्यांचा संताप अनिवार होऊन त्यांनीं वर उल्लेखिलेल्या गृहस्थाला "जिन्याची पायरी उतरून चालते व्हा," असें सांगितलें. "माझा श्री. केळकरांवर पूर्ण विश्वास आहे. त्यांच्याविरुद्ध असले गलिच्छ आरोप मी कधींहि ऐकून घेणार नाहीं. हे आरोप करणारांचेंच तोंड त्यांत फुटेल; मी जीं माणसें माझ्याजवळ केलीं व होमरूलच्याच काय पण सर्व सार्वजनिक कामांत त्यांच्यावर विश्वास टाकला, तो योग्य होता. या माणसांवर आरोप करणें म्हणजे त्यांना जवळ करणारा मी अक्कलशून्य आहें असें म्हणण्यासारखें आहे. तें मी कधींहि सहन करणार नाहीं." – असे तडकाफडकी उद्गार काढून खरोखरीच लोकमान्यांनीं त्यांना जिन्यावरून खालीं केलें. श्री. केळकर यांच्यावर लोकमान्यांचा केवढा विश्वास होता, हें या प्रकरणांत चांगलेंच दिसलें.

(४) असहकारितेच्या काळांत दारूबंदीचा उपक्रम हा एक चळवळीचा प्रमुख भाग होता. धारवाडास अशाच तऱ्हेची दारुबंदीची चळवळ चालली असतांना दारूच्या दुकानावर निरोधन करणाऱ्या स्वयंसेवकांवर तेथील फौजदारांनीं गोळीबार केला; व त्यांत कांहीं जबर दुखापती झाल्या. धारवाडचें हें प्रकरण त्या वेळीं फार गाजलें. लोकांत तर एवढी दहशत बसली होती कीं, दिवसाढवळ्या गांवांत शुकशुकाट झाला होता! अशा या ओणीवाणीच्या प्रसंगीं बेळगांवचे श्री. गंगाधरराव देशपांडे यांनीं त्यांच्या पुणें बेळगांवकडील सहकाऱ्यांसह तेथें जाऊन लोकांना धीर दिला व एक नवें धैर्य लोकांत निर्माण केलें. यांच सुमारास श्री. तात्यासाहेब केळकर हेहि धारवाडच्या लोकांना धीर देण्यासाठीं व चौकशीसाठीं पुण्याहून तेथें गेले. त्या दिवशीं तेथें भरलेल्या जाहीर सभेंत श्री. केळकर यांनीं जें भाषण केलें तें कर्नाटकांतील लोक अद्याप विसरले नाहींत. त्यांनीं त्या सभेंत दारुबंदीच्या चळवळीचें महत्त्व वर्णन केलें. लो. टिळकांनीं १९०८ पासून ही चळवळ कशी वाढविली याचें मार्मिक विवेचन केलें आणि शेवटीं स्वराज्य मिळविण्याकरितां असले लढ्याचे प्रसंग किती उपयोगी पडतात हें सांगून, या लढ्यांत होणाऱ्या आत्मत्यागाची त्यांनीं स्तुति केली. या त्यागाच्या यज्ञांतूनच

अखेर स्वराज्याची देवता अवतरेल असें त्यांनीं आश्वासनपूर्वक सांगितलें. श्री. केळकर यांच्या भावनात्मक भाषणांपैकीं हें एक भाषण होतें; व कर्नाटकांत कांहीं पोवाड्यांत तें आजहि नमूद आहे!

(५) १९३० सालच्या मिठाच्या सत्याग्रहाचा प्रारंभ होता. स्वराज्य पक्ष आणि प्रतिसहकार पक्ष यांचे पुढारी या नात्यानें श्री. केळकर यांनीं कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांच्या अनेक उपक्रमांना कसून विरोध केला होता. त्या विरोधाची मीमांसा या ठिकाणीं करण्याचें कारण नाहीं. अधिकाराच्या जागा कौन्सिलमध्यें शिरून काबीज कराव्या हें त्या विरोधाचें बीज होतें, हें सहज समजण्यासारखें आहे. लढाऊ कार्यक्रम ठेवावा असा आग्रह होता इतकेंच. १९३० सालीं मिठाचा सत्याग्रह सुरू करून कायदेभंगाची सुरवात कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं केली. पण प्रकृतिभिन्नत्वानें व पूर्वीच्या विरोधाच्या दृष्टीनें श्री. केळकर अगर त्यांचा पक्ष कॉंग्रेसच्या चौकटींत बसूं शकत नव्हता. पण हा चढाईचा लढाऊ कार्यक्रम श्री. केळकर यांना मान्य होता. म्हणून या प्रश्नाचा विचार करण्याकरिता १९३० सालीं टिळक स्मारक मंदिरांत सभा भरली, त्या वेळीं श्री. केळकर यांनीं पुढाकार घेऊन सत्याग्रहाला पाठिंबा दिला; व त्या चळवळींत आपल्या पक्षानें भाग घ्यावा असें ठरविलें.

श्री. तात्यासाहेब यांचा आग्रह येवढाच होता कीं, सत्याग्रहाचीं शिबिरें आपल्या पक्षामार्फत स्वतंत्र उभीं करावीं; त्यांच्या खर्चाकरितां कॉंग्रेसकडे तोंड वेंगाडूं नये; व वाटेल त्या वेळीं हा सत्याग्रह मागें घेण्याची आपणांस मोकळीक ठेवावी. हें धोरण अर्थातच सर्वांना पटलें; व मौज ही कीं, हें पटतांच श्री. केळकर यांनीं स्वतः मिठाचा सत्याग्रह करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें तावडतोब ते पेंणला निघून गेले व तेथें त्यांनीं जाहीर सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारून बेकायदेशीर मीठहि तयार केलें!

(६) कै. तात्यासाहेब केळकर यांच्यावर जे अनेक अडचणींचे प्रसंग गुदरले त्यांत सर्वांत नाजूक, सर्वांत अवघड व सर्वांत भयंकर असा प्रसंग म्हणजे ते व लोकमान्यांचे दोन चिरंजीव यांनीं उत्पन्न केलेले तंटे व कुरबुरी होत. श्री. केळकर यांची या वेळी एका दृष्टीनें परीक्षाच झाली. लोकमान्यांवरील निःसीम श्रद्धा, लहानपणापासून वाढविलेल्या दोन्ही चिरंजिवांबाबत प्रेम — 'केसरी-मराठा' संस्था शाबूत व कार्यक्षम राहावी म्हणून तळमळ या भावनांची त्या वेळीं ओढाताण होती. लोकमान्यांच्या चिरंजिवांनीं श्री. केळकर यांच्यावरच बालंट घेतल्यामुळें उत्पन्न झालेली परिस्थिति फारच गुंतागुंतीची होती. अशा वेळीं लोकमान्यांच्या द्वितीय चिरंजिवांनीं आत्महत्या केली; व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे पत्र लिहून या हत्येचें पाप 'केसरी' संस्थेच्या विश्वस्तांच्या माथीं मारलें! याच वेळीं श्री. केळकर यांच्या शत्रुस्थानीं

असणाऱ्या कांहीं वृत्तपत्रांतून त्यांच्यावर बेहद्द व बेसुमार असा अन्यायी हल्ला चढविण्यास सुरुवात झाली. एका पत्रानें तर त्यांच्यावर या खुनाचा आरोप करण्यासहि कमी केलें नाहीं. प्रसंग मोठा बांका होता. या वृत्तपत्रांतील लेखकांना वस्तुस्थितीची कल्पनाच नव्हती. पण कांहीं गोष्टींची वाच्यता करणेंच केळकरांना शक्य नव्हतें. एरवीं श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या स्वाभिमानाला धक्का देणाऱ्या प्रतिस्पर्ध्यांचें 'बोडण' ते कसें करीत हें प्रसिद्ध आहे. पण या वेळीं मात्र त्यांनीं उत्तर दिलें नाहीं ! त्यांच्या या मौनाबद्दल त्यांना एकवार विचारलें असतां त्यांनीं सांगितलें कीं, " माझा स्वाभिमान दांडगा आहे. पण त्यापेक्षाहि लोकमान्य व त्यांचें कुटुंब यांच्या प्रतिष्ठेची चाड मला अधिक आहे. माझ्यावर हल्ला करणाऱ्यांची भंबेरी वाजविण्याचें सामर्थ्य माझ्यांत आहे; व त्यांना नेस्तनाबूत करण्याइतका मजजवळ पुरावाहि भरपूर आहे, पण मी तें करूं इच्छित नाहीं. मी मुकाट्यानें मार सोशीन; पण यांत गुंतलेल्या कांहीं गोष्टींची वाच्यता करणार नाहीं. अखेर ईश्वरच मला न्याय देईल. " श्री. केळकर यांच्या या उद्गारांत त्यांची भावनोत्कटता दिसते; व त्याबरोबरच गंभीर चारित्र्यहि दिसतें.



दिनकर वासुदेव दिवेकर

(एम्. ए., सहसंपादक 'केसरी', पुणें)

(१) कै. तात्यासाहेब मोठेपणाकरितां अगर मानाकरितां कधींहि हपापलेले नसत. १९२३-२४ सालीं मध्यवर्ती असेंब्लीची निवडणूक झाल्यावर पहिले सरकार-नियुक्त अध्यक्ष सर फ्रेडरिक व्हाईट यांच्यानंतर लोकप्रतिनिधिनियुक्त अध्यक्षाची निवडणूक व्हावयाची होती. विठ्ठलभाई पटेल निवडून आले. त्या वेळीं सरदार मुतालिक यांचें मत सरकारी उमेदवाराविरुद्ध पटेल यांस तात्यासाहेबांनीं कसें मिळवून दिलें व पटेल एकच मत अधिक पडून निवडून कसें आले तो इतिहास प्रसिद्ध आहे. त्या वेळीं असेंब्ली स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष पं. मोतीलाल नेहरू यांची इच्छा तात्यासाहेबांनींच उभें राहावें अशी होती. मोतीलालजींनीं तात्यासाहेबांस एकदोन वेळां खाजगी भेटींत तसें सुचविलेंहि; तथापि त्यांनीं होऊन हा महनीय मान सोडून पटेल यांसच पक्षातर्फे उभें केलें व स्वतः उभें राहण्याचें पंडितजींस थोडें दुखवूनदेखील नाकारलें.

(२) कानपूर येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या वेळीं पतियाळा किंवा इंदूर या दोनपैकीं एका संस्थानांतून तीनचार दरबारी दूत अगदीं गुप्त रीतीनें त्यांची भेट घेण्यासाठीं आले होते. त्या संस्थानांची दिवाणगिरी तात्यासाहेबांनीं स्वीकारावी अशी महाराजांची तीव्र मनीषा असल्याचें त्यांनीं निवेदन केलें; परंतु तात्यासाहेबांनीं त्यांस स्पष्ट नकार दिला.

(३) त्यांच्या उद्योगप्रियतेचीं उदाहरणें सहस्रशः सांपडतात. लो. टिळकांचा मृत्युलेख हें जसें एक उदाहरण आहे तसेंच त्यांनीं कानपूर येथें हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून जें भाषण केलें त्याचें लेखन हें दुसरें गणलें जाईल. त्यांची अध्यक्षस्थानीं नियुक्ति झाल्याची तार त्यांस ते कानपुरास राष्ट्रीय सभेच्या बैठकीसाठीं निघण्यापूर्वी कांहीं तासच मिळाली. पण त्यांनीं अध्यक्षपद त्या सबबीवर न नाकारतां पुण्याहून गाडींत बसण्यास निघण्याच्या घटकेपर्यंत भाषण लिहून पुरें केलें. तें घाईत लिहिलेलें भाषण त्यांनीं श्री. अण्णासाहेबांस दाखविलें. त्यांस तें फार आवडलें. मग तात्यासाहेबांनीं तें भाषण कसें लिहिलें त्याची कथा सांगितली व विनोदानें विचारलें, मी घाईगर्दीत कसें तरी लिहितों तेंच सावकाशीच्या लेखांपेक्षां अधिक सरस असतें कीं काय !

नरहर विष्णु गाडगीळ

(बी. ए., एलएल्. बी., दिल्ली सरकारचे मंत्री, मु. दिल्ली)

(१) १९१५ च्या सुमारास तात्यासाहेब यांच्या सान्निध्यांत येण्याचा प्रसंग येऊं लागला व त्याचें कारण त्यांचे चिरंजीव बापू केळकर यांची मजबरोबर असलेली मैत्री हें होय. त्या वेळीं मी, बाबा धारप, बापू जोशी, बापू केळकर, सदूभाऊ जोगळेकर, वगैरे मंडळींचा एक तरुण संघ असून, आम्ही एकत्र जमून चर्चा करीत असूं. मधूनमधून मी केळकरांच्या घरीं जाई. त्यांचें लक्ष चांगल्या रीतीनें वेधण्याचें एका गंमतीच्या प्रसंगानें घडलें. नेने घाटावर पानसुपारीचा समारंभ होता. तेथें तात्यासाहेब आले. जवळच लोड वगैरे होते. त्याला टेकून त्यांनीं कुणाला तरी बसण्यास सांगितलें. सदरहू गृहस्थ भिडस्तपणें नाकारत होते. येवढ्यांत मी म्हणालों, प्रत्येकाला बैठक लागतेच; शंखाला सुद्धा अडणी अगर जंगमाचा खांदा असावा लागतो. तात्यासाहेबांनीं मजकडे टवकारून पाहिलें. विनोद बोचक होता. तो गुदगुल्या करणारा असावा हें त्यांचें सूत्र पुढें फार वर्षांनीं मला अवगत झालें. हेंच सूत्र खरें प्रभावी ठरतें हा अनुभव आहे.

(२) १९२०-२१ म्हणजे असहकारतेची वाढती कमान होती. सार्वजनिक सभेंत कांहीं वकिलांची सभा भरून त्यांत वर्षभर वकिली सोडावी असा प्रश्न निघाला, त्या वेळीं मी जिल्हा कमिटीचा चिटणीस होतों. धंद्यांत नाममात्र प्रवेश होता. मीं माझें नांव दिलें. सभेनंतर तात्यांनीं माझ्या परिस्थितीची चौकशी केली. पुढील बैठकींत मजसारख्यांची व्यवस्था करण्याची तात्यांची इच्छा होती. बैठकीस लोक जमत; पण पुढील व्यवस्था हा प्रश्नच मागें पडला ! तात्यासाहेबांनीं मला स्वतः व्यवस्था करतों म्हणून सांगितलें. पण मीं नाकारलें. वर्षभर वकीली नाममात्र केली

व सर्व वेळ काँग्रेसच्या कामास देत होतों. अनेक वेळां तात्यांनीं मदतीबद्दल विचारलें. मीं नाकारलें, पण त्यांनीं मात्र आपली जबाबदारी पार पाडण्याची केव्हांहि तयारीच दाखविली.

(३) एका वादत्या राजकारणांत मतभेद झाले. १९२५ सालीं तांबे प्रकरण झालें. गहजब झाला. रात्रीं पुण्यांतिल सर्व कार्यकर्त्यांना तात्यांनीं आपल्या घरीं बोलाविलें. केलें तें बरोबर आहे कां व पुढें काय करावें असे दोन प्रश्न त्यांनीं विचारले. सुमारें शंभर मंडळी होती पण दोनतीनजणच बोलले, व ते सर्व त्यांचें कृत्य योग्य होतें असें म्हणत होते. मला विचारलें तेव्हां मी सांगितलें, " तुम्ही चूक केलीत. तार धाडावयास नको होती. एक तर ती मान्य करून मिटवावें नाही तर नेटानें नवीन मार्ग काढावा. " सर्व लोक रागानें मजकडे पाहत होते. त्या वेळेपासून मी दूरदूर होऊं लागलों. पण त्यांच्या ' गत गोष्टींत ' चूकच झाली असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला ! इतर लोक मी शिष्ट, अति शहाणा म्हणून समजूं लागले; पण तात्यांनीं आपल्या खाजगी वर्तनांत कांहीहि फरक होऊं दिला नाही.

(४) केसरीत मीं कधींच लिहिलें नाहीं. मराठ्यांत मधूनमधून लिहीत असे. नांबानें अगर अन्य रीतीनें. त्यामुळें तात्यासाहेबांना असें वाटलें की, माझी इच्छा संपादक मंडलांत यावे अशी आहे; व एक दिवशीं १९२२ मध्यें त्यांनीं मला जेवण्यास बोलाविलें व तसें विचारलें. मी म्हणालों कीं, माझी तशी महत्त्वाकांक्षा नाहीं. मी लिहितों तें कांहीं तरी सेवा व्हावी या उद्देशानें. त्यांनीं विचारलें, मग तुम्ही काय ठरविलें आहेत ! मी म्हणालों १५ वर्षें वकीली करावयाची व नंतर पूर्णपणें वेळ राजकारणास द्यावयाचा. तोंवेळपर्यंत सामान्य राहणीला पुरेल येवढें मी मिळवीन. हें ऐकून त्यांना फार आनंद झाला व हेंच मालवीयांनी केलें व हाच योग्य मार्ग आहे असें ते म्हणाले. त्याप्रमाणें मी वागलों व धंद्यांतसुद्धां मधूनमधून पक्षकार तात्यासाहेब यांच्याकडून येत असत. राजकारण करणाऱ्यांनीं कोणावर चरितार्थासाठीं अवलंबून राहूं नये, स्वावलंबी असावें, असा त्यांचा उपदेश असे. वैयक्तिक निःस्पृहता नसेल तर राजकारण बोटचेपें होतें हा अनुभव सर्वत्रच येतो !

(५) १९२९ मध्यें काँग्रेसचें अधिवेशन लाहोरमध्यें होतें. मी त्यांच्याबरोबर राजा नरेंद्रनाथ यांच्याकडे उतरलों होतों. स्वातंत्र्याचा ठराव त्यांना सर्वस्वी पसंत नव्हता. तेथील मुक्कामांत व प्रवासांत चर्चा चाले. ठरावाला पाठिंबा दिला, आतां पुढें कसें होईल म्हणून चर्चा चाले. आतां प्रचंड चळवळ अटळ आहे. २६ जानेवारी १९३० ला प्रतिज्ञापत्रवाचन झालें. त्याच दिवशीं नवी व जुनी पिढी यांतील रेषा स्पष्ट झाली. तात्यांचें मन द्विधा झालें व शेवटीं त्यांनीं सत्याग्रहहि केला. पण हीच गोष्ट सुरुवातीस केली असती तर – तर कांहीं निराळाच इतिहास झाला

असता! वैयक्तिक धैर्य त्यांच्यांत नव्हतें हा आरोप खोटा आहे. कारण मला प्रत्यक्ष त्या वेळची परिस्थिति माहीत आहे; पण हा समज केवढा व्यापक होता. याचें एक उदाहरण देतों. अलिबाग लॉकपमध्यें मी असतां एक पोलीस अधिकारी त्यांच्याबद्दल निंदास्पद बोलूं लागला. त्याला मीं सांगितलें, 'तुम्हांला तात्या माहीत नाहींत व तुमची त्यांना बोलण्याची लायकी पण नाहीं. थोर व चांगल्या माणसाची निंदा करणें हें पाप आहे. तसेंच मुकाट्यानें निंदा ऐकून घेणें हेंहि पाप आहे. तेव्हां मजसमोर तुम्ही बोलूं नका.' 'तुम्ही खुद्द त्यांच्यावर टीका कां करतां!' त्यानें प्रश्न विचारला. मी उत्तर दिलें, "त्यांच्या सार्वजनिक कार्यावर मी टीका करतों व तीहि सर्वमान्य सभ्यतेच्या मर्यादा संभाळून." अनेक मित्र माझ्यावर रागवतात. कां तर मी खाजगी भाषणांत विरोधकांवर टीका करीत नाहीं व सार्वजनिक भाषणांत त्यांना सोडत नाहीं. माझा दंडक मित्रावर खाजगी टीका व त्यांना सार्वजनिक पाठिंबा; विरोधकांवर सार्वजनिक टीका व खाजगी रीतीनें गुणग्रहण असा आहे. तात्यांनीं खाजगी कुणाचीही निंदा केली नाहीं, किंबहुना असें होत असेल तेथें ते नापसंती दर्शवीत. खाजगी व वैयक्तिक जीवन म्हणजे रणसंग्राम नव्हे अगर शनवारवाड्यापुढील मैदान नव्हे. या जगांत निर्दोष कोणी नाहीं, म्हणून, केवळ निंदा व दोषदर्शन करून समाज सुधारत नाहीं.

(६) १९३४ सालापर्यंत समोरासमोर उभे राहून युद्ध खेळण्याचा प्रसंग आला नव्हता. निवडणुकीनिमित्त तो आला. प्रहार करणें जरूर होतें. पण आघात करावयाचा नव्हता. पराभव करावयाचा होता, पण वैर उत्पन्न करावयाचें नव्हतें. एकाच वेळीं सामर्थ्य व सभ्यता दाखवावयाची होती. मराठी वर्तमानपत्रांतून माझ्या भाषणाच्या विपर्यस्त बातम्या येत होत्या. गैरसमज होणें साहजिक होतें. माझीं भाषणें कडक होतीं, पण त्यांत निंदा नव्हती. भीष्माच्या पायापाशीं आदराचे चार बाण सोडून अर्जुन लढला तसेंच माझें होत होतें. तात्यांची योग्यता सांगून मी धोरणावर टीका करीं. बातमीदार पहिला भाग गाळून दुसरा लिहीत. वास्तविक त्यांना आमचे संबंध माहीत होते. उभे राहण्याचें ठरल्यानंतर तात्यांच्या घरीं जाऊन आशीर्वाद व चहा घेऊन आलों होतों. आशीर्वाद जरी शब्दांनीच त्यांनीं स्पष्ट केला नव्हता तरी मनोमन त्याची खात्री मला पटली होती.

जेव्हां निवडणुकीचा निकाल त्यांना मध्यरात्रीं कळला त्याबरोबर त्यांनीं लिहिलेलें अभिनंदन-पत्र हें सौजन्याचा व खिलाडूपणाचा व अभिजात पुरावा असें तें होतें. "तुम्हांला मिळालेलें यश अगदीं योग्य आहे, त्याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों. तुम्ही बिनविरोध निवडून यावें अशी माझी इच्छा होती. उद्यांच्या सभेंत मजवर टीका करण्याची तुम्हांस इच्छा होईल तशी व मला योग्य ठरेल अशी टीका करण्यास तुम्ही मोकळे आहांत. (You may, however, criticise me in

tomorrow's meeting as you desire or as I deserve.) मीं एका अक्षरानेंहि तात्यांच्या विरोधाबद्दल सभेंत उल्लेख केला नाहीं. निवडणुकीच्या हलकल्लोळांत व तीव्र आघाताप्रत्याघातांत मैत्रीविषयक पुष्कळ अपघात (Casualties) होतात. पण मी असें म्हणूं शकतों कीं, मीं मित्र कमी न करतां शत्रूंना मित्र करून घेतले यांचें श्रेय तात्यांच्या मजवर झालेल्या शिकवणुकीचाच परिणाम होय.

(७) मध्यवर्ती असेंब्लीचें अधिवेशन संपलें म्हणजे अगत्यपूर्वक मी त्यांना भेटे. तसेंच प्रत्येक खेपेस तुरुंगांतून सुटून आल्यानंतरहि भेटे. आमच्या या भेटी म्हणजे तासदीडतास उत्कृष्ट वातावरणांतील चर्चेचा आस्वाद घेण्याची संधिच होती. उतारवयांतसुद्धां सकाळीं काव्यप्रकाशासारखे ग्रंथ एखाद्या कॉलेजमधील विद्यार्थ्यानें वाचावेत इतक्या तन्मयतेनें वाचतांना त्यांना मीं पाहिलें आहे. रिकामटेकड्या चकाट्या पिटणें अगर कंपूंत बसून कुटाळक्या करणें हे त्यांना कधींच आवडत नसे; व प्रत्येक क्षण ज्ञानार्जनांत खर्चण्याच्या कामीं त्यांची तत्परता असे. रोज चांगल्या ग्रंथाचीं निदान शंभर पानें वाचल्याशिवाय झोपावयाचें नाही असा त्यांचा दंडक होता, व एका वेळीं निदान दोन कप चहा घेणें असा त्यांचा शिरस्ता असे! पैकीं दुसरें मीं भक्तिभावानें उचललें आहे; पहिलें अद्यापि नीट जमत नाहीं. मात्र कारागृहांतील विश्रांतीच्या वेळेचा ग्रंथ लिहून सदुपयोग केला हें ऐकून त्यांना फारच आनंद वाटला व त्याप्रमाणें त्यांनीं माझ्या पुस्तकावर अभिप्राय देऊन व्यक्त केला आहे. त्यांच्या नेतृत्वाची बैठक विद्वत्ता होती.

(८) १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य प्राप्त झालें. तें याच देहीं याच डोळां त्यांनीं पाहिलें. कॉंग्रेसविरोधकांपैकीं अनेकांना पक्षाभिमानामुळें कसेसेंच वाटलें. तात्यांना आनंद झाला व त्यांनीं लेखांत व व्याख्यानांत तो प्रकटहि केला. केवढें कार्यक्षेत्र निर्माण झालें आहे असें ते म्हणत. आतां सर्व पक्षांनीं एक होऊन देशाची प्रगति संपन्नतेकडे केली पाहिजे, असा त्यांचा कटाक्ष असे. कॉंग्रेसनें व्यापक दृष्टि ठेवून सर्वपक्षीय मंत्रिमंडळ बनविलें हें चांगलें केलें असेंहि ते म्हणत. सप्टेंबर १९४७ मध्यें मी पुण्यास मंत्री म्हणून आलों, तेव्हां खासगी बैठकींत तसेंच शिवाजीमंदिरांतील सभेंत मध्यवर्ती मंत्रिमंडळाला पाठिंबा द्यावा, असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. "श्री. गाडगीळ यांच्यावर आमचा विश्वास आहे. ते सांगतात कीं, मंत्रिमंडळ दक्षतेनें वागत आहे. आमचें समाधान झालें. आमची सदिच्छा, सद्भावना व सहकार्य मंत्रिमंडळामागें आहे". हें त्यांचें वाक्य सदरहू सभेंतील अध्यक्ष या नात्यानें उच्चारलेलें अद्यापि माझ्या कानाला सुखवीत आहे. पक्षापेक्षां देश श्रेष्ठ आहे, व्यक्तीचा अहंकार देशाच्या प्रतिष्ठेपेक्षां अधिक नाहीं, ही गोष्ट ते कालज्ञ होते म्हणून जाणत. या दृष्टीनें ते मुत्सद्दी होते. अतीतावर भाष्य करणारे नुसते इतिहासकार नसून भावी कालाला कलाटणी कशी द्यावी हें सांगणारे ते द्रष्टे होते.

विद्यमानांत वयामुळें ते प्रयत्नविन्मुख दिसत असले तरी विचारसृष्टींत त्यांचें अखंड कार्य चालूच असें. विद्वान् पण निगर्वी, नेता पण अनुयायांना मोकळीक देणारा, रसिक पण सदभिरुचिपूर्ण, साहित्यिक असून व्यवहार जाणणारा असा हा विरळा नरश्रेष्ठ होता. दैन्यावांचून जीवन त्यांनीं घालविलें व आयासाशिवाय मृत्यूला जवळ केलें. मराठीमार्फत ज्ञानदान दिलें व मृत्यूमार्फत सृष्टीचें जीवनासाठीं घेतलेलें ऋण फेडलें! त्यांचे दोष जे काय असतील ते चितेवर संपले; त्यांचे गुण हाच त्यांचा वारसा आहे व तो जितका वाढवूं तितका अधिक वाढणारा आहे.

❋

महादेव चिंतामण केळकर

(बी. ए., निवृत्त डे. कलेक्टर, तात्यासाहेबांचे ज्येष्ठ बंधु, जळगांव)

(१) चि. तात्यासाहेब मॅट्रिक झाले त्या वेळीं मी फर्स्ट बी. ए. नापास झालों व नाना पास झाले. माझी स्कॉलरशिप बंद झाली. परंतु नानास श्रीमंत मिजरकर बाळासाहेबांनीं बी. ए. च्या अभ्यासास एक वर्षाचा खर्च २५० रु. दिला. त्यामुळें ते डेक्कन कॉलेजांत गेले. वडिलांस पगार ५५ रु. मला खर्च देऊन तात्यास कॉलेजांत जाणें शक्य नव्हतें. तथापि आमच्या मातुश्रीनीं कर्ज काढून तात्यांना कॉलेजांत घातलें. यामुळें त्यांचें पुढील शिक्षण झालें.

(२) मॅट्रिकमध्यें असतांना तात्या इंग्रजी व संस्कृतचे पेपर इतके चांगले लिहीत कीं, त्या वेळचे हेडमास्तर आण्णासाहेब अत्रे ते जपून ठेवीत. एक वेळीं दाजीसाहेब खरे त्यांच्याकडे उतरले असतां त्यांनीं ते पेपर त्यांना दाखविले व म्हणाले कीं, आमचा हा विद्यार्थी किती उत्तम लिहितो तें पाहा. पुढील मोठेपणाचे पाय पाळण्यांत दिसतात याचें हें उदाहरण आहे.

(३) तात्यासाहेब एल्एल्. बी. झाले व साताऱ्यास वकिली करूं लागले. त्या वेळीं त्यांच्या डोक्यांत एक वर्तमानपत्र काढण्याचा विचार होता. त्या वर्तमानपत्राचें नांव 'जज' ठेवावें असें ते म्हणत. यावरून त्यांच्या विचाराची चुणूक दिसते. पुढें दैवयोगानें ते लो. टिळकांकडे गेले व मग साहजिकच ते वर्तमानपत्राचे संपादक झाले व तेथें त्यांनीं इतकें यश मिळविलें!

❋

सौ. गिरिजाबाई केळकर

(तात्यासाहेबांची भावजय, जळगांव)

(१) आमच्या काशिनाथबापूंचें लग्न झालें. नवी नवरी घरांत आली तेव्हां सगळीं मुलं मला विचारूं लागलीं कीं, आम्हीं तर तुला वहिनी म्हणतों; मग

हिला काय म्हणायचें! तात्या चटदिशी म्हणाले, ही माझी 'ए वहिनी' आहे. तुम्हीहि ए वहिनीच म्हणतां; या तुमच्या नव्या बहिनीला अहो वहिनी म्हणा म्हणजे झालं!

(२) माझें लग्न झालें तेव्हां आमच्या घरांत साक्षरतेपेक्षां जास्त शिकलेल्या बायका नव्हत्या. तेव्हां लग्न झाल्यानंतर तीन वर्षांनीं माझा प्रथम लेख मासिक मनोरंजनांत बक्षिस मिळून आला; तेव्हां आम्ही धुळ्याला होतों व भाऊजी पुण्यास होते. ते पुढें लगेच धुळ्यास आले व मला पाहतांच हंसत हंसत हात पुढें करून "काढा पेढे, काढा" म्हणाले. मला कांहींच अर्थ न कळल्यामुळें मीं घोटाळलें. मग जेवतांना ते म्हणाले, "आपल्या घरांत पहिली स्त्री लेखिका झाली म्हणून पेढे नाहीं कां वाटले!"

(३) पुण्यास बुक-कमिटीच्या सभेला मी आलें असतांना एक गृहस्थ मला भेटायला आले व इंग्रजींतच बोलूं लागले. तात्या जेवत होते. ते खालीं मान घालूनच बसले. त्या गृहस्थाला वाटलें ह्या विदुषीबाई (त्याला काय ठाऊक कीं, मी विदुषी नसून लोकांनीं बनवली आहे) ह्यांना इंग्रजी येत असेल. ते गेले व तात्या वर मान करून हसूं लागले व मग म्हणाले, "वहिनी, डायरेक्ट मेथड पद्धतीनें तूं इंग्रजी शिक बरं! पूर्वीच शिकावयाला पाहिजे होतें, म्हणजे अशी मानहानी झाली नसती!"



द. के. केळकर

(बी. ए., प्राध्यापक, ग्रंथकार, तात्यासाहेबांचे चुलत बंधु, मुंबई)

(१) तात्या लेख लिहीत असतां कोणी भेटावयास आला कीं लेख बंद करीत आणि तो निघून गेला कीं लगेच जेथें सोडला तेथून पुढें लिहावयास लागलीच सुरवात करीत. त्यामुळें सगळ्या लेखाचे चित्र जणू कांहीं त्यांच्या डोळ्यांपुढें उभेंच असावें, किंवा क्रमशः तें चित्र आपोआप विस्तृत होत जावें असें वाटे. लोक भेटावयास येत ते रोजच. पण एका दिवशीच्या प्रसंगाची मला विशेष आठवण राहिली आहे. गांधीयुग सुरू झाल्यावर टिळकांच्या अनुयायांपैकीं कांहीं अखेरपर्यंत तटस्थ राहिले व कांहीं सुरुवातीला तटस्थ राहून नंतर गांधीपक्षांत सामील झाले. या सामील झालेल्यांपैकी एक पुढारी परगांवाहून पुण्यास तात्यांच्याकडे उतरावयाकरितां रात्री आला होता. रात्रीं जेवण वगैरे झाल्यावर दहा वाजण्याच्या सुमाराला महात्माजींच्या मताविषयीं चर्चा सुरू झाली. प्रथम प्रथम चर्चा दोन मित्रांत चालावी अशा स्वरूपाची सौम्य होती; पण सुमारें अर्ध्या तासानंतर दोघांचाहि आवाज चढतां चढतां इतका चढला कीं, माडीवर जोरानें चाललेला हा वादविवाद ऐकून आम्हां खालील

मजल्यावरच्यांना भीति वाटूं लागली कीं, हे दोघे मित्र आतां हातघाईवर येतात कीं काय ! दोघांचेहि आवाज उत्तरोत्तर चढतच चालले आणि दोघांच्यांतला वादविवाद चालला तो रात्रीं सुमारे दोन वाजेपर्यंत चालला ! पण या प्रसंगाचा उल्लेख जो मी करीत आहें तो तात्या कांहीं वेळा संतापूनहि बोलत, या करितां नव्हे; तर मला असें पुढे सांगावयाचें आहे कीं, रात्रीं दोन वाजेपर्यंत कडाक्याचा वाद झाला असतांहि नेहमींप्रमाणें सकाळी सहा वाजतां तात्यांना व त्यांच्या मित्रांना चहा देण्याकरितां म्हणून मी माडीवर जेव्हां गेलों तेव्हा पाहतों तों तात्या नित्याप्रमाणें लेखन करीत बसलेले ! जणू कांहीं रात्रीं कांहींच घडलें नाहीं. तात्यांच्या मेंदूला निरनिराळे कप्पे होते की काय कोणास ठाऊक ! म्हणजे असें कीं, भांडण-तंट्यांत चार-दोन तास घालविले तरी वादविवाद संपतांच तो मेंदूचा कप्पा जणूं कांहीं बंद करून टाकावयाचा; व दुसरा कप्पा उघडावयाचा, अशी तात्यांची वागणूक असे. राजकारणांतलीं अनेक कामें करीत असतांहि तात्या प्रचंड वाङ्मय निर्माण करूं शकले, तेंहि आपल्या मेंदूचे कप्पे पाडण्याची जी कला त्यांना साध्य झाली होती त्यामुळेंच करूं शकले असें मला वाटतें.

(२) या प्रकारचा आणखी एक प्रसंग मला आठवतो. तो फेरोजशहा मेहेता यांचा मृत्युलेख तात्यांनीं लिहिला त्या वेळचा. तात्यांचे थोरले बंधु अप्पासाहेब यांच्या मुलीच्या विवाहसमारंभाकरितां आम्ही सर्व जळगांवास आप्पांच्याकडे गेलो होतों. संध्याकाळची वेळ, लग्नसमारंभाची मोठी मिरवणूक निघणार होती तात्याहि कपडे घालण्याच्या तयारींत होते. इतक्यांत तात्यांच्या नांवानें एक तार घेऊन तारेचा शिपाई आला. तात्यांनीं तार फोडून पाहिली. तार मराठा पत्राच्या उपसंपादकाची होती. सुप्रसिद्ध पुढारी फेरोजशहा मेहेता परलोकवासी झाले होते. ती शुक्रवारची संध्याकाळ होती. मराठा पत्र रविवारीं बाहेर पडावयाचें, तेव्हां शनिवारीं त्यांत लेख छापला जाणें आवश्यक होतें, म्हणून उपसंपादकांनीं तात्यांना तातडीची तार धाडली होती. तात्यांनीं तार आप्पासाहेबांच्या हातांत दिली व म्हणाले, तुमची मिरवणूक चालूं द्या ! मला आतां लेख लिहून रात्रीं मेल जायच्या आंत टपालांत टाकला पाहिजे, असें म्हणून त्यांनीं लगेच मला हांक मारली व कागद शाई घेऊन आम्ही वरच्या मजल्यावर जाऊन बसल्यावर सुमारे पांच मिनिटें होतात न होतात तोंच त्यांनीं मेहेतावर अग्रलेख सांगण्यास सुरवात केली. दीड-दोन तासांत लेख पुरा झाला व लगेच स्टेशनवरच्या पोस्टांत जाऊन मी तो ताबडतोब जाण्याची व्यवस्था केली.

(३) राजकारणांत उपस्थित केल्या गेलेल्या सगळ्याच प्रश्नांशीं तात्या समरस होत नसत हें सांगावयास नकोच. एक प्रसंग मला आठवतो त्याचा उल्लेख

करतों. एकदां मोठें धरण बांधण्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. आतां धरण बांधावयाचें म्हणजे आसपासचीं अनेक खेडीं उध्वस्त होणार होतीं, हें सांगावयास नकोच. त्यांतील खेडुतांना अन्य ठिकाणी जमिनी घेण्यास व घरें बांधण्यास लागणारा पैसा देण्यास धरण बांधणारी कंपनी तयार होती; पण आपलें घरदार सोडून जाण्यास ते खेडूत साहजिकच नाराज होते. तात्यांची प्रकृति ठीक नसल्यानें त्या वेळीं हवा खाण्याकरितां आम्ही पुण्याजवळीलच हवाशीर अशा यवत नांवाच्या खेड्यांत आठ-पंधरा दिवस राहण्यास गेलों होतों. तात्या तेथें असतांना वर उल्लेखिलेला धरण बांधण्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. खेड्यांतल्या लोकांनीं या बाबतींत सत्याग्रह करावा व धरण बांधण्यास विरोध करावा, असें कांहीं लोकांचें मत होतें व त्या मताचा पुरस्कार केसरीनें करावा याकरितां पुण्याहून दहाबीस मंडळी एक दिवस दुपारच्या वेळीं यवतास तात्यांच्याकडे आली. मंडळींनीं आपली विचारसरणी सविस्तर तात्यांच्यापुढें मांडली. तात्यांना ती सर्वस्वीं पसंत पडणें अशक्यच होतें. ज्यांना जमिनी व घरें सोडावीं लागणार होतीं त्यांना देऊं केल्यापेक्षां अधिक पैसा देण्याबद्दल आग्रह धरण्यास तात्या कबूल होते, पण धरण बांधण्यासच विरोध करावा हें तत्त्व मान्य करण्यास कबुली देणें हें तात्यांना अवघड होतें; त्या वेळीं परकीय राज्य होतें व धरणाच्या निमित्तानें कां होईना पण खेडुतांच्यामध्यें सत्याग्रहाच्या चळवळीची कल्पना रूढ करितां येईल अशीहि त्यांच्या पुरस्कर्त्यांना आशा होती. पण तात्यांना धरणबांधणीला विरोध करणें कठीण वाटलें तर नवल नाहीं. यामुळें तात्यांनीं केसरीच्या पुढच्या अंकांत जो यासंबंधीं लेख लिहिला तो तात्यांची भेट घेण्याकरितां पुण्याहून यवतास येणाऱ्यांना सर्वस्वीं पसंत पडण्यासारखा नव्हता हें सांगावयास नकोच. आज काळ बदलला आहे व आपल्या सरकारनें अनेक धरणें बांधण्याची योजना लोकांच्यापुढें मांडली आहे. आज त्या कल्पनांना विरोध होत नाही हें सांगावयास नकोच. पण तात्यांच्या बाबतींत वरील प्रसंगाचा उल्लेख करावयाचा तो अशाकरितां कीं, तात्यांच्या बुद्धीस जी गोष्ट पटली नाहीं ती केवळ लोकाग्रहास्तव मान्य करणें तात्यांना फार कठीण वाटे, हें स्पष्ट करण्याकरितांच होय. पुढें वर उल्लेखिलेलें तें धरण बांधलें गेलें हें सांगावयास नकोच!



येसूताई आठवले

(तात्यासाहेबांची चुलत बहीण, पुणें)

(१) सुमारें ४२ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. त्या वेळीं माझें वय २०–२१ वर्षांचें व माझी धाकटी बहीण काशी हिचें १५ वर्षांचें असेल. आदल्या वर्षीच काशीचें लग्न झालें होतें. ती वर्षे यांच्याकडे दिली. त्या वर्षी आम्हीं घरची सर्व मंडळी म्हणजे

आमची आई, स्वतः मी, बहीण काशी व भाऊ प्रो. दत्तुकाका असे मिळून मिरजेहून बैलगाडीनें नरसोबाच्यावाडीस जात होतों. आम्हांबरोबर मी आमच्या शेजारच्याच एका केळकर आडनांवाच्या घरांतील दोन वर्षांचा छोटा मुलगाहि घेतला होता; कारण तो त्यांचा मुलगा सदा मजजवळच असे व माझी त्याला आईपेक्षांहि अधिक संवय लागली होती. प्रवासांत असतां एका खेड्याजवळ आम्ही आलों. दुपारचें अकरा-बारा वाजण्याचा सुमार होता आणि तेथेंच आमच्या बैलगाडीच्या चाकाची धांव निघाली. जवळपास कोठेंच पाणी, विहीर किंवा कांहीं नव्हतें आणि धांवेवर घालावयास थोडेंतरी पाणी हवें होतें. म्हणून आमचा गाडीवाला दूर अंतरावर घरगुती दुकानासारखें एक खोपटें दिसलें तिकडे गेला व पाणी मागूं लागला. तेथें त्या वेळीं चारपांच टगे बसलेले होते, त्यांनीं त्याला धुडकावून लावलें व पाणीबिणी कोठलें आलें आहे असें म्हणून त्याला परत लावला. पण माझी बहीण काशी ही स्वभावतःच धिटुकली व जहांबाज होती. ती पाणी देत नाहींत म्हणजे काय असें म्हणून आपली गाडींतील तपेली घेऊन खालीं उतरली व त्या दुकानांतील लोकांकडे जाऊन जोरानें म्हणाली, " अहो, गाडीची धांव निघाली म्हणून आम्हांस पाणी पाहिजे. प्यायलासुद्धां तुमचें पाणी नको आहे, " असें म्हणून तिनें ती तपेली त्यांच्यापुढें आदळली. गंमत अशी झाली कीं, ती तपेली बसलेल्यांपैकीं एका इसमानें सहज उचलून घेऊन पाहिली, त्याबरोबर त्याच्या वृत्तींत एकदम परिवर्तन झालें व तो नरमपणानें म्हणाला, तुम्ही केळकरांच्या घरची मंडळी का ? व मग त्यानें घरांत जाऊन घागरभर पाणी आणून दिलें व म्हणाला, आणखी लागलें तरी पाणी न्या ! हा सगळा प्रभाव काशीच्या तपेलीवर ठोकलेल्या तात्यांच्या नांवाचा ! ही तपेली कांशीला तिचें लग्न झाल्यावर दुर्गाताईनें (तात्यासाहेबांच्या पत्नी) दिलेली होती. असो; हा प्रसंग आमच्या विनोदाला प्रवासभर व पुढेंहि कायमचा उपयोगी पडला व काशी तर घरीं आल्यावर सगळ्यांना सांगूं लागली कीं, माझ्या तपेलीनें तुम्हांला पाणी मिळालें ! माझी तपेली दुसऱ्या कोणाला मिळावयाची नाहीं, असें ती जोरजोरानें सांगूं लागली व त्या प्रवासांतील ती गंमत सांगूं लागली म्हणजे जो कांहीं हंशा पिके त्याला सीमा नाहीं. सांगण्याचें तात्पर्य हें कीं, तात्यांचें नांव त्या वेळींहि सगळीकडे इतकें खेड्यांपाड्यांतूनसुद्धां माहित झालेलें होतें.

(२) माझ्या लहानपणीं तात्यांनीं मला अंगाखांद्यावर खेळविलेलें आहे. मी जात्याच गोरीपान, देखणी व स्वच्छ असे व त्या वेळीं आमच्या घरांत लहान मूल म्हणजे मीच तेवढी. यामुळें माझें कौतुक फारच होत असे. तात्या पहिल्यानें विलायतेला गेले त्या वेळचा प्रसंग. घरून निरोप घेतांना संध्याकाळीं तात्या देवघरांत देवाला नमस्कार करून माजघरांत आले व तेथें घरांतील सर्व मंडळी जमली होती त्यांत येऊन बसले. या वेळीं आक्काच्या सासूबाई काकी देशपांडेहि साताऱ्याहून मुद्दाम

आलेल्या होत्या. त्यांनीं तात्यांच्या हातावर दही घातलें. त्या वेळीं तात्यांचा नातू श्रीधर पांच-सहा वर्षांचा होता. तो तात्यांच्याजवळ बसला होता. मी जवळच तेथें उभी होतें. तात्यांनीं मजकडे पाहिलें व मला जवळ बोलावून लहान मुलासारखा माझ्या पाठीवरून हात फिरवला. श्रीधरला चमत्कारच वाटला. त्याला वाटलें मी येवढी पोक्त बाई आणि तात्या माझ्याप्रमाणेंच यांच्या पाठीवरून हात फिरवत आहेत; तें पाहून तात्याच श्रीधरला म्हणाले, "अरे श्रीधर, तूं आतां जेवढा लहान आहेस तेवढीच तुझी ही आत्याबाई होती. तुझ्यासारखीच तरतरीत आणि स्वच्छ असे आणि तुझ्याप्रमाणेंच तिला मी अंगाखांद्यावर खूपखूप खेळविलें आहे बरं का ! म्हणून आतां घरांतून बाहेर पडतांना हिच्याकडे पाहून कसेसेंच वाटत आहे !"

(३) माझ्या बालपणांतील गोष्ट; आई वगैरे नेहमीं सांगत.मला त्याची आठवण अर्थातच नव्हती. कारण मी त्या वेळीं दोन-अडीच वर्षांची होतें. घरांत मी एकटीच तान्हें मूल. यामुळें नेहमीं जो तो मला अंगाखांद्यावर खेळवी. तात्या तर मला घेत असत व मी त्यांना फार आवडे. एक दिवस ते शाळेंतून घरीं आले. मी दारांत खेळत होतें. त्यांनीं लगेच उचलून मला घेतलें; पण त्या वेळीं त्यांच्या खिशांत टांक होता तो माझ्या पायांत घुसला व मी किंचाळून रडूं लागलें. पायास रक्तहि आलें. तात्यांना फारच वाईट वाटलें; परंतु आई बोलल्यामुळें तर त्यांना तें अधिक लागलें. त्या वेळची ती टांकाच्या जखमेची खूण अद्याप माझ्या पायावर आहे. लहानपणीं ती जखम पाहून कोणी हें काय लागलें म्हणून विचारलें आणि आईनें ती हकीकत सांगितली म्हणजे त्यांना वाईट वाटे. त्यांच्या मृत्यूच्या अगोदर दोन दिवस आम्ही सर्व दुपारीं जेवावयास बसलों असतां हीच गोष्ट तात्यांनीं कशावरून तरी बोलणें निघालें असतां मुलांस सांगितली.

(४) एक दिवस माझ्या आईनें मला पुष्कळ मारलें म्हणून मी मोठ्या-मोठ्यानें रडत उभी होतें. इतक्यांत तात्या घरीं आले. त्यांनीं मला उचलून घेतलें व ते आईलाच पुष्कळ बोलले व म्हणाले, "काकी, ही कांहीं तुझ्या एकट्याचीच नाहीं समजलीस, आम्हां सर्वांचीच आहे. तिला अशी मारत जाऊं नको गडे. तिला असें मारूं लागलीस म्हणजे माझ्या काळजांत कसेसेंच व्हावयाला लागतें बुवा !"

(५) माझें लग्न अगदीं लहानपणीं म्हणजे मी पांच वर्षांची असतांनाच झालें. सतराव्या वर्षी मी माहेरीं परत आलें. पहिल्या खेपेच्या दिवसांत माझ्या सासरची सर्व मंडळी म्हणजे पति, सासू, नणंद अशी गेली. फक्त मामंजी म्हातारे तेवढे राहिले होते. कशाच्या बिसाच्या वर्षापर्यंत मी सासरींच होतें. पुढें मामंजीहि वारले म्हणून मी कायमची माहेरीं राहण्यास आले. त्या वेळीं तात्याच मला मिरजेस येऊन पुण्यास घेऊन आले. माझ्या मामंजींनीं वारण्याआधीं घराची सर्व

व्यवस्था केली. त्यांत मला फक्त पांचशें रुपये दिले व बाकी घरदार सर्व लेकीच्या नांवानें करून टाकलें. त्याचा साहजिकच मला फार राग आला होता. पुण्यास आल्यावर एक दिवस बोलत असतांना मीं रागानें म्हटलें, "म्हातारड्यानें मला कांहीं एक ठेवलें नाही." पण तात्यांना मीं सासऱ्याबद्दल उच्चारलेले शब्द बिलकूल आवडले नाहींत व ते रागानें मला लगेच म्हणाले, "खबरदार असला शब्द पुन्हा तोंडांतून काढशील तर – असे शब्द बोलूं नयेत."

(६) पुण्याच्या घरांत मनमोकळेपणानें हंसणारी, धिंगाणा घालणारी माहेरवाशीण म्हणून मी प्रसिद्ध आहें व अखेरपर्यंत तात्यांच्या समोरहि तो माझा हक्क मी "सदर परवानगी" असल्यासारखा बजावीत आलें आहें. तात्यांच्या मृत्यूपूर्वी अवघ्या दोनच दिवसांची गोष्ट आहे व तिची आठवण होऊन आतां मला चटका लागला आहे. त्या दिवशीं अगदीं सकाळीं आम्ही बायकामंडळी स्वयंपाकघरांत भाजी वगैरे चिरीत बसलों होतों. इतक्यांत नेहमींच्या परिपाठाप्रमाणें रात्रीं स्वतः आपल्या हातानें वर नेलेला पाण्याचा तांब्या स्वयंपाकघरांत घासण्याच्या जागीं ठेवण्याकरितां तात्या घेऊन आले व खालीं वाकले. थंडीचे दिवस असल्यामुळें त्यांनीं धाबळीची गांध्याची माकडटोपी डोक्याला घातली होती. ती पाहून मला इतकें अनिवार हसूं लोटलें कीं, सांगतां सोय नाहीं. तेव्हां तात्यांना कळेना व ते काय काय म्हणून हंसत चौकशी करूं लागले. तेव्हां मीं सांगितलें, दुसरें कांहीं नाहीं; तुमची ही गोंध्याची टोपी बघितली म्हणून हसूं आलें इतकेंच. त्यावर ते लगेच हंसत म्हणाले, हात्तिच्या! येवढेंच ना? नुसती टोपीच काय घेऊन बसलीस? ही पहा जुन्यासारखी मी बाराबंदीसुद्धां अंगांत घातली आहे, असें म्हणून त्यांनीं शालजोडी दूर करून दाखवली व ते हंसत हंसत बाहेर निघून गेले.

❋

डॉ. कमलाबाई देशपांडे

(पीएच्. डी., प्रिन्सिपॉल; तात्यासाहेबांची कन्या, पुणें)

(१) उभ्या जन्मांत तात्यांनीं कधीं घरांत एखादा दागिना करून आणलेला अगर त्यांत लक्ष घातलेलें आठवत नाहीं. पण एकदां त्यांनीं एकदम एक नथ आणवून सर्वांना आश्चर्यचकित करून सोडलें.

१९४३ सालीं जिमखान्यावरील आमच्या बंगल्यांत चोरी झाली व त्यांत ताईची नथ चोरीला गेली. देवपूजेच्या वेळीं नथ नाकांत घालावयाचा तिचा नेम असे व त्यामुळें ती नेहमीं देवघरांत असे. त्या दिवशीं ती स्वयंपाकघराच्या कपाटांत राहिली व चोरीहि नेमकी त्याच दिवशीं होऊन त्यांत नथ चोरीला गेली. त्यामुळें सर्वांनाच हळहळ वाटली; पण त्यांत नथ गेल्यानें जरा विशेष वाईट वाटलें. ताई-

लाहि अर्थात् वाईट वाटलेंच. पण अशा गोष्टीबद्दल हळहळत बसण्याची अगर मनस्ताप करून घेण्याची तिची वृत्ति नाहीं. आपला योग असतो तोंवर वस्तु आपली असें म्हणत नाकावर नथेऐवजीं कुंकवाचें बोट टेकून तिनें देवपूजा केली. 'जिन्नस असे कसे बाहेर ठेवले!' म्हणून तात्या रागवावयाचे ते रागावणार, पण ते मुळींसुद्धां कांहीं म्हणाले नाहींत, यांचेंच तिनें सर्वांना कौतुक करून सांगितलें. तिचे नित्यक्रम नेहमींच्या शांत व प्रसन्न मनानें चालूं झाले. घरांत मी त्या वेळीं आजारी निजून होतें. मलाहि राहवेना. ताईनें मनाला लावून घेतलें नाहीं तरी पूजा करतांना नाकांत नथ असावी अशी तिची एक प्रकारें धार्मिक श्रद्धा मला माहीत; आणि दागिना करून द्या असें न म्हणण्याची तिची पद्धत त्याहून माहीत. तेव्हां मींच एक नथ दुसऱ्या दिवशीं विकत आणली व तिला दिली. तिसऱ्या दिवशीं नवी नथ घालून ती देवपूजेला बसावयास व तात्या आंघोळ करून देवघरांत यावयास एक गांठ पडली, "ही नथ कुठली?" त्यांनीं हंसत विचारलें.

"ही आक्कानें मला विकत घेऊन दिली." ताईनें सांगितलें.

"आतां मी पण गंमत सांगतों," तात्या म्हणाले; "मींहि पण एक नथ मागविली आहे. माझा विचार होता कीं, नथ आल्यावरच देऊन मग सांगावयाचें. पुण्यांत मी दातारांना निरोप धाडला असतां तर तुम्हांला कळलें असतें. तुम्हां सर्वांना एकदम नथ दाखवून मला आश्चर्यचकित करावयाचें होतें म्हणून मीं मुंबईस लिहिलें आहे. एकदोन दिवसांत नथ येईल. तूं कांहीं दागिना मागावयाची नाहींस म्हणून म्हटलें आपणच द्यावा."

सर्वच मंडळी हंसूं लागली. कारण एक नथ चोरीला गेली पण दोन नथा मिळाल्या! 'न मागे तयाची रमा होय दासी!' हेंच खरें.

(२) कै. ती. तात्यांच्या स्वभावांतील एक वैशिष्ट्य म्हणजे शक्य तेवढी दुसऱ्याची सोय पाहण्याची वृत्ति. मला आठवतें तसें आमचें घर म्हणजे सल्लामसलतीचें मुक्तद्वार. कोणींहि केव्हांहि यावें व आपली अडचण सांगून त्याबद्दल सल्ला विचारावा. गांवांत राहत होतों तेव्हां व जिमखान्यावर आलों तेव्हांहि हीच पद्धत कीं, आलेल्या माणसाला तिष्ठत न ठेवतां काम ऐकून घेऊन आपलें मत सांगून मोकळें करणें. अलीकडे दुपारीं दोन तास ते झोंपत; तेव्हां मात्र कोणीहि आलें तरी त्यांना झोपेंतून उठवावयाचें नाहीं असें धोरण असें. पुष्कळदां पानावर भात वाढला असला तरी चटदिशी उठून बाहेर बोलावयास जात व पानांत वाढलेला भात काढून झांकून ठेवण्याची वेळ येई. स्वतःचें जेवण थोडें उशीरां झालें तरी चालेल, पण लांबून चालत आलेल्या माणसास तिष्ठत ठेवणें हें त्यांना संकट वाटे. अलीकडे शेवटीं महिना दीड महिना त्यांची प्रकृति बरी नव्हती. मध्यंतरीं आठ-दहा दिवस

त्तर ते नुसते ताकावर होते. पण अशा वेळींहि जरा हुशारी वाटली कीं, पुनः उठून काम करण्याची वृत्ति बळावे. याच उपासाच्या दिवसांत एक दिवस भांडारकर इन्स्टिट्यूटमधून चिठ्ठी आली कीं, भांडारकर स्मृतिदिनाचे नियोजित अध्यक्ष येऊं शकत नाहींत, तेव्हां तुम्ही याल काय ! त्यांनीं होकार दिला व दोन दिवसांत थोडीं पुस्तकें आणून 'कौटिलीय अर्थशास्त्रा'वर अध्यक्षीय भाषण केलें. व्याख्यान माहितीपूर्ण व परिणामकारक झालें व व्याख्यान ऐकण्यास गेलेल्यांना ते आजारी आहेत, ताकावर आहेत, असें मीं सांगितलें तेव्हां आश्चर्य वाटलें.

(३) या दिवसांत कांहीं वेळां ते मला सांगत कीं, "आक्का, तूं मधल्या हॉलमध्यें वाचीत बसतेस; तेव्हां कोणीहि आलें तरी त्यांना सांग, मी भेटूं शकत नाहीं, आजारी आहे." पण हा नियम अंमलांत आणीपर्यंतच मोडण्याची वेळ येई ! त्यांना जरा विश्रांति मिळून हुशारी वाटली कीं, तेच आल्यागेल्यांचा आवाज ऐकला की उठून माडीच्या दाराशीं येत. एके दिवशीं दुपारीं रा. रा. बाबासाहेब साळवेकर व जगन्नाथमहाराज घरीं आले. तात्यांनीं नुकतेंच मला सांगितलें होतें कीं, "कोणीहि आलें तरी त्यांना मी भेटत नाहीं म्हणून सांग !" पण बाबासाहेब मुद्दाम मुंबईहून आलेले; म्हणून मी थोडी विचारांत पडलें व ताईला भेटण्यासाठीं त्यांना थांबवून घेतलें. येवढ्या वेळांत तात्यांना थोडें बरें वाटून ते उठून बसले होते व खालीं बाबासाहेबांचा आवाज ऐकतांच माडीच्या दारांत येऊन त्यांनीं बाबासाहेब व जगन्नाथमहाराज यांनाच वर हांक मारली व पुढें संभाषण सुरू झालें !

(४) त्यानंतर पुन्हां एके दिवशी त्यांनीं मला दुपारीं हांक मारली व सांगितलें कीं, "मी आतां झोपतों. कोणीहि आलें तरी मला बरें नाहीं, मी भेटत नाहीं असें सांग." सुमारें एक तासानें रा. बाबुराव भडभडे आले. डॉ. ॲनिबेझंट यांचा जन्मशताब्दि उत्सव एक ऑक्टोबरला होता. त्यानिमित्त कांहीं काम होतें. रा. भडभडे यांना तात्या आजारी असून झोपलें असल्याचें मीं सांगितलें व त्यांनीं संध्याकाळीं पुन्हां येण्याचें कबूल केलें. सरासरी अर्धा तास गेला नाहीं तोंच अहिल्याबाई होळकर कन्याशाळेकडून टांगा आला. कशासाठीं आला हें मला माहीत नव्हतें. म्हणून तात्यांना जाऊन सांगितलें कीं, टांग्याला परत पाठवितें. तोंपर्यंत त्यांना हुशारी वाटूं लागली होती. निरोप ऐकतांच ते म्हणाले, टांगा परत नको पाठवूं. मी जाऊन येतों व उठून लागलीच कोटच अंगांत घातला. मला असेंहि सांगवेना कीं, मी भडभड्यांना तुम्ही आजारी म्हणून सांगितलें आहे. त्यासाठीं तरी तुम्ही आतां बाहेर पडूं नका. मी आपली मनांतल्या मनांत म्हणत होतें कीं, आतां त्यांची व भडभड्यांची रस्त्यांत गांठ न पडो व माझ्याकडे खोटेपणा न येवो म्हणजे झालें !

भाद्रपद महिनाभर त्यांची प्रकृति कांहीं ना कांहीं कारणानें क्षीण होत होती. त्यांतच थोडें बरें वाटलें व मधलें उपोषण सोडून दसऱ्याच्या दिवशीं ते प्रथम मुलांबरोबरच दुपारीं जेवले ते दिवाळीच्या दिवशीं दुपारपर्यंत. दुखणें कांहींच नव्हतें व जरा हुशारी वाटली कीं जातीच्या तापटपणानें हिंडून काम करूं लागत. त्यामुळें इतरांना त्यांच्या क्षीणपणाची खरी कल्पना आली नाहीं. त्यांना मात्र स्वतःच्या क्षीण होणाऱ्या शक्तीची कल्पना येऊन मृत्यूची चाहूल लागली असावी; पण शेवटच्या क्षणापर्यंत स्थितप्रज्ञाप्रमाणें व्यवहार करून त्यांनीं शेवटचा निरोप लिहून ठेवला!

काशिनाथ नरसिंह केळकर

(तात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव, ॲडव्होकेट, ज्योतिर्विद व चित्रकार, पुणें)

(१) तात्यांची अलीकडची वृद्धापकाळची अवस्था पाहून मला नेहमीं त्यांच्या आईची आठवण होई. ती त्यांच्याच सारखी गौरवर्ण व प्रसन्नचित्त होती. सतत काम करीत राहणें हा तिचा गुण तात्यांनीं उचलला होता. जुन्या काळच्या ती पुष्कळ गोष्टी सांगत असे. आजोबांना आम्ही दादा म्हणत असूं व आजीला 'आई' म्हणत होतों. १८९७ सालीं पुण्यास प्लेग होता तेव्हां पुष्कळ माणसें सामान-सुमान टाकून भीतीनें पुणें सोडून गेलीं. दादा व आई मिरजेस निघालीं होतीं व तात्यांना केसरीच्या कामामुळें येथेंच राहणें प्राप्त होतें. त्या वेळीं त्यांचें वय अवघें पंचवीस वर्षांचें होतें व आई मिरजेस जाणार म्हणून ते तिला स्टेशनावर पोंचवावयास गेले होते. स्टेशनावर गर्दी कोण होती व सामानसुमानाचा खच पडला होता. आईशेजारीं कोणी एक बाई बसली होती, तिच्याशीं तिचें सहज बोलणें सुरूं होतें. तात्यांच्या हुशार, तेजस्वी, तरुण मुद्रेकडे बाईनें पाहून विचारलें, " हा मुलगा का तुमचा! " आई म्हणाली. " होय; हा मला पोंचवावयाला स्टेशनावर आला आहे. "

" तो नाहीं का तुमच्याबरोबर येणार मिरजेला ! " बाईनें विचारलें.

त्यावर आईनें सांगितलें, " त्याच्या कामाकरितां त्याला इथेंच राहावयाचें आहे. "

सारें पुणें भीतिग्रस्त असतां हा मुलगा पुण्यांतच राहणार, याचें त्या बाईला फार कौतुक वाटलें व आईला ती म्हणाली, " लोक पुण्याबाहेर जातात ते सारी चीजवस्त, सोनें, रुपें बरोबर घेऊन जातात. तुम्ही मात्र हें 'सोनें' मागें ठेवून जात आहांत ! "

आई यावर काय म्हणणार ! ती हंसून म्हणाली – " होय. असें तर खरेंच ! "

(२) आईचा सहवास तात्यांना दीर्घकाळ लाभला. ते परम मातृभक्त होते. आईनें आपणांकरितां किती कष्ट पूर्वी केले हें ते जाणत होते. तात्यांचा हिंदुस्थान-भर लौकिक होत असलेला पाहून तिला धन्यता वाटे. तात्या कोठेंहि बाहेरगांवीं गेले तरी तिला कधीहि सांगितल्याशिवाय जात नसत व अमुक दिवसांनीं परत येईन असें सांगत. त्यांत बहुधा एक दिवसाचाहि उशीर करीत नसत. १९२६ सालीं ती अगदीं थकली. तेव्हां बहुतेक हा तिचा शेवटचा आजार असें समजून परगां-वच्या सर्व कार्यक्रमांना नकार देऊन तात्या पुण्यांतच राहिले. कलकत्त्याला त्यावेळीं ऑल इंडिया काँग्रेस कमेटीची सभा होती व कांहीं कारणानें सरकारनें पंडित मालवीय यांवर बंदीची नोटीस बजावलेली असतांहि, सरकारी हुकुमाचा भंग करून मालवीय सभेला हजर राहिले. आईच्या आजारामुळें तात्यांनीं दुसरी कोठलीहि गोष्ट मनावर घेतली नाहीं. शेवटीं अखेरचा क्षण आला तेव्हां झटकन् पुढें होऊन तात्यांनीं आपली मांडी दिली, तेव्हां आईनें प्राण सोडला ! तिचें वय झालें होतें हें खरें; पण समोर दिस-णारी 'आई' नाहींशी झाली याचें दुःख त्यांना जाणवलें, पण तें आवरून दुसऱ्याच दिवशीं ते ताबडतोब कलकत्त्याला रवाना झाले ! इतकी त्यांची कर्तव्यनिष्ठा जबर होती. त्यावेळीं टाईम्सच्या बातमीदारानें Mr. Kelkar proceeded to Calcutta, in spite of his mother's death " असे यथार्थ उद्गार काढले होते.

(३) राजकारणांत पुष्कळदां शत्रूंचे मित्र होतात, मित्रांचे शत्रु होतात. मित्रांतहि प्रामाणिक मतभेद इतके होतात कीं, खासगी मैत्री कितीहि दृढ असली तरी त्यावर थोडा तरी परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं. याबद्दल विलायतेंतील फॉक्स व बर्क यांचें उदाहरण प्रसिद्ध आहे. मोतिलाल नेहरू यांच्याशीं तात्यांचा विरोध आला तेव्हां त्यांनींच त्याला कृष्णार्जुनयुद्धाची उपमा दिली होती. पण कृष्णार्जुनाइतके नेहेरूंशीं त्यांचे स्नेहसंबंध केव्हांच नव्हते; पण श्री. बापुजी अणे काँग्रे-सच्या वार्किंग कमिटींत गेल्यामुळें मात्र कृष्णार्जुनयुद्ध खेरं जुंपण्याची वेळ आली ! हा मतभेद तात्यांना फार जाणवला असें त्यावेळच्या केसरीच्या अग्रलेखांवरूनहि दिसून येईल. १९३३ सालीं मुंबईस मी प्रभातचा संपादक होतों. त्या वेळीं तात्यांना भेटावयास सरदारगृहांत गेलों होतों. त्या वेळी उमरावतीचे बामणगांवकर, नागपूरचे गोपाळराव ओगले वगैरे मंडळीहि तेथें आली होती. बापूजी अणे यांच्याबद्दलच गोष्टी निघाल्या होत्या. थोडेसें हंसून बामणगांवकरांना तात्या म्हणाले, " बापूजी अण्यांशीं आमचा मतभेद झाला, यापेक्षां आतां जगांत कांहीं शिल्लक आहे का ! त्यांचें मन तुम्हांला वळवतां आलें तर तुम्ही जरूर खटपट करून पाहा; पण वर्किंग कमिटीची जागा बापूजींनीं प्रथम सोडली पाहिजे. तेथेंच सारा खटका आहे ! त्यांनीं

वर्किंग कमिटीची जागा सोडली म्हणजे बापूजी पुनः आमच्याकडे येण्याला कांहींच प्रत्यवाय नाहीं !"

(४) १९३२ सालीं म. गांधींनीं मंदिरप्रवेशाची चळवळ चालविली होती, तेव्हां ते नुसतेच मोघम बोलत. मंदिर-प्रवेश म्हणजे कांहीं गाभाऱ्यांत प्रवेश नव्हे किंवा देवतेच्या मूर्तीला स्पर्श करण्याचा हक्क नव्हे ! कारण असें झालें म्हणजे भांडणें होऊन रक्तपातापर्यंत मजल जाईल. याकरितां ही गोष्ट स्पष्ट करून त्यांनीं 'समर्याद' विधान करावें, म्हणून मीं महात्मा गांधींना एक पत्र लिहिलें होतें. त्याला त्यांनीं स्वहस्ताने ताबडतोब उत्तरहि पाठविलें. यावेळीं गांधी येरवड्याच्या तुरुंगांत होते व फक्त हवी ती सामाजिक चळवळ करण्याला (अर्थात् तुरुंगांत राहून) त्यांना सरकारनें परवानगी दिली होती. एक दिवस गांधीजींनीं तात्यांना भेटण्याची इच्छा दर्शविली, म्हणून मीहि त्यांच्याबरोबर येरवड्याच्या तुरुंगांत गेलों होतों. उन्हाळ्याचे दिवस असल्यानें एका आम्रवृक्षाच्या छायेंत गांधीजी उघड्या अंगानें बसले असून शेजारीं महादेवभाई देसाई या मुलाखतीचें प्रत्येक अक्षर लिहून घेत होते. गांधींनीं तात्यांशीं बोलतांना "You are my enemy" असें उपरोधिक विनोदानें पहिल्या दोन-चार वाक्यांतच म्हणून, या सामाजिक कार्यांत तुमचें मला सहकार्य पाहिजे अशी विनंती केली. गांधींचे हे शब्द तात्यांना आवडले नाहींत; पण फक्त ते मुद्रेनें दर्शवून तात्यांनीं संवादाला सुरवात केली. आणि व्यावहारिक तोड म्हणून असें सांगितलें कीं, मंदिर-प्रवेश हवा खरा; पण अस्पृश्यांनाच नव्हे तर सर्वांनाच तो हक्क समर्याद असावा. मंदिरांत गाभाऱ्याच्या समोर मूर्तीचें दर्शन घेतां येईल अशी कोठें तरी एक सीमारेषा मानावी; तेथूनच सर्वांनीं दर्शन घ्यावें. गाभाऱ्यांत कोणीच जाऊं नये !" गांधींना ही तडजोड पसंत पडली. नंतर माझ्याकडे वळून गांधी विनोदानें म्हणाले, "तुमच्या काशीनाथानेंहि पत्रांत मला असेंच लिहिलें आहे ! मग विचारांची उसनवारी तुम्ही त्याची केली कीं त्यानें तुमची केली ?" यावर तात्यांनीं सांगितलें, "मी त्याचे विचार उसने घेण्याचें काय कारण ? सार्वजनिक आयुष्यांत त्याच्यापूर्वी किती तरी वर्षें मी आधीं आलों आहे. उसनवारी असली तर त्यानेंच माझी केली असेल !" अशा प्रकारें सुमारें तासभर मुलाखत होऊन म्हणजे त्यांत कांहीं चिमटे, कांहीं हास्यविनोद होऊन आम्ही निघून आलों !

(५) सन १९२४ सालीं ती. तात्यांना दे. बं. दास यांच्या सांगण्यावरून सुभाषचंद्र बोस यांनीं एक पत्र पाठविलें. तात्यांनीं तें वाचल्यावर स्वतःजवळ ठेवण्याकरितां मी तें त्यांच्यापासून मागून घेतलें. तें पत्र विशेष महत्त्वाचें वाटल्यावरून मूळ अस्सल इंग्रजींत असलेलें तें पत्र खालीं देत आहे.

CORPORATION OF CALCUTTA,
Municipal Office, 9–8–24.

My dear Mr. Kelkar,

Deshbandhu is down with colic pain and cannot write to you himself. He has therefore asked me to write this letter to you.

As far as we have been able to judge, you probably dislike the idea of this corporation giving an address of welcome to Mr. V. J. Patel, and your declining the address is probably due to that reason. Mr. Patel's activities in Bombay and his attitude towards Mr. Jayakar and other stalwarts of our party have no doubt antagonised you along with all other Swarajists in India. But we beg of you to look at the question from the point of view of the Calcutta Corporation. This Corporation is no doubt dominated by the Congressmen and particularly by Swarajists. But I desire to point out that there are Congressmen who are not Swarajists, and there are other members of the Corporation who are not Congressmen at all. The proposal to present an address to Mr. Patel was due, not to his activities as a Swarajist, but to the fact that he is the president of the Bombay Corporation. I can assure you that if Mr. Patel had not happened to be the president of the Bombay Corporation, the address would not have been presented to him. You probably know that the resolution to present an address was passed without a single dissentient voice, and in proposing the names of the leaders the reasons were given in each case. Calcutta and Bombay are sister corporations, and Mr. Patel by virtue of his office alone, managed to get in the list to whom addresses would be presented. Mr. Patel's attitude towards the Swaraj Party is a matter which affects us and not the public in general to the same extent. We could not therefore oppose the idea of giving him the address of welcome on account of his anti-Swarajist activities.

You will realise no doubt that the capture of the Calcutta Corporation has been like capturing the citadel belonging to the enemy. We are out to create a new tradition by offering welcome, not to the Governor or any governmental official, but to the representatives of the people. This departure from the track is being looked upon with a critical eye by all our enemies abroad including the Government. If you and Pandit Neheru decline to receive the address, the ceremoney will be a failure, and may have to be dropped, though we have already proceeded too far in making arrangements. If this proposed ceremoney turns out to be a hoax, we shall stand humiliated before the public of Calcutta and the Government. I hope you will spare us this humiliation since you have no desire to put us into a difficult or an awkward position. If you look at the situation from the point of view of the Calcutta Corporation, you will not decline to receive the address.

I am treating your telephonic message to me as a private one and I am writing this to you on behalf of Deshbandhu, myself and our party here, to reconsider your decision and finally agree to receive the address. If you agree I shall tear into pieces the wire you have already sent declining the welcome. At present hardly any one in my office knows about your decision.

We may if you so desire, present a seperate address to Mr. Patel on another day. But you and Panditji must accept our welcome. It is for you to consider whether we should make a separate arrangement for Mr. Patel – But we must have *you* in any case.

Let us, Mr. Kelkar, be charitable to our enemies. What, after all, do we lose if we present an address to the president of the Bombay Corporation? Nobody knows more than Deshbandhu himself about Mr. Patel's ××× activities; but still Deshbandhu has taken up an attitude which I consider to be in

keeping with the lofty principles of the party to which we are all proud to belong.

Please send a reply to this by wire, and on behalf of Deshbandhu and our party here, I again request you to agree to accept the address of welcome. If you agree, you need not refer at all to the wire you have already sent. With best regards.

Yours sincerely,
(Sd.) SUBHAS C. BOSE.

❋

यशवंत नरसिंह केळकर

(बी. ए., तात्यासाहेबांचे कनिष्ठ चिरंजीव, उपसंपादक केसरी, पुणें)

(१) आमच्या लहानपणीं आम्हां मुलांना पर्वणीसारखे दिवस वाटावयाचे ते म्हणजे उन्हाळ्यांतील मे महिन्याच्या सुटीचे. कारण त्यावेळीं वसंत व्याख्यानमाला, नाट्यसंमेलन, इतिहासमंडळाचें संमेलन वगैरे बाबी असत व बहुधा त्या काळांत परगांवचे अनेक नामांकित पाहुणे घरीं उतरावयास येत किंवा तात्यांना भेटावयास येत. यांपैकीं श्री. कृ. कोल्हटकर, वासुदेवशास्त्री खरे व गो. स. सरदेसाई हे तर एकदां तरी एकत्र मिळून भोजनास यावें असें ठरलेलेंच असे. व तो दिवस तात्यांचा त्यांच्यासाठींच जवळ जवळ काढून ठेवल्यासारखा असे. त्यांचीं मनमुराद संभाषणें चोरून तासनूतास ऐकत आम्ही बसत असूं. या वेळचा एक प्रसंग. आम्हीं त्या वेळीं गायआळींतील जुन्या घरी राहत होतों. माजघरांत पानें मांडलीं होतीं. माडीवरून माजघरांत येण्याचा जिना अरुंद असून पायऱ्यावरच्या फळ्या फार गुळगुळीत झाल्या होत्या. भोजनास झालें म्हणून कळल्यावर चौघेंहि म्हणजे तात्या, सरदेसाई, कोल्हटकर व खरेशास्त्री खालीं आले. खरेशास्त्री सर्वांत मागून येत होते. जिना अरुंद व कांहींसा अंधेरा होता. खरेशास्त्र्यांचा पाय पहिल्याच पायरीवरून निसटला व ते अलिकडे क्रीडांगणावर मुलांकरितां घसरगुंड्या केलेल्या असतात त्यावरच्यासारखे शेवटच्या पायरीवर येऊनच थांबले! शास्त्रीबोवा वृद्ध व अंगानें स्थूलहि होते. यामुळें सर्वजण घाबरून धावत जिन्याशीं गेले. सुदैवानें शास्त्रीबोवांना इजा कांहींच झाली नव्हती. तो लहानसा अपघातच टळला व मग शास्त्रीबोवासुद्धां सर्वचजण कोट्या करून हसूं लागले. इतरांच्या कोट्या ऐकल्यावर तात्यांनीं कोटी केली, ती अद्याप स्मरते. ते म्हणाले, "जाऊं द्या. आज खैर झाली. आतां त्या बिचाऱ्या जुन्या जिन्यावर उगाच घसरूं नका."

(२) आमच्या केसरीतील एकवेळचे सहसंपादक श्रीयुत मा. पं. सोमण यांच्या घरीं कांहीं लग्नकार्य झाल्यामुळें त्यांनीं तात्या, बाबा विद्वांस व केसरीच्या संपादकवर्गातील सर्व स्टाफचे लोक यांना जेवावयास बोलावलें होतें. अर्थात् ती सर्व खाशांची स्पेशल पंगत असल्यासारखीच होती. जेवतांना बाबूराव गोखल्यांनीं नेहमींच्या पद्धतीप्रमाणें आपण अगदीं साधेभोळे आहों, असा भाव आणून बाबा विद्वांसाचीं वर्मे काढलीं व चिमटे घेतले. पण बाबा विद्वांस बाबूरावांचें बारसें जेवलेले आणि फटकळपणें समर्पक पण ग्राम्य दृष्टांतहि बोलण्यास न भिणारे; यामुळें त्यांनींहि बाबूरावांच्या डावावर भराभर तोडी करून दाखविल्या. अर्थात् सर्वच प्रकार विनोदानें हंसतखेळत चालला होता. असो; जेवण झाल्यावर आंचवून मंडळी पानसुपारीच्या शोधास लागली. पण तिची व्यवस्था खालीं होत होती; यामुळें बऱ्याच जणांनीं व तात्यांनींहि कपडे चढविण्यास सुरवात केली. तेवढ्यांत कोणीतरी मोठ्यानें म्हणाला, " अरे ! पानाचें तबक दिसत नाहीं कोठें ? मग मुखशुद्धीला काय ?" त्या वेळीं तात्या गमतीनें लगेच म्हणाले, " आम्हांला मुखशुद्धीची तितकी आवश्यकता नाहीं. बाबांचें मात्र पाहा." तेव्हां तेथें मोठा हंशा पिकला. बाबांचा अहोरात्र गडीमाणसांशीं प्रसंग पडावयाचा व त्यामुळें त्यांच्या पेशाला अनुरूप अशी भाषा त्यांच्या तोंडीं अगदीं बद्धमूल झालेली असे. त्याला अनुलक्षून तात्यांनीं विनोदानें ती मुखशुद्धीची कोटी केली होती.

(३) मोठेपणीं स्वतःच्या वडिलांचा लौकिक निरनिराळ्या तऱ्हांनीं प्रतीत झाला तर त्याची बरोबर चिकित्सा करण्याइतकें ज्ञान व समजूत वाढलेली असते; परंतु लहानपणीं असा एखादा प्रसंग घडला म्हणजे आश्चर्य वाटतें. याबाबतचा माझा एक अनुभव पुढीलप्रमाणें आहे. मी बारा वर्षांचा असतांना दक्षिण आफ्रिकेतील गांधींच्या लढ्याकरितां स्वयंसेवक म्हणून घरोघर फिरून वर्गणी जमा केली होती. त्या वेळीं नामदार गोखल्यांचा पुतण्या विष्णु माझा जोडीदार होता. प्लेगमुळें आम्ही झोपड्यांत राहत होतों. यामुळें तो आमचा तेथला आळीकर म्हणून दोस्त झाला होता. मला वाटतें आम्ही दोघांनीं दररोज रस्तोरस्तीं हिंडून महिन्या दोन महिन्यांत तीन-चारशें रुपये तरी सहज मिळवून दिले होते. सर्व्हेट ऑफ इंडियाचे सि. एस्. देवळे हे आम्हांला सत्या करून पावतीपुंस्तकें देत व दर दोन दिवसांनीं सायंकाळीं आम्हीं सोसायटींत जाऊन जमलेल्या रकमेचा भरणा करीत असूं. सि. एस्. देवळ्यांना आमचें फार कौतुक वाटलें व तें त्यांनीं तात्यांच्याजवळ बोलूनहि दाखविलें.त्या दिवशीं तात्यांनीं आमच्या कामाची चौकशी करून हांसत मला शाबासकी दिल्याचें चांगलें स्मरतें. यानंतर मला वाटतें, इंग्रजी तिसरींत किंवा चौथींत असतांना पुण्यांत स्मशानफंड जमविण्यास प्रथम सुरुवात झाली. त्या वेळींहि मी स्वयंसेवक म्हणून पुष्कळ दिवस काम केलें. या फंडाचा भरणा श्री. ज. स. करंदीकर यांजकडे करावा लागे, तेव्हां त्यांची माझी प्रथम ओळख झाली. त्यांनींहि माझें कौतुक केलें. या

वेळच्या स्वयंसेवकपणांत दत्तु बरवे आतां बी. एजी, विठ्ठलराव बरव्यांचा पुतण्या, हा माझा जोडीदार होता. याहि वेळीं प्लेगमुळें आम्ही झोपड्यांतच राहत होतों. सार्वजनिक फंड मागतांना स्वयंसेवकांना किती विविध व विचित्र अनुभव येतात त्याचा प्रत्यय त्या वेळीं मला प्रथमच भरपूर आला. त्या वेळीं आम्ही थोडेसे जाणते असलों तरी १४-१५ च वयाचे. कोणी स्मशानफंड वर्गणी नाकारली तर या मनुष्याला मरण येऊन त्याची फजिती व्हावी म्हणजेच त्याला समजेल अशी आपसांत आम्ही त्याची टिंगल करावी. रामनारायण बंगल्याशेजारीं एका मराठा पाटलाची झोपडी होती. आम्ही त्याच्या बागेंत शिरलों व त्यास पत्रक देऊन याचना केली. तेव्हां त्यानें शिव्या हसडून आपल्या कुत्र्यासच आमच्या अंगावर छू म्हणून सोडलें! तेव्हां अक्षरशः भीक नको पण कुत्रा आवर अशी आमची स्थिति झाली होती. असो. याच सुमारास आम्ही दुपारीं ११-११॥ वाजतां सध्यां एल्. जे. आपट्यांचा बंगला आहे तेथें असलेल्या ब्राह्मणांच्या झोपड्यांत वर्गणी मागत हिंडू लागलों. एका झोपडींत शिरलों, त्या गृहस्थांनीं पत्रक वाचलें परंतु आमची आधी खूप हजेरी घेतली. सध्यां विद्यार्थी फार उनाड व चोरटे झाले आहेत, वगैरे उपदेशाचा मोठा थोरला डोस त्यांनीं आम्हांला पाजला. त्यावर आम्हीं आमचे मिळविलेले आकडे दाखविले व म्हटलें चारदोन आणे दिलेत तरी चालतील. त्याबरोबर ते फारच उसळले व म्हणाले फार फाजील पोरें दिसतात हीं. नांव काय तुमचें, कोणत्या शाळेंत शिकतां वगैरे त्यांनीं विचारलें. मग मला माझें सबंध नांव सांगावेंच लागलें. त्याबरोबर मात्र तो गृहस्थ एकदम नरमच आला व चकित झाल्यासारखा विचारूं लागला, तूं नरसिंह चिंतामण केळकरांचा, तात्यासाहेबांचाच मुलगा! मग हें आधीं कां सांगितलें नाहींस? झालेल्या प्रकारानें जणूं कांहीं आपल्या हातून मोठी वाईट गोष्ट घडली असेंच त्या गृहस्थास खचित वाटलें व परिणाम असा झाला कीं, त्याच गृहस्थांनीं स्वतः आमच्याबरोबर २५-३० ठिकाणीं येऊन अर्ध्या-पाऊण तासांत रोख ३०-४० रु. वर्गणी मिळवून दिली! त्या दिवशीं तात्यांच्या लौकिकाचा असा परस्पर प्रत्यय आला. घरीं आल्यावर हा अनुभव ऐकून सर्वांनाच मौज वाटली. हे गृहस्थ म्हणजे सध्या पुणें येथील गाजणारे सर्जन बंडोपंत घारपुरे यांचे चुलते होते. ते मला अर्थातच ओळखत नसतील; परंतु मी ज्या ज्या वेळीं त्यांना पाहतों त्या त्या वेळीं वरील प्रसंगाची मला आठवण होते.

❋

श्रीधर गोपाळ देशपांडे

(तात्यासाहेबांचे दौहित्र, चीफ एरोड्रम ऑफिसर, सँटाक्रूझ एअरपोर्ट, मुंबई)

(१) जगज्जेत्या शिकंदर बादशहानें एकदां एका साधूला विचारलें कीं, "तुला काय हवें तें माग". आणि साधूनें म्हणे उत्तर दिलें, "माझ्यापुढें उभा

राहिल्यानें तुझी सांवली अंगावर पडते, तेवढी दूर करून अंगावर ऊन पडूं दे म्हणजे झालें. आणखी कांहीं नको तुझ्याकडून!"

देवानें तात्यांना जर विचारलें असेल जन्माला घालण्यापूर्वी तर त्यांचें मागणें असेंच कांही असेल कीं, "नश्वर जगांतली महत्त्वाकांक्षा आणि ऐश्वर्य-लोलुपता यांची छाया माझ्यावर पडूं देऊं नको, फक्त आजन्म ज्ञानाच्या उन्हांत तळपत बसूं दे." देव म्हणाला, "तथास्तु" आणि त्या आशीर्वादाचें प्रत्यंतर म्हणजेच तात्यांचें जीवनचरित्र. साधी राहणी नी उच्च विचारसरणी.

(२) तात्या साधा हिशेब पुढें मांडीत. "रोज एक पानभर लिहिलें तर वर्षाला ३६५ पानें होतील. म्हणजे वर्षभरांत अगदीं विनासायासानें माणसाच्या हातून एकदोन पुस्तकें सहज लिहून होऊं शकतील." त्याप्रमाणें त्यांच्या हातून अखंड लेखन बाहेर पडे. लायब्ररीतून पुस्तकांचा भारा आणीत. चांगलीं लठ्ठ लठ्ठ पुस्तकें. पण तीन दिवसांत त्या पुस्तकांची परत रवानगी ते करीत! पुस्तक प्रथम चाळून त्यांतील नेमका भाग शोधून काढायचा, आणि त्यांतील ग्राह्यांश चटकन आत्मसात करायचा कीं झालें पुस्तकवाचन. सूक्ष्म बुद्धि व उत्तम ग्रहणशक्ति यामुळें ते कोणताहि विषय चटकन अभ्यासून इतक्या सुंदर तऱ्हेनें विषद करून लिहीत कीं, तात्या म्हणजे ज्ञानार्जनाचें शब्दशः यंत्र झालें होतें. एका बाजूनें ज्ञान आत्मसात करायचें कीं लागलीच तें पुस्तकरूपानें सर्वांच्यासाठीं लिहून तयार!

(३) आणखी अेक तात्यांचा गुण म्हणजे त्यांची प्रखर न्यायप्रियता. त्या न्यायप्रियतेनें ताजव्याची पारडी ते अितकी सारखतोल धरत कीं, आपपरभाव, स्नेहार्द्रता, किंवा भाडभीड त्या तोलावर निरुपयोगी ठरत. ही न्यायप्रियता खुद्द व्यवहारांतच काय, पण कल्पनासृष्टींत सुद्धा ते तितक्याच कसोशीनें अमलांत आणीत.

माझी "ठेंगणें अस्मान" कादंबरी वाचल्यावर ते म्हणाले, "त्या श्रवण श्रीकांत सोहोनीनें बनू आठवलेबरोबर गुजराथ मेलनें अेकदां प्रवास केल्यावर त्यानें शेवटी तिच्याशीं लग्न न करणें हें फार अन्यायाचें आहे. कादंबरीचा शेवट तें लग्न दुसरें असलें तरी झालेलें दाखवून करावा." तात्यांच्या मतानें त्यांतील पुष्कळ भाग मी अितक्या स्पष्टपणानें लिहिणें अुचित नव्हतें. पण अितर अनेकांचा अभिप्राय मला अनुकूल पडल्यामुळें त्यांनीं आपला आग्रह सोडला; तरी पण काल्पित गोष्टींतहि त्यांची न्यायदृष्टि किती सूक्ष्म होती व अनीतीची कल्पनाहि त्यांच्या मनाला कशी खपत नसे हें स्पष्ट दिसतें.

(४) बाळबोध मराठी जितक्या सुंदर हस्ताक्षरांत तात्या लिहीत, तितक्याच पूर्णज्ञानें बाळबोध मराठी वळणाचें जीवन तात्यांनीं स्वतः गिरविलें. पूर्वीचें बाळबोध मराठी वळण म्हणजे कसे असे, असें जर मला कोणीं विचारलें

तर मी तात्यांच्याकडे बोट दाखवीन. ते राहिले तें बाळबोध मराठी वळण. आणि तात्यांनीं आजन्म तें गिरविलें, त्यांतच त्यांच्या चारित्र्याला ज्याप्रमाणें तेज चढतें, त्याचप्रमाणें एकोणिसाव्या-विसाव्या शतकांच्या संधिकालांतील महाराष्ट्राच्या सत्त्व गुणांनी शोभन दिसणाऱ्या, साध्या नि उच्च राहणीचें प्रतीक होणाऱ्या "बाळबोध मराठी वळणाचा" हि त्यांन आपोआप स्तुति होते असें नाही कां ?

(५) कांहीं महान् व्यक्ति त्यांच्या राष्ट्राच्या कांही विशिष्ट कालखंडामध्यें मूर्तिमंत प्रतीकरूप होतात. दुसऱ्या महायुद्धाच्या कठीण कसोटीच्या वेळी जीवन-मरणाचा झगडा करणाऱ्या इंग्लंडचा मूर्तिमंत प्रतिनिधि म्हणजे विंस्टन चर्चिल. त्याच्या मुद्रेवरचा बुलडॉगप्रमाणें दिसणारा चिवटपणा, त्याच्या भाषणामध्यें प्रकट होणारे विचार नि त्यानें केलेल्या अवघड कार्याची पूर्ती यामध्यें जणूं कांहीं सारें इंग्लंडच त्याच्या रूपानें प्रतीत होत होतें. त्याचप्रमाणें टिळकांच्या नंतरच्या कालखंडाच्या महाराष्ट्राचें मूर्तिमंत प्रतीक म्हणजे तात्या होते. कुणालाहि हार न जाणारी बुद्धि-संपदा, जाज्वल्य देशाभिमान, बिनमिजासीपणा इतका कीं, तो दोषाच्या सदरांत पडावा, गरीबी आणि सत्त्वस्थपणा या महाराष्ट्राच्या साऱ्या गुणावगुणांचें प्रतिबिंब तात्यामध्यें होतें. महाराष्ट्राच्या राजकारणांतील बुद्धिप्रामाण्याचा वाद, पण प्रत्यक्ष स्वातंत्र्याच्या लढ्यामध्यें इतरांशीं सहभागी होण्याची गर्दी—आपल्याला न आवडणाऱ्या मार्गानेंहि—ही तात्यांच्या महाराष्ट्राची मनःस्थिति होती. तात्या गेले त्या वेळीं महाराष्ट्राला ही जाणीव झाली.

❋

गंगाधर नीलकंठ गोखले

(प्रिन्सिपॉल, सांगली इंजिनियरिंग कॉलेज)

डॉ. बेझंट बाईच्यासारखी आयरिश वृद्ध बाई आपल्या हिंदुस्थानकरितां इतका जीव टाकते व आम्ही हिंदभूमीचे सुपुत्र ऐषारामांत लोळत असतों यानें मला फार वाईट वाटून मी माझी नोकरी सोडण्याच्या विचारांत होतों. तेव्हां या बाबतींत तात्यासाहेब यांचा सल्ला घ्यावा म्हणून मी त्यांच्याकडे गेलों व म्हणालों, "तात्यासाहेब, काय करूं सांगा." ते म्हणाले, "नोकरी सोडल्याखेरीज देशसेवा करतां येते. पोटाची सोय असल्याखेरीज कांहींहि कार्य करतां येत नाहीं व त्यामुळेंच पुढें देशभक्त फंडगुंड बनतात. नोकरी सोडणें फार मोठी चूक होईल." हा त्यांचा अनुभवाचा सल्ला मला पटला व अखेर त्यांचा माझा असा तहनामा झाला कीं, मीं दरमहा निदान शंभर रुपयांची आजन्म तरतूद कुटुंबपोषणार्थ करून त्यांना दाखवावी व मग त्यांनीं आपली हरकत मागें घ्यावी. याप्रमाणें १९१७ मध्यें केलेला हा करार मीं १९२८ सालीं पेन्शन घेऊन पुरा केला. या-

प्रमाणें मला त्यांनीं मोठ्या चुकीपासून परावृत्त केलें. माझ्या हातून जर कांहीं कार्य आज होत असेल तर त्याचें श्रेय कै. तात्यासाहेबांसच आहे. अशी माझी श्रद्धा आहे.

❋

सरस्वतीबाई पेंडसे

(तात्यासाहेबांच्या नातेवाअीक, पुणें)

(१) माझे वडील कै. ती. गणेश अनंत ऊर्फ भाऊसाहेब लेले, बी. ए., हे ती. कै. तात्यासाहेब केळकर यांचे थोरले बंधु, कै. ती. नानासाहेब यांचे चांगले स्नेही होते; डेक्कन कॉलेजमध्यें माझे वडील व कै. नानासाहेब केळकर समकालीन असून १८८५ सालच्या सुमारास बरोबर शिकत होते. दोघेहि बोर्डिंगमध्यें एकाच खोलींत असल्यानें त्यांची एकमेकांची चांगली मैत्री होती. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दोघे जरी भिन्न व्यवसायाला लागले, तरी त्या दोघा मित्रांचा पत्रव्यवहार शेवटपर्यंत होता. ती. नानासाहेब केळकर मृत्यु पावल्याचें पत्र ती. तात्यासाहेबांकडून, ज्या वेळीं माझ्या वडिलांच्याकडे आलें, त्या वेळीं तें पत्र हातीं घेऊन, कांपऱ्या हातानेंच, माझ्या आईला माझ्या वडिलांनीं पत्र वाचून दाखविलें, व " माझ्या चांगल्या मित्रांपैकीं एक मित्र आज मीं गमावला " असें म्हणून नेत्रांतून अश्रु गाळूं लागले. त्या देखाव्याचें स्मरण मला अद्यापि चांगलेंच आहे. कै. ती. नानासाहेब केळकर जरी इहलोक सोडून गेले होते, तरी कै. तात्यासाहेबांचा व माझ्या वडिलांचा त्यानंतर पत्रव्यवहार शेवटपर्यंत होत असल्यामुळें त्यांचे स्नेहसंबंध दृढ झाले.

(२) केसरी संस्थेचा पुण्याचा गायकवाड-वाडा, ज्यांत हल्लीं केसरी ऑफिस आहे, तो पूर्वी केसरी संस्थेच्या मालकीचा नव्हता; बडोद्याच्या महाराजांकडून विकत घ्यावयाचा होता; तो विकत घेण्याकरितां व त्या बाबतींत कांहीं रकमेची व मुदतीची तडजोड करण्याकरितां, कै. तात्यासाहेब केळकर माझ्या वडिलांकडे बडोद्यास आले होते, व आमच्याच घरीं उतरले असल्यानें मला त्या वेळेचेंहि चांगलें स्मरण आहे. वर्तमानपत्रांत तेथला कांही मजकूर छापावयाचा असल्यास माझ्या वडिलांकडे पत्रें येत, व देण्यासारखा मजकूर असल्यास लिहून पाठविला जाई, हेंहि मला चांगलें स्मरतें. हा मैत्रीचा संबंध १९०६ सालापर्यंत चालू असून, त्याचें रूपांतर थोड्या दिवसांनीं पेंडसे व लेले घराण्यांशीं झालें, व त्यामुळेंच जास्त संबंध आला. १९०६ सालीं माझें लग्न झालें. लग्न जुळविण्याच्या बाबतींत ती. तात्यासाहेब यांनीं आपल्या मैत्रीचें स्मरण ठेवून जी खटपट केली, तिचें रूपांतर हल्लींच्या नात्याच्या संबंधांत झालें आहे. ही निरंतरची स्मृति माझ्या ध्यानांत शेवटपर्यंत राहणारी

आहे. हा नात्याचा संबंध म्हणजे ती. दुर्गाताई केळकर यांची मी भावजय असून, त्या माझ्या वन्स लागत आहेत. त्यांच्याबद्दल माझी पूज्य बुद्धीहि तशीच आहे. कै. तात्यासाहेब हयात असतांना मी पुष्कळ वेळां ती. ताईस विनोदानें म्हणत असे कीं, " आपले डोळे मिटल्यास मला फार आनंद होईल " व त्याहि मला म्हणत असत कीं, " तुझें बोलणें खरें होवो. " पण ईश्वरी घटना अतर्क्य असते हेंच खरें.

(३) १९१० सालीं चि. अक्काचें लग्न झालें. तिला देशपांडे नांवाच्या देशस्थ घराण्यांत दिल्या कारणानें, त्या वेळीं त्यांच्यावर समाजाकडून पुष्कळ टीका झाली; तथापि तात्यासाहेबांनीं ती टीका मनावर न घेऊन धैर्यानें सोसली व त्यांच्या घरांतील इतर सर्व मंडळींनींहि धैर्यानें टक्कर दिली. तात्या न बोलके पण कर्ते सुधारक होते.

(४) १९२२ सालीं चि. बापुराव केळकर ह्यांचें लग्न झालें, त्या प्रसंगीं मी हजर होतें. त्या वेळीं लग्नसमारंभास पुष्कळ लोक आले होते, व सर्वांत मोठ्या मुलाचें लग्न व पहिलेंच कार्य असल्यानें, सर्वांस आनंद व उत्साह वाटत होता. लग्नसमारंभांत वाद्यें वाजवावयाचीं नाहींत, असें तत्त्व ठरवून कृतींत आणिले. तात्यासाहेबांनीं सर्वांस तसें निक्षून बजाविलें होतें कीं, बायकामंडळींत वाद्याबद्दल गोष्ट निघाल्यास " मी वाद्यें साफ वाजविणार नाहीं, कोणाचें या बाबतींत ऐकणार नाहीं, भीड चालणार नाहीं, असें सर्वांस स्पष्ट सांगा. " तात्यासाहेबांचीं सामाजिक मतें जरी पुष्कळ सुधारलेलीं असलीं, तरी घरगुती बाबतींत त्यांचीं मतें पूर्ण सनातनी दिसत. दरवर्षीचीं रामनवमी, तिची जेवणावळ, श्राद्ध, पक्ष वगैरे नित्य नैमित्तिक कर्में सनातनी मताप्रमाणें होत असत.

(५) ती. तात्यासाहेबांकडे माझें जाणेंयेणें सुरू झाल्यापासून त्यांचें घर नेहमीं पाहुण्यांनीं भरलेलें दिसें व मी नेहमीं विनोदानें म्हणें, " आपलें घर वटवृक्षाप्रमाणें आहे. " " पण याचें श्रेय तिच्याकडे (ताई) आहे " असें ते उलट म्हणत !

(६) कै. तात्यासाहेबांस मी भक्तिभावनेनें जेवावयास मधूनमधून बोलावीत असें व ते सवड असल्यास येतहि असत.

एकदां सकाळीं ९-१० च्या सुमारास आमच्याकडे ते आले. मी नित्याच्या संवयीप्रमाणें चहा, दूध वगैरे देतें असें म्हटलें; त्यावर " चहा, दूध सर्व ठिकाणीं मिळतें, परंतु सुंठीची कढी (ताकाची) कोठें मागतां येत नाहीं, व मिळणें कठीण असतें. शक्य असेल तर ती दे. " असें ते म्हणाले. मला त्यांच्यां या बोलण्याचें फार कौतुक वाटलें.

(७) तात्यासाहेबांस सर्व कोकणी पदार्थ मनापासून आवडत. काकडीचीं गोडाचीं धिरडीं, खांडवी, तसेंच कांहीं रुचिपालट, भाज्या, हेहि प्रकार ते आवडीनें मागून

घेत. एकदां असेंच आमच्याकडे ते जेवीत असतां, एकप्रकारची भाजी केलेली होती. ती त्यांस फार आवडली. त्यांनीं मला हांक मारून विचारिलें, "मामी, भाजी फार आवडली, परंतु ओळखीची दिसत नाहीं, हिचें नांव काय?" "ह्या भाजीचें नांव चंदनबटवा असें आहे व हिची गोळाभाजी चांगली होते," असें मीं त्यांस सांगितलें. त्यावर ते हंसून म्हणाले, "एकदां आमच्या घरीं ये व तुझी बटवा भाजी तिला करण्यास सांग."

(७) महायुद्ध जोरांत चालूं असतांना, मुंबईवर बाँब हल्ला होईल असें समजून पुष्कळ लोक मुंबईहून पुण्यास आले. कोणी कोकणांत गेले. ज्यास जिकडे आश्रय मिळेल तिकडे तो जाऊं लागला. नाना तऱ्हेच्या गोष्टी लोक बोलूं लागले. मी येथें २-३ लहान मुलांना घेऊन असल्यामुळें मलाहि आतां काय करावें हे सुचेना. कै. तात्यासाहेबांस मीं आमच्याकडे बोलाविलें व विचारलें; "बाँब हल्ले होतील म्हणून मुंबईचे लोक येथें बेरचसे येत आहेत, किंवा दुसरीकडे जात आहेत; आपण कसें करावयाचें? आपण कोठें जाणार आहां किंवा काय? मी कोठें जावें, मला मार्ग सांगा." कै. तात्यासाहेब हयावर हंसून म्हणाले, "मामी, ही सर्व हूल खुठली आहे. पुण्या-मुंबईवर हल्ला होत नाहीं; येथून उठून आपण जाणार कोठें व किती दिवस! मरण व संकटें यावयाचीं असल्यास तीं चुकत नाहींत. स्वस्थ चित्तानें राहा. मी कोठें जाणार नाहीं, व तूंहि येथेंच राहा," असें सांगून धीर देऊन गेले. नेहमीं माझ्या दुःखी मनःस्थितींत मी अस्वस्थ मनानें तात्यासाहेबांस कांहीं कांहीं भांबावलेले प्रश्न विचारीत असें, त्या वेळेस मला ते म्हणत, "सुखाबरोबर दुःखाची तयारी करून ठेवावी लागते, त्यास तूं अपवाद कशी होशील! तुला वेदान्त आवडतो ना! मग हाच वेदान्त कृतींत आण."

❋

वामन हरी देशपांडे

(जी. डी. ए. आर. ए., ऑडिटर, मुंबई)

(१) सन १९३७-३८ सालची गोष्ट असावी. वेस्टर्न इंडिया इन्शुअरन्स कंपनीची सिल्व्हर ज्युबिली होती. त्यानिमित्त त्या कंपनीचा ऑडिटर म्हणून मुद्दाम मी मुंबईहून सातारला गेलों होतों. समारंभाचे अध्यक्ष तात्यासाहेब होते. समारंभ संपल्यानंतर परत घरीं जातांना तात्यासाहेब समोरच दिसले. त्यांना नमस्कार केला. तत्क्षणींच 'उद्या घरीं येऊन भेटा' असें त्यांनीं सांगितलें आणि याच 'उद्याच्या' भेटींत मी शिक्षण प्रसारक मंडळी पुणें या संस्थेचा ऑडिटर झालों!

माणसाची पारख होणें व योग्य कामाकरितां योग्य त्या व्यक्तीचा हमखास उपयोग करणें, हें मोठेपणाचें लक्षण तात्यासाहेबांच्या अंगीं पुरेपूर होतें. अनेक

प्रकारच्या उलाढालींत त्यांना निरनिराळ्या प्रकारच्या माणसांची जरूर लागे. त्यांच्या ह्या लोकसंग्रहांत मी जमा होतों. अशाच एका प्रसंगानें त्यांनीं मजकडे भोर संस्थानच्या धान्य-खात्याच्या तपासणीचें काम सोपविलें. त्या वेळीं ते त्या संस्थानच्या एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे अध्यक्ष होते. काम अतिशय जबाबदारीचें व जिकीरीचें, त्यामुळें तें पुरें करण्यास वेळहि फार लागे. त्यांत एका कामाचा तात्यासाहेबांनीं आपल्या अधिकारांत निकाल लावला होता. पण ऑडिटर म्हणून त्यावर टीका करण्याचा मजवर प्रसंग आला. ही बाब अतिशय नाजूक व जबाबदारीची; यामुळें टीका करण्यावांचून मला गत्यंतरच नव्हतें. हें एक्झिक्यूटिव्ह कौन्सिल इनमीन् तीन माणसांचें. पैकीं एक संस्थानचे दिवाण, दुसरे राजेसाहेबांचे खाजगी कारभारी व तिसरे खुद्द अध्यक्ष म्हणजे तात्यासाहेब! अशा स्थितींत हा मतभेद झालेला. माझा रिपोर्ट त्यांच्याविरुद्ध झालेला. तेव्हां हे कसें काय होणार ह्या विवंचनेंत मी होतों. मीं माझ्या रिपोर्टाचा कच्चा ड्राफ्ट त्यांना वाचून दाखविला व त्यांच्या चेहऱ्यावर त्याचा काय परिणाम होतो तें पाहत राहिलों; पण आश्चर्य हें कीं, अगदीं अनपेक्षित असेंच उत्तर त्यांच्याकडून मिळालें. ते म्हणाले, "ठीक आहे; तुम्ही म्हणतां तसें असलें तर आमचा मूळचा ठराव बदलून घेऊं. त्यांत कमीपणा कसचा!" या त्यांच्या उद्गारामुळें माझ्या विवंचनेचा निरास झाला. या प्रसंगाचें राहून राहून मला नवल वाटतें. कारण आमच्या ह्या व्यवसायाच्या निमित्तानें इतर कांहीं थोरांमोठ्या लोकांबरोबर उद्भवलेले अनेक खारट-तुरट प्रसंग ध्यानांत घेऊन त्यांची वरील प्रसंगाशीं तुलना केली असतां, तात्यासाहेबांच्या ह्या उत्तरामुळें आमच्या व्यावसायिक अनुभवांत बहुमोल भर पडली हें खास!

(२) याच कामाच्या निमित्तानें तात्यासाहेबांच्या सहवासांत भोरला दोन दिवस राहण्याचा मला योग आला. त्यामुळें त्यांची काम करण्याची पद्धति, त्यांचा उरक, टापटीप व सर्वांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन निर्णायक निकाल करण्याची हातोटी वगैरे गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव आला. एके रात्रीं त्यांच्या जेवणाचें ताट त्यांनीं आम्ही बसत असूं त्याच दिवाणखान्यांत मागविलें. आचारी ताट ठेवून गेला; पण जेवण झाल्यानंतर तें उचलावयास कोणीच आलें नाहीं. बराच वेळ वाट पाहून मी स्वतः तें उचलण्यास पुढें झालों. तें पाहून मला बाजूस सारून स्वतः तें त्यांनीं बाहेर नेऊन ठेवलें. ही बारीकशीच गोष्ट पण तिचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. तसेंच सकाळीं ते माझ्या अगोदर उठत, सर्व प्रातर्विधि आटोपीत व "देशपांडे उठा, चहा तयार आहे" म्हणून हाक मारून उठवीत. ह्यामुळें मी लज्जित होऊन!

(३) गायनशास्त्रामध्यें त्यांचा माझा मतभेद होता. किंबहुना मी त्यांचा विरोधक होतों. संगीताच्या मराठीकरणाविषयींचीं त्यांचीं मतें मला कधींहि

पटलीं नाहींत. अुलट त्यांच्या विचारप्रणालीवर अेका लेखांत मीं अुघड अुघड व कडक टीका केली होती व तेवढ्यानेंहि माझें समाधान न होतां "तुमच्यासमोर मनमोकळेपणानें भांडतां येत नाहीं, म्हणून हा लेख मुद्दाम पाठवीत आहें" असें स्वतंत्र पत्र लिहून त्यासोबत या लेखाचें कात्रण पाठविलें. त्याला त्यांचें अुत्तर तीस-पसतीस मुद्द्यांचें आलें. प्रत्यक्ष गांठ पडलीं तेव्हां "तुम्हांला मी अितकें लांबलचक व आवर्जून व मुद्देसूद पत्र लिहिलें; पण त्याची तुम्ही साधी पोच सुद्धां पाठविली नाहींन," असें म्हणून ते मजवर खूपच रागावले! मराठीकरणाच्या बाबतींत वादाचा मुख्य मुद्दा उच्च संगीतांत शब्दाच्या अर्थाची अपेक्षा कितपत ठेवावी असा होता, व त्या अनुरोधानें उच्च संगीतांत स्वरांनाच प्राधान्य आहे, शब्दांना नव्हे, असें आमचें म्हणणें. आमच्याशीं त्यांनीं वाद घेतला. पण जळगांवच्या साहित्य संमेलनांत त्यांनीं आमच्या मुद्द्यांचा अनुवाद केल्यामुळें अर्थातच आम्हांला त्यांच्या अभिजात प्रांजलपणाविषयीं सादर धन्यता वाटली.

(४) मुंबईस एकदा त्यांचें रेडिओवर भाषण झालें. तेथें पूर्वी ठरल्याप्रमाणें त्यांची माझी भेट झाली. तेथून ते, त्यांचे चिरंजीव बापूराव व मी मांटुगा येथील बापूरावांच्या घरीं जाण्याकरिता बोरीबंदरवर आलों. तिकिटें काढण्यास अर्थातच मी पुढें झालों; पण मला थोपवून, "बापू, तूं थर्ड क्लासचीं तिकिटें काढून आण," असें म्हणून त्यांनीं स्वतः बापूरावांच्या जवळ पैसे दिले. मीं तिकीटें काढलीं असतीं तर तीं फर्स्टक्लास अगर सेकंडक्लासचीं काढलीं असतीं. हें ओळखून त्यांनीं ही चपळाई केली! कारण दुसऱ्याला तोषिस लागूं द्यावयाची नाहीं व कोणाचा बारीकसासुद्धां उपकार घ्यावयाचा नाहीं हा तर त्यांचा बाणा!



नारायण बाळकृष्ण केळकर

(बी. ए., ऋणानुबंधी, खानदेशचे रहिवासी, हल्लीं मुक्काम पुणें)

(१) सन १९२३ पासून तात्यांचा व माझा विशेष परिचय झाला. मी पुण्यास १९३४ मध्यें राहावयास आल्यापासून तो दृढतर झाला. त्यांची व माझी नेहमीं भेट होत असे व अनेक सुखदुःखांच्या गोष्टी ते अतिशय मोकळ्या मनानें माझ्याशीं बोलत असत.

१९२६ मधील असेंब्लीच्या निवडणुकीसाठीं तात्यांनीं खानदेशांत दौरा काढला होता. नवापूर येथील कार्यक्रम आटोपून आम्ही नवापूर स्टेशनवर आलों. बरोबर मंडळीहि बरीच आली होती. रात्रीं ९॥ ची वेळ. गाडीस सुमारें पाऊण तास उशीर होता. स्टेशनवर गडबड असावयाचीच. पण तशा धांदलींत व गडबडींत उघड्या प्लॅटफॉर्मवर तात्यांनीं वळकटी पसरली व आश्चर्याची गोष्ट ही कीं,

१० मिनिटांत ते घोरूं लागले ! त्याहून आश्चर्याची गोष्ट म्हणजे गाडी येण्याच्या १० मिनिटें आधीं ते आपण होऊन जागे झाले !

(२) तळोदें, शहादें, शिरपूर, चोपडें, यावल, वगैरे तालुक्यास जातांना तापी नदी ओलांडावी लागते. साधारणतः अधिकारी, प्रतिष्ठित किंवा श्रीमान् लोक या भागांत प्रवासास आले म्हणजे नदी उतरतांना त्यांना जरूरी असली तर कोळी व भिल्ल खांद्यावर बसवून नदीपार करीत व त्यांचे जोडेहि हातांत घेत. ही गोष्ट नित्याच्या परिपाठांतील असल्यामुळें कोणाला कांहीं त्याचें वाटत नसे. पण तात्यांनीं मात्र नदीपार होतांना कोळ्यास आपले जोडे उचलूं दिले नाहींत किंवा कोणाच्या खांद्यावरहि ते बसले नाहींत. यासंबंधीं आम्हीं सहज बोलत असतांना "स्वतःचें काम करावयास मनुष्याला लाज वाटण्याचें कारण काय ! " असें तात्यांनीं उद्गार काढले ! अर्थात् आम्हां सर्वांना चोरट्यासारखें झालें हें सांगावयास नकोच.

(३) निवडणुकीच्या वेळीं दौऱ्यावर असतांना तळोदें व शिंदखेडें येथें पोलिसानें उद्धटपणा दाखविला. त्या वेळीं तात्यांना अतिशय संताप येऊन त्यांनीं पोलिसाची अशी खरडपट्टी काढली कीं सांगतां सोय नाहीं ! त्याचें खरें कर्तव्य काय याची त्यांस जाणीव करून देऊन त्यांनीं त्यांस घराबाहेर हांकलून दिलें ! आपली चूक लक्षांत येऊन पोलीस शरमिंदा झाला व येथें आपली टुरटुर चालावयाची नाहीं असें वाटल्यानें तो मुकाट्यानें चालता झाला !

(४) तात्या भिडस्त असले तरी भ्याड नव्हते व कोणाच्याहि तोंडावर ते स्पष्टपणें बोलत असत. एकदां धुळ्यास ते मजकडे चहाफराळास आले असतांना एक बडे सरकारी अधिकारीहि आले व पायांतील बूट तसेच ठेवून बैठकीवरील खुर्चीवर येऊन बसले. पण तात्यांना तें न आवडून "देशी पद्धतीनें घातलेल्या बैठकीवर मंडळी बसली असतांना बुटासह येऊन बसणें हें अयोग्य होय," असें त्यांनीं उघड बोलून दाखविलें. अर्थात् सदर अधिकारी बूट काढून बैठकीवर मुकाट्यानें येऊन बसला !

(५) एकदां भेट झालेली असली म्हणजे तात्या त्या गृहस्थाची ओळख सामान्यतः विसरत नसत. धुळ्यास माझ्याकडे ते आले असतांना जमलेल्या मंडळींत फारसें न पाहिलेल्या लोकांची तात्यांना आठवण राहते कीं नाहीं हें पाहावें, अशी कुजबुज सुरूं झाली. "तुमची अमुक वेळीं भेट झाली होती" असें तात्यांनीं त्या गृहस्थास सांगून आम्हां सर्वांस चकित केलें ! तसेंच धुळें व चाळिसगांव येथें सुमारें वीस वर्षांपूर्वी पाहिलेल्या एका गृहस्थास ते पुण्यास आले असतांना तात्यांनीं त्यांस नेमकें ओळखलें !

(६) तात्या निगर्वी असले तरी स्वाभिमानी असत. लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद असतांना त्यांनीं व्हॉईसरॉय, त्यांचे सेक्रेटरी, इतर युरोपिअन

सभासद यांची आपण होऊन ओळख करून घेण्याचा कधींहि प्रयत्न केला नाहीं. एवढेंच नव्हे तर, जातां येतां होणाऱ्या गांठीभेटींत शिष्टाचार म्हणून कोणास कधीं "गुडमॉर्निंग"हि केलें नाहीं, असें ते मजजवळ बोलले होते व हें एकदोनदां त्यांनीं भरसभेंतहि सांगितल्याचें मला आठवतें. असेंब्लीचे सभासद असतांना तात्यांची वागणूक अतिशय भारदस्तपणाची असे. त्यांच्याबद्दल युरोपिअन सभासदांस सदैव आदर व त्यांच्याबद्दल एक प्रकारचा वचक वाटत असे, असें एका प्रमुख खासदारानें मजजवळ बोलून दाखविलें होतें.

(७) तात्यांच्या या स्वभावाचा धुळ्यासहि एक अनुभव आला. आपल्या पुतणीच्या विवाहानिमित्त ते धुळ्यास आले असतांना विवाहाच्या दिवशीं पाहुण्यांच्या स्वागतार्थ ते प्रवेशद्वाराशींच उभे होते व आल्यागेल्यांचें ते यथोचित स्वागत करीत. जिल्ह्यांतील बहुतेक सर्व प्रमुख अधिकारीहि यावयाचे होते. त्यावेळीं मात्र तात्या प्रवेशद्वाराशीं थांबले नाहींत ! मुद्दाम मंडपाच्या एका बाजूस कोणास न दिसेल अशा ठिकाणीं जाऊन उभे राहिले ! तात्यासाहेब धुळ्यास आल्याचें अधिकाऱ्यांना माहीत असल्यामुळें त्यांनीं होऊनच तात्यांच्या भेटीची इच्छा दर्शविल्यामुळें आप्पासाहेबांनीं तात्यांस बोलावून अधिकाऱ्यांची ओळख करून दिली. पण शिष्टाचारास अनुसरून अवश्य तेवढें बोलणें झाल्यावर तेथें न बसतां तात्या तेथून उठून निघून गेले !

(८) ता. २२-९-१९२५ रोजीं धुळ्यास कलेक्टरच्या अध्यक्षतेखालीं " बेबी वुइक "चा बक्षीससमारंभ होता. तात्याहि त्याचवेळीं धुळ्यास आले असल्यानें त्यांनींहि दोन शब्द सांगावे अशी चालकास स्वाभाविकच इच्छा झाली. पण केसरीच्या संपादकाचा संपर्क समारंभास लागलेला कलेक्टरला कसा रुचणार ? त्यानें या गोष्टीस हरकत घेतली ! पण चालकास हा अपमान वाटून त्यांनीं आग्रह धरल्यामुळें कलेक्टरला परवानगी देणें भागच पडलें ! पण तात्यांच्या व्याख्यानांत राजकारणाचा वासहि येतां कामा नये, अशी अट त्यानें घातलीच ! तात्यांनीं आपल्या भाषणास सुरुवात केली तीच मुळीं ' वुईक बेबी ' असते म्हणून बेबी वुइक साजरा करावा लागतो, या विनोदी वाक्यानें. त्यांचें व्याख्यान खुद्द कलेक्टरालाहि आवडलें. त्याबद्दल त्यानें तात्यांना धन्यवाद दिले व त्यांच्या व्याख्यानास मनाई करण्याचा जो विचार मनांत आला होता, त्याबद्दल प्रांजलपणें खेद व्यक्त करून त्यानें तात्यांची उघड माफीहि मागितली !

(९) माझे वडील तीर्थरूप बाळकृष्ण गणेश केळकर हे पोलीस खात्यांत नोकरीवर असले तरी अत्यंत सत्त्वशील व धर्मनिष्ठ होते. त्यांच्या मृत्यूनंतर मीं त्यांचें चरित्र लिहून काढलें व तें तात्यांस वाचावयास दिलें. त्यांनीं सर्व हस्तलिखित काळजीपूर्वक वाचलें. " चरित्र अतिशय चांगलें आहे, बोधप्रद आहे, तुम्ही

तें अवश्य प्रसिद्ध करा. एक वेळ श्राद्ध न केलें तरी चालेल, पण चरित्र प्रसिद्ध करून पितृऋण अवश्य फेडा." असें त्यांनीं मला सांगितलें.

(१०) ता. २१ नोव्हेंबर १९४१ रोजीं सायंकाळीं मी सहज तात्यांकडे गेलों. माडीवर जाऊन पाहतों तों पेटी-तबला सुरू असून तात्या गातांना दिसले! मी चाटच पडलों!! पद संपल्यावर पेटीवाला व तबलजी परत गेले. तात्या एकटेच आहेत असें पाहून "हिटलरनें जगड्व्याळ युद्ध सुरूं करून सर्व जगाला धक्का दिला! तुम्ही या वयांत गाणें शिकावयास आरंभ केल्याचें पाहून तुमचे निकटचे स्नेही देखील खचित चकित होतील!" असें मी म्हणालों. त्यावर तात्यांनीं केलेला खुलासा मोठा आश्चर्यकारक होता. "माझ्या नाटकांतील पदें मला स्वतःला तरी म्हणतां यावीं व वेळहि जावा या हेतूनें मीं हा उद्योग सुरू केला आहे," असें ते म्हणाले. यावरून तात्यांची ज्ञानलालसा व व्यासंगाची हौस किती विलक्षण होती हें प्रत्ययास येतें!

(११) स्वतःच्या कौटुंबिक गोष्टीहि तात्या मजजवळ अनेकदां मोकळेपणानें बोलत असत. असेंच आम्ही एकदां बोलत असतांना आपल्या प्रकृतीबद्दल व एकंदर कौटुंबिक स्वास्थ्याबद्दल मजजवळ अतिशय समाधानाचे उद्गार त्यांनीं काढले. 'माझा उत्कर्ष झाला याचें कारण माझी पत्नी होय, तिच्या सत्प्रवृत्तीचेंच हें फल आहे' असें तात्या नेहमीं म्हणत असत. याचें आम्हांस नित्य प्रत्यंतर येई. कारण तात्यांना प्रापंचिक गोष्टीकडे लक्ष द्यावें असा हव्यास नव्हता व वेळहि नव्हता. पण ताईंनीं ती बाजू उत्तमरीतीनें सांभाळली यांत शंकाच नाहीं. किंबहुना इतक्या तत्परतेनें, निष्ठेनें व निरलसतेनें पतीची सेवा हौसेनें व मनःपूर्वक करणारी ताईसारखी साध्वी वियमान काळांत आढळणें दुर्मिळच होय!

(१२) ताईबद्दल तात्यांना याप्रमाणें विलक्षण आदर वाटत असल्यामुळेंच स्वतःस तत्त्वतः न पटलें तरी ताईंच्या समाधानासाठीं तात्या बहुतेक सर्व धार्मिक गोष्टी घरांत करीत. त्यांच्या घरीं रामजन्मोत्सव दरवर्षी नियमानें साजरा होत असे. त्या वेळीं तात्या हटकून सोंवळे नेसत हें पुष्कळांच्या पाहण्यांत असेलच. त्या वेळीं ते एखाद्या कर्मठ ब्राह्मणाप्रमाणें वागत!

(१३) कोणीहि तात्यांचा सल्ला घ्यावयास गेल्यास त्याची बाजू ते समजावून घेत व सर्व दृष्टींनीं विचार करून आपलें मत काय आहे हें सांगत. पण "आपल्या बुद्धीस जें उचित वाटेल तेंच मनुष्यानें करावें, दुसऱ्याला निमित्ताचें धनी कधीं करूं नये" असेंच तात्या शेवटीं सांगत. एकदोन वेळां कांहीं कारणानिमित्त मींच त्यांना सल्ला विचारला असतांना त्यांनीं मला वरील धोरणानुसारच उत्तर दिलें.

❋

श्रीमंत अनुबाई वहिनीसाहेब घोरपडे

(श्रीमंत बाबासाहेब यांची स्नुषा, इचलकरंजी)

(१) ती. तात्यासाहेब केळकर यांच्या घराण्याचा व माझ्या पितृघराण्याचा घरोबा होता, तसेंच कै. तात्यासाहेब व माझे श्वशुर कै. श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, अधिपति इचलकरंजी, हे दोघेहि १८९० च्या सुमारास कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्यें सहाध्यायी होते व त्यांचे मित्रत्वाचे संबंध अखेरपर्यंत राहिले. माझे वडील कै. गोविंद वासुदेव ऊर्फ तात्यासाहेब कानिटकर व माझ्या मातुश्री श्रीमती काशीबाई कानिटकर हे दोघेंहि वाङ्मयसेवा करणारे, विद्वानांच्या सहवासांत आनंद मानणारे, वक्ते वगैरे असल्यानें कै. तात्यासाहेब केळकर यांचा व माझ्या मातापितरांचा स्नेहसंबंध अनेक वर्षांचा होता. तात्यासाहेब आमच्याकडे इचलकरंजीस एकंदर दोन वेळां आले होते व आमच्या उन्हाळ्याच्या गिरिनिवासालाहि त्यांनीं भेट दिली होती. इचलकरंजीस एका संस्थेच्या उद्घाटन समारंभाच्या निमित्तानें ते आले असतांना त्यांनीं आपल्या भाषणांत संस्थानिकांच्या बद्दल एक गमतीदार उपमा दिली. ती सर्व श्रोत्यांना फार पसंत पडली. ते म्हणाले, " संस्थानिक एकवीस वर्षांचे होतांच त्यांना राज्याधिकार दिले जातात व ज्या मानानें संस्थान लहानमोठें असेल त्या मानानें हजारों अगर लाखों लोकांचें भवितव्य एका एकवीस वर्षांच्या तरुणाच्या हातीं सोपविलें जातें. संस्थानिकांना अनियंत्रित सत्ता असते व ब्रिटिशांच्या अंतर्गत राज्यकारभारांत ढवळाढवळ न करण्याच्या धोरणामुळें जुलमी राजांच्या प्रजेला न्याय मिळणेंहि कठीण पडतें. आपण श्रीकृष्णजन्माचें वर्णन वाचतों. त्यांत जसें जन्मतःच श्रीकृष्णाला चार हात फुटले तसें एकविसावें वर्ष लागतांच संस्थानिकांना एकदम एखाद्या मोठ्या राज्याचा अनियंत्रित कारभार करण्याची अक्कल फुटते, अशीच ब्रिटिशांची समजूत दिसते. "

(२) १९२७ च्या उन्हाळ्यांत तात्यासाहेब श्रीमंत सरकारांच्या आमंत्रणावरून 'माधवगिरी'स [बेळगांवापासून चाळीस मैलांवर असलेलें आमच्या दौलतींतील गिरिनिवासाचें रम्य स्थान] कांहीं दिवस विश्रांतीसाठीं आले होते. त्या वर्षी मी व माझीं मुलेंहि स्वारीबरोबर होतों. कै. तात्यासाहेब त्यांची तब्येत बरी नसल्यामुळें ते विश्रांति व हवापालट ह्या दुहेरी हेतूनें जरी त्या थंड ठिकाणीं येऊन राहिले होते, तरी त्यांचा लेखनाचा व वाचनाचा जो अखंड कार्यक्रम चालू असे तो पाहून आम्हांला अतिशय कौतुक वाटे. मी त्या वेळीं एका सनातनी विचाराच्या श्वशुरांची सून असल्यानें जरी तात्यासाहेबांशीं चर्चा वगैरे करण्याचा प्रसंग आला नाहीं, तरी कांहीं वेळां आम्ही सर्व संध्याकाळीं एकदमच फिरावयास जात होतों, त्यामुळें त्यांचें विनोदी भाषण अनेक वेळां ऐकण्यास मिळे. तें ऐकून अतिशय आनंद होई.

आमच्या सरकारांच्या मोटारीचा ड्रायव्हर इमाम अतिशय वेगानें मोटार चालवीत असे. एकदां तात्यासाहेब त्यांच्या मोटारींतून माधवगिरीहून वेंगुर्ले, सांवतवाडी वगैरे पाहून आले. माधवगिरीहून सांवतवाडीस जातांना आंबोलीचा घाट लागतो. त्या घाटांत फार वळणें आहेत. इमाम ड्रायव्हरनें घाटांतूनहि अतिशय वेगांत गाडी कशी चालविली व एका ठिकाणीं भयंकर अपघात होण्याची वेळ कशी आली, त्याचें मजेदार वर्णन तात्यासाहेबांनीं परत आल्यावर भोजनाच्या पंक्तींत केलें. ते म्हणाले, "बाबासाहेब, आज आपल्या ड्रायव्हरनें खूप वेगांत गाडी सोडली; व घाटांत एका वळणावर पुढून एक मोटार आल्यानें त्यानें आपली मोटार इतक्या जोरानें बाजूला घेतलीन् कीं, मला तर वाटलें आतां कड्यावरून आम्ही खालीं कोसळणार आणि आमची गच्छंती तिथेंच होणार! मीं तर डोळे घट्ट मिटूनच देवाचें नांव घेतलें, पण 'माधवगिरी'वर श्रीखंडपुरी आमची वाट पाहत होती ना? त्यासाठीं सुखरूप आलों परत आज!!"

(३) कै. तात्यासाहेबांशीं प्रत्यक्ष बोलण्याचा एकच व तोहि दुर्दैवानें अखेरचाच प्रसंग म्हणजे १६ जानेवारी १९४७ रोजी झालेल्या आमच्या भेटीचा होय. पुणें येथें मी गेलें असतां कै. तात्यासाहेबांना मीं निरोप पाठविला कीं, मला आपल्याला भेटण्याची इच्छा आहे, तेव्हां आपण केव्हां मोकळे असाल तेव्हां मी आपणांकडेहि येऊन भेटूं शकेन. परंतु त्यांनीं लगेच उलट निरोप पाठविला, "मी आज मोकळा आहें. गाडी पाठवा व मीच येऊन भेटतों." तात्यासाहेबांच्या ह्या निरोपामुळें मला आनंद तर वाटलाच; पण त्यांच्या स्वभावांतील सौजन्यानें मला उपकृत वाटलें. थर्डाच्या दिवसांत सकाळीं आठ वाजण्याच्या सुमारास ते माझ्यासाठीं घराबाहेर पडले व कानिटकरांच्या वाड्यांत आम्ही भेटलों. कांहीं गोष्टींत मला त्यांचा सल्ला पाहिजे होता, तो त्यांनीं एखाद्या आप्ताच्या कळकळीनें दिला. माझ्या मातुःश्री काशीबाई कानिटकर ह्यांनाहि तात्यासाहेब भेटले व त्यांची वृद्धावस्था पाहून तात्यासाहेबांना गहिंवरून आलें. बराच वेळ बसून त्यांनीं सर्व कुटुंबियांची आस्थापूर्वक चौकशी केली. पूर्वकाळांतल्या कांहीं आठवणीहि त्यांनीं काढल्या. माझ्या मातुःश्रींच्या आत्मचरित्राबद्दल विषय निघाला, तेव्हां मीं म्हटलें, "त्यांचें आत्मचरित्र बरेचसें लिहून झालें आहे; पण अद्याप पुरें झालें नाहीं. तें पुरें करावयाचें आहे." त्यावर एकाद्या वडील माणसानें अधिकारानें सांगावें तसें ते म्हणाले, "तुम्ही करा कीं तें काम! काशीताईंचें आत्मचरित्र म्हणजे समाजसुधारणेचा व स्त्रीशिक्षणाचा एक इतिहासच होईल व तें चरित्र पुरें करून प्रसिद्ध करण्याचें काम व्हायला पाहिजे." कै. तात्यासाहेबांनीं आमच्या कै. ती. सरकारांचा व त्यांचा स्नेह कसा टिकला ह्याबद्दलहि सांगितलें. ते म्हणाले, "बाबासाहेबांचा व माझा राजाराम कॉलेजपासूनचा परिचय. राजकारणांत जरी आमचा तीव्र मतभेद अनेक वेळीं असे, तरीहि

ते एक विद्वान्, सदाचरणी व कर्तृत्ववान् अधिपति होते, विद्यादानाचें कार्य त्यांनीं अखेरपर्यंत केलें व राज्यकारभार उत्तम केला. ह्या सर्व गुणांमुळें त्यांच्याबद्दल मला फार आदर वाटे. शिवाय राजकारणांतील मतभेदाचा परिणाम आमच्या स्नेहावर न होऊं देण्याची बाबासाहेब विशेष काळजी घेत असत."



कार्शीनाथ नारायण धारप

(बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, मुंबई)

(१) १९३५ ख्रिस्ताब्दांत हायकोर्टाला उन्हाळ्याची सुटी झालेली होती व लगेच माझे मित्र श्री. सदाशिवराव बापट यांचें मला पत्र आलें कीं, गु. तात्यासाहेब दरवर्षाप्रमाणें देवगडास गेले आहेत, ते तेथें एकटेच आहेत व तुम्हांला व मला त्यांनीं ४।८ दिवस देवगडास येण्याबद्दल फार आग्रहानें सांगितलें आहे. तरी तुम्ही पुण्यास या व तेथून आपण बरोबर देवगडास जाऊं. मी त्याप्रमाणें पुण्यास गेलों, परंतु श्री. बापट कांहीं आकस्मिक अडचणींमुळें देवगडास येऊं शकले नाहींत; म्हणून मी एकटाच सातारा-कोल्हापूर मार्गानें मोटारनें देवगडास गेलों. दुपारीं चार वाजतां मी तात्यांच्या घरीं पोंचलों. तात्या त्या वेळीं शेजारच्या गांवीं गेले होते व तेथून ते संध्याकाळीं परत येणार होते. तात्यांचे चिटणीस श्री. आपटे यांनीं माझी स्नानाची, फराळाची व्यवस्था केल्यावर वेळ होता म्हणून मी व आपटे देवगडाच्या बंदरावर व किल्ल्यावर फिरावयास गेलों. तेथून परत येतांना आम्हांला उशीर झाला व काळोख खूप पडला. तात्यासाहेब देवगड गांवापासून मैल दोन मैल माळरानावरील बंगल्यांत राहत होते. आमच्याबरोबर दिवा वगैरे कांहीं नव्हता व काळोखांतून धुळींतून तर आम्हांस जावयाचें, देवगडास फुरशांचा उपद्रव फार, यामुळें तात्यासाहेब गांवाहून परत आल्यावर आम्ही बाहेर फिरावयास गेलेले तोंपर्यंत परत आलों नाहीं हें पाहून काळजीनें अत्यंत अस्वस्थ झाले. त्यांच्या जिवाची बरीच घालमेल झाली. मांडवांत ते एकसारखे इकडून तिकडे येरझारा घालीत होते. मला सुरक्षित परत आलेला पाहून त्यांना अति हर्ष झाला. पण मग एकदम ते उसळले व आपट्यांच्यावर तोंड टाकून त्यांना म्हणाले, "धारपांना येथील माहिती नाही, पण तुम्हांला तर सर्व ठाऊक आहे ना? दिवाबत्ती बरोबर नसतांना इतका उशीर होऊन काळोख पडल्यावर तुम्ही त्यांना घेऊन बाहेर राहिलांत कसें? कुणाला फुरसें चावलें असतें तर केवढा प्रसंग ओढवला असता!" मीं सर्व दोष मजकडे घेण्याचा प्रयत्न केला; पण मला ते बोलूंच देईनात व जास्तच खवळले. मीं आपट्यांना खूण करून बाजूस जाण्यास सांगितलें

व युक्तीनें दुसऱ्याच विषयावर बोलणें काढलें. हळूंहळूं ते शांत झाले. घरीं आलेल्या पाहुण्याच्या सुरक्षिततेबद्दल कोण ही काळजी व आस्था !

देवगडास मी ५–६ दिवस होतों. त्या मुक्कामांत मला तात्यांच्या प्रेमळ वागणुकीचा व मनमोकळ्या बोलण्याचा यथेच्छ लाभ मिळाला. एवढ्या मोठ्या चतुरस्र पंडिताशीं व राष्ट्रीय पुढाऱ्याशीं निवांतपणें गांठ पडलेली ! त्याचा मीं भरपूर उपयोग करून घेतला; व निरनिराळ्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यासंबंधीं विषयांवर मनमुराद चर्चा केली. कित्येक वेळां त्यांच्या मताचा कल पाहून बळेंच उलट बाजू घेतली. वेळप्रसंगीं वादहि घातला. कदाचित् वितंडवाद सुद्धां झाला असेल. परंतु त्या थोर मनाच्या पुरुषानें माझा कोणताहि अविनय मनावर घेतला नाहीं. माझें ज्ञान तें किती ! परंतु तात्यांनीं मी जणूं कांहीं त्यांच्याबरोबरीचा आहें अशी माझ्याशीं वागणूक ठेवली होती. आणि ही त्यांची अगदीं सहज प्रवृत्ति होती. कृत्रिमतेचा त्यांत लेशहि नव्हता. मी मनांत अगदीं चूर होऊन गेलों व म्हटलें, माझ्याशीं जर यांची ही अशी वागणूक तर श्री. माधवराव अणे वगैरेसारख्या खऱ्या बरोबरीच्या स्नेह्याशीं हे कसें वागत असतील !

एक दिवस लढाऊ राजकारणाचा विषय बोलण्यांत निघाला. लो. टिळक व म. गांधी यांनीं केलेल्या निरनिराळ्या चळवळी, त्यांच्या कार्यपद्धति, त्यांचीं उद्दिष्टें, लोकसंग्रह वगैरेबद्दल पुष्कळच ऊहापोह झाला. मी म्हणालों, " आपल्या पक्षाची स्वतंत्र अशी कोणतीच मोहीम होत नसल्यामुळें व म. गांधींच्या चळवळीला ब्रिटिश सरकारविरुद्ध लढ्याचें स्वरूप येत असल्यामुळें आपल्यापैकीं पुष्कळ कार्यकर्ते त्यांत सामील होतात; नव्हे त्यांना त्यांत सामील व्हावेंच लागतें. परंतु चळवळीचें नियंत्रण आपल्या हातीं असत नाहीं; व तिचा शेवट केव्हां, कोठें, कसा करावा याचे अष्टाधिकार एकट्या म. गांधींच्या हातीं असल्यामुळें त्यांच्या वैयक्तिक लहरीप्रमाणें ती चळवळ परत घेतली जाते व भलत्याच बिलामती राष्ट्राच्या गळ्यांत पडतात. तेव्हां तुम्हांला पटणारी अशी एखादी चळवळ योग्य प्रसंगीं तुम्ही पुढाकार घेऊन केलीत तर आपल्या पक्षांतील सर्व लोक त्यांत मोठ्या अभिमानानें व हिरीरीनें भाग घेतील." (स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं सुरू केलेल्या भागानगर व भागलपूरच्या निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळींत हा अनुभव पुढें आलाच). यावर गु. तात्यासाहेब म्हणाले, " तूं म्हणतोस तें खरें आहे, परंतु माझ्या स्वभावामुळें मी असल्या चळवळींचें पुढारीपण पत्करूं शकत नाहीं. माझा स्वभाव फार हिशेबी आहे. असल्या चळवळी यशस्वी करण्यासाठीं लोकांना वाटेल तो त्याग करावयास सांगण्याला अंगीं जो एक प्रकारचा बेदरकारपणा असावा लागतो तो माझ्यांत नाहीं. परंतु आपल्यापैकीं कोणी जर अशी उठावणी करून निघेल तर मी सर्वस्वी

त्याचा पाठपुरावा करीन. मला त्यांत बिलकूल कमीपणा वाटणार नाहीं. उलट माझ्या अंगावर मूठभर मांस चढेल."

(२) ख्रिस्ताब्द १९२६ च्या मार्च-फेब्रुवारींतील प्रसंग. पुराण-वस्तु-संरक्षण खात्याचे शिल्पज्ञ श्री. चंद्र यांना बरोबर घेऊन गु. तात्यासाहेब केळकर छत्रपति श्रीशिवाजी स्मारकाचे एक विश्वस्त म्हणून महाराजांच्या छत्रीची पाहणी करण्यासाठीं रायगडावर गेले होते. श्री. बाबुराव गोखले वगैरे आणखी दोनतीन पुण्याची मंडळी बरोबर होती. रायगडानजीकच्या महाड गांवचा मूळ रहिवासी म्हणून मीहि बरोबर होतों. रायगडावर जाऊन येण्याची सर्व व्यवस्था महाडचे माझे स्नेही श्री. बापूराव जोशी व श्री. दत्तोपंत वैद्य वकील यांनीं उत्तम केली होती व तेहि आमच्याबरोबर गडावर आले होते. ठरल्याप्रमाणें आम्ही सर्व बैलांच्या छकड्यांतून महाडहून दुपारीं दोन वाजतां निघालों व कोंझरपर्यंत जाऊन तेथून पुढें किल्ल्याचा चढ दोन अडीच मैल पायीं चढून पाचाडास रात्रीं मुक्काम केला. पहाटे उठल्यावर दोनप्रहरीं भोजनास गडावर मुक्काम करावा किंवा गड उतरून परत पाचाडास यावें याबद्दल मतभेद झाला. श्री. बापुरावांचें म्हणणें कीं, एकदम इतका पल्ला घेणें तात्यांना निभणार नाहीं. तरी दोनप्रहरच्या भोजनाचा बेत गडावर करूं व थोडें ऊन खालीं झाल्यावर गड उतरून येऊन रात्रीं महाडास जाऊं. माझें म्हणणें कीं, सकाळच्या थंड वेळेंतच सर्व कार्यक्रम उरकावा. गड चढून गेल्यावर तेथेंच थोडी विश्रांती घेऊन अल्पोपहार करावा व नंतर छत्रीची पाहणी करून त्याच पावलीं गड उतरून पाचाडास यावें व तेथें स्नान, भोजन वगैरे उरकावें आणि कांहीं वेळ आणखी थोडी विश्रांती घेऊन कोंझरास जाऊन पुढें छकड्यानें महाडास जावें, म्हणजे महाडासहि दिवसाउजेडीं पोचूं. चढ थोडा, तीन-चार मैल सपाटी व परत येतांना सहा मैल सर्वच उतार असल्यानें तात्या-साहेबांनाहि त्रास जाणवणार नाहीं. तात्यासाहेबांनीं माझ्या म्हणण्याप्रमाणें करण्याचें ठरविलें.

तात्यासाहेबांचें वय त्या वेळीं पंचावन्न-छपन्न वर्षांचें होतें. म्हणून मी व दत्तो-पंत वैद्य वकील दोघे पिण्याच्या पाण्याच्या पिशव्या बरोबर घेऊन त्यांच्या एकसारखे मागें-पुढें होतों. पहाटे पांच वाजतां गड चढण्यास सुरुवात केली. आमच्या अपेक्षे-पेक्षां पुष्कळच जलदीनें तात्यासाहेब आपला स्थूल देह आवरून गड चढत होते. वाटेंत फारच थोड्या वेळां त्यांनीं पाणी वगैरे घेतलें. ठरल्याप्रमाणें गडावरील सर्व कार्यक्रम उरकून आम्ही आकरा वाजतां पाचाडास परत आलों. तात्यांचें पाय बोलूं लागले होते; पण त्यांनीं दाद दिली नाहीं. स्नान, भोजन वगैरे सर्व विधि थट्टामस्करींत व गप्पाविनोदांत सावकाश उरकले. आम्रफलांचें मधुर व थंडगार पन्हें सर्वजण यथेच्छ प्यालों व थोडी विश्रांती घेऊन दुपारच्या भर उन्हांत तोंडा-

वर सूर्य घेऊन पाचाडाहून कोंझरपर्यंत उतरून आलों. बैलांची उत्तम जोडी असलेल्या नातें येथील श्रीमान् शेठ शंकरभाई धरीया यांच्या छकड्यांत त्यांच्याचबरोबर तात्यांची प्रथम पुढें महाडास रवानगी केली व बाकी सर्व मंडळी मागून सोईप्रमाणें गाडींतून अगर पायीं चालत महाडास आलों. तात्यासाहेब आमच्यापूर्वी तास दीड तास अगोदर महाडास पोंचले होते. श्री. बापुराव जोशी यांच्या घरीं पाहुणे मंडळींचा मुक्काम होता. घरांतील मंडळींजवळ मोकळेपणानें बोलून विचारपूस करून तात्यांनीं आपली सर्व सोय लावून घेतली होती. मुळींच संकोच बाळगला नाहीं. तात्यांचे पाय सुजून तळलेल्या घारग्या-सारखे फुगले होते. तरी ते त्याबद्दल कांहींच बोलले नाहीत ! मात्र ही गोष्ट श्री. बापुरावांच्या वडील भावजयेच्या लक्षांत आली होती. आम्हीं घरीं पोंचल्यावर तिनें प्रथमच आम्हांस तात्यांचे पाय सुजले असल्याचें सांगितलें. आम्हीं हळूहळू विचारपूस करण्यास सुरुवात केली. तात्या कांहीं दाद लागू देईनात. अखेरीस बापू-रावांनीं त्यांच्याजवळ बसून युक्तीनें त्यांचा एक पाय चटकन् उचलून हातांत घेतला. पाहतात तों काय चांगलाच सुजलेला ! नुसता हस्तस्पर्शहि तात्यांना सहन होत नव्हता. आम्हांला तात्या कांहींच कळूं देईनात. अखेर मोठ्या मिनत-वारीनें त्यांनीं गड्याकडून पायांना खोबऱ्याचें तेल वगैरे लावून घेण्याचें कबूल केलें. मग हळूहळू पायांना तेल चोळून बराच वेळ गरम पाण्यानें शेक दिल्यावर त्यांना बरें वाटलें. दुसऱ्या दिवशीं सकाळच्याला ते साफ मोकळे झाले.

येतांना व जातांना महाडास श्री. बापूरावांच्या घरीं झालेल्या मुक्कामांत तात्या जणूं कांहीं स्वतःच्या मुलामाणसांत आहेत अशा मोकळेपणानें व निःसंकोच वृत्तीनें वागत होते. त्यामुळें एवढा मोठा पाहुणा घरीं आला असून कोणाला कांहीं अवघड वाटलें नाहीं व त्यांच्या बडदास्तींत आपल्याकडून कांहीं चुकल्यामुळें त्यांची गैरसोय झाली कीं काय अशी कोणाच्या मनाला रुखरूखहि लागली नाहीं. सर्व वातावरण कसें आनंदानें भरलें होते.

ल. र. साने

(दिवाण, संस्थान भोर)

(१) कै. तात्यासाहेब केळकर यांचा व माझा प्रत्यक्ष असा संबंध १९४५ अखेरपर्यंत फारसा आला नव्हता. पुण्यांतच बालपणापासून मी वाढल्यानें एक-दोन प्रसंगीं त्यांचा परिचय झाला, पण अर्थात् तो तेवढ्या कामापुरतांच होता. सुदैवानें भोर संस्थानांत श्रीमंत राजेसाहेब यांच्या हाताखालीं काम करण्याची संधि मला मिळाली व १९४५ सालच्या अखेरीस श्रीमंतांनीं मुद्दाम कै. तात्यासाहेबांना

बोलावून घेऊन भोरच्या राज्यकारभाराच्या बाबतींत त्यांचा सल्ला घेतला व त्यानंतर तात्यासाहेब हे भोरच्या सरकारी मंडळाचे ऑनररी अध्यक्ष म्हणून काम पाहूं लागले. त्या कारभारी मंडळाचा मीहि एक सदस्य असल्यानें तात्यासाहेबांबरोबर वारंवार बोलण्याचालण्याचा व कामकाज करण्याचा फायदा मला मिळाला. तात्यासाहेबांच्याकडे मी केव्हांहि गेलों तरी ते तयारच. मोकळ्या मनानें प्रश्नांची चर्चा करावी, साधकबाधक गोष्टींचा विचार करावा व मग निश्चित धोरण ठरवावें ही कामाची पद्धत जणूं ठरून गेली होती. तात्यासाहेब यांचें वैशिष्ट्य हें कीं, ते कित्येक वेळां स्पष्ट म्हणत कीं, " हें बघा, साने, मला दैनंदिन राज्यकारभाराचीं अंगेंउपांगें त्यांची तितकीशी माहिती नाहीं, त्या दृष्टीनें तुम्ही निःशंक मनानें मला तुम्हांला योग्य वाटेल तें सांगा; मी कांहीं सर्वज्ञ नाहीं, मलाहि शिकावयाचें असें पुष्कळ आहे." केवढी ही त्यांची शालीनता. ती केवळ वरवरची नव्हती, तर खरोखरच अंतःकरणापासूनची होती. त्यांच्यापुढे येणारा प्रश्न कितीहि बिकट असो, त्याची सोडवणूक ते मोठ्या सफाईनें उत्तम तऱ्हेनें करीत. एक ना दोन किती तरी उदाहरणें देतां येतील.

(२) येथे फक्त एकदोन प्रसंग नमूद करण्याचें योजिलें आहे. भोर संस्थानांतील एका तालुक्याच्या गांवांतील प्रसिद्ध मंदिरालगतच्या वाटेनें हरिजनांनीं इतर लोकांप्रमाणें जावें अशाबद्दल एकदां काम चालूं झालें. हरिजनमंदिरप्रवेश वगैरे प्रश्नांबाबत तात्यासाहेबांचीं मतें जगजाहीर होतींच, त्यास अनुसरून त्यांनी त्या प्रश्नाकडे बघितलें; पण कांहीं विशिष्ट अडचणी त्यांच्यापुढे आल्यावर त्यांनीं त्यांच्या नेहमींच्या मिळतें घेण्याच्या धोरणानुसार आपलें म्हणणें त्या कामीं पुढाकार घेतलेल्या सनातनी इसमांना समजावून सांगितलें. त्या वेळीं मीहि त्यांच्या घरीं त्या चर्चेच्या वेळीं होतों. अगदीं शांतपणानें व खेळीमेळीच्या वृत्तीनें तात्यासाहेबांनीं मोकळ्या दिलानें चर्चा केली; पण आलेल्या सनातनी गृहस्थांनीं बकिली बाण्यानें बोलण्यास सुरवात करतांच तात्यासाहेब एकदम म्हणाले कीं, "मीहि कायद्याचा अभ्यास केलेला आहे. तुमच्याप्रमाणेंच कायदा थोडाबहुत मलाहि कळतो. असे प्रश्न कायद्याच्या काटेकोरपणानें न हाताळतां समजुतीनें सोडविले पाहिजेत." पण ही विचारसरणी आलेल्या गृहस्थांना न पटून ते आपलें पूर्वीचेंच घोडें तसेंच दामटूं लागले, हें पाहून कधींहि न रागावणारे तात्यासाहेब इतकें रागावले कीं, त्यांचें त्यांना भान राहिलें नाहीं. चेहरा तांबडा लाल झाला. डोळे गरगर फिरूं लागले. मी तरी तात्यासाहेबांना इतके रागावलेले तोंपर्यन्त पाहिलें नव्हतें. मीच मध्यें पडून त्या सनातनी वकिलांना खालीं घेऊन गेलों व अशा तऱ्हेनें ती वेळ मारून नेली.

(३) तसेंच आणखी फक्त एका प्रसंगीं तात्यासाहेब असेच कमालीचे रागावलेले मीं पाहिलें. आमची कारभारी मंडळाची सभा पुण्याच्या

पंतसचिवाच्या वाड्यांत चालूं होती. त्या वेळीं कारभारी मंडळाच्या एका सन्माननीय सभासदांनीं एका कामांत भरमसाट, अप्रस्तुत व गैरवाजवी विधानें केलीं. तीं पाहून तात्यासाहेब इतके गरम झाले की, तेथल्या तेथें तात्यासाहेबांनीं कौन्सिल सेक्रेटरीला आपलें म्हणणें लिहून घेण्यास सांगितलें व तें त्या सन्माननीय सभासदांस तेथेंच दाखविलें. केळकरांच्या रागाचा पारा भलताच वर गेलेला, अशा स्थितींत काम चालूं ठेवणें योग्य नाहीं, असें पाहून मींच त्या वेळीं काम दुपारपर्यन्त बंद ठेवावें असें सुचविले व त्यामुळें वेळ निघून गेली. त्याच दुपारीं त्या सन्मान्य सभासदांनीं तात्यासाहेब यांच्याकडे क्षमेची याचना करून तें प्रकरण तेथेंच संपवावें अशी लेखी विनंती केली व तात्यासाहेबांनीं तितक्याच सहज सुलभतेनें ती स्वीकारून सकाळीं नमूद केलेलें म्हणणें कौन्सिलच्या प्रोसिडिंगमधून रद्द केल्याचे उद्गार तसेच विशाल अंतःकरणानें जाहीर केले !

कांहीं जरूरीच्या कामासाठी मी तात्यासाहेब यांच्याकडे रात्रीं अवेळीं गेलों असतांहि मी आलों आहें असें ऐकतांच ताबडतोब येऊन शांतपणानें माझ्याशीं विचारविनिमय करून कामाचा निकाल लाविला.

(४) आतां अखेरची एकच गोष्ट नमूद करावीशी वाटते. गेल्या ता. १८ ऑगस्टला हिज हायनेस श्रीमंत राजेसाहेब यांचा राज्यारोहणाचा रजतमहोत्सव भोरास होणार होता. त्या वेळीं भोर स्टेट बँकेतर्फे श्रीमंतांना मानपत्र व रात्रौ मेजवानी देण्याचें मुक्रर झालें होतें. बँकेच्या डायरेक्टर बोर्डाचा चेअरमन या नात्यानें मीं तात्यासाहेबांना मेजवानीला येण्यास विनंती केली. ते त्याच दिवशीं सायंकाळीं भोरहून परत पुण्यास येणार होते, पण मीं आग्रहाची विनंती केल्यानें त्यांनीं आपला पहिला कार्यक्रम रद्द करून राहण्याचें कबूल केलें. मला फार आनंद झाला. ठरल्याप्रमाणें रात्रीं भोजन झाल्यावर बँकेच्या डायरेक्टरांसमवेत बराच वेळ गप्पागोष्टी करून मग ते दुसरे दिवशीं पुण्यास गेले. त्यांचा स्वभाव भिडस्त, सहसा नाहीं म्हणून लोकांस नाराज करावयाचें नाहीं. या वेळीं त्यांनीं कायदे-कौन्सिल व हिंदी राजकारण ह्यांबद्दल आपल्या जुन्या मजेदार कित्येक आठवणी सांगितल्या.

तसेंच त्यांनीं मॅजजवळ पुष्कळ वेळां असें स्पष्ट सांगितलें कीं, भोरच्या राज्यकारभारांविषयीं वर्तमानपत्रांवरून माझें जें जरासें प्रतिकूल मत होऊं लागलें होतें, किंबहुना झालें होतें, तें मात्र प्रत्यक्ष अनुभवानंतर बदललें आहे. टीका रास्त व योग्य केव्हांहि करावी, पण ती द्वेषमूलक केव्हांहि नसावी असा त्यांचा दंडक होता. प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतर तात्यासाहेब म्हणत कीं, " कोठलें संस्थान 'आयडियल' आहे ! पण राईचा पर्वत करणाऱ्या टीकाकारानें ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली

पाहिजे कीं, त्याच त्याच गोष्टी पुनःपुन्हा वर्तमानपत्रांत उगाळल्यानें त्याचें महत्त्व आपोआपच नाहींसें होतें." शेवटीं शेवटीं तर तात्यासाहेब त्याच दृष्टीनें भोरविषयीं येणाऱ्या टीकेकडे पाहत असत.

(५) कै. तात्यासाहेब हे खरोखरच मेरूसारखे होते. कितीहि बिकट प्रश्न असो तो ते इतक्या उत्तम तऱ्हेनें सहज सोडवीत कीं, मला तर फार कौतुकच वाटे. मी त्यांना पितृतुल्य मानी व त्यांचीहि मजवर अल्पावधींतच वात्सल्यपूर्ण कृपा बसली. खेळीमेळीनें सर्वांस सुखावह काम करण्याची त्यांची हातोटी त्यांनाच साधली होती. असो. तात्यासाहेब यांच्याविषयीं कितीतरी लिहितां येईल; पण तो मोह आवरता घेऊन तात्यासाहेब यांना माझी प्रेमाची श्रद्धांजलि मोठ्या सद्भावानें अर्पण करतों.

तैसे साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ॥
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥

वरील श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या शब्दांत तात्यासाहेब यांच्या लेखनाचा थोडक्यांत आढावा घेतां येईल असें वाटतें.

❋

वि. पां. दांडेकर

(एम्. ए., पीएच्. डी., प्राध्यापक, बडोदें)

(१) गुरुवर्य तात्यासाहेब केळकर ह्यांचें जीवन एखाद्या निर्मळ व सतत वाहणाऱ्या जिवंत झऱ्याप्रमाणें होतें. तृषार्त कसाहि असो, गरीब असो कीं श्रीमंत असो, एकटा आलेला असो कीं कोणाच्या मध्यस्थीनें आलेला असो, त्याची तहान तत्परतेनें नाहींशी करण्याचें कार्य झरा करतो. तात्यासाहेबांचें तसें होतें. कोणी केव्हांहि त्यांच्याकडे जावो. तें त्याचें म्हणणें शांतपणें व सहानुभूतीनें ऐकून त्याचें होईल तें काम करीत. इ. स. १९२६ सालीं माझी व तात्यासाहेबांची पहिली गांठभेट झाली. तत्पूर्वी त्यांची व माझी मुळींच ओळख नव्हती. त्यांच्या वाङ्मयाचा मी एक चाहता होतों व दुरून, मी जेव्हां पुण्यास जाई तेव्हां, त्यांचें दर्शन घेऊन मी समाधान मानीत असें. जर्नॅलिझम किंवा वृत्तपत्रीय शिक्षण आपणाला तात्यासाहेबांजवळ घेतां आलें तर फार बहार होईल, असा मनांतल्या मनांत विचार करीत उन्हाळ्याच्या सुटीचे दिवस मी घालवीत होतों. येवढ्या थोर पुढाऱ्याची आपणाला भेट कशी घेतां येईल आणि त्याच्याजवळ जर्नॅलिझमचे पाठ देण्याची विनंती कशी करतां येईल या काळजींत एक दिवस एक पत्र मीं तात्यासाहेबांना लिहून टाकिलें. पत्रांत भेटीचा उद्देश व केव्हां भेटतां

येईल याविषयीं मजकूर होता. तिसऱ्या दिवशीं माझ्या पत्राचें मला उत्तर मिळालें. तें तात्यासाहेबांच्या हस्ताक्षरांत होतें व त्यांत त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं भेटून जाण्याविषयीं लिहिलें होतें. एका अनोळखी व सामान्य माणसाच्या पत्राला उत्तर देण्याची कोण ही तत्परता! किती पुढारी अशीं उत्तरें देत असतील? पत्रांत सांगितलेल्या वेळीं तात्यासाहेबांच्या गायआळींतील घरीं मी गेलों. दारावर टकूटक् करतांच खाकरत खाकरत त्यांनीं दार उघडलें व ते बाहेर आले. इतक्या जवळून मीं त्यांना त्यापूर्वी कधींहि पाहिलें नव्हतें. धोतर नेसलेले, उघडे-बंब असें त्यांचें तेजस्वी नि गौरवर्ण शरीर पाहून मीं जुन्या पद्धतीनें खालीं वाकून त्यांना नमस्कार केला. मीं त्यांच्याकडे पाहिलें तों त्यांच्या ओठांच्या कडांतून स्मित बाहेर येण्याकरितां धडपडत होतें. साहित्य-सम्राटासमोर साहित्याच्या क्षेत्रांतील एक भणंगभिकारी या नात्यानें उभा राहून मीं माझ्या येण्याचा हेतु त्यांना भीतभीत कळविला. तो ऐकून ते म्हणाले, "अस्सं! जर्नॅलिझमचं असं वेगळं शिक्षण कांहीं नसतं; लिहितां लिहितां तें सर्व जमतं. उद्या तुम्ही याच वेळीं या." त्यांच्या आज्ञे-प्रमाणें दुसऱ्या दिवशीं त्यांच्या घरीं जातांच ते मला म्हणाले, "सध्या लीग ऑफ नेशन्सविषयीं बरीच चर्चा चालली आहे. या विषयावर येथें बसल्या बसल्या कांहीं स्फुट विचार लिहा पाहूं. मग काय करावयाचं तें सांगतों." त्यांची आज्ञा हा महाप्रसाद समजून व मनांतल्या मनांत विचारांची गुंफण करून मीं वीस पंचवीस ओळींचा मजकूर लिहिला. लीग ऑफ नेशन्सवर गारुडी व त्याच्या पोत-डीचें रूपक योजून मीं सर्व मजकूर सजविला होता. मजकूर तयार होतांच मीं तो त्यांना दाखविला व परीक्षेच्या परिणामाच्या साशंकतेनें मी त्यांच्या चेहेऱ्याकडे पाहूं लागलों. दोन तीन मिनिटांत त्यांनीं तो मजकूर वाचून संपविला. त्यांच्या मुद्रेवर मला समाधान दिसलें. ते मला म्हणाले, "तुम्ही चांगलें लिहिलें आहे. जात्यावर बसलें कीं ओवी आठवते ती ही अशी. यांत भरीला थोडा मजकूर घालून मी तो येत्या केसरीच्या अंकांत छापायला देतों." असें म्हणत तात्या-साहेबांनीं आपलें पेन हातांत घेऊन माझ्या दोन परिच्छेदांखालीं तिसरा एक परिच्छेद जोडला व तो सर्व मजकूर लि. आ. म. (लिहून आलेला मजकूर) या सदराखालीं केसरींत पुढें प्रसिद्ध केला. हा लेख एक मौल्यवान् ठेवा म्हणून मीं माझ्याजवळ जपून ठेविला आहे. घोंगडीला शालजोडीचें ठिगळ लावावें तसा माझ्या मजकुराखालीं त्यांचा मजकूर दिसतो! थोडाहि गुण दिसतांच त्याला उत्तेजन देण्याचा हा केवढा मनाचा मोठेपणा! तात्यासाहेबांनीं माझ्या पहिल्याच लेखाला जें अपूर्व उत्तेजन दिलें तसें किती संपादक देत असतील! माझ्या-सारख्या सर्वस्वीं अनोळखी मनुष्याकरितां आपला महत्त्वाचा वेळ किती पुढारी घालवीत असतील! अगदीं प्रथम भेटीला तात्यासाहेबांकडून मिळालेलें प्रोत्साहन

मला आजतागायत पुरलें आहे. एखादी गोष्ट हिंमतीनें आपण करूं शकूं हा विश्वास त्यांच्याच कृपेमुळें माझ्या ठिकाणीं निर्माण झाला. निर्मळ झऱ्यासारखें परोपकारार्थ त्यांचें जीवन होतें असें जें मी म्हणतों तें यामुळेंच.

(२) हातीं घेतलेलें काम उरकण्यांत तात्यासाहेब वाघासारखे होते. काम केवढेंहि मोठें असो, ठराविक वेळेच्या आंत तें संपविण्याचें त्यांचें चातुर्य व कसब हीं अजब होतीं. टिळकचरित्राचा पहिला खंड प्रसिद्ध होऊन पांच-सहा वर्षें झालीं तरी उरलेले खंड प्रसिद्ध होईनात, असें पाहून त्यांच्या असंख्य वाचकांनीं त्यांना ते लिहिण्याविषयीं अगदीं गळ घातली. राजकारणाच्या व्यापापुढें तात्यासाहेबांना घडीची उसंत मिळेना; पण त्यांनीं ठराविलें की, १९२७ साल संपण्यापूर्वी उरलेलें टिळकचरित्र लिहून पुरें करावयाचें. पुण्यांत राहून हें होणें शक्य नव्हतें. म्हणून ते मुद्दाम पांचगणीजवळ असलेल्या दांडेघर येथें जाऊन राहिले. त्यांच्याबरोबर त्या वेळीं लेखक म्हणून मीहि होतों. ता. २ ऑक्टोबर १९२७ ते २० ऑक्टोबर १९२७ पर्यंत आम्ही श्री. साठे यांच्या बंगल्यांत राहिलों. बंगला उंच व निवान्त जागीं होता व तेथून कृष्णानदीचें खोरें मोठें रमणीय दिसें. टिळकांसारख्या लोकोत्तर पुरुषाचें चरित्र लिहायला जसें स्फूर्तिस्थान असावें तसें हें होतें. ह्या जागीं रोज बारा बारा तास तात्यासाहेब आम्हां दोनतीन लेखकांना आलटून पालटून मजकूर सांगत. ज्या वेळीं आमच्यापैकीं कोणीच हजर नसे त्या वेळीं ते स्वतःच लिहीत बसत! टिळकचरित्राच्या पहिल्या खंडाच्या मानानें दुसरा व तिसरा हे खंड तितकेसे सरस उतरले नाहींत व ते तात्यासाहेबांनीं स्वतः लिहिले नाहींत, अशा प्रकारची खोटी हूल कांहीं निंदकांनीं उठवलेली मीं ऐकिली आहे. ह्यांपैकीं पहिला भाग हा मतभिन्नतेचा विषय होऊं शकला, तरी दुसरा भाग अगदीं धादांत खोटा आहे असें मी सांगूं इच्छितों. टिळकचरित्राचा उत्तरार्ध ह्या अथपासून इतिपर्यंत स्वतः तात्यासाहेबांनीं लेखकांना तोंडी मजकूर सांगून तयार केला आहे; इतकेंच नाहीं तर, हा मजकूर लिहीत असतांना चरित्रनायकाशीं अनेक वेळां अगदीं समरस झालेलें मी तात्यासाहेबांना पाहिलें आहे. टिळक आणि क्रांतिकारक यांच्या परस्पर संबंधाविषयीं मजकूर सांगतांना एका रात्रीं तात्यासाहेब इतके रंगले कीं, घड्याळांत बारा वाजून गेल्याचेंहि त्यांच्या लक्षांत आलें नाहीं! त्या अठरा-वीस दिवसांत तात्यासाहेब अगदीं टिळकमय बनले होते. अनेक फाइली व हजारों पत्रें धुंडाळून ते मनांतल्या मनांत विषयाची रूपरेषा आंखीत आणि मग आम्हांला भराभर मजकूर सांगत. रात्रीचे काय सहा-सात तास ते झोपतील तेवढेंच. बाकीच्या वेळांत ते चरित्राच्या कामांतच गुंतलेले असत. शेवटीं त्यांच्या इच्छेप्रमाणें व संकल्पाप्रमाणें त्यांनीं टिळकचरित्राचा उरलेला सुमारें सात-आठशें पानांचा मजकूर तेवढ्या अठरा दिवसांत तयार केला!

(३) तात्यासाहेबांचीं साहित्यविषयक कांहीं विशिष्ट मतें होतीं. त्यांपैकीं बरीचशीं लेखरूपानें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांच्याशीं गप्पागोष्टी करीत असतांना मला जीं कांहीं विशेष वाटलीं तीं येथें देतों. भाषाशैलीसंबंधानें तात्यासाहेबांचें असें मत होतें कीं, तिचें अनुकरण होऊं शकत नाहीं व कोणी करूं नये. जसें प्रत्येकाचें चालणें, बोलणें हें वैशिष्ट्यपूर्ण असतें तशी त्याची शैलीहि असते. मनुष्याचें प्रतिबिंब भाषाशैलींत पडतें. भाषाशैलीप्रमाणें वर्णनशैली किंवा वर्णनाच्या पद्धतीसंबंधीं त्यांचें असें मत होतें कीं, वर्णन सूचक असावें, संपूर्ण नसावें. शेवटच्या टोकापर्यंतचें, अथपासून इतिपर्यंतचें वर्णन नसावें. एक पायरी अलीकडचें वर्णन असावें. याच्याकरितां अर्थातच संयमाची जरूरी असते. या बाबतींत पांचगणी मुक्कामीं एका संध्याकाळी आमच्या गप्पा चालल्या असतांना त्यांनीं 'लाऊकन' या सुप्रसिद्ध शिल्पकृतीवर लेसिंगनें जें लिहिलें आहे त्याचा उल्लेख केला. लेसिंगनें असें सांगितलें आहे कीं, खरी कला ही उपान्त्यावस्थेंत असते, अन्तिम अवस्थेंत नसते. (ऑल आर्ट इज पेनल्टिमेट, नॉट अल्टिमेट) आधुनिक मराठी कादंबरीकार सर्व कांहीं वर्णन करून सांगतात, या पद्धतीवर त्यांचा आक्षेप त्यांनीं विस्तारानें त्या दिवशीं मांडला. लिहिणें अवास्तव किंवा भावनेच्या फाजील आहारीं गेलेलें नसावें, असें तिसरें एक त्यांचें खास मत होतें. खुद्द लेखकाच्याच तर्कबुद्धीला न पटणारें असें पुष्कळ वाङ्मय प्रसिद्ध होतें. तें अर्थातच त्यांना आवडत नसें. आपण वर्णन केलेल्या गोष्टी संभाव्य आहेत किंवा नाहींत, यासंबंधीं लेखकानें स्वतःच स्वतःला प्रश्न विचारून समाधान करून घ्यावें, असें ते म्हणत.

(४) माझ्या लक्षांत आलेल्या तात्यासाहिबांच्या कांहीं आवडीनिवडीसंबंधानें चार शब्द लिहितों. तात्यासाहेबांना शेंगादाणे फार आवडत असत, हें आतां सर्वांनाच माहीत झालें आहे, आणि ज्यांना त्यांच्या इतर गुणांचें अनुकरण करतां येत नाहीं ते शेंगादाणे खाऊन तात्यासाहेबांचें अनुकरण करितात ! जेवतांना त्यांना मधूनमधून चमच्यानें आमटीचे घोट घ्यायला आवडत असे. पांचगणीच्या मुक्कामांत हें मीं पाहिलें. आमच्या बरोबरचा गोपाळराव स्वयंपाकी तात्यांच्या पानांत एक चमचा ठेवी. पुढें ह्या चमच्याचा उपयोग माझ्या लक्षांत आला. दुपारचें भोजन झाल्याबरोबर अर्धा पाऊणतास ते न चुकतांना झोंप घेत. झोंपतांना तोंडावर बारीकसें पांघरूण घेऊन त्यांना झोंपण्याची संवय असे. पांचगणी येथें असतांना बूट-पाटलोण, कोट असा पोषाक करून ते सकाळीं फिरायला जात. परंतु हा पोषाक त्यांना घालायला आवडत नसे व तो त्यांना धड घालतांहि येत नसे. सामान्यपणें तात्यासाहेबांना सुपारीचेंहि व्यसन नव्हतें, असें म्हणायला हरकत नाहीं. टिळकांचे शिष्य असूनहि त्यांना सुपारीचें व्यसन लागलें नाहीं हें आश्चर्य आहे. परंतु क्वचित् त्यांना मन प्रसन्न बनविण्याकरितां छोटयाशा उत्तेजकाची जरूरी भासे. एका लाकडी कुपींत अत्तराचा

फाया किंवा सुगंधी तपकीर ठेवून, ती कुपी मधूनमधून ते हुंगीत असत. अगदी एकदांच मीं त्यांना पांचगणीच्या मुक्कामांत सिगरेट ओढतांना बघितलें. मला पाहतांच ते म्हणाले, " कांहीं तरी 'सेन्सेशन' (उत्तेजन) असावें म्हणून मी ओढतों." तात्यासाहेबांना चहा विशेष आवडे आणि एका कपानें त्यांचें समाधान न होतां ते बहुधा दीड दोन कप चहा घेत. सर्व व्यवसायात त्यांना प्रोफेसराचा व्यवसाय विशेष आवडत असे. पुण्याला जेव्हा केव्हां मी जाई तेव्हां त्यांचें, मला पाहतांच, हंसत हंसत पुढील वाक्य ठरलेलें असें. " जन्माला यावें आणि प्रोफेसर व्हावें. " तात्यासाहेबांना आपलें वाङ्मय (वृत्तपत्रीय सोडून) दुसऱ्यांना – अर्थातच समानशील अशा रसिकांना – वाचून दाखवायला आवडत असे. पुणें व पांचगणी अशा दोन्ही ठिकाणीं तात्यासाहेबांनीं मला अनेक वेळां आपल्या कविता व नाटके वाचून दाखविलीं आहेत. चंद्रगुप्त व कृष्णार्जुनयुद्ध हीं दोन्हीं नाटकें त्यांनीं मला अथपासून इतिपर्यंत वाचून दाखविलीं. वाचत असतांना ते अगदीं तद्रूप होऊन वाचीत.

(५) आणखी एकच महत्त्वाची आठवण सांगतों. इ. स. १९४५ च्या ऑगस्टमध्यें कांहीं कामानिमित्तानें मी पुण्यास गेलों होतों. पुण्यास गेल्यावर एक दिवस तात्यासाहेबांकडे जेवावयाला जावेंच लागे. त्याप्रमाणे ता. १३ ऑगस्ट रोजीं मी त्यांच्याकडे जेवायला गेलों. पंक्तींत रा. अण्णासाहेब व बापूसाहेब केळकर हेहि होते. जेवतांना ज्योतिषासंबंधीं गोष्टी निघून मुंबईच्या एका ज्योतिषानें त्या वर्षाच्या दिपवाळींत तात्यासाहेबांच्या मृत्यूचें भविष्य वर्तविल्याविषयीं खुद्द त्यांनींच सांगितलें. तें सांगत असतांना अगदीं हंसत हंसत तात्यासाहेब बोलत होते. " असल्या भविष्यांचा माझ्या मनावर कांहींदेखील परिणाम होत नाहीं, " असें त्यांनीं त्या वेळीं सांगितलें. जेवण झाल्यावर त्यांची वामकुक्षी घेण्याची संवय मला माहीत असूनहि मी त्यांच्या मागोमाग वर गेलों व म्हणालों, " तात्यासाहेब, पुनर्जन्मासंबंधानें आपलें काय मत आहे ? " त्यावर क्षणाचाहि विचार न करतां ते म्हणाले, " पुनर्जनन आहे, पुनर्जन्म नाहींच मुळीं. मेल्यावर मनुष्याच्या देहाचे कण मातींत किंवा हवेंत मिसळतात. हे कण यदृच्छेनें व कांहीं रूपानें एकत्र येऊन त्यांना जो जन्म मिळत असेल तो फार झालें तर पुनर्जन्म म्हणून मानतां येईल. येरव्ही कांहीं नाहीं. आहे या शरीराचा येवढ्याचसाठीं अधिकाधिक लोकांकरितां उपयोग करीत राहणें हें माझें जीवित तत्त्वज्ञान आहे. " तात्यासाहेबांच्या या उद्गारांत आणि मृत्यूच्या कांहीं तास पूर्वी त्यांनीं लिहून ठेविलेल्या दोन श्लोकांत किती विलक्षण साम्य आहे, हें वाचकांनीं ताडून पाहावें.

❋

वामन कृष्ण परांजपे

(बी. ए., एल्एल्. बी., वकील, पुणे)

केळकराच्या कैलास-वासामुळें अनेक गुण निराश्रित झालेले आहेत. त्यांपैकीं गुणग्राहकता, माणुसकी, पक्षांधतेचा अभाव, ग्राह्याग्राह्यविवेचनशक्ति, उद्योगशीलता आणि अष्टपैलूपणा हे प्रमुख होत. ह्या गुणांना दुसऱ्या कोणाकडे केव्हां थारा मिळेल तो मिळो, पण तूर्त तरी हे गुण 'निर्वासित' झालेले आहेत, यांत शंका नाहीं. सुजनता ही तर त्यांच्या स्वभावाची शोभा होती. म्हणूनच सद्विचार, सत्संग आणि सदुद्योग यांचें सतत खत मिळणाऱ्या त्यांच्या स्वभाववृत्तीच्या वेलीवर वर दिलेल्या सद्गुणांचीं सुंदर फुलें सदोदित फुललेलीं दिसत असत. आणि म्हणूनच मतभेदाच्या आणि पक्षभेदाच्या चिखलांतून त्यांचें हृदयकमल लीलेनें वर येऊं शकत असें आणि उमलून डौलानें डुलत असें! खालीं दिलेल्या तीन आठवणी ह्या वर सांगितलेल्या वृत्तीच्याच द्योतक आहेत.

(१) कै. शिवरामपंत परांजपे यांच्या मृत्यूनंतर त्यांनीं लिहिलेलें 'पहिला पांडव' हें कर्ण-चरित्रावर लिहिलेलें नाटक रंगभूमीवर आलें होतें. पहिला किंवा दुसराच प्रयोग असेल. स्थळ किर्लोस्कर थिएटर, कपनी महाराष्ट्र नाटक मंडळी. तात्यासाहेबांना कंपनीनें मुद्दाम निमंत्रण केलेलें असलें पाहिजे, हें उघडच आहे. त्या वेळीं महाराष्ट्र नाटक मंडळीचा नटसंच चांगला होता आणि विशेषतः टिपणीस व पोतनीस हे नामांकित नट अनुक्रमें कर्ण आणि कुंती यांच्या भूमिका अतिशय उठावदार व परिणामकारक रीतीनें करीत असल्यामुळें नाटकाला चांगलाच रंग भरत असे. तात्यासाहेब पहिल्या रांगेंत मध्यालगतच्या पहिल्याच खुर्चीवर बसलेले होते. सदर नाटकाच्या दुसऱ्या अंकांतला शेवटला प्रवेश कर्ण आणि कुंती यांच्या भेटीचा असून त्यांचा हा संभाषण-प्रसंग कमालीच्या करुणरसानें अत्यंत ओथंबलेला आहे. कर्ण हा कौरवांच्या पक्षाचा सेनापति आणि पांडवांची माता कुंती ही कर्णाची पण जन्मदात्री आई! त्यांचें हें संभाषण म्हणजे दोन कर्तव्यांचा निष्ठुर झगडा. नातीं तुटण्याचा तसाच आंतडीं तुटण्याचा तो प्रसंग! अशा रीतीनें विलक्षण परिस्थितींत आणि कात्रींत सांपडलेल्या मातापुत्रांचा हा अंतःकरण पिळवटून काढणारा प्रवेश जेव्हां रंगूं लागला, त्या वेळीं रसार्द्र झालेल्या तात्यासाहेबांचें अंतःकरण हेलावून जाऊं लागलें. दुसऱ्या दिवशीं कर्ण आणि अर्जुन यांचें हिरीरीचें युद्ध व्हावयाचें होतें आणि दोघांपैकीं कोणीतरी एक कुंतीच्या पोटचा गोळा दुसऱ्या गोळ्याच्या हातून मरावयाचा होता! अशा रीतीनें या प्रवेशांत कुंती आणि कर्ण यांच्या अगतिकतेंतून आणि दैवगतीच्या विचित्र निष्ठुरतेंतून निर्माण झालेला आणि अखेर विलापांनीं विव्हल झालेल्या कुंतीला मूर्छा आल्यामुळें

कळसापर्यंत पोचलेला तो करुण रस ज्या वेळीं नाट्यगृहांतील सहृदय प्रेक्षकांच्याकडे वळून पावती मागूं लागला, त्या वेळीं हें लक्षांत आलें कीं, तात्यासाहेबांनी आपली पावती केव्हांच देऊन टाकलेली होती. त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या होत्या आणि आपल्या उपरण्यानें ते वारंवार आपले डोळे पुशीत होते!

(२) सन १९३७ मध्यें कॉंग्रेसनें पहिल्यांदा अधिकार-स्वीकार केला. त्या वेळीं मुंबईच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळानें एक बेत मनांत योजला होता. तो असा कीं, गुजराथेंतल्या सुप्रसिद्ध बार्डोलीच्या लढ्यांत ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या किंवा ज्या लोकांचें नुकसान झालें किंवा ज्यांनीं त्याग केला त्यांना सरकारतर्फे मोबदला देण्यांत यावा. ह्या सुमाराला कॉंग्रेस पक्ष आणि लोकशाही स्वराज्य पक्ष यांच्यामधली तेढ आणि चुरस अतिशय तीव्र झालेली होती. लोकशाही स्वराज्य पक्षाचे पुढारी श्री. जम्नादास मेथा हे त्या वेळीं कौंसिलांत आपल्या तिखट व खोंचदार वक्तृत्वानें कॉं. सरकारावर भडीमार करीत होते. अशा वेळीं जेव्हां कॉं. सरकारनें बार्डोलीच्या सत्याग्रह्यांच्या मोबदल्याचा बूट काढला तेव्हां तोडीस तोड म्हणूनच कीं काय जम्नादासांनींहि आपली एक प्रतियोजना काढली. जम्नादासांची योजना अशी कीं, जर बार्डोलीवाल्यांना मोबदला द्यावयाचा तर महाराष्ट्रांत पूर्वीपासून म्हणजे टिळकांच्या राष्ट्रीय चळवळीपासून किंबहुना १८५७ पासून ज्यांनीं ज्यांनीं चळवळींत भाग घेतला आणि स्वार्थत्याग केला त्यांचीहि यादी करावी आणि त्यांनाहि सरकारनें मोबदला द्यावा. कॉं. सरकारच्या योजनेला जम्नादासांचें हें प्रत्युत्तर होतें. लगेच ह्या कल्पनेचा पाठपुरावा करण्याकरितां आणि त्याला पाठिंबा मिळविण्याकरितां जम्नादासांनीं टिळकमंदिरांत जाहीर सभा भरविली. आधींच सभेंतील वातावरण जम्नादासांना आणि त्यांच्या योजनेला अनुकूल असें होतें. त्यांतच जम्नादासांच्या कॉंग्रेसवरील खमंग आणि कडक टीकेची भर पडल्यामुळें श्रोतृसमाज पूर्णपणें त्यांच्या बाजूला झुकला. आणि ते ज्या वेळेला आपलें भाषण संपवून खालीं बसले त्या वेळीं अत्यंत उत्साहानें टाळ्यांचा कडकडाट करून श्रोत्यांनीं आपला संतोष आणि संमति व्यक्त केली.

ह्या सभेला तात्यासाहेब केळकर हजर होते. त्यामुळें संकल्पित कार्याला अधिक पुष्टि मिळण्याच्या अपेक्षेनें त्यांना बोलण्याची विनंती करण्यांत आली. प्रथम ते भाषण करण्याला किंचित् नाराज दिसले; परंतु सभेनें टाळ्यांच्या रूपानें वारंवार आग्रह केल्यामुळें ते बोलावयास उठले. तात्यासाहेबांनीं पहिलेंच वाक्य उच्चारलें तें असें –

"तुम्ही मला बोलायला अतिशय उत्साहानें आग्रह करतां आहांत खरें; पण मी जें बोलणार आहें तें तुम्हांला माहीत असतं, तर हा आग्रह मला तुम्हीं केलांच नसता! तुम्हांला कदू लागेल–अप्रिय वाटेल असंच माझं या बाबतींत मत आहे."

अशी प्रस्तावना करून तात्यासाहेबांनीं आपला दृष्टिकोन निर्भीडपणानें सभेपुढें मांडला. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, एकानें गाय मारली म्हणून आपण वासरूं मारावें अशा इरेस पेटून आपण तत्त्वच्युत होत आहोंत. स्वार्थत्यागाला मोबदला देऊं पाहणें ही गोष्ट मुळांतच घातुक आणि अनिष्ट आहे. एका पक्षाचें सरकार झालें कीं, लगेच त्यानें आपल्या पक्षांतील चळवळ्यांना नुकसानभरपाई अगर मोबदला देणें म्हणजे एक प्रकारें राजकीय लांच दिल्यासारखेंच होय ! म्हणून अशी घातुक प्रथा पाडण्यालाच विरोध केला पाहिजे. काँ. सरकारनें ही घातुक टूम काढली म्हणून आपणहि तशीच काढणें ही तत्त्वाच्या दृष्टीनें मोठी चूक आहे. याकरितां आपण काँग्रेस सरकारच्याच मूळ कल्पनेचा निषेध केला पाहिजे.

तात्यासाहेबांच्या ह्या विचारसरणींतलें अचूक तत्त्वशोधन तर मार्मिक श्रोत्यांना पटलेंच; पण उघडउघड सभेचें मत आपल्या दृष्टिकोनाच्या विरुद्ध आहे, हें दिसत असतांहि सभेंतल्या चुरशीच्या वातावरणाच्या वर जाऊन निःपक्षपाती बुद्धीनें विवेक करून आपलें खरें मत स्पष्टपणें मांडण्यांत तात्यासाहेबांनीं जो निर्भीडपणा प्रकट केला, त्याची छाप सुज्ञ आणि बुद्धिनिष्ठ श्रोत्यांच्यावर अधिक पडली, यांत संशय नाहीं.

(३) मीं कै. शिवरामपंत परांजपे यांचें चरित्र लिहून १९४५ च्या सप्टेंबर महिन्यांत प्रसिद्ध केलें. अर्थातच त्याची एक प्रत मीं तात्यासाहेबांकडे भेट म्हणून पाठविली होती. ह्या ग्रंथांत केळकरांच्यावर प्रखर टीका आहे. परंतु माझ्या अपेक्षेला धक्का देणारी गोष्ट अशी कीं, तात्यासाहेबांच्याकडे पुस्तक पाठविल्यापासून चारच दिवसांच्या आंत त्यांनीं लिहिलेलें पत्र माझ्या हातांत पडलें. त्यांत त्यांनीं 'माझी तिसरी पिढी असतांनाहि' इतकी जुनी माहिती 'एखाद्या माहितगाराप्रमाणें' दिल्याबद्दल मला धन्यवाद दिले होते आणि 'अनेक अंगांनीं उत्कृष्ट ग्रंथ' लिहिल्याबद्दल माझें मोकळ्या मनानें अभिनंदन केलें होतें !

पण एवढ्यावरच हें थांबलें नाहीं. एवढाच प्रकार घडला असता तर कदाचित् ही आठवण नमूदहि केली नसती. वरील गोष्टीनंतर सुमारें चार महिन्यांनंतरची हकीकत. जाहिरातीच्या कामासंबंधांत मी गायकवाडवाड्यांत शिरत होतों. दरवाजाच्याच बाहेर उभ्या असलेल्या एका टांग्यांत तात्यासाहेब नुकतेच चढून बसले होते आणि त्यांचा टांगा चालू झाला होता. खरं म्हणजे मीं तात्यासाहेबांना वाड्याच्या दरवाज्यांतून आंत शिरत होतों तेव्हां पाहिलें होतें. पण मी आंत वळून आपल्या कामाला चाललों होतों. इतक्यांत 'अरे' अशी तात्यासाहेबांच्या नेहमींच्या घोगऱ्या स्वरांत मोठ्यांदा मारलेली हांक मला ऐकूं आली. त्यांनी मला ओझरतें आंत शिरतांना पाहिलें होतें. मी लगबगीनें बाहेर आलों. त्यांनीं टांगा थांबविला होता. मी नमस्कार

करून अदबीनें किंचित् अंतरावर उभा राहिलों. त्यांनीं बोलण्यास सुरुवात केली – "अरे, फार चांगलं पुस्तक लिहिलं आहेस तूं ..." तेव्हां मीं म्हटलें, "तात्यासाहेब, आपण अभिनंदनाचं पत्रहि पाठवलं होतं आणि त्याला मीं आभाराचं उत्तर धाडलं होतं. तें मिळालं ना!" त्यावर ते म्हणाले, "अरे तें खरं, पण मीं पुन्हां दुसऱ्यांदा वाचलं सबंध पुस्तक ... फारच उत्तम लिहिलं आहेस ..." पण येवढ्यानेंहि त्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं मला हाताला धरून पुढें ओढून पाठ थोपटली. त्यानंतर इतर कांहीं औपचारिक कुशल प्रश्न विचारून झाल्यानंतर त्यांनीं मुख्य मुद्दयाला हात घातला. मी पुढें काय करणार आहें, पुढला ग्रंथ कोणता लिहावयाला घेतला आहे, सतत लेखनाचा अभ्यास-व्यासंग ठेवतोस कीं नाहीं, याची त्यांनीं अत्यंत आस्थेवाईकपणानें चौकशी सुरू केली. मला या चौकशींत तात्यासाहेबांचें लेखनकलेविषयींचें खरें प्रेम, जातिवंत जिव्हाळा आणि लेखनकलेच्या अभिवृद्धीसंबंधींची अंतर्यामींची आस्था व ओढ स्वच्छपणानें दिसून आली. त्यांनीं प्रकट केलेली खिलाडू वृत्ति तर आल्हादकारकच होती. घरीं आल्यावर त्या दिवशीच्या डायरींत मीं पुढील नोंद करून ठेवली – 'आज पुस्तक लिहिल्याचें चीज झालें!'

शंकर रामचंद्र दाते

(बी. ए., संपादक काळ, पुणें)

(१) सुमारें अठ्ठावीस वर्षांपूर्वींची गोष्ट. सन १९१९ सालीं मी एका शिकविणीच्या निमित्तानें उस्मानाबाद या गांवीं सुमारें एक महिना राहिलों होतों. तेथें माझी श्री. रामचंद्रराव मास्तर यांची गांठ पडली. पुण्यांत असतांना त्यांच्यासंबंधानें मला विशेष कांहींच माहिती मिळाली नव्हती. पण एका मित्रानें मला त्यांचें नांव व पत्ता देऊन त्यांस भेटण्यास सांगितलें होतें. एक दिवस मी त्यांस भेटावयास गेलों असतां त्यांनीं मला आपण कोण, कोठलें म्हणून विचारलें. उस्मानाबादसारख्या शहरांत माझ्यासारख्या पुणेरी गृहस्थाचें आगमन पाहून त्यांच्या मनावर आश्चर्य व किंचित् भीतीहि दिसूं लागली होती. पण मला आपणांस भेटण्याविषयीं अमुक गृहस्थानें सांगितल्यावरून मी भेटावयास आलों, असें मीं त्यांस सांगतांच त्यांनीं एकदम उठून मोकळ्या मनानें माझें स्वागत केलें, व विश्वासानें माझ्याशीं ते बोलूं लागले. हे रामचंद्रराव मास्तर म्हणजे नाशिकच्या जॅक्सन खुनाच्या खटल्यांत दीर्घकालीन शिक्षा भोगून बाहेर पडलेले व सी. आय. डी.च्या सासुरवासामुळें तिला चुकवून मोगलाईत जाऊन राहिलेले क्रांतिकारक देशभक्त रामभाऊ भावे हे होत. त्यांची माझी पुढें बरीच सलगी झाल्यानंतर त्यांनीं आपल्या वनवासाच्या व क्रांति-

कारक चळवळीच्या अनेक गोष्टी मला सांगितल्या. त्यांत त्यांनीं तात्यासाहेब केळकर यांची एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले – " मी जेव्हां तुरुंगांतून सुटून आलों तेव्हां घरादारास मुकलेला, स्नेह्यासोबत्यांस अंतरलेला, निराधार व निराश्रित अशा अवस्थेंत पुण्यास आलों. तो काळ असा होता कीं, आम्ही क्रांतिकारक तुरुंगांत असलों किंवा बाहेर असलों तरी आमच्या मागें सी. आय. डी. चा ससेमिरा अक्षय्य असे. तुरुंगांतून बाहेर आल्यावर ज्यांच्याबद्दल आम्हांला अतिशय आदर वाटत असे किंबहुना ज्यांच्या शिकवणीनें व विचारानें आम्ही क्रांतिकारक मार्गांत दाखल झालों, त्यांना एकवार भेटावें व त्यांची सल्लामसलत घ्यावी हा विचार साहजिकच मनांत आला; परंतु दुःखाची गोष्ट अशी कीं, ज्या मंडळींना भेटावें अशी आम्हांस उत्कंठा लागली होती ते लोक आम्हांस टाळण्यास निमित्त शोधीत व आम्हांस दूर दूर करीत असा अनुभव आला ! त्यामुळें तर माझ्या मनाला अधिकच दुःख व वेदना झाल्या.

या वेळीं मला जर कोणीं आशेचा ओलावा दाखविला असेल व आधाराचा शब्द बोलला असेल तर ते तात्यासाहेब केळकर हे होत ! वास्तविक पाहतां तात्यासाहेब क्रान्तिकारक प्रवृत्तींना नाउमेद करणारे गृहस्थ असल्यामुळें मवाळ म्हणून आम्ही त्यांची हेटाळणी करीत असूं; पण ज्यांचा आम्हीं आधार अपेक्षिला त्यांनीं आम्हांस सोडून दिल्याचा व ज्यांच्यापासून आम्हीं कधींहि साहाय्याची अपेक्षा केली नाहीं त्या तात्यासाहेब केळकरांनीं मात्र आम्हांस आधार देऊन जवळ केल्याचा प्रत्यक्ष अनुभव आला.

मी जेव्हां तात्यासाहेबांना भेटावयास गेलों, तेव्हां त्यांनीं माझें मोठ्या प्रेमभरानें स्वागत केलें; एवढेंच नव्हें तर त्यांनीं मला आपल्या घरीं ठेवून घेण्याचीहि तयारी दर्शविली व आर्थिक साहाय्यहि केलें. तात्यासाहेबांच्या जवळून पैशाची मदत घेतांना मी मनांत अतिशय खजील झालों होतों. मी संकोचतों आहें हें त्यांच्याहि लक्षांत आलें, तेव्हां ते मला म्हणाले – 'हे पहा भावे ! तुमच्यासारख्या स्वाभिमानी माणसाला मजसारख्यापासून १०–२० रु. घेण्यास संकोच वाटावा हें मलाहि समजूं शकतें. फुकट कोणाचें आपण घ्यावें हें स्वाभिमानी मनाला पटूं शकत नाहीं हें खरें; पण तुम्ही तसा संकोच बाळगण्याचें कारण नाहीं. आणि तुम्ही ज्या परिस्थितींत आहांत त्या परिस्थितींत तर आमच्यासारख्यांवर तुमचा हक्कच आहे. त्यांतून तुमच्या मनास समाधान वाटत नसलेंच तर तुम्ही असें करा कीं, रोज तासभर घरीं येऊन माझ्या मुलांस शिकवीत जा; म्हणजे, आपण कोणाचें फुकट घेतलें नाहीं असेंहि समाधान तुम्हांस लाभेल व तुमची अडचण तात्पुरती कां होईना पण भागूं शकेल ! '

तात्यासाहेबांच्या ह्या निर्व्याज, प्रेमळपणामुळें मला त्यांच्याबद्दल केवढा

आदर वाटूं लागला व कृतज्ञता वाटली याचें शब्दानें वर्णन करणें कठीण आहे. त्या वेळीं सबंध पुण्यांत मला धीर देणारे व मदत करणारे दोनच पुढारी भेटले; ते म्हणजे तात्यासाहेब केळकर व भाऊसाहेब लवाटे हे होत."

(२) पुण्यास कांहीं दिवसांपूर्वी डॉ. शामाप्रसाद मुकर्जी हे आले असतां त्यांना, शेट माणिकचंद यांनीं एक मोठी मेजवानी दिली. त्या मेजवानीस पुण्यांतील अतिशय निवडक असे सुमारे ४० लोक बोलावले होते. जेवणें झाल्यावर त्यांनीं प्रत्येकास स्वतंत्र हार व गुच्छ दिले होते. पान-सुपारी होऊन बाहेरची बहुतेक मडळी निघून गेल्यावरहि आम्ही १०–१२ जण जावयाचे राहिलों होतों. पुढें कॉफी घेण्याची गोष्ट निघाली. तेव्हां सहाजिकच जाणें थोडें लांबलें.

आमच्या गळ्यांत घातलेले हार आम्हीं सर्व एकत्र ठेवल्यामुळे हारांचा ढीग बराच मोठा दिसत होता. हार घालणारानें एखाद्याच्या गळ्यांत हार घातल्यास तो गळ्याला टेकल्या न टेकल्याबरोबर काढून ठेवण्याची पद्धत पडली आहे. माणिकचंदजी यांचे बधु वालचंद शेटजी म्हणाले, हे हार घालण्याकरतां असून ठेवण्याकरतां नाहींत. म्हणून ज्यानें त्यानें आपला हार घातला पाहिजे; हार घालून बसण्याचा आग्रह सुरू झाला व एकमेक एकमेकांना आग्रह करून हार घालूं लागले. शेवटीं आम्हीं दहाबाराजणांनीं एकमेकांना हार घालून घेतले; व जाईपर्यंत ते काढावयाचे नाहींत असें ठरलें. आमचा हा गोंगाट इतका वाढला होता कीं, शेजारच्या हॉलमध्यें तात्यासाहेब केळकर बसले होते, त्यांना तो ऐकूं गेला; तेव्हां आमचें काय चाललें आहे हें पाहण्यासाठीं ते हळूच आंत आले, तों आम्ही सर्वजण खुर्च्यांवर गळ्यांत हार घालून बसलेले त्यांनीं पाहिलें! तेव्हां आम्ही जरा चपापलों व गळ्यांतील हार काढून जरा आटोपशीर बसूं लागलों, तेव्हां तात्यासाहेब खेळीमेळींत म्हणाले "होतां तसेंच बरे दिसतां! जणूं सर्कसच भरली आहे! तुम्हीं गळ्यांतून हार काढण्याचें कारण नाहीं." पण आम्ही संकोचतों आहोंत हें पाहून त्यांनीं स्वतः पलीकडच्या खोलींतून एक हार आणला व स्वतःच्या गळ्यांत घालून आमच्यामध्यें येऊन बसले व हंसत म्हणाले, "आतां तरी तुम्हांस संकोच वाटण्याचें कारण नाहीं ना!"

तात्यासाहेब थोरांत थोरांहून थोर होते, तर लहानांत लहानांशीं मिसळून वागण्यांत त्यांना आनंद वाटे. तात्यासाहेब हे महाराष्ट्रांतील लोकांना आपल्या कुटुंबांतील वडील माणूस असें नेहमीं वाटे; त्याचें कारण त्यांचा सर्वांशीं मिळून-मिसळून वागण्याचा प्रेमळ व निर्मळ स्वभाव होय.

❋

माधवराव वि. किबे

(सरदार, इंदूर)

(१) इंदुरास महाराष्ट्र साहित्य संमेलनाची बैठक ठरविली गेली. ते दिवस संशयाचे, म्हणून सोवळे असे साहित्यिक, श्री. आगाशे यांची अध्यक्षस्थानीं योजना केली. पण लहानापासून थोरांची इच्छा ही कीं, तात्यासाहेबांनीं समारंभास यावें. त्याप्रमाणें ते आग्रह केल्यावरून व कांहीं त्रास होणार नाहीं असें पूर्ण आश्वासन मिळाल्यानें, आले. ते केव्हां येणार हें नक्की न कळल्यानें त्यांच्या स्वागतार्थ स्वागताध्यक्ष कै. जनरल मतकर किंवा कार्याध्यक्ष कै. डॉ. गो. रा. तांबे हे स्टेशनवर जाऊं शकले नाहींत. कांहीं स्वयंसेवक हजर होते. त्या दिवसांत प्रत्येक सार्वजनिक कार्यांत पडणाऱ्यावर पोलिसांची देखरेख असे. अशा व्यक्ति नंबरानें ओळखल्या जात. प्रस्तुत लेखकाचाहि नंबर होता. तात्यासाहेबांचा होता, यांत आश्चर्य नाहीं. येथील पोलिसांस बातमी आली कीं, अमुक नंबर येत आहे. तात्यासाहेब गाडींतून उतरतांच त्यांना पोलिसांनीं घेरलें व चौकींवर चला म्हणूं लागले. तात्यासाहेबांनीं सांगितलें कीं, "मी येणार नाहीं, वाटल्यास उचलून न्या." इतक्यांत ही बातमी मला कळली. मी ती फोननें मुख्य प्रधान, मेजर दुवे, यांस कळविली. ताबडतोब पोलिसांस हुकूम गेला. स्वागताध्यक्ष आदि स्टेशनवर हजर झाले व तात्यासाहेबांची क्षमायाचना करून त्यांना मोठ्या आदबीनें उतरण्याच्या ठिकाणीं नेलें.

(२) इ. १९२१ च्या उन्हाळ्याचे दिवस. आम्ही सहकुटुंब सिंहगडावर जाऊन राहिलों होतों. लोकमान्यांचा बंगला श्री. रामभाऊ टिळकांनीं आम्हांस मोसमाकरितां राहण्यास दिला होता. एके दिवशीं ११ च्या सुमारास श्री. तात्यासाहेब स्वामी सत्यदेव यांना घेऊन गडावर फिरून बंगल्याजवळ आले. आम्हां उभयतांस पाहून विनोदानें ते म्हणाले, "लोकमान्यांच्या बंगल्यांत जो राहत असेल तो आम्हांस जेऊं घालील. त्यावर आमचा हक्कच आहे ! असें समजून आम्हीं तर आलों, पाहा बुवा !" अर्थात् त्यांच्या पंक्तीचा आम्हांस अनायासें लाभ झाला.



दत्तात्रेय व्यंकटेश बेळवी

(बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, बेळगांव)

(१) तात्यासाहेबांची स्वारी आपल्या मंडळीसह इ. स. १९३९ मध्यें मुंडाजेहून पुण्यास परत जातांना बेळगांवांत नेहमींप्रमाणें आमच्या येथें मुक्कामास येणार होती. गाडी येण्याची वेळ सकाळची असल्यामुळें आम्ही त्यांची वाट पाहत दरवाज्यांत उभे होतों. इतक्यांत त्यांना घेऊन येण्याकरितां स्टेशनवर

गेलेल्या आमच्या मोटारीचा हॉर्न ऐकूं आला व लगेच मोटार दरवाज्यांत उभी राहिली. मोटारीचा दरवाजा उघडतांच त्यांची हातांत धरण्याची काठी मोटारच्या दरवाज्यांतून खालीं पडली. तेव्हां मीं म्हटलें, "तात्यासाहेब, काठी खालीं पडली." तेव्हां तात्यासाहेबांनीं लगेच हंसून उत्तर दिलें, "नाहीं, नाहीं, पडली नाहीं. वडील तुम्ही. तेव्हां तुम्हांला काठीनें माझ्या आधीं घाईनें विनयपूर्वक दंडवत घातला!"

(२) मागें एकदां तात्यासाहेब बेळगांवास आले असतां येथील मिशन हायस्कुलांत अेक सार्वजनिक सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं तात्यासाहेब होते. समारोपादाखल भाषण करतांना त्यांनीं खालील विनोदी गोष्ट सांगितली. "पाश्चात्य देशांत कधीं कधीं अगदीं जख्खड म्हातारेसुद्धां लग्नाच्या मंडोळ्या बांधून घेण्यास तयार असतात. एकदां एका नव्वद वर्षांच्या श्रीमंत म्हाताऱ्यास लग्न करण्याची हुक्की आली. त्यानें एक पंचाऐशी वर्षांच्या म्हातारीस वधू म्हणून पसंत केली. लग्न-समारंभ पार पडल्यावर तेथें हजर असलेल्या वराच्या एका मित्रानें त्यास थोडें बाजूस नेऊन विचारलें, "आजोबा, आतां आपणांस मुळेंबाळें होण्याचें कांहीं वय नाहीं. तेव्हां एक गोष्ट विचारतों; रागावूं नका. या वयांत आपण लग्न कशासाठीं केलेंत?" तेव्हां त्या मिस्किल म्हाताऱ्यानें उत्तर दिलें, "खरें सांगूं? रात्रीं एकट्याला भीति वाटते म्हणून!" ही गोष्ट ऐकून सभेंत एकच हंशा पिकला.

(३) तात्यासाहेबांनीं आपलें 'गतगोष्टी अथवा माझी जीवनयात्रा' हें पुस्तक प्रसिद्ध केल्यानंतर, मी एकदां पुण्याला नेहमीप्रमाणें त्यांच्या येथेंच उतरण्यास गेलों असतां केळकरांच्या पूर्वजांचें मूळगांव जें ढोकमळें त्याची मला आठवण होऊन घरांत शिरतांना मी मोठ्यानें म्हणालों, "Is His Grace The Duke of Dhokamale at Home"? माझा आवाज व विनोद ऐकून तितक्याच विनोदानें तात्यासाहेबांनीं उत्तर दिलें, "Yes, His Grace is at home and he welcomes his Vassal!"

❋

हणमंतराम रामनाथ

(रावबहादूर, नगरशेठ, पुणें)

(१) माझा आणि देशभक्त तात्यासाहेब यांचा संबंध सुमारें इसवी सन १९०५ सालापासून आला व तो अखेरपर्यंत वृद्धिंगत होऊन जिव्हाळ्यानें कायम राहिला. मी माझें गृहकार्य अगर समाजकार्य अगर व्यापारांतील अडचण कोणतेंहि कार्य असो, प्रत्येक महत्त्वाच्या कामांत मी त्यांचा सल्ला घेत

असें व ते फार योग्य असा सल्ला मला देत असत. त्यांच्या सल्ल्याचा मला फार उपयोग होत असे. खरोखर, योग्य सल्ला असा तात्यासाहेबांनींच द्यावा.

(२) पुणें शहर म्युनिसिपालिटींत सुमारें २५–३० वर्षें त्यांच्याबरोबर मी काम करीत होतों. प्रत्येक वर्षी म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष बदलावा ही कल्पना देशभक्त तात्यासाहेबांनीं सुचविली. पूर्वीची परंपरा एकच अध्यक्ष पुष्कळ वर्षें राहावा अशी होती, ती त्यांना पसंत नव्हती. दरसाल अध्यक्ष बदलण्याची मूळ कल्पना त्यांची. ती त्यांनीं अमलांत आणिली.

(३) देशभक्त तात्यासाहेब हे सर्व पक्ष एकत्र आणून ते शक्य तेवढें एक-विचारें कार्य करतील अशी नेहमीं खटपट करून त्याप्रमाणें घडवून आणीत. समेट–एकी–संघटन करणें हा त्यांचा हातखंडा असे. एकींत कसें सामर्थ्य आहे हें त्यांनीं आम्हांस वारंवार पटवून द्यावें.

(४) " ताराचंद रामनाथ आयुर्वेदिक हॉस्पिटल " चें आज दिसत असलेलें प्रचंड कार्य त्यांनींच माझ्याकडून करवून घेतलें. त्यांनीं या कामीं अतिशय मेहनत घेतली. स्वतःचें समजून त्यांनीं तें कार्य केलें. मीं जी अल्पस्वल्प सदर संस्थेला मदत केली ती त्यांच्याच स्फूर्तीनें व आज्ञेवरून केली. कोणत्याहि लोकोपयोगी कार्यास तन-मन-धनानें मदत करण्यास ते सदैव तत्पर असत. त्यांच्या मृत्यूनें माझा मोठा सल्लागार नाहींसा झाला.

❋

क्र. ह. ढमढेरे

(बी. ए., हिंदुमहासभेचे आधारस्तंभ, मुंबई)

(१) पाकिस्तानविरोधी परिषद डिसेंबर १९४४ मध्यें दादरला मुंबई प्रांतिक हिंदुसभेतर्फे तात्यासाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. फार दिवसांनीं प्रकटपणें सार्वजनिक सभेंत राजकारण विषयावर मुंबईत तात्या-साहेब बोलणार म्हणून सभेस मोठा श्रोतृसमाज जमला होता. योगायोगानें सभेच्या स्वयंसेवकांपैकीं कोणा स्वयंसेवकाची व फ्री प्रेस व विश्वमित्र या वृत्त-पत्रांचे बातमीदार यांची बोलाचाली होऊन मारामारीपर्यंत प्रकरण वाढत गेलें. व्यासपीठापर्यंत गडबड वाढत जाऊन सभेच्या कामांत व्यत्यय येऊं लागला. परि-षदेचा कार्यवाह म्हणून माझ्याकडून थोडक्यांत परिस्थिति समजावून घेतल्याबरोबर तात्यासाहेबांनीं समयसूचकतेनें व चतुराईनें वातावरण शांत करून सभेचें काम पुढें चालूं केलें. अध्यक्ष म्हणून पुढें येऊन त्यांनीं सांगितलें कीं, " वृत्तपत्रांचे प्रतिनिधि हे आपले सन्माननीय निमंत्रित पाहुणे होत, त्यांचें काम त्यांना स्वस्थपणें व त्यांच्या सोईप्रमाणें करतां येईल इतकी सुरक्षितता उत्पन्न

करून देणें हें स्वयंसेवकांचें कर्तव्य आहे. सभेच्या कार्यकर्त्यांनींहि बातमीदारांचा विश्वास राहील, अशी व्यवस्था करावयास पाहिजे. परिषदेच्या प्रचारकार्याच्या स्वार्थी व संकुचित दृष्टीनें पाहिलें तरी बातमीदारांस समाधानकारक वातावरण उत्पन्न करून दिल्यानेंच परिषदेच्या कामास मदत होणार आहे." इतकें बोलल्यावर रिपोर्टरांकडे वळून ते म्हणाले कीं, "बातमीदारांनींहि कार्यकर्त्यांच्या अडचणी व व्यवस्थेच्या आणि आवरशक्तीच्या मर्यादा यांचा विचार करून आपल्याच समाजांतील ही सभा आहे ही जाणीव ठेवावी. अधिकृत कार्यकर्त्यांना वगळून कोणा तरी अनधिकारी स्वयंसेवकाच्या वर्तनानें चिडून जाऊन आपल्याच तक्रारींचा गवगवा करून सभेच्या कामांत व्यत्यय येईल या थरापर्यंत गोष्टी नेणें इष्ट नसतें, हें त्यांनीं ध्यानांत धरावे. अनुभवी वृत्तपत्रीय संपादक म्हणून मी सांगतों कीं, बातमीदारांनींसुद्धां आपण स्वतः समाजाचे एक घटक आहोंत व सभेचें काम जरी स्वतःच्या राजकीय मताप्रमाणें नसलें तरी सर्व पक्षांच्या मतप्रदर्शनास संधि मिळणें आवश्यक असतें हे ध्यानांत बाळगून परिषदेच्या कार्यकर्त्यांबरोबर खेळीमेळींनें सहकार्यच केलें पाहिजे. या दृष्टीनें कार्यवाह डमढेरे यांनीं केलेल्या प्रांजल खुलाशानें हें प्रकरण मिटावयास पाहिजे."

याप्रमाणें तात्यासाहेब अध्यक्ष म्हणून पुढें होऊन बोलतांच सभेमधील वातावरण शांत होऊन सभेचें पुढील कामकाज सुरू झालें.

अध्यक्ष म्हणून किती कौशल्यानें व शिस्तीने केळकर काम करतात हें पुष्कळ लोकांना ऐकून ठाऊक होतें; परंतु प्रत्यक्ष वेळ आल्याबरोबर नेटानें सभेचें काम पुढें चालूं करण्याची त्यांची तडफ व सौजन्य पाहून सर्वांस फार कौतुक वाटलें. या गडबडींत सुद्धां समतोल वृत्ति राखून वागण्याचा त्यांचा 'उभयपक्षी' स्वभाव अवचित जागा होऊन दोन्ही बाजूंच्या लोकांस त्यांनीं स्पष्टपणें स्वकर्तव्याची जाणीव करून दिली, हें पाहून दोघांसहि धन्यता वाटली.

(२) इतकें झाल्यावर या बातमीदारांच्या तक्रारी मिटल्या असें आम्हां सर्व कार्यकर्त्यांस वाटलें. पण हट्टी व खोट्या अभिमानाच्या आहारीं जाणाऱ्या त्या बातमीदारांनी यापुढें मजल मारली. वर्तमानपत्राची संघव्यवस्था वाढत आहे, त्याचा गैरफायदा घेऊन वृत्तपत्रांच्या बातमीदारांचा अवमान व हक्कांची पायमल्ली झाली असा गवगवा करून मुंबईतील सर्व वर्तमानपत्रांत परिषदेची हकीकत, भाषणें, ठराव वगैरे कांहीं छापून प्रसिद्ध केलें जाऊं नये अशी व्यवस्था रातोरात त्यांनीं घडवून आणली. दैनिक फ्री प्रेसनें तर फक्त सभेंत मारामारी होऊन बातमीदारांचा जीव धोक्यांत आला व सभेंत गोंधळ माजून राहिला, एवढ्याच अर्थाची हकीकत, सभेचा रिपोर्ट म्हणून प्रसिद्ध केली! हा विपरीत घटना पाहून आम्हां कार्यकर्त्यांस फारच आश्चर्य वाटलें. पण प्रसिद्ध झालेल्या विकृत रिपोर्टाचें

निराकरण करण्यास आपले कथन म्हणून प्रसिद्धीस दिलें तरी तें कोणी छापणार नाहीं असा वाजवी धाकहि पडला. माझे मित्र काशीनाथपंत खानविलकर यांच्या सूचनेप्रमाणें ते व मी तात्यासाहेब यांच्या निवासस्थानीं डॉ. अभ्यंकर यांच्या घरीं गेलों. आमची अडचण व इच्छा तात्यासाहेबांना समजतांच ते म्हणाले कीं, "विरोधी पक्षांतील असलो तरी फार जुना अनुभवी वृत्तपत्रकार म्हणून माझ्या स्वतःच्या स्पष्टीकरणाचा फ्रीप्रेसचे सदानंद मुद्धां प्रसिद्धि नाकारूं शकणार नाहींत, तेव्हां हा सर्व खुलासा मी आपल्या सहीनेंच प्रसिद्धीस देतों." अंगांत कपडे घालून पुण्यास जाण्यास निघालेले तात्यासाहेब लगेच खालीं बसले व लिहून घ्या म्हणून सांगून काशिनाथपंत खानविलकर यांस त्यांनी सुबोध व सुसंगत असें पत्र थोडक्यांत कथन केलें. या गोष्टी वेळच्या वेळेस झालेल्याच बऱ्या म्हणून पुण्यास जाऊन प्रसिद्धीस पाठविण्यापेक्षां मी आतांच लिहून देतों असें ते म्हणाले. आजच्या आज ते पत्र फ्री प्रेसकडे व संध्याकाळच्या वर्तमानपत्रांकडे नेऊन द्या म्हणजे तेवढें तरी काम होईल, असें त्यांनी आम्हांस बजावून सांगितलें व ते लगेच पुण्यास गेले. "वर्तमानपत्रांच्या संस्थेचे घटक म्हणून हे बातमीदार व त्याचे संपादक आपल्या हक्कांवर व मोठेपणांवर गदा आली म्हणून एवढा गवगवा करून अकांडतांडव करतात; परंतु त्या परिषदेचा अध्यक्ष एक प्रख्यात जुना व नामांकित वर्तमानपत्राचा संपादकच होता व त्याच्या प्रकट विचारांस व सभेंतील निवेदनास साधी प्रसिद्धीहि न देतां त्यांचा आपण अवमान करीत आहोंत हें मात्र बेट्यांच्या लक्षांत येत नाहीं" असें विनोदानें त्यांनीं उद्गार काढले.

तात्यासाहेबांच्या अंदाजाप्रमाणें फ्रीप्रेसचे सदानंद व बॉंबे सेन्टिनलचे हॉर्निमन् यांनीं त्यांचें सविस्तर पत्र आपापल्या दुसऱ्या अंकांतून प्रसिद्ध केलें.

(३) स्वपक्षीय सामान्य व्यक्तींच्या कार्यासहि प्रोत्साहन देऊन आपल्या पक्षाचें कार्य संघटित करून वाढविणें याकडे तात्यासाहेबांचें फार लक्ष असें. अशा कांहीं प्रसंगीं स्वतःच्या वैयक्तिक मोठेपणास धक्का पोंचतो किंवा कसें याबद्दल बेफिकीर राहून ते केवळ कार्याकडेच ध्येयपूर्तीच्या दृष्टीनें पाहत असत, याचा मला एक अनुभव आला होता.

मध्यवर्ती कायदे मंडळाचा हिंदुमहासभेचा मुंबई शहरातर्फेचा इच्छुक म्हणून १९४५ सालच्या निवडणुकींत मी उभा होतों. प्रचाराचीं सर्व साधनें आम्हांस अर्थातच दुर्मिळ होतीं. वैयक्तिक पत्रकांचा उपयोग केव्हांहि मर्यादितच होतो. कॉंग्रेसच्या प्रकट सभा, प्रचाराच्या बैठकींचे कार्यक्रम, वर्तमानपत्रांतील वेळोवेळीं कॉंग्रेस पुढाऱ्यांचीं प्रसिद्ध होणारी कथानकें यामुळें दक्षिणी समाजाचे बाहेरचे मतदार यांस कॉंग्रेसची बाजू समजत असे, परंतु हिंदुमहासभेचीं मतें व कार्यक्रम यांबद्दल मात्र त्यांच्यांत पुरेपूर अज्ञान होतें. आपल्या तर्फेचे विचार त्यांच्या कानावर

जावेत म्हणून माझे मित्र रा. काशिनाथपंत खानविलकर व मी मुंबईतील निरनिराळ्या संपादकांस भेटून विनंती करीत होतों, परंतु आम्हांस कोणी प्रोत्साहन देईना. टाईम्स ऑफ इंडियाचे ॲक्टिंग संपादक जेहूसाहेब यांच्याबरोबर या विषयावर चर्चा केली; तेव्हां निवडणुकीमधील वादग्रस्त मुद्द्यांबद्दल खुलासेवजा पत्रव्यवहार हिंदुसभेच्या प्रमुख पुढाऱ्यांकडून येईल तर तो टाईम्समध्यें प्रसिद्ध करून तुमच्या निवडणुकीच्या कामांत या नाहीं त्या रूपानें मी मदत करूं शकेन. एरवी जाहिरातीवजा खर्च घेऊन सुद्धां मीं तुमचा मॅनिफेस्टो सारांशानेंहि प्रसिद्ध करूं शकणार नाहीं, असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. इतकें झाल्यावर मुंबईतील हिंदुसभेच्या मुख्य पुढाऱ्यांना भेटून तसा प्रयत्न अयशस्वी झाला हें पाहून माझे सन्मित्र काशिनाथपंत खानविलकर यांनीं सुचविलें कीं, आतां या कामास लायक व काम हौसेनें करतील व राहिलेल्या थोड्या दिवसांत काम व्हावयाचें, म्हणजे तात्यासाहेब केळकरच आपल्या कामीं मदत करतील तर, शक्य आहे. लगेच आमच्या एका मित्रास पुण्यास मुद्दाम पाठवून ही सर्व हकीकत त्यांच्या कानावर घातली. तेव्हां तात्यासाहेब म्हणाले, " मला यांत कांहीं कमीपणा वाटत नाहीं. वर्तमानपत्रांत पत्र प्रसिद्धीला पाठविणें यांत कांहीं कमीपणा व कांहीं निवेदन प्रसिद्धीला पाठविणें यांत जास्त मोठेपणा आहे असा मला फरक वाटत नाहीं. जेहूसाहेब पत्ररूपानें कां होईना आपल्या धोरणाचा पुरस्कार करण्याची संधि देतो आहे ना, घ्या त्याचा भरपूर फायदा." असें म्हणून तेथेंच आमचे मित्र काळचे संपादक मामा दाते होते त्यांस त्यांनीं पत्राचा मसुदा सांगून हिंदुसभेचें धोरण उगाच कांगावखोरपणें प्रतिपादलें जातें त्याप्रमाणें ज्ञातिनिष्ठ नसून खरें राष्ट्रीय विचारांचेंच आहे, याबद्दल थोडक्यांत लिहून हिंदुसभेच्या उमेदवारांसच सुबुद्ध मतदारांनीं मतें द्यावीं, असें त्यांत प्रतिपादलें होतें. जेहूसाहेबांनीं लगेच दुसऱ्याच दिवसाच्या टाइम्समध्यें प्रमुखस्थानीं व ठळक ठशाचा मथळा देऊन तात्यासाहेबांचें पत्र छापलें. अगदीं थोडक्या अवधींत आमचें काम खुल्या दिलानें व उत्साहानें तात्यासाहेबांनीं करून आम्हांस फार प्रोत्साहन दिलें, यामुळें आम्हांस धन्यताच वाटली. त्यांची कार्यतत्परता व माझ्यासारख्या सामान्य माणसाचा कार्यसिद्धीकरितां पाठपुरावा करण्याची तयारी पाहून त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित व्हावा यांत काय नवल!

❋

मोतीराम बाळकृष्ण वेलकर

(एल्. एम्. अँड एस्., डॉक्टर, मुंबई)

कै. लोकमान्य टिळक हयात असतांना त्यांच्या नेतृत्वाखालीं चालत असलेल्या अनेक राष्ट्रीय चळवळींतील कै. केळकरांच्या निकट सहवासाची मला

आठवण होते. मुख्यतः त्यांचा व माझा अत्यंत निकट असा परिचय विलायतेंत असतांना झाला. सन १९१९ सालीं लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखालीं काँग्रेस आणि होमरूल लीगचें मॉन्टेग्यूचेल्म्सफर्ड सुधारणांच्या बाबतींत जें शिष्टमंडळ विलायतेंत गेलें होतें त्यांत टिळकांच्या पक्षांतील बाबू बिपीनचंद्र पाल, दादासाहेब खापर्डे, नरसोपंत केळकरांसमावेत आम्ही सदस्य होतों. लंडन येथें वेस्टएंड येथील टॅलबट रोडवर श्री. जव्हेरी नांवाच्या गुजराथी गृहस्थानें लो. टिळकांच्या मंडळीस राहण्याकरतां आपला भव्य बंगला खाली करून दिला होता. हे गृहस्थ व्यापारी असून आपल्या कुटुंबासह १५–२० वर्षें विलायतेंत कायमची वस्ती करून राहिले होते. त्या बंगल्यांत टिळक आणि खापर्डे यांच्या खोल्या पहिल्या मजल्यावर असून दुसऱ्या मजल्यावर नरसोपन्तांची खोली माझ्या खोलीला लागून होती, व दुसऱ्या बाजूला वासुकाका जोशी यांची खोली होती. विलायतेच्या वास्तव्यांत कित्येक महिने नरसोपन्तांच्या निकट सहवासाचा लाभ मला मिळाला होता. जेवणाच्या वेळीं अगर त्यांना अत्यंत आवडणाऱ्या शेंगदाण्यांवर ताव मारतांना किंवा पार्लमेंटमध्यें हिंदीसुधारणांच्या बाबत जॉइंट कमिटीच्या बैठकीस हजर राहण्याकरतां जात असतांना आणि इंग्लंडच्या निरनिराळ्या भागांत व्याख्यानांच्या दौऱ्यावर असतांना आम्ही दिवसांतून बहुतेक चोवीस तास एकत्र असूं. ह्या निकट सहवासांत त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचें आणि विशाल अंतःकरणाचें मला अगदीं जवळून दर्शन झालें. त्यांच्याबरोबर झालेलीं संभाषणें नेहमीं उत्साहदायक असून बुद्धीला आणि मनाला तजेला आणीत. त्यांच्या खोलीमध्यें केव्हांहि जा, ऐकतर ते टेबलावर लिहीत बसलेले असावयाचे, केसरीकरतां किंवा विलायतेंतील काँग्रेसच्या "India" वगैरे साप्ताहिकांकरतां आणि तसेंच हिंदुस्थान व इंग्लंडांतील इतर वर्तमानपत्रांकरतां कांहीं तरी लेख लिहितांना ते आढळत. नाहीं तर आरामखुर्चींत बसून विलायतेंतील बुक-स्टॉल्समधून घेतलेलीं नवीं व जुनीं पुस्तकें वाचण्यामध्यें गढून गेलेले दिसत. अनेक विषयांवरील जुनीं व नवीं पुस्तकें खरेदी करण्याचें त्यांना एक तऱ्हेचें वेडच होतें. कितीदां तरी तात्यासाहेबांबरोबर अशा पुस्तकांच्या दुकानांमध्यें जाऊन पुस्तकें वाचून पसंत झालेलीं खरेदी करण्यांत कित्येक तास घालविलेले मला आठवतात. हीं बुकस्टॉल्स म्हणजे लायब्ररीवजा जुनीं व नवीं पुस्तकें विक्रीचीं मोठमोठीं दुकानें होत. या ठिकाणीं दुर्मिळ व अमोलिक जुने व नवे ग्रंथ विकत घेण्याची सोय असते. ह्या दुकानांत इतर पुस्तकालयाप्रमाणें पुस्तकें आरामशीर रीतीनें बसून वाचण्याची सोय केलेली असते. आपल्या विलायतेंतील वास्तव्यांत नरसोपंतांनीं अशा दुकानांतून कितीतरी अमौलिक पुस्तकें खरेदी करून आपल्या स्वतःच्या घरच्या लायब्ररींतील ग्रंथभांडार संपन्न केलें हें मला आठवतें.

(२) व्याख्यानांच्या दौऱ्यावर असतांना मला एक प्रसंग आठवतो. एका दौऱ्यावर तात्यासाहेबांची व माझी दोघांची निवड झाली होती. ब्रिस्टोल, बर्मिंगहॅम, टॉन्टन् आणि वेस्टन सुपरमरे वगैरे ठिकाणीं आमचीं व्याख्यानें झालीं. वेस्टन सुपरमरेच्या व्याख्यानाला जो समाज जमला होता तो बहुतेक हिंदुस्थानांतील मोठमोठ्या अधिकारांवरून निवृत्त झालेला इंग्रज अधिकारीवर्ग, त्यांच्या बायका वगैरे मंडळींचा होता. तेथें नरसोपन्तांचा निस्पृहता हा गुण चांगला दृष्टोत्पत्तीस आला. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या चळवळीसंबंधीं बोलतांना त्यांनीं असें सांगितलें कीं, हिंदुस्थानच्या राजयंत्रावर खरी हुकमत सेंट्रल गव्हर्नमेंटची नाहीं, पार्लमेंटची नाहीं, क्राऊनची म्हणजे राजाचीहि नाहीं आणि व्हाइसरॉयचीहि नाहीं; तर ती ब्रिटिश सरसेनापतीची, इंडियन सिव्हिल सर्व्हिस म्हणजे कमिशनर – कलेक्टरची आणि इंग्रज भांडवलदार यांची आहे. इंडियन सिव्हिल सर्व्हिससंबंधानें बोलतांना सर्व्हिसमधून निवृत्त झालेल्या त्या सभेंत बहुसंख्येनें हजर असलेल्या त्या समाजापुढें ते म्हणाले, " There was the Indian Civil Servant who, as the chairman truly said, was neither an Indian nor civil nor a servant. He answered the same description as the ' Holy Roman Empire ' which was neither Holy, nor Roman, nor an Empire, " या त्यांच्या उद्गारावर एकच हंशा पिकला; परंतु हिंदुस्थानांतून निवृत्त होऊन परतलेल्या इंग्रजी ऑफिसरांचीं हें भाषण ऐकून डोकीं भडकलीं व सभेचें वातावरण बरेंच प्रक्षुब्ध झालें. तरी न डगमगतां नरसोपन्तांनीं आपलें भाषण तसेंच पुढें रेटीत नेलें, आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची कैफियत अत्यंत निर्भय-रीतीनें त्या समाजापुढें मांडली.

(३) याच वेळीं त्यांच्या मानी स्वभावाची साक्ष देणाऱ्या दुसऱ्या एका प्रसंगाची आठवण होते. तो प्रसंग दिल्ली येथील जुन्या लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या बैठकीच्या वेळीं घडला. काँग्रेसची असहकारतेची चळवळ सुरू असतांना कै. मोतीलाल नेहरू व कै. चित्तरंजनदास यांनीं कौन्सिलप्रवेश करण्याकरितां काँग्रेस-मध्येंच स्वराज्य पक्षाची नुकतीच स्थापना केली होती. आणि नवीनच निवडणुकी होऊन तात्यासाहेब महाराष्ट्रातर्फे लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्यें निवडून गेले होते. हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या प्रांतांतील कायदेकौन्सिलांत स्वराज्य-पक्षातर्फे निव-डून आलेल्या सभासदांची सभा स्वराज्य-पक्षाचे अध्यक्ष दासबाबू यांनीं दिल्लीस बोलाविली होती. मुंबई कायदेकौन्सिलचा सभासद म्हणून मी त्या ठिकाणीं इतरांसमवेत हजर होतों. असेंब्ली हॉलमध्ये प्रेक्षकांच्या गॅलरींत बसण्यासाठीं माझ्याकरितां एक पास मिळावा म्हणून नरसोपंत मला असेंब्लीच्या सेक्रेटरीच्या ऑफिसमध्यें घेऊन गेले. तेथील इंग्लिश अधिकाऱ्याकडे त्यांनीं पासाची मागणी

केली. तो इंग्लिश अधिकारी जुन्या उर्मट अरेरावी वळणाचा होता. तो म्हणाला, "Wait, I am busy at this moment, I will see to it afterwards." आणि त्यांच्या बोलण्याकडे लक्ष न देतां काम करूं लागला. नरसोपंत आपल्या मानी स्वभावानुसार एकदम उसळले व उद्गारले, "You don't think I am going to dance attendance on you to secure the pass. You ought to know whom you are addressing. You are here to cater for our comforts and our requirements. You must remember the Old Regime is gone since the Congress has entered Assembly." याचा परिणाम असा झाला कीं, तो वरचढ अधिकारी नरमला आणि नम्रतेनें दिलगिरी प्रदर्शित करून त्यानें चटकन् एक सोडून दोन पासेस नरसोपंतांच्या हातांत दिले!

(४) कौन्सिलचीं प्रश्नोत्तरें व ठराव यासंबंधीं अनेक वेळां अत्यंत उपयुक्त सल्ला त्यांनीं मला दिला आहे. बॅरिस्टर सावरकरांच्या सुटकेसंबंधींचा ठराव मी जेव्हां मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें आणला त्या वेळीं पुण्यांत सदाशिव पेठेंत त्यांच्या घरीं मी राहिलों होतों. तेव्हां ठरावावर मीं भाषण करण्यासंबंधीं आम्ही बोलत असतांना नरसोपंतांनीं माझ्या भाषणासाठीं कांहीं महत्त्वाचे मुद्दे दिल्याचें मला आठवतें. तसेंच त्यांच्या दिल्ली येथील वास्तव्यांत कौन्सिलमध्यें पहिले प्रश्न त्यांच्याच सल्ल्यानें आणि त्यांनीं दिलेल्या सामग्रीवरून मीं पाठवल्याचें मला पक्क आठवतें. अशा रीतीनें मला त्यांनीं पुष्कळ उपकृत करून ठेवलें आहे.

(५) कामाची तडफ किंवा इंग्रजीमध्यें ज्याला डिस्पॅच म्हणतात तो त्यांचा विशेष गुण होता. कितीहि कामाचा ढिगारा असेना का, कामें तडफीनें हातांत घेऊन उरकून टाकावयाचीं व हातावेगळीं करावयाचीं, हा त्यांचा गुण अनेक सभांच्या बैठकीच्या वेळीं ते अध्यक्ष असतांना विशेष दृष्टोत्पत्तीस येई. सभेची कार्यक्रमपत्रिका कितीहि भरगच्च असो, त्यांतील विषय वादविवादांत गुरफटून न देतां तडकाफडकीनें निकालांत काढण्याकडे त्यांचा नेहमी कटाक्ष असे. प्रत्येक वेळीं त्यांचें हें वागणें नियमांना धरून होतें किंवा नाहीं ह्याबद्दल दुमत असूं शकेल. मला असें पक्कें आठवतें कीं, कित्येक प्रसंगीं कमिटीच्या बैठकीच्या वेळीं, महत्त्वाचे प्रश्न निकालासाठीं आलेले असतांना सभासद विषयाच्या बाजूनें किंवा विरुद्ध बाजू आपापसांत इतर सभासदांना समजावून देण्याचा प्रयत्न करीत. अध्यक्ष केळकर लगेच उद्गारत, "ही कमिटी सर्व सुज्ञ व समंजस मंडळींची आहे. प्रत्येकजण पूर्ण विचार करून व आपलें मत बनवून या कमिटींत हजर आहे. तुम्ही आपल्या भाषणानें आपापसांत जास्त तें काय सांगणार! व त्यांचें मतपरि-

वर्तन तें काय करणार ! तुम्ही फक्त 'होय' का 'नाहीं' बोला. ठरावाच्या बाजूनें आहांत कीं विरुद्ध आहांत येवढेंच सांगा. सभेचा फुकट वेळ खाऊं नका." कांहीं कांहीं वेळीं त्यांचें असें वागणें जरूरीचें होतें; पण नेहमींच अशा तऱ्हेचें वागणें बरोबर होतें असें नक्की सांगतां येणार नाहीं.

(६) केळकरांच्या 'केसरी'च्या संपादकीय लेखांबद्दल टिळकांनीं काढलेले उद्गार मला या आठवणींत सांगावेसे वाटतात. ग्लासगो येथील मजुरांच्या संघापुढें टिळकांचें व माझें अशीं दोघांचीं भाषणें होऊन आम्ही परत येत होतों. तेव्हां वक्तृत्वकलेसंबंधानें बोलतां बोलतां स्वतःच्या 'केसरी'तील लेखासंबंधानें ते म्हणाले, "केसरींतील लेख लिहीत असतांना भाषासौंदर्याकडे मी फारसें लक्ष देत नाहीं. अलंकारिक आणि डौलदार भाषा लिहिण्यामध्यें आमचे केळकर माझ्यापेक्षां सरस आहेत. पण माझ्या अंतःकरणांत असलेले विचार जितक्या सोप्या भाषेंत कळवितां येतील तितके कळविण्याचा मी प्रयत्न करीत असतों. मनांत घोळत असलेले विचार सरळ बाहेर पडलेल्या भाषेनें लोकांच्या समोर ठेवल्यानें त्यांच्या मनावर तात्काळ परिणाम होत असतो. भाषासौंदर्याकडे व सौष्ठवाकडे तात्या जास्त लक्ष देतात त्यामुळें कधीं कधीं विचारांवर नसतें दडपण येण्याचा संभव असतो. भाषेला सौंदर्य असेल तर उत्तमच; परंतु मुख्यतः तें विचाराला कधींहि मारक होतां कामा नये येवढें सांभाळलें म्हणजे झालें. कांहीं झालें तरी माझ्या गैरहजेरीत केळकरांनीं आपल्या लेखनकौशल्यानें 'केसरी'द्वारें मोठी राष्ट्रसेवा केली आहे."

(७) केळकरांच्या सान्निध्यांत असतांना त्यांच्या चारित्र्यांत एक गोष्ट अत्यंत प्रामुख्यानें मला आढळून आली. ती ही कीं, त्यांचें जीवन एखाद्या योग्यासारखें होतें. विलायतेंत असतांना आम्ही सकाळीं व सायंकाळी लो. टिळक, दादासाहेब खापर्डे, वासुकाका जोशी व टिळकांचे प्रायव्हेट सेक्रेटरी श्री. नामजोशी अशी आमच्या त्या कुटुंबांतील मंडळी जेवणाकरितां एकत्र बसत असूं. येथें माधवराव भट म्हणून आमचा आचारी आपल्या दक्षिणी पद्धतीप्रमाणें वरण, भात, भाजी, आमटी आणि पोळी असें जेवण तयार करीत असे. मात्र आम्ही तें इंग्रजी पद्धतीप्रमाणें सर्वजण काट्या-चमच्यानें जेवत असूं. जेवण सुरू झाल्याबरोबर नरसोपंत वरण-भात, भाजी-आमटी एकत्र करीत व झटपट खाऊन ताट चटकन् रिकामें करून उठत असत ! इंग्रजीमध्यें बोलायचें झालें आणि तसें आम्ही जेवतांना त्यांच्या समक्ष बोलत असूं कीं, "Mr. Kelkar does not care for the nicities of the pallet, he believed more in eating to live rather than living to eat." व्याख्यानाच्या दौऱ्यावर असतांना पुष्कळदा हॉटेलमध्यें राहण्याचा प्रसंग येत असे. नरसोपंत शाकाहारी होते तेव्हां नेहमीं "जेवणा-

करितां काय काय पदार्थ करण्यास सांगूं" असें विचारलें असतां ते त्रासलेल्या आवाजानें म्हणायचे "कांहीं तरी सांगा झालं. कसलेहि व कांहींहि पदार्थ असलेलें जेवण मला चालतें." इतकी त्यांची राहणी साधी होती. परंतु पंचपक्वान्नाबद्दल आसक्ति नसणाऱ्या ह्या योगी पुरुषाला विदग्ध साहित्याची मात्र मनमुराद लूट करण्यामध्यें अलोट आनंद वाटत होता!



गोपाळ पांडुरंग महाजन

(म्युनिसिपल कौन्सिलर, पुणें)

(१) सुमारें २०-२२ वर्षांपूर्वी माझ्या गुडघ्यामध्यें पाणी सांठत होतें. तेव्हां पुणें येथें सर्व डॉक्टर लोकांनीं ऑपरेशनशिवाय गत्यंतर नाहीं असें सांगितलें. तेव्हां मीं रा. अन्तूकाका फडणीस यांच्यामार्फत ही गोष्ट तात्यासाहेबांच्या कानावर घातली. तेव्हां तात्यासाहेबांनीं सांगितलें कीं, मुंबई येथें मी जाईन त्या वेळीं तेथील डॉक्टर लोकांचा सल्ला घेऊं. एके दिवशीं तात्यासाहेब मुंबईला गेल्याचें कळलें. तेव्हां मी मुंबई येथें सरदारगृहांत गेलों. कांहीं वेळानें डॉ. भाजेकर तेथें आले. त्यावेळीं अंतूकाकांना मीं म्हटलें कीं, डॉक्टरांना माझा पाय दाखवा. तेव्हां त्या डॉक्टरांना तात्यासाहेबांनीं पाय पाहण्यास सांगितलें. पाय पाहून त्यांनीं सांगितलें कीं, हें फ्रॅक्चर आहे. माझ्या दवाखान्यांत आल्यावर मी सर्व कांहीं करीन. नंतर दुपारीं डॉ. देशमुख यांच्याकडे तात्यासाहेब मला घेऊन गेले. तेव्हां त्यांनीं पाय तपासून पाहिला. "मलम देतों, ऑपरेशनची जरूरी नाही" असें सांगितलें; पण असें न करतां डॉ. भाजेकर यांच्याकडेच जाऊन उपचार करावा असें ठरलें. म्हणून डॉ. भाजेकरांकडे जाऊन ऑपरेशन करावयाचें ठरविलें. तात्यासाहेबांनीं त्या डॉक्टरांस सांगितलें कीं 'हा माझा मनुष्य आहे. माझ्याप्रमाणें यांस समजून काळजीनें काम करा.' तेव्हां डॉक्टर भाजेकर यांनीं मजकडून एक पैसाहि न घेतां ऑपरेशन चांगल्या रीतीनें केलें व माझा पाय बरा झाला.

(२) १९३७-३८ सालीं पुणें म्युनिसिपालटीत प्रथम मी निवडून आलों. निकाल ऐकल्यावर तात्यासाहेब यांच्याकडे मी गेलों, त्यांना वंदन करून मी म्हणालों, 'निवडून आलों.' त्या वेळीं ते पांच मिनिटें हंसतच राहिले व नंतर 'ठीक झालें' असें म्हणाले. विशेष हें कीं, दुसऱ्या दिवशी त्यांनीं मला पन्नास रुपये पाठवून दिले!



नारायण सदाशिव जोशी

(पेन्शनर मामलेदार, मुंबई)

(१) बहुतेक १८९०–९१ साल असावें. या वर्षी मी न्यू इंग्लिश स्कूल पुणें येथें मॅट्रिकच्या वर्गांत होतों. फर्ग्युसन कॉलेजांत प्रिव्हियसच्या वर्गांत केळकर होते. त्यांचें इंग्रजी विषयावर प्रथमपासूनच प्रभुत्व होतें. त्या वेळच्या सर्व विद्यार्थ्यांत त्यांच्या विद्याव्यासंगाबद्दल सर्वांना फार आदर वाटत असे. त्यांना इंग्रजी विषयांत प्रावीण्य मिळविल्याबद्दल युनिव्हर्सिटीतून बक्षिसहि मिळालें होतें. हें युनिव्हर्सिटी कॅलेंडरांत नमूद आहे.

(२) पक्कें वर्ष आठवत नाहीं, पण तें १९०१ असावें. डेप्युटी कलेक्टर कै. रा. ब. हरी विनायक साठे यांना स्पेशल ड्यूटीवर नेमलें होतें. सर्व्हे खातें बंद करण्याचें चालू होतें. त्या खात्यांतील सर्व विषयांचें ज्ञान मुख्यतः चालू सिव्हिलियन, युरोपियन व इतर लोकांना मिळावें ह्याकरितां सर्व्हे आणि सेटल्मेंट मॅन्युअल तयार करण्याचें काम सरकारनें सदर साठे यांच्याकडे सोपविलें होतें. त्यांस मदतनीस म्हणून त्यांच्या हाताखालीं माझी नेमणूक झाली होती. साठे यांचें इंग्रजीचें ज्ञान चांगलें होतें. तथापि आपला ग्रंथ युरोपियन लोकांच्या हातांत जाणार तेव्हां त्यांनीं त्यास नांवें ठेवूं नयेत, लेखनांत चुका होऊं नयेत म्हणून पुस्तक वाचून त्यांत इंग्रजी भाषेसंबंधानें वगैरे चुका झाल्या असल्यास त्या दुरुस्त व्हाव्या अशासाठीं साठे यांनीं केळकर यांना विनंती केली होती. सर्व्हे आणि सेटल्मेंट हा कांहीं केळकरांचा विषय नव्हे; पण त्यांनीं तो ग्रंथ काळजीपूर्वक वाचण्याचे परिश्रम घेतले व त्यांत थोड्याबहुत सूचनाहि केल्या हें विशेष होय.

(३) केळकरांचे व्याही प्रो. लागू पुणे येथें वारले. स्मशानयात्रेस केळकर आले होते. मीहि हजर होतों. लागू यांची शरीरयष्टि मोठी व भरभक्कम होती. शव नेण्यास सहा माणसें लागलीं! वाटेंत मध्यंतरीं तिरडी मधोमध मोडते कीं काय असें केळकरांच्या सूक्ष्म नजरेस आलें. त्यामुळें ते अति अस्वस्थ दिसले. पण त्यांची समयसूचकता अशी कीं, त्यांनीं लगेच माझ्या हातांत टेकण्याची काठी होती ती माझ्याजवळून मागून घेतली व तिरडीच्या मध्यभागावर जीं दोन माणसें होतीं त्यांच्या खांद्यांवर भार पडेल अशा खुबीनें त्यांनीं ती स्वतः बसवून दिली. स्मशानांतं प्रेत खालीं ठेवल्यावर अलगत त्यांनीं काठी काढली व ती मला परत दिली. स्नेहस्मृति म्हणून ती मीं जपून ठेविली आहे!

❋

कै. ग. वि. साळवेकर

(बी. ए., मालक सरदारगृह, मुंबई)

(१) १९२७ च्या सप्टेंबर महिन्यांत माझे वडील ती. विसूभाऊ ऊर्फ तात्या साळवेकर ज्या वेळीं अत्यवस्थ आजारी झाले त्या वेळीं संन्यास घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. परंतु त्यापूर्वी ' ती. तात्यासाहेब यांच्याशीं मला बोलावयाचें आहे तरी तार करून त्यांना बोलावून घे ' अशी त्यांनीं मला आज्ञा केली. त्याप्रमाणें मीं तार केली व तात्यासाहेब केळकर आले. आमच्या तात्यांनीं, तात्यासाहेब केळकर यांना अत्यंत कळकळीने सांगितलें कीं, "माझा काल अगदी समीप आला आहे व उद्यां मी संन्यास घेणार आहें. बाबू लहान आहे; परंतु तो समंजस असून पितृभक्त आहे. त्याला मी तुमच्या स्वाधीन करीत आहें. माझ्या ठिकाणीं आतां त्याला तुम्हीच वडिलांप्रमाणें आहांत. तुमच्या सल्ल्यानें व आज्ञेप्रमाणें त्यानें वागलें पाहिजे असें मीं त्याला सांगितलें आहे. त्याच्यावर आपलें लक्ष असूं द्यावें." तात्यासाहेब यांनीं उत्तर दिलें कीं, " आपण त्याच्याबद्दल कांहीं काळजी करूं नका व मी त्याला योग्य ती सल्लामसलत देत जाईन. " तात्यासाहेब यांनीं याप्रमाणें आश्वासन देतांच वडिलांचे डोळे भरून आले व त्यांना फार समाधान वाटलें.

(२) मला लिहिण्याला अत्यंत आनंद वाटतो कीं, तात्यासाहेब यांनीं मला वेळोवेळीं सल्लामसलत तर दिलीच, पण मी एकदां अडचणींत असतां त्यांनीं मला फार मोठ्या रकमेनें पैशाची सुद्धां मदत केली होती. त्यांचे हे उपकार मी कधींहि विसरणें शक्य नाहीं.

(३) मला पहिलें अपत्य मुलगी झाली. त्या वेळीं बारशाचा समारंभ पुण्यास थाटानें झाला. त्या वेळीं तात्यासाहेब हजर होते. त्यानंतर दुसऱ्या खेपेला मुलगा होईल अशी सर्वांची अपेक्षा होती; परंतु मुलगीच झाली ! हें वृत्त मी तात्यासाहेब यांना कळविलें व दुसरीहि मुलगी झाल्यामुळें आमचा थोडासा हिरमोड झाल्याबद्दल मीं त्यांना लिहिलें. या पत्राचें उत्तर त्यांनीं मोठ्या गमतीचें पाठविलें. तें असें – " मुलगी झाली तरी तींहि पुत्ररत्नाप्रमाणें कन्यारत्नच आहे. दोहोंनाहि "रत्न" हें उपपद लावतात. तरी निराश होण्याचें कारण नाहीं. आतां मात्र पुढल्या खेपेला नक्की मुलगा होईल. हें माझें भविष्य लिहून ठेवा ! " मला सांगण्यास अभिमान वाटतो कीं, तात्यासाहेब यांचें हें भविष्य खरें ठरलें व मी त्यांना गमतीनें म्हणालों, " तात्यासाहेब, आपण भविष्य अचूक वर्तवितां, हा आपला गुण आम्हांला नव्यानेंच समजला. " यावर ते कांहीं न बोलतां अगदीं मनापासून हंसले ! !

❋

रामचंद्र केशव बाळ

(रावबहादूर, निवृत्त सेशन जज्ज, पुणें)

(१) तात्यासाहेब यांस मीं प्रथम १८८९ मध्यें पाहिलें. त्या वेळीं ते मिरजेहून फर्ग्यूसन कॉलेजमध्यें नुकतेच आले होते. परंतु ती भेट कॉलेज-वर्गांत न होतां आमची आब्यापाब्या खेळण्याची मुरलीधराच्या देवळाजवळ एक बखळ होती तेथें एकदां ते संध्याकाळीं आले त्या वेळीं झाली. नंतर ते लवकरच कोल्हापुरास राजाराम कॉलेजमध्यें गेले. त्यानंतर त्यांची गांठ 'डेक्कन' कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्गांत पडली. आम्ही दोघेहि रेसिडेन्सींत राहत होतों. पुढें कॉलेजमध्यें संस्कृत 'मृच्छकटिक' करण्याचें ठरलें. त्यांत तात्यासाहेब यांनीं नटीची भूमिका पत्करली होती. नाटकांच्या तालमी होत त्या वेळीं मी तेथें मधूनमधून जात असे. त्यामुळें थोडा जास्त परिचय होऊं लागला.

एल्एल्. बी. ची परीक्षा झाल्यावर तात्यासाहेब साताऱ्याहून कांहीं दिवसांनीं पुण्यास केसरी संस्थेमध्यें लोकमान्यांचे मदतनीस म्हणून आले व मी नोकरीवरून पुण्यास सुट्टींत येई तेव्हां भेट होत असे. अशा वेळीं तात्यासाहेब जरी त्यांचा समाजांतील दर्जा वाढत चालला होता तरी, जुनी ओळख ठेवून अगत्यानें विचारपूस केल्याशिवाय राहत नसत. त्याबद्दल आनंद वाटे. कारण दुसरे कांहीं कॉलेज-सहाध्यायी गांठ पडल्यावर ओळख आहे असेंहि दर्शवीत नसत !

(२) तात्यासाहेबांच्या उदार स्वभावावरून एक लहानशी हकीकत सांगावीशी वाटते. माझे एक स्नेही मजबरोबरच न्यायखात्यांत नोकर होते. त्यांच्या मनांत लोकमान्य टिळकांच्या गायकवाड वाड्यांतील वाचनालय पाहावयाचें होतें. लोकमान्य त्या वेळीं हयात होते. पण त्यांच्याकडे न जातां कै. रा. धोंडोपंत विद्वांस यांच्याकडून तें काम करवून घेण्याचें होतें. परंतु ते भेटले नाहींत. त्या वेळीं तात्यासाहेब तेथें होते. त्यांनीं आम्हां दोघांस नेऊन तें पुस्तकालय दाखविलें. त्या दोघां परस्परविरोधी स्वभावाच्या दोन स्नेह्यांच्या सान्निध्यानें माझ्या मनांत असा विचार येऊन गेला कीं, ह्या दोघांनीं आपापल्या जागांची अदलाबदल करणें योग्य झाल असतें. माझे हे दुसरे स्नेही सरकारी नोकरींत होते तरी त्या वेळच्या मानानें त्यांचे विचार ज्वलज्जहाल वाटत. मी चटकन् बोलून गेलों, "You should have changed places." मी काय म्हणालों यांचें त्या वेळीं त्या दोघांस आकलन झालें कीं नाहीं हें समजलें नाहीं. तात्यासाहेबांच्या स्मरणांत ती गोष्ट आली असावी असें दिसलें नाहीं. परंतु मला काय वाटलें तें कांहीं मंडळींस पुन्हां सांगितलें. तात्यासाहेब न्यायखात्यांत आले असते तर त्यांस केसरी संस्थेकडून जो अखेर अखेर तनखा मिळे त्यापेक्षां किती तरी पटीनें जास्त मिळाला असता व तसें मला उद्देशून एक-

दोन प्रसंगी त्यांनीं बोलूनहि दाखविलें होतें. परंतु एकदा तेच म्हणाले कीं, "मग मला हल्ली जी मान्यता मिळाली आहे ती मिळाली असती किंवा नाहीं ही शंका आहे. सार्वजनिक आयुष्यांतील मान्यता नोकरींत मिळणें कठीणच."

(३) त्यांच्याबद्दलची आणखी एक लहानशी हकीकत देतों. आम्ही दोघे जरी डेक्कन कॉलेजांत शेवटच्या वर्षांत होतों तरी आमचे ऐच्छिक विषय निराळे होते. मीं तत्त्वज्ञान हा विषय घेतला होता तर त्यांचा भाषाविषय होता. म्हणून एका भोजनप्रसंगीं ते माझ्याकडे आले असतांना त्यांनीं मला एक सप्रेम भेट म्हणून त्यांचें 'भारतीय तत्त्वज्ञान' पुस्तक दिलें. जरी त्यांनीं बोलून दाखविलें नाहीं तरी त्या भेटीचें औचित्य माझ्या लक्षांत आलें.

(४) जेव्हां खाजगी रीतीनें न्यायनिवडीचा प्रश्न येई त्या वेळीं मला ते अगत्यानें त्या पंचमंडळीपैकी एक नेमीत. एक वेळ तर त्यांच्यासह आम्ही तिघे पंच होतों.

(५) त्याचप्रमाणें नेत्यांस व इतरांसहि मदत करण्याचा प्रश्न उद्भवला असतां त्यांची तयारी असे. एका विवाद्य प्रकरणांत माझा पाठपुरावा करून त्यांनीं मला उपकृत करून ठेविलें आहे.

❋

बाळकृष्ण श्रीधर कोल्हटकर

(सरकारी निवृत्त शिक्षक, पुणें)

सन १९०१ साली दिवाळीच्या सुट्टींत तात्यासाहेब, मी, रा. ब. कृष्णराव जोशी, कृष्णराव दीक्षित व नाना (तात्यांचे थोरले भाऊ) असे पांचजण भीमाशंकरास ट्रिपला गेलों होतों. तेथून नेरळच्या वाटेनें जंगलांतून उतरलों. त्या वेळीं तात्या म्हणाले, "या वाटेनें जाण्यांत तुम्ही 'फूलहार्डिनेस' करतां." पुढें आमच्यांत कांहीं गोष्टीवरून वाद सुरू झाला. परंतु अखेर त्यांत अतिशय तीव्रता आली, कडवटपणा उत्पन्न झाला. तेव्हां तात्यासाहेब म्हणाले, "मित्रामित्रांत इतका कडाक्याचा वाद व त्याचें पर्यवसान असें होणें इष्ट नाहीं. त्यानें मैत्री तुटते." त्याबरोबर आम्हीं एकदम वादविवाद बंद केला. आज त्याला ४६ वर्षें झालीं. परंतु त्यांचे ते शब्द व प्रसंग माझ्या डोळ्यापुढें उभा आहे. यावरून त्यांचा भांडणें मिटविण्याचा स्वभाव दिसून येतो.

❋

रामचंद्र विनायक पटवर्धन

(बी. ए., एल्एल्. बी., महर्षि पटवर्धन यांचे चिरंजीव, पुणें)

(१) टिळक पंचांग प्रसिद्ध होऊं लागल्यापासून कांहीं वर्षें जुन्या मताभिमान्यांमध्यें मोठी खळबळ उडूं लागली. परंतु वादविवादांत त्यांना यशाची आशा दिसेना. अशा काळांत एकदां तात्यासाहेब बेळगांवास गेले असतां तेथील कांहीं मंडळींनीं या प्रश्नांत तुम्ही तोडजोड घडवून आणा, अशी तात्यासाहेबांना फार गळ घातली. तात्यासाहेबांचीं मतें निश्चित आणि खंबीर; पण स्वभाव अतिशय भिडस्त असल्यानें त्यांना मोठी पंचाईत पडली. पण गळ घालणाऱ्या लोकांस त्यांनीं शेवटीं सांगितलेंच कीं, " परंपरागतपद्धति किंवा शास्त्रार्थ यांत कालमानानुसार फरक पडणें संभवनीय आहे हें कबूं शकतें; पण गणितानें निघणाऱ्या उत्तरांत किंवा निष्कर्षांतहि तोडजोड होते, असें असेल तर तुम्हीच स्वतः पुण्यास या आणि तो चमत्कार सर्व मंडळींस तुम्हीच समजावून सांगा म्हणजे झालें. त्याला माझी तरी मध्यस्थी कशाला पाहिजे ? "

(२) पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या वार्षिक पारितोषिकसमारंभाच्या प्रसंगीं आजपर्यंत अध्यक्षस्थानीं जे जे विराजमान झाले ते ते सर्व अर्थातच उत्तम विद्वानांपैकींच होते. परंतु त्यामध्यें संस्कृतांत भाषणें करणारे अध्यक्ष फारच कमी यांचें कारण उघडच असें कीं, श्रोत्यांपैकी अभिजात अशा संस्कृताचें ज्ञान असणारे श्रोते फारच थोडे असतात. एकदां पारितोषिक-समारंभाचे अध्यक्ष तात्यासाहेब हेच होते. त्यामुळें श्रोतृगणहि नेहमींपेक्षां फार मोठा होता. परंतु सर्वांना आश्चर्य वाटलें तें हें कीं, तात्यासाहेबांनीं भाषण केलें तें संस्कृतांतच केलें, आणि संस्कृत भाषणाचा उत्कृष्ट नमुना म्हणून तें भाषण अतिशय श्रवणीय असेंच झालें. परंतु श्रोत्यांपैकीं पुष्कळांना त्यांतील रसास्वाद घेणें इच्छा असूनहि अशक्य झालें. म्हणून त्यांपैकीं एकानें विनंती केली कीं, आपल्या भाषणांतील माधुर्य व विनोद समजण्याकरितां आपण आणखी तसेंच दुसरें भाषण मराठींत करा. ही विनंती तात्यासाहेबांनीं तत्काळ मान्य केली आणि संस्कृत भाषण पूर्ण झाल्यावर पुनः दुसरें सुंदर भाषण त्यांनीं मराठींत केलें.

(३) केसरींतील एका जाहिरातीसंबंधाची माहिती तात्यासाहेबांना कोणीतरी विचारली असतां त्यांनीं सांगितलें कीं, केसरींत आलेली कोणतीहि जाहिरात न पाहिलेला असा कोणी असेल तर तो मी; आणि आंतील मजकूर न पाहणारे असे कोणी असतील तर ते आमचे धोंडोपंत बाबा. कारण, जाहिरातींचें व इतर कामाचें लचांड त्यांच्यामागें एकसारखें इतकें असतें कीं, त्यांना इकडे तिकडे पाहण्यास फुरसत मिळेल तर शपथ !

(४) फलज्योतिषासंबंधानें त्यांच्या भाषणांत एकदा असें आलें कीं, फलज्योतिषाच्या सत्यतेविषयीं माझी स्वतःची जरी ठाम खात्री नसली तरी ज्यांच्या विद्वत्तेविषयीं शंकाच नको असे बडोद्याचे दाजीसाहेब आपटे, आणि आपल्या येथले तात्यासाहेब करंदीकर यांच्यासारखे चिकित्सक दृष्टीनें पाहणारे चाणाक्ष लोक जर त्या शास्त्रावर पूर्ण विश्वास ठेवणारे आढळतात, तर मी तरी तें खोटें आहे असें कसें म्हणूं ? आणि शिवाय योगायोगाची गोष्ट म्हणा पाहिजे तर, पण माझ्या जीवनक्रमांत प्रत्येक बारा बारा वर्षांनीं असें कांहीं तरी घडत आलें आहे कीं, त्यामुळें माझ्या आयुष्याला महत्त्व येत गेलं, असें सांगून पहिल्या बाराव्या वर्षी अमुक घडलें, त्यानंतरच्या बाराव्या वर्षी अमुक झालें असें क्रमवार त्यांनीं सांगितलें.

(५) बऱ्याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. तेव्हां माझा "मराठा" पत्राशीं संबंध होता. त्यामुळें तात्यासाहेब हे त्या वेळीं गायआळींतील घरांत रहात होते, तेथें मी जात असें. तात्यासाहेबांचे वडील चिरंजीव श्री. बापूराव हे न्युमोनियानें अतिशय आजारी असल्याचें ऐकल्यानें मी तेथें गेलों, तों बापूरावांची प्रकृति चिंताजनक असल्याचें दिसलें. पण तात्यासाहेब तेथें नव्हते. म्हणून आंतील जिन्यानें माडीवर गेलों. तों तात्यासाहेब लेखनकार्यांत अगदीं गढून गेले होते. मी त्यांच्यासमोरच बसलों. तात्यासाहेबांची मुद्रा अत्यंत चिंताग्रस्त असल्याचें दृष्टोत्पत्तीस आलें. तेव्हा याच वेळीं हें काय करतां असें मीं विचारतांच ते म्हणाले, " बापूची अवस्था कठिण आहे हें खरें; पण तुमच्या अण्णासाहेबांच्याच सल्ल्यानें उपचार चालू आहेत व शुश्रूषाहि व्यवस्थित आहे, मग मीहि आणखी तेथेंच बसून अधिक तें काय करणार ! दुःखावेगाचा जोर दाबून धरण्यास दुसरा कांहीं मार्ग दिसेना, म्हणून लेखनकार्यानें तरी कांहीं जमतें काय तें पहावें असें मनांत येऊन कालपरवांपासून हें लिखाण लिहीत असतों; त्यामुळें मनाला बरें वाटतें," असें म्हणून ते स्वस्थ राहिले. तात्यासाहेब हे लोकमान्यांचे सच्छिष्य शोभतात खरें, असें माझ्या मनांत येऊन मी उठलों व परत बापूसाहेब तापानें फणफणत होते तिकडे गेलों. "आपत्सु महतां चित्तं शैलकाठिन्यकर्कशम् " ही भर्तृहरीची उक्ति तात्यासाहेबांना कशी तंतोतंत लागू पडते हें मात्र स्पष्ट दिसलें.



शंकर दामोदर पेंडसे

(एम्. ए., पीएच्. डी., प्राध्यापक, नागपूर)

(१) अखंड वाचनानें आणि विचारानें, राष्ट्राच्या सामाजिक व राजकीय प्रगतीविषयींचे कांहीं सिद्धान्त तात्यांनीं निश्चित केले होते. त्यामुळें या प्रगतीकरितां

आपली लेखणी ते अव्याहत चालवीत असतांहि अप्रिय प्रसंगांनीं किंवा प्रकारांनीं त्यांची वृत्ति विचलित होत नसे. प्रातिनिधिक अशा सरकारी व बिनसरकारी संस्थांच्या कारभारांत चालणारे उद्वेगजनक प्रकार त्यांच्या नजरेस आणून, हिंदुस्थान हा खरोखर लोकशाहीला योग्य आहे काय, असें त्यांना विचारतां ते म्हणाले – "हळुहळू ही स्थिति सुधारत जाईल आणि 'जसें लोक तसें त्यांचें राज्य' हा अबाधित सिद्धांत लक्षांत ठेवला तर या प्रकारांबद्दल हळहळण्यांत काय अर्थ?"

(२) नागपूर येथील राजाराम वाचनालयाच्या हीरकमहोत्सवाचे अध्यक्ष म्हणून एक-दीड वर्षापूर्वी तात्या येथें आले होते. त्यांच्या भाषणाला जुन्या व नव्या पिढींतील सर्व लोक इतक्या मोठ्या संख्येनें उपस्थित झाले होते कीं, तात्यांच्याविषयीं एखादा राजकीय पक्ष कसाहि वागला तरी लोकांमधील त्यांच्याविषयींचा आदर कायम होता, असें सहज दिसून आलें. त्या वेळीं "साहित्यसम्राट्" या पदवीला अनुलक्षून तात्या विनोदानें म्हणाले, "सिंहासन आणि छत्र हीं दोन सम्राट्पदाचीं चिन्हें आहेत. त्यांपैकीं वाङ्मयसंमेलनाच्या अध्यक्षपदाचें सिंहासन मला अनेकवेळां लाभलें आहे. पण आज माझ्या शेजारीं बसलेल्या पुरीच्या शंकराचार्यांच्यावर धरलेल्या छत्रांत मधूनमधून माझाहि प्रवेश होत असल्यामुळें सम्राट्पदाचें दुसरें चिन्ह जें छत्र तेंहि मला लाभलें आहे!" व्याख्यानाच्या आरंभींच केलेल्या या विनोदानें तात्यांनीं सभा ताब्यांत घेतली व पुढील व्याख्यान चांगलेंच रंगलें.

(३) १९३० मधील गोष्ट आहे. "केसरी" द्विसाप्ताहिक झाला होता. त्याकरितां संपादकवर्गांत आणखी कांहीं लेखक घेण्याची योजना तात्यांच्या मनांत घोळत होती. एक दिवस मला बोलावून ते म्हणाले, "तुमची आज मी परीक्षा घेणार आहें. सायमन कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे. त्याच्या सारांशाचीं तीन कॉलमचीं प्रुफें तयार आहेत, तीं घेऊन जा व या रिपोर्टाचें गुणदोष विवेचन करणारा लेख मला उद्यां सकाळीं आणून द्या." त्याप्रमाणें केसरीकचेरींत जाऊन मीं रिपोर्टाच्या सारांशाचीं प्रुफें आणलीं व रात्रीं त्यावर तीन कॉलमचा लेख लिहून सकाळीं तात्यांना नेऊन दिला. या लेखाच्या प्रारंभीं तात्यांनीं स्वतः एक सुंदर परिच्छेद लिहिला व "सायमन सत्याग्रहीचा अपशकून फळला" असा मथळा देऊन, अग्रलेख म्हणून १४ जून १९३० च्या केसरीच्या अंकांत दुसऱ्या दिवशीं तो प्रसिद्ध केला.

(४) तात्या स्वतः कोणालाहि दुखवीत नसत. त्यांना अन्याय झालेला पाहवत नसे. सामाजिक व राजकीय क्षेत्रांतील अन्यायामुळें त्यांचें मन कळवळून जाई, एवढेंच नव्हे तर नाटकांतील काल्पनिक अन्यायाहि त्यांना पाहवत नसे. पुण्याला श्री. प्र. के. अत्रे यांच्या एका नाटकाला आम्ही गेलों होतों. रंगभूमीवर

एक करुणरसपूर्ण प्रवेश चालूं असतांना मीं जवळच बसलेल्या तात्यांकडे मुद्दाम पाहिलें तेव्हां त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वाहत आहेत आणि उपरण्यानें ते पुनः पुनः पुशीत आहेत असें मला दिसलें. " लोकोत्तराणां चेतांसि मृदूनि कुसुमादपि. "

(५) आपल्या लेखनांतील कांहीं कांहीं प्रसंग तात्या आपल्या अंतःकरणांतील सर्व भावना ओतून तन्मयतेनें लिहीत. अशा रसपूर्ण स्थलांचा वाचकांच्या मनावर कसा परिणाम होतो हें जाणण्याचीहि त्यांना उत्सुकता असे. " गतगोष्टी अर्थात् माझी जीवनयात्रा " हें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें. त्यानंतरच्या उन्हाळ्याच्या सुट्टींत त्यांना नेहमीप्रमाणें भेटलों असतां या पुस्तकांतील कांहीं उत्कृष्ट स्थळांबद्दल मी बोलत होतों. त्या वेळीं विशेषतः त्यांनीं आपल्या मातुःश्री-विषयी केलेल्या वर्णनाबद्दल बोलत असतां, तात्या आनंदपूर्ण चर्येनें तें ऐकत होतें. तीं वर्णनें स्वतः लिहीत असतां त्यांना झालेला आनंद, रसिक वाचकालाहि झालेला पाहिला म्हणजे लेखनाची सार्थकता झाली असें वाटून त्यांना आनंद व समाधान होई. हें त्यांच्या बोलण्यावरून दिसून येई. वाङ्मयकलेचा आनंद तात्यांनीच खरा भोगला. वाङ्मयानंदाच्या सविकल्प समाधीत गुंगून गेलेले तात्या हे एक स्थितप्रज्ञ योगीच होते.

❋

सौ. मालतीबाई पेंडसे

(प्रा. पेंडसे यांचें कुटुंब, कै. धोंडोपंत विद्वांस यांची कन्या, नागपूर)

(१) तीं. तात्या कोठेंहि परगांवीं गेले म्हणजे तेथील ऋणानुबंधी व आप्त मंडळींना अगत्यानें भेटल्याशिवाय राहत नसत. अशा मंडळींची ते एक यादीच तयार करोत व वेळांत वेळ काढून त्यांना भेट देत. सकाळचा व दुपारचा ठरलेला भेटींचा कार्यक्रम नियमित वेळीं पार पडावा असा त्यांचा कटाक्ष असे. गेल्या १५-२० वर्षांत. नागपुरास ते दोनदां आले. पहिल्या खेपेला ते कै. दादासाहेब ओगले यांजकडे शहरांत उतरले होते. तेथून ठरल्याप्रमाणें अगदीं सकाळींच प्रथमतः ते आमच्याकडे आले. आल्याबरोबर थेट स्वयंपाकघरांपर्यंत जाऊन त्यांनीं आम्हांस कुशल प्रश्न विचारले; पण चहाला थोडा वेळ आहे असें पाहतांच ते म्हणाले, " हें पाहा; चहाकरितां थांबलों तर सकाळच्या भेटीचे सर्व कार्यक्रम कसे बरें आटोपतील ! " म्हणून त्यांनीं लगेच बरोबरच्या मंडळींसह खाद्यपदार्थ थोडेथोडे मागून घेतले व पुढील ठरलेल्या ठिकाणीं भेटीकरितां ते निघून गेले. किती हें अगत्य व प्रेमळपणा !

(२) अगदीं अलीकडे राजाराम वाचनालयाच्या हीरक महोत्सवाकरितां ते आले. त्या वेळीं त्यांनीं आठवणीनें यादी करून सर्व ऋणानुबंधी व आप्त लोकांच्या आस्थेनें व स्वस्थतेनें भेटी घेतल्या व कोठल्याहि लहानमोठ्या संस्थेचें निमंत्रण

नाकारलें नाहीं. वेळांत वेळ काढून सर्व संस्थांना त्यांनीं भेटी दिल्या व प्रत्येक ठिकाणीं थोडथोडीं भाषणें केलीं. आपण पुनः नागपूरला येणार नाहीं हें त्यांना जणुं काय कळलेंच होतें!!

❋

चिं. द्वा. देशमुख

(सी. आय. ई., गव्हर्नर, रिझर्व्ह बँक, मुंबई)

नोकरशाहीच्या घटकांचा राजकारण किंवा साहित्य या क्षेत्रांशीं फारच थोडा संबंध असतो. त्यांत माझी लोकसेवा जवळजवळ वीस वर्षें दुसऱ्या प्रांतांत झाल्यामुळें, तात्यासाहेब केळकरांशीं ओळख होण्याची सुवर्णसंधि बऱ्याच उशीरा लाभली. प्रत्यक्ष भेट घडण्यापूर्वी त्यांच्या साहित्यसेवेची, भाषाप्रभुत्वाची व राजकारणाशिवाय आस्थेची ढोबळ माहिती होतीच. ती कोणा महाराष्ट्रियाला नसावी! व अशा प्रभावी व्यक्तीशीं परिचय असावा अशी बऱ्याच दिवसांपासून माझी उत्कंठाहि होती. शेवटीं प्रत्यक्ष योग बृहन्महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजच्या नामकरणविधीच्या निमित्तानें पुण्यास गेलों तेव्हां आला. ती माझी पुण्याची भेट पुणेकरांच्या आपुलकीच्या स्वागतामुळें स्मृतिपटलावर सुवर्णाक्षरांनीं नोंदली गेली आहे, व त्या वेळेचा एक डोळ्यांत भरण्यासारखा भाग म्हणजे साहित्यसम्राटांचा अपूर्व परिचय. त्या एकदोन दिवसांच्या धामधुमींत परिचय घट्ट झाला किंवा व्यक्तिगत संभाषण विशेष झालें असें म्हणणें अतिशयोक्ति होईल, पण ओळख झाली ती पुसट असूनहि परिणामकारक. प्रथमदर्शनींच आजपर्यंत ऐकलेलें वर्णन खरें असा प्रत्यय आला. त्यांची भव्य शरीरयष्टि, सोज्ज्वल मुद्रा, विद्वत्तेचें सात्विक तेज या सर्व गोष्टींची पहिल्या दृष्टिक्षेपांतच जाणीव झाली. थोड्या प्रासंगिक बोलण्यावरून त्यांच्या सौजन्याची, विनोदी वृत्तीची व विचारशील बुद्धीची प्रतीती आली. मनांत विचार आला कीं, पुण्याला माझ्या मधूनमधून खेपा होतातच; त्यांत केळकरांच्या भेटीचा पुनःपुनः योग येऊन ओळख वाढविता येईल, तर मोठा लाभ होईल; पण विधिलिखित निराळें होतें. त्यांच्या निधनाचें दुर्वृत्त कळल्यावर सार्वजनिक तोटा झाल्याची जाणीव वैयक्तिक हानीच्या आकलनानें दुणावली. कै. तात्यासाहेब केळकर गेले खरें, पण त्यांच्या लोकोत्तर प्रभावाची छाप महाराष्ट्राच्या साहित्यावर व विचारसरणीवर अजरामर राहील यांत शंका नाहीं.

❋

रा. ना. गद्रे

(एम्. ए., एलएल्. बी., प्राध्यापक, पुणें)

(१) नू. म. वि. हायस्कुलांत १९४३ मध्यें 'शिक्षकसंघ' स्थापण्यांत आला. त्याच वेळीं शि. प्र. मंडळीच्या आजीव-सभासद-मंडळानें शाळेंतील शिक्षकांच्या वेतनाचा विचार करण्यासाठीं एक समिति नेमली होती. या समितीनें तयार केलेल्या अहवालाची प्रत शि. प्र. मंडळीच्या 'नियामक मंडळा' नें त्यावर मान्यतेचा शिक्कामोर्तब करण्यापूर्वी शिक्षकसंघाच्या सदस्यांस मिळाली तर हवी होती. तात्यासाहेब नियामक मंडळाचे अध्यक्ष. मी शिक्षकसंघाचा ४४–४५ मधील कार्यवाह आणि इतर दोन शिक्षक यांनीं तात्यासाहेबांच्या घराची वाट धरली. त्यांना सर्व गोष्टी निवेदन केल्या आणि सांगितलें कीं, "अहवाल आमच्यासाठीं असल्यामुळें तो अगोदर आम्हांला पाहावयास मिळाल्यास नियमभंग होणार नाहीं. शिवाय एकदा तो नियामक मण्डळानें मान्य केला म्हणजे त्यांत बदल करतां येणार नाहीं." थोडा वेळ विचार करून शान्तपणें त्यांनीं आश्वासन दिलें कीं, "मी स्वतःसाठीं अहवालाची प्रत मागून घेतों आणि तुम्हांस पाहण्यास देतों. शिवाय नियामक मण्डळाच्या येत्या सभेंत अहवालाची चर्चा पूर्ण न करतां पुन्हां एकदां या अहवालावर शिक्षकसंघाचें म्हणणें ऐकून घ्यावें असा ठराव करून घेतों." या आश्वासनानें आम्हांला अतिशय धीर आला. आम्ही निघण्याच्या वेळीं त्यांनीं एक मोलाचा सल्ला दिला. "शाळेच्या उत्पन्नापैकीं जेवढी रक्कम अहवालांत पगारखातीं खर्च व्हावयाची आहे तेवढ्यांत तुम्ही आपले पगार जर सुव्यवस्थित बसवून दाखविलेत तर ते मिळण्याची जिम्मेदारी मी घेतों." हे शब्द ऐकून आम्ही उठलों ते अगदीं आनंदानें. आमचें म्हणणें आंकडेमोडीनें सिद्ध करण्याची गणितागत पद्धति आम्हीं यापूर्वीच थोडीशी अवलंबिली होती. आतां तिचा नेटानें पाठलाग आम्हीं केला, कोष्टकें तयार केलीं व तीं तात्यासाहेबांना नेऊन दाखविलीं. त्यांनीं सर्व गोष्टी समजून घेतल्या आणि 'ठीक, आतां निष्काळजी असा' असें सांगितलें. नियामक मंडळाच्या नंतरच्या सभेंत शिक्षकसंघाचें सर्व म्हणणें मान्य झालें हें सांगावयास नकोच. नियमभंग न करतां व्यावहारिक अडचणींतून कसा मार्ग काढावा यासाठीं प्रसंगोपात्त उपाययोजना सुचविणें यांत तात्यासाहेबांसारखा समयज्ञ विरळा; शिवाय तात्यासाहेब नियामक मंडळाचे अध्यक्ष. शिक्षकांशीं बोलण्याचें, त्यांचें म्हणणें अनेकवार ऐकून घेण्याचें त्यांचें सौजन्य अनुपमेयच !

(२) दुसरा एक प्रसंग. १९४५ सालच्या जून महिन्यांत महाराष्ट्रांत बऱ्याच ठिकाणीं नवीन कॉलेजें निघणार होतीं. नू. म. विद्यालयांत कांहीं शिक्षक कॉलेजांत अध्यापनाचें काम करतील अशा योग्यतेचे होते. त्यांपैकीं एका शिक्षकास अशा नवीन निघणाऱ्या एका कॉलेजांत अध्यापकाची जागा मिळाली. ते शिक्षक 'कायम'

होते. कायम सेवकानें नोकरी सोडण्यासाठीं सहा महिन्यांची पूर्वसूचना नियमाप्रमाणें द्यावयास पाहिजे. शाळेच्या त्या वेळीं असलेल्या मुख्याध्यापकांनीं त्या कॉलेजांत जाणाऱ्या शिक्षकांविषयीं अत्यंत उदार धोरण ठेविलें होतें हें मान्य केलें पाहिजे. तरी पण तीन महिन्यांचा पगार पुरेशी पूर्वसूचना नाहीं म्हणून त्या शिक्षकांस भुर्दंड पडणार होता. त्या शिक्षकाबरोबर मी तात्यासाहेबांकडे गेलों. "शाळेंतील शिक्षक कॉलेजांत प्राध्यापक होतात हा शाळेचा गौरव आहे. शिवाय तीन महिन्यांचा पगार घेऊन संस्थेचा मोठासा आर्थिक फायदा होईलसें नाहीं. परंतु व्यक्तीच्या दृष्टीनें हे पैसे पुष्कळच आहेत. वर्षाच्या अखेरीस हे शिक्षक जात असल्यानें नवीन चांगला शिक्षक शाळेसाठीं मिळणें दुरापास्त नाहीं. संस्थेची गैरसोय न करतां व्यक्तीनें स्वतःचा उत्कर्ष करून घेणें हें न्याय्य होय." हा आमचा मुद्दा तात्यासाहेबांना पटला. "शक्य तें अवश्य करीन, तुम्ही निष्काळजी असा" असें त्यांनीं सांगितलें. साक्षेपानें ही गोष्ट मनांत वागवून तात्यासाहेबांनी आपला मोलाचा शब्द वेचला. कारण त्या शिक्षकांची प्राव्हिडंट फंडाची सर्व रक्कम त्यांना मिळाली. तीन महिन्यांच्या पगाराइतकें द्रव्य त्यांतून कमी केलेलें नव्हतें. "नियमाला सुद्धां केव्हां केव्हां मुरड घालावी लागते; कारण नियम माणसाची सोय पाहण्यासाठीं असतात" असें ते म्हणत!



गोविंद नरहर पंढरपुरे

(शास्त्री, आचार्यकुल, पुणें)

तात्यासाहेब केळकर यांचा व माझा परिचय गीतारहस्य व शंकराचार्य यांचें तत्त्वज्ञान यासंबंधींच्या संवादामुळें झाला. मी राहणारा चिंचवडचा; दर संकष्टीला चिंचवडला मी जाणारा. जातांना कोणी तरी प्रख्यात व्यक्तीला बरोबर नेऊन तेथील लोकांना कांहीं तरी पारमार्थिक विचार मी ऐकवीत असे. एकदां अशीच विनंती तात्यासाहेबांना मीं केली. त्यांनीं मला होकारहि दिला. ऐन वेळेला मोटार घेऊन मी दाराजवळ गेलों; पण तात्यांना मलेरियाचा ताप आला होता. ताप १०२ अंशांवर होता. तें पाहून मीं म्हटलें, "तात्यासाहेब, राहूं द्या, आज नको, पुनः केव्हां तरी मी आपल्याला घेऊन जाईन." तात्या म्हणाले, "नाहीं, मी आज येणारच. हें पाहा, येथें बसून मी बायकांमुलांसमोर कण्हत बसणार. पण तेथें आलों तर निदान देवासमोर तरी कण्हत बसेन व त्यामुळें मला बरें वाटेल." इतक्या वृद्धापकाळीं या त्यांच्या आत्मविश्वासाचा माझ्यां तरुण मनावर विलक्षण परिणाम झाला व तो या क्षणापर्यंत जशाचा तसाच कायम आहे.



द. वि. परांजपे

(निवृत्त सरकारी नोकर, पुणें)

(१) सुमारे ४०-५० वर्षांपूर्वीची गोष्ट. पुणें शहरांत प्लेगचा कहर उसळला होता. माझे वडील बन्धु प्लेगच्या आजारांतून बचावले होते; परंतु रुग्णशय्येवरच होते. आमच्या कुटुंबाची पारिस्थिति त्या वेळीं अत्यन्त बिकट होती. गांठीला पैसा नव्हता आणि पैशाविना बंधूंची नीट शुश्रूषा होणार नव्हती. घरांत वडील बन्धू-खेरीज मिळवणार कोणीच नव्हते. मातुःश्री व आम्ही सर्व लहान रोपांटोपी पोरं. वडिलांच्या हयातींत अभिमानानें दिवस काढल्यामुळें कोणापुढें तोंड वेंगाडायची सवय नाहीं; पण प्रसंगामुळें हात पसरायचा म्हटलें, तरी कोणापुढें ! अशा स्थितींत मी व मातुःश्री पुण्याच्या त्या वेळच्या निर्जन रस्त्यांतून कोठें शिरावें म्हणून विचार करीत शून्य हवेल्यांकडे पाहत हिंडत होतों. पहतां पाहातां टकल्याच्या हवेली-पाशीं आलों. चौकांत कोपऱ्यावर गोळ्यांचा वाडा आहे. आम्ही सहज वर बघितलें तोंच वरील खिडकींतून एका व्यक्तीनें बाहेर डोकावलें. त्याच वेळीं आमच्या पुढून जाणाऱ्या दोघां इसमांपैकीं एकानें त्या व्यक्तीकडे अंगुलीनिर्देश करून दुसऱ्यास म्हटलें, ' बघितलेस ते एन्. सी. केळकर. ' ते लोक पुढें गेले व ती बाहेर डोकावणारी व्यक्तीहि खोलींत गेली; पण रस्त्यावरून जाणाऱ्या त्या माणसाच्या मुद्रेवर अंगुलीनिर्देश करीत असतांना जो भाव उमटला होता, त्यानें मात्र माझ्या मनाची पकड घेतली. ' एन्. सी. केळकर ' काय अगर दुसरा कोणी काय ! नांवांत त्या वेळीं जादू वाटली नाहीं. नांवाचें महत्त्व त्या वेळीं फक्त एकाच व्यक्तीसंबंधीं माझ्या मनांत जाणवत होतें आणि ती व्यक्ति म्हणजे ' लो. टिळक '; परंतु अंगुलीनिर्देश, चेहेऱ्यावरील भाव आणि नामोच्चार या त्रयीमुळें माझ्या मनाचें आकर्षण इतकें झालें कीं, मीं झपाझप जिना चढून त्यांच्या खोलीचें दार उघडलें !

खोलींत प्रवेश करतांच पाहतों तों पुस्तकांनीं खोली खेंचून भरली होती आणि एका वेताच्या खुर्चीवर बसलेले ' एन्. सी. केळकर ' वाचनांत अगदीं गढून गेले होते. धसमुसळ्यासारखा आंत येणाऱ्याची म्हणजे माझी चाहूल त्यांना लगेच लागली व माझ्याकडे पाहत (मातुःश्री बाहेरच उभ्या होत्या.) ते म्हणाले, ' कोण पाहिजे ! ' मीं म्हटलें, 'आपणच'. तात्यासाहेब उद्गारले, ' माझ्याशीं काय काम आहे ! ' तोंड वेंगाडणें जिवावर आल्यामुळें थोडा वेळ मी कांहींच बोललों नाहीं. यावर ते पुनः म्हणाले, ' तुम्हांला काय पाहिजे ! ' ' पंधरा रुपये ! ' मीं ताडकन् उत्तर केलें.

" काय ! पंधरा रुपये ! " अर्थातच तात्यासाहेब आश्चर्यानें उद्गारले. कारण एक अगदीं अनोळखी इसम असा तडकाफडकी दार उघडून खोलींत येतो काय

आणखी पंधरा रुपये मागतो काय! आतां बरीक मातुःश्री पुढें झाल्या आणि तात्यासाहेबांस त्यांनीं एकंदर हकीकत सांगितली आणि म्हटलें, 'पंधरा रुपये आम्हांला उसनवार पाहिजे आहेत. चार-सहा महिन्यांत हातीं येतांच परत करूं.' यावर चटकन् उठून तात्यासाहेबांनीं रुपये काढले व मातुःश्रींच्या हातावर ठेवून म्हटलें, "तुमचा मुलगा आधीं चांगला बरा होऊं दे; मग सावकाश परत करा पैसे." पुढें, चार-सहा महिन्यांचीच गोष्ट. बंधु पूर्ण बरे होतांच आमच्याकडे सत्यनारायणाचें व्रत झालें व तात्यासाहेबांस तीर्थप्रसादास बोलावलें. त्याप्रमाणें ते अगत्यानें आले. तीर्थप्रसादानंतर मातुःश्रींनीं मजकडून तात्यासाहेबांस त्यांजकडून उसनवार घेतलेले रुपये परत करविले. विडा प्रसाद वगैरे घेऊन इतर मंडळी सर्व गेली, तरी तात्यासाहेब बसूनच होते. पण थोड्या वेळानें ते उठून निरोप घेण्यासाठीं म्हणून मातुःश्रीकडे येऊन म्हणाले, "काकू, मजकडून उसने घेतलेले पैसे तुम्हीं परत केलेत हें ठीकच झालें. मीहि ते घेऊन भरून पावलों. आणखी तुम्ही ऋणमुक्त झालांत. आतां माझी पाळी! मी आपल्याला तुमच्याचपैकीं एक समजून या सत्यनारायणाच्या खर्चाचा सामायिक वांटा म्हणून हे पैसे परत देतों. तुमच्याचपैकीं मी झाल्यानें उपकार होत नाहीं. तुमच्या मनांत ऋणी असल्याची जाणीव राहिली नाहीं व माझ्या मनांत उपकाराची भावनाहि उरली नाहीं!"

वरील आठवणींत तात्यासाहेबांच्या अंगच्या अनेक गुणांबरोबरच त्यांच्या स्वभावसहज तडजोड-प्रवृत्तीचीहि प्रचीति येते!

(२) आमची परिस्थिति किंचित् सुधारली तरी बेताचीच. तात्यासाहेबांशीं थोडा अधिक परिचय वाढल्यामुळें व त्यांचें वजन त्या वेळीं बऱ्याचशा संस्थांतून वाढल्यामुळें मीं त्यांच्यामागें नोकरीचा लकडा चालू केला. बरेच दिवस कुठेंच जमेना. शेवटीं मीं एक दिवस म्हटलें, "इतर ठिकाणचें सोडून द्या; पण केसरी ऑफिसमध्यें एखादी जागा मला तुम्हांला खास देतां येण्यासारखी आहे!" 'केसरी'चें नांव काढतांच त्यांनीं मजकडे अशा कांहीं चमत्कारिक नजरेनें बघितलें कीं, वरील विनंतीस प्रेरणा देणारी माझ्या अंतरंगांतील भावना जणूं कांहीं ते आपल्या दृष्टींतील किरणांनीं बाहेर ओढीत असावेत. ती त्यांनीं बाहेर काढलीच याविषयीं शंका नाहीं. ती म्हणजे लेखक होण्याची जबर आकांक्षा. माझ्या वरील विनंतीस उत्तर म्हणून जें त्यांनीं दिलें तें मासलेवाईक होतें. ते म्हणाले, "हें पहा, केसरी ऑफिसांत किंवा दुसरीकडेहि कुठें तूर्त जमणार नाहीं. पण माझ्या घरांत बरीक तुला एखादी जागा देणं माझ्या हातांत खास आहे. असं कर; उद्यांपासूनच कामावर रुजू हो कसा." मी साहजिकच गोंधळून गेलों. त्यावर ते थोडें हंसून म्हणाले, "अरे, घरांत म्हणजे मंडईतून भाजी आण, पंचा नेसून आणखी खांद्या-

वर फडकें टाकून पाटपाणी कर अशी एखादी शागीर्दाची जागा तुला नाहीं देत. लेखकाची नसली तरी मानाची आहे. आमच्या मुलांना उद्यांपासून शिकवीत जा. सध्यां ही शिक्षकाची नोकरी पत्कर. बाहेरच्या नोकरीचें पुढें पाहूं !"

(३) पण माझ्या मनांत त्या वेळीं लेखक म्हणून मिरवण्याची जी जबर हौस होती व जी तात्यासाहेबांनीं थोडीशी पुरवली त्यासंबंधीं पुढील चार ओळी लिहिल्याशिवाय ही आठवण पुरी होणार नाहीं.

मी माझें लिखाण उठल्या सुटल्या तात्यासाहेबांना वाचून दाखवीत असें. मीचसा काय, पण कै. गडकऱ्यासारखे कांहीं अभिजात लेखकहि आपल्या लिखाणाच्या गुंडाळ्या हातांत घेऊन तात्यासाहेबांना त्यांतील भाग वाचून दाखवावा, म्हणून त्यांच्याकडे हेलपाटे घालतांना मी नित्य बघत असें. एक दिवस मी असाच एक लेख घेऊन तात्यासाहेबांकडे गेलों. वाचून दाखवूं का ? म्हणून हळूंच थोड्या आडपडद्यानें मी सूचित करणार तोंच ते म्हणाले, 'हे पाहा, आतां किनई कंटाळा आला आहे. दे ठेवून. मीच वाचीन.' चार दिवसांनीं मी पुनः गेलोंच. मला कुठला दम निघायला ? थोडा वेळ इकडे तिकडे करून मीं म्हटलें, "वाचलांत का लेख ?". "वाचला. अरे, मी एकट्यानेंच काय ? उद्यां हजारोजण तुझा लेख वाचतील. मात्र जितक्या लोकांनीं तुझा लेख वाचला असेल तितके दिवस तूं माझ्यावर आपल्या लिखाणाचें वाचन लादूं नको !" असें ते म्हणाले.

दुसऱ्या दिवशीं खरोखरच तसें घडून आलें. कारण तो लेख 'डॉ. सन्यत्सेन' त्या दिवशीच्या 'केसरी'त छापून आला होता. त्यानंतर माझे चार-दोन लेख 'चीन'संबंधीं केसरींत आले. पुढें ज्या कांहीं सात-आठ कादंबऱ्या मीं लिहिल्या त्याहि तात्यासाहेबांच्या घरांतील वाङ्मयीन वातावरणांत वावरत असल्यामुळेंच लिहिल्या गेल्या यांत शंका नाहीं.



काकासाहेब ओंकार

(इनामदार, पुणें)

(१) सन १९२९ सालांतील गोष्ट. मी तात्यासाहेबांकडे जुन्नर येथील श्री. रघुनाथराव जोशी वकील यांना मजबद्दल परिचय-पत्र द्यावें. अशी विनंती करण्यास केसरी ऑफिसमध्यें गेलों होतों.

माझ्या कामाबद्दल आमचें कांहीं बोलणें चाललें असतांना परगांवचे दोन गृहस्थ तात्यासाहेबांकडे आले. ते तात्यासाहेबांच्या विशेष परिचयाचे असावेत असें त्यांच्यामध्यें चाललेल्या संभाषणावरून दिसून येत होतें.

बरींच बोलणीं झाल्यावर त्यांतील एक गृहस्थ दुसऱ्या गृहस्थाकडे नजर टाकून तात्यासाहेबांना म्हणाला, "तात्यासाहेब, या माणसास मी अनेक वेळां पैशाची मदत करीत आलों आहें. परंतु मला जर एखाद वेळीं नड पडली तर हा मात्र बिलकूल मदत करीत नाहीं. याला काय माणुसकी म्हणावी!" यावर तात्यासाहेब सस्मित चेहरा करून म्हणाले – "तुम्ही त्यांना अनेक वेळां पैशाची मदत करीत आलांत व ते फेडीत आले. असंचा ना? कां त्यांनीं त्यांतले कांहीं बुडविले?" ते गृहस्थ म्हणाले – "छे हो! तसें मी कसें म्हणेन? माझी पै न् पै त्यांनीं परत केली आहे. त्याबद्दल माझी तक्रार नाहीं. माझी तक्रार आहे ती येवढीच कीं त्याला जरूर लागते तशी मलाहि लागते. परंतु मीं रक्कम मागितली की– जवळ पैसे असतांनाहि – कांहीं तरी सबब सांगून हा रक्कम देण्याचें टाळतो, याबद्दल माझी तक्रार आहे." यावर तात्यासाहेब म्हणाले, याचें उत्तर अगदीं सरळ आहे. तुम्ही त्याला पैसे देत आलांत व ते तो बिनचूक फेडीत आला. याचा अर्थ असा होतो कीं, तुमचा त्याच्यावर पूर्ण विश्वास आहे व त्या विश्वासास तो पात्र असल्याचें तो सिद्ध करीत आला; तुमचा विश्वास गैरवाजवी ठरूं दिला नाहीं. तुमची पारख खरी ठरली. हा तुमचा विजय नव्हे कां?

आतां तो तुमच्या उपयोगी पडत नाहीं याचें कारण त्याला तुमचा तितका विश्वास वाटत नसावा. तुम्ही विश्वासास पात्र असल्याचें त्याला पटवून दिलें की तुमची तक्रार दूर होईल. खरं ना!"

तात्यासाहेबांच्या या विनोदी व मार्मिक विवेचनानें आम्ही सर्वचजण हसूं लागलों!

(२) तात्यासाहेबांच्या वयास ६१ वें वर्ष लागलें म्हणून १९३२ सालीं पुणें म्युनिसिपालिटीनें त्यांचा सत्कार केला. त्या प्रसंगीं मि. बेग या मुसलमान गृहस्थानें हिंदुबद्दल आस्थेवाईक विवेचन करून तात्यासाहेबांबद्दल धन्योद्गार काढले. यावर तात्यासाहेबांनीं भाषण केलें. मि. बेगच्या भाषणास अनुसरून ते म्हणाले, "मि. बेगसारखीं समजूतदार माणसें मुसलमान समाजांत जर असतील तर वादच कुठें राहणार? आम्हांला चीड येते ती एवढीच कीं, आमच्या देवावर व आमच्या बायकांवर हे लोक हात टाकतात. आमच्या लोकांचें कपटानें धर्मांतर करतात. असल्या गोष्टी त्यांनीं सोडल्या कीं, आम्ही आणि ते सख्या भावासारखें वागूंच वागूं!"

मनुष्याच्या स्वास्थ्यास विघातक असलेल्या गोष्टींस आळा घालण्याकरितां शासनपद्धति निर्माण करण्यांत आलेली आहे असें तात्यासाहेब म्हणत. शासनपद्धतीचा उपयोग न करतां उपदेशाचें नुसतें अवडंबर माजविल्यानें काय अनर्थपरंपरा ओढवते याचें प्रत्यंतर हल्लींचा काळ देत नाहीं काय?

(३) सन १९२५ सालामधील प्रसंग. कीर्तनालंकृति कुमारी शांताबाई ओंकार वयाच्या बाराव्या वर्षी याच सालांतील एप्रिल महिन्यांत दिवंगत झाली. तिच्याबद्दल तात्यासाहेबांना फारच कौतुक वाटत असे. तिच्या मृत्यूनंतर ३–४ महिन्यांतच तिच्या मावशीनें तिचें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें. त्या पुस्तकाची एक प्रत मीं सिमल्यास तात्यासाहेबांच्याकडे अवलोकनार्थ पाठविली. ते त्या वेळीं असेंब्लीच्या कामांत गढून गेले होते, तरी त्यांनीं तें पुस्तक वाचून लगेच त्यावर विस्तृत अभिप्राय व मला सांत्वनपर पत्र पाठविलें. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं, "इतक्या लहान वयांत पुस्तकरूपानें चरित्र लिहिलें जाण्याचें जिच्या भाग्यांत होतें अशी ही बहुधा पहिलीच मुलगी असावी. मुलीच्या गुणाबरोबर तिला मिळालेल्या जवळच्या आस्थेवाईक आप्तांबद्दलहि अभिनंदन करणें जरूर आहे." माझ्यासारख्या सामान्य माणसाशींदेखील ते किती आपुलकीनें वागत, किती समरस होत, याचें हें उदाहरण होय. कितीहि दुःखीकष्टी मनुष्य त्यांच्याकडे जावो ते आपल्या अमोल विचारसरणीनें, पौराणिक व ऐतिहासिक दाखल्यानें त्याचें दुःख त्याला सह्य होईल असें वागत. पुढें ते स्वतः मजकडे समाचारास आले; त्या वेळीं ओघाओघानें ते म्हणाले, "मला मुळींच दुःख देऊं नकोस असें ईश्वराजवळ मागणें केव्हांहि वाजवी होणार नाहीं. मागणेंच झाल्यास जीं दुःखें माझ्या वाट्यास आलीं असतील तीं मजघर येऊं देत; परंतु तीं मला सहन करण्यास, त्यांच्याशीं झुंजण्यास मला धैर्य व सामर्थ्य दे, अशी मागणी त्याच्याजवळ करणेंच योग्य होईल."



श्री. कृ. बेलवलकर

(एम्. ए., पीएच्. डी., प्रोफेसर, पुणें)

(१) डेक्कन कॉलेजचे एक माजी ख्यातनाम विद्यार्थी म्हणून कॉलेजच्या वार्षिक संमलनाचें निमंत्रण श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्याकडे प्रतिवर्षी न चुकतां जाई, व तेहि वेळांत वेळ काढून दोन प्रहरच्या सहभोजनाला, निदान तिसऱ्या प्रहरच्या 'ॲड्रेसला' तरी उपस्थित होत असत. एकदां – बहुधा १९०३ साल असावें – मी तात्यासाहेबांच्या समोरच्या पंक्तींतच भोजनास बसलों होतों. त्या वेळीं पाहिलेली व अजूनहि लक्षांत राहिलेली विशेष गोष्ट म्हणजे पानांत कांहींहि न टाकण्याचा त्यांचा नियम. प्रस्तुत प्रसंगीं तात्यासाहेबांनीं संमेलनांतील भोजनावळीचा अपवाद म्हणून उल्लेखण्याइतकें आपलें पान निर्मळ केलें होतें. एका कोंपऱ्यांत थोडें मीठ राहिलें होतें, पण दोनतीनदां बोटानें त्याची चव घेऊन व वर पाणी पिऊन तेंहि त्यांनीं फुकट घालविलें नाहीं !

(२) त्यानंतर कांहीं वर्षांनीं संमेलनप्रसंगीं विद्यार्थ्यांनीं "तोतयाचें बंड" या तात्यासाहेबांनीं रचिलेल्या ऐतिहासिक नाटकाचाच प्रयोग करून दाखविण्याचें ठरविलें, व तात्यासाहेबांनीं विद्यार्थ्यांच्या विनंतीस मान देऊन प्रयोग पाहावयास येण्याचें कबूल केलें व तो प्रयोग शेवटपर्यंत त्यांनीं पाहिला. त्या वेळीं मी कॉलेजच्या 'स्टाफ' मध्येंच असल्यानें माझी खुर्ची तात्यासाहेबांच्या जवळच होती, व माझे मित्र प्रोफेसर आर. डी. रानडे हेहि जवळच होते. रानड्यांनीं नाटकाचें पुस्तक वाचलें नव्हतें, म्हणून प्रवेश संपतांच पुढचा प्रवेश काय आहे व त्यांत काय होणार आहे याची ते माहिती विचारीत. त्या वेळीं मीं तात्यासाहेबांना म्हटलें, "तुमच्या नाटकास जसा हवा तसा प्रेक्षक मिळाला आहे. हे माझे मित्र नाटकाच्या संविधानकाशीं पूर्णपणें अपरिचित आहेत व उतावीळपणें आगामी प्रवेशाची माहिती विचारीत आहेत, यावरून त्यांना खेळ आवडलासें दिसतें". तात्यासाहेब उत्तरले, "कृपा करून त्यांना आगाऊ माहिती मुळींच पुरवूं नका, आणि खेळ संपल्यावर त्यांचें जें मत बनेल तें मला सांगा." पण माझ्या मित्राच्या टोंचणीमुळें मला तसें करतां आलें नाहीं. या वेळीं नाटकाचा मध्यबिंदु – तिसऱ्या अंकांतील पोवाड्याचा प्रवेश – सुरू होता, व तो आमच्या विद्यार्थ्यांनीं इतका कांहीं रंगविला कीं, तात्यासाहेब स्वतः म्हणाले, "हा प्रवेश धंदेवाईक कंपन्यांच्या खेळांतहि इतका रंगलेला मीं आजवर पाहिला नाहीं."

(३) शेवटच्या २-३ युरोपियन प्रिन्सिपॉलांच्या अमदानींत डेक्कन कॉलेजला शिक्षणसंस्थांत तत्पूर्वी असलेलें मानाचें स्थान कमी कमी होऊं लागलें होतें. भारी पगाराच्या अध्यापकांच्या केंद्रीकरणामुळें खर्चाचें प्रमाण वाढलें व विद्यार्थ्यांची संख्या घटूं लागली. त्या वेळीं, एक तोडगा म्हणून, पहिल्या वर्षाच्या सायन्सचा क्लास कॉलेजांत अुघडण्याचें ठरलें. त्याकरितां लागणाऱ्या जादा खर्चाच्या मंजुरीस कायदेकौन्सिलांत विरोध होण्याचा संभव असल्यामुळें त्याबाबत नरसिंह चिंतामण केळकर यांच्याशीं रदबदली करण्याचें काम प्रिन्सिपालनीं मला सांगितलें. हें दौत्य अनिवार्य म्हणून मीं स्वीकारिलें, व तात्यासाहेबांस सदाशिव पेठेंतील त्यांच्या घरीं जाऊन भेटलों. भेटीचें कारण कळतांच तात्यासाहेब एकदम उसळून म्हणाले, "आम्हीं कशासाठीं, कां म्हणून, डेक्कन कॉलेजचा पक्ष उचलून धरावा? आमच्या पक्षाला हितकर राहीलच, पण रुचेल असें तरी डेक्कन कॉलेजनें आजवर काय केलें आहे कीं आम्हीं त्याची कड घेऊन लिहावें?" या स्पष्ट प्रश्नास मला अर्थात् उत्तर देतां आलें नाहीं. तथापि, कॉलेजच्या पूर्वेतिहासाकडे लक्ष देऊन, सायन्स क्लासच्या खर्चाच्या मागणीस, ती मंजूर होतच असेल, तर आम्ही विरोध करणार नाहीं एवढेंच मोठ्या मिनतवारीनें तात्यासाहेबांनीं मान्य केलें, व माजी विद्यार्थी या नात्यानें डेक्कन कॉलेजचें असलेलें ऋण फेडलें.

(४) पण दुसऱ्या एका माजी विद्यार्थ्यानें – त्याचा नामनिर्देश करावयासच पाहिजे असें नाहीं – हातीं थोडी सत्ता येतांच डेक्कन कॉलेज विकून टाकून त्याचें नांवहि उरूं नये, यासाठीं भगीरथ प्रयत्न केलेले सर्वांस ठाऊक आहेतच. त्या बाबत माजी विद्यार्थि-संघानें केलेल्या कामगिरीचा उल्लेख येथें येवढ्यासाठीं करावयाचा कीं, फिर्यादीचें काम डिस्ट्रिक्ट कोर्टांत चालू असतां, श्री. केळकर ती चर्चा ऐकण्यास मुद्दाम एके दिवशीं आले. त्या वेळीं कोर्टापुढें माझी उलटतपासणी चालू होती. मध्येंच एक कायद्याचा मुद्दा उपस्थित केला गेल्यानें उलटतपासणी ५।७ मिनिटें स्थगित करावी लागली, व डिस्ट्रिक्ट जज्ज नानावटी यांनीं सौजन्यानें साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत उभे न राहतां खालीं खुर्चीवर बसण्याची मला परवानगी दिली. मी तात्यासाहेबांशेजारींच बसलों. त्या वेळीं ते मला हळूंच म्हणाले, " या खटल्यांत तुम्हांस यश मिळावें व डेक्कन कॉलेज नामशेष होऊं नये असें मला मनापासून वाटतें; कारण कॉलेजची यापुढची व्यवस्था तुमच्या माजी विद्यार्थि-संघाकडे आल्यास त्याचा भविष्यकाळ भूतकाळाइतकाच ऊर्जित होणें अशक्य नाहीं. "

(५) डेक्कन कॉलेजानंतर ज्या एका पुण्यांतील संस्थेशीं माझा अगदीं आरंभापासून संबंध आला त्या भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिटयूटशीं श्री. तात्यासाहेब केळकर यांचाहि जवळजवळ आरंभापासून संबंध होता. ही संस्था स्थापन करण्याचा उपक्रम डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या ७८ व्या वाढदिवशीं (६ जुलै. १९१५) आनंदाश्रमांत एक जाहीर सभा बोलावून केला गेला. त्या सभेस तात्यासाहेब उपस्थित नसले तरी त्या वेळीं नेमल्या गेलेल्या कार्यकारणीचे श्री. तात्यासाहेब हे एक सदस्य होते. पुढील १२ महिन्यांत संस्थेकरितां स्वतःची वास्तु विकत घेऊन कांहीं विवक्षित मागण्या मुंबई सरकाराकडे मागण्याकरितां डेप्युटेशन नेण्यापर्यंत मजल आली. हें डेप्युटेशन ५ जुलै १९१६ रोजीं त्यावेळचे मुंबई प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांस भेटलें. या डेप्युटेशनमध्येंहि केळकरांचा समावेश करण्यांत आला होता. डेप्युटेशनकरितां कौन्सिल हॉलमध्यें आल्याबरोबर केळकरांनीं तेथील व्हिजिटर्स बुकांत सही करून येण्याचा उद्देशहि लिहिला. तें पाहून आमच्यापैकीं कांहींनीं तात्यासाहेबांचेंच अनुकरण केलें. असें करण्याचें कारण विचारतां तात्यासाहेब म्हणाले, " आमच्यासारख्यांना गव्हर्नराच्या भेटीस जाण्याचा प्रसंग आला असतां, त्याच्या हेतूबद्दल इतरांना तर्कवितर्क करण्याची संधि न देतां, आपणच स्वदस्तुरचें स्पष्टीकरण करणें बरें नव्हे काय ? " या वेळीं अर्थात् लोकमान्य हयात होते.

(६) कारणपरत्वें तात्यासाहेब अनेक वेळां माझ्या घरीं आले आहेत, व मीहि त्यांच्या घरीं गेलो आहें. अगदीं प्रथम त्यांचा मजकडे येण्याचा प्रसंग अजूनहि

मला आठवतो. त्या वेळीं मी नारायण पेठेंतील देशमुखांच्या वाड्यांत राहत असे. पुढील दार ओढून घेतलेलें असल्यामुळें रस्त्यावरूनच त्यांनीं मला हांक मारिली. मी माडीवरून खालीं येऊन त्यांना सामोरा गेलों व आम्ही दोघेहि माडीवर गेलों. जिन्यावर प्रथम त्यांनीं जावें म्हणून मी दारांतच थबकलों. त्या वेळीं ते म्हणाले, "अहो, पौर्वात्य पद्धत म्हणजे घरच्या यजमानानें पुढें होऊन पाहुण्यास वाट दाखवावयाची. ही तुमची पाश्चात्य पद्धत झाली. पण तीं ठाऊक नसणाऱ्या एखाद्याला वाटावयाचें, हे मागें कां थबकले; त्यांना कांहीं संशय वगैरे आला कीं काय ? म्हणून तोहि थबकून रहावयाचा !"

(७) महाभारताच्या चिकित्सक आवृत्तीसंबंधानें तात्यासाहेबांची शेवटची कामगिरी म्हणजे गेल्या ऋषिपंचमीस (ता. १९ सप्टेंबर १९४७) भीष्मपर्व-प्रकाशनाचा जो समारंभ झाला त्या वेळीं नियोजित अध्यक्ष आयत्या वेळीं न आल्यानें – अवघ्या २ दिवसांचीच पूर्वसूचना असतांनाहि – तात्यासाहेबांनीं स्वीकारिलेलें अध्यक्षस्थान, व 'कौटिलीयाचें अर्थशास्त्र' या विषयावर त्यांनीं केलेलें अध्यक्षीय प्रवचन. तात्यासाहेबांनीं या प्रसंगीं प्रकट केलेले या विषयावरील विचार एखाद्या चिकित्सक संशोधकास शोभेसे होते. तें समग्र भाषण भांडारकर इन्स्टिट्यूटच्या २८ व्या वर्षाच्या 'ॲनल्स' मध्यें (पृष्ठें १२८–१३०) प्रसिद्ध झालें आहे. समारंभ सुरू व्हावयाच्या पूर्वी, तयार झालेली भीष्मपर्वाची आवृत्ति मीं त्यांच्या हातीं दिली. ती चाळून पाहून व शेवटीं Critical Notes दिलेल्या पाहून त्यांना बरें वाटलें; तरी पण, 'आतां: हें सर्व केव्हां वाचावयाचें' असें म्हटल्यासारखा भाव त्यांच्या चर्येवर प्रकट झाल्यासारखें मला वाटलें. भीष्मपर्वाच्या संपादकीय जबाबदारींतून मुक्त होतांच त्याहून मोठें अधिक जबाबदारीचें शांतिपर्वाच्या संपादनाचें काम मीं अंगावर घेतल्याचें समजून त्यांना फार समाधान झालें, व जणूं कांहीं पहिलें जबाबदारीचें काम पूर्ण पाडल्याबद्दलचें हें मला बक्षीसच दिलें जात आहे असें त्यांनीं त्याला स्वरूप दिलें. हें नंतरचें काम तात्यासाहेबांच्या अपेक्षेपेक्षांहि अगोदर संपविण्याचा मीं त्याच वेळीं मनानें निश्चयहि केला. पण आतां तो निश्चय तडीस गेला तरी त्याचें चोज करणारे तात्यासाहेब त्या वेळीं कोठें असणार !

(८) केळकर यांच्या ३०–४० वर्षांच्या परिचयांतील जे थोडे प्रसंग, स्मरणशक्तीस विशेष ताण न देतां, मला आठवले ते वर नमूद केलेच आहेत. या आठवणींच्या शोधार्थ गतकालांत वावरत असतां तेवढ्यापुरता तात्यासाहेबांशीं साक्षात् सहवास मी अनुभवीत आहें असा सुखकर आभास निर्माण झाला; पण हें सुख आतां शोकपर्यवसायीच ठरणारें असल्यानें आणखी एकच आठवण देऊन मी आटोपतें घेतों. तात्यासाहेबांनीं मला 'सह्याद्री' करितां श्रीशंकराचार्यांच्या कालासंबंधीं अेक लेख लिहावयास सांगितलें. लेख पुरा होतांच

तो 'पुष्करिणी'त जाऊन त्यांच्या हवालीं केला व चार शब्द बोलून मी जावयास उठलों असतां ते म्हणाले, "थांबा; घाई नाहीं ना? मोक्ष व जीवन-मुक्ति याबद्दल तुमचें काय मत आहे?" तात्यासाहेबांनीं कांहीं महिन्यांपूर्वी "ऐलथडीचा मोक्ष" या विषयावर टिळक-स्मारक-मंदिरांत एक व्याख्यान दिलें होतें, तें मीं ऐकलें होतें व या विषयासंबंधीं त्यांचीं केवळ बुद्धिप्रामाण्यवादाच्या भूमिकेवरून बनलेलीं मतें मला परिचित होतीं. त्यापलीकडे जावयास ते तयार नव्हते. आत्मनित्यता म्हणजे व्यक्तिनित्यता (permanence of the individual) न मानतां, ज्ञातिनित्यता (permanence of the species) मानण्यास ते तयार होते. अर्थात् अनुरूप पुत्रोत्पत्ति हीच त्यांच्यामतें आत्म-नित्यता. याच भूमिकेवरून पुढें गेल्यास मनुष्याच्या[1] आठवणी, त्यानें मागें ग्रथित करून ठेविलेले विचार – जर मनुष्यानें स्वतः आपल्या हयातींत जें प्रोत्साहनाचें अथवा नवचैतन्य देण्याचें कार्य केलें असेल तेंच कार्य करण्यास ते समर्थ असतील तर – तोहि एक आत्मनित्यतेचा प्रकार म्हणतां येईल. येथपर्यंत मजल घेण्यास तात्यासाहेब राजी होते; पण त्याच्या पुढच्या न्यायप्राप्त पायऱ्या म्हणजे वेदनित्यता,[2] विभूतिवाद व अवतारवाद मी त्यांच्या गळीं उतरवूं शकलों नाहीं. त्यांच्या शेवटच्या कवितेंत आत्मनित्यतेच्या प्रश्नास दुरूनहि स्पर्श केला गेला नाहीं हें या बाबतींत विशेष सूचक आहे. वरच्या (theoretical) भूमिकेहून थोड्याशा खालच्या (practical) भूमिकेवर आल्यास, समत्वस्वरूप कर्मयोग व 'अद्वेष्टा सर्वभूतानां' इत्यादि (भ. गी. ११, १२–१३–१९) जीवन्मुक्ताचीं लक्षणें जीवन्मुक्ताच्या अंगीं बाणलीं पाहिजेत हें तात्यासाहेबांना संमत होतें व चित्तस्वास्थ्याकरिता प्राणा-यामादि साधनांची उपयुक्तता (पण आवश्यकता नव्हे!) ते मानावयास तयार होते; पण त्याच्या पलीकडे जाऊन समाधिअवस्था आणि 'ब्रह्म'-साक्षात्कार त्यांच्या बुद्धिवादाच्या चौकटींत मला तरी नीट बसवितां येईना.

जीवन्मुक्तास सृष्टिनिर्मितीचें कोडें यथार्थपणें उकलितां आलें पाहिजे या मुद्द्यास केळकरांचें उत्तर असें कीं, या कोड्याचें कोणतें उत्तर यथार्थ हें ठरवावयाचें कोणीं व कसें! जीवन्मुक्तास 'कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं' शक्ति असली पाहिजे, त्याला सर्व 'सिद्धि' वश असल्या पाहिजेत, ह्या मुक्तीच्या भोळ्या पौरा-णिक कल्पनांना अर्थात् ते दुरूनहि स्पर्श करावयास तयार नव्हते.

अखेरीस मीं असा मुद्दा उपस्थित केला कीं, ज्या जीवन्मुक्त पुरुषानें ऐलथडीच मुक्ति मिळवून अखिल जीवनाचें खरें रहस्य आत्मसात् केलें त्याला

---

१ भवभूतीनें लिहिलें आहे – 'न खलु स उपरतो नाम यस्य वल्लभो जनः स्मरति.'

२ वेद = सत्य ज्ञान.

वस्तूंच्या व व्यक्तींच्या गुणदोषांचें पूर्ण ज्ञान असलें पाहिजे. फार लांब कशाला, हिंदुस्थानचें पुढें आणखी ८–१० वर्षांनीं काय होणार आहे हें त्याला आज अचूक सांगतां आलें पाहिजे. या अचूकतेची प्रतीति आपणांस कालांतरानें ताडून पाहतां येण्याजोगी आहेच. एवढा एकच मुद्दा तात्यासाहेबांना पटलासें दिसलें.

आमच्या दुर्दैवानें, पण तात्यासाहेबांच्या सुदैवानें, 'ऐलथडीचा मोक्ष' अनुभवून तात्यासाहेब आतां 'पैलथडीस' गेले आहेत. तेथें कांहीं हातीं लागण्याजोगें असलेंच तर, त्याचें यथार्थ ज्ञान – त्यांच्या आजवरच्या वृत्तपत्रकाराच्या पेशास अनुसरून – ऐलथडीवरच ठेंचकाळणाऱ्या आम्हां मुमुक्षूंस त्यांनीं करून दिलें पाहिजे हीच आमची अपेक्षा व त्यांना शेवटची आप्रहाची प्रार्थना!



श्रीमंत महाराज यशवंतराव होळकर

(अधिपति, संस्थान इंदूर)

कै. नरसिंह चिंतामण केळकर यांचा मराठी साहित्याच्या विविध क्षेत्रांत सारखाच अधिकार होता. त्यामुळें त्यांना लोकमतानें देण्यांत आलेली 'साहित्यसम्राट्' ही पदवी अत्यंत सार्थ होती. कोणताहि विषय सरळ, सुबोध भाषेंत, तर्कशुद्ध व सप्रमाण रीतीनें मांडण्यांत ते सिद्धहस्त होते. 'केसरी' पत्राचें संपादकत्व यांच्याकडे असलेल्या प्रदीर्घ कालांत प्रचलित राजकारणाची विद्वत्तापूर्ण, निर्भीड, निर्भय, तर्कशुद्ध व राष्ट्रीय दृष्टीनें चिकित्सा करण्यांत 'केसरी' पत्राची बरोबरी महाराष्ट्रांत तर दुसरें कोणतेंहि पत्र करूं शकत नव्हतेंच; पण इतर प्रांतांतहि त्याच्या तोडीचीं फारच थोडीं पत्रें होतीं.

राजकारणांतील हीच समतोल विचारसरणी साहित्याच्या क्षेत्रांताहि कै. तात्यासाहेब केळकर यांच्या सर्वच लिखाणांत सुस्पष्ट दिसून येते. त्यांच्या मताशीं, कित्येक महत्त्वाच्या बाबतींत, अलिकडे देशांतील कित्येक नामांकित विचारवंतांचा व पुढाऱ्यांचा मेळ बसेनासा झाला होता. पण मतस्वातंत्र्याचा हा प्रश्न बाजूला ठेवला तर केळकरांची दीर्घकालीन मराठी साहित्याची सेवा, त्यांनी देशाच्या उद्धाराप्रीत्यर्थ केलेले बहुविध प्रयत्न व महाराष्ट्रांतील त्यांचा थोर दर्जा याविषयीं तर दुमत होऊंच शकत नाहीं, हें निर्विवाद आहे.

गंगाधर बाळकृष्ण देशपांडे

(बी. ए., एल्एल्. बी., कर्नाटकचे काँग्रेस पक्षाचे पुढारी, बेळगांव)

(१) १९२१ सालीं माझ्यावर कलम १२४ अ प्रमाणें खटला भरण्यांत आला होता. या खटल्याचें वारंट सुटल्याची हकीकत मला पुण्याला समजली. त्या

वेळीं मी तात्यासाहेबांच्या घरींच उतरलो होतों. १२४ अ कलमाखालीं दीर्घ मुदतीची शिक्षा सांगितली आहे. अशा स्वरूपाचा हा खटला कर्नाटकांत पहिलाच होता व गांधींच्या असहकाराच्या चळवळीला जोर चढत चालला होता व त्या चळवळींत मी प्रामुख्यानें भागहि घेत होतों. या सर्व परिस्थितीमुळें माझ्यावरील खटल्यांत मला बरीच मोठी शिक्षा होईल असें वाटलें. घरीं वृद्ध मातोश्रीशिवाय घरचें असें कोणी नव्हतें. म्हणून तुरुंगांत जाण्यापूर्वी त्यांना एकदां भेटावें व घरच्यासंबंधीं कांहीं व्यवस्था त्यांना सांगून त्यांचा निरोप घ्यावा अशी माझी इच्छा होती. पण पकडवॉरंट चुकवून हें सर्व साध्य होणें कठीण होतें. मी पुण्यास केळकरांच्या घरीं आहे ही गोष्ट कांहीं गुप्त नव्हती. माझ्यावर वॉरंट सुटल्यापासून केळकरांच्या घरावर पोलिसांची सारखी पाळत होती. तेव्हां आईला भेटण्याची इच्छा तडीला कशी न्यावी हा प्रश्न मला पडला. या बाबतींत मी तात्यासाहेबांचा सल्ला घेतला. बेळगांवच्या पोलिस सुपरिंटेंडेंटला तार करून मी पुण्यास आहें व बेळगांवला येण्याला मला पांच-सहा दिवस लागतील, तोंपर्यंत माझ्यावरील वॉरंट बजावण्याकरितां पुण्यास पाठवूं नये, अशी तार करून उत्तर मागवावें असा त्यांनीं सल्ला दिला. हा बेत थोडा धाडसाचाच होता. तथापि त्याप्रमाणें करण्याचें मीं ठरवून पोलिस सुपरिंटेंडेंटला तार केली व ही बातमी बेळगांवला माझ्या नेत्यांना तारेनें कळवून पोलिस सुपरिंटेंडेंटचा काय बेत ठरतो तें कळवण्यास लिहिलें. माझे नेते पोलिस सुपरिंटेंडेंटला भेटले व दोघांच्या विचारें माझी ५।६ दिवस वाट पाहावयाची असें ठरलें. तथापि वेळेवर हजर होण्याकरितां पुण्याहून बेळगांवास कसें जावयाचें व घरीं जाऊन आईला भेटण्याची व्यवस्था कशी करावयाची हे प्रश्न माझ्यापुढें होतेच. त्याबद्दलची तोडहि तात्यासाहेबांनीं सुचवली. मुदतीच्या आंत बेळगांवला तर जावयाचें, पण वाटेंत किंवा बेळगांवच्या स्टेशनावर वॉरंट बजावण्याचा मोका टाळण्याकरितां मोटारीनें पुण्याहून बेळगांवचा प्रवास करावा असें तात्यासाहेबांच्या विचारानें ठरलें. तथापि पुण्याची मोटार घेतल्यास पोलिसांना समजणें संभवनीय होतें. म्हणून अंतूकाका फडणीस यांना साताऱ्याला पाठवून तेथून एक मोटार आणवली व त्या मोटारीनें मी बेळगांवला रात्रीं येऊन पोचलों. बरोबर अंतूकाका व बाबूराव गोखले यांना देण्यांत आले होते. आईची भेट झाली. घरची व्यवस्था करावयाची ती केली व पोलिसांना कळविलें. त्यांनीं "घाई नाहीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं येऊं" असा निरोप पाठवला. त्यामुळें संबंध रात्र व दुसऱ्या दिवशीं सकाळच्या ९ वाजेपर्यंत वेळ मिळाला.

तात्यासाहेबांचा सल्ला किती योग्य होता व त्यांनीं सुचविलेली सावधगिरी प्रसंगाला किती अनुसरून होती हें दिसून येईल. कोणत्याहि प्रकारची लबाडी, छपवाछपवी पदरांत न घेतां सर्व कामें तडीला गेलीं.

(२) १९२९ एप्रिलमध्यें बेळगांवाला चवदावें महाराष्ट्र-साहित्य संमेलन

भरलें होतें. त्यापूर्वी कर्नाटकांत कानडी लोकांनीं या संमेलनाच्या विरुद्ध खूप चळवळ केली होती व संमेलनाला अपशकून करण्याची तयारी चालविली होती. श्री. बळवी व मी अस्सल कर्नाटकी असूनहि कानडी लोकांनीं चालवलेली दंगल आम्हां दोघांना मान्य नव्हती व साहित्य संमेलन निर्विघ्नपणें पार पडावें म्हणून आम्ही शक्य ते प्रयत्न करीत होतों. बेळगांव जिल्हा व विशेषतः बेळगांव शहर कर्नाटकांत का महाराष्ट्रांत हा वादाचा मुद्दा होता. काँग्रेसच्या घटनेप्रमाणें सबंध बेळगांव जिल्हा हा कर्नाटकांत सामील करण्यांत आला आहे व त्याला अनुसरून १९२४ सालीं कर्नाटक प्रांतांत भरावयाची राष्ट्रीय सभा बेळगांवांत भरविण्यांत आली म्हणून कानडी लोकांनीं हा वाद उपस्थित करूं नये म्हणून मी माझी पराकाष्ठा करीत होतों. या प्रयत्नाला यश मिळावें म्हणून संमेलनाचे नियोजित अध्यक्ष शिवरामपंत परांजपे यांची संमेलनापूर्वी मॉ भेट घेतली व आपण सर्व काँग्रेसला मानणारे आहोंत व काँग्रेसच्या घटनेप्रमाणें बेळगांव जिल्हा कर्नाटकाचा भाग आहे येवढी गोष्ट अध्यक्षीय भाषणांत घालण्याबद्दल सुचवलें. शिवरामपंतांनीं इतकें केलें असतें तर वाद विकोपाला गेला नसता. पण, शिवरामपंतांनीं तसें करण्याचें नाकारलें. आपल्या भाषणांत या विषयाचा उल्लेखच करणार नाहीं असें त्यांनीं मला स्पष्ट सांगितलें.

याच वेळीं केळकरांची मीं भेट घेतली. केळकरांची संमेलनाला जाण्याची इच्छा नव्हती. पण केवळ माझ्या आग्रहानें त्यांनीं येण्याचें मान्य केलें. इतकें पदरांत पडल्यानंतर केळकरांना बेळगांव जिल्हा हा काँग्रेस-घटनेप्रमाणें कर्नाटकाचा भाग आहे अशा अर्थाचा ठराव मांडण्यास विनंती केली. केळकरांसारख्या थोर महाराष्ट्रीय पुढाऱ्यानें अशा प्रकारचा ठराव मांडण्याचें पत्करल्यास कर्नाटकांतील चळवळ शांत होईल अशी माझी कल्पना होती. ही साधी व न्यायाची विनंती केळकरांनीं मान्य केली. त्यामुळें मला आनंद झाला व येवढ्यानें कर्नाटकांतील वादळ दबेल असें मला जें वाटलें होतें तें खरें ठरलें. केळकर जर हा ठराव मांडत असतील तर आम्ही विरोध करणार नाहीं असें विरोधकांच्या पुढाऱ्यांनीं मला आश्वासन दिलें. पुनः मी संमेलनाच्या पूर्वी पुण्याला जाऊन त्यांचें येण्याचें निश्चित करून आलों. केळकर ठरल्याप्रमाणें आले व त्यांनीं ठराव मांडला व मी अनुमोदन दिलें. पण अध्यक्षांनी ठराव नियमबाह्य ठरविला त्यामुळें ठरावावर मतमोजणी झाली नाहीं. पण संमेलनाच्या प्रसंगीं शिष्टाचाराला सोडून जे प्रकार होणार अशी भीति वाटत होती ती मात्र नाहींशी झाली व संमेलनाचें काम यशस्वी रीतीनें पार पडलें. याचें सर्व श्रेय केळकरांना आहे हें मात्र मी विसरणार नाहीं. केळकर हे महाराष्ट्राचे अभिमानी, मराठी साहित्याचे सम्राट् असूनहि कानडी-मराठी वाद जेथें जेथें म्हणून उपस्थित होण्याचा संभव असे तेथें तेथें ते न्यायाला धरून वागले

व कानडी लोकांवर अन्याय होऊं दिला नाहीं, अशीं अनेक उदाहरणें मला माहीत आहेत.

(३) १९३० सालीं मी रत्नागिरीच्या तुरुंगांत असतां एक दिवस जेलचे सुपरिंटेंडेंट माझ्याकडे आले व मला म्हणाले कीं, "पंचवीस हजारांचा एक ट्रस्ट करण्यांत आला आहे व ट्रस्टींपैकी तुम्ही एक आहां. ऑफिसमध्यें येऊन ट्रस्टचा कागद वगैरे पहा." कोणता ट्रस्ट व कोणीं केला याची मला मुळींच कल्पना आली नाहीं; किंवा कोणी तरी ट्रस्टीमध्यें माझें नांव घालील ही कल्पनाहि मला नव्हती. शिवाय ते दिवस दडपशाहीचे होते व मी तर शिक्षाच भोगत होतों. त्यामुळें सुपरिंटेंडेंटला आलेल्या कागदपत्रांचा नीटसा उमज झाला नसावा असें मला वाटलें. ऑफिसमध्यें जाऊन मीं ट्रस्टचा कागद पाहिला. तेव्हां मला आश्चर्य वाटलें. लोकमान्य टिळक पर्सफंडांतून २५००० रु. कर्नाटकाकरितां राखून ठेवून त्या रकमेच्या व्याजाची व्यवस्था करण्याकरितां जे ट्रस्टी नेमले होते त्यांत माझें नांव होतें. ही सर्व व्यवस्था तात्यासाहेबांनीं केली होती. वास्तविक या वेळीं तात्यासाहेबांचा व माझा राजकारणांत तीव्र मतभेद उत्पन्न झाला होता. कर्नाटकांत पर्स-फंड जमविण्यांत मीं प्रामुख्यानें भाग घेतला होता व टिळकांच्या धोरणाला अनुसरूनच मी राजकारणांत भाग घेत असे. या गोष्टी लक्षांत आणून व स्वतःच्या मतभेदाकडे दुर्लक्ष करून केळकरांनीं माझें नांव टस्ट्रीत घातलें होतें. यावरून केळकरांचें सौजन्य व मनाचा मोठेपणा दिसून येतो.

(४) असहकारितेच्या १९२१ च्या चळवळींत मी मुंबईस विद्यार्थ्यांनीं कॉलेजें, शाळा वगैरे संस्थांवर बहिष्कार घालावा म्हणून प्रयत्न करीत होतों. या चळवळीला मदत म्हणून मुंबईचे बमनजी शेठ यांनीं दहा हजार रुपये दिले होते. ही रक्कम खर्च करण्याची जबाबदारी मुख्यतः माझ्यावर होती. तरी तात्यासाहेबांनीं या कामीं मला मदत करण्याकरितां कै. अण्णासाहेब नेने व श्री. बाबुराव गोखले यांना सांगितलें होतें. मुंबईस विद्यार्थ्यांच्या पुष्कळ सभा आम्ही घेत होतों. "केसरी"तून सुद्धां तात्यासाहेबांनीं या विशिष्ट चळवळीला उचलून धरलें होतें. कांहीं महाराष्ट्रीय विद्यार्थी "आम्ही केळकरांचें मत या बाबतींत घेतों व नंतर काय तें ठरवूं" असें म्हणत होते. केळकरांचे लेख व त्यांनीं मला केलेली मदत हीं लक्षांत घेतां ते विरुद्ध मत देतील ही कल्पना मला येणें शक्य नव्हतें. म्हणून मी बेधडक अशा विद्यार्थ्यांना केळकरांना विचारा असें सांगत असे. कांहीं विद्यार्थी केळकरांकडे जाऊन आल्यानंतर, त्यांनीं कॉलेज सोडूं नका, असें सांगितलें आहे, असें मला सांगूं लागले. मला आश्चर्य वाटलें. पुढें कांहीं दिवसांनीं माझी व त्यांची भेट झाली तेव्हां त्यांच्याकडून खुलासा मागितला. तेव्हां त्यांनीं मला

सांगितलें कीं, "जे विद्यार्थी माझा सल्ला घेण्याकरतां येतात त्यांच्या मनांत कॉलेज सोडण्याचें नसतेंच. त्यांच्या व माझ्या बोलण्यांत हें मला दिसून आलें, म्हणून त्यांच्यावर जबरदस्ती करून भलतेंच प्रलोभन दाखवून त्यांच्या शिक्षणक्रमांत व्यत्यय आणावा असें मला वाटलें नाहीं. म्हणून अशांना कॉलेज न सोडण्याचा सल्ला दिला ही गोष्ट खरी आहे. गांधींना विचारलें तर तेहि असेंच सांगतील अशी माझी खात्री आहे." या उत्तरानें माझें समाधान झालें व केळकरांनीं केलें तें योग्यच होतें असें मला वाटलें. पण, त्यांच्याकडे गेलेल्या विद्यार्थ्यांना मात्र "आम्हांला केळकर कॉलेज सोडूं नका म्हणून सांगतात व ते आमचे पुढारी आहेत म्हणून आम्ही कॉलेज सोडीत नाहीं" असें म्हणण्यास फावलें! यांत केळकरांकडे कांहीं दोष नव्हता, पण बदनामी मात्र त्यांची झाली. बाकी असे अनुभव केळकरांना पुष्कळच आले आहेत. माझे व त्यांचे पुष्कळ मतभेद होते. तथापि त्यांचें वर्तन दुटप्पी आहे असें मला कोणी सांगूं लागला तर मी त्याचें म्हणणें खरें मानून वागत नसे. त्यामुळें आमच्या स्नेहांत अंतर आलें नाहीं.

(५) १९४६ च्या ऑगस्ट पहिलीच्या पूर्वी कांहीं दिवस मी केळकरांच्या भेटीला गेलों होतों. त्या वेळीं ते टिळकपुण्यतिथीच्या निमित्त भाषण करणार होते व त्याला अनुसरून त्या आठवड्याच्या केसरींत देण्यासाठीं पक्षोपपक्ष यासंबंधानें एक लेख सांगण्यांत गुंतलें होते. मला पाहून त्यांनीं लेख सांगण्याचें बंद केलें व त्याच विषयासंबंधानें त्यांनीं भाषण सुरू केलें. त्यांच्या बोलण्याचा आशय पुढीलप्रमाणें होता :– "सार्वजनिक कार्यांत व विशेषतः राजकारणांत एकाच पक्षाचें नेहमीं वर्चस्व असतें असें नाहीं. कांहीं कालपर्यंत मी प्रभावी असलेल्या पक्षाच्या प्रमुखांत एक होतों. पण आज तो पक्ष अल्पसंख्य झाला आहे. तुमचेंहि तसेंच झालें आहे. आज दुसरे पक्ष जोरांत येत आहेत. त्यामुळें तुम्हीं आण्णासाहेब लठ्ठे यांना पाठिंबा दिला तरी तुमचें सर्व साधलें नाहीं. त्यांना काँग्रेसचें तिकिट मिळालें, पण मंत्रिपद मिळालें नाहीं, वगैरे." लठ्ठयांना मंत्रिपद मिळावें म्हणून मीं प्रयत्न केला नव्हता असें सांगितलें. त्यांना तें खरें वाटलें. तो लेख केसरींत प्रसिद्ध झाला आहे व त्यांच्या कल्पना आज मूर्त स्वरूपांत येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. गेल्या वर्षीच्या टिळकपुण्यतिथीच्या दिवशीं तात्यासाहेबांचें भाषण होऊन "टिळकपक्षा" च्या धोरणासंबंधानें त्यांनीं ऊहापोह केला. त्या वेळीं त्यांनीं माझा उल्लेख करून माझ्या राजकीय मतांत बदल झाल्याचें सांगितलें. पाकिस्तान-निर्मिति झाल्यामुळें हिंदुस्थानच्या राजकारणाच्या जुन्या धोरणांत बदल करावे लागणार असें माझें मत झालें आहे, हें अगदीं खरें आहे. डॉ. शामाप्रसाद मुकर्जीसारख्या हिंदुमहासभेच्या पुढाऱ्याला मध्यवर्ती मंत्रिमंडळांत घेणें त्याचप्रमाणें श्री. माधवरावजी अणे यांना बिहारचे गव्हर्नर नेमणें या घटना

काँग्रेसचा देखील दृष्टिकोन बदलल्याच्या निदर्शक आहेत. म्हणून अशा प्रसंगीं तात्यासाहेबांची मला आठवण होते. त्यांच्या सहकार्यांची व मार्गदर्शनाची या नवीन परिस्थितींत पुष्कळांना आवश्यकता वाटणें स्वाभाविक आहे. मलाहि तसेंच वाटत होतें. पण विधिघटना निराळीच आहे ! ता. १ ऑगस्टला मी अमळनेरला होतों व ता. १४।१०।४७ रोजी मी तेथें असतांनाच त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकण्याचा प्रसंग आला ! व अमळनेरहून परत बेळगांवला जातांना त्यांच्याशीं वाटाघाट करण्याचा माझा बेत जागच्या जागींच जिरला !



शंकर गणेश दवणे

(एम्. ए., वरांडा-चांदा).

(१) सन १९२३ सालची गोष्ट. काँग्रेसच्या गोटांत फेर आणि नाफेरवाद जोरांत सुरू होता. दास, नेहरू व केळकर यांच्या खटपटीनें स्वराज्य पक्ष स्थापन होऊन काँग्रेसनें कौन्सिल प्रवेशाला मान्यता दिली होती. खुद्द तात्यासाहेब मध्यविभागातर्फे मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या निवडणुकीसाठीं स्वराज्य पक्षातर्फे उभे होते. निवडणुकीच्या दौऱ्यांत तात्यासाहेब भुसावळला आले. त्या वेळीं त्यांचें तेथील गांधी-चौकांत मतदारांना उद्देशून भाषण झालें. असहकारितेच्या युगांत अनेक लहानमोठे पुढारी भुसावळला येऊन गेले होते. शिवाय भुसावळ गांव म्हणजे दे. भ. आण्णासाहेब दास्ताने यांचा बालेकिल्ला असा त्या वेळीं एक सार्वत्रिक समज होता. तात्यासाहेबांचें व्याख्यान झालें. इतर ठिकाणांप्रमाणेंच भुसावळ येथील या सभेंतहि कट्टर काँग्रेसवाद्यांनीं कौन्सिल-प्रवेशाला आपला विरोध केलाच. तो पाहून 'मी भुसावळकरांना जाणून आहें' असें तात्यासाहेब म्हणाले. या सभेचा विशेष हा की, त्या वेळीं तात्यासाहेबांचे वडील बंधु श्री. महादेव चिंतामण केळकर 'हे खासगी नात्यानें पूर्वखानदेशतर्फे मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीसाठीं उभे होते. 'त्यांना तुम्ही आपलीं मतें देऊं नका. स्वराज्यपक्षीय उमेदवारालाच तीं द्या' असें तात्यासाहेबांनीं मतदारांना खडखडीत बजावलें. या तात्यासाहेबांच्या तत्त्वनिष्ठेचा मतदारांवर फार अनुकूल परिणाम झाला आणि तात्यासाहेबांनीं ती सभा जिंकली. कौन्सिल-प्रवेशाच्या पुष्टयर्थ त्यांनीं खालीं दिलेला दाखला आपल्या भाषणांत दिला:—

व्याघ्रस्य महदालस्यम् सर्पस्य च महद्भयम् ।
पिशुने चैव दारिद्र्यम् तेन जीवन्ति यानवाः ।

(२) तात्यासाहेबांना मीं प्रथम १९२५ सालीं पत्र लिहून त्यांच्या हस्ताक्षराची मागणी केली. लगेच सिमल्याहून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या कामांत ते अस-

नाहि त्यांनीं मला पत्र लिहिलें. तात्यासाहेब आपल्या पत्रांत म्हणतात :– "..... हस्ताक्षरें संग्रहित करण्याचा तुमचा हौशी उद्योग केवळ मुलांनाच असतो असें नाहीं. याचें प्रत्यंतर पाहावयाचें असल्यास पुण्याच्या इतिहासमंडळांत जाऊन पाहावें. माझें हस्ताक्षर जपून ठेवण्याइतकें चांगलें नाहीं येवढेंच जरा वाईट वाटतें. असो. इंग्रजी हस्ताक्षराकरतां मी असेंच कोणीं मागिल्यास ज्या चार ओळी नेहमीं लिहून देतों त्याच तुम्हांसहि लिहून पाठवाव्या असें वाटून पाठवीत आहें :–

Shall I ask the brave soldier
Who fights by my side
In the cause of our country
If our creeds agree ?
Shall I give up the friend
I have valued and tried
If he kneel not before
The same alter with me ?

मीं पत्रांत तात्यासाहेबांना अमूकच लिपींत हस्ताक्षर पाठविण्याचें लिहिलें नव्हतें. पण तात्यासाहेबांनीं पत्र मोडी लिपींत लिहून, त्यांत एक इंग्रजी उतारा आणून पत्ता बाळबोध लिपींत लिहिला आणि दोन भाषा आणि तीन लिपींत त्यांनीं आपलें हस्ताक्षर मला उपलब्ध करून दिलें याबद्दल मला धन्यता वाटली. 'माझें हस्ताक्षर जपून ठेवण्याइतकें चांगलें नाहीं' असें तात्यासाहेबांनीं जरी वरील पत्रांत म्हटलें असलें, तरी त्यांच्या हस्ताक्षराची ओळख महाराष्ट्राला नवीन करून देण्याचें कारण नाहीं. तें अगदीं ठळक, सुवाच्य आणि वळणदार असें होतें. १९२७ सालीं तात्यासाहेबांच्या कर्णमुळावर मुंबईला 'कैकिणी–टिळक' इस्पितळांत ऑपरेशन झालें. तशाहि स्थितींत त्यांनीं माझ्या एका पत्राला दिल्लीहून उत्तर दिलें. हें त्यांचें सौजन्य मी कधींहि विसरणार नाहीं.

(३) १९२७ सालीं तात्यासाहेबांची प्रत्यक्ष गांठ पडली. त्या वेळीं ते गायआळींत स्वतःच्या घरीं राहत होते. मीं माझ्या नांवाची चिठ्ठी आंत पाठविली. "भेटीस येणाऱ्यानें चिठ्ठी-चपाटी पाठविण्याची जरूरी नाहीं" असें ते मला म्हणाले. "तुम्ही यादवराव दवणे यांचे कोण ?" असा त्यांनीं मला प्रश्न केला. माझे आजोबा ती. कै. यादवराव माधवराव दवणे हे कै. बाबासाहेब पेंडसे यांच्या हाताखालीं पुण्यासं कमिशनरच्या ऑफिसांत काम करीत असत. त्यांची आणि कै. बाबासाहेब विद्वांस यांची नित्य बैठक असे" असें सांगितलें. तात्यासाहेबांना संगीताचा नाद फार. माझे चुलत आजोबा ती. कै. मार्तंडराव यादवराव दवणे हे तालज्ञानांत तरबेज असा त्यांचा लौकिक होता. त्यांची आणि तात्यासाहेबांची मैत्री असे. श्रीपाद कृष्ण

कोल्हटकरांच्या आत्मवृत्ताच्या पृ. ३३ वर त्यांच्या नांवाचा उल्लेख आहे. 'तुम्हांला गाणें येतें काय ?' असा प्रश्न तात्यासाहेब मला नित्य विचारीत. आमचें घराणें मूळचें वेरूळ येथील जुनें. तेथील आमच्या वाड्यांत कांहीं जुने ऐतिहासिक कागदपत्र आहेत काय असाहि तात्यासाहेब मला प्रश्न करीत. वेरूळच्या लेण्यावर 'सह्याद्रि'साठीं एखादा लेख लिहिण्याचीहि त्यांनीं मला आज्ञा केली होती. पण तात्यासाहेबांच्या शतांशहि उद्योग व उरक माझ्यांत नसल्यानें तें काम माझ्याकडून अद्याप व्हावयाचेंच आहे ! माणसाला कितीहि अडचणी सोसाव्या लागल्या तरी उच्च शिक्षण हें "झालेंच पाहिजे" हा तात्यासाहेबांचा उपदेश मी नित्य उराशीं बाळगून असें. 'ज्ञानार्जनाच्या कामीं अर्धेंच काय पण सगळें आयुष्य गेलें तरी काय चिंता ?' असें ते म्हणत. या त्यांच्या उपदेशाच्या बळावर मी बी. ए. व पुढें एम्. ए. झालों. तेव्हां त्यांना फार समाधान वाटलें. नागपूर विद्यापीठांत एम्. ए. ला मराठ्यांचा सर्व इतिहास न ठेवतां फक्त पानिपतच्या तिसऱ्या युद्धापावेतोंच ठेवण्याचा कोणीं उपद्व्याप केला, हें तात्यासाहेबांना आवडलें नाहीं.

(४) तात्यासाहेबांच्या घरीं त्यांच्या टेबलावर वाचनाचीं पुस्तकें आणि पत्रव्यवहार व्यवस्थेशीर रीतीनें लावून ठेवलेला असे. 'केसरी' कचेरींतील एखादे गृहस्थ त्यांच्या हाताशीं नेहमीं असत. टेलिफोनवरून केसरीचीं प्रुफें मागविण्याचीहि गडबड चाले. लेखकांस ते खोलींत येरझारा करीत मोठ्यानें मजकूर सांगत. त्यांच्या भेटीस येणाऱ्यांत बूटसूट घातलेल्या लोकांपासून तों तहत नखशिखांत खादीचा शुभ्र पोशाख केलेले गृहस्थ असत. नेपोलियन बोनापार्टचा एक लहानसा 'बस्ट' 'पेपरवेट' म्हणून ठेवलेला मीं त्यांच्या टेबलावर पाहिला आहे. भेटीस आलेला गृहस्थ नेहमीं समाधान वृत्तीनें त्यांच्या घराबाहेर पडत असे. चालूं राजकारणाचा अभ्यास करावयाचा तर त्यासाठीं 'गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट' (१९३५) वाचण्याची त्यांनीं मला शिफारस केली होती. 'Administration of a country is governed by the Act on which it is based' असें ते म्हणत. मराठी भाषेचा अभ्यास करण्यासाठीं त्यांनीं मला कै. हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्या वाचण्याची शिफारस केली होती. या कामीं मदत म्हणून कै. वाग्भट देशपांडे व हरिभाऊंच्या चरित्रकर्त्या कु. गोदावरीबाई केतकर यांचीं नांवें त्यांनीं सुचविलीं होतीं. पैकीं कै. वाग्भट देशपांडे यांनीं मला बहुमोल मदत केली.

(५) डेक्कन कॉलेजांत शारदेचा उत्सव एकदा तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं पार पडला. मंडळाचे अध्यक्ष प्रा. श्रीकृष्ण निळकंठ चापेकर हजर होते. व्यासपीठाच्या मागें राजा रविवर्मा यांचें शारदेचें भव्य चित्र भिंतीला टांगलें होतें. त्याच्याकडे पाहून तात्यासाहेबांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत शारदेचा मुकुट, तिचे हात, तिची वीणा, त्या वीणेच्या तारा, शारदेचे अलंकार यांची आणि वाङ्मयां-

तील रसालंकारांची उत्कृष्ट तुलना करून असें सुंदर रूपक केलें कीं, सर्व उपस्थित साहित्यिक आनंदानें डोलूं लागले.

(६) फर्ग्यूसन कॉलेजांतील अँफी थिएटरांत बॅ. जयकर यांचें एकदा व्याख्यान झालें. व्याख्यान अगदीं रंगांत आलें होतें. जयकर यांच्या ओघवती इंग्रजी वाणीनें विद्यार्थि-वर्ग अगदीं तन्मय झाला होता. इतक्यांत स्टेजच्या पाठीमागील दारानें तात्यासाहेब काखोटीला उपरणें घेतलेले असे हळूच येऊन खुर्च्यांच्या मागील रांगेंत बसले, तोंच 'एन्. सी. केळकर!' अशी विद्यार्थ्यांनीं एकच आरोळी ठोकून सर्व थिएटर दणाणून सोडलें आणि टाळ्यांचा एकच कडकडाट केला. बॅ. जयकर यांना आपलें ऐन रंगांत आलेलें भाषण थांबविणें भाग पडलें. त्यांनीं मागें वळून पाहिलें आणि स्मित केलें. सभेच्या चालकांनीं तात्यासाहेबांचा हात धरून खुर्चीवर पुढें आणून बसविलें. पुनः जयकरांचें भाषण पूर्ववत् सुरू झालें. फर्ग्यूसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुढें तात्यासाहेबांचेंहि भाषण दुसऱ्या एका अशाच प्रसंगीं झालें. त्या वेळीं तात्यासाहेबांनीं विज्ञान आणि गणितशास्त्र यांतील निरनिराळे दाखले देऊन विषय इतका रंगविला की, त्यांचें व्याख्यान झाल्यावर प्रि. महाजनी यांनीं मुद्दाम पुढें येऊन तात्यासाहेबांशीं हस्तांदोलन केलें व उत्कृष्ट भाषणाबद्दल त्यांचें अभिनंदन केलें.

(७) १९२७–२८ सालीं डॉ. मुंजे एकदा पुण्यास आले होते. किर्लोस्कर थिएटरांत त्यांचा सन्मान करण्यांत आला. लोकांची त्या वेळीं इतकी गर्दी लोटली होती कीं, थिएटराची गॅलरी 'कर कर' वाजूं लागली. तेव्हां अध्यक्ष या नात्यानें तात्यासाहेबांना सभा स्थगित करावी लागली. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं शिवाजी मंदिरांत सभेचें राहिलेलें काम पुरें करण्यांत आलें. श्रोत्यांनीं शिवाजी मंदिर अगदीं फुलून गेलें होतें. आपल्या अध्यक्षीय भाषणांत तात्यासाहेबांनीं डॉ. मुंजे यांना 'हिंदूंचे पठाण' ही सार्थ पदवी बहाल केली. डॉ. मुंजे यांनींहि लोकमान्यांच्यामागें आपण तात्यासाहेबांना गुरुस्थानीं मानतों असें मोठ्या अभिमानानें सांगितलें.

(८) याच सुमारास एका सायंकाळीं तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं बेझंटबाईंचें किर्लोस्कर थिएटरांत व्याख्यान झालें. बाई इतक्या वृद्ध पण त्यांचें भाषण त्यांच्या लौकिकास साजेल असें ठसकेबाज झालें. तात्यासाहेबांचें अध्यक्षीय भाषणहि इंग्रजींतूनच झालें. अध्यक्षीय टेबलासमोर थिएटरमधील 'फूट लाइट्स्' लावण्यांत आले होते. तात्यासाहेबांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणाच्या सुरुवातीस 'फूट लाइट्स्' या शब्दावर अशी सुंदर कोटी केली की, त्या योगानें बेझंटबाई फार खूष झाल्या. तात्यासाहेबांचें सर्व भाषण बाईंनीं इतक्या एकाग्र चित्तानें ऐकलें कीं, आपली खुर्ची स्वहस्तें अध्यक्षीय

टेबलाजवळ ओढून घेऊन कानाला हात देऊन त्या तात्यासाहेबांचा शब्दन् शब्द लक्षपूर्वक ऐकत होत्या. तात्यासाहेबांच्या तोंडून जसजसें राजकीय तात्त्विक बोल बाहेर पडत होते तसतसा बाईंचा चेहरा विचारमग्न झालेला दिसत होता. यावरून अव्वल दर्जाच्या भारतीय राजकीय पुढाऱ्यांत तात्यासाहेबांना किती मोलाचें स्थान होतें याचें प्रत्यंतर त्या वेळीं पुणेकरांना आलें.

(९) याच वेळीं तळेगांव दाभाडे येथील गणपतिविसर्जनाचा प्रश्न मुसलमानांनीं उपस्थित केला होता. तळेगांव येथें जी हिंदुधर्मपरिषद झाली तीस तात्यासाहेब हजर होते. याशिवाय श्री. तात्यासाहेब करंदीकर, विश्वासराव डावरे इ. हिंदुधर्माभिमानी पुढारीहि हजर होते. या परिषदेंत तात्यासाहेबांचें भाषण फार आवेशयुक्त असें झालें. "गणपतिविसर्जनाच्या बाबतीत वेळप्रसंगीं सत्याग्रह करावा लागल्यास मी स्वतः पुढें होईन" असें तात्यासाहेबांनीं सांगतांच लोकांचा आत्मविश्वास दुणावला आणि त्यांनीं टाळ्यांचा एकच गजर केला.

(१०) केसरी-मराठा संस्थेची कांहींना कांहीं तरी सेवा आपल्या हातून घडावी असा तात्यासाहेबांच्या मागें माझा नेहमींच लकडा असे. १९३० सालीं त्यांनीं माझा महाराष्ट्र-विद्यापीठावरचा लेख केसरींत प्रसिद्ध केला. त्यानंतर 'मातृभाषा हें शिक्षणाचें माध्यम', 'जर्मनींतील निवडणूक' हे लेखहि त्यांनीं छापले. केसरीचा ज्युबिली महोत्सव झाला त्या वेळीं मीं महोत्सवानंतर "लो. टिळकांच्या केसरीचीं गेलीं पन्नास वर्षे" हा लेख लिहून तात्यासाहेबांच्याकडे पाठविला. तो योग्य वेळीं प्रसिद्ध करण्यांत येईल असें त्यांनीं मला कळविलें. पण महिन्यामागून महिने लोटले तरी लेख प्रसिद्ध होईना, तेव्हां मी निराश झालों. पण पुढें त्या वर्षीचा टिळक पुण्यतिथीचा केसरीचा अंक मी उघडून पाहतों तों त्यांत माझा वरील लेख पांच कॉलमांत पानभर आलेला मीं पाहिला! योग्य वेळीं लेख देण्याच्या तात्यासाहेबांच्या हातोटीचें मला या वेळीं प्रत्यंतर आलें. १९३५ सालीं 'सह्याद्रि' निघाला; त्या वेळीं तात्यासाहेबांनीं मला लेख लिहिण्याची अनुज्ञा दिली होती. "जें आपण लिहूं तें सर्वच छापलें जावें असा आग्रह होतकरू लेखकानें धरूं नये. अनेक पानें लिहून आपणासच तीं फाडावीं लागतात" असें ते म्हणत. १९३५ सालीं नागपुरास अखिल भारतीय शिक्षण परिषद आणि लिबरल फेडरेशन यांचीं अधिवेशनें भरणार होतीं. या प्रसंगीं केसरी – मराठ्याचा प्रतिनिधि म्हणून तात्यासाहेबांनीं माझी नेमणूक केली होती. मला जें त्यांनीं अधिकार-पत्र दिलें त्यांत टाईप करणाऱ्यानें खालीं Proprietor, the Kesari and the Mahratta असें टाईप केलें होतें. तात्यासाहेबांनीं आपल्या हातानें Proprietor, हा शब्द खोडून त्याऐवजीं Trustee असा शब्द घातला व सही केली.

(११) १९४५ सालीं तात्यासाहेब नागपुरास राजाराम वाचनालयाच्या

महोत्सवासाठी आले होते. ते नागपुरास येण्याच्या अगोदरच मुद्दाम पुण्यास पत्र लिहून मीं त्यांना घरीं येण्याचें आमंत्रण दिलें होतें. तात्यासाहेबांचें आगमन म्हणजे नागपूरस्थ साहित्यिकांना ती एक पर्वणीच होती. स्टेशनवर त्यांना बरीच मंडळी सामोरी आली होती. ज्या दिवशीं तात्यासाहेब आले त्याच दिवशीं सायंकाळीं मी त्यांना भेटलों. ॲडव्होकेट गोखले यांच्याकडे ते उतरले होते. प्रवासाच्या दगदगीनें आणि नागपुरांतील विविध कार्यक्रमानें ते अगदीं थकून गेल्यासारखे दिसले. इकडचें तिकडचें बोलणें झाल्यावर मीं तात्यासाहेबांना घरीं येण्याबद्दल हळूंच सूचना केली. ती त्यांनीं ताबडतोब मान्य केली. त्या वेळीं मला अपरिमित आनंद वाटला. ते म्हणाले, 'उद्या सायंकाळीं येतों.' तात्यासाहेब घरीं येणार ही बातमी घेऊन आनंदित होत्साता मी घरीं आलों आणि घरच्या मंडळींना आणि वाडिलांना ही बातमी कळविली, तेव्हां सर्वांनाच आनंद झाला. माझ्या मित्रमंडळींना ही बातमी कळवितांच त्यांनीं एक निराळाच बूट काढला. माझे सिटी कॉलेजांतील मित्र प्रा. पहाडे आणि प्रा. देशपांडे यांना तात्यासाहेबांना एकदां अगदीं जवळून घरीं खाजगी बैठकींत पाहण्याची इच्छा झाली. तात्यासाहेबांशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणारे कोणी तरी पाहिजे म्हणून डॉ. मुंजे व श्री. दाजीशास्त्री चांदेकर यांसहि बोलाविण्याचें ठरविण्यांत आलें. तात्यासाहेबांना मोठ्या थाटाचा अल्पोपाहार देण्याचा आमचा विचार होता. आमंत्रण देण्याकरितां प्रा. पहाडे व मी डॉ. मुंजे यांच्याकडे गेलों, तों तेथें आम्हांला तात्यासाहेब आणि डॉ. मुंजे हे एकत्र बसलेले आढळले. थोड्या वेळानें तात्यासाहेब उठले आणि माझ्याकडे एकदम वळून मला म्हणाले, "चला मी तुमच्याकडे आतांच येतों". हें वाक्य तात्यासाहेबांच्या तोंडून बाहेर पडतांच माझी एकच गाळण उडाली! घरीं कांहींच तयारी नव्हती. चांदीचें तबक तर राहोच पण साधें पितळी तबकहि नव्हतें. प्रा. पहाडे व मी एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागलों. कधीं नव्हत तात्यासाहेब घरीं येणार आणि हा दिवस आपल्या आयुष्यांत सुवर्णाक्षरांत लिहून ठेवण्यासारखा होणार असें असल्यानें "आपण यावेळीं येऊं नका" असें तात्यासाहेबांना म्हणणें म्हणजे ती एक नामुष्कीची गोष्ट होती. तात्यासाहेब आणखी पुढें म्हणाले, "पाहा, मी आपण होऊन तुमच्या घरीं येतों म्हणून म्हणतों तर तुम्ही कांहींच बोलत नाहीं". हें ऐकून मी पार विरघळून गेलों! माझी ती केविलवाणी स्थिति पाहून डॉ. मुंजांनाहि हसूं येऊं लागलें. शेवटीं मनाचा हिय्या करून 'चला' असें म्हणालों. दारापुढें मोटार उभी राहिली. सुदैवानें तीर्थरूप घरीं होते. त्यांच्या बैठकीवर मीं तात्यासाहेबांना नेऊन बसविलें. सुरुवातीसच ते म्हणाले, "मला तुमचें हें अत्तर द्या, गुलाब द्या, लवंगा, वेलदोडे द्या, पण खाण्याचा पदार्थ मात्र देऊं नका." शेवटीं

अशा रीतीनें सर्वच प्रश्न त्यांनीं सोडवून टाकिला! शेवटीं सौभाग्यवतीनें व मुला-बाळांनीं त्यांना नमस्कार केले व तात्यासाहेबांनीं आशीर्वाद दिले. परत जातांना जिना उतरत असतांना माझे वडील त्यांना म्हणाले, "आपल्यासारख्या थोरांनीं आमच्या घरीं पायधूळ झाडली हें आमचें महद्भाग्य होय". त्यावर तात्यासाहेब चटकन म्हणाले, "छे. छे. पायधूळ कसली! माझ्या पायावर मुळींच धूळ नाहीं. ते चांगले स्वच्छ आहेत कीं!" शेवटीं तात्यासाहेबांनीं आम्हा सर्वांना प्रेमानें निरोप दिला आणि जन्माचें ऋणी करून ठेविलें.

(१२) तात्यासाहेबांच्या नागपूरच्या या मुक्कामांत तेथील साहित्य संस्थांनीं त्यांना नागपूर विद्यापीठाच्या पदवीदानसमारंभाच्या दिवाणखान्यांत मानपत्र दिलें. साहित्यिकांच्या मेळाव्यांत तात्यासाहेब नेहमींच रंगून जात. त्याप्रमाणें येथेंहि झालें. "जन्मभर केसरी-मराठा संस्थेशीं संबंध आल्यानें मी इतकें लेखन-कार्य करूं शकलों" असें ते म्हणाले. कित्येक साहित्यिक उच्च दर्जाचे असतात, विचारवंताहि असतात, पण त्यांच्या लेखणीचा आणि कागदाचा मेळ बसत नाहीं आणि त्यामुळें त्यांच्याकडून म्हणावी तशी ग्रंथनिष्पत्ति होत नाहीं असें ते म्हणाले. 'साहित्यिक' कोणाला म्हणावें यासंबंधींहि एक नवीन मुद्दा तात्यासाहेबांनीं साहित्यिकांपुढें मांडला. जे कलाविलासांत रंगलेले असतात त्यांनाच आपण मुख्यत्वें साहित्यिक असें समजतों. पण जे लोक विज्ञान व शास्त्रें यांत निपुण असतात त्यांनाहि आपण साहित्यिक समजलें पाहिजे आणि त्यांनाहि साहित्य-संमेलनासारख्या संस्थेचें अध्यक्षस्थान दिलें पाहिजे असा त्यांचा आग्रह दिसला. १९१८ सालीं तात्यासाहेबांनीं मराठ्यांच्या इतिहासाचें वाङ्मयश्राद्ध म्हणून 'मराठे आणि इंग्रज' हा ग्रंथ लिहिला. तो ग्रंथ निरनिराळ्या इतिहास-सज्ञांकडून लिहवून घेतला जावा अशी तात्यासाहेबांची मूळची मनीषा होती हें फारच थोड्यांना माहीत असेल. पण ऐनवेळीं कोणी पुढें आला नाहीं तेव्हां तात्यासाहेबांनींच तो ग्रंथ एका हातीं लिहून पुरा केला. ग्रंथ बाहेर आल्याबरोबर त्याच्या प्रती भराभर खपूं लागल्या. याबद्दल महाराष्ट्रानें तात्यासाहेबांचें कौतुक केलें. पण उलट तात्यासाहेबांनीं महाराष्ट्राची कींव केली. ते म्हणाले, "मी माझ्या मराठे आणि इंग्रज या ग्रंथांत पदरचें असें फारच थोडें घातलें आहे. ज्या गोष्टी घडल्या त्यांचींच एका विशिष्ट पद्धतीनें मांडणी केली आहे. ग्रंथ ज्यावेळीं भराभर खपूं लागला त्या वेळीं याहि गोष्टी लोकांना माहीत नसाव्या याबद्दल मला वाईट वाटलें!"

(१३) १९४६ च्या डिसेंबर महिन्यांत मी पुण्यास जाऊन तात्यासाहेबांना भेटलों. डेक्कन जिमखान्यावर 'पुष्करिणी'च्या फाटकांत मी जाऊन उभा राहिलों त्या वेळीं तात्यासाहेबांचीं नातवंडें अंगणांत खेळत होतीं. त्यांपैकीं एक १०–१२ वर्षांचा चुणचुणीत नातू मला पाहून म्हणाला, "कोण पाहिजे!" "तात्यासाहेब" असें

मी उत्तर देतांच "थांबा" असें म्हणून त्यानें पळत पळत ओसरींत जाऊन शाळेसारखी एक मोठी घंटा 'टणकन्' वाजविली ! त्याबरोबर दार उघडून तात्यासाहेबांनीं बाहेर डोकाविलें व 'या' म्हटलें. अलीकडे वृद्धापकाळामुळें तात्यासाहेबांना ऐकूं कमी येत असे. त्यामुळें बाहेर भेटीस येणाऱ्या माणसाची वर्दी देण्यासाठीं ही घंटेची योजना करण्यांत आली आहे हें नंतर मला समजलें. तेव्हां मला मोठी मौज वाटली. दिवस थंडीचे आणि वेळ सकाळची असल्यामुळें तात्यासाहेबांनीं डोक्याला एक टापशी बांधून अंगांत बनातीची बाराबंदी घातली होती. तेव्हां मला कै. आगरकरांची आठवण झाली. कारण आगरकरहि अशाच पोषाखांत घरीं बसत असत असें सांगतात. चहापान करतां करतां मराठींतील वर्तमानपत्रें हा विषय निघाला. तेव्हां मी म्हणालों, "केसरीसारख्या केवळ तत्त्वदृष्टीनें चालविल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांची परंपरा आतां महाराष्ट्रांतून तुटत चालली आहे. वर्तमानपत्रांच्या धंद्यांतहि आतां भांडवलशाही सुरू झाली असून जसा पैसा तसें मत असें होऊं लागलें आहे." त्यावर तात्यासाहेब मला लगेच म्हणाले, "पण तसें झाल्यानें कांहींच बिघडत नाहीं. वकील जसा पैसे घेऊन आपल्या अशिलाची बाजू कौशल्यानें मांडतो तसेंच लेखकांनीं केल्यास त्यांत विशेष नांवें ठेवण्यासारखें कांहीं नाहीं." तात्यासाहेबांच्या या उत्तरानें माझें बोलणें खुंटलें. नंतर तात्यासाहेबांना मीं अभिवादन करून त्यांचा निरोप घेतला. तात्यासाहेबांची आणि माझी ही शेवटचीच भेट असा जर कोणीं मला त्या वेळीं इषारा दिला असतां तर मी आणखी कितीतरी वेळ तात्यासाहेबांच्या चरणांजवळ पाठ घेत बसून राहिलों असतों !

❋

सदाशिव कृष्ण काळे

(चित्रकार, पुणें)

(१) संध्याकाळीं साधारण सहाची वेळ असेल. रा. बापूरावांकडे मी गेलों होतों. ते घरीं नव्हते. श्री. तात्यासाहेब त्या वेळीं आपल्या बंगल्याच्या अंगणांत शतपावली करीत होते. मी फाटक उघडून आंत गेलों व त्यांना नमस्कार केला. या, बसा. कोणाकडे आलांत वगैरे मामुली प्रश्न त्यांनीं विचारले. ते व मी तेथील बाकावर बसलों. कांहींतरी बोलावयाचें म्हणून सहज म्हटलें, "आपण यंदा भोरास श्री. शंकराजी नारायण यांच्या उत्सवास आला होतां ना ?" ते म्हणाले "हो, श्रीमंतांनीं बोलाविलें होतें, आलों सहज." मीं म्हटलें, "मीहि पण त्या वेळीं तेथें होतों." "तुमचें नांव काय ?" त्यांनीं विचारलें. मीं म्हटलें "काळे", "श्री. शंकराजी नारायण यांचें मोठें चित्र तेथें रंगविलें आहे ते काळे तुमचे कोण ?" असें त्यांनी विचारतांच मीं पटकन उत्तर दिलें, "मीच तो." लगेच त्यांच्या गालावर थोडें हास्य दिसलें.

मी पडलों चित्रकार. ह्यांच्याशीं काय बोलावें हेंच समजेना; पण लगेच त्यांनींच चित्रकलेविषयीं बोलण्यास सुरवात केली. मग काय विचारतां? माझ्या आवडत्या विषयाची बरीच माहिती त्यांच्याकडून मला मिळाली व माझें बरेंच समाधान झालें. मीं विचारलें, "चित्रकलेचा कांहीं पारमार्थिक बाबतींत लाभ होतो का?" ते म्हणाले, "काय झालें न व्हावयाला? अहो, तुम्ही एकदां तुमच्या कामांत रंगून गेलांत म्हणजे आणखी काय पाहिजे तुम्हांला? आपण आपला आवडता उद्योग सतत करीत असलें म्हणजे त्यांत सर्व कांहीं आलें. तोच आनंद – तोच मोक्ष. पण काहो, आमच्या बापूला नुसतें पोर्ट्रेट पेन्टिंग शिकावयाचें झालें तर किती दिवस लागतील?" मी निरुत्तर झालों व यांना काय उत्तर द्यावें हेंच समजेना. माझ्या मनाची गोंधळलेली परिस्थिति पाहून त्यांनीं लगेच विषयास कलाटणी देऊन दोन हातांनीं साधारण एक आकार दाखविला व विचारलें कीं, "एवढें पेन्टिंग करण्यास किती खर्च येतो?" मीं म्हटलें, "त्यास लागणाऱ्या खर्चापेक्षा त्या पेन्टिंगवर जी काय मेहेनत केली असेल त्याचीच खरी किंमत." हें ऐकून ते म्हणाले, "अगदीं बरोबर बोललांत. आमचेंहि तसेंच आहे. नुसत्या कागद-पेन्सीलची काय किंमत! घटवून घटवून काय उतरेल तें खरें!"

(२) मी जाण्याकरिता उठलों. उठतां उठतां माझ्या खिशांतून एक श्रीपांडुरंगाचा प्रिन्ट काढला व त्यांच्या हातावर ठेवून आदरपूर्वक नमस्कार केला. त्यांनीं विचारलें "हा प्रिन्ट तुमच्याच चित्राचा कां?" होकारार्थी मीं मान डोलावली. ते म्हणाले, "श्रीज्ञानेश्वरांचें एखादें चित्र आहे का तुमच्याजवळ? जर तुमचें चित्र मला पसंत पडलें तर मी त्याचा अवश्य उपयोग करीन."

दुसऱ्या दिवशीं त्यांनीं मजकडे आपला मनुष्य पाठवून मीं तयार केलेलें श्री ज्ञानेश्वरांचें चित्र नेलें व थोड्याच दिवसांत तें चित्र त्यांच्या ज्ञानेश्वरी या पुस्तकांत झळकलेलें माझ्या दृष्टीस पडलें! कोणत्याहि माणसाची ताबडतोब पारख करून त्याचा काय फायदा समाजाला करून देतां येईल ह्याची पूर्ण पारख श्री. तात्यासाहेबांच्यासारख्या थोर माणसांतच आढळून येते.

❋

वा. चिं. भानु

(पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक)

(१) पुणें सें. को. बँकेशीं श्री. तात्यासाहेब केळकरांचा घनिष्ट संबंध होता व तो त्यांनीं, तसाच अखेरपर्यंत ठेवलाहि होता. ही बँक १९१७ सालीं स्थापन होण्यास त्यांची सक्रिय सहानुभूति कारणीं लागली होती. त्यांनींच प्राथमिक मोठी ठेव आणून दिल्यानें, बँक नोंदविण्याचें काम सोपें झालें होतें. पहिलीं सहा-सात वर्षें या

बँकेचे ते चेअरमन म्हणून बिनविरोध निवडून येत असत. बँकेच्या निवडणुका त्या वेळीं भक्तिभावानें होत. आजकाल त्यांना बाजारभाव आलेले दिसतात तसें त्या वेळीं नव्हतेच. ज्या ज्या इतर संस्थांशीं श्री. तात्यासाहेबांचा निकट संबंध होता, त्या संस्थांच्या शिलका याच बँकेत असत. त्यामुळें जशी एकाद्या अपत्यावर बापाची मर्जी असते, तशीच श्री. तात्यासाहेबांची पुणें सें. को. बँकेवर होती व बँकेच्या एकंदर कारभाराकडे त्यांचें आस्थेवाईक लक्ष सदोदित असें.

सन १९३१-३२ सालची गोष्ट आहे. श्री. दा. वि. गोखले हे बँकेच्या डायरेक्टरांच्या बोर्डाचे अध्यक्ष होते. बँकेचा वार्षिक अहवाल आणि ताळेबंद छापून प्रत्येक सभासदाकडे रवाना झालेला होता व बँकेची वार्षिक साधारण सभा, चारदोन दिवसांवर आलेली होती. बँकेच्या प्रमुख कार्यवाहांनीं श्री. तात्यासाहेब यांच्या घरीं जाऊन बँकेच्या सांपत्तिक स्थितीबाबत व एकंदर प्रगतीची यथार्थ कल्पना दिली होती. याच सुमारास श्री. तात्यासाहेबांच्या कांहीं निकटवर्ती इसमांनीं त्यांच्या घरीं जाऊन बँकेच्या अंतर्गत कारभारासंबंधींच्या कांहीं अतिरंजित गोष्टी त्यांच्या कानांत सांगितल्या. त्या त्यांनीं ऐकल्याहि; व त्या मंडळींच्या आग्रहावरून वार्षिक सभेच्या वेळीं मुद्दाम त्यांनीं हजर राहण्याचेंहि कबूल केलें. असा कोणी आग्रहच केला व गळ घातली तर ती त्यांना मोडवत नसे.

सभेच्या दिवशीं सुरुवात होण्यापूर्वीच पंधरा मिनिटें, श्री. तात्यासाहेब सभागृहांत उपस्थित झालेले होते. बँकेच्या नियमानुसार बोर्डाचे अध्यक्षच अशा सभांचे अध्यक्ष असतात, त्याप्रमाणें श्री. दा. वि. गोखले सभाध्यक्ष होते. नियोजित वेळीं सभेच्या कामास प्रारंभ होऊन, एकेक विषय हातावेगळा होत होता. बँकेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रकें मंजुरीसाठीं सभेपुढें रीतसर सूचना व अनुमोदन मिळून मांडण्यांत आलीं. तेव्हां "या विषयाबद्दल ज्या कोणास कांहीं बोलावयाचें अगर फेरबदल करण्याची दुरुस्ती सुचवावयाची असेल, त्यांनीं बोलण्यास प्रारंभ करावा. मात्र कार्यक्रम पत्रिकेवर असलेले सर्व विषय याच सभेंत आज उरकणें असल्यानें, वक्त्यांनीं वेळेचें बंधन राखावें. बोलणारांनीं प्रत्येकीं पांचदहा मिनिटें घ्यावींत." अशी अध्यक्षांनीं सूचना दिली. अध्यक्ष खालीं बसतांच, श्री. तात्यासाहेब ताडकन् उठून उभे राहिले व म्हणाले, "मला या विषयावर बोलावयाचें आहे. पण ५।१० मिनिटांत माझें बोलणें संपणार नाहीं."

अध्यक्षांनीं विचारलें, "आपणांस किती वेळ लागेल! वेळेचें बंधन असावें हें आपणांस मान्य आहे ना!"

"मला अर्धा तास लागेल. कदाचित् तास दोन तासहि लागतील काय सांगावें!" तात्यासाहेब अमळ रागानेंच उद्गारले. पूर्वग्रहानें तात्यासाहेबांचें मन गढूळ झालेलें

आहे, हें पाहून अध्यक्ष म्हणाले, " ठीक आहे. आपला व या बँकेचा स्निग्ध जिव्हाळा व आपला अधिकार लक्षांत घेऊन मी आपल्याला असें सांगतों कीं, एक दोन तासच काय, पण चार तास नव्हे आपली मर्जी असेल तितका वेळ, केवळ अपवाद म्हणून, आपणांस भाषण करण्यास मी वेळ देत आहें. मात्र मीं सुरुवातीस सांगितलेलें बंधन इतरांवर राहील. तात्यासाहेब आपण आपल्या भाषणास सुरुवात करावी. "

तात्यासाहेबांनीं, त्यांना घरीं जाऊन भेटलेल्या मंडळींनीं पुरविलेल्या माहितीच्या आधारावर, अहवाल, ताळेबंद वगैरे भागांचें सविस्तर परीक्षण करून व कांहीं निष्कर्ष काढून, चार दोन शंका प्रदर्शित केल्या. त्यांचें भाषण साधारणपणें अर्धा तें पाऊणतासपर्यंत त्यांच्या नेहमींच्या पद्धतीनें मोठें खुमासदार झालें. श्री. तात्यासाहेब अमळ रागावले असले म्हणजे कसे शब्द योजून बोलत याची कल्पना सर्वांस आहेच.

अध्यक्षांच्या सांगण्यावरून बँकेच्या प्रमुख कार्यवाहानें श्री. तात्यासाहेब यांनीं उपस्थित केलेल्या टीकास्पद मुद्यांना उत्तरें दिलीं व त्यांच्या सर्व शंकाचें भरपूर पुराव्यासह निराकरण केलें. या खुलाशानें श्री. तात्यासाहेबांना भेटलेल्या मंडळींचें समाधान झालें किंवा नाहीं तें मला सांगतां येणार नाहीं; पण श्री. तात्यासाहेबांच्या चेहऱ्यावरून व त्यांच्या एकंदर आविर्भावावरून मात्र, त्या खुलाशानें त्यांचें स्वतःचें पूर्ण समाधान झालेलें सभोतालच्या मंडळींच्या तेव्हांच लक्षांत आलें. तथापि अध्यक्षांनीं त्यांना विचारलेंच, " कार्यवाहांनी आतांच दिलेल्या उत्तरानंतर, आपणांस उपप्रश्न किंवा कांहीं नवीन प्रश्न विचारणें असेल अगर जादा माहिती हवी असेल तर आपण विचारावें. उत्तरें देण्यास मी सांगतों." तात्यासाहेब हसत हसत उठले व नेहमींच्या गोड स्मितपूर्वक शब्दांत म्हणाले, " माझें पूर्ण समाधान झालें आहे. आतां मला कांहीं एक विचारावयाचें नाहीं. अन् नंतर कांहीं वाटलेंच, तर उद्यां बँकेच्या ऑफिसमध्यें जाऊन मी विचारीन. आतां फक्त एकच विनंती करावयाची आहे. समोर तिकडे रा. भानू सभेच्या कामकाजाची टिपणें घेत आहेत तें मला दिसतंय. तेव्हां त्यांना म्हणावें, कीं मी, इतका वेळ जें कांय बोललों तें बोललों नाहीं असें समजावें, व तशी टांचणांत नोंद त्यांनीं घ्यावी ! ! "

बँकेचा एक नोकर या नात्यानें, दरसालप्रमाणें, मी या वार्षिक सभेचा वृत्तांत म्हणून नोट्स घेत होतों.

अध्यक्षांनीं मजकडे वळून मला विचारलें, " भानू, तुम्ही कोठपर्यंत नोट्स घेतल्या आहेत ? "

मी उठून उभा राहून उत्तरलों, " मॅनेजिंग डायरेक्टर यांच्या खुलाशानंतर श्री. तात्यासाहेब केळकर यांचें शंकानिरसन झालें व ते म्हणाले —

कीं, 'इतका वेळ मीं जें बोललों तें मी बोललोंच नाहीं असें समजून त्याची तशी नोंद घ्यावी.' येथपर्यंत मीं नोट्स घेतलेल्या आहेत."

तात्यासाहेबांनीं हंसत हंसत मला उद्देशून विचारलें, "सभेच्या टाचणांत तेंहि नोंदवून घेतलें आहे काय!"

"होय, सभेंत होणाऱ्या कामकाजांचें टांचण मी घेतों आहें" मीं त्यांना उत्तर दिलें.

ते खूपच मोठ्यांदा हंसूं लागले व साऱ्या सभेंतहि हास्यरस निर्माण झाला. श्री. तात्यासाहेबांचा गैरसमज केव्हांच नाहींसा झाला होता!!

या प्रसंगीची ही आठवण मी कधींहि विसरणें शक्य नाहीं. सभेंत हजर असणाऱ्या सर्वांना त्या प्रसंगाची आठवण राहीलच. कारण या प्रसंगाने श्री. तात्यासाहेबांच्या स्वभावांतील आपुलकीची तीव्र भावना, हल्ला चढविण्याची वृत्ति, समाधान होतांच तें कबूल करून माघार घेण्याची प्रवृत्ति आणि विनोदाचा स्वीकार कौतुकपूर्ण करण्याची तयारी यांचें दिग्दर्शन भरपूर होतें आहे.

बाळकृष्ण मार्तंड चौंडे

(प्रसिद्ध गोरक्षण कार्यकर्ते, वाई)

गोवर्धन संस्थेचें कार्य सुरू झाल्यापासून त्याची आर्थिक व्यवस्था पंचामार्फत होत जावी, यावर माझा पहिल्यापासून कटाक्ष. प्रारंभीं वाईक्षेत्रापुरतीच कार्याची मर्यादा असल्यामुळें, स्थानिक मंडळीच्या देखरेखीखालीं जमाखर्च होत असे. नंतर पुण्या-मुंबईस कार्य आल्यावर व महाराष्ट्रांतील श्रीमान प्रतापशेट अमळनेरकर, येवल्याचे शेट वल्लभदास मुरलीधर यांच्यासारख्या दानशूरांनी मोठमोठ्या रकमांचें साह्य केल्यावर संस्थेच्या सर्व मिळकतीचा ट्रस्ट करण्यांत येऊन महाराष्ट्रांतील कांहीं प्रमुख ट्रस्टींच्या देखरेखीखालीं संस्थेचा सर्व कारभार चालूं झाला. त्यानंतर मुंबईचें गोवर्धन भवन ३।। लाख रुपयांस संस्थेसाठीं खरेदी देण्याचें ठरलें. तेव्हां ही नवी मत्ता संस्थेच्या ट्रस्टडीडमध्यें समाविष्ट करतांना भारी किमतीचा स्टँप भरण्याचा प्रसंग आला, म्हणून तात्यासाहेबांचा सल्ला घेण्यासाठीं मी त्यांच्याकडे गेलों. त्या वेळीं अत्यंत सहानुभूतीनें विचार करून तात्यासाहेब म्हणाले, "हजारो लोकांच्या लहानमोठ्या रकमांचें साह्य तुमच्या संस्थेस झालें आहे. ट्रस्टडीडमुळें सर्व देणगीदारांना संस्थेच्या कारभारांत आपला हात आहे, असें वाटत नाहीं. सध्या लोकशाहीचें युग आहे. यासाठीं संस्था रजिस्टर करून टाकलेली बरी असें मला वाटतें." ट्रस्टींच्या संमतीनें मीं तात्यासाहेबांच्या या बहुमोल सूचनेला

'हो'कार दर्शवितांच त्यांनीं घटनेची स्थूल रूपरेषा श्रमपूर्वक स्वतः तयार करून दिली व नंतर श्री. तात्यासाहेब गोखले वकील यांच्या साह्यानें तिला कायदेशीर स्वरूप देऊन संस्था रजिस्टर करण्यांत आली.

(२) 'कांहीं कामासाठीं आपणांकडे भेटावयास केव्हां येऊं ?' अशी मीं पत्रद्वारें तात्यासाहेबांच्याकडे विचारणा केली होती. त्या पत्राच्या उत्तरांत 'मला कांहीं कामासाठीं तिकडच्या भागांत यावयाचें आहे. मीच तुम्हांस येऊन भेटेन,' असें लिहून तात्यासाहेब स्वतःच संस्थेच्या कचेरींत आले. १९३० ते १९३२ च्या दरम्यानची ही गोष्ट असेल. संस्थेच्या कामाविषयींची चर्चा आटोपल्यावर चालू राजकीय परिस्थितीसंबंधीं बोलणें निघालें असतां तात्यासाहेबांच्या तोंडून खालील उद्गार निघाले, "लोकांच्या दृष्टीनें माझी देशभक्ति दोन आणे कमी ठरली तरी हरकत नाहीं. पण केवळ लोकरंजनाकरितां मी तुरुंगांत जाणे मला योग्य वाटत नाहीं. मी स्वतः तुरुंगांत जाण्यापेक्षां बाहेर राहून माझ्या हातून केसरीचें लेखन अथवा इतर जें कार्य होत आहे, तें तुरुंगांत जाण्यापेक्षां जास्त महत्त्वाचें आहे, असें जोंपर्यंत मला वाटत आहे, तोंपर्यंत मी तुरुंगांत जाण्याचा मार्ग पत्करणार नाहीं व त्याबद्दल कोणास कांहीं वाटलें तरी त्याची पर्वा मी करणार नाहीं."



शं. स. डोळे

(धेनुदास, पुणें)

(१) भोजनोत्तर वामकुक्षी करण्याचा तात्यासाहेबांचा नित्यनेम. त्यांना कसलेंच व्यसन नव्हतें; पण वामकुक्षीची मात्र तल्लफ होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या वामकुक्षींतहि त्यांनीं आपणहून एका सत्कार्यास साह्य करण्याच्या इच्छेनें विक्षेप आणला ही आठवण नमूद करण्यासारखी आहे. संस्थेच्या कार्यावर वृत्तपत्रांतून कांहीं आक्षेप घेण्यांत आले होते. सस्थेच्या नियामक मंडळांतील एका अधिकाराच्या जागेवर तात्यासाहेब असल्यामुळें या बाबतींत स्वतः लक्ष घालण्याची आपल्यावर जबाबदारी आहे, हें ध्यानीं घेऊन तात्यासाहेब संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या दि. ५।८।३८ च्या सभेस ऐन उन्हाच्या वेळीं उपस्थित राहिले. वास्तविक ती वेळ त्यांच्या वामकुक्षीची होती. अंगांत सदरा, डोक्यावर टोपी व अंगावर एक उपरणें घेऊन टांग्यांतून तात्यासाहेब सभेच्या ठिकाणीं आले. सभेंतील वादविवाद त्यांनीं ऐकला. सर्व कारभाराची चौकशी केली. खोलांत जाऊन कागदपत्रांचे आधारहि पाहिले व कांहीं सूचनाहि केल्या. इतकेंच नव्हे तर लगेच दि. १२-८-३८ च्या 'केसरी' त स्वतः लेख लिहून आपलें

मत जगजाहीर केलें. यावरून कोणत्याहि संस्थेंतील अधिकाराची जागा नुसत्या मानाकरितां न अडविता कार्याच्या खऱ्या तळमळीनेंच ती तात्यासाहेब स्वीकारीत असतील, असें अनुमान काढल्यास तें चुकीचें होणार नाहीं. ज्या गोवर्धन संस्थेच्या नियामक मंडळावर आपण आहोंत, जिच्या कार्यांत आपण थोडेंबहुत लक्ष घालतों, तिची भरभराट व्हावी, एका राष्ट्रोपयोगी कार्याची प्रगति व्हावी, म्हणून सर्व तऱ्हेची पूर्ण खात्री करून घेतल्यानंतर सदरहू लेखांत तात्यासाहेबांनीं जनतेस केलेली सूचना म्हणजे गोवर्धन संस्थेस मिळालेला अखंड आशीर्वाद होय. त्या लेखांत शेवटीं तात्यासाहेब लिहितात – "गोरक्षण-गोवधबंदी यासंबंधीं चौंडेमहाराजांनीं जितका मतप्रसार केला तितका कोणाच्याहि हातून झाला नाहीं आणि होणार नाहीं. म्हणून जनतेनें निःशंक चित्तानें व सढळ हातानें त्यांना साह्य करावें असें मला वाटतें."

(२) 'आधीं केलें मग सांगितलें' हा श्रीसमर्थांचा दंडक तात्यासाहेबांच्या कृतींत होता. वरील आठवणींत उल्लेख केलेल्या ज्या सभेंत तात्यासाहेब उपस्थित होते त्या सभेच्या प्रसंगीं संस्थेच्या कारभाराची बारकाईनें माहिती त्यांनीं घेतली. तेव्हां संस्थेवर कर्जाचा बोजा आहे व तें कर्जहि जास्त व्याजाच्या दराचें आहे, असें त्यांना आढळून आलें. त्यांनीं कार्यकर्त्यांस सुचविलें कीं, "तुम्ही चार साडेचार टक्के व्याजाच्या दरानें ठेवी घेण्याचें जाहीर करा, हितचिंतकांकडून ठेवी मिळवा आणि जास्त दराचें कर्ज ताबडतोब फेडून टाका." एवढा कोरडा उपदेश करूनच तात्यासाहेब थांबले नाहींत. लगेच "मी माझी स्वतःची ५०० रु. ची ठेव देतों," असें म्हणून ठेवीची रक्कम तत्काळ संस्थेकडे त्यांनीं पाठविलीहि! १९३२ सालीं त्यांच्या वाढदिवसाच्या वेळीं त्यांनीं गोरक्षण संस्थेस एक हजार रुपयांची देणगी दिली हें प्रसिद्धच आहे.

❋

विष्णु महादेव भट

(एम्. बी. बी. एस्., डॉक्टर, येवलें)

(१) कै. तात्यासाहेबांच्या महत्त्वाच्या कांहीं आठवणी माझ्या हृदयावर आजन्म कोरलेल्या आहेत. मी १९१५ मध्यें तुरुंगांतून सुटून आल्यावर १९१६ मध्यें केसरी-मराठा संस्थेंत सहसंपादक म्हणून लो० टिळकांनीं मला घेतलें. प्रारंभींचा माझा मराठ्याचा मजकूर कधीं कधीं तात्या नजरेखालून घालीत व उपयुक्त सूचना देत. अनेक वेळां तोच मुद्दा लिहावा लागला तरी हरकत नाहीं; पण मोजक्या, नेमक्या, चुरचुरीत शब्दांत विषय प्रतिपादन व्हावें, यावर त्यांचा मोठा कटाक्ष असे. केसरीच्या वर्तमानसारांत एकदां चाचिलच्या आईच्या पुनर्विवाहाबद्दल मीं तीनचार ओळींतच ती बातमी दिली होती. पाश्चात्यांत कन्यादानासारखी

पद्धति थोडीशी आहे. लग्न लावतांना वधूकडचा 'Best man' कुणी तरी व्हावा लागतो. आईच्या पुनर्विवाहाच्या वेळीं खुद्द हल्लीचे चर्चिलसाहेब हेच 'Best man' झाले होते! त्याचें वर्णन "आईचें कन्यादान चिरंजिवांनीं केलें!" असें मीं म्हटलें होतें. त्यावर तात्यांनीं एकदम पसंतीचा शेरा मारला आणि असेंच स्वल्पाक्षर बव्हर्थ लिहिणें पाहिजे, म्हणून मला बजाविलें होतें.

(२) ज्या विषयावर लिहावयाचें त्याचा शक्य तितका अभ्यास करून तात्या लिहीत. मलाहि तीच पद्धति आवडे. त्यामुळें माझ्या लेखांकडे तात्यांचें व लो. टिळकांचेंहि लक्ष वेधलें होतें. मॉंटफर्ड सुधारणांच्या आगोदर, वाटाघाटी चालूं असतां, टिळकांनीं तात्यांना जेव्हां (A Case for Home Rule) इष्ट सुधारणांचा खलिता लिहावयास सांगितलें, तेव्हां त्यांनीं त्या कामीं आपला मदतनीस म्हणून मला घेतलें होतें आणि त्याबद्दल तात्यांनीं मजजवळ प्रशंसोद्गारहि काढले होते. वास्तविक मी त्यांचा शिष्यच होतों. पण त्यांनीं मला तसें कधीं भासूं दिलें नाहीं आणि त्या खलित्याच्या प्रस्तावनेंत त्यांनीं आपला मदतनीस म्हणून माझा उल्लेखहि केला होता. त्यांच्या या ममत्वामुळेंच त्यांनीं मला पुन्हां मेडिकल कॉलेजमध्यें जाऊन एम्. बी. बी. एस्चा कोर्स पुरा करण्यासाठीं टिळकांच्याजवळ गळ घातली होती.

तात्यांनीं वेळोवेळीं मला जी मदत केली ती मी आजन्म विसरणें शक्य नाहीं. त्यांच्या आग्रहामुळेंच लोकमान्यांनीं मला परवानगी दिली. तात्यांनीं टिळकांना अशीहि दुसरी गळ घातली होती कीं, उद्यां 'केसरी' बंद झाला तर आम्ही सगळे वकिली वगैरे कांही तरी करूं. भटांना कोणतीच पदवी नसल्यानें त्यांना फारच जड जाईल. त्यांतूनहि भट बेडखोर असल्याने सरकारी भीतीमुळें त्यांना कोणी खाजगी नोकरीहि देणार नाहीं. तेव्हां भटांना या संधीचा फायदा घेऊन द्या. या सर्व युक्तयाप्रयुक्तयांचा परिणाम होऊन मी ग्रँट मेडिकलमध्यें टिळकांच्या संमतीनें दाखल झालों. याबाबतींतले तात्यांचे मजवर शतशः उपकार आहेत. टिळक वारल्यावरहि त्यांनीं पैशांची मदत तशीच चालूं ठेवली होती. ममत्व म्हणतात तें हें.

(३) एम्. बी. बी. एस्. मी पहिल्या सपाट्यांतच पास झालों, याबद्दल त्यांना फारच आनंद झाला. त्या भरांतच ते म्हणाले कीं, "भट, आतां तुम्ही वैद्यकीचा धंदा करा." माझी इच्छा होती कीं, पास झालों तरी केसरींतच राहावें. पण तात्या म्हणाले कीं, वैद्यकीचा धंदा हा प्रत्यक्ष अनुभवानेंच शिकतां येतो. येथें केसरींत तुम्हांला त्याचा अनुभव मुळींच मिळणार नाहीं आणि शिकलेलें सर्व वायां जाईल, तरीं तुम्ही धंदा करावा हेंच योग्य. तुम्हांला वाटलें तर केसरींत केव्हांहि लिहीत जा. केसरी तुमचाहि आहे. मलाहि तें पटलें, आणि मी या व्यवसायांत शिरलों. पण पुढें जेव्हां तात्यांची एकसष्टी झाली, तेव्हां मी पुण्यास गेलों होतों. केसरीच्या

नव्या इमारतीहि पूर्ण झाल्या होत्या. संपादकांच्या सर्व संचाला पुरून उरलेली एक खोली शिल्लक होती. त्यापूर्वी मी येवल्याहून केसरींत अधून मधून लिहीत होतोंच. ते लेखहि त्यांच्या नजरेस पडले होते. मला पाहतांच ते म्हणाले कीं, "भट, पुन्हां केसरींत येतां का? तुमच्यासाठीं एक खोली रिकामी आहे." मीहि त्यांना "हो" म्हटलें. पण मग तेच म्हणाले कीं, "तशीच जरूर वाटली तर मी बोलवीन तेव्हां मात्र या." परंतु मग तशी जरूर त्यांना वाटली नाहीं, आणि मीहि पुन्हां केसरींत गेलों नाहीं.

(४) लोकमान्यांच्या निधनानंतर कांहीं दिवस केसरी संस्थेची व त्यांच्या मालमिळकतीची सुरळीत व्यवस्था लागेपर्यंत देण्याघेण्याचे व्यवहार कांहीं काळ तहकूब होते. त्याप्रमाणें, मी कॉलेजमध्यें असतां, माझ्या कुटुंबाला मिळणारी मदतहि तीनचार महिने बंद होती. त्यामुळें आमच्या घरची फारच तारांबळ उडाली. तेव्हां माझ्या पत्नीनें तात्यांना या अडचणीची जाणीव होईल असा निरोप पाठवला. तात्यांनीं ताबडतोब ४ महिन्यांची रक्कम २०० रु. एकदम बाबांच्या मार्फत पाठवून दिले. आणि घरीं स्वतः येऊन सांगितलें कीं, "केव्हांहि अडचण आली तर मला कळवीत जा. मुंबईस भटांना कळवूं नका. उगाच त्यांना काळजी लागेल आणि अभ्यासांत व्यत्यय येईल. टिळक गेले असले तरी तुम्हांला पन्नास रुपये दरमहा केसरीनें न दिले तर मी देईन!" याचप्रमाणें कै. बाबा विद्वांसांनींहि येऊन आश्वासन दिलें होतें. अंतरीचा जिव्हाळा असल्याशिवाय इतकें कोण करणार?

❋

मनुताई अभ्यंकर

(बालमनोहर मंदिर, सातारा)

माझे मामंजी कै. ती. दत्तात्रेय रघुनाथ अभ्यंकर व प. पू. कै. तात्यासाहेब केळकर यांचें जन्मस्थान एकच असल्यानें त्यांची मैत्री अत्यंत जिव्हाळ्याची आणि आजन्म अशी होती. तात्यासाहेबांनीं आपल्या जीवनक्रमांत जे अनेक व्यासंग केले ते सर्व सांभाळूनहि आपली मैत्री त्यांनीं कशी टिकवली याचें मला नेहमीं आश्चर्य वाटतें. त्यांचा हा एक गुण माझ्या ध्यानांत आला तो प्रसंग मी केव्हांच विसरणार नाहीं. माझे वडील ती. रा. स. जोशी, रि. प्रिन्सिपॉल ट्रे. कॉ. पुणें, हे सांगलीस असतांना मी त्यांच्याजवळ राहत असे. १९४४ च्या मे महिन्यांत कै. ती. तात्यासाहेब हिंदुमहासभेच्या कांहीं कामाकरितां सांगलींतील हिंदुमहासभेचे चिटणीस श्री. पंडितराव दांडेकर यांच्याकडे आले होते. त्यांच्या घराशेजारींच आम्ही राहत होतों. हें समजतांच ती. तात्यासाहेब स्वतः केवळ मजकरितां म्हणजेच पर्यायानें आपल्या दिवंगत मित्राच्या सुनेचा क्षेमसमाचार विचारून आपल्या मैत्री-

तील जिव्हाळा व्यक्त करण्याकरितां आले. अलीकडे वृद्धापकाळामुळें त्यांचे पाय दुखत असत. परंतु स्वतःचें शारीरिक दुःख बाजूला सारून अनेक सार्वजनिक कामांचा अमोल वेळ खर्चून ऐन दुपारीं तीन वाजतां जिना चढून धापा देत माडीवर आमच्याकडे आले आणि मला चार समजुतीच्या उपदेशपर गोष्टी सांगून गेले. त्या प्रसंगानें माझ्या मनांत असलेला त्यांच्याविषयींचा आदर द्विगुणित झाला यांत आश्चर्य नाहीं.

❋

वासुदेव बळवंत जोशी

(बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट, मुंबई)

कै. लोकमान्य टिळकांच्या मुंबई येथील स्मारक-कमिटीनें म. गांधी यांना चौपाटीवरील टिळक-पुतळ्याच्या अनावरण-समारंभासाठीं निमंत्रण दिलें होतें. परंतु म. गांधी हे मुबईस असतांना त्या वेळच्या म. गांधींच्या सैतानी सरकारच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यांत नवयुगचा प्रेस देण्यासाठीं ते ता. ३१।७।३०रोजीं रात्रीच्या गाडीनें साबरमतीस गेले. म्हणून अशा वेळीं कमिटीनें श्री. मा. श्री. अणे यांना निमंत्रण दिलें व त्यांनीं आयत्या वेळीं समारंभास हजर राहून पुतळा अनावरण केला. मी त्या समारंभास चौपाटीवर हजर होतों. त्या वेळीं त्या सभेंत श्री. मा. श्री. अणे यांचे आभार मानतांना कै. तात्यासाहेब केळकर म्हणाले कीं, "एक अणे आले व सोळा आणे काम केलें." ह्या एका वाक्यांत किती विनोद व शब्दावरील कोटीचें औचित्य व समारंभाचें संपूर्ण यश दर्शविलें गेलें आहे, हें न सांगतां समजण्यासारखें आहे.

❋

सौ. शांताबाई नाशिककर

(लेखिका, पुणें)

(१) सन १९१८ मध्यें माझे पति श्री. दि. वि. गोखले हे वारले. त्या वेळीं माझ्या आईवडिलांच्या (कै. तीं. विद्याधर वामन भिडे आणि कै. सौ. सरस्वतीबाई) हृदयावर भयंकर आघात झाला. त्यांची मनस्थिति व्याकुळ होऊन गेली आणि या प्रसगीं काय करावें, कुणाला विचारावें, या दुःखनिवारणाचा उपाय काय, कोण आपल्याला मार्ग दाखवील या प्रश्नांनीं त्यांना सुचेनासें झालें. तासन् तास तीं उभयतां विचार करीत, अश्रु ढाळीत, माझ्याकडे त्यांना बघवेना. त्यांच्या मनांत असे विचार घोळूं लागले कीं, विधवांनीं कुंकूं लावायला काय हरकत आहे? त्या उभयतांनीं तर या विषयावर साधकबाधक चर्चा

केलीच. शिवाय आल्यागेल्या विद्वान् स्त्री-पुरुषांजवळहि आपले विचार मांडून दोघे त्यांच्याजवळ वादविवाद करीत. लोक अनुमति दर्शवीत; परंतु म्हणत, सर्व कबूल; पण समाजाला तें पटलें पाहिजे ना ? समाजाला पटलें पाहिजे म्हणजे थोर व्यक्तींनीं या विषयाला चालना दिली पाहिजे. म्हणजे आधीं आपण सुप्रतिष्ठित स्त्री-पुरुषांना भेटून त्यांच्यापुढें हा विषय मांडला पाहिजे, पटवला पाहिजे हें माझ्या आई-वडिलांना कळून आलें. त्या वेळीं लो. टिळक म्हणजे सर्व हिंदुस्थानचे अनभिषिक्त सम्राट् होते आणि त्यांचे पंतप्रधान म्हणजे श्री. न. चिं. केळकर. लो. टिळक जुन्या विचारांचे होते. माझ्याबद्दलची हकीकत मुंबईला श्री. छत्रे यांनी त्यांना सहजगत्या सांगितली असतां ते हळहळून उद्गारले, "काय करणार बिचारी! काळापुढें कुणाचें कांही चालत नाहीं. धीर धरून दुःख गिळलें पाहिजे खरें."

श्री. न. चिं. केळकर हे सुधारणावादी. शिवाय त्यांच्या मुलीवरील वैधव्यापत्तीमुळें एकप्रकारें समदुःखी; तेव्हां त्यांनाच या विषयावर विचारलें पाहिजे असें ठरवून माझ्या वडिलांनीं त्यांना निरोप पाठवला कीं, आमच्याकडे याल का ? आणि तेवढ्या निरोपावर त्या वेळीं कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर विराजमान असलेले श्री. तात्यासाहेब केळकर आमच्या घरीं आले याबद्दल माझ्या आईवडिलांना धन्य धन्य वाटलें. श्री. केळकर चांगले दीड-दोन तास बसले. मी त्या वेळीं केवळ पंधरा वर्षांची असल्यामुळें त्या बैठकींत बसलें नव्हतें. परंतु मागूनच्या घरांतील बोलण्यावरून मला थोडी हकिकत समजली. ती म्हणजे श्री. केळकर हे आमच्या घरीं आले एवढेंच नव्हे तर आपल्याला कशाकरितां बोलावलें असावें हें तर्कानें ओळखून आपल्या खिशांत एक पुनर्विवाहासंबंधी स्वलिखित असें लहानसें छापील पुस्तक वडिलांना देण्याकरितां ते घेऊन आले होते. कुंकवाचा विषय वडिलांनीं पुढें मांडतांच तें खिशांतील पुस्तक बाहेर काढून ते म्हणाले, "विधवेनें कुंकू लावणें इत्यादि गोष्टी किरकोळ झाल्या. खरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुनर्विवाह हीच. तुमच्या मुलीचा तुम्ही पुनर्विवाह करून द्या. झाल्या गोष्टीबद्दल नुसतें दुःख करून तुमच्या मुलीची पारिस्थिति सुधारणार नाहीं." माझे आईवडील ज्या ज्या शंका विचारीत त्यावर ते आपलें पुस्तक उघडून त्यांतून चटचट उतारे वाचून दाखवून विवरण करीत. आईनें विचारलें कीं, तुमच्या चंद्राताईचा पुनर्विवाह कां करून देत नाहीं? मोठ्या लोकांनीं एखादी विरुद्ध गोष्ट केली तरी लोक कांहीं बोलूं शकत नाहींत, फारसा विरोध दर्शवीत नाहींत. मग आमच्यासारख्या लोकांनीं पुढें पाऊल टाकलें तरी तितकासा त्रास होत नाहीं. तेव्हां श्री. केळकरांनीं उत्तर दिलें कीं, "माझ्या मुलीनें पुनर्विवाह केला तर मला आवडणार नाहीं असें नाहीं; पण मीं याबद्दल तिला पुष्कळ विचारलें; परंतु तिनें मला स्पष्ट सांगितलें कीं, मला पुनः लग्न करायचें

नाहीं." श्री. केळकर येऊन गेल्यामुळें माझ्या आईवडिलांच्या मनाला बराच विरंगुळा वाटूं लागला. शिवाय माझ्या बाबतींत त्यांनीं बऱ्याच सूचना केल्या असाव्या असें वाटतें. कारण पूर्वी माझ्यासंबंधींच्या सर्व गोष्टी घरांत माझ्या अपरोक्ष चालत. परंतु श्री. केळकर येऊन गेल्यानंतर त्यांचें पुस्तक मला आईनें वाचायला दिलेंच. आणि शिवाय पुनर्विवाहासंबंधीं स्पष्टपणें माझ्यासमोर घरांत वादविवाद होऊं लागले. माझे वडील त्यांना अष्टपैलू हिरा म्हणत. गणमात्रावृत्तांच्या कविता लिहिणारे केळकर सारेगमचें संगीत कसें आकलन करूं शकतात हें कोडें त्यांना कधीं उलगडलें नाहीं !

(२) पुढें १९४४ सालीं श्रीजिजामाता वाचनालयाच्या मदतीकरितां एक नाट्यप्रयोग होणार होता. त्याच्या प्रयोगाला उपस्थित राहावें म्हणून श्री. केळकर यांना आमंत्रण देण्याकरितां मी त्यांच्या पुष्करिणी-निवासांत सौ. यमुताई सहस्रबुद्धे यांच्याबरोबर गेलें असतां मी तुमच्या घरीं मागें आलेलों आहें म्हणून त्यांनीं मला आठवण दिली !

त्यांना बोलावणें केल्यावर, माझीं पुस्तकें मी आपणाकडे पाठवीन असें मीं म्हटलें, तेव्हां ते म्हणाले, " जरूर जरूर; मी वाचून अभिप्राय देईन. मीं तुमची 'लग्नाचा बाजार' ही कादंबरी वाचलेली आहे. मला ती आवडली फार."

मीं खरोखर माझीं सर्वच पुस्तकें पाठवायला हवीं होतीं; परंतु मला वाटलें यांना कुठला इतका वेळ मिळायला ! ते कसले आपल्या कादंबऱ्या वाचतात नि अभिप्राय देतात !

असा विचार करून मीं फक्त " माझीं कोरीव लेणीं " आणि " नीलेचा दिलरुबा " अशीं दोन पुस्तकें त्यांच्याकडे पाठविलीं. अभिप्रायार्थ म्हणून त्या वेळीं त्यांनीं पोच दिली. मला वाटलें, झालें, संपलें ! पुस्तकें पाठविल्याचें आतां विसरून जावें हें बरें.

आनंदाश्चर्याची गोष्ट अशी कीं, चारपांचच दिवसांनीं साहित्यसम्राटांनीं स्वहस्तें लिहिलेलें पत्र मला आलें. त्यांत त्यांनीं " कोरीव लेणीं " वर सविस्तर अभिप्राय दिलेला होता. धन्य त्यांच्या सौजन्याची व कर्तव्यजागृतीची !

❋

विनायक मोरेश्वर शारंगपाणी

(यवतमाळ)

पुष्कळ वर्षांपूर्वी यवतमाळ जिल्ह्यांत राजकीय जिल्हा-सभा लोकजागृतीकरितां होत असत. मी स्वतः प्रत्येक जिल्हासभेला हजर राहून एखाद्या ठरावावर भाषण करी. अशीच एक जिल्हासभा केळापूर तालुक्यातफें पांढरकवड्यास झाली.

अशा जिल्हासभेस कोणीतरी बाहेरचा प्रसिद्ध देशभक्त बोलावण्याची वहिवाट असे. पांढरकवड्याच्या सभेला कै. तात्यासाहेब अध्यक्ष होते. आमच्या गांवचे प्रिय पुढारी बापूजी अणे हे स्वागताध्यक्ष होते. मला वाटतें सुमारें पंचवीस वर्षांपूर्वीची ही गोष्ट असावी. मी गोरक्षणाचा ठराव मांडला व त्यावर माझें भाषण झालें. यानंतर मी पुणें येथें १९३७ सालीं आलों. नंतर कांहीं प्रापंचिक कारणामुळें १९४२ अखेरपावेतों तेथें वास्तव्य करणें भाग पडलें. माझी व तात्यासाहेबांची चार-सहा महिन्यांनीं कोठेंतरी विश्राम-मंडळांत किंवा रस्त्यांत भेट होई. तेव्हां ते मला दरवेळेस नमस्कार करावयाचे व हंसतमुख करून म्हणावयाचें कीं, "यवतमाळचे तुम्ही गोभक्त ना?" विलक्षण स्मरणशक्तीचा मला हा नमुना वाटतो.

❋

लीलाबाई पटवर्धन

(क. माधवराव पटवर्धनांचें कुटुंब, पुणें)

(१) नऊ-दहा वर्षें झालीं त्या गोष्टीला. तात्यासाहेबांच्या आमंत्रणावरून माधवरावांच्याबरोबर चहाफराळाकरितां मीहि त्यांच्या घरीं गेलें होतें. त्यांचा माझा जरी प्रत्यक्ष परिचय नसला तरी त्यांच्या सुविद्य कन्या व माझ्या गुरु डॉ. कमलाबाई देशपांडे यांचा माझा दाट परिचय होता. त्यांच्याबद्दल माझ्या मनांत अत्यंत आदर व मजबद्दल त्यांची आपुलकीची भावना मी माधवराव पटवर्धनांची पत्नी होण्यापूर्वीपासून जशी आज आहे तशीच तेव्हांहि होती. कै० माधवरावांना तात्यासाहेबांबद्दल फार आदर होता. त्यांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीसंबंधीं तात्यासाहेबांना मोठें कौतुक वाटत असे. आम्ही ज्या दिवशीं त्यांच्याकडे चहाला गेलों होतों त्या दिवशीच्या विविध गप्पांत भाषाशुद्धि हा विषय प्रामुख्यानें होताच. भाषाशुद्धीवरील चाललेल्या वादांत तात्यासाहेबांनींहि भाग घेतला होता. कारण त्याच सुमारास तात्यासाहेबांच्या परवानगीनें माधवरावांनीं आपला 'भाषाशुद्धिविवेक' हा ग्रंथ त्यांना अर्पण केला. माधवरावांसंबंधीची हीच भावना माधवरावांच्या मृत्यूनंतर तात्यासाहेबांनीं ठेवली होती; आणि त्यामुळेंच त्यांची माझी थोडी ओळख झाली. माधवरावांच्या मृत्यूनंतर कोल्हापूर सरकारकडून मला कांहीं वार्षिक वेतन किंवा 'ग्रॅच्युइटी' तरी मिळावी ह्याकरितां मुख्य प्रयत्न तात्यासाहेबांनीं केले व स्वतःच्या सहीनें एक पत्र त्यावेळचे कोल्हापूरचे दिवाण रावबहादूर सुर्वे यांजकडे पाठविण्याकरितां एक दिवस सकाळीं स्वतःच आमच्याकडे घेऊन आले व तें त्यांनीं माझे वडील रा. बाबासाहेब गरूड यांच्या स्वाधीन केलें.

(२) माधवराव वारल्यावर मीं एका वर्षांतच माधवरावांचा 'मधुलहरी व इतर कविता' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या सुमाराला प्रा. वामन मल्हार जोशी

मजकडे आले होते. कोणातरी मोठ्या साहित्यिकाची प्रस्तावना ह्या ग्रंथाला घ्यावी व ती तात्यासाहेबांचीच घ्यावी अशी सूचना मला त्यांनीं केली. मीं म्हटलें, 'माझा त्यांचा इतकासा परिचय नाहीं. तुसल्या माझ्या जाण्याचा उपयोग कितपत होईल त्याची मला शंका वाटते.'' वामनराव मला म्हणाले, "चल, मी तुला तेथें घेऊन जातों." त्यानंतर एक दिवस सकाळीं मी व वामनराव तात्यासाहेबांच्याकडे गेलों. आम्हीं तोंडांतून शब्द काढतांच तात्यासाहेबांनीं दोन शब्द त्या पुस्तकाला लिहिण्याचें ताबडतोब मान्य केलें. माधवरावांच्या मृत्यूनंतर स्थापन झालेल्या स्मारक-समितीचे ते अध्यक्ष होते हें सर्वश्रुत आहेच.

(३) ही जी ओळख झाली ती पुढें ते विसरले नव्हते. त्यांच्या जाण्या-येण्याची वाट माझ्या 'निवान्त' बंगल्यावरूनच. कित्येक वेळीं ते जेव्हां पायीं जात तेव्हां माझी त्यांची गांठ पडे. एक दिवस संध्याकाळीं मी शाळेंतून पायींच येत होतें. तात्यासाहेब समोरून येतांना मला दिसलें. माझ्याकडे त्यांनीं पाहिलें आणि ते क्षणभर उभे राहिले व अगत्यपूर्वक त्यांनीं माझी विचारपूस केली. असे ते अनेक वेळ मला वाटेंत भेटत. परंतु भेट झाल्यावर त्यांनीं कधीं कुशलप्रश्न व विचारपूस केली नाहीं असें झालें नाहीं. १९४६ सालीं मीं आपल्या 'निवान्त' बंगल्याचा दुसरा मजला वाढवला. बंगल्याचें काम सुरू असतांना एक दिवस तात्यासाहेब मला माझ्या फाटकापाशींच भेटले. त्यांनीं मला विचारलें, "घराला दुसरा मजला बांधतां काय ? भाड्यानें थोडी जागा देणार कीं नाहीं ?" मीं म्हटलें, "हो, भाड्यानें देण्याकरितांच तर दुसरा मजला बांधतें." "अजून शाळेला जातां का ?" मीं उत्तर दिलें, "जोंपर्यंत काम करवतें तोंपर्यंत करणार आहें. नाहीं त्या दिवशींची सोय म्हणूनच माडी बांधतें आहें." तात्यासाहेब लगेच म्हणाले, "शाबास, छान ! अशाच धैर्यानें वागा." कां कोणास ठाऊक ते पुढें सटकल्यावर माझ्या डोळ्यांत मला न कळत अश्रु उभे राहिले व मी आपल्या विचारांतच घरांत शिरलें. परंतु मला एक प्रकारचा उत्साह व मनाला आनंदहि वाटला. कारण एका फार मोठ्या माणसानें माझें कौतुक केलें होतें व धीर दिला होता. वास्तविक ज्यांच्या-मुळें माझा व तात्यासाहेबांचा थोडाबहुत संबंध आला ते जाऊनहि आठ वर्षें झालीं तरी तात्यासाहेब मला विसरले नव्हते. माझी चौकशी ते आपल्या आप्तस्वकीयां-प्रमाणेंच करीत.



गणपतराव गोडबोले

(बी. ए., एल्एल्. बी., वकील, सांगली)

(१) अेका खासगी भाषणांत तात्यासाहेब यांना असा प्रश्न विचारण्यांत आला कीं, "आपण कित्येक लोकांवर अनेक उपकार केलेले आम्हांस माहीत असून

त्यांनींच आपली निंदा करीत सुटावें हें आश्चर्य नव्हे काय!" तात्यासाहेब म्हणाले, "हल्लींचा काळच असा आहे कीं, हें असें घडणारच. कारण एक तर अशा निंदेपासून ज्याच्यावर आपण उपकार करतों तो कांहीं दुसराच लाभ साधीत असतो; शिवाय तुम्हीं ज्यांवर उपकार केलांत त्याच्यापासून मोबदला कां अपेक्षावा! आजचा मनू असा आहे कीं, ज्याच्यावर आपण उपकार केले त्याची फेड अनुपकारानें होणें हा नियम. अपवाद हा कीं, त्यानें कृतज्ञ असावें. सर्वांनीं केलेल्या उपकाराची कोणालाच परतफेड करतां येणार नाहीं; परंतु जाणीवबुद्धि ठेवणें मात्र खचित शक्य आहे. तशी कोणीं ठेविली तर त्याचे उलट आपण आभार मानावे. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें मला या निंदेबद्दल कांहींच वाटेनासें झालें आहे! उलट निंदा ही मनुष्याला शुद्धीवर ठेविते, ती अप्रत्यक्ष गुरूचें काम करते असेंच मी समजतों!"

(२) गु. तात्यासाहेब कांहीं कारणानें सांगली मुक्कामीं माझे पाहुणे होते. त्या वेळीं कवि साधुदास यांनीं आपलें एक पुस्तक परीक्षणासाठीं त्यांच्याकडे दिलें. ग्रंथ सुमारें तीनशें पानांचा होता. पुस्तक घेऊन ते खोलीमध्यें सुमारें एक तास बसले व नंतर साधुदास यांना अभिप्राय तोंडी देऊं लागले. मीं विचारलें, "तात्यासाहेब, इतक्यांत वाचून झालें?" त्यावर ते म्हणाले, "यांत तुम्हांला आश्चर्य कां वाटलें! वाचनाचा चांगला व्यासंग ठेवला म्हणजे मागील पुढील मजकुरावरून मधला मजकूर ध्यानीं येतो, तो अगदीं अक्षरशः वाचावा लागत नाहीं. हा थोडाफार सरावाचा प्रश्न आहे."

❋

सौ. मालती दांडेकर

(लेखिका, बुधगांव)

(१) विद्युत्-रेखा या माझ्या पुस्तकाच्या निमित्तानें तात्यासाहेब यांच्या परिचयाचा सुयोग आला. मला त्यांच्याकडून प्रस्तावना घ्यावयाची होती. परंतु माझी ओळख नव्हती मुळींच! तेव्हां माझे मेहुणे कॅप्टन नूलकर यांच्याबरोबर मी एकदां त्यांच्याकडे गेलें. त्यांनीं माझा हेतु सांगतांच तात्यासाहेबांनीं प्रसन्न हास्य करून म्हटलं – "सह्याद्रीमध्यें कधीं कांहीं लिहिलं आहांत का?' मीं नम्र उत्तर दिलं कीं, 'सुखी संसार' अंकांत मीं एक निबंध दिला होता, अन् 'विशुद्ध प्रेमकथा' अंकांतहि माझी गोष्ट प्रसिद्ध झाली आहे 'वादळ' नांवाची!" ते मग म्हणाले – "म्हणजे 'विशुद्ध प्रेमाची' तुम्हांला स्पष्ट कल्पना आहे एकूण! हें ठीक आहे. नाहीतर हल्लींच्या नव्या लेखकांना नेमकी हीच गोष्ट समजत नाहीं! बरं वाचून दाखवा, तुमचा एखादा विद्युत्-रेखेंतला लेख पाहूं –?"

मीं 'तपस्विनी' हा लेख वाचला. जन्मभर कुटुंबासाठीं झिजणाऱ्या एका बालविधवेच्या तापस जीवनाचें तें शब्दचित्र ऐकून तात्यासाहेब क्षणभर गंभीर झाले. अन् म्हणाले – "छान साधलं आहे. मला आवडलं. तुम्ही नव्या लेखिका असलां, तरी उत्तम स्त्री-जीवनचित्रें रेखाटाल असें दिसतें. मी याला अवश्य प्रस्तावना लिहीन. बाकी तुम्हीं आतां वाचल ना? तशा तपस्विनी समाजांत किती असतात! पूर्वीच्या एकत्र कुटुंबांतून एखादी तरी अशी स्त्री असे. आमच्याहि घरांत एक तपस्विनी होती. अगदी हेंच आयुष्य! बरं, मला छापील प्रुफें पाठवा. हस्तलिखित वाचतांना जरा त्रास वाटतो. प्रुफें पाहून प्रस्तावना पाठवीन. तुम्हीं चांगलं लिहिलं आहे. असाच व्यासंग ठेवा!"

(२) यानंतर तात्यासाहेबांनी माझ्या माहेरच्या घराण्याची बारीक चौकशी केली. सासरचीहि केली. त्या उतारवयांतहि त्यांची मुद्रा लोकांचा आदर खेचून घेईल अशी प्रसन्न, गंभीर दिसली. नव्या माणसाबरोबराहि ते तास-दीड तास किती रंजक भाषण करूं शकतात याची आम्हाला साक्ष पटली. त्या तास-दीड तासांतहि त्यांची बहुश्रुतता अन् चतुरंग विद्वत्तेची झळाळी त्यांच्या संभाषणांतून प्रकट होत असलेली पाहण्याचं भाग्य मला लाभलं. नव्या कलावंताला उत्तेजन देण्याचा दुर्मिळ गुण मला तेथें आढळला. त्या थोर व्यक्तीच्या परिचयाचा हा अमूल्य दीड-तास मला भाग्याचा वाटतो अगदीं! खरंच! किती सुंदर, मार्मिक प्रस्तावना दिली तात्यासाहेबांनीं माझ्या विद्युत्‌रेखेला! पण त्यापेक्षांहि त्यांचा सहजगत्या मला मिळालेला आशीर्वादच मला अधिक स्फूर्ति देतो – "तुम्ही उत्तम स्त्रीजीवन-चित्रें रेखाटाल असें वाटते. असाच व्यासंग ठेवा!" हा तो आशीर्वाद!



लक्ष्मण विनायक आगाशे

(एम्. ए., प्राध्यापक, पुणें)

(१) झालीं पांच वर्षे त्या गोष्टीला. एक दिवस मी बाजारांतून घरीं आलों तों माझ्या थोरल्या बंधूंनीं मला हांक मारून सांगितलं, "ते गेले नं तूं आलास! आत्तां तात्यासाहेब केळकर येऊन गेले, त्या आपल्या लेखाबाबत." माझ्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचें हें पहिलेंच अनौपचारिक येणें होतें आमच्या घरीं; त्यामुळें मला थोडी चुटपुट लागून राहिली. पण त्याच वेळीं तात्यासाहेबांच्या असामान्य व्यक्तिमत्वांतील एक पैलू मला दिसला! माझ्या बंधूंनीं (त्र्यं. वि. आगाशे) सत्याग्रहासाठीं 'काल व आकाश' याविषयीं आधींच्या अंकांत आलेल्या एका लेखावर एक खंडनात्मक अभ्यासपूर्ण लेख लिहिला होता. त्या लेखाबाबत संपादकांशीं थोडासा मतभेद झाल्यामुळें मी तो लेख तात्यासाहेबांकडे एके दिवशीं

संध्याकाळीं नेऊन दिला व सर्व हकिकत निवेदन केली व "मी पुन्हां चार-पांच दिवसांनीं येईन" असें सांगून परतलों. दुसऱ्याच दिवशीं सकाळीं तात्यासाहेब घरीं येऊन उभे! त्यांनीं रात्रींच तो लेख वाचून संपवला व सकाळीं आमच्या घरीं आले व त्या लेखावर चर्चा करून त्यांनीं तो लेख समग्र छापला! हा त्यांचा कामाचा उरक व आस्थेवाईक स्वभाव हे गुण त्यांचें विशिष्ट व्यक्तिमत्त्व बनविण्यास कारणीभूत झाले आहेत.

(२) अभ्यासू माणसांना अनेक प्रकारें साहाय्य करण्याची तात्यासाहेबांची तत्परता आठवली कीं, खरोखरच किती माणसें किती तऱ्हेनें, त्यांच्या निधनामुळें पोरकीं झालीं आहेत याची कल्पना येते. गेल्या युद्धांतील हिटलरच्या सरशींचा काल होता. त्यावें 'स्वस्तिक' गाजून राहिलें होतें. डॉ. अरुंडेल वगैरे हिटलरच्या स्वस्तिकाच्या अशुभतेबद्दल बरेंच लिहून राहिले होते. त्या वेळीं "Which is the correct Swastik 卐 or 卍?" ह्या मथळ्याचा एक संशोधनात्मक व वरील मंडळींच्या मताच्या खंडनात्मक प्रबंध माझ्या बंधूंनीं लिहिला. तो प्रसिद्ध करण्यापूर्वी तात्यासाहेबांचें मत अजमावण्यासाठीं तो त्यांना वाचावयास दिला. तो वाचून ते म्हणाले, "हा लेख चांगल्या विचारवंतांच्या पुढें येईल अशा रीतीनें प्रसिद्ध केला पाहिजे." लगेच त्यांनीं "प्रबुद्ध भारत" ह्या मासिकाचें नांव सुचवलें व ताबडतोब, लेखासोबत धाडण्यासाठीं, एक सुंदर परिचय-पत्र लिहून दिलें. इतकेंच नव्हे, तर त्याचें मराठींत भाषांतर करून आणावयास सांगितलें, सह्याद्रींत छापण्यासाठीं. बंधूंच्या अतिशय खराब व अनिश्चित प्रकृतीमुळें तें भाषांतर करणें तसेंच अर्धवट पडलें आहे अजून ही गोष्ट निराळी!



कै. लक्ष्मीबाई कोल्हटकर

(श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम, माटुंगा)

तात्यासाहेब यांची चिरस्मरणीय देणगी – त्यांचें संस्थेवरील प्रेम व त्यांचा माझा जुना परिचय असल्यानें ते मुंबईस आल्यावेळीं संस्थेला आपुलकीनें वरचेवर भेट देत असत. प्रत्येक वेळीं मी त्यांना येथील महिलांच्या कांहीं सत्यकथा निवेदन करीत असे. अशाच एके वेळीं मी त्यांना खालील नवी नवलकथा सांगितली :–

"कोकणांतील एका मराठा स्त्रीचा नवरा बेळगांवला मिलिटरींत होता. तो एकदां दोनच दिवस घरीं येऊन गेला. लगेच कांहीं दिवसांनीं ती स्त्री आपल्या माहेरीं राहावयास गेली. थोड्याच दिवसांत ती गरोदर असल्याचा संशय आई-

वडिलांना आला. नवरा दूर असल्यामुळें तिचें वांकडें पाऊल पडलें असावें असें स्वाभाविकच आईवडिलांना वाटले. त्यांनीं तिला तसें विचारतांच तिनें परोपरीनें निर्वाळा दिला. परंतु आईवडिलांना तो पटला नाहीं. जातीमध्यें बोभाटा होण्यापूर्वी अत्रूला भिऊन त्यांनीं मुलीला आश्रमांत पोंचविलें. ती मुलगी घाबरून गेली. नवऱ्याला पत्राने कळवावें तर तिला लिहितांवाचतां येत नव्हतें. आश्रमांत मुलीची वागणूक चांगली होती. स्वभाव सालस होता. तिची उदासीनता पाहून मीं तिला मायेनें माहिती विचारतां तिनें खुलासा केला, "नवऱ्याची व माझी रात्रीं भेट झाली होती. त्यांच्याशिवाय इतर माझा कोणाशींच संबंध आलेला नाहीं" इत्यादि संगतवार माहिती सांगून ती रडूं लागली. मला तें पटलें व वाईटहि वाटलें. मीं तिला समजावलें. परळला तिचा भाऊ राहात होता. त्याला बोलावून सर्व सांगितलें. नंतर तिच्या नवऱ्याला ही गोष्ट समजतांच तो बेळगांवाहून थेट मुंबईला आला आणि तिच्या भावाला घेऊन आश्रमांत आला. घरांतील अडाणी माणसांच्या गैरसमजुतीमुळें माझ्या बायकोला गुन्हेगार समजून येथें यावें लागलें याचें त्याला फार दुःख झालें. त्याच्या बायकोच्या वर्तनाचा त्याला पूर्ण विश्वास होता. लवकरच सर्व समजलें व बायको भेटली म्हणून त्याला अत्यंत आनंद झाला. उभयतांची भेट अपूर्व वाटली. होणारें मूल माझेंच आहे असें स्वाभिमानानें सांगून संस्थेचे आभार मानून तो बायकोला आनंदानें घरीं घेऊन गेला."

ही हकिगत ऐकतांच तात्यासाहेबांना मोठें आश्चर्य व कौतुक वाटलें; कारण थोडे दिवसांपूर्वी त्यांनीं एक अशीच कादंबरी लिहिली असून येथेहि त्याच स्वरूपाची घटना घडून यावी, हा योगायोग विलक्षण वाटून त्याचें निदर्शक म्हणून "जगाची रीत" ही त्यांनीं लिहिलेली कादंबरी सर्व हक्कासह आश्रमाला देण्याचा त्यांनीं संकल्प केला आणि तसें त्यांनीं सेक्रेटरींना कळविलें. त्याचें उत्पन्न संस्थेला मिळावे अशी ही साहित्यपरिचय देणगी साहित्यसम्राटाकडून आम्हांला कायमची मिळाली आहे. त्या कादंबरीला ना. डॉ. मुकुंदराव जयकर यांनीं प्रस्तावना लिहिली आहे.

"मूळ नांव, गांव वगळूनदेखील बायकामुलांच्या कहाण्या लिहून स्वतंत्र पुस्तक छापलें असतां आपल्या चुका समजावून देणारें समाजसुधारणेला अत्यंत उपयुक्त असें तें पुस्तक ठरेल," असें त्यांनीं उद्गार काढले व तसें पुस्तक निघावें अशी त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली.



ग. स. महाजनी

(रँग्लर, माजी प्रिन्सिपॉल फर्ग्युसन कॉलेज, पुणें)

(१) तात्यासाहेब यांची व माझी अगदीं प्रथम केव्हां भेट झाली हें आठवत नाहीं. परंतु त्यांच्याशीं एकच वाक्य बोलण्याचा शेवटचा योग आला. तो त्यांच्या निधनाच्या पूर्वी नऊ दिवस. तो असा :– रविवार तारीख ५ ऑक्टोबर रोजीं सायंकाळीं क्रिकेटपटु प्राध्यापक देवधर यांच्या कन्येच्या विवाहाबद्दलची पानसुपारी टिळकतलाव रस्त्यावरच्या भावेस्कूलमध्यें होती. तिकडे मी व माझी पत्नी असे उभयतां जिमखान्याच्या इमारतीच्या बाजूनें जात होतों. पुढील मैदानावर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कांहीं कार्यक्रम चालला होता व तात्यासाहेब जवळ चौथऱ्यावर बसून तो पाहत होते. डोक्यास पगडी होती व जवळ एक दोन गृहस्थ होते. आम्हांला पाहिल्याबरोबर "कां कुणीकडे?" असा त्यांनीं हंसतमुखानें प्रश्न केला. "लग्नाला जाऊन येतो" असें मी उत्तर दिलें. "ठीक" म्हणून तात्यासाहेब हंसले व त्यांनीं मान हलविली. तें दृश्य मात्र विसरणें शक्य नाही. ही शेवटची भेट न विसरली जाण्यास आणखीहि एक कारण आहे, तें असें. तात्यासाहेबांना उत्तर देऊन चालूं लागतांच माझी पत्नी मला म्हणाली, "चुकलं तुमचं ! 'जातों आम्ही द्वारकापुरा' एवढंच तुम्ही म्हणाला असतात तरी 'लग्नाला' असं तात्यासाहेब खास उमगले असते इतके ते रसिक आहेत !" 'खरंच चुकलं, सधि गेली' असें मी बोललों व आम्हीं पुनः मागें वळून पाहिलें तों ती स्वारी हंसत हंसत शेजारच्या गृहस्थांशीं बोलत होती.

(२) लेखनांत, संभाषणांत मार्मिकपणें व अलंकारिक रीतीनें विचार प्रदर्शित करणारीं माणसें थोडींच; पण त्यांच्यापेक्षांहि गुणग्रहण करणारे व त्यापासून खरा आनंद ज्यांना होईल असे विद्वानहि पण विरळाच. "वृद्धांच्या गुणग्रहणानें तरुण कार्यकर्त्यांच्या अंगावर मूठभर मांस चढतें" असे उद्गार तात्यासाहेबांनींच फर्ग्युसन् कॉलेजच्या हीरक महोसत्व प्रसंगीं भाषण करतांना काढले होते. पण सर्वच वृद्धांच्या गुणग्रहणानें मात्र नव्हे ही पुस्ती जोडली पाहिजे. गुणग्रहण करणारे वृद्धहि तसेच अधिकारी पाहिजेत. तात्यासाहेब ही अशी महनीय व्यक्ति होती कीं, साहित्यक्षेत्रांत कोणत्याहि नामवंत लेखकाला त्यांची शाबासकी शिरोधार्य वाटावी; असा हा लेखकांचा पुरस्कर्ता लेखक गेला व महाराष्ट्राचें एक पर्व संपलें."

(३) फर्ग्युसन कॉलेजचा मी १९२९ मध्यें प्रिन्सिपॉल झाल्यानन्तर एक दोन वर्षांतच तात्यासाहेब आमच्या सोसायटीच्या कौन्सिलचे सभासद निवडून आले. हा संबंध अखेरपर्यंत राहिला, एवढेंच नव्हे, तर शेवटीं ते कौन्सिल व गव्ह-

निंग बॉडी दोन्हींचे उपाध्यक्ष होते. ज्या कॉलेजमध्यें आपण एकेकाळीं विद्यार्थी होतों त्याच्याशीं एक अर्ध शतकानन्तर असा संबंध आला ह्याबद्दल त्यांना अभिमान वाटे व त्यामुळें संस्थेतील काम करणाऱ्या आम्हां तरुण लोकांना फारच उत्साह येई. वयाच्या दृष्टीनें मी त्यांच्याहून एक पिढीहून जास्तच लहान – म्हणून संस्थेच्या कामाशिवाय त्यांच्याकडे जाण्याचा फारसा योग येत नसे. पण अडीअडचणीला प्रिन्सिपल म्हणून मी जेव्हां त्यांच्याकडे जाई, त्या वेळीं त्यांच्या थोरपणाची कल्पना येई. वागण्यांत, वागविण्यांत व बोलण्यांत ते कधींहि वयाचें अंतर भासूं देत नसत !

(४) केळकरांचें लिखाण विस्तृत आहे व व्यापकहि आहे. साहित्याच्या प्रत्येक दालनांत त्यांनीं पाऊल टाकलें. त्यांच्या ग्रंथांचें योग्यतामापन करायला प्रतिकेळकरच हवा ! मी त्यांचें व्याख्यान सहसा चुकवीत नसे. त्याचें कारण म्हणजे त्यांच्या मार्मिक कोट्या व उपमा ! " उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् " हें आपल्याला माहीत आहे. पण एका प्रसंगीं सरदार किबे यांच्यापेक्षां त्यांच्या पत्नींचें साहित्य " कांकणभर अधिक " ही तात्यासाहेबांनीं केलेली शब्दयोजना पाहून श्रोत्यांच्या टाळ्या व सौ. किबे यांच्या "कांकणां"चा आवाज ऐकून कालिदासानेंसुद्धां आनंदानें धन्योद्गार काढले असते !

(५) लो. टिळकांच्या पश्चात् त्यांचें राजकारण टिकविण्याची व केसरीच्या संपादकत्वाची जबाबदारी केळकरांनीं तत्परतेनें व निष्ठेनें संभाळली. एका विविक्षित पक्षाच्या प्रणालींत काम करीत असतांनासुद्धां त्यांच्या मनाची बैठक व्यापक होती आणि पष्ठ्यब्दिपूर्तीनंतरच्या पंधरा वर्षांत तर तात्यासाहेबांची सार्वजनिक आयुष्यांत पक्षातीत अशीच भूमिका राहिली. विविध पक्षांतील अनेक लोक त्यांचा सल्ला विचारीत, आणि प्रत्येकाला त्यांच्या परिस्थितीशीं समरस होऊन ते हिताच्या गोष्टी सांगत. ते जेव्हां आमच्या सोसायटीच्या कौन्सिलवर निवडून आले तेव्हां ते टिळकपक्षीय आणि आतां सोसायटींत त्यांचे कसें जमणार अशी कांहींनीं शंका व भीति प्रदर्शित केली होती; पण त्यांचें जमलें एवढेंच नव्हे तर त्यांचा संबंध व त्यांचें सभासदत्व संस्थेच्या उत्कर्षाला पोषक झालें. असो. " समग्र केळकर "च्या लेखकाबद्दल एक आठवण लिहायलासुद्धां ज्या शब्दसंपत्तीची जरूरी आहे ती माझ्याजवळ नसल्यामुळें मी येथेंच लेखणी आवरती घेऊन तात्यासाहेबांच्या स्मृतीस अत्यंत नम्रभावानें प्रणाम करतों.

❋

पां. वा. काणे

(एम्. ए., एल्एल्. बी., एल्एल्. एम्., कुलगुरु, विद्यापीठ, मुंबई)

(१) सन १९२१ मधील बडोदा साहित्य संमेलनाच्या वेळची गोष्ट आहे. हे संमेलन फार मोठ्या प्रमाणावर झालें व अनेक कारणांनी तें गाजलें; त्यांतील दोन कारणें सांगण्यासारखीं आहेत. एक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून तात्यासाहेब यांनीं केलेलें भाषण व दुसरें महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ट्रस्टी प्रि. रा. ग. पाध्ये यांच्याबरोबर बडोदें येथील मंडळींनी आयत्या वेळी सुमारें पाऊणशे सभासद करून त्यांची मतें घ्यावीं असा आग्रह करून जो खटका उडाला तो. या दोन्ही गोष्टींत तात्यासाहेबांचें काम उत्कृष्ट झालें. तात्यासाहेबांचे अध्यक्षीय भाषण बरेंच विस्तृत, रमणीय कल्पना व चिरस्मरणीय शब्द, उपमा, दृष्टांत इत्यादि अलंकारांनीं खेचून भरलेलें असें होऊन, मराठींतील अत्यंत उच्च दर्जाच्या वाङ्मयांत त्याची गणना होईल. ह्या विस्तृत भाषणाच्या अखेरीस त्यांनीं प्रश्न उपस्थित केला कीं, वाङ्मय वाचल्यानें मनाला जो आनंद होतो तो कां व कसा ? या प्रश्नाचें विवरण करतां करतां त्यांनी एकदम पुढे दिलेले उद्गार काढले, " या आनंदानें एक प्रकारची तल्लीनता येते व तो आनंद फारच उत्कट झाला तर त्यापासून समाधीहि लागूं शकेल. या दृष्टीनें पाहतां ' खरी सविकल्प समाधि उत्पन्न करूं शकेल तें वाङ्मय ' अशी नवीन व्याख्या मीं बनविली आहे. वाङ्मयाची कोणतीच व्याख्या समर्पक होऊं शकत नाहीं हें मी जाणतों, तरी ही व्याख्या आपल्या विचाराकरितां मी सादर करीत आहें. " या व्याख्येनें तेथे जमलेल्या साहित्यसेवकांत वादाची मोठी दंगलच उडाली, ती मला चांगली आठवते. कांहींचें म्हणणें कोणत्याहि पदार्थाची व्याख्या करतांना जे शब्द उपयोगांत आणावयाचे ते परिचित असावे आणि त्यांनीं सुशिक्षित सामान्य माणसाला त्वरित अर्थबोध झाला पाहिजे. समाधीचा स्वतः अनुभव तर फारच थोड्या मनुष्यांना असतो व ती दुसऱ्यानें घेतलेलीहि पाहणारे लोक थोडे. सविकल्प हा शब्द तर अनेकांना परिचित नाहीं. हे दोन्ही शब्द (सविकल्प समाधि) योगशास्त्रांतील पारिभाषिक शब्द आहेत. त्यांचा उपयोग करून वाङ्मयाची व्याख्या केली तर ती विद्वानांनाहि नीटशी कळणार नाहीं. मीं संस्कृत साहित्यदर्पण या अलंकारशास्त्रावरील पुस्तकाचें इंग्रजी टीपांसह संपादन केलें असल्यामुळें बऱ्याचजणांनीं माझ्याशी याबाबतींत चर्चा केली. मीं सांगितलें कीं, तात्यासाहेबांची व्याख्या कदाचित सामान्य जनांना कठीण असेल व व्याख्या करतांना परिचित शब्दांनी अपरिचिताचें वर्णन करणें अवश्यक असावें, तरी तात्यासाहेबांची व्याख्या विचारणीय आहे. कारण, वाङ्मय किंवा काव्य यांची व्याख्या करितांना अनेक संस्कृत साहित्य शास्त्रकारांनीं कठीणच शब्द वापरले आहेत. उदा-

हरणार्थ 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' किंवा 'काव्यस्यात्मा ध्वनिः' हे शब्द पाहा. रस म्हणजे काय किंवा ध्वनि म्हणजे काय याचें विवरण करण्याकरितां ग्रन्थ खर्ची पडले आहेत. काव्य या शब्दाची सामान्य कल्पना तरी साधारण मनुष्याला असते; परंतु रस आणि ध्वनि या कल्पना विद्वानाशिवाय कोणासहि फारशा परिचित नाहींत. या दृष्टीनें तात्यासाहेबांनीं केलेली व्याख्या विचारार्ह व स्वागतार्ह आहे असें माझें मत होतें व तें मीं त्या वेळीं प्रतिपादिलें. दुसरी गोष्ट म्हणजे त्या संमेलनांत उडालेला रा. ब. पाध्ये व स्थानिक मंडळीतील खटका. या बाबतींतहि तात्यासाहेबांनीं उत्तम तडजोड सुचविली व ती रा. ब. पाध्ये व साहित्य परिषदेचे अधिकारी (त्यांत मीहि होतों) यांनीं मान्य केल्यामुळें तेंहि वादळ शांत झालें.

(२) १९२१–२२ साल असावें. त्या वेळी महात्मा गांधी यांच्या अहिंसक असहकाराच्या चळवळीची ऐन गर्दी होती. त्या कार्यक्रमांत खादीपरिधान, चरखा, कोर्टावर बहिष्कार, शाळा ओस पाडणें, पदव्यांचा त्याग वगैरे अनेक कार्यक्रम बोलले जात होते. जन्मभर लोकमान्य टिळकांच्या संप्रदायांत असणाऱ्या मोठमोठ्या मंडळींनीं आपल्या पगड्या फिरवून खादी टोपी घालून आपलें उत्तमांग भूषविलें त्या वर्षी लोकमान्य टिळकांच्या प्रभावळींतील एका विद्वान् गृहस्थांनीं माझ्याकडे हायकोर्टांत दाखल करण्यासाठीं एका अपिलाचे कागद दिले. दोन्ही कोर्टांत त्यांच्या विरुद्ध निकाल झाला होता व मिळकत किंवा वादाचा मुद्दा फारसा महत्त्वाचा नव्हता. अपील कसें तरी दखल झालें होतें. पुढें तें चालविण्याच्या वेळेपूर्वी कांहीं दिवस ते गृहस्थ मजकडे काय तक्रारी करावयाच्या वगैरे चर्चा करण्यासाठीं आले. चर्चा झाल्यानंतर थोडे चेष्टेच्या हेतूने मीं त्यांना म्हटलें कीं, आपण गांधीवादाचे अनुयायी, कोर्टावर बहिष्कार हें तर प्रधान अंग, असें असतां आपण क्षुल्लक कारणासाठीं हायकोर्टाकडे धांव घेतां हें मला आपल्या खादी तत्त्वाला धरून दिसत नाही. ते म्हणाले, " अहो, तुम्हांला तो कार्यक्रम बरोबर समजला नाहीं. आम्ही सर्व माणसांविरुद्ध कोर्टांत जाणार नाहीं. बहिष्कार घालूं असा त्याचा अर्थ नाहीं. तर आमचा प्रतिस्पर्धी गांधीवादी, अहिंसक, सत्याग्रही असेल त्याच्याविरुद्ध फारतर कोर्टांत जाणार नाहीं ! " गृहस्थ मोठे असल्यामुळें जास्त न बोलतां मला अर्थ कळला नव्हता, आपण सांगितलें ठीक झालें असें म्हणालों. पुढें बोलतां बोलतां त्या वेळीं मुळशी सत्याग्रहाची चळवळ चालूं होती. तो प्रश्न निघाला. त्या वेळीं जान किंवा जमीन अशी भाषा बोलली जात होती. मी म्हणालों की, केसरीनें जान किंवा जमीन हें तत्त्व करडेपणानें अमलांत आणणें बरें नव्हे असें लिहिलें आहे, असें मला वाटतें. तरी त्यावर तुमचें म्हणणें काय ! तेव्हां त्या गृहस्थांनीं तात्यासाहेबांबद्दल अतिशय अनुदार उद्गार काढून त्यांच्यावर भलतेच आरोप केले. तेव्हां मी म्हणालों, तुम्ही दोघे थोर पुरुष, टिळकांच्या तालमींतले

च एकमेकांबद्दल असें माझ्यासारख्या तिऱ्हाईत व वयानें बऱ्याच लहान मनुष्याला सांगतां यार्चे मला आश्चर्य वाटतें व विषादहि वाटतो. तेव्हां पुनः त्यांनीं तेंच बोलून खुंटा बळकट केला! मीं पुढें तो वाद सोडून दिला. नंतर मी आपल्या एका मित्राजवळ या उद्वेगजनक प्रकाराबद्दल बोललों. तेथून पसरत पसरत ती बातमी कशीतरी तात्यासाहेबांच्या कानीं गेली. एक दिवस मी आपल्या खोलींत रविवारीं लिहीत बसलों असतां, एकदम तात्यासाहेब व आणखी दोनचार मंडळी मजकडे आली. मीं काय काम व तात्यासाहेबांनीं मुद्दाम मजकडे येण्याचें कां ठरविलें वगैरे विचारिलें. तात्यासाहेब म्हणाले, माझ्याबद्दल टिळकांच्याच अनुयायांपैकीं एक मोठे गृहस्थ तुमच्याजवळ कांही बोलले असें ऐकतों. तरी तें काय तें सांगा. मी विचारांत पडलों. पक्षकारानें वकिलास सांगितलेली, एखाद्या खात्यासंबंधींची माहिती किंवा वकिलानें पक्षकारास दिलेला सल्ला दुसऱ्याला सांगण्याचा अधिकार वकिलाला पक्षकाराच्या संमतीशिवाय नाहीं. तशाप्रकारचे त्या मोठ्या गृहस्थांचे उद्गार जरी नव्हते तरी मला ते शब्द जशाचे तसे तात्यासाहेबांस सांगणें इष्ट वाटेना. कारण ते शब्द पुढें केसरींत किंवा इतरत्र प्रसिद्ध झाले तर माझ्यावर बऱ्याच अडचणींचा प्रसंग गुदरण्याचा संभव होता. तेव्हां मीं तात्यासाहेबांना म्हटलें, तें मी सांगूं इच्छित नाही. मला फक्त वाईट वाटतें तें इतकेंच कीं, आपल्या पक्षांतील आपणांला मित्र वाटणारी कांही मंडळी आपल्याविरुद्ध आहेत, हें आपल्याला माहीत नाहीं. मी, ते काय म्हणाले तें आपण जर त्यांची, माझी व आपली खासगी बैठक भरवून विचाराल तर सांगेन, भिणार नाहीं; पण सार्वजनिक चर्चा व्हावी हें मला संमत नाहीं. तात्यासाहेब म्हणाले, सार्वजनिक चर्चा होणार नाहीं. मग मीं त्यांच्यापुढें कांहीं अटी ठेविल्या. त्यांतील मुख्य म्हणजे त्यांनीं किंवा बरोबर आलेल्या कोणींहि स्वतः किंवा परस्पर केसरी किंवा दुसऱ्या कोणत्याहि वर्तमानपत्रांत मी सांगेन तें प्रसिद्ध करितां कामा नये व जर पत्रांत प्रसिद्ध झालें तर तें खोटें आहे, असें ते मोठे गृहस्थ कधींच म्हणाले नाहींत असें मी प्रसिद्ध करीन. ही अट मान्य झाली. नंतर मीं सर्व सांगितलें. पुढें अनेक वेळां पाहिलें कीं ते मोठे गृहस्थ तात्यासाहेबांबरोबर व तात्यासाहेब त्यांच्याबरोबर अगदीं खेळीमेळीनें बोलताहेत, तेव्हां मला तात्यासाहेबांच्या संयमाची धन्यता वाटली. हा संयम मोडण्याचाहि एकदां प्रसंग आला होता; पण तात्यासाहेबांनीं त्याहि वेळीं मोह आवरला, यामुळें तात्यासाहेबांबद्दलचा माझा आदर द्विगुणित झाला. हल्लीं वर्तमानपत्रांत एकमेकांच्या वैयक्तिक कृतीबद्दल येणाऱ्या उखाळ्यापाखाळ्या वाचल्या म्हणजे तात्यासाहेबांनीं खरोखर फारच अपूर्व संयम दाखविला असें मान्य करणें भाग आहे. धन्य त्यांची!

❋

ग. वि. पटवर्धन

(रावबहादूर, स्मॉलकॉज जज्ज, पुणें)

(१) तात्यासाहेबांचा विशेष गुण मला दिसला तो हा कीं, आपल्याकडून शक्य ती दुसऱ्यास मदत करणें. माझ्या एका मित्रास नोकरीबद्दल शिफारसपत्र पाहिजे होतें. तें मीं त्यांस मागितलें. तेव्हां क्षणाचाहि विलंब न करतां ते म्हणाले, " नोकरी कोठे आहे व कोणास पत्र देऊं तेवढें सांगा, म्हणजे देतों. " व तसें लगेच ताबडतोब करण्यांत आलें.

(२) पुणें येथील वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या कार्यास तात्यासाहेबांनीं बहुमोल मदत केली आहे. सन १९३५ मध्यें त्या संस्थेची साधारण सभा भरली असतां कांहीं शैक्षणिक संस्थांकडून मोठमोठ्या रकमेच्या मागण्या आल्या होत्या. त्या सभेचे अध्यक्ष तात्यासाहेब होते व सुमारें २-३ शें सभासद उपस्थित होते. त्या वेळीं अध्यक्षाचें काम त्यांनीं, बराच वादविवाद उत्पन्न झाला असतां, फार कुशलतेनें व चातुर्यानें पार पाडलें व सर्व मागण्या बहुमतानें नामंजूर झाल्या. यानंतर पुढें ३-४ वर्षें सभेच्या व्यवस्थापक मंडळाचे कार्याध्यक्ष व कार्यवाह यांमध्यें दोन पक्ष होऊन तंटे चालू होते व संस्थेंतहि बरेच वादग्रस्त प्रश्न उत्पन्न झाले होते. हे सर्व ८।१०।३९ च्या साधारण सभेपुढे निर्णयाकरितां मांडले गेले. यांपैकी प्रत्येक प्रश्नाचा निकाल या साधारण सभेनें करणें फार दुर्घट होतें. या सभेचे अध्यक्ष तात्यासाहेब होते. त्यांनी ही बिकट परिस्थिति पाहून यांतून मार्ग काढण्याचा उपाय सुचवला. तो असा कीं, ज्याअर्थी साधारण सभेकडून या सर्व प्रश्नांचा निकाल समाधानकारक रीतीनें करणें अवघड आहे व त्यास कालावधीहि बराच लागेल त्याअर्थी हे सर्व प्रश्न सोडविण्याकरितां तीन पंचांची एक समिति या सभेनें नेमून तिच्याकडे हें काम सोपवावें व तिनें जरूर ते कागदपत्र पाहून कोर्टपद्धतीनें मुद्दे काढून पुरावा घेऊन एक महिन्यांत निकाल द्यावा. ही उपाययोजना सर्वांस पसंत पडून तशा अर्थाचा ठराव सभेनें एकमतानें पास केला, व त्याअन्वयें सभेनें श्री. तात्यासाहेब यांस एक पंच नेमलें व दुसरे दोन त्यांनीं निवडून द्यावे असें ठरवलें. त्याप्रमाणें त्यांनीं मला व रा. ब. रा. के. बाळ पेन्शनर स्मॉलकॉज जज्ज पुणें यांस निवडून घेतलें व मला या पंचमंडळाचे अध्यक्ष नेमले. आम्हीं तिघांनीं सर्व पुरावा घेतला व ठराव लिहिण्याचें काम तात्यासाहेबांनीं करावें असें मीं सुचविलें. पण त्यांनीं मलाच तें काम सांगितलें व त्यांस कार्यबाहुल्यामुळें सवड होणें कठीण असल्याचें जाणून मी त्यांच्या विनंतीस मान देऊन ठराव लिहिला व तो त्यांस पसंत पडून त्यावर तिघांनीं ता. २८।११।३९ रोजीं सह्या केल्या. पंचांकडून निर्णय करण्याचा ठराव त्यांनीं

युक्तीनें घडवून आणला. या सर्व प्रसंगीं त्यांचें सौजन्य व निगर्वी स्वभाव मला उत्कटतेनें दिसून आला. तसेंच सार्वजनिक संस्थेबद्दल व कार्याबद्दल त्यांची आस्था व कळकळ हीं स्पष्टपणें निदर्शनास आली.

❋

गो. ल. आपटे

(बी. ए., एलएल. बी., वकील, पुणें)

कांही वर्षांपूर्वी पुणें येथें नाट्यमहोत्सव मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला होता. तो पुण्यांतला पहिलाच व आतांपर्यंतचा तरी शेवटलाच नाट्य-महोत्सव होता. त्यांत एके रात्रीं आमच्या सोशल क्लब या नाट्य-संस्थेनें तात्या-साहेबांच्या नितांतरम्य अशा 'तोतयाचें बंड' या प्रसिद्ध नाटकाचा प्रयोग केला. या प्रयोगांत मी स्वतः, तसेंच सुधाबाई आपटे, मामा लेले अशा मंडळींनीं हौसेनें कामें केलीं होतीं. तात्यासाहेबांना हा प्रयोग पाहण्यास मुद्दाम बोलावणें पाठविलें होतें. नाट्य-प्रयोगास सुरुवात होण्यापूर्वीच तात्यासाहेब आंत रंगपटांत आले. मोठीं-छोटीं कामें करणाऱ्या सर्व नटांशी ते आपुलकीनें बोलत होते. माझें सुखानधानाचें काम त्यांनीं पूर्वीहि बरेच वेळां पाहिलें होतें. नाटकाच्या तिसऱ्या अंकांतील नाना, पार्वतीबाई यांच्या सुप्रसिद्ध सवादाच्या प्रवेशाच्या वेळीं मी बुइंगमधून, बाहेर पुढ-ल्याच रागेंत बसलेल्या तात्यासाहेबांच्या मुद्रेकडे मुद्दाम पाहत होतों. तात्यांना हें नाटक फार आवडे. वरील प्रवेशांतील सुधाबाई व मामा लेले यांचा संवाद चालूं अस-तांना तात्या अगदी तद्रूप होऊन गेले होते व त्या संवादाचा उच्च बिंदु गांठला गेला, तेव्हां तात्यांच्या डोळ्यांतून अक्षरशः अश्रु झिरपले! जबाबदार व्यक्तींकडून केवळ गैरसमजामुळें, खऱ्या देशभक्तावरहि केव्हां केव्हां कशी निष्कारण आग पाखडली जाते व त्यामुळें सज्जनांचाहि कसा कोंडमारा होतो याचें स्वतःच रंगविलेलें चित्र रंगभूमींवर पाहून तात्यांच्या हळव्या व सात्त्विक हृदयाला भडभडून आलें होतें!

❋

नारायण भास्कर खरे

(डॉक्टर, माजी दिवाण, संस्थान अलवार)

तात्यासाहेबांचा व माझा दाट परिचय नव्हता; तरी पण त्यांच्या-सारख्या आमरण त्यागवृत्तीनें राष्ट्रसेवा व वाङ्मयसेवा करणाऱ्या महाराष्ट्राच्या या महनीय पुढाऱ्याच्या चरणी आपलीहि श्रद्धांजलि अर्पण व्हावी असें वाटणें साहाजिकच आहे. केवळ ह्याच बुद्धीनें मी हा मजकूर लिहिण्यास उद्युक्त झालों आहें.

(१) त्यांची व माझी पहिली ओळख ४० वर्षांपूर्वी वऱ्हाडांत सामगांव

मुक्कामी झाली. कै. लो. मा. टिळकांच्या वऱ्हाडांतील दौऱ्याच्या वेळीं तात्यासाहेब खामगांवास आले होते. मी त्या वेळेस खामगांवास असिस्टंट सर्जन होतों. केळकरांचा मुक्काम कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांकडे होता. त्यांचा व माझा थोडा परिचय झालेला होता. त्यांनी मेजवानीच्या वेळी मलाहि भोजनास बोलाविलें होतें, तेव्हांच केळरांची माझी ओळख झाली. त्या वेळेस मी दोन-चार महिन्यांपूर्वीच कॉलेजमधून बाहेर पडून नौकरीला लागून बाहेरच्या मोठ्या जगांत पदार्पण केलें होतें. म्हणून अशा थोर आणि प्रसिद्ध माणसाची ओळख झाल्यामुळें मी स्वतःच मोठा झालों असें मला वाटायला लागलें. दोघेहि 'तात्या' साहित्यिकच, तेव्हा भोजनोत्तर गप्पागोष्टी चालल्या असतांना साहजिकच वाङ्मयावर चर्चा सुरू झाली; बोलतां बोलतां मराठींतील शृंगाररसाकडे चर्चेचा ओघ वळला. दोघेंहि तात्या अगदीं रगांत आले होते. मीं अगदी अनभिज्ञ असूनहि मधूनमधून लहान तोंडी मोठा घास घ्यायचा प्रयत्न केला. या प्रसंगीं केळकरांची ऋजुता, साधेपणा आणि रसिकता यांची माझ्या मनावर जी छाप पडली ती कायमचीच.

(२) यानंतर त्यांची व माझी भेट नागपूरला १९२५ सालीं त्या वेळीं अत्यंत गाजलेल्या तांबे प्रकरणाच्या वेळीं झाली. त्या वेळीं नागपुरांत स्वराज्यपक्षाचा सभा होती. त्या सभेला केळकर नागपूरला आले होते, आणि ते माझ्याच घरीं उतरले होते. या सभेनंतरच स्वराज्यपक्षाचीं दोन शकलें झालीं, व प्रतियोगी सहकारिता पक्षाचा जन्म झाला. या सभेमध्यें डॉ. मुंजे यांजवर कै. बॅरिस्टर अभ्यंकर यांनीं जोराचा हल्ला केला होता. अशा त्रस्त वातावरणांत केळकरांची समयज्ञता, विवेक आणि बुद्धिवाद यांचा चांगलाच प्रत्यय आला. मी अभ्यंकर पक्षाचा आणि केळकर विरुद्ध बाजूचे आणि तशांत माझे पाहुणे, पण केळकरांच्या निःसीम सौजन्यामुळें त्यांच्या सहवासाचे दोन-तीन दिवस मोठ्या आनंदांत गेले.

(३) त्यानंतर केळकरांची व माझी भेट १९२९ मध्यें लाहोर येथें काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी झाली. याच अधिवेशनाच्या वेळीं जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास झाला आणि मध्यरात्रीं "इंकिलाब जिंदाबाद" चा हैदोसधुळा झाला. याच "इन्किलाब जिन्दाबादचें" पर्यसान शेवटीं "इन्किलाब जिन्नाबाद" मध्यें झालें आहे! या अधिवेशनाच्या वेळीं गांधी आणि केळकर यांचा मोठा कडाक्याचा वाद झाला. केळकरांचें म्हणणें असें कीं, ज्याअर्थी तुम्ही पूर्ण म्हणजे साम्राज्याच्या बाहेर असें स्वातंत्र्य हें ध्येय ठरविलें आहे, त्याअर्थी तुम्हीं आतां अहिंसेच्या जोखडांनीं आपले हातपाय बांधून घेऊं नका; कारण असें स्वातंत्र्य अहिंसेनें कधीं मिळणार नाहीं व टिकणार तर नाहींच नाहीं. या प्रसंगीं केळकरांची तडफ आणि

वाकपटुता पाहण्यासारखी होती. स्वराज्याच्या मार्गावर प्रतियोगित्वाचा दीपस्तंभ उभारून लोकमान्य टिळक कालवश झाले. तो दीप अखेरपर्यंत केळकरांनीं तेवत ठेवला, म्हणजे एका अर्थानें केळकर हे द्रष्टे होते. पण गांधी हे 'नेता' झाले आणि अखेरपावेतों राहिले, म्हणून देशाचा घात झाला. गांधींच्या तथाकथित अहिंसेच्या आणि असहकारितेच्या जोडगोळीनें भारतमातेचा शिरच्छेद केला आहे. देशाचे अंतःशत्रु हे लिगी मुसलमान आणि बहिःशत्रु हे इंग्रज या दोघांच्या रक्त आणि कृष्णकारस्थानापुढें गांधींच्या अहिसेनें सपशेल शरणागती पतकरून व मातृद्रोह करून पाकिस्तानाला संमति दिली. या कारस्थानाचा सुगावा मी व्हाईसरॉयच्या कौन्सिलमध्यें असतांना कॅबिनेट मिशन हिंदुस्थानांत आलें होतें, त्या वेळीं मला लागला होता. आणि मी व्हाईसरॉयची नाराजी पत्करून त्याचा स्फोटाहि वर्तमानपत्रांत केला होता व कांहीं प्रतिष्ठित काँग्रेसवाल्यांना त्याबद्दल सूचनाहि दिली होती. परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. ज्या अधिकारलोलुपतेबद्दल काँग्रेसवाल्यांनीं प्रतियोगी पक्षाला नांवें ठेवलीं त्याच अधिकारपदाच्या लोभाला ते सेवटीं बळी पडले. आपला लोभ आवरून जर काँग्रेसवाले, केळकरांनीं दाखविलेल्या मार्गानें गेले असते तर, पाकिस्तान न होतांहि देश स्वतंत्र झालाच असता.

(४) १९२४ पासून १९३८ पावेतों मी केळकरांच्या विरोधी पक्षांतच होतों. केसरीमधून माझ्यावरती हल्ले होत असत व मीहि 'तरुण भारत' मधून केळकरांच्या पक्षावर हल्ले करीत असे. तरीहि १९३८ मध्यें काँग्रेसमधून माझें 'खरेत्राण' झाल्यानंतर केळकरांनीं ज्या आत्मीयतेनें आणि आदरानें माझ्याशीं वागणूक ठेवली ती मी कधींहि विसरणार नाहीं. १९४२ किंवा १९४४ मध्यें पुण्यास टिळक पुण्यतिथीच्या वेळीं केळकर अध्यक्ष होते आणि मी मुख्य वक्ता होतों. त्या वेळेस सत्कारोपाच्या वेळीं "व्हाइसरॉयच्या कौन्सिलचा मेंबर असूनहि, इतक्या छातीठोकपणें व बेडरपणें बोलणारा दुसरा गृहस्थ मीं पाहिला नाहीं," असे जे त्यांनीं उद्गार काढले ते अजूनहि माझ्या कानांत घुमत आहेत.

❋

कृ. ग. फुलंब्रीकर ऊर्फ मास्तर कृष्णा

(गायनकलाभिज्ञ, नटसम्राट्, पुणें)

तात्यासाहेब हे राजकारणी व साहित्यसम्राट् होते, तरी त्यांना संगीताचें खरें प्रेम असल्यानें त्यांच्या अंगीं रसिकवृत्ति पूर्ण बाणलेली होती, व याच कारणानें त्यांचा माझा परिचय झाला.

(१) सन १९११ सालीं मी नाट्यकलाप्रवर्तक कंपनींत असतांना प्रसिद्ध कादंबरीकार कै. श्री. हरी नारायण आपटे यांनीं लिहिलेल्या 'संत सखू' या नाट-

कांतील विठ्ठलाच्या कामाबद्दल मला पारितोषक म्हणून एक खिशांतील घड्याळ, व डोक्यास बांधण्याचा जरीचा रुमाल, तात्यासाहेबांच्या हस्तें दिला गेला, व त्या वेळीं प्रथमच मीं तात्यासाहेबांना पाहिलें.

(२) तात्यासाहेबांचा किर्लोस्कर कंपनीशीं निकट संबंध होता. कुठल्याहि परिस्थितींत योग्य सल्लामसलत देऊन कंपनींत एकजूट असावी व संस्था उत्तम प्रकारें चालावी, या दृष्टीनें त्यांच्या विचारसरणीचा उपयोग फार होत असे. खरा सल्ला देण्याबाबत तात्यासाहेबांचा लौकिक सर्वश्रुत आहे. माझे गुरुवर्य गायनाचार्य भास्करबुवा बखले यांनीं इ. स. १९११ सालीं स्थापन केलेल्या किर्लोस्कर भारत-गायन समाजाचे हितचिंतक म्हणून तात्यासाहेब होते. त्या वेळीं समाजाचे गायनाचे जलसे होण्याचें ठरलें. त्या वेळीं सुरवातीस एक विद्यार्थी व होतकरू गायक या नात्यानें माझा गाण्याचा कार्यक्रम ठेवावा असें ठरून जाहिरातींत सुटसुटीत असें माझें नांव काय द्यावें असा खल झाला. त्या वेळीं तात्यासाहेबांनीं असें सुचविलें कीं, लहान मुलाला मास्टर असें संबोधितात; तेव्हां 'मास्तर कृष्णा' असें सुटसुटीत नांव छापावें व त्याप्रमाणें तें छापलें गेलें. तो छापण्याचा ठसा अद्याप कायम आहे. लोकमान्यांमुळें जसें 'बालगंधर्व', तसें तात्यासाहेबांमुळें 'मास्तर कृष्णा' हें नांव कायम झालें !

(३) मी गुरुवर्य बखलेबोवांकडे शिक्षण घेत असतांना पुण्यास किर्लोस्कर नाट्यगृहांत चित्ताकर्षक नांवाची नाटक मंडळी खेळ करीत होती. तात्यासाहेबांनीं लिहिलेलें 'तोतयाचें बंड' हें नाटक प्रथमच रंगभूमीवर त्या कंपनीनें करण्याचें ठरलें. नाटक गद्यमय होतें, पण त्यांत दसऱ्याची शिलंगणाची स्वारी यावर एक लावणी योग्य रीतीनें तशाच पद्धतीनें म्हटली जावी, याकरितां माझी योजना करून त्याप्रमाणें माझ्या गुरुजींना सांगण्याकरितां तात्यासाहेब हे भारत गायन समाजांत आले, व त्यांच्या 'मास्टर कृष्णा'कडून ही लावणी म्हटली जावी असें त्यांनीं बुवासाहेबांना सांगितलें. सुरुवातीचा प्रयोग ३।४ दिवसांनींच व्हावयाचा आहे. तेव्हां शक्य तों लवकर ती बसवून द्यावी असें म्हटल्यावर मला लावणीची तालीम सुरू झाली व उत्तमप्रकारें बसल्यावर तात्यासाहेबांनीं ती ऐकली व ते खूष झाले. नंतर श्री. तात्यासाहेबांच्या देखरेखीखालीं प्रयोगाच्या दिवशीं मी डोक्यास तुरा खोवलेला फेटा, अंगांत मुंडीछाट सदरा, गळ्यांत ताईताचा गंडा, हातांत चांदीचें कडें, असा पोशाख करून बरोबर तुण-तुणें, डफ असा फड घेऊन एका प्रवेशांत ती लावणी (पंचकल्याणी घोडा अबलख) म्हटली व प्रेक्षकांनीं टाळ्यांनीं त्याचें स्वागत केलें. तात्यासाहेब आंत येऊन मला शाबासकी देऊन कंपनींतील मंडळीस म्हणाले, " माझी योजना चुकली नाहीं ना ? " योजकस्तत्र दुर्लभः.

(४) कांहीं वर्षांनंतर गंधर्व कंपनीनें 'संतकान्होपात्रा' नाटक बसविण्यास घेतलें. अर्थातच पदांच्या व अभंगांच्या चाली देण्याचे काम माझ्याकडेच असल्यानें त्या नाटकांतल्या पदांच्या व अभंगांच्या चाली बहुतांशीं मीं दिल्या व पुढें नाटकाचे प्रयोग सुरू झाले. कंपनी मुंबईस होती व मी पुण्यास मध्यंतरी माझ्या घरीं २।३ दिवसाकरिता आलों होतों. तेवढ्या अवधींत मुद्दाम एके दिवशी तात्यासाहेब माझ्या घरीं आले. सकाळीं सात वाजण्याचा सुमार होता. मी नुकताच उठलों होतों. तात्यासाहेब एकदम माडीवर आले. त्याचा तो पुणेरी जोड्याचा आवाज ऐकून माडीवर कोण आलें म्हणून पाहण्यास माझी पत्नी खोलीचे दार उघडून हॉलमध्यें आली व 'कोण आहे?' असें विचारतांच, 'घरचाच पाहुणा आहे! मास्तर कृष्णा आहेतना?' असें म्हटल्यावर मला माझ्या पत्नीनें येऊन, 'अहो, बाहेर गॅलरींत तात्यासाहेब बसले आहेत', असें मला सांगितलें. मी तांतडीनें बाहेर येऊन "सकाळींच इकडे कोठें?" असें विचारलें. ते म्हणाले, "अहो, तुम्ही कान्होपात्रा नाटकांतून अभंगाला चाली लावल्या त्या फार उत्तम आहेत असें वर्तमानपत्रांत वाचलें. तेव्हां तुमच्या तोंडून त्या ऐकाव्या आणि ही सकाळची वेळ ऐकण्यास चांगली म्हणून आलों." "मी जरूर ऐकवितों" असें म्हणून तीन-चार अभंग त्यांना ऐकविलें. त्यांना ते अतिशय आवडले हें त्यांनीं मनमोकळेपणानें बोलून दाखविले. न बोलवतां आपण होऊन माझ्या घरीं येऊन गाणीं ऐकलीं, यावरून त्यांचें संगीतावरील प्रेम व रसिकपणा दिसून येतो.

(५) संगीतावरील प्रेमामुळें व मराठी भाषेच्या अभिमानामुळें हिंदुस्थानी चिजाप्रमाणें आपणहि मराठींतून ख्याल वगैरे बांधावे, व ते गवयांनीं गावे, अशा कल्पनेनें त्यांनीं कांहीं गाणीं केलीं व कांहीं गवयांना तीं म्हणण्यासहि सांगितलीं; तसें मलाहि त्यांनीं सांगितलें. माझ्याजवळ तीं पदें दिलीं. मीं तीं म्हणून पाहून त्यांनाहि ऐकविलीं व हिंदुस्थानी चिजेवर मराठींतून गाणें रचून तें म्हणण्यास काय अडचण आहे, तीहि सांगितली. "चिजेंतील शब्दांच्या सोपेपणामुळें गाण्यास सुंदर अशा हिंदुस्थानी चिजेवर मराठींतून ख्याल बांधण्यापेक्षां, मराठींतून स्वतंत्र पदें करून, शिवाय संतांचे प्रेमळ असे असंख्य अभंग आहेत ते म्हटल्यास बरें नाहीं का? व ते सोपेहि आहेत; शब्दांच्या व अर्थाच्या दृष्टीनें त्या अभंगांवर हिंदी चीज तशी बांधणें जसें कठीण, तसाच हाहि प्रकार कठीण आहे," असें मी म्हणालों. या बाबतींत त्यांचें व माझें बरेंचसें स्पष्ट बोलणें झालें. त्यावर ते म्हणाले कीं, "कांहीं अडचणीं असतात, त्या आम्हांला स्पष्ट शब्दांत सांगायला कोणी धजत नाहींत. 'तात्यासाहेबांना स्पष्ट कसें सांगायचें बुवा', या भिडेनें आम्हांला खऱ्या अडचणी कळत नाहींत. तुम्ही स्पष्ट बोललांत हें एक प्रकारें बरें वाटलें." मात्र यामुळें

त्यांचें हिंदुस्थानी गाण्यावरील प्रेम यत्किंचितहि कमी झालें नाहीं. तर ते हिंदुस्थानी गाण्याचा लाभ सरास घेतच असत.

(६) गायनक्षेत्रांत माझी पंचवीस वर्षांची सेवा झाल्याबद्दल पुण्यास झालेल्या समारंभास तात्यासाहेब हे अध्यक्ष लाभले. त्यांनीं माझा परिचय कसा व केव्हांपासून झाला याबद्दल कांहीं आठवणी सांगून समयोचित असें भाषण केलें. आठवणी इतक्या बरोबर सांगितल्या कीं, मलाहि त्यांचें पुन्हा स्मरण करून दिलें. त्यांच्या स्मरणशक्तीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. माझ्या गाण्यावरील प्रेमामुळें त्यांनीं माझ्या पद्धतीचें गायन शिकण्याची इच्छा बोलून दाखविली. त्याप्रमाणें मी माझे शिष्य, हरीभाऊ देशपांडे, बापुराव अष्टेकर, व अप्पा भोपे यांना क्रमाक्रमाने त्यांच्याकडे पाठवीत असे. ऑर्गनचे स्वर गोड असतात, तेव्हां त्यांनीं माझ्याकडील ऑर्गनहि मागून नेला होता. माझ्या शिष्यांनीं त्यांना म्हणण्यास लावावें, व त्यांची सांथ करावी व कांहीं पदें शिकवावीं, असा क्रम सुरू झाला. वंदेमातरमची माझी चालहि स्वतः ऑर्गनवर वाजवून त्याबरोबर त्यांनीं म्हटलेली आहे. आवाजाबद्दलची त्यांची तक्रार मात्र ते स्वतःच करीत असत. अशा आवाजांतहि इतक्या वयांत लहान मुलाप्रमाणें, त्यांचें शिकण्याचें व म्हणण्याचें धाडस, चिकाटी व प्रेम पाहून आश्चर्य वाटतें.

(७) मुंबईचे सरदारगृहाचे मालक कै. बाबुराव साळवेकर यांच्याकडे त्यांच्या चिरंजिवाच्या वाढदिवसानिमित्त माझें गायन झालें होतें. तात्यासाहेब गायन ऐकण्यास आले होते. प्रतिष्ठित मंडळीकरितां टेकण्यास तक्के ठेवले होते. तात्यासाहेब प्रथम तक्क्याशीं टेकून बसले होते. माझ्या दोन चिजा संपल्यावर, तिसऱ्या चिजेस मी सुरुवात करतांच ती अपरिचित रागांतील चिजेची ठेवण, व त्यांतील शब्दरचना ऐकून त्यांनीं आपल्या वयाकडे लक्ष न देतां, गाण्याकडे लक्ष देऊन ते एकदम पुढें येऊन बसले! ते जवळजवळ अखेरपर्यंत तसेच बसले होते. भैरवीच्या अगोदर मीं हिंडोल राग म्हटला. ती चीज त्यांना फार आवडलीहि. ही चीज ऐकून तात्यासाहेब म्हणाले कीं, "या चीजेंतील शब्दलालित्य किती तरी सुंदर असून त्याची उठावण हिंदोळ्या (झुल्या) प्रमाणें वाटतें, हा खरा हिंडोल." खरा मार्मिकपणा व रसिकपणा याची साक्ष आणखी दुसरी काय पाहिजे?

(८) ज्या वंदेमातरम् प्रकरणाकरितां रेडिओवर मी गाणार नाहीं असा मीं निश्चय केला होता, त्या प्रकरणाचा गोड निकाल लागून रेडिओवरची वंदेमातरमची बंदी काँग्रेस सरकारनें उठविली, व मी मानानें वंदेमातरम् रेडिओवर म्हणून माझ्या गाण्यास सुरवात केली. त्याबद्दल माझा सत्कार झाला. या सत्कार-

सभारंभाचें अध्यक्षस्थान तात्यासाहेबांनीं स्वीकारून गायनकलेबद्दल उत्कृष्ट भाषण केलें व त्यानंतर लवकरच ते नादब्रह्मांत कायमचे लीन झाले !



गोविंदराव धर्माजी वर्तक

(बी. ए, मंत्री, मुंबई सरकार)

(१) समाजसुधारणेसंबंधानें तात्यासाहेबांचीं मतें कशी प्रगतीपर होतीं त्याची प्रचीति बत्तीस वर्षांपूर्वी त्यांचें प्रार्थनासमाजांत झालेलें व्याख्यान ऐकून मला व माझ्या सहकारी विद्यार्थ्यांना आली. विधवाविवाहदिनानिमित्त तें व्याख्यान होतें. त्या वेळीं राजकारणाच्या आघाडीवर असलेल्या केसरीचें धोरण सामाजिक सुधारणेसंबंधानें तितकेंसें प्रगमनशील नव्हतें. त्यामुळें विधवाविवाहासारख्या विषयावर तात्यासाहेब काय म्हणतात तें ऐकण्याकरितां कॉलेजांतील इतर साहाध्यायांबरोबर मी मुद्दाम गेलों होतों. विधवाविवाहाचें प्रतिपादन करतांना त्यांनी हिंदुस्थानांतील बालविधवांचें करुण चित्र पुढें मांडून त्या विषयाची सांगोपांग चर्चा केली. विधवाविवाहासंबंधानें निरनिराळ्या स्मृतींत परस्परविरोधी वचनें आढळतात याचा उल्लेख करून ते म्हणाले कीं, " पूर्वी जसे तत्कालिन आचारांना धरून स्मृतिकारांनीं स्मृतिग्रंथ लिहिले, तसेच आजची परिस्थिति लक्षांत घेऊन समाजाची धारणा व्हावी म्हणून नवी स्मृति निर्माण करणारे स्मृतिकार कां निघूं नयेत ? "

(२) प्रतिपक्षाविषयीं हेटाळणीचे उद्गार न काढतां युक्तिवादानें प्रतिपक्षाच्या चुका दाखवून आपल्या पक्षाचें समर्थन करण्याची वृत्ति पहिल्यापासूनच तात्यासाहेबांच्या ठिकाणीं दिसून येत होती. १९२० सालीं सोलापूर येथें तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं इलाखा प्रांतिक परिषद भरली होती. कायदेमंडळांत कॉंग्रेसविषयीं ज्यांची निष्ठा कसोटीला लागेल त्यांनाच लोकांनीं निवडून द्यावें अशा आशयाचा ठराव तेथें झाल्यानंतर, निरनिराळ्या जिल्हा-सभांतून तसे ठराव मंजूर करण्यांत आले. यासाठीं डहाणु येथें कै. दादासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं ठाणें जिल्हापरिषद भरली होती. आणि त्या सभेस तात्यासाहेब स्वतः उपस्थित होते. ठाणें जिल्हासभेंत असा ठराव होऊं नये म्हणून नेमस्तांनीं जोरानें प्रयत्न चालविला होता. परिषदेच्या मंडपाजवळ असलेल्या पिंपळाच्या पारावर भरलेल्या प्रचार-सभेंत कांहीं नेमस्ताग्रणींनीं असा ठराव पास होऊं नये म्हणून भाषणें केलीं. भाषणें चालू असतांना मधूनमधून श्रोतृवर्गांतून विरोध होत होता. त्याच वेळीं तात्यासाहेब कुणाला भेटण्याकरितां पाराच्या रस्त्याच्या बाजूनें जात होते. त्यांना लोकांनीं आग्रह करून सोलापूर ठरावाची भूमिका समजावून देण्यासंबंधीं विनंती केली. तात्यासाहेबांनीं नेमस्तपक्ष हा राष्ट्रीय पक्षाच्या मागें वीस वर्षे

कसा असतो त्याचें विनोदानें वर्णन करून बिनतोड युक्तिवादानें ठरावाची भूमिका समजावून दिली. त्यामुळें नेमस्तांना सभेंतून हळूच पाय मागें घेवून आपल्या निवास-स्थानीं परत जावें लागलें !

(३) सहजगत्या विनोदी उत्तर देऊन दुसऱ्याला धीर देण्याची वृत्ति तात्या-साहेबांच्या ठिकाणीं होती, याचें प्रत्यन्तर अनेकांना आलेलें आहे. १९४६ च्या नोव्हेंबरमध्यें सहकारदिनसप्ताहांत श्री. वैकुंठभाई मेहता यांचें पहिलें व्याख्यान ठेविलें होतें. या सभेस तात्यासाहेब हजर होते. महाराष्ट्रांत सहकारी चळवळी-वर श्री. वैकुंठभाईंनी अनेक वेळां आपले विचार मराठी भाषेंतून मांडलेले असल्यामुळें सभेंतहि त्यांनीं मराठींत बोलावें अशी त्यांना मंडळींनीं विनंती केली. वैकुंठभाईंनीं तात्यासाहेबांकडे बोट दाखवून उत्तर दिले कीं, "महा-राष्ट्राचे साहित्याचार्य बाजूस बसले असतांना, मराठीत बोलण्याची मला भीति वाटते." त्याबरोबर तात्यासाहेब विनोदानें म्हणाले कीं, "अहो, मला अलीकडे ऐकावयाला कमी येते. तुमच्या मराठी बोलण्यामध्यें कांहीं चुका झाल्यास मला ऐकूं कमी येत असल्यामुळें त्या समजणार नाहींत ही एक सोयच झाली आहे असें समजून तुम्ही आपल्या भाषणास बेलाशक मराठीतच सुरवात करा !" तात्यासाहे-बांचें असें आश्वासन मिळाल्याबरोबर वैकुंठभाई यांनीं आपलें भाषण मराठींतच केलें हें सांगण्याची जरूरी नाहीं.

(४) सौजन्यपूर्ण वागणूक हा तात्यासाहेबांचा एक स्वभावविशेष होता. १९४६ सालीं मुंबई सरकारचा मुक्काम पुण्यास असतांना नूतन मराठी विद्यालया-च्या चालक मंडळीचें संस्था पाहण्याचें आमंत्रण होतें. निरनिराळ्या वेळीं जाऊन संस्था पाहण्यांत चालकांचा वेळ घेण्यापेक्षां सर्वांनीं भिऊन एकदम जावें असा बेत करून श्री. वैकुंठभाई मेहता, श्री. तपासे आणि मी असे तिघे दोन वाजण्याच्या सुमारास संस्था पाहण्यास गेलों. तेथें गेल्यावर पाहुण्यांच्या स्वागतार्थ तात्यासाहेब हजर असलेले पाहून आम्हांस आश्चर्य वाटलें. दोन प्रहरच्या गैर-सोयीच्या वेळीं या उतारवयांत त्यांनीं संस्थेचा ऋणानुबंधी म्हणून हजर राहावें, अशी आमची अपेक्षा नव्हती. म्हणून पांच-दहा मिनिटें आमच्याबरोबर फिरल्यानंतर आम्ही त्यांना विनंती केली कीं, दुसऱ्या मंडळीबरोबर फिरून आम्ही संस्थेच्या कार्याची माहिती समजावून घेतों. आणि मग आपणाला भेटतों; तोंपर्यंत आपण विश्रांति घ्यावी. सुमारें अेक तासापेक्षां अधिक वेळ संस्थेच्या आवारांत फिरून शैक्षणिक प्रयोगाचीं प्रात्यक्षिकें चालत असलेलीं आम्हीं पाहिलीं आणि तात्यासाहेब ज्या प्रशस्त खोलीमध्यें बसलेले होते तेथें गेलों. अल्पोपाहाराच्या वेळीं, आपण भर दोन प्रहरीं त्रास घेऊन येण्याचें विशेष प्रयोजन नव्हतें असें मी त्यांना म्हणालों. त्याबरोबर त्यांनीं सौजन्यपूर्वक उद्गार काढले कीं,

"तुमच्यासारखे पाहुणे संस्थेच्या आमन्त्रणावरून संस्था पाहण्यास आले असतांना संस्थेचा ऋणानुबंधी म्हणून स्वागतासाठीं उपस्थित राहणें हें माझें कर्तव्य असल्यामुळें मी आलों आहें आणि तुम्ही येथून परत गेल्यानंतरच मी घरीं जाईन."

❋

ग. दे. तपासे

(बी. ए., मंत्री, मुंबई सरकार)

(१) महाराष्ट्रांतील नामवंत पुढारी, मराठीचे खंदे लेखक, आणि मार्मिक व विनोदी वक्ते म्हणून तात्यासाहेबांची कीर्ति मी लहानपणापासून ऐकत होतों. त्यांना मीं अनेकदां पाहिलें होतें व त्यांचीं भाषणें अनेक वेळां ऐकिलींहि होतीं. तथापि त्यांचें निकट सान्निध्य मला थोडेंच मिळालें व तेंहि अगदीं अलीकडेच.

(२) कांहीं महिन्यांपूर्वी श्री. हरिभाऊ फाटक यांनीं महाराष्ट्र हरिजन मंदिरप्रवेश-मंडळाची दुसरी सभा पुण्यास बोलाविली होती. त्या सभेस डॉ. आण्णासाहेब कर्वे व तात्यासाहेब हजर होते. त्या वेळीं तात्यासाहेबांच्याबरोबर समक्ष बोलण्याची संधि मला मिळाली. हरिजनांना मंदिरप्रवेश मिळावा व तोहि त्यासाठीं कायदा होण्यापूर्वीच मिळावा याविषयींची तात्यासाहेबांची उत्कट इच्छा व तळमळ त्यांच्या बोलण्यांत व्यक्त होत होती. त्या सभेला तात्यासाहेब हजर आहेत, एवढ्यानेंच त्यांच्याविषयीं मला एकप्रकारचा आदर वाटत होताच. सदर सभेंत बराचसा वादविवाद झाल्यावर तात्यासाहेबांनीं महाराष्ट्रांतील व विशेषतः पर्वती व आळंदी येथील प्रसिद्ध देवालयें कायदा मंजूर होण्यापूर्वीच हरिजनांना कशा प्रकारें खुलीं होतील याविषयीं उत्कृष्ट सल्ला त्या वेळीं दिला, व नुसता सल्ला देऊनच न थांबतां त्याबाबतींत तशा उतारवयांतहि स्वतः इतरांबरोबर हिंडण्याची आपली तयारी पण त्यांनीं दर्शविली! हातीं घेतलेलें कार्य वेळीं श्रम सोसूनहि तडीस नेण्याची त्यांची नेहमीं तयारी असे. ती या वेळींहि दिसून आल्यामुळें तात्यासाहेबांविषयींचा माझा आदर दुणावला. तात्यासाहेबांचा निकट सहवास मला अगदीं अल्पसाच लाभला, तरीहि त्यांच्या थोरपणाविषयीं नितांत आदर वाटण्याइतपत तो प्रभावी होता, हें येथें नमूद करण्यास मला अभिमान वाटतो. ही अल्पशी स्मृतिसुमनांजलि कै० तात्यासाहेबांच्या चरणीं मी मोठ्या आदरानें व भक्तिभावानें अर्पण करीत आहें.

❋

कुं. सो. फिरोदिया

('स्पीकर' मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्ली)

तात्यासाहेबांचा व माझा प्रथम परिचय सन १९१६ साली ते अहमदनगर जिल्हा कॉन्फरन्सचे अध्यक्ष म्हणून नगरास आले तेव्हां झाला. मी परिषदेचा एक सेक्रेटरी होतों. त्या वेळीं लोकमान्यहि सन्मान्य पाहुणे म्हणून नगरास आले होते व त्यांचीं त्याच वेळेस होमरूलवर दोन व्याख्यानें झालीं. या व्याख्यानांबद्दल त्यांच्यावर पुढें खटला झाला, पण ते सुटले. या परिषदेच्या वेळीं विषयनियामक कमेटीचें काम तात्यासाहेबांनीं ज्या रीतीनें चालविलें त्यापासून मी पुष्कळ शिकलों. टिळक – केळकरांच्या होमरूल चळवळीत तेव्हां मी होतों. केसरी ग्रुपच्या लोकांशीं माझा संबंध लोकमान्यांस १९२० सालीं पुण्यास थैली अर्पण केली तेथपर्यंत चांगलाच होता. या समारंभालाहि मी हजर होतों. पण १९२१ सालापासून राजकारणांत फाटे फुटले म्हणून दुर्दैवानें माझा संबंध दुरावला.

तात्यासाहेब हे मोठे निःस्वार्थी देशभक्त, साहित्यसम्राट् या पदवीला योग्य व सर्वांशीं मिळते घेण्याचा त्यांचा स्वभावच असे; म्हणून मतभेद झाले तरी आम्हां परस्परांच्याबद्दलचा आदरभाव नाहींसा झाला नाही. तात्यासाहेबांना वरिष्ठ विधिमंडळाच्या निवडणुकींत मीं यथाशक्ति साहाय्य केलें आहे. तात्यासाहेबांच्या निधनानें महाराष्ट्राचा एक मोठा सन्मान्य पुढारी नाहींसा झाला. त्यांच्या निधनानें झालेली हानि लवकर भरून निघणें शक्य नाहीं. मृत्यूच्या आधीं त्यांनीं ज्या कविता लिहिल्या व यमराजाला आह्वान दिलें, त्यावरून तर ते खरे स्थितप्रज्ञ झाले होते यांत शंका राहत नाहीं, अशी माझी भावना आहे.

❋

काकासाहेब कालेलकर

(बी. ए., सत्याग्रहाश्रम, वर्धा)

(१) तात्यासाहेब यांचा व माझा परिचय फारच थोडा म्हटला पाहिजे. कॉलेजचें शिक्षण संपतांच १९०८ मध्यें केसरी कार्यालयांत विनावेतन काम करावें अशा हौसेनें ॲक्च्युअरी मराठे यांच्या मार्फत लोकमान्यांच्याकडे मीं विनंती केली. त्यांनीं मला तात्यासाहेबांच्याकडे पाठवून दिलें. अवैतनिक काम करणार आहे याची खात्री करून घेतल्यानंतर तात्यासाहेबांनीं मला स्वतःचे लेख 'डिक्टेट' करायला सुरुवात केली. माझें अक्षर गचाळ असलें तरी सुवाच्य होतें आणि त्यांची सांगण्याची गति आणि माझी लिहिण्याची गति यांचा मेळ बसल्यानें ते मजकडून मुबलक लिहून घेत. पुढें त्यांनीं मला बारीकसारीक संपादकीय

टिप्पणें लिहावयास सांगितलें. माझें इंग्रजी चांगलें आहे असें म्हणून प्रोत्साहनहि दिलें. मीं जें लिहिलें तें सर्व त्यांनीं मराठ्यांत प्रसिद्ध केलें.

(२) अशा रीतीनें गायकवाडवाड्यांत कधींकधीं लोकमान्यांची तात्यासाहेबांशीं होणारी चर्चा ऐकावयास मिळे. तात्यासाहेबांची बाजू नेहमीं नेमस्त आणि सार्वजनिक कार्याच्या सिद्धांताला धरून असे आणि ती माझ्या जहाल वृत्तीला प्रथम जरी कशीशीच वाटे, तरी चर्चेच्या शेवटीं त्यांचेंच म्हणणें खरें आहे असें मनाला पटे. लोकमान्य देखील केव्हां केव्हां तात्यासाहेबांचा मुद्दा स्वीकारण्याइतकी-पड घेत, यामुळें तात्यासाहेबांच्या बुद्धिमत्तेविषयीं मला आदर वाटूं लागला. अशा रीतीनें आलेला संबंध जर वाढला असतां तर माझ्या आयुष्यास निराळेंच वळण लागलें असतें. पण माझ्या मातुश्रीच्या शेवटच्या आजारामुळें मला घरीं जावें लागलें.

(३) तात्यासाहेबांचा याचवेळीं किंवा यापूर्वी दुसरा संबंध आला होता, तो पुण्यांतील दारूच्या गुत्त्यांच्या पिकेटिंगमुळें. तेथेंहि तात्यासाहेबांच्या वृत्तींतील जबाबदारीचाच परिचय आम्हांला आला. पिकेटिंग करणाऱ्या स्वयंसेवकांच्या दंडाला लाल फीत बांधलेली असे. एकदा एक बराच लहान मुलगा पिकेटिंग करण्यासाठीं तयार झाला. आम्हीं कौतुकानें त्याच्या दंडाला तांबडी फीत बांधली. देखरेखीसाठीं तेथें आलेल्या तात्यासाहेबांनीं ती काढावयाला लावली! ते म्हणाले कीं, "ही सार्वजनिक चळवळ आहे. इतक्या लहान मुलाला यांत घेतां कामा नये. सर्व दृष्टीनें हें अनिष्ट आहे."

(४) केव्हां केव्हां पुण्याला गेलों म्हणजे तात्यासाहेबांना मी भेटून येई. त्यांचें वागणें अतिशय सौजन्याचें असल्यामुळें त्यांना भेटल्यानें प्रसन्नताच वाटे. त्यांच्यावर कोणीं नाहक टीका केली म्हणजे त्यांना आतोनात दुःख होत असे. केव्हां केव्हां ते चिडून जात. एकदा त्यांना भेटावयाला गेलों असतां असेंच कांहीसे बोलणें निघालें. तेव्हां ते म्हणाले कीं, "प्रतिपक्षाविषयीं वाईट असा एक शब्दहि बोलावयाचा नाहीं हें तुमच्या गांधींना साधतें, आम्हांला नाहीं तें जुळत! गांधींनीं मात्र कधीं चुकून देखील या व्रताचा भंग केला नाहीं. तो एक योगच म्हटला पाहिजे. धन्य त्यांची!"

(५) राष्ट्रभाषेच्या बाबतींत त्यांना एकदोनदा भेटण्याचा मला प्रसंग आला होता. हिंदी साहित्य संमेलनाच्या पुण्याच्या अधिवेशनांत त्यांनीं हिंदींत भाषण केलें होतें. भाषारसिकच ते! त्यांनीं मला विचारलें कीं, "माझ्या भाषणाची हिंदी कशी काय होती!" त्यांच्या भाषासौष्ठवाची मुक्त कंठानें स्तुति करण्याची संधि मी काय म्हणून सोडीन! मला जें वाटलें तें सर्व त्यांना मीं सांगितलें.

माझें प्रामाणिक मत आहे कीं, तात्यासाहेबांची मराठी भाषा विष्णु-

शास्त्र्यांच्या आणि लोकमान्यांच्या मराठी भाषेहून जास्ती कमावलेली आणि प्रभावशाली आहे. त्यांनीं इतक्या निरनिराळ्या विषयांवर इतकें कांहीं सुबलक लिहिलें आहे, आणि जें लिहिलें आहे तें इतकें कांहीं सुंदर व सुबक आहे कीं, मराठी भाषेचें अध्ययन करणाऱ्याला केळकर – साहित्य वाचल्यावांचून गत्यंतर नाहीं. आणि त्यानें एकट्या केळकर – साहित्याचेंच मार्मिकपणें अध्ययन केलें तर त्याच्या मराठींत कच्चेपणा उरणार नाहीं.

(६) कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींत त्यांना अत्यंत मानाचें स्थान असूनहि तीव्र मतभेद होतांच वेगळें उभे राहण्यांत त्यांनीं जी नैतिक हिंमत दाखविली तिच्याबद्दल मला नेहमीं आदरच वाटलेला आहे. महाराष्ट्राची सर्वांगीण सार्वजनिक सेवा, राजकीय तपःश्चर्या आणि मराठी भाषेची अनन्य उपासना यांत सबंध आयुष्य एकनिष्ठेनें व्यतीत करणाऱ्या या वंदनीय राष्ट्रपुरुषाचें ऋण महाराष्ट्र कधींहि विसरणार नाहीं !



सौ. इंदिराबाई देवधर

(क्रिकेटपटू प्रा. देवधरांच्या पत्नी, पुणें)

(१) १९२१ साल असावें. दारूगुत्यावर पिकेटिंग करण्याची चळवळ जोरांत चालू होती. सूतकमिटीतर्फे स्त्रियांची एक जाहीर सभा शिवाजीमंदिरांत भरून, ह्या चळवळीला पाठिंबा देण्यांत आला. सभेंत सुमारें पंचवीस तीस स्त्रियांनीं पिकेटिंगसाठीं आपलीं नांवें दिलीं. त्यांत मींहि आपलें नांव दिलें होतें. ह्या सभेनंतर लगेच त्याच ठिकाणीं पुणें शहरवासियांची एक जाहीर सभा तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं होऊन त्यांत पिकेटिंगच्या चळवळीचा कार्यक्रम ठरणार होता. म्हणून तत्पूर्वी स्त्रियांची जाहीर सभा घेऊन तींत पास झालेला ठराव, व चळवळींत भाग घेण्यास तयार असलेल्यांचीं नांवें ह्या सभेला सादर करण्यांत आलीं. निरनिराळ्या वक्त्यांचीं आवेशपूर्ण भाषणें झालीं. स्त्रियांच्या उत्साहाचेंहि सर्व वक्त्यांनी कौतुक केलें. अखेरीस आपल्या समारोपाच्या अध्यक्षीय भाषणांत तात्यासाहेब म्हणाले, "मला ह्या चळवळीसाठीं, तुरुंगांत जाण्यास तयार असलेले ५०० वृद्ध लोक मिळाले, तरी ही चळवळ यशस्वी झाली असें मी म्हणेन. त्यासाठीं सर्व कुटुंबाचा भार ज्यांच्यावर आहे त्यांनीं अगर विद्यार्जन सोडून विद्यार्थ्यांनीं वा कोणीहि तरुण स्त्रियांनीं तुरुंगांत जावें असें मला वाटत नाहीं. साठ वर्षांच्या पुढील पेन्शनर मंडळी पुण्यांत पुष्कळ आहेत. त्यांनीं ह्या चळवळींत भाग घेण्यास प्रथम पुढें यावें." एकाद्या कुटुंबाच्या कल्याणाचा सर्वस्वी भार ज्याच्यावर असतो, तो मनुष्य कुटुंबांतील मंडळींना मार्गदर्शन करतांना ज्या तळमळीनें व जबाब-

दारीनें बोलेल, त्याच तळमळीनें व जबाबदारीनें तात्यासाहेबांनीं त्या दिवशीं आपलें भाषण केलें. "आज स्पष्ट बोललों नाहीं तर मी माझ्या कर्तव्याला चुकलों असें होईल" असेंच जणूं त्यांना वाटत होतें असें दिसलें. आणि राजकारणांत असें भावनाप्रधान होऊन चालणार नाहीं, हा तात्यासाहेबांच्या बोलण्याचा निष्कर्ष माझ्या मनावर ठसला.

(२) १९२६ साली गिलीगन यांच्या नेतृत्वाखालीं इंग्लंडचा क्रिकेटसंघ हिंदुस्थानांत आला होता. त्या वेळीं ह्या संघाबरोबर झालेल्या सामन्यांत प्रो. देवधरांचा खेळ चांगला झाला. त्याचें वर्णन इंग्लंडमधील वर्तमानपत्रांतून आले होतें. त्याचीं एक दोन कात्रणें पुढें कांहीं दिवसांनीं तात्यासाहेबांनीं अभिनंदनपर पत्रासहित आपणहून प्रो. देवधरांना पोस्टानें धाडलीं होतीं. "माझ्या सहज वाचनांत आलें. परदेशांतील पत्रांतूनहि तुमच्याबद्दल धन्योद्गार निघालेले पाहून आनंद वाटला. मुद्दाम तुम्हांला वाचण्यासाठीं म्हणून हीं कात्रणें पाठविलीं आहेत." वगैरे मजकूर सोबतच्या पत्रांत होता. इतक्या कामाच्या व्यापांतून लहान-सहान गोष्टीसुद्धां हे न चुकतां कशा करू शकतात व इतकें अगत्य बाळगतात याचे मला आश्चर्य वाटलें व त्यांच्याबद्दलचा आदर दुणावला.

(३) १९२९ अगर ३० सालची गोष्ट आहे. भारतस्नेह – संवर्धक मंडळा-मार्फत लोकमान्य – टिळकपुण्यतिथि लिमये यांच्या वाड्यांत साजरी करण्यांत आली. त्या वेळीं तात्यासाहेब केळकरांच्या अध्यक्षतेखालीं माझें व्याख्यान झालें. माझ्या भाषणानंतर आणखीहि एकदोन स्त्रिया बोलल्या. नंतर समारोप करतांना तात्यासाहेब विनोदानें म्हणाले, "आजच्या व्याख्यात्यांच्या भाषणांत व नंतर ज्या स्त्रिया बोलल्या त्यांच्या भाषणांताहि, टिळक स्त्री-शिक्षणाला प्रतिकूल होते वगैरे कांहीं विधानें येतात काय म्हणून मी पाहत होतों. पण तसें कोणींहि म्हटलें नाहीं. उलट स्तुतीच झाली. तर मग ही जी टिळकांची निंदा कधीं कधीं ऐकूं येते, ती सर्व पुरुषांचीच कारवाई बरं कां!"

(४) पी. वाय. सी. हिंदु जिमखाना स्त्री-शाखेतर्फे 'नंदादीप' नांवाचें एक हस्तलिखित षाण्मासिक काढण्यांत येत असतें. तात्यासाहेब गणपति-उत्सवांत पानसुपारीसाठीं म्हणून स्त्री-शाखेच्या बॅडमिंटन हॉलमध्यें आले असतां, त्यांना षाण्मासिकाचा अंक दाखविण्यांत आला व त्याबद्दलचा अभिप्राय कळविण्यास विनंती केली. त्यांनीं मोठ्या आनंदानें तो अंक घरीं वाचण्यास नेऊन, आवर्जून व स्मरणपूर्वक असा उत्तेजनपर अभिप्राय पाठवून दिला. 'साहित्यसम्राट्' म्हणून ज्यांची कीर्ति त्यांनीं आपला अंक वाचून त्यावर अभिप्राय दिला, याचें सर्व भगिनींना विशेष महत्त्व वाटलें. थोरांकडून मिळालेलें उत्तेजन हें खरोखर शक्ति-

वर्धक औषधाप्रमाणें असतें; परंतु सर्रास सर्वांना हें औषध देणारे तात्यासाहेबांच्या-सारखे धन्वंतरी थोडेच !

❋

नीलकंठ शंकर नवरे

(बी. ए., बी. टी., प्रिन्सिपॉल ट्रेनिंग कॉलेज, पनवेल)

(१) मी त्या वेळीं इंग्रजी सहाव्या इयत्तेंत होतों. १९१२ च्या मे महिन्यांत पुणें येथील वसंत-व्याख्यान-मालेमध्यें जुनागड कॉलेजचे संस्कृतचे प्रोफेसर आणि प्रसिद्ध वक्ते प्रा. महादेव मल्हार जोशी यांचें प्रा. वि. गो. विजापूरकर यांच्या अध्यक्षतेखालीं 'बाणभट्ट' या विषयावर सुंदर, मधुर आणि परिणामकारक व्याख्यान झालें. मी तें कधींहि विसरणें शक्य नाहीं. मालेचा एकनिष्ठ श्रोता या नात्यानें माझ्या रोजनिशींत आणि हृदयांत जीं कांहीं व्याख्यानें कोरलेलीं आहेत, त्यांपैकीं तें एक आहे. व्याख्यानोत्तर नरसोपंत (त्या काळीं आम्ही त्यांना तात्यासाहेब म्हणत नव्हतों आणि इतर वक्तेहि नरसोपंतच म्हणत.) उपवक्ते म्हणून म्हणाले कीं, "कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमधील आमचे संस्कृतचे प्रोफेसर आपटे यांनीं आम्हांस बाणभट्टाची संस्कृत कादंबरी शिकविली. त्या वेळीं ते म्हणत :– To go through Bana, is to go through a dense and dark forest full of thorns. मधूनमधून ते आम्हांस कंदील लावण्यास सांगत. पेनसिलीच्या खुणा हेच ते कंदील ! व्याख्याते प्रो. जोशी यांना माझी अशी विनंती आहे कीं, त्यांनीं कादंबरींतील लांब लांब समासांची छाटाछाट करून एक सुटसुटीत पुस्तक तयार करावें. म्हणजे माझ्या-सारख्या संस्कृतप्रेमी गृहस्थास तें वाचण्यास सुकर होईल." यावर प्रोफेसर महाशयांनीं आपण अमुक अमुक करूं असें कोणतेच आश्वासन दिलें नाहीं. पण मी मात्र आपल्या सुप्त मनांत एक खुणगांठ बांधीत होतों. ती कोणती ! तर कादंबरीच्या सुलभीकरणाचें काम इतरांनीं कोणीं केलें नाहीं तर आपण पुढें कादंबरीचा अभ्यास करून तें करावयाचें ! ही माझी कुमारावस्थेंतील इच्छा प्रौढावस्थेंत पूर्ण झाली. १९२८ सालीं मी प्रथम मराठींत कादंबरीकथा लिहिली. तींत कादंबरी कथानकांतील गुंतागुंती टाळून आधुनिक कादंबरी लिहितात तशी ती पुनरर्चना करून लिहिली. प्रस्तावनेंत केळकरांकडून मिळालेल्या स्फूर्तीचा मी सानंद व कृतज्ञतेनें उल्लेख केला आहे. तो त्यांस मुद्दाम नेऊन दाखविला. तो पाहून त्यांनीं समाधान व्यक्त केलें. त्यानंतर १९३५ सालीं मी याच धर्तीवर संस्कृत कादंबरीकथा लिहिली. केसरींतून निवृत्त झाल्यावर केळकरांनीं माझ्याकडून संस्कृत कादंबरीकथा मुद्दाम मागवून घेऊन ती संपूर्ण वाचली.

मी संस्कृत नाटकांच्या कथा मराठींत लिहिलेल्या आहेत हें त्यांना माहीत होतें. त्यावर त्यांनीं अभिप्रायहि दिला होता. त्याची आठवण मी भेटीस गेलों असतां त्यांनीं दिली आणि अशा प्रकारच्या कथा आणखी लिहिल्या असल्यास 'सह्याद्री'-साठीं द्या असें त्यांनीं सुचविलें; त्याप्रमाणें माझी 'रत्नावलि' ही नाट्यकथा सह्याद्रींत देण्याची व्यवस्था त्यांनीं केली. संस्कृत वाङ्मयाचें केळकरांचें प्रेम विशेषच होतें.

(२) संस्कृत वाङ्मयांत कालिदासाची उपमा देण्याची चातुरी अनुपम आहे, याविषयीं रसिकांत मतभेद नाहीं. तात्यांचें लेख वाचीत असतां त्यांच्या आल्हाददायक व समर्पक उपमा पाहून ' उपमा नरसिंहस्य ' असे उद्गार इतरांच्याप्रमाणें माझ्या तोंडून अनेक वेळां येत.

उपमा कालिदासस्य । भारवेरर्थगौरवम् ॥
दंडिनः पदलालित्यं । माघे सन्ति त्रयो गुणाः ॥

याच धर्तीवर १९४४ सालीं गडकऱ्यांच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त मीं खालीलप्रमाणें श्लोक रचला आणि एका जाहीर सभेंत तो मीं म्हणून दाखविला.

उपमा नरसिंहस्य । श्रीपादस्यार्थगौरवम् ॥
कृष्णस्य पदलालित्यं । रामे सन्ति त्रयो गुणाः ॥

या श्लोकांत केळकर, कोल्हटकर, खाडिलकर या गडकऱ्यांच्या समकालीन वाङ्मयवीरांच्या लेखनशैलीचें वर्णन मीं केलें आहे. हा श्लोक तेव्हां अनेक वृत्तपत्रें व मासिकें यांनीं उद्धृत केला होता.

त्यानंतर तात्यांच्या 'पुष्करणींत' मी गेलों असतां वरील श्लोकासंबंधीं बोलणें ओघाओघानें निघालें. आतां तात्या काय बोलतात हें मी उत्सुकतेनें पाहत होतों. तों ते स्मितपूर्वक 'हां' असें म्हणून कालिदासाच्या उपमेकडेच वळले. ' Beauties from Kalidas ' अथवा ' कालिदास-सूक्तिमंजुषा ' या श्री. केशव अप्पा पाध्ये यांनीं लिहिलेल्या ग्रंथाला आपण इंग्रजींत प्रस्तावना लिहिल्याचें त्यांनीं सांगितलें. तींत " यथोचित उपमा देण्यांत कालिदासाचा हात धरणारा संस्कृत कवी दुसरा कोणी नाहीं, असें मीं सोदाहरण दाखविलें आहे.

मध्येतपोधनानां किसलयमिव पांडुपत्राणाम् ।

' पिकलेल्या पानांमध्यें एकादें कोवळें पान दिसावें तशी ऋषींच्यामध्यें शकुंतला दिसते आहे ' हें कालिदासानें केलेलें शकुंतलेच्या नाजुकपणाचें व मुग्धावस्थेचें वर्णन आपणांला फारच आवडतें, " असें ते म्हणाले.

(३) १९३७ सालीं केळकर आपला ' हास्यविनोदमीमांसा ' हा ग्रंथ लिहीत होते. त्या प्रसंगीं माझी भेट झाली असतां ते म्हणाले, " तुम्हीं महाराष्ट्र साहित्य

पत्रिकेंत स्त्रियांच्या बऱ्याच म्हणी प्रसिद्ध केल्या आहेत हें मला माहीत आहे. त्यांतून कांहीं विनोद, म्हणी आढळल्या तर पाहाव्या म्हणून मीं म. सां. पत्रिकेचे अंक साहित्य परिषदेच्या कचेरींतून आणविले आहेत. त्यांतील कांहीं म्हणी माझ्या 'हास्यविनोदमीमांसा' ग्रंथांत घेतल्या आहेत. 'वाक्-प्रचार व म्हणी' या संबंधीं तात्यासाहेबांनीं एक निबंध लिहिला आहे. याचा उल्लेख मीं त्यांच्यापाशीं केला व म्हटलें, "आपण म्हणींची व्याख्या चकारयुक्त केली आहे. 'चिमुकलें, चतुरपणाचें व चटकदार वचन.' तशीच मींहि केली आहे. पण सकारयुक्त. 'सुबोध, सूचक, समंजस व सुटसुटीत वचन.' माझ्यापाशीं असलेल्या म्हणींचा एक हप्ता मीं सह्याद्रीमध्यें द्यावा अशी इच्छा तात्यांनीं प्रदर्शित केली आणि तदनुसार मला नवीन वाटणाऱ्या व नुकत्याच ऐकलेल्या कांहीं म्हणी मीं त्यांच्याकडे पाठविल्या; त्या त्यांनीं सह्याद्रींत १९४३ मध्यें प्रसिद्ध केल्या आहेत.

(४) 'नवलपूरचा संस्थानिक' ही कादंबरी तात्यासाहेबांनीं केसरींत प्रकरणशः प्रसिद्ध केली. ती वाचीत असतां मला तींत एकदोन प्रमाद आढळले. तात्यांनीं रघुवंशांतील रघु राजाविषयीं केलेला निर्देश चुकीचा आहे असें मीं सोलापूराहून पत्रद्वारें त्यांच्या नजरेस आणलें. त्यांचें उलट डाकेनें उत्तर आलें. त्यांत ते म्हणतात, "तुम्ही जो निर्देश चुकीचा आहे असें म्हणतां तो मीं केलेला नसून कादंबरींतील पात्रानें केलेला आहे. त्याचा दोष माझ्याकडे कसा येईल? पण हा विनोद झाला. कोण वाचक किती सूक्ष्मतेनें वाचतात हें मला कळून आलें. हा या कादंबरीपासून मोठा लाभ झाला असें मी मानतों. तुम्हांस आणखी कांहीं दोष आढळल्यास कळवावें. ही कादंबरी लिहिण्यांत संस्थानी राजकारण रंगविणें हेंच माझें मुख्य उद्दिष्ट होय! जावयापुढें मांडलेल्या चांदीच्या ताटाखालीं केळीचें पान ठेवतात तसें इकडील संस्थानांतून हरघडी घडणाऱ्या राजकारणाला मीं कथानकाची जोड दिली आहे इतकेंच." रसिकता आणि प्रांजलपणा यांचा कोण हा गोड संगम!



भास्करराव जाधव

(एम्. ए., एल्एल्. बी., कोल्हापूर)

(१) तात्यासाहेब व मी एकाच वर्षी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालों. तरी त्यांचा माझा प्रत्यक्ष परिचय बरेच दिवस झाला नाहीं. ते पुण्यास टिळकांच्या राजकारणांत रंगत होते. मी कोल्हापुरास शाहू महाराजांच्या तालमींत वेदोक्ताच्या व ब्राह्मणेतर पक्षाच्या समाजकारणांत वावरत होतों. आमच्या दोघांच्या व्यवसायांत एकत्र येण्याचे प्रसंग आले नसतांहि त्यांच्या विषयींचा माझा आदर वाढतच होता. टिळकांच्या जहाल राजकारणांत जरी त्यांचा वरिष्ठ दर्जा

होता तरी ते स्वभावतः उदारमतवादी असल्यामुळें त्या राजकारणांत तात्यासाहेब हिरिरीनें पडत नसत असा माझा समज असे. सुवर्णमध्य गांठण्याकडे त्यांचा नेहमीं कल असे. ही माझी त्यांच्याविषयीं असलेली कल्पना सन १९१९ सालीं आम्हां उभयतांची लंडन येथें गांठ पडली, तेव्हां प्रत्ययास आली. त्या-वेळीं आमचें बोलणें कोणत्या विषयावर झालें हें आतां आठवत नाहीं. परंतु त्यांच्याविषयीं माझा फार अनुकूल ग्रह झाला. टिळक कैलासवासी झाल्यानंतर टिळक पक्षाचें धोरण हळूंहळूं उदारमतवादाकडे सरकूं लागलें, असा माझा समज होऊं लागला. राजकारणापेक्षां साहित्यांतील तात्यासाहेब केळकरांची कामगिरी विशेष प्रशंसनीय आहे. साहित्य क्षेत्रांतील प्रत्येक दालनांतील त्यांची कृति कमी-अधिक मानानें यशस्वी झाली आहे. ते खरोखरच साहित्यसम्राट् होते.

(२) त्यांची आणखी एका प्रसंगाने आठवण होते. डॉ. मुंजे यांचें मुंबई येथील ब्राह्मण समाजांत व्याख्यान झालें. त्या प्रसंगीं तात्यासाहेब अध्यक्ष होते. डॉ. मुंजे यांच्या आग्रहावरून त्या सभेस मी हजर राहिलों होतों. विषय डॉक्टरसाहेबांचा आवडीचा 'ब्राह्मणांनींहि मांसाशन करण्याची आवश्यकता' हा होता. व्याख्यात्यांनीं जोरदारपणें आपला विषय प्रतिपादिला. त्या वेळीं तात्यासाहेबांचें अध्यक्षीय भाषण फारच वाखाणण्यासारखें झालें. डॉ. मुंजे यांच्याशीं ते सहमत नव्हते; पण त्यांनीं त्यांच्या मतावर कडक टीका केली नाहीं. प्राचीन काळीं सर्वच लोक मांसाशन करीत हें नाकारतां येण्यासारखें नव्हतें. तात्यासाहेबांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें सुवर्णमध्य गांठण्याचा प्रयत्न केला! भांडण करणें, दुसऱ्या पक्षाचा पाणउतारा करणें, हें त्यांस पसंत नसे. एकंदरींत ते फार थोर मनाचे, उदार स्वभावाचे व दुसऱ्याचें अंतःकरण न दुखविणारे सद्गृहस्थ होते असा आमचा अनुभव आहे.

❋

रा. ब. आठवले

(एम्. ए., प्राध्यापक, अहमदाबाद)

(१) एकदां उन्हाळ्याच्या दिवसांत पुण्यांतील टिळकतलावावर मी पोहण्याकरिता सकाळीं दहानंतर गेलों होतों. त्या ठिकाणीं तात्यासाहेब आले व माझ्या शेजारीं तलावांत पोहूं लागले. बराच वेळ ते सफाईनें उताणे पोहत होते. त्या वेळीं त्यांचें वय पासष्ट वर्षांचें तरी असावें. 'पोहण्यानें अंग मोकळें होतें, म्हणून कधीं कधीं मी मुद्दाम पोहायला येथें येतों' असें त्या वेळीं ते मजजवळ बोलले.

(२) " 'सविकल्पसमाधि' ह्या, काव्यास्वाद घेणाऱ्या रसिकाच्या चित्तवृत्तीचें वर्णन करतांना आपण वापरलेल्या शब्दाबद्दल, आपलें मला कौतुक वाटतें. " मीं एकदां तात्यासाहेबांना म्हटलें. " हा शब्द अत्यंत समर्पक व प्राचीन संस्कृत साहित्य-शास्त्रांतील परंपरेला धरूनच आहे हें आपलें अभिनंदनीय वैशिष्ट्य. आपण हा शब्द संस्कृत साहित्यशास्त्रांतील एखाद्या ग्रंथांतून घेतला आहे कीं काय ! " मीं विचारलें. 'नाही' तात्यासाहेब म्हणाले, " मला हा शब्द अगदीं अचानक सुचला. कां हा शब्द तुम्हाला जुन्या संस्कृत साहित्यांत कोठें आढळला आहे कीं काय ! " त्यांनी मला विचारलें. 'हो', मीं म्हटलें. " रसगंगाधरावरील नागेशभट्टांच्या टीकेंत हा शब्द वापरलेला आहे " असें म्हणून मीं त्यांना त्या टीकेंत सविकल्पसमाधि हा शब्द काढून दाखविला. आपण मराठी साहित्यशास्त्रांत रूढ केलेल्या सविकल्पसमाधि ह्या शब्दाला अशा रीतीनें प्राचीन संस्कृत साहित्यांतून आधार मिळालेला पाहून तात्यासाहेबांना मनापासून आनंद झाला.

(३) अहमदाबादेंत सुमारें नऊ वर्षांपूर्वी साहित्यसम्राट् तात्यासाहेब यांचा भव्य सत्कार महाराष्ट्र समाजातर्फे झाला. त्या वेळीं त्यांना चांदीच्या सिंहासनावर बसविण्याचा अपूर्व योग आला व साहित्यसम्राट् या त्यांच्या बिरुदाला साजेसा हा उचित प्रकार झाला. ह्या सत्कारसमारंभांत त्यांना येथील अखिल महाराष्ट्रियांकडून मानपत्र देण्यांत आलें. (ह्या प्रसंगाचें छायाचित्र केसरीच्या केळकर अंकांत आलें आहे.) ह्या प्रसंगीं त्यांनी केलेल्या भाषणांत ते म्हणाले, " माणसानें आपली जगांत कीर्ति व्हावी अशा रीतीनें वागावें अशा अर्थाचें जें श्रीसमर्थांचें वचन आहे त्याचा माझ्या दृष्टीनें मीं असा अर्थ बसविला आहे :— एखादा गृहस्थ वारला असें कळतांच, बोलावणें आलें नसतांहि, आपण होऊन त्याच्या स्मशानयात्रेला बरेचसे लोक – त्याचे खास इष्टमित्र नसलेलेहि – जर जमा झाले तर खुशाल समजावें कीं, हा गृहस्थ कीर्ति मिळवून गेला. इतपत कीर्ति किंवा वाहवा मिळवून कुणी गेला तरी त्याचें इहलोकचें जीवन मी धन्य समजेन. माझ्या जीवनयात्रेला हीच कसोटी माझ्यामागें लोकांनीं लावावी ! "

(४) " आम्ही काँग्रेसशीं कधींच फटकून वागलों नाहीं – फटकून वागण्याचें आम्हांला कारण काय ? काँग्रेस ही आमचीच आहे असें आम्ही मानीत आलों आहों. १९२९ पर्यंत आम्ही ऑ. इं. काँग्रेस कमिटीमध्यें होतोंहि. पण आमची राजकीय मतें गांधीपक्षाला मानवेनात, त्या मतांबद्दल तो पक्ष आमचा द्वेष करूं लागला व आमची इच्छा नसतांनाहि गटबाजीच्या जोरावर आम्ही काँग्रेसच्या बाहेर ढकलले गेलों. अजूनहि मानानें व मतस्वातंत्र्य कायम ठेवून आम्हांला काँग्रेसमध्यें जातां आलें तर त्याकरिता माझी पूर्ण तयारी आहे. " टिळक-पुण्यतिथीच्या प्रसंगीं माझें पुण्यास प्रकट व्याख्यान झालें; त्याच्या आदल्या

दिवशीं त्या समारंभाचे नियोजित अध्यक्ष म्हणून तात्यासाहेब यांना भेटायला मी गेलों असतां ते मला वरीलप्रमाणें म्हणाले होते.

(५) "शहरांतील गजबजीपासून दूर एकाद्या खेड्यांत एक छोटेसें घर असावें, भोंवतालीं एक टुमदार फुलबाग आणि फळबाग असावी. (बागेंत कलमी आंब्याचीं झाडें असणें मला फार आवडतें.) अशा ठिकाणीं वर्षांतून १।२ महिने तरी निवान्त राहावें; व काव्यशास्त्रविनोदांत – मुख्यतः विद्यानंदांत व कुटुंबांतील नजीकच्या मंडळींच्या प्रेमळ सहवासांत आनंदानें दिवस घालवावे – हें माझ्या वृद्धावस्थेंतील जीवनाचें ध्येय आहे. ह्या ध्येयाच्या दृष्टीनें मी कोंकणांत अशा तऱ्हेचें एक ठिकाण तयार केलें आहे व तेथें मी दरवर्षी जावयाचें ठरविलेंहि. पण नियमितपणें दरवर्षी जाणें होत नाहीं. ह्या माझ्या आदर्शस्थलाची व जीवनाची थोडीशी चुणूक ह्या माझ्या 'पुष्करिणी'त तुम्हांला पाहायला मिळेल."

एकदां पुण्यांतील 'पुष्करिणी'च्या बागेंत संध्याकाळीं तात्यासाहेबांशी बोलत बसलों असतां त्यांनीं मला 'वृद्धांचें आदर्श जीवन' याविषयीं वरील कल्पना सांगितली. "धन्यो गृहस्थाश्रमः" व "यदि रामा यदि च रमा यदि तनयो विनयगुणगणोपेतः। तनये तनयोत्पत्तिः सुरवरनगरे किमस्त्यधिकम्" ह्या संस्कृत सुभाषिताची मला या प्रसंगीं आठवण झाली, व तात्यासाहेबांच्या आदर्श जीवनाविषयीं कौतुक वाटलें.

❋

रा. वि. ओतूरकर

(एम्. ए., प्राध्यापक सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें)

इ. स. १९३३ सालांतील जुलै महिन्यांतील एक प्रसंग. तात्यासाहेब सदाशिव पेठेंतील आपल्या घरांत राहत होते. दुसऱ्या कायदेभंगाच्या चळवळींतील सत्याग्रही सुटले होते. सामुदायिक कायदेभंगाची चळवळ पुढें चालूं ठेवावी कीं तहकूब करावी याबद्दल धोरण निश्चित करण्यासाठीं पुण्यास कॉंग्रेस पुढाऱ्यांची परिषद टिळकमंदिरांत दोन दिवस भरली होती. लो. ना. अणे सर्वाधिकारी या नात्यानें अध्यक्ष असत. लो. ना. अणे नेहमींप्रमाणें तात्यासाहेबांकडेच उतरले होते. पहिल्या दिवशीं तात्यासाहेब हजर नव्हते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं तात्यासाहेबांच्या घरीं पंजाबचे कांहीं कॉंग्रेस पुढारी तात्यासाहेब व अणे या उभयतांस भेटण्यास गेले. हे पुढारीहि बहुधा पहिल्या दिवशीं हजर नसावेत. कारण त्यांनीं प्रारंभीचे कुशल प्रश्न झाल्यावर पुढील प्रश्न केला. संभाषण इंग्रजींत झालें.

प्रश्न :– काल काय धोरण ठरलें ?

लो. ना. अणे :– काल संध्याकाळपर्यंत सभा चालली. निर्णय ठरला नाहीं. आज पाहूं आतां, काय धोरण ठरेल तें.

तात्यासाहेब :– (हंसत) You see, conclusions, like dishes ought to be fresh that they may be relished ! (अहो, आजकाल खायच्या पदार्थाप्रमाणें पुढाऱ्यांचे निर्णय देखील गरमागरम व ताजेताजे असावे लागतात म्हणजे त्यांचा स्वीकार होत असतो !)

लो. ना. अणे :– But you see, there must be appetite for it ! (होय, खरें आहे, पण ते पचवण्याजोगी भूकहि आहे कीं नाहीं तेंहि पाहावें लागतें ! हो कीं नाहीं ?)

सर्वजण हसले. त्या बैठकीत सामुदायिक कायदेभंग तहकूब करण्याचा निर्णय घेतला गेला. फक्त महात्माजींनीं वैयक्तिक कायदेभंगाचा प्रयोग करावा – ('कायदेभंगाचें तंत्र मला काय तें समजतें' इति महात्माजी) असें ठरलें. कांहीं महिन्यांनंतर वैयक्तिक कायदेभंगाचा प्रयोगहि तहकूब झाला.

प्रस्तुत लेखक त्या वेळीं वृत्तपत्राचा प्रतिनिधि असल्यानें पुढाऱ्यांच्या परिषदेस वरील प्रसंगीं तात्यासाहेबांच्या घरीं उपस्थित होता.



रा. प. सबनीस

(एम्. ए., प्राध्यापक, पुणें)

जमखिंडीच्या मांजी अधिपतींनीं आपले वडील सर परशुरामभाऊ यांचें स्मारक करण्याच्या निमित्तानें संस्थानांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणहि प्राथमिक व दुय्यम शिक्षणाप्रमाणें मोफत देण्याचें ठरविलें. त्यांचा पहिला बेत जमखिंडीला कॉलेज काढण्याचा होता. पण विश्वविद्यालयानें अर्धवट कॉलेजांना मान्यता न देण्याचें धोरण अवलंबिलें होतें व पूर्ण कॉलेज करण्याइतका निधि जमला नव्हता. इकडे न्यू पूना कॉलेजवर शास्त्रशाखेचे वर्ग काढल्यामुळें व नवीन इमारत बांधल्यामुळें कर्जाचा जबर बोजा पडला होता. तेव्हां कॉलेजला मोठी देणगी दिली तर दोन्ही पक्षांची सोय होईल असा विचार निघाला. न्यू पूना कॉलेज हें वैशिष्ट्यशून्य नांव ठेवतांना महाराष्ट्राला भूषणभूत अशा एकाद्या व्यक्तीच्या नांवाशीं पुढें मागें महाविद्यालय निगडीत करावें असा उद्देश होता. परशुरामभाऊ या नांवांत महाराष्ट्राच्या दृष्टीनें जादू होती. तेव्हां या महाविद्यालयाचे चालक जमखिंडीकरांबरोबर वाटाघाटी करण्यास तयार झाले.

दोन्ही पक्षांचा तात्यासाहेबांच्यावर विश्वास असल्यामुळें त्यांच्यापुढें निरनिराळे मुद्दे ठेविले जात होते व त्यांवर ते निर्णय देत होते. मध्यंतरीं संस्थानाच्या बाजूनें असा युक्तिवाद पुढें आला कीं, जमखिंडी संस्थानचे ५० विद्यार्थी ज़र नसले तर संस्थानला बाहेरच्या विद्यार्थ्यांचीदेखील शिफारस करण्याचा हक्क असावा. तेव्हां तात्यासाहेब म्हणाले –

"तुमच्या बोलण्यावरून माझ्या लहानपणची एक गोष्ट आठवते. कोल्हापूरजवळच्या एका खेड्यांतून आम्ही बैलगाडींतून कोल्हापूरला यावयास निघालों होतों. अटी वगैरे आमच्या काकांनीं ठरविल्या होत्या. वाटेंत त्याची व गाडीवाल्याची कांहीं बोलाचाली झाली. तेव्हां रागारागानें ते खालीं उतरले व म्हणाले, "मला गाडींत बसवून न्यावयाचें असा करार आहे. मी गाडींत बसणें शक्य नाहीं, इतका त्रास तूं मला दिला आहेस. मी आतां चालत जाणार, मात्र गाडींत माझ्या वजनाचा धोंडा ठेविल्याशिवाय सोडणार नाहीं!"

संस्थानचे जे प्रतिनिधि आले होते त्यांना आपलें म्हणणें मुकाट्यानें सोडून द्यावें लागलें. पुढें एका प्रसंगीं ते हंसत हंसत म्हणाले, "तात्यासाहेबांच्या त्या धोंड्यानें आमच्या युक्तिवादाचा कपाळमोक्ष मात्र झाला!"



वि. प्र. मोहगांवकर

(एम्. ए., एल्एल्. बी., प्रिन्सिपॉल रा. आ. कॉलेज, वाशीम)

१९३२ सालची ही हकिकत आहे. मी त्या वेळीं इंदूरच्या ख्रिश्चन कॉलेजमध्यें बी. ए. ला होतों. कॉलेजच्या मराठी वाङ्मय मंडळाचा मी त्या वर्षासाठीं अध्यक्ष होतों. तात्यासाहेब केळकर यांना आम्हीं उज्जयनी येथून कॉलेजच्या मराठी वाङ्मय मंडळाच्या वार्षिक संमेलनासाठीं पाचारण केलें होतें. उज्जयिनी येथें ते कविसंमेलनासाठीं आले होते. आमच्या आमंत्रणाचा त्यांनीं मोठ्या तत्परतेनें स्वीकार केला. 'तरुण महाराष्ट्र मंडळा'च्या या वार्षिक संमेलनाला शहरांतील सर्व नामांकित लोक व साहित्तिक तर उपस्थित होतेच, पण विशेष नवलाची गोष्ट ही कीं, सारा ख्रिश्चन समाजहि बहुसंख्येनें उपस्थित होता. प्रसगाचें औचित्य ओळखून तात्यासाहेबांनीं अत्यंत सुंदर असें भाषण केलें. तें भाषण सगळेंचें सगळें येथें देणें शक्य नाहीं. पण चारदोन वाक्यें नमुन्यादाखल म्हणून येथें मुद्दाम सादर करतों.

"या कॉलेजला ख्रिश्चन कॉलेज म्हणतात. ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं मराठी भाषेवर अत्यंत उपकार केलेले आहेत. मराठी भाषेची भिक्षेची झोळी प्रथम या मिशनऱ्यांच्या औदार्याच्या खुंटीवरच अडकविण्यांत आली होती. आज

मराठीच्या द्वारीं हत्ती झुलत असले तरी तिच्या विपन्नावस्थेंत ज्यांनीं तिला जवळ केलें त्यांचें व त्यांच्या उपकारांचें स्मरण करणें औचित्याला धरून आहे." तात्यासाहेबांचें भाषण झाल्यानंतर प्रिन्सिपाल स्कॉट यांनीं त्यांचे आभार मानले व 'ही खरी गुणग्राहकता व औदार्यबुद्धि' या शब्दांत त्यांचा गौरव केला. परकीयांकडूनसुद्धां प्रशंसोद्गार काढविण्याचें सामर्थ्य व कुशलता त्यांच्या ठिकाणीं होती ही गोष्ट या प्रसंगानें स्पष्ट झाली.



वासुदेव बळवंत गोगटे

(एल्एल्. बी., वकील, पुणें)

(१) माझे वडील कै. बळवंत रामकृष्ण गोगटे, बी. ए., हे मिरज हायस्कूलचे हेडमास्तर होते व तात्यासाहेब हे त्यांचे विद्यार्थी. यामुळें वडिलांचा व तात्यासाहेबांचा लोभ चांगला. इ. स. १९२९ सालीं मी जेव्हां पुण्यास कॉलेजच्या शिक्षणासाठीं फर्ग्युसन कॉलेजांत दाखल झालों, त्या वेळीं वडिलांनीं मला मुद्दाम तात्यासाहेबांच्याकडे नेऊन माझ्यावर लक्ष ठेवण्यास तात्यासाहेबांना सांगितलें होतें व मलाहि वरचेवर तात्यासाहेबांची भेट घेण्यास बजावलें होतें. त्याप्रमाणें मी अधूनमधून तात्यासाहेबांकडे जात असे, व त्यांच्याकडून वाचावयास पुस्तकें आणीत असे. १९३० च्या ऑक्टोबर महिन्यांत माझे वडील कैलासवासी झाले. १९३१ च्या जून महिन्यांत पुण्यास जुनियर बी. ए. च्या वर्गांत मी अभ्यास करीत होतों. त्याच वेळीं सोलापूरचा कुप्रसिद्ध मार्शल लॉ पुकारला गेला होता. मल्लाप्पा धनशेटी, सारडा, शिंदे आदि सोलापूरच्या चार पुढाऱ्यांना फांशी देण्यांत आलें होतें. त्या वेळीं प्रथम गृहमंत्री असलेले ना. अर्नेस्ट हॉटसन हे मुंबई प्रांताचे तात्पुरते गव्हर्नर नेमण्यांत आलेले होते. सोलापूरच्या या जुलुम-जबरदस्तीच्या बुडाशीं हॉटसन साहेबांचा हात प्रामुख्यानें होता व ते या जुलुमाला जबाबदार होते अशी माझी समजूत होती व म्हणून आपल्या लोकांवर झालेल्या जुलुमाचा निषेध अत्यंत तीव्र स्वरुपांत व्यक्त करावा या हेतूनें ना. हॉटसन यांजवर गोळी झाडण्याचें मीं मनाशी ठरविलें होतें. त्यासाठीं दोन रिव्हॉल्व्हर्स मीं मिळविलीं होतीं व हॉटसनसाहेब कोठे भेटतील या प्रसंगाच्या शोधांत मी होतों २० जुलै १९३१ रोजीं मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचें उद्घाटन होतें व त्या दिवशीं त्या ठिकाणीं हॉटसन गव्हर्नर उद्घाटनासाठीं येणार अशी माहिती मला मिळाली होती. तेव्हां त्या वेळी तेथेंच त्यांस गोळी घालावी असें मीं ठरविलें होतें. म्हणून असेंब्लींत जाण्यासाठीं प्रवेशपत्रिका मागण्याकरितां मी तात्यांच्याकडे गेलों व त्यांच्याजवळ प्रवेशपत्रिका मागितली. कशासाठीं म्हणून त्यांनीं विचारलें.

त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें लुटपुटीचें पार्लमेंट विद्यार्थी चालवीत असत. त्या पार्लमेंटांत मी एक मंत्री आहें, तेव्हां प्रत्यक्ष असेंब्लीचें काम कसें चालतें हें पाहावें व त्यावरून आपल्या पार्लमेंटमध्यें आपणास चांगलें काम करतां यावें, यासाठीं मला असेंब्लीची प्रवेश-पत्रिका पाहिजे अशी थाप मीं तात्यांना दिली ! तेव्हां त्यांनीं मला केसरी कार्यालयासाठीं म्हणून एक चिठी दिली व प्रवेश-पत्रिका केसरींतून घेण्यास सांगितलें. पण केसरीचा बातमीदार वेगळा नेमला गेला असल्यामुळें, मला प्रवेशपत्रिका मिळाली नाहीं. तेव्हां मी निराश होऊन परत आलों. त्यानंतर २२ जुलै १९३१ या दिवशीं दुपारीं १–१॥ वाजतां फर्ग्युसन कॉलेजमध्यें हॉटसनसाहेब आले व त्यांच्यावर गोळ्या झाडण्याची मला संधि मिळाली;' पण २ गोळ्या झाडूनहि हॉटसनसाहेब वांचले ! मला ८ वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली. हा सर्व प्रकार महाराष्ट्राला ठाऊकच आहे. या खटल्याच्या चौकशींत तात्यांशीं माझा संबंध आला तो असाः– "स्वदेशी कापड वापरण्याचा प्रचार घरोघर हिंडून करावा" यासंबंधीचें एक पत्रक माझ्या खोलीच्या झडतींत पोलिसांना सापडलें होतें. हें पत्रक तात्यांनीं लिहिलें होतें व त्याबर पहिली सही तात्यांची होती व नंतर दे. भ. न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांची सही होती व नंतर इतरहि पुण्याच्या पुढाऱ्यांच्या सह्या होत्या. हें पत्रक घेऊन सी. आय्. डी. खात्याचे अधिकारी खा. ब. कोठावाला हे तात्यांच्याकडे गेले होते. त्या वेळीं 'हें पत्रक मीं वासुदेवास दिलें होतें. तो माझे शिक्षक श्री. बळवंतराव गोगटे यांचा मुलगा असल्यामुळें माझ्याकडे नेहमीं येत जात असे व आपणांस स्वदेशीचा प्रचार करावयाचा आहे असें तो म्हणाला, म्हणून मीं हें पत्रक त्यास दिलें' असा स्पष्ट खुलासा तात्यांनीं पोलिसांजवळ केला.

(२) सन १९३७ सालीं मीं तुरुंगांतून सुटून आल्यानंतर तुरुंगांत असतांना 'विनायक' नांवाची एक राजकीय कादंबरी लिहिली होती. ती माझे मित्र वा. वि. साठे यांनीं माझ्या सुटकेनंतर प्रसिद्ध केली. तिची प्रत तात्यांना भेट देण्यासाठीं म्हणून घेऊन मी त्यांच्या भेटीला गेलों. प्रथम त्यांनीं २० जुलै १९३१ च्या भेटीचा विनोदानें उल्लेख केला व 'वा रे! थापाड्या!' असें ते हंसत हंसत मला म्हणाले. त्या भेटीच्या वेळीं तात्यांनीं अगदीं सद्गदित अंतःकरणानें माझें स्वागत केलें व माझ्या कादंबरीचेंहि त्यांनीं पुढें कौतुक केलें. केसरींत त्या कादंबरीवर चांगला अभिप्रायहि दिला.

(३) तात्यांची जन्मभर आठवण राहावी अशी एक ठेव तात्यांनीं माझ्याजवळ देऊन ठेवली आहे व ती अगदीं मृत्यूपूर्वी तेराच दिवस. पुण्यांतील 'श्रीशिवाजी मंदिर संस्था' या संस्थेचे तात्या हे विश्वस्त होते. या ट्रस्टचे मूळचे ट्रस्टी तीन (१) लो. बाळ गंगाधर टिळक, (२) प्रो. हरी गोविंद लिमये व (३) नरसिंह चिंतामण केळकर. यांतील पहिले दोन विश्वस्त दिवंगत झाल्यानंतर तात्यासाहेब

हे एकटेच विश्वस्त राहिले. त्यानंतर त्यांनीं पुढें आपल्या जोडीला श्री. ल. ब. भोपटकर यांना विश्वस्त म्हणून घेतलें. या ट्रस्टचा मुख्य हेतु श्रीशिवाजी महाराजांचा वार्षिक उत्सव थाटानें व्हावा व जाहिर सभा या ठिकाणीं व्हाव्यात असा होता व त्यासाठींच येवढी विस्तीर्ण जागा घेण्यांत आलेली होती. या ट्रस्टचे काम तात्यांनीं फारच उत्तम रीतीनें चालविलें.

मृत्यूपूर्वी एके दिवशीं मुद्दाम मला त्यांनीं आपल्या घरीं बोलाविलें व मी आतां या संस्थेंतून (शिवाजीमंदिर) निवृत्त होऊं इच्छितों व पुढची जबाबदारी तूं आपल्यावर घे असें त्यांनीं मला सांगितलें. लो. टिळकांचे नातू श्री. जयंत श्रीधर टिळक यांना पण माझ्याबरोबरच या संस्थेचे विश्वस्त म्हणून तात्यांनीं नेमलें. लो टिळक या संस्थेचे विश्वस्त होतेच; त्यांच्या जागीं त्यांचे कर्तृत्ववान नातू आले ही एक अत्यंत उचित अशीच घटना होय. आग्रह करून त्या दिवशीं मला त्यांनीं स्टँप आणावयास लावले व त्यावर ट्रस्टडीड लिहून त्यांनीं तीन विश्वस्तांची नेमणूक केली. ते तीन ट्रस्टी म्हणजे, (१) श्री. ल. ब. भोपटकर, (२) वासुदेव बळवंत गोगटे व (३) जयंत श्रीधर टिळक. आम्हांला अशी कल्पनाहि नव्हती कीं, या ट्रस्टडीडवर सही केल्यापासून १४ व्या दिवशीं पहाटे तात्या एकाएकीं आम्हांला सोडून जातील !



कै. गो. गो. मुजुमदार

(राजकवि, साधुदास, सांगली)

(१) सन १९२९ च्या सप्टेंबरमधील गोष्ट. 'मराठीची सजावट' हा माझा ग्रंथ दोन भागांत छापून निघत होता, आणि त्यांतील दुसऱ्या भागाला प्रस्तावना लिहिण्याचें तात्यासाहेबांनीं मला अभिवचन दिलें होतें. कार्यबाहुल्यामुळें तात्यासाहेबांना पुणें मुक्कामी फुरसत झाली नाहीं आणि ते सप्टेंबरच्या प्रारंभीं मध्यवर्ती विधिमंडळाच्या बैठकीसाठीं सिमल्यास निघून गेले. मीं त्यांना एक निकडीचें पत्र लिहून आठवण दिली. त्याबरोबर त्यांनीं सिमल्याहूनच ताबडतोब प्रस्तावना लिहून पाठविली. ही प्रस्तावना त्यांच्या लौकिकास साजेशी मार्मिक तर आहेच, पण पुस्तकाचे छापील फॉर्म आपल्याबरोबर नसतांना केवळ वाचलेल्या आठवणीवरून त्यांनीं ती कशी लिहिलेली असावी याचा मला फार विस्मय वाटला. इतका शब्दाचा धड, आठवणींचा खंबीर साहित्यिक मला दुसरा आढळला नाहीं.

(२) तात्यासाहेब एकदा सांगलीस आले होते आणि येथील सुप्रसिद्ध वकील रा. गणपतरावजी गोडबोले यांच्या घरीं उतरले होते. कांहीं तरी विशेष निमित्तानें त्यांचा सत्कार चालला होता आणि अनेक संस्था व व्यक्ति त्यांना हार

समर्पण करीत होत्या. मीहि सदर समारंभास उपस्थित होतों, पण बरोबर हार नेला नसल्यामुळें माझी फार कुचंबणा झाली. तेव्हां मीं तेथल्या तेथेंच एक श्लोक करून 'हा माझा हार' असें म्हणून तो श्लोक त्यांना अर्पण केला. कौतुकप्रवृत्तिक तात्यासाहेब लगेच मार्मिकपणें म्हणाले, 'हार गडबडीनें गुंफला आहे, पण फार सुगंधी आहे!'

(३) तात्यासाहेबांना मी गुरुजी असें संबोधित असे. एकदां या शब्दाला हरकत घेऊन ते मला म्हणाले, 'मीं तुम्हांला साहित्यांतील कसलेच धडे दिले नसतांना तुम्ही मला गुरुजी कां म्हणतां?' मीं उत्तर दिलें, 'तुम्हीं मला धडे दिले नाहींत; पण मीं ते तुमच्या लेखनशैलीवरून घेतले आहेत. महाभारतांतील एकलव्यानें द्रोणाचार्यांना कळूं न देतां त्यांची विद्या उचलल्याचा जुना दाखला आहेच. मात्र माझी निष्ठा एकलव्याइतकी जबर नसेल म्हणून आपलें शिष्यत्व मिरविण्याइतपत पात्रता माझ्या अंगीं आली नाहीं. इतकीच गोष्ट!' यावर तात्यासाहेब कांहीं बोलले नाहींत. कारण तोंडावर स्तुति करणें त्यांना आवडत नसे; पण त्यांच्या स्मितावरून माझा कोटिक्रम त्यांना पटला असावा यांत शंका नाहीं.

❋

सर भवानीशंकर नियोगी

(सी. आय. ई., माजी हायकोर्ट जज्ज, नागपूर)

(१) दे. भ. तात्यासाहेब यांचा माझ्याशीं लोकमान्य टिळकांचे अनुयायी या नात्यानें स्नेहाचा परिचय दीर्घकालाचा होता. तात्यासाहेबांनींच १९०८ सालच्या एप्रिल महिन्यांत गायकवाडवाड्यामध्यें मी नागपुरांतील राष्ट्रीय मंडळाचा एक होतकरू तरुण आहे म्हणून माझी लोकमान्यांशीं ओळख करून दिली. तात्यासाहेबांच्या भेटीचा अखेरचा योग ते नागपुरांस १९४५ च्या आक्टोबर महिन्यांत राजाराम लायब्ररीच्या सुवर्णमहोत्सवानिमित आले होते. तात्यासाहेब हे कट्टर बुद्धिवादी ही गोष्ट त्यांच्या साहित्यसेवेइतकीच प्रसिद्ध आहे. मला या बाबतींत अनुभव आला तो मी येथें नमूद करतों.

१९१५-१६ सालीं मी कै. अच्युतराव कोल्हटकरांनीं सुरू केलेल्या 'मेसेज' या इंग्रजी दैनिकाचा मुख्य संपादक होतों. तेव्हां तात्यासाहेब यांनीं आगाऊच मला अशी सूचना केली कीं, सार्वजनिक कार्यें केवळ तारुण्यांतील उत्साह व अंधश्रद्धा यावर यशस्वी होत नाहींत. त्याप्रमाणें अखेरीस खास लोकमान्यांच्याच सल्ल्याप्रमाणें मला 'मेसेज'च्या भानगडींतून अंग काढून घ्यावें लागलें. पुढें १९२१ सालीं महात्मा गांधी यांनीं कॉंग्रेसचीं सूत्रें हातांत घेऊन 'एक वर्षांत स्वराज्य' अशी घोषणा करून असहकाराची चळवळ

सुरू केली. तदनुरोधानें मींहि आपला वकिलीचा व्यवसाय स्थगित केला होता व धारवाडला शिवलिंगाप्पानें गोळीबार केला त्या प्रकरणाची चौकशी करण्याकरितां ठरविलेल्या मंडळामध्यें माझी नेमणूक झाली होती. धारवाडला जात असतांना मुद्दाम मी पुण्यांत उतरून तात्यासाहेबांना भेटलों. तेव्हां ते म्हणाले, "काय शंकरराव! तुम्ही मेसेजच्या चक्रव्यूहांतून निघून महात्म्याच्या होमकुंडांत पडलांत याबद्दल मी तुमचें अभिनंदन करूं काय!" पुढें संभाषणामध्यें त्यांनीं सत्य व अहिंसा या शब्दानें कदाचित् कांहीं भाविक लोक गांधींचे अनुयायी बनतील; परंतु कॉंग्रेसचें भजनीमंडळींत रूपांतर केल्यानें स्वराज्याच्या घड्याळाचा काटा मागें जाईल अशी त्यांनीं भीति प्रदर्शित केली. मी विनोदानें म्हणालों कीं, 'ज्याअर्थी लोकमान्यांचें मत सर्व पक्षांनीं कॉंग्रेसमध्यें राहूनच कार्य करावें असें होतें, त्या अर्थी कॉंग्रेस हें भजनीमंडळ झालें तर आपल्यालाहि टाळ वाजविल्याशिवाय गत्यंतर नाहीं!' ते म्हणाले, 'असेंच केवळ नाहीं, निराळा सुसंघटित राजकीय पक्ष काढूनसुद्धां आपल्याला कॉंग्रेसमध्यें राहतां येईल व आपलें म्हणणें जोरानें मांडतां येईल. टिळक तत्त्वज्ञान अमर आहे.' त्याप्रमाणें त्यांनीं प्रयत्न केला. १९४५ च्या आक्टोबरमध्यें ते नागपुरास आले होते. तेव्हां कॉंग्रेसच्या धोरणासंबंधीं त्यांचें मत बदललें होतें असें मला दिसलें नाहीं. परंतु सप्टेंबर १९४६ च्या सह्याद्रीच्या अंकांतील त्यांच्या लेखांत त्यांनीं "कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या शहाणपणाचा किंवा गांधींच्या अनुयायांच्या भोळसट वृत्तीचा विजय असो; परंतु राजकीय चळवळ करणारा एक नामांकित पक्ष म्हणून गांधी व गांधीप्रणीत कॉंग्रेस यांनीं बाहेरच्या जगावर छाप पाडली, याकरतां तरी त्यांचें अभिनंदन अवश्य केलें पाहिजे," असें प्रांजलपणें कबूल केलें. यावरून त्यांच्या कॉंग्रेसशीं असणाऱ्या विरोधाचें मूळ विकारवशतेंत, हटवादीपणांत, एककल्लीपणांत, असूयेंत अगर दुष्टबुद्धींत बिलकूल नसून तत्त्वांत होतें हें स्पष्ट दिसतें.

(२) राजकीय विषयाप्रमाणें साधुसंत म्हणून गाजलेल्या व्यक्तींच्या बाबतींत सुद्धां ते बुद्धिवादाचीच भूमिका घेत असत. नागपुरांत कांहीं वर्षांपूर्वी गुलाबराव महाराज या नांवाचे संत होऊन गेले. त्यांच्याबद्दल असा सार्वजनिक ग्रह झाला होता कीं, ते आंधळे असून सुद्धां कोणत्याहि ग्रंथांतील मजकूर, तो ग्रंथ केवळ उशाशीं ठेवून निजल्यावर, त्यांच्या बुद्धींत तो उतरत असे! १९४५ सालीं तात्यासाहेबांनां मला पत्रद्वारें त्यांच्याबद्दल माहिती विचारली. मीं त्यांना लिहिलें कीं, जर मला कोर्टापुढें साक्षीदार या नात्यानें हा प्रश्न कोणीं केला, तर खुद्द मला वरील चमत्काराबद्दल कांहीं माहीत नाहीं असेंच सांगावें लागेल. ते नागपुरास १९४५ सालीं आले होते; तेव्हां यासंबंधानें आम्ही बोलत असतांना ते म्हणाले, 'तुम्हीं जें उत्तर दिलें त्यालाच मी बुद्धिवाद म्हणतों. एरवी अंध भावनांचा गोंधळ हा असाच चालावयाचा!'

❋

बाबू रामचंद्र शिंदे ऊर्फ बाबू टांगेवाला

(क्रिकेट खेळाचे शोकीन, पुणे)

(१) महाराष्ट्रांत जे थोर लोक होऊन गेले त्यांत तात्यासाहेब एक महापुरुष होऊन गेले. ते वारले तेव्हां मी सर्व दिवस टांगा सोडून दिला. तो संबंध दिवस मी रडत होतों. शेवटी त्यांच्या प्रेतयात्रेंत सामील झालों. असा पुरुष पुन्हां होणें नाहीं. राजे, महाराजे, विद्वान् त्यांचे गुण गातात. मी तर बोलून चालून अडाणी टांगेवाला. पण त्या सर्वांपेक्षां तात्यांचे गुण मींच विशेष चाखतों. तात्या गेल्यानें महाराष्ट्राचें नुकसान झालें, अखिल भारताचें नुकसान झालें. त्यांच्यासारखा मुत्सद्दी व राजकारणी अगदींच क्वचित्. तसेंच त्यांचें खाजगी वर्तन अती गोड. कोणीहि त्यांच्याकडे गेला तरी त्याला योग्य सल्ला देऊन त्यास हंसत ते वाटेस लावीत, असा त्यांचा मला बराचवेळां अनुभव आलेला आहे. माझा टांगा त्यांच्याकडे नेहमीं जात असे. टांग्यांत बसल्यावर त्यांच्याबरोबर जे कोणी असत त्यांस ते सांगत कीं, "हा आपला बाबू आहे. माणसांत एखादातरी उत्कट गुण असावा, तसा याच्यांत क्रिकेटबद्दलचा आहे." हें ऐकून मला आनन्दाचें भरतें येई. माझ्या टांग्यांत बरेच मोठे लोक बसले असतील; पण असें कोणीच बोललें नाहीं, म्हणून गहिंवर येतो.

(२) एकदां टांग्यांतून जात असतां ते म्हणाले, "बाबू, तूं माझ्या घरीं येऊन जा." त्याप्रमाणें मी गेलों. त्यांनीं माझी मुलाखत घेतली व ती सह्याद्रीमध्यें माझ्या फोटोसकट छापली. अंक बाहेर पडला तेव्हां लोक मला म्हणूं लागले, "अरे बाबू, तूं आतां फार मोठा झालास! साहित्यसम्राट् तुला लेखक मिळाले!" मी त्यांस म्हणे, "खरेंच मी भाग्यवान्, तात्यांनीं मला संबंध देशांत प्रसिद्ध केलें. त्यांच्यामुळें मी जगजाहीर झालों!"

(३) एकदां टांग्यांतून जात असतां मी त्यांना म्हणालों, "तात्या, तुमच्यावर लोक फार टीका करतात!" ते शांतपणें म्हणाले, "अरे, त्यांच्याकडे लक्ष द्यावयाचें नसतें. आपलें काम तुझा घोडा जसा डोळे मिटून चालला आहे तसें करावयाचें असतें. तुलाहि नाहीं कां तुझे टांगेवाले नांवें ठेवीत? मग तूं कधीं क्रिकेट खेळणाराला हार घालण्याचें किंवा कप देण्याचें कमी केलें आहेस का?"

(४) एकदां असेंच टांग्यांतून चाललों असतां, बोलण्याच्या भरांत, मी आपली मान वळवून त्यांच्याशीं सारखा बोलत होतों. तेव्हां ते म्हणाले, 'अरे, पुढे घोड्याकडे पाहा; तो वाट सोडील.' तेव्हां मी म्हणालों, "तो माझा घोडा आहे. माझ्यापेक्षाहि त्याला तुमचें बोलणें आवडतें. म्हणून तो आपले कान तुमच्याकडे टवकारून पावंडा पावंडानें चालला आहे. काळजी नको." हें ऐकून ते खूपच हसले.

(५) एकदां टांगा चालू असतां मीं त्यांस विचारलें, 'तात्या, लोक मला म्हणतात, बाबू, तात्यांच्या संगतीनें तूं आतां फार मोठा झालास!' त्यावर ते म्हणाले, "मग यांत काय बिघडलें! तें खरेंच आहे. आतांच पाहा; तूंहि टांग्यांत, मीहि टांग्यांत जवळजवळ आहोंतच! यांत फरक कोणचा? दोघेहि सारखेच!"

(६) प्रो. देवधर यांची मॅच होती. तेव्हां तात्या मला म्हणाले, "काय बाबू! कप बक्षीस ठेवावयाचे असतील; तसेच फुलांचे हार आणणार असशील?" मी म्हणालों, "ही मॅच मोठी. माझें बक्षीस लहान, कसें चालेल!" ते म्हणाले, "अरे, फूल नाहीं फुलाची पाकळी तूं दिलीस तरी त्या पाकळीला फुलाचाच सुगंध आहे. कारण तूं गरीब. इतकें करतोस हें काय थोडें आहे? माझ्या आयुष्यांत तुझ्यासारखा क्रिकेटचा इतका शोकिन मीं गड्या पाहिला नाहीं."

(७) त्यांच्या बंगल्यावरून मी टांगा घेऊन जेव्हां जेव्हां जातों, तेव्हां तेव्हां मला असा भास होतो कीं, तात्या अजून आंत आहेत. मला हाक मारतील; फार काय पण, घोडाहि तेथें थोडा थबकतो, यामुळें ते गेल्यासारखे मला वाटत नाहीं!



धनंजय रामचंद्र गाडगीळ

(प्रिन्सिपॉल, अर्थशास्त्रज्ञ, पुणें)

(१) तात्यासाहेब यांची माहिती होण्याचा अगर व्याख्यानें ऐकण्याचा योग माझ्या लहानपणीं आला नाहीं. त्यांचें पहिलें जाहीर व्याख्यान मीं सुरतेस ऐकलें. १९२८ सालीं बाडोलीच्या लढ्याच्या वेळीं बहुतेक विख्यात पुढाऱ्यांनीं बाडोलीस व सुरतेस भेटी दिल्या; व त्यांपैकीं अनेकांचीं व्याख्यानेंहि झालीं. तात्यासाहेबांचें व्याख्यान इंग्रजींत दीड तास झालें, तें मला विशेष आवडल्याचें अजूनहि स्पष्ट आठवतें. कारण त्यांत वृथा शब्दावडंबर न माजवितां तात्त्विक भूमिकेची स्पष्ट मांडणी व व्यावहारिक धोरण पत्करण्याची भूमिका यांचा सुंदर मिलाफ केला होता. भाषाहि उत्तम होती.

(२) तात्यासाहेब यांचा व माझा खरा परिचय पुण्यास मी १९३० सालीं आल्यानंतरच झाला. महाराष्ट्रांत स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याप्रीत्यर्थ खटपट करण्याकरितां एक समिति पुण्यांत स्थापिली गेली व तिचा मी चिटणीस झालों. या कामीं तात्यासाहेबांचा सल्ला व मदत घेण्याचा प्रसंग वारंवार येई. केव्हांहि त्यांच्याकडे गेलें असतां त्यांजकडून साहाय्य तत्परतेनें व आस्थेवाईकपणें होई. आपल्या हातीं असलेल्या प्रत्येक कार्याची त्यांस कशी आठवण असे याबद्दलचा अनुभव विद्यापीठसमितीच्या अनुषंगानेंच मला आला. १९३२ सालीं त्यांनीं शासंड

टेबल कॉन्फरन्सचें निमंत्रण स्वीकारलें, तेव्हां कॉन्फरन्सला जाण्यापूर्वी गव्हर्नरांची भेट झाली असतां विद्यापीठाविषयीं बोलणें निघून त्याबद्दलचा गव्हर्नरांचा ग्रह तात्यासाहेबांना अनुकूल वाटला. ही संधि योग्य आहे असें लक्षांत येतांच बोटोवरूनच त्यांनीं मला पत्र लिहिलें व पुढील कार्यपद्धति व तिचा उठाव यांबद्दल त्यांनीं सूचना दिल्या. त्यांस अनुसरूनच काम होऊन १९३३ मध्यें शिष्टमंडळ व त्यांतून उद्भवलेली परिषद हीं घडून आलीं. या परिषदेंत शेवटीं महाराष्ट्र विद्यापीठाच्या आक्षेपकांस तात्यासाहेबांनीं दिलेलें मुद्देसूद व बाणेदार उत्तर हजर असलेल्यांस संस्मरणीय असें झालें.

(३) तात्यासाहेबांच्या कार्यपद्धतीचा आणखी एक विशेष माझ्या प्रत्ययास आला. तात्यासाहेबांनीं आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ एक पारितोषिक-योजना जाहीर करून हें पारितोषिक महाराष्ट्र विद्यापीठ अस्तित्वांत आल्याबरोबर त्याच्या-मार्फत दिलें जावें अशीहि तरतूद केली. विद्यापीठ अस्तित्वांत येईपावेतों योजना चालविण्याकरितां त्यांनीं तीन विश्वस्त नेमले. एक स्वतः अगर केळकर घराण्याचा प्रतिनिधि, दुसरे शि. प्र. मंडळीचे चिटणीस अधिकारतः व तिसरे मला नेमलें. वास्तविक पारितोषिक मराठी ग्रंथास द्यावयाचें व याबाबत माझा अधिकार अत्यल्प. माझ्यापेक्षां अधिकारानें अधिक व तात्यासाहेबांशीं कितीतरी जास्त परिचित अशा पुण्यांत अनेक व्यक्ति असतां माझी निवड कां केली याचें मला प्रथम आश्चर्य वाटलें. पण नंतर ही नेमणूकहि अधिकारतः असावी असं माझ्या लक्षांत आलें. भावी विद्यापीठाचा प्रतिनिधि म्हणून तात्यासाहेबांनीं विद्यापीठ-समितीच्या चिटणिसाची नेमणूक केली. समितीची घटना पुरती बांधलेली नसल्यामुळें नेमणूक अधिकारतः करतां आली नाहीं, यामुळें व्यक्तिशः केली असावी. पण यांत यथोचित पद्धतीचा स्वीकार करण्याचा त्यांचा कटाक्ष दिसून आला.



कै. डॉ. बा. शि. मुंजे

(संस्थापक, भोसले लष्करी शाळा, नाशिक)

(१) १९२८ किंवा १९२९ साल असेल. मी त्या वेळेस सेंट्रल असेंब्लीचा मेंबर होतों. असेंब्लीमध्यें मी बहुधा फौजी विषयावरच बोलत असे. एके दिवशीं फील्ड मार्शल सर वुइलियम बर्डवुड, कमाण्डर-इन-चीफ, यांच्याशीं माझें बोलणें झालें. ते म्हणाले, "हिंदुस्थानच्या डिफेन्सचा प्रश्न फार भानगडीचा व कठीण आहे. त्याची असेंब्लीतील तुम्हां लोकांना विशेषशी कल्पना नाहीं. तुम्ही लोक पुस्तकें वाचतां व वाटेल तसें बोलतां." मी म्हणालों, "असेल तसें; पण प्रसंग जर द्याल तर

आम्ही आपल्या सरहद्दीवरील डिफेन्सचीं सर्व ठाणीं व व्यवस्था पाहून घेऊं, म्हणजे आम्हांला त्यासंबंधींची कल्पना येईल." ते म्हणाले, "ठीक आहे, पाहतों काय व्यवस्था करतां येईल ती." नंतर कांहीं दिवसांनीं असेंब्लींतील निवडक अशा कांहीं माणसांची एक लहानशी टोळी या कमांडर-इन-चीफनें आपल्या इंग्रजी मिलिटरी ऑफिसर्सच्या देखरेखीखालीं पाठविली. त्यामध्यें कै. श्रीनिवास आयंगार, कै. पं. मदनमोहन मालवीय, कै. पं. मोतीलाल नेहरू, कै. नरसोपंत केळकर, अणे व मी अशी मंडळी होतों. त्या वेळेस मलाकंद, खैबर, जडोला, रझमक, डेराइस्माईलखान वगैरे सरहद्दीवरील फौजेचीं ठाणीं आमच्या पाहण्यांत आलीं. खरोखरच तो प्रांत मोठा बिकट प्रांत आहे. तेव्हां ज्या दिवशीं आम्ही खैबर मुक्कामीं पोहोंचलों, त्या वेळेस आम्ही सरकारचे हिंदुस्थानी पाहुणे म्हणून आमच्या भेटीकरितां १०–१५ पठाण मंडळी आली. त्यांमध्यें सर्व लोक जरी बिलकूल पठाणासारखे दिसत होते तरी त्यांमध्यें कांहीं मंडळींच्या कपाळावर गंध लावलेलें होतें! ही मंडळी जेव्हां आली तेव्हां त्यांपैकीं कांहींच्या मस्तकांवर गंध पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. तात्यासाहेब माझ्याजवळच उभे होते. त्यांस मी म्हणालों, "तात्यासाहेब, पठाण लोकांच्या मस्तकावर चंदन ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे." तात्यासाहेब म्हणाले, "त्यांना विचारल्यावर उलगडा होईल." मी त्यांस म्हणालों, "आपण सर्व पठाणच कां!" ते म्हणाले, "होय, आम्ही सर्वच पठाण." "मग तुमच्यांपैकीं कांहींच्या मस्तकावर हिंदूप्रमाणें चंदन कसें दिसतें!" ते म्हणाले, "होय, आम्ही सनातनी हिंदु आहोंत." मी म्हणालों, "आर्यसमाजी हिंदु का!" ते म्हणाले, "नाहीं, नाहीं. आम्ही आर्यसमाजी हिंदु नाहीं. आम्ही बिलकूल सनातनी हिंदु आहोंत." तेव्हां तात्यासाहेबांस मोठा विस्मय वाटला. ते जसे टोळीनें आमच्या भेटीला आले त्या वेळीं त्यांनीं आपल्याबरोबर एक दुंबा – बोकड – आणला होता. आम्ही सर्व त्या बोकडाकडे पाहून मनांतल्या मनांत विचार करूं लागलों. तो दुंबा – बोकड – पाहून मीं तात्यासाहेबांस म्हटलें, "हा दुंबा कशाकरितां असेल? पाहुणचाराकरितां तर नाहीं! विचारून पाहावें." मीं त्या पुढाऱ्यांस म्हणालों, "क्यों पठाण, आपसे मिलकर बडी खुशी हुई, लेकिन यह बकरा किस वास्ते!" त्या पठाणाचा म्होरका जो होता तो म्हणाला, "साहेब, यह आपके मेहमानीवास्ते लाया है. हम इसको दुंबा बोलते है." जवळच श्रीनिवास आयंगर व बापूजी अणे वगैरे मंडळी होती. त्यांना मोठें गूढ पडलें कीं, आतां या दुंब्याचें काय करावें! तेव्हां मी सर्वांस उद्देशून तात्यासाहेबांस बोललों, "आपल्या सर्वांच्या तर्फे मी या दुंब्याचा स्वीकार करतों. मी सनातनी ब्राह्मण आहें, मला हा दुंबा चालतो!" सर्व मंडळी मोठ्यानें हंसली. तात्यासाहेब मला म्हणाले, "वा, डॉक्टरसाहेब मोठी मौज केली!"

(२) आठ-दहा वर्षे झालीं. माझ्याशीं आणि कै. श्री. भाई परमानंद यांच्याशीं मोठा वादाचा आणि झगड्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. वाद व झगडा जो झाला तो त्यांच्या आमच्या खाजगी प्रश्नासंबंधीं नव्हता किंवा हिंदुमहासभेचें धोरण किंवा राजकारण यासंबंधीहि नव्हता. तो केवळ सार्वजनिक बाबीसंबंधीं होता. तो झगडा जरी ७-८ वर्षे चालला तरी त्यामुळें भाईजीसंबंधानें माझ्या प्रेमांत व आदरांत बिलकूल फरक झाला नाहीं. भाईजी व भाईजींच्या मंडळींनीं वर्तमानपत्रांत जरी वाद उपस्थित केला तरी मी उत्तर देऊन वाद वाढविण्यास कारणीभूत झालों नाहीं. जो वाद होता तो एकाच गोष्टीबद्दल आणि ती गोष्ट ही कीं, दोन-दोन लक्ष रुपये खर्च करून जी हिंदुमहासभेची इमारत रीडिंग रोड, नवी दिल्ली, येथें बांधण्यांत आली होती ती इमारत कोणाची ? भाईजींच्या खाजगीची कीं भाईजींनीं नवीन जी सोसायटी – Servants of Hindu Society – रजिस्टर्ड केली होती तिची किंवा हिंदुमहासभेची ? माझें म्हणणें एवढेंच कीं, ती सर्व इमारत हिंदुमहासभेची व ती सर्व इमारत हिंदुसभेच्या ताब्यांत असावी. वादाचा व झगड्याचा मुद्दा येवढाच. प्रथम लवादानें या प्रश्नाचा निकाल लावावा म्हणून प्रयत्न करण्यांत आला. परंतु सर मन्मथनाथ मुकर्जी लौकरच वारले म्हणून तें आर्बिट्रेशन थांबलें. पुढें सरकारी कोर्टांत तो झगडा चालला. आम्ही वादी होतों. भाईजी प्रतिवादी होते. परंतु शेवटीं दोन वर्षांपूर्वी नरसोपंत केळकर यांना आर्बिट्रेटर नेमून निकाल लावून घ्यावा असें बहुमतानें ठरलें. नरसोपंतांना आर्बिट्रेटर नेमण्याच्या मी विरुद्ध होतों. कारण, त्यांचा स्वभाव मला माहीत होता कीं, कोणतीहि भांडणाची गोष्ट आणि मित्रामित्रांत जर भांडणें उपस्थित झालीं तर 'अर्धं त्वया अर्धं मया' हा न्याय ते लावीत असत. मला ही गोष्ट पसंत नव्हती. मला कायद्याचा व न्यायाचा निकाल पाहिजे होता कीं, "ही इमारत कोणाची, हिंदुमहासभेची कीं इतरांची ?" पुढें बहुमतानें नरसोपंत केळकर हे आर्बिट्रेटर नियोजित झाले.म्हणून मी लाचार झालों. परंतु अशा प्रकारची तडजोड न व्हावी म्हणून, आणि कायद्यानें आणि न्यायानें जो निकाल होईल तो देण्यांत यावा म्हणून मीं एक युक्ति काढली. मी तात्यासाहेबांस प्रत्यक्ष भेटलों नाहीं; कारण त्यांचा स्वभाव मला माहीत होता; कारण अशा प्रकारच्या भानगडींत ते कोणाच्याहि मानमुरवतीकडे पाहत नसत. त्यांना जें बरें वाटे त्याप्रमाणें ते करीत असत. म्हणून मीं त्यांस पत्र लिहिलें, "अर्धं त्वया अर्धं मया या तत्त्वावर हा झगडा मिटविण्यांत येऊं नये; आपण कोर्टाप्रमाणें सर्व साक्षी कागदपत्र पाहून कायद्यानें व न्यायानें निकाल द्यावा."

अशा प्रकारचें पत्र लिहिल्यावर कांहीं दिवसांनंतर जेव्हां त्यांची माझी प्रत्यक्ष भेट झाली, तेव्हां बोलण्यामध्यें तात्यासाहेब म्हणाले, "तुमचें पत्र मिळालें.

तुमच्या म्हणण्याचा मी विचार केला आहे. तुम्ही ज्या कारणाकरितां माझ्या आर्बिट्रेटरच्या निवडणुकीस प्रतिकूल मत दिलें होतें तीं कारणें खरीं आहेत." मी म्हणालों, "तात्यासाहेब, हा कांहीं वाटणी किंवा पार्टिशनचा झगडा नाहीं. हा झगडा शुद्ध मालकीसंबंधी आहे. ही हिन्दु महासभेची इमारत कायद्यानें व न्यायानें कोणाची एवढाच प्रश्न आहे. यामध्यें निदान माझ्याकडून तरी भाईजींच्या मित्रत्वामध्यें व्यत्यय येणार नाहीं व त्या दृष्टीनें मी हा झगडा चालवीतहि नाहीं." पुढें हें अशा प्रकारचें कोर्ट केसरी ऑफिसमध्यें भरविण्यांत आलें आणि आनंदाची गोष्ट ही कीं, तात्यासाहेब केळकर यांनीं बिलकुल कोर्टाप्रमाणें काम चालविलें. त्यांनीं वादी-प्रतिवादींच्या जबान्या घेऊन व कागदपत्र पाहून बिलकुल कायद्याचा व न्यायाचा निकाल आमच्या बाजूनें दिला. अशी तात्यासाहेबांची न्यायबुद्धि होती. अशा प्रकारचा न्यायप्रिय मनुष्य, आमच्याबरोबर काम केलेला, दिवंगत झाला म्हणून फार दुःख होतें आणि पुण्यांत किंवा उभ्या महाराष्ट्रांत त्यांच्यासारखा मनुष्य त्यांची जागा भरून काढण्यास दुसरा नाहीं हें त्यांचा शत्रुहि (त्यांस शत्रु असल्यास) कबूल करील.



डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर

(एम्. ए., पीएच्. डी., कलकत्ता)

(१) केळकर यांस प्रथम मीं पुण्यांतील आनंदोद्भव थिएटरमध्यें पाहिलें. सन १८९१ सालीं डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं 'मृच्छकटिक' नाटक करून दाखविलें. त्या वेळेस अर्थात् माझे परमपूज्य वडील प्रोफेसर रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे हजर होते. नाटक उत्तमोत्तम झालें. नरसोपंत यांस दोन भाग (Parts) देण्यांत आले होते. त्यांची अंगयष्टि सुंदर व मोहक होती. चवथ्या अंकांत शर्विलक वसंतसेनेच्या मदनिका दासीला भेटावयास गेला, तेथें दोघांची अचानक गांठ पडली. त्या वेळेस शर्विलकानें तिच्या अप्रतिम सौंदर्याच्या वर्णनपर 'मदनमपि गुणैर्विशेषयन्ती रतिरिव मूर्तिमती विभाति येयम्' हा श्लोक मोठ्या सुस्वरांत गायला. त्या वेळेस टाळ्यांची मोठीच गर्जना झाली. माझे वडील स्वभावतःच फार गंभीर होते. तथापि विद्यार्थ्यांनीं मदनिकेच्या (अर्थात् नरसोपंतांच्या) सौंदर्याच्या व मोहकतेच्या प्रशंसापर हा टाळ्यांचा गजर केला. वडिलांकडे मीं थोडी दृष्टि वळविली, पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझे वडीलदेखील नरसोपंतांकडे पाहून सकौतुक हसत होते! चवथा अंक संपल्यानंतर पुष्कळ लोक म्हणजे शिक्षक, शास्त्रीबुवा, विद्यार्थी वगैरे चर्चा करूं लागले कीं अधिक सुंदर व मोहक कोण! वसंतसेनेचा पार्ट ज्यानें घेतला तो कीं मदनिका! पण दोघेहि मोठे सुंदर व मोहक होते असेंच सर्वांचें मत पडलें.

(२) त्या मृच्छकटिक नाटकामुळें त्यांची माझी चांगली ओळख झाली. त्यामुळें आमचा परिचयहि झाला व तो वाढत गेला. सन १८९१ सालीं व त्यानंतर एक वर्ष फर्ग्युसन कॉलेजची इमारत बांधली जात होती. त्या वेळेस दसऱ्याचें सीमोल्लंघन तेथें मोठ्या थाटानें होत असे. त्या वेळेस त्या वेळचे मोठमोठे लोक जमत होते. प्रिन्सिपाल आगरकर, लोकमान्य टिळक, रा. नामजोशी, प्रो. जिनसीवाले इत्यादि मंडळी येत असे व आकस, चुरसभाव पुरा विसरून एकमेकांची सप्रेम भेट घेत असत. मी तेथें अवश्य जात असें. नरसोपंत मला शोधून काढीत व कडकडून भेटत. ते मला सोनें (आपट्याचीं पानें) देत व मीहि त्यांना देई.

(३) चारपांच वर्षांपूर्वी मी पुण्यास गेलों होतों. एके दिवशीं पर्वती पाहावयास गेलों. पायऱ्या चढतां चढतां माझ्यापुढें नरसोपंतांस मीं जातांना पाहिलें. त्यांच्याबरोबर एक वयातीत बाई होती. म्हणून मीं हलकेंच " यथा यथा लगति शीतवातः " हा श्लोक पुटपुटला. माझे शब्द त्यांच्या कानीं पडले व त्यांनीं पाठीमागें वळून विनोदयुक्त हास्य केलें व नमस्कार केला. त्यांचा विनोद व सुभाषित यांचा मला बरींच वर्षें परिचय होता. म्हणून कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या बी. ए. परीक्षेला त्यांचें ' सुभाषित व विनोद ' हें पुस्तक मीं लावून ठेवलें होतें; सध्यां त्यांचें 'गद्यगुच्छ' हें पुस्तक ठेविलें आहे. एकंदरींत पाहतां केळकर हे अष्टपैलू होते; ज्यांचा ज्यांचा त्यांच्याशीं परिचय झाला होता त्यांच्या स्मृतिपथावरून ते कधींहि नाहींसे होणार नाहींत, अशी माझी खात्री आहे.

वा. रा. पुराणिक

(माजी व्हाइस चॅन्सेलर, युनिव्हर्सिटी, नागपूर)

(१) साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांना महाराष्ट्रांतील प्रसिद्ध पुढारी व लेखक या नात्यानें मी बरेच वर्षांपासून ओळखत असे. महाराष्ट्रांत किंबहुना साऱ्या हिंदुस्थानांत त्यांचें नांव इतकें दुमदुमलें आहे कीं, त्यांना न जाणणारी व्यक्ति क्वचित्च सांपडेल. त्यांचा माझा विशेष परिचय १९४६ सालअखेर नागपुरांतील राजाराम वाचनालयाचा सुवर्णमहोत्सव झाला त्या वेळीं झाला. मी त्या वाचनालयाचा बरेच वर्षांपासून अध्यक्ष आहें व राजारामपंत दीक्षित –ज्यांच्या नांवानें तें वाचनालय प्रसिद्ध आहे–त्यांचा व तात्यासाहेबांचा चांगला स्नेहसंबंध होता हें ऐकून माहीत होतें; म्हणून मीं व वाचनालयाच्या कार्यकारी मंडळानें तात्यासाहेबांस या प्रसंगीं बोलवावें असें ठरविलें व तात्यासाहेबांस आग्रहाचं आमंत्रण (पत्र व तारद्वारें) पाठविलें. त्यांनीं आधीं वृद्धापकाळांत इतक्या दूरचा प्रवास व दगदग सहन करवणार नाहीं या सबबीवर येण्याचें नाकारलें व

वाचनालयास उपदेशपर आपला आशीर्वाद पाठविला; परंतु आपल्या उत्तरांत तात्यासाहेबांनीं जी कळकळ व आत्मीयता दाखविली त्यावरून कार्यकारी मंडळानें पुनः आग्रह करून पाहण्याचे ठरविले व त्यांच्या चांगल्या परिचयाचे दोन गृहस्थ पुण्यास त्या कामासाठीं मुद्दाम पाठविले. अखेरीस आपल्या भिडस्त स्वभावाप्रमाणें त्यांनीं प्रसंगास येण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें ते आले. त्यांच्या या सौजन्यामुळे नागपुरकरांना फार आनंद वाटला व येथें त्यांचें मोठ्या प्रेमानें व थाटानें स्वागत करण्यांत आलें. या वेळीं जवळजवळ आठवडाभर त्यांचा नागपूरला मुक्काम झाला व या अवधींत त्यांनीं आपल्या समतोल बुद्धीच्या भाषणांनीं, विद्वत्तेनें व विनोदी स्वभावानें नागपूरकरांवर अशी छाप बसविली कीं, त्यांनीं आणखी कांहीं दिवस राहून निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें द्यावी अशी त्यांना आग्रहाची विनंती करण्यांत आली. माझा व त्यांचा दाट परिचय याच आठवड्यांत झाला. या वेळीं मी नागपूर विश्वविद्यालयाचा कुलगुरु होतों व म्हणून सर्व साहित्यिक संस्थांतर्फे व विश्वविद्यालयातर्फे तात्यासाहेबांना मानपत्र अर्पण करण्याचा मान मला देण्यांत आला. त्या मानपत्राला उत्तर देतांना तात्यासाहेबांनीं मराठी वाङ्मयावर जें मार्मिक व विनोदी भाषण केलें तें अद्यापहि सर्वांच्या लक्षांत आहे. यांत साहित्याच्या निरनिराळ्या अंगांचें विश्लेषण व वाङ्मयांत विनोदाचें स्थान कोणतें व कसें असावें यावरील विचार फारच मार्मिक व सुंदर होते.

(२) विषय कोणताहि म्हणजे राजकीय, सामाजिक अथवा साहित्यिक असो, तात्यासाहेब बोलूं लागले म्हणजे त्यांच्या विचाराचा समतोलपणा लागलीच लक्षांत येत असे व त्यांच्या बुद्धिवैभवाबद्दल व चातुर्याबद्दल खात्री पटत असे. विरुद्ध पक्षाचें काय म्हणणें आहे हें नीट समजून घेऊन त्यांतील गुणदोष लक्षांत घेऊन आपलें मत ते बनवीत असत व आपलें मत ते अशा रीतीनें मांडत असत कीं, उलट पक्षाच्या मंडळींत त्यांच्याविषयीं आदर कायम राहात असे. निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या विषयांवर चर्चा होत असतांना हे त्यांचे गुण सहज लक्षांत येत. त्यांच्या अंगीं वसत असलेलें सौजन्य व त्यांचा विनोदी स्वभाव यांचा अनुभव त्यांच्या सान्निध्यांत असतांना वेळोवेळीं येत असे. ते एवढे मोठे 'साहित्यसाम्राट्' व प्रसिद्ध 'देशभक्त'; परंतु लहानथोरांशीं, सर्वांशीं, ते मिळून मिसळून वागत असत व आपल्या विनोदाने सर्वांना हंसवून उपदेश करीत असत.

(३) त्यांचा वृद्धापकाळ लक्षांत घेतां त्यांच्यावर कामाचा बोजा जास्त पडूं नये म्हणून आमचें कार्यकारी मंडळ फार झटत असे; परंतु तात्यासाहेब कोणासहि 'नाहीं' म्हणण्यास तयार नसत. इतकेंच नव्हें तर त्यांच्या पूर्वपरिचयाचे जे लोक नागपुरांत होते त्यांच्या घरीं आमंत्रणाशिवाय देखील खेप टाकून आल्याशिवाय

त्यांना राहावलें नाहीं. दुपारची थोडी वामकुक्षी झाली कीं एकाद्या तरुणाप्रमाणें ते पुनः काम करण्यास तयार असत.

(४) याच मुक्कामांत त्यांचें नाटकावरील प्रेम व त्या कलेंतील त्यांची तन्मयता ही आमच्या लक्षांत आली. त्यांच्या सन्मानार्थ जीं नाटकें करून दाखविण्यांत आलीं, तीं त्यांनीं जागरणास न जुमानतां पूर्ण पाहिलीं व रंगभूमीबद्दल, विशेषतः मराठी रंगभूमीबद्दल, आपले विचार त्यांनीं येथील नाट्य-प्रेमी मंडळीस सांगितले. तात्यासाहेबांच्या मुक्कामाचा आठवडा निरनिराळ्या कार्यक्रमांनीं भरला होता. त्या सर्व कार्यक्रमाला नेमल्या वेळीं हंसतमुखानें हजर राहून त्यांनीं नागपूरकरांस निरनिराळ्या विषयांवर आपले विचार सांगून उपकृत केलें. त्यांच्यासंबंधीं लिहावें तितकें थोडेंच आहे. तात्यासाहेबांच्या निधनाचें वर्तमान ऐकून नागपूरकरांस धक्का बसला. मराठी वाङ्मयाचा खरा 'हिरा' गमावला मेला यांत शंका नाहीं.



दत्तो वामन पोतदार

(बी. ए., प्राध्यापक, महामहोपाध्याय, पुणें)

(१) मी बी. ए. होतांच अमेरिकेंत पुढील शिक्षणासाठीं जावें असा एक विचार माझ्या डोक्यांत आला. कांहीं छात्रवृत्ति जाहीर झाल्या होत्या. तेव्हां शिफारसपत्राची गरज पडली. तात्यासाहेबांनीं कसलेहि आढेवेढे न घेतां एक क्षणांत उत्कृष्ट शिफारसपत्र दिलें! त्यांनीं आपलें काम केलें. आतां आमचें नाणें चाललें नाहीं; त्याला त्यांचा काय उपाय?

(२) एकदां असें झालें. बहुशः इ. स. १९११–१२ साल असावें. कै. राजवाडे रात्रौ ९–९॥ च्या सुमारास मला बरोबर घेऊन तात्यासाहेब केळकरांकडे गेले. कै. वासुदेवशास्त्री खरे यांचे केळकर शिष्य, आणि कै. वासुदेवशास्त्री यांचें ऐतिहासिक लेखनसंग्रहाचें काम आर्थिक पेंचामुळें मंदावलें होतें. तो पेंच सोडवून शास्त्रीबुवांचें काम जोराला कसें लावावें ही विवंचना सोडविण्यासाठीं राजवाडे यांनीं नरसोपंतांपाशीं आग्रहानें चर्चा केली! त्या वेळीं राजवाडे आणि खरे यांचें खरें सौरस्य कसें होतें याचा मला प्रत्यय आला. आणि नरसोपंतांविषयीं राजवाडे जरी कधीं कौतुकानें बोलत नसत तरी या कालीं त्यांना अखेर तात्यांच्याकडेच जाणें उचित वाटलें याची मला मौज वाटली.

(३) भारत इतिहास संशोधक मंडळासाठीं प्रथम दहींच्या शिवाजी मंदिराच्या जागेंतच एक पट्टी मिळवावी अशी खटपट होती. शिवाजी मंदिराची मोकळी जागा केळकरांनीं झिजा करून घेतली होती. परंतु पुढें पंढरपुरला परिषद

झाली त्या वेळीं केळकर यांनीं शेजारची व समोरची बेहेरे यांची बखळ जागा मंडळासाठीं मिळावी ही योजना ठरविली. ती जागा हस्तगत करण्याच्या कामीं त्रास कांहीं थोडा नाहीं झाला. एकदां तर भररात्रीं ९।१० वाजतां जोराचें वादळ झालें. रस्त्यांत गुडघा गुडघा पाणी ! पण वेळ टळली तर मालक फिरण्याची धास्ती माझ्या पोटांत धस्स करीत होती ! काय करणार ! कसें होईल म्हणून चिंता ! पण नरसोपंत तश्श्या पावसांत अंगरखा पागोटें घालून निघाले. रस्त्यांत विजेचे दिवे नव्हते त्या वेळीं. हातांत कंदिल, वरून विजा चमचमताहेत ! अशा थाटांत आम्ही निघालों ! मालक सर्दच पडला आणि कबुली झाली ! अशी ही जागा आपल्या मंडळास मिळाली ! आणि त्या काळीं नरसोपतांचें हें असें अकृत्रिम साहाय्यच कारणीभूत झालें ! प्रथम ही जागा दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयानें मिळविली होती. पुढें विकत घेण्याचा मोका आला. त्याहि वेळीं तें काम पार पाडलें ! व तेंहि नरसोपंतांनींच आपली रक्कम आयत्या वेळीं पुढें करून आणि मालकाची संमति मिळवून ! !

(४) इ. स. १९१७ सालची गोष्ट. आम्ही सारे म्हणजे पंत पराडकर, मी, तात्यासाहेब इंदूरला मराठी साहित्य संमेलनासाठीं निघालों. त्या वेळीं वाटेंत नरसोपंतांनीं आपली कल्पना माझ्यापुढें मांडली कीं, " १८१८ ला मराठी राज्य बुडालें. १९१८ ला त्या गोष्टींला शंभर वर्षें पूर्ण होतील. तेव्हां मराठी राज्याचा आढावा घेणारा एक ग्रंथ या निमित्तानें प्रसिद्ध करावा. खरे शास्त्री यांचें साहाय्य मी मिळवीन, पण इतरांची मदत पाहिजे, कामें व विषय वाटून घेऊं. " झालें; याद्या झाल्या, टिपणें सुरू झालीं. पण काम रेंगाळत पडलें; तेव्हां तात्यासाहेबांनीं स्वतःच एकट्याच्या हिम्मतीवर ' मराठे आणि इंग्रज ' हा सर्वोत्कृष्ट ग्रंथ लिहून शतसांवत्सरिक श्राद्धसंकल्प सिद्धीस नेला ! असा त्यांचा दांडगा उरक आणि आत्मश्रद्धा ! !

(५) हल्लीं मी ज्या 'लोककल्याण' वास्तूंत राहतों त्यांतहि तात्यासाहेबांचा संबंध आलाच. मीं चिंचवडास राहण्यास जावयाचा बेत केला आणि सहज ती गोष्ट त्यांच्या कानावर घातली ! दुसऱ्या दिवशीं तात्या सकाळीं उठून 'पुष्करणी' बंगल्यांतून गांवांत थेट माझे मित्र धोंडूमामा साठे यांच्या घरीं गेले आणि माझा बेत मोडून काढून माझी स्थापना या 'लोककल्याण'गृहांत करण्याचा आग्रह त्यांनीं केला ! आणि अखेर तसेंच घडलें ! !

माझा ग्रंथसंग्रह मीं जुन्या घरांतून नव्या लोककल्याणमध्यें आणला. गड्ग्यांचा डोंगर पडला. तो पाहून तात्यासाहेब म्हणाले, " बोला, हा कधीं लावणार ! तुमच्याच्यानें कांहीं हा डोंगर हालविणें होणार नाहीं ! " मी म्हणालों – " सहा महिन्यांनीं या-आणि पाहा." मीं खरोखरीच तो पर्वत हालवून लावून टाकला आणि खरोखरीच तात्यासाहेब एका दिवशीं पुष्करिणी बंगल्यावरून चालत नदीवरून आले ते थेट लोककल्याणांत ! डोंगर हाललेला आणि पुस्तकें लावलेलीं पाहून त्यांस फार फार

समाधान वाटलें! चौथ्या मजल्यावर शांतता, उजेड, वारा सारखा वाहता हें दृश्य पाहून तात्यासाहेब म्हणाले, "– बस्स, मी येथेंच वाचनांसें आणि अभ्यासास बसणार!" याहून आणखी काय पाहिजे!

गोडींत माणसाला सहज चढवून काम करून घेण्याच्या त्यांच्या हातोटींचें, प्रेमळपणाचें, विद्याप्रेमाचें आणि साधेपणाचें हें स्वानुभवाचें उदाहरण माझ्या मनावर कोरून ठेवावें तसें ठसून राहिलें आहे."

(६) कांहीं वर्षें मी मुंबई युनिव्हर्सिटीच्या वाङ्मयशाखेचा (आर्टस् फॅकल्टीचा) सभासद होतों. तेथें मराठी अभ्यास मंडळावर तात्यासाहेबांची निवड व्हावी म्हणून प्रयत्न करण्याचें मीं मनांत आणलें. मला भय वाटत होतें कीं, मुंबई युनिव्हर्सिटींत अशी गोष्ट घडवून आणणें जरा कठिणच काम आहे! झालें तर पाहा! पण न झालें तर, तर तात्यासाहेबांसारख्या साहित्यसम्राटाला फुकट पणाला लावलें हा अपशब्द मात्र लागणार! म्हणून मुनशी, काणे प्रभृतींचें पाठबळ मिळविलें. तात्यासाहेबांची संमति पाहिजे, तर ते एकाएकीं कानाजवळचें हाड कुजल्याचें नजरेस आल्यामुळें सिमल्याहून तडक निघून मुंबईस इस्पितळांत पडलेले! ती गुप्त बातमी काढून त्याहि स्थितींत तात्यासाहेबांची भेट घेऊन त्यांची सही मीं मागितली आणि त्यांनीं दिली!! पण आमचा सारा बार फुकट गेला! युनिव्हर्सिटींतल्या खेळ्यांनीं निराळाच डाव केला!! पण तात्यांनीं चकार शब्दानें मला दुखविलें नाहीं!

न. का. घारपुरे

(एम्. ए., पीएच्. डी., प्रोफेसर, पुणें)

(१) 'ईस्ट ॲण्ड वेस्ट असोसिएशन' ही संस्था आम्हीं जानेवारी १९३४ मध्यें स्थापन केली. परदेशाला जाऊन आलेल्या लोकांनीं एकत्र यावें, विचाराविनिमय करावा, परदेश व हिंदुस्थान यांतील शैक्षणिक, सांस्कृतिक मैत्री दृढ व्हावी ह्या उद्देशानें ही संस्था कार्य करीत असे. संस्थेतर्फे मधूनमधून जेवणाचा कार्यक्रम होत असे. एका जेवणाला सर राधाकृष्णन्, दे. भ. सरोजनी नायडू, श्री. तात्यासाहेब केळकर इत्यादि बरेच थोरथोर लोक आले होते. जेवणाचा बेत टिळक स्मारक मंदिराच्या गच्चीवर सायंकाळीं ८॥ वाजतां होता. तात्यासाहेब त्या वेळीं जवळच राहत होते. उन्हाळ्यामुळें उकडत होतें. म्हणून तात्यासाहेब अंगांत नुसता सदराच घालून आले होते. आम्हां सर्वांना जरा आश्चर्य वाटलें. तात्यासाहेब म्हणाले, "अहो, उकडतें आहे कोण! शिवाय टिळक स्मारक मंदिर मला घरच्यासारखेंच आहे." थट्टेनें ते पुढें म्हणाले, "शिवाय जेवणाकडे माझें

लक्ष तुमच्यापेक्षां जास्त लागेल." आम्ही सर्वच हसूं लागलों. यावरूनच मला आठवतें कीं, असहकारितेची चळवळ जोरांत असतांना स्वदेशीवर तात्यासाहेबांचें शिवाजीमंदिरांत व्याख्यान चाललें होतें व ते म्हणाले, "ज्यांना स्वदेशीच कापड वापरावयाचें आहे, त्यांना तें शक्य आहे. आपल्या देशांत कपडे लागताहेत तरी किती? माझेंच पाहाना. मी हा गळ्यापर्यंत बंद बटनांचा कोट घालतों, त्यामुळें आंत सदरा घालावा लागत नाही, कापड वांचतें, स्वदेशीचा प्रश्न तेवढाच सुटतो," असें म्हणून त्यांनीं कोटाच्या दोनचार गुंड्या काढून दाखविल्या, तीं आंत सदरा नव्हता! असा त्यांचा मार्मिक साधेपणा होता.

(२) माझे मित्र श्री. नीलकंठ चिंतामण गद्रे यांनीं १९३५ मध्यें 'कृष्ण-कारस्थान' हें (कंसवधाच्या आख्यानावर) नाटक लिहिलें तात्यासाहेबांना वाचून दाखवून त्यांनाच तें अर्पण करण्याविषयीं परवानगी घ्यावयाची होती. तात्यासाहेबांची व माझी ओळख म्हणून मीं त्याप्रमाणें त्यांना विचारलें. त्यांनीं संमति दिल्यावर नाटकाचे दोन अंक त्यांना समक्ष वाचून दाखविले. त्यांनीं ते ऐकून घेऊन कांहीं सूचनाहि केल्या व नाटक चांगलें आहे असा अभिप्राय दिला व अर्पण करण्यासहि परवानगी दिली. त्याप्रमाणें गद्रे यांनीं नाटक त्यांना अर्पण केलें व छापील प्रत देण्याकरितां ते व मी त्यांच्याकडे गेलों. चांदीच्या तबकांत प्रत ठेवून ती त्यांना अर्पण केली व नमस्कार करून आशीर्वाद मागितला. तात्यासाहेब म्हणाले, "अहो, हें नाटक तुम्हीं मला अर्पण केलें तें ठीक झालें; परंतु त्याला हें चांदीचें पुष्टीपत्र हो कशाला? त्यांत वाङ्मयानंद आहे काय?" गद्रे यांना वाईट वाटेल म्हणूनच त्यांनी तबकाचा स्वीकार केला व स्वतःचें कवितांचें पुस्तक गद्रे यांना त्यांनीं परत भेट म्हणून दिलें. गद्रे यांना किती धन्यता वाटली हें सांगावयास नको.

(३) कै. रावसाहेब महादेव मोरेश्वर कुंटे, बी. ए., यांचें चरित्र लिहिण्यास मीं घेतलें आहे. हा ग्रंथ बहुतेक तयार होत आला आहे. कै. कुंटे यांच्यासंबंधीं तात्यासाहेबांना कांहीं माहिती असल्यास विचारावी या उद्देशानें मी त्यांच्याकडे गेलों होतों. कुंटे यांच्या विद्वत्तेबद्दल त्यांनीं आदर व्यक्त केला व खालीलप्रमाणें आठवण सांगितली :- "मी प्रथम पुण्यास दि. ८ ऑक्टोबर १८८८ ला आलों. पुण्यांत पाऊल ठेवतों तों मला सगळें वातावरण अगदीं विषण्ण व सुन्न दिसलें व म्हणून मीं चौकशी केली. तेव्हां मला समजलें कीं, पूना हायस्कूलचे कर्तबगार हेडमास्तर व विद्वान् संस्कृतज्ञ महादेव मोरेश्वर कुंटे वारले असून लोक दहन-भूमीकडे चालले होते. मीहि तिकडे गेलों. तेथें कुंट्यांचें मला प्रथमचें व शेवटचें दर्शन झालें. पुण्यांतील महादेव गोविंद रानडे वगैरे तत्कालीन मोठमोठ्या लोकांचीं कुंट्यांबद्दलचीं भाषणें ऐकलीं. एवढींच माझी आठवण आहे. माझें पुण्यास प्रथम येणें मला आठवलें कीं, कुंटे डोळ्यापुढें उभे राहतात!!"

❋

रामचंद्र गोविंद ऊर्फ तात्यासाहेब जाधवराव

(इनामदार, भुइंजकर, जि. सातारा)

(१) तात्यासाहेब यांच्याबद्दल मराठे समाजांत गाढ लोकप्रियता होती, हें ते सेंट्रल असेंब्लीच्या निवडणुकांस उभे असतां सिद्ध झालें. त्या वेळीं सातारा जिल्ह्यांत सत्यशोधकांचा फार जोर होता; वजनदार ब्राह्मणेतर उभे असून त्यांची व्याख्यानबाजी सारखी चालू होती. तात्यासाहेब एकदांच जिल्ह्यांत हिंडून गेले व इतक्या मोठ्या बहुमतानें निवडून आले कीं प्रतिपक्षी चकीतच झाले. आश्चर्य कीं, कित्येकांच्या अनामत रकमाहि जप्त झाल्या. त्यांचा सारा प्रचार वाया गेला आणि अखेर मराठ्यांनीं तात्यासाहेबांनाच मतें दिलीं. भुइंजेपुरतें मला माहीत आहे कीं, आमचे आजोबा ती० खंडेराव रायाजीराव यांचें मत तात्यासाहेबांनाच मिळणार हें कळतांच पंचक्रोशींतील सोळा गांवांतील मराठ्यांनीं आपलीं सर्व मतें केळकरांनाच दिलीं !

(२) १९२८ सालची गोष्ट; लोकमान्य टिळक व तात्यासाहेब यांवर ते केवळ ब्राह्मण म्हणूनच कित्येक मराठ्यांचा आक्षेप असे व ते थोर गृहस्थ मराठ्यांनीं चालविलेल्या सत्कार्यास हातभार लावण्यांत कुचराई करीत असा दुष्टपणाचा प्रचारहि होत असे. पण माझ्या अनुभवाप्रमाणें ही वस्तुस्थिति नसून खोटी गोष्ट आहे. पूज्य जिजामातेच्या पाचाड येथील समाधीचा जीर्णोद्धार व एकादें स्मारक करण्यासाठीं कै. सेनापति सरदार यशवंतराव खंडेराव दाभाडे, मी व आणखी कांहीं मंडळींनीं योजना केली. या प्रकरणीं संशोधनाच्या कामीं केवळ तात्यासाहेब केळकरांच्यामुळेंच आम्हांस यश लाभलें.

(३) तात्यासाहेब लोकसंग्रहाची एकहि संधि घालवीत नसत, तसेंच समदृष्टीनें कोणाच्याहि गुणांचें चीज करीत. याचा अनुभव १९३६ सालीं मलाच आला. मी मुंबई विधिमंडळाच्या निवडणुकीस सातारा उत्तरभागातर्फे अखेर लो. स्व. पक्षातर्फे उभा होतों. ही निवडणूक मी अखेरपर्यंत कां लढवूं शकलों नाहीं हा इतिहास सांगण्यासारखी वेळ अजूनहि यावयाची आहे. तेव्हां मी वस्तुतः कॉंग्रेसच्या तिकिटावरच उभा राहावयाचा; पण सातारा जिल्ह्यांतील विलक्षण राजकारणामुळें मला नकार मिळाला. हें बॅ. रामराव देशमुखांना कळतांच त्यांनीं मला दे. भ. अण्णासाहेब भोपटकरांना भेटण्यास कळविलें. अखेर मला तात्यासाहेब केळकरांकडे नेण्यांत आलें. त्यांनीं ताबडतोब सारी व्यवस्था करवून मजबद्दल ११-१२-१९४६ च्या केसरींत उत्तम मजकूर लिहून लो. स्व. पक्षातर्फे पाठिंबा दिला.

(४) १९३९ ते ४४ पर्यंत मी सातारा जिल्हा युद्धमंडळाचा सभासद व ऑ. टे.

रि. ऑफिसर म्हणून काम केलें. त्या वेळीं तात्यासाहेबांचा या बाबतींतील दृष्टिकोन समजावून घेण्यासाठीं त्यांचा मीं पुण्यास भेट घेतली. त्यांचा दृष्टिकोन सुप्रसिद्धच आहे. सांगावयाचें हें कीं, त्यांनीं प्रसिद्धिविन्मुखतेनें बसल्याबसल्याच या बाबतींत एवढें काम केलेलें मला दिसलें कीं, मला मी करीत असलेल्या कामाच्या क्षुल्लकपणाची खरोखर लाजच वाटली !



डॉ. नवले

(संपादक दीनबंधु, पुणें)

(१) श्री. केळकर हे लोकमान्य टिळकांच्या बरोबर १९०५-०६ सालांत स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचा प्रसार महाराष्ट्रांत करण्यासाठीं दौरे काढीत होते. दरसाल ते काँग्रेस अधिवेशनास त्यांच्यावरोबरच जात असत. त्यामुळेंच तात्यासाहेबांचा गोड सहवास मला अनायासें लाभला. १९०८ सालीं जेव्हां टिळकांच्यावर हायकोर्टमध्यें खटला सुरू झाला, तेव्हां इंदुप्रकाश प्रेसमध्यें रात्रीचा दिवस करून सबंध केसचीं टिपणें वगैरे घेऊन प्रसिद्ध करण्याच्या कामांत मी तात्यासाहेबांना मदत करीत असें. त्या वेळीं त्यांची अहोरात्र काम करण्याची चिकाटी दिसून आली.

(२) सुरतेस काँग्रेस मोडली तेव्हां नवीन राष्ट्रीय पक्ष स्थापन करण्यामध्यें केळकरांचाच भाग होता. पुढें टिळक सुटून आल्यावर १९१५ सालीं पुणें येथें रा. ब. जी. व्ही. जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं जी पुणें जिल्हा सभा भरविली गेली त्यांतहि केळकरांच्याबरोबर मीं काम केलें. त्या वेळीं त्यांची तडफ, दूरदृष्टि व समाजसंघटना वगैरे गुण दिसून आले.

(३) १९२० सालीं मला पार्लमेंट हाऊसमध्यें ' चेल्म्सफर्ड रिफॉर्म स्कीम ' साठीं साक्षीकरितां जावें लागलें. त्या वेळीं नुकतेच लो. टिळक व केळकर जाऊन आले होते. त्या वेळीं लो. टिळकांनी त्यांच्या राहिलेल्या कामासंबंधीचीं कांहीं खाजगी पत्रें मला दिलीं होतीं. त्याचप्रमाणें तात्यासाहेबांनींहि ओळखीसंबंधाचीं मला पत्रें दिलीं होतीं. त्यांचाहि मला फार उपयोग झाला.

(४) लंडनमध्यें काँग्रेसप्रणीत इंडिया साप्ताहिक पत्र मिसू नॉर्मिंग्टन्बाई चालवीत असे व लंडनमध्यें असतांना त्यांच्याबरोबर संपादकाचें काम तात्यासाहेब करीत असत. तेव्हां ' केळकर गेले तर डॉ. नवले तुम्ही आतां आम्हांला मदत केली पाहिजे ' असें त्या बाई मला म्हणाल्या. त्यांनीं केळकरांविषयीं खालील उद्गार काढले कीं, " Mr. Kelkar is the great politician of India and best English writer. I like him very much."

(५) १९२० ऑगस्टमध्यें लो. टिळक वारले. त्या वेळेस मी इंग्लंडांत होतों. त्यांची शोकप्रदर्शक सभा रसेल्स स्क्वेअर, शेक्सपिअर हॉलमध्यें मी भरविली होती. त्या समेस हाऊस ऑफ लॉर्डस्, हाऊस ऑफ कॉमन्स, लेबर पार्टी वगैरेमधील बरीच प्रमुख मंडळी जमली होती. टिळकांच्या गौरवपर भाषणांत केळकरांचाहि उल्लेख येत असे. कारण टिळकांच्या सेक्रेटरीचें काम केळकरच करीत असत. नंतर टिळकांसंबंधीं खाजगी वैयक्तिक मतें घेण्यासाठी मीं कित्येकांच्या गांठीभेटी घेतल्या. त्या वेळीं केळकरांसंबंधींहि पुष्कळांनीं उद्गार काढले ते माझ्या डायरींतून खालीलप्रमाणें देत आहेः-

१. मि. मॉंटेग्यू, स्टेट सेक्रेटरी ऑफ इंडिया म्हणाले, " मि. टिळक गेले तरी त्यांचा उजवा हात मि. केळकर, ग्रेट मराठा लीडर, हे त्यांचें कार्य खात्रीनें पुढें चालवितील व इंग्लिशांना सळो कीं पळो करून सोडतील असें वाटतें."

२. मि. लॅन्सबेरी, लेबर लीडर, मेंबर ऑफ पार्लमेंट, बोलले - " Mr. Kelkar is a thorough gentleman, eminent Editor and true son of India. I like him very much. "

३. सर शंकर नायर, असिस्टंट स्टेट सेक्रेटरी फॉर इंडिया, उद्गारलेः- " टिळकांचीं 'केसरी' व 'मराठा' हीं पत्रें टिळक गेले तरी, केळकर बंद पडूं देणार नाहींत. केळकरासारखा महाराष्ट्रियन पुढारी असल्यामुळें कॉंग्रेस व प्रागतिक यांमधील ते दुवा आहेत. ते वर्तनानें जरी राष्ट्रीय असले तरी हाडानें खरे प्रागतिक आहेत. "

४. मरहूम लॉर्ड सिंह, जॉइंट पार्लमेंटरी स्टेट सेक्रेटरी फॉर इंडिया, म्हणाले, " Mr. Kelkar is a hero of Maharashtra. He was the right hand of Mr. Tilak. "

५. श्रीमंत सर सयाजीराव गायकवाड हे त्या वेळीं लंडनमध्यें होते. ते केळकरांचे चहाते. त्यांनीं असा शेरा दिला कीं, " टिळक गेले तरी केळकर मागें असल्यामुळें टिळकांचें कार्य ते खात्रीनें पुढें उत्तम रीतीनें चालवितील. त्यांच्यासारखा शांत, दूरदृष्टि व समंजस महाराष्ट्रियन दुसरा कोणी नाहीं. "

६. सर जॉन राईस, एम्. पी., यांनीं बोलून दाखविलें कीं, " Mr. Kelkar is an extraordinary gentleman and best leader of Bombay. "

७. मि. एडवर्ड, पोलीस कमिशनर हे सेवानिवृत्त होऊन लंडनमध्यें इंडो ब्रिटिश असोसिएशन काढून तिचे सेक्रेटरी बनले होते. ते जरा मिस्किलपणें म्हणाले - " मी बॉंबेचा पोलीस कमिशनर असतांना मला टिळकांना पकडण्याची संधि मिळाली. केळकर फार धूर्त असल्यानें ते कधीं माझ्या तावडींत सांपडले नाहींत ! "

८. लॉर्ड सिडनहॅम, मुंबईचे माजी गव्हर्नर, हे मुंबईहून पेन्शनींत गेल्यानंतर लंडनमध्यें एका गल्लीतील दोन खणांच्या ब्लॉकमध्यें राहात होते व कांहीं संस्थानिक हाताशीं धरून त्यांच्याकडून पैसे उकळून इंडो-ब्रिटिश असोसिएशनचे चेअरमन बनले होते. त्यांच्या भाषणामध्यें पुढील मजकूर आला :-- "मी मुंबईचा गव्हर्नर असतांना मुंबई इलाख्यांत असंतोषाचा वणवा पेटविण्यांत केळकर अग्रगण्य होते. केसरीकडे सर्व केळकरच पहात असत, म्हणून टिळकांना तिकडे विशेष बघावें लागत नसे. सरकारविरुद्ध 'केसरी' त अग्रलेख केळकरच लिहीत असत. त्यांची लेखणी अतिशय तीव्र असल्यानें तेच केसरींत विषारी लेख लिहीत. टिळकांइतकेच केळकरहि मोठे मुत्सद्दी आहेत. केळकर हे 'हिडन् स्ट्रेट्समन' असल्यानें केव्हां काय करतील याचा नेम नाहीं."

९. स्व. छत्रपती शाहूमहाराज, कोल्हापूर, म्हणाले, "केसरीमध्यें 'आमचे स्वराज्यद्रोही छत्रपति' हा लेख टिळकांनीं केव्हांहि छापून प्रसिद्ध केला नसता. केळकरांनीं हा लेख छापून माझें तोंडच बंद केलें व आमच्या ऑफिसमधील मूळ फाइली कशा व केव्हां नेल्या हें कोडेंच आहे." केळकरांच्या-विषयीं असे मोठमोठ्यांचे उद्गार आहेत. अशा अनेक आठवणी वर दिल्या आहेत. कारण त्यांचा आमचा ४० वर्षांचा संबंध होता व त्यांच्या सहवासामुळेंच मला संपादकीय कामामध्यें पडावें लागलें. "बहुजनसमाजाची दुसरी बाजू आम्हांपुढें आल्याशिवाय त्यांची खरी स्थिति कशी कळणार? त्यांची बाजू तुम्ही अवश्य पुढें मांडा. जरी तुम्ही आमच्यावरहि टीका केलीत तरी आपल्या मैत्रींत अंतर येणार नाहीं. कारण कोर्टामध्यें दोन वकील जरी परस्परविरोधी असतात तरी त्यांच्या-तील मैत्री कधीं कमी होत नाहीं", असें त्यांनीं मला अनेकवार सांगितलें व माझ्या या कामांत मला त्यांनींच उत्तेजन दिलें.



विश्वास बलवंत डाखरे

(धर्मवीर, पुणें)

(१) बहुधा १९२३ साल असावें. भवानी पेठेंतील एका श्रीमान् व्यापा-याच्या दुकानावर पहाटेपूर्वी हल्ला झाला. या हल्ल्यांत त्या दुकानांतील भय्या रघुवीरसिंग यानें एका दरोडेखोरास पकडलें. दरोडेखोर सशस्त्र होता. त्यानें रघुवीरसिंगाच्या अंगावर मोठाले वार केले. पोटावरील वार फारच भयंकर होता. पण तशा जखमी स्थितींतहि दरोडेखोरास पळून जाऊं देण्यास रघुवीरसिंगानें अवसर दिला नाहीं व पकडून ठेवलें. या जखमांमुळें रघुवीरसिंग कित्येक दिवस हॉस्पिटलमध्यें होता व नंतर प्रकृति सुधारून तो परत सुखरूपपणें घरीं आला.

दरोडेखोर गुन्हेगारास योग्य शासनहि न्यायालयाकडून मिळालें. रघुवीरसिंगाच्या या शौर्याची हकीकत आम्ही तात्यासाहेबांस निवेदन करून अशा गृहस्थास एक कट्यार, मानपत्र व कांहीं रक्कम बक्षिस द्यावी हा आमचा मनोदय व्यक्त केला; व त्या जाहीर समारंभाचें अध्यक्षस्थान तात्यासाहेबांनीं स्वीकारावें अशी विनंती केली. मानपत्र व रक्कम देण्यांत कांहीं विशेष नव्हतें, पण कट्यार जाहीर रीतीनें बक्षीस द्यावयाची म्हणजे त्या वेळच्या हत्याराच्या कायद्याच्या दृष्टीनें धोक्याचें होतें. प्रसंगीं देणारा व घेणारा दोघेहि गुन्हेगार ठरणार! पण आमचा उत्साह पाहून तात्यासाहेबांनीं तो धोका पत्करला व समारंभाचें अध्यक्षपद स्वीकारलें. समारंभ जाहीरपणें अत्यंत यशस्वीपणें पार पाडला व "स्वतःच्या प्राणावर बेतली असतां आततायीचा वध करणें हें कसें धर्म्य आहे" हें तात्यासाहेबांनीं सोप्या भाषेंत निवेदन करून कट्यार, मानपत्र व रक्कम भग्या रघुवीरसिंग यास दिली.

समारंभ संपल्याच्या दुसऱ्या दिवशीच भग्या रघुवीरसिंग यास त्या कट्यारीसह फरासखान्यांत बोलावून नेलें. चौकशी व्हावयाची ती झाली; पण यांत तात्यासाहेबांनीं प्रामुख्यानें भाग घेतला या एकाच गोष्टीमुळें त्यावर खटला न भरतां कट्यारीसह त्यास सोडून दिलें! सदर कट्यार त्या गृहस्थाने मरेपर्यंत उजळ माथ्यानें शीख जसें कृपाण वापरतात त्याप्रमाणें वापरली.

प्रसंगीं धोका पत्करून कायदेभंगहि करावयाचा व शौर्याचा गौरव करण्यास पुढें व्हावयाचें ही तात्यासाहेबांची वृत्ति या प्रसंगीं स्पष्टपणें दिसून आली.

(२) प्रतिसहकार पक्षातर्फे पुणें शहरासाठीं डॉक्टर लोहोकरे यांना उमेदवार उभे करण्यांत आलें होतें व त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून काँग्रेसवाल्यांनी शेठ लल्लूभाई यांना उभे केलें होतें. तो प्रसंग मोठा चुरशीचा होता. निवडणुकीच्या दिवशीं सूर्योदयापूर्वी आदल्या रात्रीं डॉक्टर लोहोकरे हार्ट डिझीसच्या विकारानें एकाएकीं कालवश झाले! ही वार्ता आम्हांस पहाटे दोन वाजतां कळली. मृत्यूमुळें आमच्या मनास धक्का बसला खरा. पण निवडणुकीचें पुढें काय होणार हा प्रश्न आमच्यापुढें उभा राहिला. प्रतिपक्षी बिनविरोध निवडला जाऊं नये ही आमची इच्छा होती. आम्ही ताबडतोब डेक्कन जिमखान्यांत डॉ. लोहोकरे यांच्या बंगल्यावर जेथें त्यांचा मृत देह होता तेथें गेलों. तेथें प्रतिसहकार पक्षाची म्हणजे टिळकपक्षाची मंडळी जमली होती, त्यांच्यापुढें हा निवडणुकीचा विषय ठेवला.

"निवडणूक होणारच, ती थांबणें कठीण" असें उत्तर वेगवेगळ्या पुढाऱ्यांकडून मिळालें. आमचें समाधान होईना. शेवटीं तेवढ्या रात्रीं आम्ही श्री. तात्यासाहेब यांच्या घरीं जाऊन त्यांना उठविलें व डॉ. लोहोकरे यांच्या मृत्यूचें दुःखकारक वृत्त कळवून "निवडणूक कशी थांबवितां येईल" अशी पृच्छा केली.

डॉ. लोहोकरे यांच्या मृत्यूमुळें आलेला दुःखाचा आवेग कमी होतांच त्यांनीं आम्हांस सांगितलें कीं, "आत्ताच्या आत्तां [श्री. दि. वा.] दिवेकर यांच्या घरीं जा, त्यांना उठवा व त्यांच्याकडून केसरी लायब्ररींतील निवडणुकीबाबतचें नवीन रूल्सचें पुस्तक घ्या व मजकडे या." त्याप्रमाणें आम्हीं केल्यावर निवडणुकीच्या नियमांच्या पुस्तकामधील एका कलमाचा आधार त्यांनीं दाखविला व ताबडतोब कलेक्टरची भेट घेण्यास सांगितलें. त्यानंतर आम्ही व श्री. रामचंद्र गोविंद दंडवते वकील, कलेक्टर, यांस त्यांच्या बंगल्यावर जाऊन भेटलों व योग्य तें ॲफिडेव्हिट दिलें. त्याचा इष्ट परिणाम होऊन सरकारी चक्रें फिरूं लागलीं. पण निर्णय लवकर मिळेना. दरम्यान सकाळीं स्मशानयात्रा निघाली. ती चालू असतांच आठ वाजतां निवडणुकीचें काम सुरू होऊन मतदान होऊं लागलें. लोहोकरे यांच्याविरुद्ध पक्षाची मतनोंदणीची धांदल व त्यांची राक्षसी मनोवृत्ति पाहून आम्हांसच काय पण सर्वच टिळकपक्षीय गृहस्थांस फार वाईट वाटलें. पण लोहोकरे यांची स्मशानयात्रा बुधवारांत फरासखान्याशेजारीं असलेल्या निवडणूक-मंडपाजवळ येण्यास व तेथें निवडणुकीचें काम थांबविण्यांत आलें याची ओळख पटविणारा घंटानाद होण्यास एकच वेळ आली. कलेक्टर, कमिशनर, गव्हर्नर यांची वाटाघाट होऊन निर्णय घेण्यास इतका वेळ साहजिक लागला. या निवडणूक-तहकुबीनें आमच्या प्रयत्नाचें साफल्य झाल्याचें समाधान आम्हांस लाभलें; पण त्याचबरोबर तात्यासाहेबांच्या दीर्घ वाचनाचा, स्मरणशक्तीचा व समय-सूचकतेचाहि अनुभव येऊन त्यांच्याबद्दलचा आमचा आदर दुणावला.

(३) तळेगांव-दाभाडें येथील मशिदीवरून सवाद्य मिरवणूक नेण्याच्या हक्का-वर गदा आल्यानें सन १९२७ सालीं आमच्या नेतृत्वाखालील तेथील लढा रंगला होता. टाळ, वीणा किंवा मृदुंग या पांच वाद्यांपैकीं कोणतींहि ५ वाद्येंच वाजवावींत असा अधिकाऱ्यांचा मुसलमानांस खूष करण्याच्या दृष्टीनें विक्षिप्तपणाचा आग्रह होता व ही गोष्ट मानण्याचें तळेगांवच्या हिंदूंनीं साफ नाकारलें होतें व शांतताभंग होण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली होती.

या वेळीं तात्यासाहेबांकडे त्या वेळच्या कलेक्टरचें (ट्यूडर ओवन हें त्यांचें नांव) पत्र आलें. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं, डावरे व गुंजाळ यांना आवरा, समजावून सांगा व एक वर्ष माझ्या म्हणण्याप्रमाणें घडूं द्या म्हणजे पुढील वर्षी तुमच्या म्हणण्याचा विचार पूर्ण सहानुभूतीनें करण्यांत येईल.

तात्यासाहेबांनीं तें पत्र आमच्याकडे पाठविलें. आम्हीं तात्यांना स्पष्ट कळविलें कीं, कलेक्टरवर आमचा विश्वास नसून त्याच्या म्हणण्याचा विचार कर-ण्याची आवश्यकता आम्हांस वाटत नाहीं. कलेक्टरचें म्हणणें आम्हांस मान्य

नाहीं. पण आमचे पुढारी या नात्यानें आपण कांहीं आज्ञा करीत असाल तर ती मात्र आम्ही मान्य करूं.

आमचें तें पत्र तात्यासाहेबांनी कलेक्टराकडे पाठविलें. तें कलेक्टरनें पाहिल्यावर पुन्हां त्यानें तात्यासाहेब व अण्णासाहेब भोपटकर यांच्याशीं वाटाघाट चालविली. या वेळीं तात्यासाहेबांच्या मुत्सद्देगिरीचा चांगला उपयोग झाला व त्याचाच परिणाम म्हणून कलेक्टरनें ता. ७ सप्टेंबर १९२८ रोजीं मुसलमानांस उद्देशून स्पेशल ऑर्डर काढून तळेगांवच्या मुसलमानांना स्पष्ट कळविलें कीं, "हिंदूंची सदर रस्त्यानें वाद्यें वाजवीत जाण्याची वहिवाट अडीचशें वर्षापासून आहे. हल्लीं जेथें मशीद आहे त्या ठिकाणीं ५० वर्षांपूर्वी मशीद नव्हती. त्या जागीं एका हिंदूचें दुकान होतें व त्या दुकानाचें रूपांतर मशिदीत करण्यांत आलें. हिंदूंच्या हक्कांत ढवळाढवळ करण्याची डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटची मुळींच इच्छा नाहीं. हिंदूंची कोणतीहि आगळीक नसतां तुम्ही मुसलमानच भांडणें उकरून काढतां. तुमच्यावर हिंदूंनीं बहिष्कार घातला तो तुमच्या कृत्यामुळेंच तुम्हीं ओढवून घेतला आहे. यापुढें हिंदूंविरुद्ध आगळीक केल्यास तुम्हांस योग्य शासन करण्यांत येईल."

यानंतर लवकरच तळेगांव येथील हिंदूंचे वाद्याबाबतचे हक्क अधिकाऱ्यांनीं बिनतक्रार मान्य केले, व तळेगांवच्या मिरवणुकी पूर्व वहिवाटीस अनुसरून मशिदीवरून सवाद्य जाऊं लागल्या व आजहि जात आहेत.

कलेक्टर कांहींहि म्हणणें (हिंदूंतर्फे) मान्य करण्यास तयार नव्हता व हिंदूंवर जुलुमाचा वरवंटा फिरवीत होता. त्याच कलेक्टरला वठणीवर आणण्यास तात्यासाहेबांची मुत्सद्देगिरीच या वेळीं उपयोगीं पडली. पण "तुम्हीं जोर धरला, गुंजाळांनीं पाठपुरावा केला, म्हणून हिंदूंना यश लाभलें", असें म्हणून श्री. तात्यासाहेब यांनीं सर्व श्रेय इतरांस देऊन टाकलें, हें या वेळीं आमच्या निदर्शनास स्पष्टपणें आलें. मनाचा मोठेपणा यापेक्षां दुसरा कोणता असूं शकेल?

वि. ग. पटवर्धन

(बी. ए., एलएल्. बी., मुनसफ, इचलकरंजी)

(१) श्रीमंत बाबासाहेब घोरपडे हे बहुधा उन्हाळ्यांत माधवगिरी या हवा खाण्याच्या ठिकाणीं वास्तव्य करीत. तेथील मुक्कामांत चार दिवस राहण्यासाठीं कोणातरी बड्या गृहस्थास आमंत्रण देण्याची त्यांची प्रथा असे. तिला अनुसरून १९२८ सालीं त्यांनीं तात्यासाहेबांना असेंच आमंत्रण दिलें होतें. त्याचा स्वीकार करून तात्यासाहेब आपले चिरंजीव बापूराव यासह माधवगिरीला राहावयास आले होते.

परत जातांना त्यांचा मुक्काम कांहीं तासच आजऱ्यास होता व तो मजकडे होता. तेव्हां टिळक-चरित्राचा शेवटचा भाग लिहिण्याचें काम चालूं होतें. त्याबाबत २-३ चकोरें मजकूर त्यांनीं आपल्या चिरंजिवास तोंडानें सांगितला, व त्यांनीं तो लिहिल्यावर लगेच टपालानें पुण्यास रवाना केला. यावरून तात्यासाहेबांची निरलसता, वेळ फुकट न दवडण्याचा कटाक्ष व उद्योगप्रियता दिसून येते.

(२) तात्यासाहेबांच्या विद्वत्तेचा लाभ आजरेकरांना व्हावा अशी श्रीमंतांची इच्छा होती व तिला अनुसरून छोटी सभा अतिथिगृहांत घेतली. तात्यासाहेबांनीं सहकारी चळवळ या विषयावर चार शब्द श्रोत्यांना सांगितले. त्या वेळीं 'अनाचारो हि मालिन्यम् अत्याचारस्तु मूर्खता' या त्यांच्या आवडत्या तत्त्वाला धरून अत्यंत सोप्या भाषेंत त्यांनीं विवरण केलें. त्या वेळीं अध्यक्ष कोणीं व्हावें याचें कोडें पडलें. सहकारी सोसायटीच्या चिटणिसास अध्यक्ष कोणी दिसेना. श्रीमंतांची आज्ञा तर होती कीं, सभा व्यवस्थित झाली पाहिजे. तात्यांच्या ध्यानांत ही अडचण आली व मला संकोच अगर भीति वाटूं नये म्हणूनच स्वतः त्यांनीं मुनसफ अध्यक्ष होतील असें चिटणिसांना सांगून त्यांची अडचण व माझा संकोच नाहींसा केला. मी तेथें तेव्हां मुनसफ होतों. त्यांत तात्यांचें सौजन्य व दुसऱ्याची अडचण जाणण्याची सहृदयता दिसून आली.

(३) तात्यांना पोचवण्यास सरकारी मोटार दिली होती. ड्रायव्हर इमाम नांवाचा होता. त्याला फार वेगानें म्हणजे ताशीं ५०-६० मैलांच्या वेगानें मोटार हाकण्याची खोड होती. निपाणीजवळील तंवदीच्या घाटांतहि अशीच बेदरकार गाडी त्यानें चालविली. तात्यांनीं पुण्याहून पोचल्याबरोबर लिहिलेल्या पत्रांत मुद्दाम श्रीमंतांना सूचना दिली कीं, हा ड्रायव्हर अगोदर बदला. केव्हां अपघात करील याचा नेम नाहीं. तात्यांचें मित्रप्रेम असें होतें.

(४) नवीन होतकरू लेखकास उत्तेजन देण्याचा गुण तात्यांचा प्रसिद्धच आहे. माझें पहिलें पुस्तक 'ब्राह्मणांतील बेकारी, कारणें, उपाय' हें मीं त्यांच्याकडे अभिप्रायार्थ पाठविलें. थोड्याच दिवसांत अभिप्राय आला. त्यांत त्यांनीं पुढील शब्दांत मला उत्तेजन दिलें. "ब्राह्मणांतील बेकारी या विषयाचा इतक्या जिव्हाळ्यानें व तपशिलवार विचार करणारें हें एकच पुस्तक माझ्या पाहण्यांत असून, या प्रश्नाकडे जोरानें लक्ष वेधण्याची कामगिरी यानें होईल यांत शंका नाहीं." 'युद्धोत्तर समाजरचना' या माझ्या दुसऱ्या पुस्तकांतील समाजव्यवस्थेचें प्रकरण फारच आवडलें असें लिहून त्यांनीं पृच्छा केली कीं, हुकमी समाजव्यवस्था कोण करणार ? 'बेकारीचा कृतान्त काळ' हें माझें तिसरें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर त्यांनीं डॉ. गु. कर्वे यांच्यामार्फत मला निरोप पाठवला कीं, लहानसा स्वतंत्र लेख सह्याद्रींत याच विषयावर लिहा, अवश्य प्रसिद्ध करतों. पण तो योग येण्याच्या आंतच

तात्यासाहेब इहलोक सोडून गेले ! तथापि नूतन लेखकांस उत्तेजन देण्यास ते किती दक्ष असत, हें वरील गोष्टीवरून प्रतीत होतें; आणि म्हणूनच प्रत्येक नवख्या लेखकास आपला आधारच गेला असें वाटतें.



वासुदेव शिवराम कोल्हटकर

(राष्ट्रीय कीर्तनकार, संस्थापक धर्मचैतन्य संस्था, पुणें)

(१) मी शिवजन्माच्या आख्यानाचें पुस्तक तात्यासाहेबांच्या हस्तें प्रकाशन करावें, म्हणून त्यांस विनंती करावयास गेलों होतों. पुस्तक छोटेसेंच म्हणजे अवघ्या ५० पानांचेंच होतें. एक अल्पवयस्क कीर्तनकार, मध्यस्थावांचून घेऊन आलेला आणि तात्यासाहेबांसारख्या साहित्यिकाशीं गांठ ! वरवर पाहतां हा केवळ पोरकटपणा होता असेंच कोणीहि म्हणेल. पण तात्यासाहेबांनीं आपल्या हातांतलें काम बाजूला ठेवून माझें पुस्तक हातांत घेतलें आणि आपली चपल आणि रहस्यग्राही दृष्टि पुस्तकावरून फिरविली. पांचदहा मिनिटांत पुस्तकाचें स्वरूप ध्यानांत घेऊन ते मला कांहीं प्रश्न करूं लागले. त्यांचा पहिलाच प्रश्न असा होता कीं, " तुम्ही पहिलें कीर्तन केव्हां केलें तें तुम्हांस सांगतां येईल काय ! " मीं म्हटलें, " अगदीं बालपणीं साधारण ७–८ वर्षांचा असतांना. खेळांतच मीं कीर्तन करीत असे. पण १३–१४ व्या वर्षी मीं देवळांत कीर्तन केलें आहे. " हें ऐकल्याबरोबर तात्यासाहेबांनीं हातांतलें पुस्तक खालीं ठेवलें आणि ते मला म्हणाले, " हल्लीं तुम्हीं स्वतःच रचलेलीं आख्यानें किती आहेत ! " तेव्हां मीं म्हटलें, " हल्लीं मी एक वर्ष सतत असें कीर्तन करूं शकेन, इतकीं आख्यानें रचलेलीं आहेत. " हें ऐकल्याबरोबर तात्यासाहेबांनीं आपला चष्मा काढून ठेवला आणि जरा साशंकपणानें ते मला म्हणाले, " हीं सर्व आख्यानें तुम्ही कोठे प्रत्यक्ष कीर्तनांत लाविलीं आहेत काय ! " तेव्हां मीं म्हटलें, " तीं मीं पुण्यांतच रचलीं आणि पुण्यांतच प्रत्यक्ष कीर्तनांतहि उपयोगांत आणिलीं आहेत. " तेव्हां तात्यासाहेब म्हणाले, " कीर्तन हा माझा फार आवडता विषय आहे, पण तो वाटतो तितका सोपा नाहीं. चांगला कीर्तनकार म्हणजे पौर्णिमेचा चंद्र आहे. त्याला अनेक कला अवगत असाव्या लागतात. असा कीर्तनकार म्हणजे खरोखरच जनतेचा कंठमणि झाल्याशिवाय रहाणार नाहीं. पण या दृष्टीनें कीर्तन विषयाचा अभ्यास केला पाहिजे. तुमचा प्रयत्न स्तुत्य आहे. पुन्हां केव्हांतरी मी तुमच्याशीं बोलेन. "

(२) १९४२ मध्यें पुण्याच्या सहस्रावधि श्रोत्यांनीं तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं माझा एक सत्कार-समारंभ केला. ज्या सत्कारांत आपण अध्यक्ष म्हणून भाग घेणार त्यासंबंधीं अधिकांत अधिक प्रत्यक्ष माहिती असणें बरें

म्हणून माझें महिनाभर कीर्तन सुरू असतां एके दिवशीं पूर्वसूचना न देतांच तात्यासाहेब एखाद्या सामान्य श्रोत्याप्रमाणें अचानक कीर्तनास येऊन बसले. कीर्तन संपल्यावर ते माझ्याशीं तेथेंच बराच वेळ बोलत बसले होते. माझ्या कीर्तनाबद्दल ते काय म्हणाले तें मला सांगायचें आज कारण नाहीं. परंतु सामान्यपणें कीर्तनाबद्दल आमचा जो संवाद झाला त्यांतील महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणें आहे.

तात्यासाहेब म्हणाले, "कलेच्या दृष्टीनें सामान्यतः मी नाटकाच्या खालोखाल कीर्तनाला महत्त्व देतों; आणि असामान्य कीर्तनकाराच्या कीर्तनाला कलेच्या दृष्टीनें देखील मी नाटकापेक्षां अधिक श्रेष्ठ समजतों. मात्र खरोखरच तें असामान्य असायला हवें. असें कीर्तन आणि नाटक एकाच वेळीं असतील तर नाटक सोडून मी कीर्तनालाच आधीं जाईन."

मीं म्हटलें, "कीर्तनांतील संगीत, विनोद आणि वक्तृत्व यासंबंधीं आपलें काय मत आहे?" तेव्हां तात्यासाहेबांनीं नेहेमींच्या त्यांच्या स्वभावाप्रमाणें यासंबंधी एक सुंदर उपमा दिली. ते म्हणाले, "कीर्तन हें सरोवर धरलें तर वक्तृत्व हें त्यांतील निर्मल उदक आहे. कमळें हें त्यांतील संगीत आहे आणि त्यांत मधूनमधून गुंजारव करणारे भ्रमर हा विनोद होय. कीर्तनांत उत्तान शृंगार तर नसावाच; पण उत्तान विनोदहि कीर्तनांत सहसा नसावा. कीर्तनकाराची भूमिका नटापेक्षां फारच उच्च असावयास पाहिजे आणि हेंच नाटकांत आणि कीर्तनांत खरें महत्त्वाचें अंतर आहे."

मीं म्हटलें, "कांहीं लोक कीर्तनांत आधुनिक चालींचीं पदें नसावीं असें म्हणतात; त्याबद्दल आपलें काय मत आहे?" तेव्हां तात्यासाहेबांनीं मला विचारलें कीं, "आधुनिक चाली नसाव्या कीं आधुनिक पदें नसावीं? आक्षेपकांचें म्हणणें तरी काय? ते जर आधुनिक पदेंच नसावीं असें म्हणत असतील तर आधुनिक जगांत त्यांनीं रहावेंच कां हें मला समजत नाहीं; आणि ते जर आधुनिक चाली नसाव्या असें म्हणत असतील तर मी त्यांना असें विचारीन कीं, चालींनीं बिचाऱ्यांनीं काय केलें आहे? रसनिर्मितीला अनुकूल अशा चाली निवडून जर कोणीं त्यांच्यावर रसाळ पदें केलीं तर तें भूषणास्पदच होईल. मात्र एखादी विरुद्ध रसाला पोषक अशी लोकप्रिय चाल ज्या प्रसंगांत गावयाची असेल त्या प्रसंगांत त्या चालीच्या मूळ पद्यस्मरणानें विरुद्ध रस निर्माण न होण्याची वक्त्यानें काळजी घेणें अवश्य आहे. आतां स्वतःला काव्यशक्ति नाहीं म्हणूनच दुसरा कोणी कविता करीत असेल, त्याच्यावर कांहीं तरी करून टीकाच करावयाची एवढ्याचसाठीं जर कुणाला टीका करावयाची असेल तर बोलणेंच खुंटलें. तात्पर्य, तारतम्य हें सर्वांस, सर्व ठिकाणीं, लागूं पडणारें तत्त्व आहे, हें लक्षांत असलें पाहिजे."

(३) एकदां मी सहज पुष्करिणीच्या पवित्र जलाचा घोंटभर तरी आस्वाद घेऊन यावें म्हणून तात्यासाहेबांकडे गेलों. तेव्हां माझ्या सुदैवानें तात्यासाहेब ज्ञानेश्वरीहृदय या पुस्तकाचीं मुद्रितें तपासीत होते. त्यावेळीं तात्यासाहेब अगदीं मोकळ्या मनानें आपले हृद्गत मोकळें करीत माझ्याशीं बोलूं लागले. ते म्हणाले, " मी जें ज्ञानेश्वरीवर लिहीत आहें त्याचा अर्थ फार वेगळा आहे. मी जें ज्ञानेश्वरी-संबंधीं लिहिलें आहे त्याहून अधिक ज्ञानेश्वरींत कांहीं नाहीं असा त्याचा अर्थ नाहीं. अथवा या विषयांत मी पारंगत झालों आहे, असेंहि मला वाटत नाहीं. तुम्ही म्हणाल, मग तुम्हीं हें लिहितां कशाला ? पण असें पहा कीं, माझ्याहूनहि अधिक कळणारे जसे कांहीं लोक असतीलच, तसेंच माझ्याइतकेंहि न कळणारे कांहीं आहेतच की नाहीं ? त्यांना माझ्या या लिखाणाचा उपयोग झाल्यावांचून रहाणार नाहीं; आणि हे पाहा, तुम्हाला मी एक सांगून ठेवतों तें लक्षांत असू द्या. ज्या विषयाचा आपल्याला अभ्यास करावयाचा असेल, त्या विषयासंबंधी आपण कांहीं तरी लिहावयाचें आहे असें ठरवावें म्हणजे त्या विषयाचा अभ्यास अधिक चांगला होतो. माझ्या पुष्कळ लिखाणाला हा नियम मीं लागू केलेला आहे. ग्रंथकार म्हणून ग्रंथ लिहावयाचा अशा आढ्यतेनें मीं कोणतेंच लिखाण केलें नाहीं."

❋

गोविंद गणेश भागवत

(निवृत्त संस्कृत शिक्षक, संस्थान बडोदें)

(१) सन १८९२ सालची गोष्ट. सातारा न्यू इंग्लिश स्कूलमध्यें (रा. जोशी यांच्या) मी मॅट्रिकच्या वर्गांत विद्यार्थी होतों. त्या वेळीं सातारा हायस्कूलमध्ये एके दिवशीं तात्यासाहेब केळकर यांचें इंग्रजींत फारच उत्तम व्याख्यान झालें. त्या वेळीं केळकर नुकतेच बी. ए. होऊन एल्एल्. बी.चा अभ्यास करीत होते. त्यांस मिशीहि फुटली नव्हती. हायस्कुलांतील शिक्षक मंडळी, विद्यार्थी व शहरांतील कांहीं ठळक वकील मंडळी व इतर शाळेंतील विद्यार्थी असा श्रोतृसमाज होता. तात्यासाहेबांच्या व्याख्यानाचा विषय " वकिलीच्या धंद्यांतील दोष " असा होता. हा विषय त्यांनीं निबंधरूपानें लोकांपुढे मांडला. त्यांत त्यांनीं या विषयाचें सोपपत्तिक विवेचन केलें होतें. त्यावरून त्यांची प्रतिपादनशक्ति कळून आली. विषयप्रतिपादनाची व इंग्रजी भाषेची सर्वांनीं फार प्रशंसा केली. व्याख्यान संपल्यानंतर हायस्कुलांतील शिक्षक रा. रा. सदाशिव बापूजी गाडगीळ यांनीं भाषण केलें. त्यांत व्याख्यात्यांच्या इतर गुणांचें त्यांनीं फारच वर्णन करून ते म्हणाले, " एखाद्या वकिलाच्या अंगीं हे दोष असले तरी सबंध वकीलवर्गावर या दोषांचा आरोप करणें योग्य होणार नाही, हें लहानमूर्ति केळकरांच्या ध्यानीं

येईलच !" खासगी रीतीनें पुढें केळकरांनीं आपली चूक कबूल केली. प्रांजलपणा हा त्यांचा जन्मस्वभावच होता.

❋

रामचंद्र जनार्दन गोखले

(बी. ए., माजी प्राध्यापक, पुणें)

(१) तात्यासाहेबांचे वडील बंधु कै. नानासाहेब त्यांची १८९१ सालीं सातारच्या सरकारी हायस्कुलामध्यें दुय्यम शिक्षक म्हणून नेमणूक झाली, त्या वेळीं माझा त्यांच्याशीं संबंध विद्यार्थी या नात्यानें आला, आणि त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळें त्यांचा लोभ मजवर जडला. पुढे त्यांची बदली पुण्यास झाल्यावर १८९७ सालीं चित्रशाळेजवळील परांजपे यांच्या वाड्यांत बिऱ्हाडकरू म्हणून एकमेकांशेजारीं राहण्याचा योग आम्हां दोघांना आला. तात्यासाहेब हे पुण्यास याआधींच लोकमान्यांचे मदतनीस म्हणून आले होते व १८९७ साली हे दोघे बंधु परांजपे यांच्या वाड्यांत एकत्र रहात असल्यानें वडील बंधूंच्यामुळें माझा तात्यासाहेबांशीं परिचय झाला. त्या वेळीं मी बी. ए.चा अभ्यास करीत होतों व मला शिक्षणासाठीं पैशाची अडचण पडली म्हणून मीं नानासाहेबांच्याकडे कर्जाची मागणी केली. आश्चर्याची गोष्ट कीं, ती त्यांनीं ताबडतोब मान्य केली. कर्जाबद्दल तारण म्हणून मीं आपली विमापॉलिसी त्यांच्या नांवे करून दिली. पण 'तिची जरूरी नाहीं' असें त्यांचें पूर्वीपासून म्हणणें होतें. हे त्यांचे मजवर उपकार व शेजारीं रहाणें यांमुळें माझा दोघां बंधूंशीं स्नेह वृद्धिंगत होत गेला. पुढें नानासाहेब बदली होऊन पुण्यास गेले. (त्यांचें कर्ज मीं वेळेवर फेडलें हें सांगणें नकोच.)

(२) १९०२ अखेर तात्यासाहेबांना व मला नवीन भाड्याची जागा पाहण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. त्या वेळीं माणकेश्वरच्या विष्णूजवळील गोळे यांचें घर तात्यासाहेबांनीं भाड्यानें घेतलें व त्यांत आम्हीं दोघांनीं आपापल्या जरूरीप्रमाणें जागा वाटून घ्यावी असें ठरलें. पण एक अडचण अशी उत्पन्न झाली कीं, त्या घरांत दोन स्वयंपाकघरांची सोय नव्हती. तेव्हा नानासाहेबांनीं असें सुचविलें कीं, दोघांनीं एकाच ठिकाणीं जेवण करावें व खर्च अजमासें वाटून घ्यावा. त्याप्रमाणें आम्हीं व्यवस्था केली व ती उत्तम रीतीनें चालली. याविषयींचा उल्लेख तात्यासाहेबांनीं आपल्या 'गतगोष्टी' या पुस्तकांत पुढीलप्रमाणें केला आहे – "तो प्रयोग यशस्वी झाल्याचा पुरावा हाच कीं, गोखले व मी यांचा स्नेह व ऋणानुबंध आजतागायत अबाधित आहे. नातेवाइकांपेक्षां समानशील स्नेह्यांचा संबंध अधिक टिकतो व सुखप्रद होतो अशी माझी खात्री आहे." (पृष्ठ २०३).

(३) दोन वर्षांनंतर १९०४ अखेर माझी नेमणूक नाशिक हायस्कूलमध्यें

झाल्यावर ही व्यवस्था बंद पडली. त्या वेळेपासून केळकर कुटुंब हें आमच्या नाते-वाईक कुटुंबासारखें झालें आहे. आम्ही एकत्र रहात असतां तात्यासाहेबांचे वडील व मातोश्री मधूनमधून रहाण्यास येत असत. वडील हे अत्यंत सात्त्विक वृत्तीचे होते. मातोश्री या इतक्या सुस्वभावी होत्या कीं सुनांना त्या आईप्रमाणें वाटत असत.

या दोन वर्षांच्या कालांत तात्यासाहेबांचे जे स्नेही त्यांच्याकडे येत असत, त्यांपैकीं कै. श्री. कृ. कोल्हटकर यांची आठवण मला विशेष आहे. कारण या दोघां स्नेह्यांची बैठक म्हणजे हास्यविनोदाची एक अप्रतिम मैफल असे.

(४) क्रिकेट, टेनिस, बिलियर्ड्स हे सर्व खेळ तात्यासाहेब खेळले आहेत. क्रिकेटच्या एका मॅचमध्यें ते आपल्या चाळिशीच्या सुमारास खेळण्यास आले होते असें मला आठवतें.



ग. वि. कौजलगी

कॉंग्रेस-कार्यकर्ते, इंगळी, जि. विजापूर)

(१) इस्लामपूर, ताळुका वाळवें, जिल्हा सातारा येथें मी काग्रेसच्या धोरणानुसार कार्य करीत असतां तात्यांशीं विरोधाचे अनेक प्रसंग येत. तात्यांनीं महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचा राजिनामा सादर केला, त्या वेळीं वाळवें तालुक्यांतील सर्व प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या सदस्यांच्या सहीनें ' तात्यांचा राजिनामा मंजूर कराच ' असें जाहीर पत्रक काढून मीं महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या सभेंत वाटलें होतें. वाळवें तालुक्यांतील बत्तीस-शिरोळे येथील नागरिक कै. बाळाजी दामोदर हसबनीस यांनीं आपल्या इस्टेटींतून मला कांहीं मदत मिळावी, अशी इच्छा आपल्या मृत्युसमयीं प्रकट केली. त्या वेळीं मी नागपूर राष्ट्रीय झेंडा सत्याग्रहानिमित्त अकोला जेलमध्यें होतों. कै. हसबनिसांनीं आपल्या इस्टेटीपैकीं एका जमिनीचें बक्षिसपत्र तात्यांच्या नांवें केलें होतें. तात्यांना कै. हसबनिसांच्या वारसाकडून तें समजल्यावर त्यांना मीं कांहीं सुद्धां विचारलें नसतां त्यांनीं मला खालीलप्रमाणें पत्र लिहिलें.

" कै. हसबनीस यांनीं मला बक्षिस दिलेल्या जमिनीची विक्री करून त्याच्या किंमतीचा विनियोग त्यांच्या वारसाच्या विचारें तुम्ही जसा करावयाचा ठरवाल त्यास माझी मान्यता आहे. "

वास्तविक कै. हसबनिसांनीं या जमिनीचें बक्षिसपत्र वैयक्तिक तात्यांच्या नांवें केलें होतें. मला त्यांची मदत करण्याची इच्छा असली तरी ती त्यांच्या इतर इस्टेटींतून करावी असें त्यांना सहज म्हणतां आलें असतें. याच समजुतीनें मीं त्यांना कांहीं

विचारलें नव्हतें. विरोधी मताच्या कार्यकर्त्यांसंबंधीं त्यांचें अशा प्रकारचें औदार्य व सचोटी प्रकाशित करणें हें मी माझें पवित्र कर्तव्य समजतों.



रघुनाथ विष्णु साठे

(रावसाहेब, सेवानिवृत्त सरकारी अधिकारी, पुणें)

(१) माझ्या मुलीच्या लग्नाकरितां मी स्थळें शोधित होतों. मी एकदां तात्यासाहेबांच्याकडे त्यांच्या नातेवाईक मुलाची चौकशी करण्यास सकाळीं गेलों. तात्यासाहेब लिहीत बसले होते. मला पाहून त्यांनी पेन खाली ठेविलें व माझ्या कामाविषयीं विचारपूस करून मला पाहिजे असलेली माहिती पत्र पाठवून मागवितों व नंतर कळवितों असें सौजन्यानें त्यांनीं सांगितलें व त्याप्रमाणें माझ्या पत्त्याची नोंद व काम आपल्या डायरींत लिहून घेतली. एवढेंच नव्हे तर, काम तावडतोब व्हावें म्हणून लागलीच एक कार्ड जलद लिहून माझ्याजवळच पोस्टांत टाकण्यास दिलें. उत्तर आलें म्हणजे तुम्हास कळवितों असें सांगून माझी बोळवण केली. मला धन्य वाटलें कीं, एवढा मोठा राजकारणी गृहस्थ, त्याच्याकडे मी एका खाजगी बाबतींत गेलों व त्यानेंहि प्रेमळपणानें माझें काम पांच मिनिटांत आढेवेढे न घेतां केलें ! पुढें त्यांना समजलें कीं, पत्र लिहिलेल्या नातेवाईकाचें लग्न ठरलें आहे. तेव्हां मला उगीच हेलपाटा पडूं नये म्हणून दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझ्या घराचें दार तात्यासाहेब स्वतः ठोठावूं लागले. माझ्या मुलीनें दार उघडलें, तों समोर तात्यासाहेब ! तिला आमच्या घरीं त्यांचें येणें विस्मयकारक वाटलें. मीं त्यांचें स्वागत केलें. नंतर त्यांनीं येण्याचें कारण सांगितलें. मी त्यांस म्हणालों, माझ्याकरितां श्रम व वेळ खर्च करण्याचें कारण नव्हतें. परंतु त्यांस तें पटलें नाहीं. त्यांचा येण्याचा हेतु माझी गैरसोय व निराशा होऊं नये असा होता. नंतर त्यांनीं माझ्या मुलीला हाक मारून व बी. ए. ला विषय काय घेतले त्याची चौकशी करून तिच्याकरितां एक नवें स्थळ सुचविलें. त्या स्थळाकडे मी गेलों होतों. पण मुलाचे वडील चमत्कारिक स्वभावाचे दिसले म्हणून त्या स्थळाचा नाद सोडून दिला होता. तात्यासाहेबांचें त्या घराण्याशीं नातें असल्यामुळें त्यांनीं प्रयत्न करण्याचें अंगावर घेतलें. लगेंच ते स्वतः त्या मुलाकडे जाऊन व आमच्या घरीं येण्याची वेळ ठरवून, संध्याकाळीं मला चिठ्ठीनें कळविलें कीं, उद्यां सकाळीं साडेसात वाजतां आम्ही मुलगी पहाण्यास येतों व त्याप्रमाणें बरोबर वेळेवर तात्यासाहेब मुलासह माझ्या घरीं आले !

माझी व तात्यासाहेबांची पूर्वीची ओळख नव्हती. परंतु वरील साध्या गोष्टीवरून त्यांचा स्वभाव किती प्रेमळ, परोपकारी व सामान्य व गरजू माणसास कस-

त्याहि गोष्टींत मदत करण्यास तत्पर असे हें दिसून येतें. माझ्या मनावर तर त्यांचा चिरंतन परिणाम झाला.



ज्ञानेश्वर उद्धव मांढरे

(श्रीगुलाबरावमहाराजकृत समग्र ग्रंथाचे प्रकाशक, नामदेव शिंपी समाजाचे एक पुढारी, पुणें)

(१) इ. स. १९११ साली श्रीमत्सद्गुरु गुलाबरावमहाराज श्रीक्षेत्र आळंदीकरितां पुण्यास आले असतां मला बरोबर घेऊन तात्यासाहेब यांच्या भेटीस गेले. त्या वेळीं अनेक महत्त्वाच्या विषयांवर त्यांचीं सुमारें दोन तास मार्मिक प्रश्नोत्तरें झालीं. स्वार्थसाधु बोलघेवडे समाजसेवक व देशभक्त, तसेंच स्वैराचारी लोकांचीं महाराजांच्या भोंवती गर्दी सारखी वाढूं लागली; तेव्हां तो उपसर्ग टाळावा म्हणून 'गुरु व शिष्य' हा लेख लिहून महाराजांनीं केळकरांना पाठवितांच तो त्यांनीं केसरी ता. ८–१०–१९१२ च्या अंकांत प्रसिद्ध केला. महाराजांच्या पश्चात् त्यांच्या ग्रंथांच्या प्रथम आवृत्तीचे अठरा भाग अल्पावधींत संपून अगदीं दुर्मिळ झाल्यामुळें तात्यासाहेबांनीं स्वतः पुढाकार घेऊन "श्रीगुलाबराव महाराज यांचे ग्रंथ" ह्या मथळ्याखालीं स्वतःच्या सहीनें प्रकट विनंती केसरींत ता. १४–१–१९३६ रोजीं केली. स्वतः साहित्यसम्राट्, बुद्धिप्रामाण्यवाद्यांचे कट्टर पुरस्कर्ते, प्रत्येक महत्त्वाची गोष्ट स्वानुभवाच्या कसोटीस लावून पाहणारे असे तात्यासाहेब वरच्यावर लोकांना सांगत कीं, "विसाव्या शतकांतील जगाचे डोळे दिपविणारी जन्मांध संतविभूति म्हणजे वऱ्हाडचे एक श्रीगुलाबराव महाराज होते व त्यांचे ग्रंथ म्हणजे एक ज्ञानकोशच झालेला आहे." महाराजांच्या द्वितीय आवृत्तीच्या अनेक ग्रंथांस प्रस्तावना लिहून त्याशिवाय केसरी व सह्याद्रींत स्वतंत्र लेख लिहून तात्यासाहेबांनीं आम्हांस जी ग्रंथप्रकाशन-कार्यांत सक्रिय सहानुभूति दाखविली त्यामुळेंच महाराजांच्या एकूण पासष्ट ग्रंथांपैकी आम्हांस द्वितीय व तृतीय आवृत्तींचें काम हातीं घेण्यास सुलभ झालें. देव, धर्म व संत ह्यांबद्दल त्यांची श्रद्धा अशी डोळस व दांडगी होती.

(२) "श्रीज्ञानेश्वरांचें विभूतिमत्त्व" हा तात्यासाहेबांचा हृदयस्पर्शी व संस्मरणीय लेख 'श्रीज्ञानेश्वरदर्शन' ग्रंथांत प्रसिद्ध झाल्यापासून ग्रंथसम्राट् ज्ञानेश्वरीवर साहित्यसम्राटांनीं स्वतंत्र ग्रंथ लिहावा असा मी त्यांच्याजवळ हट्ट घेऊन बसलों. तेव्हां त्यांनी ज्ञानेश्वरीचें वाचन व लेखन सुरूं केलें. ज्ञानेश्वरीवर आमचें वाचन व लेखन चालूं असतां त्यांनीं एक मार्मिक प्रश्न काढला कीं, ज्ञानेश्वरीच्या अनेकांच्या अनेक प्रतींत अध्यायवार ओव्यांची संख्या

निश्चित नाहीं, कोणती ओवी अस्सल व कोणती प्राक्षिप्त ओळखावी ! नंतर त्यांना सांगितलें कीं, " भगवान् श्रीज्ञानेशांची ओवी अगदीं अर्थपूर्ण, सूत्रबद्ध, प्रासादिक, ठांशीव व मुख्यतः पूर्वीच्या तीन चरणांपेक्षां चवथा चरण कमी अक्षरांचा असतो." त्यांना वरील माझें म्हणणें पटतांच तसें मला पत्रानें कळवून लागलीच जुलै १९४५ च्या 'सह्याद्रि' अंकांत " एक शंकानिरसन " हा स्वतःचा लेख त्यांनीं प्रसिद्ध केला. पुढें लवकरच त्यांचा " ज्ञानेश्वरी सर्वस्व " ग्रंथ छापण्यास सुरवात झाली. त्यांतील गद्य सारांशाचीं मुद्रितें त्यांनी मला पाहाण्यास दिलीं ज्ञानेश्वरीचा तो गद्य सारांश अगदींच त्रोटक व अपुरा झाल्यामुळें त्यांत थोडी अधिक भर घातली तर बरें होईल, असें सुचवितांच त्यांनीं पुढील सर्व काम प्रेमाच्या सक्तीनें मजवरच टाकलें. त्यांचा हा विनय अगदीं अभूतपूर्वच होता. ते एवढे मोठे साहित्यसम्राट्, एम्. ए., पीएच्. डी. परीक्षांचे परीक्षक व मी तर अगदीं सामान्य शेवटच्या दर्जाचा मनुष्य ! पण तात्यासाहेब अत्यंत गुणग्राहक, निरभिमान बुद्धीचे, प्रेमळ व उदार मनाचे होते म्हणूनच त्यांनीं मीं लिहिलेली पुरवणी जशीच्या तशीच आपल्या ज्ञानेश्वरी-सर्वस्व ग्रंथांत छापली; शिवाय माझे गुरुबंधु नागपूरचे सुप्रसिद्ध भगवद्भक्त वकील श्री. द. ग. खापरे, एम्. ए., एल्एल्. बी. यांनीं लिहिलेली ज्ञानेश्वरीची विषयवार व वर्णानुक्रमवार संक्षिप्त सूचि छापून आपल्या ज्ञानेश्वरी-सर्वस्व ग्रंथांत येवढी मोठी जागा देऊन व त्याऐवजीं स्वतःचा तेवढा मजकूर कमी करून आम्हांस निरंतर उपकृत व धन्य केलें. येवढेंच नव्हे, तर त्याच ग्रंथांत उलट आमचा गौरव करून त्यांनीं आभार प्रदर्शित केले आहेत ! ! भगवद्गीतेत वर्णिल्याप्रमाणे त्यांची ती सात्त्विक निरंहकारादि दैवी संपत्ति पाहून मन आश्चर्यचकित होतें !

(३) तात्यासाहेब यांचा व माझा परिचय आज छत्तीस वर्षांचा आहे. कामानिमित्त मीं वरचेवर त्यांच्या घरीं जात असल्यामुळें आमचा घरोबा उत्तरोत्तर वाढतच राहिला. ता. ५-९-१९४३ रोजीं मी सकाळी त्यांच्या घरी गेलों असतां " प्रो. पिंपळखरे यांनीं काढलेल्या श्रीसद्गुरु गुलाबराव महाराज यांच्या भव्य तैलचित्राचें दर्शन घेण्यास मी आज तुमच्या घरीं येणार आहें ", असें ते म्हणतांच मला मोठा आनंद झाला. त्या प्रसंगीं कांहीं सुप्रतिष्ठित पुढाऱ्यांस आमंत्रण मीं दिल्यावरून तीं सर्व मंडळी हजर राहून दुधांत साखर पडल्यासारखें झालें. माझे दिवंगत मित्र पं. ना. पाटसकर यांच्या आठवणी "नाथस्मृति" ग्रंथांत लिहून देण्याबद्दल विनंती करतांच तात्यासाहेबांनी त्या ताबडतोब लिहून पाठविल्या. माझ्या ज्येष्ठ पुत्राची मृत्युवार्ता कळतांच (ता. २०-३-४६) तात्काळ अगोदर ठरलेल्या महत्त्वाच्या सर्व कार्यक्रमास फाटा देऊन माझ्या घरीं येऊन सुहृदाप्रमाणें आम्हां उभयतांचें त्यांनीं सांत्वन केले व स्मशानयात्रेसहि कांहीं वेळ हजर राहिले ! त्या वेळीं

मनमोकळेपणानें बोलण्याची संधि न मिळाल्यामुळें दुसऱ्या दिवशीं मुद्दाम माझ्या घरीं पुन्हां आले. प्रत्यक्ष मायबापापेक्षांहि अधिक त्यांचा तो अलोट, निरतिशय व निष्काम अंतःकरणाचा जिव्हाळा पाहून त्या सर्वांबद्दल आमचें अंतःकरण वरचेवर कृतज्ञतेनें भरून येतें !



एस्. एम्. जोशी

(बी. ए., एल्एल्. बी., काँग्रेस सोशॅलिस्ट पक्षाचे पुढारी, पुणें)

(१) तात्यासाहेबांची आणि माझी अगदीं शेवटची भेट घडली तोच प्रसंग मला प्रथम आठवतो. पुण्याचे रावसाहेब किराड यांच्याकडे श्री. अच्युतराव पटवर्धन यांच्याबरोबर तात्यासाहेब केळकरांना श्री. किराड यांनीं भोजनासाठीं बोलाविलें होतें. मी, नारायणराव गोरे, ह. मो. जोशी इत्यादि मंडळीहि होतीच. भोजन चालूं असतांना आमच्या गप्पा चालूं होत्या. सर्वोदयवाद, गांधीवाद, उदारमतवाद, समाजसत्तावाद इत्यादि तत्त्वप्रणालींसंबंधीं कांहींशीं विनोदानें तर थोडीफार गंभीरपणानें बोलणीं सुरू होतीं. बोलतां बोलतां, हा वाद खरा कीं तो वाद खरा असा प्रश्न निघाला. तेव्हां तात्यासाहेब हंसत हंसत म्हणाले, " हें पाहा, यांत 'सत्तावाद' हा खरा, मग त्याच्यामागें शेपूट कोणतेंहि लावा. समाजसत्तावाद म्हणा कीं मोठें नांव देऊन आत्मसत्तावाद म्हणा सर्वांचें मर्म एकच ! " त्यांचें हें वाक्य ऐकून आम्ही सर्वच मोठ्यानें हंसलों आणि तो वाद संपला. तात्यासाहेबांच्या त्या विधानांत किती गंभीर अर्थ भरलेला आहे याची प्रचीति मला वेळोवेळीं येते आणि त्या वेळीं तात्यासाहेबांच्या त्या वचनाची आठवण झाल्यावांचून राहत नाहीं.

(२) असाच एकदां संध्याकाळच्या वेळीं तात्यासाहेबांच्या भेटीसाठीं मी त्यांच्या बंगल्यावर गेलों होतों. थोडा वेळच त्यांच्याबरोबर इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. परंतु त्या प्रसंगीं तात्यासाहेबांनीं महात्मा गांधींच्यासंबंधीं जे उद्गार काढले त्याचें विस्मरण मला कधींहि होणें शक्य नाहीं. गांधीजी त्या वेळीं नौखालीची यात्रा करीत होते. देशांतील परिस्थितीबद्दल सहाजिकच प्रश्न निघाला. तात्यासाहेब अगदीं मोकळ्या मनानें बोलत होते. टिळकांच्या पुण्यतिथीला सर्व पक्षांची एकत्र सभा व्हावी म्हणून जो प्रयत्न झाला आणि मागाहून तो बेत रद्द करण्यांत आला त्यासंबंधीं ते बोलत होते. बोलतां बोलतां ते म्हणाले, " लोकांना वाटतें कीं, मी गांधीचें मोठेंपण ओळखीत नाहीं. परंतु तें खरें नाहीं. गांधींनीं फार मोठी कर्तबगारी केली आहे. आजच पाहाना. एवढ्या उतार वयांत तो म्हातारा नौखालीस जाऊन कांहीं तरी प्रयत्न

करतो आहे. त्यांच्यापेक्षां जीं माणसें वयानें कितीतरी लहान आहेत अशांना देखील ही धकाधकी सहन होऊं शकत नाहीं. अरे, मोठा तो केव्हांहि मोठाच. मतभेद असले म्हणून काय झालें ! जें चांगलें तें केव्हांहि चांगलेंच म्हटलें पाहिजे." तात्यासाहेब आणि महात्मा गांधी यांच्यामध्यें कांहीं तरी मानसिक अढी बसलेली आहे अशी माझी कल्पना असल्यामुळें गांधीजींच्याबद्दल त्यांच्या मुखांतून ही भाषा येईल अशी मीं कधींच अपेक्षा केली नव्हती. परंतु त्यांचें बोलणें ऐकून मला आनंदाश्चर्य वाटलें. कारण गांधीजींचें मोठेंपण मान्य करून त्यांनीं आपलें स्वतःचें मोठेंपण सिद्ध केलें होतें. तात्यासाहेबांच्याबद्दल माझ्या मनांतील आदर त्या प्रसंगानें कितीतरी पटींनीं वाढला.

(३) हिंदुस्थानच्या फाळणीला कॉंग्रेसनें मान्यता दिली याबद्दल एकदां बोलणें निघालें. मीं अर्थातच तीव्र नापसंती दाखवून देशांत निर्माण झालेल्या जातीय दंगलीबद्दल खेद व्यक्त केला. तात्यासाहेबहि आपल्याचप्रमाणें बोलतील असें मला वाटलें होतें; परंतु ते म्हणाले, " अरे, आपल्या मनांत आहे कीं, सर्व जगांत एकच राज्य निर्माण व्हावें. परंतु आजच्या परिस्थितींत तें घडून येणें शक्य आहे का ! तसेंच याबाबतहि समजलें पाहिजे. कालचक्र हें विचित्र आहे. आम्हींच पूर्वी बंगालच्या फाळणीविरुद्ध चळवळ केली, पण तेच आम्ही आज बंगालची फाळणी झाली पाहिजे असें म्हणत आहों ! आपण वास्तववादी बनलें पाहिजे. जेवढ्या विभागाचें राज्य तुम्हांला मिळणार आहे तो काय लहान आहे ! तें तरी तुम्ही चांगलें चालवून दाखवा. तूर्त तेवढें केलेंत तरी जगांत तुमचा फार मोठा प्रभाव निर्माण होईल." तात्यासाहेबांचा दृष्टिकोन किती वस्तुनिष्ठ असे याची यावरून सहज कल्पना येण्यासारखी आहे.

(४) " साधनानामनेकता " हें वचन पुष्कळांच्या तोंडून मीं ऐकलें आहे; तसें तें तात्यासाहेबांच्याकडूनहि ऐकलें आहे. परंतु त्यांचा त्या तत्त्वावर खरोखर विश्वास होता आणि म्हणूनच त्यांच्यापेक्षां निराळ्या मार्गाचा अवलंब करणाऱ्याबद्दल त्यांना खरीखुरी सहानुभूति वाटत असे. यासंबंधींची एक आठवण देण्यासारखी आहे. ती गोष्ट तात्यांचे त्या वेळचे खासगी चिटणीस श्री. शंकरराव आगाशे यांनीं मला सांगितल्याचें स्मरतें. मीरत कटाचा खटला चालू होता. तात्यासाहेबांनीं कम्युनिझमला अमर समाजवादाला मान्यता दिली नाहीं. तरी पण ते स्वतः मीरतला गेले आणि कॉ. डांगे प्रभृतींची त्यांनीं भेट घेतली आणि विचारपूस केली. नुसती शाब्दिक सहानुभूति व्यक्त करून ते थांबले नाहींत. त्यांनीं खटल्याच्या खर्चासाठीं एक मोठ्या रकमेचा चेकहि डांगे यांच्या स्वाधीन केला ! ही हकीकत मला माझ्या राजकीय जीवनाच्या सुरुवातीसच समजली. त्यांच्या उदारमतवादित्वाबद्दल माझी खात्री पटली आणि थोड्याच दिवसांत मलाहि त्याचा चांगला अनुभव आला !

(५) मी दुसऱ्या एल्एल्. बी. च्या टर्म्स भरीत होतों. पहिल्यापासूनच मी अकिंचन असल्यामुळें खर्चाची नड होतीच. माझे मित्र शंकरराव आगाशे मला तात्यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनीं माझी विचारपूस केली आणि म्हणाले, " हें बघ, मी तुला दरमहा तीस रुपये देवविण्याची व्यवस्था करतों. आमच्या 'मराठा' पत्रांत आठवड्याला एखाद दुसरा कॉलम मजकूर लिही म्हणजे झालें. " इतक्या सहजासहजीं एका तरुण माणसाला साहाय्य करणारी मंडळी त्या वेळीं तरी फारच विरळा होती. पुढे ही व्यवस्था फार दिवस चालली नाहीं. कारण १९३२ ची चळवळ सुरू झाली. प्रथम आम्हांला दोन महिने येरवड्यास स्थानबद्ध करून ठेवलें आणि मागाहून सोडण्यांत आलें, तरी आम्हीं पुणें लष्कर हद्दींतच राहावें असा हुकूम आमच्यावर बजावण्यांत आला. कांहीं दिवस अशाप्रकारें लष्करमध्यें राहिल्यावर हुकूम मोडून सत्याग्रह करण्याचें मीं ठरवलें. तात्यासाहेबांच्या कानावर गोष्ट घालून ठेवावी म्हणून त्यांची भेट घेतली. ते माझ्या निर्णयाला मान्यता देतील अशी आशा मला नव्हतीच. परंतु चमत्कार असा कीं, सर्व परिस्थिति त्यांना सांगितल्यावर ते म्हणाले, " माझें मत कांहीं असलें तरी तुझ्या अंतःकरण-प्रवृत्तीला मानवेल तेंच कर. " त्यांचे हे शब्द ऐकून मला समाधान वाटलें. ज्याला स्वतःच्या उभारीवर पुढें जावयाचें आहे त्याचे पाय ओढण्याची वृत्ति त्यांनीं कधींच ठेवली नाहीं. शक्य असल्यास प्रोत्साहनच दिलें.

वासुदेव कृष्ण भावे

(बी. ए., माजी संपादक केसरी, पुणें)

(१) रा. तात्यासाहेब करंदीकर तुरुंगांत असतां मी सन १९३२ व १९३३ या वर्षी केसरीचा मुख्य संपादक होतों. त्या काळांत केळकरांच्या मनांत केसरींत ज्या सुधारणा करून घ्यावयाच्या होत्या त्या त्यांनीं घडवून आणल्या. केसरी आठवड्यांतून एकदां निघत होता, तेव्हां केसरीचा अग्रलेख तीन साडेतीन रकाने होता तें ठीक होतें; परंतु तो आठड्यांतून दोनदां झाल्यावर एवढ्या मोठ्या लेखाची जरूरी नाहीं असें त्यांचें मत होतें. त्याप्रमाणें मुख्य अग्रलेखाची मर्यादा त्यांनीं दोन रकान्यांची घातली व ती पाळण्याबद्दल मला निक्षून सांगितलें. मुख्य अग्रलेख दोन रकाने, दुय्यम लेख एक रकाना नि स्फुट सूचना दोन रकाने असा दंडक त्यांनीं घालून दिला व तो मी व माझे सहकारी यांनी शक्य तितका कसून पाळला. इतका रेखीवपणा दिसण्यांत अगदीं यांत्रिक स्वरूपाचा झाल्यानंतर कांहीं वर्तमानपत्रांनीं त्यावर टीकाहि केली. अर्थात् तिच्याकडे लक्ष देण्याचें कारण नव्हतें. या बदलाचा

परिणाम असा झाला कीं, पत्रांत विषय-वैचित्र्य अधिक आलें व मधल्या पानांत 'ओझरती नजर' हें नवीन सदर घालण्यास जागा मिळाली.

(२) तात्यासाहेब केळकरांनीं केसरीचें संपादकत्व सोडल्यावरहि विश्वस्त या नात्यानें केसरीशीं त्यांचा निकट संबंध पुढें कांहीं वर्षें होता. त्या काळांत आपल्या मताप्रमाणें पत्र चालावें असा त्यांचा विचार मधूनमधून प्रबळ होई व त्याबरोबर ते कांहीं प्रयत्नहि करीत. एकदां थोडे दिवस पत्रांतील मजकुराची सारी व्यवस्था त्यांनीं आपल्याकडे घेतली होती. पाश्चिमात्य देशांत मुख्य संपादक पत्रांत स्वतः कांहीं न लिहितां हाताखालच्या संपादकांना कामें वाटून तीं त्यांजकडून करवून घेत असतो. या वेळीं केळकरांनीं तोच प्रयत्न करून पाहिला. ते आपल्या टेबलावर ताजीं वर्तमानपत्रें व मासिकें रोजच्या रोज मागवीत व तीं पाहून प्रत्येक संपादकाकडे त्यांच्या आधारें मजकूर लिहिण्यास तीं पाठवून देत. मासिकांच्या आधारें लेख लिहिण्याचें काम मजकडे आलें. वर्तमानपत्रांच्या राज्यांत केव्हां केव्हां असें होतें कीं, अग्रलेखांकरिता महत्त्वाचा विषयच नसतो. तेव्हां एखादा विषयच उकरून काढून कशी तरी वेळ मारून न्यावी लागते. ही पद्धत केळकरांना पसंत नसे. अशा अडचणीच्या वेळीं उपयोगी पडण्यासारखे दोन-तीन लेख शिल्लक असावे म्हणजे ते ताबडतोब देतां येतात असें त्यांचें नेहमीं म्हणणें असे. शिवाय अग्रलेख आयत्या वेळीं लिहावयास न बसतां शक्य तर लेखकास एकदोन दिवसांची जास्ती फुरसत दिल्यास त्याजवर नीट विचार करावयास व माहिती मिळविण्यास सांपडून तो चांगला लिहितां येतो, असें ते सांगत व तें खरेंहि असे.



हरी गणेश फाटक

(काँग्रेस-कार्यकर्ते, पुणें)

रूसो-जपानी युद्धाचा प्रसंग. त्या युद्धांतील धारातीर्थीं देह ठेवलेल्या जपानी सैनिकांच्या विधवांस व मुलाबाळांस मदत करण्याकरितां 'केसरी'नें फंड सुरू केला होता. या फंडामुळें जपानसंबंधीं महाराष्ट्रांतील जनतेंत आपुलकीची भावना उत्पन्न झाली होती. या लहानग्या जपानी राष्ट्रानें मोठा पराक्रम करून मांचूरियांत रशियन सेनानींना मागें रेटलें. तेव्हां रशियानें आपलें आरमार दर्यासारंग रोडझोव्हेन्स्की याच्या नेतृत्वाखालीं जपानवर हल्ला करण्यास पाठविलें. जपाननें रशियन आरमाराचा धुव्वा उडविला. आशियांतील राष्ट्रानें युरोपियन राष्ट्रावर आरमारी युद्धांत मिळविलेला हा पहिलाच जय असल्यामुळें, सर्व हिंदुस्थानभर लोकांना मनांतून फार मोठा आनंद झाला. हा आनंद व्यक्त करण्यासाठीं जाहीर सभा भरवावी व जपानचें अभिनंदन करावें या विचारानें मी लो. टिळक यांस

विंचूरकरांच्या वाड्यांत भेटावयास गेलों. लो. टिळकांना आमची कल्पना पसंत पडली. पण ते म्हणाले, "सभा एका पक्षाची होईल; नेमस्त पक्षाचे पुढारी सभेस येऊं शकतील असें मला वाटत नाहीं." आम्ही लोकमान्यांस म्हणालों कीं, "आपणाप्रमाणें नेमस्त पुढाऱ्यांनाहि आम्ही भेटतों व दोन्ही पक्षांची मिळून सभा होईल असा प्रयत्न करतों." लोकमान्य म्हणाले, "जरूर करा!" तेव्हां ना. गोखले यांच्याकडे जाण्याचें आम्हीं ठरविलें. ना. गोखले हे मला विद्यार्थी-दशेपासून ओळखत होते. तरी पण याबाबत आपण प्रथम तात्यासाहेब यांचें साहाय्य घ्यावें असें मनांत योजून मी तात्यासाहेब यांच्याकडे गेलों. तात्यासाहेब व ना. गोखले यांचा सलोख्याचा संबंध होता. 'केसरी'तून ना. गोखले यांच्यावर हल्ला होई. पण 'मराठा' पत्रांतून – ज्या पत्राचे संपादक त्या वेळीं तात्यासाहेब होते – ना. गोखले यांच्यावर स्तुतिसुमनें उधळलीं जात! यामुळें ना. गोखले यांच्या मनांत तात्यासाहेबांच्यासंबंधानें स्नेहपूर्ण ओलावा होता.

तात्यासाहेब यांना आम्हीं आपली कल्पना सांगितली. लोकमान्यांची मान्यता मिळविली आहे. ना. गोखले यांची मान्यता मिळविण्यासाठीं मी प्रयत्न करीत आहें. आपण ना. गोखले यांस पत्र दिल्यास काम होईल, असें म्हणालों. त्यावर तात्यासाहेब म्हणाले, "तुम्ही जसें लो. टिळकांकडे गेला, तसें ना. गोखल्यांकडेहि जा. पत्र नको. ते आपली मान्यता देतील असें मला वाटतें."

तेव्हां मी ना. गोखले यांच्याकडे जाण्यास निघालों. वाटेंत ॲक्चुअरी मराठे भेटले. त्यांना घेऊन आम्ही ना. गोखले यांस भेटलों. पण लो. टिळकांनीं भाकित केल्याप्रमाणें ना. गोखल्यांनीं मान्यता दिली नाहीं! तेव्हां थोडें खिन्न होऊन आम्ही पुनः तात्यासाहेबांकडे गेलों. तेव्हां ते म्हणाले, "तुमची कल्पना मला सर्वस्वी मान्य आहे. आपण जरूर जाहीर सभा भरवूं. कोणी जरी आलें नाहीं तरी मी अध्यक्ष होतों व अभिनंदनाचा ठराव पास करून आपण तो जपानी कॉन्सलकडे पाठवून देऊं." आम्हांस अतिशय आनंद झाला. आम्हीं जाहीर सभेची खटपट केली. सार्वजनिक सभेंत म. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालीं जपानचें अभिनंदन करण्याचा ठराव पास झाला. सभेला खूप गर्दी जमली होती. लो. टिळक व तात्यासाहेब यांचीं स्फूर्तिदायक भाषणें झालीं. या सभेमुळें तात्यासाहेब यांना भेटण्याचा मला प्रथम योग आला. तेव्हांपासून त्यांच्या शेवटच्या दिवसापर्यंत तात्यासाहेब यांचा व माझा निकटचा संबंध होता व राजकारणांतील माझीं मतें हीं जरी त्यांना मान्य नव्हतीं, तरी शेवटच्या दिवसापर्यंत त्यांनीं मजबरोबर सहानुभूतीचा संबंध कायम ठेवला होता. तात्यासाहेब यांच्या स्वभावांतील हें वैशिष्ट्य होतें असें मला वाटतें.

❋

नारायण रामलिंग बामणगांवकर

(संपादक उदय, अमरावती)

(१) यवतमाळला विदर्भसाहित्य संमेलन तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं झालें. बापूजी अणे स्वागताध्यक्ष होते. श्री. अभ्यंकर वकिलांकडे तात्यासाहेब उतरले. स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांचीं भाषणें झालीं. जेवण आटपून मंडळी पानसुपारीस बसली. नाटकांचा विषय निघाला. तात्यांना आपल्या सर्वच नाटकांचीं नांवें आठवत नव्हतीं. बापूजी अणे (माधव श्रीहरी) आठवल्यासारखें करून म्हणाले, " तें एक तुमचें 'व्रात्य माधव' नाटक ! " तात्यासाहेब लागलीच गंभीरपणें उत्तरतात कीं, " बापूजी, मला माझ्या नाटकाचें नांव पाहिजे होतें. तुमचें नको होतें ! " सर्वत्र हंशाच हंशा. "अमात्यमाधव" हें तात्यांचें नाटक आहे.

(२) "प्रतिभा" पाक्षिकांत तात्यासाहेबांनीं कै. शिवरामपंत परांजपे व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें वाङ्मयीन परीक्षण केलेला एक लेख लिहिला होता. तो मीं वाचला. त्यानंतर मुंबईस सरदारगृहांत त्यांची व माझी भेट झाली. त्याच दिवशीं ब्राह्मणसभेंत तात्यांचें व्याख्यान होतें. त्यांच्याच मोटारींत बसून मीहि निघालों. सदर लेखाचा मीं विषय काढला व म्हटलें की, आपल्या लेखाचें एक वैशिष्ट्य मला पटलें. कोणतें ? तर सत्य कथन हें कटु असतें असें म्हणतात; पण तें अगदीं खडीसाखरेसारखें गोड असतें, असें हा लेख वाचून म्हणावें लागतें. त्यावर तात्या म्हणाले कीं, " कडवट वृत्तीच्या टीकाकारानें सत्यकथन हें कटु असतें, असें म्हटलें आहे. सत्य हें मुळांतच गोड. तेव्हां त्याचें कथन तरी कडू कसें होणार ! सत्य तें सत्य व कडू तें कडू हेंच खरें ! " त्यावरून सत्यावर श्रद्धा ठेवून टीका करणारे टीकाकार तात्यासाहेबांना आवडत, असें मला वाटतें.

(३) १९३० मधील गोष्ट आहे. मी पुण्यांतच होतों. सोलापूरला लष्करी सोटेशाही सुरू झाली होती. तत्पूर्वीच बाबूराव गोखले वगैरे केसरी कार्यालयांतील संपादक तुरुंगांत गेले होते. सोलापूर-प्रकरणांत केसरीनें झणझणीत टीका केली होती. केसरीवर खटला होणार अशा भुमकाहि उठल्या होत्या. तत्पूर्वी तात्यांनींहि सत्याग्रह केला होता. नाशिकचे एक सद्गृहस्थ माझ्याकडे आले व ते मला तात्यांकडे घेऊन गेले. हेतु हा कीं, नाशिकच्या झेंडावंदनार्थ तात्यांनीं यावें. प्रथम या गृहस्थास तात्यांनीं नाहीं म्हटलें होतें हें मला अवगत नव्हतें. सदाशिव पेठेंतील राहत्या घरीं मी त्या गृहस्थासह सकाळीं तात्यांकडे गेलों. इकडच्या तिकडच्या गोष्टींवरून मी मूळ विषयावर आलों. तात्या लागलीच म्हणाले कीं, " मीं यांना कालच नाहीं म्हटलें, आज तुमची मात्रा लागू होईल म्हणून तुम्हांला आणलेलें दिसतें. कालच्या नाहींच्या रोगावर तुमची

होयची मात्रा कशी लागू होईल ?" मी थंडच पडलों. पण "लोकसंग्रहार्थ जाऊन यावयास हरकत नाहीं," असें मीं हळूच म्हटलें. "मीं येथेंच राहून केसरी संभाळावयाचें ठरविलें आहे." पुढें मीं म्हटलें कीं, "आपणहि तुरुंगांत गेल्यावर कसें ?" तेव्हां तात्या म्हणाले, "त्याचा विचार आजच करून कसें चालेल ?" "आपण एकदां तुरुंगांत जाऊन आल्यावांचून आपल्या टिळक पक्षाला निंदकाच्या दृष्टीनें किंमत नाहीं," असेंहि मी बोललों. यावर "टिळक तुरुंगांत गेल्यानेंच टिळक झाले. याशिवाय त्यांच्यांत कांहीं वैशिष्ट्य नव्हतेंच, असें समजणारा वर्ग नाहीं असें नाहीं; पण तुरुंगांत काय वा तुरुंगाबाहेर काय टिळक आपलें कार्य करीतच राहिलें हें त्यांचें वैशिष्ट्य आपण कां अशा लोकांकरितां विसरावें ?" असें तात्या उद्गारले. शेवटीं टिळकांच्या स्मरणार्थ एक ट्रस्ट करावयाचा आहे, त्यासाठीं त्यांनीं वऱ्हांडांतील नांवें मला विचारलीं. तींच नांवें पुढें प्रसिद्ध झालीं.

(४) १९३७ सालच्या निवडणुकीची वेळ होती. मध्यप्रांत-वऱ्हाडमध्यें आम्हीं कॉंग्रेस पक्षाशीं सहकार्य विशिष्ट अटींवर केलें. लोकनायक अणे यांच्यामार्फत शंकरराव देवातर्फे तसेंच महाराष्ट्रांत व्हावें म्हणून प्रयत्न होता. सरदारगृहांत सभा भरली. तात्यासाहेब आम्हा वऱ्हाडकरांप्रमाणेंच समेट करावा ह्याच मताचें. मतदान झालें, त्या वेळीं आमच्याचसारखें त्यांनीं मत दिलें. पण आमचेंच म्हणविणारे कांहीं मित्र चहापानांत गुंतले आणि मतें घेतलीं तेव्हां दोन मतांनीं आमचा समेटवृत्तीचा ठराव नापास झाला. आम्हांस वाईट वाटलें. म्हणून एकीकडे तात्यांस म्हटलें, आम्ही वऱ्हाडकरांनीं कांहीं झालें तरी बापूजी अणे यांच्याच मागें जावयाचें ठरविलें आहे. तसें आपल्या पक्षांत महाराष्ट्रांत असते तर समेटावर वाद उत्पन्न झाला नसता. ह्यावर तात्या म्हणाले कीं, "तुम्हा सर्वांनाच मीं स्वातंत्र्य दिलें आहें. तुम्ही बहुमतानें जें ठरवाल तिकडे मीं साथ द्यावयाचें ठरविलें आहें. अनुयायांवर वा मित्रांवर आपलीं मतें लादावयाचीं नाहींत असा मीं निश्चय केला आहें. यशापयशाचा वाली हरी आहे." ह्यानंतर असेंच अखेरपर्यंत तात्यासाहेब वागत गेले.

(५) १ ऑगष्ट १९४७ ला टिळक मंदिरांत टिळकानुयायी जमले. बॅ. रामराव अध्यक्ष होते. १५ ऑगष्टच्या स्वातंत्र्यदिनास गौरवावें ह्याच मताचे आम्ही वऱ्हाडकर होतों. तात्यासाहेबांचें भाषणहि तसेंच झालें, म्हणून आम्हांला आनंद झाला. बॅ. रामराव व तात्यासाहेब ह्यांच्या भाषणांत तत्त्वतः कांहींच फरक पडला नाहीं. पहिला दिवस संपतांच तात्यासाहेब, बॅ. रामराव व मी एकाच मोटारमधून जेवावयास परतलों. हें असें कसें घडलें म्हणून विषय होता. "ईश्वरी सूत्र सर्वत्र एक असतें, असें म्हणतात याचा हा प्रत्यय नव्हे काय ?" असा तात्यांनीं प्रश्न टाकला व गंभीर मुद्रा केली. अखेर तेथून कांहीं दिवसांनीं हें ईशसूत्र इह-

लोकचें तरी एकाएकीं तुटलें, हें अनुभवण्याचें आमच्या नशीबीं आलें. टिळक गेल्यानंतर वऱ्हाडनें त्यांना विशेष साथ दिली असें त्यांच्या रेडियोवरील अखेरच्या भाषणांत होतें. वऱ्हाडलाहि तात्यांनीं अखेरपर्यंत साथ दिली हेंहि तितकेंच खरें. लोकनायक अणे यांच्या कांहीं उद्‌गाराबद्दल केसरी' मध्यें व 'उदय' मध्यें वाद उभा झाला होता. तो चिघळलाहि गेला असता; पण हें " कृष्णार्जुनयुद्ध " लागलीच संपविलें गेलें ! आणि आम्ही मूठभर टिळकानुयायी कोठेंहि असलों व कसेंहि असलों तरी एकमुखी राहूं शकतों हें सिद्ध केलें गेलें.



मल्लिकार्जुन आप्पाराव पाटील

(वय ८०, कै. वारद यांचे मुनीम, सोलापूर)

(१) सातारा येथे इ. स. १९१० मध्यें महाराष्ट्र वीरशैव धर्म परिषद कै. आप्पासाहेब वारद यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. त्या वेळीं मी आप्पासाहेबांच्याबरोबर साताऱ्यास होतोंच. कै. दादासाहेब करंदीकर, वारद व मी यांचा फार परिचय. तात्यासाहेब केळकरांचा परिचय झाला होता. पण तो फार थोडा होता. पण त्याच वर्षी व त्याच वेळीं साताऱ्यांत त्यांच्या मुलाचें लग्न होतें. आमचे मालक कै. आप्पासाहेब वारद यांना व मला त्यांनीं निमंत्रण दिलें. आम्ही लग्नास गेलों. कै. वारद यांची रीत अशी कीं, कोणत्याहि लग्नास गेलें कीं, आहेर हा न्यावयाचाच. त्याप्रमाणें आम्हीं अखेर आहेर देण्याचा प्रयत्न करूं लागलों. कै. आप्पासाहेबांचा आग्रह हा कीं, घेतलाच पाहिजे व तात्यासाहेबांचा आग्रह हा कीं आहेर घ्यावयाचा नाहीं व द्यावयाचा नाहीं अशी माझी प्रतिज्ञा आहे. तेव्हां यांत कै. दादासाहेबांनी समेटाचा मार्ग काढला. तो असा कीं, तात्यासाहेबांच्या मुलास खाऊ म्हणून रुपये शंभर द्यावेत. अशा प्रकारें त्या उभयतांतील वाद मिटविला. हें जेव्हां तात्यासाहेबांना समजलें तेव्हां ते अप्पासाहेबांना म्हणाले कीं, तुमची प्रतिज्ञा तुम्हीं सिद्धीला नेली; पण माझी प्रतिज्ञा मोडली याचें काय ? यावर वारद म्हणाले कीं, आम्हीं तुम्हांस आहेर केला नाहीं. मुलगा तुमचा असला, तरी मुलगा म्हणजे तुम्ही नव्हे, हें खरें ना ? यावर हंसत हंसत तात्यासाहेब म्हणाले कीं, " मालाचें नांव बदललें; पण सौदा मात्र तुम्हीं केलाच. " आम्हीं सर्वच हंसलों.

(२) त्या १९१० मध्येंच पुढें वीरशैव जगद्‌गुरूंचें "व्यासंतोल" प्रकरण भडकलें. जगद्‌गुरूंच्या बिरुदावळींत सोन्याचा व्यासहस्त असतो व त्यावर मिरवणुकींत लिंगायत थुंकत, असा लेख केसरींत प्रसिद्ध झाला. ही एकतर्फी खोटी बाजू आहे, असें मीं तात्यासाहेबांना लिहिलें. तेव्हां त्यांनीं खरें काय आहे तें लिहून पाठवा असें मला कळविलें व त्याप्रमाणें मीं

पाठविलेली माहितीपूर्ण लेख त्यांनी केसरींत प्रसिद्ध केला. दुसऱ्या जातीचा, दुसऱ्या धर्माचा व दुसऱ्या पक्षाचाहि ते समतोल भावनेनें विचार करीत असें मला त्या वेळीं अनुभवास आलें. पुढें हेच जगद्गुरु सोलापूर, बार्शी, पुणें येथें व्यासंतोलसह सर्व महाराष्ट्रांत मिरविले. पण मिरवणुकीस कोठेंहि कोणत्याहि सबबीवर बंदी झाली नाहीं आणि त्या व्यासहस्तास लिंगायत पूज्य मानतात असेंच सर्वांच्या प्रत्ययास आलें.

(३) १९१५ मधील केसरींत सोलापूरहून युरोपियनांच्या चहाच्या मळ्यांत जाऊन आलेल्या एका गृहस्थानें तेथील हिंदी मजूरांवरील जुलुमाचा वृत्तांत 'केसरी'त लिहिला होता. तेव्हां तात्यासाहेबांना मळेवाल्यांची नोटीस आली कीं, विधानें परत घ्या, नाहीं तर फिर्याद करतों. तेव्हां तात्यासाहेब मुद्दाम सोलापुरांत आले. त्यांचे बंधु माधवराव केळकर तेथेंच त्या वेळीं मोठ्या हुद्द्यावर होते. पण ते सरकारी नोकर असल्यामुळें तात्या रा. ब. साठे यांच्याकडे उतरले व मला त्यांनीं बोलावणें पाठवून लेख पाठविणाऱ्यास मला भेटावयाचें आहे, त्यासाठीं मी आलों आहे, असें सांगितलें. शेवटीं तो गृहस्थ भेटविला. प्रसिद्ध मजकुरास आधार विचारले ते दाखविले गेले. तात्यासाहेबांचें समाधान झालें. आतां ह्या मळेवाल्यानें फिर्यादच करावी असें ते मोठ्या निश्चयानें बोललें. पण मीं म्हटलें, एवढ्यानें फिर्याद चुकली व निर्दोषी सुटाल हें कसें ? यावर ते म्हणतात कीं, " तो प्रश्न न्यायाचा आहे. पण आपण भक्कम पुराव्यावांचून कोणास दोष दिला नाहीं ह्यांत आपलें समाधान आहे ना ? कारण केसरींचा बाणा व लौकिक लक्षांत घ्या."

(४) कै. वारदांच्या पुण्यतिथीसमारंभाला अध्यक्ष करण्याकरितां मीं त्यांना समक्षच पाचारण केलें होतें. त्याप्रमाणें त्यांनीं येऊन अध्यक्षस्थान स्वीकारलें व आप्पासाहेबांच्या गुणगौरवाचें सर्वोत्कृष्ट असें भाषण केलें. पदवीधर हाच विद्वान् असतो असें नाहीं, तर विचारग्रहण करून जो आचार करतो तोच पंडितापेक्षांहि श्रेष्ठ ठरतो. नुसतें पांडित्य व्यर्थ आहे असें ते ह्या वेळीं बोलले.



बाळकृष्ण गणेश खापर्डे

(बी. ए.. एल्एल्. बी., हायकोर्ट वकील, अमरावती)

(१) डेक्कन कॉलेजमध्यें विद्यार्थी असतांना मी कांहीं दिवस खडकीस स्वतंत्र बंगला घेऊन राहिलों होतों. सन १९०१ सालची गोष्ट असावी. एके दिवशीं रात्रीं कै. श्रीमंत सरदार बाबा महाराज यांच्या सदाशिव पेठेंतील वाड्यांतून माझ्या बंगल्यावर घोडयाची गाडी आली. गाडीसमागमें एक कारकून होता. गाडी इतक्या रात्रीं आल्यानें मला आश्चर्य वाटलेंच. पण कारकुनानें आण-

लेला निरोप ऐकून आश्चर्याची परमावधीच झाली. तो म्हणाला, "आपल्याला तात्यासाहेब केळकरांनीं वाड्यांत ताबडतोब बोलाविलें आहे. ते तेथें येऊन बसले आहेत." अर्थात् मला याचा अर्थच समजेना. तात्यासाहेब केळकर कोण? आणि मला बोलावण्याचें कारण काय? आणि इतक्या रात्रीं? व वाड्यांत? मीं त्या गृहस्थास अनेक प्रश्न विचारले. पण ठराविक निरोपापलीकडे तो अधिक कांहीं बोलेना. याला पुष्कळ अधिक माहीत आहे; पण तें तो सांगत नाहीं अशी माझी समजूत झाली व तेंच शेवटीं खरें ठरलें. मी गेलों. वाड्याचा देखावा बराच अपरिचित होता. इतक्या रात्रीं म्हणजे १२–१ वाजतां वाडाभर दिवे होते आणि दारावर जाणाऱ्या-येणाऱ्यावर कडक पाहाऱ्याची नजर होती. अंगणांतील जिना चढून पहिल्या दालनांत गेलों. तेथें एका गादीवर तक्क्याशीं टेकून एक तेजस्वी व गौरवर्ण, भरदार चेहेऱ्याचा तरुण पुरुष बसला होता आणि भोंवतीं दोन-तीन माणसें सचिंत बसलीं होतीं. माझ्याबरोबरचा कारकून म्हणाला, "तात्यासाहेब, हे बाबा-साहेब आले आहेत." त्याबरोबर हे गृहस्थ अर्धवट उठले व त्यांनीं मला जवळ बसवून घेतलें. अर्थात् हेच तात्यासाहेब केळकर असा मीं सहजच तर्क बांधला. बरेंच बोलणें झालें. तात्यासाहेबांना पाहण्याचा व त्यांच्याशीं बोलण्याचा हा माझा अगदीं पहिलाच प्रसंग. त्या रात्रीं कै. श्रीमती ताईमहाराज (माझ्या सावत्र सासूबाई) कै. बाळामहाराजांस दत्तक घेणार होत्या. तत्पूर्वी हल्लीं गादीवर असलेले श्री. जगन्नाथमहाराज यांस विधिपूर्वक दत्तक घेतलेले असल्यामुळें त्या रात्रीं ताईमहाराजांनीं दुसऱ्यानें बाळामहाराजांस दत्तक घेणें अनुचित व बेकायदा आहे ही गोष्ट ताईमहाराजांस मीं समजावून सांगावी व पुनः दुसरा दत्तक घेण्यापासून त्यांस परावृत्त करावें म्हणून मला बोलावण्यांत आलें होतें, असें तात्यासाहेबांनीं मला सांगितलें. टिळक स्वतः पुण्यांत नसल्यामुळें इतक्या अपरात्रीं तात्यासाहेब यांस वाड्यांतील मंडळींनीं या महत्त्वाच्या कामाकरितां बोलावून आणिलें होतें असें मला कळलें; तेव्हां टिळकांच्या अनुपस्थितींत त्यांच्याऐवजीं तात्यासाहेबांची योजना असते हेंहि अनुमान मला सहज झालें. त्या वेळच्या तात्यासाहेबांच्या बोलण्याचा तपशील देऊन जागा अडवीत नाहीं. पण पोटांत शिरून त्यांच्या त्या बोलण्याचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. लोकमान्यांकरितां खस्ता खाणाऱ्या त्या पुरुषाबद्दल कांहीं एक विशिष्ट भावना माझ्या मनांत उत्पन्न झाली. त्या दिवशीं माझ्या मनांत तात्यासाहेबांविषयीं जो आदर उत्पन्न झाला तो उत्तरोत्तर वाढतच गेला. माझ्या आयुष्यांत मला जे कांहीं महत्त्वाचे व चिर-स्मरणीय प्रसंग वाटतात त्यांपैकीं एक, ही तात्यासाहेबांची अशा रीतीनें झालेली आकस्मिक भेट होय.

(२) लोकमान्य दिवंगत झाल्यानंतर एके वर्षीं तात्यासाहेबांनीं मला लोकमान्यांच्या पुण्यतिथीस उत्सवाचा मुख्य वक्ता म्हणून पाचारण केलें. अर्थात् ही

कामगिरी मीं मोठ्या आनंदानें स्वीकारली व ठरल्या दिवशीं पुण्यास आलों. तात्यासाहेबांनीं मला स्वतःच्या घरींच उतरून घेतलें. त्या वेळीं त्यांच्या निकट सहवासाचा तीनचार दिवस सुयोग आला व त्यांच्या मनमोकळेपणाचाहि गोड अनुभव आला. त्यांनीं स्वतः आपलें सर्व घर दाखविलें व ते कसें मिळालें वगैरेची हकीकत सांगितली. एका भागांत गवंडी व मजूर काम करीतच होते. पुढें कालांतरानें मला असें कळलें कीं, नवीन घर बांधणें अगर जुन्यांत फेरबदल करीत असणें हा त्यांच्या करमणुकीचा एक व्यवसायच होता. असो. संध्याकाळीं अंगणांत बैठक टाकून आम्ही अनेक गोष्टींची चर्चा करीत असूं; पण जिन्यावर एक लहानशी जागा त्यांच्या फार आवडीची होती. तेथें वारा एक सारखा येत असे व तो त्यांना फार सुखकर वाटे. एकदोन दिवस आम्ही अंगणांत बसलों. पण त्यानंतर तात्यासाहेबांनीं आपलें हृद्गत मला सांगितलें. ते म्हणाले, "तुम्हांला जागेचा संकोच वाटूं नये म्हणून मी येथें बसलों. पण माझी नित्याची व आवडीची जागा ही नाहीं. चला आपण जिन्यावर थोडी मोकळी जागा आहे तेथें बसूं. मला जागेचा संकोच वाटला नाहीं; पण संकोचापायीं तात्यासाहेबांनीं माझ्यासाठीं दोन दिवस अडचण सोसली याबद्दल मला संकोच वाटून विषाद वाटला व त्यांना तसें म्हणालों देखील. पण ते नुसतेच किंचित हंसले व वाऱ्यावर हातपाय लांब करून असें सुखानें बसले कीं, त्याचा मलाहि मनापासून आनंद झाला. बोलतां बोलतां राजकारणाच्या गप्पा निघाल्या; आणि तात्यासाहेब मनमोकळे करून आडपडदा न ठेवतां बोलत होते. ते म्हणाले, "एकाच गोष्टीचा अभिमान धरून दुसऱ्या पक्षास कःपदार्थ लेखणें मला आवडत नाहीं. माझ्या मनाची ठेवण तशी नाहीं. टिळकांची होती. कसें तें सांगतों. यांतहि कांहीं गुण आहेत, त्यांतहि कांहीं गुण आहेत; यांतहि दुर्गुण आहेत तसे त्यांतहि आहेत; पण सारासार विचार करतां एकंदरींत सद्यःस्थितीस एवढें ग्राह्य आहे. अशा विचारसरणीस आमच्या येथें कांहीं लोक थट्टेनें 'केळकरी' वृत्ति म्हणूं लागले आहेत. पण खरोखरी हेंच बरोबर आहे. दोन्ही पक्ष स्तुति करूं लागले म्हणजे आपलें कुठेंतरी चुकलें असें गृहीत धरावें व दोन्ही पक्ष नांवें ठेवूं लागले म्हणजे आपली मध्यस्थाची भूमिका तोलून बरोबर आहे असें समजावें असें मी म्हणत असतों." हें तात्यासाहेब त्या वेळीं सहज बोलून गेले; पण मीं स्वतः त्याचा पुष्कळ विचार केला. बरेच दिवस मला हें पटेना. पण अलीकडे मला त्यांतं बरेंच सत्य आहे, हेंहि एक तत्त्वज्ञान आहे, असें खास वाटूं लागलें आहे.

श्रीमंत नारायणराव गंगाधरराव ऊर्फ तात्यासाहेब पटवर्धन

(राजे, मिरज-संस्थानाधिपति, मिरज)

(१) तात्यासाहेबांना मी प्रथम पाहिलें, तें १९१९ च्या पार्लमेंटरी कमिटी-पुढें साक्ष देण्यासाठी लो. टिळकांच्याबरोबर विलायतेस जाण्यापूर्वी मिरजेस आमच्या वडिलांना व मिरजेंतील त्यांच्या इतर मित्रमंडळींना भेटण्यासाठीं ते आले होते त्या वेळीं. किल्ल्यांत जामदारखान्याच्या चौकात आमच्या वडिलांना ते भेटून गेले. मी केवळ दुरूनच, हे एक केसरीसारख्या पत्राचे संपादक व टिळकांचे अनुयायी म्हणून त्यांच्याकडे कौतुकानें पाहत होतों. पुढें बहुतेक १९२४ मध्यें, मी प्रथम पुण्यास त्यांना भेटलों, त्या वेळी सदाशिव पेठेंतील आपल्या घरीं ते राहत असत. त्या वेळच्या व हल्लीच्या राजकीय परिस्थितींत अपूर्व फरक झालेला आहे. त्या काळांत माझ्यासारख्या इसमानें त्यांना भेटणें हें थोडें धाडसाचेंच असे. पुढें पुण्यास मी गेला म्हणजे एखादे वेळीं त्यांना भेटत असे. पण १९३३ ते १९३९ पर्यंत मी पुण्यास मुलांच्या शिक्षणा-करितां होतों, त्या वेळेपासून आमच्या विशेष गांठीभेटी होऊं लागल्या. तात्या-साहेबांचें वय, विद्वत्ता व त्यांचा व्यवसाय हे लक्षांत घेता, वास्तविक त्यांच्याशीं माझें मित्रत्वाचें नातें असण्याचा सभव फारच कमी. परंतु त्याच्या स्वभावांत अशी एक मौज असे की, लहानथोर, विद्वान, अक्षरशत्रु कोणी का असेना, त्याच्याशीं ते समरस होऊन वागत. पुढें मी मिरजेस आल्यावर बहुतेक वर्षांतून एकदोन वेळां तरी माझ्याकडे ते चारदोन दिवस मुक्कामास असत. त्या वेळीं अनेक विषयांवर आपले विचार ते प्रदर्शित करीत. त्यांच्या वागण्यांत अत्यंत साधेपणा असे. आढ्यता त्यांना माहीतच नव्हती. माझ्या घरीं त्यांचा मुक्काम बहुधा तळ-मजल्यावरील खोलींत असे. जिना चढण्या-उतरण्याचा त्रास त्यांना होऊं नये म्हणून व मीहि खालींच राहत असल्यामुळें उभयतांना तें सोयीचें होई.

(२) एकदां असेच माझ्याकडे ते मुक्कामास होते. दुसऱ्या दिवशीं सकाळच्या गाडीनें ते जावयास निघाले. मी खोलींत त्यांना भेटण्यास गेलों तों ते सामानाची बांधाबांध करीत होते. मी म्हणालों, " बाहेर नोकर आहे तो बांधील ना सामान." त्यावर ते म्हणाले, " अहो, सामान काय, मला फारसें लागत नाहीं. जन्मभर मी असाच गबाळ्यासारखा वागलों. इतके दौरे केले, परंतु प्रवासाची व्यवस्था मीं स्वतः कधींच केली नाहीं. बरोबर बहुधा अंतुकाका असत. त्यांनी आमची सेवा किती केली म्हणून सांगूं. ते नसते तर आमचें सामानच काय पण ऐनजिनसी आम्हांहि सांडलों असतों ! "

(३) नक्की स्मरत नाहीं, पण पुण्यास केव्हां तरी संस्थानिकांनीं आपल्या

प्रजेस अधिकार द्यावेत अगर देऊं नयेत अशी चर्चा चालली होती. तेव्हां ते म्हणाले, "संस्थान लहान म्हणून प्रजेस अधिकारच देऊं नयेत हें म्हणणें मला पटत नाहीं. संस्थान लहान असो वा मोठें असो, फाशीचीहि शिक्षा देण्याचा अधिकार संस्थानिकांना आहेच. अशा लहान सस्थानिकांपैकीं कोणी तरी, फाशीचा हुकूम लिहितांना, मी लहान संस्थानिक आहें, सबब आरोपीच्या पंचप्राणांपैकीं एकच प्राण घ्यावा असा हुकूम कोणीं कधी दिला आहे काय!"

(४) एकदां पुणें येथील अनाथ विद्यार्थिगृह व महाराष्ट्र व्यायाम मंडळ या दोन्ही संस्थांना मीं भेट द्यावी अशी इच्छा तात्यासाहेब यांनीं प्रदर्शित केली. पुढें पुण्यास गेल्यावर भेटीस जाण्याचा दिवसहि नक्की ठरला. त्या वेळीं मी या संस्थांना काय देणगी द्यावी म्हणून त्यांना विचारलें. त्यांनीं थोडा वेळ थांबून कांहीं एक आंकडा मला सुचविला. त्यावर मी म्हणालों, "अहो, हा आंकडा थोडा कमी दिसत नाहीं काय!" तेव्हां ते म्हणाले, "तुमच्याकडून अशा पुष्कळ देणग्या घ्यावयाच्या आहेत. एकदांच घेऊन मोकळें व्हायचें नाहीं. सोन्याचें अडें घालणाऱ्या कोंबडीची गोष्ट माहीत आहे ना!"

❋

शंकर नारायण जोशी

(इतिहास-संशोधक, पुणें)

श्री. भालाकर भोपटकर त्यांच्या मनांत तात्यासाहेब केळकरांच्या-संबंधानें कांहीं कारणानें (गायकवाडवाड्यांत श्रीगणेशोत्सवप्रसंगीं भालाकारांनीं 'गोंधळ' इत्यादि शब्दयोजना केली व हें तात्यासाहेबांना आवडलें नसल्यामुळें त्यांनीं केसरींत तसें प्रसिद्ध केलें.) बरें नव्हतें. पण हें बितुष्ट नसावें असें वाटून श्री. अण्णासाहेब ढमढेरे यांच्या घरीं उभयतां तात्या-भाऊंनीं यावें व एकदिल आणि निर्मल होऊन जावें असा प्रसंग मित्रमंडळींनीं योजला. दोघेहि आले. तात्या-साहेबांनीं प्रथमच व आपणहून बोलण्यास प्रारंभ केला व म्हणाले कीं, "भाऊ-साहेब, आपल्या दोघांच्याहि गोवऱ्या आतां ओंकारेश्वरीं नेण्याची वेळ आली आहे. तेव्हां सगळींच भांडणें मी मिटवीत चाललों आहें आणि त्यासाठीं माझें म्हणणें हें कीं, मींच पदर पसरला आहे. चुका माझ्याच. त्या तुम्ही विसरून जा व आपण दोघेहि यापुढें अकिल्मिष वागूं. मी कधीं तुमच्याविषयीं अभद्र वा विनोदी-सुद्धां बोललोंच नाहीं. करितां एवढेंच म्हणतों कीं, मनांतील अढी विसरून जा व मला पदरांत घ्या!!" हें तात्यांचें भाषण ऐकून त्यांच्या थोर, उदार, प्रांजळ व लोकसंग्राहक गुणांचें सर्वांनीं कौतुक केलें व न्या. रानडे यांची ही सुधारून वाढ-विलेली आवृत्ति आहे असे तेथील एका प्रमुखानें उद्गार काढले!

❋

द. वि. ताम्हनकर

(बी. ए., केसरीचे प्रतिनिधि, लंडन)

(१) गु. तात्यासाहेब केळकरांचा अगदीं घरच्यासारखा संबंध तें १९३२ सालीं लंडनला तिसऱ्या गोलमेज परिषदेसाठीं आले त्या वेळीं आला. पुण्याचा त्यांचा माझा परिचय होताच; पण लंडनला परिचयाची परिणति घरोब्यांत झाली. १९३२ ते १९४७ या कालावधींत मी चार वेळां हिंदुस्थानांत येऊन गेलों. प्रत्येक खेपेस तात्यासाहेबांची गांठ पुण्यास पडे आणि मनमोकळी चर्चा करण्यास मिळे. त्यांच्याबरोबर तास दोन तास नव्या-जुन्या परिचितांच्या गोष्टी करण्यांत आणि त्यांनीं वाचलेल्या पुस्तकांविषयीं त्यांच्या तोंडून मार्मिक विवेचन ऐकण्यांत कसे जात तें कळत नसें.

तात्यासाहेबांची विद्वत्ता त्यांच्या विनयशील स्वभावानें अधिकच शोभून दिसत असे. लंडनमध्येंसुद्धा त्यांच्या विद्वत्तेनें आणि बहुश्रुततेनें चांगलीच छाप बसविली होती असें म्हणावयास हरकत नाहीं.

(२) इंग्लिश राजकारणी लोकांस पहिली भेट तात्यासाहेबांनीं दिली ती वेजवुड बेन या माजी भारतमंत्र्याला. १९३१ च्या सर्वसाधारण निवडणुकींत बेन-साहेब पडले होते आणि मजूरपक्ष अधिकारच्युत झाला होता. अर्थातच अशा विगत विधिविशारदाला भेटण्यांत काय अर्थ आहे, असें मी त्यांना सहज बोललों. त्यावर तात्यासाहेब म्हणाले, "देव्हाऱ्यांत बसलेल्या देवाची पूजा कोणीहि करतो; पण माळावर पडलेल्या देवाला नमस्कार करण्यांतच अधिक पुण्य असतें. मि. बेनला भेटावयाचें तें अशासाठीं कीं, त्यांनाहि कळलें पाहिजे कीं, ते अधिकारच्युत झाले म्हणून त्यांची किंमत आम्ही हिंदी लोक कमी समजत नाहीं."

रात्रीं ९ वाजतां आम्हीं बेनच्या घरीं गेलों. तेथें बेननें नेमका हाच प्रश्न केला कीं, "आतां मला राजकारणांत कांहीं स्थान राहिलेलें नसतांनाहि मि. केळकर, तुम्ही इतक्या अगत्यानें मजकडे आलांत यांतलें रहस्य काय!" श्री. केळकरांनीं त्यांना आपली भूमिका समजावून सांगतांच बेनलाहि मोठें समाधान वाटलें आणि त्यानें केळकरांचा हात आपल्या हातांत धरून मोठ्या आदरानें त्यांच्याशीं हस्तांदोलन केलें.

(३) १९३२ सालीं केळकरांचा सर्व मुक्काम हॅन्स्क्रेसंट हॉटेलांत झाला. सकाळीं लौकर उठून चहा घ्यावयाचा आणि लंडनमधलीं सारीं वर्तमानपत्रें (त्या वेळीं मँचेस्टर गार्डियन धरून १० पत्रें आम्हीं घेत असूं.) भराभर चाळीत आणि निळ्यातांबड्या पेन्सिलीनें खुणा करीत बसावयाचें असा तात्यांचा क्रम. ८ वाजेपर्यंत ते सारीं पत्रें वाचून फस्त करीत व मला लिहावयाचा मजकूर सांगत. आमची

न्याहारी बहुधा श्रेडेड व्हीट (बारीक शेवईची बंदिस्त वडी) व दूध, पॉरिज, टोस्ट, लोणी, फळें आणि चहा अशी असे. दुपारचें व रात्रीचें जेवणहि पुष्कळ वेळां आम्ही हॉटेलांतच घेत असूं. चीज, मलई, पालेभाज्या व भात त्या दिवसांत भरपूर मिळे. भाज्या मसालेदार नसत; पण तात्यासाहेब आपलें जेवण आवडीनें जेवीत. त्यांना तिखट फारसें आवडत नसावें असा माझा समज आहे.

(४) तात्यासाहेबांनीं अनेक प्रश्नांवर गोलमेज परिषदेंत भाषणें केलीं तीं ते प्रथम लिहून काढीत आणि काळजीपूर्वक वाचीत. कांहीं बाक्पटु सभासद त्याबद्दल त्यांची थट्टा करीत. पण तात्यासाहेबांचें त्यांना उत्तर चोख असें कीं, अशा सभांतून करावयाचीं भाषणें 'इंप्रेशन मारण्यासाठीं' नसून आपला मुद्दा साधार सिद्ध करण्यासाठीं असतात. अर्थातच तीं काळजीपूर्वक आपले आधार तपासून आणि प्रतिपक्षाचे मुद्दे अंदाज करून लिहून काढून वाचलीं तर त्यांत वावगें कांहींच नाहीं.

आपल्या इकडे भाषणें तयार करून देण्याची प्रथा एकंदरींत कमीच. राष्ट्रीय सभेचे आणि वाङ्मयसंमेलनाचे अध्यक्षच काय ते आपली भाषणें लिहून काढून वाचतात. बाकी लोकांचा भर 'एक्स्टेंपोर' बोलण्याकडेच विशेष. इकडे महत्त्वाचीं भाषणें तयार करण्याची पद्धत सरांस रूढ आहे. पार्लमेंटांतील सारीं सरकारी भाषणें आगाऊ तयार करून वाचलीं जातात. एवढेंच काय, पण विख्यात वक्ता म्हणून प्रसिद्ध असलेला विन्स्टन चर्चिलसुद्धां आपलीं भाषणें लिहूनच काढून वाचतो! श्री. केळकरांचीं इंग्रजी भाषणें अत्यंत मुद्देसूद आणि साधार असल्यामुळें तीं फार परिणामकारक होत.

(५) केळकरांच्या येथील वास्तव्यांत त्यांनीं ऑक्सफर्डला दिलेली भेट नमूद केली पाहिजे. ख्रिस्तवासी प्रो. एडवर्ड टॉम्सन यांच्या खास निमंत्रणावरून तात्यासाहेब तेथें गेले. मीहि त्यांच्याबरोबर होतों. दिवस फारच छान होता. हिवाळ्यांत इकडे सूर्यदर्शन होण्याचा मारामार; पण त्या दिवशीं चांगलें उन्हच पडलें होतें असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा प्रसन्न वातावरणांत श्री. तात्यासाहेबांची आणि प्रो. टॉम्सन व डॉ. गिलबर्ट मरे यांची "बोर्सांहिल"वर भेट झाली. मरे हा प्राचीन ग्रीक वाङ्मयाचा विख्यात व्यासंगी म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्याशीं तात्यासाहेबांनी "ग्रीक ट्रॅजेडी" संबंधी महत्त्वाची चर्चा केली. "ग्रीक ट्रॅजेडी" हा विषय तज्ज्ञ विद्वानांत अत्यंत वादाचा म्हणून समजतात; पण त्यावरहि तात्यासाहेब अधिकारवाणीनें बोलूं शकतात हें पाहून टॉम्सन व मरे यांनासुद्धां त्यांच्या अष्टपैलू आणि सर्वंकष बुद्धिसामर्थ्याचें कौतुक वाटलें असलें तर नवल काय!

प्रो. टॉम्सनची इच्छा तात्यासाहेबांनीं निदान एक वर्षभर तरी ऑक्सफर्डला

"मराठी" या विषयावर व्याख्यानें द्यावींत अशी होती. तो स्वतः बंगालीचा प्रोफेसर होता. पण दुर्दैवानें तो योग आला नाहीं.

(६) तात्यासाहेब फार मोठे पुरुष होते, पण त्यांची वृत्ति लहान मुलासारखी होती असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति मुळींच होणार नाहीं. कोठेहि कांहीं नवें दिसलें तर लहान मुलाच्या कुतूहल-बुद्धीला साजेशा वृत्तीनें ते त्या गोष्टीची माहिती करून घेत व कौतुक करीत. आम्ही एके दिवशीं लंडनमधील एका प्रसिद्ध दुकानांत "सेल फ्रिजेस स्टोअर्स" मध्ये बूट विकत घेण्यासाठी गेलों. "हे दुकान म्हणजे एक रोजचें अजस्र प्रदर्शनच होय" असें तात्यांनीं तेथें जातांच उद्गार काढले. "From a pin to an elephant we sell in this store", असें त्याच्या मॅनेजरनें तात्यासाहेबांना सांगितलें व आपल्याबरोबर त्यानें आम्हांला स्टोअर दाखविला. आम्ही स्टोअरमध्यें गेलों तों फक्त एक बुटाचा जोड घेण्यासाठीं; पण बाहेर पडलों त्या वेळीं आमचे बिल जवळजवळ ५०० रु. झालें होतें. आम्हीं तेथें एक टाइपरायटर घेतला, छत्री घेतली, एक घड्याळ घेतलें, कांहीं उबदार पायमोजाचे जोड घेतले व एक चिलीमहि खरेदी केली! परत हॉटेलांत आलों त्या वेळीं तात्यासाहेब मला म्हणाले, "पुनः अशा स्टोअर्समध्यें जाण्याच्या आधीं एक यादी तयार करून व पाहिजे तेवढेंच – यादीबरहुकूम – खरेदी करून बाहेर पडावयाचें असें ठरवा; नाहीं तर जिन्नस खरेदी करण्याचा मोह पडून दिवाळें वाजविण्याची पाळी यावयाची!" बाकी या अनुभवामुळें येथील जीवनाचा मला एक चांगला धडा मिळाला. मी तात्यासाहेबांस म्हणालों, "येथें घटस्फोटाचे खटले फार होतात. त्याचें एक कारण हे स्टोअर्स अस्तित्वांत असें माझें मत झालें आहे. कारण बहुतेक गिऱ्हाईक स्त्रियांचेंच दिसलें. मालखपव्या लोकांच्या गोड बोलण्याला फसून त्या बाया हवी तशी खरेदी करीत होत्या. घरीं बिल गेलें आणि नवऱ्यानें तें पाहिलें म्हणजे त्याचे डाळे उघडतील." यावर तात्यासाहेब म्हणाले, "अहो, तुम्ही आम्हीसुद्धां जर भलतीच खरेदी करून आलों – ही चिलीमच घ्या, आतां ती मी केव्हां ओढणार? पण मोह पडला यांत शंका नाहीं," असें म्हणत म्हणतच तात्यांनी त्यांत तंबाखू घातला व एक झुरका मारला. पण कधींच संवय नसल्यामुळें त्यांना ठसका लागला. चिलमीला त्यांनीं त्या दिवशीं जी रजा दिली ती कायमची. ती अद्यापीहि मजकडे "स्मरण-चिन्ह" म्हणून मीं जतन करून ठेविली आहे!



मरहूम लॉर्ड सँकी

(मजूर प्रधानमंडळाचे लॉर्ड चॅन्सेलर, २ ऱ्या गोलमेज परिषदेचे अध्यक्ष, लंडन)

लेखक – द. वि. ताम्हनकर

(१) गेल्या आठवड्यांत मरहूम झालेले लॉर्ड सँकी यांनीं श्री. तात्यासाहेबांच्या-विषयीं काढलेले उद्गार नमूद करणें जरूर आहे. माझे स्नेही श्री. सदाशिवराव बापटांचें पत्र येतांच मीं सँकींना पत्र पाठवून तात्यासाहेबांच्या विषयींच्या आठवणी पाठविण्याची विनंती केली. पण ते आजारी असल्याचें त्यांच्या सेक्रेटरींनीं कळविलें. म्हणून इकडील रिवाजाप्रमाणें फुलांचा एक मोठा गुच्छ घेऊन मीं त्यांच्या समाचाराला गेलों. त्या वेळीं लॉर्ड सँकी यांनीं आपल्या क्षीण आवाजांत खालील मजकूर सांगितला :–

लॉर्ड सँकी म्हणाले, "केळकरांचें नांव एक प्रखर बुद्धिवान् आणि म. गांधींचे विरोधक म्हणून मीं ऐकिलें होतें. अर्थातच अशा विद्वान् माणसाशीं मनमोकळेपणानें बोलण्याची संधि मिळावी म्हणून मीं त्यांना "ऑक्स्फर्ड अँड केंब्रिज" क्लबमध्यें दुपारच्या जेवणासाठीं बोलावलें. ते शाकाहारी असल्याचें मला माहीत होतें; म्हणून मींहि त्या दिवशीं शाकाहारच घेण्याचें ठरविलें. पण आमच्या वाढप्याला हिंदी शाकाहाराची कल्पना नसल्यामुळें त्यानें आमच्यापुढें मासा ठेवला.

"श्री. केळकरांनीं सहज हा काय पदार्थ आहे म्हणून विचारलें व मीं त्यांना हा प्लेस नांवाचा मासा आहे म्हणून सांगतांच ते पोट धरधरून हंसूं लागले. "मी बहुतेक सर्व तऱ्हेचीं फळें खातों पण हें 'वॉटर-फ्रूट' मला खातां येईल असें मला वाटत नाहीं," असें त्यांनीं सांगितलें. तेव्हां मासा हा जिन्नस शाकाहारांत बसत नाहीं असें माझ्या आणि माझ्या वाढप्याच्या लक्षांत आलें आणि केळकरांना दुसरा जिन्नस वाढण्यांत आला.

"माशाच्या या लघुविनोदाचा मला फार उपयोग झाला. कारण त्यानंतर आम्ही Formal संबोधक मिस्टर आणि लॉर्ड यांना रजा देऊं शकलों व मनमोकळेपणानें बोलूं लागलों. इतक्या वर्षांनंतर आमच्या चर्चेचा मुख्य विषय काय होता तें आतां मला स्मरत नाहीं. पण केळकरांचें इंग्रजी ग्रंथांचें वाचनहि विपुल असावें असें माझें त्या वेळीं मत झालें हें मला सांगितलें पाहिजे.

"विशेषतः वर्ड्स्वर्थ, टेनिसन आणि कीट्स या कवींची कविता आणि चार्लस डिकिन्सच्या कादंबऱ्या श्री. केळकरांनीं चांगल्याच अभ्यासित केल्या असाव्यात असें त्यांच्या संभाषणावरून मला दिसून आलें. गरीब लोकांच्या

जीवनावर पहिल्यानें प्रकाश पाडला डिकिन्सनें. अर्थातच आम्हां समाजसत्तावादी लोकांचा तो ग्रंथकार फार आवडता. त्याचे ग्रंथ म्हणजे आमचें बायबल. श्री. केळकरांना " पिक्विक् पेपर्स " मधील व्यक्तिचित्रें फारच आवडत हें त्यांनींच मला सांगितलें. आणि त्यांच्या भाषेंत पिक्विकिअन् विनोद मला पुष्कळच अनुभवण्यास मिळाला. श्री. केळकरांनीं मला आपलें एक पुस्तक – " Pleasures And Privileges of Pen " नजर केलें. तें मीं अद्यापीहि आस्थापूर्वक जतन करून ठेविलें आहे. त्यांच्या मृत्यूनें तुमच्या देशाची मोठीच हानि झाली आहे; पण आमचीहि हानि कमी महत्त्वाची नाहीं. कारण या देशाशीं हिंदुस्थानचे संबंध अत्यंत मैत्रीचे असावेत असें प्रतिपादन करणाऱ्यांत केळकर प्रमुखस्थानीं होते. "

(२) सँकी आणि केळकर यांची एका बाबतींत परस्परविरोधी टोकांवर असणारे म्हणून दुसरी एक गोष्ट सांगण्यासारखी आहे.

लॉर्ड सँकी पायानें चालण्याचा मोठा शोकी. रोजं कमींत कमी ५ मैल चालावयाचेंच असा त्यांचा निश्चय आणि त्यासाठीं ते खिशांत Speedometer ठेवीत. ठरीव अंतर चालून झालें तरच मग टॅक्सींत वा मोटारींत बसावयाचें असा त्यांचा नित्यक्रम.

याच्या उलट श्री. तात्यासाहेबांचें. त्यांना चालण्याचा भयंकर आळस. एके दिवशीं गोलमेज परिषदेचें काम संपल्यावर सर तेज त्यांना म्हणाले, " मिस्टर केळकर, चला जरा सेन्ट जेम्स पार्कमधून फिरत फिरत आपण ॲथीनियम् क्लब-मध्यें जाऊं. " तेथें दोघांनाहि कोणाला तरी भेटावयास जावयाचें होतें. सेंट जेम्सेस पॅलेस (गोलमेज परिषदेचें ठिकाण) आणि ॲथीनियम् क्लब यांतील अंतर ५०० यार्ड सुद्धां असेल नसेल. पण तात्यासाहेबांनीं आपण टॅक्सींतूनच तेथें येतों, असें सर्वांना सांगितलें व चालण्याचें नाकारलें. कदाचित् त्या दोन ठिकाणांतील अंतर तात्यांच्या लक्षांत आलें नसेल. पण एकंदरींत पायीं चालण्याचा त्यांना कंटाळाच होता असा माझा अनुभव होता.

❋

बा. सा. बुधकर

(मसूर, जि. सातारा)

आमच्या जिल्ह्यांत पगारवाढीसाठीं शिक्षकांनीं संपावर जाण्याचा ठराव केला होता व शाळाखात्यास कांहीं दिवसांची मुदत विचार करण्यास दिली होती. परंतु संप करण्याच्या विरुद्धहि कांहीं शिक्षक होते. अशा वेळीं योग्य सल्ला मिळण्यासाठीं आम्हीं कांहीं शिक्षकांनीं तात्यासाहेबांची भेट घेतली. तात्यासाहेब

म्हणाले, "तुमच्या जिल्ह्यांत झालेल्या तलाठ्यांच्या संपाचा परिणाम ध्यानीं घ्या व तुम्ही संप करूं नका. संप करतां करतां म्हणून आव आणा, बोभाटा करा, सभा भरवा, पण काम बंद करूं नका व शाळा बंद ठेवूं नका. जगांतील संपांचा इतिहासच असा आहे कीं, बहुधा संप करणारांसच शेवटीं माघार घ्यावी लागते." तात्यासाहेबांनीं दिलेल्या समयोचित सल्ल्याप्रमाणें आम्हीं वागलों व पुढील आपत्ति टळली. तात्यासाहेबांचे हे केवढे उपकार !



दा. न. शिखरे

(एम्. ए., माजी सहसंपादक केसरी, पुणें)

(१) विद्यार्थिदशेपासूनची माझी महत्त्वाकांक्षा कीं, आपण संपादक व्हावें आणि 'केसरी' संस्थेंत प्रवेश मिळाला तर काय ! महद्भाग्यच ! नऊ-दहा वर्षें त्या संस्थेंत काम करीत असतांना दोन गोष्टी माझ्या मनावर अधिकाधिक बिंबल्या. एक म्हणजे, लो. टिळकांविषयीं जों जों जास्त जास्त माहिती खोदखोदून मिळवावी, तों तों त्यांच्या थोरवीविषयींची कल्पना अधिकाधिक विस्तृतच होते; आणि दुसरी गोष्ट मनावर बिंबली ती अशी कीं, श्री. तात्यासाहेब केळकर हे लो. टिळक व त्यांची 'केसरी संस्था' यांच्याशीं पूर्णपणें तन्मय झाले आहेत, एकजीव झाले आहेत. या गुणांचीं वाचक अशीं उदाहरणें पदोपदीं घडत.

(२) तात्यासाहेबांच्या लेखनाचा आत्मा जसा औचित्य हा होता, तसा सौजन्य हा त्यांच्या जीवनाचा आत्मा होता. वाचणें आणि लिहिणें हे त्यांचे जणु श्वासोच्छ्वास होते. एकदां ते आजारी होते. सकाळीं मी त्यांच्याकडे गेलों होतों. त्याच वेळीं 'ज्ञानप्रकाश' चे श्री. वामनराव पटवर्धन त्यांना भेटण्यासाठीं आले. 'हं तात्या, काय होतंय् ?' अशी पृच्छा त्यांनीं केली. लगेच हंसतहंसत तात्यासाहेब उत्तरले, 'हें होतय्;' आणि गादीवरून उठून टेबलाच्या खणांतून पांचसात कागद त्यांच्या हाती देत तात्यासाहेब म्हणतात, "रात्रीं डोक्यांत सारखे विचार येऊं लागले; तेव्हां उठलों आणि हा लेख लिहून काढला, तेव्हां आराम वाटला. माझें दुखणें हेंच" असें म्हणून तात्यासाहेब मोकळेपणानें हंसले.

(३) स्वतंत्र लेखन असेल तें बहुधा स्वहस्तानें तात्यासाहेब लिहीत. त्यांचें शेंकडा नव्वद टक्के लेखन दुसऱ्याला निवेदून लिहून घेतलेलेंच आहे. तरीसुद्धां योग्य तोच शब्द यावा म्हणून ते फार दक्ष असत शिवाजी मंदिरांतील एक सभा मला आठवते. कुस्तींतील उपमा ते देत होते. त्या वेळीं त्यांना एक समर्पक शब्द कांहीं केल्या लवकर आठवेना. टेबलावर बोटानें ते टक् टक् करूं लागले. श्रोत्यांनीं शब्द सुचविले, पण ते त्यांच्या मनास येईनात. टेबलावरील टक् टक् चालूंच

होतें – जणूं कांहीं ते आपल्या स्मृतीलाच तारायंत्रानें निरोप पाठवीत होते. शेवटी त्यांचीच स्मृति धांवून आली आणि 'मल्लानें स्वारी भरली तर' असा उचित शब्द-प्रयोग त्यांनीं केला.

(४) तात्यासाहेबांच्या वर्तनांतील सौजन्य तर रोजच्या व्यवहारांत पावलोपावलीं अनुभवास येई. अलीअलीकडे वार्धक्यामुळें "कधीं कधीं ज्योत भडकते" असें तेहि म्हणत; पण हे प्रसंग म्हणजे अपवादच. एरवीं आपल्या हाताखालच्या माणसाशीहि गोडीगुलाबीनें व खेळीमेळीनें ते वागत; त्यांचें कौतुक, त्यांचा गौरव मुक्तकंठानें करीत; एवढेंच काय, एखादा नवाशिका तरुण त्यांच्याकडे गेला तरी ते त्याला प्रेमानेंच वागवीत. इतरांचें कशाला? माझेंच उदाहरण देतों म्हणजे झालें. निवंडणुकीची ऐन धामधूम होती. तात्यासाहेबांचा दौरा चालला होता. मध्यवर्ती विधिमंडळासाठीं ते उभे होते. दौऱ्यांत कराडला मुक्काम झाला. त्या वेळीं मी एम् ए. झालों असेन-नसेन. कॉलेजमध्यें असतांना 'दांपत्यधर्म' नांवाचें एक चोपडें मीं लिहिलें होतें. तें प्रकाशित व्हावें हा हेतु. त्यासाठीं तात्यासाहेबांची प्रस्तावना मिळावी अशी लालसा. म्हणून तें हस्तलिखित घेऊन मी कराडला गेलों. श्री. पांडुअण्णा शिराळकर यांनीं माझी व माझ्या पुस्तकाची त्यांस थोडक्यांत ओळख करून दिली. 'नोव्हेंबरमध्यें मी पुण्यास जाईन, तेव्हां मला भेटा' एवढेंच तात्यासाहेबांनीं घाईत उत्तर दिलें. आधीं व नंतर किती तरी लोक त्यांना भेटत होते, राजकारणावर चर्चा करीत होते, त्या गर्दीत त्यांनीं दिलेलें तें उत्तर! तें उत्तर नेमकें लक्षांत ठेवून पुण्यास नोव्हेंबरांत त्यांस मी भेटतांच तात्यासाहेब मला म्हणाले, "तुमचें तें दांपत्य-धर्माचें हस्तलिखित अ णलेंत?" त्यांची ही स्मरण-शक्ति पाहून मी थक्कच झालों. या अलौकिक स्मरणशक्तीमुळें व सूक्ष्म तर्कशक्तीमुळें ते येणाऱ्या माणसाचें प्रयोजन इतकें अचूक हेरीत कीं, तात्यासाहेब हे मनकवडे आहेत, अंतर्ज्ञानी आहेत असाच भास व्हावा! त्या दिवशीं रात्रीं बाहेर अंगणांत तात्यासाहेब जेवण करून बसले होते. मी लेखनाच्या उंबरठ्यावर उभा होतों. कल्पना अशी कीं, केसरींतील प्रत्येक ओळ त्याच्या संपादकाला माहीत असेल. पण "केसरींत आलेले कैक अभिप्राय मीं वाचलेले नाहींत" असें तात्यासाहेबांनीं सांगितलें, तेव्हां माझ्या मनाला विस्मयाचा धक्का बसला. त्या भरांत मी कांहींबाही बरेंच बोललों. पण त्या साहित्यसम्राटानें शांतपणें तें सर्व ऐकून घेतलें व टीकेची सारी वाफ बाहेर पडूं दिली. तो त्यांचा शांतपणा व सुजनपणा मी कधींच विसरणार नाहीं.

(५) तात्यासाहेब कांहीं ईश्वरनिष्ठ नव्हते किंवा विरक्तहि नव्हते. पण त्यांच्या जीवनाशीं सावलीप्रमाणें सदैव संलग्न असलेलें सौजन्य हें त्यांच्या उदात्त संस्कृतीचें बाह्य चिन्ह होतें. या त्यांच्या उदात्तपणाचीं दोन उदाहरणें महाराष्ट्रांत केवळ अपूर्व आहेत. एक म्हणजे ते आपण होऊन कांहींहि

सक्ति नसतांना, पन्नास-साठ सार्वजनिक संस्थांतून निवृत्त झाले. सत्तेचा हा स्वयंस्फूर्त संन्यास कितीजणांनीं स्वीकारला आहे? दुसरें उदाहरण तर चिरस्मरणीय आहे. तें म्हणजे आपले गुरु लो. टिळक यांना महाराष्ट्रीय जनतेनें कृतज्ञभावानें तीन लाख रुपयांची थैली दिली. "आज तुम्हीं मला विकत घेतलें" असे भावनार्द्र उद्गार त्या वज्रकठोर विभूतीच्या मुखांतून बाहेर पडले तें तीन लाखांचें 'ऋण' मानून तात्यासाहेबांनीं जनतेला, कोणाचीहि मागणी नसतांना, केवळ आपल्या इच्छेनें अर्पण केलें. या गुरुभक्तीला व या आनृण्याला तोड क्वचितच सांपडेल.

(६) लो. टिळकांविषयीं तात्यासाहेबांनी पर्वतप्राय वाङ्मय रचलें आणि शेंकडों व्याख्यानें दिलीं. त्यामध्यें गौरवाचीं विशेषणें किंवा भावनेचे उमाळे प्रकट होत नसत. पण त्यांच्या बुद्धिप्रधान मनांतहि लोकमान्यांविषयीं आदर, किंबहुना भक्तिभावच वसत होता. एकदां पं. मालवीयजी केसरी संस्थेंत आले होते. ग्रंथशाळेंत त्यांचा सत्कार करण्यांत आला. 'सध्या केसरीचा खप किती?' असें मालवीयजीनी विचारलें. खपाचा आंकडा सांगितला, तेव्हां पंडितजींनीं समाधानानें मान हालविली व संतोष प्रकट केला. त्या वेळीं तात्यासाहेब म्हणाले, "ही लोकमान्यांची पुण्याई!"

(७) आपल्या संस्थेला किंवा आपल्या माणसाला उणेपणा दुरून किंवा चुकूनसुद्धां येऊं नये, म्हणून तात्यासाहेब फार जपत. १९३९ सालीं मीं केसरी संस्था सोडण्याचें ठरविलें. सर्वांत आधीं आपलेपणानें सांगितलें तात्यासाहेबांनाच. ते त्या वेळीं सेवानिवृत्त होते. प्रभात-रस्त्यावरील 'पुष्करिणी' निवासांत त्यांचें वास्तव्य होतें. त्यांना मी भेटलों व म्हणालों, "ज्यांच्या हस्तें आवाहन झालें त्यांच्याकडूनच विसर्जन व्हावं म्हणून आलों आहें." कॉंग्रेस राज्यारूढ झाल्यानें व तिनें सार्वजनिक जीवनाच्या सर्व अंगोपांगांत प्रवेश केल्यानें, मतभेदाचीं स्थळें वाढत आहेत, वगैरे मी बोललों. तें सारें ऐकून घेऊन ते म्हणाले, "हा प्रसंग याच्या-आधींच येईल असें मला वाटत होतें. आतां तुम्ही राजीनामा देणार तर द्या; पण त्यांत मतभेद हें कारण दाखवूं नका; कारण तसें केल्यानें संपादकावर दुरून तरी Reflection येतें."

महादेवबुवा वैद्य

(व्यवस्थापक, धर्मसेवाश्रम, वनगुळें, जि. रत्नागिरी)

एका सार्वजनिक संस्थेंत मी व ब्र. वासुदेवमहाराज कुवळेकर यांनीं पंधरावीस वर्षें काम केलें; परंतु पुढें ती संस्था ध्येयपराङ्मुख झाल्यानें त्यांतच राहून समाजकार्य करणें अशक्य झालें, म्हणून आम्हीं उभयतांनीं "धर्मसेवाश्रम –

वनगुळें, जि. रत्नागिरी " या नांवाची संस्था सुरू केली; परंतु पहिल्या संस्था-चालकांनीं या नूतन संस्थेस खूपच विरोध केला. तेव्हां आम्ही दोघेहि तात्यासाहेब यांच्याकडे गेलों व त्यांना सर्व हकीकत निवेदन करून, " या बाबतींत काय करावें " म्हणून त्यांना मत विचारलें; तेव्हां लगेच त्यांनीं आपलें स्पष्ट मत क्षणाचाहि विलंब न लावतां लिहून दिलें. ते लिहितात – " या दिवसांत ज्याला जें कार्य करतां येईल तें स्वतंत्रपणें केल्यास बरें. जुने संबंध अडचणीचे झाल्यास ते ठेवून उपयोगी नाहीं. व्यक्तीनें निःस्वार्थ राखून केलेलें सर्व कार्य ईश्वराघरीं रुजूं होतें. "

न. चिं. केळकर, ५–१०–४४

कलिमुद्दिन अबदुल हुसेन

(व्यापारी, पुणें)

(१) श्रीमंत पेशवे सरकारच्या खास परवानगीनें पुणें शहरांतील बोहरी समाजाच्या मशिदी व मोहल्लाकारितां कात्रज तलावाचें पाणी श्रीमंत सरकारांच्या खास पाणीबंधाऱ्यांतून जोडून दिलें होतें. कात्रज तलावाचें पाणी अशुद्ध आहे असें कारण दाखवून व इतर बाबी पुढें करून पुण्यांतील निरनिराळ्या हौदांचें पाणी बंद करण्याचें पुणें शहर म्युनिसिपालिटीनें ठरविलें; तेव्हां तात्यासाहेब यांसी समाजानें खालील दोन कारणांकरितां पाणी बंद न करण्याबद्दल विनवणी केली. १ कात्रजचें पाणी श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या खास परवानगीनें समाजास यावच्चंद्रदिवाकरौ दिलें असल्याकारणानें म्युनिसिपालिटी कमिटीनें तें बंद करणें योग्य होणार नाहीं. २ खडकवासल्याच्या पाण्यापेक्षां कात्रजचें पाणी विशेष लाभदायक आहे. तात्यासाहेब नगराध्यक्ष होते. त्यांनीं कागदोपत्रीं पुरावा पाहून पाणी बंद करतां येणार नाहीं असा निर्णय दिला; परंतु शुद्धाशुद्धाचा निकाल लागेना. तेव्हां दोन निरनिराळ्या बाटल्यांत खडकवासल्याचें व कात्रजचें पाणी भरून सरकारी पृथक्करण खात्याकडे तपासाकरितां पाठविण्याचें ठरलें. बोहरी समाज या बाबतींत साशंक होता; परंतु तात्यासाहेबांस विश्वास होता कीं, कात्रजचें पाणी शुद्ध आहे. आरोग्याधिकाऱ्यास न कळवितांच त्यांनीं बाटल्यांवरील लेबलें बदलून त्या मुंबईस पाठविल्या. तेथून असा रिपोर्ट आला कीं, कात्रजचें पाणी (अर्थात् खडकवासल्याचें) संपूर्ण अशुद्ध असून त्यांत जीवनतत्त्वें फार अल्प प्रमाणांत आहेत; व खडकवासल्याचें पाणी (अर्थात् कात्रजचें पाणी) अर्ध अशुद्ध असून त्यांत जीवनतत्त्वें फार मोठ्या प्रमाणांत आहेत ! याच्या उलट आरोग्याधिकाऱ्यांनींसुद्धां तात्यासाहेबांच्या हुकमानुसार बाटल्या पाठविल्या होत्या, त्याचा रिपोर्ट अगदीं उलट आला ! तेव्हां हा काय सावळागोंधळ आहे याचा कोणास उमज पडेना. तेव्हां तात्यासाहेबांनीं रहस्यस्फोट करून दाखवून दिलें कीं, कात्रजचें पाणी अशुद्ध

असले तरी फारच श्रेयस्कर आहे. शेवटीं हौदावर अशी पाटी लावण्यांत आली कीं, पाणी पिण्याच्या उपयोगांत न आणतां फक्त वापरावें.

(२) सोन्यामारुती चौकांत झालेल्या सांप्रदायिक दंगलीनंतर रा. रा. अण्णासाहेब भोपटकर यांनीं हिंदु समाजातर्फे कोर्टांत फारच उत्तम प्रकारची वकिली केली होती. या बाबतींत पुणें सार्वजनिक सभेच्या का वार्षिक संमेलनांत त्यांचें अभिनंदन करण्याचा ठराव एका सभासदानें मांडण्याचें ठरविलें. तात्यासाहेबांनीं आपल्या स्वभावानुसार ठराव वाचून भोपटकरांना हळूच विचारलें, " काय हो, तुमच्या कार्याचें माप या ठरावानें होणार आहे काय ? " भोपटकर म्हणाले, " खचित नाही. " नंतर सभेकडे पाहून तात्यासाहेब गंभीरपणें म्हणाले, " पुणें सार्वजनिक सभा हें नांवच ही संस्था सर्व धर्मांच्या व संप्रदायांच्या हितास जपणारी आहे असें दर्शवीत असून या सभेंत एक का असेना, परंतु मुसलमान सभासद आहे, तेव्हां अशा प्रकारच्या ठरावाची कांहीं जरूरी नाहीं. " या अपूर्व सहिष्णुतेच्या त्यांच्या बोलानें माझ्या डोळ्यांस आसवें आलीं व कित्येक दिवसपर्यंत मला त्यांचा विसर पडत नव्हता.

(३) एकसष्टाव्या जन्मतिथीच्या वेळीं पुण्यास तात्यासाहेबांच्या आदरसत्काराची जणूं काय पर्वणी आली होती. गायकवाडवाड्यांत त्यांना कोणीं विचारलें, " तात्या, पुण्यांत आतां आपलें सत्कार करणारे कोण बाकी राहिलें आहे ? " तात्यासाहेब भविष्यवाद्यास साजेल अशा रीतीनें बोलले, " बोहरी समाजाच्या आमंत्रणाची मी वाट पाहत आहें. " काय आश्चर्य कीं, त्याच दिवशीं सायंकाळीं त्यांना तें आमंत्रण मिळालें व तात्यासाहेबांचें भविष्यवचन खरें ठरलें ! यापूर्वी असें आमंत्रण आपणास येईल अशी वार्तासुद्धां त्यांना नव्हती. परंतु समाजाच्या निरनिराळ्या लोकांच्या मनोवृत्तीचा त्यांनीं इतका दांडगा अभ्यास केला होता कीं, अमुकअमुक असें करणार असें ते छातीस हात लावून सांगत असत. तात्यासाहेबांच्या एकसष्टाव्या जन्मतिथीच्या वेळीं कै. देवधर (पुणें सेवासदनाचे संस्थापक) यांना बोहरी समाजानें या समारंभास हजर राहण्याची विनंती केली. आमंत्रण स्वीकारतांना देवधर म्हणाले, " तात्यासाहेबांकरितां अशा समारंभास मी जरूर हजर राहीन. " तात्यासाहेबांना जेव्हां माहिती दिली कीं, देवधर येणार आहेत, त्या वेळीं तात्यासाहेब त्यांच्याजवळ असलेल्या ना. बापूजी अणे यांना म्हणाले, " अहो अणे, देवधरांना अनुकूल होईल अशी तुमची वेळ ठरवा व या समारंभास हजर राहा. " नंतर मला म्हणाले, " अणे, देवधर व मी (केळकर) यांचा फोटो घेण्याची व्यवस्था असूं दे. " आज्ञेनुसार फोटो झाला, तेव्हां तात्या म्हणाले, " पाहा, फोटोंत निरनिराळ्या विचारांचे लोक कसे सावरून नटून बसतात

ते ! अशांच रीतीनें जरं आपण सर्व बाबतींत सावरून नटून राहूं तर खात्रीनें देशांत लवकर सुदिन उगवेल. "

❋

रा. अ. कानिटकर

(बी.ए., एलएल्. बी., वकील, बुलढाणा–वऱ्हाड)

(१) सन १९३२ मध्यें तात्यासाहेब इंग्लंडांत तिसऱ्या वर्तुळ परिषदेकरितां गेले. त्या वेळीं वऱ्हाडच्या प्रश्नासंबंधीं त्यावेळच्या सर्वपक्षीय कमिटीचें काम आम्हीं त्यांच्यावरच सोंपविलें होतें. त्यांनीं तें चोखपणें पार पाडलें. यासंबंधीं वर्णन करण्याची आवश्यकताच नाहीं. या वेळीं निजामातर्फे अकबर हैदरी प्रतिनिधि होते. त्यांच्याशीं बोलण्यांत निजामानें वऱ्हाड त्याला आपल्या अधिराज्यांत ठेवण्याची उत्कंठा असल्यास वऱ्हाडास सर्व राज्याधिकार देण्याची सूचना तात्यासाहेबांनीं केली होती.

(२) मॅक्डोनाल्ड, ब्रिटिश मुख्य प्रधान, यांनीं जातीय निर्णय प्रसिद्ध केल्यानंतर त्यावर मीं मध्यप्रांत विधिमंडळांत त्याविरुद्ध मतप्रदर्शनाची संधि साधली होती. या गोष्टीचें स्मरण ठेवून तात्यासाहेबांनीं १९३४ सप्टेंबरमध्यें पुण्यास भरलेल्या महाराष्ट्र प्रांतीय जातीय निवाडा निषेध-परिषदेस मला अध्यक्ष म्हणून बोलाविलें होतें, व आपल्या अनुयायांतील लहानसहान माणसांच्या कर्तव्यनिष्ठेबद्दल गुणग्राहकता व्यक्त केली होती.

❋

गोविंद गोपाळ देसाई

(संस्थापक, श्रीगोपाळ गायन समाज, पुणें)

(१) सन १९२७ च्या एप्रिल महिन्यांत गोपाळ गायन समाजाची नवी इमारत झाल्यामुळें गायनवर्गाचें काम त्या इमारतींत सुरू झालें. सायंकाळीं साडेसहा वाजतां मी गाण्याच्या मेहनतीस बसत असें. तात्यासाहेब त्याच वेळीं गायन-समाजांत येत, ते रात्रीं आठ वाजेपर्यंत बसत. परशुरामभाऊ कॉलेजच्या वसतिगृहांतील विद्यार्थी व इतर सभ्य स्त्री-पुरुष गाणें ऐकण्यास येत असत. एक दिवस दोघांतिघांनीं आपलीं पादत्राणें गोपाल-कृष्णाच्या मंदिरालगतच्या खोलींत आणून तेथेच ठेविलीं. बाहेरच्या चौकांत अदमासें पंचवीस पादत्राणें ठेविलेलीं दिसत होतीं; पण तें या विद्यार्थ्यांच्या ध्यानीं आलें नाहीं. त्यांच्या मागोमाग तात्यासाहेब आले. त्यांनीं त्यांपैकीं पादत्राणाचा एक जोड पायांत घालून बाहेर ठेविला, इतक्यांत एक विद्यार्थी आला. त्याला बाकीचीं दोन पादत्राणें पायांत घालून

बाहेर ठेवण्यास त्यांनीं सांगितलें व तीं पादत्राणें बाहेर ठेवल्यानंतर आपण आंत आले. तात्यासाहेब आंत आल्यावर यासंबंधानें कांहीं बोलतील असें मला वाटलें; पण नेहमींप्रमाणें येऊन बसले व रागाचें नांव, तालाच्या मात्रा, तालाचें नांव, रागाचे स्वर इत्यादि माहिती विचारून ती लिहून घेतली. थोडा वेळ गाणें झाल्यावर "आपण आलांत ते बाहेर दहा मिनिटें उभें राहून काय करीत होतां?" असें मीं त्यांना विचारिलें. त्यावर ते म्हणाले, "चुकून आंत आलेलीं पादत्राणें बाहेर ठेविलीं. शेजारींच पीर आहे. त्या ठिकाणीं स्वच्छता व पावित्र्य राखण्यासाठी मुसलमान लोक किती काळजी घेतात हें आपण रोज पाहतों. मग श्रीगोपालकृष्णाच्या मंदिरांत येणारांनीं हें शिकावयास नको काय?" असें जमलेल्या मंडळींना उद्देशून ते बोलले. तात्यासाहेबांचे हे शब्द ऐकून सर्व मंडळी एकदम चपापली. आठ वाजतां तात्यासाहेब गेल्यावर या गोष्टीची वाटाघाट सुरू झाली. तात्यासाहेबांची शिस्त, नियमितपणा, विद्याव्यासंग, गुणग्राहकता व रसिकता अन्य ठिकाणीं क्वचित् पाहावयास मिळेल. देशांतील राजकारण, समाजकारण, धर्मकारण इत्यादि गोष्टी करीत असतां एक क्षणभर देखील फुरसत मिळणें कठीण; पण हें सर्व करून पुन्हा संगीतकलेची माहिती गेलीं चार वर्षें ते आमच्याकडून घेत होते.

(२) सन १९२४ सालीं कॉंग्रेसचें अधिवेशन बेळगांवास भरलें. म. गांधी अध्यक्ष होते. स्वागताध्यक्ष गंगाधरराव देशपांडे यांची मला तार आली. बेळगांवीं ठळकवाडीच्या मैदानावर हजर झालों; पण तेथें कानडी-मराठी वाद उत्पन्न होऊन राष्ट्रगीताचा कार्यक्रम झालाच नाहीं. कानडी लोकांनीं गाइलेल्या राष्ट्रगीतासंबंधानें प्रतिकूल चर्चा ऐकून तात्यासाहेब म्हणाले, "कॉंग्रेसमध्यें राष्ट्रगीत उत्कृष्ट प्रकारें गाण्याचा प्रघात महाराष्ट्रियांनींच पाडला व तो आजपर्यंत महाराष्ट्रियांनींच चालूं ठेविला आहे. राष्ट्रगीत कसें गावें हें आमच्या कानडी बंधूंनीं आम्हां महाराष्ट्रियांजवळ शिकावें अशी माझी त्यांना विनंती आहे"



दत्तो अप्पाजी तुळजापूरकर

(बी. ए., एलएल्. बी., ॲडव्होकेट, मुंबई)

(१) सुमारें पस्तीस वर्षांपूर्वीची गोष्ट. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन त्यांच्या माडींतला प्रसंग :– अण्णासाहेबांनीं नरसोपंतांना (त्या वेळीं त्यांचें तात्यासाहेब हें नांव विशेष रूढ झालें नव्हतें) मुद्दाम बोलावून घेतलें होतें. मी अगदीं अनपेक्षितपणें त्याच दिवशीं मुंबईहून आलों होतों. पुणें म्युनिसिपालिटींतील कांहीं भानगडीबद्दल बोलणें होणार होतें. त्या वेळींहि हल्लींप्रमाणेंच पुणें म्युनिसिपालिटीच्या

व्यवहारांत पुष्कळच बजबजपुरी माजली होती. कांहीं स्वार्थी व लब्धप्रतिष्ठित सभासदांनीं व त्यांच्या बगलबच्च्यांनीं म्युनिसिपालिटीच्या व्यवहारांत बऱ्याचशा भानगडी उपस्थित केल्या असल्यामुळें वादाचें रणकंदन माजलें होतें.

"ढोले, मोघे, चोबे, काजी। इतने मेंबर निकले –" अशा तऱ्हेचा म्युनिसिपालिटीवरचा कटाव पुण्यास सर्रास म्हणण्यांत येत असे. त्या वेळीं पुणें म्युनिसिपालिटींत चार जागा सुशिक्षित मतदारांकरितां राखून ठेवलेल्या असत. त्या जागेवर पूर्वी लोकमान्य टिळक, बाबासाहेब पेंडसे, अण्णासाहेब पटवर्धन हे हमखास निवडून येत. मी आतां वर्णन करतों आहें त्या वेळीं नरसोपंत व रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी हे उभयतां म्युनिसिपालिटीचे सभासद होते. रा. ब. जोशी हे फार मोठे विद्वान्, व्यासंगी, आंकडेशास्त्रज्ञ गृहस्थ होते. ते शाळाखात्यांत नोकरीवर असतांनाहि त्यांच्या आंकडेशास्त्राच्या व्यासंगाचा न्यायमूर्ति रानडे भरपूर उपयोग करून घेत. प्रथम जी. व्ही. जे. व नंतर नुसते जे. या टोपण नांवाखालीं त्यांचे माहितीपूर्ण लेख 'टाइम्स ऑफ इंडियां'त प्रसिद्ध होत असत. त्यांना "झांकलें माणिक" अशीच संज्ञा होती. पण त्यांचा स्वभाव अत्यंत सरळ – व्यवहारांतले साधे डावपेंचहि न कळण्याइतका सरळ होता! त्यामुळें कुटिल राजनीतीचें आगर असलेल्या पुणें म्युनिसिपालिटीत जोशीबुवांच्या सरळपणाचा किंवा भोळसरपणाचा दुरुपयोगच होत असे. अशाच एका प्रसंगीं त्यांच्या कांटेखोर समतोल बुद्धीच्या मध्यस्थीच्या भाषणाचा नरसोपंतांना राग आला; व ते जोशीबुवांना थोडें टाकून बोललें. त्याची प्रतिक्रिया जोशीबुवांच्या मनावर होऊन ते आपल्या स्वभावानुरूप फुरंगुटून बसले. तें गाऱ्हाणें अण्णासाहेबांपर्यंत पोंचलें. जोशीबुवांच्याबद्दल अण्णासाहेबांच्या मनांत अत्यंत आदर व तेवढ्याकरितांच त्यांनी नरसोपंतांना त्या दिवशीं बोलावून घेतलें होतें. थोडेसें प्रास्ताविक बोलणें झाल्यावर, "त्या ब्राह्मणाला तुम्ही उगीच कां छळावं?" असे कांहींसे निराशाजनक त्रासिकपणाचे उद्गार अण्णासाहेबांच्या तोंडून बाहेर पडले. नरसोपंतांचा चेहराहि जरासा क्रुद्ध झाला. त्यांनीं सडेतोडपणानें सांगितलें की, "खरोखर छळणूक कोणाची होते आहे हें तुम्ही लक्षांत घेत नाहीं. जोशीबुवांच्या विद्वत्तेबद्दल किंवा मोठेपणाबद्दल काय आम्हांला आदर नाही? पण तुम्ही किंवा टिळक म्युनिसिपालिटींत असतांना म्युनिसिपालिटीचा कारभार जितका सरळपणानें चालत होता तसा आतां चालत नाहीं. चांडाळचौकड्यांची व पाजीपंचकांचीं कारस्थानें म्युनिसिपालिटींत धुडगूस घालीत आहेत. अशा वेळीं जोशीबुवांची फाजील सरळ वृत्ति आम्हांला पदोपदीं नडते! तेव्हां त्याला एकच उपाय आहे. एक जोशीबुवांनीं तरी राजीनामा द्यावा किंवा आम्हीं तरी. माझा राजीनामा हा मी आतां तुम्हांला लिहून देतों" असें म्हणून त्यांनीं खरोखरच कागद व टाक हातांत घेतला. अण्णासाहेब थोडे नरमलेंच. त्यांच्या नेहमींच्या शांतवृत्तीनें ते एवढेंच

म्हणाले, "अरे तसें नव्हे! असा त्रागा करूं नको. जोशीबुवासारखीं माणसें आपल्याला लाभत नाहींत. तीं सुदैवानें लाभलीं आहेत. आपणच त्यांना संभाळून घेतलें पाहिजे. बळवंतरावांच्या (टिळकांच्या) गैरहजेरींत हें सर्व गाडें तुम्हांलाच संभाळून न्यावें लागेल." शेवटीं हा वाद येथेंच मिटला. केळकरांच्या सौम्य वृत्तीला प्रसंगीं सडेतोडपणाची जोड कशी मिळत असे हें या प्रसंगावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

(२) मुंबईचे एक ज्योतिर्षी गजाननस्वामी बोरकर यांनीं 'विविधवृत्ता'वर बेअब्रूची फिर्याद केली होती. त्या खटल्यांतील बोरकरांच्या उलटतपासणीचा साग्र वृत्तान्त प्रश्नोत्तररूपानें वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत होता. त्या सुमारास तात्यासाहेब एकदां माझ्याकडे आले असतांना ते म्हणाले, "तुमच्या उलटतपासणीचें तंत्र विलक्षणच आहे! अशा रीतीनें तुम्ही कोणत्याहि शहाण्या माणसाला मूर्ख ठरवूं शकाल!" मीं म्हटलें 'उलट' तपासणी ह्या शब्दाचा अर्थच असा आहे कीं, ती कधीं 'सरळ' असूंच शकत नाहीं! वकिलांना आपल्या धंद्यांत जीं ज्ञात-अज्ञात पातकें करावीं लागतात तशापैकींच हा प्रकार असतो. तात्यासाहेब हंसून म्हणाले, "पण हें पाप तुम्हांला तोड्यांत कधींच पडत नाहीं!"

(३) तात्यासाहेबांचा हजरजबाबी कोटीबाजपणा विलक्षण होता. वरील प्रसंगीं ते प्रथमच आमच्या गिरगांवांतील नवीन बिऱ्हाडीं आले होते. तेथें आमच्याकडे येण्यास पांच मजल्यांच्या शंभर पायऱ्या चढाव्या लागतात. वर आल्यावर तात्यासाहेब म्हणाले, "मुंबईचा हा गड तुमच्या मळवलीच्या डोंगरी निवासस्थानापेक्षाहि उंच आहे!" मी म्हणालों, "तितकें आम्ही स्वर्गाला जवळ नाहीं का! वर जातांना तेवढा आमचा प्रवास कमी होईल!" त्यावर ते उद्गारले, "अहो, पण त्यामुळें मागें राहाणारांचा त्रास तितका जास्त नाहीं का वाढणार!"

(४) वकिलीच्या धंद्याकरितां म्हणून १९०६ सालीं मी हैद्राबादेस गेलों, तों टिळक-केळकरांचा आशीर्वाद घेऊनच गेलों होतों. तेथें गेल्यावर प्रथमच एका महाराष्ट्रीय हिंदु कुटुंबांतला एक भाऊबंदकीचा खटला माझ्याकडे आला होता. त्यांत मीं तडजोड घडवून आणली. तेव्हां माझ्या फीबद्दल म्हणून पैसाफंडाकरितां त्यांना कांहीं देणगी देण्यास मीं सांगितलें. त्याकरितां त्यांनीं फक्त दोन रुपये मजजवळ दिले! आपल्या महाराष्ट्रीय मंडळींच्या भांडखोर स्वभावाचें थोडेसें वर्णन देऊन ती देणगी मीं केळकरांच्याकडे पाठवून दिली. त्या दोन रुपयांच्या क्षुद्र देणगीच्या पार्श्वभूमीचें सुंदर वर्णन केलेलें असें तात्यासाहेबांचें मला उत्तर आलें. तें मीं जपून ठेवलें होतें. परंतु तेथून झालेल्या माझ्या हद्दपारीच्या वेळीं जे कागदपत्र अग्नयेस्वाहा करण्यांत आले, त्यांत त्या पत्राचीहि आहुति पडली!

❀

श्री. ब. पाटणकर

(डॉक्टर, सोलापूर)

सुमारें एक वर्षापूर्वी मला महाराष्ट्र युनिव्हर्सिटीस कांहीं रक्कम देणगीदाखल देण्याची प्रेरणा झाली. त्याबाबत मूळ कल्पनेला सक्रिय मदत व द्रव्यसाहाय्य देणारे तात्यासाहेब केळकर यांची मला आठवण झाली, व मीं त्यांना पत्र पाठवून सल्ला विचारला. पत्रांत मीं स्वत्व राखून कांहीं अटीवर रक्कम देऊं केली होती व कोणाकडे आण कशी रक्कम पाठवावी वगैरेबाबत खुलासा विचारला होता. त्यांनीं मला स्वदस्तुरचें पत्र सत्वर पाठवून कळावले होतें कीं, मी जी देणगी देणार आहें ती 'स्वत्वनिरपेक्ष करून बंधनाशिवाय द्यावी' व तसें मी करण्याचें ठरविल्यास पुढील तजवीज करण्याचें त्यांनी कबूल केलें होते. वरील सल्ल्यावरून असें अनुमान निघतें की, त्यांना 'गुप्तदान व स्वत्वनिरपेक्ष देणगी' आवडत असे. तसेंच महाराष्ट्र युनिव्हर्सिटीबद्दल त्यांची आत्यंतिक तळमळ व त्या कामीं कार्यतत्परता दिसून आली.



वासुदेव सीताराम धोंगडे

(उपाध्यक्ष, न्या. रानडे शतसांवत्सरिक उत्सव मंडळ, करकंब)

(१) दोन तपांपूर्वीचा तो काळ. संस्थानी प्रजापरिषदांची मुहूर्तमेढ हिंदी राजकारणांत नुकतीच कुठें रोवली जात होती. फेर-नाफेर वादाची रस्सीखेच वृत्तपत्रांतून वाचून झिंगून जाण्याचें तेव्हां माझें वय नव्हतें. सरकारी अध्यापन-विद्यालयांत शिकण्यासाठीं मी तेव्हां सोलापुरास होतों. अक्कलकोट संस्थान प्रजापरिषदेच्या पहिल्याच अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून तात्यासाहेब सोलापुरास आले होते. ती १९२३ सालच्या आठव्या महिन्यांतील सतरा तारखेची सकाळ होती. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे भलेबुरे पडसाद महाराष्ट्रांत उमटत होते. सत्यशोधकी चळवळीच्या लाटाहि आदळत होत्या. तरी पण ब्राह्मणसंघटनेच्या गंगेचा अजून उगम व्हावयाचा होता, मग पोटजातींच्या एकीकरणाचें भव्य पात्र तिला तेव्हां कुठले ! त्या सकाळीं मी त्यांच्याकडे गेलों व माझ्या ब्राह्मण पोटजातीवर होणाऱ्या सामाजिक अन्यायांची त्यांना साधार माहिती दिली. चांगलाच चिडलों होतों मी. माझा देशस्थ ब्राह्मणांविषयींचा त्वेष व भावनेचा उद्रेक पाहून तेहि मोठ्या कौतुकानें माझ्याशीं समरस झाले व तात्काळ त्यांनीं माझ्याजवळ ब्राह्मण समाजास उद्देशून एक विनंती-पत्र लिहून दिलें. त्या पत्राच्या जाहीर प्रचारानें पोटजातींच्या एकीकरणाच्या कार्यास व ब्राह्मणसंघटनेस मोठी मदत झाली, हें मी

स्वानुभवाने कृतज्ञतापूर्वक ऐतिहासिक सत्य म्हणूनच सांगतो. त्यांच्या थोर व्यक्तिमत्त्वाचा ठसा माझ्या मनावर तेव्हां चांगला स्वच्छ उमटला.

(२) दुसऱ्या महायुद्धाची रणधुमाळी युरोपांत त्या वेळीं चालू होती. काँग्रेसचे सर्व लहानथोर पुढारी सरकारी पाहुणे झाले होते. बेचाळीसच्या आंदोलनानंतर दोन वर्षांनीं पुढें पुण्यास १५ सप्टेंबर १९४४ ला एक मोठें युद्धप्रदर्शन सरकारनें उघडलें होतें. त्यांत पहिल्याच दिवशीं राष्ट्रीय युद्ध-आघाडीतर्फे तात्यासाहेबांचें 'प्राचीन व अर्वाचीन महाराष्ट्र' या विषयावर व्याख्यान ऐकण्याची सुसंधि मला लाभली. त्यांचें भाषण सारग्राह्य पद्धतीनें लिहून घ्यावें, या हेतूनेंच मी तेथें गेलों होतों. मंडपाच्या प्रवेशद्वारावर चर्चिल, रूझवेल्ट, स्टॅलिन, चँग-कै-शेक वगैरे विद्यमान पाश्चात्य पुरुषश्रेष्ठांचे फोटो लावलेले होते. पण शिवाजी महाराजांचा फोटो नव्हता, हें तात्यासाहेबांच्या नजरेस आलें; पण त्यांनीं तें सहन केलें नाहीं. भर व्याख्यानांत या बुद्धिपुरस्सर झालेल्या चुकीचा त्यांनीं तीव्र निषेध केला. त्या वेळीं मी तर अगदीं चाटच झालों. त्यांचा तो अन्याय सहन न करण्याचा मराठा बाणा त्या वेळीं स्पष्ट दिसून आला. रिक्रूट-वीर म्हणून निंदा करण्याची तेव्हां एक फॅशन झाली होती. कारण ते सांप्रदायिक दे. भ. नव्हते एवढेंच ! त्यांच्या भाषणाचा रिपोर्ट सकाळीं मीं त्यांना वाचून दाखविला. त्यांच्या वृत्तपत्रीय शास्त्राप्रमाणेंच तो बरोबर वठल्यानें खुष होऊन मला त्यांनीं प्रशंसापत्र देऊन प्रोत्साहन दिलें. तरुणाकडे कौतुकास्पद दृष्टीनें बघण्याचा त्यांच्या स्वभावाचा हा पैलू मला तेव्हां दिसला. ही गोड स्मृति मला आयुष्यभर नवजीवनच देत राहील.

(३) केव्हांहि मी पुण्यास गेलों तरी तात्यासाहेबांच्या भेटीकरितां मुद्दाम त्यांच्या पुष्करणी बंगल्यावर जाऊन त्यांची भेट घ्यावयाचीच, असा माझा परिपाठच ठरून गेला होता. त्यांनीं मला तसें कायमचेंच आमंत्रण देऊन ठेवलें होतें प्रा. माटे यांच्या षष्ठयब्द-उत्सवानिमित्त झालेल्या सत्कार-समारंभाकरिता मी मुद्दाम गेलों होतों. समारंभाच्या दिवशीं सकाळीं मी तात्यासाहेबांच्याकडे भेटीस गेलों. प्रारंभींची अनौपचारिक चौकशी केल्यावर मीं त्यांना एक खाजगी कामाचें पत्र मागितलें, व तें त्यांनीं मला दुसऱ्याच दिवशीं अगत्यपूर्वक दिलेंहि. अलीकडे कांहीं चांगलें पुस्तक वाचलेंत का, अशी त्यांनीं पृच्छा केली. मी शिवरामपंत करंदीकरांच्या सावरकरचरित्राच्याबद्दल विशेषतः त्यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेबद्दल आनंद व्यक्त केला व आपल्या प्रस्तावनेवर माझ्यांनीं झंकारमधून केलेली टीका फारच तीव्र व पराकोटीची होती, आपणावर त्यांनीं असा अकारण केलेला हल्ला पाहून फार हळहळ वाटते, सीझरवर ब्रूटसनें केलेल्या हल्ल्याची आठवण होते, असा मानसिक त्रास व वाङ्मयीन हल्ला निदान बापूसाहेबांकडून तरी

व्हावयाला नको होता, असें मी म्हणालों. यावर त्यांनीं हंसतच म्हटलें कीं, "छे ! छे ! तुम्ही वाचक ग्रंथकारांचे खरेखुरे न्यायाधीश आहांत. टीकाकार नव्हत." सायंकाळीं पांच वाजतां पाहतों तों, तात्यासाहेब परशुराम-भाऊ कॉलेजच्या रमाबाई हॉलमधील व्यासपीठावर उत्सवमूर्ति बापूसाहेब माळ्यांबरोबर हितगुज करीत आहेत ! मित्रप्रेमाची कोण ही थोरवी ! खरोखर या साहित्यसम्राटाचें सागराप्रमाणें विशाल अंतःकरण व हिमालयाप्रमाणें थोर व्यक्ति-मंत्त्व पाहून त्या सभेंत मी तात्यासाहेबांच्या गौरवपर भाषण केलें. त्या वेळीं त्या उभयतांना कृष्णार्जुनाच्या जोडीची उपमा देण्याचा मोह मला आवरला नाहीं ! साहित्याच्या क्रीडांगणावर वावरणाऱ्या खेळाडूंनीं हा केळकरांचा आदर्श अवश्य डोळ्यापुढें ठेवावा.

❋

ग. ग. भावे

(माजी सहसंपादक, 'लोकमान्य' व 'निजामविजय', हैद्राबाद)

(१) मुंबईचें 'लोकमान्य' बंद झाल्यानंतर मी हैद्राबादला 'निजामविजयां'त गेलों तो तात्यासाहेबांच्याच प्रेरणेनें. त्यांनीं मला परिचयपत्र दिलें होतें. त्यांत लिहिलें होतें कीं, " श्री. भावे हे माझ्या परिचयाचे आहेत. त्यांनीं सहसंपादकाचें काम केलेलें आहे. ते आपल्यास चालतील असें वाटतें." हैद्राबादचें 'निजाम-विजय' पत्र त्या वेळीं तेथील त्या काळांतील प्रसिद्ध पुढारी कै. वामनरावजी नाईक यांच्या आश्रयाखालीं चाललें होतें व त्यांच्या संमतीशिवाय मजसारख्या भटजीला तेथें जागा मिळालीहि नसती. पण तात्यासाहेबांच्या पत्राचा प्रभाव असा कीं, त्यांनी तें पत्र पाहतांच अधिक कांहींहि न बोलतां मला कामावर येण्यास सांगितलें !

(२) खाजगी व्यवहारांतहि तात्यासाहेब यांच्या कारभाराचें प्रत्यंतर मला एका खाजगी पत्रव्यवहारांत दिसून आलें. सन १९३६ सालीं त्यांस मीं एक पत्र लिहून कांहीं विचारणा केली होती. पण त्याचें उत्तर येईल अशी मात्र मला मुळींच अपेक्षा नव्हती. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, केवळ अठ्ठेचाळीस तासांत मला माझ्या पत्राचें समर्पक उत्तर व तें त्यांच्या स्वतःच्या हस्ताक्षरांत मिळालें !

❋

रा. स. जोशी

(बी. ए., माजी प्रिन्सिपॉल, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें)

(१) सुमारें १०–१२ वर्षांपूर्वी ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं तात्यासाहेब यांची 'बलिदान' ही कादंबरी अभ्यासास घेतली, आणि तिजवरील सर्वांगीण चर्चा

करण्याच्या प्रसंगानें तात्यासाहेबांस बोलाविलें. तात्यासाहेबांनीं विद्यार्थ्यांच्या सुंदर – साधक-बाधक – अशा चर्चेचें कौतुक केलें. पुढें त्या प्रसगाच्या निमित्तानें त्यानीं खुलासा केला कीं, "सध्या महात्मा गांधींच्या अहिसा-वादाविषयीं टीका होत आहे. म्हणून तो विषय घेऊन मी ही कादंबरी लिहिली आहे, अशी सर्वांची समजूत झाली आहेसे दिसतें; परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, मी तीस वर्षांपूर्वी ह्याच नांवानें ह्याच विषयावर एक नाटक लिहिलें होतें, तें तसेंच पडून राहिलें होतें. त्याचे तें रूप बदलून मीं त्याची आतां ही कादंबरी बनविली आहे. सध्यांच्या विचार-प्रवाहास अनुसरून ही लिहिली असें मुळीच नाहीं."

(२) ट्रेनिंग कॉलेजांत येण्याचें आमंत्रण देण्यासाठीं तात्यासाहेबांच्या घरी मी गेलों असतां, दुसरी कांहीं मंडळी त्यांजकडे आली. त्यांनीं तात्यासाहेबांच्या एका नवीनच प्रसिद्ध झालेल्या लहानशा पुस्तकाची प्रशंसा केली. ती ऐकून घेऊन तात्यासाहेबांनी विचारलें, "तें असो, पण आज काय काम घेऊन आला आहां?" ती मंडळी म्हणाली, "आम्हांला वाटतें कीं, त्या पुस्तकाचें हिंदींत भाषांतर करावें." "चांगली कल्पना आहे" तात्यासाहेब म्हणाले. मंडळींनीं विचारलें, "मग त्याच्या अटी वगैरे?" तात्यासाहेब एकदम उत्तरले, "कसल्या अटी? तुम्ही भाषातर करा, छापा, विका, सर्व कांहीं करा. मला त्यांतलें कांहीं नको. मला त्यासाठीं आणखी कांहीं मागूं नका म्हणजे झालें! पुस्तक आहे तुमच्याजवळ! नसलें तर हें घेऊन जा." असें म्हणून वर त्यांना एक प्रत तात्यासाहेबांनीं काढून दिली! इतका उदारपणाचा सौदा आणि इतक्या झटकन् झालेला ह्या चालू काळांत क्वचितच कुणीं पाहिला असेल!

(३) पुस्तकप्रसिद्धीविषयीं ते एकदां मला म्हणाले, "आपण पुस्तक लिहावें आणि मोकळें व्हावें. त्याची छपाई, विक्री ह्या भानगडींत पडूं नये. ह्याची दगदग आणि ह्याचा वेळ, एवढ्यांत दुसरें एक पुस्तक लिहून होतें." मीं म्हटलें, "ज्यांनी दुसरीं अनेक पुस्तकें लिहिण्याची योजना आंखली असेल, त्यांना हा उपदेश योग्य आहे, पण ...".

(४) तात्यासाहेबांच्या पुस्तकांतील एक पुस्तक अगदी लहान असून त्याची भाषा अगदीं सोपी होती. त्याचा विषय मात्र राजकारणाचा होता. ह्या पुस्तकासाठीं त्यांच्याकडे जाऊन त्यांच्याशीं मी बोलत बसलों असतां ते म्हणाले, "हें पुस्तक मॅट्रिकच्या मुलांना शाळेंत वाचण्यासाठीं उपयोगी पडावें अशी इच्छा आहे. अशी एक मालाच लिहिण्याचा माझा विचार आहे."

(५) तात्यासाहेब त्यांच्या एका लहानपणच्या स्नेह्याकडे भोजनास आले होते. लोकनायक बापूजी अणे त्यांच्या पंक्तीला होते. जेवण झाल्यावर पान-सुपारी

घेऊन तात्यासाहेब उठले, आणि खुंटीवरचा कोट त्यांनीं अंगांत घातला. बापूजींस वाटलें कीं, सदरा घालण्याचें हे विसरले असावे, म्हणून त्यांनीं त्यांस तशी आठवण दिली. तेव्हां तात्यासाहेब म्हणाले, "मी सदरा घालून आलोंच नव्हतों. मी दोन दोन कपडे अलीकडे घालीत नाहीं. ही खादी भारी जाड असते; तेव्हां मी एका वेळीं एकच कपडा घालतों. घरीं सदरा घालतों, आणि बाहेर जातांना तो काढून ठेवून कोटच नुसता घालतों." एवढा थोर पुरुष. पण राहणी ही किती साधी!

❋

सी. ग. चांदिवडेकर

(पेन्शनर हेडमास्तर, खेड, रत्नागिरी)

"गांधीच फाळणीला जबाबदार!" हा तात्यासाहेब यांचा लेख त्यांनीं आपल्या नांवावर केसरींत प्रसिद्ध केला. तो मला फार आवडला; म्हणून मीं त्यांना तसें पत्र लिहिलें. खेरीज त्या पत्रांत 'हिंदुस्थानच्या राजकारणावर गांधीतत्त्वाचें झालेले अनिष्ट परिणाम' या विषयावर पुस्तक होणें अत्यंत जरूर आहे व सदर काम आपल्यावांचून होणें शक्य नाहीं. तरी आपण लिहावें अशी विनंती केली होती. माझ्या या पत्राचें उत्तर ताबडतोब त्यांनीं स्वहस्तें दिलें तें हें :- "माझा लेख तुम्हांला चांगला वाटला असें तुम्हीं स्वयंस्फूर्तीनें लिहून कळविलें याकरितां आभारी आहें. तुम्ही सुचवितां तशा प्रकारचें समर्पक पुस्तक अवश्य व्हावयास पाहिजे. मीं तसें लिहिलेंहि असते; पण दुर्दैवानें आतां तें काम करण्यास मला शक्ति नाहीं. वार्धक्यामुळें लेखन सुटत चाललें आहे" ता. ७।७।४७ – न. चिं. केळकर.

यावरून त्यांची शारीरिक शक्ति क्षीण होत चालली होती हें उघड आहे.

❋

भालचंद्र द. खांडेकर

(मालक, लॉ प्रिंटिंग प्रेस, पुणें)

(१) १९४२ या सालीं आमच्या 'लॉ प्रिंटिंग प्रेस' या सत्तर वर्षांच्या जुन्या छापखान्याचा वाढदिवस समारंभ साजरा करावा असें माझ्या मनांत होतें; व तो समारंभ तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालींच करावा अशी तीव्र मनीषा होती म्हणून त्याबाबत मीं त्यांना विचारलें होतें.

तात्यासाहेबांनाच अध्यक्ष करण्यामध्यें एक महत्त्वाचें कारण होतें व याचकरितां त्यांनीं मोठ्या आस्थेनें तें कबूल केलें होतें. तें म्हणजे तात्यासाहेबांचा व आमच्या छापखान्याचा फार जुना संबंध आलेला आहे. इतकेंच

नव्हे तर लो. टिळकांचा व माझ्या वडिलांचाहि ऋणानुबंध होता, हें त्या समारंभाच्या दिवशीं खुद्द तात्यासाहेबांनीं आपल्या भाषणांत विशद करून सांगितलें. कसल्याशा रिपोर्टाचें काम छापायचें होतें. तें इंग्रजीत होतें व इंग्रजी काम त्या वेळीं फारच थोड्या छापखान्यांत होत होतें. टिळकांनीं तें छपाईचें काम आमच्याकडे पाठविलें. " घाईचें काम आहे, काळजीपूर्वक करा, टिळकांशीं संबंध आहे, " असें तात्यासाहेबांनीं माझ्या वडिलांना सुचवलें होतें. तितक्याच तांतडीनें व काळजीनें तें रिपोर्टाचें छपाईचें काम माझ्या वडिलांनीं पूर्ण करून टिळकांकडे पोंचतं केलें व शाबासकी मिळविली. ही हकीकत तात्यासाहेबांनीं समारंभाच्या दिवशीं बोलून दाखविली व सुमारें चाळीस वर्षांपूर्वीचा इतिहास त्यांनीं तेथें सांगितला. यानंतर ताईमहाराजांच्या सुप्रसिद्ध खटल्याच्या अपिलाचें काम टिळकांनी स्मरण ठेवून तात्यासाहेबांबरोबर आमच्याकडे पाठविलें. तात्यासाहेबांनीं आमच्या उपरिनिर्दिष्ट समारंभाच्या दिवशीं जे उद्गार काढले ते मननीय वाटतात; ते म्हणाले, " या समारंभाचें अध्यक्षपद मला देण्यांत, या छापखान्याचे मालक खांडेकर यांचे चिरंजीव भालचंद्रपंत यांनीं फार औचित्य दाखविलें आहे. हें अध्यक्षपद घेण्यामुळें मलाहि ३०–४० वर्षांच्या जुन्या आठवणी नव्यानें लक्षांत आल्या. टिळकांवर उपकार केलेल्या ज्या व्यक्ति आज आहेत, त्यांत या छापखान्याचे मालक दत्तोपंत खांडेकर यांचा नंबर बराच वर लागेल. केसरी-मराठा या पत्रांच्या सुरुवातीचे दिवस अत्यंत बिकट होते. त्या बिकट काळांत या पत्रांचे कांही अंक छापून दत्तोपंत यांनीं आमची अब्रू बचावली आहे आणि म्हणूनच हें अध्यक्षपद कृतज्ञता बुद्धीनें मी स्वीकारलें आहें."

माझ्या वडिलांनीं लिहिलेल्या 'म्युनिसिपल ॲक्टा'ला पहिली प्रस्तावना तात्यासाहेब यांनींच दिली होती, हेंहि त्यांनीं त्या दिवशीं सांगितलें.

(२) तात्यासाहेब आमच्याकडे एकदा रात्रौ कीर्तनाकरितां आले होते. परत जातांना पाहतात तों त्यांचा जोडा कोणी चोरून नेला असें दिसून आलें. तें पाहून मला फार वाईट वाटलें. मीं त्यांना सांगितलें कीं, आपल्या पायाचें माप घेऊन आतां पंधरा मिनिटांत नवा जोडा आणून देतों. तसेच अनवाणी जाऊं नका; परंतु ते तसेच निघाले. मात्र जातांना मजजवळ एवढेंच म्हणाले, " माझे जोडे हरवले म्हणून तुम्हांला वाईट वाटलें, पण मला आनंद झाला. अहो, हल्लीं पुणेरी जोडे वापरणारे आहेत कुठें ! बरें झालें, आणखी एक मनुष्य जोडे वापरणारा पुण्यांत वाढला ! शिवाय तुम्ही देणार होता ते जोडे तुमच्याकडून घेणें मनाला प्रशस्त वाटेना ! " तात्यांच्या या विनोदाबद्दल मला अजूनहि आठवण झाली कीं हसूं येतें.

❋

नारायण भास्कर नाईक

(संपादक 'भारतमित्र', रिवण, गोवा)

गोमंतक व गोमंतकीय यांच्याबद्दल साहित्यसम्राट् यांना फार कौतुक व प्रेम होते. समारंभाचे अध्यक्ष, वक्ते अगर अन्य नात्यानें गोमंतकाशीं त्यांचा संबंध आला होता. त्यांचें वक्तृत्व लाघवी असून त्यांत आपुलकी ओतप्रोत असल्यानें अत्यंत पूज्य भावानें गोमंतकीय त्यांचें अमूल्य व्याख्यान ऐकत असत. केळकर, मुंजे प्रभृति गृहस्थांचें हिंदुसभेतर्फे शिष्टमंडळ गोव्यांत आलें, त्या वेळीं मी आमच्या 'भारतमित्र' संस्थेतर्फे त्यांना हार घालण्यासाठीं 'कॉलेम' स्टेशनवर गेलों. गाडी स्टेशनांत उभी राहतांच आपल्या सोबत्यांना उद्देशून तात्यासाहेब म्हणाले – "अहाहा! गोमंतकीय वाराच किती आल्हादकारक पाहा! अहो! 'गोवा' हें आमच्या महाराष्ट्राचें प्रत्यक्ष नंदनवन आहे!" मराठीला अत्यंत प्रतिकूल अशा गोमंतकांत महाराष्ट्र साहित्याची एकनिष्ठपणें सेवा बजावणारें मासिक म्हणून 'भारतमित्रा'वर तात्यासाहेबांचें आपुलकीचें प्रेम असे. जबाबदारीच्या मुख्य संपादकीय कामाची गर्दी असतांहि मी दिसलों कीं हातचें काम बाजूला ठेवून "यावें, भारतमित्र" असें म्हणून ते प्रेमानें स्वागत करीत. मला 'नाईक' असें संबोधण्यापेक्षां 'भारतमित्र' म्हणणें त्यांना विशेष आवडे!



पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

(बी. ए., आमदार, कऱ्हाड)

(१) सातारा जिल्हा परिषदेचें अधिवेशन १९१२ साली कऱ्हाडास झालें. ते माझ्या घराशेजारीं बेलापुरे नाट्य-मंदिरांतच झालें. तात्यासाहेब हे त्या परिषदेचे अध्यक्ष होते. माझ्या घराशेजारीच असलेल्या त्या नाट्यमंदिरांत चाललेलें तात्यासाहेबांचें भाषण मी बारा-तेरा वर्षांचा त्या वेळचा मुलगा सार्थपणें कितपत समजणार! पण "साधेपणीं चारुता" असणाऱ्या तात्यासाहेबांच्या भाषाशैलीनें मला मोहनी घातली. इतकी कीं, दर बुधवारीं डाकेनें येणाऱ्या केसरीतील लिखाण विशेषतः केळकरी लिखाण वाचण्याचें मला व्यसनच लागलें म्हटलें तरी चालेल!

(२) तात्यासाहेब थोरांत थोर तर असतच; पण पोरांत पोर होऊन समरसतेनें सल्ला देत, असा अनुभव मला असहकाराच्या पहिल्या लाटेंत आला. शाळा-कोर्टावरील बहिष्काराची उबळ त्या वेळीं रोज रोज नव्या नव्या मंडळींना येत होती. अर्थात् मीहि त्यांतलाच. तेव्हां आपला विचार व्यावहारिक किती, व्यक्तीच्या उपयोगाचा किती अन् खऱ्या राष्ट्रसेवेचा किती, याबाबत सल्ला घेण्यासाठीं धीर करून आम्ही कांहीं सातारकर कॉलेजविद्यार्थी तात्यासाहेबांच्याकडे

गेलों. तेव्हां तात्यासाहेबांनीं आम्हांपैकीं प्रत्येकाची परिस्थिति वडील भावाच्या आस्थेनें समजावून घेतली अन् शेवटीं म्हणाले कीं, "उंच उडी मारणारा आणि लांब उडी मारणारा असे दोघेहि तरुण लोकांच्या कौतुकाचे विषय होतात, दोघेहि समाजाला उपयोगी व असतात. पण उसळी घ्यावयाची कां टप्पू घ्यावयाचा, याचा विवेक ज्याच्या त्याच्या उमेदीवर अवलंबून असतो. शाळांवरला बहिष्कार म्हणजे शिक्षणावरील बहिष्कार नव्हे. परकीय सत्तेच्या तंत्रानें चालणाऱ्या संस्थांवरील बहिष्कार आहे. हा बहिष्कार घालून लोकशाही स्वराज्याचे सेवक होतील असे तरुण तयार करणाऱ्या राष्ट्रीय शाळा निघाल्या अन् त्या लोकांनीं टणकपणानें चालवल्या तरच सर्वार्थानीं प्रस्तुतचा शाळा-बहिष्कार यशस्वी झाला, असें म्हणतां येईल उलट, लोकशाही बहुमतावर चालते; आपल्या हिंदुस्थानांत इंग्रजानें बहुजनसमाज अडाणी राखला. म्हणून त्या अडाणी समाजाशीं समरस होण्यासाठीं आपण शाळा सोडल्या तर जग आपल्याला समजणार नाहीं, बहुजनसमाजाला समजावून सांगतां येणार नाहीं, आणि अशा तऱ्हेनें नेमकें इंग्रजाला व हिंदुस्थानच्या शत्रूला हवे त्या गोष्टीलाच आपण शाळावरील बहिष्कारानें मदत केल्यासारखें होईल. म्हणून शहाणीसुती लोकशाही हें आपलें ध्येय न विसरतां जें झेपेल तेंच करावें, देखाव्यानें दिपून जाऊं नये व मुख्यतः पश्चात्तापास कारण न होईल असेंच धोरण ठरविणें योग्य होईल," अशा तऱ्हेचा पोक्त, सावधगिरीचा पण तरुणांनी नाउमेद करणारा सल्ला त्यांनीं दिला.

(३) १९३२ सालीं श्री. अण्णासाहेब शिंदे यांचें व्याख्यान बेलापुरे नाट्यमंदिरांत तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं होणार असल्याचें कळलें. तेव्हां श्री. शिराळकरांच्याकडे तात्यासाहेबांच्या दर्शनास गेलों. तेथें बोलतां बोलतां, महाराष्ट्र तरुण बुद्धिवादी राजकारणांत पडावयाचें सोडून महात्मा गांधींच्या भावनात्मक राजकारणांत अकारण भाग घेतात, असा प्रवाद निघाला. अर्थातच मीं या गोष्टीचा इनकार केला. "राष्ट्राचें पाऊल पुढें पडत आहे, तें आजकाल म. गांधींच्या राजकारणानें पडत आहे, हें तेल्यातांबोळ्यांचे पुढारी म्हणविण्यांत अगर म्हटलें जाण्यांत भूषण मानणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या महाराष्ट्रांतील तरुणांना पटतें. कारण गांधींनीं 'परत खेड्यांत' असा जो संदेश दिला आहे, त्यांतील रहस्य महाराष्ट्राचे बुद्धिवादी तरुण चांगलें ओळखतात!" माझ्या अशा तऱ्हेच्या कांहीं बोलण्यावर तात्यासाहेबांनीं आम्हां सर्वच बोलकांची समजूत फर्मास घातली. ते म्हणाले – "भावनाप्रधान नसला तर तो तरुण कसला! 'परत खेड्यांत' चालण्याचा संदेश गांधींनीं दिला, तो एकपरी लोकमान्यांच्या लोकसेवक राजकारणाचा विकासच आहे. पण म्हणून लोकरंजनाच्या मोहानें लोकांची एक तऱ्हेची खुषमस्करी करण्याची संवय भावनाप्रधान तरुणांना लागते आणि ती लोकशाहीला शेवटीं घातकच आहे. उदाहरणार्थ,

आजचा अस्पृश्यता-निवारणाचाच प्रश्न घेऊं. केवळ महात्मा गांधी म्हणतात म्हणून हुल्लडबाजीनें जर कोणी सहस्रभोजनें उठवूं लागला, तर अस्पृश्यतानिवारणाचा तो देखावा होईल व मूठभर लोकांपुरता नि गाजावाजापुरताच त्याचा उपयोग होईल. पण खरें अस्पृश्यता-निवारण म्हणजे आपल्याकडे आपले आप्तेष्ट आले असतांना घरच्या सर्व मंडळींत जसा सकोच म्हणून कसा तो वाटत नाहीं, तसाच महारमांग वगैरे मंडळी आल्यावर समाजांत कोठेंच वावेनासा झाला, म्हणजेच खरें अस्पृश्यता-निवारण झालें, असें स्वच्छ म्हणतां येईल. या कामीं एका बाजूनें स्पृश्य मंडळींत अस्पृश्यतानिवारणाचें राष्ट्रीय व सामाजिक महत्त्व आणि मानवतेचा धर्म व्यावहारिक बुद्धिवादानें बिंबवला पाहिजे, तर दुसऱ्या बाजूनें स्पृश्य समाजाबद्दलहि अस्पृश्यांना सहकारसंगति-साहाय्य-संघटन यांचें महत्त्वहि त्यांच्याच बोलींनें बोलून पटवून दिलें पाहिजे. वर्गविग्रहाच्या भावना न फुलवतां वर्गसमन्वयाच्या भावनांना कोणी तरुण कार्यकर्ता आपल्या अस्पृश्यतानिवारणाच्या कळकळीनें भरतीच्या भरती आणीत गेला तर त्याला नांवें ठेवण्यासारखें काय आहे? उलट, बुद्धीनें निश्चित केलेलें कर्तव्य कळकळीच्या भावनांनीं मोहरून दाखविलें, तर त्या तरुणाची पाठ थोपटणेंच इष्ट आहे."

(४) "गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः" एवढेंच नव्हें तर "तथा ना भेदो वा समरसमयो भिन्नमतयोः" असेंच तात्यासाहेबांचें वागण्याचें धोरण असे. सातारा जिल्ह्याला त्याचा प्रत्यय १९३४ सालीं तात्यासाहेबांनीं खास दिला. Parliamentary Mentality has come to stay असें महात्मा गांधींनीं जाहीर केल्यास कांहीं दिवस लोटले नाहींत, तोंच मुंबई कौन्सिलसाठीं दे. भाऊसाहेब सोमणांनीं काँग्रेसचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवावी असें ठरलें. अखिल अखंड हिंदुस्थानांत परकीय सत्तेविरुद्ध काँग्रेसनें मिळविलेल्या लोकांच्या पाठिंब्याचा तो पहिला निकष लावण्याचा प्रसंग होता. १९३० च्या चळवळीनंतर काँग्रेसमधून तात्यासाहेबांनीं बहुधा सर्वप्रकारें अंग काढून घेतलें होतें. तरी सुद्धां कायदे-मंडळांवरील बहिष्कार काँग्रेसनें काढून घेतला आणि ऐन सरकारी दरबारांत लढत देण्याचें तत्त्व मान्य केलें, या एकाच आनंदानें तात्यासाहेबांनीं सोमणांच्या निवडणूक प्रचाराची मोहीम सुरू केली, ती प्रथम कऱ्हाडपासूनच. त्या वेळीं आणि १९३६ सालीं मे महिन्यांत व नोव्हेंबर महिन्यांत दे. शिराळकर-सोमणांचे षष्ठ्यब्दिसमारंभ झाले त्या प्रसंगीं, तात्यासाहेब अध्यक्ष असतांना, मी स्वयंसेवक म्हणून काम करीत होतों. त्या कामांतील वेळापत्रक मीं बिनचूक पाळून दाखवलें याबद्दल तात्यासाहेबांनीं शाबासकी दिली होती. शिराळकर साठीच्या प्रसंगीं कै. महादेव हरी दुबेदी व मी असे प्रत्येक बारीकसारीक गोष्ट पाहत होतों. तें पाहून तात्यासाहेब समारंभाहून परत फिरतांना म्हणाले –

"तुमच्या इकडील सदन मराठा रेल्वे कांहीं आपली स्टेशनें नेमक्या मिनिटाला गांठत नाहीं. पण तुम्ही सगळे कार्यक्रम कसे ठराविक मिनिटाला संपवलेत. नियमितपणा, नेमकेपणा आणि उरक यांची अत्यंत मोठी उणीव आपल्या सार्वजनिक जीवनांत आहे. ती उणीव आतां नाहींशी होईल, असें तुमच्यासारखीं कामसू माणसें पाहिल्यावर खास वाटूं लागतें."

(५) डॉ. दादासाहेब भडकमकर यांचा 'साठी' समारंभ पुण्यास झाला. त्या वेळीं भडकमकर-गौरव-ग्रंथ प्रसिद्ध झाला. तो तयार होत असतांना, आर्यभूषण छापखान्यांत संपादकीय कामानिमित्त मीं सकाळ-दुपार कांहीं काळ बसे आणि मुख्य संपादक प्रा. माटे यांच्या संमतीनें ग्रंथांत समाविष्ट करावयाच्या मजकुराची जुळणी करी. या क्रमांत मीं दोन दिवस अंगांत ताप असूनहि काम केलें. ही वार्ता कोठून तरी तात्यासाहेबांच्या कानीं गेली. तेव्हां पुढे दोन दिवस सकाळ-संध्याकाळ एकदां नियमानें छापखान्यांत येऊन माझ्या प्रकृतीची चौकशी करून व काम नीट चाललें आहे असें पाहून तात्यासाहेब जात. भडकमकर 'साठी' समारंभाचे प्रमुख म्हणून काम पाहत असतांना, काम आणि तें करणारीं माणसें नीट मार्गी असल्याचें दक्षतेनें पाहणाऱ्या तात्यासाहेबांच्यापासून कर्त्या व पुढारी माणसाची जबाबदारी कशी बारकाव्याची असावी याचा बोध माझ्या मनावर ठसला.

❀

के. भा. लेले

(डॉक्टर एम्. सी. पी. एस्., पुणें)

(१) स. १९४६ सालीं 'जादूच्या खेळांचे प्रकार' हें पुस्तक मीं प्रसिद्ध केलें व त्यावर तात्यांचा अभिप्राय मागितला; आणि मौज म्हणून त्यांना ४।५ खेळहि करून दाखविले. हे खेळ त्यांच्या घरीं, दिवसा व त्यांच्या नजरेसमोर एक फुटाच्या अंतरावर दाखवूनसुद्धा त्यांना त्यांमधील गुप्त प्रकार समजला नाहीं, हें पाहून त्यांना फार अचंबा वाटला. तेव्हां ते म्हणाले, 'मला या विषयाची मुळींच माहिती नाहीं, याकरितां माझ्या अभिप्रायाऐवजीं तुम्हीच लेख लिहून या म्हणजे 'सह्याद्रि'मध्यें छापूं'. त्याप्रमाणें मी लेख लिहून दिला व तो तावडतोब म्हणजे मार्च १९४६ च्या सह्याद्रीच्या अंकांत त्यांनीं छापला.

(२) 'हिप्नॉटिझम' या विषयावर मराठी भाषेंत योग्य असें एकहि पुस्तक नाहीं. या विषयांत 'हिप्नॉटिस्ट' किंवा 'ऑपरेटर' आणि 'सबजेक्ट' या इंग्रजी शब्दांना मराठींत कोणते शब्द योजावेत याविषयीं बोलत असतां ते एकदम उठले व माडीवर जाऊन त्यांनीं भगवद्गीता उघडून दाखविली: 'प्रयोगकार' किंवा 'प्रयोगी' आणि 'युक्त' असें शब्द योजण्याला हरकत नाहीं, असें त्यांनीं सांगितलें.

(३) १९४६ च्या डिसेंबरांत अखिल भारतीय जादूगारांची पहिली परिषद मीं पुण्यास भरविली. त्या वेळीं जादूविषयक वाङ्मय व वस्तूंचें प्रदर्शन मांडलें होतें. तें प्रदर्शन पाहून " एका माणसाची ही कृति व जादूचा शिक्षणांत उपयोग करून घेतां येतो, हा शोध विचारांत घेण्यासारखा आहे, " असे त्यांनीं उद्गार काढले. 'पाश्चात्य जादू-विद्या' या माझ्या ग्रंथांतला वरील प्रदर्शनासंबंधाचा त्यांचा अभिप्राय वाचनीय आहे.



माणिकचंद वीरचंद शहा

(धनाढ्य व्यापारी, सोलापूर-पुणें)

(१) श्री. तात्यासाहेब यांचा माझा परिचय, पक्षांतील पुढारी व अनुयायी या नात्यानें पुष्कळ असला, तरी १९४२ सालीं जिमखान्यावर आम्ही राहण्यास आल्यापासून तो अधिक घनिष्ट होत गेला व त्यांत आपुलकीचा जिव्हाळा उत्पन्न झाला. यामुळें त्यांच्या माझ्या वयांत २५ वर्षांचें अंतर असलें तरी त्यांनीं स्नेही म्हणून बरोबरीनें वागविण्यास सुरवात केल्यानें तो पुढें पुढें घरच्या माणसाइतका वाढला. ते त्यांच्या मनुष्य-संग्रहाच्या दृष्टीनें जरी बरोबरीच्या नात्यानें वागवीत असले तरी त्यांच्या व माझ्या योग्यतेमधील अंतर ओळखून त्यांच्याबद्दल योग्य आदर ठेवूनच आम्ही वागत असूं. जानेवारी १९४५ सालीं माझ्याकडे वळसंगला हुरडा खाण्यासाठीं मी त्यांस आमंत्रण देण्यास गेलों, त्या वेळीं ते म्हणाले, " पूर्णतया विश्रांति मिळत असेल तरच मी येईन, " व त्याप्रमाणें त्यांना पूर्ण विश्रांति द्यावयाची असें मनाशीं ठरवून त्यांना नेलें.

(२) याच हुरडा पार्टीच्या वेळीं तेथें जमलेली इतर मंडळी फुरसतीच्या वेळीं करमणूक म्हणून 'रमी' खेळत होती. अर्थात् तात्यासाहेबांपासून एकीकडे त्यांना उपाधी न होईल अशा बेतानें खेळत होती. पण तात्यासाहेबांच्या नजरेंतून ही गोष्ट सुटली नाहीं. ते खेळाशेजारीं येऊन बसले, थोडा वेळ खेळ पाहून खेळाची माहिती विचारली, खेळ जोडीदाराची जरूर नसलेला, ज्याचा तो जबाबदार व केव्हांहि पुरा करतां येणारा असा आहे व इतर डावांप्रमाणें समोरील गड्याची चूक होतांच उणें अधिक बोलण्याचें कारण नाहीं असें पाहून तेहि खेळतो म्हणाले ! त्या वेळीं व त्यानंतर तेथें असेपर्यंत इतर कार्यक्रमांतून वेळ मिळतांच ते म्हणत, " हं चला काढा रमी ". हा खेळ त्यांनीं इतका पसंत केला कीं, पुण्यास आल्यानंतर देखील महिन्यांतून बरेच वेळां ते विचारीत कीं आहे का फुरसत ? व सर्वांना बोलावण्याबद्दल सुचवीत असत. त्यांना या खेळापासून अदृश्य ती विश्रांति व करमणूक मिळते, म्हणून आम्ही असे प्रसंग मुद्दाम जमवून आणीत असूं. त्या वेळीं सर्व प्रका-

रच्या विषयांवर चर्चा व त्यावर त्यांचें मत ऐकण्याचा व त्यांच्या संगतीचा लाभ मिळत असे.

(३) गेलीं ३–४ वर्षें आम्ही कांहीं मित्र-मंडळी मधूनमधून सहलीचे कार्यक्रम ठेवीत असूं. त्यांत तात्यासाहेबहि असत. त्यासाठीं आम्ही बनेश्वर, आळंदी, लोणीकंद इत्यादि ठिकाणीं गेलों होतों. एका बनेश्वराच्या सहलीच्या वेळीं तात्यासाहेब तेथें आल्याचें मामलेदार यांना समजलें; त्यांनीं आमची व्यवस्था ठेवलीच, पण तिसऱ्या प्रहरीं त्यांनीं सर्वांना चहास निमंत्रण दिलें. तात्यासाहेब हे त्या वेळीं भोर संस्थानचे ए. कौन्सिलचे अध्यक्ष होते. आम्हीं मामलेदार यांच्या घरीं जमलों असतांना एक संस्थानी शेतकरी तेथें आला व तात्यासाहेबांच्या पायांवर डोकें ठेवून, त्यांच्यापुढें नारळ पानसुपारी ठेवून " माझ्या नातवाच्या लग्नाचें तुम्हांस आवतन देण्यास आलों " असें म्हणाला. त्या वेळीं त्यांचे डोळे कृतज्ञतेच्या आसवांनी भरून आलेले होते. आम्ही प्रश्नार्थक मुद्रेने एकमेकांकडे पाहूं लागलों. तेव्हां तात्यासाहेब म्हणाले, " या शेतकऱ्यानें वॉरबॉंडसाठीं पैसे भरलेले होते. वॉर बॉंड घेतले गेले नसल्यानें त्याला बॉंड किंवा पैसे परत मिळालेले नव्हते. त्या वेळीं भोर स्टेटचे कांहीं चौकशीचें काम मजकडे आलें होतें. त्या इसमाचा अर्ज पाहून त्याला पैसे देण्याचा हुकूम देण्यांत आला." त्यांच्यासमोर नेहमीं पडलेल्या मोठमोठ्या कामाच्या व्यापांतहि गरिबांचें छोटेसें कामहि लक्षांत ठेवून ते तें करीत असत. त्यांच्याकडे गरीब, श्रीमंत भेद नसे. तात्यासाहेबांऐवजी एरवी नेहमींच्या अधिकारी वृत्तीचा कोणी गृहस्थ त्या जागीं असतां तर पैसे देण्याचा हुकूम व पैसे प्रत्यक्ष पदरीं पडण्यास त्या वृद्ध शेतकऱ्याच्या नातवाच्या नातवाचे लग्नाचे दिवस उजाडले असते !

(४) ता. ५ मे १९४५ रोजीं जयंतराव टिळकांचें लग्न होते. लग्नाच्या दिवशीं आम्ही पानसुपारीस गेलों त्या वेळीं तात्यासाहेब तेथें स्वागतास उभे होते. आम्हांस वाटलें कीं, तेहि आमच्याप्रमाणें पण थोडे आधीं आले असावेत. त्यांनीं आम्हांस खुर्च्यांवर बसण्यास सांगितलें, त्या वेळीं मीं त्यांनाहि बसण्यास विनंती केली; तेव्हां ते म्हणाले, " आज मी यजमान आहें ! " तितक्यांत दुसरी मंडळी आली. ते त्यांच्या स्वागतास गेले. मागाहून समजलें कीं, ते सकाळींच तेथें आले असून पानसुपारी गायकवाड वाड्यांतच व्हावयास पाहिजे म्हणून त्यांनीं शक्य ती तजवीज तांतडीनें करविली. जयंतरावांनीं त्यांना फक्त लग्नाचें आमंत्रण दिलें. तरी वर्डीलपणाच्या मोठ्या आदरामुळें त्यांनीं त्यांना याबद्दल कांहीं सांगितलें नव्हतें. लोकमान्य टिळकांचें ऋण, त्यांची परंपरा चालवून व इतर पुष्कळ तऱ्हांनीं त्यांनीं फेडलें होतें; तरीहि त्यांच्या नातवाच्या लग्नांत वयाच्या ७४ व्या वर्षी दिवसभर काम करून टिळकांची राहिली-साहिली बाकी फेडतां फेडतां, त्यांच्या नातवास

त्यांच्या आजोबांची शिकवण व पुढील व्यवहाराचे धडे देण्यासाठींच जणुं ते उभे होते, असें प्रत्येकास वाटलें असल्यास नवल नाहीं.

(५) तात्यासाहेबांच्या एका स्नेह्याच्या मनांत ××× संस्थान हद्दींत एक नवीन कारखाना काढण्याची कल्पना आली; त्यासाठीं संस्थानकडून कांहीं सवलती व परवानगी हवी होती. त्या संस्थानिकांचे व तात्यासाहेबांचे निकट संबंध असल्याचें माहीत असल्यावरून त्यांनीं तात्यासाहेबांकडे विचारणा करतांच ओळखपत्र तर दिलेंच; व सध्यां विशेष वाटाघाटी चालूं आहेत, घाई करा, अशी सूचनाहि दिली. शिवाय समक्ष भेटींत त्यांना सांगेन असें म्हणाले. त्या पत्रासह अर्ज करतांच राजेसाहेबांकडून मान्यतेचें उत्तर तात्यासाहेबांच्याकडे लागलीच आलें. ते घेऊन तात्यासाहेब स्वतः त्या स्नेह्याकडे गेले, व असें उत्तर आलें आहे, दिवाणांना भेटा, जरूर तर दिवाणांनाहि पत्र देतों असें १२-१०-४७ ला म्हणाले. पुढें त्यांचें काम आठ दिवसांत त्या पत्रामुळें झालें. पण तात्यासाहेब मात्र तें पाहण्यास राहिले नाहींत!

(६) ऑगस्ट १९४७ ची गोष्ट. तात्यासाहेब हे भोर स्टेटच्या कामासाठीं स्टेटच्या गाडींतून सकाळीं भोरला जाण्यासाठीं निघाले होते. पुण्यापासून ६-७ मैलांवर त्यांची गाडी नादुरुस्त झाली. ड्रायव्हरनें चालू करण्याचा शक्य तो प्रयत्न केला, पण गाडी चालूं होण्याचा रंग दिसेना. तात्यासाहेब व त्यांच्या बरोबरचे गृहस्थ उतरून इकडे तिकडे हिंडत होते. त्या वेळीं तात्यासाहेब सोबतच्या गृहस्थास म्हणाले, "आतां कोणाबरोबर जर माणिकचंद किंवा वालचंदकडे निरोप पाठविला तर ते आपली गाडी नक्की पाठवितील." योगायोग असा कीं, या बोलण्यानंतर पांचच मिनिटांनीं शेठ वालचंद आपल्या एका स्नेह्यास घेऊन बनेश्वराला निघाले होते, ते तेथें पोहोंचले! पुढें त्यांनीं त्यांना भोर येथें पोहोचविलें हें सांगणें नकोच. पण आठवण करतांच किंवा इच्छा करतांच ती गोष्ट समोर उभी राहावी याला योगायोग, दैवी इच्छा किंवा आत्मिक बळ, कांहींहि म्हणा, त्यांच्यामध्यें होतें हें खरें. ही हकीकत त्यांनीं मला स्वतः सांगितली व अनुभवाचा बोल म्हणून म्हणाले कीं, "प्रवासासाठीं विशेषतः मोटारनें निघावयाचें असल्यास दिवस अंगावर घेऊन निघावें."

❋

सुंदरराव भास्कर वैद्य

(मुंबइ)

(१) विनोद हा तात्यांच्या अंगीं मुरलेला होता. त्यांच्या वयास साठ वर्षें पुरीं झालीं म्हणून त्यांचें अभिनंदन करण्याकारितां मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या-मार्फत मुंबईत ब्राह्मण सभेंत एक समारंभ झाला. त्या संस्थेचा या वेळीं मी कार्यवाह

होतों. माझ्याकडे आभार मानण्याचें काम होतें म्हणून मी व्यासपीठावर अध्यक्ष बाबासाहेब जयकर यांच्याजवळ बसलों होतों. मी तात्यासाहेबांना अर्पण करण्याकरितां त्यांचें छायाचित्र (सिलुएट = माणसाचें बाजूनें बघून काळ्या कागदावर चित्र काढावयाचें व तें कापून पांढऱ्या कागदावर चिकटवावयाचें म्हणजे माणसाची सुंदर ओळख पटते.) काढलें होतें व तें मी तात्यासाहेबांस अध्यक्षांच्या हस्तें देवविलें. त्या वेळीं तात्यासाहेबांच्या विरुद्ध मुंबईतील एका साप्ताहिकानें एक लेख लिहिला होता त्याची आठवण ठेवून चित्र हातांत घेऊन ते म्हणाले – " हें पाहा, वैद्यांनीं माझें काळें छायाचित्र काढून मला बक्षिस दिलें आहे; पण त्या संपादकांनीं जर हें पाहिलें तर ते म्हणतील, माझ्या तोंडाला वैद्यांनीं काळें फांसलें आहे ! " याच वेळीं मीं तात्यासाहेबांचें रंगीत चित्र तांदळाच्या एका दाण्यावर काढलें तें तात्यासाहेबांचा षष्ठयब्दपूर्तीचा समारंभ पुण्यांत होता, त्या वेळीं तें मीं पुण्यास पाठविलें. तें समारंभाच्या वेळीं तात्यासाहेबांना अर्पण केल्यावर ते विनोदानें म्हणाले, " मी आज ह्या समारंभाकरितां मुंबईहून अक्षता घेऊन आलों आहे ! तांदळाच्या एका दाण्यावर छायाचित्राप्रमाणें माझें हें हुबेहूब रंगीत चित्र काढलेलें आहे ! "



कृ. ग. जोशी

(बी. ए., रावबहादूर, निवृत्त शिक्षणाधिकारी, पुणें)

(१) माझा व तात्यासाहेब ह्यांचा परिचय त्यांचे वडील बंधु नाना ह्यांच्यामार्फत झाला. नाना हे शाळाखात्यांत शिक्षक म्हणून काम करीत होते व त्यांच्याबद्दल तात्यासाहेब ह्यांना विशेष प्रेम व आदर असे. नाना अल्पायुषी वारले व त्यांचें कुटुंबहि त्यांच्या मागें लवकरच निवर्तलें; तेव्हां त्यांच्या दोन मुलांची जबाबदारी तात्यासाहेब व त्यांचे बंधु माधवराव यांच्यावर येऊन पडली. वडील मुलाची सर्व व्यवस्था म्हणजे संगोपन, शिक्षण, लग्न व तदनंतरची सर्व तरतूद तात्यासाहेबांनीं सर्वप्रकारें स्वतःच्या मुलाप्रमाणें समसमान केली. माझी व तात्यासाहेब ह्यांची जेव्हां खाजगी रीतीनें गांठ पडे तेव्हां त्याबद्दल उल्लेख केल्याशिवाय मला राहवत नसे. अशा प्रसंगीं तात्यासाहेब उत्तर देत कीं, " मी फक्त माझें पवित्र कर्तव्य करण्याची खटपट करीत आहें. नानांनीं आम्हांबद्दल जें केलें आहे त्या मानानें हें कांहींच नाहीं." बंधुप्रेम व कर्तव्यनिष्ठा ह्यांचें अधिक ठळक द्योतक तें काय असावें ?

(२) तात्यासाहेबांच्या " मातुश्रीच्या " इच्छेवरून " त्यांची एक मामेबहीण त्यांच्याजवळ राहण्यास आली. सदर बाई त्यांच्याजवळ निदान ३०–४० वर्षे राहत होत्या. पण वृद्धपणामुळें व विशेषतः त्यांच्या चमत्कारिक स्वभावामुळें त्यांचें तेथें

राहणे कठीण झालें आहे हें तात्यासाहेबांनी ओळखून त्यांस त्यांच्या हयातीपर्यंत मदत करण्याचें ठरवून दुसरीकडे राहण्याची तजवीज केली. अशारीतीनें त्यांची स्वतंत्र व्यवस्था योजून त्यासाठी दरमहा ते योग्य ती रक्कम न चुकतां पाठवीत असत. पाठविण्यांत येणारी रक्कम कमी होते असे नजरेस येतांच त्यांनी ती रक्कम दीडपट केली. असला प्रेमळपणा व न्यायबुद्धि हे गुण स्वातंत्र्याच्या नवीन युगांत अत्यावश्यक नाहींत काय ?

(३) पुणें शहरांत मुलींसाठी स्वतंत्र कॉलेज स्थापण्याच्या योजनेस तात्यासाहेबांचा पूर्णपणें पाठिंबा होता. महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीनें असें कॉलेज सुरू केल्यावर तात्यासाहेबांनी मुद्दाम हुजुरपागेत येऊन माझी गांठ घेतली व हुजुरपागेतील शिक्षणसंस्थेच्या व्यावहारिक चोख व्यवस्थेबद्दल प्रशंसोद्गार काढून मुद्दाम सोसायटीच्या उपयोगासाठी मी कायम ठेवेची रक्कम घेऊन आलों आहें असें मला त्यांनी सांगितलें. सार्वजनिक संस्थेबद्दल अशी तळमळ बाळगणारे नेते किती सांपडतील ?



मुरलीधर रामचंद्र चंद्रात्रेय

(बी. ए., मामलेदार, माढें)

(१) सन १९२६ सालची गोष्ट. मी ज्युनिअर बी. ए. च्या वर्गांत होतों. त्या वेळीं केळकर यांचें एकहि व्याख्यान न चुकविण्याचा संकल्प मीं केला होता. त्यांच्या कांहीं कांहीं व्याख्यानांचा ठसा आजहि माझ्या मनावर कायमचा कोरला गेला आहे. शिवाजी मंदिरांत ' कानपूर कॉंग्रेस ' या विषयावर त्यांचें व्याख्यान झालें. व्याख्यानांत त्यांचा आत्मविश्वास नि आपल्या मतांची कसोटी यांचा चांगलाच प्रत्यय आला. त्या कॉंग्रेसमध्यें कौन्सिल-प्रवेशावर कॉंग्रेसचा शिक्कामोर्तब कसा बसला व महाराष्ट्राचें मतच अखेर कसें मान्य झालें हे त्यांनीं फार उत्तम रीतीनें सांगितलें. प्रतियोगी सहकारितेबद्दलहि ते म्हणाले कीं, " Pandit will have to learn another lesson from Maharashtra ".

(२) सन १९३९ सालीं केळकर नाशिक सार्वजनिक वाचनालयाच्या उत्सव-प्रसंगीं व्याख्यानास आले होते, त्या वेळीं मी हजर होतों. ' समग्र केळकर वाङ्मय ' यावर नुकतीच एका लेखकाकडून टीका करण्यांत आली होती. त्यावर सह्याद्रीमध्यें एक लेख प्रसिद्ध झाला होता. त्या लेखाची घाटणी अगदीं केळकरी वळणावर होती; परंतु लेख टोपण नांवाखालीं प्रसिद्ध झाला होता. तेव्हां मी केळकर यांना म्हणालों कीं, सदरहु लेख आपणच लिहिलेला आहे; मग तो टोपण नांवानें कां लिहिला ? तेव्हां ते हंसत म्हणाले कीं, " लेखकास योग्य उत्तर दिलें गेलें कीं नाहीं ?

लेख कोणी लिहिला हा मुख्य प्रश्न नसून लेखाचें कार्य साध्य झालें कीं नाहीं हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचें उत्तर तुम्ही द्या म्हणजे झालें!"

❋

महादेवशास्त्री दिवेकर

(हिंदुत्वदीपक, मिरज)

तात्यांचा व माझा घनिष्ठ संबंध प्राज्ञपाठशाळेचा प्रचारक, लेखक व हिंदु-समाजसंघटक अशा तीन नात्यांनीं आला. विविध प्रसंगीं त्यांचें व्यक्तिमत्व मला आढळलें.

(१) उमरावतीस मी प्रा. पा. शाळेच्या प्रचारार्थ गेलों होतों. त्याच वेळीं तेथें डॉ. गौरांच्या अध्यक्षतेखालीं वऱ्हाड-मध्यप्रांत राजकीय परिषद भरली होती. लो. मा. टिळक नुकतेच सुटून आले होते, त्यामुळें त्या परिषदेला महत्त्व होतें. सर मोरोपंत स्वागताध्यक्ष होते. तात्यासाहेब केळकर, डॉ. मुंजे वगैरे त्या वेळीं आले होते. सभा एका विशिष्ट धोरणानेंच व्हावी व त्याकरितां काय युक्ति करावी, याची चर्चा चालूं होती; कारण नेमस्तपक्ष तेथें जोरांत होता. तात्यासाहेब म्हणाले, "हें पाहा डॉ. मुंजे, तुम्हांला जर गोंधळ व बखेडा नको असेल, तर असें करा. स्वागत-भाषण व अध्यक्षीय भाषणें कशींहि होवोत. पुढील काम आपल्या तंत्रानें व्हावें. त्याकरितां अध्यक्षांच्या शेजारीं एका बाजूस तुम्ही बसा व दुसऱ्या बाजूस मी बसतों. प्रत्येक महत्त्वाच्या वेळीं अध्यक्षाला जवळच्यां जबाबदार माणसांनाच विचारवेसें वाटतें. तुम्ही आम्ही जवळ असलों कीं सभा आपण जिंकूं." पुढें तीच व्यवस्था केली. त्यामुळें परिषद उत्तम तऱ्हेनें पार पडली.

(२) गोमांतकांत भट्ट प्रभु परिषद ग्रामण्याकरितां भरली. श्रीशंकराचार्यांनीं तात्यांना आपले प्रतिनिधि म्हणून पाठविलें. परिषदेचे अध्यक्ष तात्यासाहेबच होते. परिषदेपुढें भट्ट प्रभु समाजाची बाजू मी उत्तम मांडली, त्यामुळे विरुद्ध बाजू अगदीं लंगडी पडली. भट्ट प्रभु पुढाऱ्यांनीं तात्यासाहेब यांचा व माझा परिषदेनंतर अनुक्रमें सुवर्णपदक व उपरणें देऊन गौरव केला. त्या वेळीं उत्तरार्थ भाषणांत तात्या अगदीं गहिवरून म्हणाले, "या परिषदेमुळें मी पुष्कळ शिकलों. धर्माच्या नांवाखालीं समाजांत किती अन्याय होतो याची कल्पना आली. तुमचें दुःख मी जाणतों. मी श्रीशंकराचार्यांकडे योग्य तेंच कळवीन." भाषणानंतर भट्ट प्रभु मंडळी ईश्वराचा तूं अवतार आहेस असें म्हणून तात्यांच्या पायां पडली. पुढें तात्यांच्या मताप्रमाणें शंकराचार्यांनीं भट्टप्रभूंच्या बाजूनें निर्णय दिला व तें ग्रामण्य संपलें. भट्ट प्रभु अवघे ३०० होत. त्यांना अन्य ब्राह्मणांनीं वाळींत टाकल्याचें हें ग्रामण्य होतें.

(३) साताऱ्यास बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं गांधी मत-विरोधी पक्षाची राजकीय परिषद भरली होती. त्या सभेंत अनेक भाषणें व ठराव झाले सुताच्या अटीचा विषय निघाला. तात्या इतके लाल झाले व म्हणाले, " हा काय पोरखेळ आहे ? चार आणे वर्गणी द्यावी हें ठीक आहे. पण तुमची सुताची अट असेल तर मी चार आण्यांची भाजी द्यावी अशी पुस्ती सुचवितों : कारण सुतापेक्षां भाजी त्वरित उपयोगास येते ! ! तेव्हां या सभेंत ती अट नको. "

(४) सांगली इंजिनिअरिंग कॉलेजच्या वाढ दिवसास तात्यासाहेब आले होते. त्यानतर ते मिरजेस आले. अवघ्या दोन महिन्यांपूर्वीचीच गोष्ट ! अलीकडे श्रीमंतांच्याकडेच तात्या उतरत असत. परंतु आम्हीं गांवच्या मंडळींनीं केव्हांहि बोलाविलें तरी ते येत व भाषण करीत. लो. शा. पक्ष, हिंदु सभा, गीताश्रम मंडळ हेच त्यांचे अलीकडे निमंत्रक असत. शांकरतत्त्वमंदिरांत तात्यांचें भाषण झालें. प्रश्नोत्तरें झालीं. रेफरेंडमहि देशाच्या नांवावर व एक दोन प्रश्नांवर त्यांनीं घेतला. शेवटीं ते म्हणाले, " आम्ही बुद्धिद्रोह केला नाहीं; देशद्रोह तर नाहींच नाहीं. देशहितार्थच आम्हीं आमचीं मतें मांडलीं. आम्ही बाजूला पडलों तरी देश स्वतंत्र झाला यांत आम्हांला आनंद आहे. हें राज्य आपल्या अंगावर आलें आहे. खेळांत राज्य येतें, तसेंच हें झालें आहे. तें चालवितांना स्वार्थत्यागाचा फारच मानसिक त्रास होणार आहे हें विसरूं नका. काँग्रेस हा मोठा पक्ष आहे. मोठ्यानेंच लहानांची दखल घ्यावयाची असते. त्या पक्षानें सर्व पक्षांतील लायक व कर्तृत्ववान् माणसें घेऊन राज्य करावें. आम्हांला बोलाविलें तर आम्हीहि कसलीहि अट न मानतां साह्य करूं. कारण देश आपला आहे. " हे चटका लावणारे विचार ऐकतांच मला वाटलें कीं, टिळकपक्षाचा मान तात्यांना गव्हर्नर नेमून करणें योग्य होतें. कुठे तो पक्कासा, ती सरोजिनी व कुठें हा नरसिंह ! ! !



न. गो. अभ्यंकर

(वकील, रा. स्व. से. संघ-प्रमुख, पुणें)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक पू. डॉ. हेडगेवार हे सामान्यतः सन १९२८ सालापासून दरसाल महाराष्ट्रांत संघप्रचारार्थ येऊं लागले. सन १९३४ सालापासून त्यांच्याबरोबर असण्याचें सद्भाग्य मला प्राप्त झालें होतें. पुण्यांत आल्याबरोबर पहिली गोष्ट ते करीत, ती म्हणजे 'देवदर्शन' घेत. हें देवदर्शन म्हणजे केसरी कचेरी, तात्याराव केळकर, अण्णाराव भोपटकर या थोर पुढाऱ्यांची भेट ! या दरप्रसंगीं मी त्यांच्याबरोबर असे. पू. डॉक्टर यांच्याबरोबर

असाच चौथ्या अगर पांचव्या वेळीं तात्याराव यांच्याकडे गेलों होतो. त्या वेळीं वाहन कसलेंहि आमच्याजवळ नसे. तात्याराव यांची गांठभेट होऊन आम्ही परत निघालो. वेळ दुपारची होती. तात्याराव म्हणाले, "डॉक्टर, इतक्या उन्हांत पायीं इतक्या लांब येण्याची तसदी कशाला घेतली!" पू. डॉक्टर लगेच म्हणाले कीं, "वडिलांच्या दर्शनास व आशीर्वाद घेण्यास निघतांना कष्टाचा कधीं विचारच मनांत येत नाहीं." तात्याराव हें ऐकून सद्गदीत झाले व उद्गारले, "डॉक्टर, आपल्यासारख्या थोर कार्यकर्त्यांचा हा विनय व हें शुद्ध अंतःकरण वैऱ्यालासुद्धां जिंकून घेईल. तुम्ही आज ना उद्या आपल्या हिंदुसमाजास खासच जिकाल. आतां या वयांत आपणांस साहाय्य करण्याचा उत्साह मला राहिला नसला, तरी आपल्या कार्यास यश मिळावें ही परमेश्वराजवळ नेहमी प्रार्थना करीन." पू. डॉक्टर खूपच उल्हसित वृत्तीनें बाहेर पडले व मला म्हणाले, "भाऊराव, तपश्चर्येनें प्रसन्न न होणारा देव या विश्वांत नाही."



पांडुरंग केशव शिराळकर

(जमीनदार व सावकार, कराड)

(१) तात्यासाहेबांचा व माझा परिचय फार जुना. एकदां त्यांच्या घरी गेलों असतां केसरीकरितां अग्रलेख लिहिण्यांत ते गढले होते. तथापि मी गेल्यावर थोडा वेळ लिहिण्याचें काम त्यांनीं थांबविलें व कांहीं वेळ आम्ही बोलत बसलो. त्या वेळी टेबलावर ॲडिसन व मेकॉले यांच्या निबंधांचीं पुस्तकें इतर कांहीं पुस्तकांबरोबर पडलीं होतीं, तीं मीं पाहिलीं. त्या वेळी लेखनासबंधीं सहज बोलणें निघालें. त्या वेळीं ते म्हणाले, "लेखनाचें काम ज्याला करावयाचें आहे, त्यानें आपल्या वाचनाचा व्यासंग लेखन करतां करतांच करावा. असें केल्यानें ज्ञान वाढतें व दृढ होतें. पण त्याबरोबरच लेखनकलाहि चांगली साध्य होते." टेबलावर पडलेल्या पुस्तकांकडे बोट दाखवून ते पुन्हां म्हणाले, "लेखन करीत असतां मी या पुस्तकांतील कित्येक कल्पनांचा, विचारांचा व शब्दांचाहि आधार घेतों. त्यांचा उपयोग करून माझें लिखाण सजवितों. त्यामुळें माझें लेखन माझ्या मनाप्रमाणें करतां येतें. केसरींत लेख प्रसिद्ध झाल्यावर त्यांतील गुणदोष वाचकांना सहजीं कळणें शक्य नाहीं. पण मलाच माझा लेख अधिक चांगला व्हावा असें वाटतें, म्हणून मी उपयुक्त अशा ग्रंथांचा आधार घेऊन लेख सुधारण्याचा प्रयत्न करतों. यामुळें माझे लेख निदान माझ्या समजुतीप्रमाणें बरे वठतील असें करण्यांत श्रम व वेळ पुष्कळ खर्च करावा लागतो हें खरें; पण माझ्या मनाचें समाधान होतें. लेखन व त्यासाठीं करावयाचें वाचन हें परस्परांपासून अलिप्त न ठेवतां एकाच वेळीं करीत गेल्यास लेखन चांगलें होतें व ज्ञान दृढ होतें असा दुहेरी लाभ होतो."

(२) सन १९१०-११ सालीं केसरी ऑफिसमध्यें मी गेलों असतां केसरीवर ५००० रु. ची जामिनकी सरकारनें लादल्याचा उल्लेख श्री. तात्यासाहेब यांनीं केला. सरकारच्या या निर्घृण हुकुमाबद्दल संताप व्यक्त करून जामीन भरण्याकरितां आपण फंड उभारला तर माझ्या शक्तीप्रमाणें मी स्वतः मदत करण्यास तयार आहें, असें मी बोललों. फंड उभारून लोकांच्यावर ओझें न टाकतां केसरी संस्थेंतूनच सर्व रक्कम भरण्याचा विचार आहे असें ते बोलले. यांत त्यांचा स्वाभिमान व भिडस्तपणा व्यक्त होत आहे.

(३) १९३० सालची गोष्ट. कायदेभंगाचे ते दिवस! शिवाजी मंदिरांत बेकायदा मीठ विक्रीचा कार्यक्रम ठेवला होता. त्या वेळीं प्रथम तात्यासाहेबांनीं मिठाची पुडी विकली व ती मी शंभर रुपयांस विकत घेतली. नंतर पेणला सत्याग्रह-कायदेभंग करण्याकरितां जाण्याचा विचार ठरला. तेथें गेल्यावर समुद्राचें पाणी आणवून श्री. रामभाऊ मंडलीक यांनीं अगाऊ सर्व सिद्धता केली होती. चुलीवर पातेलें ठेवून त्यांत समुद्राचें पाणी मीठ बनविण्यासाठीं तात्यासाहेब यांनीं ओतलें. त्या वेळीं त्यांनीं थोडेंसच पण फार आवेशयुक्त असें भाषण केलें. अशा रीतीनें सत्याग्रह करून रात्री आम्ही पुण्यास परत आलों.



मुरलीधर गणेश उपासनी

(कीर्तनसम्राट् निजामपूरकर, नागपूर)

तात्यासाहेब ह्यांचे बंधु खानदेशमध्यें असल्यामुळे ते पुष्कळ वेळां खानदेशमध्यें येत असत. आमच्या गांवींहि (निजामपूर येथें) आमच्या संस्थानाला भेट देण्यास ते आले होते. त्यानंतर मी पुण्यास १९३५ सालीं कीर्तनें करण्याकरितां गेलों असतांना हा पूर्वसंबंध लक्षांत ठेवून ते माझ्या कीर्तनास वरचेवर येत असत. मला पुण्यास जें मानपत्र मिळालें, त्यावर तात्यासाहेबांची स्वाक्षरीहि आहे. माझ्या कीर्तनामध्यें मी नेहमीं शाहिरी-काव्याचा उपयोग करीत असें. हें तात्यासाहेबांच्या लक्षांत येऊन त्यांनीं मला तसा उपयोग न करण्याबद्दल प्रेमानें सूचना केली, त्यामुळें कीर्तनाचें गांभीर्य बिघडतें असें ते म्हणाले. तेव्हांपासून तसा उपयोग करण्याचें मीं सोडून दिलें. अर्थात् ह्यानंतर माझें कीर्तन फारच सरस वठूं लागलें. आज मला "कीर्तनसम्राट्", "कीर्तनकेसरी" वगैरे अनेक पदव्या मिळाल्या असून माझें कीर्तन ऐकण्यास सहस्रावधि लोक जमतात. हें मी महाराष्ट्र साहित्यसम्राट् तात्यासाहेबांच्या आशीर्वादाचेंच फल आहे असें समजतों.



गणेश नरहर श्रीगोंदेकर

(सार्वजनिक कार्यकर्ते, पुणें)

(१) १९१८ पासून तात्यासाहेबांचा व माझा परिचय होता. नगरवाचनमंदिराचा व तात्यासाहेबांचा संबंध घनिष्ठ होता. वाचनमंदिरांत तात्यासाहेब जितक्या प्रसंगीं आले त्या बहुतेक प्रसंगीं तात्यासाहेबांना विनंती करून संस्थेंत आणण्याचें काम मजकडे सोंपविलें जाई.

(२) श्रीशुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मण सभा, पुणें (याज्ञवल्क्याश्रम) या संस्थेचा मी चिटणीस असतांना श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या उत्सवप्रसंगीं तात्यासाहेबांनी आमच्या सस्थेत येऊन व्याख्यान द्यावें अशी मीं त्यांना विनंती केली. ती त्यांनीं मान्य केली. कार्तिक वद्य १२ शके १८६४ रोजीं त्यांनीं आश्रमांत येऊन ज्ञानेश्वरीवर, व्यासपीठावर बसून, दोन तास प्रवचन केलें. तें प्रवचन साधार, सुश्राव्य व विद्वत्तापचुर असें झालें. कोणत्याहि विषयावर भाषण अगर प्रवचन करतांना ते त्या विषयाची सांगोपांग पूर्ण तयारी करीत असत, हें वरील प्रसंगीं दृष्टोत्पत्तीस आलें. त्या दिवशीं तात्यासाहेब सहकुटुंब आश्रमांत उपस्थित झाले म्हणून चालकांना फार आनंद झाला. त्यांच्यासारख्या श्रेष्ठ पुढाऱ्यांनी आपल्या संस्थेंत येऊन आम्ही अंगिकारलेल्या कार्याविषयीं चार कळकळीचे व प्रशंसेचे उद्गार काढले यामुळें तो दिवस आश्रमाच्या इतिहासांत ठळकपणें नमूद केला गेला आहे.

(३) पुणें-नगरवाचनमंदिराचे तात्यासाहेब १९३७-३८ मध्यें एकच वर्ष अध्यक्ष होते. साहित्यसम्राट् व संस्थेचे अध्यक्ष या दुहेरी नात्यानें संस्थेंत त्यांचें तैलचित्र असणें अवश्य होतें. त्याप्रमाणें चालकांनी प्रो. पिंपळखरे यांच्याकडून मोठें तैलचित्र तयार करवलें. त्याचें अनावरण मुंबईचे म. म. काणे यांच्या हस्तें १९४१ च्या मेमध्यें झालें. त्या प्रसंगीं तात्यासाहेबांनीं उपस्थित राहावें म्हणून मी त्यांना विनंती करण्याकरितां त्यांच्याकडे गेलों व त्यांना तशी आग्रहपूर्वक विनंती केली ते म्हणाले, " माझ्या तैलचित्राच्या अनावरणप्रसंगीं मीं हजर राहणें हें जरा चमत्कारिक दिसतें. बरें, तुमच्या इच्छेप्रमाणें मी जर हजर राहिलों तर तुम्ही मला चार शब्द बोलावयास लावणार, स्वस्थ बसूं देणार नाहीं. हें कांहीं बरें नाहीं. " त्यावर मीं म्हटलें, " आपण बोलावें हा तर मुख्य हेतु आहे. तसा हेतु नसता तर आपलें तैलचित्र तेथें आहेच." त्यांनीं तत्काल येण्याचें कबूल केलें. समारंभाच्या वेळीं आपल्या भाषणांत ते म्हणाले, " या माझ्या तैलचित्रासमोरील कपाटांत माझें समग्र लिखाण ठेवलें आहे. फ्रेंच कादंबरीतील एक दृष्टांत द्यावयाचा तर मी असें सांगतों कीं, माझ्या मृत्यूनंतर त्या तैलचित्रांतून मी मध्य-

रात्रीं बाहेर येईन व कोणत्याहि कपाटांतून मला लागेल तें पुस्तक काढून वाचीन व पुनः जागच्या जागीं ठेवून देईन, असें चिटणिसांना आश्वासन देतों. कारण मी शिस्तीचा भोक्ता आहें!"

(४) एका भाषणांत तात्यासाहेबांनीं एकदां असें म्हटलें होतें कीं, "जर देव मला प्रसन्न झाला तर मी त्याला दोन गोष्टी मागेन. एक ही कीं, माझें लिहिण्याचें काम चालूं असतांना त्यांत व्यत्यय येऊं नये. म्हणून मी एक अशी कुपी त्याला मागेन कीं, त्यांतील दोन डोस खुर्चीवर बसल्या बसल्या घेतले कीं, पोटभर जेवण झाल्याचें समाधान झालें पाहिजे व दुसरी मागणी अशी कीं, 'देवा, मला जें तूं आयुष्य दिलें असशील त्यांतील पांच वर्षें कमी कर, पण मला अवचित व सुखानें मरण येऊं दे!" वरील दोन मागण्यांपैकीं पहिली मागणी सफल होण्याचा संभवच नव्हता. पण त्यांची दुसरी मागणी मात्र मान्य झाली हें आतां सर्वांना माहीत झालेलेंच आहे.

❋

ज. गं. करंदीकर

(बी. ए., बी. टी., मुख्याध्यापक, सुलाखे हायस्कूल, बार्शी)

(१) श्री. विठ्ठलभाई पटेल यांचें चरित्र लिहिण्याचें माझ्या मनांत आलें, तेव्हां पटेलांच्या संबंधीं कांहीं माहिती मिळवावी म्हणून प्रथम तात्यासाहेबांच्या घरीं त्यांच्या भेटीस मी गेलों व माझा मनोदय मीं त्यांना सांगितला. लगेच त्यांनीं मला पटेलांच्या चरित्रास लागणारी अवश्य ती साहित्यसामुग्री कोठें मिळेल तें नेमकें सांगितलें. एक चिठ्ठी लिहून दिली व मला म्हणाले कीं, "ही चिठ्ठी घ्या – त्यांना दाखवा म्हणजे तुमचें सर्व काम होईल." त्याप्रमाणें पुढें माझें काम झालें. ही आठवण लिहिण्याचा हेतु असा कीं, नवीन होतकरू तरुणांना प्रोत्साहन देण्यांत व मार्गदर्शन करण्यांत त्यांना नेहमींच आनंद वाटे. आपल्या अनुभवाचा व माहितीचा फायदा त्यांनीं सहस्रावधि लोकांना करून दिला.

(२) पत्रांना उत्तरें देण्याच्या बाबतींत ते अतिशय दक्ष असत. पत्रांचें उत्तर ताबडतोब गेलें पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. "सह्याद्री"चे संचालक या नात्यानें त्यांच्याशीं झालेल्या पत्रव्यवहाराच्या बाबतींत मला हा अनुभव आला. अतिशय कार्य-व्यापृत असूनहि नेहमींचा पत्रव्यवहार दक्षतेनें सांभाळणें ही गोष्ट तितकीशी सोपी नाहीं. साध्या गोष्टीकडेहि बारकाईनें लक्ष्य पुरविणें कठीण असतें. परंतु तें तात्यासाहेबांना साध्य झालें होतें.

❋

वि. वि. भागवत

(एम्. ए., एलएल्. बी., बी. टी., उपप्राचार्य, प्रा. अ. विद्यालय, चाळिसगांव)

(१) १९२५ सालची गोष्ट. मी फर्ग्युसन कॉलेजमध्यें शिकत होतों. खानदेश विद्यार्थी संघाच्या वादविवाद-मंडळाचा चिटणीस म्हणून तात्यासाहेब यांचें व्याख्यान ठरविण्यासाठीं मी व माझे मित्र येवल्याचे श्री. दामुअण्णा थत्ते वकील त्यांच्याकडे गेलों. त्यांनीं मोठ्या आनंदानें व्याख्यान देण्यास अनुमति दिली. पुढें प्रो. के. रा. कानिटकर यांनीं त्यांच्या व्याख्यानाची परवानगी रहित करून तें व्याख्यान रद्द करावें असें आम्हांला सुचविलें ! आम्ही अगदीं चकित झालों व मनांतून रागावलों. 'वक्त्याला एकदां आमंत्रण करून पुनः त्याला येऊं नका असें सांगणें हें अगदीं गैर दिसेल' असें आम्हीं त्यांना सांगितल्यावर ते म्हणाले, 'ती जबाबदारी मी घेतों. मी त्यांना स्वतःच पत्रानें कळवीन.' पण प्रो. कानिटकरांचें पत्र गेलें, तरी स्वतः तात्यासाहेब यांच्याकडे जाऊन त्यांची क्षमायाचना करणें मला जरूर होतें. कानिटकर यांचें पत्र त्यांच्याकडे पोंचलें होतेंच. मी व थत्ते त्यांच्याकडे जाऊन अधोवदन करून उभें राहिलों व त्यांना वस्तुस्थिति सांगितली. त्या वेळीं त्यांनीं मोकळ्या मनानें "सार्वजनिक कार्यांत मानापमानाची खंत ठेवून चालत नाहीं. तुम्ही मुळींच वाईट वाटून घेऊं नका. पुन्हां केव्हां तरी तुमच्याकडे व्याख्यानास येतां येईल," असें सांगून आमची समजूत केली. प्रो. कानिटकरांविषयीं कांहींच अनुद्गार उद्गार न काढतां त्यांनीं त्यांच्या बदललेल्या 'दुसऱ्या विचारा' (Second thought) बद्दल आश्चर्य मात्र व्यक्त केलें !

(२) एकादें काम उत्तेजनार्ह आहे अशी खात्री पटल्यावर तात्यासाहेब ताबडतोब त्या कार्याला शक्य तें साहाय्य देऊन मोकळे होत. 'भारतचित्रदर्शन' या लोकरंजनाबरोबर लोकशिक्षण देणाऱ्या ध्येयनिष्ठ चित्रपट संस्थेची स्थापना करतांना श्री. ना. ह. आपटे यांना तोच अनुभव आला आहे. तात्यासाहेबांना अशा संस्थेची कल्पना पटल्याबरोबर त्यांनीं आपला ठेवीचा चेक त्याच बैठकींत दिला व कार्याची मुहूर्तमेढ उभारली ! लगेच योग्य शब्दांत भारतचित्रदर्शन या संस्थेला अभिप्रायहि लिहून दिला. पण अवास्तव जबाबदारी टाळण्याची दक्षताहि ते घेत. खानदेशमधील एका व्यक्तीनें भारत-चित्रदर्शन संस्थेसंबंधीं त्यांच्याकडे पत्रद्वारें चौकशी केली. पण त्या व्यक्तीला तात्यासाहेबांचें कांहींच उत्तर आलें नाहीं, म्हणून त्या चित्रपट संस्थेचा खानदेशांतील प्रतिनिधि म्हणून मीं तात्यासाहेबांना एक पत्र लिहिलें. त्याचें उत्तर आलें तें असें :-

पुणें, १५।२।४७.

"मीं स्वतः भारतचित्रदर्शनकडे एक ठेव ठेवली आहे. त्याशिवाय मीं त्या कार्यार्थ एक प्रशस्तिपत्र दिलें असून तें छापून वाटलें जात असतें. याशिवाय या कार्यास ठेवी घ्याव्या असें मी व्यक्तिशः कोणास सांगूं इच्छित नाहीं. ज्यानें त्यानें स्वतःची खात्री करून घ्यावी हें बरें." — न. चिं. केळकर.

तात्यासाहेबांच्या हस्ताक्षरांतील बाळबोध पत्र मला या निमित्तानें मिळालें. साहित्यसम्राटांचें हें पत्र मीं मोठ्या अभिमानपूर्वक जपून ठेविलें आहे.

(३) १९४१ मधील गोष्ट. तात्यासाहेबांच्या संचालकत्वाखालीं चालणाऱ्या कार्यासंबंधीं तक्रार करण्याचा प्रसंग मजवर आला. त्यांतील एका कार्यकर्त्याच्या यांत्रिक वागण्यानें अपमान झाल्यासारखें मला वाटलें. त्यासंबंधीं मीं तात्यासाहेबांची 'पुष्करिणी'त गांठ घेतली व माझी तक्रार मांडली. माझी व्यथा तात्यासाहेबांनीं नेमकी ओळखली व ते मनापासून तळमळून म्हणाले, "भागवत, मी या लोकांना शिष्टाचार कां आतां शिकवीत बसूं ? झाल्या गोष्टीबद्दल मी दिलगीर आहें. तुम्ही कांहीं मनांत आणूं नका." तात्यासाहेबांनीं असें म्हणतांच माझ्या डोळ्याला पाणी आलें, माझा आवेश व संताप पार उतरला व मी चटकन् म्हणालों, "छे, छे, तात्यासाहेब, तुम्हीं असें म्हणण्याची गरज नाहीं." त्यानंतर दि. २२।९।४१ ला त्यांच्या हातचें मोडी पत्र मला आलें. त्यांत "गैरसमज करून घेऊं नका. आमच्याहि कांहीं अडचणी असतात, त्यांच्याकडे सहानुभूतीनें पाहा" असें म्हटलें आहे. कोणालाहि नाखूष करणें त्यांच्या जिवावर येई !

❋

गोविंद माधव किनखेडे

(नागपूर)

राजाराम वाचनालयाच्या महोत्सवाच्या निमित्तानें तात्यासाहेबांचें आमच्या नागपुरांत आगमन झालें होतें. त्या सधीचा फायदा घेऊन नागपुरांतील अनेक संस्थांनीं त्यांच्या आगमनाचा फायदा घेतला. आमच्या प्रिन्सिपालच्या विनंतीस मान देऊन तात्यासाहेबांनीं आमच्या सुप्रसिद्ध शाळेस भेट दिली. तासभर व्याख्यान देऊन त्यांनीं विद्यार्थ्यांस उपयुक्त अशा अनेक गोष्टींचा खुलासा व बोध केला. हारतुरे होऊन समारंभ संपल्यानंतर ते जेव्हां जावयास निघाले तेव्हां घांवतच मी त्यांच्या मोटारीजवळ गेलों व माझी स्वाक्षरीवही त्यांच्यासमोर धरली. हातांत वही घेऊन त्यांनीं मागील पानें चाळावयास सुरवात केली. चाळतां चाळतां ते डॉ. बी. शि. मुंजे यांच्या स्वाक्षरीच्या पानाकडे टक लावून

पाहूं लागले. मजजवळचें पेन घेऊन शोध्याच वेळांत त्यांनीं डॉक्टरसाहेबांच्या सहीखालींच मोडीमध्यें सही केली.

"आपला कांहीं संदेश ...?" मीं विचारलें. "आमचं वाङ्मय काढा. एखादं सुंदर वाक्य असल्यास शोधा, आणि लिहा याखालींच!" "परंतु आपलं वाङ्मयच इतकं विस्तृत आहे कीं, त्यांतील कोणतें वाक्य घ्यावें, हेंच कळत नाहीं." उत्तरादाखल तात्यासाहेबांनीं माझ्याकडे पाहून केलेलें स्मित अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. परत पानं चाळतां चाळतां प्रथम पृष्ठावरील माझें नांव वाचून ते म्हणाले, "माधवरावांचा मुलगा कां तूं?" 'हो!' मीं उत्तर दिलें.

तात्यासाहेबांनीं वहीवर तर कांहीं मला संदेश दिला नाहींच; परंतु माझ्या हृत्पटावर कोरण्यासाठीं एक अनमोल असा संदेश दिला. ते म्हणाले, "आपल्या वडिलांचें चरित्र लिहा!!"



विठ्ठलराव जोशी

(सांगलीचे जुन्यांपैकीं एक सार्वजनिक कार्यकर्ते)

(१) सन १९०६ सालीं, तात्यासाहेब केळकर व यशवंतराव कुलकर्णी हे श्रीमंत कै. बाबामहाराज यांच्या कुन्नूर येथील जमीनीसंबंधानें कांही माहिती मिळवण्याकरितां चिकोडी गांवीं आले, त्या वेळीं माझा त्यांचा प्रथम परिचय झाला. त्या वेळीं 'स्वदेशी बहिष्कार' व 'बगालची फाळणी' या विषयांवर त्यांचीं दोन व्याख्यानें, माझ्या सहकारी मंडळींनीं करविली. त्यांच्या सत्कारार्थ, नागरिकांतर्फे चिकोडीस निघणाऱ्या सुप्रसिद्ध कापडापैकीं धोतरजोडा, उपर्णे जोडी व इतर कांहीं अशाच वस्तु, भेट म्हणून – त्यांस तेथील पुढारी कै. सखारामपंत कुलकर्णी यांच्या हस्तें – अर्पण करण्यांत आल्या. दुसरे दिवशींच्या व्याख्यानापूर्वी वरील सर्व कापड वगैरे वस्तूंची अंदाजी किम्मत त्यांनीं मला विचारून घेतली व समारंभाच्या अखेरीस वरील रकमेंत पदरची थोडी भर घालून, तेथील एका नवोदित संस्थेस आपली देणगी म्हणून त्यांनीं परत केली! अनृणी राहण्याची त्यांची प्रवृत्ति पहिल्यापासून दिसून येत होती.

(२) सन १९२९ च्या डिसेंबरमध्यें, लाहोरास 'पंजाब प्रांतिक हिंदु-सभेची परिषद व कॉंग्रेसचें अधिवेशनहि होतें; तात्यासाहेबांची प्रांतिक हिंदु-सभेच्या अध्यक्षस्थानीं निवड झाली असल्यामुळें स्वागताध्यक्ष राजा नरेंद्रनाथ यांच्याकडे त्यांचे पाहुणे म्हणून उतरण्याची व्यवस्था करण्यांत आली होती; तात्यासाहेबांच्या इच्छेवरून त्यांच्याबरोबर गजाननराव केतकर,

अंतुकाका फडणीस, न. वि. गाडगीळ, बापुराव जोग व मी असे पांचजण तेथेंच होतों. त्या वेळीं तात्यासाहेबांनीं प्रकृतिस्वास्थ्याकरितां, सुमारें तीन आठवडे, नुसत्या भाज्यांवर राहण्याचें ठरविलें होतें. राजा नरेंद्रनाथांनीं आम्हां महाराष्ट्रीय पाहुण्यांकरितां, भोजनांत – पुलावा वगैरे अनेक तऱ्हेचीं पंजाबी पक्कान्नें, त्या दहा दिवसांच्या मुक्कामांत, करविलीं होतीं; परंतु तात्यासाहेबांनीं, आपल्या ठरलेल्या भाज्यांखेरीज त्या मुक्कामांत दुसरें कांहीं घेतलें नाहीं, यावरून त्यांचा निग्रही स्वभाव, संयम व अनासक्तीची वृत्ति दिसून येईल.

(३) याच मुक्कामांत, नॅशनल कॉंग्रेसच्या सुप्रसिद्ध अधिवेशनासहि, आम्ही सर्वजण जात असूं. विषय-नियामक कमीटीच्या पहिल्या दिवशीं, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी, कॉंग्रेसचे गतसालचे चिटणीस या नात्यानें सर्व अहवाल वाचून दाखविला; तो वाचीत असतांना त्यांत पूज्य पंडित मालवीयजी यांजवर, दहा हजार रुपये तसलमातीचा हिशेब देण्यास दिरंगाई केल्याबद्दल, बरेचसे अनुदारपणाचे उद्गार काढून त्यांनीं पर्यायानें मालवीयजींचा अपमान केला. त्यांचें भाषण झाल्यावर, पंडित मालवीयजींनीं, आपल्या खुलाशाचें उत्तर दिलें. परंतु सभेंत झालेल्या अपमानाबद्दल त्यांस वाईट वाटून, त्यांचा चेहरा उतरल्याचें दिसलें. त्यानंतर तात्यासाहेबांनीं मालवीयजींच्या समर्थनपर माहितीपूर्ण, उत्कृष्ट असें स्पष्टोक्तीचें भाषण केल्यामुळें त्यांची बाजू उत्तम रीतीनें सांवरली गेली. त्यामुळें श्रोतेमंडळींना तात्यासाहेबांच्या समयज्ञतेबद्दल व इंग्रजी भाषेंतून समर्पक रीतीनें, मालवीयजींची पडती बाजू चांगल्या रीतीनें सांवरून धरल्याबद्दल धन्यता वाटली.

(४) याच लाहोरच्या मुक्कामांत, दिवंगत पुढारी लाला लजपतराव यांच्या घरीं मुद्दाम जाऊन, त्यांच्या कुटुंबास व मुलांस भेटून, त्यांचें सांत्वन करून व त्यांचा समाचार घेऊन येण्यास, तात्यासाहेब विसरले नाहींत; कारण त्यांचा व लालाजींचा जिव्हाळ्याचा ऋणानुबंध होता. यावरून सार्वजनिक कामें सांभाळूनहि, इतर लौकिकी व्यवहार दक्षतेनें पाळण्यांत तात्यासाहेब किती जागृत असत, हें दिसून येईल.

(५) सन १९३६ सालीं मी जपानच्या दीर्घ प्रवासांतून परत आल्यावर, दे. भ. तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं, तिकडील बहुविध माहितीबद्दलचें एक व्याख्यान, टिळक स्मारक मंदिरांत दिलें. ती माहिती वगैरे आपणास फार पसंत पडल्याचें, त्यांच्या अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं उद्गार काढून, ते पुढें म्हणाले कीं, "अव्वल दर्जाच्या पुढाऱ्यांचींच चरित्रें नेहमीं लिहिलीं जातात; परंतु दुय्यम, तिय्यम दर्जाच्या कार्यकर्त्यांचीहि माहिती, प्रसिद्ध करण्यानें नवीन पिढीस त्याचा उपयोग फार होतो; कारण त्यांस घेण्याजोगें त्यांत

बरेंच असतें; म्हणून तशा प्रकारचा प्रयत्न अवश्य झाला पाहिजे." बुद्धीनें किंवा कर्तृत्वानें लहान असलेल्या माणसांचाहि गौरव करून, त्यास उत्तेजन देण्याचा गुण तात्यासाहेबांत उत्कटत्वानें दिसून येत असे.

(६) जपानांतील कागदांचे कारखाने व कागद फॅक्टऱ्यांची मशिनरी तयार करण्याचे कारखाने पाहून, त्या कारखानदारांकडून एक तपशिलवार योजना मी येतांना आणलेली होती; व तसला एखादा कारखाना महाराष्ट्रांत जुळल्यास काढावा असा हेतु असल्यानें, वडीलकीच्या नात्यानें व महाराष्ट्रांतील अनुभविक पुढारी या नात्यानें, त्या बाबतींत तात्यासाहेबांचा सल्ला घ्यावा म्हणून त्यांजकडे जाऊन त्यांस ती योजना दाखविली व त्या कार्यास दहा लाख रुपये लागणार असल्यानें शेअरच्या रूपानें भांडवल जमवणें शक्य होईल काय असें त्यांस विचारलें. त्याच वेळीं मी दुसऱ्या एका लहानशा धंद्याची मशिनरीहि आणली होती. त्यानंतर तात्यासाहेबांनीं दोन्ही योजनांचा साधकबाधक विचार करून, मला असा सल्ला दिला कीं, पहिल्या परावलंबी पेपर मिलच्या शेअर्स गोळा करण्याच्या फंदांत न पडतां, स्वावलंबनाचा दुसरा लहान धंदाच चिकाटीनें करावा. त्यांच्या सल्ल्याप्रमाणेंच वागण्याचें मीं ठरविलें व परिणामीं, त्यांचें मार्गदर्शनच आमच्या हिताचें ठरलें. यावरून समोरच्या माणसाची कुवत, देश–काल–परिस्थिति या सर्व गोष्टी ध्यानांत घेऊनच तात्यासाहेब कोणासहि दूरदर्शिपणाचा हितप्रद सल्ला देत असत असें दिसून येईल.

(७) गेल्या वर्षी मुंबईस ब्राह्मणसभेंत, डॉ. धायगुडे, डीन, गोवर्धन मेडिकल कॉलेज मुंबई व इतर तीन गृहस्थ, यांच्या सत्कार-समारंभास मी हजर होतों; त्या वेळीं कै. तात्यासाहेब केळकर अध्यक्ष होते. डॉ. धायगुडे यांनीं सत्कारानंतरच्या आपल्या भाषणांत आपल्या विद्यार्थिदशेंतील हकीकत सांगतांना, असहकारितेच्या चळवळीच्या वेळीं आपणहि कॉलेज सोडण्याचें पक्कें ठरविलें होतें. इतक्यांत एके दिवशीं तात्यासाहेब केळकरांच्या, याच विषयावर झालेल्या व्याख्यानांत स्वतः नीट विचार केल्याशिवाय विद्यार्थ्यांनीं कॉलेज सोडून आपलें नुकसान करून घेऊं नये, अशाबद्दलचें सयुक्तिक व्याख्यान ऐकून आपण कॉलेज सोडण्याचा बेत रहित केला व त्यापुढें आपला हिंदुस्थानांतील व विलायतेंतील अभ्यासक्रम पूर्ण झाला व त्यामुळेंच आज एका स्वतंत्र मोठ्या कॉलेजचा डीन होण्याची संधि आपणास मिळाली आहे; व यांचें सर्वस्वी श्रेय श्रीयुत तात्यासाहेब यांसच आहे, असे कृतज्ञतेचे उद्गार, डॉक्टरानीं काढले. त्या वेळीं तात्यासाहेबांसहि गहिंवर आला; व आपल्या अध्यक्षीय भाषणांत ते म्हणाले कीं, "असहकारितेच्या वेळच्या, माझ्या मतांबद्दल कित्येकांनीं जरी माझा उपहास केला, तथापि एका विद्यार्थ्यास तरी, माझ्या मार्गदर्शनाचा उपयोग झाल्याचें आतांच

ऐकून मनाला समाधान वाटलें; असहकार चळवळींतील कै. तात्यासाहेबांचें धोरण व विचार कसे दूरदर्शित्वाचे होते, हें आतां अनेक लोकांस पटूं लागलें आहे.

❋

गो. रा. चोळकर

(बी. ए., बी. टी., हेडमास्तर, इचलकरंजी)

(१) प्रा. द. के. केळकर हे तात्यासाहेबांचे चुलत बंधु. त्यांचे वडील त्यांच्या लहानपणींच दिवंगत झाले. तात्यासाहेबांनींच त्यांचें हायस्कूलचें व कॉलेजचें शिक्षण केलें. प्रा. केळकर व मी बी. ए.च्या वर्गांत सहाध्यायी होतों. तेव्हां परिचय होऊन मैत्रींत वाढ झाली. त्यांच्या पत्नी कै. वामनराव जोशी यांच्या कन्या होत. वामनराव व मी महिला विद्यापीठांत अध्यापक होतों. हा विवाह जमविण्यांत मी मध्यस्थ होतों. तात्यासाहेबांचा थोरपणा त्या वेळीं मला पदोपदीं प्रतीत होई. वधूपसंतीनंतर विवाह लवकर व्हावा म्हणून वामनराव उत्सुक होते. तात्यासाहेब मुंबईस व्याख्यानाकरितां गेले होते. त्यांचा मुक्काम सरदारगृहांत होता. आम्हीं दोघांनीं त्यांना तेथें गांठलें. पंधरा मिनिटांत सर्व ठरवून तात्यासाहेबांनीं आमचा मार्ग मोकळा केला ! "तात्यासाहेब, देण्याघेण्याचें काय ?" असें मीं विचारलें मात्र; त्यांनीं लगेच उत्तर दिलें, "आम्हांला कांहीं ध्यावयाचें नाहीं. आम्हीं तुम्हांस कांहीं द्यावयाचें आहे कां ? तेवढें मात्र सांगा." हें ऐकून आम्ही हसूं लागलों !

विवाह झाल्यावर वरपक्षाकडील मंडळींना भोजन द्यावयाचें. त्याकरितां तात्यासाहेबांना निमंत्रण द्यावयास गेलों. निमंत्रण स्वीकारून तात्यासाहेबांनीं विचारलें, "केव्हां होअील ?" आम्हीं उत्तर दिलें, "साडे अकराच्या सुमारास. पण नक्की वेळ मात्र सांगतां येणार नाहीं. थोडे पुढेंहि जाईल." त्यांनीं उत्तर दिलें, "कांहीं हरकत नाहीं. पुन्हां बोलावयास मात्र येऊं नका. आम्ही सर्वजण साडे आकराला येतों. थोडा कमजास्त वेळ लागला तरी हरकत नाहीं. घाई करण्याचें कारण नाहीं, मंगळवार असल्यामुळें (केसरीस सुट्टी) कामाचा लकडा नाहीं." असेंच सर्व बाबतींत. असे विवाह होतील तर मला वाटतें 'विवाह करून पाहावा' ही म्हण निरर्थक ठरेल.

(२) तात्यासाहेबांना कोंकणची मोकळेपणाची राहणी व हवा फार आवडे. एकदां त्यांची व माझी पांचगणी येथें प्रा. केळकर यांच्या घरीं गांठ पडली. मीं सहज विचारलें, "आपणांस कोठलें हवापाणी जास्त आवडतें ? आपण पुष्कळ ठिकाणें पाहिलीं आहेत." तात्यासाहेबांनीं ताबडतोब उत्तर दिलें, "मला तुमचें कोंकणचें हवापाणी, सृष्टिसौंदर्य, मोकळी राहणी सर्वांत पसंत पडते. कोंकणांत लोक उघडे

हिंडतात तें तर मला फार आवडतें." गायआळींतील त्यांचें जें घर होतें, त्या ठिकाणीं अंगणांत त्यांनी नारळी-पोफळींचीं झाडें लावून छोटेसें कोंकणचें दृश्य निर्माण केलें होतें. त्याचा उल्लेख त्यांनीं आपल्या 'गुजगोष्टी'त केलेला आहेच.

❋

सिताराम विश्वनाथ टिळक

(बी. एजी., माजी अध्यक्ष, कुलाबा जिल्हा लोकल बोर्ड, नागोठणें)

(१) सन १९२६ सालच्या रायगडावरील मोठ्या उत्सवाच्या वेळीं श्री. तात्यासाहेब व मुरुडकरबुवा वगैरे मंडळी कर्जत मार्गानें महाडास जाण्याकरितां आली व रात्रीच्या प्रवासांत सुकेळी खिंडीच्या पायथ्याशींच गाडीचें चाक मोडल्यामुळें आमचा मुक्काम झाला. मुरुडकरबुवा व तात्यासाहेब असल्यामुळें किती प्रकारच्या विषयांवर चर्चा झाली असेल, त्यामध्यें विनोद व विद्वत्ता ही किती उच्च दर्जाची असतील, याचें वर्णन कोठवर करावें ! रात्र संपली; परन्तु विषय व त्यांतील नावीन्य कमी झाले नाहीं. चर्चेच्या ओघांत नागोठणें मुक्कामीं त्याच रात्रीं शिवरात्रीनिमित्त होत असलेल्या नाटकाची मला आठवण झाली व आमचा खालील-प्रमाणें संवाद झाला.

मी :– तात्यासाहेब, आज रात्रीं आमच्या गांवीं उत्सवाचें नाटक आहे.

ते :– अहो, हें तुम्ही आगोदरच कां नाहीं बोललांत, आपण त्या नाटकाला जरूर गेलों असतों.

मी :– तात्यासाहेब, आपण नागोठण्याहून ५ मैलांच्या अंतरावर आहोंत. इतके लांब आपण कसें गेलों असतां व गेला असतां तर आपणांस त्रासहि झाला असता.

ते :– अहो त्यांत त्रास कसला ! अशी संधि नेहमीं येत नाहीं. माझ्या मतें ग्रामीण जीवनांत उत्सव व नाट्य संस्था यांस एक निश्चित स्थान आहे. गांवचा उत्सव हें गांवीं राहणाऱ्या व शहरांतून नोकरीनिमित्त जाणाऱ्या लोकांचें संमेलन होय. पुढें ते असेंहि म्हणाले कीं, उत्तम नट हा तिकिट लावून नाटक करणाऱ्या मंडळींतच असतो असें कां तुम्हांला वाटतें ! खेडेंगांवच्या नाट-कांतूनहि उत्तम अभिनय उत्तम नट असूं शकतात, व हीं नाटकें पाहण्यांत मला तर एक प्रकारचा विशेष आनंदच होतो. नंतर त्यांनीं दशावतारी नाटकापासून तो आधुनिक संगीत नाटकापर्यंतच्या अनेक स्थित्यंतरांचें मोठें रसभरित वर्णन केलें.

(२) रायगड किल्लयावरील मुक्कामांत माझ्यानरोबर जिल्हाबोर्डाचा सर्व परिवार व बरीच मित्रमंडळी असल्यामुळें आमचा मुक्काम स्वतंत्र होता व तात्या-साहेबांचा मुक्काम उत्सवमंडळाकडे होता. लोकमान्यांच्या पश्चात् हा पहिलाच

मोठा उत्सव असल्यामुळें त्यांना त्याबद्दलची मोठी जबाबदारी वाटे. व बारीक-सारीक गोष्टीबद्दलहि ते अत्यंत दक्षता घेत व त्याप्रमाणें त्यांनीं मला बोलूनहि दाखविलें होतें. गडावरील मुक्कामांत रोज सकाळीं अभावितपणें आमच्या मुक्कामावर ते चहा पिण्यास येत व प्रसादाच्या दिवशीं सायंकाळीं तीन वाजेपर्यंतहि ते जेवले नव्हते असें मला दिसून आल्यामुळें, आमच्या मुक्कामावर येऊन दोन घांस जेऊन जाण्याची विनंती मीं त्यांस केली. ती त्यांनीं निश्चयपूर्वक नाकारली व म्हणाले, "अहो, तुमच्या मुक्कामावर यायला मला तुमचें बोलावणें नको. परंतु आजचा दिवसच असा आहे कीं, आज येथील मंडळींबरोबरच राहून त्यांच्याच बरोबर जेवणें हें माझें कर्तव्यच आहे आणि त्याचप्रमाणें मी तेथेंच जेवणार, तुमच्याकडे येणार नाहीं." त्यांच्या चर्येवरील जबाबदारीची व कर्तव्याची जाणीव पाहून मीं त्यांस आग्रह केला नाहीं.

(३) बोर्डाच्या धर्मशाळेच्या पायाचा दगड बसविणारे अध्यक्ष राजे भोसले आम्हांस तात्यासाहेबांमुळेंच लाभले. राजे भोसले गडावर आले त्या वेळीं श्री. तात्यासाहेब त्यांना सामोरे गेले व नमस्कारपूर्वक स्वागत करून म्हणाले, "यावे राजेसाहेब! आपण स्वगृहींच आलां आहांत!" या दोन वाक्यांतील स्वागतांतील मार्मिकपणा उलगडून सांगण्याची जरूरीच नाहीं. धर्मशाळेच्या समारंभास प्रथमपासून शेवटपर्यंत त्यांचें स्वतःचेंच कार्य समजून त्यांनीं पुढाकार घेतला; इतकेंच नव्हे तर शेवटचें आभाराचें भाषणहि त्यांनीं स्वतःच केलें. अशा प्रकाराचे अनेक प्रोत्साहनाचे प्रसंग आले, त्याबद्दल कुलाबा जिल्हा लोकलबोर्ड व मी स्वतः त्यांचे कसें उतराई होणार!

(४) १९२६ सालच्या कुलाबा जिल्हा लोकलबोर्डाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या वेळीं काँग्रेस पक्षांत फितुरी होऊन मी पराभूत झालों. मागाहून मला असें समजून आलें कीं, रायगडावरील कार्य मीं आरंभिलें असून तें माझ्याच हातून पुरें व्हावें अशी तात्यासाहेबांची इच्छा होती व त्याप्रमाणें त्यांनीं परभारें बोर्डाच्या सभासदांना पत्रेंहि लिहिलीं होतीं. परंतु त्याचा उपयोग न होतां मी निवडणुकींत पडलों. या पराभवानंतर मीं त्यांना सविस्तर हकीकतीचें पत्र लिहिलें व सार्वजनिक कार्यांतून परावृत्त होण्याची माझी मनीषा त्यांना कळविली. लौकरच ते मुंबईस आले असतांना त्यांनीं मला सरदारगृहांत बोलावून घेतलें व अनेक तऱ्हेचे दृष्टान्त व दाखले देऊन मी निवृत्त न होतां, असेंच सार्वजनिक कार्य करीत राहावें असें आग्रहानें सांगितलें. यानंतर मी कोणत्याहि निवडणुकीस उभा राहिलों नाहीं हें खरें; पण जिल्ह्यांतील विविध प्रकारच्या सार्वजनिक कामांशीं मी संबंध मात्र ठेवीत आलों आहे. हा त्यांच्याच उपदेशाचा परिणाम असें म्हणणें योग्य होय.

❋

गंगाधर विष्णु पुराणिक

(वैद्य व गव्हर्निंग डिरेक्टर, श्रीधूतपापेश्वर, पनवेल)

सुमारें पंधरा वर्षांपूर्वीची गोष्ट. तात्यासाहेब पनवेल येथें आले होते. ते आमच्याकडेच उतरले होते. रात्रीं टेनिस क्लबच्या इमारतींत एक बैठक चर्चेसाठीं घेण्यांत आली होती. सार्वजनिक कार्यांत लक्ष घालणारी पंचवीस-तीस मंडळी जमली होती. वै. काळेशास्त्री यांनीं " मिशनरी लोक आपल्या धर्माचा मोठ्या जोरानें प्रचार करतात, वाटेल त्या ठिकाणीं त्यासाठीं जातात, म्हणून ख्रिश्चन धर्माचा मोठा प्रसार झाला, तसें हिंदुमहासभा कां करीत नाहीं ? " असा मुद्दा उपस्थित केला. त्यावर तात्यासाहेब यांनीं उत्तर दिलें, " हिंदुमहासभा कांहीं करीत नाहीं म्हणजे कोण करीत नाहीं ? मी करीत नाहीं आणि तुम्ही करीत नाहीं असेंच ना ? आतां मी तुम्हांस असें सांगतों कीं, तुम्ही मिशनरी लोकांसारखें हिंदुधर्माबद्दल लोकांस आदर वाटेल व कार्यकर्त्यांबद्दल प्रेम व आपलेपणा वाटेल असें कांहीं कार्य येथें सुरू करा. त्याकरितां लागणाऱ्या मदतीचा ठराविक भरपूर हिस्सा हिंदुमहासभेकडून मीं देववितों. हें आश्वासन देतांना इतर जिल्ह्यांत असें कार्य सुरू होईल तेथेंहि अशीच मदत देण्याची जबाबदारी घेतल्यासारखें होणार आहे. तरी पण हरकत नाहीं. मी ती स्वीकारतों. तुमच्यापुरती येथील कार्याची जबाबदारी हिंदु म्हणून आणि त्या कार्याचें महत्त्व तुम्ही चांगल्या तऱ्हेनें ओळखीत आहां व हें कार्य येथील लोकांनींच अंगावर घेणें इष्ट म्हणून तुम्हीं स्वीकारावें. " पुढें ते म्हणाले, " कोणत्याहि संस्थेच्या कार्याची जबाबदारी संस्थेच्या अधिकारी मंडळावर असते. आपलें काम फक्त सल्ला देण्याचें व टीका करण्याचें अशी कल्पना अनेकांची असते हें मी जाणतों; तथापि संस्थेचें ध्येय मान्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें आपल्या शक्तीप्रमाणें व बुद्धीप्रमाणें कार्य करावयास लागणें हें प्रत्येकाचें सामाजिक कर्तव्य आहे, ही जाणीव सर्वांनीं ठेविली पाहिजे."

❋

गणपत महादेव नलावडे

(माजी नगराध्यक्ष, पुणें)

(१) १९२८ या वर्षी मुसलमानांनीं मुंबईत दंगल उडवून दिली. पायीं चालण्याच्या ओट्यावर झोपणाऱ्या गोरगरिबांच्या पोटांत भरदिवसा नि भरपथावर सुऱ्या खुपसल्या गेल्या नि त्यांचे मुडदे पाडले. या सर्व प्रकारांवरून " मुंबईचें महाराष्ट्राचें मंगल करील " या शीर्षकाखालीं 'संग्राम' पत्रांत लिहिलेल्या अग्रलेखामुळें हिंदु-मुसलमानांत वैमनस्य माजविण्याचा प्रयत्न केल्याच्या अपराधाखालीं माझ्यावर

खटला भरला गेला. अशा प्रसंगीं दे. भ. तात्याराव केळकर हेच आमचे आधार. मी त्यांच्याकडे गेलों; त्यांना हकीकत सांगितली; त्याबरोबर ते म्हणाले कीं, " या सरकारी खटल्यांत जावई फिर्यादी नि सासरा न्यायाधीश अशी अवस्था असते आणि तुमच्यावरील हा १५३ अ कलमाखालचा खटला तर पूर्वमान्यतेनें भरावा लागतो. तेव्हां हा खटला होणें म्हणजे शिक्षा ठेवलेलीच आहे असें मानूनच चालावें, म्हणजे आपण जे निर्दोषी ठरण्याचे आटोकाट प्रयत्न करतों ते व्यर्थ गेल्याचा विषाद वाटणार नाहीं. या खटल्यांत तुम्हांला कमींत कमी १॥ ते २ वर्षें तरी तुरुंगांत जावें लागेल नि तशी आपली मनाची सिद्धता असूं द्या. तुम्हांला दंडच झाला तर तो कितीहि असो, वैयक्तिक तुम्हांला सोसावा लागणार नाहीं. त्याची भरपाई कोणीहि करील; तथापि शिक्षा होईल ती मात्र तुम्हांलाच भोगावी लागेल. तुमच्यासाठीं दुसरा कोणी शिक्षा भोगतो म्हणाला तरी तसें होऊं शकत नाहीं ! "

यानंतर खटल्याचें काम प्रत्यक्ष सुरू झालें. त्याकडे त्यांचें बारकाईनें लक्ष होतें. खटल्याच्या निर्णयाच्या दिवशीं पुनः मी सकाळीं त्यांच्याकडे गेलों. त्यांचें दर्शन घेतलें व आज निकाल आहे असें सांगितलें. लगेच तात्या म्हणाले, " आहेना तयारी ? मी निकाल ऐकावयाला नि तुरुंगांत जातांना निरोप द्यावयाला येणार आहें कोर्टांत ! " त्या दिवशीं कोर्टांत मुसलमानांची त्याचप्रमाणे हिंदूंचीहि बरीच गर्दी झाली होती. वकील मंडळी बसतात त्यांच्या मागच्याच ओळींतील खुर्चीवर तात्या येऊन बसले होते. मी जाण्यापूर्वीच ते कोर्टांत आले होते. त्यांच्याच खुर्चीजवळ उभा राहून मी कांहीं तरी त्यांच्याशीं बोललों. भोपटकरहि त्यांच्यापुढेंच बसले होते. मॅजिस्ट्रेटसाहेब चेंबरमध्यें आले. त्यांच्या शिपायानें कायद्याचीं पुस्तकें, खटल्याचे कागद व घरूनच लिहून आणलेली निकालाची प्रत अशा कागदपत्रांचें गोठोडें आणलें व तें टेबलावर ठेवलें. पण त्यांची अचानक गांठ सुटून ते सर्व धडधड खालीं पडले. त्याबरोबर तात्या भान न राहिलेल्यासारखे मोठ्यानें ओरडून म्हणाले कीं, " अहो नलावडे, दसऱ्याची गांठ सुटली हा तुम्हांला शुभशकून आहे. तेव्हां तुम्ही तुरुंगांत जात नाहीं. तुम्ही आतां खात्रीनें सुटणार ! " हे तात्यांचे शब्द ऐकून कोर्टांत ध्वनि उमटला नि त्यानंतर पांच मिनिटांनीं कोर्टानें मला ऐन शिक्षा वा दंड न करतां एक वर्षाकरितां जामीन घेऊन सोडून दिलें !

(२) हिंदुसभेच्या महाराष्ट्रांतील कार्याविषयीं विचार-विनिमय करण्याच्या दृष्टीनें कांहीं निवडक मंडळींची सभा घेतली होती. या प्रयत्नाचे प्रमुख महाडचे श्री. बापूराव जोशी हे होते. अनेक तरुण नि उत्साही कार्यकर्त्यांनीं आपल्या अडचणी मांडल्या. एकंदर सूर असा कीं, आम्ही मोठ्या तळमळीनें कार्य करतों; तथापि आम्हांस पुढाऱ्यांचा पाठिंबा नाहीं ! यांत पुढारी कोण आणि माघारी कोण हेंहि ठरविण्याचा मोठा प्रश्न होता. ही सभा ओळीनें तीन दिवस चालली होती. अनेकांनीं

चर्चेंत भाग घेतला होता. तीनहि दिवस तात्याराव वेळेवर उपस्थित राहून प्रारंभापासून शेवटपर्यंत बसत असत. सर्वांचे विचार त्यांनीं ऐकून घेतले. नंतर त्यांनीं भाषण केलें; तें इतक्या थोर विचारांचें होतें कीं, या वेळीं तात्याराव हे संतमालिकेपैकींच एक आहेत असें वाटलें. सर्व आक्षेपांना उत्तरासाठीं उत्तर न देतां समर्पक रीतीनें कांहीं आक्षेपांचें खंडन, कांहींचें विवेचन त्यांनीं केलें आणि शेवटीं असें सांगितलें कीं, "हिंदुमहासभेची प्रतिष्ठा महाराष्ट्रांत वाढविण्याचें कार्य कोणी करीत असेल तर त्यानें हा पैजेचा विडा उचलावा. मी त्याला पैसा पुरवितों. पत्र देतों. केसरीसारख्या पत्राला पाठपुरावा करावयाला लावतों, प्रतिष्ठा देतों, म. प्रां. हिंदुसभेचा अध्यक्ष करतों, आशीर्वाद देतों नि कार्य केल्यानंतर पायाला हात लावून पायाहि पडतों. हा पैजेचा विडा उचलणारांस कांहीं कमी पडूं देत नाहीं." महाराष्ट्र-केसरीची ही तळमळीची गर्जना ऐकून कोणीच पैजेचा विडा मी उचलतों असें म्हणेना. तेव्हां ते पुनः म्हणाले, "ही गोष्ट सोपी नाहीं हें मी जाणतों. चार दिवस विचार करा. मला आठ दिवसांनीं सांगा. आतांच मला निर्णय द्या असे मी म्हणत नाहीं. कोणी तरी हा पैजेचा विडा उचलून महाराष्ट्राचें राजकारण चालवील, तर मला खरा आनंद वाटेल. टिळकांच्या पश्चात् मला टिळक होतां आलें नाहीं, हें अगदीं खरें आहे. ती सोपी गोष्ट नाहीं. त्यांची योग्यता माझ्या ठिकाणीं नाहीं, हें मीं अनेक ठिकाणीं अनेक वेळां भरसभेंत प्रकट केलें आहें. कोणी तरी आपल्यापैकीं धडाडीनें पुढें होत असेल, तर मी माझ्या सर्वस्वासह त्याच्यामागें उभा राहण्यास सिद्ध आहें."

❋

गजानन रामचंद्र करमळकरशास्त्री

(काव्यतीर्थ, प्रिन्सिपॉल, संस्कृत महाविद्यालय, इंदूर)

(१) सन १९३१ मध्यें उज्जयिनी नगरीत 'मध्यभारत कविसंमेलन' साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलें होतें. इंदूरच्या प्रतिनिधींबरोबर मीहि प्रतिनिधि म्हणून तेथें गेलों होतों. मी 'लोकमान्यालंकार' नांवाचें पुस्तक संस्कृतमध्यें लिहून सन १९४१ मध्यें छापून प्रसिद्ध केलें तें त्या वेळीं अपूर्ण स्थितींत होतें. त्यांतील कांहीं श्लोक तात्यासाहेब केळकर यांस वाचून दाखवून त्यांचा त्यावर सल्ला घ्यावा या हेतूनें ते माधव कॉलेजच्या संमेलनाच्या हॉलमधून निवासस्थानीं दुपारीं ११ वाजतां येत असतां रस्त्यांतच त्यांस गांठून चार शब्दांत माझा हेतु त्यांस कळविला. त्यांनींहि लगेच मला मोठ्या उदार अंतःकरणानें असें सांगितलें कीं, "मला वेळ फार कमी आहे, तथापि भोजनोत्तर मी विश्रांति घेत असतां तुमचें काव्य अवश्य ऐकेन,

तुम्ही त्या वेळीं निवासस्थानीं या." असा त्यांचा रुकार मला मिळाल्यावर मला जो आनंद व उत्साह वाटला त्याचें वर्णन अवर्णनीय आहे. ठरलेल्या वेळीं मी हॉलच्या दरवाज्यापाशीं आपल्या काव्याचें लेखी पुस्तक बगलेंत घेऊन गेलों असतां, दारावरील इसमानें मला आंत जाण्यास रोखलें. मी म्हटलें, 'मला तात्यासाहेबांनीं हींच वेळ भेटण्यास दिली आहे.' तो म्हणाला, "ही त्यांची भोजनोत्तर विश्रांतीची वेळ आहे. या वेळीं कोणासहि आंत सोडूं नकोस अशी त्यांची मला आज्ञा आहे. तुम्ही मग थोड्या वेळानें भेटा." असा, त्याचा व माझा दाराजवळच जरा उच्च स्वरांत चाललेला संवाद आंत त्यांच्या कानावर गेला व ते लगेच आपल्या त्या मनुष्यास म्हणाले, "अरे कोण आहे? शास्त्रीबुवा आहेत काय? येऊं दे त्यांस आंत, मी त्यांस हीच वेळ दिली आहे" ह्या त्यांच्या दोन वाक्यांतच मला त्यांच्याविषयीं असलेल्या आदरांत भर पडली. पुस्तक पाहिल्यावर ते म्हणाले, "तुमची कल्पना फार चांगली आहे. श्लोकांत प्रसादगुण आहे, तरी पुस्तक पूर्ण करून माझ्याकडे पाठवा, मग मी जें काय त्यांवर मत द्यावयाचें तें देईन." इतकें बोलून ते स्वस्थ पडले. मीहि माझा कार्यभाग झाला असें समजून समाधान वृत्तीनें बाहेर पडलों.



त्र्यंबक भिकाजी हर्डीकर

(एम्. ए., माजी प्राध्यापक, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें)

(१) 'न्यू पूना कॉलेज'च्या इंटरच्या गणिताच्या विद्यार्थ्यांच्या पहिल्या खास सम्मेलनास तात्यासाहेब अध्यक्ष होते. गणितासारखा रुक्ष विषय, तात्यासाहेब त्यांतील अनभिज्ञ व गणित विषयाच्या विद्यार्थ्यांच्या समोर बोलण्याचा प्रसंग! परंतु, तात्यासाहेबांचें त्या प्रसंगाचें भाषण माहितीनें भरलेलें, तर्कशुद्ध, मर्मग्राही, दृष्टांत, उपमा, विनोद इत्यादींनीं सजलेलें इतकें सुंदर व आल्हाद-दायक झालें कीं, आज तीस वर्षानंतरहि ही आठवण तितकीच ताजी व आनंदाची अनुभूति निर्माण करणारी आहे, असें परवां स्मशान-यात्रेंत असलेल्या त्या वेळच्या एका विद्यार्थ्यानें मला मोठ्या भक्तिभावानें सांगितलें.

(२) लोकमान्य टिळकांनीं श्रीमंत जगन्नाथ महाराजांच्याकडून मंडळीला कॉलेजासाठीं हल्लींची जागा देवविली. ह्या कामाचें सर्व श्रेय एकट्या तात्यासाहेबांचें आहे. लोकमान्य विलायतेला जाण्यास निघाले होते; अनेक माणसें आपआपलीं निकडीचीं महत्त्वाचीं कामें घेऊन त्यांच्या भेटीस आलीं होतीं; लोकमान्यांना क्षणाचाहि उसंत मिळत नव्हता; तात्यासाहेबांच्या सांगीप्रमाणें कॉलेजाची मंडळी मुंबईतील सरदारगृहांमधील लोकमान्यांच्या खोलीच्या दाराबाहेर

अहोरात्र अक्षरशः धरणें धरून बसलेली होती. तो प्रसंग आजहि माझ्या डोळ्यांपुढें अगदीं तसाच उभा आहे. तात्यासाहेबांची समयज्ञता, चिकाटी, अंतःकरणांतील प्रेम, व्यवहाराचा उरक ह्या गुणसमुच्चयामुळेंच मंडळींच्या पदरांत ही जागा पडूं शकली. तात्यासाहेबांचे संस्थेवर हे केवढे मोठे उपकार झाले ह्याची जाणीव – जागेला हल्लीं मूल्य व महत्त्व शतपटीनें आलें – ह्यामुळें आजच्या परिस्थितींत अधिक उत्कटत्वानें व्हावी हें अगदीं साहजिक आहे.

(३) प्रि. शहा यांनीं आकस्मिकपणें मंडळींच्या तहाहयात सभासदत्वाचा राजिनामा दिला, त्या प्रसंगाचा उल्लेख कटू असला तरी अपरिहार्य आहे. ही आठवण न केली तर तात्यासाहेबांशीं कृतघ्नपणा केल्यासारखें होईल; शिवाय दीर्घकालावधि मध्यंतरीं गेल्यामुळें उभयपक्षीं सलणारें शल्य आतां बोचेनासें झालें आहे व प्रसंग इतिहासजमा झाला आहे. त्या वेळीं मंडळी व कॉलेज बाल्यावस्थेंत होतीं. एकाएकीं अशनिपात व्हावा असा आणीबाणीचा गंभीर प्रसंग ! त्या वेळीं तात्यासाहेब मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य होते. तेथील त्यांची भूमिका निःपक्षपाती न्यायाधिशाची होती. सर्व सवलती व अवधि त्यांनीं प्रि. शहा यांना स्वसमर्थनार्थ दिला. 'केसरी'त स्वतः लेख लिहून त्यांनीं मंडळीची बाजू अभिनिवेशानें मांडली. एखाद्या कसलेल्या वकिलाला साजेल, प्रतिपक्षाला सर्वथैव निरुत्तर करील व तिऱ्हाइताच्या न्यायबुद्धीला सहज पटेल इतकें तर्ककर्कश, मर्मभेदक, समर्पक व सुंदर असें हें समर्थन आहे. वादळ शांत करण्याचे सामर्थ्य त्यांत होतें. तात्यासाहेबांनीं कौन्सिलच्या अनेक सभांतून चांगला नेट धरला, म्हणूनच प्रि. शहांच्या दीर्घ मुदतीच्या विलायत-शिक्षणासाठीं मंडळीनें खर्च केलेली फार मोठी रक्कम पुढें तडजोडींत मंडळीला परत मिळूं शकली.

(४) जमखंडीचे राजेसाहेब कै. श्रीमंत अप्पासाहेब पटवर्धन व त्यांचे त्या वेळचे सल्लागार संस्थानचे मुख्य न्यायाधीश श्रीयुत महाबळ ह्या उभयतांना तात्यासाहेबांच्याबद्दल नितान्त आदर असे; व त्यामुळेंच तात्यासाहेबांची मध्यस्थी यशस्वी झाली. श्रीमंत राजेसाहेबांनीं मंडळीच्या योजनेस मान्यता दिली; मंडळीस दोन लक्ष रुपयांची देणगी दिली व 'न्यू पूना कॉलेज'चें रूपांतर 'सर परशुराम भाऊ कॉलेज' मध्यें झालें. ह्या कामीं तात्यासाहेबांनीं दाखविलेली व्यवहारबुद्धि व समयज्ञता, व घेतलेले परिश्रम ह्या सर्व गोष्टी अविस्मरणीय आहेत.

(५) डेक्कन जिमखाना ह्या संस्थेंत माझ्या अल्प सामर्थ्यानुसार कांहीं दिवस मीं थोडें फार काम केलें. तात्यासाहेब पूर्ववयांत ह्या संस्थेचे सेक्रेटरी होते व अलीकडे अध्यक्ष होते. आम्हां सर्व कार्यकर्त्यांना अनेक प्रसंगीं त्यांचें विविध प्रकारचें साहाय्य मिळालें आहे. मरणापूर्वी दहाच दिवस अगोदर

जिमखान्याचा स्थापना-दिन-समारंभ होता; त्या वेळीं तात्यासाहेब अध्यक्ष होते. जिमखान्याच्या हांतून पूर्वीइतक्या उत्साहानें कार्य होत नाहीं, परिस्थिति निराशाजनक आहे, अशी बाजू प्रास्ताविक मुख्य भाषणांत मीं मांडली. त्या वेळी तात्यासाहेबांनीं संस्थेचा जुना इतिहास सांगून हल्लींचे सभासदत्वाचे आंकडे तपशीलवार वाचून दाखवून ह्याहि बाबतींत एखाद्या नवीन तरुण कार्यकर्त्यालाहि लाजवील असा उत्साह व आशावाद प्रकट केला! वर्तमान काळ व भविष्य काळ, बुद्धि व भावना, व्यवहारांतील उरक व ध्येयवाद यांची गोड सांगड घालून साधतां येईल तितकें समाजहित साधावयाचें अशी त्यांची वागणूक होती. त्यामुळें त्यांची वृत्ति नेहमीं समाधानाची व चित्त प्रशांत असे.

❋

भा. वि. घारपुरे

(क्युरेटर, रे-म्युझियम, पुणें)

(१) "मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदूं ऐसे॥" असा अनुभव तात्यासाहेबांच्या सान्निध्यांत केव्हां केव्हां येई. ज्या वेळीं मदत करावयाची तेव्हां दुसऱ्या कोणाच्यानें होणार नाहीं अशी ते करीत व नाहीं तेथें अगदीं तुटकपणें तोडून टाकीत व तसें क्षणमात्रांत करीत. १९२२-२३ सालीं मला टाइप रायटर नव्हता. मी केसरी कचेरीकडून माझें काम टाइप करून मागत असे. एकदां असें काम व मदत मिळण्याची तात्यासाहेबांच्या समक्ष विनंती केली. त्यांनीं 'केसरी'चा व तुमच्या टाइपरायटिंगचा संबध काय! असें म्हणून तो प्रश्न सोडवून टाकला!

(२) सन १९४७ सालीं माझ्या परदेशपर्यटनाच्या कामीं केसरीकडून मदत मिळण्याबद्दल बोलणें झालें. मीं रु. २००० ची अपेक्षा केली. ते म्हणाले, केसरीला मदत करावयास काय हरकत आहे! केसरी-मराठा मदत करील व पुढें हेंच खरें झालें; केसरी-मराठा संस्थेनें २००० रुपये मदत केली!

(३) सन १९२८ सालीं विश्रामबाग राजवाडा म्युझियमसाठीं मिळावा म्हणून मीं चळवळ केली. मला तात्यासाहेबांची भरपूर मदत होती. त्या वेळीं आम्हीं त्या वेळचे मुंबई सरकारचे अर्थमंत्री नामदार सर गोविंदराव प्रधान यांच्याकडे डेप्युटेशन नेलें. त्याचा पुरस्कार तात्यासाहेबांनीं केला. डेप्युटेशनमध्यें डॉ. नायडू, सरदार जगन्नाथ महाराज हेहि होते. पुणें प्रदर्शन कमिटीचा मी दुय्यम चिटणीस म्हणून होतों. गोविंदराव प्रधानांनीं तात्यासाहेबांदि सर्वांना चहापार्टी दिली. तात्यासाहेब सर गोविंदरावांना म्हणाले, "आम्हांला चहा नको; वाडा द्या!" सर्व मुद्दे मांडून झाल्यावर तात्यासाहेबांनीं सर गोविंदरावांना बजावलें कीं, "विश्राम-

बाग राजवाड्याचा दर्शनी चौक सार्वजनिक फंड उभारून बांधलेला आहे व त्याचा आम्ही म्हणतों असा सदुपयोग सरकारनें करूं दिला नाहीं, तर आम्ही सरकारवर दावा लावूं व हायकोर्टाचा मार्ग स्वीकारूं!" आम्हांला हें मोठें धाडस आहे असें वाटलें. पण स्पष्टपणें असा इशारा द्यावयास तात्यासाहेब मुळींच कचरले नाहींत!

(४) कोणच्याहि उपयुक्त सार्वजनिक कार्याला त्यांची सक्रिय सहानुभूति असे. 'पेटंट' या विषयावर माझ्याकडून पुस्तकें व फायली घेऊन त्यांनीं एक लेख लिहिला व 'पेटंट' याचा वाचक "अनन्य सामान्य" असा शब्द कालिदासांतून स्वतंत्रपणें बसविला. लेख त्यांनीं लिहिला; परतु मला त्यांनीं असें सांगितलें कीं, माझी इच्छा आहे कीं, हा लेख तुमच्या नांवानें प्रसिद्ध व्हावा व पुढें आलीं म्हणजे लेखावर मीं तुमचें नांव घालणार आहें!

(५) लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय पुणें या संस्थेचा स्वतंत्र कायदा झाला व तो ५ जूनला जाहीर झाला, त्याबद्दल त्यांना फार धन्यता व समाधान वाटलें. यानंतर कामाकाजानिमित्त मी जेव्हां त्यांना प्रथम भेटलों तेव्हां मोठ्या उल्हसित मनानें ते मला म्हणाले, "घारपुरे, कायदा झाल्याबद्दल तुम्हीं पेढे वाटले पाहिजेत. फार छान झालें." दुसऱ्या दिवशीं मीं त्यांना पेढ्यांचा पुडा नेऊन दिला. तेव्हां ते म्हणाले, "अहो, प्रत्यक्ष पेढे देण्याघेण्यापेक्षां – खाण्यापेक्षां – ते द्या असें नुसतें म्हणण्यांतच खरी मौज आहे. उगाच हा खर्च केलांत. अगदीं चुकलें."

❋

वि. रा. भूसरथ

(एम्. बी. बी. एस्., अध्यक्ष, तेलगू परिषद, हैद्राबाद दक्षिण)

सन १९२८ सालीं पुणें येथें हैद्राबाद प्रजा परिषदेचें दुसरें अधिवेशन श्री. राघवेंद्रराव शर्मा यांच्या खटपटीमुळें भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं यशस्वी रितीनें पार पडलें. त्या अधिवेशनास साहित्यसम्राट् केळकर यांना खास आमंत्रण दिलें होतें. मुळापासून निजामींतील हिंदु प्रजेकडे त्यांचा विलक्षण ओढा असल्यामुळें वेळांत वेळ काढून त्यांनीं आमच्या हैदराबाद प्रजा-परिषदेस हजर राहण्याचा मोका वाया जाऊं दिला नाहीं. तात्यासाहेबांची योग्यता मोठी असतांनासुद्धां ते आमच्या बरोबर बरोबरीच्या नात्यानें वागतांना पाहून आम्हां सर्व कार्यकर्त्यांस आश्चर्य वाटलें. यामुळें त्यांच्याविषयीं अंतःकरणामध्यें असलेला आदर दुणावला. त्या वेळीं तीन-चार तास ते आमच्या सहवासांत होते. तेवढ्या अवधींत ते किती थोर, विचारवंत, धोरणी व समतोल बुद्धीचे होते, याची कल्पना आम्हां सर्वांस आली. त्यांच्या विचाराचा व सल्ल्याचा परिषदेंतील कार्यकर्त्यांना अत्यंत उपयोग झाला. तपशील देऊन जागा अडवीत नाहीं.

❋

वैद्य खडीवाले

(पुणें)

(१) १९२५ सालची हकीकत. रत्नागिरीचे प्रसिद्ध पुढारी कै. व्यंकटराव सुर्वे यांच्या अध्यक्षतेखालीं टिळक-स्मारक मंदिरांत 'महाराष्ट्र हिंदु तरुण परिषद' भरावयाची होती; तिला तात्यासाहेब यांचा आशीर्वाद मागण्याचें काम माझ्यावर सोपविण्यांत आलें; मी रविवारी सकाळीं त्यांच्याकडे गेलों. त्या वेळेला त्यांच्या शेजारी गोरेपान पोक्त संन्यासी बसले होते. ते बहुतेक वाईचे नारायणशास्त्री मराठे असावेत. मला उद्देशून संन्यासी उद्गारले, "कसली परिषद भरवितां ? पुण्यांत ब्राह्मणांच्या प्रेताला चार मंडळीहि पुरती जमूं नयेत ह्याची तरुणांस लाज वाटली पाहिजे." तात्यासाहेब माझ्याकडे वळून म्हणाले, 'यांना उत्तर द्या.' मीं उत्तर दिलें कीं, "मी व माझे लोकमान्यपंथीय (भगवी टोपी धारण करणारे) सहाध्यायी नेहमी तयार आहोंत; फक्त पैशाचा प्रश्न पडतो" तात्यासाहेब म्हणाले, "त्याची काळजी नको. पैसा खर्च करा. नतर घराचा पत्ता, मृताची नांवनिशीवार नोंद देऊन केसरी व्यवस्थापकापासून लागलेले पैसे घेऊन जा. काम करणारीं माणसें हवींत, पैशाची काळजी नको." पुढें ८।१५ दिवसांतच नारायण पेठेत दामले-वाड्यांत देशपांडे नांवाचे गरीब गृहस्थ वारले व आपल्या शब्दाप्रमाणें तात्यासाहेबांनींच पैशाची व्यवस्था केली.

(२) करपात्री महाराजांनीं सुरू केलेल्या गोवध – सत्याग्रहांत मीं जाऊन आल्यावर मला तात्यासाहेबांनीं मुद्दाम बोलावून घेऊन व सर्व हकीकत विचारून घेतली. त्या वेळीं झालेल्या संभाषणांत त्यांच्या मुखांतून त्वेषपूर्ण व उत्साही वाक्ये बाहेर पडलीं. ते म्हणाले, "निवडणुकीच्या वेळेला समाज जागरूक राहून मतें देतां तर ही पाळी खास आली नसती ! असो; आतां साधुसंत गुहेंतून राष्ट्र व धर्मकार्यांकरितां बाहेर येत आहेत हें सुचिन्ह आहे; व त्यांचा अनन्वित छळ होत आहे याचा परिणाम लोकजागृतीत होईल यांत शंका नाहीं."

❋

ना. अ. गोरे

(एम्. ए., प्राध्यापक, मुंबई)

(१) तात्यासाहेब अनेक लोकांना हस्तें-परहस्तें अनेकपरीनीं मदत करीत असत. स्वसंपादित धनापैकीं आठ हजार रुपये देणगी म्हणून महाराष्ट्र-विद्या-पीठाला देण्यासाठीं बाजूला काढून, तें निधेपर्यंत आपल्या आईवडिलांच्या स्मरणार्थ त्यांच्या व्याजांतून 'यशोदा चिंतामणी' पारितोषिक दरसाल देण्याची प्रथा सुरू

करून अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथांच्या प्रकाशनाचा मार्ग त्यांनीं सुकर करून ठेवला. रा. कृष्णराव मुळे यांच्या 'भारतीय संगीत' या मौलिक ग्रंथाला त्यांनीं तें पारितोषिक दिल्यामुळेंच त्याचा प्रथम भाग प्रकाशित होण्याची सोय होऊं शकली. तें प्रसिद्ध झाल्यावर श्री. मुळे तात्यासाहेबांना भेटण्यासाठीं मुद्दाम पुण्याला आले होते. तेव्हां मी त्यांच्याबरोबर होतों. तात्यासाहेबांच्या बैठकीच्या खोलींत जाऊन त्यांचें दर्शन होतांच कृष्णरावांनीं त्यांना साष्टांग प्रणिपात केला! तात्यासाहेबांनीं त्यांना घाईघाईनें 'अहो कृष्णराव, हें काय, हें काय, म्हणत उठवून प्रेमानें जवळच्याच एका खुर्चीवर बसवलें व आस्थेवाईकपणें त्यांच्या संगीत व्यासंगाची चौकशी केली व उरलेले दोन भाग लौकर पुरे करण्यास सुचविलें.

श्री. कृष्णराव हेहि त्या वेळीं चांगले वयोवृद्ध होते. त्यांनीं व्यक्त केलेली कृतज्ञता व तात्यासाहेबांनीं दाखविलेली गुणग्राहकता यांचा खोल ठसा कोणाहि सहृदयाच्या मनावर टिकून राहणें हें साहजिकच आहे.

(२) तात्यासाहेब सार्वजनिक सभांमध्यें गडबड, बेशिस्तपणा किंवा विरोध दिसल्यास फार संतापत असत. पांच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. लोकमान्यांच्या पुण्यतिथीला टिळक-स्मारक मंदिरांत लोकनायक अणे यांचें तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान होतें. अणे त्या वेळीं व्हाइसरॉयच्या कार्यकारिणीचे एक सदस्य होते. त्यांचें व्याख्यान संपत येण्याच्या सुमारास स्वातंत्र्यवीर सावरकर हे उपस्थित झाले. अण्यांच्या भाषणानंतर स्वातंत्र्यवीरांनीं बोलावें असा लोकांनीं एकच आग्रही निनाद केला. सावरकर बोलण्याला प्रथम नाखूष होते म्हणून म्हणा, अथवा त्यांचें भाषण कार्यक्रमांत नव्हतें म्हणून म्हणा; अध्यक्ष केळकर यांनीं निग्रहपूर्वक नकार देऊन आपलें समारोपाचें भाषण सुरू केलें, पण लोक तर ऐकेनात. तेव्हां तात्यासाहेब फारच रागावले गेले व 'मीं या सभेचा अध्यक्ष सांगतों आहें कीं, आता सावरकरांचें भाषण होणार नाहीं.' त्याबरोबर लोकांचा आरडाओरडा व स्वातंत्र्यवीरांनीं बोलावें याविषयींचा आग्रह फारच वाढला. तेव्हां आपली काठी उचलून उपरणें सावरीत संतप्त होऊन, 'मीं या सभेचा अध्यक्ष जाहीर करतों कीं, ही सभा बरखास्त झाली' असें म्हणत व्यासपीठावरून खालीं उतरण्यासाठीं ते चार पावलें पुढें निघाले देखील! शेवटीं खुद्द सावरकरांनींच पुढें होऊन तात्यासाहेबांना मागें आणलें व स्वतः लोकांना सांगितलें कीं, सभापति गु. तात्यासाहेबांची आज्ञा पाळलीच पाहिजे. माझी प्रकृति बरी नाहीं. ती बरी झाल्यास मी उद्यां स्वतंत्र व्याख्यानच देणार आहें. विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं, या भाषणानंतर तात्यासाहेबानीं जें भाषण केलें तें फारच सुंदर व विनोदप्रचुर होतें. पूर्वीच्या रागाचा त्या वेळीं मागमूसहि कोठें दिसून आला नाहीं. श्रोते अगदीं खूष होऊन गेले.

❋

जिज्ञासु

(बी. ए., बी. टी.; फलटण)

ऑगस्ट १९४५ च्या 'सह्याद्री'त 'कवि-कालिदास-प्रशस्ति' या मथळ्याखालीं तात्यासाहेबांच्या कांहीं संस्कृत कविता प्रसिद्ध झाल्या. त्यांत एके ठिकाणीं आलेलें 'शार्मण्यकविसम्राज्ञा' हें पद मला चिन्त्य वाटलें. कारण 'सम्राज्' शब्द 'राज्' प्रमाणें चालावयाचा, 'राजन्' प्रमाणें नव्हे. तेव्हां 'सम्राजा' असें पाहिजे होतें. मुद्रणदोष असावा याच मुख्य समजुतीनें संपादकांकडे मीं एक पत्र पाठवून जिज्ञासा व्यक्त केली. त्यांनीं तें पत्र तात्यासाहेबांस दाखवलें असावें. कारण माझें पत्र व त्यांचा खुलासा हीं दोन्ही एकदमच प्रसिद्ध झालीं! मासिकांत झालेली एका अक्षराची चूक म्हणजे खरोखरच किरकोळच बाब. तथापि मीं पत्र पाठविलें होतें तें संपूर्णपणें प्रसिद्ध केलें, याचें तर मला नवल वाटलेंच, पण त्याखाली "... मला संस्कृत व्याकरणाचें ज्ञान नसल्यानें चूक झाली आहे. ती छपाईची चूक नाहीं. अज्ञानाची आहे." हा स्वतःच्या सहीनें तात्यासाहेबांनीं केलेला अनपेक्षित खुलासा पाहून मी सादर चकित झालों. 'सह्याद्रि' व तात्यासाहेब यांचे संबंध व 'जा' आणि 'ज्ञा' यांतील मुद्रणदृष्ट्या असलेलें साधर्म्य लक्षांत घेतां, 'मुद्राराक्षसा'च्या (प्रिंटर्स डेव्हिल) नांवाखालीं चूक सहज झांकतां आली असती. पण तसें न करतां, संस्कृत भाषेवर सुंदर प्रभुत्व असूनहि तात्यासाहेबांनीं स्पष्टपणें व मोकळ्या मनानें चूक कबूल केली यांत त्यांच्या मनाचें मोठेंपण फार खुलून दिसलें! हा असामान्य प्रांजलपणा त्यांच्या मानानें सामान्य असणाऱ्या लोकांतहि पुष्कळ वेळां नसतो, असा अनुभव मला दुसऱ्या एका मोठ्या गृहस्थांच्या कवितेच्या बाबतीत कांहीं दिवसांनीं आला. त्या वेळीं तात्यासाहेबांची आठवण चटदिशीं होऊन त्यांच्याविषयीं वाटलेला आदर द्विगुणित झाला.

❋

सी. के. बोले

(रावबहादूर, जे. पी., मुंबई)

(१) तसें पाहिलें तर, तात्यासाहेब यांचा व माझा प्रत्यक्ष परिचय १९४० पर्यंत चहून आला नाहीं; टिळककालीन राजकारणामध्यें आम्हीं 'ब्राह्मणेतर' पक्षाचे! आमची सहानुभूति ना. गोखले यांच्या धोरणाकडे असे. मी सार्वजनिक कार्यांत हौसेनें भाग घेणारा. १९२० पूर्वी, गोखले असतांना किंवा नंतर, आमच्या सार्वजनिक चळवळीसंबंधीं 'केसरी'चें धोरण जरा कडकच असें. सामाजिक सुधारणेचा प्रश्न, 'वेदोक्ताचा अधिकार,' अस्पृश्यता–निवारण, इत्यादि गोष्टींत थोडा कानाडोळा करून व 'राजकारण आधीं आणि नंतर समाजसुधारणा' अशी टीका करून,

पुष्कळ टिळकपक्षीय लोक वागत; पण समतोलपणाविषयीं केळकर यांचा लौकिक आम्हांला विदित असल्यानें आणि 'आधीं केलें मग सांगितलें' या उक्तीप्रमाणें केळकरांनींच स्वतःच्या वैयक्तिक वा कौटुंबिक गोष्टींत वर्तन केलें आहे. उदाहरणार्थ, त्यांच्या मुलीचें लग्न. सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला असल्यानें, आमच्यावर वा गोखले पक्षावर होणारा टीकांचा अग्निवर्षाव केळकरांना रुचत नसावा, निदान त्यांत त्यांचा हात वा शब्द नसावा अशीं आम्हांला अनुमानें बांधतां येत.

(२) पुढें १९२० नंतर 'गांधीयुग' उजाडलें! सर्वच राजकारणाचीं तोंडें बदललीं नि कधींहि एका दिशेला नसलेलीं तोंडें एका दिशेला आलीं! बुद्धिवादाचे, महाराष्ट्राच्या परंपरेचे अभिमानी व अध्वर्यू म्हणून केळकरांच्या आणि आमच्या धोरणांत जवळ जवळ एकरूपता येऊं लागली. आम्ही देवगडला गेलों असतां तेथें 'ब्राह्मणी' पंक्तिप्रपंच न मानतां ॲ. सुर्वे यांच्याजवळ आमचें पान पाहिजे असा व्यवहार केळकरांनीं कृतींत आणून, उदारपणा आणि पुढारीपणा दाखविला!

(३) १९४० मध्यें केळकरांची माझी प्रत्यक्ष भेट माझ्या ७२ व्या वाढदिवसाच्या समारंभप्रसंगीं झाली. त्या वेळीं त्यांनीं उदारमनानें पुढीलप्रमाणें भाषण केल्याचें पूर्ण स्मरतेंः–ते म्हणाले, "रा. ब. बोले यांच्या सत्कार–समारंभाचें अध्यक्षस्थान माझ्यासारख्या विरोधी गटांतील व्यक्तीनें स्वीकारल्याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यांत आलें आहे. आम्हीं पूर्वी 'केसरी'तून रावबहादुरांवर व ब्राह्मणेतर पक्षावर टीका केली आहे ही गोष्ट खरी; पण त्या वेळीं रावबहादुरांचा व आमचा प्रत्यक्ष संबंध आला नव्हता. सरकार पक्षाचे पुढारी असाच त्यांच्याविषयीं गैरसमज करण्यांत येत असे. पुष्कळ वेळां अशी परिस्थिति उत्पन्न होते कीं, सरकारशीं सहकार केल्याशिवाय लोकोपयोगी कायदे पास होणें कठीण असतें; परंतु त्यांनीं प्रसंगीं सरकारशीं विरोध करण्यासहि कमी केलें नाहीं."

"त्यांच्या सार्वजनिक कार्याचें क्षेत्र स्वजाति, अखिल ब्राह्मणेतर समाज आणि आतां अखिल हिंदु समाज असें वाढतच गेलें. रा. जेधे काँग्रेसला मिळाले तर रा. ब. बोले हिंदुसभेशीं निगडित झाले. म्हणून बोले व मी विरोधी पक्षांतील व्यक्ति एकत्र येण्याचा व त्यांच्याशीं प्रत्यक्ष परिचयाचा प्रसंग आल्याबद्दल मला आनंद होत आहे.

(४) या समारंभाच्या दुसऱ्या दिवशीं केळकर माझ्या घरीं आले असतां पुष्कळ 'चहा-चर्चा' (Tea-talk) झाली. बोलणीं लांबलीं; पण केळकर नि मी यांच्यामधील अंतर मात्र उणावलें! आयुष्याच्या ताटावर दोन हात मारून ८० ची कड गांठलेल्या आम्हांला 'वैराग्ययुक्तविषाद' वाटतो. केळकर गेले, पण त्यांचें 'तत्त्व' अमर झालें खास!

❋

व्ही. आर. जोशी

(डॉक्टर, कराड)

१९२६ सालीं तात्यासाहेब विलिंग्डन कॉलेज सांगली या ठिकाणीं आल्या-वेळीं त्या वेळचा प्रचलित महत्त्वाचा विषय जो हुंडणावळीचा दर १६-१८ पेन्स व त्याचा हिंदुस्थानच्या तिजोरीवर (गंगाजळीवर) होणारा वाईट परिणाम व इंग्लंडचा होणारा फायदा, यावर अतिशय स्पष्ट, सुबोध, व सुंदर दीड तास त्यांचें व्याख्यान झालें. व्याख्यानाच्या सुरवातीसच तात्यासाहेब यांनी सांगितलें कीं, " हा विषय मी इतका सोपा करून सांगणार आहें कीं, त्याचें एक गमक मी मनाशीं ठरविलें आहें. तुम्हा मुलांना हा विषय स्पष्ट, पूर्ण कळला तरच तो मला स्वतःला बरोबर कळला व पटला आणि जर तुम्हांला तो समजला नाहीं तर मलाहि खास तो समजला नाहीं असें मी समजेन." खरोखरी इतक्या क्लिष्ट विषयाची फोड त्यांनीं इतकी सुंदर व मुद्देसूद केली कीं, प्रत्येकाला तो विषय उत्तम समजलाच; पण तात्यासाहेबांच्या अगाध ज्ञानाबद्दल, स्वतःच्या आत्मविश्वासाबद्दल व मुलांचीं मनें आकृष्ट केल्याबद्दल माझ्या मनांत कायमचें कुतूहल राहून गेलें व नितान्त आदर वाटला.



त्र्यंबक बाळकृष्ण केळकर

(जळगांव, पूर्व-खानदेश)

(१) दि. ८ नोव्हेंबर १९३५ रोजी जळगांवीं वल्लभदास वालजी वाचनालयाच्या आवारांत तात्यासाहेब यांचें सद्यःस्थितीवर अतिशय सुंदर व्याख्यान झालें. ते म्हणाले, " नवीन सुधारणा कुचकामाच्या, टाकाऊ आहेत हें जरी खरें असलें तरी त्यांचा शक्य तो उपयोग करून घेणेंच शहाणपणाचें ठरणार नाहीं काय ! आज येथें जे लोक जमले आहेत त्यांतला एक तरी मनुष्य पुढें येऊन परमेश्वरास स्मरून सांगेल काय कीं, त्याचा संसार सुखाचा आहे म्हणून ? असें जरी आहे तरी संसार करणें कुणीं सोडून दिलें आहे काय ! तर त्याचें 'नाहीं' हेंच उत्तर येणार. जबाबदारी आहे तेथें अधिकार आहेच व अधिकार आहेत तेथें जबाबदारी आलीच. दैववाद खरा कीं प्रयत्नवाद खरा ! तर मी म्हणेन कीं दोन्हीहि खरे. आधीं प्रयत्न करा, काम करा, मग यश न आलें तर दैव म्हणा वाटलें तर. दैववादी लोकांना कांहीं काम करावयाचें नसतें म्हणून ते दैववाद, दैववाद म्हणत बसतात. दैवाचा नंबर पांचवा लागतो. गीतेंत म्हटलेंच आहेना कीं, " दैवं चैवात्र पंचमम्," पुरुषार्थ, प्रयत्न हे केलेच पाहिजेत ! "

(२) सन १९३६ सालीं माझे वडील बंधु नारायणराव यांच्यामार्फत मीं तात्यासाहेबांना मला चार उपदेशाच्या गोष्टी त्यांच्या हस्ताक्षरांत लिहून पाठविण्यास विनंती केली होती. त्यांच्या पाठीमागें अक्षरशः शेंकडों तऱ्हेचे व्याप असतांहि वेळांत वेळ काढून त्यांनीं मला जें उपदेशपर पत्र पाठविलें आहे, त्याबद्दल मीं त्यांचे कितीहि आभार मानले, तरी ते अपुरेच होतील. कारण त्या पत्रांतील प्रत्येक शब्द मोलाचा आहे. मी त्या उपदेशाचीं पारायणें केलीं व प्रत्येक वेळीं माझ्या चित्तास त्या उपदेशामृतानें नवचैतन्य मिळालें आहे. मला या उपदेशापासून चित्ताच्या शांतीस व मनाच्या समाधानास फारच मदत झाली आहे. सदरहू पत्र खालीलप्रमाणें आहे :–

श्रीराम

पुणें. ता. २०।१२।१९३६

रा. रा. त्र्यंबकराव केळकर, मु. जळगांव यांस,

कृतानेक साष्टांग नमस्कार. विशेष.

आपले बंधु, आमचे मित्र, रा. नारायणराव केळकर यांनीं आपला निरोप कळविला. जगांत मनुष्यानें कसें वागावें या प्रश्नाचें उत्तर सर्वांना पटेल असें देणें कठीण आहे; तथापि त्यांच्या व तुमच्या आग्रहास्तव माझें मत लिहितोः–

१ पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे मनुष्यानें आपला जो खरा स्वभाव आहे त्याप्रमाणेंच वागावें. दुसऱ्याचा स्वभाव, लोक वाखाणतात म्हणून, तसा बहाणा किंवा ढोंग करूं नये.

२ स्वतः आपण व आपणावर अवलंबून असणाऱ्या माणसांचा चरितार्थ स्वाभिमान सांभाळून चालविणें हें मनुष्याचें आद्य कर्तव्य आहे. तें पुरें पाडून उरेल तो वेळ व शक्ति समाजसेवेला अवश्य खर्च करावी.

३ अशा उरलेल्या वेळेचा आणि शक्तीचा उपयोग सर्वांनींच केला तर सार्वजनिक कार्याचे डोंगर उभारले जातील.

४ सार्वजनिक कार्यें अनंत आहेत; तथापि आपला स्वभाव आणि साधनांची अनुकूलता पाहूनच आपण आपलें आवडीचें कार्य, कर्तव्य म्हणून आंखून घ्यावें आणि जन्मभर निष्ठेनें करावें.

५ अशा रीतीनें एकच कार्य जन्मभर अव्यभिचारी भक्तीनें केल्यास यश हटकून लाभेल.

६ दुसऱ्याचें मोजमाप आपल्या यशाला लावून पाहूं नये. आपलेंच माप

लावून पाहावें, म्हणजे निराशेचा प्रसंग येणार नाहीं व आलाच तरी दुःख होणार नाहीं.

७ आईवर प्रेम करण्याचा हक्क तिच्या सर्व मुलांना सारखाच असतो. प्रेमाच्या दृष्टीनें श्रेष्ठ-कनिष्ठ भाव राहत नाहीं. तीच गोष्ट देशभक्तीची आहे.

– न. चिं. केळकर

वरील त्यांच्या पत्रांतील उपदेशाच्या चिंतनानें व मननानें माझ्या मनाचें पूर्ण समाधान झालें व त्यानंतर कसल्याहि प्रसंगानें माझ्या मनाची शांति ढळली नाही.

(३) तात्यासाहेब जळगांवीं आले असतां मी त्यांना भेटायला गेलों होतों. त्यांची भेट झाली. मीं त्यांना माझ्या घरीं फराळास येण्याबद्दल विनंती केली. तात्यासाहेब मला म्हणाले, "मी तुमच्या घरीं उद्यां सकाळीं अवश्य येईन; पण केवळ गप्पा मारण्यास; खाणार मात्र नाहीं. कारण असें प्रत्येक ठिकाणी थोडें थोडें खाल्लें तरी पोटावर तो अत्याचारच होतो; नाहीं का?" मला त्यांचें म्हणणें पटलें. ठरल्याप्रमाणें ते माझ्या घरीं आले. मनमोकळेपणानें खूप बोलले. मीं त्यांना एक शंका विचारली. 'मौजेचे चार प्रहर' या तुमच्या पुस्तकांत 'अलिगड किल्ल्यांतील एक रहस्य' या गोष्टींत पंचेचाळीसाव्या पृष्ठावर खालील वाक्य आहे. "अयोध्याप्रसाद म्हणाला – हीच तर या जगांत मौज! पुरांत वाहून आलेल्या काटक्या कुठल्याच्या कुठें येऊन भेटतात. गीतेंत म्हटलेंच आहे ना, यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ" हें त्यांना दाखवून मीं त्यांना विचारलें, गीतेंत तर हा श्लोक नाहीं, मग आपण असें कसें लिहिलेंत? यावर ते खूप हंसले व म्हणाले, 'यथा काष्ठं च काष्ठं च', हा श्लोक गीतेंत नाहीं हें काय मला माहीत नाहीं? परंतु सर्वसाधारण जनता आपल्या म्हणण्यास कांहीं आधार घ्यायचा असला तर धर्मसिंधु, महाभारत, गीता, अशासारख्या ग्रंथांचा मुळांत नसलेले आधार देते. या प्रवृत्तीस अनुसरून अयोध्याप्रसादानें विद्वत्तेचा आव आणून दडपून गीतेचा उल्लेख केला, असें मीं विनोदानें लिहिलें आहे. पण तो विनोद तुम्हांस कळला नसला तर मला तो साधला नाही असेंच म्हटलें पाहिजे!

(४) मी कपाशी खरेदी करणाऱ्या व्यापारी कंपनींत नोकरीवर असल्यानें साहजिकच कपाशीवर बोलणें निघालें. मी म्हणालों, कापसाच्या व्यापारांत आम्हां लोकांना अमेरिकेवर अवलंबून राहावें लागतें. मुंबईचे भावसुद्धां अमेरिकेच्या लहरीवर हेलकावे खात असतात हें अतिशय अनिष्ट आहे. यावर तात्यासाहेब म्हणाले, "तुम्ही म्हणतां तें खरें आहे. सरकारनें कायदा करून कापसाची लागवड मर्यादित केली पाहिजे. हिंदुस्थानांतील शेतकरी कापूस पेरण्याच्या मागें लागला असून इतर धान्यें पिकविण्याकडे त्यांचें दुर्लक्ष होत आहे हें कांहीं सुचिन्ह नव्हें. कापूस

अन्न म्हणून कांहीं खातां येत नाहीं. तोंच शेतकरी जर इतर धान्यें पेरील, भाजी-पाला, फळफळावळ करील तर त्यास पौष्टिक व शुद्ध अन्न पोटभर खावयाला मिळेल. त्याच्या गुरांनासुद्धां पोटभर चाराहि होईल. आपल्या शेतकऱ्यांस आज हें सुचत नाहीं, पण पुढें त्यांना पश्चात्ताप करण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाहीं." तात्यासाहेबांच्या वरील म्हणण्यांत किती तथ्य होतें हें आज आपणा सर्वांच्या अनुभवास येत आहेच.

(५) तारीख २९ सप्टेंबर १९४१ रोजीं रात्री जळगांव येथें वाचनालयाच्या आवारांत तात्यासाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं कु. वेणूबाई पाटणकर यांचें विभावरी शिरूरकरकृत 'विरलेलें स्वप्न' या कादंबरीवर व्याख्यान झालें. वेणूबाई पाटणकर ह्या अर्थशास्त्र व राजकारण हे विषय घेऊन एम्. ए. झाल्या आहेत. व्याख्यानाच्या सुरुवातीस, वाङ्मयक्षेत्रांत त्यांनीं पाऊल घातलें नसल्यानें स्वतांस झेंडूच्या फुलाची उपमा लावून घेतली. त्या म्हणाल्या, "स्त्रियांचीं दुःखें स्त्रिया जितक्या चांगल्या तऱ्हेनें मांडतील तितकीं तीं पुरुषांना मांडतां येणार नाहींत. विरलेलें स्वप्न या कादंबरींत मंगळागौरीच्या दिवशीं घागरी फुंकण्याचा उल्लेख आहे. घागरी मंगळागौरीस फुंकत नसून अश्विन शुद्ध अष्टमीस फुंकतात. कोणचीहि स्त्री असें चुकीचें विधान करणार नाहीं." अशींच आणखी कांहीं कारणें देऊन त्या म्हणाल्या, "यावरून सदरहू पुस्तक कुणीतरी पुरुषानेंच लिहिलें असावें खास." अध्यक्ष तात्यासाहेब यांनीं समारोप फारच सुंदर केला. ते म्हणाले, "व्याख्यात्या वेणूबाई या अर्थशास्त्र व राजकारण हे विषय घेऊन एम्. ए.च्या परिक्षेंत उत्तीर्ण झाल्या आहेत. यावरूनच त्यांची बुद्धि किती प्रखर असली पाहिजे हें कांहीं निराळें सांगायाला नको. त्यांनीं स्वतःकडे कमीपणा घेण्यासाठीं स्वतःस झेंडूच्या फुलाची उपमा लावून घेतली. परंतु त्यामुळें त्यांच्याकडे कमीपणा तर येत नाहींच, उलट ती उपमा योग्यच आहे. कारण नवरात्रांत, दसऱ्याच्या दिवशीं आपणांस देवीस झेंडूचींच फुलें लागतात. दुसरीं कोणचीहि फुलें चालत नाहींत. (हंशा). 'स्त्रियांचीं दुःखें स्त्रियांच्याकडूनच चांगल्या तऱ्हेनें चव्हाट्यावर येतील' असें त्या म्हणाल्या. तसेंच कांहीं केवळ म्हणतां येणार नाहीं. ह. ना. आपटे यांची 'पण लक्षांत कोण घेतो' ही कादंबरी नाहीं तर फुकट गेली असती. परकाया प्रवेश करून त्या त्या व्यक्तीशीं समरस होतां येतें. स्त्रियांचें नांव घेतलें म्हणजें लेखन प्रसिद्ध होतें, खपतें या समजावरून असेच प्रकार मागेंहि झाले आहेत. उदाहरणार्थ, अ. ब. कोल्हटकर यांची 'वत्सला वहिनींचीं पत्रें.' मी एकदां अच्युतरावांस स्वतःच याबद्दल विचारलें असतां उत्तरादाखल ते नुसते सात मजली हंसले! या हंसण्याचाच अर्थ 'तात्यासाहेब, तुम्ही किती हो भोळे! असा आहे. असो. या उत्सवास 'शारदीय' महोत्सव हें

नांव कां दिलें ? शरदृतूंत होतो म्हणून कां त्यांत स्त्रियांचीं व्याख्यानें ठेविलीं जातात म्हणून ?" (हंशा)

शारदीय उत्सवाचे चिटणीस श्री. पळशीकर वकील आभार मानतांना म्हणाले, "शारदीय महोत्सव या नांवाबद्दल तात्यासाहेबांनीं जी शंका प्रदर्शित केली, त्यांत त्यांनीं एक चलाखी केली आहे." पळशीकर बोलत असतांनाच तात्यासाहेब त्यांना चटकन् म्हणाले, "अहो, मला व्याकरणानें मदत केली !" (खूपच हंशा).



धोंडो श्रीधर आगाशे

(शिक्षक, हायस्कूल रहिमतपूर)

स्वराज्य पक्षाच्या स्थापनेसाठीं जोरांत प्रचार सुरू असतां मुंबईस गांधर्व महाविद्यालयाच्या पटांगणावर एक मोठी प्रकट सभा घेण्यांत आली होती. अध्यक्षस्थानीं तात्यासाहेब होते. बंगाल, मद्रास व मध्यप्रान्ताकडील बरेच पुढारी उपस्थित होते. सभापति या नात्यानें मद्रासकडील श्री. ए. रंगास्वामी अयंगार यांची श्रोत्यांना ओळख करून देत असतां तात्यासाहेब म्हणाले कीं, 'या गृहस्थांचें तामीळ भाषेवर दांडगें प्रभुत्व आहे.' लागलीच एका श्रोत्यानें प्रश्न केला कीं "तात्यासाहेब, तुम्हां स्वतःला ती भाषा येते का ?" तात्यासाहेब म्हणाले, "नाहीं." श्रोत्यानें विचारलें, "तर मग तुम्ही असें कसें सांगूं शकतां ?" तात्यासाहेब जरा गोंधळल्यासारखें झालें खरें. पण लागलीच ते म्हणाले, "ज्या अर्थी ह्या गृहस्थांनीं त्या भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें व ग्रंथ, त्याचप्रमाणें चालविलेलीं अनेक वर्तमानपत्रें या सर्वांचा इतरांच्या मानानें फार मोठा खप असतो, त्या अर्थी मला असें बिनदिक्कत म्हणतां येतें." या उत्तरानें विचारणारा तर गप्प झालाच; पण इतर सर्व श्रोत्यांना मोठें कौतुक वाटल्याचें स्पष्ट दिसलें.



शांता आपटे

(सुप्रसिद्ध सिने-तारका, अंधेरी)

(१) मीं लहानपणीं गणपति-उत्सवाच्या वेळीं मेळ्यांत गाणें म्हणण्यास सुरुवात केली हाच माझा संगितांत प्रवेश. त्या वेळीं तात्यासाहेब केळकर यांनीं, माझीं गाणीं ऐकून मला संगिताचा शास्त्रोक्त अभ्यास करण्यास सांगितलें.

(२) माझा संगीत शिक्षणक्रम सर्वतोपरी हालअपेष्टा, कुचेष्टा सहन करून पुरा झाला. आतां जनतेपुढें आपली परीक्षा देण्यास हरकत नाहीं अशी गुरुजींनीं आज्ञा

केली. पण तें करण्याअगोदर, आपल्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या सद्गृहस्थांच्या चरणीं आपली सेवा सादर करावी व त्यांना पसंत पडल्यास मग जनतेपुढें निर्भयपणें यावें, असा विचार मनांत आला. तात्यासाहेब यांच्याबद्दल मला परम आदर. त्यांना शास्त्रोक्त व शुद्ध संगीत फार आवडे; म्हणून त्यांनाच बोलवावें व आपली तयारी त्यांनाच दाखवावी असें ठरलें. त्यांच्याबरोबर सरदार आबासाहेब मुजुमदार यांनाहि आमंत्रण दिलें. मीं विनंती करतांच इतर सर्व उद्योग स्थगित करून येण्यास तात्यासाहेब तयार झाले व सरदार मुजुमदार यांच्यासह खडकीस माझ्या बंगल्यावर त्यांनीं येण्याचा अनुग्रह केला. वृद्धपणामुळें मला रात्रीं फार वेळ बसतां येणार नाहीं असें त्यांचें म्हणणें असल्यामुळें बैठक सायंकाळीं सहा वाजतां सुरू करावयाची, तीन तास गायन करावयाचें एवढेंच ठरलें होतें. तो १८ जुलै १९४० चा माझ्या रोजनिशींतील नोंदलेला दिवस आहे. मी दोन अडीच तास तब्बल रागदारी गायलें. तात्यासाहेब अगदीं लक्षपूर्वक रागांतील प्रत्येक उपज-निपज बारकाईनें ऐकत होते. मीं पण अत्यंत सावधगिरीनें मला येतें तें गायलें. गुरुजीहि होते. संगीत चाललें असतां चीज संपतांच तात्यासाहेब एकदम उठले, डोक्याची टोपी व उपरणें काढून कोचावर ठेवून म्हणाले, "वा, हे बघा शांताबाई, मी आतांपर्यंत तुमचें ऐकलें; आतां तुम्ही माझें ऐका." आम्हांस आश्चर्य वाटलें. हा काय प्रकार आहे ! हे गाऊं लागतात कीं काय ? असें वाटून मीं झटदिशी तंबोरा खालीं ठेवला व बाजूस झालें, हें पाहून तात्यासाहेब व आबासाहेब मोठ्यांनीं हासले.

फराळ झाल्यावर रात्रीं ११ वाजतां तात्यासाहेबांची स्वारी पुन्हां दिवाणखान्यांत आली. शालजोडी पांघरून पुन्हां पट्टीनें ऐकण्यास बसले व म्हणाले, "आतां मी सांगतों ते होऊं द्या. बरेच दिवसांनीं मस्त संगीत शांतपणानें जवळून ऐकण्यास मिळत आहे." त्यांनीं धमार, टप्पा, अडाणाबहार व खंबावतीची फर्मास केली. तंबोरे लागले. चार तंबोरे एकस्वरांत बोलूं लागले. त्या आनंदांत तात्यासाहेबांना पुन्हां बोलावेंसें वाटून ते मला म्हणाले, "मला ऐकूं कमी येतें व आपण गातांना ज्या हरतऱ्हेच्या गोडगोड मुरक्या, उपजा, खटके घेतां, ते छोटे स्वर लांबून ऐकून त्याचा आनंद घेतां येत नाहीं व त्यांतच खरें माधुर्य, संगीत, रागाचा आविष्कार व संपूर्ण छाया असते. अलीकडे गडबडींत व धांदलींत यंत्रद्वारां लोक काय ऐकतात व रसिक काय ऐकून घेतात समजत नाहीं." मग बैठकीस सुरवात झाली. तात्यासाहेब मुरब्बी व खरे रसिक यांत शंका नाहीं. रागावर राग होऊन बैठक पहाटें ३ पर्यंत चालूं होती !

तात्यासाहेब इतकें जाग्रण अलीकडे करीत नसत. घरच्या मंडळीना तात्यासाहेब घरीं आले नाहींत म्हणून काळजी वाटूं लागली व वारंवार फोन येऊं

लागले; पण ते जे बैठक मारून बसले ते हालेनात. त्यांनीं मला पुष्कळ सूचना केल्या. चीजेचा अर्थ श्रोत्यांच्या लक्षांत येऊन संगीताचा संपूर्ण आनंद मिळावा, म्हणून गायकानें शब्दोच्चार स्पष्ट करावा, भावनेनें स्वरांत घुसून एकजीव होऊन गावें, विरामाच्या जागा हेतुपूर्ण व अर्थपूर्ण असाव्या वगैरे अनेक मार्मिक सूचना त्यांनीं केल्या. त्यांनीं ऐकिलेल्या फार थोर व अधिकारी गायकांचीं बरींच नांवें त्यांनीं सांगितलीं व मुख्यतः त्या सर्वांच्या गाण्यांतील खुब्या व लकबी त्यांनीं मार्मिकपणें मला सांगितल्या. त्याचा मला पुढें फार उपयोग झाला.

(३) तात्यासाहेब नेहमीं माझ्या शिक्षणाबद्दल चौकशी करीत असत. पुनः एकदां बैठक करण्याचें माझ्या मनांत होतें; पण योग आला नाहीं. शेवटी गेल्या सप्टेंबर १९४७ मध्यें इंडियन क्रिकेट टीम, ऑस्ट्रेलियांत जाण्याच्या वेळीं प्रो० देवधर-सत्कार-समारंभाच्या वेळीं नूतन मराठी विद्यालयाच्या पटांगणांत सभा भरली. त्या समारंभाचे तात्यासाहेब अध्यक्ष होते; त्या वेळीं शेवटीं वंदेमातरम् पदमीं गाइलें. त्या वेळीं ते उभ्यानें लक्षपूर्वक ऐकत होते. शेवटीं त्यांच्याशीं बोलण्याची माझी इच्छा असतांहि अवसर मिळाला नाहीं. मजकडे पाहून नुसतें ठीक आहे ना? म्हणून म्हणाले, वात्सल्याच्या भावनेनें हंसले. मला वाटलें नाहीं हेंच त्यांचें शेवटचें दर्शन ठरेल. पण माझेंच नशीब खोटें!



वि. स. वाकसकर

(बडोदें)

(१) एकदां भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संमेलनास मी पुण्यास गेलों होतों. सकाळीं संमेलनाचा कार्यक्रम संपल्यावर सर्व मंडळी मागील ओसरीवर भोजनासाठीं पानावर बसली. तेथें काटकोनांत तीन ओळी होत्या. दुसऱ्या काटकोनाजवळील तिसऱ्या ओळींतील पहिल्याच पानावर मी बसलों. माझ्या खालीं कोणीहि नसल्यानें मीच शेवटीं होतों. मंडळांतील सभासदांची वागणूक इतकी प्रेमळ असते कीं, तेथें परकेपणा असा मला कधींच वाटत नाहीं व त्यामुळें मी एकटाच आणि सर्वांच्या शेवटीं पण स्वतंत्र पंक्तींत बसलों हें माझ्या ध्यानांतहि नव्हतें. पहिल्या ओळींतील पहिल्याच मानाच्या पानावर साहित्यसम्राट् बसले होते. सर्वांच्या मागाहून मी येऊन पानावर बसतांच भोजनास प्रारंभ व्हावयाचा म्हणून मी पेल्यांतील पाणी हातांत घेऊन तें पत्रावळीभोंवतीं फिरविण्याच्या सिद्धतेंत असून इतर मंडळीहि तेंच करीत होती. इतक्यांत साहित्य-सम्राट् आपल्या जागेवरून उठून माझ्याजवळील माझ्या खालच्या पात्रावर येऊन विराजमान झाले! त्यांस पाहून मीं विचारिलें,

'कां ! जागा कां बदलली ! ' तात्यासाहेब – तुम्हांला मजजवळ बसविण्यास जागा नव्हती म्हणून मीच तुमच्याजवळ आलों. मी – डोंगर महंमदाजवळ न गेला तर महंमदानेंच त्याच्याजवळ जावें असेंच ना ! तात्यासाहेब – मी कांहीं महंमद नाहीं. तुमचें तुम्ही ठरवा ! मजजवळ येऊन बसण्यांत तात्यासाहेबांची व्यवहार-कुशलता व्यक्त होते. संमेलनास जमलेली बहुतेक मंडळी ब्राह्मण असून भोजनसमयीं मीच एकटा चांद्रसेनीय कायस्थ प्रभु होतों. मला अथवा प्रेक्षकाला वैषम्य वाटेल, तें न वाटावें म्हणूनच तात्यासाहेब आपल्या मुख्य जागेवरून उठून मजजवळ येऊन बसले !

(२) सन १९३० च्या डिसेंबरच्या २५ तारखेस खार स्टेशनवर आगगाडींतून अपघातानें मी प्लॅटफॉर्मवर पडलों. तो अपघात भयंकर असून मी तत्काळ परलोकींच जावयाचा; पण त्यांतून वांचून परत घरी आलों. त्यानंतर तात्यासाहेबांची व माझी गांठ पडल्यावर अपघाताचा वृत्तान्त त्यांस सांगून पूर्वजांच्या पुण्याईनें मी जगलों, असें मीं म्हटलें. तें ऐकून तात्यासाहेब म्हणाले, " तुम्ही पडलां ती डिसेंबरची २५ वी तारीख होती. ख्रिस्ती लोकांची ती पवित्र तारीख होय. कारण, येशू ख्रिस्ताचा जन्म त्या दिवशीं झाल्यानें तो दिवस ख्रिस्तजयंतीचा होता. त्या दिवशीं स्वर्गाचीं द्वारें ख्रिस्ती लोकांनाच उघडीं असतात. तुम्ही ख्रिस्ती नसल्यानें तुम्हांला तेथें मज्जाव होता; म्हणून तुम्ही परत मृत्युलोकांत आलां ! "



बाबासाहेब परांजपे

(तपस्वी, स्वार्थत्यागी व राजकीय तत्त्वज्ञानी)

(१) लोकमान्यांना एक लाखाची थैली अर्पण करण्याची पुण्यांतील त्यांच्या प्रेमी मंडळींत चळवळ चालूं होती. त्याच वेळीं मुंबईस 'मेसेज' नांवाचे इंग्रजी साप्ताहिक सुरू करण्याबाबत व त्यासाठीं निधि जमविण्याबाबत श्री. अच्युतराव कोल्हटकर यांचे प्रयत्न चालू होते. दोन निरनिराळे निधि एकाच वेळीं चालू ठेवणें इष्ट नसल्यामुळें लोकमान्यांस देण्यांत येणारी थैली ते स्वतःकरितां न वापरतां सार्वजनिक कार्याकरितांच खर्च करणार असल्याचें ठरल्यासारखेंच असल्यानें मेसेजचा फंड निराळा न जमवितां लोकमान्यांच्या फंडाकरितांच निधि जमवून त्यांतूनच मेसेजकडे रक्कम पुढें जरूरीप्रमाणें घेण्याची योजना चालक-मंडळींनीं ठरविलेली होती. परंतु गैरसमजुतीनें त्या बाबतच्या तक्रारी अखेर लोकमान्यांच्या कानापर्यंत गेल्या. श्री. अच्युतराव यांच्याशीं माझा संबंध या वृत्तपत्री व्यवहारांत असल्यानें माझ्याबद्दलची तक्रार त्या वेळीं बरीच होती. अखेर आपल्या थैलींतील रक्कम त्या कामीं खर्ची घालून तो व्यवहार लोकमान्यांनीं मिटवून घेतला. संदेशपत्र

व मेसेज पत्र हीं लोकमान्यांच्या धोरणास पोषकच होतीं, म्हणून तात्यासाहेबांच्या सल्ल्यानें व मदतीनें हा वाद मिटूं शकला. तात्यासाहेबांनींहि त्या वेळच्या प्रसंगानंतर पुनः पुनः त्याची चर्चा करीत न बसतां व मागील प्रसंगाची तीव्रता विसरून पुढील कामांत मला कधींच अडथळा केलेला दिसला नाहीं. ध्येयाची दृष्टि ठेवूनच सतत कार्य करण्याचें त्यांचें धोरण असल्यानेंच तात्यासाहेब अशा प्रकारचे व्यवहार करूं शकले हेंच त्यांचें वैशिष्ट्य आहे.

(२) लोकमान्य टिळकांचा सहा वर्षांचा कारागृहवास चालूं असतांना तात्यासाहेब केसरी पत्राचे संपादक होते. केसरीच्या दरएक अंकांत सामाजिक विषयाला बरेंच मोठें स्थान प्रामुख्यानें देण्यांत येत असल्याची तक्रार वाईचे भाऊशास्त्री लेले यांनी फार जोरानें केली असल्याचें स्वतः तात्यासाहेबांनींच मला सांगितलें. माझी स्वतःची त्यांच्याकडे तीच तक्रार होती. केसरी पत्र हें सामाजिक विषयाकरितां नव्हे, अशी माझी तक्रार होती. तात्यासाहेबांचा ओढा समाजसुधारणेकडे मनापासून असल्यानें लोकमान्यांच्या गैरहजेरीत केसरीचा कल सामाजिक विषयांकडे झुकत चाललेला आहे, हें मीं तात्यासाहेबांस स्पष्ट व तीव्र शब्दांत सांगितले व नापसती दशविली. तात्यासाहेबांनी त्या वेळीं मार्मिक व प्रासंगिक उत्तर दिलें हें खरें, पण पुढें लोकमत जमेस धरून आवश्यक ते फेरफार हळूहळू त्यांनीं केले. नमूद करण्याची गोष्ट एवढीच कीं, स्पष्ट शब्दांत त्यांस निवेदन केलेल्या बाबीमुळें पुढें त्याबाबतचा राग त्यांनीं मनांत कधींच ठेवला नाहीं व माझ्याशीं वागण्यांत त्यांनी कधींच उणेंपणा ठेविला नाहीं हीं त्यांच्या वागणुकीची पद्धत व मनाची थोरवी व गर्भश्रीमंती निर्विवादपणें प्रशसनीय आहे, यांत शका नाहीं.



दत्तात्रय दिवाकर चितळे

(मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक)

तात्यासाहेब यांचा व माझा निकट असा संबंध प्रथम सन १९१८ साली आला. त्या वेळीं मी कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीचा निर्वेतन चिटणीस होतों. तात्यासाहेब हे त्या संस्थेच्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष होते. सन १९२०-२१ च्या सुमारास सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारच्या जागीं मि. ऑटो-रॉथफील्ड, आय्. सी. एस्., हे होते. त्यांना मराठी चांगलेंच समजत असे. रेव्हिन्यू खात्यांतील एक करडा अंमलदार म्हणून त्यांची ख्याति होती. स्वभावानें ते एककल्ली व कांहीस दृष्टा होते. त्यांचें असें मत होतें कीं, सहकारी संस्थांनीं आपला कारभार विशेष रुबाबानें चालवावा व त्यासाठीं सभासदांना कर्जावर थोडें जास्त व्याज द्यावें लागलें तरीहि तें द्यावें. व्याजाचा दर वाढविण्याच्या दृष्टीनें कॉस-

मांस सोसायटीनें आपले पोटनियम दुरुस्त करावेत असा त्यांचा फार आग्रह होता. कार्यकारी मंडळाच्या सभासदांचें मत याच्या अगदीं उलट होतें. तथापि रजिस्ट्रारसाहेब यांच्या आग्रहावरून त्यांचें म्हणणें साधारण-सभेपुढें दोन वेळां मांडून सभासदांच्या मतांचा अंदाज पाहिला. कार्यकारी मंडळाप्रमाणेंच याबाबत सर्वांचें मत पडल्यावरून सहकारी खात्यास त्याप्रमाणें कळविलें. परंतु मि. रॉथफील्ड यांचें समाधान न झाल्यानें त्यांनीं आपलें म्हणणें सभेपुढें समक्ष मांडण्याचा आग्रह धरला. कॉसमॉस सोसायटीची अशी प्रथा होती कीं, सल्लागार मंडळाचे अध्यक्ष हेच साधारण-सभेचे अध्यक्ष असत. सहरहू प्रथेस अनुसरून तात्यासाहेब यांनीं त्या साधारण सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल रीतसर सूचना सभेपुढें येऊन ती मंजूर झाली. तथापि मि. रॉथफील्ड यांचा असा दंडक होता कीं, ज्या ज्या सभांस ते हजर असत त्या त्या सभांचे अध्यक्ष तेच होत असत ! यामुळें याहि सभेचे अध्यक्ष आपणच आहों अशा समजानें ते स्टेजवरील अध्यक्षांच्या खुर्चीवर जाऊन प्रथमपासूनच बसले होते ! तात्यासाहेब यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली त्या वेळीं ते खालींच इतर सभासदांमध्यें बसले होते. सभा सुरू होण्याची ठराविक वेळ होतांच मि. रॉथफिल्ड यांनीं सभेच्या कामाला सुरवात करण्याबद्दल अध्यक्ष या नात्यानें मला फर्माविलें. त्यावर रजिस्ट्रारसाहेब यांचा गैरसमज झाला असून सभेच्या शिस्तीस सोडून त्यांची ही वागणूक होत आहे, हें मराठे (ॲक्च्युअरी) यांनी त्यांच्या नजरेस आणतांच साहेबबहादुर फार खजिल झाले. त्यांतच भर म्हणून तात्यासाहेब विनोदानें म्हणाले, " साहेब, आपण आहांत तेथेंच छान शोभून दिसत आहां. मी सभेचा अध्यक्ष म्हणून येथेंच बसून काम चालवितों. " तात्यासाहेबांचे हे शब्द ऐकतांच मि. रॉथफील्ड यांची मनस्थिति फारच अनुकंपनीय झाली व त्यामुळें त्यांचें धैर्य थोडें खचल्यासारखें झालें. नंतर सभेच्या कामास तात्यासाहेब यांनीं ताबडतोब सुरवात केली. मि. रॉथफील्ड हे जो विषय सभेपुढें मांडणार होते त्याचा क्रम, पत्रिकेमधील अनुक्रमांत बराच खालीं होता. तरी तात्यासाहेब यांनीं मुद्दाम त्यांच्या विषयास प्राधान्य दिलें व तो विषय सभेपुढें प्रथम मांडला ! अध्यक्षांच्या हुकुमानुसार रॉथफिल्ड यांनीं आपल्या विषयाच्या ठरीव मुद्यांचें प्रतिपादन केलें. त्यांनीं सभेपुढें अशी सूचना केली कीं, कंपनीनें व्याजाच्या दर शेंकडा २५ टक्क्यानें वाढवावा आणि हें जादा उत्पन्न संस्थेस रुबाबदार जागा, भरपूर नोकर, पगार, विजेचे दिवे, पंखे वगैरे थाटमाट, या कामीं खर्च करावे. परंतु ही विचारसरणी सभेस मुळींच मान्य होईना. सभेपुढें त्याच्या अगदीं उलट अशी उपसूचना आली व ही उपसूचना सर्वच सभासदांना सम्मत असल्याचें दिसून येत होतें. ही उपसूचना मंजूर होणार व आपला ठराव हाणून पाडण्यांत येणार, अशी रॉथफील्ड

यांची खात्री झाल्यावरून त्यांनीं आपला ठराव परत घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. परंतु सभासद त्यांना तसें करूं देईनात. अखेर आपला ठराव परत घेण्यास सभासदांचें मन वळविण्याबद्दल मि. रॉथफील्ड यांनीं तात्यासाहेबांस परोपरीनें व आग्रहपूर्वक विनंती केल्यावर तात्यासाहेब यांच्या सल्ल्यानुसार सभासदांनीं ठराव परत घेण्याबद्दल एकमतानें मान्यता दिली. त्याच वेळीं मि. रॉथफील्ड यांना तात्यासाहेब यांनी स्पष्टपणें बजाविलें कीं, आलेला अनुभव लक्षांत घेऊन यापुढें कार्यक्षम संस्थांच्या बाबतींत नसती उठाठेव करून त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचा अव्यापारेषु व्यापार त्यांनीं बंद करावा. हा सल्ला मि. रॉथफिल्ड यांना पूर्णपणें पटला व तें त्यांनीं तात्यासाहेब यांना खाजगी पत्र पाठवून स्पष्टपणें कबूलहि केलें! या प्रसंगानंतर पुढें जितकीं वर्षें मि. रॉथफील्ड हे सहकारी खात्याचे प्रमुख म्हणून काम करीत होते तोंपर्यंत, महत्त्वाच्या सर्व विषयांवर व बाबींवर निर्णय घेण्यापूर्वी, ते तात्यासाहेब यांचा सल्ला घेत असत, हें मला माहीत आहे.



माधव श्रीहरी अणे

(बी. ए., बी. एल्., बिहारचे गव्हर्नर, पाटणा)

(१) हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत १८९७ साल हें अत्यंत महत्त्वाचें समजलें जाईल यांत शंका नाही. प्लेगच्या बंदोबस्तानिमित्त ब्रिटिश सोजिरांनीं पुण्यांत जो धुमाकूळ केला होता, त्यानें चिडून जाऊन दामोदर चाफेकर या ब्राह्मण क्रांतिकारकानें गणेशखिंडींत रँड व आयर्स्ट या दोन युरोपियन अधिकाऱ्यांवर गोळ्या झाडून त्यांचा खून केला. देशांत पुढें १९०४-५ सालानंतर जी क्रांतिकारकांची व्यापक चळवळ झाली तिचा उगम पुण्यांतील क्रांतिकारकांच्या या प्रारंभीच्या धाडशी धडपडींत आहे. याच वर्षी लो. टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यांत येऊन त्यांना दीड वर्षें सक्तमजुरीची शिक्षा देण्यांत आली होती. त्या आणीबाणीच्या वेळीं टिळकांच्या केसरी-मराठा या पत्रांचें संपादकत्व जाहीरपणें पत्करण्यास केळकर व खाडीलकर या दोन तरुण व्यक्ति पुढें आल्या व महाराष्ट्रांत लोकमान्य टिळकांनीं सुरू केलेल्या चळवळी ह्या सरकारी रोष, दहशत व दडपशाही यांनीं बंद होऊं शकत नाहींत ही गोष्ट, त्यांनीं त्यांच्या कर्त्यांची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन, सर्व जगास जाहीरपणें कळविली. देशकार्याकरितां तुरुंगवास पत्करणारे लोकमान्य टिळक हे हिंदुस्थानचे पहिले सर्वश्रेष्ठ देशभक्त होत. लोकमान्यांच्या या खटल्याच्या निकालानंतर केसरी-मराठा पत्रांचे संपादकत्व पत्करणें हें ग्रीष्मऋतूंत पंचाग्नि साधन करण्याइतकेंच त्या

काळांत कठीण होतें; पण तात्यासाहेब यांनीं तें काम किती निर्भयतेनें, दक्षतेनें व उत्तम तऱ्हेनें केलें हें तुरुंगवास संपल्यावर संपादकत्व हातीं घेऊन "पुनश्च हरिः ॐ" या टिळकांनीं लिहिलेल्या अग्रलेखांत केळकर व खाडीलकर यांच्या कामगिरीचा जो अभिमानपूर्वक गौरवानें निर्देश केला होता त्यावरून कोणासहि कळून येण्यासारखें आहे. सांधा बेमालूम जुळविला अशा अर्थाच्या शब्दानें त्यांनीं त्यांच्या कामगिरीविषयीं लिहिलें आहे.

(२) तात्यासाहेबांनीं मराठ्यांतील लेखांच्या आपल्या इंग्रजी लेखनशैलीनें देशांतील नामांकित पुढाऱ्यांवर थोड्याच अवधींत कशी छाप पाडली होती याचा प्रत्यय देणारें एक उदाहरण मी वाचकांच्या नजरेस आणूं इच्छितों. १८९७ सालीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन वऱ्हाडांत अमरावती येथें झालें होतें. प्लेगचा प्रादुर्भाव, रँड-आयर्स्टचा खून, नातूबंधूंची अटक, लोकमान्य टिळकांवरील खटला व त्यांना देण्यांत आलेली कडक शिक्षा, सरकारची दडपशाही, वेल्बी कमिशन, युरोपियन सोजिरांचें उन्मत्त वर्तन, प्रो. गोपाळराव गोखले यांची माफी, इत्यादि गोष्टींमुळें या अधिवेशनास विशेष महत्त्व आलें होतें. पुणेकर प्रतिनिधींत नरसिंह चिंतामण केळकर हेहि एक प्रतिनिधि म्हणून आले होते. पुणें व नागपूर भागांतून आलेल्या प्रतिनिधींनीं टिळकांवरील खटला व त्यांना देण्यांत आलेली शिक्षा याबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करणारा ठराव राष्ट्रीय सभेंत आणून मंजूर करून घ्यावा म्हणून खटपट सुरूं केली. त्यांत तात्यासाहेब केळकर व कै. अच्युत सिताराम साठे या दोन टिळकांच्या अनुयायांनीं स्वाभाविकरीत्याच पुढाकार घेतला होता. पण तत्कालीन राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांना असा ठराव आणणें हें युक्त वाटत नव्हतें. न्यायासनासमोर कायदेशीर चौकशी होऊन आरोपीला शिक्षा झाली असल्यामुळें, हें कृत्य अन्यायाचें आहे, जुलमाचें आहे, असा ठराव काँग्रेससारख्या जबाबदार व सनदशीर मार्गानें काम करणाऱ्या संस्थेनें करणें इष्ट नाहीं हें त्या पुढाऱ्यांचें म्हणणें. यामुळें हा ठराव पुढें आणण्यासाठीं निरनिराळ्या प्रांतांतून आलेल्या पुढाऱ्यांच्या खाजगी रीतीनें भेटी घेऊन त्यांची संमति मिळविण्याचा प्रयत्न केळकर यांना करावा लागला. बंगालचे सुप्रसिद्ध वक्ते व राष्ट्रीय सभेचे एक आधारस्तंभ सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांना भेटण्यास काँग्रेस कँपमधील त्यांच्या तंबूपाशी केळकर गेले. माझे एक मित्र कै. विश्वनाथ हरी वैद्य (वणी) हे स्वयंसेवक म्हणून सुरेंद्रनाथ बॅनर्जींच्या तैनातीस तेथें होते. पूर्वी ठरल्याशिवाय सुरेंद्रनाथ हे सहसा कोणाचीहि भेट घेत नसत. केळकर हे टिळकांच्या तालमींत वाढलेले. लोकमान्यांचा दरबार सदा खुला. कोणी केव्हांहि पूर्वसंकेताशिवाय येऊन त्यांना भेटून जावें, हा त्यांचा खाक्या. त्यामुळें केळकर सरळ तंबूच्या दाराशीं आले व पडदा बाजूस सारून आंत शिरले. माझे स्नेही वैद्य हे त्यांना, थांबा, नांव-गांव व काम सांगा, असें विचारण्याकरितां

त्यांच्याजवळ येण्यापूर्वीच केळकर तंबूंत आंत गेले, हे पाहून ते स्वतः फार रागावले. अनोळखी माणसाला आंत कां सोडलें म्हणून बाबूमहाशय रागावतील अशी त्यांना मोठी भीति वाटूं लागली. केळकर हे एकटेच आंत शिरले; सुरेंद्रबाबू हे आंत असलेले त्यांच्या दृष्टीस पडले व त्यांनीं कांहीं एक औपचारिक शब्दांचा उपक्रम न करतां एकदम बाबूमहाशयांकडे पाहून म्हणाले, " Yes, I take the liberty of introducing myself to you. I am N. C. Kelkar, editor of Kesari and Maratha, Poona. " हे शब्द ऐकतांच सुरेंद्रबाबू उठले व त्यांनीं मोठ्या प्रेमानें केळकरांशीं हस्तांदोलन करून त्यांस आरामखुर्चीवर बसाविलें. " A brave Mahratta warrior that you are. You have made a surprise attack very successfully " असें म्हणून ते हंसले व टिळकांच्या पाठीमागें त्यांच्या पत्रांचें संपादकत्व पत्करून तें मोठ्या योग्यतेनें चालविल्याबद्दल त्यांनीं त्यांची फार प्रशंसा केली. " टिळकांच्या खटल्यासंबंधानें प्रत्यक्ष सरकारच्या निंदेचा ठराव आणतां आला नाहीं तरी, मी नातूबंधूंच्या अटकेवरील ठरावांत टिळकांवर झालेला खटला व त्यांना देण्यांत आलेली अमानुष शिक्षा यांचा उल्लेख करून त्यासंबंधाची नापसंती व्यक्त करण्याची संधि प्रतिनिधि व प्रेक्षक यांना देईन " अशा आशयाचें आश्वासन बाबूजींनी केळकर यांस दिल्यावर " Half a loaf is better than nothing " असा विचार करून तात्यासाहेब तेथून परतले. केळकरांना माझे मित्र वैद्य यांनीं प्रथम ओळखलें नव्हतें. पण आत गेल्यावर त्यांनीं नांव सांगितल्यावरून ते केळकर असल्याचें त्यांस कळलें. हे दोन पुढारी प्रेमानें बोलत आहेत हें पाहिल्यावर स्वयंसेवक वैद्यांची मनांतील भीति नाहीशी झाली. त्यांनीच वरील मुलाखतीची हकीकत मला अधिवेशनाहून परत आल्यावर नागपूर मुक्कामी सांगितली. पुण्याबाहेरील हिंदुस्थानच्या नामांकित पुढाऱ्यांशी तात्यासाहेबांची ही कदाचित् पहिलीच मुलाखत असण्याचा संभव आहे. सुरेंद्रनाथ बॅनर्जींना तात्यासाहेबांची ओळख 'मराठ्यां'तील त्यांच्या इंग्रजी लेखांमुळे पूर्वीच झाली होती व त्यांच्या मनावर त्यांच्यासंबंधी अनुकूल वृत्ति उत्पन्न झाली होती म्हणूनच पूर्वसंकेतावाचून अचानक त्यांच्या भेटीस ते गेले असतांहि मोठ्या प्रेमाने व अगत्याने त्यांस ते भेटले असें मला वाटतें. कारण कलकत्त्यांत मोठमोठे राजेरजवाडे, जमीनदार, अधिकारी व प्रतिष्ठित श्रीमंत लोक यांनाहि सदर बाबूजींची भेट घेण्यासाठीं पूर्वसूचना देऊन ठेवावी लागत होती.



पां. श्री. आपटे

(बी. ए., गुरुजी, विनय मंदिर, येवलें)

(१) बऱ्याच वर्षांमागें केळकरांची " रचसी केश-भूषा अथवा कुसुमचाप-पाशा " ही कविता मीं वाचली होती. त्यावरून माझा समज असा झाला होता कीं, त्यांच्या नखरेबाज लेखणीप्रमाणें त्यांची नित्याची वेषभूषाहि ठाकठिकीची असेल. १९२३ च्या आगेमागें ते येवल्यास व्याख्यानाकरितां आले होते. आम्ही राष्ट्रीय शाळेंतील मंडळी त्यांस आणण्यास स्टेशनवर गेलों होतों. रात्रीं ते गाडींतून उतरले ते अगदींच साध्या वेषांत; परीटघडीचे कपडेहि त्यांनीं बरोबर आणले नव्हते, हें पाहून मला आश्चर्य वाटलें. बौद्धिक आनंद लुटण्यांत अंतर्मुख झालेलें मन बाह्य वेषाकडे कोठून पाहणार ! " **भाच्यानें आयत्या वेळीं पुढें केलें तरच टिळकांच्या अंगावर जरीचें उपरणें दिसावयाचें** " हे टिळकासंबंधींचे केळकरांचे उद्गार त्यांना तंतोतंत लागू होते.

(२) १९२८ सालीं मुलाच्या व्रतबंधाच्या वेळीं बटूस आशीर्वाद द्यावा म्हणून मी त्यांच्याकडे गेलों होतों. पान-सुपारीबरोबर भोजनाचेंहि निमंत्रण त्यांस दिलें. त्यांनीं तें तात्काळ स्वीकारून आम्हांला मोकळें करतांना ते म्हणाले, " भोजनाला पुन्हा निमंत्रण देण्याला कोणाला पाठवूं नका. मी वेळेवर येतोंच ", असें म्हणून या संकेताची त्यांनीं लगेच डायरींत नोंद केली. पंचवीस वर्षांपूर्वी तरी आमचे पुष्कळसे पुढारी संकेतदक्ष नसत. टिपण न केल्यामुळें पुष्कळ वेळां कबूल करून समारंभास ते हजर राहूं शकत नसत. या बाबतींत केळकरांची दक्षता युरोपिअन लोकांच्या पद्धतीची पाहून मला विशेष आनंद वाटला. असो. ठरल्याप्रमाणें ते मुंजीच्या वेळीं आले, पान-सुपारी घेऊन त्यांनीं बटूस आशीर्वाद दिला व मला म्हणाले, " मी साडेदहा वाजतां जेवण्यास येतों म्हणून सांगितलें होतें खरें; पण मला अर्धा तास उशीर होईल, कांहीं महत्त्वाचें काम आहे. " त्याप्रमाणें ते ११ वाजतां आले. केळकरांची ही दक्षता पाहून आम्हांला त्यांच्याबद्दल आदर वाटला व प्रसंग लक्षांत राहिला.

(३) वरिष्ठ विधिमंडळाच्या निवडणुकीच्या वेळीं ते येवल्यास पुन्हां आले होते. रात्रीं व्याख्यान झाल्यावर ते म्हणाले, " गाडी पहाटें चार वाजतां आहे, घरीं झोंपलों तर गाडी चुकावयाची व मला तर त्या गाडीनें गेलेंच पाहिजे, म्हणून मी स्टेशनवर जाऊन झोंपतों." गांवांतील बड्या लोकांनीं आम्ही तुमची गाडी चुकवूं देणार नाहीं म्हणून सांगितलें; परंतु आमच्या लोकांच्या दक्षतेचा त्यांस अनुभव होता म्हणून त्यांनीं जाण्याचा आग्रह धरला व बड्यांनीं त्यांस संमति दिली ! इतक्यांत एक तरुण पुढें झाला व म्हणाला, " आपण स्टेशनवर जातांन

आमची अब्रूहि घेऊन जाल ! तुम्हांला तीन वाजतां उठवून चाराची गाडी साधून देणारा एकहि मनुष्य येवल्यांत नाहीं काय ? इतकें नादान आम्ही असलों तर मग आम्ही स्वराज्य कसलें मिळविणार ! आम्हांला एकदां संधि देऊन तर पहा.'' त्या तरुणाचे ते भावनोप्रधान उद्गार ऐकून तात्यासाहेब म्हणाले, "अनुभवानें मी शहाणा झालों आहें, पण आतां झोंपतों बुवा येथें. पण गाडी चुकूं देऊं नका हं.''

त्या तरुणानें खात्रीच्या तांगेवाल्याला सांगून ठेवलें कीं, डॉ. भटांच्या घरासमोर पहाटें तीन वाजतां तांगा उभा कर. तांगेवाल्यानें शपथपूर्वक येतों म्हणून सांगितलें. त्या तरुणास नीट झोंप आलीच नाहीं व तो तांगेवाल्याला दोन वाजतां उठवावयास गेला; तो तांगेवाला दारू पिऊन धुंद होऊन पडला होता. मग तेवढ्या रात्रीं दुसरा तांगा गांठून त्यांच्या घरासमोर त्या दक्ष तरुणानें उभा केला. तों घड्याळांत तीनचे ठोके पडले. केळकर जागे होतेच. वाटच पहात होते. नंतर कांहीं मंडळी त्यांना पोहचविण्यासाठीं स्टेशनवर गेली. केळकर गाडींत बसतांना त्या दक्ष स्वयंसेवकांकडे पाहून म्हणाले, "याच्यामुळें मला स्वस्थ झोंप मिळाली व गाडीहि साधली. पण यांना त्यांच्या प्रतिज्ञेमुळें फार श्रम पडले म्हणून मला दुःख होत आहे'' असें पुन्हां पुन्हां बोलून त्यांनीं आभार मानून कृतज्ञताहि दर्शविली. स्वयंसेवकांच्या सेवेचें असें चीज करणारे फारच थोडे पुढारी असतात. हे गुण दिसावयाला लहान खरे; पण याच गुणानें पुढारीपण मिळतें व टिकतें.



कृष्णाजी महादेव ऊर्फ पैसाफंड रानडे

(देशदास, पुणें)

(१) सर्व सार्वजनिक कामांत मी स्वयंसेवकाचें कार्य करणारा या नात्यानें एकदां तात्यासाहेब यांच्या बरोबर मी कोकणांत गेलों होतों. पुण्याहून निघून परत पुण्यास येईपर्यंत सर्व मुक्कामांत सर्व वेळीं खाणें, जेवणें, निजणें वगैरे सर्व बाबतींत तात्यासाहेब माझी काळजीपूर्वक इतकी विचारपूस करीत कीं, तो सर्व प्रकार पाहून माझी मलाच लाज वाटे. कारण स्वयंसेवक म्हटला म्हणजे त्याचें कोणीं कसेंहि पोतेरें करावें, असा माझा अनुभव असल्यामुळें, तात्यासाहेब यांच्या या आत्मौपम्य दृष्टीनें वागण्याचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. रामदास दासां सांभाळितो कैसा । जीव प्राणा जैसा तैसा पाहे ॥ असें श्रीसमर्थांचें वर्णन केलें आहे तें येथें तंतोतंत लागू पडतें !

(२) नाशिक येथें कांहीं सार्वजनिक कामास मी गेलों असतां तेथें अपघातानें माझा हात मोडला. म्हणून मी मुंबईस डॉ. भाजेकर यांच्या दवाखान्यांत

गेलों. त्याचवेळीं मुंबईस सरदारगृहांत लोकमान्य शेवटच्या आजारानें अत्यवस्थ होते. तात्यासाहेब लोकमान्यांच्या जवळून एक क्षणभरहि दूर जात नसत. पण मी दवाखान्यांत येऊन पडलेला आहे हें त्यांस कसें कळलें न कळे. ते तशा परिस्थितींत वेळ काढून विलक्षण व्यग्र मनःस्थितींत लगबगीनें वरचेवर मजकडे दवाखान्यांत येऊन माझी चौकशी करीत, धीर देत व मला सर्व प्रकारची मदत करण्याबद्दल डॉ. भाजेकर यांस विनंती करीत. उरक, आपलेपणा व परोपकार यांचे ते प्रतीक होत.

(३) थोर पुरुषांची वाणी विलक्षण प्रभावी असते. रा. नारायणराव राजहंस यांस लोकमान्यांनी 'बालगंधर्व' पदवी दिल्यानें याच नांवानें ते ओळखले जाऊन त्यांचें मूळ नांव लोक विसरले! तसेंच कांहींसें माझेंहि झालें. पैसाफंडाचें काम अत्यंत तन्मयतेनें दीर्घकाल मी केल्यामुळें सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत एतद्विषयक भरलेल्या एका जाहीर सभेंत, अध्यक्ष तात्यासाहेब यांनींच स्वयंस्फूर्तीनें मला "देशदास" ही पदवी दिली व त्याच नांवानें मी ओळखला जातों!

(४) निर्लोभपणानें पैसाफंडाचें काम मी करीत असतां × × × या गृहस्थानें, मी पैसाफंडातून पैसे खातों, असें मेळ्यांतील एका पदांत ध्वनित केलें व हे "देशदास" नसून 'देशडास' आहेत असें म्हटलें! मला अति दुःख झालें. मीं हें सर्व तात्यासाहेब यांस श्रुत केलें. त्यांस वाईट वाटलें. त्यांनीं या कामाकरितांच शिवाजी मंदिरांत बोलाविलेल्या जाहीर सभेंत हा विषय काढून मजवरील हा आरोप एक तर जाहीरपणानें पुढें येऊन सिद्ध करावा किंवा व्यर्थ आळ घेतल्याबद्दल प्रामाणिकपणानें माफी मागावी असें अत्यंत त्वेषपूर्वक भाषण करून जाहीर आव्हान दिलें. शेवटीं त्या गृहस्थानें माफी मागून हें प्रकरण संपविलें.

वि. स. खांडेकर

(साहित्यिक, कोल्हापूर)

(१) १९२६ सालच्या मे महिन्यांत मी मोकळेपणानें तात्यासाहेब कोल्हटकरांच्या सहवासांत सारी सुट्टी घालविण्याकरितां मुंबईला आलों. कोल्हटकरांनीं आपल्या प्रवासाच्या कार्यक्रमांत तात्यासाहेब केळकरांकडे पुण्याला आठ-पंधरा दिवस रहावयाचें निश्चित केलें होतें. मीहि त्यांच्याबरोबर पुण्याला जावें असें ठरलें. केळकरांच्या घरीं उतरल्यावर त्यांच्याविषयीं मला जी अकारण भीति वाटत होती ती एका पळांत लोप पावली! अगदीं खेळीमेळीनें आम्हीं बोलूं लागलों. तात्यासाहेब कोल्हटकरांनीं 'हे खांडेकर' म्हणून माझ्याकडे बोट दाखवून माझा

औपचारिक परिचय करून देतांच 'गाढवाची गीता' लिहिणारे खांडेकर तुम्हीच ना ? असा केळकरांनी मला हंसत हंसत प्रश्न केला. या वेळीं सावंतवाडीला माझे स्नेही श्री. शिरोडकर यांनी सुरू केलेल्या 'वैनतेय' साप्ताहिकांत 'गाढवाची गीता' या नांवाची माझी एक नाट्यछटात्मक विनोदी लेखमाला येऊन गेली होती. तिला उद्देशून तात्यासाहेबांचा हा प्रश्न होता. त्यांच्याकडे 'वैनतेय' जात असला तरी त्यांच्या-एवढा मोठा व कार्यव्यापून मनुष्य माझ्यासारख्या कोंकणच्या कोंपऱ्यांत पडलेल्या लेखकाचें लिखाण वाचीत असेल अशी मला कल्पनासुद्धां नव्हती ! मी चकित होऊन त्यांच्याकडे पाहूं लागलों. विनोदी लेखमालेचा प्रश्न त्यांनीं विनोदानेंच विचारला होता; याचा प्रत्यय मला पुढें लवकरच आला. 'वैनतेय' वर्तमानपत्रांत पहिल्या-पहिल्यांदा मी अग्रलेख, स्फुटे वगैरे मजकूरसुद्धां लिहीत असे. त्या अग्रलेखांतील कोंकणावरल्या माझ्या एका लेखाचें कात्रण तात्यासाहेबांच्या संग्रहीं पाहून मी विस्मित झालों. साहित्यसम्राट म्हणून गौरवल्या जाणाऱ्या त्यांच्यासारख्या मोठ्या माणसाच्या अंगीं इतकें जागरूक वात्सल्य, इतकी सर्वस्पर्शी रसिकता आणि आपलेपणा पाहून मला विस्मय वाटला.

(२) पुढें जवळ जवळ पंधरा दिवस केळकरांच्या घरीं रात्रीं काव्यशास्त्र-विनोदाला जो पूर येई, त्याचें वर्णन कितीहि केलें तरी तें अपुरेंच होईल. त्या बैठकींत दोघांहि तात्यासाहेबांचा कोटिबाजपणा प्रगट व्हायचा, कॉलेजांतल्या जुन्या आठवणी निघायच्या, वाङ्मयविषयक मतें प्रगट व्हायचीं, गाणें-बजावणेंहि चालायचें ! केळकरांच्या मानसमंदिरांत टिळकांच्या जोडीनें रानड्यांच्या मूर्तीलाहि स्थान आहे हे मला त्या वेळच्या त्यांच्या बोलण्यांतूनच प्रथम कळलें.

(३) शिरोड्याला एकदां माझ्याकडे ते ऐन उन्हाळ्यांत आले होते. कोंकणांत अशा वेळीं अंगांतून घामाच्या धारा वाहत असतात. गांव व गांवाजवळचीं मिठागरें पहायला आम्ही निघालों. तेव्हां तात्यासाहेब अंगांत सदरा घालायला सुद्धां तयार होईनात. मीं त्यांना म्हटलें, 'असे उघडेच जाणार तुम्ही ! लोक काय म्हणतील !' ते उत्तरले, 'लोक म्हणतील हा आपल्यापासून कांहीं न लपविणारा मनुष्य आहे. याचा कारभार सारा उघडा आहे.' त्याच वेळीं त्यांना एक रसाळ फणस विशेष आवडल्यामुळें त्याच झाडाचा दुसरा फणस त्यांच्याकरितां पाठवून देण्याविषयीं मीं माझ्या एका स्नेह्यांना कळविलें. फणस आला. तात्यासाहेबांनीं तर त्या दिवशीं फलाहारावरच राहावयाचें ठरविलें होतें ! पण त्या दुसऱ्या फणसाचा पहिला गरा तोंडांत टाकतांच ते म्हणाले, 'हा फणससुद्धां चांगला आहे. पण मघाच्या फणसाची सर याला नाहीं.' लगेच हंसत हंसत ते पुढें म्हणाले, 'जीभ ही साऱ्या रसिकांची राणी आहे. तुम्ही टीकाकार कोल्हटकर आणि खाडिलकर ह्यांच्या नाटयगुणांतलें अंतर अचूक सांगतांना ? जीभ ही सुद्धां तितकीच चोखंदळ आहे. ती कुठल्याहि

रसाचे सूक्ष्म गुणावगुण क्षणार्धात सांगू शकते.' त्यांची 'नवलपूरचा संस्थानिक' ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यावर प्रजेचीं दुःखें जाणून घेण्याकरितां वेषांतर करून फिरणारा त्यांतला संस्थानिक नायक अगदीं आधुनिक हरून् अल् रशीद दिसतो अशी मीं टीका केली होती. त्यानंतर त्यांची माझी भेट झाली तेव्हां ते म्हणाले, 'संस्थानिक गुप्त वेषानें प्रजेचीं दुःखें जाणून घेण्याकरितां फिरेल हें तुम्हांला अस्वाभाविक वाटतं; पण तुमच्या 'दोन ध्रुवां'तली नायिका – ती पांढरपेशा समाजांतील असून कारखान्यांत काम करायला जाते हें कितीसें स्वाभाविक आहे?'

(४) दुर्दम्य उत्साह, अनुपम वाङ्मयप्रेम आणि अखंड ज्ञानलालसा यांच्या संगमांतून उद्भवणारे त्यांचे अनेक संकल्प अपुरे राहिले, हें मला माहीत आहे. मानवी जीवनाचा व मानवाच्या शक्तीचा मर्यादितपणा लक्षांत घेतां असें होणें स्वाभाविकच आहे. पण एका गोष्टीबद्दल मात्र राहून राहून वाईट वाटतें; ती म्हणजे तात्यासाहेबांचें सुवर्णमध्याचें जें आवडतें तत्त्वज्ञान होतें त्याची विस्तृत मीमांसा त्यांच्याच लेखणींतून झाली नाहीं हें होय. अव्यवहार्य आदर्श व ध्येयहीन व्यवहार यांच्यामध्यें सांपडून सामान्य मनुष्य सध्यां संभ्रमांत पडल्यासारखा झाला आहे. तात्यासाहेबांच्या असल्या प्रबंधानें या संदेहावस्थेंतून बाहेर पडण्याला त्याला मोलाचें साहाय्य झालें असतें, असें माझ्याप्रमाणें अनेकांना वाटत असल्याचें मला माहीत आहे.

*

कोंडो महादेव कुमठेकर

(रिटायर्ड डिस्ट्रिक्ट सेशन्स जज्ज, पुणें)

(१) तात्यासाहेब यांचा परिचय माझे वडील कै. रा. ब. तात्यासाहेब कुमठेकर यांच्यामुळें झाला. माझे वडील पंचवीस वर्षें पुणें शहर म्युनिसिपालटीचे चीफ ऑफिसर होते. तात्यासाहेब हेहि बरींच वर्षें म्युनिसिपल कौन्सिलर होते. शिवाय लेगमुळें तात्यासाहेब हे आम्हीं जेथें राहत होतों त्याच्या अगदीं शेजारीच कांहीं वर्षें रहात होते. यामुळें आमचे व त्यांच्या कुटुंबाचे दाट परिचयाचे संबंध आले. त्यांचे वडील बंधू कै. नारायणराव हे मी पुणें हायस्कूलमध्यें असतांना आम्हाला शिक्षक होते. त्या वेळचे माझे सहाध्यायी व स्नेही श्रीमंत बाबासाहेब पंतसचिव (त्या वेळचे युवराज) यांचे नारायणराव केळकर हे ट्युटोरियल गार्डीयनसारखे कांहीं दिवस होते. त्यामुळें तात्यासाहेबांचा व श्रीमंत बाबासाहेब यांचाहि बराच परिचय झाला व त्यामुळें माझाहि उभयता केळकर बंधूंशीं विशेष स्नेह झाला. आमच्या घराण्याचा सातारचे डॉ. देशपांडे यांच्या घराण्याशीं घरोबा होता. सातारचे डॉ. देशपांडे यांचें

चतुर्थ चिरंजीव बाबूराव यांचा विवाह तात्यासाहेब यांची कन्या (डॉ. कमलाबाई) यांच्याशीं झाला; यामुळेंहि आम्हां उभय घराण्यांचा निकट संबंध आला.

(२) तात्यासाहेबांना श्रीमंत भोरकरांबद्दल फार आदर होता. सर्वच संस्थानांबद्दल, विशेषतः भोर संस्थानाबद्दल, त्यांना आपुलकी वाटत होती. संस्थानविषयक गोष्टींत ते प्रथमपासूनच लक्ष घालीत असत. संस्थानांचे ते कैवारी होते. संस्थानविषयक घडामोडी व चर्चा यामुळें माझा व त्यांचा दाट परिचय झाला व एकमेकांचे गुणावगुण एकमेकांना कळले. मीं जेव्हां भोर संस्थानचें दिवाणपद १९४० मध्यें सोडलें, त्या वेळेस केसरीशीं तात्यासाहेबांचा अधिकृत संबंध नसतांनाहि त्यांनी केसरींत एक मार्मिक संपादकीय स्फुट लिहिलें. यावरून श्रीमंत भोरकर, मी व संस्थान यांच्याविषयीं त्यांना किती कळकळ वाटत होती हें दिसून येते.

(३) एक चमत्कार असा कीं, भोर संस्थानमध्यें प्रथम सत्याग्रह तात्यासाहेब केळकर व वामनराव पटवर्धन यांनीं पूर्वीचे श्रीमंत राजेसाहेब पंतसचिव यांच्या कारकीर्दीत केला व तेच तात्यासाहेब पुढें भोर संस्थानचे व राजेसाहेबांचे सल्लागार व एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलचे प्रेसिडेंट झाले! त्यांच्या त्या कारकीर्दीत ते मजकडे वरचेवर सल्ला घेण्यास येत व मलाहि आपल्याकडे बोलावीत. त्यांची राजेसाहेबांविषयीं व प्रजेविषयीं कशी कळकळ होती हें त्या वेळेस मला अनेक रीतीनें दिसून आलें.

(४) मी भोरची दिवाणगिरी सोडून दिल्यावर गेलीं पांच-सहा वर्षें मिरज सीनियर व ज्यूनियर संस्थानचे हायकोर्ट जज्जाचें काम करीत असे. तात्यासाहेबांचें कांहीं शिक्षण मिरजेंत झालें. मिरज संस्थानाबद्दल व तेथील अधिपति श्रीमंत नारायणराव तात्यासाहेब यांच्याबद्दल केळकरांना कशी आपुलकी वाटत होती याचें प्रत्यंतर अनेक रीतीनें मला दिसून आलें. पण त्याचा तपशील देत नाहीं.

(५) संस्थानें राहावींत अशा मताचे तात्यासाहेब होते. पण संस्थानिकांनीं राज्यकारभारांत स्वतः लक्ष घालून प्रजेचें कल्याण करावें, अशी त्यांची फार इच्छा असे. ते नेहमीं मला म्हणत असत कीं, "हे पहा दादा, हे संस्थानीक जर दिवसांतून ठराविक वेळेस ऑफिसांत येऊन तास दोन तास बसून काळजीनें काम पाहतील व प्रजेचीं गाऱ्हाणीं प्रत्यक्ष ऐकतील तर, प्रजेचें कितीतरी कल्याण होईल व त्यांचा ते दुवा घेतील; व राजे लोक जो बेसुमार तनखा घेतात तो डोळ्यावर येणार नाहीं व त्याचें चीज केल्यासारखें होईल." कांहीं संस्थानीक तर संस्थानी कामांत मुळींच लक्ष घालीत नाहींत याबद्दल तात्यासाहेबांना अतिशय राग येत असे व फार हळहळ वाटत असे.

❋

ह. वि. पाटसकर

(बी. ए., एलएल्. बी., आमदार, घटना-समितीचे सभासद, चाळीसगांव)

(१) तात्यासाहेब यांच्या घराण्याचा व माझा फार जुना ऋणानुबंध होता. शिवाय ते माझ्या वडिलांचे कॉलेजमधील सहाध्यायी होते. अर्थात् तात्यासाहेब यांच्याविषयीं मला लहानपणापासून आदर वाटे. या पूर्व ऋणानुबंधामुळें आमचे संबंध पक्षभेद होऊनहि अखंड राहिले. महाराष्ट्रांत पक्षभेद विकोपास गेल्यानंतरहि ते खानदेशांत चाळीसगांवी आले कीं, मजकडेच उतरत. त्यांना या बाबतींत कित्येकांनी छेडलें. पण त्यांचें उत्तर एक! 'मी चाळीसगांवी आलों कीं हरिभाऊंकडेच उतरणार!' यावरून राजकीय मतभेद असले तरी ते वैयक्तिक संबंधापासून अलग ठेवण्याइतका त्यांच्या मनाचा मोठेपणा होता.

(२) मी कॉन्स्टिटयूअंट असेंब्लीकरितां उभा राहिलों. त्याच्यापूर्वी मी पुण्यास गेलों होतो. मी कॉ. असेंब्लीला उभा राहत आहें असें मीं त्यांना सांगितलें. त्यांनींहि 'जरूर उभे राहा' असें सांगून मला उत्तेजन दिलें. अशा रीतीने आमच्यामधील सलोख्याचें वातावरण, मतभेद होऊनहि, कधी दूषित झालें नाही.

(३) १९४०।४१ सालीं आक्टोबरमध्यें 'सद्यःस्थिति' या राजकीय विषयावर माझें धुळें येथील शारदोत्सवांत व्याख्यान ठरलें होतें. त्या वेळीं तात्यासाहेब अनायासें कांहीं कारणानें धुळ्यास आले होते. व्याख्यानाच्या चालकांनीं केळकर यांस तुमच्या व्याख्यानाचे अध्यक्ष केले तर चालेल का? असें मला विचारलें. 'तात्यासाहेबांची तयारी असेल तर माझी कांहींच हरकत नाहीं' असें मी म्हणालों. त्यांनीं कबूल केलें. दोन भिन्न मतांचे आम्ही एकाच व्यासपीठावरून बोललों. पण कोणत्याहि तऱ्हेनें सभेचें उदात्त वातावरण बिघडलें नाहीं. हेंच तात्यासाहेबांच्या थोर मनाचें, सौजन्याचें व समतोल बुद्धीचें द्योतक!

(४) १९२३ सालीं मी स्वराज्य पक्षातर्फे जुन्या मुंबई कौन्सिलकरितां उभा होतों. तात्यासाहेब दिल्लीच्या मध्यवर्ती असेंब्लीकरितां उभे होते. खानदेशांतील प्रचार आम्हीं एकत्रच केला. त्याच वेळीं नुकतेच सेवानिवृत्त झालेले त्यांचे बंधु श्री. अप्पासाहेब केळकर हेहि त्याच निवडणुकीकरितां उभे होते. ते स्वतंत्र म्हणून उभे होते; व एका दृष्टीनें माझ्या उमेदवारीचा प्रचार हा अप्पासाहेब केळकर यांच्या निवडणूक-प्रचाराविरुद्ध होता; तथापि नुसती पक्षाची शिस्त म्हणून दिखाऊ नव्हे तर पक्षाच्या यशस्वीपणाकरितां तात्यासाहेबांनीं मनःपूर्वक माझ्या उमेदवारीकरितां पाठिंबा देणारा प्रचार केला! आमच्या संयुक्त दौऱ्यांत तर एका सभेंत कांहीं श्रोत्यांनीं त्यांना या बाबतींत सवाल केला. पण त्यांनीं त्या सवालाला योग्य, सरळ व समर्पक उत्तर दिलें.

(५) आम्ही बराच काळ एका पक्षांत होतों व ते त्या काळांत त्या पक्षाचे पुढारी होते. त्यांच्याइतका निगर्वी, सालस व समतोल बुद्धीचा दुसरा पुढारी माझ्या तरी पाहण्यांत नाहीं. आम्ही एका पक्षांत होतों त्या वेळी तो पक्ष काँग्रेस अंतर्गत होता. कांहीं कालानें त्या पक्षाचा सभासद काँग्रेसचा सभासद असलाच पाहिजे ही अट काढून टाकण्यांत आली व त्या वेळेपासून त्या पक्षाचा व माझा संबंध सुटला. तथापि त्यानंतर ज्या ज्या वेळीं आमच्या दरम्यान चर्चा झाली त्या त्या वेळीं नुसती परमतसहिष्णुताच नव्हे तर परमताचा आदरहि मला त्यांच्या ठिकाणीं दिसून आला. एकदां तर वादविवाद करतांना मी त्यांना म्हणालो, 'तात्यासाहेब, मला असें वाटतें कीं, मीच माझ्या मताला चिटकून राहिलो आहें व बाकीचे सर्व आपल्या पक्षांतील लोक बदलले आहेत.' मी राजकारणांत त्यांच्या मानानें फार नवीन असलों तरी त्यांनीं माझें हे म्हणणें शांतपणें व विचारपूर्वक ऐकून घेतलें. इतकेंच नव्हे तर, त्यांनी माझ्या म्हणण्याबद्दल जो आदर दाखविला तो मी केव्हांहि विसरणार नाहीं. कारण, आता परमताचा आदर ही गोष्ट जवळ जवळ लुप्तच होत चाललेली दिसते!



वि. पां. करमरकर

(शिल्पकार, मुंबई)

(१) तें १९१९ साल असेल; त्या वेळी मी कलकत्ता येथें राहत असून धंद्यांत सुरुवातीचें पाऊल टाकीत होतों. त्या वेळचे कलकत्त्याचे महाराष्ट्रियन श्री. नानासाहेब ढवळे वगैरे मंडळींचा माझ्यावर अत्यंत लोभ होता. त्यामुळें तात्यासाहेब यांची व माझी भेट झाली. तात्यासाहेबांनीं प्रथम भेटींतच माझ्या स्टूडिओंत येण्याचें कबूल केलें व आले. चित्र व शिल्पकलेसंबंधीं अनेक तज्ज्ञेच प्रश्न त्यांनीं विचारले व ते अगदीं आपलेपणानें विचारल्यामुळें मला त्यांचीं उत्तरें देतां आलीं व कलेसंबंधीहि बरेंच बोलतां आलें. त्यावर तात्यासाहेब म्हणाले, "हे तुम्ही आतां जें बोलला तें सारें लिहून कां नाहीं काढीत? लिहून काढा, मी तें केसरींत देतों." मीं म्हटलें, "मला लिहिण्याचा सराव नाही, त्यामुळें तें होणार नाहीं." ते म्हणाले, "ही तुमची गैरसमजूत आहे. ज्याच्याजवळ कांहीं विचार आहेत त्याला तें लिहितां येतात. तुम्ही प्रयत्न करून पाहा. ज्याला शिकायची इच्छा असेल त्यानें शिकवायला लागावें, म्हणजे त्याचें स्वतःचें शिकून होते." मला तें खरें वाटलें नाहीं, इतकेंच नव्हें तर हें असें कसें सांगतात याचें आश्चर्य वाटलें. जातांना पुन्हां म्हणाले, "आळस करूं नका. लवकर लिहून धाडा." त्यांच्या उपदेशाप्रमाणें मीं धीर करून लिहिलें व त्यांच्याकडे धाडून दिलें. तें तात्यासाहेबांनीं केसरींत प्रसिद्ध केलें! मला

त्यामुळें धीर आला व तात्यासाहेबांसंबंधीं आदर वाढला. तेव्हांपासून मीं लिहायला लागलों. त्याला कारण तात्यासाहेब आहेत. त्यांच्याकडून उत्तेजन मिळालें नसतें तर माझी धास्ती दूर झाली नसती व लेखणी मीं कधींच हातांत घेतली नसती.

(२) तें १९३५ साल होतें. तात्यासाहेबांना माझ्या घरीं सासवण्याला येऊन मला सिटिंग द्याल काय अशी पत्र लिहून विनंती केली. त्यांनीं ताबडतोब लिहून कळविलें कीं, जरूर येईन. त्याप्रमाणें ते आले, सिटिंग दिलें, बस्ट पुरा केला. त्या निमित्त ते माझ्या घरीं तीन दिवस होते. तिन्ही दिवस काम करतांना व इतर वेळीं मोकळेपणानें बोलण्याची मुभा मिळाली व ती त्यांनीं दिली. मीं म्हटलें ' तात्यासाहेब, लोकमान्यांच्या पाठीमागें महाराष्ट्र म्हणजे आपण व कृष्णाजीपंत खाडीलकर हाच महाराष्ट्र आम्हीं समजत होतों; परंतु राजकारणांत महाराष्ट्राला अर्थात् आपणा दोघांना असावें तें स्थान राहिलें नाहीं किंवा टिकलें नाहीं याचें कारण काय ? आम्हांला वाटतें आपल्या व कृष्णाजीपंतांच्या मतभेदामुळें ही स्थिति आली. त्यावर तात्यासाहेब म्हणाले, " मतभेद हें खरें कारण नव्हें. खरें कारण असें– लोकमान्यांच्या कालांत राजकारण सुशिक्षित वर्गांतच होतें. आतां तें अशिक्षित वर्गांत पोहोंचलें आहे. महाराष्ट्राचे आम्ही पुढारी असून, आम्हांला निवडणुकी जिंकणें अशक्य झालें, हें खरें; याचें कारण निवडणुकी हें पैशाचें काम होऊन बसलें आहे. तें आम्हां महाराष्ट्रियांना अवघड झालें. कॉंग्रेस ज्यांच्या हातांत गेली त्यांना पैशांचें पाठबळ भरपूर होतें व आहे. आम्हांला विरोधी प्रचार करावयाचा तरी पुण्याहून सोलापूरला जावयाचें म्हटल्यास पैशांची व्यवस्था नाहीं. उलट कॉंग्रेसवाले वाटेल तेव्हां विमानानें धावले तरी त्यांना पैशाची भरपूर मदत मिळावयाची. अशिक्षितांचीं मतें विकत घेतां येतात व तें फक्त त्यांनाच शक्य आहे. यामुळें महाराष्ट्र पुढें राहूं शकला नाहीं. कृष्णाजीपंत कॉंग्रेसला धरून राहिले तरी ते पुढारी होऊं शकले नाहींत, याचें खरें कारण हेंच आहे."

(३) आम्हीं सासवनेकरांनीं गु. रामजी लक्ष्मण घरत यांचा ८१ वा वाढदिवस साजरा करण्याचें ठरविलें. तें १९३४ किंवा १९३५ साल असेल. तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर समारंभ करावा, असें सर्वांच्या इच्छेनुरूप ठरलें. त्याप्रमाणें तात्यासाहेबांना आमंत्रण दिलें. त्यांनीं आनंदानें स्वीकार केला. ठरलेल्या दिवशीं मी तात्यासाहेबांना बोटीनें घेऊन जात होतों. बोटींत अनेक मंडळी त्यांच्याभोंवतीं जमली. तात्यासाहेबांनीं आम्हांला विचारलें, घरतांची घरची व चरितार्थाची स्थिति कशी आहे ? मीं सांगितलें, स्थिति चांगली नाहीं. त्यांना महिना १५–२० रुपयांची जरूरी आहे व ती मदत आम्ही सासवन्यांतली तीनचार मंडळी करूं शकूं. त्यावर तात्यासाहेब म्हणाले, " हें पाहा, असें करूं नका. प्रत्येकाची इच्छा असली तरी काल बदलत असतो, परिस्थिति बदलत असते,

सर्वांच्याच हातून वचनें दिलेलीं पुरीं होऊं शकत नाहीं. म्हणून जी काय घरतांच्या चरितार्थाची सोय करावयाची असेल ती याच समारंभाच्या वेळीं करा व रक्कम उभी करून ती बँकेत ठेवा व जरूर तेवढे दर महिना त्यांना देत जा. जर आजच्या समारंभांत तशी योजना जाहीर करीत असाल तर माझे २५० रु. जाहीर करा. ते मी धाडून देईन." या स्फूर्तिदायक भाषणामुळें त्याच वेळीं बोटींत "घरत-पर्स-फंड" जमविण्याचें ठरलें. कांही मंडळींनी तेथेंच आंकडे घातले. सासवन्याला गेल्यावर "घरत-पर्स-फंड" समिति तात्यासाहेबांच्या सल्ल्याप्रमाणें नेमली व समारंभांत ती योजना जाहीर झाली. समारंभ पुरा झाला. फंड १५०० रु. जमला; व दर महिन्याला जरूर ते रुपये घरतांना मिळाले व त्यांना चांगली मदत झाली. योजकस्तत्र दुर्लभः

गंगाधर रघुनाथ भडभडे

(बी. ए., एलएल्. बी., माजी सबजज्ज, सांगली)

(१) तात्यासाहेब यांची मनःप्रकृति तर्कप्रधान असल्यामुळें त्यांचा अतींद्रिय ज्ञानावर आधारलेल्या गूढ शास्त्रावर फारसा विश्वास नव्हता. या अतींद्रिय दृष्टीवर आश्वासून डॉ. बेझंट यांनीं बाल कृष्णमूर्ति यांच्या जागतिक गुरुत्वाच्या भूमिकेबद्दल घोषणा केली. त्या बाबतींत १९१२ साली तात्यासाहेबांनीं 'अवतार-कृत्याचा पोरखेळ' या शीर्षकाखालीं केसरींत एक झणझणीत टीकालेख लिहिला. पुढें १९२८ सालीं कृष्णमूर्ति पुण्यास आल्यावेळीं त्यांच्याशीं तात्यासाहेबांचा वाद झाला होता. त्यांत मतभेद झाला असला तरी कृष्णमूर्तींचा स्वतंत्र बाणा व मौलिक विचार पाहून डॉ. बेझंट यांचा त्यांच्याबद्दलचा कयास अगदींच चुकलेला नव्हता असें तात्यासाहेबांनीं प्रांजलपणाचे उद्गार काढले.

(२) बेझंट जन्मशताब्दि-उत्सवानिमित्त त्यांच्या स्मृतीस वाहिलेला एक विशेष अंक काढण्याबद्दलची विनंती एका प्रमुख स्त्री-मासिकानें ऐनवेळीं नाकारल्यामुळें आतां दुसऱ्या कोणच्या मासिकाच्या संपादकाकडे धाव घ्यावी, अशी विवंचना सुरू झाली. या वेळीं ऑगस्ट १९४७ चा महिना संपत आला होता व तारीख १।१०।४७ ला बेझंट विशेष अंक निघण्याची आशा दुरावत चालली. अशा बिकट स्थितींत सह्याद्रि मासिकाचा आक्टोबर ४७ चा अंक बेझंट विशेष अंक म्हणून काढण्यास होकार देतील कीं नाहीं हें पाहावें, अशी आमच्या मंडळीस कल्पना सुचली व त्या संबंधानें तात्यासाहेबांस विचारण्याचें नाजुक काम मजकडे सोंपविण्यांत आलें. या वेळीं ऑगस्ट महिना संपला होता. तेव्हां इतक्या उशिरां तात्यासाहेबांस विचारण्याचें धाष्टर्य कसें करावें अशा

भीतीनेंच मी त्यांच्या घरीं गेलों व सदर गोष्टीबद्दल धिटाई करून पण कचरतच बोललों. पण अत्यंत आश्चर्याची व आनंदाची गोष्ट ही कीं, 'आता वेळ थोडा राहिला आहे, वगैरे कोणत्याहि तऱ्हेचें कारण, तें योग्य असतांहि, न सांगतां व कसलेही आढेवेढे न घेतां अंक काढण्याचें त्यांनीं मान्य केलें व मीं जमविलेला सर्व मजकूर मागून घेतला व कम्पोझ करण्यासाठीं सत्याद्रीकडे ताबडतोब पाठविला! बाकीचे लेख जमविण्यास जरूर तो कालावधीहि त्यांनीं दिला; फार काय, पण आतां जास्त मजकूर देण्याजोगा मजकडे शिल्लक नाहीं असें मी म्हणेपर्यंत मला त्यांनीं सवलत दिली. त्या अंकांत बेझंटबाईंचीं चार चित्रें व ४२ पानें मजकूर आला. शिवाय खुद्द तात्यासाहेबांनींच आपण होऊनच एक गुणग्रहणपर असा अति सुंदर मजकूर लिहिला. अडलेल्यांना हात देण्याची ही केवढी थोर वृत्ति!

(३) १ आक्टोबर १९४७ रोजी डॉ. बेझंट यांची जन्म-शताब्दीची जाहीर सभा योग्य तऱ्हेनें कशी पार पडेल अशी चिंता मीं त्यांच्याजवळ व्यक्त केली. तेव्हां ते म्हणाले, "तुम्हांस असलीं कामें करण्याचा फारसा अनुभव नाहीं म्हणून शिणल्यासारखे दिसतां; पण तुम्ही कांहीं काळजी करूं नका, सर्व मजवर सोपवा. सभा सांगल्या तऱ्हेनें पार पडेल." टिळक मंदिरांत ही सभा खुद्द त्यांच्याच अध्यक्षतेखालीं यशस्वीपणें पार पडली. त्यांच्या मनाच्या व अंतःकरणाच्या मोठेपणाचें विस्मरण आम्हां सर्व थिऑसफिस्ट मंडळींना कधींहि होणें शक्य नाही व त्यांच्या उदार साहाय्याबद्दल आम्ही सदैव कृतज्ञच राहूं!



चिंतामण जनार्दन गोखले

(निवृत्त शिक्षक, पुणें)

(१) लहानपणची माझी गरिबी. विद्येकरितां मी पुण्यास आलों. प्रथम मधुकरी मागे. मधुकरीकरितां तात्यासाहेबांच्या घरीं जात असे. यांत वेळ फार मोडे, म्हणून 'वारां'ची कास धरली. या कामीं तात्यांची चिठ्ठी मागितली. ती त्यांनी दिली. ती पाहून कोणी नाहीं म्हटलें नाहीं. सर्व वार लागले.

(२) माझा मुलगा पाय मोडल्यामुळें ससून हॉस्पिटलमध्यें ठेविला होता. त्यास पाहण्यास तात्या तेथें गेले. ते गेल्यामुळें आपोआप तेथील सर्व व्यवस्था चांगली झाली!

(३) माझे एक स्नेही नागपुराहून आजारी म्हणून मजकडे आले. फार दिवसांचा आजार. बरें वाटेना. माझ्या घरी जागा लहान, आतां काय करावें! म्हणून तात्यांकडे गेलों. होऊस सर्जनला तात्यांनीं चिठ्ठी दिली. चिठ्ठी दाखवितांच

त्यांनीं त्यास आदरानें ठेवून घेतलें. दोन महिने राहून तो रोगी बरा होऊन आला. हें काम पैशानें होणारें नव्हतें तें, केवळ त्यांच्या चिठ्ठीनें झालें.

(४) माझ्या मुलीची परीक्षा पास झाली. तिला नोकरी मिळावी म्हणून तात्यांच्याकडे गेलों. त्यांस सर्व सांगितलें. लगेच, मुख्य अधिकाऱ्याकडे मी येतों, आतांच चल असें ते म्हणाले. त्यांच्या घरीं गेलों, पण ते भेटले नाहींत; म्हणून त्यांना तात्यांनीं घरी बोलाविलें व अपेक्षेपेक्षांहि जास्त माझें काम झालें. असें एक ना दोन, शेकडों प्रसंगीं ते माझ्या उपयोगी पडले आहेत. त्यांच्या कृपेमुळें पुण्यांत माझें जीवित सुखावह झालें आहे.

द. बा. वरवे

(बी. ए., 'स्वदेशी'चे कार्यकर्ते, पुणें)

(१) लोकमान्यांच्या बहुमोल सल्ल्यावरून वकिलीचा अभ्यास सोडून मी मुंबईस पदूमल ब्रदर्स नांवाच्या सिंधी व्यापाऱ्याकडे कामास लागलों. या कंपनीचा धंदा हिंदुस्थानांतील स्वदेशी कारागिरीचा माल परदेशांत पाठविण्याचा होता. माझ्या मनांतून लोकमान्य टिळकांनी एकदां या फर्ममध्यें येऊन त्यांचें काम पाहावे असें होतें. म्हणून मी तात्यासाहेबांना भेटून वरील इच्छा प्रदर्शित केली. ताबडतोब तात्यासाहेबांनीं मला आश्वासन दिलें कीं, लवकरच कोलंबो मार्गानें विलायतला जाण्याकरितां आम्ही मुंबईस येऊं, तेव्हां टिळकांना तुमचें दुकान पाहण्यास आणतों. त्याप्रमाणें केळकरांनीं टिळकांना माझ्या दुकानांत आणलें. मी आनंदातिशयानें गहिवरून गेलों. त्या वेळीं सर्व दुकान पाहिल्यावर तात्यासाहेबांनी मला आग्रहानें सांगितले कीं, येथे टिकून राहा – ईस्ट इंडिया कंपनीनें जें काम आपल्या देशाकरितां हिंदुस्थानांत केलें तशा प्रकारचें काम ही फर्म आपल्या देशांकरितां परदेशीं करीत आहे. कंपनीच्या मालकांना टिळकांनीं धन्यवाद दिले व म्हणाले कीं, तुमचें काम 'आक्रमक स्वदेशी'चें आहे म्हणून फार भूषणावह आहे. मलाहि अर्थात् तेथें राहण्यास उत्साह व विश्वास वाटला. यावज्जन्म तात्यासाहेबांचे उपकार मी विसरणार नाहीं. माझें अंतःकरण त्यांनीं काबीज केलें.

(२) सन १९२२ सालीं मुंबईच्या डेक्कन मर्चेटस् ॲसोसिएशनमार्फत आम्हीं मुंबईस महाराष्ट्र व्यापारी परिषद भरविली व ती फारच यशस्वीपणें पार पडली. परंतु पुढे ॲसोसिएशनमध्यें मतभेद होऊन दोन तट पडले व काम होईना. तेव्हां कोणाला लवाद नेमून भांडणें मिटविण्याचें उभयपक्षीं ठरलें व सर्वांना तात्यासाहेबांवर हें काम सोपवावें असें वाटलें. त्यांनीं तें काम कर्तव्यबुद्धीनें अंगिकारलें व अखेर सर्वांच्या मनाला पटेल अशा रीतीनें त्यांनीं तें फार कौशल्यानें पार पाडलें. पण

त्याकरितां तात्यासाहेबांना नाहक त्रास होत होता. कारण उभयपक्षांचीं माणसें त्यांना भेटून सतावीत व आपलें म्हणणें त्यांच्यापुढें मांडीत. पण त्यांनीं हा त्रास आनंदानें सहन केला.

(३) सन १९२७ सालीं पुण्यास दुसरी महाराष्ट्र व्यापारी परिषद भरविण्याच्या मी खटपटीस लागलों. त्या वेळीं अध्यक्षस्थान कोणास द्यावें यासंबंधीं आमच्या मंडळींत वादविवाद सुरू झाला. रणें माजलीं. एक पक्ष म्हणे तो महाराष्ट्रीयच पाहिजे. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें येथें लिहिणें बरें नाहीं. अखेर तात्यासाहेबांचा सल्ला घेण्याचें ठरलें. आम्ही त्यांच्याकडे गेलों. तेव्हां तात्यासाहेब म्हणाले, "अहो, त्या विषयांतील अनुभवी व तज्ज्ञ अध्यक्ष नेमा. मी सांगतों कीं, पुण्यांतील हणमंतराम रामनाथ यांना स्वागताध्यक्ष नेमा व वालचंद हिराचंद यांना अध्यक्ष करा." त्याप्रमाणें आम्हीं केलें. परिषद यशस्वी झाली.

(४) याच सुमारास सेनापति बापटांच्याबरोबर एकदां मी तात्यासाहेबांच्याकडे गेलों असतां बापटांना ते म्हणाले, "आम्हीं पन्नास वर्षें स्वदेशीचा प्रचार केला; पण स्वदेशी माल परदेशांत विकून बरवे यांनीं आमच्या स्वदेशीला चढाईच्या स्वदेशीचा कोंब निर्माण केला व परकीयांना भारतीय माल विकून मोठ्या पैलवानाला निदान चिमटा घेतल्याचें पुण्य संपादन केलें!"

(५) तात्यासाहेब यांच्याशीं बोलतांना त्यांच्या बोलण्यांत वाङ्मयदृष्ट्या ज्या उत्तम गोष्टी येत त्यांपैकी कांहीं सुभाषितें म्हणून खालीं देत आहे. ते म्हणालेः- "(१) अहो, पराक्रम पराक्रम म्हणजे काय? क्रमानें काम नियमितपणें करीत गेल्यास आक्रम होऊन त्यांतूनच पुढें पराक्रम निर्माण होतो, म्हणून प्रत्येकानें उद्योग नियमानें करावा. (२) माणसानें स्वार्थच करीत राहावा व तोच मत्स्यावताराच्या वृद्धीप्रमाणें वाढवीत वाढवीत विश्वव्यापी केल्यावर त्यांतूनच हेन्री फोर्डनें केला त्याप्रमाणें स्वार्थ आपोआप परार्थांत व परमार्थांतसुद्धां विलीन होऊं शकतो. म्हणून कित्येकवेळां स्वार्थत्यागापेक्षा स्वार्थाच्या क्षेत्राचें परीघ माणसानें उत्तरोत्तर वाढवीत न्यावें. राजा जनक व भीष्माचार्य आपापल्या क्षेत्रांत इतके थोर ठरले कीं, दोघांनाहि जग आतांपर्यंत मानीत आले. राजा जनकानें लग्न केलें नसतें तर ते भीष्माचार्याप्रमाणें व भीष्माचार्यांनीं लग्न केलें असतें तर ते राजा जनकाप्रमाणें चमकले असते यांत शंका नाहीं.

गोविंद रामकृष्ण अत्रे

(वकील, नाशिक)

(१) १९१५ सालची गोष्ट. इंदूर येथें महाराष्ट्र साहित्य संमेलन भरलें होतें व त्याच वेळीं हिंदी साहित्य-संमेलन म. गांधी यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार होतें. लोकमान्य नुकतेच सुटून आले होते व १९०८ सालापासून तेथें केसरीस बंदी होती. यामुळें वरील संमेलनांच्या निमित्तानें लोकमान्यांस तेथें आणावें म्हणून लोकांनीं व मुख्यतः विद्यार्थ्यांनीं प्रचंड चळवळ केली. अखेर तेथील पुढाऱ्यांनीं आम्हां विद्यार्थ्यांस चांगलेंच चकविलें. त्यांनीं सांगितलें कीं, अमुक गाडीनें टिळक येणार आहेत. त्या गाडीस आम्ही लोकमान्यांचें स्वागतार्थ हजारो स्वयंसेवक स्टेशनवर हजर होतों. आम्हां विद्यार्थ्यांपैकीं कोणीहि यापूर्वी लोकमान्य अथवा केळकर यांस पाहिलेलें नसल्यानें पुणेरी पगडी दिसतांच ह्या डब्याभोंवतीं गोळा झालों. पुढारी मंडळींनीं त्यांचें स्वागत केलें. पण त्यांच्या बोलण्यावरून ते केळकर आहेत, लोकमान्य नव्हेत हें कळतांच आम्ही सर्व विद्यार्थी वर्ग स्वागतकमिटीच्या सभासदांवर स्टेशनवरच उलटलों व बरीच धक्काबुक्की केली. हें पाहून तात्यासाहेबांना आश्चर्य वाटलें व तो कठीण प्रसंग पाहून ते पुढे आले व आम्हांस शांत करून म्हणाले कीं, "तुम्ही लोकमान्यांस पाहिलें नाहीं. त्यांना तुम्ही फक्त केसरींतील लेखांवरून व पगडीच्या फोटोवरूनच ओळखता ना!" आम्ही हो म्हणालों. तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, "तुमची श्रद्धा त्यांच्या डोक्यावरच आहे. तेव्हां तें डोकें मीं बरोबर आणलेलें आहें! कारण केसरीचा व लोकमान्यांचा प्रतिनिधि म्हणून व तुमची आवडती पुणेरी पगडी धारण करून मी आलेलों आहें व माझा अपमान म्हणजे प्रत्यक्ष लोकमान्यांचा व पुणेरी पगडीचा अपमान होणार आहे! तेव्हां तुमचा भक्तिभाव मी लोकमान्यांना सादर करीन." हें भाषण इतक्या शांततेनें व आपुलकीनें त्यांनीं केलें कीं, आमचा सर्व राग शांत होऊन आम्ही त्यांच्या पायां पडलों. नंतर त्यांनीं तेथील मुक्कामांत महाराजांना भेटून केसरीवरील बंदी उठवून घेतली; त्यामुळें तर तात्यांची पुणेरी पगडी म्हणजे 'केसरी व टिळक' असें आम्ही समजत असूं!

(२) मी मॅट्रिकच्या परिक्षेनंतर मिळालेल्या सुटींत एक प्रोज नाटक लिहिलें व तें इंदूर येथील कांहीं साहित्यिकांस दाखवून सुधारणा करून घेतल्यानंतर मुद्दाम पुण्यास जाऊन तात्यांना दाखविण्यासाठीं गायकवाडवाड्यांत गेलों. त्यांनीं सर्व विचारपूस आपुलकीनें केल्यानंतर ते प्रथम हंसले. त्याचा परिणाम माझ्या मुखावर दिसतांच त्यांना थोडेसें वाईट वाटलें असावें असें वाटतें, व मग लगेंच थोडक्यांत नाटकाचा प्लॉट विचारला व त्यांतील विचाराबद्दल कौतुक केलें व लगेंच म्हणाले कीं, "मी हें वाचून पाहीन. परंतु चार वर्षांनंतर

तुमचा बी. ए.चा रिझल्ट कळवाल त्या वेळीं परत करीन!" मी गोंधळलों. तेव्हां ते म्हणाले कीं, "तुमच्यासारख्या स्वतंत्र विचारांचीं माणसें आम्हांस नाटककार नकोत. तर कार्यकर्ती हवी व त्यासाठीं प्रथम हें शिक्षण लवकर पुरें करून कार्यास लागा व मग फुरसती अंतीं नाटकें लिहा." मला तें बरोबर पटलें. त्यांच्या आज्ञेप्रमाणें मीं सार्वजनिक कार्यांतच पडलों. तें नाटक तसेंच पडून राहिलें. मीं त्यास पुढें हात लाविला नाहीं.

(३) गेल्या सालीं नगर येथें तेथील नाट्यसंस्थेतर्फे एक व्याख्यानमाला सुरू केली गेली. त्याचें प्रारंभीचें व्याख्यान तात्यासाहेब यांचें ठरलेलें होतें. त्या वेळीं ते तेथें आले असतांना मी त्यांना सहज म्हणालों कीं, आपणांस कानांनीं बरेंचसें कमी ऐकू येऊं लागलें; तेव्हां ते म्हणाले कीं, "हो इष्टापत्ति आहे. नाहीं तरी मला शिव्या दिलेल्या केव्हांच ऐकूं येत नव्हत्या व चहाड्या ऐकण्याचीहि संवय नव्हतीच; पण ऐकूं येतें हें जाणून लोक सांगण्याचा प्रयत्न तरी करूं इच्छीत होते, परंतु आतां ती मुळींच भीति राहिलेली नाहीं व त्यामुळें अशा लोकांचीं तोंडें आपोआपच बंद झालीं व मलाहि सहजगत्या चांगूलपणा मिळाला! प्रत्येक माणसानें ही संवय करावयास पाहिजे. पण मला हें सहजगत्या प्राप्त झालें आहे. त्यांत वाईट असें कांहींच नाहीं!" वाईटांतूनहि चांगलें कसें काढावें व समाधानवृत्ति कशी ठेवावी ही शिकवण यांतून मिळण्यासारखी आहे.



सौ. शांताबाई ओक

(तात्यासाहेब यांची पुतणी, अमळनेर)

(१) तात्यांच्या मागें 'आमचे तात्या' म्हणण्यांत ज्या कित्येकांना अभिमान वाटतो त्यांपैकी मी एक आहें, या गोष्टीचा मला फार आनंद होतो. ते माझे सख्खे व एकुलते एक चुलते असल्यामुळें माझा त्यांच्याशीं पुष्कळच सहवास होता; व ते चिकटवलेलीं नातीं सुद्धां लक्षांत ठेवून वागणारे असल्यानें आमच्यासारखीं घरचींच नातीं ते अगदीं जिव्हाळ्यानें व प्रेमानें संभाळीत यांचें नवल कसलें! त्यांचा जीव मुलाबाळांवर फार. आमचीं मुलींचीं लग्नें झालीं तेव्हां वरातीच्या दिवशीं तात्यांच्या डोळ्यांला पाणी यावयाचें! दर उन्हाळ्याला आमची पुण्याची खेप व्हावयाचीच. वर्षांतून एकदां तरी तात्यांकडे गेल्याशिवाय आमच्या अप्पासाहेबांना कधीं चैन पडलें नाहीं. अगदीं यंदाच्या मे महिन्यांतसुद्धां अप्पासाहेब पुण्यास जाऊन आले. माझा तर जन्मसुद्धां तात्यांच्याच घरीं झालेला. पुढें जेव्हां जेव्हां तात्या आप्पासाहेबांकडे येत तेव्हां तात्यांच्या स्वागताकरितां अप्पासाहेबांची जी धांदल उडे त्याची मला आठवण आहे. पुढें मॅट्रिकच्या परीक्षेसाठीं आम्हीं

पुण्याला गेलों त्या वेळीं मी चांगली १०।१२ दिवस तेथें होतें. ते दिवस केव्हांच भरकन् गेले. तात्यांच्या घरांत नेहमीं राजकारणाला भर असायचा. केसरी, व्याख्यानें, अध्यक्ष यांची तात्यांच्या राजकारणाशीं असलेल्या दाट संबंधामुळ एकसारखी चर्चा चालावयाची. तात्यांच्या घरीं केव्हांहि गेलें तरी त्यांत कांहीं तरी नावीन्य दिसावयाचें. नेहमी घराची पाडापाड व बांधाबांध चालू असावयाची ! विहिरीसमोरच्या बागेंत नारळ व सुपाऱ्या यांच्या झाडांमधून शतपावलीसाठीं संध्याकाळीं तात्यांच्या फेऱ्या चालू असायच्या. कोणी ना कोणी टांगा, मोटार घेऊन दाराशी सारखें उभे असायचें. माझ्या लग्नांत उखाणे वगैरे ऐकायला तात्या सर्वांत पुढें ! थट्टा-विनोद करणें त्यांना फार आवडे. पण त्यांत कोणाला न बोचतां थोडीशी मजा करावी एवढाच त्यांचा उद्देश असायचा.

(२) १९२१ सालीं आम्ही अमळनेरला आल्यानंतर तात्यांचें कांहीं सार्वजनिक कार्यक्रम अमळनेरला होते म्हणून ते आले. अर्थातच ते आमच्याकडेच उतरणार होते. येणार त्या दिवशी मी अगदीं पांच वाजल्यापासून चहाचें आधण ठेवून त्यांची वाट पहात बसलें होतें. पण तात्या सहा वाजतां आले व लगेच दुसरीकडे जायचे होते. आले ते थकलेले. मी चहाचें ताट घेऊन वर जातांच ते मला म्हणाले, " हे बघ शांताबाई, तूं घरची आहेस ना ? शिष्टाचाराचा प्रश्न नाहीं; पण आतां मला चहा वगैरे कांहीं नको. मी आतां स्वस्थ विश्रांति घेतों. रात्रीं आल्यानंतर काय देशील तें घेईन हं. " मी अगदीं जड अंतःकरणानें पण त्यांच्या चर्येकडे पाहून खरोखरच ते थकलेले दिसले म्हणून परत गेलें. रात्रीं आल्यावर मात्र गच्चीवर गार हवेंत त्यांनीं फराळ केला, गप्पा मारल्या. त्यांची आवडती दाण्यांची उसळ त्यांनीं खाल्ली. मग मला बरें वाटलें तरी तेवढ्यांत त्याच्या खाजगी ओळखीचे लोक आलेच गप्पा मारायला; व पाठोपाठ व्याख्यानाचें बोलावणें येऊन पुन्हां गेलेच ते. त्यांचें व्याख्यान ऐकायचा योग मला आला व तोहि शेवटचाच !



शि. वि. दामले

(कॅप्टन, संस्थापक, महाराष्ट्र व्यायाममंडळ, पुणें)

(१) सन १९२४ सालची गोष्ट. तात्यासाहेब हे असेंब्लीचे सभासद म्हणून सिमल्यास होते. मला व माझ्या मित्रमंडळींना एक नमुनेदार व्यायामशाळा काढावयाची होती. पुण्यांत पुष्कळ प्रयत्न केले; परंतु कोणी मदत करीना. जागा ठरविली कीं, प्रथम वर्षाचें भाडें मागत. आमच्याजवळ एक पैसाहि नव्हता. तेव्हां मीं तात्यासाहेबांना एक पत्र पाठविलें. त्यांनी ताबडतोब टिळकरोडवरील हल्लींच्या जागेंत खेळत जा, म्हणून लिहिलें. जागेला कांटेरी कुंपण नव्हतें. विहिरीचें पाणी

खराब झालेलें होतें. पण त्यांनीं जें कांहीं आम्हांस पाहिजे होतें तें सर्व आपल्या खर्चानें करून दिलें. त्यांच्या ओळखीमुळें एका गृहस्थानें पेट्रोलपंप फुकट लावून दिला. पुण्यास एक व्यायामशाळा निघत आहे, तर त्याला सर्व तऱ्हेची मदत मी करण्यास तयार आहें असें ते म्हणत व त्याप्रमाणें त्यांनी अक्षरशः तसें केलें. व्यायामशाळेबद्दल सरकारांत कोणीतरी खोटी माहिती देऊन सरकारचें मत कलुषित केलें. व्यायामशाळा बंद करण्यांत येणार अशी विश्वसनीय माहिती एका बड्या सरकारी नोकरानें तात्यासाहेबांस सांगितली. ते व्यायामशाळेंत आले व उपाययोजनेबद्दल श्री. अण्णासाहेब भोपटकर यांच्याबरोबर विचारविनिमय केला. शेवटीं मुख्य अधिकाऱ्यास प्रत्यक्ष संस्था दाखवावी व अण्णासाहेब आणि केळकर यांनीं गैरहजर रहावें असें ठरलें. मोठे अधिकारी आले व त्यांनीं त्या वेळीं संस्थेस उत्तम अभिप्राय दिला. दुसऱ्या दिवशीं सस्था बेकायदेशीर ठरविण्याचे कागद त्यांच्यापुढें आले. केळकरांना त्यांनीं बोलावलें व दोघांचें बोलणें होऊन संस्थेवरील गंडांतर टळलें !

(२) आम्हांला दिलेली जागा अकरा महिन्यांच्या भाडेपट्ट्यानें दिली होती. ते म्हणत, मला भाडें देऊं नकोस; पण तूर्त मी भाडेपट्टा वाढवून देणार नाहीं. ज्या हेतूसाठी त्यांनीं हें केलें तो साध्य झाल्यावर येथील एक धनिक व्यापारी त्यांच्याकडे ही जागा वार्षिक चार हजार रुपये भाड्यानें मागण्यासाठीं गेले. मींहि त्यांना विनंती केली. तेव्हां त्यांनीं मला ही जागा केवळ ५०० रुपये भाड्यानें ३३ वर्षांच्या करारानें दिली. त्यांचें व माझें हें बोलणें रात्रौ ११च्या नंतर झालें व दुसऱ्या दिवशीं अकरा वाजतां आम्हीं भाडेपट्टा सरकारांत नोंदविला. एकदां ठरल्यावर मग त्या गोष्टींचा निकाल केल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे.

(३) तात्यासाहेबांना पोहण्याचा नाद फार. मंडळांत ते येत तेव्हां पुष्कळ वेळां विहीरींत आमच्याबरोबर पोहत असत. मंडळांतील पाऊणशें मुलें-मुली पुरामध्यें पोहण्यासाठीं मीं व माझ्या सहकाऱ्यांनीं नेण्याचें ठरविलें. त्या वेळीं ते मुद्दाम लकडीपुलावर आले व त्यांनी प्रत्येकास सूचना देऊन प्रोत्साहन दिलें. मींहि तुमच्याबरोबर येण्यास तयार आहें असें ते म्हणाले; परंतु आम्हींच नको म्हटलें.

(४) १९४२ सालची गोष्ट. मंडळाचा पसारा वाढत चालला. तेव्हां इतींची जागा आपणास खरेदी मिळावी अशी आम्हां सर्वांची इच्छा. म्हणून मी त्यांस म्हणालों, ' आपण पुण्यांतील कित्येक संस्थांना जन्म दिला व त्यांचें पालन-पोषण केलें. त्यांमध्यें आमचें मंडळ हें एक आहे. तरी आम्हांस ती खरेदी द्यावी.' त्याप्रमाणें ती जागा त्यांनीं आम्हांस खरेदीहि दिली.

(५) मी लढाईवर गेलों. तेथून मीं त्यांस पत्र लिहिलें कीं, येथें आमची चैन आहे. खाण्यापिण्याला सर्व गोष्टी मुबलक असून मी फार आनंदांत व चैनींत

आहें. त्यांचें उत्तर आलें कीं, "रणभूमीवर आहां; तेव्हां सदैव जागरूक व सावधान असावें."

(६) एक दिवस ते टाऊन प्लॅनिंग कचेरींत गेले. एका कारकुनाच्या टेबलापाशीं आले व म्हणाले, भांडारकर संस्थेजवळ अमुक प्लॉट आहे त्याची माहिती पाहिजे. तो कारकून मद्रासी होता व नोकरीवर रुजू होऊन त्यास ७।८ दिवस झाले होते. त्यानें विचारलें, त्या जागेंत तुमचा काय संबंध आहे? तात्यासाहेब म्हणाले, 'कांहीं नाही.' त्यावर तो म्हणाला, 'मग मी कांहीं माहिती देत नाहीं.' त्याचा त्यांना राग आला. इतक्यांत पुण्यांतील त्यांना ओळखणारा कारकून आला व त्यानें विचारलें कीं, तुम्ही इकडे कुठें व तुम्हांला काय पाहिजे? ते म्हणाले, "सहज एका प्लॉटची माहिती विचारीत होतों." त्यानें आपल्या वरिष्ठ गोऱ्या साहेबाला कळविलें कीं, तात्यासाहेब आले आहेत. गोऱ्या साहेबानें त्यांना बोलावून सन्मानपूर्वक बसविले व माहिती पाहिजे होती ती देण्यासाठीं त्या मद्रासी कारकुनास सांगितलें. हे गृहस्थ N. C. Kelkar असें समजल्याबरोबर साहेबाच्या देखतच त्या कारकुनानें त्यांच्या पायां पडून हात जोडून माफी मागितली. तात्यासाहेबांनीं सरकारच्या हुकुमाची अंमलबजावणी नीट केल्याबद्दल त्याला उलट शाबासकी दिली!



महादेव अनंत भावे

(दिवाणबहादूर, निवृत्त सेशन्स जज्ज, मुंबई)

सन १९४१ मध्यें माझी कन्या चि. सौ. नर्मदा ऊर्फ निर्मला हिचा विवाह श्री. अप्पासाहेब केळकर यांचे चिरंजीव श्री. बाळासाहेब यांच्याबरोबर झाल्यानंतर पूर्वी असलेला तात्यासाहेबांचा व माझा परिचय दृढतर होऊन त्यांच्याविषयींचा आदर द्विगुणित झाला. माझी कन्या सौ. नर्मदा ऊर्फ निर्मला हिनें आपल्या पतीबरोबर उच्च शिक्षणासाठीं अमेरिकेला जाण्याचा निश्चय केला. त्या वेळीं केवळ अपत्यप्रेमानें तिनें परदेशीं जाऊं नये असें मला वाटत होतें. कां तर तिला परदेशांत दुखणेबाणे आल्यास कसें होईल, तिचे हाल होतील व इतक्या लांबीचा प्रवास तिला झेपणार नाहीं असें मला वाटे. म्हणून या कामीं तात्यासाहेबांचा सल्ला घ्यावा असे ठरविले. ते आमच्या घरीं आले. त्या वेळीं या विषयावर बोलणीं निघालीं. तेव्हां ते म्हणाले, "वा! जाऊं द्या कीं, तिला काय हरकत आहे जायला! दोघेहि बुद्धीनें अनुरूप आहेत. पुढील पिढींतील मुलांमुलींच्या महत्त्वाकांक्षा व धडाडी यांस केवळ आपल्या अपत्यप्रेमासाठीं पायबंद घालणें योग्य नाहीं. आपण पुढील पिढीच्या दृष्टिकोनांतूनच पाहिलें पाहिजे व अशीं मुलें परदेशांत गेल्यानें त्यांचें पुढील आयुष्य उज्ज्वल होईल यांत बिलकुल शंका

नाहीं." त्यांच्या या उद्गारांमुळें माझें विरोधी मन मागें फिरलें व माझी कन्या त्यांच्या प्रोत्साहनानें अमेरिकेंतील उच्चतम शिक्षण पुरें करून मिशिगन युनिव्हर्सिटीची डिग्री मिळवून सुखरूप परत आली. या कामीं तिचे पति व श्वशुर अप्पासाहेब यांचाहि तात्यासाहेबांच्या म्हणण्यास दुजोरा होता, त्यामुळें तिच्या आयुष्याला उच्चतर वळण लागलें. तात्यासाहेबांची ही आठवण मी कधींहि विसरणें शक्य नाहीं.

बाळशास्त्री हरिदास

(साहित्याचार्य, प्रधानमंत्री, भारतीय सांस्कृतिक विद्यापीठ, नागपूर)

(१) चारपांच वर्षांपूर्वीची गोष्ट. मी कांहीं कामानिमित्त पुण्यास आलों होतों व त्या दिवशी संध्याकाळीं टिळक-मंदिरांत श्री. ज. स. करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं "श्रीज्ञानेश्वरांचा योगमार्ग" या विषयावर माझें व्याख्यान व्हावयाचें होतें. सकाळीं काळकर्ते मामाराव दाते यांच्याजवळ तात्यासाहेब यांना एकवार जवळून पाहण्याची मीं इच्छा दर्शविली. मामांच्या तोंडून मीं अनेकवार तात्यासाहेबांच्या थोरवीसंबंधीं ऐकलें होतें व त्यामुळेंच मुख्यतः माझ्या मनांत त्यांच्याविषयीं कुतूहल जागृत झालें होतें. माझी विनंती मामाराव यांनीं मान्य केली व आम्ही दोघे तात्यासाहेबांच्या "पुष्करिणींत" त्यांना भेटावयास गेलों. तात्यासाहेब खालच्याच खोलीत बसले होते. औपचारिक प्रश्नोत्तरांनंतर मामांनीं माझी तात्यासाहेबांना ओळख करून दिली व व्याख्यानाची बातमी सांगितली. तात्यासाहेबांनीं क्षण दोन क्षण स्तब्ध राहून मला एकदम प्रश्न विचारला, "काय हो! टिळक, ज्ञानेश्वर व शंकराचार्य यांच्यापैकीं गीतातात्पर्यनिर्णयाच्या बाबतींत, तुमच्या मतें, कोण बरोबर आहे व कोण चुकीचें आहे!" मीं त्यांवर त्यांना म्हटलें, "तात्यासाहेब, माझ्या वयाच्या पंचविशीची नुकती कोठें सुरवात आहे. आपण उच्चारलेलीं तीनहि नांवें इतकीं श्रेष्ठ आहेत कीं, यांपैकीं अमुक एक बरोबर व दुसरा चुकीचा असें म्हणण्याचें धाष्टर्य मी करूं शकणार नाहीं. या महापुरुषांपैकीं कोणाचें मत व मांडणी काय आहे आणि कोणाला काय म्हणावयाचें आहे असें मला विचारलें तर मात्र मला निश्चित सांगतां येईल." माझें हें उत्तर तात्यासाहेबांना इतकें आवडेलेलें दिसलें कीं, प्रसन्न हास्याचें चांदणें आमच्यावर उधळीत तात्यासाहेब म्हणाले, "शाबास! तुमचें म्हणणं मला अगदीं अंतःकरणापासून आवडलें." त्यानंतर संध्याकाळच्या व्याख्यानाला तात्यासाहेब मुद्दाम उपस्थित राहिले व या प्रसंगानंतर जेव्हां जेव्हां त्यांच्या भेटीचे प्रसंग आले त्या त्या वेळीं त्यांनीं माझ्याविषयी फारच आस्था दाखविलेली आहे.

(२) नागपूरला तात्यासाहेबांनीं राजाराम लायब्ररीच्या सुवर्ण महोत्सव-प्रसंगीं जी अगदीं अलीकडे शेवटची भेट दिली त्या वेळीं भारतीय सांस्कृतिक विद्या-पीठाच्या वार्षिकोत्सवाचें अध्यक्षपद त्यांनीं स्वीकारावें म्हणून त्यांना मीं संस्थेचा कार्यवाह या नात्यानें विनंती केली. तात्यासाहेबांनीं आमचें निमंत्रण कार्यक्रमाची धांदल असतांनाहि स्वीकारलें. त्यांचें अध्यक्षीय भाषण सुरू होण्यापूर्वी मीं केलेल्या परिचयात्मक भाषणांत संस्थेच्या शिक्षणपद्धतीविषयीं माहिती सांगितली. ती लक्षपूर्वक ऐकून आपल्या भाषणाच्या प्रारंभींच तात्यासाहेब म्हणाले, " मी येथें आलों तो ही एक जुन्या एकांगी पद्धतीनें आपल्या संस्कृतीचे शिक्षण देणारी संस्था असेल या समजुतीनें. तौलनिक शिक्षणपद्धतीचें महत्त्व सांगावयास मुख्यतः आलों; पण हरदासांनीं जी माहिती सांगितली त्यावरून आतां माझ्याकडे यांनीं स्वीकारलेली शिक्षणपद्धति किती चांगली व उपयुक्त आहे येवढेंच सांगण्याचें काम काय तें उरलेलें आहे. " मला वाटतें, वेगळें तात्पर्य शब्दांनीं न उल्लेखितां देखील माझ्या प्रत्ययास आलेलीं तात्यासाहेबांच्या व्यक्तित्वाचीं वैशिष्ट्यें या आठवणींच्या नुसत्या उल्लेखानें चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत येतील.

❋

मो. वि. रबडे

(आसिस्टंट मॅनेजर, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक)

(१) तात्यासाहेब यांचा आमच्या बँकेशीं फार निकटचा संबंध असल्यामुळें ते बँकेंत वेळोवेळीं येत असत. दिवस उन्हाळ्याचे होते. उकाडा फार होता. अशा एके दिवशीं तात्यासाहेब भर उन्हाचे बँकेंत आले होते. त्यांचा त्या वेळचा पोषाक म्हणजे पगडी, गळ्यापर्यंत गुंड्यांचा कोट व साधें आंखूड धोतर. आल्या-बरोबर त्यांनीं माझ्यासमोरील टेबलावर आपली छत्री व पगडी ठेवली व कोटाच्या गुंड्या काढण्यास सुरवात केली. सर्व गुंड्या काढून झाल्यावर मी पाहतों तों त्यांच्या अंगांत सदरा नव्हताच. तेव्हां त्याबद्दल विचारता त्यांनीं त्यांच्या ह्या पोषाखाची उप-युक्तता सांगितली. आमच्या बँकेच्या इमारतीचा कोनशिलासमारंभ त्यांच्याच हस्तें २३-९-१९२३ रोजीं झाला. त्या वेळचाहि त्यांचा हाच पोषाख होता. अशी त्यांची साधी राहणी असे.

(२) आमच्या बँकेनें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट तात्यासाहेब यांच्याच हस्तें सुरू केला. त्या वेळीं त्यांनीं केलेल्या भाषणांत ते म्हणाले होते कीं, " पुणें शहरांत हा प्रयत्न कितपत यशस्वी होतो याबद्दल शंकाच आहे. कारण जनतेजवळ आतां मौल्यवान् असें कांहीं फारसें राहूंच नये अशा पद्धतीची आपली हल्लीची राजवट आहे. " नन्तर कांहीं दिवसांनीं ते कांहीं कामानिमित्त बँकेंत आले असतांना त्यांनीं

प्रथम लॉकरबद्दल विचारलें. तेव्हां त्यांना नवीन ३।४ लॉकर्स आणून ते सर्व खपून गेले आहेत व लॉकर्सला दररोज बरीच मागणी आहे हें सांगितलें. तें ऐकून त्यांना फार समाधान झालें. त्यांनीं कित्येक संस्थांना लॉकर्स घेण्याबद्दल शिफारस केली. त्याचप्रमाणें आपल्या कुटुंबीय मंडळींनाहि त्यांचा फायदा घेण्यास लावलें.



डॉ. कृ. न. जेजुरीकर

(चिटणीस, महाराष्ट्रीय व्यायाम-मंडळ, पुणें)

(१) कांहीं कामाकरितां तात्यासाहेबांच्याबरोबर मी सोलापूरला गेलों होतों. त्या मुक्कामांत स्नानाच्या वेळीं तात्यासाहेब यांच्या धोतराच्या निऱ्या करून तें धोतर त्यांना द्यावें म्हणून मीं माझ्या हातीं त्यांचें नेसावयाचें धुतलेलें धोतर घेतलें व निऱ्या करूं लागलों. त्याबरोबर तें धोतर माझ्या हातांतून हिसकावून घेऊन, तात्यासाहेब मला म्हणाले कीं, धोतराच्या निऱ्या करणें हें काम डॉक्टरचें नव्हे ! शेवटीं त्यांनीं स्वतःच आपल्या धोतराच्या निऱ्या केल्या व ते स्नानाला गेले.

(२) त्याच मुक्कामांत माझे स्नेही श्री. पाबळकर ह्यांनीं आम्हां पुणेकर मंडळींना मुद्दाम चहाला बोलाविलें. ते पुण्याचेच व तेथें इंपीरिअल बँकेंत ते एक अधिकारी होते. त्या वेळीं हुंडणावळीबद्दल सहज बोलणें निघालें असतां, त्या विषयबद्दल तात्यासाहेबांनीं एवढी त्यांच्याशीं चर्चा केली कीं, त्या विषयाची त्यांची माहिती पाहून आम्ही मंडळी अगदीं थक्क झालों.

(३) १९३९ सालची गोष्ट. हैद्राबाद सत्याग्रहांत शिक्षा झाल्यामुळें अण्णासाहेब भोपटकर हे औरंगाबादच्या तुरुंगांत होते. त्या वेळीं त्यांना भेटावयास तात्यासाहेब, डॉ. सोमण, मी व रामभाऊ राजवाडे असे औरंगाबादला गेलों होतों. तात्यासाहेबांना प्रवास सुखाचा व्हावा म्हणून आम्ही त्यांचें वरच्या वर्गाचें तिकीट काढलें होतें. परंतु आम्ही बाकीची सर्व मंडळी तिसऱ्या वर्गातून प्रवास करीत असतां, त्यांनीं वरच्या वर्गातून प्रवास करणें त्यांना आवडलें नाहीं व तेहि तिसऱ्या वर्गातच आम्हांबरोबर आले. तिसऱ्या वर्गातून प्रवास करणाऱ्यांची वेळीं-अवेळीं जाहिरात करणारांनीं तात्यासाहेबांची ही हकीकत जरूर लक्षांत ठेवावी.

(४) एका पानसुपारीच्या समारंभांत त्यांची व माझी गांठ पडली. मला पाहतांच 'अहो लेखक' म्हणून त्यांनीं मला मुद्दाम हांक मारली व मराठ्यामध्यें माझ्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या लेखनाबद्दल मला शाबासकी दिली. उदयोन्मुख लेखकांना उत्तेजन देण्याच्या कामांत, तात्यासाहेब किती दक्ष असत, हें प्रसिद्धच आहे; परंतु आपल्या माणसाचें कौतुक करण्याची ते किती दक्षता बाहत असत हें यावरून लक्षांत येतें.

(५) गेल्या सप्टेंबरमध्यें प्रा. देवधर हे क्रिकेटमधून निवृत्त झाले. त्यांच्या निवृत्तीनिमित्त त्यांचा सन्मान करून त्यांना निरोप देण्याचा समारंभ हिंदी क्रिकेट कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष मि. डिमेलो ह्यांच्या अध्यक्षतेखालीं महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशननें ठरविला होता. समारंभ दुसऱ्या दिवशीं सकाळीं होता. आदल्या दिवशींच्या सायंकाळपर्यंत मि. डिमेलो हे पुण्याला आलेच नाहींत व येतात कीं नाहीं हें नक्की समजेना. तेव्हां अध्यक्षांची तरतूद करून ठेवणें आम्हांला जरूर होतें. प्रि. दुलिपसिंह, मर्चंट वगैरे क्रिकेट-क्षेत्रांतील अनेक मंडळी पुण्याला आलेली होती. परंतु आयत्या वेळीं कोणी अध्यक्षपद स्वीकारण्यास तयार होईल किंवा नाहीं याची कोणास खात्री पटेना. शेवटीं तात्यासाहेबांना विचारून ठेवावें असें ठरलें, व हें काम मजवर सोंपविण्यांत आलें. मी लगेच त्यांच्याकडे गेलों व त्यांना सर्व हकीकत सांगून आमची अडचण निवेदन केली. त्यांनीं आमची अडचण ओळखून अध्यक्ष होण्याचें एकदम कबूल केलें; एवढेंच नव्हे तर, मला आपणहून असें म्हणाले कीं, " जर तुमचे अध्यक्ष आयत्या वेळीं आले तर मी बाजूला बसेन. " केवढी ही उदारता.

(६) भोरच्या राजकुमाराच्या मुंजीकरितां म्हणून मी व तात्यासाहेब सरकारी खास गाडीमधून भोरला चाललों होतों. गाडीमध्यें आम्हां उभयतांच्या निरनिराळ्या विषयांवर खूपच गप्पा झाल्या. त्यांमध्यें मी, महाराष्ट्रीय लोक राजकीय चळवळींत मागें पडत चालले आहेत असें त्यांना म्हणालों. तेव्हां ते म्हणाले कीं, " महाराष्ट्र हा इतर कोणाच्याहि बरोबरीचा आहे; पण एकेका राष्ट्राचा एकेक काळ असतो ! त्याप्रमाणें आतां महाराष्ट्रेतरांचा काळ आहे. द्रव्यबळावरच कांहींची देशभक्ति शोभून दिसत आहे आणि सामान्य माणसाप्रमाणें रागलोभादि विकारांनीं पछाडलेल्या व हिंसेला लागणारा दुष्टपणा अंगीं असतां तोंडच्या अहिंसावादावर जगाला भुलवूं पाहणाऱ्या लोकांचें परदेशांत कौतुक होत आहे ! ढोंगाचा जय आहे, प्रांजलपणाचा पराभव आहे ! "

शंकर केशव कानेटकर (गिरीश)

(एम्. ए., प्राध्यापक, विलिंग्डन महाविद्यालय, सांगली)

(१) माझे श्वशुर कै. गोविंद विनायक श्रीखंडे हे तात्यासाहेबांचे मिरज हायस्कुलांत शिक्षक व मिरजेतील एकाच वाड्यांतील शेजारी. १९१४ सालीं पुण्यास आल्यावर त्यांनींच माझी व तात्यासाहेबांची प्रथम ओळख करून दिली. त्यामुळें तात्यासाहेब मला ' मास्तरांचे जावई ' या घरगुती नात्यानेंच शेवटपर्यंत ओळखीत असत ! या विशेष नात्यामुळें त्यांच्याशीं माझा घरोबा वाढत गेला.

(२) पुढें १९१८ सालीं आम्ही पुण्यांत एक 'भारती विहार मंडळ' नांवाची वक्तृत्वाची संस्था स्थापन केली होती. या मंडळांत दा. वि. गोखले, वि. म. भट प्रभृति व्यक्ति व्याख्यानें देऊन गेल्या होत्या. तेव्हां तात्यासाहेबांचें एकादें व्याख्यान करवावें म्हणून मी व माझे स्नेही श्री. शंकरराव कुलकर्णी त्यांच्याकडे निमंत्रणासाठीं गेलो. सकाळचें टपाल नुकतेंच आलें होतें; व तें फोडून वाचण्यांत ते गर्क झाले होते. शिवाय त्या वेळीं इतर राजकीय कामांतहि ते फार गुंतलेले होते. आम्ही भीत भीत माडीवर गेलों व शंकररावांनीं त्यांना मंडळाचें निमंत्रण दिलें. त्याबरोबर अत्यंत स्पष्ट व खणखणीत शब्दांत त्यांनीं नकार दिला. खरें म्हणजे त्यांच्या कामाच्या मानानें आमचें काम क्षुल्लक होतें. शिवाय त्यांच्या जबाबदारीची जाणीवहि आम्हांस यावयास हवी होती, पण ती आली नाहीं. म्हणून शंकररावांनीं पुन्हा आग्रह करण्यास सुरवात केली. तेव्हां तात्यासाहेब एकदम खणखणीत आवाजांत, पत्रांतील डोकें काढून म्हणाले, "नाही! आणि नाही म्हणजे पुन्हा नाही म्हणण्यासहि वेळ नाही!" आम्हांला त्या वेळीं वाईट वाटलें, तरी त्यांनीं त्या वेळीं केलें तेंच बरोबर होतें असेंच नंतर वाटलें!

(३) त्यानंतर १९२७ सालच्या पुण्याच्या साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष व मी चिटणिसांपैकीं एक म्हणून त्यांच्याबरोबर काम करण्याचा मला योग आला संमेलनाध्यक्ष कै. तात्यासाहेब कोल्हटकर होते. त्यामुळें दोघांचे संवाद व कोट्या-प्रतिकोट्या कशा चालत तें मला अगदीं जवळून पहावयास मिळालें. या सर्व संमेलनानंतर माझ्या मनावर त्यांच्या व्यक्तिमत्वाची जी एक छाप कायमची बसली आहे ती ही कीं, एकादें काम हातीं घेतल्यानंतर तें शिस्तवार कसें पार पाडावें हें तात्यासाहेबांपाशींच शिकावें.

(४) एकदां मुंबईस दादरच्या 'ब्राह्मण-सेवा-संघांत' तात्यासाहेबांचा सत्कार होता. त्याच वेळीं माझें काव्यगायनहि ठेवलेलें होतें. सभेला सुरवात माझ्या काव्यगायनानें झाली. थोड्या कविता म्हटल्यानंतर मी थांबलों; इतक्यांत तात्यासाहेब आले. व्यासपीठावर त्यांच्या शेजारीं बसून कविता म्हणण्यास मला जरा संकोच वाटूं लागला. पण थोडा धीर धरून मी माझी 'तेढ' कविता म्हणण्याचें ठरविलें. प्रस्तावनेंत "पतिपत्नींचें भांडण होऊन अबोला सुरू झाला म्हणजे निरपराधी स्त्रीला काय वाटतें" हें सांगून मीं कविता म्हटली. कविता अत्यंत परिणामकारक झाली. पण ती संपते न संपते तोंच तात्यासाहेब एकदम मोठ्यानें उद्गारले – "मग त्यांत पतीनें काय उत्तर दिलें?" त्याबरोबर जो हंशा पिकला तो अवर्णनीय होता. माझ्या कवितेपेक्षांहि तात्यासाहेबांच्या त्या समयस्फूर्त सहजोद्गाराची श्रोतृसमाजास फारच मौज वाटली.

(५) एकदा तात्यासाहेब आमच्याकडे फराळास आले होते. पुण्यांतील कांहीं

प्रतिष्ठित मंडळी व फर्ग्युसनमधील कांहीं प्राध्यापकहि आले होते. थोडी करमणूक म्हणून माझा मुलगा चि. मधु यास मीं एक-दोन गाणीं म्हणावयास सांगितलीं. तीं तात्यासाहेबांस इतकीं आवडलीं कीं, त्यांनीं मला ताबडतोब सांगितलें, "याला गायन शिकवा व याचं धंद्यांत त्याला पुढें जाऊं द्या." ते त्यांचे शब्द मला व चि. मधूला फार प्रेरक वाटले व त्यानें पुढें तोच पेशा पत्करला. पण तेव्हांपासून शेवटपर्यंत भेट झाली कीं, प्रत्येक वेळीं मधूची प्रगति कोठवर झाली आहे याची ते न चुकतां चौकशी करीत.

(६) अगदीं परवां म्हणजे गेल्या जूनमध्यें माझ्या एका पुतण्याच्या लग्नाचे निमंत्रण देण्यास मी त्यांच्या घरीं माझ्या बंधूसह सपत्नीक गेलों होतों. मी व माझे बंधु माडीवर गेलों व त्यांना निमंत्रण दिलें. त्यांनीं निमंत्रण स्वीकारलें व त्यांना काय वाटलें कुणास ठाऊक, मला एकदम म्हणाले, "हें पाहा, आतां पुन्हां याल त्या वेळीं तुमची पत्नी व मुलें यांना घेऊन या. मी त्यांना पाहिलें त्याला फार दिवस झाले!" तेव्हां मीं म्हटलें, "माझी पत्नी खाली आली आहे!" त्याबरोबर तात्यासाहेब एकदम उठले व लगबगीनें जिना उतरून खाली आले. माझ्या पत्नीने नमस्कार करतांच त्यांना मिरजेच्या घरांतील आठवणी होऊन त्यांचे डोळे एकदम पाणावले! नंतर कुशल प्रश्न विचारून आमचें सर्व दृष्टीनीं स्वास्थ्य आहे हें ऐकून त्यांना आनंद झाला. तात्यासाहेबांची ती लगबग, ती आतुरता, तें औत्सुक्य पितृतुल्य होतें. त्यामुळें तात्यासाहेब गेले हें ऐकतांच 'आपल्या घरचें एक पितृतुल्य छत्र गेलें!' असें आम्हांस वाटल्यास नवल काय!



मारुती सादू सरपाटील

(केसरी-मराठा ग्रंथशाळेंतील शिपाई, पुणें)

(१) तात्यासाहेब हे ज्याप्रमाणें आकाशांतील तारकागणांत चंद्रमा शोभतो त्याप्रमाणें ते आपल्या शीतल प्रभेनें सर्वांना शोभवीत आणि आनंदवीत होते. त्या सत्पुरुषाची आठवण केव्हांहि माझ्या हृदयांतून जावयाची नाहीं. त्यांना गरीब-श्रीमंत यांच्यामध्यें भेदभाव नव्हता. मालक व नोकर यांत ते मनानें व वर्तनानें अंतर मानीत नसत. मी केसरी ऑफिसमध्यें कामाला १९४४ मध्यें लागलों. १९४५ साली त्यांच्याकडे जावयास सुरवात झाली. पण मला आतांपर्यंत चुकूनसुद्धां त्यांनीं कधीं एक शब्दहि वाईट वापरला नाहीं. माझें काम चुको अथवा न चुको, मला एका शब्दानें ते बोलले नाहीत. त्यांच्या गुणांचें स्मरण होऊन माझ हृदय भरून येत आहे.

(२) १९४६ सालांत माझ्या भावाचें लग्न निघालें असतां, माझ्या भावाला पैशाची जरूर लागली. तेव्हां माझ्या तोंडांतून शब्द बाहेर पडतांच ताबडतोब तात्यांनीं सांगितलें, " बरें; बाळ, तूं कांहीं काळजी करूं नकोस; उद्यां ये, मी तुझी इच्छा पूर्ण करीन. " ' लगेच दुसऱ्या दिवशीं मी व माझे बंधु त्यांच्याकडे गेलों असतां " काय बाळांनो, आलांत ? " असें प्रेमळपणानें बोलले व ' या आंत, बसा ' असें सांगितलें व ताबडतोब चेक देऊन मला व माझे बंधु यांना काळजींतून मोकळें केलें.

माझ्या चुलत बंधूंच्याकडून माझे तीनशें रुपये येणें असतांनाहि ते माझे मला ताबडतोब मिळाले नाहींत. पण तात्यासाहेबांच्या दीडशें रुपयांची मला किंमत करतां येणार नाहीं असा उपयोग झाला. कारण ती वेळ तशीच आणीबाणीची होती. चेक देतांना ते म्हणाले, " बाळांनो, चांगल्या रीतीनें चाला व चांगल्या रीतीने वागा म्हणजे ईश्वर तुमचें कल्याण करील. " पुढें कांहीं दिवसांनी त्यांनीं सांगितलें, " बाळांनो, तुम्ही गरीब आहांत. तरी मला दरमहा पंधरा रुपयांचा हप्ता दिला तरी चालेल; म्हणजे दहा महिन्यांत रक्कम फिटेल. " त्याप्रमाणें आम्हीं त्यांना दिले व शेवटच्या महिन्यास हार, गोटा, नारळ व पानसुपारी नेली असतां ते म्हणाले, " बाळांनो, तुम्ही येवढा खर्च कशाला केलांत ? तुम्ही गरीब आहांत. " तेव्हां आम्ही म्हणालों, " तुम्ही बिन-व्याजी पैसे दिले असतां आम्हांला फार आनंद झाला व आमच्यावर फार उपकार झाले. कारण तुम्ही आमच्यावर वेळ आलेली दूर केली. म्हणून अंतःकरणांतून ही इच्छा झाली. " मग त्यांनीं तें मान्य केलें. आम्ही निघतांना त्यांनीं आम्हांला पांच रुपये खाऊ म्हणून बक्षिस दिले !

(३) ता. १४-१०-४७ रोजीं हा अष्टपैलू हिरा हरपला असें माझ्या बंधूंच्या तोंडांतून शब्द बाहेर पडतांच माझें हृदय भरून आलें. मी माझ्या बंधूंना म्हणालों, " तुला अंत्यदर्शन झालें किंवा नाहीं ? " कारण मी त्या वेळीं गांवाला गेलों होतों. मला दर्शन घडलें नाहीं याचें मला वाईट वाटून अंतःकरण भरून येतें. तात्यासाहेबां-सारखे मालक मिळणार नाहींत. ते दृष्टिआड गेले, पण सृष्टिआड आहेत. त्यांची मूर्ति गेली, कीर्ति उरली ! मरावें परी कीर्तिरूपें उरावें !



भास्कर बहिरो महाबळ

(बी. ए., एल्एल्. बी., माजी न्यायमंत्री, जमखंडी)

(१) सन १९२३ सालीं तात्यासाहेब येथें आले असतां त्यांचें जाहीर व्याख्यान झालें. प्रारंभीं येथील प्रमुख पुढाऱ्यानें तात्यासाहेबांचें गुणवर्णन कर-

तांना असें सांगितलें कीं, तात्यासाहेबांच्या सारख्या मोठ्या योग्यतेच्या गृहस्थानें आमच्या खेडेगांवीं येऊन आमचा गौरव केला, हे आमच्यावर त्यांचे उपकार आहेत. यावर आपल्या भाषणाच्या प्रारंभीं तात्यासाहेबांनीं सांगितलें कीं, "मी मोठा व तुम्ही लहान असा प्रकार खरा नाहीं. आम्ही पुण्यामुंबईचे लोक वस्तुतः थोर नाहीं. तुमच्या आमच्यांत फरक नाहीं. टिळकांनीं आम्हांला आपल्या प्रभावळींत बसविलें म्हणून आम्ही चमकलों, चढलों इतकेंच! पुण्यामुंबईच्या बाजारांत भाजीपाला व फळफळावळ खेड्यापाड्यांतूनच येते. तेथें आल्यानंतर त्यांची व्यवस्थित मांडणी करून व त्यावर सुंदर आकर्षक रंगीबेरंगी वेष्टनें घालून तो माल विक्रीसाठी ठेवला जातो. मूळचा माल खेड्यापाड्यांतलाच, पण स्थानमाहात्म्यामुळें तो उठून दिसतो इतकेंच. अगदीं तीच गोष्ट आमची. मला टिळकांनीं आपल्याजवळ केलें म्हणून मी मोठा. माझ्याऐवजीं तुमच्यांपैकीं कोणास त्यांनीं निवडलें असतें तर तुम्ही माझ्याइतके किंवा अधिकच थोर ठरला असतां." आहे कीं नाहीं, सौजन्य आणि मार्मिकपणा यांचा सुंदर संगम!

(२) मिरज येथील सरस्वती-मंदिराचा उद्घाटनसमारंभ होता. हा समारंभ तात्यासाहेबांच्या हस्तें झाला. साहित्यसम्राटांच्या हस्तें हा समारंभ व्हावा ही गोष्ट अत्यंत उचित होय, असें आरंभीं स्वागताध्यक्ष म्हणाले. समारंभास तीनचार सस्थानिकहि उपस्थित आहेत, हें पाहून तात्यासाहेबांनीं संधि साधली. आपल्या भाषणांत त्यांनीं प्रथम उपक्रमच असा केला – "साहित्यसम्राट् हे शब्द उच्चारून तुम्हीं माझी स्तुति केली हें खरें; पण ही पदवी मला नको. हे दिवस सम्राटांचे नाहींत. राजे-जहागीरदारांचे तर नाहींतच नाहींत. सम्राटाला आपला मुकुट लोकसत्तेच्या पायावर ठेवलाच पाहिजे असे हे दिवस आहेत. राजेलोकांनीं ही गोष्ट लक्षांत बाळगावी; म्हणून या पदवीचा मला स्वीकार करतां येत नाहीं, किंबहुना मला तिटकाराच वाटतो!" असा उपक्रम केल्यानंतर ते पुढें म्हणाले, "आतां या पदवीनें माझा गौरव करण्यांत तुमचें चातुर्य आहे; कारण याचा अर्थच असा कीं, माझी ही पदवी काढून घेणारा माझ्याहून श्रेष्ठ साहित्यिक खात्रीनें निर्माण होईल असेंच तुम्ही सुचवीत आहां, याबद्दल मात्र मला आनंद वाटतो. ही पदवी अयथार्थ करणारे सवाई केळकर निर्माण झालेच पाहिजेत असें मीहि म्हणतों."

(३) सन १९४५-४६ सालीं दक्षिणेंतील संस्थानिकांनीं समाईक हायकोर्ट स्थापन करण्याचा विचार करून त्या दिशेनें प्रयत्न सुरू केले. कोल्हापूरसह सर्व संस्थानिकांचें एकच हायकोर्ट असावें असा कांहींचा अभिप्राय होता, तर कोल्हापूर तूर्त वगळून बाकीच्यांचेंच हायकोर्ट असावें, असें इतरांचें म्हणणें होतें. या बाबतींत तात्यासाहेबांचा अभिप्राय घेण्यासाठीं पटवर्धन संस्थानांतील कांहीं अधि-

कारी मुद्दाम त्यांच्याकडे गेले होते. सर्व गोष्टी लक्षांत घेऊन कोल्हापूरचे छत्रपति समान दर्जा स्वीकारून या योजनेंत सामील होणार नाहींत; सबब तूर्त त्यांना वगळूनच इतरांनीं हायकोर्ट स्थापावें, असा अभिप्राय तात्यासाहेबांनीं व्यक्त केला. पण त्याच वेळीं त्यांनीं आणखी एक सूचना केली. ते म्हणाले, "गैरसमज किंवा अविश्वास उत्पन्न होऊं नये म्हणून प्रथम पटवर्धन संस्थानिकांनींच एकीकरण करावें व आपलें हायकोर्ट स्थापावें व नंतर सोईप्रमाणें इतरांना त्यांत आणावें. हाच प्रारंभ अगदीं स्वाभाविक व नैसर्गिक आहे; कारण हिंदु-कुटुंब प्रथम एकत्र असतें व नंतर विभक्त होतें; पण विभक्त झाल्यानंतरहि पुन्हा एकत्र होण्याचा मार्ग हिंदुधर्मशास्त्रानें मोकळा ठेवलाच आहे. तोच न्याय येथेंहि लागू. मूळ पटवर्धनी कुटुंब व जहागीर एकच. नंतर विभक्तपणा आला व निरनिराळीं संस्थानें झालीं. आतां पुन्हा एकत्र व्हा म्हणजे झालें! हा क्रम अगदी स्वाभाविक असून इतरांना मार्गदर्शकहि होईल." पटवर्धन संस्थानिकांचहल हा केवढा कळवळा!

(४) टाइम्स वगैरे इंग्रजी पत्रांत मौजेचे लहान चुटके प्रसिद्ध होतात. त्यांतील कांहींचें रूपांतर मराठींत करून पाठविल्यास 'सह्याद्री'त प्रसिद्धि मिळेल का अशी पृच्छा एका लेखकानें तात्यासाहेबांच्याजवळ केली. वस्तुतः ती कल्पना कांहीं वाईट नव्हती; पण कारण काय असेल तें असो, तात्यासाहेबांना ती रुचली नाहीं. त्यांनीं थोडासा विचार करून हलक्या आवाजांत उत्तर दिलें, "छे! असला उद्योग मी तुम्हांला करूं देणार नाहीं. कोणाकडून कोणतें काम घ्यावें हें आम्हांला समजतें. असलें काम तुमच्याकडून करवून घेऊन तुमचे श्रम व वेळ व्यर्थ खर्ची पडावा हें मला पसंत नाहीं. तुम्हीं सह्याद्रीसाठीं स्वतंत्र लेखच लिहिला पाहिजे. केव्हां लिहून पाठवितां बोला!" ते गृहस्थ मोठे लेखक होते असें नाहीं; तथापि लेखांच्या बाबतींत सह्याद्रीनें कोणाची उसनवारी करूं नये अशा विचारानेंच तात्यासाहेबांनीं हें उत्तर दिलें असावें; पण स्पष्टपणें त्यांना नकार न देतां सहसा कोणास दुखवावयाचें नाहीं ही त्यांची अभिजात सत्प्रवृत्ति. यामुळेंच असें आडवळणी उत्तर त्यांनीं दिलें व आपला हेतु साधला!



अनंतदास रामदासी

(गोसेवक, मु. हिंगणघाट)

दिल्लीच्या मध्यवर्ती विधिमंडळांत ना. रघुवीरसिंग यांनी गोहत्याप्रतिबंधक बिल आणण्याचें ठरविलें होतें. त्यास असलेलें अनुकूल लोकमत प्रकट करण्यासाठीं पुण्याच्या नागरिकांची सभा सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत भरविण्याचें

ठरलें. अध्यक्षस्थानीं तात्यासाहेबांची योजना करावी अशा विचारानें त्यांना विनंती करण्यासाठीं मी गेलों. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, " मागच्या एका असल्या सभेस मीच अध्यक्ष होतों. डॉक्टर लोहोकरेहि असेंब्लींत या वेळीं आहेत, त्यांना विचारा. मीच दर वेळीं अध्यक्ष होण्यापेक्षां नवीन एखादा कार्यकर्ता तुम्हांस मिळाल्यास तें तुमच्या कार्यास अधिक फायद्याचें होईल. त्यांनीं नकार दिल्यास मला कळवा. मीच त्यांना आग्रह करीन. सध्यां मीं तुमचें नांव सुचविलें आंहे एवढें त्यांना कळवा, म्हणजे तुमचा कार्यभाग होईल. " आणि झालेहि त्याप्रमाणेंच. 'आपण या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारावें' असें श्री. तात्यासाहेब केळकरांचें म्हणणें आहे, एवढे शब्द ऐकतांच डॉक्टरसाहेबांची संमति मिळाली!



सीताराम विष्णु केळकर

(जमीनदार, पुणें भारत गायनसमाजाचे प्रमुख कार्यकर्ते, पुणें)

(१) लो. टिळक व तात्यासाहेब सन १९१९ सालीं विलायतेहून परत आल्यानंतरची गोष्ट. पुणें शहरांत ठिकठिकाणी प्रत्यहीं सभा होत होत्या. त्यांपैकीं एक सभा नव्या पेठेतील चिमणबागेंत कै. बाबूराव फुले यांनी भरविली होती. प्रारंभीं कांहीं भाषणें झाल्यानंतर टिळक बोलण्यास उभे राहिले. त्यांचें भाषण चालू असतांनाच सभाचालकांपैकीं एकानें सभेत फिरून हस्तपत्रकें वाटण्यास सुरुवात केली. त्यामुळें सभास्थानीं बसलेलीं मुले व बालसदृश मनाच्या व्यक्ति यांच्याकडून " अहो, इकडे द्या " अशी थोडी गडबड सुरू झाली. टिळक बोलतां बोलतां एक-दोन वेळां क्षणभर थांबले व त्यांनीं हस्तपत्रकें वाटणाऱ्या गृहस्थाकडे रोखूनहि पाहिलें. परंतु याचा अर्थ समजण्याइतकी बुद्धि त्या गृहस्थांत अगर गडबड करणाऱ्यांमध्यें नव्हती. टिळकांनीं नाइलाजानें पुन्हां आपलें भाषण करण्यास सुरुवाताहि केली. परंतु मागें बसलेल्या तात्यासाहेबांना हा प्रकार सहन झाला नाहीं. ते लगेच उठून त्या गृहस्थावर जवळजवळ खेकसून म्हणाले, " अहो, तीं हस्तपत्रकें वाटणें बंद करा. भाषण चालूं असतांना तुमच्यामुळें गडबड होत आहे, हें तुमच्या कसें लक्षांत येत नाहीं? " नंतर ते श्रोत्यांकडे वळून म्हणाले, " विलायतेंत असा प्रकार होत नाहीं. बहुतेक सभांतून हस्तपत्रकें वाटलीं जातात; परंतु तीं दारावर प्रत्येकास व्यवस्थितपणें दिलीं जातात. त्यामुळें सर्वांस हस्तपत्रकें मिळतात व गोंगाट होत नाहीं. आम्ही इंग्रजांजवळ स्वराज्य मागावयास जातों आणि इकडे आम्हांस या साध्या गोष्टी समजत नाहींत याचा अर्थ काय? " याहून नहि ते दहापांच वाक्यें अधिक बोलले, किंबहुना त्यांनीं एक उपव्याख्यानच दिलें म्हणाना. तोंपर्यंत टिळक उभेच होते. येवढा ताशेरा झाडून तात्यासाहेब खालीं

बसले आणि नंतर टिळकांनीं भाषण पुढें चालू केलें. आतां या दोन्ही थोर व्यक्ति काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत. परंतु त्या सभेस जी मंडळी उपस्थित असतील त्यांच्या डोळ्यापुढें टिळक उभे आहेत आणि त्यांना जवळजंवळ थांबवून केळकर लोकांची हजेरी घेत आहेत हा प्रसंग आजहि निःसंशय उभा राहील.

(२) तात्यासाहेब यांचे धाकटे चिरंजीव श्री. यशवंतराव हे माझे शाळेपासूनचे स्नेही. आमचं एकमेकांकडे जाणेयेणें त्या वेळीं विशेष होतें, आणि पुस्तकांबद्दल आत्यंतिक प्रेम दोघांनाहि होतें. तात्यासाहेब यांच्या लक्षांत ही गोष्ट आली असावी. एक दिवस मी यशवंतराव यांच्याकडे गेलों असतां, ज्या खोलींत आम्ही बोलत बसलों होतों तेथें तात्यासाहेब कांहीं कामाकरितां आले. मला पाहून ते एकदम म्हणाले, "तुम्हांला पुस्तकांचा संग्रह करण्याचा नाद आहे असें अण्णा म्हणत होता. तो संग्रह पाहण्यास मी एकदां येणार आहें." हें ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला. माझ्याजवळ पुस्तकांचा संग्रह तो काय असणार आणि तो मी या साहित्यसम्राटांना दाखविणार काय! माझ्या मनांतील ही भीति मी लगेच बोलूनहि दाखविली. त्यांनीं लगेच "परवांच्या दिवशीं सकाळीं मला वेळ आहे" असें म्हटलें. त्यामुळें अत्यंत संकोचलेल्या वृत्तीनेंच मीं त्यांना त्या दिवशीं येण्याबद्दल निमंत्रण दिलें. तात्यासाहेब ठरल्या वेळीं आमच्या घरीं आले आणि सुमारे दीड तास पुस्तकांबद्दल बोलण्यांत त्यांनीं घालविला! वर म्हटल्याप्रमाणें माझ्या मनास जरी अत्यंत संकोच उत्पन्न झालेला होता तरी तो दिवस माझ्या आयुष्यांत अत्यंत संस्मरणीय आणि अभिमानाचा असा मी समजतों. तात्यासाहेब यांच्या आणि माझ्यामध्यें वयानें, ज्ञानानें इ. सर्वच बाबतींत जमीनअस्मानाचा फरक होता. परंतु आरामखुर्चीत स्वस्थपणें बसून बोलणाऱ्या तात्यासाहेबांना याची जाणीव बिलकूल नव्हती. माझ्याजवळ "All quiet on the Western front" हें पुस्तक होतें. तें पाहतांच ते म्हणाले, "या पुस्तकाची फार प्रसिद्धि झालेली आहे. हें मी वाचावयास घेऊन जातों." कांहीं दिवसांनतर तें पुस्तक परत पाठवून त्याच्याबरोबर त्यांनीं अफगाणिस्थानांतील जीवनाचें चित्र रेखाटणारीं दोन पुस्तकें मला वाचण्याकरितां पाठविलीं!! तीं पुस्तकें वाचून त्यांना परत देण्याकरितां मी गेलों तेव्हां ते म्हणाले, "All quiet on the Western front" हें पुस्तक मीं वाचलें, परंतु मला तें मुळींच आवडलें नाहीं. एखाद्या वेळीं एखाद्या थर्ड क्लास पुस्तकालाहि भलतीच प्रसिद्धि मिळते. युरोप-अमेरिकेत हा धंदेवाईक लोकांचा उद्योगच आहे." अफगाण-जीवनावरील त्यांचीं पुस्तकें मीं वाचलीं किंवा नाहीं याचीहि चौकशी त्यांनीं केली, व तीं पुस्तकें मला कशीं वाटलीं म्हणूनहि त्यांनीं विचारलें. तीं पुस्तकें मला आवडल्याचें सांगतांच, "तुम्हांला त्यांत काय विशेष दिसलें?" म्हणून

प्रश्न आलाच. त्यांच्याबरोबर पुस्तकांच्या गुणदोषांची चिकित्सा करण्याचें धैर्य मला नसल्यानें " तें कांहीं सांगतां येत नाहीं " असें मोघम उत्तर देऊन मोकळा होण्याचा मीं प्रयत्न केला. परंतु या उत्तरानें निराळाच परिणाम झाला ! त्यांची वृत्ति लगेच नाराज दिसूं लागली आणि " पुस्तकें डोळसपणानें वाचलीं पाहिजेत, चिकित्सा केल्याशिवाय ग्रंथ नुसते 'गिळून' टाकण्याची खोड नवीन पिढींत जास्त दिसते, " असा शेरा मिळाला ! यानंतर मात्र सत्याचा आश्रय केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून, " त्या पुस्तकांत विशेष काय आढळलें तें थोडें फार सांगतां येईल. पण तें दुसरीकडे सांगतां येईल, आपल्यासमोर मात्र नाहीं," अशी मीं कबुली दिली. हें प्रांजळ उत्तर ऐकून मात्र तात्यासाहेब मनमोकळेपणानें हंसले, आणि त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी नाराजी दूर झाली.

(३) एका मोठ्या औद्योगिक कंपनींत तात्यासाहेब डायरेक्टर होते. त्या कंपनीचें एक विविष्ट काम पुरें करण्याकरतां कंपनीनें मजकडे सोंपविलें होतें. त्याबाबत कांहीं सूचना मीं डायरेक्टरांस दिल्या. परंतु त्याचा निर्णय त्यांच्याकडून लवकर येईना. सबब तात्यासाहेब यांच्याकडे जाऊन त्यांना मीं ही हकीकत सांगितली. मुद्द्याचे एकदोन प्रश्न विचारून त्यांनीं आपली खात्री करून घेतली; आणि त्याच दिवशीं दुपारीं कंपनीच्या डायरेक्टर-बोर्डाची सभा होती त्या वेळीं कंपनींत येण्यास मला सांगितलें. त्याप्रमाणें मी कंपनीच्या ऑफिसांत गेलों आणि नांवाची चिठ्ठी आंत त्यांच्याकडे पाठविली. लगेच त्यांनीं मला आंत बोलावून घेतलें आणि माझ्या सूचना बोर्डास सांगण्यास सांगितलें. माझें बोलणें संपतांच तात्यासाहेब एकदम म्हणाले, " या सूचना अगदीं योग्य वाटतात; आणि त्याप्रमाणें ठरविण्यास मला कांहींच हरकत वाटत नाहीं. " तात्यासाहेब यांचे हे शब्द ऐकून चेअरमनसुद्धां सर्व डायरेक्टरांचा एकदम निर्णय झाला, आणि ठराव सर्वानुमतें ताबडतोब मान्य झाला ! ! तात्यासाहेबांची निर्णायक शक्ति केवढी जबरदस्त होती हें त्या वेळीं दिसून आलेंच; परंतु कोणतीहि गोष्ट अर्धवट न सोडण्याचा त्यांचा कटाक्षहि प्रत्ययास आला. कारण ठराव लिहून होतांच मीं सुचविण्यापूर्वीच ते बोर्डास म्हणाले, " ठराव झाला, परंतु येवढ्यानें काम संपलें नाहीं. कंपनीतर्फे मुखत्यारपत्र कोणास द्यावयाचें तें ठरवा, कामाचा नक्की दिवस नमूद करा आणि खर्चाची तरतूद करा म्हणजे काम पुरें झालें. " पुष्कळ दिवस ज्या कामाच्या नुसत्या वाटाघाटी सुरू होत्या त्याचा निकाल तात्यासाहेब यांनीं अशा तऱ्हेनें दहा मिनिटांत लावला ! !

(४) केळकर घराण्याचा इतिहास लिहिला जावा अशी तात्यासाहेबांची फार दिवसांची इच्छा होती. त्यांना स्वतःला हें कार्य अंगावर घेण्यास सवड मिळणें अर्थातच अशक्य होतें. परंतु त्यांनीं ही इच्छा अनेक वेळां व्यक्त केली

होती. सन १९४६ साली मी व यशवंतराव केळकर यांनी हे कार्य अंगावर घेण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें मी तात्यासाहेब यांना सांगण्यास गेलों. त्यांना हें ऐकून अर्थातच फार आनंद झाला. यानंतर केव्हांहि भेट झाली असतां "कुलग्रंथाचें काम कोठपर्यंत आलें?" अशी चौकशी करण्यास ते केव्हांहि विसरले नाहींत. त्यांच्या मृत्यूपूर्वी थोडेच दिवस अगोदर त्यांची रस्त्यांत गांठ पडली असतां त्यांनी असाच प्रश्न विचारला. तेव्हां कामाचा रिपार्ट देऊन मी त्यांना म्हणालों, "आपणास मुद्दाम घरीं बोलावून सर्व काम एकदां प्रत्यक्ष दाखविणार आहें." तात्यासाहेब तितक्याच उत्साहानें म्हणाले, "अवश्य, कधीं येऊं तें सांगा. उद्यां येऊं?" जमलेली माहिती निदान एकत्रित करून त्यांत व्यवस्थितपणा आणल्याशिवाय त्यांच्यासारख्यांना मुद्दाम बोलावणें बरें नाहीं असा विचार मनांत येऊन मी म्हणालों, "उद्यांच नको. थोड्या दिवसांनीं मी बोलावण्यास येईन." परंतु त्यांनीं हें कार्य पाहण्याचा योग नव्हता असेंच म्हटलें पाहिजे. त्यांच्याकडून शाबासकी घ्यावी या हेतूने मीं त्यांना बोलावणें – विशेषतः ते "उद्यां येऊं?" असें म्हणत असतां – लांबणीवर टाकलें, ही गोष्ट त्यांच्या आकस्मिक निधनामुळें माझ्या मनास फारच लागली आहे.



शं. वा. ऊर्फ सोनोपंत दांडेकर

(एम्. ए., प्रिन्सिपॉल, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें)

(१) तात्यासाहेब यांनीं अनेक संस्थांशी असलेला आपला संबंध आपण सोडणार म्हणून जाहीर केलें होतें व त्याप्रमाणें वेगवेगळ्या संस्थांना त्यांचीं पत्रेंहि गेलीं होतीं. वर्तमानपत्रांत तात्यासाहेब आपल्या संस्थेचा संबंध सोडणार हें वाचल्याबरोबर आमच्यापुढें मोठा प्रश्न उत्पन्न झाला कीं, आतां त्यांची जागा घेणारा असा लायख अध्यक्ष कोण शोधावा? तेव्हां एकदां तात्यासाहेब राहिले तर पाहावें म्हणून प्रयत्न करून बघण्याकरतां माझे लेही कै. प्राचार्य भागवत व मी त्यांच्या घरीं गेलों व थोडें भीतभीतच त्यांना म्हणूं लागलों कीं, आपण इतर संस्थेचे संबंध जरी सोडले तरी आमच्या संस्थेचे संबंध आपण सोडतां कामा नये. आणि मला सांगावयास आनंद वाटतो कीं, त्यांनीं आम्हांला चटकन सांगितलें कीं, "अहो, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व शिक्षणप्रसारक मंडळ ह्या माझ्या आवडत्या संस्था आहेत. व त्यांचा संबंध मी सोडणार नाहीं." व खरोखरच देहावसान होईपर्यंत ते आमच्या मंडळीच्या हरएक कामांत लक्ष घालून काम करीत होते. या गोष्टीवरून त्यांचा अंतरात्मा कोणत्या स्वरूपाचा होता हें सहज कळून येईल.

(२) भांडारकर इन्स्टिटयूटमध्यें एका मद्रासी पंडिताचें कौटिल्याच्या

अर्थशास्त्रावर व्याख्यान व्हावयाचें होतें व प्रसंग असा कीं, नियोजित तज्ज्ञ अध्यक्ष ऐनवेळीं येत नाहीं म्हणून तार! अशा गंभीर विषयावर व्याख्यान होणार अशा प्रसंगीं ऐनवेळीं अध्यक्ष कोण उभा करणार म्हणून योजकांना काळजी वाटूं लागली. ते तात्यासाहेबांच्याकडे गेले. वास्तविक तात्यासाहेबांची प्रकृति आदल्या दिवशी अतिसाराच्या विकाराने फारच नादुरुस्त होती; ते घरींच पडून होते. पण मंडळी जेव्हां त्यांच्याकडे गेली तेव्हां प्रकृति किंचित् बरी होती; व आश्चर्य हें कीं, मंडळींच्या आग्रहास्तव तात्यासाहेबांनीं अध्यक्ष होण्यास मान्यता दिली! व त्याहूनहि आश्चर्याची गोष्ट अशी की, त्यांनीं कौटिल्याच्या अर्थशास्त्रावर उत्कृष्ट असा जवळजवळ एक निबंधच वाचला!! उपस्थित असलेला प्रत्येकजण तात्यासाहेबाच्या विद्वत्तेची तारीफ करतांना दिसत होता. तात्यासाहेबांची थट्टा, 'कायमचे अध्यक्ष' म्हणून केलेली आपण ऐकतों. पण सामान्य लोकांच्या लक्षांत हें येत नाहीं कीं, विविधप्रसंगीं अध्यक्ष म्हणून काम करण्यास लागणारी तयारी त्या थोर पुरुषाजवळ पूर्ण होती; म्हणूनच ते अध्यक्षपद स्वीकारून जागा विभूषित करूं शकत होते. त्यांच्यासारखे अनेक विषयांचा खोल अभ्यास केलेले उभ्या महाराष्ट्रांत किती सांपडतील?



श्रीधर गणपत आचरेकर

(रावबहादूर, सुपरिंटेन्डेंट ऑफ पोलीस, मुंबई)

(१) १९३४-३५ मधील गोष्ट. तात्यासाहेब कांहीं कामानिमित्त मुंबईस आले होते. ते आमच्या "देवगड एज्युकेशन बोर्ड" या शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष आणि खजिनदार असल्यामुळें त्या संस्थेसाठीं फंड गोळा करण्याचा प्रश्न मी त्यांच्या भेटीस गेल्या वेळी निघाला. तात्यासाहेब मला म्हणाले, "आचरेकर, तुम्ही आम्ही फंड गोळा करण्याकरितां देवगड तालुक्यांत दौरा काढूं या." त्यावर मी म्हटलें, "तात्यासाहेब, ठीक आहे. पण मी आहें सी. आय्. डी इन्स्पेक्टर नि आपण आहांत प्रसिद्ध राजकीय पुढारी. त्यामुळें आपण उभयतां जेथें जेथें फंडासाठीं जाऊं तेथें तेथें लोक म्हणतील कीं, मी आपल्या हालचालीवर देखरेख करण्यासाठीच फिरत आहें!" तेव्हां तात्यासाहेब हंसून म्हणाले, "अहो आचरेकर, हा सी. आय. डी. चा ससेमिरा माझ्यामागचा फार जुना आहे. तेव्हां तुम्ही माझ्याबरोबर असल्यानें लोकांना नवा धक्का बसणार नाहीं. शिवाय तुम्ही सी. आय. डी.मधील गुन्हाशाखेंत आहांत व तुमचा राजकीय-शाखेशीं कांहींच संबंध नाहीं हें आतां सर्वांना माहीत आहे. हें शिक्षणाचें कार्य असल्यामुळें सरकारलांहि तुमच्याबद्दल संशय येण्याचें कारण नाहीं." हें उत्तर ऐकल्याबरोबर मी

आश्चर्यानें सर्दच झालों. कारण मी गुन्हा-शाखेंत होतों ही माहिती तात्यासाहेबांना कशी व केव्हां झाली हें मला अजूनहि गूढच आहे. पुढें सन १९४६ सालीं सेक्रेटरी, गोगटे कॉलेज, रत्नागिरी, यांच्याबरोबर वरील कॉलेजकरितां फंड जमविण्यासाठीं देवगड तालुक्यांत दौरा काढण्याचा योगायोग आला होता.

(२) सन १९४० मध्यें देवगड एज्युकेशन बोर्डाच्या कामासाठींच मी पुण्यास तात्यासाहेबांना भेटावयाला त्यांच्या घरीं गेलों होतों. आमचें काम आटोपल्यावर मीं त्यांना प्रश्न केला, "तात्यासाहेब, असं कां व्हावं? कांहीं असामान्य बुद्धिमत्तेचीं व गाढ विद्वान् अशीं माणसें कांहीं असामान्य दुर्गुणांनीं पछाडलेलीं कां आढळतात? पाहिल्या प्रतीच्या पदव्या, समाजांत उच्च दर्जा असें असूनहि त्यांच्यामध्यें सद्गुणांची वाढ त्या प्रमाणांत कां होऊं नये?" याचें उत्तर देतांना तात्यासाहेब म्हणाले, "मनुष्य जन्माला आला कीं तो कांहीं सद्गुण नि कांहीं दुर्गुण घेऊन वाढतो. सद्गुणांचे अगर दुर्गुणांचे स्फुलिंग त्याच्यांत असतातच; ते त्याच्या शिक्षणाबरोबर वाढींला लागतात. म्हणून बुद्धीची वाढ झाली तरी दुर्गुणांना ती ताब्यांत ठेवूं शकतेच असें नाहीं."

सौ. उषा मुलाखे

(पी. ए., कोविद, बार्शी)

ऐकां हो एक नवल । कोण्या दिवशीं जाहलं ।
स्फूर्तिदेवीनें उजळलं । मन्मन प्रगट होवोनी ॥ १ ॥
रम्य कल्पनाबीजांस । मनोअंगणीं दिधला वास ।
सिंचोनि भाव-जलांस । अंतर्धान पावली ॥ २ ॥
भूमि उन्मळोन आला । अंकुर नव तेजाळला ।
जोपासावा कैसा भला । माझें मन नेणेची ॥ ३ ॥
तथापि, आत्मानंद-वारां । घालोनि प्रेमाचा उबारां ।
वाढविले कोमलांकुरा । कल्पना-वेली उभविली ॥ ४ ॥
एक दिन कल्पना-वेली । कन्या-रत्ना प्रसवली ।
कलिका, 'कविता' नामें शोभली । तिजला पाहोनी धन्य मी ॥ ५ ॥
हरपलें माझें भान । मनोअंगणीची खाण ।
अर्पावी कोणा लागून । पूज्य चरणीं कोणाच्या? ॥ ६ ॥
ढळढळीत रश्मी गगनीं । नयना दिसत असोनी ।
आठवावे कांच-मणी । तेंवी गती जाहली ॥ ७ ॥

'सह्याद्रि'-गिरि-कुहरीं । करिती गर्जना 'केसरी' ।
तेथें एका 'पुण्य-मंदिरीं' । 'नरसिंह' वास करी ॥ ८ ॥
'अध्यक्षा'च्या सिंहासनीं । 'विश्वस्ता'च्या बहुमानीं ।
'साहित्य'-भुजा उभवोनी । दैवत उभें जागतें ॥ ९ ॥
एका हातीं काव्य-स्फूर्ति । दुज्या हातीं नाट्य-युक्ति ।
तिसऱ्यांत विनोदमति । निबंधचातुरी चवथ्यांत ॥ १० ॥
कोणाचेंही दुःख हरी । दोन्हीं पक्षांना तुष्ट करी ।
सुवर्ण मध्याच्या स्तंभावरी । मानवदेही देव हा ॥ ११ ॥
देशभक्ति-प्रभा मुखावरीं । विद्वत्तेचा किरीट शिरीं ।
माधुर्य वसे वैखरीं । काय तेज वर्णावें ! ॥ १२ ॥
जो कोणी भक्त आला । कधिं न तया परतविला ।
करून कृपा तोषविला । कोणालाही पावतो ॥ १३ ॥
जया अंगीं दिव्य-गुण । त्यास येई मोठेपण ।
मोठेपणाचा अभिमान । लवभरहि नसेल ॥ १४ ॥
ऐशा गुणांचें माहेरघर । होईल जो जो नर ।
तोच देवत्वाचा मानवर । पूजा-स्थानीं शोभेल ॥ १५ ॥
ऐशा दैवताच्या पायीं । कर जुळवोनि एके ठायीं ।
सहजीच नमते डोई । कोणाचीही ॥ १६ ॥
म्हणून आला विचार । ऐशा देवाचे सत्वर ।
यथाशक्ति साचार । चरणकमल पूजावें ॥ १७ ॥
म्हणोन काय केलें ऐका । खुडोनि कविता-कलिका ।
घालोनि कागदी-करंडकां । पाठवोनी दिधली ॥ १८ ॥
राहिलें नाहीं मज भान । कोवळी कलिका अजुन ।
होईल जैं प्रफुल्ल सुमन । ते वेळींच खुडावी ॥ १९ ॥
परि देव मनाचा दयाळू । भावभक्तीचा वेल्हाळू ।
नव-भक्ताला कृपाळू । कधिं न अंतर देईल ॥ २० ॥
मुग्ध कलिका हुंगिली । परि खिन्न मुद्रा केली ।
" कोवळिक नाहीं निमाली । तोंच व्यर्थ खुडली कां ! " ॥ २१ ॥
मजसी नेलें बोलावून । भक्तिभाव निरखुन ।
टाकिली दृष्टी स्नेहपूर्ण । माता जेंवी बालका ॥ २२ ॥
असीम दिव्य-शक्तीचा । साहित्य-युक्त रसाचा ।
फिरविला कर अमृताचा । कलिकेवरून ते वेळीं ॥ २३ ॥

कलिकेचे ओंठ हंसले । पूर्ण पुष्प उमललें ।
सुगंधें राऊळ भरलें । दाही दिशा डोलल्या ॥ २४ ॥

नरसिंह बोलले माझ्याशीं । ऐका हो, काय त्या दिवशीं ।
" पोचाल काव्याच्या मोक्षीं । चिंतन जरी कराल ॥ २५ ॥

कधिं न खुडाव्या ऐशा कळ्या । उमलूं द्याव्या पूर्ण मोकळ्या ।
खुडतां गळाल्या पाकळ्या । खंत न मनीं आणावी ॥ २६ ॥

रंग उषेचे मिळवावे । नव-रसांत घोळावे ।
ऐसें जल घालावें । पुष्प दिव्य लाभेल तैं ॥ २७ ॥

धुंडून साहित्यसागर । आणावा शब्द-रत्न-संभार ।
खत घालावें मुळावर । पुष्प दिव्य लाभेल तैं ॥ २८ ॥

कल्पनेंत कल्पना गुंफोन । करावें सुंदरसें व्यजन ।
ऐशा व्यजनें वारा घालुन । पुष्प दिव्य लाभेल तैं " ॥ २९ ॥

अमृतबोलाचें केलें प्राशन । हळूंच उघडून माझे नयन ।
पाहिलें पुष्प ओळे भरून । काय प्रभा वर्णावी ॥ ३० ॥

कोणाचें जरी शंकित मन । तरी बघावें जाऊन ।
प्रचीती घ्यावी करून । लवलाही एकदां ॥ ३१ ॥

सह्याद्रीच्या राउळीं जावें । एका कोनीं बघावें ।
नयन तृप्त करून घ्यावे । पुष्पप्रभा देखोनी ॥ ३२ ॥

त्याचा सुगंध ना सरला । रंग लव ना विटला ।
पाकळ्या झाल्या ना विकला । आज जणूं उमललें ! ॥ ३३ ॥

मजसारख्या पामरासी । थोर मनें दिधले दर्शनासी ।
कृपाहस्त ठेवोनि डोईसी । तोषविली मज बहुतची ॥ ३४ ॥

परंतु माझाचि हा पडप नव्हें । कोणीहि पुढें व्हावें ।
दर्शना त्यांच्या आसवावे । तोषवीतही त्यास हो ॥ ३५ ॥

मानवदेही-देव कृपाळू । महाराष्ट्राचा ममताळू ।
स्मृति-दीप त्यास ओवाळूं । भक्तिभावें आजला ॥ ३६ ॥

बहुरंगी, बहुविध । कारागीर नानाविध ।
बुधजनांचा बुध । प्रणाम माझे शतशः ॥ ३७ ॥

❋

प्रभाकर नीळकंठ नवरे
(बी. एस्सी., पुणें)

(१) सकाळची ६–६॥ ची वेळ असेल. तात्यांकडे प्रथमच जावयास मी निघालों होतों. त्या साहित्यसम्राटाकडे साहित्यप्रेमी असा मी सेवकाप्रमाणें मुजरा करण्याकरतां निघालों होतों. त्या महापुरुषाशीं बोलावयास मन कचरेल, मनाला संकोच वाटेल म्हणून मींच लिहिलेलें पत्र त्यांना देण्यासाठी त्यांच्याकडे जात होतों. 'पुष्करिणीं'तील माडीवर अंगावर शाल लपेटून ही स्वारी – सरस्वतीची उपासना करीत असतांनाच मी त्यांच्या खोलींत – नव्हे सरस्वतीच्या मंदिराच्या गाभाऱ्यांत – प्रवेश केला. भीतभीतच मी तें पत्र त्यांच्या हातांत दिलें. तात्यांनीं तें पत्र वाचलें व कुतुहलानें ते माझ्याकडे पाहूं लागले.

"आज माझ्या वाढदिवसाच्या दिवशी प्रथम अभिनंदन करणारा तूंच आहेस व तें अभिनंदन करतांना कांहीं शंका व प्रश्न विचारणाराहि तूंच पहिला आहेस." डोळ्यावरील चष्मा काढीत सस्मित मुद्रेनें ते म्हणाले. पत्र वाचून त्यांना गंमत वाटल्यावांचून राहिली नाहीं. तोंपर्यंत माझी सारी भीति व भीड कुठ्हांच दबली होती.

मागाहून जवळजवळ अर्धा-पाऊण तास त्यांनीं माझ्याशीं गप्पा मारल्या. स्वतःच्या आरोग्याविषयीं त्यांनीं चार-पांच गोष्टी सांगितल्या, त्या मात्र फार मार्मिक होत्या. पण त्या गोष्टी कोणीहि शरीरशास्त्रज्ञ सांगेल. तात्यांचें विशेषत्व त्यांत नाहीं. त्यांनीं आणखी एक गोष्ट आरोग्याला आवश्यक म्हणून सांगितली, आणि ती म्हणजे "लहान मुलांत रमावें व त्यांच्यांत खेळावें" ही होय. "लहान मुलांसमवेत वेळ घालविल्यानें मन शुद्ध व आनंदी होते, दुःखाचा विसर पडतो व आरोग्याला हें पोषक होतें" असें ते म्हणाले.

(२) लेखनासंबंधीं बोलतांना त्यांनीं दोनतीन मार्गदर्शक सूचना दिल्या. ते म्हणाले, "खूप व मनसोक्त हिंडावें. पण हिंडतांना डोळे उघडे ठेवून हिंडावें. एक वही करून त्यांत जें विशेष वाटेल तें टिपून ठेवावें. निरनिराळ्या कल्पना, कोट्या टिपून ठेवाव्या. विविध स्वभाव टिपावेत. यांचा उपयोग पुढें लेखनांत फार होतो. नाटकें वगैरे लिहितांना मला माझ्या टिपणींचा उपयोग फार झाला."

'इतकें विपुल लेखन आपण कसें केलेंत?' असें विचारल्यावर ते म्हणाले, "माझ्या आयुष्यांतील दिवसांची संख्या व माझ्या ग्रंथांच्या पानांची संख्या पाहिली तर दिवसाला सरासरी एकादेंच पान पडेल. म्हणजे रोज एक एक पान लिहावयाचें असें जर ठरविलें, तर प्रत्येकाला विपुल लेखन करतां येईल. मात्र हौस, चिकाटी, परिश्रम करण्याची तयारी पाहिजे."

संदेश मागतांच "वरीलप्रमाणें वही करून त्यांत लिहून दाखव म्हणजे मग संदेश देईन" असें तात्या म्हणाले!

वरील प्रसंग घडल्यानंतर दोनतीन दिवसांनींच तात्यांनीं मला स्वतः लिहिलेलीं तीन पुस्तकें बक्षीस म्हणून दिलीं. सम्राटाकडून आलेला नजराणा होता तो! पुढें दोनतीन महिन्यांनीं तशी वही तयार करून त्यांत कांहीं भाग टिपून त्यांना दाखविण्यासाठीं मी त्यांच्याकडे पुन्हां गेलों. त्यांच्या खोलीची रचना बदलली होती. तेव्हां त्याबद्दल विचारतांच, 'आपल्या जीवनांत आपणच नावीन्य आणलें पाहिजे' असें म्हणत त्यांनीं माझी वही चाळिली व समाधान व्यक्त केलें. आतां संदेश न द्यावयास कोणतीच सबब उरली नव्हती. त्याच वहींत तात्यांनीं संदेश दिला. दोन्ही बाजू मांडावयाच्या व समतोल दृष्टीनें विचार करावयाचा ही जी तात्यांची वृत्ति ती या लहानशा संदेशांतहि लपूं शकली नाहीं. तो सदेश असा, "आमच्या वेळच्या विद्यार्थ्यांपेक्षां हल्लींच्या विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता अधिक खोल किंवा तीव्र आहे असें मला वाटत नाहीं. तथापि त्यांचें जगाचें ज्ञान, त्यांच्या स्वतःच्या निकट परिस्थितीचें ज्ञान, सामाजिक व्यवहार, भौतिक सुखसाधनांचा परिचय आणि उद्योगाच्या आवडी, या सर्व गोष्टी त्यांना आमच्या वेळेपेक्षां अधिक लाभल्या आहेत यांत शंका नाहीं. पण त्याबरोबर त्यांची जबाबदारीहि वाढली आहे. ती ते कशी पार पाडतात याकडे समाजाचें लक्ष राहणारच."

दि. १६-१०-४१ — न. चिं. केळकर

(३) संक्रांतीच्या निमित्तानें तिळगूळ देण्याकरतां आम्ही दोघेतिघे मित्र त्यांच्याकडे गेलों होतों. संध्याकाळच्या वेळीं घरांतील मधल्या खोलींत कोचावर तात्या बसले होते व आसपास त्यांचे नातू-पणतू बागडत होते, ते त्यांच्यांशीं गप्पा मारण्यांत रमून गेले होते, अशा वेळीं आम्ही त्यांच्याकडे गेलों व तिळगुळ देण्याघेण्याचा कार्यक्रम पार पडला. पुढें १०-१५ मिनिटें हास्यविनोदांत वेळ घालवून आम्हीं त्यांचा निरोप घेतला. 'लहानाशीं रमावें व खेळावें' ही त्यांच्या स्वतःच्या उक्तीची प्रचीति तर आलीच! पण 'विश्वाभिरामगुणगौरवगुंफितानां। क्रोधोऽपि निर्मलधियां रमणीय एव। (मोठ्या लोकांचा रागसुद्धां रमणीय असतो. मग त्यांचा आनंद किती रमणीय असेल) या सस्कृत उक्तीचीहि प्रचीति आल्याविना राहिली नाहीं.

(४) एकदां तात्यांनीं मला त्यांचें लघुनिबंधाचें पुस्तक 'पालापाचोळा' हें वाचावयास दिलें व अभिप्राय अवश्य कळव असें सांगितलें. आपल्याजवळ अभिप्राय मागितला म्हणून माझ्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखें मला वाटलें. कांहीं दिवसांनीं मीं लेखी अभिप्राय त्यांना दाखविला. आवडलेल्या व न आवडलेल्या गोष्टी मीं त्यांत नमूद केल्या होत्या. 'पालापाचोळा' हें नांव कां

दिलें असें विचाल्यावर ते म्हणाले, "माझे लघुनिबंध पालापाचोळ्यासारखे असतात असा अभिप्राय खांडेकरांनीं व्यक्त केला होता. म्हणून तेंच नांव देऊन खांडेकरांनाच तें अर्पण केलें आहे! जुन्या वठलेल्या वृक्षावर पालापाचोळा असणारच. पण त्यावर एकादें कोवळें, पालवीचें पान असेलच कीं नाही!"

माझा अभिप्राय पाहत ते म्हणाले, "मी दुसऱ्यावर खूप अभिप्राय लिहितों. पण माझ्यावर दोष दाखविणारा अभिप्रायहि मला आवडतो. कारण त्याकरतां टीकाकाराला आपलें पुस्तक वाचावें लागतें. आपलें पुस्तक वाचलें जाणें हाहि एक आनंदच आहे. लेखन करणें हा जसा एक आनंद आहे तसाच तें लेखन दुसऱ्यांनीं वाचणें हाहि आनंद नव्हे काय?"

लघुनिबंधांविषयीं बोलतांना ते म्हणाले, "पुष्कळांना वाटतें कीं, लघुनिबंधांत माहिती वगैरे असूं नये, पण मला तें मान्य नाहीं. लघुनिबंध म्हणजे कांहीं बरळणें नव्हे. ते माहितीनें भरलेले असावे असें मला वाटतें.

तात्यांचा हा प्रांजलपणा पाहून मला आश्चर्य वाटलें. "मोठा मनुष्य तोच कीं, जो आत्मटीका करूं शकतो व दुसऱ्यांनीं केलेली टीका स्वमुखानें सांगण्यास कचरत नाहीं," हें म्हणणेंहि मला त्या वेळीं पटलें.

(५) आमच्या आळींतील गणपति-उत्सवाच्या वेळेस एकदां तात्यांनीं प्रवचन केलें होतें. 'मोक्षाची कल्पना' हा त्यांनीं विषय घेतला होता. "ज्ञान मिळवणें म्हणजेच मोक्ष मिळविणें होय. ज्ञानी हे मोक्षाप्रत गेलेले असतात. या मानवी आयुष्यांत आपल्याला मोक्ष मिळवितां येतो. मोक्ष हें कांहीं स्थल नसून मोक्ष ही स्थिति आहे. मेल्यानंतर मोक्ष मिळतो, विशिष्ट स्थान मिळतें, ही कल्पना माझ्या मतें कांहींशी चुकीची आहे. इहलोकींहि ही स्थिति प्रयत्नसाध्य आहे." अशाप्रकारें त्यांचें उद्बोधक व विचारप्रवर्तक प्रवचन झालें! वरील दृष्टीनें विचार करतां तात्यांनीं ही स्थिति मिळविली होती असें विधान करावेसें वाटतें.

(६) तात्यांच्या समयसूचकतेची व विनोदी वृत्तीची एक गोष्ट आठवते. एका सभेस माधवरावजी अणे होते अध्यक्ष व वक्ते होते तात्या. 'माझीं नाटकें' हा विषय स्पष्ट करीत असतांनाच तात्यांना आपल्या एका नाटकाचें 'अमात्यमाधव' हें नांव कांहीं केल्या आठवेना! 'माधव, माधव' म्हणत ते अडखळूं लागले. 'व्रात्यमाधव असेल' असें अणे मध्येंच थट्टेच्या स्वरूपानें म्हणाले! सभेंत हंशा पिकला. 'मी तुमचें नांव विचारीत नाहीं.' तात्या शांतपणें व गंभीर चेहरा करून म्हणाले! सभेंत सात मजली हंशा पिकला!!



सौ. सरोजिनी देशपांडे

(दिल्ली)

१९३७ साल अखेर मी यूगोस्लाव्हियाच्या आंतरराष्ट्रीय स्त्री-संघाच्या परिषदेस जाऊन हिंदुस्थानांत परत आलें. युरोपमध्यें असतांना वरचेवर मी केसरीमध्यें तिकडील वर्णनें पत्ररूपानें लिहीत असें. हिंदुस्थानांत परत याल तेव्हां जरूर पुण्यास या व भेटून जा, म्हणून केसरीकारांचें मला अगत्याचें पत्र आलें होतें. त्याप्रमाणें पुण्यास गेल्यानंतर मी केसरी कचेरींत जाऊन, श्री. करंदीकर ह्यांना भेटलें आणि नंतर तात्यासाहेबांना भेटावयास गेलें. माझ्या लेखांसंबंधीं उत्तेजनपर किती वेळ तरी ते बोलले. शेवटीं ते म्हणाले, " तुमचे सारे लेख तुम्ही अवश्य पुस्तकरूपानें प्रसिद्ध करा, म्हणजे त्याला कायमचें मूर्तस्वरूप येईल," झालें. साहित्यसम्राटाकडून एका परप्रांतांत राहणाऱ्या व मातृभाषेची एवढीशी सेवा करणाऱ्या मला असा उपदेश व उत्तेजन मिळाल्यानें किती तरी आनंद झाला. आणि पडत्या फळाची आज्ञा मीं मान्य केली व भीतभीतच त्यांस विचारलें, माझें पुस्तक झालेंच तर त्याची प्रस्तावना आपण लिहाल ना ? 'अवश्य लिहीन' असें ते लगेच म्हणाले. तात्यासाहेब गेले; पण आज ते प्रस्तावनेच्या मौक्तिकरूपानें माझ्या पुस्तकांत चिरकालीन वास्तव्य करून राहिले आहेत !

❋

चिंतामण विश्वनाथ पुरोहित

(तात्यासाहेबांचे उपाध्ये, आयुर्वेदभिषक्, पुणें)

(१) तात्यासाहेबांच्या घरांतील सर्व धर्मकृत्यें वेळच्यावेळीं होण्यासाठीं त्यांच्या पत्नी (ताईसाहेब) या नेहमीं दक्ष असत. विशिष्ट तिथीच्या अगोदर तात्यासाहेबांच्या कानावर तो दिवस त्या घालीत व तात्यासाहेबहि लगेंच तो दिवस आपल्या रोजनिशींत टिपून ठेवून, त्या दिवशीं ठरलेल्या वेळीं ते अगोदर दहा मिनिटें हजर असत. धार्मिक कृत्य एकदां सुरू झालें म्हणजे त्या याज्ञिक वगैरे प्रयोगांकडे त्यांचें पूर्ण लक्ष असे व शेवटपर्यंत ते मधून बिलकुल हलत नसत. प्रयोग चालविण्यावरून ते ताबडतोब भिक्षुकाची परीक्षा करीत असत. त्यांस संस्कृत ज्ञान कमी असलेला भिक्षुक कधींच पसंत पडत नसे.

वार्षिक त्या त्या महिन्यांत होणारीं सर्व धर्मकृत्यें ते आमच्या व त्यांच्या विचारानें करीत असत. साधारण वार्षिक धर्मकृत्यें पुढीलप्रमाणें असत – रामनवमी, मंत्रजागर, रामायणसप्ताह, मातापितरांचें श्राद्ध, पक्ष, श्रावणी, गणेशचतुर्थी, दौहित्र श्राद्ध वगैरे. याप्रमाणें मनापासून ते आपलीं धर्मकृत्यें वेळच्या वेळीं न चुकतां व इतर

अनेक कामांची पाठीमागें गर्दी असतांहि व्यवस्थित करीत असत. अशा वेळीं कोणी त्यांस कांहीं कामासाठीं भेटण्यास आल्यास ते त्यांस दुसऱ्या वेळीं बोलावीत असत. त्यांच्या घरांत बाराहि महिने रोज देवांची पूजा, नैवेद्य व वैश्वदेव आजतागायत अखड होत आहे. तात्यासाहेब स्नान करून श्रीरामाला फुलें-तुळशी वाहून, गंध लावून व तीर्थ घेऊन नंतर भोजन करीत असत. हा त्यांचा नित्यनियम होता. या बाबतींत त्यांच्या पत्नीची कडक शिस्त असे व ती ते आनंदानें पाळीत असत. गोलमेज परिषदेसाठीं ते विलायतेस गेले त्या वेळीं त्यांच्या सूचनेवरून त्यांना आम्हीं जानवी मंत्रून दिलीं होतीं व तीं त्यांनीं मुद्दाम आपल्या ट्रंकेंतून नेलीं होतीं ! कोणतीहि धार्मिक गोष्ट करण्याचें ठरावल्यानंतर ती पूर्ण श्रद्धेनें, यथासांग व कोणाचेंहि मन न मोडतां ते करीत असत. गेल्या पंचवीस वर्षांच्या अवधींत त्यांच्या घरीं विवाह, मुंजी, त्यांच्या पत्नीचीं व्रतोद्यापनें वगैरे धार्मिक कृत्यें यथासांग व उत्तम तऱ्हेनें आपल्या सनातन वैदिक पद्धतीप्रमाणें झालेलीं आहेत व त्या त्या वेळीं त्यांनीं आपल्या पत्नीच्या सहमताने, त्यांस कधीहि न दुखवितां योग्य तो धार्मिक खर्च केलेला आहे. तात्यासाहेबांना वेदान्त विषयाची फार आवड होती. ते ह. भ. प. मुरूडकरबोवा यांच्या कथेला मधूनमधून आपल्या पत्नीसह जात असत. तात्यासाहेबांच्या घराण्यांत श्रीरामाची उपासना त्यांच्या वडिलांपासून आहे. रामनवमींत रामायणसप्ताह, मंत्रजागर व विशेषतः ब्राह्मणभोजन ह्या गोष्टी फार मोठ्या प्रमाणांत त्यांनी आजपर्यंत केल्या. रामनवमीच्या पारण्याच्या निमित्तानें त्यांची पत्नी अनेक माणसांना महाप्रसादाला (भोजनाला) बोलावीत असत व सर्व मंडळी मोठ्या प्रेमानें, निःसंकोचपणानें त्यांच्याकडे नेहमीं भोजनाकरितां येत असत. अशा तऱ्हेनें या घरात मोठ्या मोकळेपणानें व आनंदानें आजपर्यंत हजारों माणसें येऊन जेवून गेलेली आहेत. त्यांचा व त्यांच्या पत्नीचा (ताईचा) स्वभाव अतिशय प्रेमळ; त्यामुळे कोणालाहि ते सहज आपलेपणानें वागवीत.

(२) आम्ही संस्थान भोरचे प्रजाजन. आमच्यावर कांही दिवसांपूर्वी पाली या गांवाहून सदर संस्थानच्या हद्दीतून परमिटप्रमाणें तांदूळ आणीत असतां, संशयावरून पोलिसांकडून खटला भरण्यांत आला. त्या वेळीं तात्यासाहेब भोरच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांच्या कानावर मीं ही गोष्ट घातली व त्यांस पटलें कीं, निष्कारण हा खटला भरला आहे. कारण माझ्याजवळ परमिट होतें. नंतर सदर खटल्याची चौकशी झाली व सरकारी सर्व पुरावा झाला. परन्तु त्यांत एक मुद्दा मोठा मार्मिक होता; तो असा; युद्ध चालू असेपर्यंत धान्य ने-आण करण्याचे कायदे चालू राहतील व भोरच्या सरकारी गॅझेटमध्यें खुद्द दिवाणांच्या सहीनें युद्ध संपल्याचें जाहीर होऊन दोन महिने झाले होते व त्यानंतर सदर खटला आमच्यावर भरला होता. हें तात्यासाहेबांच्या सूक्ष्म नजरेस येतांच त्यांनी

आपल्या अधिकारांत सदर खटला काढून टाकण्याबाबतचा हुकूम मॅजिस्ट्रेट यांस पाठविला व आम्हांस मोठ्या काळजींतून मुक्त केलें.

❋

शंकर रामचंद्र बेडेकर

(बी. ए., एलएल्. बी., वकील, कोरेगांव, जि. सातारा)

१९३५ सालचा 'इंडिया ॲक्ट' पास होऊन कौन्सिल निवडणुकीचा धमामा कमीजास्त प्रमाणांत सुरू होता. लोकमान्यांच्या शिष्यसंप्रदायापैकीं सातारचे दे. भ. भाऊसाहेब सोमण हे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलच्या निवडणुकीस उभे होते; त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून श्री. चोरेकर ब्राह्मणेतर पक्षातर्फे उभे होते. हिंदुसभा त्या वेळीं निवडणुकीच्या आखाड्यांत उतरली नव्हती. भाऊसाहेबांच्या स्नेहामुळें तात्यासाहेब, बाबुराव गोखले वगैरे मंडळी खटपटीसाठीं सातारा जिल्ह्यांत दौऱ्यावर आली होती. सदर पाहुणे-मंडळीचा कोरेगांव येथें निवडणुकप्रचारात्मक व्याख्यानाचा कार्यक्रम होता. पुण्यांत शिस्तबद्ध व नियमबद्ध होणाऱ्या व्याख्यानांची सवय असलेल्या आमच्या पुणेरी पाहुण्यांस सातारा जिल्ह्यांतील दांडगट, बेशिस्त व बेताल आचाराची कडवट चव त्या वेळीं चाखण्याचा प्रसंग आला. सदभिरुचीचा मानभंग झालेला पाहावा लागला; हिडिस, किसळवाणी व अप्रयोजक भाषणपद्धति ऐकावी लागली. सभेंतील गैरशिस्त वागणुकीमुळें व अयोग्य आणि अश्लील शब्दप्रयोगामुळें तात्यासाहेब इतके बेभान झाले कीं, ते थरथर कापूं लागले, क्रोधाने लाल झाले व ब्राह्मणेतर असभ्य वक्त्यावर तुटून पडले. क्षणभर वीज कडाडल्याचा भास झाला. शब्दांची झटापट व प्रश्नोत्तरांची खडाजंगी ऐकून प्रतिस्पर्धी वक्ते अगदीं गांगरून गेले. सभेचें वातावरण एकदम भयंकर गरम व अत्यंत प्रक्षुब्ध झालें. आमच्यासारख्या तात्यांच्या चहात्यांना क्षणभर, तात्यांचा तोल सुटला, शांतिब्रह्म असणारे तात्या आज असे कसे 'प्राकृतजन' झाले असें वाटलें; परंतु प्रतिस्पर्धी प्रचारकांकडून जेव्हां अश्लील जातीयतेचा पुरस्कार झालेला तात्यांनीं ऐकला, नोकरशाहीची साथ करणारांनीं काँग्रेसनिंदेचा जेव्हां वर्षाव केला, त्या वेळीं तात्यांची विशुद्ध-भूमिकेवर आरूढ झालेल्या काँग्रेसबद्दलची भक्ति उफाळली, तत्त्वनिष्ठा प्रदीप्त झाली व मान्यवरांची क्षुद्र अवहेलना ऐकून त्यांची सुसंस्कृत वाणी तडित्तुल्य वेगानें आणि गुणानें कडाडली व शब्दसमर करण्यास सरसावली. तात्यांच्या तोंडाच्या तोफेचा तो भडिमार विलक्षण होता. तात्यांचें खरें महानुभावित्व यांतच होतें हें न सांगतांहि वरील हकिकतीवरून कळण्यासारखें आहे.

❋

केशवराव गोखले

(बी. ए., एल्एल्. बी., माजी आमदार, बेळगांव)

तात्यासाहेब यांच्यावर तत्त्वदृष्ट्या मीं अत्यंत कठोर हल्ले केले आहेत. पण त्यांचा मजवर पुत्रवत् लोभ होता. मी पुण्यास आलों म्हणजे नेहमीं त्यांना भेटे. माझ्या छोट्या महाभारतरूपी जीवनांत ज्योतिष व हस्तसामुद्रिक हें एक छोटें पर्व होऊन गेलें आहे. एकाद्या विषयाचा छंद लागला कीं, कोणाला भेटावें व कोणाचा किती वेळ घ्यावा याचें मला भान राहत नसे. मी तात्यासाहेबांच्या घरीं दुपारीं गेलों. ते झोपले होते. मी उठवूं नका म्हणून तेथील एकास सांगितलें. पण हे शब्द ऐकूनच ते जागे झाले ! मी त्यांना काम कांहीं नाहीं, तुमचा हात पाहावयाची इच्छा आहे व हस्तसामुद्रिक व तुमची कुंडली पाहून तुलनात्मक अभ्यास करावयाचा आहे असें सांगितलें. माझा या शास्त्रावर फारसा विश्वास नाहीं हें तुम्हांला माहीत आहे ना, असें ते म्हणाले. तें मला माहीत आहे; पण इतर अभ्यासूंच्या आड आपण येत नाहीं, ही आपली उदात्त प्रवृत्तीहि मला माहीत आहे म्हणून मीं सांगितलें. लगेच त्यांनीं मला आनंदानें हात दाखविला. मीहि अर्धा तास हात पाहत होतों. त्यांचे ग्रह ताडून पाहत होतों. याप्रमाणें एक तास तात्यांचा मीं घेतला. चतुरस्र कार्यकर्ता, तैलबुद्धि पण समतोल प्रवृत्ति व प्रतिपक्षाची बाजू समजून घेण्याची अभिजात मनोवृत्ति यांचे कारक रवि, बुध व गुरु ह तीन ग्रह प्रबळ असावेत असा माझा तर्क होता. कुंडलीपेक्षां "हातच्या कांकणाला आरसा नको" या म्हणीप्रमाणें हस्तसामुद्रिक हें जास्त हमखास शास्त्र आहे. तात्यासाहेब यांचे रवि, बुध, गुरु यांचे पर्वत उच्च, सुस्पष्ट व विशाल होते. गुरूवर चौक होता. रविवर स्पष्ट रविरेषा होती. आयुष्यरेषा मोठी होती. त्यांचा हात पाहून माझी शास्त्रीय जिज्ञासा तृप्त झाली. तैलबुद्धि रवीच्या रेखेवरून, लोकप्रियता गुरूच्या चौकावरून, समतोल वृत्ति व प्रतिपक्षीयाची बाजू समजून घेण्याची उच्च प्रवृत्ति बुधाच्या पर्वतावरून मला स्पष्टपणें दिसून आली. या गोष्टीला आज १५ वर्षें होऊन गेलीं, पण तो प्रसंग काल घडल्याप्रमाणें आज माझ्या मनःचक्षूपुढें उभा आहे. नंतर कर्नाटकचें राजकारण, कानडीमराठीवाद, म. गांधींचें तत्त्वज्ञान याबाबत आपलें स्वतःचें स्पष्ट मत सांगून त्यावर वादविवाद झाला. दोन तास मला त्यांनीं दिले; व मी गांधीगटांतला व केळकरांच्यावर तोंडसुख घेणारा, तरी माझ्याशीं ते अपत्यप्रेमानें वागत याचीच ही आठवण साक्ष देईल. मतभेद असले तरी प्रेम असूं शकतें व समतोल मन राखून माणसें जिंकतां येतात हेंच मी या व इतर अनेक प्रसंगांवरून तात्यासाहेबांच्याकडून शिकलों.

❀

सौ. कमळाबाई चितळे

(एम्. बी. बी. एस्., डॉक्टर, पुणें)

(१) एकदां तात्या आमच्याकडे जेवावयास आले. त्यांना जेवण फार लवकर हवें असें म्हणून मीं दहालाच दोघांचीं पानें वाढलीं. तितक्यांत इन्स्पेक्टर रेगे यांच्या पत्नीची प्रकृति तपासण्याकरितां मला बोलावणं आलें. झालें! तात्यांच्या हातांतील घास हातांतच राहिला व ते मला म्हणाले, "सर्व स्वयंपाकाचीं भांडीं आमच्यापुढें आणून ठेव व तूं आधीं जा पाहूं त्यांच्याबरोबर." मी म्हटलें, जेवणानंतर त्यांच्याकडे गेलें तरी चालेल; पण ते रागावले व म्हणाले, 'तें तुझें पहिलें कर्तव्य आहे. तूं जा कशी! तूं जात नसलीस तर मात्र मी पानावरून उठून जाईन!' मुकाट्यानें त्यांची आज्ञा पालन करणें मला भाग पडलें.

(२) एकदां तात्या एका व्याख्यानाकरितां सातारला जाण्याकरितां मोटार लॉरीनें शिरवळपर्यंत गेले. तेथें पांचगणीहून त्यांच्याकरितां ट्रॅरिंगकार येणार होती; पण ती कांहीं आली नाही. आम्ही शिरवळ ओलांडलें व मध्येंच आमच्या गाडीला बंद पडण्याची लहर लागली. दुसऱ्या गाडीकरितां निरोप पाठविणेंहि शक्य नव्हतें; व सर्व्हिसच्या सर्व गाड्या निघून गेल्या होत्या. कांहीं तरुण मंडळी खुशाल गाडींत बसून राहिली. पण तात्या सर्वांच्या आधीं ताडकन् उठले व त्यांच्या बरोबरच्या एका गृहस्थांना घेऊन चालू लागले! दोन मैल चालल्यावर सुदैवानें दुसरी गाडी आम्हांला मिळाली.

(३) एकदां एका व्याख्यानांत कोणी त्यांस म्हणाले, 'तुम्ही सर्व पोषाख स्वदेशीच घालतां का!' तेथल्या तेथेंच त्यांनीं आपल्या अंगांतला कोट मंडळींना दाखवून म्हटलें कीं, 'हा पाहा, शुद्ध स्वदेशी आहे व याच्या आंत सदरा पण नाहीं. तेव्हां माझी काटकसर व स्वदेशीचा अभिमान तुमच्यापेक्षां जास्त सांभाळला जातो.' बोलणारे गृहस्थ अगदीं गप्प बसले!

(४) कॉंग्रेसनें पुन्हां कौन्सिलमध्यें शिरावें असें ठरविलें, त्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही तात्यांच्याकडे गेलों असतां मीं म्हटलें, 'शेवटीं या लोकांनीं तुमचेंच अनुकरण केलें.' त्यावर ते शांतपणें म्हणाले, "चुका प्रत्येकाच्या हातून होत असतात. त्यांत कोणाला नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. मी कोणाच्याहि बरोबर जाण्यास, देशाचें हित होत असेल तर, केव्हांहि तयार आहें; पण मी आपलीं मतें मात्र विकणार नाहीं."

दाजी नागेश आपटे

(बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, बडोदें)

(१) सन १९१७ सालीं फेब्रुवारी महिन्यांत इंदुरास महाराष्ट्र साहित्य-संमेलनाची बैठक कै. रावबहादूर आगाशे यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. संमेलनाच्या आदल्या दिवशीं श्रीमंत सरदार माधवराव किबे यांच्या कोठींवर एक प्राथमिक सभा बोलाविण्यांत आली होती. त्या वेळीं तेथें एकदम बातमी आली कीं, तात्यासाहेब केळकर संमेलनासाठीं इंदुरास स्टेशनावर उतरल्यावर त्यांना सरकारी पोलिसांनीं अटक केली ! हें वृत्त ऐकतांच सर्वत्र खळबळ झाली. कोणी म्हणाले, त्यांना अटक करून चौकींवर नेलें, कोणी म्हणाले, त्यांना गांवांत येण्याची बंदी केली ! शेवटीं सरदार किबे व त्या संमेलनांतील प्रमुख कार्यकर्ते व इतर पुष्कळ गृहस्थ तात्यासाहेबांच्याकडे गेले व सुमारें दोन तासांनीं तात्यासाहेबांसह सर्व मंडळी सभास्थानीं परत आली. आल्यावर तात्यासाहेबांनीं हंसतहंसतच सांगितलें कीं, जोंपर्यंत आपली देशी संस्थानें बेजबाबदार आहेत, तोंपर्यंत असे प्रसंग घडावयाचेच व राजकीय आखाड्यांत उतरलेल्या दरेक व्यक्तीला हे प्रसंग नित्याचेच असावयाचे ! अशा प्रकारें संमेलनाला आरंभीं जरी विक्षेप आला, तरी पुढें मात्र त्याचें काम फार सुरळित चाललें. त्या संमेलनांत साहित्यपरिषदेची घटना मंजूर करण्यांत आली. तें काम करण्यासाठीं नेमलेल्या समितींत तात्यासाहेबांबरोबर काम करण्याची मला संधि मिळाली. त्यावेळीं त्यांच्या विधायक घटनाचातुर्याची, समन्वयाच्या धोरणाची व मनमिळाऊ स्वभावाची ओळख सर्वांनाच उत्तम तऱ्हेनें पटली. संमेलनाचे सर्व प्रतिनिधि एकत्र जेवावयास बसले असतांना श्लोक म्हणण्याचा आग्रह सर्वांना करण्यांत आला. तेव्हां तात्यासाहेबांनीं तेथेंच एक प्रसंगोचित कविता रचून म्हणून दाखविली होती.

(२) १९२१ सालीं बडोद्यास भरलेल्या महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष तात्यासाहेब होते. बडोद्याच्या सहविचारिणी सभेनें हें संमेलन भरविण्याचें ठरवून त्यासाठीं कार्यकारी मंडळाची निवडणूक केली. स्वागताध्यक्षपदीं कै. श्रीमंत संपतराव गायकवाड यांची योजना केली व मुख्य चिटणिसाच्या जागीं माझी नेमणूक झाली होती. या आमच्या कार्यकारी मंडळाच्या सभेंत संमेलनाचे अध्यक्ष कोणास निवडावे या प्रश्नाचा विचार निघाला असतां असें ठरलें कीं, साधारणतः महाराष्ट्रांतील लोकमताचा कौल अनौपचारिक रीतीनें घेऊन मग या संबंधाचा निर्णय करावा. त्या सालीं पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक संमेलनाचें अध्यक्षस्थान कै. श्री. संपतराव गायकवाड यांना देण्यांत आलें होतें व त्यासाठीं ते पुण्यासच गेले होते. त्या वेळेस तेथें सर्व पक्षांच्या सुमारें पन्नास विद्वा-

नांची एक सभा आम्हीं बोलाविली व तींत अनौपचारिक रीतीनें चर्चा करतां तात्यासाहेब केळकरांचीच निवड व्हावी, असें सर्वानुमतें ठरलें. त्याप्रमाणें त्यानंतर बडोद्यास भरलेल्या एका सभेंत संमेलनाच्या स्वागतमंडळानें तात्यासाहेबांची निवड करून त्याप्रमाणें त्यांना कळविण्यास व त्यांना अध्यक्षीय भाषण तयार करण्याची विनंती करण्याबद्दलहि कळविण्यास मला या स्वागत-मंडळानें सांगितलें. त्यानंतर महाराष्ट्र-साहित्य-परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष कै. दामोदर गणेश पाध्ये यांनीं मला चिटणीस या नात्यानें मुंबईस तातडीनें बोलाविलें. त्याप्रमाणें मी तेथें गेलों. त्यांनीं मला सांगितलें कीं, बडोद्याच्या स्वागत-मंडळानें केलेली अध्यक्षाची निवड साहित्य-परिषद मंजूर करूं शकणार नाहीं व त्या स्थानासाठीं परिषदेनें एका संस्थानिकाची निवड करण्याचें ठरविलें आहे! यावरून त्या वेळीं रा. पाध्यांची व माझी खूप खडाजंगी होऊन मीं त्यांना स्पष्ट सांगितलें कीं, ब्रह्मदेव खालीं उतरला तरी आम्ही आपला ठराव बदलणार नाहीं व साहित्य परिषदेला या कामीं लुडबूड करण्याचा अधिकार नाहीं! या आमच्या निश्चयाप्रमाणें स्वागतसभेचें काम चालूं असतांच ऑगस्ट महिन्यांत 'केसरी' पत्रांत कै. शाहूछत्रपतींच्या देशविद्रोही खटपटींचा स्फोट करण्यांत आला. त्यामुळें बडोद्याच्या छत्रपतिपक्षपाती गोटांतील स्वागत-समितीच्या कांहीं सभासदांनीं मोठें काहूर उठविलें व जर केळकरांची निवड अध्यक्षपदीं झाली, तर श्री. सयाजीराव महाराज (हे कै. शाहूछत्रपतींचे व्याही असल्यानें) रुष्ट होतील व ते संमेलनाला हजरहि राहणार नाहींत, अशी या सभासदांनीं धमकीहि दिली! श्री. सयाजीराव महाराज हे त्या वेळीं विलायतेस होते व ते संमेलनाच्या अगोदर १।२ दिवसच हिंदुस्थानांत येणार होते. या धमकीमुळें स्वागतमंडळाचे इतरहि कांहीं सभासद गडबडले. पण स्वागताध्यक्ष श्रीमंत संपतराव भक्कम राहिल्यानें हें काहूर थंडावलें. पुढें ठरल्याप्रमाणें सयाजीराव महाराज बडोद्यास आले व १।२ दिवसांनींच संमेलनाला सुरुवात झाली. सभास्थानीं सयाजीराव महाराज येऊन प्रास्ताविक विधि झाला; स्वागताध्यक्षांचें भाषण झालें व तात्यासाहेबांना सयाजीराव महाराजांनीं हार घालतांच टाळ्यांचा एवढा प्रचंड कडकडाट झाला कीं, त्यांच्या निवडणुकीला आक्षेप घेणाऱ्या स्वागतमंडळाच्या उपस्थित सभासदांचीं तोंडेंच बंद झालीं! या संमेलनांतील तात्यासाहेबांचें भाषण म्हणजे सर्व अध्यक्षीय भाषणांचा कौस्तुभमणिच होय. प्रत्यक्ष संमेलनाच्या खेळीमेळींत तात्यासाहेबांच्या सौजन्यानें व समन्वयी वृत्तीनें त्यांचे आक्षेपकहि खूष झाले!

(३) सन १९२५ सालच्या पुण्याच्या वसंत-व्याख्यानमालेंत मी 'साहित्यानंदाची उपपत्ति' या विषयावर व्याख्यान दिलें. त्या प्रसंगीं तात्यासाहेब अध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत 'सविकल्प समाधी'च्या आपल्या

उपपत्तीची अधिक फोड करून "आत्मौपम्याच्या साहाय्यानें या समाधीचा अनुभव घेतां येतो" असें तिचें उपबृंहण केलें. त्यामुळें त्या उपपत्तीला तार्किकपूर्णत्व आलें व आतां ती उपपत्ति प्राचीन संस्कृत साहित्यकारांच्या रस, रीति, ध्वनि वगैरे सुप्रसिद्ध उपपत्तीच्या तोडीची मानिली जाते, हें यथार्थच होय.

(४) सन १९३३ सालीं पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजांत तेथील वाङ्मयमंडळासमोर वाडिया सभागृहांत "राष्ट्रीय उन्नतींत धर्माचें स्थान" या विषयावर झालेल्या माझ्या व्याख्यानाच्या प्रसंगीं तात्यासाहेबच अध्यक्ष होते. त्या वेळीं हिंदुधर्म म्हणजे 'वेडगळ समजुतींची एक बांधलेली मोळी' अशी जी त्याची व्याख्या त्या कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल रँग्लर परांजपे यांनीं केली होती, ती खरी नसून धार्मिक तत्त्वांच्या अधिष्ठानाशिवाय राष्ट्राची स्थापना व त्याचें योगक्षम होणें शक्यच नाहीं असें प्रतिपादन तात्यासाहेबांनी केलें; त्या वेळचें तें विद्वत्तापूर्ण व चमकदार भाषण फार सुंदर झालें होतें.

(५) कोण जाणें, काय योग असेल तो, पण १९२१ चें बडोद्याचें साहित्यसंमेलन व त्यासाठीं अध्यक्ष म्हणून तात्यासाहेब यांची योजना या प्रसंगानें विरोधाचें तुफान उठावें असा संकेत ठरल्यासारखा दिसला. कारण, असाच प्रसंग सन १९३४ सालीं दुसऱ्यांदा पुन्हां आला! या प्रसंगीं तात्यासाहेबांना अध्यक्षस्थान देऊन योग्य व अधिकारी व्यक्तीला तेरा वर्षांनंतर पुन्हां एखादी मौलिक वाङ्मयिक उपपत्ति प्रतिपादण्याला अवसर द्यावा व एकाच व्यक्तीला दोन वेळां अध्यक्षपद न मिळूं देण्याची अनिर्णीत प्रथा मोडावी या उद्देशानें त्यांचें नांव स्वागत मंडळांत मीं सुचविलें. परंतु तत्पूर्वी येथील स्वागतमंडळाच्या किल्ल्याला पुण्याच्या कांहीं स्वार्थसाधु व्यक्तींनीं बडोद्याच्या घरभेद्यांच्या साहाय्यानें सुरुंग लावला! पुण्याच्या एका मोठ्या गृहस्थानें तात्यासाहेबांना स्वतः भेटून त्यांना सांगितलें कीं, आपण एक वेळ संमेलनाचे अध्यक्ष झालां आहांत व तेंहि बडोद्यासच. तेव्हां आतां पुनः आपलें नांव इरेस घालून आपण वाद कां उपस्थित करतां! हें त्यांचें बोलणें ऐकून तात्यासाहेब चकितच झाले! ते म्हणाले, "मला या प्रकरणाची कांहींहि माहिती नाहीं व माझा यांत बिलकुल हात नाहीं." आलेले गृहस्थ यावर म्हणाले, "तर मग आपणच बडोद्याला पत्र पाठवून आपलें नांव सुचविण्याला आपली संमति नाहीं असें कळवाना!" सौजन्यमूर्ति तात्यासाहेबांनीं हें म्हणणें ताबडतोब मान्य केलें व त्या अर्थाचें पत्र बडोद्यास स्वागतमंडळाकडे पाठविलें. अर्थात् त्यामुळें त्यांच्या निवडणुकीचा प्रश्नच निकालांत निघाला, व खटपट्या गृहस्थांचें फावलें! त्यांनीं लगेंच लटपट करून आपला हेतु साध्य करून घेतला. पण या प्रकरणीं तात्यासाहेबांच्या मनाचा निःस्वार्थीपणा व प्रांजलपणा मात्र उत्तम तऱ्हेनें दिसून आला!

(६) तात्यासाहेब केसरीचें संपादकत्व सोडण्याचा विचार करीत होते. त्यावरून सहज प्रश्न निघाला असतां त्या पत्राच्या संपादकाच्या जागेसाठीं अवश्य असलेल्या आदर्श गुणांचें त्यांनीं फार मार्मिक विवेचन केलें. ते म्हणाले, "केसरीच्या आदर्श संपादकाच्या अंगीं माझ्या मतें चार गुण अवश्य आहेत. एक तर, त्याला राजकारणाचें नुसतें व्यावहारिकच नव्हे, तर सोपपत्तिक ज्ञान हवें. मोर्लेमिंटो सुधारणांच्या वेळीं त्या सुधारणा फायदेशीर आहेत किंवा तें एक फसवेगिरीचें जाळें आहे, असा पुष्कळांना प्रश्न पडला. त्या वेळीं टिळकांनीं 'उजाडलें, पण सूर्य कोठें आहे' अशा प्रकारचे लेख लिहून राजकारणाची सोपपत्तिक चर्चा केली. त्याचप्रमाणें सुरत काँग्रेसच्या गोंधळानंतर नेमस्त पक्षानें त्यांच्याविरुद्ध उडविलेला गैरसमजुतीचा धुरळा बसविण्यासाठीं त्यांनीं केसरींत 'सनदशीर आणि कायदेशीर', 'कायदेशीर आणि बेकायदेशीर' वगैरे लेख लिहून जें राजकारणाच्या मूलतत्त्वांचें दिग्दर्शन केलें, तें मोठमोठ्या कायदेपंडितांनाहि लाजविण्यासारखें होतें, व त्यामुळेंच राजकीय मंडळांत त्यांना अग्रपूजेचा मान मिळाला. यामुळें अशा विद्वत्तेची जरूरी सिद्ध होतें. केसरीच्या संपादकाला दुसरी अवश्य गोष्ट म्हणजे मराठी-भाषाप्रभुत्व ही होय. केसरीच्या पूर्वकालांत मराठींत जवळ जवळ राजकीय परिभाषा नव्हतीच असें म्हटलें तरी चालेल. एकदां नवीन नवीन शब्दांचीं नाणीं केसरीच्या टांकसाळेंतूनच बाहेर पडलीं कीं, तीं कलदार होऊन बसतात, असा अनुभव आहे, म्हणून हा गुण अवश्य आहे. तिसरा गुण म्हणजे उत्तम वक्तृत्व हा होय. केसरीच्या संपादकाबद्दल दरेकाला इतका आदर व आपलेपणा वाटतो कीं, बहुतेक सार्वजनिक सभांना केसरीचा संपादकच अध्यक्ष हवासा वाटतो व त्याप्रमाणें त्याला आमंत्रणें येतात. अशा प्रसंगीं चांगलें वक्तृत्व अंगीं असल्याशिवाय त्याचा प्रभाव पडूं शकणार नाहीं, व आपल्या विचारप्रणालीचा योग्य परिपोष त्याला करतां येणार नाहीं. म्हणून वक्तृत्वशक्ति ही त्याला आवश्य आहे. तसेंच, केसरी ही एक कुटुंबासारखी संस्था असल्यामुळें तिला एक प्रकारची परंपरा आहे. इष्टमित्रांचे लागेबांधे आहेत, शत्रुमित्रतटस्थादि संबंध आहेत, त्या सर्वांचें ज्ञान संपादकाला अवश्य असलें पाहिजे. त्याशिवाय त्याचा वृत्तपत्रीय व्यवहार सुरळीत चालणार नाहीं. नाहीं तर त्यांत अनेक घोटाळे होतील. केसरीच्या संपादकाचा हा माझा आदर्श आहे." वस्तुतः याच्याइतकें मार्मिक विश्लेषण क्वचितच ऐकावयास मिळतें. पण तें तात्यासाहेबांच्याचकडून अपेक्षित होतें. इतरांकडून नाहीं.

(७) सन १९४२ सालीं पुण्यास माझ्या अध्यक्षतेखालीं पंडित रघुनाथशास्त्री पटवर्धन त्यांच्या ज्योतिषशिक्षणसंस्थेचा रौप्यमहोत्सव व ज्योतिषसंमेलन भरविण्यांत आलें. त्या प्रसंगीं तात्यासाहेब मुद्दाम उपस्थित झाले होते. माझें

अध्यक्षीय भाषण पुरें झाल्यावर तात्यासाहेबांना बोलण्याची मीं विनती केली. त्या वेळीं भाषण करतांना त्यांनीं स्पष्ट जाहीर केलें कीं, माझा ज्योतिषावर विश्वास नाहीं ही गोष्ट खोटी आहे. अर्थात् या परिषदेंत फलज्योतिषावर विशेष भिस्त ठेवलेली नसून महाराष्ट्रांत प्रचलित भिन्न भिन्न पंचागांच्या पुरस्कर्त्यांमधील मतभेदांचे मुद्दे कितपत निकालांत काढतां येतील व सर्व भागांत एकमुखी पंचांग रूढ करणें कितपत शक्य आहे हें पाहणें, हाच या परिषदेचा मुख्य हेतु होता. अर्थात् हा विषय पारिभाषिक व तज्ज्ञांनीं चर्चा करण्यासारखाच असल्यानें त्यांत तात्यासाहेबांना विशेष कुतूहल असण्याचा संभव नसूनहि दरेक विषयांतील मूल सिद्धान्तांचें ग्रहण करण्याची त्यांची तीव्र जिज्ञासाच या परिषदेला त्यांना आणण्याला कारणीभूत झाली. या परिषदेंतच त्यांच्या हातून मला 'ज्योतिषाचार्य' ही पदवी समर्पण करण्यांत आली. हा माझ्या आयुष्यांतील आनंदाचा व अभिमानाचा क्षण मी समजतों.

(८) तात्यासाहेबांची व माझी अखेर भेट १९४५ सालीं झाली. त्या सालच्या मे महिन्यांत पुण्याला सर परशुराम भाऊ कॉलेजांतील रमाबाई सभागृहांत हिंदु कायद्यांचें एकीकरण करावें किंवा नाहीं या विषयाची चर्चा करण्यासाठीं एक परिषद भरली होती. उभयपक्षांचें म्हणणें ऐकून निर्णय देण्याचें काम त्या प्रसंगीं मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश न्या. लोकूर यांना देण्यांत आलें होतें. परंतु सनातन पक्षीयांनीं मूळ मुद्दा सोडून भलत्याच दिशेनें श्रोतृजनांना न समजणाऱ्या संस्कृत भाषेत आपल्या वक्तृत्वाचा प्रवाह जेव्हां सुरू केला, तेव्हां तात्यासाहेब थोड्या वेळानें बोलावयास उठून त्यांनीं या सर्व वक्त्यांचा असा झणझणीत समाचार घेतला कीं, कांहीं विचारूंच नये! वेळप्रसंगीं ते कसे निःस्पृह असत हें त्या वेळीं दिसून आलें. ते म्हणाले, "दिवस आणि दिवस व कलाकच्या कलाक तुमच्या भाषणांतील एक अक्षरहि श्रोत्यांना समजत नसतांना तुम्ही त्यांच्यावर आपलीं भाषणें अशीं लादतां तेव्हां तुमच्या मनाला त्यांच्याबद्दल यत्किंचितहि दया येत नाहीं काय! हा जुलूम असह्य आहे. तुम्हांला जें कांहीं सांगावयाचें तें मुद्देसूद रीतीनें व लोकांच्या बोधासाठीं सांगितलें पाहिजे." या त्यांच्या झाडणीनंतर सभेंतील गैरलागू वक्तृत्वाचा जोर अजिबात थंडावला!

❊

प्रा. वि. घ. देशपांडे

(कार्यवाह, हिंदुमहासभा, दिल्ली)

(१) डॉ. मुकर्जी पुण्यास १९४४ सालीं १ ऑगस्टला व्याख्यान देण्यास आले. त्या वेळीं त्या सभेचे केळकर अध्यक्ष होते. इतक्या नीटसपणें अध्यक्षाचें

काम दुसऱ्या कोणी केलेलें मीं पाहिलें नाहीं. त्यांनीं केलेला समर्पक परिचय व संक्षिप्त पण मार्मिक समारोप यांमुळें मी विशेष प्रभावित झालो.

(२) बिलासपूर अधिवेशनाच्या नंतर पुण्यास वर्किंग कमिटी (हिंदुमहासभा) ची बैठक झाली व नंतर प्रचण्ड जनसमुदायासमोर डॉ. मुकर्जींचें अत्यंत प्रभावी व्याख्यान झालें. तात्यासाहेबांच्या मोटारींतून ते, श्री. खापर्डे व मी परत चाललों होतों. एस्. पी. कॉलेजच्या पटांगणांतून गर्दींतून वाट काढतांना कॉलेजचीं अवखळ पोरें मोटारला वुद्धया वाट देईनात. पण ड्रायव्हरनें मोटार जोरानें सोडतांच मुलें घाबरून ड्रायव्हरला शिव्या देत बाजूला झालीं. तात्यासाहेब चिडून म्हणाले, " मला राग येतो तो असल्या मस्तवालपणाचा. नवीन तरुणांना गैरशिस्तपणाचा विशेष अभिमान वाटतो. "

(३) दिल्लीच्या हिंदुमहासभाभवनाच्या वादाचे पंच म्हणून तात्यासाहेबांचें काम मीं पाहिलें आहें. तासन् तास ते पुरावा ऐकत असत. त्या वेळीं त्यांनी दाखविलेली कमालीची सहनशीलता वाखाणण्यासारखी आहे.



दिगंवर वासुदेव नेने

(आहिताग्नि, वैदिक संशोधन-मंडळ, पुणें)

(१) उज्जयिनीस वाङ्मय परिषदेचे अध्यक्ष म्हणून तात्यासाहेब आले होते. त्या वेळीं त्यांना बिलकूल सवड नव्हती. पण इंदूरकरांच्या आग्रहामुळें त्यांना एक दिवस इंदुरास यावें लागलें. सबंध दिवस निरनिराळ्या संस्थांना भेट देण्यांत, लोकांच्या गांठीभेटी घेण्यांत गेला. संध्याकाळीं जाहीर सन्मानसमारंभ झाला. रात्रीं आठ वाजतां ते मुक्कामावर आले. त्या ठिकाणीं इंदुरांतील कांही निवडक कवि आले होते. तात्यासाहेबांना दिवसभराचा जरी शीण आला होता व दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्यांस तेथून निघावयाचें होतें, तरी मोठ्या प्रेमानें आलेल्या कवींचें काव्यगायन दीडदोन तासपावेतों त्यांनीं ऐकलें. इतकेंच नव्हे तर आपण स्वतःहि एकदोन स्वकृत कविता म्हटल्या.

(२) मी येथें वैदिक संशोधन मंडळांत श्रौतकोशाच्या कामासाठीं आलों. तेव्हांपासून मला चारपांच वेळां तात्यासाहेबांच्या घरीं श्रौताचार्य बापटशास्त्री यांच्या 'स्वाध्यायमंदिर' संस्थेच्या कामानिमित्त जाण्याचा प्रसंग आला. कारण तात्यासाहेब स्वाध्यायमंदिर संस्थेचे कोषाध्यक्ष होते. प्रत्येक वेळीं मी गेल्याबरोबर आपलें हातचें काम बाजूला ठेवून आमचें काम अगोदर ताबडतोब करून देत. एकदां मी गेलों असतां, महामहोपाध्याय पं. श्रीधरशास्त्री पाठक यांचें शुक्लयजुःसंहितेचें भाषां-

तर ते वाचीत होते. मला पाहिल्याबरोबर त्यांना बापटशास्त्री यांनीं केलेल्या शुक्ल-यजुःसंहितेच्या भाषांतराची आठवण झाली व तुलनात्मक वाचनासाठीं त्यांनी ते माझ्याकडून मागून घेतलें. पुनः मी गेलों तेव्हां त्यांचें वाचन झालें होतें. त्यांनीं बापटशास्त्री यांच्या भाषांतराबद्दल आपला अनुकूल अभिप्राय झाल्याचें मला सांगितलें व आभारपूर्वक पुस्तक माझ्याजवळ परत दिलें.

देवदत्त भालचन्द्र क्षीरसागर

(बी. ए., एल्एल्. बी., रेशनिंग ऑफिसर, लोणावळा)

(१) आम्ही सन १९२५ सालीं तात्यासाहेबांच्या गायआळींतील राहत्या घरीं भाड्यानें राहावयास गेलों. राहावयास गेल्याबरोबर खुद्द तात्यासाहेबांनींच मला बोलावून घेतलें व सांगितलें कीं, तुम्ही येथें नवीन राहावयास आलां, तुम्हांला ज्या कांहीं गैरसोयी वाटत असतील त्या कांहींएक संकोच न धरतां मला सांगा. त्या ताबडतोब दूर करूं. तात्यासाहेब यांचा स्वभाव इतका गोडवा व निगर्वी होता कीं, त्याचें किती।ह वर्णन केलें तरी तें अपुरेंच पडेल.

(२) मी एल्एल्. बी. झाल्यावर एक कायद्याचें पुस्तक प्रसिद्ध केलें. त्यावर त्यांनी स्वतः उत्तम अभिप्राय दिला व केसरींतहि छापला. शिवाय श्री. बाळासाहेब खेर, मुंबईचे पंतप्रधान, त्या वेळीं बॉबे-लॉ जर्नलचे संपादक होते, त्यांसहि मला ओळखीचें पत्र दिलें. मी शब्द काढण्याचा आवकाश कीं, त्यांनीं ताबडतोब पत्र लिहून आपल्या चिरंजिवाबरोबर माझ्याकडे पाठवूनहि दिलें ! अंगीं इतकें मोठेंपण असून सौजन्य तर इतकें होतें कीं, कोणालाहि तात्यासाहेबांबद्दल नुसता आपलेपणाच वाटत नव्हता, तर आपण त्यांच्या घरच्यापैकींच एक आहोंत असें वाटे. आम्हांवर तर त्यांचें छत्रच होतें.



शंकर नारायण बर्वे

(केसरी-मराठा ग्रंथशाळेचे व्यवस्थापक, पुणें)

(१) नगरपालिकेच्या निवडणुंकीचा तो दिवस होता. वेळ सकाळची असावी. मतदानकेंद्राजवळ एक मोटार येऊन उभी राहिली. आंतील स्वयंसेवक लगबगीनें खालीं उतरून उद्गारला, "बर्वे, तात्यासाहेबांनीं तुम्हांला आतांच केसरी कचेरींत बोलावलं आहे." मीं विचारलें "काय हो, कांहीं विशेष ?" "त्यांच्याबरोबर कोणी पाहुणे आहेत बुवा. चला लौकर याच गाडींतून." मी

तावडतोब केसरी कार्यालयांत गेलों, तों तात्यासाहेब म्हणाले, "बर्वे, आपली ग्रंथशाला पाहण्यास हे पाहुणे (श्रीमंत युवराज मिरजकर तात्यासाहेब पटवर्धन, त्यांच्या भगिनी श्रीमंत सौ. लक्ष्मीबाई मुजुमदार, बडोदें व इतर कांहीं खाशी मंडळी) आले आहेत. म्हणून मुद्दामच तुम्हांला बोलावलं." तात्यांच्या नेतृत्वाखालीं ग्रंथशाला दाखविण्याचें काम चालूं असतां मध्येंच श्रीमंत युवराजांनीं विचारलें, "काय हो, नेपोलियनवर कांहीं पुस्तकें आहेत काय?" "हो, बरींच आहेत." उत्तर देतांदेतांच मी तीं काढवून घेण्याच्या व्यवस्थेला लागलों. तों युवराज म्हणाले, "काढावयाला नकोत; मला आतांच नकोत, सहज चौकशी केली." यावर तात्यासाहेब मोठ्या अभिमानानें बोलले, "काहूंयाहो, तुम्ही बसा इथें जरासें, त्यांच्या व्यवस्थेची कसोटी तरी घेतां येईल; एरवी तीं आम्हांला कशीं दिसणार? हीच परीक्षेची वेळ. बर्वे, आणवा पाहूं नेपोलियन-विषयक जेवढं वाङ्मय असेल तेवढं सर्व." एक रॅक आणवून त्यांत २०–२५ पुस्तकें काढवून त्यांच्यापुढें ठेवलीं. युवराज पुस्तकें चाळूं लागले व तात्यांना तीं पाहूनच आनंद व अभिमान वाटला. तो त्यांनीं केवळ "हां ऽ ऽ ऽ" या दीर्घोच्चारी एकाक्षरानेंच एकसारखा व्यक्त केला. त्यावेळचा त्यांचा तो हंसरा व प्रसन्न चेहरा आणि त्यांच्या नजरेंतील ती संतोषमय साभिप्राय चमक माझ्या डोळ्यापुढें जशीच्या तशी आहे. त्यांतील आशय शब्दानें का प्रकट होणारा आहे?

(२) तात्या जितके न्यायनिष्ठुर व कर्तव्यकठोर तितकेच ते सहृदय आणि भावनाप्रधान होते. याची साक्ष त्यांच्याशीं १९३२ सालीं प्रथमच परिचय होतांना मला पटली. पुण्यास आल्यापासून तात्यासाहेब यांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखालीं लोक-मान्यांच्या थोर संस्थेची व पर्यायानें राष्ट्राचीच अल्पस्वल्प सेवा करण्याची सुसंधि मिळावी, अशी माझ्या मनाची विलक्षण ओढ होती! तिची पूर्तता करण्यासाठीं एक दिवस हिय्या करून तात्यासाहेबांना मी प्रत्यक्ष भेटण्याचें धाडस केलें. मनांतील प्रामाणिक हेतु त्यांना कळवून टाकला. यावर ते हंसत हंसत म्हणाले, "तुम्हांला नोकरीची जरूरी असली तरी आम्हांला या वेळीं नोकराची कुठं गरज आहे? तुम्ही अर्ज करून ठेवां. वेळ येईल तेव्हां मी तुम्हांला अवश्य बोलावीन." मी मोठ्या कष्टानेंच त्यांचा निरोप घेऊन निघालों व लगेच अर्ज केला म्हणण्यापेक्षां त्यावेळच्या माझ्या कल्पनेनुसार उपमालंकारयुक्त असें एक वाङ्मयप्रधान निबंधवजा पत्रच त्यांच्याकडे धाडलें! तें त्यांच्या हातीं पडतांच त्यांनीं मला भेटण्यास बोलाविलें. भेटींत त्यांनी प्रश्न केला, "तुम्हीं आतांपर्यंत वाङ्मय असें काय लिहिलेंत?" "श्रीगणेशा शिकण्यासाठीं आपल्या चरणांजवळ यावें अशा उत्कट इच्छेनें जें पत्र लिहिलें तेंच माझें वाङ्मय!" मी निर्भयतेनें व प्रांजलपणें उत्तर दिलें. तात्या हंसले व म्हणाले, "ठीक आहे. तुमची योजना

लौकरच होणाऱ्या आमच्या ग्रंथशालेंत करण्याचें मीं ठरविलें आहे." नोकराची तूर्त आवश्यकता नसतांना २–३ दिवसांच्या अवधींतच माझी नेमणूक कां व कशी झाली हें गूढ उकलणारें उत्तर माझ्या अल्पमतीला एकच देतां येईल कीं, "तात्यासाहेब अंतःकरण ओळखणारे होते!" त्यांचें भावनाप्रधान मन द्रवलें, म्हणून तर माझा अर्ज वाचण्यापूर्वीच संस्थेंत कायम नोकर म्हणून त्यांनीं माझी नेमणूक केली. या त्यांच्या विलोभनीय गुणसंपदेची मला प्रचीति पटून मी त्यांच्याकडे अधिकच आकर्षिला गेलों!

श्रीपाद बाजी जोग

(माजी असिस्टंट चीफ ऑफिसर, पुणें म्युनिसिपालिटी)

(१) मी पुणें शहर म्युनिसिपालिटींत १९१९ ते १९३६ पर्यंत असिस्टंट चीफ ऑफिसर होतों व तात्यासाहेब १८९९ ते १९१५ व १९१८ ते १९२५ म्युनिसिपल सभासद होते. आक्टोबर १९१८ ते मे १९१९ व एप्रिल १९२२ ते मार्च १९२५ पर्यंत ते अध्यक्ष होते. ते अध्यक्ष असतांना कामासंबंधीं माझा त्यांच्याशीं नेहमीं संबंध येत असे. अध्यक्षीय कामाकरितां त्यांच्या घरींच स्वतंत्र ऑफिस असे. आपल्या अनेकविध कार्यांच्या व्यापामध्यें सुद्धां ते म्युनिसिपालिटीच्या कामाला पुष्कळ वेळ खर्च करीत असत. महत्त्वाच्या कामांत सरकारी अधिकाऱ्यांकडे जो पत्रव्यवहार होतो तो बहुधा चीफ ऑफिसर व त्यांचे मदतनीस हेच तयार करतात. गुंतागुंतीचीं कामें समजून घेऊन त्यांसंबंधीं साधक-बाधक आधार देऊन पत्रांचे मसुदे तयार करण्याची कुवत अध्यक्षांत बहुधा असत नाहीं. पण याला अपवाद म्हणजे गोपाळराव गोखले, हरिभाऊ आपटे व तात्यासाहेब केळकर हे होत. तात्यासाहेब यांच्या हातचे पुष्कळ महत्त्वाच्या पत्रांचे व रिपोर्टांचे मसुदे म्युनिसिपल फायलींत मिळतील. म्युनिसिपल ड्रेनेज व पाणीपुरवठा हीं कामें सरकारी अधिकाऱ्यांनी करून त्यांत अनंत चुका व गैरवाजवी खर्च केला. त्यासंबंधांत पुढें सरकारी अधिकाऱ्यांशी ज्या वाटाघाटी होत त्यांत म्युनिसिपालिटीची बाजू तात्यासाहेबांनीं अभ्यासपूर्वक कुशलतेनें व जोरदारपणें मांडली आहे. मे १९१९ मध्यें तात्यासाहेब लो. टिळकांबरोबर इंग्लंडास गेल्यामुळें त्यांची अध्यक्षाची पहिली कारकीर्द सहा महिन्यांत संपली. पण एप्रिल १९२२ मध्यें ते पुनः अध्यक्षपदीं बसले व वर्षभर मनोभावें त्यांनी त्या जागेवर काम केलें. म्युनिसिपालिटीनें लो. टिळकांचा पुतळा उभारावा, अशी सूचना कोणीं तरी आणली. त्याला विरोध करणारा पक्षहि प्रबळ होता. १५–२० हजार रुपये या कामास खर्च करण्यास सरकार मंजुरी देणार नाहीं व तो खर्च सभासदांस करावा लागेल अशी

भीति घालण्यांत आली. हा प्रश्न साधारणसभेपुढें खूप चर्चिला गेला. त्या वेळीं तात्यासाहेबांनीं सांगितलें कीं, "मी केसरी ऑफिसांतून लागतील ते पैसे उसने म्हणून देतों. पुतळा तर तयार करून तो उभारूं. यास सरकारी मंजुरी मिळाली तर केसरीचे पैसे परत द्या. नाहीं तर नका देऊं." पुढें येथील डिस्ट्रिक्ट कोर्टांत दावा होऊन पुतळ्याचा खर्च करणें हें म्युनिसिपालिटीच्या अधिकारांत आहे, असा निकाल झाला व केसरीचे पैसे परत मिळाले. १९२३ ते १९२५ पर्यंत तात्यासाहेब मध्यवर्ती कायदेमंडळांत गेल्यानें त्यांना आपलें काम उपाध्यक्षांवर बराच काळपर्यंत सोपवावें लागलें. लो. टिळकांच्या पुतळ्याची स्थापना मोतीलाल नेहरूंच्या हस्तें तात्यासाहेबांनी करविली. तो समारंभ फारच वैभवशाली झाला.

(२) हरिभाऊ आपटे यांचा मी शिष्य व एल्.जे. आपटे यांचा मित्र. तात्यासाहेब अध्यक्षपदाच्या अधिकारावर आल्यावर त्यांच्या पक्षांतील कांहीं म्युनिसिपल अधिकाऱ्यांनीं वरील विरोधी गटांतील मी मनुष्य म्हणून मला कामावरून काढण्याचे पुष्कळ प्रयत्न केले; परंतु स्वतः तात्यासाहेबांचें माझ्याशीं वागणें अत्यंत सरळ, निःपक्षपातीपणाचें व उदारपणाचें शेवटपर्यंत राहिलें; मरणापूर्वी दोन वर्षे आकस्मिकपणें ते एक दिवस आपण होऊन मजकडे येऊन त्यांनी म्युनिसिपालिटींतल्या कामाविषयीं चर्चा केली व माझ्या म्युनिसिपालिटींतल्या कामासंबंधी गुणग्राहकता व्यक्त केली. केवढा हा थोरपणा!



धुंडिराज गणेशशास्त्री बापट

(सोमयाजी, पांचवड, सातारा)

(१) आमच्या 'पांचवड' गांवीं पुण्याच्या सोशलक्लबच्या धर्तीवर 'थि पांचवड सोशल क्लब' नांवाची एक संस्था तीन वर्षे चालूं होती. इतिहास मंडळांतील रा. शं. ना. जोशी, शब्दकोशाचे संपादक दातारशास्त्री हे त्या क्लबांतील नटवर्गापैकींच होत. आमच्या क्लबचे नाट्यप्रयोग वांई, सातारा व औंध येथेंहि झाले व क्लबचा लौकिकहि चांगला झाला. याच सुमारास माझे मावस बंधु कै. अच्युतराव कोल्हटकर यांची गांठ पडली व त्यांनीं मोठ्या आग्रहानें मला आपल्या 'नारिंगी निशाण' संस्थेंत ओढलें. संस्थेच्या प्रत्येक नाटकांत नायकाची भूमिका मजकडेच दिली जाई. कै. अच्युतरावांनीं केलेल्या अनेक नाटकांत 'ताई तेलीण' हें त्यांचें ऐतिहासिक नाटक फारच लोकप्रिय झालें होतें. नारिंगी निशाण संस्थेचा मुक्काम एकदा पुण्यास असतां 'ताई तेलीण' या नाटकाचा प्रयोग किर्लोस्कर थिएटरमध्यें झाला. तो पाहण्यास कै. अच्युतराव यांच्या निमंत्रणावरून तात्यासाहेब व शिवरामपंत परांजपे हे उपस्थित होते! बापू गोखल्यांची भूमिका मीं केली होती. तात्या-

साहेब व शिवरामपंत हे दोघेहि नाट्यकलेचे भोक्ते व दर्दी असल्यामुळें माझें अभिनय-कौशल्य पाहून त्या दोघांचा फार अनुकूल ग्रह झाला होता. माझ्या आवाजावरून व चेहऱ्यावरून हा नट आपल्या परिचयांपैकीं कोणीतरी असावा, असा दोघांनाहि संशय आला. इतक्यांत अच्युतराव त्यांच्याकडे आले. तेव्हां बापू गोखल्यांची भूमिका करणारा नट कोण आहे ? असें त्यांनीं त्यांना विचारलें. अच्युतराव यांनीं पांचवडचे बापटशास्त्री, असें सांगतांच दोघांनाहि माझ्याबद्दल कौतुक वाटलें, आणि अंक संपल्यावर दोघेहि नेपथ्यांत आले व अच्युतरावांना म्हणाले, बापटशास्त्र्यांना इकडे बोलवा. त्याप्रमाणें रंगपटांतून बाहेर येऊन उभयतांना मीं विनयानें नमस्कार केला. तात्यासाहेब मला म्हणाले, " बापटशास्त्री, तुम्हांला नाट्यकलेची ईश्वरी देणगी आहे व तिचा अभ्यास करून तुम्हीं अभिनयकौशल्य चांगलें संपादन केलें आहे. तुम्ही आपली भूमिका समजून करितां, याबद्दल आम्ही दोघेहि तुम्हांस शाबासकी देतों, तुमचें अभिनंदन करतों. पण मी तुम्हांला अशी सूचना मुद्दाम करितों कीं, वर्ष सहा महिन्यांनीं तुम्ही हा नाद सोडून द्या. तुमची विद्या व तुमचा पेशा नाट्यकलेपेक्षां अत्यंत श्रेष्ठ आहे. तोच पुढें चालवा. मला अशी भीति वाटते कीं, तुमच्या या अभिनय-कौशल्यामुळें एखादी नाटक कंपनी तुम्हांला ओढील. तुम्हांला पैसा मिळेल, उत्तम नट म्हणून प्रसिद्धीसहि याल; पण तुमच्या श्रेष्ठ पेशाला मात्र मुकाल. तसें होऊं देऊं नका. " शिवरामपंतांनीहि ' तात्यासाहेब म्हणतात हें नीट ध्यानांत ठेवा व लौकर मोकळे व्हा ' असा दुजोरा दिला. मी ' आपल्या आज्ञेप्रमाणेंच वागेन ' अशी विनय-पूर्वक त्यांना कबुली दिली आणि लौकरच संस्था सोडली. आज श्रौतकोशासारख्या जागतिक व प्रचंड ग्रंथाचा मुख्य संपादक होण्याचें मला लाभलेलें भाग्य हें केवळ तात्यासाहेबांच्या हार्दिक उपदेशाचेंच फल आहे, यांत संशय नाहीं.

(२) पुणें येथें बुधवारांतील आर्यभूषण थिएटरांत राजे लक्ष्मणराव भोसले यांच्या अध्यक्षतेखालीं महाराष्ट्र हिंदु धर्म परिषदेचें अधिवेशन भरलें होतें. वाईचे प्राज्ञपाठशाळेचे संस्थापक पंडित नारायण शास्त्री मराठे यांनीं " सांप्रत कलियुगांतहि क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व असून ब्राह्मणांप्रमाणेंच त्यांना उप-नयनादि संस्कार व वेदशास्त्रांच्या अध्ययनाचा अधिकार आहे." हा ठराव परिषदे-पुढें मांडला. त्यास अनुमोदन देण्याचें काम मजकडे असल्यामुळें माझें भाषण चालूं होतें. जुन्या मताचे धर्मशास्त्री क्षत्रिय-वैश्यांचा आज अभाव असल्याचें प्रतिपादन करीत असतात; पण तीं वचनें सिद्धांतरूप नसून पूर्वपक्षाचीं निदर्शक आहेत, हें मी श्रोतृवर्गास पटवीत होतों. परंतु मूळ वचनें माझीं चिरपरिचित असूनहि त्या वेळीं तीं माझ्या स्मृतिपथावर येत नव्हतीं. आणि बोलण्यांत न आल्यामुळें विषयप्रति-पादनास यावा तितका उठाव येत नव्हता. वचनें आठवण्याची मी मनांत धडपड करीत होतों व त्या अर्थाचीं वाक्यें च बोलत राहिलों होतों. या वेळीं माझ्या

मनाची उडालेली धांदल माझ्या शेजारींच मागच्या खुर्चीवर बसलेल्या तात्यासाहेबांच्या लक्षांत आली आणि त्यांनी खाली वाकल्यासारखें करून, माझ्या कोटाचें टोंक ओढलें व फक्त मला ऐकूं येईल इतक्या हळूं आवाजांत 'कलावाद्यंतयोः स्थितिः' व 'नंदांतं क्षत्रियकुलम्' असा उच्चार केला! त्याबरोबर, मलाच वचन आठवल्यासारखा बहाणा करून मीं त्या वचनाचा अनुवाद केला आणि माझ्या भाषणाचा नीट जम बसला! तात्यासाहेबांची ही समयसूचकता आजन्म माझ्या स्मरणांत राहील.



सौ. सुधा वेलणकर

(बी. ए., खार, मुंबई)

(१) सह्याद्रींत तात्यासाहेबांची 'दिवाण शिप्री' ही कादंबरी चालू होती. त्यांतील एका प्रकरणांत मला एका ठिकाणीं एक बारीकशी चूक आढळली. चूक दाखवून द्यावी असें तर वाटे; पण पुन्हां मनाला असा संकोच वाटे कीं, एवढ्या मोठ्या साहित्यसम्राटांची चूक आपण कशी दाखवावी? पण त्या चुकीचें कांही स्पष्टीकरण तर हवें होतें. शेवटीं पत्र लिहूं की नको लिहूं, अशा अनिश्चयांतच पत्र लिहून तर टाकलें! पत्राला उत्तरहि तात्यासाहेबांच्या स्वतःच्या सहीनेंच ताबडतोब आलें, तें असें:– "पत्र पोचलें. आभारी आहे. 'शालू' हा शब्द 'शेल्या'ऐवजीं चुकून पडला आहे, पुढील अंकांत ती दुरुस्ती करीन. इतकें बारकाईनें वाचकानें वाचलें म्हणजे लेखकाला आनंद होतो." ह्या पत्रावरून केळकरांचा प्रांजलपणा व दुसऱ्याचा थोडाहि गुण मोठा करून दाखविण्याची वृत्ति दिसून येत नाहीं का? याच वृत्तीमुळें त्यांनीं सर्व माणसें जोडलीं. 'राखावीं बहुतांची अंतरें' ही वृत्ति स्वतः निर्लोभ, निःस्पृह राहून ठेवणें कठीण. पण ती कला तात्यासाहेबांनी आत्मसात् केली होती.

(२) ह्या पत्रानंतर तात्यासाहेब हे नाशिकला नाट्यशताब्द-महोत्सवाचे अध्यक्ष म्हणून आले होते, त्या वेळीं आमचे श्री. वेलणकर हे नाशिकला पोलीस सुपरिंटेंडेन्ट असल्यामुळें आम्ही नाशिकलाच राहत होतों. त्या वेळीं तात्यासाहेबांना निमंत्रण दिल्यावरून ते आमच्या घरीं आले होते. वेळ सकाळची होती. तात्यासाहेब जिना चढून वर आले व आरामखुर्चीत स्थानापन्न झाले. नंतर माझी नी त्यांची ओळख करून देण्यांत आली. इतक्या जवळून त्यांना मीं पाहिल्यादाच पाहिले. पाहतांक्षणींच त्यांच्या भव्य मूर्तीची माझ्यावर छाप पडली. विशेषतः त्यांचें आढें खूप रुंद व छाती विस्तीर्ण होती. माझ्या मनांत एकदम आलें कीं, देशकार्यांची धुरा वाहणाऱ्या या महापुरुषास योग्य अशीच निधडी छाती देवानें दिली आहे.



कृष्णाजी लक्ष्मण वेलणकर

(तात्यासाहेबांचे एक लेखक, पुणें)

(१) तात्यासाहेब यांच्या टिळक-चरित्र-लेखकांपैकीं मी एक लेखक होतो. टिळक-चरित्राचा मजकूर त्यांनीं मला तोंडी सांगावयाचा व मीं तो लिहावयाचा असें काम चालत असें. कामाचा उरक पडावा म्हणून वक्तशीरपणावर त्यांचा कटाक्ष असे. मला क्वचित् उशीर झालाच तर तात्यासाहेबांचे चिरंजीव आण्णासाहेब अगर ग. वि. केतकर हे लिहावयास बसलेले असावयाचे. माझी वेळ सकाळी ८ ते १० ची होती. माझें लक्ष लिहिण्यांत असतां १० वाजल्याचें लक्षांत येणार नाहीं म्हणून ते घड्याळाचा गजरच लावून ठेवीत असत. मजकूर चालू असतां कोणी तरी यावयाचें व त्यांच्याशीं तात्यासाहेबांना बोलावेंहि लागावयाचें; पण आश्चर्य असें कीं, थांबलेल्याच्या पुढील मजकूर 'हं, कुठपर्यंत आलें' असें न विचारतां स्मरणानें एकदम ते सांगूंच लागावयाचे !

एकदां सुरत कॉंग्रेस प्रकरण उपरोधिक व पल्लेदार वाक्यांनी चालूं असतां कोणीतरी मध्यें आले. त्यांस निरोप देऊन परत येतांच 'हं, कुठपर्यंत आलों आपण ?' असें त्यांनीं विचारलें. मीं लगेच 'सुरतेपर्यंत आलों' असें सांगितलें. तेव्हां ते आनंदून म्हणाले, 'माझ्या विनोदाचें असें अनुकरण होत गेल्यास मला फार आनंद वाटतो.'

(२) एकदां तात्यासाहेबांना गांवाला जावयाचें होतें. म्हणून कांहीं मजकूर तत्पूर्वीच पुरा करणें जरूर होतें व मला रविवारची सुट्टीहि होती. म्हणून त्या रविवारी जास्तींत जास्त मजकूर सतत लिहून पुरा करण्याचें ठरविलें. आम्ही असें किती वेळ लिहीत बसलों असूं ? सकाळीं ७ ते रात्रीं ८ सतत १३ तास बसून लिहिलें ! मीं सतत बसून लिहिलेंच; पण तोंडी सांगावयाचा इतका मजकूर मनोमय योजून ठेवण्यास तात्यासाहेबांनी आधीं किती श्रम घेतले असतील याची कल्पना करा ! मजकूर पुरा होऊन मी घरीं जाण्यास निघतांच तात्यासाहेब म्हणाले, "छे छे वेलणकर ! आतां दोन्ही वेळचें जेवूनच जा." अशा रीतीनें त्या दिवशी मला त्यांच्या पंक्तीचा लाभहि झाला !

(३) पुढें अनेक वर्षांनीं कांहीं कामाकरतां माझ्या लेखनाचें प्रशस्ति-पत्र मागितलें असतां त्यांनीं कुठें कांहींहि न पाहतां तें लगेच लिहून दिलेलें पाहून मी आश्चर्यानें म्हटलें, 'तात्यासाहेब, माझें सबंध नांव आपण कधींहि विचारलें नसतांना तें यांत कसें लिहिलेंत !' ते म्हणाले, "म्हणजे मला इतका भोळा समजतां की काय ? अहो, तुम्ही मजकडे लिहिण्यासाठीं येण्यापूर्वीच आमच्या बापटांना तुमचें सबंध नांव मीं विचारून घेतलें होतें."

(४) असेंब्लीच्या एका निवडणुकींत तात्यासाहेबांनीं नळाच्या तोटीवर कोटी केली होती. एक मतदार मत देऊन बाहेर पडल्यावर बाहेरच्याच नळावर ते लगेच हात धूत होते. त्यांचे स्नेही म्हणाले, ' काय खाल्लेत हो आंत ! ' तात्यासाहेब मध्येंच म्हणाले, " छे, छे, मत देण्यांत कांहीं पाप केलें असेल म्हणून त्या पापानें भरलेले हात ते धूत असतील ! "

(५) एकदां टिळक-चरित्रांतील एक प्रकरण केसरी कचेरींतील एका ग्रंथांतील माहिती पाहून लिहिण्याकरितां आम्हां दोघे तिकडे निघालों असतां रस्त्यांतील एक भांडण कुशलतेनें तात्यासाहेबांनीं मिटविलें. चौकशींत समजलें कीं, सायकलीच्या धक्क्यानें सांडलेल्या दुधाचे पैसे सायकलस्वार गवळ्यास देत असतांहि तो नुकसानीदाखल मागत असलेले दुप्पट पैसे सायकलवाला देत नसल्यानें मारामारीची वेळ येऊन तुफान गर्दी झाली आहे. ती पाहून तात्यासाहेबांनीं सल्ला दिला कीं, " अहो, हें काय ? तुम्ही एवढे लोक जमलांत ना ? तर मग त्या गवळ्याला सर्वांनीं धरून ठेवा आणि सायकलवाल्याला जायला सांगा. " झालें, लोकांनीं असें करतांच सर्वच ग्रंथ आटोपला ! सायकलवाला क्षणार्धांत निघून गेला आणि गवळ्याखेरीज सर्व मंडळी हंसत हंसत तात्यासाहेबांची तारीफ करीत निघून गेली !

(६) मी विजय प्रेसमध्यें नोकर असतांना असेंच एक हातघाईवर आलेलें प्रकरण तात्यासाहेबांनीं गोडींत मिटविलें. एका गृहस्थाचें " विनोदी लेखसंग्रह " या नांवाचें पुस्तक छापून तयार झालें व त्याची पहिलीच प्रत लगेच होणार असलेल्या या पुस्तकाच्या प्रकाशनसमारंभाकरितां प्रकाशकांच्या हातीं वेळेवर दिली. पण ती पाहतांच प्रत वेळेवर दिल्याचें कौतुक न करतां उलट संतापून हमरीतुमरीवर ते आले. इतक्यांत कांहीं कामाकरितां तात्यासाहेब अचानकपणें छापखान्यांत आले. काय झालें हें समजतांच सुशिक्षितांतील भांडण विकोपास जाऊं नये म्हणून ते म्हणाले, " अहो, हें हो काय ? जसें पुस्तकाचें अंतरंग तुम्हीं केवळ विनोदानें नटविलें आहे तसें छापखान्यानें बाह्यांग नटाविलें यांत बिघडलें तें काय ? अहो, पुस्तकाचें कव्हर उलटं लागलें आहे म्हणतां; पण कव्हरकडून पुस्तक उघडून पाहून कव्हर उलटें झालें आहे हें पाहतांच विनोदच नाहीं का सुरू होणार ? " झालें; तात्यासाहेबांची हीच कल्पना घेऊन व छापखान्यावरील राग विसरून ते गृहस्थ प्रकाशनसमारंभाला एकदम निघून गेले ! !

र. द. गोडबोले

(चिटणीस, महाराष्ट्र चित्रकारमंडळ, पुणें)

(१) दुसरें महाराष्ट्र चित्रकार संमेलनाचें अधिवेशन पुण्यास १९३२ सालीं भरणार होतें. त्यासाठीं अनेकांनीं लहानमोठ्या देणग्यांचीं आश्वासनेंहि दिलीं होतीं. पण संमेलन दोन दिवसांवर आलें तरी एक पैसाहि रोख जमला नव्हता ! आगाऊ खर्चाची मोठीच आपत्ति आली. तेव्हां रात्रीं दहा वाजतां मीं तात्यासाहेबांकडे जाऊन ही स्थिति निवेदन केली. तात्यासाहेबांनीं लगेच दीडशें रुपयांचा चेक लिहून हसतमुखानें माझ्या हवालीं केला. वाचेला कृतीची खेळकर जोड देणारे तात्यासाहेब अवध्या महाराष्ट्राला वंदनीय कां वाटूं नयेत ?

(२) १९३४ सालीं मुंबईचे प्रसिद्ध कलावंत श्री. हळदणकर चित्रकार संमेलनाचे अध्यक्ष होते. अध्यक्षांच्या भाषणाच्या शेवटीं ते म्हणाले, " चित्रकाराचा खरा अॅड्रेस (भाषण) चित्रलेखनच. त्याला शाब्दिक भाषणाचें काय महत्त्व ! संमेलन चिटणीस गोडबोले यांनीं मनावर घेतल्यास माझा खरा अॅड्रेस (अध्यक्षीय भाषण) मी रंगकुंचल्यानेंच करून दाखवीन. " बैठक आटोपतांच श्री. हळदणकर मला म्हणाले, " गोडबोले, तात्यासाहेबांचे 'पोर्टेट' करण्याची फार दिवसांची माझी इच्छा आहे. पण सिटिंग देण्यासाठी त्यांचें मन तुम्ही वळवूं शकाल तर फार आनंद होईल. " तात्यासाहेब तेथेंच होते. मी अध्यक्षांची ही इच्छा त्यांना सांगतांच त्यांनी लगेच होकार दिला आणि श्री. हळदणकरांनींहि सर्व पाहुण्यांसमक्ष त्यांचें 'पोर्टेट' अगदी थोड्या वेळांत करून दाखविलें. हे एवढे मोठे महाराष्ट्राचे प्रमुख पुढारी, होय म्हणतील कीं नाहीं ही शंका त्या परस्थ पाहुण्यांना येणें साहजिक होतें. पण तात्यासाहेबांचा स्वभाव किती निगर्वी व खेळकर होता याचें त्यापेक्षां दुसरें कोणचें प्रत्यंतर दाखवितां येईल ?

नरहर गणेश कमतनूरकर

(विनोदी लेखक, नाटककार, सांगली)

(१) कै. गडकऱ्यांच्या विशेष आमंत्रणानें तात्यासाहेब 'पुण्यप्रभाव' चा प्रयोग पाहण्यास आले होते. चौथ्या अंकांत वृंदावनाकडून नायिकेच्या समजल्या गेलेल्या पाळण्यांतील मुलाचा खून झालेला; आणि पांचव्या अंकाच्या सुरुवातीस नायिका वसुंधरा रिकामा पाळणा हलवीत " निज बाळा रे, गाणें गातें आई ... " हें कारुण्यानें ओथंबलेलें गाणें गात बसलेली पाहतांच, " अरेरे, पाळणा रिकामा ना ! " असे तात्यासाहेबांच्या तोंडून एकदां उद्गार निघाले, आणि

उपरण्याच्या सोग्याचा शेवट अगदीं सहजपणें डोळ्यांकडे गेला ! कवीचें काव्य कवीच्या भावनेनें जाणावयास जाणणारा कवीच असला म्हणजे कशी रसगंगा वाहूं लागते, याचें प्रत्यक्ष दृश्य मला त्या रात्रीं अगदीं जवळून पाहावयास मिळालें.

(२) विनोदावरचें तात्यासाहेबांचें विस्तृत विवेचन ग्रंथरूपानें नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें. त्या सुमारास कांहीं सार्वजनिक समारंभासाठीं तात्यासाहेब सांगलीस आले होते. अर्धा एक तास अगदीं एकटेच असे माझ्या घरीं त्यांस भेटण्याचा सुयोग आला. तेवढ्या थोडलींतहि आमचें खालीलप्रमाणें बोलणें झालें. विनोदमीमांसेंत विनोदाच्या नीतीबद्दल विवेचन असावयास पाहिजे होतें, तेवढी त्या ग्रंथांत महत्त्वाची उणीव राहिली असून, पुढील आवृत्तींत ती भरून काढावी, असें त्या भेटींत मी सहज बोलून गेलों. तात्यासाहेबांनीं ती उणीव एकदम कबूल केली; पण पुढे ते लगेच म्हणाले, " माझ्या पुस्तकाच्या पुढच्या आवृत्तीपर्यंत थांबायचें कशाला ? तुम्हीच एक लहानसें पुस्तक विनोदाच्या नीतीबद्दल कां लिहीत नाहीं ? " " कोण, मी ? " आश्चर्याच्या अचानक धक्क्यानें लटपटून जाऊन मीं म्हटलें, " विनोदाच्या नीतीचें विवेचन मी करूं ? माझी योग्यता काय आणि विषय काय ? "

माझें बोलणें ऐकून तात्यासाहेब एकदम गंभीर झाले आणि म्हणाले, " विनोदी वाङ्मय तुम्हांला मनापासून आवडतें, होय ना ? विनोदालाहि त्याचें असें एक नीतिशास्त्र असूं शकतें, असें तुम्हांला वाटतें आहे ना ? तुमचें तें वाटणें अगदीं बरोबर आहे, असें माझेंहि म्हणणें आहे; इतकी प्राथमिक तयारी म्हणजेच मी म्हणतों योग्यता. लिहिण्यासाठीं जी तयारी करावी लागेल, जे श्रम घ्यावे लागतील, तीं सारीं साधनें आहेत. " काय उत्तर देणार मी ? मी गप्प बसलेला पाहून आपण होऊनच तात्यासाहेब पुढें म्हणाले, " मी सांगूं, अशासारखें विवेचनात्मक पुस्तक लिहिण्याला तुमचें मन कां कचरतें तें ? आजपर्यंत आपण लिहूं तें उत्तमच ठरलें पाहिजे, या गुप्त ईर्षेनें तुम्ही लिहीत आलेले आहांत. आपण लिहूं तें कसें होईल, काय होईल याची जरा शंका आली रे आली कीं, तुम्ही सुचलेला विषय मनांतून काढून टाकतां, आपल्या ठिकाणीं स्वस्थ बसून दुसरा कोणी त्या विषयावर लिहील तेव्हां आपल्याला वाचायला मिळेलच, अशा विचारानें वाट पाहत राहतां ! अरे, असं कां ? आपण लिहूं तें साऱ्यांना आवडलेंच पाहिजे, असा तुमच्या मनाचा आग्रह कां ? एखाद्या विषयावरचें तुमचें लिहिणें नाहीं तितकेसें जमलें, तर न जमेल; त्याबद्दल पुढें दुसरा कोणी पुष्कळ, किंवा मी म्हणतों, अधिक चांगलें लिहीलहि. तुमचाच Last word असावा, अशी तुमची महत्त्वाकांक्षा कां असावी हो ? " " छे, छे, माझी तशी मुळींच महत्त्वाकांक्षा नाहीं " लगेच मी अजीजीनें म्हणालों. तेव्हां ते म्हणाले, " तुम-

च्या मनाच्या सपाटीवर ती महत्त्वाकांक्षा नाही, हें मला माहीत आहे. पण मी सांगतों, तुमच्या मनाच्या तळाशी तशी आकांक्षा आहे खास. प्रत्येक लेखकाला तिनें पछाडलेलें असतें. परंतु तिची आपण हकालपट्टी केली पाहिजे. जो विषय आपल्याला आवडेल आणि आपल्याला जें त्याच्याबद्दल म्हणायचें असेल, तें खुशाल म्हणून टाकावें; ते जगांत सोडून द्यावें. दुसरे त्याबद्दल विचार करतात, त्यांना कांहीं नवीन विचार सुचतात, ते ते जगापुढें मांडतात; अशाच मार्गानें एखाद्या विषयावरचें साहित्य एकसारखें तयार होत जातें आणि त्याच्यावरचे विचार पूर्णतेकडे जाऊं शकतात. आणि दुसऱ्यानेंच नेहमीं आपल्याला विचाराचें भक्ष्य पुरवावें असें तुम्ही कां म्हणावें हो? हा आयतेपणा चांगला नाहीं, द्या सोडून तो. पुनः आपली भेट होईल तेव्हां विनोदाच्या नीतीवरचें पुस्तक लिहून झालें असें मला सांगा."

पुढच्या एकदोन भेटींत तात्यासाहेबांनी "काय, त्या विनोदाबद्दलच्या पुस्तकाचें तुमचें काम कुठपर्यंत आलें आहे?" असें विचारलेंच. "चाललंय" असें कांहीं तरी पण चांचरत उत्तर मीं दिलें. नंतरच्या भेटीगांठीच्या प्रसंगीं तात्यासाहेबांचा तो गोळीबंद प्रश्न येऊन ठोका देणार अशी माझ्या मनानें भीतीच घेतली होती; परंतु एकदोन प्रसंगानंतर त्यांनीं तो प्रश्न माझ्यावर टाकला नाहीं. एक तर ती बाबत त्यांच्या लक्षांतून निघून गेली असेल किंवा मला 'पक्का मक्ख' असें ठरवून त्यांनीं तो विषय सोडूनहि दिला असेल!

❋

सौ. सरोजिनी कमतनूरकर

(सांगली)

(१) सन १९३२ ची गोष्ट. सांगली विलिंग्डन कॉलेजमध्यें तात्यासाहेब आलेले होते. कॉलेजमधील विद्यार्थ्यांबरोबर त्यांची अनौपचारिक चर्चा चालूं होती. मी त्या दिवशीं तात्यासाहेबांना प्रथमच पाहिलें. त्यांचा तो पक्का महाराष्ट्रीय पोषाख, त्यांची ती समाधानी हंसतमुख चर्या, आपलें वयाचें, ज्ञानाचें, अनुभवाचें, विद्येचें सारें मोठेपण विसरून, विद्यार्थ्यांशी त्यांच्या पातळीत येऊन एकरूप, समरस होऊन त्यांनीं केलेली चर्चा मी कदापि विसरणें शक्य नाहीं. वाटेल ते, वाटेल तसले खोचक-बोचकहि प्रश्न विद्यार्थ्यांनीं विचारले, तरी त्यांना राग तर यायचा बाजूलाच राहिला, पण विद्यार्थ्यांना पटेल अशी विनोदमय, मार्मिक उत्तरें देण्याची त्यांची कुशलता माझ्या विशेष लक्षांत राहून गेली आहे.

(२) इंग्रजीमध्यें वाचलेली एक लघुकथा मला अतिशय आवडली होती. अपघातांत दोन्ही पाय गेलेल्या एका लहान मुलासंबंधीं मनाला एक प्रकारचा

चटका लावणारी ती लघुकथा मीं मराठींत लिहून काढली आणि स्त्रीवर्गाच्या लिखाणाला विशेषत्वानें प्राधान्य देणाऱ्या आमच्या 'स्त्री' मासिकाकडे प्रसिद्धी-साठीं पाठवून दिली. ती लघुकथा प्रसिद्ध व्हावी, असें मला फार वाटत होतें. कारण ती तितकी एकदम मनाचा ठाव घेणारी होतीच. परंतु लघु-कथेची पोच येण्याऐवजीं 'स्त्री' मासिकाच्या संपादकाकडून ती उलट टपालीं साभार परत आली! संपादकांनीं ती वाचून तरी पाहिली होती की नाहीं देव जाणे!! मला तर ती लघुकथा मनापासून आवडली होती. 'स्त्री'-कडून परत आलेली तीं कथा मी जशीच्या तशी, त्याच दिवशी तात्यासाहेबांकडे पाठवून दिली आणि सोबत एक पत्र लिहून, ती लघुकथा प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेची नसेल, तर ती जरूर त्या सुधारणांच्या सूचनेसह मजकडे परत करण्याविषयी त्यांना विनंती केली. एक दिवस 'सह्याद्रि' कार्यालयाकडून एक मोठा लिफाफा टपालानें आला. आपली लघुकथा परत आलेली असणार, अशी कल्पना झाली; परंतु लिफाफा 'सह्याद्रि' कडून आलेला होता, त्यामुळे, नीटशी कांहीं आंतील मजकुराबद्दल खात्रीपूर्ण कल्पना होईना. एका तऱ्हेच्या आतुरतेनें मीं तो लिफाफा फोडून पाहिला. आंत माझ्या लघुकथेचीं 'सह्याद्रि' मासि-कासाठीं छापलेलीं प्रुफें होतीं! तात्यासाहेबांकडून माझ्या पत्राच्या उत्तरादाखल 'सह्याद्रि' चीं छापील प्रुफें आलेलीं पाहून मला काय वाटलें, तें व्यक्त करायला माझ्याजवळचें शब्द-भांडार अपुरें आहे खास!

(२) कांही कामानिमित्त तात्यासाहेब मिरजेस आले होते. सांगली-मिरजेस तात्यासाहेब आले कीं, ती संधि साधून त्यांना एकदां विलिंग्डन कॉलेजमध्ये आणाविण्याची एक प्रथाच पडली होती. त्याप्रमाणें, विलिंग्डन कॉलेजमध्यें तात्या-साहेबांचें व्याख्यान असल्याची वार्ता समजतांच, आमच्या सांगली येथील सरस्वती सेविका-समाज या भगिनीवर्गाच्या संस्थेस त्यांच्या आशीर्वादाच्या चार शब्दांचा लाभ व्हावा, या उद्देशानें त्यांना तशी विनंती करण्यासाठीं मी विलिंग्डन कॉलेज-मध्यें गेलें. त्यांचें व्याख्यान आटोपतांच मी त्यांना भेटलें. मला पाहतांक्षणीं तात्यासाहेब म्हणाले, "काय, मग करणार ना काम? अशी संधि वाया जाऊं देतां कामा नये बरं का." "कसलं काम, तात्यासाहेब? मीच एका कामासाठीं आपल्याला आज मुद्दाम भेटायला आलें आहें" मीं जरा आश्चर्यानें म्हटलें. "तुमचं काम मग बघूं; पण त्या कामाचं पुढें काय झालं?" "पण कसलं काम? माझ्या नाहीं लक्षांत आलं?" "उगीच सोंग पांघरूं नका. आतां सत्तादान झालं ना सांगलीला? तुमच्याकडे कांहीं अधिकार सोंपवणार आहेत, असं आम्हांला पुण्याला कळलं आहे. तुम्हीं स्त्रियांनीं अशा वेळीं अवश्य पाऊल पुढें टाकलंच पाहिजे." सांगली संस्थानांत नुकतीच लोकांच्या हातीं सत्ता सुपूर्त करण्यांत

आली होती. अजून अधिकाराच्या जागीं विधिमंडळांतील कोणकोणत्या सदस्यांची निवड व्हावयाची, तें ठरायचें होतें. का कोणास माहीत, पण कांहीं अधिकार मजकडे सोंपविले जाण्याचा संभव आहे, अशी सांगलींत अकारण उठलेली दाट वदंता, पुण्यास तात्यासाहेबांपर्यंत जाऊन पोहोंचली असेल, अशी मला तिळमात्र कल्पना नव्हती. "कांहीं तरी उगीच बातमी उठली आहे, तात्यासाहेब ती; कांहीं आधार नाहीं तिला अन् करायचे आहेत काय असले नाममात्र अधिकार! काम करतांना नाहीं नाहीं त्या कायदेशीर आणि तांत्रिक अडचणी मात्र ह्व्या तेवढ्या. सत्तेबरोबर कामाच्या नियमांत बदल होईल तेव्हांना –" मी पुढें कांहीं बोलण्याच्या आंत तात्यासाहेब एकदम जरा रुष्ट होऊन म्हणाले, "तुम्ही तक्रारीपासून सुरुवात करीत चला. काम करणाऱ्याला अडचणी ह्या यायच्याच; म्हणून जबाबदारी पत्करायची नाहीं कीं काय! जबाबदारी पत्करली पाहिजे, काम करून दाखवलें पाहिजे. अडचणींतून मार्ग काढणं, त्या नाहींशा करणं तुमच्याच हातीं आहे." काय ती निराधार उठलेली बातमी; पण त्याचें तात्यासाहेबांना केवढें महत्त्व वाटलें! स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल, स्त्रियांच्या प्रगतीविषयीं त्यांना किती तळमळ वाटत होती! शक्य त्या प्रकारें मला वेळोवेळीं प्रोत्साहन देऊन या अफाट जगांत वावरण्याविषयीं एक दृष्टि देण्याचा त्यांनीं जो प्रयत्न केला त्याबद्दल मला त्यांची स्मृति आमरण राहिल्यावांचून राहणार नाहीं.

❋

भास्करराव सदानंद तर्खडकर

(जे. पी., मुंबई)

(१) १९३६ सालीं माझे आजोबा रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर, ज्यांना मराठी भाषेचे पाणिनि म्हटलें जातें, त्यांच्या मराठी व्याकरणाचा शतसांवत्सरिक उत्सव मुंबईत झाला. त्याचप्रमाणें पुणें व इतर ठिकाणींहि झाला. त्यासाठीं पुण्याहून मला बोलावणें आलें होतें. तेथें महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विद्यमानें मराठी व्याकरण परिषद, व्याकरण प्रदर्शन व सभा झाली. रंगाचार्य रड्डीशास्त्री अध्यक्ष होते. सभेपुढें "शुद्ध बोलण्याला व लिहिण्याला व्याकरणाची जरूरी आहे काय?" हा प्रश्न चर्चेस घेतला होता. मी तात्यासाहेबांच्याजवळ बसलों होतों. माझें भाषण झाल्यावर तात्यासाहेबांचें भाषण झालें. त्यांत ते म्हणाले कीं, "ही परिषद तज्ज्ञांची आहे खरी; पण मी तज्ज्ञ आहें असें म्हटलें तर आपण हंसाल, आणि मी अज्ञ आहें म्हटलें तर त्याहिपेक्षां अधिक हंसाल; तेव्हां मी तज्ज्ञहि नाहीं व अज्ञहि नाहीं, तर मी आहें तरी कोण? त्यावर माझें उत्तर असें आहे कीं, मी 'अतज्ज्ञ' आहें. 'शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें

हें व्याकरण शिकल्यानें समजतें असें सांगण्यांत येतें. पण माझें मत तर असें आहे कीं, शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें हें व्याकरण न शिकल्यानें समजतें! 'येतें व समजतें' यांतील फरक पाहिला म्हणजे मी काय म्हणतों तें लक्षांत सहज येईल."

त्यानंतर ह्या परिषदेस जी मंडळी हजर होती त्या सर्वांना केसरी ऑफिसमध्यें चहापार्टीस आमंत्रण होतें. मीहि हजर होतों. तात्यासाहेब मजजवळ आले व त्यांनीं मला विचारलें कीं, 'भास्करराव, दुपारीं झालेल्या माझ्या भाषणाचा तुम्हांस राग तर नाहीं ना आला?' मी म्हटलें, राग कशाचा येणार? प्रत्येक व्यक्तीला आपले विचार व्यक्त करण्यास मोकळीक आहे. आपल्या मनांत हा विचार तरी कां यावा?

(२) प्रो. वामन मल्हार जोशी, एम्. ए., हे एक 'दादोबा पांडुरंग मराठींतील उत्तमांत उत्तम ग्रंथ' जो ठरेल त्या तीन परीक्षकांपैकी एक परीक्षक होते. त्यांच्या निधनानें दोनच परीक्षक हें पारितोषिक ठरविण्यास राहिले. तिसऱ्या परीक्षकासाठीं बरीच नांवें सुचविली गेलीं होतीं. माझ्यापुढें तात्यासाहेबांचें नांव प्रामुख्यानें होतें, पण त्यांना ह्यासंबंधानें विनंती करणें कठीणच वाटलें. कारण त्यांचा पुण्यांत अनेक संस्थांशीं संबंध असल्यामुळें त्यांस सवड होणार नाहीं म्हणून व त्यांचें वयहि ध्यानांत घेऊन मला त्यांना लिहिणें जडच वाटलें. पण धीर करून त्यांना मीं पत्र पाठविलें. मला त्या वेळेस असें वाटलें कीं, त्यांच्याकडून खात्रीनें निराशेचेंच उत्तर येईल. पण त्यांचें ताबडतोब उत्तर आलें कीं, "मी मोठ्या खुषीनें परीक्षकाचें काम करीन व त्याप्रमाणें मुंबई विश्वविद्यालयास कळवावें." मला आनंद झाला व तो मीं माझ्या पत्रांत त्यांना व्यक्त केला.

❋

हरी भास्कर भिडे

(आयुर्वेदविशारद, उपसंपादक केसरी, पुणें)

(१) १९३४ सालीं मुंबईला अखंड भारत परिषदेचे अध्यक्ष म्हणून तात्यासाहेब गेले होते. परिषदेचें सकाळचें काम संपलें व मुक्कामावर जाण्यापूर्वी ते एका बड्या गृहस्थाकडे भेटण्यास जाणार होते. स्वयंसेवक म्हणून मी त्यांच्याबरोबर होतों. त्या गृहस्थाकडे जाण्यापूर्वी तात्या म्हणाले, "तेथें गेल्यावर खाण्यापिण्याकरितां मी बिलकूल तोंड उघडणार नाहीं. वयोमानामुळें मला आतां सोसत नाहीं." तेथें गेल्यावर सन्मान करण्याच्या पद्धतींत उणाव भासेल म्हणून त्या सदगृहस्थानें मोठ्या अगत्यानें उत्तम उत्तम फळें व मौल्यवान् मेवा वगैरे आणलें. तात्या बोलल्याप्रमाणें त्यांतील कांहीं न घेतां, त्या गृहस्थांची क्षमा मागून फक्त अत्तर,

गुलाब वगैरे घेऊन उठून चालू लागले. जिन्यांत खालीं येतांच मीं त्यांस विनोदानें म्हटलें, 'तात्या, खाण्याकरितां तोंड न उघडण्याच्या तुमच्या प्रतिज्ञेमुळें माझ्यासारख्याचे मात्र हाल झाले!' तात्या एकदम हंसून म्हणाले, 'गड्या, चुकलें खरें. पुन्हां ध्यानांत ठेवीन. तुमचे असे हाल होऊं देणार नाहीं, अशी युक्ति करीन!'

(२) वेव्हेल योजनेला काँग्रेसनें संमति दिल्यानंतर लाटसाहेबांच्या मंत्रिमंडळांत काँग्रेस जाणार व हिंदुमहासभेचे अध्यक्ष डॉ. मुकर्जी यांचें नांव एका मंत्रिपदाकरितां सुचविलें जाणार अशी वार्ता प्रसिद्ध झाली. लगेच तात्यांनीं मुकर्जींनीं विचारल्यावरून त्यांस तार करून तें पद स्वीकारण्यास संमति दिली, ही वार्ताहि प्रसिद्ध झाली. पण या प्रसंगापूर्वीच पुणें येथें महासभेच्या कार्यकारिणीच्या बैठकींत वेव्हेल-योजनेचा धिक्कार करण्यांत आला होता व आतां त्याच तात्यांनीं मंत्रिपदस्वीकाराचा सल्ला दिल्याचें वाचून मी सर्द झालों. त्या वेळीं मीं वऱ्हाडांत दौऱ्यावर होतों. आकोला येथून मीं त्यांना रागानें त्यांच्या या सल्ल्याचा निषेध करणारें कडकडून पत्र लिहिलें. परत आल्यानंतर पुढें दोन-तीन महिन्यांनीं कांहीं कामाकरितां पुष्करिणीवर मी गेलों. आतां ती सर्व परिस्थिति पार पालटली होती व कांहीं कारणामुळें डॉ. मुकर्जी मंत्रिमंडळांत गेलेहि नव्हते. तात्यांच्याकडील काम संपवून मी परतण्यास निघतांच मला थांबवून एकदम त्यांनीं माझ्या त्या पत्राचें उत्तर सांगण्यास सुरवात केली. अत्यंत कळकळीनें व त्यांच्या नेहमींच्या विवेचक पद्धतीनें त्यांनीं आपलें म्हणणें मला पटवून देण्याचा प्रयत्न केला; तथापि त्यानें माझें पूर्ण समाधान झालें नाहीं. पण माझें समाधान झालें तें येवढ्याचकरितां कीं, त्यांनीं इतके दिवस त्या पत्राची आठवण ठेवून माझ्यासारख्या एका लहान स्वयंसेवकाच्या शंकेचें निरसन करण्याचा निरहंकारी प्रयत्न केला!

❋

दामोदर मोरेश्वर भट

(हिंदुमहासभेचे प्रमुख कार्यकर्ते, मिरज)

(१) दे. भ. रामभाऊ कानिटकर यांच्या अध्यक्षतेखालीं पुण्यास टिळक मंदिरांत अँटी कम्यूनल अॅवॉर्ड कॉन्फरन्स् भरली होती. महाराष्ट्रामधून सहस्रावधि स्वाक्षऱ्या कम्यूनल अॅवॉर्डच्या निषेधार्थ आलेल्या होत्या. मिरज येथील रहिवाश्यांच्या एक सहस्र स्वाक्षऱ्या घेऊन मी पुण्यास या सभेस उपस्थित राहिलों. अनेकांचीं भाषणें झालीं. तात्यासाहेब बोलावयास उभे राहिले. भाषणाच्या ओघांत डाव्या हाताच्या आंगठ्याजवळच्या खांचेंत उजव्या हाताचा उभा पंजा करवतीप्रमाणें घांशीत ते म्हणालेः— "गांधींनीं असा हिंदूंचा गळा कांपलेला आहे! मुसलमानांकडून १६ ऑगस्ट १९४६ पासून आजवर हिंदूंचें जें हत्याकांड चाललेलें

आहे, आणि पुढें जें हिंदु-मुसलमानांचें अटळ युद्ध – ज्याचा प्रारंभ मुसलमान करतील–दृष्टीपुढें उभें ठाकलेलें दिसत आहे, त्याला इंग्रज अंशतः कारण असलें तरी गांधीशिकवण नि गांधीधोरण ह्या अनर्थाला तितकेंच किंबहुना अधिकच जबाबदार आहेत."

(२) 'पुणें-करारा'च्या वेळीं, म. गांधींनीं येरवडा जेलमधून केळकरांना त्यांचें मत विचारलें. " ७४ च्या ऐवजीं १४७ जागा अस्पृश्यांना देण्यांत चूक होत आहे व ह्या कारणानें बंगालमधील स्पृश्य हिंदूंना तरः भयंकर अन्याय पोचणार आहे ", असें त्यांनीं आपलें मत सर्व बाजूंचा विचार करून गांधींना स्पष्ट कळविलें. त्या वेळी परिवारांत बसलेल्या मंडळीकडे तोंड वळवून, त्यांना केळकरांचा अभिप्राय वाचून दाखवीत, गांधी उपहासपूर्वक उद्गारले, 'This is mathematical head!'

(३) सुधारक मंडळी, 'पुनर्विवाहाच्या कायद्या' चा वाढदिवस पाळीत असत! एके वर्षी कै. सीतारामपंत देवधर (सु. न्यू. इं. स्कूल, सातारा) हे पुण्यास व पुण्याचे केळकर हे साताऱ्यास या वाढदिवस प्रसंगीं मुख्य व्याख्याते होते. ज्ञानप्रकाशांत दोघांच्या व्याख्यानांचे सांद्यन्त वृत्तान्त प्रसिद्ध झालेले मीं वाचले. मला चमत्कार वाटे, तो असा कीं, यांचें वर्तन परस्पर भिन्न कसें? कारण गु. देवधरांच्या भाषणांत शास्त्राधार देण्याची प्रवृत्ति आढळली. वस्तुतः ते कडवे सुधारक, त्यांनीं शास्त्राची पर्वा कां करावी? तसें तात्यांचें नाहीं. तात्यासाहेबांच्या भाषणांत, " शास्त्राधार नाहीं, एवढ्यासाठीं आपण अडून बसतां कामा नये. देशकालपरिस्थित्यनुरूप नव्या अडचणी समाजांत उद्भवल्या, तर त्या दूर करण्यासाठीं नवें शास्त्र रचलें पाहिजे – निर्माण केलें पाहिजे " असा नव्या स्मृतीचा पुरस्कार होता. सनातनी समजल्या गेलेल्या लो. टिळकांच्या पक्षांत हे बंडखोर कसे! असेंहि माझ्या मनास मीं विचारलें. पुढें त्यांच्याकडूनच खुलासा झाला. ते म्हणाले, " समाज-धुरीणांचें हें कर्तव्य आहे कीं, काल-प्राप्त अडचणींचा परिहार करणारें शास्त्र निर्माण करणें हेंच समाजाच्या जिवंतपणाचें लक्षण त्यांनीं समजलें पाहिजे व काल-देशवर्तमानानुरूप निर्वाहक शास्त्र प्रवृत्त करून, समाजास नवा आचार-धर्म शिकविला पाहिजे."

(४) ५–६ वर्षांपूर्वी तात्यासाहेब यांना मी अथणी येथें व्याख्यानासाठीं घेऊन गेलों. कानडी भाषेचा अभिमानी असा साहित्यिकांचा एक वर्ग अथणीस आहे. वदंता आली कीं, तात्यासाहेबांच्या व्याख्यानांत हे लोक विक्षेप करणार आहेत. तात्या समयसूचक पद्धतीनें वागणारे, मोठे चतुर, समयज्ञ. शिवाय मनाची ठेवणहि त्यांची अशी कीं, देशांतील भिन्नभाषी लोकांनीं एकमेकांच्या भाषेस शक्य तोंवर मान द्यावा. त्या दिवशींच्या व्याख्यानारंभीं कानडी भाषेविषयीं आपली आदरबुद्धि याच सिद्धान्तावरून आहे, असें सांगून त्यांनीं आपलें कानडीचें प्रेम

लहानपणीं पाठ केलेला एक कानडी श्लोक सर्वच्या सर्व पाठ म्हणून दाखवून व्यक्त केलें! ह्यायोगें कानडी भाषाभिमानी कन्नडिग-संघाचें समाधान होऊन त्यांनीं तात्यांचें पुढील सर्व राजकीय विषयावरचें अप्रिय व्याख्यान शांतपणें ऐकून घेतलें. व्याख्यानांतील प्रतिपादन त्यांना मान्य होण्याजोगें नव्हतें. कारण ते सर्व काँग्रेसवाले होते. तात्यांनीं मात्र आपलीं प्रामाणिक मतें ह्या व्याख्यानांत अति निर्भीडपणें मांडलेलीं होतीं.

(५) पुष्कळ वर्षांपूर्वी मिरजेस 'मिरज-विद्यार्थि-संघ' या संस्थेंत एक चर्चा-प्रसंग आला. तात्या हजर होते. चर्चा चालू झाली; त्या वेळीं एका गृहस्थानें तात्यांना विचारलें, 'देशभक्ति कोणीं करावी?' तात्यांनीं उत्तर दिलें, 'सर्वांनीं देशभक्ति करावी.' या पृच्छकानें पुनः प्रश्न केला, 'सर्वांनींच देशभक्ति करून काय करावयाचें?' तात्यांनी प्रतिप्रश्न केला, " सर्वांनींच जेवून काय करावयाचें? कांहीं लोक जेवतातच; तेव्हां बाकीचे उपाशी बसले तरी चालेल! असा तुमच्या प्रश्नाचा अर्थ होतो. तथापि सर्वांनीं जगण्याकरितां जेवणें जसें सर्वांस अवश्य आहे त्याचप्रमाणें कांहीं ना कांहीं देशसेवेचा, समाजसेवेचा उद्योग करणें प्रत्येक देशवासियाचें अवश्य कर्तव्यच आहे." या युक्तिवादानें सदर गृहस्थाचें पूर्ण समाधान झालें व म्हणून त्यानें विद्यार्थि-संघाचें काम करण्याचें व्रत पतकरलें.

(६) तात्या मिरज येथील 'विद्यामंदिर' संस्थेस भेट देण्यास गेले. अलीकडील त्यांच्या वहिवाटीप्रमाणे त्यांनीं व्याख्यान न देतां मंडळींनीं चर्चा चालू करावी असा अभिप्राय प्रकट केला. चर्चेस प्रारंभ एका तरतरीत मुलीच्या प्रश्नानें झाला. तिनें विचारलें, 'सहशिक्षण असावें कीं नसावें?' तात्यांनीं किंचित् हंसून परत प्रश्न केला, " तुला काय वाटतें? तूं आपलें असें कांहीं मत – उत्तर – या प्रश्नावर ठरवलेंच असशील." मुलगी लाजून म्हणाली, " मला वाटतें, सहशिक्षण नसावें." तात्या अनुमतिदर्शक स्वरांत म्हणाले, " बरोबर; तुला वाटतें तें खरेंच आहे. एक तर, मुलांमुलींचे कांहीं विषय शिक्षणाचे समसमान असले, तरी मोठेपणीं गृहिणीपद घ्यावें लागणाऱ्या स्त्री-विद्यार्थ्यांस अभ्यासावयाचे कांहीं कांहीं विषय भिन्नच ठेवणें योग्य होईल. मात्र, वरिष्ठ वैद्यकीय इत्यादि शिक्षण-संस्थांत, पुरेशा विद्यार्थि-संख्येच्या अभावीं सध्यां सहशिक्षण घेण्याचा प्रसंगच येतो! यास्तव निरुपाय म्हणून अशा संस्थांत सहशिक्षण समर्थनीय ठरेल. मात्र, हा नियम मानतां येणार नाहीं. अपवादच समजला पाहिजे. कारण, सोयहि पाहावी लागते." तात्यांचा हा अभिप्राय ऐकून त्या मुलीला व सर्वांना मोठा आनंद झाला.

(७) जेव्हां जेव्हां तात्या मिरजेस आले, तेव्हां तेव्हां मीं त्यांना व्याख्यान देण्याचा आग्रह केलेला आहें. ते व्याख्यान देत सुद्धां, पण करार असा करीत, 'चर्चा ठेव; व्याख्यान नको.' मला 'होय' म्हणावें लागे. पण, माझी नाराजी

पाहून म्हणत, "अरे, मी तीस वर्षे केसरीमधून आठवड्यांतून एकदां व आतां तर दोनहांहि तुम्हां लोकांसीं इतकें बोलत आलों आहें व इतरसुद्धां इतकें लिहून ठेवलेलें आहे कीं, त्यांतलें तुम्हीं घेतलें किती, तुम्हांला कळलें किती नि काय, तें मला पाहावयाचें आहे. एवढ्यासाठीं मला चर्चा हवी. मला स्वतःला आतां बोलण्याचा कंटाळा आला आहे. मला तुमचे विचार ऐकूं द्या कीं." हें त्यांचें म्हणणें अक्षरशः खरेंच होतें.



दामोदर सीताराम कोकजे

(जिल्हा प्रकाशनाधिकारी, पुणें)

(१) "पुण्यांतील प्रसिद्ध व्यक्तींना तुम्ही ओळखतां काय?" "होय! कांहीं कांहीं व्यक्ति ओळखतों." "तुम्ही तात्यासाहेब केळकर यांना ओळखतां?" "होय." "मग बातमीदार म्हणून तुमची नेमणूक करण्यास हरकत नाहीं." १९२९ सालीं ऑक्टोबरमध्यें ज्ञानप्रकाशचे संपादक कै. काकासाहेब लिमये व उमेदवार या नात्यानें त्यांच्यापुढें उभा राहिलेला मी यांच्यांत वरील प्रश्नोत्तरें झालीं; आणि तात्यासाहेबांच्या शुभ नांवाच्या आधारानेंच माझें वृत्तपत्रीय जीवन सुरू झालें.

(२) १९३८ च्या जानेवारींत पुणें वार्ताहर-संघाचें पहिलेंच स्नेह-संमेलन पुणें नगरपालिकेच्या सभागृहांत भरलें होतें. अध्यक्षस्थानीं तात्यासाहेब हे होते. त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत वृत्तपत्रव्यवसायाच्या अनेक अंगांची व विशेषतः वार्ताहर-कौशल्याची विविध स्वरूपाची माहिती सांगितली. या भाषणाच्या शेवटीं त्यांनीं एक उत्तम वार्ताहर म्हणून माझ्याकडे अंगुलीनिर्देश करून मोठ्या गौरवपर शब्दांत माझा उल्लेख केला. त्यांच्या या अनपेक्षित शिफारशीमुळें मी एकदम प्रकाशांत आलों! या सभेला पुण्यांतील अनेक थोर वकील, सरकारी अधिकारी व नागरिक हजर होते. त्यांच्यापुढें तात्यासाहेबांसारख्या थोर पत्रकाराकडून मला मिळलेल्या या शिफारशीमुळें सरकार-दरबारीं माझा दर्जा वाढला. त्या वेळीं त्यांनीं केलेल्या या उल्लेखाचा फायदा मला अद्यापिहि मिळत आहे. याच वेळीं त्यांनीं वार्ताहर-संघाबद्दल बोलतांना असें सांगितलें कीं, "पुण्यांतील वार्ताहरांनीं संघ केला ही गोष्ट या व्यवसायांत काम करणारांच्या दृष्टीनें फारच इष्ट अशी घटना झाली आहे. कारण संघ झाला कीं संप येतोच. असें संघ आणि संप यांचें साहचर्य आहे. यापुढें वृत्तपत्राचा धंदा करणाऱ्या मालक-मंडळींनीं सावध होऊन या व्यवसायांत काम करणाऱ्या लोकांची आर्थिक व्यवस्था नीट होईल अशी दक्षता घेतली पाहिजे; नाहीं तर त्यांच्या व्यवसायाला धोका आल्याशिवाय राहणार नाहीं." तात्यासाहेबांच्या इशाऱ्याप्रमाणें वार्ताहर व एकंदर वृत्त-

पत्रव्यवसायी मंडळींच्या आर्थिक परिस्थितीकडे मालक-वर्गाचें लक्ष गेलें असून बऱ्याच सुधारणा झाल्या आहेत.

(३) होतकरू लेखकांकडे तात्यासाहेबांचें विशेष बारकाईनें लक्ष असे. १९३४ सालीं अप्पाबळवंत चौकांतील किबे वाड्याच्या भग्न अवशेषांवर सध्याचें किबेलक्ष्मी थिएटर बांधण्यांत आलें. त्या प्रसंगीं किबेवाड्याच्या मूळ उत्पत्तीपासून तों थेट प्रभात चित्रमंदिरापर्यंतची त्या वास्तूवर घडलेल्या स्थित्यंतरांची माहिती देणारा असा एक लेख मीं लिहून ज्ञानप्रकाशांत माझ्या नांवावर प्रसिद्ध केला. त्या लेखाच्या प्रसिद्धीनंतर सुमारें चार महिन्यांनीं त्यांची भेट झाली. त्यांनीं आठवण-पूर्वक मला जवळ बोलावून माझा तो लेख त्यांना विशेष आवडल्याचें मला सांगितलें व ऐतिहासिक माहिती अशीच गोळा करून लेख लिहावे असें प्रोत्साहन दिलें.

(४) १९४२ सालीं मीं ज्ञानप्रकाशची नोकरी सोडली. त्या वेळीं केसरींत नोकरी मिळाली तर करावी अशी माझी इच्छा होती, म्हणून तात्यासाहेबांच्या भेटीसाठीं गेलों. नोकरी सोडण्याचीं कारणें त्यांनीं सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतलीं व नंतर ते म्हणाले कीं, "तुमच्यासारख्या वार्ताहरास मीं केव्हांच सोडलें नसतें; परंतु आज केसरीचीं सूत्रें माझ्या हातांत नाहींत; शिवाय कागदाच्या टंचाई-मुळें केसरीचीं पानें कमी झालीं असून सध्यां पटावर असलेल्या संपादकांनाच भरपूर काम नाहीं. अशा परिस्थितींत त्या ठिकाणीं अधिक वाढ करा असें त्या मंडळींना सांगणें योग्य होणार नाहीं. वास्तविक मी तुम्हांस मागेंच बोलवि-णार होतों. तुमच्यासारखा वार्ताहर केसरीच्या पटावर असावा अशी माझी फार इच्छा होती. परंतु त्या वेळीं तुम्ही येथील एका चांगल्या दैनिकांत काम करीत असल्यानें तुम्हांस तेथून काढून घेणें योग्य झालें नसतें. एरवीं मीं तुमच्यासारख्या वार्ताहर हातचा घालविला नसता. तरी पण कोठेंच जमलें नाहीं तर पुन्हां अवश्य येऊन भेटा", असें त्यांनीं विशेष आपुलकीनें अभिवचन दिलें होतें.



सदाशिव रंगनाथ सुंठणकर

(बी. ए., एलएल. बी., वकील, बेळगांव)

(१) १९१६ च्या उन्हाळ्यांत मुंबई प्रांतिक परिषद भरली होती. त्या वेळीं होमरूल या विषयावर लो. टिळकांचें व्याख्यान मीं ऐकिलें. पुढें १९१७ सालीं बेळगांव येथें तात्यासाहेबांचें त्याच विषयावर व्याख्यान ऐकिलें. दोघांच्या व्याख्या-नांत मला जो महत्त्वाचा फरक दिसला तो असा :— लो. टिळकांचें भाषण ऐकून माझा जीव बेचैन झाला. इंग्रजांस देशांतून कसें हाकून देतां येईल याविषयीं केवळ

माझ्याच नव्हे तर प्रत्येक श्रोत्याच्या डोक्यांत विचार घोळूं लागले. परंतु तात्यासाहेबांचें भाषण ऐकल्यावर ब्रिटिश राज्य हें संपूर्ण अन्यायी आहे असें माझ्या बुद्धीस पटूं लागलें. आपला मुद्दा पटवून देण्यासाठीं तात्यासाहेब हे आपलें बुद्धिसर्वस्व कसें खर्च करीत असत याचा प्रत्यय मला या वेळीं प्रथम आला. अर्थात् टिळकांची विचारसरणीसुद्धां बुद्धिप्रामाण्यावर अधिष्ठित असे यांत शंका नाहीं. परंतु बुद्धीबरोबरच भावनाहि चेतविण्याचें कार्य टिळक करीत असत. सारांश, लोकमान्यांचें भाषण मला सूर्याप्रमाणें तेजस्वी आणि प्रखर वाटलें तर तात्यासाहेबांचें भाषण मला चंद्राप्रमाणें प्रकाशमान नि प्रशान्त वाटलें.

(२) १९२१ मध्यें मी फर्ग्युसन कॉलेजचा विद्यार्थी होतों. त्या वर्षी म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीनें उच्चांक गांठला होता. त्या सालच्या पावसाळ्यांत शनिवार वाड्यासमोरील पटांगणांत तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं अफाट जनसमुदायापुढें म. गांधींचें भाषण झालें. मी त्यांच्या खुर्चीच्या मागेंच उभा होतों. म. गांधींचें भाषण अर्थात् त्यांच्या आवडत्या असहकारितेच्या कार्यक्रमावर झालें व तो कार्यक्रम जर आचरणांत आला तर सहा महिन्यांत स्वराज्य नक्की ठेवलेलें असें म. गांधींनीं प्रतिपादिलें. शेवटीं तात्यासाहेबांनीं सडेतोड नि स्पष्टोक्तिपूर्ण असा समारोप केला. आपल्या समारोपांत तात्यासाहेब आपलें स्वतःचें अंतःकरण पिळवटून महात्माजींना उद्देशून उद्गारले कीं, "महात्माजी! तुमची बहिष्कारत्रयी अव्यवहार्य आहे, इतकेंच नव्हे तर ती देशहितविघातक आहे असें माझ्या बुद्धीस प्रामाणिकपणें वाटतें. शाळा-कॉलेजांवर बहिष्कार घालण्यास सांगून तुम्ही एका सबंध पिढीच्या शिक्षणाचें नि संस्कृतीचें मातेरें करतां आहांत! त्याचप्रमाणें वकील-बॅरिस्टरांसारखा बौद्धिक दृष्ट्या समर्थ पक्ष राजकारणापासून दूर ठेवून हिंदी राजकारणाचें अपरिमित नुकसान करतां आहांत. तसेंच कायदे-कौन्सिलांवर बहिष्कार घालण्यास लावून आपल्या पुढाऱ्यांस मिळणारी राजकीय शिक्षणाची संधि वाया जाऊं देतां. लोकांचे प्रतिनिधि कौन्सिलांत नसल्यामुळें सरकार दडपशाहीचे कायदे पास करून जनतेची हालअपेष्टा करीत आहे. स्वराज्य तर ५–६ महिन्यांत मिळणेंच शक्य नाहीं; मग लोकांस अशा हालअपेष्टा सोसण्यास कां भाग पाडतां? माझ्याविषयीं म्हणाल तर, मी हवा तो त्याग करण्यास तयार आहें. केवळ खादीच नव्हे, तर गोणपाट सुद्धां वापरण्यास माझी खुषी आहे." त्या वेळचा देशाच्या भवितव्याबद्दल हवालदील झालेला त्यांचा चेहरा व त्यावर स्पष्टपणें व्यक्त होणारी देशहिताबद्दलची त्यांची तळमळ हीं आजहि माझ्या नजरेसमोर स्पष्ट उभीं राहतात. पुढें ७–८ महिन्यांतच चौरीचौराचा दंगा झाला. म. गांधींनीं चळवळ मागें घेतली. तात्यासाहेबांची वाणी खरी ठरली व दास-नेहरू हेहि त्यांच्या वळणावर आले!

(३) १९३७ मध्यें मी धारवाड येथें वकिलीचा धंदा करीत होतों व धारवाड येथील महाराष्ट्र मंडळाचा प्रमुख कार्यकर्ता होतों. त्या वर्षी तात्यासाहेबांनीं म्हैसूरला दौरा काढला होता. दौऱ्याहून परततांना वाटेंत आमच्या मंडळास भेट देण्याविषयीं मंडळातर्फे आम्हीं त्यांना विनंती केली. आमच्या विनंतीस मान देऊन त्यांनीं धारवाड येथील महाराष्ट्र मंडळास भेट दिली. धारवाडच्या सदर्न मराठा बँकेच्या सभागृहांत त्यांचें सुमारें एक हजार नागरिकांपुढें 'परप्रांतांत महाराष्ट्र मंडळाची आवश्यकता' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झालें. व्याख्यानास कन्नडिग बंधूंचा बराच समुदाय उपस्थित होता. परप्रांतांत महाराष्ट्रीय संघटनेची जरूरी कशी आहे हें त्यांनीं मोठ्या खुबीनें सूचित केलें. ते म्हणाले, "आपली कर्तृत्वशक्ति, मगदूर किती आहे याचा विचार करून महाराष्ट्रियांनीं आपलें धोरण निश्चित करावें. समजा कीं, आपल्याजवळ एक चमचाभरच साखर आहे. ती आपल्या एका चहाच्या कपांत टाकून चहा गोड करून प्यावा का ती एखाद्या ओल्यांत टाकून देऊन ओढा गोड करण्यासाठीं धडपड करणें बरें, याचा विचार करून महाराष्ट्रियांनीं आपलें वर्तन ठेवावें." हें त्यांचें भाषण कानडी मंडळींनाहि फार आवडलें.

(४) व्याख्यान आटोपल्यावर त्याच दिवशी श्री. पटवर्धन वकील यांच्या घरीं तात्यासाहेबांबरोबर तेथील महाराष्ट्रियांची खाजगी स्वरूपाची चर्चा झाली. त्या वेळीं महाराष्ट्रीय मंडळींनीं "आपण आपल्या पक्षासह काँग्रेसमध्यें कां सामील होत नाहीं," म्हणून तात्यासाहेबांना विचारिलें. यावर तात्यासाहेब उद्गारले कीं, "माझी भूमिका मीं अनेक वेळां 'केसरी'तून व अन्यत्र स्पष्ट केलेली आहे. म. गांधींच्या चळवळीला बुद्धिप्रामाण्याचें अधिष्ठान नाहीं, अर्थात् तें मला पटत नाहीं. माझ्या मनोवृत्तीला ढोंगाचें वावडें आहे. केवळ लोकप्रीतीसाठीं मी गांधींचें अगर काँग्रेसचें राजकारण मान्य करणार नाहीं." या प्रसंगीं नुकतेच तुरुंगांतून प्रकट होऊन बोलबाला होत असलेल्या कॉ. एम्. एन्. रॉय यांच्या राजकारणाविषयीं केळकरांचा अभिप्राय मीं विचारला. तेव्हां तात्यासाहेब म्हणाले कीं, "रॉय हे विद्वान् आहेत. बुद्धिप्रामाण्यवादी आहेत. मध्यम वर्गाचे पुढारी आहेत. परंतु त्यांचें राजकारण आपल्या समाजास मानवणार नाहीं. आपल्या परंपरेशीं व भूतकालाशीं आपला असलेला संबंध आपण आजिबात तोडला पाहिजे अशी त्यांची शिकवण असल्यामुळें, ते विद्वान् आणि बुद्धिमान् असूनहि अखेरपर्यंत एकांडे शिलेदारच राहतील."

(५) १९४० मध्यें बेळगांव येथें श्रीमती क्षमाराव यांच्या अध्यक्षतेखालीं गीर्वाणवाणी परिषदेचें पहिलें अधिवेशन झालें. त्या अधिवेशनास तात्यासाहेब जातीनें उपस्थित होते. इतकेंच नव्हे तर स्वतः सत्तरीच्या दारांत असतां त्यांनीं

संस्कृतसारख्या कठीण नि इतिहासजमा असलेल्या भाषेत सुबोध भाषण केलें. यां त्यांच्या व्यासंगाबद्दल सर्वांनाच त्यांचें मोठें कौतुक वाटलें.



विनायक महादेव आपटे

(एम्. ए., पीएच्. डी., प्राध्यापक, मुंबई)

(१) १९३९ फेब्रुवारी-मार्चची अहमदाबादमधील गोष्ट. मी त्या वेळीं अहमदाबादच्या 'महाराष्ट्र-समाजा'चा अध्यक्ष होतों. गिरण्यासारख्या औद्योगिक व इतर विविधक्षेत्रांत गुंतलेल्या बुध्युपजीवि व श्रमजीवि अशा महाराष्ट्रियांची संख्या अहमदाबादेंत सुमार ८ ते १० हजारांपर्यंत आहे, व या सर्वांना उपयुक्त वाटणारी अशी 'महाराष्ट्र-समाज' ही एक सर्वसंग्राहक संस्था आहे. ह्या समाजाच्या अधिकृत उत्सवांपैकी श्रीदासनवमीच्या उत्सवाकरितां तात्यासाहेब यांना आण-ण्यांत आलें होतें. त्या वेळी त्यांचीं तीन व्याख्यानें होऊन त्यांना मानपत्र देण्याचा मोठा थाटाचा समारंभ झाला. या निमित्तानें तात्यासाहेब मजकडे उतरले होते.

बोलतां बोलतां मीं त्यांस विचारलें, "मित्र, सहकारी व अनुयायी या नात्यांनीं लोकमान्य टिळकांकरितां आपण जें कार्य केलें तें लोकमान्यांना त्यांच्या हयातींत पसंत होतें; इतकेंच काय तर त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आत्म्याला संतोष वाटेल असें तें झालें आहे. ह्याबद्दल मतभेद महाराष्ट्रांत नाहीं. पण आपल्या भाषणांत व विशेषतः लेखांत लोकमान्यांविषयींच्या वर्णनांत वा उल्लेखांत विभूति-पूजेची उत्कटता व भावनावशता न आढळल्यामुळें पुष्कळ टिळकभक्तांचा थोडासा विरस होतो हें आपणांस माहीत आहे काय?" यावर ते उत्तरले, "हें मी जाणतों; पण त्याला उपाय नाहीं, माझी 'प्रकृती'च तशी आहे. शिवाय (स्मित करून) दोन प्रेमी माणसांची – पतिपत्नी, पितापुत्र, मातापुत्र, बन्धुभगिनी अशा सारख्यांची – गोष्ट घ्याना! या जोडयांपैकीं एकजण जेव्हां दुसऱ्याची स्तुति लोकांत प्रकट रीतीनें, अगदीं आवर्जून, आवेशानें करतो, त्यावेळीं 'या दोघांची नुकतीच थोडीशी कुरबुर झाली असावी' असें कांहीं श्रोते तरी कुजबुजतील कीं नाहीं! बोला, यांत काय तें सर्व समजा!"

(२) कांहीं मंडळी घरीं भेटावयास आली त्या वेळीं चर्चा चालली असतां एकानें पृच्छा केली, "तात्यासाहेब! काँग्रेसच्या अध्यक्षांची खुर्ची व आपली खुर्ची यांत कांही इंचांचेंच अंतर उरलेलें असतांना, गांधीयुग सुरू होऊन मतभेदांमुळें आपण मागें सरलांत, त्या वेळीं अध्यक्षपदाचा म्हणजे राजकारणांतील अत्युच्च मान व कीर्ति यांचा-मोह आपण कसा आवरूं शकलांत?" यावर ते म्हणाले, "याची कारणें तीन; एक म्हणजे स्वमतनिष्ठा; यासंबंधीचें श्रेय अर्थात् आपण सर्व मला

देतांच; दुसरें कारण म्हणजे स्वतःच्या महत्त्वाकांक्षेला मर्यादा घालण्याचें सामर्थ्य मजजवळ असल्यामुळें माझ्या मनाला एकप्रकारची शांति प्राप्त झाली आहे. तिसरें कारण, मी स्वतः वाङ्मयसेवेपासून प्राप्त होणाऱ्या कीर्तीला व आनंदाला ज्यास्त चिरंतन व श्रेष्ठ मानतों हें होय."

(३) 'मोठा माणूस' कोणाला म्हणावें? तर त्याला कीं, ज्याच्याकडे लोक जातात, पण जो स्वतः खास बोलाविल्याशिवाय, त्यांच्या घरीं जाऊन भेटीची परतफेड, स्वतःला सवड असली तरी, करीत नाहीं तो, अशी एक अनुभवसिद्ध व्याख्या अलीकडे दुर्दैवानें तयार झाली आहे!! परंतु तात्यासाहेबांनीं तीन-चारदां माझ्यासारख्याच्या घरीं येऊन आपल्या निरभिमान वृत्तीनें मला चकित करून सोडलें आहे!



मोरेश्वर रामचंद्र ढमढेरे

(एम्. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, सरदार, पुणें)

(१) दे. भ. तात्यासाहेब केळकर यांचें माझें प्रत्यक्ष बोलणें-चालणें प्रथम १९१९ च्या सप्टेंबर किंवा ऑक्टोबरमध्यें झालें. तोंपर्यंत त्यांना देशांतील एक फार मोठे देशभक्त, विद्वान् नि व्यासंगी संपादक आणि लो. टिळकांचे उजवे हात म्हणून मी ओळखत असें. एवढ्या मोठ्या माणसाकडे बोलावणें करण्यास जाण्याचा बहुमान मला मिळाला होता. मी ज्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें फेलो होतों; आणि आमच्या क्लबांत एका 'फीस्ट'साठीं त्यांना निमंत्रण करण्याचें ठरलें होतें; आणि तीं कामगिरी करण्याचा मान मला मिळाला होता. पोटांत भीति अशी वाटे कीं, तात्यासाहेब जेवणास येत नाहीं असें म्हणाले तर काय करावयाचें? अशा चिंतेंत आदरयुक्त आणि किंचित् भीति-युक्त अंतःकरणानें मी त्यांच्या घरीं गेलों. मला वाटलें, एवढा मोठा गृहस्थ, तेव्हां दरवाजावर चिठीचपाटी लागत असेल, म्हणून माझें नांव टाइप करून आणि त्या-पुढें 'बी. ए. (ऑनर्स) दक्षिणा फेलो फर्ग्युसन कॉलेज' असें लिहून तो कागद बरोबर घेऊन मी गेलों. पाहतों तों दरवाजावर कोणी मनुष्य नाहीं कीं कोणी नाहीं; म्हणून तसाच आंत घुसलों आणि पाहतों तों समोरच एका खुर्चीवर कांहींतरी काम करीत तात्यासाहेब बसलेले! मीं माझ्या हातांतील चिठ्ठी त्यांस दिली. चिठ्ठी वाचून ते किंचित् हंसले आणि म्हणाले, "बोला, काय काम?" मीं भीतभीतच जेवणास बोलावणें देण्यास आलों आहें असें सांगितलें. त्यांनीं कोणत्या दिवशीं, किती वाजतां वगैरे विचारलें आणि 'बरें आहे, येतों" असें ते म्हणाले. अर्थात् मला आनंद झाला आणि कॉलेजमध्यें मीं परत आलों.

ठरल्या वेळीं तात्यासाहेब आले आणि आमचीं जेवणें मोठ्या आनंदांत झालीं. जेवतांना अनेक विषयांवर गप्पा चालल्या होत्या. त्यांच्या वेळच्या डेक्कन कॉलेज वसतिगृहामधील पुष्कळ गोष्टी त्यांनीं सांगितल्या; आणि आमच्या चित्तवृत्ति आनंदवून सोडल्या. पानसुपारी खातां खातां त्यांनीं त्यांच्या वेळच्या एका फेलोची गोष्ट सांगितली. त्यावेळीं माझी चिठ्ठी वाचून त्यांनी हास्य कां केलें तें मला कळलें! डेक्कन कॉलेजमध्यें एका पहिल्या वर्गामध्यें पास झालेला व प्रिन्सिपॉलच्या मर्जीतील एक विद्यार्थी त्या वर्षी फेलो म्हणून घेण्यांत आला होता. त्याच्याबद्दल इतर विद्यार्थ्यांना फारसा आदर नसे; परंतु तो मात्र आपण फार मोठे शिष्ट आणि विद्वान् अशा ऐटींत वागत असे. कॉलेजमधील मुलें त्यांच्याकडे उपहासात्मक दृष्टीनें पाहून दुर्लक्ष करीत. तो पदवीदानसमारंभास जाऊन मुंबईहून परत आला. तरी कोणी त्याला विचारीना कीं, 'तूं कुठें गेला होतास?' शेवटीं त्यानें आपल्या डाव्या हाताच्या करंगळीला एक फडकें बांधलें आणि तो जेवणास येऊन बसला. तेव्हां कुणी एकानें सहज 'काय हो! बोटाला काय झालें?' असें विचारलें. त्याबरोबर त्यानें तो सेकंडक्लासमधून कॉन्व्होकेशनकरितां कसा गेला आणि येतांना त्याचें बोट सेकंडक्लासच्या दरवाजांत कसें सांपडलें, याचें वर्णन करण्यास सुरुवात केली. त्याचा सांगण्याचा उद्देश तो सेकंडक्लासमधून फेलो म्हणून कॉन्व्होकेशनला मुंबईस गेला होता हें श्रोत्यांच्या मनावर बिंबवावें! हें ऐकून मंडळींत खूपच हंशा पिकला. पण तेवढ्यांत माझ्या एका स्नेह्यानें 'हे फेलो तसें नाहींत. हे गुणानें फर्स्टक्लासमध्यें आल्याकारणानें फेलो झाले आहेत' असें सांगितलें. त्याबरोबर तात्यासाहेबांनीं 'तें मला माहीत आहे; पण फेलो म्हणजे काय चीज असते, तें मला सांगावयाचें होतें' असें उत्तर दिलें. तात्यासाहेब येऊन परत जाईपर्यंत २–३ तास ते आमच्याशीं जसें कांहीं आमच्यापैकींच एक, इतक्या तन्मयतेनें वागत होते!

(२) लो. टिळक विलायतेहून परत आल्यानंतर त्यांना फर्ग्युसन कॉलेजमधील विद्यार्थ्यांनीं पानसुपारी करण्याचें ठरविलें. प्रिन्सिपॉल परांजप्यांनीं कॉलेजमध्यें ही गोष्ट करण्यास परवानगी दिली नाहीं, तेव्हां आम्हीं 'वैदिक आश्रमा'मध्यें ती करण्याचें ठरविलें. रात्रीं आठच्या सुमारास लो. टिळक, तात्यासाहेब इत्यादि मंडळी आली. वैदिक आश्रम नुसता विद्यार्थ्यांनीं फुलून निघाला होता. प्रथम स्वागतपर भाषण प्रो. लिमये यांनीं केलें; आणि सर्व थोर मंडळींस हार घालून आम्हांस उपदेशाचे चार शब्द सांगण्यास विनंती केली. टिळकांच्या सांगण्यावरून तर तात्यासाहेब बोलावयास उभे राहिले. तात्यासाहेब किती शालीन आणि किती विनयशील होते ह्याची त्या वेळीं आम्हांला कल्पना आली. ते म्हणाले, "आज तुम्हीं मला हार घालून माझा गौरव केला हें ठीक झालें; परंतु ह्याचा खरा अर्थ मीं जाणतों. गंजिफा खेळणारांना

माहीत आहे कीं, सुरक्याबरोबरच्या कोणत्याहि एका फडतुस पानालाहि एक पान सुरक्याला मिळतें तसेंच मिळत असतें. टिळकांबरोबर कोणीहि असला तरी त्याला हार हा मिळावयाचाच! टिळक ह्या डावाचे सुरक्या आहेत आणि मी त्यांच्याबरोबरचें केवळ एक साधें पान!" असें भाषण करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें. नंतर टिळक बोलावयास उभे राहिले. त्यांनीं प्रथमच तात्यासाहेबांच्या ह्या भाषणाचा उल्लेख केला आणि कोटीवर कोटी करून म्हणाले, "आतांच तात्यासाहेबांनीं मला सुरक्या आणि स्वतःला साधें पान म्हटलें; परंतु गंजिफा खेळणारांना हेंहि माहीत असतें कीं, रात्रीचा सुरक्या निराळा आणि दिवसाचा सुरक्या निराळा. एकाचें राज्य संपल्यानंतर दुसऱ्याचें राज्य सुरू होतें; त्याप्रमाणें माझ्यानंतर आमच्या तात्यांचें राज्य सुरू होईल." लो. टिळक त्या दिवशीं जवळजवळ एक तास बोलले; त्यांत तात्यासाहेबांच्याबद्दल त्यांचें मत त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. तात्यासाहेबांचा विनय मोठा कीं टिळकांची गुणग्राहकता मोठी?

(३) आपण स्वतः मागें राहून दुसऱ्या माणसाला पुढें आणावयाचें, त्याला प्रत्येक बाबतींत संधि द्यावयाची, साधनें द्यावयाचीं आणि आशीर्वाद द्यावयाचा, हाच तात्यासाहेबांचा मूळ स्वभाव. सन १९४३ सालीं दिल्ली येथील मध्यवर्ती विधिमंडळाची निवडणूक झाली; आणि त्यांत आमच्या पक्षातर्फे बॅ. जम्नादास मेहता निवडून आले. निवडणूक मंडळाच्या मुख्य कार्यालयाचा मी कार्यवाह होतों. श्री. अण्णासाहेब भोपटकर यांच्या आज्ञेमुळें हें काम मला पतकरावें लागलें. निवडणुकीच्या दिवसांत मी कित्येक वेळां १५–१६ तास काम प्रत्यहीं करीत असे. तात्यासाहेब मधूनमधून येऊन काम कसें काय चाललें आहे हें पाहून जात असत. जम्नादास निवडून आल्याचा आनंद साहजिकच आम्हां सर्वांस झाला. माझ्या कामाबद्दल स्वतः जमनादास, अण्णासाहेब भोपटकर यांनीं माझें कौतुक केलें; परंतु मला माझ्या समाधानांत कांहींतरी कमतरता आहे असें सारखें वाटत असे. एक दिवस सकाळींच तात्यासाहेब माझ्या दरवाज्यांत उभे! मला मोठें नवल वाटलें. तात्यासाहेबांची व माझी इतक्या वर्षांत बरीच घसट वाढली होती. तरी देखील इतक्या सकाळच्या प्रहरीं हे कां आले असावेत ह्याचा बोध होईना. तात्यासाहेब म्हणाले, 'वर चला ... ... काम आहे.' मी जरा बिचकत बिचकतच त्यांच्या मागोमाग माडींत गेलों. मला त्यांनीं जवळ बोलावलें आणि अक्षरशः माझ्या पाठीवरून हात फिरवून मला शाबासकी दिली! त्या वेळीं मला कळलें कीं, माझ्या समाधानांतील कमतरता तात्यासाहेबांच्या शाबासकीमुळें भासत होती! आईबाप वारल्यानंतर इतक्या प्रेमळपणानें माझ्या पाठीवरून हात क्वचित्च कोणी फिरविला असेल! त्या वेळीं मला खरोखर

धन्यता वाटली. वास्तविक माझ्यापेक्षां कर्तृत्वानें आणि अनुभवानें ज्यास्त अशीं कितीतरी माणसें आमच्या पक्षांत होतीं; परंतु मला उत्तेजन देऊन, कौतुक करून, कार्योद्युक्त करण्याकरितां तात्यासाहेबांची ही केवढी दक्षता व उदारमनस्कता !

(४) १९४१ सालीं मुंबईस अखंड हिंदुस्थान परिषद मुंबई प्रांतापुरती भरली होती. तिचें अध्यक्षस्थान तात्यासाहेबांनीं मंडित करावें अशी मुंबईकर मंडळींची फार इच्छा. तात्यासाहेबांनीं त्यांच्या विनंतीला मान दिला व जाण्याचें कबूल केलें. मीं तात्यासाहेबांना सहज म्हटलें, "तात्यासाहेब, तुमचें भाषण छापण्यापूर्वी आम्हांस वाचावयास मिळेल काय !' त्यावर त्यांनीं ताबडतोब 'होय' म्हणून सांगितलें. आतांपर्यंत माझी तात्यासाहेबांच्या बाबतींतील भीड बरीचशी चेपली होती, म्हणजे कोल्हा सिंहाजवळ जाऊन बसून क्वचित् प्रसंगीं आयाळाला हातहि लावूं शकत होता ! भाषणाची हस्तलिखित प्रत माझ्याकडे तात्यासाहेबांनीं पाठवून दिली. मीं ती वाचली, आणि परत तात्यासाहेबांच्याकडे जाऊन त्यांत कांहीं थोडाफार फरक करण्याचा किंवा कांहीं अधिक मजकूर घालण्याचा आम्हांस अधिकार आहे काय असें विचारलें. त्यावर त्यांनीं 'अवश्य' असें उत्तर दिलें. मला वाटला तेवढा भाग मीं त्यांतून गाळला आणि एक सबंध परिच्छेद त्यांत घालण्याकरितां म्हणून लिहून नेला होता, तो त्यांना वाचून दाखविला. त्यांना तो भाग फार पसंत पडला, आणि तो त्यांनीं आपल्या भाषणांत घातला. मला मोठी धन्यता वाटली.

(५) गेल्या सालच्या टिळकपुण्यातिथीच्या निमित्तानें आम्हीं एक लहानशी-खासगी सभा माझ्या घरीं बोलाविली होती. ह्या सभेस महाराष्ट्रांतील ठळक ठळक सुमारें पन्नास माणसें सर्व पक्षांतील मिळून बोलाविलीं होतीं. प्रतिवर्षाप्रमाणें हा कांहीं फक्त टिळकपक्षीयांचाच मेळावा नव्हता. ह्या सभेस देशांतील कांहीं फार मोठ-मोठे पुढारी आले होते. त्यांचा नामनिर्देश मी मुद्दामच करीत नाहीं. त्या सभेस तात्यासाहेब स्वतः उपस्थित होते. सकाळीं आठ वाजतां सभेस सुरवात झाली. पुष्कळच मोकळ्या मनानें चर्चा झाली. ११॥ च्या सुमारास तात्यासाहेब उठून गेले, आमची सभा चालूच होती. वृद्धपणामुळें अलीकडे दुपारचें जेवण त्यांना ११ च्या सुमारास लागत असे. आणि जेवण झाल्यावर एक तासभर त्यांना स्वस्थ झोंप पाहिजे असे. मीं घरांत ह्या सर्व गोष्टींची सूचना देऊन ठेविलेली होतीच. तात्यासाहेब उठले ते मुकाट्यानें खालीं स्वयंपाक घरांत जाऊन माझ्या कुटुंबास त्यांनीं त्यांचें ताट वाढण्यास सांगितलें. आमची सकाळची सभा सुमारें दुपारच्या एक वाजेपर्यंत चालली होती ! मी सभा संपल्यावर खालीं येऊन पाहतों तों तात्यासाहेब जेवण करून वामकुक्षी करण्याकरितां आमच्या मोठ्या दिवाणखान्यांत झोंपले आहेत ! मीं चौकशी केली तेव्हां मला हें सर्व कळलें. दुपारच्या सभेला पुनः तात्यासाहेब हजरच ! रात्रीं आठच्या सुमारास ते घरीं जाण्याकरितां निघाले. मीं

त्यांना 'सकाळच्या जेवणाच्या वेळीं मला वेळेचें भान राहिलें नाहीं, त्यामुळें आपणांस स्वतः खालीं जाऊन व्यवस्था करून घ्यावी लागली' असें म्हटलें. त्यावर ते म्हणाले, "त्यांत काय एवढें मोठें मनाला लावून घेण्यासारखें आहे ! शिवाय मी कांहीं ह्या घरांत परका थोडाच आहें! तुमचें कुटुंब म्हणजे नात्यानें माझी मुलगीच लागते !" कारण माझ्या कुटुंबाच्या माहेरचें आडनांव 'केळकर' आणि तात्यासाहेब तर त्या कुळाचें महत्तम भूषण! माझ्या सबंध घराबद्दल त्यांची एवढी आपलेपणाची भावना होती, म्हणून मी स्वतःला फार भाग्यवान् समजतों.

(६) माझ्या घरीं एक चांगलें सोनचाफ्याचें झाड आहे. पावसाळ्याच्या सुरवातीला रोजच्या रोज हजार हजार तरी फुलें निघत असत. एके दिवशीं मी त्यांतील उत्कृष्ट अशीं शेंदोनशें फुलें घेऊन तात्यासाहेबांच्या घरीं गेलों, आणि तीं फुलें त्यांना दिली. तात्यासाहेबांना फुलांची भारी आवड. फुलें पाहून त्यांना फार आनंद झाला. ह्या वेळेपर्यंत तात्यासाहेब मला स्वतःच्या घरच्या मोठ्या वडील माणसाइतके जवळचे वाटत. त्यांना माझ्याविषयीं किती आपलेपणा वाटत असे ह्याची अर्थातच मला कल्पना नव्हती. पण पुढें कांही दिवसांनीं मला त्याची पूर्ण कल्पना आली. डिसेंबरची थंडी म्हणजे मी म्हणत होती. तात्यासाहेब सकाळीं उठून, उबदार कपडे घालून आणि पायांत जाड लोकरीचे पायमोजे घालून, गळ्याभोंवतीं उपरणें गुंडाळून एके दिवशीं सकाळीं ते माझ्याकडे आले. हातांत एक पिशवी होती. ती दिसल्याबरोबर मी साहजिकच त्यांच्या हातांतील सामान घेण्याकरितां हात पुढें केला; पिशवी खुंटीवर अडकविली आणि ओटीवरच्या झोंपाळ्यावर ते बसले होते, त्यांच्यासमोर बोलण्याकरितां उभा राहिलों. ते म्हणाले, "पिशवी खुंटीवर अडकविण्याकरितां आणली नाहीं; पिशवींत काय आहे तें तर पाहा." मीं पिशवी उघडली तों त्यांत तांबडीकाळीं गहिऱ्या रंगाचीं वांगीं ! मी ती खुंटीला अडकवून ठेवूं लागलों. ते म्हणाले, "आमच्या बंगल्याच्या मागील बागेंत अण्णानें वांगीं लावलीं होतीं. फार चांगलीं आहेत. म्हटलें, आज तुम्हांस शेंडीं द्यावींत." मीं मनांत फार आनंदित झालों. परंतु स्वतः तात्यासाहेबांनीं आपल्या हातांतून तीं वांगीं आणलीं हें मला पटलें नाहीं. मीं म्हटलें, "कोणाबरोबर कां पाठविलीं नाहीत ! स्वतः कां आणलींत !" त्यावर ते हंसून म्हणाले, "घरचें काम करण्याची मला कोणीं काय मनाई केली आहे !" असें म्हणून त्यांनीं माझ्या कुटुंबास बाहेर बोलावून वांगीं घेऊन जाण्यास सांगितलें. वास्तविक तात्यासाहेबांच्या मानानें मी किती लहान आणि ते केवढे मोठे ! पण आकाशस्थ सूर्य चिखलापाण्यांतल्या कमलांना काय लांबचें समजतो ! 'व्यतिषजति पदार्थान् आंतरः कोऽपि हेतुः' हेंच खरें !

(७) तात्यासाहेबांच्या 'पुष्करणी' बंगल्यांत मी मधून मधून जात असे. तेहि

पण गांवांत आले म्हणजे केव्हांहि माझ्याकडे येऊन तास दोन तास बसून गप्पा मारून जात असत. गांवांत सभा असली म्हणजे सभा संपल्यानंतर माझ्या घरीं येऊन तास-भर गप्पा मारल्याशिवाय जावयाचें नाहीं असा एक जवळजवळ अलिखित नियमच झाला होता ! सभा असो वा नसो, तात्यासाहेब एक दिवसा आड तरी माझ्याकडे सायंकाळी येत असत. आणि राजकारण, समाजकारण, काव्यनाटकादि ललितवाङ्मय, आचारविचार, भावी गोष्टी, आशाआकांक्षा इत्यादि गोष्टींबाबत त्यांचे विचार ते बोलून दाखवीत असत. त्यामुळें तो तास दीड तास कसा जाई हें आम्हांस कळतहि नसे. तात्यासाहेब माझ्या घरीं पुढच्या माडींत बसावयाचे ही गोष्ट आमच्या अगदी आंगवळणीं पडली होती. तात्यासाहेबांच्या निधनाची विराट सभा सर परशुराम-भाऊ कॉलेजच्या ग्राउंडवर भरली होती. सभा संपल्यानंतर मी आणि माझे मित्र श्री. मामाराव दाते, इतर मित्र-मंडळींसह आमच्या पुढच्या माडींत येऊन बसलों होतों. मन दुःखानें अगदीं भरून गेलें होतें. त्या माझ्या माडींत दरवाजासमोर खिडकीखालीं बसण्याकरितां दोन गाद्या घातलेल्या असत. त्यांत तात्यासाहेबांची एक जागा ठरलेली असे. तीवर सहसा कोणी बसत नसत. आम्ही येऊन बसल्या-वर साहजिकच सभेबाबत बोलणें चाललें होतें. मामाराव दाते मात्र मधूनमधून दाराकडे पाहत होते. मीं त्यांना कांहीं वेळानें विचारलें, 'मामा, तुम्ही दरवाजाकडे सारखे काय पाहतां ?' ते एकदम म्हणाले, 'मीं सारखा वाट पाहत होतों, तात्या-साहेब आतां इतक्यांत येतील !' बोलतां बोलतांच त्यांची चूक त्यांच्या लक्षांत आली आणि त्यांनीं जीभ चावली ! आमच्या सर्व मंडळींचे डोळे अश्रूंनीं भरून आले. आतां तात्यासाहेब पुनः या जन्मीं कसले दिसतात ! माझ्या माडींतील त्या गादीवरील त्यांची जागा आतां कायमचीच मोकळी पडली आहे !!



य. वि. पुरंदरे

(एम्. बी. बी. एस्., डॉक्टर, मुंबई)

(१) तात्यासाहेबांची व माझी पहिली भेट सं. १९०४ सालीं झाली. सार्व-जनिक कार्य करणारानें कोणतें पथ्य संभाळलें पाहिजे याची रूपरेषा त्या वेळीं त्यांनीं मला सांगितली. ते म्हणाले, "आपल्या सदसद्विवेक बुद्धीला जागृत ठेवून निरपेक्षबुद्धीनें व आत्मविश्वासानें कार्य करीत राहावें. प्रामाणिकपणें असें कार्य करूं लागल्यावर वैयक्तिक मानापमानापेक्षां कार्याच्या उपयुक्ततेकडे लक्ष ठेवावें. खोटा अभिनिवेश मनाशीं बाळगून केवळ लौकिकाकरितां कार्य करण्याचा आविर्भाव आणणें योग्य नव्हे. थोडक्यांत, सार्वजनिक कार्य करणारानें 'समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः । शीतोष्णसुखदुःखेषु समः संग-

विवर्जितः ॥ हीं तत्त्वें आत्मसात् करावीं.' तात्यासाहेबांनीं केलेलें हें मार्गदर्शन माझ्या सार्वजनिक आयुष्यांत मला फारं उपयोगीं पडलें.

(२) सार्वजनिक कार्यांत प्रामुख्यानें आस्थापूर्वक व विशेष कळकळीनें मीं शुद्धीकरणाच्या प्रश्नाकडे आपलें लक्ष केंद्रित केलें आहें. मी यथाशक्ति इतर मित्रांच्या सहाय्यानें सन १९३२ पासून शुद्धीकरणाचें कार्य करीत आहें. पण शुद्धीकृतांना समान दर्जा व हक्क देण्यास समाजाची तयारी नसते, असा अनुभव मला आला. शुद्धीकरणाचें कार्य यशस्वी होण्यास कोणत्या मार्गाचा व साधनांचा अवलंब करावा, यासंबंधीं तात्यासाहेबांबरोबर मीं अनेक वेळां विचारविनिमय केला होता. शुद्धीकरणाच्या कार्यांत अनेक अडचणींचे व वादग्रस्त प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविल्यावांचून परधर्मांत गेलेले लोक पुन्हां स्वधर्मांत येण्यास तयार होत नाहींत. या बाबतींत तात्यासाहेब म्हणाले, "शुद्धीकरणाचें कार्य प्रभावी व यशस्वी व्हावयास समाजाचें मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करणें जरूर आहे. असें मतपरिवर्तन झाल्यावर शुद्धीकृतांना समाजांत पूर्वीचा दर्जा प्राप्त होऊं लागेल व त्यामुळें धर्मांतर केलेले अनेक लोक स्वधर्मांत स्वखुशीनें येऊं लागतील व शुद्धीकार्य प्रभावी होईल." तात्यासाहेबांच्या मार्गदर्शनानुरूप समाजाचें मतपरिवर्तन करून जें शुद्धीकार्य आम्हीं केलें तें यशस्वी झालें व पुढेंहि तें यशस्वी होईल असा आत्मविश्वास वाटतो.

❋

राजाराम जगन्नाथ बनारसवाले

(वक्ते, मालक, लोकमान्य सेन्ट फॅक्टरी, वाई)

(१) १९२१ सालचीं गोष्ट. पुण्यास जीवदया-परिषदेचे तात्यासाहेब अध्यक्ष होते. अनेक धर्मपंथांचे प्रतिनिधि एकामागून एक बोलत होते. त्यांत एकानें ख्रिश्चन धर्मावर हल्ला चढवून येशू ख्रिस्त विधवापुत्र असल्याचें बोलूं लागतांच तात्यासाहेबांनीं त्यास गैरलागू बोलण्यास प्रतिबंधिलें. तसेंच ते म्हणाले, "एक तर, हें बोलणें विषय सोडून आहे; व असें प्रत्येक धर्मांत कांहीं तरी आहेच. उदाहरणार्थ, आपली कुंतीची गोष्ट घ्या. इ०". तात्यासाहेब न्यायप्रिय होते. त्यांना कोणतीहि गैर गोष्ट खपत नसे.

(२) १९२१ सालीं पुण्यास शनिवारांतील नातूंच्या हौदासमोरच्या गोडबोल्यांच्या वाड्यांत गणेशोत्सवांतील व्याख्यानाचे तात्यासाहेब अध्यक्ष होते. विषय होता 'हिंदुधर्माचें रहस्य'. व्याख्याते श्री. भोपटकर यांनीं सांगितलें कीं, हिंदूंनीं आपली संस्कृति विस्तारण्यासाठीं धर्मप्रसारार्थ तरवारहि चालविली, इत्यादि. अर्थात् तात्यासाहेबांना हें पटलें नाहीं. आपल्या भाषणांत हें सारें

खोडून काढून ते म्हणाले, "हिंदु धर्माचे दरवाजे बाहेरून कधींच उघडत नाहींत. त्यामुळें बाहेरून कोणीहि आंत येत नाहींत. उलट हे दरवाजे आंतूनच बाहेर उघडतात व लोक परधर्मांत जातात. येथेंहि आतां जसें हें चाललें आहे!" (तात्यासाहेबांच्या भाषणास नेहमींच गर्दी. येथें तर कमाल भीड झाली होती. तरीहि लोक आंत येण्याची धडपड करीत होते. पण दरवाजावरील स्वयंसेवक त्यांना आंत येऊं देत नव्हते; मात्र आंतून बाहेर जाणाऱ्यांना जाऊं देत होते. श्रोत्यांना हेंच पाहण्यास तात्यासाहेबांनीं सांगून आपल्या भाषणाचें स्पष्टीकरण केलें!) तात्यासाहेबांच्या मार्मिकपणावर श्रोते खूष झाले. समर्पक उपमांची योजना, मला वाटतें, कालिदासानंतर इतक्या अप्रतिमपणें करणारे तात्यासाहेबच. ते कोणताहि विषय अशा रीतीनें सोपा करून तेव्हांच पटवून देत.

(३) १९२२ सालीं गांधर्व महाविद्यालच्या सभेंत तात्यासाहेबांनीं श्रोत्यांना सांगितलें कीं, "गांधी तुरुंगांत असून राजकारण फरफटलें जात आहे. अशा वेळीं इमारत खचली असतां शहाणा एन्जिनियर जसा पाया तपासून उपाययोजना करतो, त्याप्रमाणें आपण तपासणी केली पाहिजे. तेव्हां यासाठीं १९१६ च्या अमृतसरच्या कॉंग्रेसपर्यंत आपणांस मागें जाऊन धोरण ठरविलें पाहिजे आणि कौंसिलें काबीज केलीं पाहिजेत." या त्यांच्या सूचनेचा माझ्या जीवनावर परिणाम झाला. मीं त्या वेळीं माझ्या जीवनाची तपासणी करून मार्ग बदलला व १९२४ सालीं लोकमान्य सेंट फॅक्टरीची स्थापना केली. तात्यासाहेबांनीं फॅक्टरीच्या भांडवलासाठीं शुभशकून म्हणून, माझ्या विनंतीवरून, एक रुपया दिला आहे. पुढें ते फॅक्टरींत आल्या वेळीं त्यांना ह्या मागील गोष्टींच्या आठवणी सांगितल्या होत्या. त्या ऐकून त्यांना आनंद झाला.

(४) वरीलप्रमाणें आणखीहि एक प्रसंग माझ्या आयुष्यास वळण देण्यास कारणीभूत झाला. पुण्यास शिवाजी मंदिरांतील एका सभेंत देशासाठीं स्वार्थत्यागपूर्वक कार्य करणाऱ्या एका देशभक्ताचा उल्लेख करून तात्यासाहेब म्हणाले, "त्याग करण्यासारखें आधीं कमवून दाखवावें व मग त्यागाच्या गप्पा माराव्या. खरी व सक्रिय देशभक्ति तर पुढची गोष्ट आहे." त्या वेळीं आपल्या स्वार्थत्यागाची जाहिरात देणाऱ्या दे. भ. यांची भली भाऊगर्दी झाली होती!

(५) स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमाचा मसुदा तयार करण्यासाठीं प्रमुख स्वराज्यपक्षीय लोकाग्रणी मुंबईस सरदारगृहांत जमले होते. रोज सभा होत. अशीच एक सभा दादरला होती. नंतर तेथें जाहीर सभा झाली. खूप गर्दी लोटली होती. केळकर येण्यास थोडा अवकाश होता. इतक्यांत एक गृहस्थ हातीं 'लोकमान्य' पत्राचा अंक घेऊन मजकडे आले व केळकरांवर तोंडसुख घेत त्यांनीं सदर पत्रांतील मजकूर मला दाखविला. आदल्या दिवशीच्या सभेंत केळकरांनीं वाटेल त्या

अटींवर तडजोड करण्याची तयारी ठेवून कोऱ्या कागदावर सही करून तो त्यांनीं देशभक्त गंगाधरराव देशपांड्यांकडे दिला होता; पण अशाहि सौजन्याचा उपयोग न झाल्यानें स्वराज्यपक्ष निघत असल्याचें सांगितलें होतें आणि त्या 'लोकमान्य' पत्राच्या अंकीं दे. भ. देशपांड्यांनी या गोष्टीचा इन्कार केल्याचें छापले होतें! त्या गृहस्थास मीं केळकरांकडूनच योग्य उत्तर मिळवून देण्याचें आश्वासन दिलें. इतक्यांत केळकर आले. ते येतांच मीं त्यांना हें सर्व सांगितलें. त्यांनीं मला व्यासपीठावरच बसवून घेतलें व सभेस सुरवात करतांना कोऱ्या कागदाबद्दल मुद्देसूदपणें खुलासा केला; आणि पुढें लवकरच एका केसरींत "कोऱ्या कागदाची कहाणी" म्हणून अग्रलेख लिहिला. ती कहाणी इतकी सुंदर वठली कीं, अजूनहि ती वाचनीय आहे!

गोविंद नारायण बर्वे

(केसरी छापखान्यांतील यंत्र-विभागांतील कामगार, पुणें)

१९३२ सालीं जुलै-ऑगस्टमध्यें माझ्या थोरल्या बंधूंची नेमणूक तात्यांनीं केसरी कचेरींत केल्यावर बहुधा ७–८ दिवसांनींच माझ्या वडिलांची प्रकृति बरीच बिघडली. डॉक्टर-सर्जन आले व कांहीं विशिष्ट गोष्टी भावाजवळ सांगून गेले. वडिलांना ताबडतोब मिरजेस नेण्याचें ठरलें. माझे दोन्ही बंधु त्यांना घेऊन मिरजेस गेले व ५–६ दिवसांनीं त्यांचें ऑपरेशन झालें. बंधूंचें मला पत्र आलें कीं, "ती. तात्यांना मुद्दाम भेट व त्यांना सर्व हकिकत कळव आणि सांग कीं, नोकरीवर रुजू होण्याबरोबरच हें संकट आमच्यावर कोसळलें; त्यामुळें माझा नाइलाज झाला. यांतून मोकळा होतांच मी कामावर येतों. वडिलांचा भरंवसा नाहीं. आमचें उभें शेत नाहींसें होण्यासारखें दिसतें! अशा वेळीं आपण लावलेलें रोपटें तरी जगवावें. त्याची वाढ होऊन आम्हांला सावली मिळेल. कृपादृष्टींत अंतर पडूं देऊं नये. थोडा विलंब होईल खरा; पण परिस्थिति ध्यानीं घेऊन क्षमा करावी." मी त्याच दिवशी तात्यांकडे गेलों, गहिवरलों, मला बोलवेना. त्यांनीं काळजीपूर्वक कारण विचारलें. त्याबरोबर मीं भावाचें पत्रच त्यांच्या हातीं दिलें. तें त्यांनीं वाचलें व क्षणभर ते देखील बेचैन झाले. पण लागलीच म्हणाले कीं, "बर्वे, तुमच्या भावाला कळवा कीं, कांही काळजी करूं नका; घाबरून जाऊं नका; वडिलांना बरें वाटेल. मग सावकाशीनें या कामावर, नोकरी कुठें जात नाहीं. मी अेकदां नोकरीवर घेतलेला मनुष्य कांही विशेष कारणाशिवाय सहसा काढीत नाहीं. वडील आजारी पडले यांत त्यांचा काय दोष? त्यांना मीं कायम केलें आहे म्हणून लिहा. तोडून टाकण्यासाठीं रोप लावलेलें नाहीं म्हणावें!" – केवढे हे बहुमोल उद्गार!

नारायण विनायक भोंडे

(बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट, पुणें)

(१) देशी चढाओढींच्या सामन्यांत यशस्वी संघास पारितोषिकें वाटण्याचा समारंभ पी. वाय्. सी. हिंदु जिमखान्याच्या पॅव्हिलियनमध्यें १९२२ सालीं हनुमान-जयंतीच्या दिवशीं सकाळीं व्हावयाचा, तेव्हां चिटणीस म्हणून मी तात्यासाहेब यांस बोलावण्यास गेलों. ते बरोबर सकाळीं ७ ला हजर ! पारितोषिकें जिंकणारे व सामना-कमिटीचे पदाधिकारीहि उपस्थित नव्हते ! ! तेव्हां उद्वेगानें केळकर म्हणाले, " आम्हांस स्वराज्य पाहिजे म्हणतों, पण राज्यकर्त्यांच्या साध्या गुणांचें अजून अनुकरण होत नाहीं. वेळ सांभाळण्याची पाश्चात्यांची पद्धति आपण अनुसरली पाहिजे. अध्यक्ष खुर्चीवर येऊन बसला म्हणजे इतरेजन त्वरित जमून शक्य तितका टळणारा वेळ वांचतो. "

(२) केळकरांस कामाचा कंटाळा नव्हता. १९३० च्या एप्रिल-मे महिन्यांत मुंबई इलाखा पोस्टल व रेल्वेमेल संघाचें अधिवेशन बडोदें येथें व्हावयाचें होतें. केळकर यांनीं अध्यक्षस्थान मंडित करावें ही आमची इच्छा. मध्यवर्ती कायदेमंडळाचें काम उरकून दिल्लीहून केळकर नुकतेच आले होते. तेव्हां त्यांनीं उपस्थित होण्याबद्दल नकार दिला. मी व येथील माजी सब-पोस्टमास्तर चोळकरप्रभृति मंडळी त्यांच्याकडे गेलों व त्यांनीं अखेर निमंत्रण स्वीकारलें व ते बडोद्यास आलेहि. त्यांना अत्यंत दगदग झाली होती. त्यांची प्रकृतिहि नीट नव्हती. तेव्हां आम्ही पदाधिकारी त्यांना म्हणालों, " विषय-नियामक कमिटीची बैठक पांचसहा तास चालून ती पहाटे २॥–३ वाजतांहि संपणार नाहीं. तेव्हां तुम्ही बैठकीस उपस्थित राहिला नाहीं तरी आम्ही निभावून घेऊं." त्यावर केळकर म्हणाले, " भोंडे, हें पहा ! मला सर्व विषयांची व शक्य तेवढ्या तपशिलाची माहिती मिळाली पाहिजे. एकदां मी आल्यावर तुमच्या परिषदेच्या सर्व कार्यक्रमास उपस्थित होणार " व त्याप्रमाणें पहाटे दोन वाजेपर्यंत ते हजर होते !

(३) रा. ब. दादासाहेब काळे यांच्या मुलाचा विवाह-समारंभ झाला. समाज मोठा होता व तात्यासाहेबांस प्रथमच विडा, पुष्पगुच्छ वगैरे दिले. त्यांचा वेळ वांचावा म्हणून आम्ही मंडळी म्हणालों ' आपण वाटल्यास निघावें. ' त्यावर ते हंसत म्हणाले, ' मी मनुष्यांतून उठलों नाहीं ! '

(४) पुणें येथील एका विमा कंपनीच्या खटल्यांत केळकरांची साक्ष झाली. त्या वेळीं उलटतपासणींत वकिलांनीं त्यांना विचारलें कीं, " तुम्ही प्रोसिडिंग-बुक पाहिलें तेव्हां अमुक एक ठराव झाला होता का नाहीं ? " साक्षीदार केळकर म्हणाले, " तो पुस्तकांत असणार; मी काय सांगूं ? " वकील पिच्छा पुरवून उत्तर द्या म्हणून

म्हणाले. तेव्हां केळकर म्हणाले, "ग्या माझें उत्तर टिपून. ह्या पुस्तकांत नमूद केले ते ठराव झाले आहेत. नमूद नाहींत ते ठराव झाले नाहींत!" श्रोतृवृंदांत हंशा पिकला!

❋

शं. वि. गोखले

(शिक्षक, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचें हायस्कूल, पुणें)

(१) १९१४ च्या युद्धाची गोष्ट. सर्व तरुण आय्. टी. एफ्. मध्यें लष्करी शिक्षण घेण्यासाठीं हौसेनें प्रविष्ट झाले होते. मुंबई विश्वविद्यालयानें सेकंड क्लास मार्क मिळणाऱ्यांच्या विषयांत सूट (Exemption) देऊन सैनिक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिलें होतें. पण आय्. टी. एफ्.चें रूपांतर यू. टी. सी.मध्यें झाल्याबरोबर आधी न कळवितांच विश्वविद्यालयानें तो क्रम एकदम थांबविला; म्हणून त्याविरुद्ध आम्हीं मुंबईस व्हा. चॅन्सेलर यांना समक्ष भेटून खटपट केली. मी पुण्यास आल्यावर मुद्दाम तात्यासाहेबांना ह्या प्रकरणांत भेटलों. माझ्याजवळ आम्हीं केलेल्या प्रचार-प्रकाशनाचीं कात्रणें वगैरे बरेच कागदपत्र होते; पण ते सर्व वाचण्यांत वेळ न घालवितां त्यांनीं जरूर त्या गोष्टीबद्दलची एक-दोन प्रश्नांत माझ्याकडून माहिती घेतली व मला उभाउभीच रजा दिली. दुसऱ्याच दिवशीच्या अंकांत "मुंबई विश्वविद्यालय व यू. टी. सी." असें एक स्फुट आलेलें मला आढळलें; मला आश्चर्य हें वाटलें कीं, एका विद्यार्थ्यानें केलेल्या सूचनेचा तात्यासाहेबांनीं इतक्या आपुलकीनें परामर्श कसा घेतला! या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, विश्वविद्यालयाची हल्लींची 'एक्झेम्शन'पद्धत दुसऱ्या वर्षी सर्वांनाच लागूं करण्यांत आली!

(२) सासवडच्या श्रीगणेशोत्सवांत तात्यासाहेबांना आम्हीं निमंत्रण केलें होतें. त्या वेळीं त्यांनीं सांगितलें कीं, "मी आज भाषण करणार नाहीं. लेख लिहून व भाषणें करून ३०-४० वर्षें तेंच केल्यानें मला कंटाळा आला आहे व माझ्या शिकवणीचें तुम्हीं काय चीज केलें याची परीक्षा मीं कां घेऊ नये? तेव्हां आज भाषण न करतां तुम्ही वाटेल ते प्रश्न मला विचारावे व मी त्यांचीं उत्तरें द्यावीं असा कार्यक्रम करा." त्याप्रमाणें अनेकांनीं अनेक प्रश्न विचारले. त्या प्रश्नांच्या लायकीवरून सासवडकरांना तात्यासाहेबांनीं फक्त पासिंग मार्कच दिले! एका प्रश्नाचें उत्तर त्यांनीं फार गमतीनें दिलें! तो प्रश्न :- सहवासोत्तर कीं सहवासपूर्व कोणता विवाह योग्य! तात्यासाहेब हसत म्हणाले, "माझ्या पत्नीचा स्वभाव मला अजून समजला नाहीं. तेव्हां सहवासाची व्याख्या कशी करणार तें सांगा!" सर्व मंडळी हंसली. नंतर एका प्रमुख काँग्रेसपदाधिकारी

गृहस्थानें त्यांना विचारलें कीं, महाराष्ट्रांतील या दोन पक्षांचें ऐक्य नाहीं का घडूं शकणार ? केळकर म्हणाले, " या 'देवांना' जोंपर्यंत आमच्या पक्षाशीं बोलणें म्हणजे स्वर्गातून दोन पायऱ्या खालीं उतरणें असें वाटतें आहे तोंपर्यंत हें कसें घडावें ! "

(३) १९२०च्या गांधी-चळवळीच्या लाटेंत कोणासहि त्यांनीं भलताच त्याग करण्याचा भरमसाट उपदेश केला नाहीं. आम्ही विद्यार्थी कॉलेज सोडावें काय, असें विचारण्यास गेलों; तेव्हां त्यांनीं स्पष्ट सांगितलें, " केलेल्या त्यागाबद्दल पश्चात्ताप होईल अशी भीति ज्यांना वाटत असेल त्यांनीं तसें करूं नये. पण राष्ट्रासाठीं एक वर्ष विधायक कार्य करण्यास म्हणून सोडावयाचें असल्यास असें कार्य जरूर करावें. " सारासार विचार व विवेचकपणा हें त्यांचें ब्रीद होतें.

(४) दे. शंकरराव देव आदींनीं शिवाजी-मंदिरांत केळकरांच्या अध्यक्षतेखालीं चार दिवस व्याख्यानें देऊन उलट केळकरांवरच टीका केली. म्हणून पांचव्या दिवशीं समारोपांत त्यांच्या सर्व मुद्द्यांना त्यांनीं जमीनदोस्त करणारें उत्तर दिलें. त्या वेळीं " काँग्रेसप्रेमी लोकांनीं कॉलेज-शिक्षणाला कलालखाने म्हणून स्वतः मात्र ताडीच्या गाडीवर मागे जशा पानांच्या झिरमिळ्या किंवा तुरे खोचून ठेवतात, तशा आपल्या पदव्या त्यांनीं अजून जपून ठेवल्याच आहेत ! " अशा एका सुंदर दृष्टान्तानें त्यांनीं टोला दिला. त्यानें सभेंत आनंद व विनोद निर्माण झाला.

(५) ती. कै. बाबासाहेब गोखले वकील यांचें निधन हें अगदीं शांतपणें झालें. वडिलांची शुद्ध शेवटपर्यंत कायम होती. शेवटच्या वेळीं डॉक्टरी उपाय थकल्यावर निर्याण निश्चित आहे असें ठरल्यावर त्यांनीं त्या वेळीं आमच्या घरीं श्री. माटे मास्तर राहात असत; त्यांना बोलावून सांगितलें कीं, केळकरांना माझा निरोप सांगा कीं, " तुमच्या केसरींतील बहुमोल लेखांमुळें मला आयुष्यांत फार आनंद प्राप्त झाला. " यावरून अंतकाळीं समाधान व शांति मिळण्यास केसरी कसा कारणीभूत होई व केळकराच्याबद्दलचा जनतेंत आदर कसा वसत होता हेंहि दिसून येतें.

❋

मारुती गणेश अरगडे

(एल्एल्. बी., ॲडव्होकेट, पुणें)

(१) तात्यासाहेब यांचें ' ऐलथडीचा मोक्ष ' या विषयावर दि. २५-११-४४ लां व्याख्यान होतें. तात्यासाहेबांच्या व्याख्यानाचा योग बाया जाऊं द्यायचा नाहीं एवढ्याकरितां हें व्याख्यान ऐकण्यास मी गेलों. विषयाच्या या विचित्र उत्सुकतेनें मी व्याख्यानास बसलों. सुरवातीसच त्यांनीं ऐलथडी म्हणजे नदीला जे दोन

तट असतात, त्यांपैकीं अलीकडील तट म्हणजे ऐलथडी होय व तेथेंच म्हणजे व्यवहारी जगांत वावरत असतांना मोक्ष मिळविणें कसें शक्य आहे यावें साधार विवेचन केलें. त्यांनीं सर्व व्याख्यान इंग्रजीत लिहून आणलें होतें. त्यामध्यें संत ज्ञानेश्वर, उपनिषदें, वेद यांतील उतारे होते. यावरून त्यांची गाढ विद्वत्ता व ज्ञानाची चौफेर दृष्टि दिसून आली. व्याख्यानास पांच मिनिटेंच बसावयाचें असें प्रथम मीं ठरविलें होतें. पण, तात्यासाहेबांनीं हा किचकट व अवघड विषय आपल्या रसाळ वाणीनें सुलभ करून सांगितला. यामुळें दोन तासपर्यंत सर्व श्रोतृसमुदाय मंत्रमुग्ध होऊन गेला. मीहि व्याख्यानांत रंगलो व दोन तासांचें भान राहिलें नाहीं. शिवाय व्याख्यानांतील महत्त्वाचे मुद्देहि मीं टिपून घेतले.

(२) मुसलमान, ख्रिश्चन, पारशी वगैरे धर्मांच्या नवीन वर्षाच्या पहिल्या दिवसास सरकारी सुट्टी मिळते. पण हिंदूंच्या पाडव्याला सुट्टी तर नाहींच, उलट १९४२ सालीं मॅट्रिकच्या परीक्षेस पाडव्यासच सुरवात होणार होती. याविरुद्ध पुणें हिंदु विद्यार्थी संघानें जोराची चळवळ केली व युनिव्हर्सिटी अधिकाऱ्यांकडे हजारों सह्यांचे अर्ज पाठविले. या बाबतींत विद्वान्, जबाबदार व्यक्तींचें मत कळावें म्हणून मी तात्यासाहेबांच्याकडे गेलों. त्या वेळीं ते लिहीत बसले होते. मीं आमचें गाऱ्हाणें त्यांच्यापुढें मांडलें व आपला पाठिंबा देण्याविषयीं विनंती केली. त्यांनीं लागलीच कागद घेऊन त्यावर सरकारच्या या अन्यायाविरुद्ध युनिव्हर्सिटीकडे पाठविण्याचें विनंतीपत्रक तयार केलें व त्यावर आपली स्वाक्षरी केली. नंतर ज्ञानप्रकाशचे संपादक वझे, रॅ. परांजपे वगैरेकडे जाऊन त्यांच्या स्वाक्षऱ्या मिळविण्यास त्यांनीं सांगितलें. त्यांच्या या झटपट काम उरकण्याच्या पद्धतीकडे पाहून मला आश्चर्य वाटलें. तसेंच मजसारख्या साध्या स्वयंसेवकानें सांगितलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवून, सर्व विषयाची माहिती घेतली व त्यांत काय करणें शक्य आहे हें स्वतःच्या हातानें लिहून मार्गदर्शन केलें. मोठमोठ्या राजकीय पुढाऱ्यांकडे आधीं प्रवेश मिळणें मुष्कील. त्यांतून त्यांची भेट होऊन त्यांस एखादी गोष्ट आपण सांगितली तर त्यावर विश्वास बसून, त्यांत भाग घेऊन, मार्गदर्शन करणें अगदींच कठीण असा नेहमीं अनुभव येतो; पण तात्यासाहेबांच्या बाबतींत मात्र निराळाच अनुभव मला आला खरा !

(३) भागलपूरचा रणसंग्राम हिंदुसभेनें सुरू केला होता. त्याला पाठिंबा देण्यासाठीं शनवारवाड्यापुढें नागरिकांची प्रचंड सभा अण्णाराव भोपटकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. तात्यासाहेब या सभेला आपणहून उपस्थित राहिलेले पाहून सर्व तरुणांना आश्चर्य वाटलें व त्यांचा उत्साह वाढला.

सभेची व्यवस्था उत्कृष्टपणें ठेवली होती. मीहि सभेंत भाषण केलें. येवढ्या मोठ्या समुदायापुढें व शेजारीं वंदनीय पुढारी बसले असतां बोलावयास उभे

राहणें म्हणजे धाडसच होतें व यामुळें मला बोलतां येतें कीं नाहीं याची शंका होती. माझें भाषण झाल्यावर तात्यासाहेब पाठीवर थाप मारून मला म्हणाले, "शाबास, ठीक बोललात. प्रयत्न करा म्हणजे चांगले वक्ते होऊं शकाल." त्यांच्या बोलण्यामुळें मला किती आनंद झाला हें सांगतां येत नाहीं. सभेच्या एकंदर व्यवस्थेकडे पाहूनहि 'स्वयंसेवकांनीं सभेची व्यवस्था उत्कृष्टपणें ठेवली' असे उद्गार त्यांनीं काढले. खरोखर मोठ्या पुढाऱ्यांच्या एक-दोन शब्दामुळें तरुण कार्यकर्त्यांचा उत्साह वाढतो व तात्यासाहेबांच्या या गुणामुळें तरुणांना ते आपल्यांतीलच एक असें वाटत होतें!

❋

शंकर गोपाळ तुळपुळे

(एम्. ए., पीएच्. डी., प्राध्यापक, सोलापूर)

(१) तात्यासाहेबांशीं माझा जो कांहीं थोडा संबंध आला तो मुख्यतः गुरुशिष्य या नात्यानें आला. सन १९३६ मध्ये मी मराठी हा विषय घेऊन एम्. ए. झालों व मुंबई विद्यापीठानें त्याच वर्षी सुरू केलेल्या डॉक्टोरेटच्या पदवीसाठीं अभ्यासहि करूं लागलों. आज मराठी हा विषय घेऊन पीएच्. डी.स बसूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास ज्यांना विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे असे पांचसात अध्यापक आहेत. परंतु तेव्हांची परिस्थिति निराळी असून ज्यांना विद्यापीठाची मान्यता आहे, असे तात्यासाहेब हे एकटेच मार्गदर्शक होते. साहजिकच त्यांना भेटून मीं 'यादवकालीन मराठीचा भाषाशास्त्रीय अभ्यास' हा विषय पीएच्. डी. साठीं संशोधनार्थ म्हणून निवडल्याचें सांगितलें. ताबडतोब तात्यासाहेबांनीं केवळ मान्यताच नव्हे तर प्रोत्साहनहि दिलें. परंतु, आपण स्वतः भाषाशास्त्रांत अनभिज्ञ असल्यामुळें 'मार्गदर्शन' असें करूं शकणार नाहीं, असें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. "आपल्या नांवाचा उपयोग करून जर कोणास पुढें येण्यास वाव मिळत असेल तर आपण कां मागें घ्यावें? या विचारानें मला स्वतःला भाषाशास्त्राचें ज्ञान नसतांहि मीं तुमचा मार्गदर्शक होण्यास संमति दिली. माझी अपेक्षा खरी ठरली यांत मला आनंद आहे", असें म्हणाले.

वरील आठवण विस्तारानें दिली आहे; ती अशाकरितां कीं, दुसऱ्यास शक्य तेवढा आधार तर द्यावा; पण स्वतःस अपरिचित अशा क्षेत्रांत खोटा अधिकार मात्र गाजवूं नये, हा तात्यासाहेबांचा मनोधर्म त्यावरून स्पष्ट होतो. त्यांचें 'मार्गदर्शन' मला झालें नाहीं हें खरें; पण त्याबरोबरच निष्कारण विरोध न करतां त्यांनीं मला आपुलकीनें साहाय्य केलें हेंहि तितकेंच खरें आहे. स्वतःच्या मर्यादा ओळखून दुसऱ्यास होईल तितकी मदत करणें हें मनाच्या मोठेपणाचें लक्षण आहे असें

मी समजतों. तात्यासाहेब हे मनाचे मोठे स्वतंत्र व निर्मळ होते. असो. पुढें मी सुटींत पुण्यास जाईं तेव्हां त्यांची भेट होईलच. दर खेपेस ते हंसून म्हणत, "तुम्हां प्रोफेसर लोकांची मोठी चैन आहे. सहा महिने काम, सहा महिने सुटी ! भरपूर वाचावं, भरपूर लिहावं. मला नेहमीं वाटतं, जन्माला यावं आणि प्रोफेसर व्हावं !"

❀

अनंत वासुदेव फडणीस

(तात्यासाहेबांचे खाजगी चिटणीस, पुणें)

(१) दिल्लीस असेंब्लीची बैठक चालूं असतां एके दिवशीं तात्यासाहेब यांचा कान दुखूं लागून ठणका लागला. तेथील प्रसिद्ध डॉक्टरास कान दाखविला. त्यांच्या व डॉ. मुंजे यांच्या सांगण्यांत हें मोठें दुखणें आहे, तेव्हां एकदम मुंबईस जाऊन डॉ. गोपाळराव देशमुख यांस दाखवून लवकर उपचार करावा असें ठरलें. रात्री ठरल्याप्रमाणें मी व ते उजाडतांच निघणाऱ्या पेशावर मेलनें निघून मुंबईस आलों. लागलीच डॉ. देशमुख यांची गांठ घेऊन त्यावर ऑपरेशन केलें पाहिजे असें ठरलें. दुसऱ्या दिवशीं ऑपरेशन केलें. त्या वेळीं देशमुख, आठवले, कैकिणी, टिळक वगैरे सुप्रसिद्ध डॉक्टर हजर होते. तें कर्णमुळाचें ऑपरेशन होतें. डॉ. कैकिणी यांच्या दवाखान्यांत ते राहिले होते. परंतु सांगावयाची गोष्ट ही कीं, पुण्यास त्यांनीं घरच्या मंडळीस कळवूं दिलें नाहीं. ते म्हणत, येथें उत्तम व्यवस्था आहे. उपचारहि चांगले चालले आहेत. तेव्हां पुण्यास कशास कळवितां ? परंतु ऑपरेशनची बातमी वर्तमानपत्रद्वारें पुण्यास चार दिवसांनीं कळून त्यांची मंडळी आली. त्यांच्या संकोची वृत्तीचें हें एक उदाहरण आहे.

(२) वरील ऑपरेशन झाल्यावर आठदहा दिवसांनीं कानास पट्ट्या बांधलेल्या स्थितींत, असेंब्लीमधील एका महत्त्वाच्या बिलावर आपलें मत देणें हें आपलें कर्तव्य आहे हें जाणून, ते तसेंच दिल्लीस त्या दिवशीं जाऊन बिलावर मत देऊन दुसऱ्या दिवशीं परत आले ! नंतर पुन्हां हॉस्पिटलमध्यें राहिल्यावर त्यांची प्रकृति दुरुस्त होऊन ते परत दिल्लीस गेले. यावरून जें कार्य आपण पत्करलें आहे, तें जिवास कष्ट झाले तरी करावयाचें, हा त्यांचा निश्चय व्यक्त होतो.

(३) असेंब्लीच्या बैठकी चालूं असतां गव्हर्मेंट हाऊसमध्यें खाने, चहापार्टी वगैरेंचीं आमंत्रणपत्रें सर्वांप्रमाणें यांनाहि यावयाचीं. परंतु सहसा ते त्याचा स्वीकार करून जात नसत. अशा पार्टीस जाऊन त्यांत वेळ घालविण्यापेक्षां आपणास दुसरें काम पुष्कळ आहे तें करावें असें ते म्हणत.

(४) तात्यासाहेबांस हिंदी येत नव्हतें. म्हणून हिंदी प्रांतांत गेल्यावर ही

अडचण येते; सबब त्यावर व्यासंग करून अभ्यास करून कानपुर हिंदु महासभेचे ते अध्यक्ष झाले. त्या वेळीं त्यांनीं आपलें भाषण हिंदीमध्यें सर्व लिहून त्या सभेंत वाचून दाखविलें! सभेस पंडित मालवीय, लाला लजपतराय वगैरे पुढारी हजर होते. त्यांनींहि त्या भाषणाचा गौरव केला होता. तें अधिवेशन फारच मोठें झालें. सभेस वीस-पंचवीस हजारांच्यावर लोक हजर होते.

(५) श्री. विठ्ठलभाई पटेल यांच्या असेंब्लीच्या अध्यक्षांच्या निवडणुकीच्या दिवशीं सकाळीं पटेलसाहेब आमच्या बंगल्यावर आले व निवडणुकीच्या गप्पा जाहल्यावर पटेल यांनीं तात्यासाहेबांस सांगितलें कीं, माझ्या निवडणुकींत यश येणें सर्वस्वी तुमच्या हातांत आहे. कारण एकच मत कमी पडत आहे व हें मत मिळणें आपल्याशिवाय होणें नाहीं. त्या मनुष्यावर मत मिळण्यासाठीं सरकारी बाजूनें प्रयत्न फार चालू होते. सरकार-पक्षास ते खास त्यांचे आहेत असा भरंवसा वाटत होता. परंतु ते तात्यांच्या मुठींत होते. तात्यासाहेबांनीं त्यांना मत देण्याचें सांगितल्यावर त्या गृहस्थांनीं पटेलसाहेबांस मत दिलें व पटेल यशस्वी झाले.

(६) असेंब्लीमध्यें स्वराज्य-पार्टी फार जोरांत होती. त्या वेळीं पंडित मोतीलाल नेहरू हे स्वराज्य-पार्टीचे लीडर होते व तात्यासाहेब डे. लीडर होते. त्या वेळीं उभयतांच्या विचारें सर्व काम उत्तम रीतीनें चालत असे. श्री. पटेल यांचें नांव अध्यक्षासाठीं पुढें आणण्यापूर्वी, तुम्ही अध्यक्ष व्हावें अशी माझी इच्छा आहे; कारण इतर दुसऱ्यापेक्षां तुम्हांला सर्वांकडून पाठिंबा मिळेल तेव्हां तुम्ही उभे राहण्याचें कबूल करा, असें नेहरू त्यांस म्हणाले. त्यावर तात्यासाहेबांनीं लागलीच त्यांस नकारार्थी उत्तर दिलें. या हकीकतीवरून पं. मोतीलालजींच्या ठिकाणीं त्यांच्याविषयीं किती आदर होता हें स्पष्ट होत आहे.

(७) उत्तरेकडे शिमग्याचा सण मोठ्या मजेंत लहानमोठ्यांनीं घालविण्याची प्रथा आहे. असेंब्लींत असतांना तो सण यावयाचा. पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशीं तिकडील म्हणजे दिल्ली, यू. पी. वगैरे प्रांतांतील मंडळी, असेंब्ली-मेंबर व दिल्लींतील प्रतिष्ठित जमून ते प्रत्येक मेंबराच्या बंगल्यावर जाऊन गुलाल उधळून सर्वांस आपापल्या बंगल्यांतून काढून मिरवणुकीप्रमाणें एकत्र निघून प्रेसिडेंट पटेलसाहेबांच्या बंगल्यावर जाऊन तेथें त्यांस त्यांत घेऊन ती सकाळ रंगवीत असत! इकडील महाराष्ट्रीय मेंबर मंडळींस हें करणें बरें वाटत नव्हतें. दोन वर्षे याप्रमाणें झालें; परंतु तिसऱ्या वर्षी कोणास समजूं न देतां तात्यासाहेब, श्री. बेळवी व श्री. पटेल वगैरेंनीं हा प्रसंग टाळण्याची युक्ति योजून काढली. ती अशी की, दिल्लींतील एका लक्षाधिशास सांगून त्याच्या मोटारींतून मथुरेस ती सकाळ काढावयाची असें ठरविलें व त्याप्रमाणें हीं मंडळी अगदीं सूर्योदयाच्या आंत रवाना झाली. त्यांनीं कोणासहि सांगितलें नाहीं. त्याप्रमाणें दिल्लीस होणारा रंग व

गुलाल या मंडळींनीं दुपारपर्यंत तिकडे वेळ घालवून टाळला; परंतु मधुरेंत रस्त्यानें मोटार जात असतां एकानें 'केळकरसाहेब चालले' असें ओरडून एक रंगाची पिचकारी मोटारींत मारलीच व शिमग्याचा सर्वांना प्रसाद दिला !

(८) तात्यासाहेब असेंब्ली-इलेक्शनच्या वेळीं स्वतः फक्त दोन जिल्ह्यांत हिंडले. बाकी महाराष्ट्रांतील मतदारांचा त्यांस इतका पाठिंबा होता कीं, ते कोठेहि हिंडले नसते तरी पहिले आले असते. पहिल्या इलेक्शनमध्यें सातारा जिल्ह्यांत दौरा काढला. बरोबर भाऊसाहेब सोमण होते व दुसऱ्या इलेक्शनच्या वेळीं दोन्ही खानदेश मध्यें हिंडले; त्या वेळीं बरोबर तात्यासाहेब जोशी, वकील, एरंडोल, हे होते. सर्व ठिकाणीं लोकांनीं त्यांच्याविषयीं आपुलकीच्या भावनेनें त्यांचा योग्य तो सन्मान केला व कांहीं ठिकाणीं मानपत्रेंहि दिलीं. सातारा जिल्ह्यांत त्यासाठीं दोन उमेदवार म्हणजे प्रसिद्ध वकील दादासाहेब करंदीकर व अष्टे येथील इनामदार खर्डेकर हे उभे होते; पण यांच्यापुढें त्यांस पाठिंबा मिळाला नाहीं व दोन्ही इलेक्शनमध्यें सर्वांत जास्त मतें मिळवून ते निवडून आले. त्या कामीं खर्चाहि बाकीच्या उमेदवारांपेक्षां फारच कमी आला. कित्येक ठिकाणीं लोकांनीं आपण होऊन खर्च केला. त्यांस खर्चाची बिलें मागतां त्यांनीं तीं देण्याचें नाकारलें. याचें कारण तात्यांची सार्वत्रिक लोकप्रियता !

(९) सर्वांत जास्त दगदगीचें व कष्टाचें काम व ज्याचा आरंभ लोकमान्यांनीं केला होता तें अखेर शेवटास तात्यासाहेबांनीं नेलें. तें काम म्हणजे रायगड येथील श्रीशिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोद्धार हें होय. सरकारी आर्केऑलॉजिकल डिपार्टमेंटच्या ताब्यांत रायगड असल्यामुळें त्यांच्या परवानगीशिवाय तें काम होणें अगदीं अशक्य. वेळोवेळीं त्या कामीं ज्या ज्या सरकारी कामगारांकडून उपयोग करून घ्यावयाचा त्यांच्या वरचेवर गांठी घेऊन त्यांच्या पाठीमागें सतत लागून सरकारकडून समाधीचा जीर्णोद्धार करण्याची परवानगी घेतली व सरकारकडून सात हजार रुपयांची मदतहि मिळविली. तें काम पूर्ण करून त्याचा अनावरण समारंभ श्रीमंत रघोजीराव भोसले नागपूरकर यांच्या हस्तें रायगडावर उत्तम रीतीनें केला. त्यासाठीं फार प्रयत्न करून लोकमान्यांची इच्छा पूर्ण करून त्यांनीं बरेच दिवस रायगड-फंड गोळा होऊनहि पडून राहिलेलें हें काम पुरें केलें.

(१०) श्री. जम्नादास मेथा हे त्यांच्यावर फार प्रेम करीत व तें त्यांनीं अखेरपर्यंत कायम ठेविलें. जम्नादास मुंबई सरकारच्या मंत्रि-मंडळांत कांहीं दिवस होते. त्या वेळीं त्यांनीं पुण्यास भेट दिली. त्यांस अण्णासाहेब भोपटकर यांच्या घरीं चहापाटी झाली. त्या प्रसंगीं तात्यासाहेब व त्यांची प्रथम गांठ पडली. त्या वेळीं त्यांनीं साक्षात् त्यांच्या पायावर डोकें ठेवून वडीलपणाचा आशीर्वाद मागितला !

(११) तात्यासाहेबांनीं मजला आठवण म्हणून एक उत्तम सोन्याची आंगठी बक्षीस दिली. तें त्यांचें बक्षीस मिळाल्यानें मजला फार धन्यता वाटते व त्यांची आठवण म्हणून मी ती नित्य वापरीत आहें.

❁

विश्वनाथ केशव कुलकर्णी

(बी. ए., एलएल. बी., वकील, बेळगांव)

१९२५-२६ साल. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्यें मीः शिकत होतों. कॉलेजमध्यें "कर्नाटक विद्यार्थी संघ" नांवाचा एक संघ होता. त्या वर्षी या संघाचा मी सेक्रेटरी होतों. ज्या संघाचें वार्षिक सम्मेलन करण्याचें ठरलें, त्याची प्रसिद्धि केसरीच्या इहवृत्तांत व्हावी असें ठरलें. पण, "कर्नाटक संघाची" म्हणून ही बातमी केसरींत येईल कीं नाहीं, अशी मला प्रामाणिक शंका आली. म्हणून तात्यासाहेब यांनाच समक्ष भेटण्याचें ठरवून केसरी कार्यालयांत गेलों व संघाची माहिती केसरींत द्याल का म्हणून विचारलें. त्यावर ते म्हणाले, "द्याल का म्हणून तुम्ही कां विचारतां?" मी माझी शंका सांगण्याचें टाळीत आहें, असें पाहून पुन्हां ते म्हणाले, "तुम्हांस शंका कसली आली? सांगण्यास कांहींच हरकत नाहीं." तेव्हां धीर येऊन मी म्हणालों, 'केसरी महाराष्ट्रांत निघतो; त्यांत कर्नाटक-संघाची बातमी घेतली जाईल कीं नाहीं, अशी शंका आली म्हणून घेतां का असें विचारलें.' तेव्हां ते हंसून म्हणाले, "अहो! केसरीवर फक्त महाराष्ट्रियांचाच हक्क आहे असें नाहीं. महाराष्ट्राइतकाच तुमच्या कर्नाटकाचाहि त्यावर हक्क आहे. फार काय, पण केसरीचा कर्नाटक लाडका आहे. तसेंच केसरी हा सर्वांचाच आहे, शंका बाळगण्याचें कांहींहि कारण नाही. संमेलनाची अवश्य माहिती द्या" असें म्हणून त्यांनीं मला कोरा कागद दिला. मला आनंद झाला. मींहि तत्काळ कार्यक्रमाची माहिती त्यावर लिहून दिली. सदर मजकूर पुढील केसरींत प्रसिद्ध झाला, हें निराळें सांगण्याची अर्थात् जरूरी नाहीं.

❁

बाळा रामा पाटील

(पुणें सार्वजनिक सभा व लो. टिळक-मंदिर येथील शिपाई, पुणें)

पुणें सार्वजनिक सभा व टिळक-मंदिर या संस्थांचा शिपाई म्हणून ज्यांना मी 'थोरले रावसाहेब' म्हणून म्हणत असें त्या तात्यासाहेबांशीं माझा फार दिवसांचा संबंध आला. मी त्यांचा शिपाई खरा, पण त्यांनीं मला मुलासारखें

वामविलें. ते माझे मायबाप होत. त्यांचे गुण मी किती आठवूं – सांगू. तासन् तास सांगत बसलों तरी तें संपणार नाहीं. म्हणून तसें न करितां फक्त एकच गोष्ट लिहितों.

एकदां माझी प्रकृति अतिशय बिघडली, मला प्लेगनें गांठलें. घरीं उपचार होणें कठीण झालें म्हणून मी ससून हॉस्पिटलमध्यें गेलों. दोन-तीन दिवस थोरल्या रावसाहेबांच्या नजरेस मी न पडल्यामुळें माझी त्यांनीं अण्णांच्या (स. वि. बापट) जवळ चौकशी केली. अण्णांनीं त्यांस सर्व हकीकत सांगितली. त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक, लगेच त्यांनी अंतुकाका फडणीस यांस टांगा आणावयास सांगून ते दोघे माझ्या चौकशीकरितां ससून हॉस्पिटलमध्यें आले व माझी चौकशी करूं लागले; पण माझें सबंध नांव त्यांस आठवेना म्हणून जरा पंचाईत पडूं लागली. 'आमचा बाळू शिपाई' असें म्हणून तेथें विचारूं लागले. पण अशा नांवानें तेथें काय पत्ता लागणार ? इतक्यांत दैवयोगानें सिव्हिल सर्जनच तेथें आले. त्यांची व थोरल्या रावसाहेबांची फार मैत्री होती, म्हणून माझा लौकर शोध लागला. मी प्लेगचा रोगी म्हणून तेथेंच, पण दूर असलेल्या प्लेग-कॅंपमध्यें मला ठेवलें आहे असें त्यांस समजलें. म्हणून ती सर्व मंडळी तेथें आली. मी निपचित पडलों होतों; पण शुद्ध होतों. एकाएकीं त्यांना पाहून मी चकित झालों. देव भेटल्यासारखें मला वाटलें, माझे डोळे भरून आले. त्या मंडळींचें इंग्रजींत बोलणें चाललें होतें. थोरले रावसाहेब माझ्या कॉटजवळ आले, खुर्चीवर बसले, ताप पाहिला, माझ्या तोंडावरून हात फिरविला व म्हणाले, "बाळ ! तुझी उत्तम व्यवस्था हे साहेब करणार आहेत. औषध-पाणी चांगलें देऊन, तुला बरें करून लौकर घरीं पाठविणार आहेत. तोंपर्यंत येथें तुझ्या खाण्या-पिण्याची आम्हीं चांगली व्यवस्था केली आहे. काळजी करूं नको, घाबरूं नको" असा धीर देऊन ते गेले. ते जात असतां, त्यांकडे मी सारखा टक लावून पाहत राहिलों अखेर ते दिसेनासे झाले, तेव्हां पुन्हां माझे डोळे भरून आले. ते येऊन गेल्यानंतर लगेच माझी तेथील सर्व व्यवस्था एखाद्या श्रीमंतासारखी ठेवण्यांत आली, तें पाहून तेथील सर्व लोकांनाहि फार आश्चर्य वाटलें. पुढें मला असेंहि कळलें कीं, ते गांवांत येल्यावर प्रथम केसरी कचेरींत गेले व मॅनेजर बाबासाहेब विद्वांस यांस त्यांनीं सांगितलें कीं, आपला बाळू बरा होऊन घरीं येईपर्यंत एक दिवसाआड त्याजकडे मोसंबी, द्राक्षें वगैरे चांगलीं ताजीं फळें पाठवीत जा. त्याप्रमाणें मी घरीं येईपर्यंत बाबांनीं हा क्रम बिनचूक चालविला होता. खरोखर मरून थोरल्या रावसाहेबांच्या पोटीं यावें असें मला कां वाटूं नये ! !

❋

सौ. सुंदराबाई बाळा पाटील

(लो. टिळक-मंदिराचे शिपाई यांची बायको, पुणें)

(१) मी अगदी लहान होतें. त्या वेळीं तात्यासाहेब टिळकरोडवरच्या घरीं राहत असत. माझ्या सासूबाई त्यांच्याकडेच कामाला होत्या. त्यांच्या घरांतील मागील बाजूस दोन खोल्या होत्या. तेथेंच त्यांनीं आम्हांस राहावयास जागा दिली होती. या खोल्यासमोरील मोकळ्या जागेंत कांहीं फुलझाडें, तसेंच नारळ व सुपारीचींहि झाडें होतीं. दररोज सकाळ-संध्याकाळ तात्यासाहेबांची फेरी या छोट्या बागेकडे होत असे. मी येथेंच पडवीत अंकलिपी वाचीत किंवा कांहींतरी पाटीवर लिहीत बसलेली असे. त्यांचीं सर्व मुलें-मुलीं शाळेंत जात असत, पण माझ्या सासूबाई मला शाळेंत पाठविण्यास तयार नसत. मला शाळेंत पाठवावें म्हणून तात्यासाहेबांनींहि सासूबाईस सांगितलें; पण सासूबाई म्हणावयाच्या, आमच्या मराठ्यांच्या मुलींना काय करावयाचें शिकून ! तात्यासाहेब मला म्हणावयाचे, घरांतल्या घरांत शिकत जा आणि आमच्या अक्कासारखी (कमळाबाई देशपांडे) मास्तरीण हो. तात्यासाहेबांचे ते शब्द मला आज चांगले आठवतात व त्यामुळें मी जिवंत असेंपर्यंत त्यांचें स्मरण मला होणारच ! कारण त्यांचें प्रोत्साहन मिळालें म्हणून तर मी आज या स्थितीप्रत आलें. शाळेंत न जातां मिळालेल्या शिक्षणावरच मी इंग्रजीहि तीन इयत्ता केल्या व आज हेल्थ व्हिजिटर्सच्या कोर्सला गेलें आहें. तात्यासाहेबांना गरिबांच्याविषयीं फार कळवळा असे. गरीब, मराठा वगैरे जातींतील मुलांमुलींनीं शिक्षण घ्यावें असें आग्रहानें ते नेहमीं म्हणत असत. मी थोडी चित्रकलाहि शिकलें. माझीं चित्रें तात्यासाहेबांनीं पाहून मला शाबासकी दिली. मीं काढलेल्या चित्राला प्रदर्शनांत सर्टिफिकेट मिळालें, तें तात्यासाहेबांना दाखविलें त्या वेळीं तर, त्यांना किती तरी आनंद झालेला दिसला. त्यांच्या ठिकाणीं गरिबांच्या विषयीं असलेली कळकळ मला स्पष्ट दिसून आली.

(२) माझ्या सासूबाई वारल्या; यामुळें माझ्या नवऱ्याच्या पगारांत एक वेळहि पोटभर जेवतां येणें अशक्य वाटू लागलें. तेव्हां आपण कांहीं तरी पैसे मिळवावयास हवेत असें वाटूं लागलें व मीं सेवासदनमार्फत मिड्वाइफरीचा कोर्स घेण्याचें ठरविलें. या वेळीं मी माझा मानस तात्यासाहेबांना सांगतांच त्यांनीं रास्तापेठेंतील किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटलचे व्यवस्थापक रावसाहेब मुदलियार यांना चिठ्ठी दिली ! त्या चिठ्ठींत त्यांनीं माझ्यासंबंधीं अगदीं आपलेपणानें लिहिलें होतें !! त्यांची आठवण झाली कीं, डोळ्याला आसवेंच येतात. मी मिड्वाइफरीची परीक्षा पास झालें त्या वेळींहि तात्यासाहेबांना भेटावयास गेलें. मी पास झालें म्हणून त्यांना मी खालीं वाकून नमस्कार केला व तुमच्या आशीर्वादानें पास झालें, इतकेंच नव्हे

तर पहिली आलें असें त्यांना सांगून आलेलें पत्र दाखवलें. त्यांनीं मला शाबासकी दिली व हंसत हंसत म्हणाले, " पास झाल्याचें सांगतांना नुसतें सांगून भागत नाहीं; पेढे द्यावे लागतात." पण मी पेढे देण्यासच गेलें होतें व बरोबर नेलेहि होते, ते त्यांना दिले. तेव्हां ते म्हणाले, " अरे वा ! तूं बरोबरच आणले होतेस वाटतं." असें म्हणून त्यांनीं दोन पेढे आपण खाल्ले व माझ्यासमक्ष नातवंडांनाहि दिले. नंतर माझी विचारपूस केली. " तुला कांहीं मदत लागल्यास व कोणाला पत्र, चिठ्ठी लागल्यास, कोठें तुझ्या अर्जावर सही करावी लागली तरी मी देईन; पण तुला मानानें पोट भरतां येईल इतकें आणि तुला शिकतां येईल तितकें अधिक शीक " असा त्या माझ्या प्रेमळ, पुण्यशील धर्मपित्यानें उपदेश केला. नंतर त्यांचा निरोप मी किती आनंदी मनानें घेतला म्हणून सांगूं ! ! मी वरील मजकुरांत 'तात्यासाहेब' असें प्रत्येक ठिकाणीं लिहिलें खरें; पण त्यांच्या मुलांबरोबर मीहि पण त्यांना नुसतें 'तात्याच' म्हणत असें ! क्वचित् तात्यासाहेब असें कधीं चुकून म्हटलें तर ते म्हणत, "मी कांहीं साहेब नाहीं; तूं माझ्या लहान मुलीसारखी आहेस. म्हणून तूं मला नेहमीं 'तात्याच' म्हणत जा." मीं अनेक मोठीं माणसें पाहिलीं; पण तात्यांच्यासारखा निर्मळ मनाचा आणि थोर दिलाचा सत्पुरुष तो एकच आतापर्यंत मीं पाहिला !



नारायण रामचंद्र केळकर

(एम्. ए., बी. टी., प्राध्यापक, अकोला)

(१) १९१७ सालीं एका मंगळवारीं केसरीच्या अंकांत दादाभाई नौरोजी आदल्या रात्रीं म्हणजे सोमवारीं दिवंगत झाले म्हणून त्यांच्यावर अग्रलेख छापण्यांत आला होता. दादाभाई वारल्याचें वृत्त सोमवारीं अपरात्रीं येतें काय व मंगळवारीं पहाटें त्यांच्यावर केसरींत अग्रलेख येतो काय, याचें सर्वांनाच आश्चर्य वाटलें. अपरात्रीं बातमी मिळतांच केसरी कचेरींत जाऊन दादाभाईंच्या कामगिरीचें संपूर्ण समालोचन करणारा अति सुंदर लेख लिहिण्यांत केळकर हे कसे सव्यसाची संपादक होते हें दिसून येतें.

(२) लो. टिळकांच्या मृत्यूनंतर फर्ग्युसन कॉलेजांत ' टिळकांच्याविषयीं दोन शब्द ' या विषयावर प्रा. वा. गो. काळे यांच्या अध्यक्षतेखालीं केळकरांचें एक व्याख्यान झालें. प्रा. काळ्यांना टिळकांच्याविषयी फारसा आपलेपणा वाटत नसे हें आम्हां विद्यार्थ्यांना सुद्धां माहीत होतें. व्याख्यानाच्या प्रारंभीं प्रा. काळ्यांनीं ' टिळकांच्यासारखें कोणीं उपरणें घेतलें तरी तो कांहीं टिळक होऊं शकत नाहीं व टिळक इतरांना कितीहि मोठे वाटले तरी, त्यांच्या नेहमीं जवळ असणाऱ्यांना ते मोठे वाटतीलच असें नाहीं. A hero is not a hero

to his vallet-de-chamber' असे कुत्सितपणाचे उद्गार काळ्यांनीं काढले. केळकरांनीं हें जणुं कांहीं आपल्या टिळकभक्तीला आव्हानच होय असें समजून, प्रा. काळ्यांनीं शेक्सपिअरच्या ज्या ज्युलिअस सीझर या नाटकांतील अवतरण उच्चारलें होतें तें सीझरच्या दाईचें होतें व तिला सीझर, इतर लोकांना कितीहि मोठा वाटत असला, तरी तिला तो अंगाखांद्यावर लहानपणीं खेळवल्यामुळें मोठा वाटत नव्हता असें त्याचें मूळ सांगून, टिळक जसे इतरांना मोठे वाटत होते तसेंच त्यांच्या नेहमीं सान्निध्यांत राहणाऱ्या लोकांना ते धैर्याचे महामेरूच वाटत असत असा निर्वाळा दिला. केळकरांचें हें समयोचित वक्तृत्व ऐकून मार्मिक विद्यार्थ्यांनीं टाळ्यांचा गजर केला.

शंकर परशुराम भिडे

(चित्रकला-शिक्षक, पुणें)

(१) माझ्या घरीं मुलीचें लग्न व माझ्या मुलाचें लग्न हीं दोन्ही वेगवेगळ्या सालीं झालीं. त्या प्रसंगीं घरांत वडीलधारें मनुष्य कोणी नव्हतें. मी कार्यांत गुंतलेला असणार व येणारेजाणारे अनेक पाहुणे यांजकडे लक्ष द्यावयास सांपडणार नाहीं. याकरितां तुम्ही माझ्या घरीं वडील मनुष्य या नात्यानें हजर राहा अशी मीं तात्यासाहेबांस विनंती केली. माझा त्यांचा ऋणानुबंध त्यांचे चिरंजीव यांचा मी स्नेही फोटोग्राफर इतकाच; पण हें लक्षांत घेऊन दोन्ही प्रसंगीं त्यांनीं माझ्या घरीं तीन तीन तास हजर राहून वडिलकीची सर्व मदत आनंदानें केली !

(२) एक दिवस तात्यासाहेबांच्याकडे मीं काढलेले चार-पांचशें फोटो घेऊन गेलों व त्यांना विनंती केली कीं, या फोटोंची वर्गवारी लावून द्या. त्यांनीं दोन तास मोहून वर्गवारी तर लावून दिली; येवढेंच नव्हे तर, आपल्या हातांनीं त्यांचे मथळेहि लिहून दिले – परिवर्तनी, सनातनी, पंडित, साहित्यिक, क्रांतिप्रिय, तत्त्वज्ञ वगैरे. सेनापती बापटांचे दोन फोटो त्यांत होते. एक त्यांनीं क्रांतिप्रियांत घालावयास सांगितला व एक साहित्यिकांत घालावयास सांगितला; व तिसरी प्रत आहे का याबद्दल चौकशी केली. कशास तिसरी प्रत पाहिजे असें मीं विचारलें. त्यावर त्यांनीं तत्त्वज्ञांत त्यांचा एक फोटो घालावयास पाहिजे असें सांगितलें; आणि तुम्हांला माहीत नाहीं कीं, ते एक मोठे तत्त्वज्ञानी आहेत असेंहि ते म्हणाले.

एन्. एन्. क्षीरसागर

(डायरेक्टर, भारत इंडस्ट्रिअल बँक, पुणें)

(१) "पुणें मर्चेंट्स् को-ऑपरेटिव्ह बँक लि."च्या संस्थापनेपासून असलेले कौन्सिलचे अध्यक्ष तात्यासाहेब यांना सेवानिवृत्तीनंतर संस्थेचें मानपत्र समर्पण करण्याचा समारंभ ता. २७ ऑगस्ट १९३७ रोजी बॅरिस्टर जम्नादास मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं डेक्कन बोलपटगृहांत करण्यांत आला.

उत्तरादाखल तात्यासाहेब यांनीं भाषण करतांना मीं त्यांच्या नांवाचा व सान्निध्याचा फायदा संस्थेस मिळाला हें जें माझ्या भाषणांत सांगितलें त्यास त्यांनीं समर्पक असा जो दाखला दिला तो सर्वांस उद्बोधक वाटेल म्हणून शक्यतों त्यांच्याच शब्दांत देत आहें. ते म्हणाले, " केमिस्ट्रीमध्यें एक कॅटेलिक एजंट नांवाचें द्रव्य आहे. या द्रव्याचें वैशिष्ट्य असें आहे कीं, तें द्रव्य ज्या पदार्थांच्या किंवा द्रव्याच्या सान्निध्यांत येतें त्या द्रव्यांना तें अधिक लवकर कार्यक्षम करण्यास लावतें आणि असें असूनहि तें मूळ द्रव्य कमी न होतां जसेंच्या तसेंच कायम राहातें. माझ्या नुसत्या नांवाचाहि बँकेच्या भरभराटीकडे उपयोग झाला व ती अधिक कार्यक्षम झाली असें आतांच सांगण्यांत आलें व जनतेला माझ्या नांवाचा कॅटेलिक एजंटासारखा उपयोग झाला तर तें मला भूषणास्पद कां वाटूं नये ! "

(२) श्रीसोन्यामारुती-सत्याग्रह सुरू झाल्यानंतर ता. १० मे १९३७ रोजीं अनपेक्षितपणें येऊन तात्यासाहेब यांनीं सकाळीं सुमारें ८ वाजतां श्रीसोन्यामारुती-मंदिरांतील घंटा वाजवून सत्याग्रह केला. सब-इन्स्पेक्टर मीर ग्यासुद्दीन यांना विचारून हुकूम अन्याय्य आहे व तो मी मोडणार आहें असें त्यांस सांगून त्यांनीं घंटा वाजविली व एक प्रदक्षिणा घातली. पोलिसांनीं त्यांना अटक केली व फरासखान्यांत नेलें. मी श्रीसोन्यामारुतीचा पंच म्हणून देवालयासन्निध सत्याग्रह चालू असतांना हजर असे. तात्यासाहेब यांनीं सत्याग्रह केल्यानंतर मी त्यांना हार घालूं लागलों; परंतु तो त्यांनीं श्रीमारुतीस घालावयास सांगितला. तात्यासाहेब यांनीं त्या वेळीं तेथें जें भाषण केलें तें त्यांचे मनोविचार दर्शविणारें आहे. ते म्हणाले, " मी शांत वृत्तीचा मनुष्य आहें; परंतु डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटचा हा हुकूम मानणें म्हणजे मी मनुष्य नाहीं असें सिद्ध करण्यासारखें आहे. हा हुकूम मोडून माझ्याजवळ माणुसकी आहे एवढेंच मीं सिद्ध केलें आहें. " या सत्याग्रहाची वार्ता तात्यासाहेब यांनीं आपल्या घरीं कोणालाहि कळविली नव्हती. सत्याग्रहास जाण्यापूर्वी मात्र त्यांनीं श्री. अण्णासाहेब भोपटकर यांना एक पत्र लिहून ती कळविली होती. त्या पत्रांतील महत्त्वाचा कांहीं भाग पुढें देत आहें. " I consider that there can be no worse tyranny of official unreason and special animus against

Hindus than the special and scandalous order of the District Magistrate. And scornful and contemptuous defiance of that order can be the only answer to it from a self-respecting Hindu citizan, however mild he may be in temperament." पुढे ते लिहितात, "मी घंटा वाजविण्यास जातों आणि तिला म्हणतों :- "Tinkle tinkle little bell and let the Order go to Hell."

वरील पत्रांतील मजकुरावरून हिंदूंच्या न्याय्य हक्काबद्दल तात्यासाहेब यांना किती तळमळ असे हें दिसून येतें.



रामकृष्ण नारायण फडणीस

(संपादक, काव्यरत्नावली, जळगांव, पूर्वखानदेश)

सन १९१६ सालची गोष्ट. त्या वर्षीची काँग्रेस लखनौला भरावयाची होती. त्या वेळीं जी काँग्रेस-स्पेशल निघाली तिनें लोकमान्य टिळक जाणार आहेत असें आम्हां विद्यार्थिवर्गास समजलें. लोकमान्यांस समक्ष पाहण्याची आमची इच्छा अत्यंत अनिवार झाली; परंतु स्पेशल ट्रेन जळगांवास न थांबतां, भुसावळ येथें थांबणार होती, म्हणून आम्ही सर्वजण आधींच्या गाडीनें भुसावळला जाऊन थांबलों. एक तासानें काँग्रेस-स्पेशल तेथें आली. लोकमान्यांना हार घालण्याकरितां, भेटण्याकरितां व दर्शनाकरितां प्लॅटफार्मवर व छपरावर देखील इतकी मनस्वी गर्दी झाली होती कीं, पुष्कळांना लोकमान्यांचें नुसतें दर्शनसुद्धां झालें नाहीं. अशा गर्दीत माझ्यासारख्या ठेंगू विद्यार्थ्याला दर्शन होणें म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखेंच अशक्य होतें. थोड्या वेळानें लोकमान्यांचा जयघोष करीत गर्दीची जी एक जोरदार लाट उसळली तीबरोबर मी जो लांब ढकललों गेलों तो दोन डबे पुढें निघून गेलों व टोपीहि हरवली गेली! मी ज्या डब्याजवळ उभा होतों त्यांत तात्यासाहेब केळकर वर्तमानपत्र वाचीत होते. मी त्यांच्याकडेच मोठ्या कुतूहलानें पहात उभा राहिलों. थोड्या वेळानें तात्यासाहेबांचें लक्ष खिडकीकडे गेलें. मी तेथें आशाळभुतासारखा उभा होतोंच. मला पाहून ते म्हणाले, "अरे बाळ! टिळक मागच्या डब्यांत आहेत. इथें काय पाहतोस!" त्यानंतर मी म्हणालों, "तेथें गर्दी फार आहे. मीं उंच नसल्यामुळें मला टिळकांचें दर्शनसुद्धां होऊं शकत नाहीं." असें मीं म्हटल्यानंतर त्यांना काय वाटलें कोणास ठाऊक, ते एकदम उठले आणि डब्याचें दार उघडून त्यांनीं मला आंत घेतलें व माझा हात धरून खालीं उतरवून लोकमान्यांच्या डब्यांत मागील दारानें मला चढवून दिलें. अर्थात् प्लॅटफार्मवरील लोकांपेक्षां फारच जवळून, चांगल्या तऱ्हेनें

व पुष्कळ वेळ गाडी सुटेपर्यंत मला लोकमान्यांचें दर्शन घेतां आलें, व मनाची तृप्ति झाली. गाडीची शिटी झाल्यानंतर मी लागलीच उडी मारून उतरलों. आपण डब्यांत चढविलेला मुलगा उतरला किंवा नाही हें मात्र खिडकींतून डोकावून पाहण्यास तात्यासाहेब विसरले नाहींत. गाडी चालूं होतांच ह्या सुवर्णसंधीचा लाभ करून देणाऱ्या माझ्या उपकारकर्त्यास मीं नमस्कार केला व त्यांचे आभार मानीत परतलों.



पुरुषोत्तम विश्वामराव डावरे

(वकील, चिटणीस, म. प्रां. वर्णाश्रम स्वराज्यसंघ, पुणें)

(१) १९४० साल असावे. पुण्यांतील "वेदशास्त्रोत्तेजक सभा" या जुन्या व सधन संस्थेमध्यें दोन पक्षांत कांहीं तात्त्विक वाद संस्थेच्या भावी धोरणाबाबत व घटनेबाबत निर्माण झाला होता. दोन तीन सभा होऊन वाद मिटण्याऐवजी तो विकोपासच गेला. अखेर निर्णयात्मक ठरावासाठी सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत तात्यासाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली. मुद्द्याचे प्रश्न निघतांच शाब्दिक रणधुमाळी सुरू झाली व ती शब्दाशब्दी मारामारीचें रूप धारण करणार असें वाटूं लागलें. इतक्यांत अध्यक्ष तात्यासाहेब यांनीं बोलणाऱ्या वक्त्यास बोलणें थांबविण्यास सुचाविलें व स्वतः त्यांनींच भाषण सुरू केलें. जमलेली मंडळी विद्वान, अभ्यासू, तत्त्वनिष्ठ व कायदेतज्ज्ञ, तसेंच वादविषयहि कठीण, तशांतच मारामारीपर्यंत मजल आलेली. अशा वेळीं सभा जिंकणें म्हणजे अतिकठीण गोष्ट; पण तशाहि अवघड प्रसंगीं तात्यासाहेब यांनी घटनेवर व वादविषयावर सुंदर व परिणामकारक भाषण केलें व दोन्हीहि पक्षांस मोठ्या धोरणीपणानें आपल्या काबूंत राखलें. भाषणाच्या शेवटीं "आपण मला पंच नेमल्यास मी निर्णय देऊं शकेन व सर्वांचें समाधान करूं शकेन" अशी ग्वाही त्यांनीं दिली; आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, भांडणाऱ्या दोन्हीहि पक्षांनी तात्यासाहेब यांची सूचना एकमतानें मंजूर केली; इतकेंच नव्हे तर आणखी दोन पंच निर्णय करण्यास मदत करण्यासाठीं त्यांच्या पसंतीप्रमाणें घेण्याचा अधिकारहि त्यांनाच दिला! अशारीतीनें मारामारी टाळून गुण्यागोविंदानें तात्यासाहेबांनी सभा संपविली. केवढी जबर समन्वयशक्ति, किती सूक्ष्म घटनापटुत्व व लोकांना आकर्षित करण्याची कोणत्या दर्जाची त्यांची मानसिक उंची, असा विचार माझ्या मनांत उचंबळून आला.

(२) महाराष्ट्रांतील संस्कृत भाषातज्ज्ञ महामहोपाध्याय पंडित वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांच्या सन्मानाचा समारंभ सुमारे १० वर्षांपूर्वी फर्ग्युसन कॉलेजच्या ॲंफीथिएटरमध्यें झाला. सदर प्रसंगीं तात्यासाहेब व पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर

प्रभृतींची भाषणें झालीं. तात्यासाहेब यांचें भाषण फारच मार्मिक व ठसावदार झालें. त्यांनीं संस्कृत व इंग्रजी भाषेस सुंदर व समर्पक उपमा उपयोगांत आणिली व तीच विशद करून सांगितली. संस्कृत भाषेला त्यांनीं शालीन व जुन्या खानदानीच्या कुलस्त्रीची उपमा दिली, तर इंग्रजी भाषेस आधुनिक कॉलेज तरुणीची उपमा दिली, व मोठ्या आकर्षक व विनोदी भाषेंत त्याच उपमेच्या अंगोपांगांचें खुलवून वर्णन करून संस्कृत भाषेचें श्रेष्ठत्व पटवून दिलें. ही उपमा मला इतकी मनोरम वाटली की, तीवरूनच मजला तात्यासाहेबांचें समग्र वाङ्मय वाचावेंसें वाटलें व तें वाचीत असतां असें समजून आले की, उपमा हा अलंकार तात्यासाहेब यांचा हुकुमाचा पत्ता असून, त्यांच्या लिखाणांत उपमा या भाषालंकारास कोहिनूर हिऱ्याचें स्थान आहे.

❋

यशवंत व्यंकटेश देशपांडे

(बी. ए., एलएलू. बी., वकील, कराड)

मी सन १९१७ ते २२ पर्यंत सातारा येथें वकीली करीत होतों. त्या वेळी लो. टिळकांची साताऱ्यास ज्युबिली झाली. ते तेथें आले होते. त्यांना पान-सुपारी करणारांच्या यादींत माझें नांव दिलेलें होतें. पानसुपारीची वेळ सायंकाळीं साडे पांच वाजण्याची होती. पानसुपाऱ्या घेत घेत लोकमान्यांची स्वारी मांझ्या दारावर साडेसहा वाजतां आली व साडे-सहा वाजतां तर थिएटरमध्यें त्यांचा सार्वजनिक समारंभ होता. लोकमान्यांची मोटार पाहतांच मीं पुढें होऊन हात जोडून चला म्हणून विनंती केली. लोकमान्य म्हणाले, फार उशीर झाला, आतां पानसुपाऱ्या घेणें बंद ! एक मिनिट यावें असा मीं आग्रह धरला, पण येईनात. ते व मीं दोघेंहि चिडलों. ते म्हणाले मी येणार नाहीं. मी जाऊं देणार नाहीं म्हणून मोटारीपुढे आडवा उभा राहून, दहा मिनिटें मोटार मीं आडवली ! लोकमान्यांच्या शेजारीं मोटारींत तात्यासाहेब अगदीं प्रसन्न चित्तानें हंसत हंसत त्यांस म्हणाले " अहो, भांडणांत तुम्हीं दहा मिनिटें घालविलींत. एवढ्या वेळांत तीनदां पानसुपारी तुम्ही घेऊन आलांसुद्धां असतां ! "

या बोलण्याची छाप व पद्धति अशी कांहीं सहजसुंदर व परिणामकारक होती कीं, चटकन लोकमान्य एका सेकंदांत अगदीं मुकाट्यानें उठले, माडीवर आले व स्वस्थपणें पानसुपारी घेऊन गेले. तात्यासाहेबांचें वजन व पुण्याई जबर हेंच खरें !

❋

गो. रा. बाळ

('नवाकाळ'चे बातमीदार, पुणें)

हिंदुस्थानांत सायमन कमिशन येणार होतें, त्या वेळीं त्या कमिशनच्या विरुद्ध हिंदुस्थानांत "सायमन गो बॅक" या घोषणांनी बहिष्काराचा चळवळ सर्व पक्षांनी सुरू केली होती. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतहि सायमन कमिशनच्या बहिष्काराची चळवळ जोमानें करण्यासाठी एक सर्वपक्षीय दौरा मुकर करण्यांत आला. त्या दौऱ्यांत तात्यासाहेब, अण्णासाहेब परांजपे, वासुकाका जोशी, बाबुराव फुले, हरिभाऊ तुळपुळे, पाषाणकर ही सर्वपक्षीय मंडळी होती. त्या दौऱ्याबरोबर अंतुकाका फडणीस आणि 'नवाकाळ'चा बातमीदार म्हणून मी गेलों होतों. या पुढाऱ्यांपैकीं वासुकाका आणि अण्णासाहेब हे माझ्या पूर्ण परिचयाचें होते; पण केळकरांचा व माझा तसा परिचय नव्हता. मी त्यांच्या विरुद्ध पक्षांतील वृत्तपत्राचा वार्ताहर होतों. या दौऱ्यासाठीं एक मोटार लॉरी ठरविण्यांत आली होती. त्या लॉरीतून हा दौरा सर्व महाराष्ट्रभर जाऊन आला. या पुढाऱ्यांच्याबरोबर लॉरींत बसण्याचा मला संकोच वाटूं लागला, हें तात्यासाहेबांच्या निदर्शनास आलें; त्या वेळी तात्यासाहेबांनी अंतुकाका यांना बोलावून सांगितलें कीं, बाळ यांना सांगा की, संकोच वाटूं देऊं नका. अंतुकाकांनी मला हें सांगितलें, त्यामुळें मला थोडा धीर वाटूं लागला. तात्यासाहेब आणि अण्णासाहेब परांजपे महाराष्ट्रांत त्या वेळीं असलेल्या परस्पर विरुद्ध फेर-नाफेर पक्षांचे अध्वर्यु होते. हे दोघेहि एकमेकांच्या पक्षांवर 'अहिरावण-महिरावण" प्रमाणें तुटून पडत असलेले त्यांच्या जाहीर व्याख्यानांच्या वेळीं श्रोत्यांना स्पष्ट दिसून येत होतें. त्यांची होणारीं व्याख्यानें ऐकून आणि वाचून जरी हे "सुंदोपसुंद" असें वाटत असलें तरी हे दोघेहि एकत्र बसले असतांना त्यांच्या आपुलकीच्या भाषणानें ते जिवलग स्नेही आहेत, असेंच मला त्यांच्या मोटारींतील गप्पागोष्टीवरून व हास्यविनोदावरून वाटलें. या पुढाऱ्यांपुढें त्या वेळीं "सायमन कमिशन बहिष्कार" हा एकच विषय होता. या दौऱ्यांत फेर-नाफेर हें राजकारण ही मंडळी विसरून गेलेली मला दिसली. या दौऱ्यामध्यें तात्यासाहेब आपल्या विनोदपूर्ण भाषणांत इंग्रजांच्या राहणीचा तिटकारा व त्यांच्याविषयीं द्वेषभावना उत्पन्न करीत. या दौऱ्याच्या वेळीं तात्यासाहेबांच्या स्वभावांतील निरनिराळे कप्पे मला कळून आले. त्यांचा स्वभाव अत्यंत हळुवार असल्याचें आणि त्यांच्याजवळ लहान-मोठा हा भेदाभेद नसल्याचें मला समजलें. मी त्यांच्या विरुद्ध पक्षांतील वृत्तपत्राचा वार्ताहर होतों, तरी त्यांनीं माझ्याबद्दल आपुलकीच्या भावनेनें वागणूक ठेवली होती, हें मी कधींच विसरणार नाहीं. आपल्यापेक्षां लहान दर्जाचा मनुष्य असला तरी त्याला आपल्याबरोबर बरोबरीच्या नात्यानें वागविण्याचा त्यांचा गुण पुढाऱ्यांनीं घेण्यासारखा आहे. ते नेहमीं मला म्हणत कीं, वार्ताहरांबद्दल मला अभिमान आहे.

मीं हें काम केलेलें आहे व हल्लींहि वेळप्रसंगीं करीत असतों. एवंच, तात्यासाहेबांनीं माझ्याबद्दल या दोन्यांत विशेष काळजी व विचारपूस, परिचय नसतांनाहि केली !

❋

दामोदर गोविंद साठ्ये

(हुंडीवाले साठ्ये, पुणें)

(१) आमचे वडील गोविंद काशिनाथ साठ्ये हे हयात असतांना सन १९२३ सालीं आमच्या घराण्यावर कांहीं प्रसंग गुदरला, म्हणून आमच्या खानदानी घराण्याकडे लक्ष देऊन आर्थिक मदतीकरितां तात्यासाहेब त्यांनीं एका संस्थानिकास पत्र दिलें. नंतर सन १९२८ मध्यें आमचा वाडा व १९३० सालांत आमचे वडील मातोश्री गेल्यामुळें आम्ही पोरके झालों; अशा अन्धःकारमय परिस्थितींत त्यांस विनंती करण्यांत आल्यावरून त्यांनीं दुसरें पत्र मुंबईतील एका बॅरोनेटास देऊन आम्हांस बहुत उपकृत करून त्यांनीं आमच्या घराण्यास एका महान् बिकट परिस्थितींतून पार पडण्यास मोठाच हात दिला, तो आम्ही जिवंत आहोंत तोंपर्यंत तरी विसरणार नाहीं; कारण इतके त्या पत्रानें आमचेवर उपकार झालेले आहेत.

(२) लोकमान्य हयात असतां आमच्या घराण्यावर कांहीं आपत्ति आली. तिच्या निवारणाकरितां आमचे वडील व चुलते लोकमान्यांकडे जाऊन त्यांनीं त्यांस मदत मागितली. अर्थात् ही मदत द्रव्यरूपाची नसून कांहीं विशिष्ट लोकांना शिफारशीचीं पत्रें मागण्याबाबत होती. तेव्हां लोकमान्य त्यांस म्हणाले, "मजकडून हटकून काम होण्यासारखें असतें तर मींच पत्रें दिलीं असतीं. परंतु माझ्या पत्रांचा उपयोग न होतां दुरुपयोग मात्र होईल ! करितां आमच्या तात्यासाहेब यांच्याकडून तीं पत्रें घ्या. ते अवश्य देतील व त्यांचा उपयोगहि होईल." त्याप्रमाणें तात्यासाहेबांस विनंती करण्यांत आली व त्यांनीं उदार मनानें पत्रें दिलीं; पण, आश्चर्याची गोष्ट अशी कीं, पत्रांतील मुख्य मजकूर टाईपराईट करून ज्यास पत्रें द्यावयाची ती जागा त्यांनीं कोरी ठेवून पत्राखालीं सह्या केल्या, व सांगितलें कीं, "तुम्हांस वाटेल त्यास हीं पत्रें पाठवा. हीं संपलीं तर पुन्हां अशींच देईन !" केवढा हा परोपकार व औदार्य !

❋

नारायण दामोदर देवधेकर

(बी. ए., एलएल. बी., वकील, उंबरगांव, ठाणें)

(१) दुसरी ठाणें जिल्हा परिषद डहाणू येथें भरली; त्या परिषदेसाठीं लो. टिळकांना आग्रहाचें निमंत्रण गेलें होतें. त्यांच्याकडून लिहून आलें कीं, मला वेळ

नसल्यामुळें केळकरांना मी पाठवून देतों; त्याप्रमाणें तात्यासाहेब आले. परिषदेचे अध्यक्ष सातारचे कै. दादासाहेब करंदीकर होते. त्यांच्याबरोबरच तात्यासाहेबांची उतरण्याची व्यवस्था श्री. जम्नादास मेहता यांच्या बंगल्यावर केली होती. जम्नादासांनीं या थोर महाराष्ट्राच्या पाहुण्यांना कांहीं कमी पडूं नये अशी व्यवस्था केली होती. तात्यासाहेबांना दुपारचे भोजन झाल्याबरोबर वामकुक्षीची संवय होती, त्यांनीं स्वतःच आपली प्रवासाची वळकटी सोडली. सतरंजी काढून झटकली व वऱ्हांड्यांतच ती अंथरून तींवरच ते पडले. हे पाहून घाईघाईनें स्वयंसेवक गादी वगैरे मोठा बिछाना घेऊन आले. जम्नादासांनी तर त्यांना दिवाणखान्यांत पलंगावर निजण्याचा आग्रह केला; पण तात्यासाहेबांनीं "अहो, मला जरा वेळच पडावयाचें आहे, पलंग-बिछाना वगैरे कांहीं नको. येथेंच छान वारा येतो आहे", असें सांगून डोळे मिटून डुलकी घेण्यास सुरुवात केली. त्यांची उच्च विचारसरणी व साधी राहणी यांचा तेथें सर्वांवरच फार परिणाम झाला.

(२) अहमदाबादच्या काँग्रेसनंतर (१९२१) वकिली सोडावी वगैरे गांधीच्या प्रचाराचा परिणाम होऊन एक वर्ष तरी वकिली सोडली नाहीं तर आपण आपल्या कर्तव्यांत कसूर केली असें होईल, अशी तळमळ माझ्या मनास लागून मी बेचैन झालों. सल्ला घेण्यास घरी कोणी वडील मंडळी नव्हती, तेव्हां तात्यासाहेबांना मी मुद्दाम भेटलों. माझ्या मनाची तळमळ सांगितली; व सल्ला विचारला. तेव्हां ते म्हणाले, "देवधेकर! होय, तुमच्या मनाची तळमळ मी ओळखतों. देशासाठी स्वार्थत्यागानें कार्य करण्यास कोणी पुढें आल्यास त्याची मी वहावाच करीन; पण एक वर्षांत स्वराज्य वगैरेंत कांहीं अर्थ नाहीं. ज्या तळमळीनें तुम्ही हें काम करूं इच्छितां त्यांतून लवकर मुक्तता तर होणार नाहींच, पण तुम्ही अधिकाधिकच त्यांत गुरफटाल; म्हणून म्हणतों, आणखी दोन महिने तुम्ही शांतपणें विचार करा व त्यानंतरहि वकिली सोडण्याचाच निश्चय कायम राहिला तर सगळ वकिली सोडा व कामाला लागा. मात्र एक सांगतों, ते आज न पटलें तरी पक्कें लक्षांत ठेवा: 'गांधीचें हे असेंच चालूं राहिलें तर आपल्याला म्हणजे टिळकानुयायांना केव्हांतरी काँग्रेसमधून बाहेर पडावें लागेल; त्याला तयार राहा म्हणजे झालें.' नंतर मीं वकिली सोडली; ती पुनः कधींच सुरू केली नाहीं. तात्यासाहेबांची कळकळीची व अचूक सल्लयाची योग्यता आजतरी कोणास सांगावयास नको.

❋

ग. द. दातार

(बी. ए., मुंबई)

(१) टिळक-चरित्राचें लेखन निर्वेधपणें करण्यासाठीं तात्यासाहेब कांहीं

दिवस यवत येथें जाऊन राहिले होते. या कामासाठीं अनेक संदर्भग्रंथ व वर्तमान-पत्रांच्या जुन्या फाइली तेथें नेण्यांत आल्या होत्या. त्यांतील जरूर ते संदर्भ, तारखा व माहिती नजरेखालीं घालून मग हॉलमध्यें येरझारा घालतां घालतां तोंडानें मजकूर सांगावयाचा असा त्यांचा क्रम असे. त्यांचा मजकूर सांगण्याचा ओघ अस्खलित चाललेला असे; फक्त लिहून घ्यावयालाच काय वेळ लागेल तेवढाच खंड पडावयाचा. दोन तास लिहिणें झाल्यावर त्यांनीं सांगितलेल्या मजकुरांतील संदर्भ वगैरे पडताळून पाहावयाचे असा क्रम होता व क्वचितच त्यांत चूक आढळावयाची. एक दिवस मीं त्यांना विचारलें कीं, येवढ्या गोष्टी तुमच्या बरोबर स्मरणांत कशा राहतात ? तेव्हां ते म्हणाले कीं, "इतर अनेक गोष्टींप्रमाणें स्मरणशक्ति हीसुद्धां कमवावी लागते व त्यासाठीं निश्चयपूर्वक प्रयत्नांची जरुरी असते. तथापि अभ्यासानें सर्व कांहीं साध्य होतें."

(२) टिळक महाविद्यालयाचें कार्य सुरू होऊन जवळजवळ एक वर्ष होत आलें होतें. वर्ग भरण्याच्या जागेचीच अडचण असे. शिकविणारेहि वेळ मिळेल तसें शिकवायला येत. अशा स्थितींत विद्यार्थ्यांच्या मनाची स्थिति थोडीशी त्रस्त व्हावी हें सहाजिक होतें. एके दिवशीं तात्यासाहेब वर्गामध्यें महाविद्यालयाच्या कार्याबाबत कोणाच्या कांहीं सूचना अगर तक्रारी आहेत कां असें विचारीत होते. त्या वेळीं विद्यार्थिसुलभ आवेशानें मी म्हणालों कीं, "येथील आम्हां विद्यार्थ्यांची स्थिति प्रयोगशाळेंतील बेडकासारखी झालेली आहे ! जो येतो तो आपला शस्त्र चालवतो. त्यानेच शास्त्रीय ज्ञानांत कदाचित भर पडणारी असली तरी त्यांत बेडकाचा काय फायदा हें कांहीं कळत नाहीं." हे शब्द तात्यासाहेबांना लागल्यासारखें दिसलें. त्यांचा कंठ सद्गदित झाला व ते म्हणाले कीं, "तुम्हां मुलांना मी बेडकासारखा कसा समजेन ? तुम्ही कोणत्या भावनेने येथें आलां आहांत याची मला जाणीव आहे; पण आम्हां कार्यकर्त्यांमध्यें जी शिस्त व जो एकसूत्रीपणा असावयास पाहिजे तो नसल्यामुळें परिस्थिति अशी आहे. पण ती शक्य तितक्या लवकर सुधारावी म्हणून माझे प्रयत्न चालूं राहतील येवढें मात्र मी तुम्हांला आश्वासन देतों."

एकदा एका गोष्टींत तात्यासाहेबांशीं माझा मतभेद झाला. त्यांचें म्हणणें मला पटेना व माझें म्हणणें त्यांना पटेना. यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांची माझी गांठ पडल्यावर ते म्हणाले कीं, "विचारांतीं तुझें त्या दिवसाचें म्हणणें बरोबर होतें असें मला मागाहून वाटूं लागलें." त्यांच्या मनाचा हा प्रांजलपणा व ही ऋजुता पाहून आपलें म्हणणें बरोबर असल्याचा माझा अभिमान पार नाहींसा झाला !

❋

रामचंद्र चिंतामण श्रीखंडे

(कॅप्टन, एम्. बी. बी. एस्., डॉक्टर, कोल्हापूर)

(१) तात्यासाहेब यांच्याविषयीं आदरभाव माझ्या मनांत माझ्या विद्यार्थी-दशेपासूनच वसत आहे. माझें 'सुश्लोक गोविंद' (प्राकृत गीतगोविंद) हस्तलिखितांत होतें तेव्हांच (१९२३ सालीं) मीं तें तात्यासाहेबांच्या अवलोकनांत आणवलें व मला त्यांच्याकडून एक त्रोटक पण उत्तेजनपर चांगला अभिप्राय पत्रद्वारां आला. पण पुढे ११ वर्षांनीं तो ग्रंथ मी प्रसिद्ध करूं शकलों. तसेंच १९४० मध्येंहि माझ्या 'सुश्लोक कुमार' (प्राकृत कुमारसंभव) काव्यास अभिप्रायदर्शक मोठेंच गौरववर पत्र त्यांनीं पाठविलें. म्हणूनच मला त्यांच्याविषयीं अत्यादरानें म्हणावेंसें वाटतें कीं–

भो वाङ्मयाभिधसरोवरचारुहंस । हे हृदभूमिगगनाङ्गणपूर्णचंद्र ॥
विद्यावतंस नररत्न धियां समुद्र । वंदे नृसिंह भवदीयपदाब्जयुग्मम् ॥

(२) १९४० च्या मे महिन्यांत शारदोपासक संमेलन-प्रसंगीं मीं तात्यासाहेबांची गांठ घेतली व त्यांच्या अनुज्ञेनें 'पुष्करणी' बंगल्यांत त्यांच्या भेटीस ३० मे रोजीं दुपारीं गेलों. त्याच वेळीं विख्यात साहित्यिक खांडेकर व शारदोपासक संमेलनाचे अध्यक्ष माडखोलकर ही मंडळी तेथें तात्यासाहेबांच्या भेटीस आली. तात्यासाहेबांनीं सर्वांचें खालच्या खोलींतच स्वागत केलें; व अगदीं खेळीमेळीनें पुष्कळ विषयांवर अनेक गप्पा झाल्या. नंतर खांडेकर-माडखोलकर मंडळी गेल्यावर तात्यासाहेबांशीं मी कांहीं वेळ बोलत बसलों होतों. 'सुश्लोक कुमार'च्या माझ्या प्रस्तावनेंत कालिदासाच्या दोन महाकाव्यांचें पौर्वापर्य ठरविण्याच्या बाबतीत 'रघुवंश' हा 'कुमारसंभवा'च्यापेक्षां आधींचा असावा असें मला कां म्हणावेसें वाटतें, याची मीं जी चर्चा केली आहे तीविषयीं तात्यासाहेब यांचें मत मीं अजमावण्याचा प्रयत्न केला. मीं सांगितलेलीं कारणेंच विचारांत घेऊन कुमारसंभवच आधींचा असावा असेंहि अनुमान काढतां येईल, असें तात्यासाहेबांचें मत दिसलें. नंतर तात्यासाहेबांनीं आपली आठवण – प्रसाद – म्हणून मला आपले तीन ग्रंथ 'डॉ. श्रीखंडे यांस मित्र-भेट' असें लिहून सही करून दिले !

(३) करवीर नगरवाचनमंदिराचा एक मोठा समारंभ येथें झाला. त्यास रा. ब. चिं. वि. वैद्य, ह. भ. प. पांगारकर, श्री. वा. म. जोशी व तात्यासाहेब हीं महाराष्ट्रांतील विद्वद्रत्नें आलीं होतीं. सर्वांचींच व्याख्यानें उत्कृष्ट व उद्बोधक अशीं झालीं. मात्र तात्यासाहेब यांच्या व्याख्यानप्रसंगीं राजाराम कॉलेज हॉलच्या गॅलरींतून एका विद्यार्थ्यानें व्यासपीठाकडे अंडीं फेकलीं ! व्याख्यान ऐन रंगांत आलें होतें व एकदम असा प्रकार झाल्यामुळें श्रोतृवृंद अगदीं क्षुब्ध झाला.

तथापि तात्यासाहेब अगदीं शांत होते व त्यांनीं त्या विद्यार्थ्यांसहि कांहीं शिक्षा होऊं नये असें मत दिल्याचें कळलें ! या अनपेक्षित प्रकारामुळें तात्यासाहेबांचें व्याख्यान अविस्मरणीय असेंच झालें. तसेंच त्याच रात्रीं 'विद्यापीठां'त वामनरावजींचें व्याख्यान तात्यासाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. तोहि प्रसंग लक्षांत राहण्यासारखाच झाला. शेवटीं आभार मानतेवेळीं व्यवस्थापकांनीं कांहीं बोचक उद्गार काढले. त्या वेळीं मात्र अध्यक्ष तात्यासाहेब अगदीं खवळून गेले व त्यांनीं हार घालून घेण्याचें साफ नाकारलें ! व्यवस्थापकांस त्यांची क्षमा मागून त्यांना शांत करतांना अगदी पुरेवाट झाली.



कल्याणराव अंबेवाडीकर

(बाभूळखेडा, नागपूर)

१९३१ साल. दांडीमार्च सुरू झाला होता. चळवळीचा वन्हि सर्वत्र चेतवला जात होता. याचवेळीं शनवार वाड्यासमोर सभा घेतली गेली होती. आणि असेंहि प्रसिद्ध झालें होतें कीं, तात्यासाहेब या सभेंत बोलणार आहेत. सभेस प्रारंभ झाला. कम्युनिस्ट फडके यांनी सभा सुरू झाल्याची सूचना दिली. अध्यक्षांचें नांव सुचवलें गेलें. दुजोरा देण्यासाठी एक गृहस्थ उभे राहिले. त्यांनीं तात्यासाहेबांना (कुत्सितपणें) गांधीटोपीचा आहेर दिला ! टाळ्यांचा एकच कडकडाट झाला. तात्यासाहेब बोलावयास उभे राहिले. ते आपल्या भाषणांत म्हणाले, " ज्या गृहस्थांनीं मला हा आहेर दिला, तो मी त्यांची आठवण म्हणून जपून ठेवीन ! त्यांच्या विनंतीप्रमाणें हा 'आहेर' असल्याकारणाने मला रोज वापरतां येणार नाही ! पण हा मी जपून ठेवीन. आहेर फक्त जपूनच ठेवावयाचा असतो ! " टाळ्यांचा प्रचंड कडकडाट ! !



वि. त्र्यं. गर्दे

(एम्. ए., पुणें)

सन १९३६ साली तात्यासाहेब यांनीं माझ्या एका चित्रपटकथेवर स्वतःचा लेखी अभिप्राय मला दिला होता. मध्यंतरीं दहा वर्षांच्या काळांत त्यांना प्रत्यक्ष भेटण्याचा मला योग आला नव्हता. दहा वर्षांसारख्या प्रदीर्घ कालांत त्यांना इतर कित्येक लोक भेटले असतील नि कित्येक इतर पुस्तकांवर त्यांनीं अभिप्राय पण दिले असतील. तथापि पहिल्या भेटीनंतर, कमींत कमी दहा वर्षांनीं, म्हणजे १९४६ सालांत मी त्यांच्याकडे एक प्रशस्तीपत्र मागावयास गेलों असतां, त्यांनीं दहा

वर्षांपूर्वीच्या आपल्या अभिप्रायाची मला आठवण करून दिली ! पंचाहत्तर वर्षांच्या केळकरांची ही तीव्र स्मरणशक्ति पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला.



शांताराम आ. सबनीस

:(बी. ए., एलएल्. बी., सॉलिसिटर, मुंबई)

(१) १९३२ सालीं " महाराष्ट्र रत्नावलि " या नांवानें श्रीहर्ष कवीच्या संस्कृत "रत्नावलि" या नाटकाचें मराठींत समश्लोकी भाषांतर मीं प्रसिद्ध केलें व त्याची एक प्रत केळकर यांच्याकडे अभिप्रायासाठीं पाठविली. त्या पुस्तकाचा त्यांनीं फार गौरव करून " आजवर जी संस्कृत काव्याचीं मराठींत भाषांतरें झालीं त्यांच्याइतकें किंबहुना त्यापेक्षांहि सरस असें आपलें भाषान्तर झालें आहे ", असा अभिप्राय दिला. त्यानतर १९३८ सालीं माझें संस्कृत "मेघदूत" काव्याचें समवृत्त व समश्लोकी मराठी भाषांतर परीक्षणासाठीं त्यांच्याकडे पाठविलें. त्या पुस्तकास त्यांनीं मार्मिक व विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहिली आहे. या वेळपर्यंत त्यांची माझी प्रत्यक्ष भेटहि झाली नव्हती.

(२) माझ्या 'मेघदूताच्या' मराठी भाषांतराचा उल्लेख वर आलाच आहे. त्यासंबंधींच्या एका घटनेचा उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. या ग्रंथाला तात्यासाहेबांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत (हिला त्यांनीं 'अभिनंदन' हा मथळा दिला आहे) गुणविशेषांचा मोकळ्या मनानें गौरव केल्यानंतर कांहीं दोषस्थळेंहि दाखविलीं आहेत. या दोषस्थळांबद्दल माझा त्यांच्याशीं प्रामाणिक मतभेद झाला, तें मीं त्यांस नम्रपणें कळविलें. त्यांनी मतभेदाचीं कारणें लिहून कळविण्याची सूचना केल्यावरून मीं उत्तरीं सविस्तर खुलासा केला. या माझ्या पत्राला जें त्यांचें उत्तर आलें, त्यांतील मजुकरानें त्यांच्या थोर, निगर्वी, परमतसहिष्णु स्वभावाची पूर्ण साक्ष पटते. त्या पत्रांत त्यांनीं लिहिलें होतें, " माझीं मतें म्हणजे कांहीं वेदवाक्य नव्हे ! आपला खुलासा वाचून आपल्या म्हणण्यांत बरेंच तथ्य आहे असें मला वाटतें. या अडचणींतून दोन मार्ग मला सुचतात; एक तर माझा लेख दुरुस्त करून मीं पुन्हां लिहावा. किंवा तो आहे तसाच ठेवून माझ्या आक्षेपांखालीं टीपा देऊन आपल्या मतभेदाचीं कारणें नमूद करावीं. यांपैकीं कोणता मार्ग आपणांस पसंत आहे तें कळवावें." तात्यासाहेबांसारख्या सज्जनांस पुन्हां तसदी देणें मला पसंत नसल्यामुळें, मीं दुसरा मार्गच पसंत केला आणि दर आक्षेपाखाली टीपा देऊन पुस्तक छापलें.

'बोद्धारो मत्सरग्रस्ताः' हा अनुभव साहित्यक्षेत्रांत नवीन नाहीं; पण शहराच्या उजाड बाळबंदांत सुंदर हिरवळीप्रमाणें वरील नियमास अपवाद अशी तात्या-

साहेबासारखीं थोर मनाचीं माणसें क्वचितच दृष्टीस पडतात. त्यांच्या गाढ्या विद्वत्तेनें व नितांत सौजन्यानें ते अखिल महाराष्ट्रांत अत्यंत लोकप्रिय होऊन राहिले होते.



नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व

(नटसम्राट्, पुणें)

(१) रसिकश्रेष्ठ व नाट्यप्रेमी तात्यासाहेब यांनी अनेक उत्कृष्ट नाटकें लिहिलीं व तीं सर्व रंगभूमीवराहि आलीं; पण त्यांचा माझा योग असा कीं, दोन कंपन्यांत (किर्लोस्कर नाटक कंपनी व गंधर्व नाटक कंपनी) मी प्रमुख असूनहि व मजवर त्यांचा हक्क व लोभ असूनहि कोठेंहि त्यांचें नाटक रंगभूमीवर येऊं शकलें नाहीं व मला त्यांत भूमिका घेण्याचा प्रसंग आला नाहीं हें आश्चर्य व दुर्दैव होय ! तात्यासाहेब यांच्या सर्व नाटकांत मला कृष्णार्जुनयुद्ध हें नाटक फार आवडे; व संगीत आणि नाट्यकृति या दृष्टीनें तें 'स्टेज'ला अतिशय अनुकूल व अनुरूप असल्यामुळें, माझ्या गंधर्व-नाटकमंडळीनें तें रंगभूमीवर करावें अशी माझी फार इच्छा होती. त्याप्रमाणें त्यांना मीं विनंती केली. ती त्यांनी आनंदानें मान्य केली. पण एक अट मात्र घातली. ती अशी कीं, त्या नाटकांतील नारदाची भूमिका मीं स्वतः केली पाहिजे ! कारण, तें संबध नाटक त्या एका पात्राभोंवतीं फिरणारें आहे, त्यावरच तें अवलंबून आहे. पुरुष भूमिका करण्याची ही जोखीम मी पत्करून त्यांची विनंती मीं मान्य केली. पुढे या कामाकरितां ते आमच्या मुक्कामीं येऊं जाऊं लागले. योजना मुकर झाली, पात्रें ठरलीं, नकला सुरू झाल्या व वर्तमानपत्रांतहि याची वाच्यता झाली. पण प्रभुरायाची इच्छा निराळीच होती असेंच म्हटलें पाहिजे ! कारण, त्या वेळीं अशी कांहीं विचित्र घटना घडली कीं, हें काम पुढें चालविणें अशक्य झालें. मला फार वाईट वाटलें, दुःख झालें. तथापि केव्हांतरी तात्यासाहेब यांस हें सांगण्याचें धारिष्ट केलें पाहिजे, असें ठरवून माझे मित्र व तात्यांचे विश्वासनिधि रा. सदाशिराव बापट यांस बरोबर घेऊन मी त्यांच्या घरीं गेलों. त्यांना हें ऐकून अपमान झाल्याबद्दल राग येईल व तसें होणें अगदींच स्वाभाविकहि आहे, असें मी मनांत म्हणतच होतों. पण आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्या थोर व उदार पुरुषानें माझी अडचण शांतपणानें व सहानुभूति-पूर्वक समजावून घेऊन, जणूं याबाबतींत पूर्वी कांहींच घडलें नाहीं असें समजून, त्यांनीं सर्व विसरण्याची मनाची तयारी दाखविली. माझ्याविषयीं गैर-समजूत होऊं दिली नाहीं, राग केला नाहीं, सहानुभूति नाहींशी केली नाहीं, पूर्वीचें नातें व संबंध यांत यत्किंचितहि कडवटपणा किंवा कमीपणा येऊं दिला नाहीं ! लोक म्हणूं लागले कीं, श्री. काकासाहेब खाडीलकर यांनीं मला सांगितलें म्हणून

मी असें केलें. शिव शिव ! लोकांचा हा प्रवाद सर्वस्वी कल्पित व खोटा आहे असें मी तात्यांना सांगितलें. तेव्हां ती स्वारी निश्चयी मुद्रेनें व लाघवी आवाजांत म्हणाली, " आमच्या कृष्णाजीपंतांच्या हातून असली गोष्ट, आणि शिवाय ती माझ्या बाबतींत, कधींहि होणार नाहीं. त्यांचा स्वभाव मी पूर्ण ओळखतों. शिवाय, नारायणराव, तुम्ही सांगतां यावर तर माझा पूर्ण विश्वास आहेच ! "

(२) किर्लोस्कर नाटक मंडळी म्हणजे महाराष्ट्रांतील सर्व नाटक कंपन्यांचें मातृस्थान. नांवालौकिकाला चढून या व्यवसायांत चमकणाऱ्या बहुतेक नटांचा नाट्यजन्म व त्यांचें पहिलें शिक्षण या माहेरघरींच झालें. नाट्यव्यवसायाची ती तपोभूमि होती. नाट्यकलामहर्षि गु. अण्णासाहेब किर्लोस्कर हे तिचे जनक व तिची पाठराखणी लो. टिळकांनीं केलेली, अशी ही किर्लोस्कर नाटक मंडळी १९१३ मध्यें ऐश्वर्याच्या व लोकप्रियतेच्या शिखरावर होती. परंतु दुर्दैव असें कीं, चालक मंडळीमध्यें महत्त्वाच्या बाबतींत तीव्र मतभेद उत्पन्न झाले. वादविवाद विकोपाला जाऊं लागला. नाटकगृहांत होणारें 'मानापमान' कंपनीच्या बिऱ्हाडांत होऊं लागलें ! दोन तट पडले. एका बाजूला कै. शंकरराव मुजुमदार आणि दुसऱ्या बाजूला नटवर्य बोडस, गु. टेंबे आणि स्वतः मी असें होतों. फाटाफूट होणार, त्याशिवाय गत्यंतर नाहीं हें स्पष्ट दिसूं लागलें; पण किर्लोस्कर मंडळींतून फुटून निघून दुसरी 'कंपनी' काढणें हा मार्ग आम्हां मंडळींच्या मनाला रुचत नव्हता. कारण, आमची मातृसंस्था सोडण्याच्या नुसत्या कल्पनेनेंहि आम्हांस कसेसेंच होत होतें.

या दिव्यांतून कसा मार्ग काढावयाचा हा पेच होता. नाट्यकृतींत जसा पेचप्रसंग असतो, तसा नाटक कंपनींतला हा पेचप्रसंग होता. नाटकांतला पेंच अप्रत्यक्ष आणि कृत्रिम, तर हा पेंच प्रत्यक्षांत आमच्या पुढें उभा होता आणि तो सोडवावयाचा होता. पण या दोन तटांतील भांडणें मिटतील अशीं लक्षणें दिसेनात, फाटाफूट अपरिहार्य आहे, असें दिसूं लागलें. त्या वेळीं कंपनी पुणें मुक्कामी होती. पण लोकमान्य त्या वेळीं स्वदेशाकरितां ब्रह्मदेशांत तुरुंगांत गेलेले होते; त्यामुळें अशा बिकट प्रसंगीं त्यांच्या उपदेशाचा उपयोग आम्हांला होण्याची आशा नव्हती, म्हणून स्वाभाविकच आम्ही गुरुवर्य तात्यासाहेब यांच्याकडे गेलों आणि त्यांना दोन्ही पक्षांत समेट करून किर्लोस्कर नाट्यसंस्था अभंग ठेवण्याची खटपट करण्याबद्दल विनंती केली.

समेटप्रिय तात्यांनीं हें अवघड काम आनंदानें आणि उत्साहानें अंगावर घेतलें. दोन्ही तटांतल्या मंडळींशीं चर्चा, विचारविनिमय करण्याला त्यांनीं सुरुवात केली. करारमदार, अटी, मसुदे, ठराव, पुन्हा फेरविचार असें सर्व कांहीं अनेकवार झालें. शेवटीं एक अखेरचा मसुदाहि तयार झाला. त्यासाठीं तात्यांनीं

आपला अमूल्य वेळ खर्ची घातला. निःपक्षपातीपणानें बोजना तयार केली व तिच्या-करितां अतिशय परिश्रमहि घेतले; परंतु खेदाची गोष्ट अशी की, दुर्दैवानें त्यांच्या सारख्यांच्या त्या खटपटीला यश येऊं शकलें नाहीं! प्रभुरायाची इच्छा तशी नव्हती!!

पुढें जेव्हां प्रभुरायाच्या कृपेनें लोकमान्य सुटून परत आले, तेव्हां त्यांच्या दर्शनाला आम्ही गेलों; व सर्व हकीगत त्यांना सांगितली. ती सर्व शांतपणाने ऐकून घेऊन लोकमान्य म्हणाले, "मला आमच्या तात्यासाहेबांकडून तुमची सर्व हकी-कत समजली आहे. ती ऐकून मला फार वाईट वाटलें. तात्यांना या कामीं यश आलें असतें तर मला फार आनंद झाला असता. अशा कामीं तात्यांचा हात यशस्वी होतो असा अनुभव आहे; पण या कामीं तो अयशस्वी कसा झाला याचें मात्र मला नवल वाटतें. त्या वेळेला जर मी मोकळा असतों तर ही गोष्ट मीं केव्हांहि घडूं दिली नसती. परंतु आतां बोलून काय उपयोग?" तात्यासाहेब यांना मध्यस्थी करण्यास विनंती करतांना आमच्यावर केवढी जबाबदारी होती याची कल्पना आम्हांस होती; पण या प्रकरणांत लोकमान्य नसले तरी तात्यासाहेब मध्यस्थ होते, म्हणूनच आमचा माथा उजळ होता हेंच मला नेहमीं मोठें समाधान वाटतें.

❋

वामन मोरेश्वर पोतदार

(बी. ए., एल्एल्. बी., पुणें)

(१) तात्यासाहेब यांचा संबंध 'केसरी' कार्यालयाशी येण्यापूर्वी त्यांची व माझी ओळख होती. त्यांचे सर्वांत वडील बंधु नारायण चिंतामण केळकर हे सन १८८६ च्या सुमारास डेक्कन कॉलेजमध्ये माझे सहाध्यायी होते. त्यांचा व माझा दृढ परिचय होता. ते बी. ए. झाल्यावर शिक्षणखात्यांत सेवक झाले व ठाण्यास हायस्कुलमध्ये शिक्षक असतांना मुंबईस असत. तात्या तेव्हां एल्एल्. बी. च्या टर्मस् भरण्याकरिता मुंबईस होते; त्यामुळें त्यांचा परिचय चांगला झाला. नाना हे फार विनोदी होते व त्यांस आम्ही नाना फडणीस म्हणत असूं, त्या वेळींहि तात्या तरतरीत व हुषार दिसत असत; परंतु ते पुढे सार्थ "नरसिंह" होतील असें त्या वेळीं कोणास वाटले नव्हतें.

(२) लोकमान्य टिळक यांस १८९७ मध्यें शिक्षा झाल्यावर त्यांच्या ला क्लासमध्यें मी शिकविण्यास जात असें. एक दिवस क्लास सुटल्यावर तात्या व मी खिडकीशीं राजकीय परिस्थितीसंबंधानें बोलत होतों. समोर एका ओटयावर एक बिनड्रेसी डिटेक्टिव्ह बसला होता. आपल्या सर्व संभाषणें काम करून तो आमचें भाषण ऐकत होता. तात्यांनीं माझें लक्ष तिकडे वेधिलें व हळूंच विचारलें, "तो

कोण आहे हें तुम्हांस माहीत आहे काय ?" मी म्हटलें "नाहीं". "अहो ! तो डिटेक्टिव्ह आहे; जरा जपून बोला. टिळकांच्या माणसांनीं फार दक्ष व सावध असलें पाहिजे", असें ते म्हणाले.



कार्शीनाथ विष्णु खानविलकर

(हिऱ्या-मोत्यांचे व्यापारी, मुंबई)

(१) मी मुंबईच्या ब्राह्मणसभेचा चिटणीस होतों. सभेच्या श्रीगणपति उत्सवांत रोज एखाद्या नामवंत वक्त्याचें व्याख्यान असावयाचेंच असा जणूं संकेतच ठरून गेला होता. त्यामुळें ब्राह्मणसभेच्या व्याख्यानांच्या या मेजवानींत तात्यासाहेबांचें व्याख्यान असावयाचेंच याची खूणगांठ त्यावेळच्या श्रोत्यांनीं आपल्या मनाशीं बांधलेली असे. आणि ह्या अपेक्षापूर्तीचा आनंद व्याख्यानाच्या आदल्या दिवसापासूनच श्रोते उपभोगीत असत. पण गेल्या दहा-पंधरा वर्षांपासूनच तात्यासाहेबांना वृद्धपणामुळें हे सर्व व्याप सांभाळणें थोडें जिकीरीचें आणि त्रासाचें होऊन बसलें होतें; म्हणून ते मला म्हणाले, "हे पाहा खानविलकर, मला या वर्षी तुम्ही व्याख्यानाची गळ घातली नाहींत तर चालणार नाहीं का ? मला हे सगळे व्याप उरकायचे म्हणजे मोठी जिकीर होते. प्रवासाच्या दगदगीमुळें मला तें कांही तितकेंसें सुखाचें होत नाहीं. तेव्हां या वर्षी तुम्हीं मला सूट दिलींत तर बरें होईल". तात्यासाहेबांनीं आणखी कांहीं सांगण्यापूर्वीच मीं त्यांचें म्हणणें मान्य केलें. आणि त्या वर्षी स्वातंत्र्यवीर सावरकरांचें भाषण ठरवून आलों. परंतु गंमत अशी झाली कीं, सावरकरांचें व्याख्यान ज्या दिवशीं ठरलें होतें त्याच्या आदल्या दिवशींच त्यांचा निरोप आला कीं "प्रकृति बरी नसल्यानें मी उद्यांच्या व्याख्यानास येऊं शकत नाहीं !"

आतां आली का पंचाईत ! व्याख्यान तात्याराव सावरकरांसारख्या गाजलेल्या वक्त्यांचें ठरलेलें होतें. ब्राह्मणसभेचीं तिन्ही सभागृहें भरून लोक अंगणांत आणि पायरस्त्यावर सुद्धां उभे राहून त्यांचें भाषण ऐकणार होते. 'लाऊडस्पीकर' शिवाय भागण्यासारखें नव्हतें आणि सावरकरांच्या वक्तृत्वाच्या जबरदस्त ओघांत श्रोते पिसासारखे हलके हलके होऊन तरंगत जाणार होते, हे सारें स्वप्न मला दिसत होतें आणि तेच सावरकर येणार नसल्याची चिठ्ठी माझ्या हातांत होती ! हें स्वप्न सावरकर नसतांनाहि साकार करणारा, लोकांना नवीन कांहीं तरी सांगणारा, वक्तृत्वानें नाहीं तरी विद्वत्तेनें भारून टाकणारा आणि सावरकरांची उणीव भरून काढून सावरकरांचाच विषय लोकांना प्रतिपादून सांगणारा, केळकरांशिवाय दुसरा कोणीहि वक्ता मला दिसेना.

वेळ अगदी थोडा होता. मी उठलों आणि एकदम बोरीबंदरच गाठलें व पुणें स्टेशनवर उतरलों, तो थेट तात्यासाहेबांच्याच घरीं गेलों. मी आल्याचा निरोप वर पोंचतांच तात्यासाहेबांनी मला वरूनच हांक मारली. व्याख्यानाचा विषय: कसा काढावा या विवंचनेंत मी होतों, तोंच चार-दोन वाक्यें इकडचीं तिकडचीं झाल्यावर तात्यासाहेब हंसत हंसत विनोदानें म्हणाले, "सभेच्या व्याख्यानाला यायचें जमणार नाही असें मी म्हणालों तर तुम्हीं खरोखरीच ब्राह्मणसभेंतून आम्हांला अजिबात वगळून टाकलेंत, अगदीं हद्दपार केलेंत!" विषयाला आयतेंच तोंड सांपडलें म्हणून मी लगेच म्हणालो, "छे, छे, आम्हीं वगळलं नाहीं आपल्याला. आपल्याला वगळून आमचं चालतच नाहीं. आज संध्याकाळच्या व्याख्यानाचं आमंत्रणच करायला आलों आहें मी, तात्यासाहेब!" त्याबरोबर ते चमकून म्हणाले, "म्हणजे काय! बाकी मला वाटलंच होतं कीं, तुम्ही सकाळच्या प्रहरीं इथं आलांत, तेव्हां एखादं असलं पिल्लूं तुमच्या खिशांत असेलच!" मग आमची अडचण समजावून देतांच तात्यासाहेबांनीं मोठ्या आनंदानें मुंबईस येण्याचें कबूल केलें. मी एवढा मुंबईहून पुण्यास आलों; आणि आमची खरोखरीची अडचण त्यांना दिसली व या दोन्ही गोष्टींची त्यांना जाणीव होऊन त्यांच्या भिडस्त स्वभावानें आणि प्रसंगीं हात देण्याच्या वृत्तीमुळें त्यांनीं मुंबईस येण्याची दगदग सोसली. तात्यासाहेब त्या वर्षी येणार नसतांनाहि आल्यामुळें, त्यांच्या व्याख्यानाचा लाभ होणार, याचा अत्यंत हर्ष वाटून श्रोत्यांनीं तात्यासाहेबांचें टाळ्यांच्या गजरांत उत्साहानें स्वागत केलें. आणि आमच्या अपेक्षेप्रमाणेंच त्यांचें त्या वेळचें भाषण झालें. भाषणाच्या सुरुवातीस आपण व्याख्यानाच्या तडाक्यांत कसें सांपडलों याची विनोदपूर्ण हकीकत सांगून श्रोत्यांना त्यांनीं खूप हंसवल्याची मला चांगली आठवण आहे.

(२) वर दिलेल्या या भेटीनंतर थोड्याच दिवसांत हिंदु राष्ट्रीय निधि जमविण्याच्या कामानिमित्त त्यांच्या नि माझ्या भेटीचा पुन्हा योग आला. कार्यकारी मंडळाची सभा भरली होती. आणि त्याच दहावीस लोकांच्या बैठकींत दहा हजारांचा आंकडा पुरा करावयाचा आम्हीं संकल्प केला होता; तात्यासाहेबांनीं पहिल्या तडाक्याला आपला पांचशें रुपयांचा आंकडा सांगितला! त्यामुळें इतरांनींहि आपापल्यापरी जास्तींत जास्त देणगीचे आंकडे घातले; तरी सुमारें सात हजारांचीच भरती झाली. तेव्हां दुसऱ्या पाळीला तात्यासाहेबांनीं पांचशेंचे सहाशें केले. तरी सुद्धां दहा हजार पूर्ण होईनात; मग पुन्हां तिसरी पाळी आली, तेव्हां मात्र तात्यासाहेब म्हणाले कीं, "हें पाहा, आतां मात्र माझ्याजवळ पैसे नाहींत. जे आहेत ते मला व माझ्या पत्नीला या पुढील दिवसांत पुरतील एवढी मला काळजी घेणं जरूर आहे. कुणास ठाऊक आमचं आयुर्मान आणखी किती आहे तें. आमचं आयुष्य संपण्या-

च्या वेळीं जर शिल्लक राहिली तर बुईलमध्यें या निर्धाच्या नांवाने मी पैसे लिहून ठेवीन." तात्यासाहेबांची सगळी काटकसर खाजगी जीवनांत चाले. देशकार्यांत मात्र सगळें आयुष्य आणि जवळचें जास्तींत जास्त वित्त त्यांनी खर्ची घातलें. स्वतःची चैन प्रत्येकजण करीतच असतो; पण इतरांसाठीं स्वतःची झीज सोसून मुक्त हस्तानें देणगी देणारीं तात्यासाहेबांसारखीं थोर मनाचीं माणसें फार दुर्मिळ असतात. म्हणूनच तात्यासाहेब गेले तेव्हां उभा महाराष्ट्र हळहळला, आणि प्रत्येक घराला आपल्याच घरांतील कर्तासवरता व श्रेष्ठ माणूस गेल्याचें दुःख अनुभवाला आलें!

(३) विलेपारलें येथील लोकमान्य टिळकांच्या कांहीं अनुयायांनी व चहात्यांनीं लोकमान्यांचें स्मारक म्हणून "लोकमान्य-सेवा-संघा"चें सभागृह बांधले. त्याचा उद्घाटनसमारंभ तात्यासाहेबांच्या हस्तें व्हावा अशी तेथील लोकांची फार इच्छा होती. तेव्हां तात्यासाहेबांचा व आमचा लोभ म्हणून त्यांना समारंभाचें निमंत्रण देण्याची कामगिरी पार्ल्यांच्या मंडळींनीं मी व श्री. न. वि. भावे यांच्यावर सोपविली. ते उन्हाळ्याचे दिवस होते. तात्यांना या दिवसांत कोंकणांत जाऊन राहण्याची मोठी हौस! आम्ही गेलों तेव्हां ते कोंकणांत जाण्याच्याच तयारींत होते. आमच्या येण्याचा आशय सांगतांच ते म्हणाले, "मीच अध्यक्ष असायला पाहिजे असा आग्रह तुम्ही कां धरतां? मी आतां महिनाभर तरी कोंकणांत जाऊन राहण्याचा विचार करतों आहें. तुम्ही कोणी दुसरा अध्यक्ष गांठलांत तर खरंच बरं होईल." मी म्हणालों, "तें सारं खरं; पण लोकमान्यांची परंपरा निष्ठेनें कायम राखणारे एक तुम्हींच आहांत. लोकमान्यांचा केसरी, त्यांचें राजकारण आणि त्यांची परंपरा म्हणून लोक तुमच्याकडे अधिक आपलेपणानें पाहतात. लोकमान्यांचा गौरव तुमच्या हातून करण्यांत लोक आपलाहि गौरव समजतात. शिवाय लोकमान्यांचें स्मारक करण्यासाठीं पारल्याच्या उत्साही मंडळींनीं रात्रीचा दिवस करून अक्षरशः आपल्या खांद्यावरून दगडविटांच्या पाट्या वाहून या स्मारकाचा पाया भरला आहे. तेव्हां ... ..." पण मग तात्यासाहेबांनीं मला अधिक बोलूंच दिलें नाहीं; आणि म्हणाले, "बरं बरं. केव्हां आहे तो समारंभ?" मी म्हणालों, "× × तारखेच्या सुमारास आहे. ती ठरली म्हणजे लोकमान्य सेवासंघाची मंडळी आपल्याला कळवतील". तात्यासाहेबांनीं सांगितलें, "तुम्ही कोणतीहि तारीख ठरवा. त्या तारखेच्या आधीं मी नक्की पुण्यास येतों. तुमचें ठरलें म्हणजे कळवा. महिनाभर राहण्याऐवजीं दहा-बारा दिवसांतच मी कोंकणांतून परत येईन." या त्यांच्या अनुग्रहाबद्दल आम्ही त्यांचे आभार मानले; आणि पारल्याच्या मंडळींना "तात्यासाहेब येण्यास तयार आहेत; तुम्ही पत्रानें त्यांना तारीख कळवा," असें सांगितलें. पण पुढें एके दिवशीं मला लोकमान्य सेवासंघाकडून निमंत्रण-पत्रिका आली; ती वाचून मी

अगदीं थक्कच झालों. पारल्याच्या लोकमान्य सेवासंघाच्या सभागृहाचा उद्घाटन-समारंभ लोकनायक बापूजी अणे यांच्या हस्तें साजरा होणार हें वाचून मी मनाशीं म्हणालों, "हें काय असें निराळेंच झालें? तात्यासाहेबांना निमंत्रण केले त्याचे काय? मग पारल्याला जाऊन चौकशी केली; तेव्हां समजले कीं, त्यांच्या कार्यकारी मंडळांत लोकनायक बापूजी अण्यांनाच बोलावण्याचें ठरलें. मी म्हणालों, "पण हें तुम्ही तात्यासाहेबांना कळविलेंत कां?" 'नाहीं' असें उत्तर आलें!! आतां आलां कां मान खालीं घालण्याची पाळी? तात्यासाहेब आपले ठरल्या तारखेला कोकणचा मुक्काम संपवून पुण्याला येऊन पत्राची वाट पाहत बसले होते. पण पारल्याच्या मंडळींनीं तर त्यांची दखलच घेतली नाही. अखेर श्री न. वि. भावे व मी उभयतां पुण्यास गेलों. झाल्या प्रकाराबद्दल तात्यासाहेबांची समजूत कशी घालावयाची या विवंचनेंत पडलों. त्यांची क्षमा मागण्याखेरीज दुसरा कोणताहि मार्ग आम्हांस दिसेना; म्हणून तोच मार्ग आम्हीं अवलंबिला. पण तात्यासाहेबांसारख्या थोर माणसाची पारल्याच्या मंडळींकडून अशी अवहेलना होऊनहि त्यांनीं या गोष्टीचा मुळींच विषाद मानला नाहीं. उलट शांतपणाने आमचीच समजूत घालीत ते म्हणाले, "होतं असं कधीं कधीं. बापूजी अणे आले आणि मी आलों नाहीं, यांत मुळींच कांहीं बिघडलं नाहीं. कोणी तरी अध्यक्ष होऊन सभारंभ व्हावयास हवा होता, तो झाला. अध्यक्ष बापूजी कीं मी, हा महत्त्वाचा मुद्दाच नाहीं." केवढी उदारमनस्कता ही!

(४) सार्वजनिक कार्यांसाठी अनेक तऱ्हेच्या देणग्या मिळविण्याकरितां कित्येकांच्या घरीं मी गेलों आहें. अनेक अनुभव मला पाहावयास मिळाले आहेत. देणगी हमखास मिळविण्यासाठीं जेवढा वजनदार माणूस जाईल तेवढा देणगीचा आंकडाहि भरघोस मिळूं शकतो हा बहुतेकांचा अनुभव आहे. तेव्हां हिंदु राष्ट्रीय निधि जमविण्यासाठीं आपण एकट्यानें न जातां, तात्यासाहेबांना घेऊन कांहीं विशेष श्रीमंत गृहस्थांकडे गेलों, तर देणग्या सढळ हातानें मिळतील, अशा विचाराने मीं तात्यासाहेबांना माझ्याबरोबर येण्याची विनंती केली; त्यांना ती प्रथम मान्यच होईना. ते म्हणाले, "आपल्या कार्याला पैसा मिळावा, अगदीं पुष्कळ मिळावा, असं सारखं वाटत असतं हें खरं; पण तो मागायला जाणं हें कांहीं जमत नाहीं बुवा आपल्याला!" मग परोपरीनें त्यांना त्यांच्या येण्याचें महत्त्व मी सांगूं लागलों. तेव्हां ते माझ्याबरोबर येण्यास तयार झाले. मुंबईतील कोट्याधीश गृहस्थ × × × यांच्याकडे जाण्यास आम्ही निघालों. तात्यासाहेबांना मी वाटेंत म्हणालों, "हे गृहस्थ अतिशय श्रीमंत आहेत; आणि आपल्याबद्दल त्यांना मोठा आदर आहे. तरी आपण आपला हेतु समजावून देतांच ते आपल्या म्हणण्यास मान देतील." "अस्सं!" तात्यासाहेबांनीं केवळ एकेरी उद्गार काढला. मी पुन्हां म्हणालों, "आपण म्हणाल

तो आंकडा द्यायला ते गृहस्थ खरेच तयार होतील." "खरं म्हणतां कीं काय!" तात्यासाहेब आंतून चिंतेनें पण वरून आश्चर्य दाखवीत म्हणाले. "पण तात्यासाहेब, आपण मागायला मात्र पाहिजे. विचार न करितां तोंडाला येईल तो आंकडा आपण बेलाशक मागा" असे मी म्हणालें! "मागेन, मागेन." असें म्हणून तात्यासाहेबांनीं मला आश्वासन दिलें. "तुमच्या म्हणण्याचा आशय माझ्या ध्यानांत आला आहे. दाता मुक्तहस्ताने देणारा आहे, आतां तुमच्या कौशल्यावरच रक्कम हातांत पडणार आहे, असेंच ना तुमचं म्हणणं? मागेन, मागेन, मी सुद्धां मागेन आज बरं!" असें ते म्हणाले. नंतर आम्ही सदर गृहस्थांच्या बंगल्यावर गेलों. त्यांनी आपल्या श्रीमंतीप्रमाणें तात्यासाहेबांच्या विद्वत्तेचा मोठा आदर व मानसन्मान केला. या गृहस्थांना त्यांच्याकडे जाण्यापूर्वी, "तात्यासाहेब आपल्याशीं अमुक अमुक विषयावर पुष्कळ बोलणार आहेत व आपल्याकडे या कार्यासाठी देणगी मागणार आहेत" असें मी सांगून ठेवलें होतें. प्रथम या बसा झालें. हवापाण्याच्या गप्पा झाल्या. चहाफराळाचं आदरातिथ्य झालें. तरी मूळ मुद्द्याचा विषय निघेना. तात्यासाहेबांनीं खूपच गप्पागोष्टी केल्या. नंतर लांबलेलें संभाषण संपवून घरमालकांना ते म्हणाले, "बरं आहे; येतों आतां आम्ही!" आणि नमस्कार करून तात्यासाहेब डोक्याला पगडी व्यवस्थित बसवीत उठले व रस्ता चालूं लागले. मला मालकांनी मुद्दामच थांबवून घेतलें आणि म्हणाले, "काय हो खानविलकर, तात्यासाहेब तुमच्या निधीबद्दल अमुक बोलणार आहेत, तमुक सांगणार आहेत, म्हणून तुम्ही म्हणत होतां; आणि मुद्द्याची एक गोष्टसुद्धां ते बोलले नाहींत की." मी म्हणालों, "मोठा सकोची आणि भिडस्त स्वभाव आहे त्यांचा. सार्वजनिक कार्यासाठी सुद्धां–पैसे मागायला जीभ वळत नाही त्यांची. आपल्याकडे ते आलेच होते; आणि येण्याचा हेतुहि मी सांगितलाच आहे; तेव्हां ते आले म्हणजे देणगी मागण्यासाठीच आले हे ध्यानांत घेऊन आपण ....." मला असें झालें की, आपण दणगीचा आंकडा सांगावा तरी किती! तात्यासाहेबांनीं दहा-पंधरा हजार रुपये मागायला हरकत नाहीं असें मी म्हणत होतों. पण येवढी देणगी मागायला माझीहि जीभ रेटेना. तेव्हां जास्तींत जास्त म्हणून मीं पांच हजार रुपये मागितले आणि त्यांनीहि ते लगेच दिले!

(५) नंतर मुंबईतील दुसऱ्या एका श्रीमंत गृहस्थांना मी जाऊन भेटलों आणि "आपल्याकडे अशा अशा कामासाठीं तात्यासाहेब स्वतः देणगी मागायला येणार आहेत" असें म्हणालों. पण ते गृहस्थ म्हणाले, "अहो, तात्यासाहेबांसारख्या विद्वान् आणि सार्वजनिक कामांत सदोदित गुंतलेल्या माणसानें माझ्यासारख्याकडे येण्यांत वेळ कशाला खर्च करावयाला पाहिजे! तात्यासाहेब या कार्याशीं सहमत आहेत हेंच त्या कार्याच्या महत्त्वाचें खरें द्योतक आहे. त्यांच्या विचारसरणीवर

माझा विश्वास आहे. मीच त्यांच्याकडे येतों आणि ते म्हणतील तीं देणगी देतों." या गृहस्थांचा हा उत्साह आणि तात्यासाहेबांविषयीचा नितान्त आदर मी तात्यासाहेबांना अगोदरच बोलून दाखविला आणि त्यांना एक प्रकारें पढविण्याच्या पद्धतीनेंच मी नम्रपणें म्हणालों, "तात्यासाहेब, हे गृहस्थसुद्धां आपण म्हणाल तो आंकडा देतील.आपण मात्र परवांसारखा भिडस्तपणा न करतां मोकळ्या मनानें देणगी मागावी." तात्यासाहेब हंसून म्हणाले, "या वेळीं अगदीं घसघशीत आंकडा मी सांगणार आहें. तुम्ही मुळींच काळजी करूं नका. परवांसारखा संकोच कांही मी करणार नाहीं. येऊं देत ते; मग ते आहेत आणि मी आहें." मी सदरहू गृहस्थांना बरोबर घेऊन आलों त्या वेळी तात्यासाहेब सरदारगृहांत उतरले होते. देणगी देणारे गृहस्थ मोठे गोष्टीवेल्हाळ होते. तासभर गप्पा झाल्या. आलेल्या गृहस्थांना संकल्पित विषयाचें विस्मरणच झालें आणि तात्यासाहेबांना आठवण होती तरी देणगी मागण्यास त्यांचा जीव धजावेना! त्यामुळें एकेक मिनिटाचा हिशेब ठेवणारे आणि मिनिट फुकट गेल्यास जिवाचा आटापिटा करणारे तात्यासाहेब, मुख्य मुद्दा अडगळीच्या खोलींतील सामानासारखा बाजूला सारून, अवांतर विषयांवर चांगलें तासभर बोलत बसले. अखेर सरदारगृहाचे व्यवस्थापक त्यांना जेवणाची वर्दी देण्यास आले. मग मात्र आलेल्या गृहस्थांना एकदम आठवण होऊन "खरंच कीं! मी अगदीं विसरूनच गेलों. आपल्या ला राष्ट्रीय निधीसाठीं देणगी द्यायला मी आलों होतों. किती देऊं मी आपल्याला" असें म्हणाले. मी माझ्या कानांत सगळी शक्ति एकवटून तात्यासाहेबांच्या शब्दाची वाट पाहात होतों. तोंच तात्यासाहेब म्हणाले, "अमुकच द्या असा कांहीं आग्रह करीत नाहीं मी आपल्याला. आपण आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तें द्यावें!" गृहस्थ म्हणाले, "पंधराशें देतों मी आपल्याला." तात्यासाहेब हंसून म्हणाले, "पुष्कळ झाले कीं!" मग मीच मध्यें म्हणालों, "आमची अपेक्षा निदान दोन हजारांची होती." त्यांनीं तो आंकडा लगेच मान्य करून चेक दिला!

त्यानंतर तात्यासाहेब मला म्हणाले, "आपल्याला कांहीं हें मागण्याचें काम जमणार नाहीं बुवा! माझ्या स्वभावाला कांहीं हें जमेलसं दिसत नाहीं. मी पुण्यास जाऊं काय!" असें त्यांनीं विचारतांच मी "होय" म्हणालों व त्यांना बोरीबंदरवर पोंचविण्यास गेलों!

भास्कर वामन भट

(वकील, धुळें)

(१) कै. राजवाडे ता. ३१ डिसेंबर १९२६ सालीं गत झाल्यावर तात्यासाहेब दिल्लीच्या मध्यवर्ती विधिमंडळाच्या सभेला हजर राहण्याकरितां जानेवारी-

अखेर धुळ्यास आले होते. त्या वेळीं त्यांचे वडील बंधु येथें असल्यानें त्यांच्याकडेच ते उतरले होते. तेव्हां नानासाहेब देव, मी व धुळें येथील कांहीं गृहस्थ त्यांच्या भेटीला गेलों. भेटींत राजवाड्यांचे बहुमोल हस्तलिखित ग्रंथ व ऐतिहासिक कागदपत्र यांची विल्हेवाट काय करावयाची हा प्रश्न उपस्थित झाला. तात्यासाहेब म्हणाले की, भारत इतिहास संशोधन मंडळ ही संस्था राजवाडे व तात्यासाहेब महेंदळे यांनीं स्थापन केली आहे. तरी त्यांच्याकडे हा संग्रह पाठवून द्यावा असें मला वाटतें. तात्यासाहेब हे भारत इतिहास संशोधक मंडळाचे एक प्रमुख चालक होते व ही सूचना त्यांनी करणे यांत कांहींच गैर नव्हतें. त्यावर तात्यासाहेब यांस आम्हीं असें सांगितलें कीं, धुळ्यास एखादी संशोधन संस्था स्थापन व्हावी अशी राजवाड्यांची फार इच्छा होती. त्या इच्छेस अनुसरून राजवाड्यांचें स्मारक म्हणून "राजवाडे संशोधन मंदिर" या नांवाची एक अद्यावत इमारत बांधून तींत हा त्यांचा संग्रह सुरक्षित ठेवावा व इतिहाससंशोधन करणारें एक मंडळ स्थापावे अशी आमची सर्वांची इच्छा आहे. त्यावर यत्किंचितहि आढेवेढे न घेतां तात्यासाहेबांनी या गोष्टीस मान्यता दिली व यापुढें राजवाड्यांचे वडील बंधु नानासाहेब यांच्याशीं या संग्रहाबाबत धुळ्याच्या मंडळींनीं जें बोलणें केलें त्यास पूर्णपणें पाठिंबा दिला व साहाय्य केलें. यांत तात्यासाहेबांनीं आपल्या मनाचा उदारपणाच व्यक्त केला. या प्रकारचा थोरपणा क्वचितच आढळतो.

(२) कै. राजवाड्यांचे मराठी धातुकोश व नामादि व्युत्पत्तिकोश असे दोन ग्रंथ त्यांच्या निधनापूर्वी त्यांनीं लिहून ठेविले होते. धुळ्यास स्थापन झालेल्या राजवाडे संशोधन मंदिराला तात्यासाहेबांनीं भेट देऊन मंडळाला भेट देणाऱ्या गृहस्थांच्या अभिप्रायाच्या पुस्तकांत त्यांनीं आपला लेखी अभिप्राय नमूद करून ठेविला. त्यांत या ग्रंथाच्या प्रसिद्धीचें काम तत्काळ मंडळानें हातीं घ्यावें असें त्यांनीं सुचविलें. ग्रंथछपाईस लागणारी रक्कम उभारण्याविषयीं एक विशिष्ट स्वरूपाची सूचना त्यांनीं केली होती. परंतु मंडळानें या ग्रंथाच्या छपाईकरितां देणग्या मिळवून हे ग्रंथ छापून प्रसिद्ध केले.

(३) राजवाडे मंडळानें राजवाड्यांचें चरित्र नुकतेंच छापून प्रसिद्ध केलें. त्या चरित्राविषयीं तात्यासाहेब यांनीं केसरीच्या दोन अंकांत विस्तृत व मार्मिक अभिप्राय दिला. हा सर्व अभिप्राय वाचला असतां तात्यासाहेबांविषयीं राजवाड्यांचें मत चांगलें नसतांहि उलट त्यांनीं मात्र थोर मनानें व उदार अंतःकरणानें राजवाड्यांनीं केलेल्या कार्याची महती मुक्तकंठानें वर्णन केली आहे. गुणी गुणं वेत्ति.

❋

हरीभाऊ कुलकर्णी

(बी. ए., सहसंपादक 'मराठा', पुणें)

तात्यासाहेब वयानें वृद्ध झाले तरी मनानें तरुणच राहिले होते. ताज्यांत ताजीं देशीपरदेशी मासिकें आणि पुस्तकें वाचावीं, नवी नवी माहिती मिळवावी, काळाबरोबर धावावें ही त्यांची हौस आणि तडफ शेवटपर्यंत कायम होती. 'मराठ्यां'तील अभिप्रायाचें सदर माझ्याकडे होतें. त्यामुळें चांगलीं इंग्लिश पुस्तकें नेहमी येत तीं त्यांकडे पाठविण्याचा शिरस्ता असे. तथापि केव्हांहि भेटले कीं, त्यांनीं हटकून विचारावें, " काय रे, नवीं पुस्तकें कोणतीं आलीं आहेत ! "

व्यासंगाचा कंटाळा त्यांनीं कधीं केला नाहीं. पुणें पत्रकार संघाच्या स्वाध्याय-मंडळानें त्याचा एक वर्ग काढला. त्या व्याख्यानांसाठीं मुंबई–पुण्याचीं प्रमुख इंग्रजी-मराठी पत्रें निवडून एका आठवड्याच्या अंकांतून संपादकीय लिखाण किती कॉलम येतें, विविध विषयांवर मजकूर किती, जाहिराती किती, बातम्या किती, त्यांत पुन्हां परदेशच्या आणि स्थानिक किती याचें एक कोष्टकच तात्यासाहेबांनीं बनविलें. वस्तुतः आपली उभी हयात त्यांनीं याच व्यवसायांत घालविली. पण व्यवस्थित टिपणें काढल्याशिवाय सहसा लिहावयाचें बोलावयाचें नाहीं, असा तात्यांचा रिवाजच असे. सदर कोष्टक त्यांच्या हस्ताक्षरांतील असल्यानें तें मी जपून ठेवलें आहे.

लो. टिळकांच्या हयातींत आणि नंतर त्यांच्याविषयीं तात्यांनीं जितकें लिहिलें तितकें इतर कोणीं लिहिलें नाहीं. पण काँग्रेसच्या डायमंड ज्युबिलीच्या ग्रंथांत 'टिळक व काँग्रेस' या विषयावर लिहिण्यासंबंधीं जेव्हां त्यांना अतिशय आग्रह झाला आणि त्यांनाहि भीड मोडवेना, तेव्हां 'केसरीच्या ग्रंथशाळेंतलीं अमकीं पुस्तकें तूंच घे, वाच आणि नीट संदर्भ काढून पानांत खुणा घालून घेऊन ये म्हणजे मी मजकूर सांगेन' असें त्यांनीं मला सांगितलें. कारण लेखांतली माहिती बिन-चूक गेली पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. मी पुस्तकें घेऊन गेलों. तीं चाळतां चाळतां माझ्या वाचनांतून सुटलेले टिळकविषयक उल्लेख त्यांनीं किती तरी काढून दाखविले. इकडे तोंडानें मजकूर सांगण्याचें काम चाललेंच होतें !

तात्या म्हणत, संपादक हा सोनाराच्या ताजव्यासारखा असावा. वजनांतला सूक्ष्म फरकसुद्धां तोलून दाखविण्याइतका तो ताजवा नाजुक असतो तसा नव्या नव्या बारीकसारीक घटनांचीसुद्धां ताबडतोब दखल घेण्याइतका संपादक तत्पर (Sensitive) असला पाहिजे. पण वजन काढून घेतलें कीं लगेच ताजवा सम-तोल होतो, त्याप्रमाणे संपादकाची बैठक स्थिर (Stable) पाहिजे. त्याच्या बुद्धीचा तोल कदापि जातां कामा नये. तात्यांच्या या व्याख्येचें खुद्द त्यांच्यापेक्षां

चांगलें उदाहरण मुद्दाम शोधलें तरी सांपडणार नाही. प्रसंगी खुद्द टिळकांचाहि विरोध तात्यांनीं पत्करला, पण आपल्या सारासारबुद्धीशीं प्रतारणा त्यांनीं केली नाहीं. हें त्यांचें वैशिष्ट्य होय.

❋

पंडित विनायकबोवा पटवर्धन

(प्रिन्सिपॉल, गांधर्व-महाविद्यालय, पुणें)

(१) माझे गुरु कै. विष्णु दिगंबरजी व तात्यासाहेब यांचा फार लहानपणापासून परिचय होता. कै. गुरु विष्णु दिगंबर यांच्याकडे लाहोरलाहि तात्यासाहेब येऊन गेले होते. मुबईला तर विद्यालयांत वरचेवर ते येत असत व पंडितजींच्याबद्दल जागजागीं आपल्या लेखांतून व पुस्तकांतून त्यांनीं उल्लेख केलेला आढळतो. संगीताची आवड तात्यासाहेबांना फार होती; केसरी व इतर राजकारणांतून वेळ मिळाला म्हणजे संगीताबद्दल ते फार आस्थेनें विचार करीत असत. १९२५ सालीं कानपूरला कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठीं ते आले होते. कॉंग्रेसबरोबर संगीत-संमेलनहि माझे गुरुजी भरवीत असत. त्या संमेलनाचें अध्यक्षपद तात्यासाहेबांनीं स्वीकारून संगीताबद्दलचें आपलें उत्कट प्रेम व्यक्त केलें होतें. त्यानंतर १९२८ सालीं पुण्यास पंडितजींनीं महाराष्ट्र प्रांतिक संगीत-परिषद तात्यासाहेबांच्याच अध्यक्षतेखालीं प्रथम भरविली व याच परिषदेंत 'संगीताचें मराठीकरण' करणें किती अवश्य आहे हें अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं पटवून दिलें. १९२८ ते १९३८ पर्यंत हा वाद महाराष्ट्रांत फारच जोरांत सुरू होता व त्यास कारण तात्यासाहेब होत. संगीतांत अर्थप्रचुर काव्यें म्हटलीं जावीं, अर्थबोधाप्रमाणें गाणें व्हावें असा त्यांचा आग्रह होता. प्रस्तुत लेखकहि वरील दहा वर्षांत मराठीकरण व्हावें म्हणून प्रचार करीत होता. त्या वेळीं तात्यासाहेबांनीं केसरीतून त्यांच्या लेखांना जागा देऊन संगीतावरील आपलें प्रेम व्यक्त केलें होतें.

(२) पुण्यास १९३२ सालीं गांधर्वमहाविद्यालयाचें उद्घाटन तात्यासाहेबांच्याच हस्तें झालें. संगीताबद्दल बऱ्याच गोष्टींची त्यांनीं आपल्या व्याख्यानांत चर्चा केल्यावर एक सूचना म्हणून जी केली ती अत्यंत विचारणीय होती. ती म्हणजे 'गाणें शिकवितांना तंबोऱ्यावर शिकवा, हर्मोनियमवर नको' ही होय. ही सूचना या घटकेपर्यंत विद्यालयांत अमलांत आलेली आहे. त्या सूचनेप्रमाणें वागण्यानें पुण्याच्या विद्यालयाचें एक वैशिष्ट्य म्हणून 'तंबोऱ्यावर शिकविणें' ही गोष्ट समजली जाते. विद्यालयाचे वर्ग कसे चालतात हें पाहण्यासाठीं म्हणून तात्यासाहेब मुद्दाम आले होते व २–३ तास निरीक्षण करीत होते. अखेरपर्यंत मी भेटलों म्हणजे विद्यालयाबद्दल चौकशी आपुलकीनें ते करीत असत.

(३) गायनाचार्य वझेबुवांचा व तात्यासाहेबांचाहि बराच परिचय होता. बुवांची माहिती पुण्यांत अगोदरपासून बरीच होती; पण बेळगांवहून बुवा पुण्यांत कायमचे राहण्यास आल्यानंतर प्रथम त्यांचें गाणें महाराष्ट्रीय मंडळांत तात्यासाहेब यांनीं करविलें. पुण्यांतील निवडक व रसिक लोक तात्यासाहेबांच्याच आमंत्रणावरून आले होते. पुढे बुवांच्या ७१ व्या वाढदिवसाची सभा तात्यासाहेबांच्याच अध्यक्षतेखालीं झाली होती. त्याचप्रमाणें कै. गु. विष्णु दिगंबरांच्या मृत्यूबद्दलच्या शोकसभेला तात्यासाहेबच अध्यक्ष होते, व त्या वेळीं पंडितजींच्याबद्दल जे धन्योद्गार त्यांनीं काढले ते कुणीहि विसरणें शक्य नाही.

(४) १९२८ सालीं पुण्यास भरलेल्या संगीत-परिषदेंत अध्यक्षीय भाषणांत त्यांनीं संगीताचें मराठीकरण करण्याबद्दल आपलें मत इतक्या मुद्दयांसहित मांडलें कीं, संगीताचें मराठीच्या रूपानें एकप्रकारें शुद्धीकरणच तात्यासाहेबांनी केलें. अलौकिक बुद्धिमत्तेमुळे संगीतांत एक बुद्धिवाद उत्पन्न करून अंधपरंपरेच्या लोकांना त्यांनी खडबडून जागें केलें. १९३८ साली श्री. टेबे यांच्या व्याख्यानानंतर आपली बाजू सप्रमाण मांडून मराठीकरणाच्या विरोधकांना त्यांनीं सर्वस्वी नामोहरम करून टाकलें. तात्यासाहेबांनीं मराठी ख्याल करण्याचा विचार नवीनपणानें मांडून ख्याल मराठींत होऊं शकतात हें आपल्या काव्यांनीं सिद्ध केलें. त्यांनी गाण्यासाठीं म्हणून मराठी पद्यें बरीच रचली व प्रत्यक्षपणे सिद्धता दाखवून नवीनपणाने विचार करण्याची जरूरी गायक लोकांना पटवून दिली. मराठी पदे व ख्याल कै. प. विष्णु दिगंबर १९१५ पासून करवून घेत असत; पण त्याला चालना मात्र १९२८ सालापासून केवळ तात्यासाहेबांच्यामुळें मिळाली हें खास. अशा प्रकारें संगीताची सेवा त्यांनीं फार निष्ठेनें व अव्यभिचारी भक्तीनें केली आहे.

(५) १९३२ सालीं पुण्याच्या विद्यालयाच्या स्थापनेनंतर माझा-त्यांचा फारच परिचय झाला. एका जाहीर सभेला मी प्रथम ईशस्तवन करणार होतों. सभा सहा वाजतां होती; आणि पावणेसहा झाले तरी मी आलों नाहीं तरी सभेच्या चालकांना त्यांनीं विश्वासानें सांगितलें कीं, 'बुवा वेळ कधीं चुकणार नाहींत; वेळेवर खास येतील,' ते असें बोलत आहेत तोंच मी सभेंत पोंचलों. लगेच 'बघा, बुवा आले' असें म्हणून माझ्यावरील प्रेम व्यक्त केलें. पुण्याचें गांधर्व महाविद्यालय मीं स्वंतः सुरू केलें. सुमारे दहा वर्षांनंतर विद्यालय सार्वजनिक करावें व रजिस्टर्ड संस्थेच्या ताब्यांत द्यावें असा विचार मनांत येतांच प्रथम मी तात्यासाहेबांच्याकडे गेलों, तेव्हां त्यांनीं सार्वजनिक संस्था केल्यानें काय काय घोटाळे होतात याचें पूर्ण स्वरूप माझ्यापुढें उभें केलें व खरा संस्थापकच बाजूला राहून दुसरेच मालक अथवा शिरजोर होण्याचा कसा संभव असतो हेंहि त्यांनीं समजावून सांगितलें व पुढें त्याप्रमाणें याची प्रचीति प्रत्यक्ष प्रस्तुत लेखकानें घेतली त्या वेळीं तात्यासाहेबांच्या खऱ्या

सल्ल्याची किंमत कळली !! अशा पुष्कळ गोष्टींत तात्यासाहेबांच्या सल्ल्याचा अनुभव मीं घेतला असल्याने त्यांच्या बुद्धिमत्तेची प्रशंसा करावी तेवढी थोडीच.

❊

के. बा. गजेंद्रगडकर

(वकील, सातारा)

(१) १९३५ सालची गोष्ट. हिंदुमहासभेचें अधिवेशन पुण्यास होतें. त्याच वेळीं धर्मनिर्णय मंडळाचें वार्षिक अधिवेशनहि जगद्गुरु डॉ. कुर्तकोटी यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यास होतें. हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे तात्यासाहेब स्वागताध्यक्ष होते व त्यामुळें ते अगदीं कामांत व्यग्र होते. तरीसुद्धां वेळ काढून धर्मनिर्णयमंडळाच्या अधिवेशनास ते मुद्दाम आले होते व तेथें अतिशय सुंदर भाषण करून तेथील कार्यास त्यांनी प्रोत्साहन दिले.

(२) १९४२ सालीं मीं प्रथम 'हिंदु कायद्याची सुधारणा' या विषयावर लेख लिहिला व पुढे सह्याद्रीतहि लेख लिहिले. पुष्कळ वेळां त्यांनीं पत्रें पाठवून माझ्या लेखाबद्दल आपलें मत कळविलें व मला उत्तेजन दिलें. कोणत्याहि कार्यांत काम करीत असलेल्या व्यक्तीस प्रोत्साहन द्यावयाचा त्यांचा स्वभावच होता.

❊

सदाशिव हणमंत बल्लाळ

(संपादक 'लोकमत', यवतमाळ)

तात्यासाहेब यांचा काम करण्याची पद्धत, प्रत्येक क्षणाचा सदुपयोग करण्याचें व्रत, चांगल्या गुणाचा कणहि आढळल्यास त्या गुणवानास उत्तेजन देण्याची त्यांची हौस यांचा माझ्या मनावर कायमचा ठसा उमटविणारी एक आठवण देतों. १९१६ साल असावें. मी अच्युतराव कोल्हटकरांच्या 'संदेश' दैनिकाचा संदेशवाहक म्हणून नगर येथें भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस परिषदेस गेलों होता. परिषदेचें अध्यक्षपद तात्यासाहेबांकडे असून स्वतः लोकमान्य टिळक अधिवेशनास हजर होते. यामुळें त्या अधिवेशनास अपूर्व महत्त्व आलें होतें. तात्यासाहेब यांनीं आपलें अध्यक्षीय भाषण लिहून काढलेलें नव्हतें. कांहीं मुद्द्यांचें टांचण करून त्यावरून ते विस्तृत बोलले. त्याच रात्री तात्यासाहेबांचे समग्र भाषण मीं लिहून काढलें. मला रात्रीचे दोन वाजले ! पहाटे मी प्रथम तात्यासाहेब उतरले होते त्या माडींवर गेलों. खोलींत तात्यासाहेब व दि. वा. दिवेकर हे दोघेच होते. परिषदेच्या कामाला प्रारंभ करण्यापूर्वी आपल्या कालच्या भाषणाचा त्रोटक सारांश तात्या-

साहेबांना "मराठा" वर्तमानपत्रांत पाठवावयाचा होता. दिवेकर हे स्वतः "मराठा"चे वृत्तहारकच; पण तात्यासाहेबांनीं हें भाषण स्वतःच दिवेकरांना लिहून घेण्यास सांगितलें. तात्यासाहेब सांगत व दिवेकर तें टिपून घेत. हें काम झाल्यावर माझ्याकडे वळून तात्यासाहेब मला म्हणाले, " काय बल्लाळ, काय काम आहे ? आपणाला आतां परिषदेला जायचें आहे, बोलायचें असेल तें चटकन बोला. " मीं चटकन खिशांतले कागद काढले आणि ते त्यांच्या स्वाधीन केले. तात्यासाहेबांच्या भाषणाचा "संदेश"कडे पाठवावयाचा तो सारांश होता. महत्त्वाचे मुद्दे मीं जाड टंकांत घेण्याकरितां शीर्षकें म्हणून लिहिलीं होतीं; तात्यासाहेब माझे कागद घेऊन वाचूं लागले. त्यांच्या मनांतील समाधानाच्या व संतोषाच्या रेषा त्यांच्या तोंडावर उठत होत्या. सगळे कागद वाचल्यानंतर त्यांनीं पुनः प्रथमपासून सगळ्या वृत्तान्तावर दृष्टि टाकली व दिवेकराना ते म्हणाले, " दिवेकर, याचें नांव रिपोर्टिंग ! वक्ता बोलत असतां पुढे जातो, मागच्या मुद्द्याचें स्मरण झालें म्हणजे त्याचाहि विस्तार करतो. मागचें-पुढचें हें सर्व जुळवून वक्त्याचें म्हणणें पद्धतशीर रीतीनें पुढें न मांडतां तो बोलला तेच शब्द त्याच क्रमानें लिहून काढणें याला रिपोर्टिंग म्हणत नाहींत. चांगलें रिपोर्टिंग करायला वक्त्याच्या मनोभूमिकेवर आरूढ व्हावे लागतें. एकापरी बोलणें सोपें, पण तें लिहिणे कठिण असतें ते यामुळेंच. बल्लाळांचें हें 'रिपोर्टिंग' म्हणजे मी एक अनुकरणीय नमुना समजतों. " असें दिवेकरांशीं बोलून तात्यासाहेबांनीं माझे कागद माझ्या स्वाधीन केले. तात्यासाहेब केळकर व 'संदेश' पत्र यांच्यामध्यें हार्दिक प्रेमसंबंधाचा जिव्हाळा नसून उलटभावना होती, हें सर्वश्रुतच आहे. असें असतांहि त्यांनीं मला आपलेसें समजून जो मनाचा उदारपणा व सौजन्य दाखविलें व माझ्या अंगच्या गुणाची " परगुणपरमाणून् पर्वतीकृत्य " शिफारस केली तिचें विस्मरण मला केव्हांहि होणें शक्य नाहीं.

❋

का. मो. सहस्रबुद्धे

(जमीनदार व व्यापारी, भाजें)

भोर-दरबार आणि पवनमावळ तालुका व्यापारी संघ यांजमधील एका महत्त्वाच्या गोष्टींत अडचणी उत्पन्न होऊन प्रकरण एक वर्षभर भिजत पडलें. मी मॅनेजिंग डायरेक्टर होतों. वरील अडचणींत कंपनी असतांना एके दिवशीं भोर दरबारकडून तात्यासाहेब यांस कार्याध्यक्ष नेमलें आहे असें सरकारी पत्रक प्रसिद्ध झालें. त्यामुळें आम्हांस उमेद येऊन आशेचा अंकुर उत्पन्न झाला. तात्यासाहेब यांनीं प्रथम-भेटींतच आमची बाजू ऐकून घेऊन प्रकरण इतके दिवस राहिल्या-

बद्दल आश्चर्य व्यक्त केलें व सर्व दृष्टीनीं विचार करून निर्भीडपणें आमच्यासारखा निकाल देऊन आजपर्यंतच्या काम करण्याच्या संस्थानी पद्धतीला खो दिला व आम्हांस कायमचें उपकृत करून ठेविलें !



यशवंत दत्तात्रय खोले

(रावसाहेब, चेअरमन, पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक)

सन १९३२ साली 'स्थानिक स्वराज्य' त्रैमासिक दे. भ. भालचंद्र महेश्वर गुप्ते, एम्. एल्. ए. यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होण्याचें ठरले. श्री. गुप्ते यांचा मदतनीस म्हणून लेख जमविण्याचें काम मजकडे आलें. मी प्रथम तात्यासाहेब याची गांठ घेऊन त्रैमासिकास लेख देण्याबद्दल विनंती केली व ती त्यांनीं तत्काळ मान्य केली व मला लेख लिहून घेण्यास बोलाविलें. लेखाचा मथळा 'स्थानिक स्वराज्य शिक्षण' असा दिला व त्यामध्यें शिक्षणद्वारां स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य, शिक्षण वगैरे प्रश्न कसे सुटूं शकतील याचें सुंदर विवेचन केलें. या लेखांत अशिक्षितांसंबंधीं पुढीलप्रमाणें मार्मिक उल्लेख आहे. "ज्यांना आपण अशिक्षित म्हणतों ते आपला स्वतःचा संसार किंवा व्यवहार आस्थेनें तर चालवितातच, पण पुष्कळसा बिनचूक चालवितात असे आढळून येतें." दुसऱ्याबद्दल गुणग्राहकता दाखविणें हा त्यांचा फार मोठा अनुकरणीय असा गुण होता.

भा. मा. ऊर्फ बाळासाहेब साठे

(इनामदार, वांई)

(१) वांई टिळक-स्मारक व वाई ग्रंथसंग्रहालय ह्या संस्थांचा वाद विकोपास जाऊन ग्रंथ-संग्रहालयाचीं पुस्तकें वगैरे सर्व मालमत्ता टि. स्मा. संस्थेच्या ताब्यांत व ग्रंथसंग्रहालयाचा कायमनिधि मात्र माझ्या ताब्यांत अशी एक अडचणीची परिस्थिति उत्पन्न झाली ! अर्थात् अशा वेळीं मीं तात्यांच्याकडे धाव घेतली व केसरीच्या तिजोरींत पस्तीसशें रुपयांची कॅश सर्टिफिकिटें ठेवून तात्यांनीं टिळक-स्मारक संस्थेच्या कार्यकर्त्यांस तसें कळवून तडजोडीच्या चर्चेकरितां तयार आहांत काय असा लेखी सवाल टाकला. दुर्दैवानें तात्यासाहेबांना समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळें तो तंटा निकालांत न निघतां तसाच लोंबकळत पडला ! पुढें माझी प्रकृति बरीच बिघडली व मी मुंबईच्या मार्गावर असतांना पुण्यास

उतरल्यावर तात्यांना निरोप पाठविल्यामुळें ते माझ्याकडे आले. " हें भांडण असेंच राहूं देणें इष्ट नाहीं. पुढे काय करावें ? " असा प्रश्न मी केल्यावर ते म्हणाले, " तुम्हांस आयुष्याचा भरंवसा वाटत नसला तर जर तुमचे ग्रथसंग्रहालयांतील सहकारी टिळक-स्मारक संस्थेच्या ताब्यांत बिनशर्त रक्कम देण्यास तयार नाहींत तर तुम्ही रक्कम देण्याचा आग्रह कां धरतां ? " त्यावर मीं म्हटलें, " माझ्या तोंडास ह्या रकमेमुळें निष्कारण काळोखी लागेल व मेल्यावर सुद्धां भांडण कायम ठेवलें इतका मी भांडखोर आहें असें लोक म्हणतील. " त्यावर ते लागलीच उत्तरले, " लोक-शाहींत वैयक्तिक विचार बाजूस ठेवला पाहिजे. फार तर दोन तरुण ट्रस्टी नेमून त्यांच्या ताब्यांत रक्कम द्या व उभय संस्था-चालकांचें ऐकमत्य झाल्याशिवाय ही रक्कम कोणाच्याच हवाली करूं नये असा निर्बंध घाला. तुमचें काम येथेंच संपलें. तुम्ही मोकळे झालांत. पुढचें पुढें कांही होवो. " मला हा सल्ला पटला नाही व मी रक्कम टिळक-स्मारक सस्थेच्या ताब्यांत देऊन टाकली हा भाग वेगळा; पण त्यांचाच सल्ला लोकशाही तत्त्वास पूरक व योग्य होता असेंच अद्यापिहि ग्रंथसंग्रहालयाचे माजी पुरस्कर्ते म्हणतात !

(२) माझ्या कीर्तनसेवेची चौदा वर्षें होऊन प्रकृतिदौर्बल्यामुळे विराम पावण्याचें मीं ठरविल्यामुळें वांईतील माझे स्नेही, चाहते व प्रमुख पुढारी ह्यांनीं माझा सत्कार केला. त्या प्रसंगाची हकीकत दोन-तीन वृत्तपत्रांतून छायाचित्रांसह विस्तृत आली. सत्कार मंडळाच्या चालकांनीं थोडासा वृत्तान्त व माझें छायाचित्र केसरीकडेहि प्रसिद्धीसाठीं पाठविलें होतें; पण त्याला प्रसिद्धि मिळाली नाही. पुढें ही कारवाई मधल्यामध्येंच केली गेल्याची कुणकूण माझ्या कानावर आली. तात्यांच्याकडे ग्रंथसंग्रहालयाच्या कार्यासाठीं मी गेलो असतांना हा विषय निघाला. मीं त्यांना सर्व हकीकत सांगितल्यावर ते बरेच रागावले व म्हणाले, " आलेला मजकूर प्रसिद्ध करण न करणें हा अधिकार संपादकाचा आहे. त्यांत इतरांची लुडबूड चालूं देतां कामा नये. उद्यां स्मरणासाठीं मनुष्य पाठवा. योग्य ती व्यवस्था मी करीन. " दुसऱ्या दिवशीं मीं मनुष्य पाठविला; पण तो जाण्याच्या पूर्वीच तात्यासाहेब हाच मजकूर लेखकास सांगत होते व तो लिहून झाल्यावर त्यांनीं माझें छायाचित्र कचेरींतून मागवून त्याचा ब्लॉक करून व तो मजकूर कंपोज करून प्रसिद्धीस द्या असें सांगितलें व तसें मला कळविलें ! अर्थातच तें सर्व केसरींत प्रसिद्ध झालें व मधली लुडबूड मध्येंच जिरली हें लिहावयास नकोच !

❋

गणेश त्र्यंबक बापट

(एम्. ए., एस्. टी. सी., पुणें)

इ. स. १९२३ मध्यें मी पुणें येथील नेटिव्ह जनरल लायब्ररीचा (पुणें नगर-वाचन-मंदिराचा) मुख्य ऑनररी सेक्रेटरी होतों. लायब्ररीचा पंचाहत्तरावा वाढदिवस माझ्या सूचनेवरून करण्याचें ठरलें. त्या दिवशीं अध्यक्षस्थानीं तात्यासाहेब होते! वाढदिवशीं पुण्याच्या ज्ञानप्रकाशांत केळकरांच्या राजकारणावर टीकात्मक लेख माझ्या सहीवर प्रसिद्ध झाला होता! लायब्ररीच्या वाढदिवशीं सायंकाळीं माझें भाषण झाल्यावर केळकरांचें भाषण झालें. नंतर आम्ही खालीं ग्रूप-फोटो काढण्यासाठीं गेलो. फोटो काढण्यास जात असतांना केळकरांनीं मला जरा बाजूला बोलावून सांगितलें, "बापट, मी तुमचा ज्ञानप्रकाशमधील आजचा लेख वाचला. तुम्ही होतकरू लेखक आहांत; परंतु माझ्यावरील टीकेंत तुम्ही कोठे चुकत आहांत हें मी तुम्हांस सांगतों" असें म्हणून थोडक्यांत त्यांनी तत्कालीन राजकारणाचा आढावा घेऊन माझी चूक माझ्या नजरेस आणून दिली. त्यानंतर मुंबईस गिरगांवांत ब्राह्मणसभेंत त्यांची व माझी गांठ कांहीं सार्वजनिक प्रसंगीं पडली. त्या वेळीं माझी विचारपूस त्यांनी केली. माझी आठवण त्यांना राहिली कशी, याचें मला आश्चर्य वाटलें! त्यांचें मन मोठें व स्मरणशक्ति दांडगी हें निःसंशय होय.

❋

शिवाजीराव पटवर्धन

(डॉक्टर, अमरावती)

(१) बर्लिन येथील ऑलिम्पिक खेळाकरितां श्रीहनुमान व्यायाम-प्रसारक मंडळातर्फे खेळाडू पाठविण्याचें ठरलें होतें. त्याच्या तयारीकरितां मी मुंबईस गेलों होतों. तात्यासाहेबहि तेथें आले होते. पुढील राजकारणाच्या दृष्टीनें ऑलिम्पिक खेळांमध्यें हिन्दुस्थानी खेळ दाखविणें किती आवश्यक आहे हें त्यांना पटवून देण्याचा माझा मानस होता; पण त्यापूर्वीच ते होऊन म्हणाले, "हिंदुस्थानाचें नांव वैभवानें सर्वच गोष्टींत जगापुढे यावें याबद्दल मी शक्य तोंवर प्रयत्न करीत असतों. त्याची जबाबदारी खास महाराष्ट्रावर आहे; पण दुर्दैवानें महाराष्ट्रांत एकी नाहीं व फितुरी आहे. उलटपक्षीं बुद्धिमत्ता आहे, साहस आहे, पराक्रम आहे, त्याग आहे, सर्व कांहीं आहे; पण मत्सरानें व संशयी दृष्टीनें आपण एकमेकांकडे पाहतों. हा राष्ट्रीय दोष काढून टाकण्यास व खेळाडू वृत्ति निर्माण करण्यास व्यायामाचा प्रसार करणें हा एक उपाय आहे. व्यायामाच्या बाबतींत महाराष्ट्र आदर्शभूत कार्य करीत आहे, याबद्दल प्रत्येकास अभिमान वाटला पाहिजे." यानंतर मीं त्यांस टिळक-स्मारक

फंडांतून पांच हजार रुपये या कामास देण्याबद्दल विनंती केली. त्यांनीं ताबडतोब ती मान्य केली; पण म्हणाले, "अरे हो, त्या फंडाचा मी एकटाच मालक नाहीं. तुम्ही बाकीच्या विश्वस्तांची संमति मिळवा. रक्कम मिळेल." त्यांनीं दिलेल्या या उत्तेजनामुळेच ऑलिम्पिक खेळास आम्ही जाऊं शकलों हें मला कृतज्ञतापूर्वक कबूल केलें पाहिजे!

(२) मी एकदां पुण्यास त्यांना भेटण्याकरितां मुद्दाम गेलों होतो. कॉंग्रेसचा संबंध त्यांनी त्या वेळीं जवळजवळ सोडला होता. मी त्यांना म्हणालों, सध्यांचें राजकारण चुकीचें आहे असें वाटतें. टिळक-पक्षांतील सर्व लोकांना एकचित्त करून नवीन दिशेनें व सर्वांना पटेल अशा प्रकारें कार्यप्रवृत्त करण्यास पुनः एकवार आपण प्रयत्न करून पहावा. टिळकांनंतर सर्व लोक आपल्याकडून मार्गदर्शनाची व कर्तृत्वाची अपेक्षा करीत आहेत. यावर ते म्हणाले, "लोकमान्य टिळकांच्या दृष्टीनें लोक मजकडे पाहतात ही त्यांची चूक आहे. अहो, कोठें टिळक, कोठें मी! सूर्य आणि काजवा इतकें अंतर आम्हां दोघांत आहे. तुम्ही लक्षांत ठेवा कीं, सर्वच दृष्टीनें अद्वितीय असल्याशिवाय पुढारी म्हणून महाराष्ट्र कोणासहि मानण्यास व तो सांगेल तसें श्रद्धेनें वागण्यास तयार होत नाहीं. हा त्याचा दोष म्हणा, गुण म्हणा, आहे ही गोष्ट खरी; म्हणून असा पुढारी मिळेपर्यंत प्रत्येकानें आपआपल्या पुरतें पाहून कांहीं काळ तरी वागणें भाग आहे. आपल्या लोकांत व्यक्तिनिष्ठा जास्त आहे, तत्त्वनिष्ठा व खरी राजकीय दृष्टि आपल्यांत अजून निर्माण व्हावयाची आहे. महात्मा गांधींच्या कारकीर्दीत ती निर्माण होणें शक्य नाही. यांत सर्व कांही समजा."

❋

शंकर कृष्ण कुळकर्णी

(चिकोडी, बेळगांव)

माझे काका ती. सखारामपंत कुळकर्णी सदलगेकर वकील हे १९२१ मध्यें दिवंगत झाल्यानंतर आमच्या एका जमिनीच्या कज्जाचें अपील मुंबई हायकोर्टात चाललें होतें. सदरहू खटल्याचें काम माझे वडील ती. कृ. पां. कुळकर्णी यांनीं अनुक्रमें चिकोडी आणि बेळगांव या कोर्टात लढविलें होतें; पण प्रकरण हायकोर्टात गेल्यावर त्यांचा धीर सुटला. तात्यासाहेब आणि कै. सखारामपंत यांच्यांतील स्नेहसंबंध-ऋणानुबंध-ध्यानीं घेऊन त्यांनीं तात्यासाहेबांच्याकडे धाव घेतली! कार्यबाहुल्यामुळें त्या वेळीं तात्यासाहेब मुंबईस जाऊं शकले नाहींत; पण 'केस'चा सांगोपांग अभ्यास करून बॅरिस्टरांना देण्याकरितां त्यांनीं कांहीं मुद्दे काढून दिले; आणि हायकोर्टाचा निकाल काय होईल याचा अंदाज चिकोडीस त्यांनीं आम्हांला

लिहून कळविला. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, नंतर लौकरच हायकोर्टाचा जो निकाल आला, त्यांत आणि तात्यासाहेबांच्या अंदाजांत अर्थाच्या दृष्टीनें तिळमात्र फरक नव्हता!!



गोविंद गणेश वैद्य

(संपादक, 'वृत्तसार', वांई)

(१) तात्यासाहेबांना कामाकरितां कोणीहि चिट्ठी मागावी व त्यांनीं नाहीं म्हणूं नये असें जवळजवळ ठरून गेलें होतें. बनारस विश्वविद्यालय व पंडित मालवीय यांचें नांव सर्वश्रुतच आहे. वांईच्या एका धाडसी मुलाला पं. मालवीयांच्या मार्फत आपली कोठेतरी शिक्षणाची सोय व्हावी अशी इच्छा झाली. पण पंडितजीना परिचयपत्र कोण देणार? अशा विचारांत त्याला वाटलें कीं, आपण तात्यासाहेबांकडे जाऊन परिचय-पत्रिका मागावी व त्याप्रमाणें तो त्यांच्याकडे गेला. त्या मुलाजवळ त्यांनीं फारशी चौकशी केली नाहीं. मुलगा चुणचुणीत आहे असें दिसलें व आपल्या चिट्ठीनें काम होत आहे असें वाटून त्यांनीं तशी चिट्ठी दिली. सदरहू मुलानें चिट्ठी घेऊन बरोबर दोन सोबत्यांना घेऊन काशीला प्रयाण केलें. केळकरांच्या चिट्ठीला एवढा मान कीं, त्या मुलाची दुसरीकडे कोठें सोय करावयाच्या ऐवजीं पंडितजीनीं त्याला आपल्या घरींच ठेवून घेतलें व सर्व खर्च चालविला!

(२) कॉंग्रेसचें व तात्यासाहेबांचें पहिल्यापासून म्हणजे, म. गांधी प्रभावी झाल्यापासून, कधीं जमलें नाहीं. यामुळें महाराष्ट्रांतील तरुण टिळकानुयायी मंडळी फार नाखूष झाली होती. तात्यासाहेब भावनेच्या आहारी कधीच गेले नाहींत व पुष्कळ वेळां त्यांना लोकांचा रोष सहन करावा लागला. एकदां त्यांच्या मनांत आलें कीं, लोकांच्या गांठी घेऊन त्यांना आपली भूमिका सांगावी. त्याप्रमाणें ते वांईस आले व बरीच खाजगी चर्चा झाली. चर्चेनें वातावरण फार गरम झालें होतें. शेवटीं ते म्हणाले, "मी जसा आहें, तसा तुम्हांला पत्करावयाचा असेल तर पत्करा. मी नको असेन तर दुसरा पुढारी निवडा. केसरीचें धोरण तुम्हांला पसंत नाहीं तर दुसरा संपादक तुम्ही सांगाल तो मी नेमण्यास तयार आहें!" या उत्तरानें चर्चेला निराळेंच वळण लागलें. भावना व व्यवहार कशीं भिन्न आहेत यार्चे त्यांनीं मार्मिक परीक्षण केलें. मंडळी गप्प झाली तरी टिळकांच्या मागोमाग तात्यासाहेबांनींच महाराष्ट्राचें पुढारीपण टिकविलें पाहिजे ही कल्पना दूर होईना.

(३) कॉंग्रेसच्या प्राथमिक सभासदत्वाची अट प्रत्यहीं सूत कातणें व खादीचा पोषाख वापरणें, ही त्यांना कधींच मान्य नव्हती. या अटीला त्यांनीं

प्रथमपासूनच विरोध केला होता. पण शिस्त म्हणून काँग्रेसमध्यें असेंतोपर्यंत त्यांनीं ती पाळली होती. फेरनाफेरवादाच्या नौबती झडत होत्या व कौन्सिल-प्रवेश काँग्रेसनें मान्य केला होता. काँग्रेसच्या तरुण अनुयायांत यामुळें उच्छृंखलपणा फार वाढला होता. तात्यासाहेबांनाहि याची झळ लागली होती. अशाच एका प्रसंगी ते वाईच्या पटांगणावर व्याख्यानाला उभे राहिले. त्यांच्या पायाजवळच बसलेल्या एका श्रोत्यानें त्यांच्या धोतराला हात लावून पाहिला व तो एकदम उभा राहून म्हणाला कीं, "या प्लॅटफॉर्मवर तात्यासाहेबांना बालतां येणार नाही. त्यांचा पोशाख खादीचा नाहीं." तात्यासाहेब खवळून म्हणाले, 'माझा पोशाख खादीचा आहे. या माझ्या सांगण्यावर तुम्हीं विश्वास ठेवला पाहिजे. या अटीनें काँग्रेसमध्यें भांदूगिरी शिरली आहे व वाटेल त्या सोम्यागोम्यानें उठावे व कोणाचाहि उपमर्द करावा ही काँग्रेसची शिकवण नाहीं.' या उत्तराने सभा शांत झाली व केळकरांचें सुंदर, समर्पक व फार बहारीचें भाषण झालें.



गंगाधर शिवराम दामले

(बी. ए., एल्एल् बी., वकील, पुणें)

(१) दिनांक २५।१।४७ रोजीं आम्ही तात्यासाहेब यांच्या भेटीस गेलों असतां, त्या ठिकाणीं कांही मंडळी जमून सध्यांच्या काँग्रेस-सरकारच्या अव्यवस्थित राज्यकाराभाराबद्दल चर्चा करीत होती. त्या वेळेस एक गृहस्थ, "काँग्रेस-सरकारपेक्षां ब्रिटिश राजवट हजार हिश्शानें बरी" असें बोलून गेले. त्या वेळेस तात्यासाहेब उसळून म्हणाले, "अहो, काँग्रेस-सरकारला तुम्हींच निवडून दिलेंत, आतां नांवें ठेवून उपयोग काय? आपणच केलेला स्वयंपाक वाईट झाल्यास दोष कोणास द्यावयाचा?" नगरपालिकेच्या कारभारासंबंधींहि कोणी फार कडक टीका करूं लागला तर तें त्यांना नापसंत असें व तें वरील उदाहरणानेंच टीकाकाराची समजूत घालीत असत.

(२) परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर सुमारें ७–८ वर्षांपूर्वी श्री. मुळे नांवाच्या गृहस्थांनीं सतत तीन दिवस सायकल चालविण्याचा विक्रम केला होता. त्याचा सत्कार तात्यासाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. त्या वेळीं ते म्हणाले, "अशा तऱ्हेचा विक्रम करणें म्हणजे मनुष्यानें निसर्गाला आव्हान देऊन मी तुझ्यापेक्षां श्रेष्ठ आहें असें दाखविण्याचा हा प्रयत्न होय. अशा तऱ्हेचा प्रयत्न करणें म्हणजे नातवानें आजोबाच्या खांद्यावर बसून आपल्या हातानें त्याच्या मिशा उपटण्यासारखें आहे! निसर्ग हा अनादि म्हणून तो जरूरुड झालेला आजोबा म्हणावयास हरकत नाहीं. मनुष्याची मर्यादित शक्ति व आयुष्य यांचा

विचार केला असतां कोणत्याहि कालांतील मनुष्य हा निसर्गाच्या दृष्टीनें बालकच ठरतो." तसेंच सुमारें दीड वर्षापूर्वी त्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्याच तोतयाचें बंड या नाटकाचा प्रयोग भानुविलास नाटकगृहांत झाला होता. त्या वेळेला ते म्हणाले की, "आपण लिहिलेल्या नाटकाचा प्रयोग आपण स्वतः पाहतांना आपलें मूल आपणाकडे दुडदुड रांगत येताना जसा आनंद व्हावा तसा आनंद होतो."

❋

रं. न. होनप

(पुणें)

(१) सन १९४२ साली आचार्य प्र. के. अत्रे हे 'महाराष्ट्र साहित्य-संमेलना' चे अध्यक्ष झाल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शारदा-मंदिराच्या विद्यमानें अल्पोपाहार देण्यांत आला. त्या वेळीं साहित्यसम्राट् केळकर हे त्या संस्थेचे अध्यक्ष या नात्यानें उपस्थित होते. आचार्य अत्र्यांनीं साहित्यसम्राटांशी माझा त्यांच्या 'ब्रँडीची बाटली' या बोलपटांतील बगारामाची भूमिका माझ्यावरून घेतल्याचा उल्लेख करून, परिचय करून दिला. लगेच श्री. केळकरांनीं मी 'चित्रशाळे' त बारा रुपये पगारावर नोकरीस असल्याचें सांगितलें. ! यावरून कोण, कोठें, किती पगारावर नोकरीस आहे याची खडान् खडा बिनचूक माहिती त्यांस कशी असे याचें आश्चर्य वाटलें !

(२) संस्थानिक राहूं नयेत, संस्थानें नष्ट व्हावींत असें जेव्हां जेव्हां मी म्हणत असें त्या वेळीं त्यांना माझ्या म्हणण्याचा फार राग येत असे. ते म्हणत असत कीं, "तुम्ही चुकतां आहांत. संस्थानिकांच्या एकतंत्री व जुलमी राज्यकारभाराबद्दल मला तिटकारा येतो; पण त्यांच्या व्यक्तिपरंपरेबद्दल मला तिरस्कार वाटत नाहीं. एके काळीं त्यांच्या पूर्वजांनीं पराक्रम केले हें आपण स्मरलें पाहिजे. त्यांच्यासंबंधीं विनाशक बोलणें मला रुचत नाही. आपण कृतघ्न ठरूं असें वाटतें." मी म्हणत असें कीं, "संस्थानिक हे देशद्रोही आहेत, म्हणूनच इंग्रजांनीं त्यांना ठेवलें आहे. त्यांच्यासंबंधीं असंतोष माजाविणें हें आज आमचें कर्तव्य आहे असें मला वाटतें." तात्यासाहेब म्हणत कीं, "संस्थानिकांच्या राज्यकारभारासंबंधीं लोकांमध्यें असंतोष निर्माण करा, पण संस्थानांसंबंधीं तसें करणें उचित नाहीं, मला पटत नाहीं. कृतज्ञताबुद्धि कांहीं ठेवाल कीं नाहीं."

❋

रा. भ. देशमुख

(अध्यक्ष, कण्वशाखा, सोलापूर)

(१) सन १९२१ सालीं असहकारितेच्या ऐन धामधुमीच्या चळवळीत सरकारी शाळेवर बहिष्कार घालण्याची चळवळ सुरू झाली होती. त्या वेळीं येथील सरकारी शाळेवर (हायस्कूल) बहिष्कार घालून नवीन राष्ट्रीय शाळा काढण्याची चळवळ आम्ही सुरू केली व त्याकरितां प्रौढ विद्यार्थ्यांची सभा घेतली होती. कै. लो. टिळकांच्या मागें महाराष्ट्राचें राजकीय पुढारीपण तात्यासाहेब केळकर यांच्याकडे असल्यामुळें, त्यांचाहि सल्ला घ्यावा म्हणून आम्ही मुद्दाम त्यांना बोलाविलें होतें व त्याप्रमाणें त्यांनीं येऊन आम्हां विद्यार्थ्यांच्या सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. सदर सभेमध्यें घेतलेला बहिष्काराचा निर्णय तात्यासाहेबांना बिलकूल पसंत पडला नाहीं. त्यांनी स्पष्ट सांगितलें कीं, " शिक्षणाकरितां होत असलेला खर्च, जनतेनें कर-रूपानें भरलेल्या पैशांतूनच होत असतो; व सदर खर्चानें चाललेल्या शाळेवर बहिष्कार टाकणें, आत्मघातकीच होईल. शिवाय सदर बहिष्कारानें सरकारचें कांहीं नुकसान होणार नाहीं. झालें तर विद्यार्थ्यांचेंच होईल. " आणि पुढें झालेंहि तसेंच ! त्या वेळीं ज्या विद्यार्थ्यांनीं त्यांचा सल्ला मानला, त्यांनीं आपला शिक्षणक्रम पुरा करून ते आज समाजांत मानानें वावरत आहेत आणि ज्यांनीं भावनेच्या भरांत तो अवमानला ते आज आपला शिक्षणक्रम अपुरा राहिल्यामुळें कसेतरी दिवस काढीत आहेत. यावरून भावनेच्या भरांत तोडदेखला सल्ला न देतां, दूरदृष्टीनें योग्य व हितकारी सल्ला देण्याचें तात्यासाहेबांचें धोरण किती मोलाचें होतें याची आठवण होते.

(२) दि. ६-२-४३ ला तात्यासाहेबांचा मुक्काम सोलापुरास होता. येथील कण्वशाखासंघाचा चतुर्थ वाढदिवसाचा समारंभ त्याच दिवशी होता. सदर समारंभास तात्यासाहेब अध्यक्ष लाभल्यास संघाच्या कारकीर्दीत एक चिरस्मरणीय गोष्ट होईल या जाणिवेन, त्यांना अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल विनंती करण्याचें सर्वानुमतें ठरलें. येथील कण्वशाखासंघाचा त्यावेळचा अध्यक्ष मी असल्यामुळें सदर काम माझ्याकडे आलें. ब्राह्मण जातींतील एका लहानशा उपशाखेच्या संघाच्या समारंभाचें अध्यक्षस्थान तात्यासाहेबांसारखा अखिल भारतीय पुढारी कसा स्वीकारील या विवंचनेंतच त्यांना भेटून संघाचें कार्य व हेतु सांगून, अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयीं मीं विनंती केली व त्यांनींहि आढेवेढे न घेतां आत्मीयतेनें सदर गोष्टीस मान्यता दिली ! त्याप्रमाणें त्यांनी समारंभास हजर राहून संघटनेचा बहुमोल उपदेश करून संघ-कार्यकर्त्यांस उत्तेजन दिलें. यामुळें जनता-संघटनेच्या कामीं लहानमोठेपणाचा विचारहि न करतां तात्यासाहेब हे सर्वसाधारण जनतेस कसे कार्यप्रवीण करीत असत, याचा प्रत्यय आला. वरील संघाचें अध्यक्षस्थान स्वीका-

रून तात्यासाहेबांनीं येथील कण्वबंधूंस उपकृत करून ठेवलें असून, त्यांचीच राजकीय मतप्रणाली बहुसंख्येनें कण्वबंधु आचरीत आहेत.



भि. गो. भिडे

(व्यवस्थापक, गीताधर्ममंडळ, पुणें)

(१) तात्यासाहेब हे गीताधर्ममंडळाच्या स्थापनेपासून त्याच्या मृत्यूपर्यंत गीताधर्ममंडळाचे अध्यक्ष होते. मंडळाच्या १९२८ सालच्या वार्षिक सभेंत कै. भिडेशास्त्री यांनीं प्रचारक तयार करण्यासाठीं वर्ग काढावा आणि विद्यार्थ्यांस मासिक शिष्यवृत्ति द्यावी, असा प्रस्ताव मांडला. भिडेशास्त्री यांनी विद्यार्थ्यांस शिक्षण देण्याचें मान्य केलें. त्यांचा आग्रह पाहून तात्यासाहेबांनीं तो प्रस्ताव मान्य केला आणि अनुमान-पत्रकांत शिष्यवृत्तीची रक्कम संमत करून घेतली. सभेचें काम संपल्यावर तात्यासाहेब म्हणाले, "शास्त्रीबुवा ! ह्या कामी तुमचे श्रम आणि मंडळाचे पैसे वाया जातील; शिष्यवृत्तीसाठीं येणारा विद्यार्थी प्रचारक होणार नाही; ज्याला ह्या कार्याची हौस असेल तोच तयार होईल व तो शिष्यवृत्तीची अपेक्षा ठेवणार नाहीं." भिडेशास्त्री यांना प्रचारक तयार होतील अशी दृढ आशा वाटत होती; म्हणून त्यांनीं मंडळाच्या खर्चानें शिष्यवृत्त्या देऊन विद्यार्थी ठेवून घेतले आणि त्यांना न्याय, वेदान्त व गीता यांचें शिक्षण देण्यासाठीं अतिशय श्रम घेतले. परंतु विद्यार्थी टिकून राहिले नाहींत. वर्ष सहा महिने राहून कंटाळून निघून जात. तरी भिडेशास्त्री यांनीं निराश न होतां सात-आठ वर्षे शक्य ते प्रयत्न केले. त्या कामीं मंडळाचे पांच-सहा हजार रुपये खर्च झाले; पण एकहि प्रचारक तयार झाला नाहीं. शेवटीं शेवटी हौसेनें शिकणारा एक विद्यार्थी मंडळाकडून शिष्यवृत्ति न घेतां थोडेंबहुत शिक्षण घेऊन तयार झाला आणि तोच सांप्रत गीता-प्रचार करीत आहे. ह्याप्रमाणें तात्यासाहेबांचें अनुमान अक्षरशः खरें झालें.

(२) १९२४ सालीं मंडळ स्थापन झालें; पण सार्वजनिक संस्थेचे हिशेब कशा पद्धतीनें ठेवावे लागतात याची आम्हांस कांहींच माहिती नव्हती. तसेंच जमाखर्च, अंदाजपत्रक व हिशेबतपासणी यांचीहि कल्पनाच नव्हती. मंडळाची काळजी म्हणून तात्यासाहेबांनीं त्या सर्व गोष्टी आम्हांस नीट समजावून सांगितल्या, आणि मंडळ सरकारांत नोंदविण्यासहि सांगितलें. त्यांच्या विश्वासाचे श्री. स. वि. बापट यांनाच त्यांनी प्रथम हिशेब-तपासणीस पाठविले. त्यांच्याकडून आम्हांला सर्व माहिती मिळाली; आणि त्याप्रमाणें सर्व गोष्टी आजवर चालू आहेत. अशा आत्मीय वृत्तीनें ते सार्वजनिक संस्थांकडे पहात असत.

(३) तात्यासाहेबांनीं 'गावरान गीता' नांवाचें एक लहानसें पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. त्यांत गीतेंतील तत्त्वज्ञान अगदीं खेडवळ माणसालाहि कळावें म्हणून तें अत्यंत सोप्या भाषेंत लिहिले आहे. त्याची एक प्रत त्यांनीं गीता-धर्म मंडळाच्या ग्रंथसंग्रहाकरितां पाठविली. कांहीं दिवसांनीं समक्ष भेटींत प्रस्तुत लेखकाला त्याबद्दल अभिप्राय विचारला. "पुस्तकाची भाषा सुबोध व सोपी आहे, पण त्यांत अद्यापि कांहीं शब्द थोडे दुर्बोधित राहिले आहेत," असा अभिप्राय प्रकट करतांच ते म्हणाले, "होय! ते माझ्याहि लक्षांत आले आहेत. दृढाभ्यासामुळें ते त्यांत घुसले आहेत. पुढील आवृत्तींत ते मी काढून टाकीन." केवढा हा प्रांजळपणा!



बाळूकाका कानिटकर

(बी. ए., सेवक-सेवानंद, पुणें)

तात्या नि मी दोघांच्या राजकीय भूमिकांत फार फरक. पूर्वसंस्कार व स्वभावभिन्नता हें कारण असावें. पण त्यामुळें खाजगी प्रेमसंबंधांत कधींहि बाध आला नाहीं. इतर मोठ्यांच्या बाबींतहि हा अनुभव आला असता तर किती छान झालें असतें! पण तो तसा आला नाहीं. तात्यांच्या मनाचा मोठेपणा या एकाच गोष्टीवरून उत्तम सिद्ध होतो. माझ्यावर प्रसंगविशेषीं कित्येक सज्जनांकडून तीव्र आघात होत असत. त्यावेळीं स्वतः तात्यासाहेबांनीं, आमचे सर्व मतभेद विसरून, केवळ माझ्या सद्बुद्धीवर विश्वास ठेवला व अत्यंत दिलदारपणानें माझा बचाव केला. खरोखर त्यांचें स्मरण पुण्यदायक वाटतें!



धों. के. जोगळेकर

(बी. ए., एलएल्. बी., वकील, चाळीसगांव)

(१) तात्यासाहेब चाळीसगांव येथें आले असतांना त्यांनीं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेला भेट देऊन बौद्धिक घेतलें. या संघाच्या जागेच्या पलीकडे एक मोठा रस्ता टाकून पुढें 'राष्ट्रसेवादला'चें पटांगण होतें. तेथें स्वयंसेवक जमले होते व तिरंगी ध्वज होता. तेथेंहि भाषण करावें अशी इच्छा दलप्रमुखांनीं दर्शविल्यावरून ते तेथे गेले. भाषण थोडा वेळच केलें. ते म्हणाले, "येथें दल-स्थानावर अहिंदु जर येत नसतील तर 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' व 'राष्ट्रसेवादल' या दोघांनीं आपआपले ध्वज एके ठिकाणीं लावून एके ठिकाणीं जमावे. दोघांनीं निरनिराळे कार्यक्रम करून वंदेमातरम् पद मात्र एकत्र म्हणावें." तात्यासाहेबांची समन्वयदृष्टि येथें प्रत्ययास आली, कारण ते समन्वयवादी होते.

(२) पुणें येथें टिळकभक्तांची सभा असो, विचारविनिमय असो अगर हिंदुसभेच्या बैठकी असोत, तात्यासाहेब उपस्थित असावयाचे. वयमानपरत्वें पुढारीपण सोडण्याचें ठरविलें तरी महत्त्वाच्या बैठकींत उपस्थित राहून ते धीर देत, उत्साह वाढवीत व मार्गदर्शन करीत. एका खाजगी सभेंत ते सद्गदित होऊन म्हणाले, "पुढाकार घ्या, कार्य करा, नुसतें बोलूं नका; कार्य करणाराचें मी ऐकेन. इतकेंच काय पण त्याच्या पायाची मातीहि मी कपाळाला लावीन!" केवढी ही नम्रता!

(३) पुण्यास सन १९४७ ऑगस्टला लो. टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांचे भाषण व्हावयाचें होतें. अध्यक्ष तात्यासाहेब होते. ध्वजगीत झालें; अध्यक्षांची सूचना होऊन अध्यक्ष स्थानापन्न झाले. व्याख्यात्यांचें व्याख्यान सुरू होण्यापूर्वीच त्या व्याख्यानाला एका तरुण हिंदुत्वनिष्ठानें विरोध केला. पोतदार यांचें भाषण व्हावयाचेंच आहे, तेव्हां तेच विरोधकास समर्पक उत्तर देतील, म्हणून तात्यासाहेबांनी तो विरोध आढेवेढे घेऊनच होऊं दिला. पोतदार यांनीं व्याख्यानास सुरुवात केली. व्याख्यान रंगलें; तों मध्येंच स्वातंत्र्यवीर सावरकर आले. लोकांनीं त्यांचा जयजयकार केला. व्याख्यान संपत आलें. श्रोत्यांनीं मोठ्या आवाजानें स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं भाषण करावें अशी इच्छा आरडून ओरडून प्रदर्शित करण्यास सुरवात केली. तात्यासाहेब रागावले, लाल झाले. श्रोत्यांनीं सभा ताब्यांत घ्यावी हें त्यांना खपलें नाहीं. अध्यक्षाचा अधिकार त्यांनीं गाजविला. ते म्हणाले, "स्वातंत्र्यवीर सावरकरांचें व्याख्यान उद्यां स्वतंत्र व्हावयाचेंच आहे. तरी तें संपूर्ण ऐकण्याची संधि उद्यांच तुम्हांला मिळणार आहे. आज आतां सावरकर भाषण करणार नाहींत." स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं उठून जेव्हां तेंच सांगितलें तेव्हां मग श्रोते शांत झाले! सभाप्रसंगीं तात्यासाहेब शिस्त काटेकोरपणानें पाळीत. सभेची सुरवात निश्चित वेळेलाच व्हावयाची व तात्यासाहेब वेळेवर उपस्थित असावयाचेच. एकदोन प्रसंग असेच आठवतात कीं, सभा संपत आल्यावर श्रोत्यांनीं स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें भाषण व्हावें असा त्यांनी आग्रह धरावा, तेव्हां "हा मी (अध्यक्ष) चाललों! होऊं द्या भाषण" असें बजावावें व त्यामुळें श्रोते ताळ्यावर यावे. आपण स्वतः शिस्त पाळून श्रोत्यांनाहि ते शिस्त पाळावयास लावीत. तात्यासाहेब जितके लोकरंजक तितकेच कडक शिस्तीचे भोक्ते होते.

❋

भा. कृ. प्रधान

(डॉक्टर, खडकी, पुणें)

तात्यासाहेबांच्या घरीं त्यांच्या चिरंजिवाच्या लग्नांतील मेजवानीनिमित्त निमंत्रित मंडळी जमली होती. पंगत संमिश्र म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर, सर्व जातींची

एकच अशी होती. सोवळें नेसलेले ब्राह्मण व ओवळे ब्राह्मणेतर शेजारीं शेजारीं बसले होते! तात्यासाहेबांचा मित्रपरिवार फार मोठा. त्यांत साहित्यिक तसेंच राजकारणी पुरुषहि होते. पंगत फारच रंगली. कोणीं कांहींतरी बोलावें, त्यावर तात्यासाहेबांनीं समयसूचक कोटी करावी व मग प्रचंड हशा पिकावा, असें चाललें होतें. जेवणाच्या शेवटीं तात्यासाहेबांनीं सर्वांपुढे दक्षिणेचा पैसा ठेवला. तेव्हां एक ब्राह्मणेतर म्हणाले, "अहो तात्यासाहेब, मी मराठा आहें, दक्षिणा घेत नाहीं." त्यावर तात्यांनी चटकन उत्तर दिलें, "अहो, आजपर्यंत होतात मराठे. आतां ब्राह्मणांच्या पंक्तीला बसून बाटलांत! आतां तुम्ही ब्राह्मणच! तेव्हां दक्षिणेवर तुमचा हक्क आहे!"



कृष्णाजी वासुदेव पुरंदरे

(इतिहास-संशोधक, पुणें)

(१) भारत-इतिहास-संशोधक मंडळाच्या एका संमेलनप्रसंगीं मीं एक संशोधनात्मक निबंध वाचला. त्यांत बरींच पत्रें उपयोगांत आणिलीं होतीं. तात्यासाहेब संमेलनप्रसंगीं बहुधा हजर असत आणि त्या वेळीं संशोधनात्मक, चर्चात्मक व संकलनात्मक वाचले जाणारे निबंध ते आस्थापूर्वक व बारकाईनें अवलोकन करीत. तो निबंधहि त्यांनीं बारकाईनें ऐकला असावा. तो छापला न जातां माझ्याजवळ पडून होता. पुढल्या वर्षी मीं दुसरा निबंध वाचला व त्यांत पहिल्या वर्षाच्या निबंधांत उपयोगांत आणिलेलें एक पत्र सामील केलें. निबंधावर चर्चा झाली; तेव्हां तात्यासाहेबांनीं नेमकें तें पत्र मागील वर्षी अमुक निबंधांत मीं उपयोगांत आणिल्याचें सांगितलें! ही त्यांची अपूर्व स्मरणशक्ति पाहून मी अगदीं चकीत झालों.

(२) मराठेशाहींतील सामाजिक परिस्थिति समजून घेण्याकडेच त्यांचा विशेष कल असे. त्यामुळें संशोधनपूर्वक लिहिलेले सामाजिक निबंध ते अत्यंत लक्षपूर्वक ऐकत. मीं त्या काळच्या 'कुणबिणी' संबंधीं प्रकाशित व अप्रकाशित पत्राधारें एक निबंध वाचला व त्यावर तोंडी बरीच चर्चा केली. त्या लिखाणांत व चर्चेंत अश्लील समजला जाईल असा भाग आला, म्हणून कांहीं सोवळ्या प्रेक्षकांत चुळबूळ सुरू झाली; पण निबंधाच्या शेवटीं जी चर्चा झाली त्यांत तात्यासाहेबांनीं एकंदर माझ्या निबंधावर चांगलें मत दिलें व समाधान व्यक्त केलें. याघरून शास्त्रीय विषयांत अश्लील म्हणून मुरड घालणें त्यांना पसंत नव्हतें असें म्हणण्यास चिंता नाहीं.



कृ. श्री. खांडेकर

(बी. ए., बी. टी., अमरावती)

१९४६ च्या फेब्रुवारी महिन्यांत तात्यासाहेबांचें "सुधारणा, सुख व सदाचार" हें पुस्तक मी वाचीत असतां माझ्या अल्पमतीनुसार दोन सूक्ष्म प्रमादस्थळें मला त्यांत आढळलीं. पण सदसद्विवेकबुद्धि जागृत होऊन दुसरें मन म्हणालें, "तुझेंच ज्ञान विपरीत असेल." या द्वंद्वानें मला अखेर ग्रंथकारांचा कौल घेण्याची प्रेरणा दिली. तदनुसार त्यांस पत्र लिहून उत्तराची सविनय अपेक्षा केली. उत्तर येणार याविषयीं शंका नव्हती; आणि खुद्द तात्यासाहेबांनी स्वहस्ताक्षरांतच स्वाक्षरीचें पत्र पुढीलप्रमाणें पाठविलेलें वाचून मजसारख्या सामान्य माणसास जो आनंद झाला व साश्रुनयन होऊन मला जी त्यांच्या उदारमनस्कतेची कृतज्ञतापूर्वक प्रतीति आली तिचें वर्णन मला यथार्थतेनें करतां येणें शक्य नाहीं. तें पत्र असें:

॥ श्री ॥ पुणें, १०–३–४६

"कृ. सा. वि.

चुका दाखविल्या त्या मान्य आहेत. योग्य वेळ येईल तेव्हां सुधारतां येतील. चुका कळविल्याबद्दल आभारी आहें. –न. चिं. केळकर"

❋

गोविंद दत्तात्रय अभ्यंकर

(तात्यासाहेबांचे विशेष परिचित, पुणें)

(१) दुसऱ्या गोलमेज परिषदेहून तात्या विलायतेहून नुकतेच परत आले होते. माझ्या वडिलांचे व तात्यांचे एक समान स्नेही श्री. बाबूराव भिडे, आय्. सी. एस्. हे त्या वेळीं पुण्यास को. ऑ. सोसायटीचे रजिस्ट्रार होते. तात्यांच्याबरोबर मनमोकळेपणानें गप्पा मारण्याची संधि अनेक सरकारी वरिष्ठ अंमलदारांना मनापासून हवी असे. श्री.भिडे यांच्याच सूचनेवरून आमच्या घरीं धुंदुरमासाच्या जेवणाचा बेत ठरला होता. जेवणानंतर मंडळी इकडच्या तिकडच्या गप्पांत अगदीं तल्लीन झाली होती. बोलण्याचा विषय अर्थात् गोलमेज परिषद हाच होता व त्यांत म. गांधीचें धोरण व त्यांची त्या परिषदेंतील भूमिका हा तात्यांच्या बोलण्याचा मध्यबिंदु होता. मला स्मरतें तें असें कीं, तात्या, गांधींच्या एकंदर भूमिकेबद्दल म्हणाले कीं, इतरांनीं जमवीत आणलेले सर्व बनाव व एकमुखी मागणीचे सर्व प्रयत्न यशाच्या पायरीपर्यंत आलेले, वाया गेले. गांधींची भूमिका काय होती तें स्पष्टपणें उमजेच ना. गांधींच्या वागण्यानें गोलमेज परिषदेचा विचका झाला असाच तात्यांच्या बोलण्याचा एकंदर सूर होता.

(२) तात्यांच्या कांहीं खाजगी कामासाठीं ते मुंबईस आले होते. रात्रीं जेवणानंतर कांहीं प्रतिष्ठित मंडळी भेटण्यासाठीं आली. 'सह्याद्रि' मासिक निघणार असल्याचें जाहीर झालें होतें. मंडळींनीं या नवीन मासिकाचा उद्देश व धोरण काय असें विचारलें. तात्या म्हणाले, " आमच्या ऑफिसमध्यें मंडळी पुष्कळ आहेत. चांगलें ग्रंथालय तयार केलें आहे. छापण्याची घरची सोय आहे. मंडळींनी खूप वाचावें, आवडीच्या विषयावर खूप लिहावें. बाहेरचे लेख न घेतां सुद्धां एक चांगलें विवेचक मासिक कां चालूं नये? हाच विचार मनांत येऊन मी हें मासिक केवळ आमच्या संपादक मंडळीकडून चालवणार आहें." थोडा वेळ थांबून ते पुढें माझ्याकडे वळून म्हणाले, " पण गोविंदा ! हें बघ, किर्लोस्करांना वाटतें, मीं तें त्यांच्या मासिकांना स्पर्धा करण्याच्या ईर्षेनेंच काढलें आहे. या टीकाकारांच्या हे कसें लक्षांत येऊं नये कीं, मला त्यांच्याशीं स्पर्धा करण्याची जरूरी काय?" तात्यांचे हे उद्गार निघत असतांना त्यांच्या चर्येवर चीड व सात्त्विक संताप यांच्या छटा स्पष्टपणें दृग्गोचर होत होत्या !

(३) नूतन मराठी विद्यालयांत प्रो. नारळकर यांनीं विद्यार्थि-भांडार चालविलें आहे. अनेक प्रसंगांनीं तात्या या संस्थेंत येत असत. या भांडाराच्या फायद्यांतून बांधलेल्या इमारतीचें उद्घाटन करण्याकरितां व्यापारी जगांतला प्रतिष्ठित अध्यक्ष आम्हांला हवा होता. गु. नारळकर व मी तात्यांच्याकडे गेलों. त्यांनीं आम्हांला दोन नांवें सुचविली. एक श्रीमंत प्रतापशेठ व दुसरे शेठ मनमोहनदास रामजी. या दोघांनाहि तात्यांनीं आमच्यातर्फे आमंत्रणाचीं पत्रें स्वतः लिहिली. प्रथम प्रतापशेठ यांना लिहिलें. त्यांनीं नकार दिला. नंतर शेठ मनमोहनदास रामजी यांनीं विनंती मान्य केली. त्यांच्या नांवाच्या उल्लेखाची समारंभाचीं आमंत्रणें सगळीकडे रवाना झालीं. समारंभाच्या आदल्या दिवशीं संध्याकाळीं शेठजींची तब्येत नादुरुस्त झाल्यानें ते येऊं शकत नाहींत अशी तार आली ! आम्ही सर्वजण अगदीं गोंधळांत पडलों. रात्रीं तात्यांच्याकडे जाऊन झाला प्रकार त्यांना कळविला व असाहाय्य मुद्रेनें त्यांच्याकडे पाहात राहिलों. क्षणार्धांत तात्या म्हणाले, " मी तरी खाली प्रेक्षकांत बसणारच होतों. आतां स्टेजवर अध्यक्षांच्या खुर्चीतच बसेन. झालं ना?" शेवटीं हा समारंभ तात्यांच्या हस्तें झाला व त्या दिवशींचें त्यांचें आयत्या वेळेचें भाषण फारच मनमोकळें, खेळीमेळीचें व हृदयस्पर्शी झालें !

(४) शिक्षण-प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाची सभा चालूं होती. सभेंत एका विषयावरील चर्चेच्या अनुरोधानें वातावरण बरेंच गरम झालें व त्या भरांत डॉ. मुळे (सोलापूर) व म. म. दत्तोपंत पोतदार यांच्यांत बरीच शब्दाशब्दी चालूं झाली. अध्यक्षाचें काम तात्याच करीत होते. तात्यांनीं चर्चा थांबविण्याचा प्रयत्न केला; पण प्रकरण थांबण्याचें लक्षण दिसेना. तात्या संतापानें चिडीला

जाण्याच्या बेतांत होते. पण तेवढ्यांत आत्मसंयमन करून व प्रसंगावधान राखून "कायदेशीर सभा संपली, तुमचें खाजगी बोलणें वाटेल तसें व वाटेल तितकें चालू द्या" असें त्या दोघांना सांगून त्यांनीं पगडी काढून ठेवून एकदम खासगी विनोदी संभाषण सुरू करून एकंदर सभेचा नूर अजीबात पालटून टाकला!



स. के. नेऊरगांवकर

(बी. ई., म्युनिसिपल इंजिनियर, पुणें)

(१) तात्यासाहेब यांचा अध्यक्ष व सभासद या नात्यानें पुणें नगरपालिकेशीं अनेक वर्षें संबंध होता; परंतु त्या कारणास्तव त्यांनी कोणतेंहि वैयक्तिक काम स्वतः करून घेतलें नाहीं, त्याकरितां दुसऱ्यास भीड घातली नाहीं. हें उदाहरण माझ्या मतें फार दुर्मिळ आहे. नगरपालिकेतील कोणत्याहि नोकरास त्यांनीं आपल्या स्वतःच्या कामाकरितां त्यांच्या घरीं बोलाविल्याचेंहि माझ्या ऐकिवांत किंवा पाहण्यांत नाहीं. फार काय, मरणापूर्वी एक वर्ष त्यांच्या स्वतःच्या घराच्या रिव्हिजनच्या कामासाठीं ते स्वतः सामान्य अर्जदाराप्रमाणें नगरपालिकेंत आले होते! वास्तविक त्यांनीं नुसता घरून निरोप पाठविला असतां तरी त्यांचें काम सहज झालें असतें. तात्यासाहेब त्या दिवशीं नगरपालिकेत आलेले पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. नगरपालिकेचे सभासद डॉ. ढमढेरे त्या वेळीं तेथें हजर होते. त्यांनीं रिव्हिजन कमिटीच्या ऑफिसमध्यें चलण्याचा त्यांना आग्रह केला; परंतु तेथें माझ्या अगोदर कांहीं नागरिक येऊन बसले आहेत, त्यांना बाजूस ठेवून मी पुढें जाणें इष्ट नाहीं, असें म्हणून ते तेथेंच आपली पाळी येण्याची वाट पहात बसले! या गोष्टीवरून त्यांचा भिडस्त स्वभाव, स्वतःस लावून घेतलेली शिस्त व दुसऱ्याबद्दलची जाणीव दिसून येईल.

(२) दुसरें महायुद्ध सुरू झाल्यानंतर जपानचा हल्ला हिंदुस्थानवर येईल अशी जेव्हां भीति वाटूं लागली, तेव्हां त्याला प्रतिकार करण्याकरितां सर्व ठिकाणीं हवाईहल्लाप्रतिबंधक संस्था निर्माण झाल्या. त्याचप्रमाणें पुणें शहरातर्फे नागरिकांची संरक्षक-समिति स्थापन होऊन त्यांत पुण्यांतील वजनदार सद्गृहस्थांचा समावेश झाला होता. या समितीचें अध्यक्षपद तात्यासाहेब यांना देण्यांत आलें होतें. तात्यासाहेब हे त्या वेळीं सार्वजनिक कार्यांतून पूर्णपणें निवृत्त झाले असूनहि देशावर आलेला प्रसंग जाणून त्यांना अध्यक्षपद स्वीकारण्याची केलेली विनंती त्यांनीं अमान्य केली नाहीं. या समितीच्या सभांना ते नियमितपणें हजर राहून मार्गदर्शन करीत असत. या समितीच्या कार्याकरितां नगरपालिकेतर्फे मला त्यांजकडे पुष्कळ वेळां जावें लागत असे.

त्या वेळीं त्यांजकडे नेलेल्या कामांचा निकाल अगदी अल्पावधींत व सर्वांना मान्य होईल अशा रीतीनें ते करीत. या कार्याकरितां वर्गणी गोळा करण्याचा एकदां प्रश्न निघाला. त्या वेळीं प्रत्येक सभासदानें गांवांतील त्याच्या ओळखीच्या श्रीमंत नागरिकांकडून वर्गणी आणावी असें ठरलें. रा. ब. नायडू वगैरे मंडळींनीं त्यांत भाग घेतला होता. आश्चर्याची गोष्ट कीं, तात्यासाहेब यांनीं स्वतः त्यांच्या माहितीच्या गृहस्थांकडे या कामाकरितां आपण होऊन जाण्याचें ठरविलें. तात्यासाहेब यांचें वय, दर्जा व अधिकार लक्षांत घेतां हें काम त्यांनी करावें अशी इतर सभासदांची मुळींच अपेक्षा नव्हती; परंतु तात्यासाहेब यांनी स्वतः होऊन तें काम पत्करल्यामुळें सर्वच कामास चांगला रंग आला.

(३) सार्वजनिक काम करतांना राजकीय पक्षांतील मतभेद तात्यासाहेबांनीं आपल्या कार्याच्या आड कधींच येऊं दिले नाहींत. सन १९३८ सालीं ते पुणें नगर-वाचन मंदिराचे अध्यक्ष होते, व त्या वेळी मी चिटणीस होतों. त्या वेळीं श्री. बाळासाहेब खेर, श्री. मावळकर वगैरे कॉंग्रेसपक्षाच्या मंत्र्यांना वाचनमंदिरांत बोलवावयाचें ठरलें. त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें प्रत्येक वेळेस हजर राहून, पाहुण्यांचें स्वागत करून, त्यांच्याबद्दल गौरवपूर्ण भाषणें करून, संस्थेस त्यांनीं मोठी मदत केली.

(४) गेल्या वर्षी ते आळंदीस श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या समाधीच्या दर्शनास मुद्दाम गेले होते. त्यांच्याबरोबर श्री. अण्णासाहेब ढमढेरे वगैरे तीन-चार मंडळी होती. त्या वेळी त्यांनीं देवालयांत सर्व ठिकाणी हिंडून माहिती घेतली. अर्थात् तात्यासाहेबांचा ज्ञानेश्वरीचा अलीकडील व्यासंग लक्षांत घेतां या भेटीस विशेष महत्त्व होतें. तात्यासाहेब जात्या भावनाप्रधान कमी. परंतु त्या वेळीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांबद्दल बोलत असतांना त्यांच्या मनांतील सुप्त भावना ते लपवूं शकले नाहींत. त्या वेळीं तेथें हजर असलेल्या मंडळींपैकी त्या दिवशीं एकाचें कोर्टात कांहीं काम होतें. त्यास अनुसरून दुसरे एक गृहस्थ म्हणाले, "बघा, तुम्ही आज आळंदीला आलांत, आज तुमचें काम फत्ते होईल." यावर तात्यासाहेब एकदम म्हणाले, "अरे, श्रीज्ञानेश्वरमहाराजांपाशीं असली क्षणिक व नाशवंत गोष्ट कोणीं मागूं नये. शाश्वत सुख व आनंद देणारे ते समर्थ आहेत. तें त्यांच्याजवळ मागूं या."



ग. दा. टिळू

(एम्. ए., पनवेल)

राष्ट्रीय सभेंत कौन्सिल-बहिष्काराचा ठराव नुकताच पास झाला होता. बहिष्काराच्या युक्तायुक्ततेबद्दल झालेल्या वादाच्या रणधुमाळींत सर्व वातावरण

धुंद झालें होतें. ठराव पास झाला खरा; पण महाराष्ट्राच्या तर्ककर्कश व युयुत्सु वृत्तीला तो मुळींच पटण्यासारखा नव्हता. पण विरोधाचें रान उगीच उठवावयाचें नाही, म्हणून डेमोक्रॅटिक पक्षातर्फे जाहीर झालेल्या उमेदवाऱ्या परत घेण्याचें व लोकांना सर्व गोष्टी समजावून देण्यासाठी व्याख्यानांचे दौरे काढावयाचें ठरलें. या योजनेला अनुसरून तात्यासाहेब पनवेल येथें आले. त्यांना म्युनिसिपालिटीतर्फे मानपत्र देण्यांत आलें. सभेमध्यें मानपत्र वाचून दाखविण्यांत आलें व त्याची एक प्रत तात्यासाहेबांना अर्पण करण्यांत आली. त्या मानपत्रामध्यें सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यांत सुधारणा या गोष्टीचा उल्लेख होता. मानपत्रांतील इतर मतप्रणालीशीं न जुळणारा असा हा उल्लेख तात्यासाहेबांच्या घारीसारख्या तीक्ष्ण नजरेंतून सुटणें शक्यच नव्हतें. मानपत्राला उत्तर देतांना तात्यासाहेबांनी बरोबर याच गोष्टीवर बोट ठेवून म्हटलें कीं, "कौन्सिल-बहिष्काराचा वांझोटा वाद आज उकरून काढण्याची मला इच्छा नव्हती व मानपत्रांत उल्लेख नसता, तर त्याचा निर्देश करण्याचें मी टाळणार होतों. पण एकीकडे तुम्हांला सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण सुरू व्हावयास पाहिजे व स्थानिक स्वराज्य सस्थांचा कारभार सुरळीत चालावा म्हणून ऐनजिनसी कायद्यांतच तुम्ही सुधारणा करूं पाहतां; पण दुसरीकडे ज्या विधिमंडळांत हे कायदे घडविले जातात, त्या विधिमंडळावर बहिष्कार घालण्यास तुम्ही पाहतां, या विसंगतीला म्हणावें तरी काय? आपल्या मनाप्रमाणें गोष्टी व्हावयास पाहिजे असतील तर शक्यतों जास्त शक्तिकेंद्रें हस्तगत करून घ्या, म्हणजे नुसता दुबळा आशावाद प्रकट करीत बसण्याची पाळी येणार नाही. मिळालेली सत्ता वापरूनच दुसरी सत्ता परकीयांपासून हिसकावून घेण्याचे सामर्थ्य येतें." अशा रीतीनें सुमारें एक तासभर कौन्सिल-बहिष्काराचा फोलपणा दाखविणारें व अधिकारक्षेत्रें काबीज करण्याची आवश्यकता प्रतिपादन करणारें सुश्राव्य, तर्कयुक्त व परिणामकारक भाषण तात्यासाहेबांनीं केलें. त्यांचें हें आवेशयुक्त व मार्मिक भाषण कित्येक दिवस लोकांच्या कानांत घुमत होतें.

द. वा. चाफेकर

(बी. ए., एम्. बी. बी. एस्., गदग)

तात्यासाहेब यांना आम्हीं दि. २५–१०–१९३७ सालीं गदग येथील आमच्या मराठी वाङ्मयप्रेमी मंडळातर्फे मानपत्र देण्यासाठीं हुबळीहून आणविलें होतें. त्यांच्या त्या वेळच्या दौऱ्यांत गदगला यावयाला त्यांना दुपारचीच वेळ फक्त शिल्लक होती.

मंडळाच्या आवारांत उघड्यावर ऐन बाराच्या उन्हांत मंडळी त्यांची वाट पहात बसली होती. गदगच्या मराठी मंडळाच्या आद्य संस्थापकांपैकीं मी एक असल्यानें मातृभाषा व मराठी मंडळ याबद्दल मला वाटत असलेला जिव्हाळा त्यांना ठळकपणानें दिसून आला. इतर सर्व मंडळी आपापल्यापरी झटत होतीच; पण या समारंभांतील विशेष जबाबदार व प्रमुख कोण हें त्यांस कळावें ही त्यांची इच्छा होती. म्हणून व्याख्यान देतांना एक समर्पक गोष्ट सांगून त्यांनी या गोष्टीचा उल्लेख केला. ते म्हणाले, "मंडळाच्या या समारंभांत सर्वच जण आस्थेनें भाग घेत आहेत हें मंडळींच्या सौजन्यास साजेसेंच आहे; पण मला येथें आल्यापासून प्रश्न पडला आहे तो हा कीं, या मंडळाची जिव्हाळ्याची संचालक मंडळी कोण असावी! यावरून मला एक माझ्या अनुभवाची गोष्ट आठवली आहे ती सांगतों. मला एकदां एका गांवीं नुसती तोडओळख झालेल्या एका गृहस्थांच्या घरीं लग्नाच्या पानसुपारीला जाण्याचा प्रसंग आला. मी माझ्या शिरस्त्याप्रमाणें अगदीं वेळेवर लग्नघरी गेलों, तों तेथें दहाबारा पुरुष मंडळी लग्नाचे पोषाक करून आल्या-गेल्यांचें स्वागत अगदीं अगत्यपूर्वक करीत होती. ही सर्व मंडळी सारख्याच दर्जाची दिसत असल्याने, घरचा मालक कोण याबद्दल मला कुतूहल उत्पन्न झालें. परत जातांना लग्नघरच्या मुख्य यजमानांना नमस्कार करून आपण पानसुपारीस येऊन गेल्याबद्दलची वर्दी त्यांना देऊन जाण्याचे माझ्या मनांत होतें. शेजारीं-पाजारीं विचारावें तरी पंचाईत; म्हणून मी इकडेतिकडे कांहीं गमक मिळतें का म्हणून पहात होतों; इतक्यांत मंडपाच्या लोक येण्याजाण्याच्या दारांतच कुणीतरी एक मोठा घाणेरडा धोंडा ठेवला होता. लोक त्याला चुकवून जात येत होते. कुणी घाईत अडखळतहि होते. आमच्या स्वागतार्थ उभी असलेली सर्व पगडीवाली मंडळीहि त्या धोंड्याला ओलांडून आली गेली. पण कुणी कांहीं त्याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. इतक्यांत साधा पोषाख केलेले एक गृहस्थ तेथून आले. त्यांनी तो धोंडा पाहतांच गर्जना केली, 'काय रे धोंडिबा! अरे, जायच्या यायच्या रस्त्यांत धोंडा कुणीं ठेवला आहे? लोक सारखे अडखळताहेत ते!' असें म्हणून त्या गृहस्थांनी स्वतः तो घाण धोंडा उचलून रस्त्यांतून बाजूला केला. मी लागलेंच उमजलों कीं, हे त्या घरचे यजमान म्हणून, आणि माझें तें अनुमान खरेंहि ठरलें! पुढें मी त्यांना नमस्कार करून व पानसुपारी घेऊन बाहेर पडलों."

पुरुषोत्तम दिनकर जोशी

(वाङ्मय-विशारद, मद्रास)

(१) तात्यासाहेब हे मला प्रत्यक्ष गुरुस्थानीं होते. टिळक महाविद्यालयां-

तील त्यांच्या शिष्यवर्गापैकीं मी एक आहें. विद्यार्थिवर्गावर त्यांचें फार प्रेम असे. असहकारितेच्या बहिष्कारप्रधान वावटळींत सरकारी व निमसरकारी शिक्षण-संस्था सोडून देण्याचा उपदेश त्यांनी तावातावानें केला नाही, व यासाठीं अनेकांचे कुत्सित आक्षेपहि त्यांनीं सहन केले. तरुण विद्यार्थ्यांच्या आयुष्याची हानि न होतां त्यांचा समाजास व राष्ट्रास अधिकांत अधिक उपयोग व्हावा याविषयींची त्यांची तळमळच या त्यांच्या थोरपणाच्या बुडाशीं होती. सल्ल्यासाठीं कोणी विद्यार्थी त्यांच्याकडे गेले, तर सर्व परिस्थितीचा विचार करून मग ते योग्य सल्ला देत. ते म्हणत कीं, " तुम्हांस शाळा मनापासून सोडावयाच्या असल्या तर माझ्या सल्ल्याची काय गरज ? शाळा-कॉलेजें सोडणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय करण्याची जबाबदारी बहिष्कार-प्रचारक पुढाऱ्यांवर आहे व महाराष्ट्रापुरती ती जबाबदारी त्यांनी पारहि पाडली. खासगी व सार्वजनिक रीतीनेंहि ते स्पष्ट सांगत कीं, " माझें स्वतःचें मत काय आहे तें माझीं मुलें मीं टिळक महाविद्यालयामध्यें घातली आहेत यावरून तुम्ही समजा."

(२) १९२१–२२ मध्यें गांधीजी पुण्यास आल्यावेळीं शनिवारवाड्यासमोरील गांधीजींच्या व्याख्यानानंतर अध्यक्षस्थानावरून तात्यासाहेबांनीं त्यांस बजावलेंच होतें कीं, ' खादीनेंच काय, पण गोणपाटानें स्वराज्य मिळेल असें आम्हां महाराष्ट्रियांस कोणीं पटवून दिलें तर आम्ही गोणपाटाचेंहि कपडे वापरूं ! ' ही एक-वस्त्राची प्रथा त्यांस मनापासून रूढ करावयाची होती असें दिसतें. अलीकडे एकदां ते म्हणाले, निदान उन्हाळ्याच्या दिवसांत तरी पुण्यास अधिक कपडे घालणें म्हणजे शरीरावर तो केवळ जुलूमच होय.

(३) तात्यासाहेब व नानासाहेब वैद्य या दोन महापुरुषांशीं संबद्ध असलेला एक प्रसंग मला स्मरतो. कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या दौऱ्यांत तात्यासाहेब एकदां कल्याणास आले होते. प्रकट व्याख्यानाप्रमाणेंच विचारविनिमय, चर्चा, प्रश्नोत्तरें असे किंचित् अनौपचारिक कार्यक्रम कार्यपूर्तीच्या दृष्टीनें तात्यासाहेबांना अधिक आवडत ही गोष्ट सर्वश्रुतच आहे. कै. श्री. बाबूराव फडके यांच्या माडीवर ही अनौपचारिक बैठक भरली होती व गांवांतील प्रतिष्ठित नागरिक, कार्यकर्ते उपस्थित होते. कल्याण येथील पदवीधर नागरिक कै. श्री. बापूसाहेब भिडे यांचा कल काँग्रेसकडे म्हणजे त्या वेळेच्या कट्टर किंवा नाफेर पक्षाकडे होता. त्यांच्या मतें तात्यासाहेब निरुत्तर होतील किंवा निदान अडचणींत पडतील असे कांहीं प्रश्न तात्यासाहेबांस ते विचारीत व त्यांस तात्यांकडून योग्य उत्तरेंहि मिळत. या सभेंत रा. ब. नानासाहेबहि होतेच. थोडीं प्रश्नोत्तरें झाल्यावर नानासाहेब म्हणाले, " बापूसाहेब, तुम्ही नरसोपंतांशीं वादविवाद करतां आहां हें लक्षांत आहे ना ? त्यांना निरुत्तर करणें तुम्हांस जमणार नाहीं. तें कर्म कठीण आहे."

(४) १९२५ मध्यें मी मद्रासला आलो. त्यानंतर पुण्यास गेलों म्हणजे प्रत्येक वेळीं तात्यांची गांठ घेतल्यावांचून राहावत नसे. त्यांच्या घरीं केव्हांहि गेलो व तेव्हां ते कितीहि कामांत व्यग्र असले तरी चार शब्द मोकळेपणानें बोलून स्वतःच्या कुटुंबांतील बऱ्याच दिवसांनीं भेटलेल्या लहान माणसाची चौकशी करावी तशी चौकशी करून एका क्षणांत आपुलकीची भावना निर्माण करीत !

(५) येथील महाराष्ट्र-मंडळ-ट्रस्टतर्फे त्यांना मानपत्र देण्यांत आलें. हा ट्रस्ट स्थापित करतांना ट्रस्टडीडमध्यें अशी एक अट अंतर्भूत करण्यांत आली होती कीं, स्थापनेपासून तीन वर्षांच्या अवधींत जर इमारत बांधून किंवा खरेदी करून झाली नाही, तर तोंपर्यंत जमा झालेली रक्कम महाराष्ट्रांतील एकाद्या उपयुक्त संस्थेस देणगी म्हणून देण्यांत यावी. पुरेशा पैशाच्या अभावीं इमारत-खरेदीचें काम मागें पडलें आहे असें जेव्हां तात्यांना समजलें; तेव्हां त्यांस फार वाईट वाटलें, थोडा रागहि आला व दिरंगाई केली म्हणून त्यांनी सभासदांस दोषहि दिला. त्यांनीं स्वतःची म्हणून १०० रु. ची देणगी ट्रस्टला दिली व त्यानंतर टिळक-पर्स-फंड-ट्रस्टच्या व्याजांतून आणखी २०० रु.ची देणगी दिली. यानंतर लवकरच सध्यांची महाराष्ट्र-भवनाची इमारत खरेदी करण्यांत आली. याचें श्रेय तात्यासाहेबांना आहे !

श्री. ना. हुद्दार

(बी. ए., संपादक, 'ग्रामीण', नागपूर)

(१) मी पुणें-टिळक-महाविद्यालयांत शिकत असतांना गु. केळकर वरच्या वर्गांना शिकवीत असल्यानें त्यांच्या तासांना उपस्थित राहण्याचें भाग्य माझ्या वर्गाच्या विद्यार्थ्यांना केवळ २-३ वेळांच लाभलें ! त्यांच्या वर्गाला विद्यार्थी चुकूनहि अनुपस्थित नसावयाचा; किंबहुना त्यांच्या वर्गांतील मुलांची संख्या दिढी-दुपटीनें वाढलेली दिसे. कारण इतर कॉलेजचेहि विद्यार्थी त्यांचें वर्गांतील व्याख्यान ऐकण्यास अत्यंत उत्सुक असत ! त्यांच्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांत नितान्त आदर व प्रेमभाव विशेषत्वानें वसत होता याचें हें निदर्शक होय.

(२) टिळक-महाविद्यालयाच्या वार्षिक संमेलनप्रसंगीं उत्तम गोष्ट सांगणाऱ्याला पांच रुपयांचें एक बक्षीस गु. केळकरांच्या वतीनें देण्यांत येई. एका वेळीं हें बक्षीस मला मिळालें. तेव्हां त्या किंमतीचीं त्यांचींच पुस्तकें त्यांच्याकडे जाऊन मीं आणलीं. हीच माझी त्यांची प्रत्यक्ष भेट व ती अत्यंत स्फूर्तिदायक मला झाली.

(३) पुण्याच्या माझ्या विद्यार्थि-जीवन-कालांत (१९२२-१९२६) गु. केळकरांचें कोणतेंहि जाहीर भाषण मी सहसा चुकवीत नसे. या कालांत देशबंधु

दास, पं. मोतीलाल नेहरू, श्रीनिवास अयंगार, राजगोपाळाचारियर, सरोजिनी नायडू इत्यादि अनेक सुप्रसिद्ध भारतीय पुढारी येऊन गेले व त्यांची गु. केळकरांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर भाषणे झाली. परंतु प्रत्येक प्रसंगीं मुख्य वक्त्यापेक्षांहि गु. केळकरांचेंच अध्यक्षीय भाषण अधिक समर्पक, मुद्देसूद, बुद्धीला पटणारें, प्रभावशाली व मार्मिक झालेलें आढळून येई. कोणताहि विषय सुबोध व मनोरंजक रीतीनें विद्यार्थ्यांना वा श्रोत्यांना समजावून सांगण्याची त्यांची शैली अनुपम होती.

(४) गु. केळकर नेहमीं म्हणत, "कोणत्याहि विषयाचा तुम्हांला अभ्यास करावयाचा असेल तर त्या विषयावर तुम्ही पुस्तकच लिहूं लागा. कोणाहि व्यक्तीला निदान एक आत्मवृत्ताचें तरी पुस्तक खास लिहितां येईल." कोणाहि होतकरू लेखकाला त्यांचे हे बोल खचित अमोल व नेहमी स्फूर्तिदायक वाटतील.



द. रा. कुलकर्णी मास्तर

(लो. टिळक-पंथाचे अनुयायी, सातारा)

(१) तात्यासाहेब हे केवळ पैशामुळे बड्या बनलेल्या व्यक्तींचा सहवास शक्य तों टाळीत ही गोष्ट माझ्या येथें घडलेल्या पुढील प्रसंगावरून लक्षांत राहिली. १९४१ सालीं बॅ. जम्नादास मेहता लो. स्व. पक्षातर्फे मध्यवर्ती असेंब्लीच्या पोटनिवडणुकीस उभे राहिले व आपले काँग्रेसी प्रतिस्पर्धी श्री. जेधे यांचा पराभव करून निवडूनहि आले. त्यानंतर त्यांनीं भोपटकर, नलावडे वगैरे मंडळीसह आमच्या जिल्ह्यांत आभार-प्रदर्शनार्थ दौरा काढला होता. दिनांक १९-४-४१ रोजीं त्यांच्या जिल्ह्यांतला पहिला मुक्काम व सत्कार-समारंभहि माझ्याच घरीं होता. शहरांतीलहि आणखी दोन-तीन निमंत्रणें होतीं. पैकीं एक फार मोठ्या धनाढ्य व्यापारी व्यक्तीचें होते. माझ्यायेथील कार्यक्रम संपताच सदर गृहस्थांकडे जाण्याबद्दल मंडळी सुचवूं लागली. प्रथम तात्यासाहेबांनी तिकडे दुर्लक्षच केलें. पण मंडळी फारच आग्रह करूं लागली, तेव्हां ते म्हणाले, "मला कशास आतां तिकडे नेतां? थोडी विश्रांती घेतों. त्यांच्या राजवाड्यापेक्षां येथेच आमच्या कुलकर्णी मास्तरांची ही मठीच मला अधिक बरी वाटते. तुम्ही जाऊन या."

तात्यासाहेबांच्या या टोलवाटोलवींतील रहस्य बॅ. जम्नादासांच्या चटकन लक्षांत आलें. त्यांनीं मग आपल्या धारदार विनोदाच्या पद्धतीनें त्या धनाढ्य व्यक्तीच्या वैभवाचें आणि विशेषतः वैभव-प्रदर्शनाच्या विशिष्ट पद्धतीचें मोठें गमतीदार वर्णन केलें. मंडळींत खूप हंशा पिकला. पण शेवटीं मंडळींनीं तात्या-

साहेबांना तिकडे आग्रहानें नेलेंच ! तात्यासाहेबांच्या स्वभावांतील भिडस्तपणानें त्यांच्या इच्छेवर विजय मिळविला खरा; तथापि स्वभावाची मूळची ठेवण येथें व्यक्त झाल्यावांचून राहिली नाहीं.

(२) तीस वर्षांपूर्वी तात्यासाहेबांच्या स्फूर्तीमुळें मी मास्तरकी सोडून व्यापारांत शिरलों व त्यांचा आशीर्वाद घेतला. त्यांनीं केलेला उपदेश सतत डोळ्यापुढें ठेविला. त्यामुळेंच आर्थिक व सामाजिक दृष्टीनेंहि मी थोडेंबहुत यश मिळवूं शकलो. पुढें त्यांचेंच उदाहरण आदर्श मानून दोन वर्षांपूर्वी चालू व्यवसायातून समाधानपूर्वक पूर्णपणें निवृत्तहि झालों. त्या वेळीं हें सारें वृत्त तात्यासाहेबांना मी कृतज्ञतापूर्वक निवेदन करूं शकलों ही माझ्या भाग्याचीच गोष्ट होय.

❋

वि. दि. बेलापूरकर

(मॅनेजर, सुलाखे-पेढी, मुंबई)

(१) टिळक-महाविद्यालयांत असतांना गु. तात्यासाहेब आम्हांस 'सिव्हिक्स' विषय शिकवीत असत. शिकविण्यासाठी विषयाची सर्व तयारी पूर्ण करून ते येत व नवीन नवीन प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें वाचून, त्यांतील उतारे वाचून दाखवून, विषयाची मांडणी उत्तम करीत असत. विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व-कला वाढविण्यासाठीं चढाओढी होत, त्यांत त्यांनीं परीक्षकाचें काम मोठ्या आस्थेनें केलें होतें.

(२) विद्यार्थ्यांत नवीन आवड उत्पन्न होण्यासाठीं ते नवीन विषयांची माहिती देत. वक्तृत्वाबरोबर त्यांनी टिळक-महाविद्यालयांत गोष्ट सांगण्याची चढाओढ सुरूं केली होती. ते म्हणत, " गोष्ट तरी सांगतां आली पाहिजे. ती एक कला आहे. चांगली गोष्ट सांगणाराला मी एक बक्षीस ठेवणार आहे व परीक्षा मी घेईन. " त्याप्रमाणें त्यांनीं गोष्ट सांगण्याची चढाओढ करवून परीक्षकाचें काम स्वतः केलें. विद्यार्थ्यांच्या सर्व गोष्टी ऐकल्या व पहिल्या नंबरास चांगलें बक्षीस दिलें.

(३) एकदां 'प्रॉपगँडा' या शब्दाचा अर्थ काय असें त्यांस मीं विचारलें. गुरुवर्य म्हणाले, " हें पाहा, रानांतून गुरें परत फिरण्याची वेळ अजून व्हावयाची आहे; अशा वेळीं एकदम वळवाचा पाऊस यावा आणि मग गुराख्याची कशी स्थिति होतें ! सगळ्या गुरांना तो हांकीत सुटतो, काठी मारमारीत असतो, आडमुठ्याला मारतो, पळणाऱ्याला मारतो, न पळणाऱ्याला मारतो, धांदलींत स्वतःलाहि काठी लागते; ही जी त्याची धांदल तो प्रॉपगँडा म्हणाना ! "

❋

सदाशिव आबाजी दांडेकर

(सहसंपादक, 'गोरक्षण', उपाध्यक्ष, सत्कार्य-सेवा-समाज, मुंबई)

(१) १९२९ सालीं जंजिऱ्याच्या दिवाणांच्या कुटिल नीतीमुळें हिंदु समाजाचे पाऊणशे पुढारी पकडले गेले व ४-५ महिन्यांच्या अडवणुकीनंतर त्यांना सोडून देण्यांत आलें. या प्रकरणीं तारा, सभा, निषेध इत्यादि आवश्यक चळवळ केली; त्यानिमित्त तात्यासाहेबांस मी भेटलों. त्या वेळेस ते मुंबईस जावयाचे होते. मुंबईस सरदारगृहांत भेटण्यास त्यांनीं मला सुचविलें. त्याप्रमाणें मी माझ्या मित्रासह गेलों. देशभक्त जम्नादास मेहताहि तेथे आले होते. दुपारीं भोजनोत्तर वामकुक्षीसाठी मंडळी जरा आडवी झाली होती. जम्नादास मेहता वाचीत होते. त्यांच्याजवळ मीं जंजिऱ्याविषयीं प्रश्न काढला. त्यांनी लगेच तात्यासाहेबांस त्याविषयीं विचारलें. ते म्हणाले, " मी विचार करतों आहे काय योजना करावी ती; पण या कामीं तुमचाहि सल्ला घेणें योग्य होईल." हें बोलणें होत आहे तोंच आडव्या झालेल्या मंडळींतून घोरण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. तेव्हां विनोदानें जम्नादास तात्यासाहेबांस म्हणाले, " A brahmin is useless after dinner." हें ऐकून तात्यासाहेब थोडे हंसले व ताबडतोब म्हणाले, " अहो, तुमच्या म्हणण्यांत ' Before dinner a brahmin is useful ' असा अर्थ निघतो त्याची वाट काय ! " त्यामुळें तेथील सर्व मंडळींत हंशाच हंशा पिकला ! तात्यासाहेबांनीं शक्य ती खटपट मी या कामीं करीन असें आम्हांस सांगितलें व आम्ही शांत मनानें घरीं निघून आलों.

(२) 'सत्कार्य-सेवासमाजा'च्या श्रीवर्धन येथें भरलेल्या पंहिल्या संमेलनांत असें ठरलें कीं, भावी पिढीस योग्य वळण देतां यावें म्हणून विविध कार्यें करण्यास एक इमारत बांधण्यांत यावी व त्यास ' श्रीमंत पेशवे मंदिर ' असें संबोधावें. या कामी समाजानें जें सल्लागार-मंडळ योजिलें यांत तात्यासाहेबांस नेमण्यांत आलें व तसें त्यांना पत्रानें कळविण्यांत आलें. नंतर ९।६।४७ रोजीं मी पुण्यास त्यांच्याकडे गेलों. माझें नांव सांगून ' श्रीमंत पेशवे मंदिर ' हे शब्द मी उच्चारतांच त्यांनीं सांगितलें ' तुमचें पत्र पोंचलें आहे; बोला, स्मारकाची रूपरेषा काय योजिली आहे ? ' त्यावर मीं त्यांना योजना तपशीलवार सांगितली. नंतर ते म्हणाले, " हा प्रयत्न अगदीं योग्य आहे. भरीव असें कांहीं चांगलें करीत रहा; स्मारकाकरितां केवळ स्तंभ अगर पुतळा यांत मात्र जनतेचा पैसा खर्च करूं नका. " एका मोठ्या गृहस्थानें, एक-दोन लाख रुपये जमवा व मोठा स्तंभ अगर पुतळा पेशव्यांच्या वैभवास साजेल असा उभारा, असें सांगितलें असल्याचें मीं तात्यासाहेबांच्या निदर्शनास आणलें. तेव्हां ते म्हणाले, " मग त्यांनाच सांगा, हें काम तुम्हीच उचला. " अर्थात् फुकटचा हा परोपदेश होता. असो. श्रीवर्धनविषयीं

त्यांनी चौकशी केली. म. दत्तो वामन पोतदार कुलाबा जिल्ह्यांतील बिरवाडी गांवचे असल्यानें, या कार्यांत त्यांचा सल्ला आम्ही प्रामुख्यानें घेणार आहों असें सांगतांच ते अधिक प्रसन्न झालेले दिसले व तसें त्यांनीं नंतर स्पष्टपणें बोलूनहि दाखविलें.

(३) अष्टांग वैद्यक विद्यालयाचे कार्यकर्ते वैद्यरत्न परांजपे यांच्यासमवेत मी तात्यासाहेबांकडे गेलों. भीति वाटत होती, आज भेट होईल कीं नाहीं म्हणून. कारण लगेच त्यांना एका सभेस जावयाचें होतें. भीतभीत घंटा वाजविली. 'वर या' असें आमंत्रण मिळालें. आनंद वाटला. "अव्याक्षेपो भविष्यन्त्यः कार्यसिद्धेर्हि लक्षणम्" ही उक्ति आम्हां उभयतांच्या तोंडून न कळत बाहेर पडली. कोणासहि मज्जाव नसणारें तें ऋषिआश्रमतुल्य स्वागत आमच्या हृदयांत अतिशय बिंबलें. आम्हीं आदरानें नमस्कार केला. 'श्रीवर्धन-दांडेकर' एवढे शब्द उच्चारतांच "काय, कोठवर कामगिरी आली?" असा प्रश्न त्यांनीं अत्यंत आस्थेनें केला. 'श्रीमंत पेशवे मंदिरास' बृहन्महाराष्ट्रीय जनतेनें जोरानें साह्य करावें म्हणून पुढाऱ्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध करावें अशी इच्छा आहे असें सांगितलें. "मीं या मंदिरास काय देणगी द्यावी तें अजून ठरविलें नाहीं" असें ते म्हणाले. स्वकर्तव्याची जाणीव त्यांच्यामध्यें कशी असे हें त्यायोगें सिद्ध झालें. आम्हीं सांगितलें, "आज आम्ही देणगीकरितां आलों नसून, आजचें कार्य पुढाऱ्यांच्या पत्रकाविषयीं आहे." नंतर पुढाऱ्यांचें पत्रक आम्हीं त्यांच्यापुढे ठेविलें. 'हें मला पूर्णपणें पसंत आहेच' असें म्हणून पत्रकावर सही केली. म. पोतदार व चौडेमहाराज यांच्या सह्यांच्या मध्यें त्यांनीं आपली स्वाक्षरी केली! त्यांचा तो विनय, प्रांजळपणा व सहृदयता पाहून त्या अत्यंत थोर पुढाऱ्याविषयीं आमच्या मनांत नितान्त आदर उत्पन्न झाला. यानंतर महत्त्वाच्या सभेस त्यांस जावयाचें आहे हें जाणून आम्ही त्यांस नमस्कार करून जलदीनें बाहेर पडलों.



पांडुरंग हरी देशपांडे

(आयुर्वेदाचार्य, पुणें)

(१) १९२१ चें भोर संस्थान प्रजापरिषदेचें पहिलें अधिवेशन हें दक्षिणी संस्थानांच्या प्रजा-चळवळीची सुरुवातच म्हणावयाचें. त्यांतून त्याचे तात्यासाहेब अध्यक्ष. संस्थानच्या हद्दींत सभाबंदीचा कायदा होता; पण तो मोडूनहि तात्यासाहेब आणि कै. वामनराव पटवर्धन यांनीं आधींच सभा केल्यानें त्यांच्यावर भोर-कोर्टांत खटला चालू होता. अशा स्थितींत भरणारें हें अधिवेशन! अर्थात् सर्व संस्थानवासियांना अत्यंत आतुरता वाटणें साहजिक होते. सभाबंदी चालूं असून

खटलाहि सुरू. अशा स्थितींत परिषद कशी पार पडते व तात्यासाहेबांची भूमिका काय राहते याबद्दलहि लोकांत मोठें कुतूहल होतें. तात्यासाहेब परिषदेच्या दिवशीं आल्यापासून सर्वत्र शांतता होती. स्वतः ते प्रशान्त होते. दुपारीं भोजनोत्तर वामकुक्षीकरितां ते हुडले. दरबारचे अधिकारी येऊन त्यांच्या उठण्याची वाट पाहात बसले. काय घेऊन आले असतील हे राजश्री म्हणून कार्यकर्ते चिंतातुर होते; पण चमत्कार निराळाच पडला. तात्यासाहेब उठल्यावर आदबीनें प्रणाम करून त्या अधिकाऱ्यानें "खटल्याचा निकाल वाचून दाखविण्यास आलों" म्हणून त्यांना सांगितलें. तें ऐकून तात्यासाहेब म्हणाले, "म्हणजे ! खटला चालला केव्हां ! निकालहि लागला इतक्या झटपट. आम्हांला त्याची कांहींच बातमी कशी नाही ! तर मग निकाल बहुधा उलटच असणार !" "नाहीं महाराज ! सुदैवानें आपण या खटल्यांतून दोषमुक्त होऊन सुटलांत, त्याचेंच निकालपत्र मी वाचून दाखवितों," अधिकारी सौजन्यानें म्हणाले. "वाः ! हा तर अजब चमत्कार ! स्वतःची जबानीहि द्यावी न लागतां ज्या खटल्यांतून सुटलों त्याचा निकाल ऐकणें मजेचेंच आहे" तात्यासाहेब हंसत म्हणाले. आरोपी युनिव्हर्सिटीचे पदवीधर असल्यानें ते हेतुपुरस्सर गुन्हा करणार नाहींत, हें दोषमुक्तीचें कारण देऊन भोर दरबारनें त्यांना सोडलें !! पण तात्यासाहेबांच्या व्यक्तिमत्वापुढें खरोखर संस्थानिकहि नमल्याचाच हा पुरावा होय.

(२) त्याच परिषदेच्या समारोपाचें तात्यासाहेबांचें भाषण चालूं होतें. त्या वेळेपर्यंत संस्थानच्या कारभाराचा वृत्तान्त (Administration Report) हातीं येऊं शकला नाहीं; पण भाषण सुरू करतां करतां एकदम कोणीं तरी त्यांच्या हातीं तो आणून दिला. वृत्तान्तावर आधीं काळजीपूर्वक वाचूनच जाहीर भाषण करावयास हवें असेंच कोणालाहि वाटणार. पण तात्यासाहेबांनीं उभ्या उभ्या तो चाळून अनेक विसंगति व दोष काढून त्यांचा आपल्या भाषणांत इतका खरपूस समाचार घेतला कीं, त्यांनीं जणूं आधीं अभ्यासपूर्वक त्याचें वाचन केलें होतें असेंच सर्वांस वाटलें !

(३) कामाचा तात्यासाहेबांचा उरक दांडगा हें महशूर आहे. प्रस्तुत लेखकानें १९३९ सालीं श्री. गोविंदराव टेंबे यांच्या षष्टयब्दपूर्तीच्या समारंभानिमित्त "गोविंदगुणगौरव" नांवाच्या ग्रंथाचें संपादन केलें. या ग्रंथाला तात्यासाहेबांनी प्रस्तावना लिहावी अशी त्यांची इच्छा होती. वस्तुतः गोविंदराव, मागील मराठीकरणाच्या चर्चेमुळें तात्यासाहेबांचे विरोधक. गोविंदरावांनीं आपल्या लेखन-भाषणांतून तात्यासाहेबांच्या विधानावर कडक टीकाहि केलेली. पण तात्यासाहेब खरे रसिक. एखाद्या मतभेदामुळें गोविंदरावांसारख्या श्रेष्ठ कलावानाच्या गौरवाला ते मागें घेणार नव्हते. विनंती करतांच त्यांनीं प्रस्तावना लिहिण्याचें कबूल केलें.

ते म्हणाले, "तुम्हीच या अमक्या दिवशी व मी सांगतो ते लिहून घ्या कसं." ठरल्याप्रमाणें गेलों तों तात्यासाहेबांनीं आदल्या रात्रींच स्वहस्तें सुंदर प्रस्तावना लिहूनहि ठेवलेली आणि त्यांत गोविंदरावांच्या गुणांची मुक्तकंठानें स्तुति केलेली त्यांनीं मला दिली. पुढें त्यांच्याच हस्तें सदर ग्रंथाचा प्रकाशन-समारंभहि झाला हे पुणेंकर रसिकांना विदित आहेच.

(४) प्रस्तुत लेखकानें श्री. सवाई गंधर्वांचा षष्ठ्यब्दपूर्ति-समारंभ घडवून आणला व 'सवाई-गंधर्व-ग्रंथ' प्रकाशित केला. या वेळीं तात्यासाहेबांना लेखनाची तसदी दिली नाहीं. पण प्रकाशनांच्या वेळीं भाषणास या म्हटलें! "कामें फार आहेत, आतां असल्या समारंभांना कंटाळलों आहें, माफ करा" असें ते म्हणाले. लेखक खट्टू झाला. एवढा समारंभ, डॉ. कुर्तकोटी अध्यक्ष आणि तात्यासाहेब बोलण्यास नाहींत हा केवढा बेरंग, म्हणून त्याला बरें वाटेना. पण त्यांचा स्पष्ट नकार असल्यानें इलाज चालेना. आतां शेवटचा प्रयत्न करून पहावा म्हणून त्याने समारंभाच्या वेळी श्रीमंत रानडे यांची गाडी त्यांजकडे पाठविली आणि चमत्कार असा कीं, भीड न लोटल्यामुळें तात्यासाहेब आले आणि अर्धा तासपर्यंत फार चटकदार बोलले!



ग. रं. कुलकर्णी हळदीकर

(बी. ए., एलएल. बी., वकील, कोल्हापूर)

(१) करवीर नगर-वाचन-मंदिराच्या ८० व्या वर्षासंबंधाचा पहिला हीरक-महोत्सव १९३२ सालीं श्रीराजाराम छत्रपतीच्या अध्यक्षतेखालीं झाला, तेव्हां तात्यासाहेब आले होते. त्या वेळीं त्यांनीं अनेक व्याख्यानें दिलीं. अनेकांनीं त्यांच्या स्वाक्षऱ्या, गांठी-भेटी, मुलाखती घेतल्या. सरस्वतीच्या कंठांतील हा मेरुमणि पाहून सर्वांस आनंद झाला; पण कांहीं विशिष्ट व्यक्तींनीं आपला निषेध व्यक्त केला! त्या वेळीं पुढील सुभाषिताची आठवण झाली –

उदितवति द्विजराजे कस्य न चित्तं परां मुदं धत्ते।
संकुचसि यत्कमल हर हर वामो विधिर्भवतः॥

(येथें 'द्विजराज' = चंद्र. श्रेष्ठ ब्राह्मण – हा श्लेष सुज्ञांच्या ध्यानांत येईल.)

(२) या उत्सवांत रात्रीं सुप्रसिद्ध गवई श्री. मंजीरखां, मास्तर कृष्णराव, श्री. अबदुल करीम यांचीं गायनें झालीं. मंजीरखां यांचें गाणें सुंदर व्हावयाचें. पण ऐन वेळीं थडीनें त्यांचा आवाज काम देईना व तानबाजीची व सुरेलपणाची पर्जन्यवृष्टि होईना. त्यामुळें श्रोत्यांची निराशा झाली. तात्यासाहेब गाणें ऐकण्यास मुद्दाम आले

होते. मीं त्यांस म्हटलें, "आज आपणांस खांसाहेबांचें गायन-वैभव पहायला मिळत नाहीं याबद्दल मला फार वाईट वाटतें." त्यावर तात्यासाहेब म्हणाले, "समुद्राचा अफाट दर्या मला दिसतो; फक्त लाटा येत नाहींत! गायनावरून मला एक कल्पना सुचते. आद्य वाणी प्रकट झाली ती प्रथम निःशब्द स्वरमय होती. निःशब्द स्वरमय वाणी म्हणजे संगीत व सशब्द वाणी म्हणजे वाङ्मय! सकाळीं आमची वाङ्मय-सेवा झाली; आतां गायनाने संगीतसेवा झाली. मिळून एकाच वाणीचीं दोन रूपे!"

(३) राजाराम कॉलेजमध्यें तात्यासाहेबांचें व्याख्यान डॉ. बाळकृष्ण यांनीं ठरविलें. तीन वाजल्यापासून कॉलेज-हॉल व त्याची ग्यालरी चिक्कार भरून गेली होती. प्रतिष्ठित नागरिक, प्रोफेसर्स वगैरे सर्व उपस्थित होते. या कॉलेजमध्यें तात्यासाहेब आज चाळीस वर्षांनीं येत होते. म्हणून जुना राजारामियन या नात्यानें आपल्या विद्याजननीच्या दर्शनास स्वतः तेहि उत्सुक झाले होते. तात्यासाहेब प्रवेश करतांच टाळ्यांचा प्रचंड गजर झाला. व्यासपीठावर चढून श्रोत्यांकडे तोंड करून ते उभे राहिले, तोंच गॅलरींतून अंडें टाकण्यांत आलें! व एकदम वातावरण अत्यंत गरम झालें. कांहीं हताश तर कांही हतबुद्ध झाले. अशा वेळीं स्वतः तात्यासाहेब धीरगंभीर मुद्रेनें उभे राहिले. हात उभारून श्रोत्यांना शांत राहण्यास ते सांगत होते. ज्या दिशेनें तें अंडें आलें तिकडे वर तोंड करून त्यांनीं दृष्टि लावली होती. अंडें कोठून आलें तें त्यांना समजलें. पण कोणीं टाकलें तें अर्थात् समजणें शक्य नव्हतें. एकदोन मिनिटांत शांतता झाल्यावर ग्यालरी-वरील कोपऱ्याकडे दृष्टि करून ते म्हणाले, "आपण जें मला आतां कांहीं दिलें तें पोंचलें! त्याचा मी स्वीकार करतों. आणखीहि कांहीं टाकावयाचें असलें तरी मी आपल्यापुढें तें टाकण्यास व मला घेण्यास सोपें जावें म्हणून हा पदर पसरतों!" असें म्हणून त्यांनी खरोखरच उपरण्याचा पदर पसरल्यासारखा केला! व ज्यानें अंडें टाकलें त्यानें जर आपलें नांव सांगितलें तर माझ्यावर व या सभेवर फार उपकार होतील. करितां नांव सांगावें." असें म्हणतांच वरून त्यानें आपलें नांव देसाई असें सांगितलें. तोंच तात्यासाहेब म्हणाले, "तुमच्या नीतिधैर्याची मी तारीफ करतों! कारण तुम्ही धैर्यानें पुढें आल्यानें या सर्वांवरील प्रसंग टळला व आतां तुमच्या-माझ्यांतलाच प्रश्न राहिला. तुमचें व माझें विद्याबंधूचें नातें. तेव्हां मी तुमची थोडी जरी सहानुभूति असली तरी गमाविण्यास तयार नाहीं. परंतु या पदार्थांचा मला उपयोग विलायतेंत जाऊनही झाला नाहीं. त्यापेक्षां एखादा मोठा पेढा फेकला असता तर मीं तो खाल्ला असतां व म्हटलें असतें कीं; आपली अघकृपा अशीच लाभो!" नंतर श्रोत्यांकडे वळून प्रसन्न मुद्रेनें पाहून ते म्हणाले, "असो; आता हा उद्वेगजनक प्रकार सोडून आतां ज्या आनंददायक

भावनेनें आपण जमलों आहों तिकडे वळूं." असें म्हणून त्यांनीं विषयाचा सुंदर प्रस्ताव करून उपमा, दृष्टान्त, विनोद इत्यादि युक्त असें सुंदर व्याख्यान दिलें.

(४) यानंतर १९३७ सालीं माझ्या 'बुद्धिबळ-क्रीडारत्नें' या पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याची त्यांना मीं विनंती केली. त्यावर "मला त्यांतील कांहीं कळत नसल्यानें प्रस्तावना लिहूंच शकत नाहीं" असें उत्तर आलें. त्यावर टिळकांनीं "सतारीचें पुस्तक" अभिप्रायास आलें असतां तज्ज्ञाकडून माहिती मिळवून अभिप्राय दिला होता, त्याची आठवण त्यांस देऊन केसरीच्या संपादकाची जागा सर्वज्ञतेची आहे, आपला अभिप्राय पाहिजे, असा आग्रह मीं धरला व तसें त्यांस लिहिलें. त्यावर त्यांनीं सुंदर अभिप्राय पाठवून देऊन "या पुस्तकाच्या संशोधनास मान्यता मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. वकील लोक जर अशा संशोधनाच्या कार्यांत वेळ घालवतील, तर ज्ञानांत भर पडून फुकट जाणाऱ्या रिकाम्या वेळाचें चीज होईल" असा वकीलवर्गास चांगला टोला त्यांनीं दिला होता.

❋

वि. रा. वेलणकर

(धनी, श्रीगजानन मिल्स, सांगली)

(१) १९३२ साल हें माझ्या आयुष्यांत फारच क्रांतिकारक गेलें. मजवर याच सालीं प्राणघातक हल्ला झाला. सखाराम मणसाराम, लल्लूभाई किलाचंद यांच्या पेढ्यांवर चमत्कारिक प्रसंग आले व त्यांत माझे ५६००० रुपये बुडाले. अशा तऱ्हेचे आघात झाले आणि मी एकटा असल्यानें माझें कांहीं बरेंवाईट झालें तर गजानन मिल्सचें काय होईल, इतक्या प्रयासानें निर्माण केलेल्या गजानन मिल्सची परंपरा कशी चालू राहील हा प्रश्न मला भेडसावूं लागला. माझी गिरणी लिमिटेड केली तर कसें काय होईल, याबाबत तात्यासाहेबांचा सल्ला घेण्यासाठीं मी त्यांच्याकडे गेलों. तात्यासाहेब म्हणाले, "विष्णुपंत, असे विचार तुमच्या मनांत यावे हें ठीकच आहे. कांहींतरी व्यवस्था असावी हेंहि ठीक आहे. तथापि लिमिटेड कंपन्यांची परंपरा अखंड चालते याचा तरी काय नेम! परंपरा राहणें याला समाजांत कर्तबगार लोकांचा भरणा लागतो. लिमिटेड कंपनी केल्यानें कदाचित् परंपरा चालेल, कदाचित् चालणारहि नाहीं. तेव्हा तो मार्ग तुम्हीं आचारावाच असें मी निश्चित म्हणूं शकणार नाहीं. तुम्ही आपल्या विवेकबुद्धीनें दुसरी कांहींतरी चांगली व्यवस्था करून ठेवा. पण माझ्या मृत्यूनंतर काय होईल याची निष्कारण काळजी करूं नका. या जगांत शाश्वत असें कांहीं नाहीं. आपण जिवंत असेपर्यंत स्वीकृत कार्य उत्तम तऱ्हेनें केलें, आपलें कर्तव्यकर्म चोख बजावलें, एवढी

जाणीव व समाधान मरतांना लाभलें, म्हणजे आपलें काम झालें; व अमका अमका मनुष्य अमक्या अमक्या गुणानें मरेपर्यंत यशस्वी झाला एवढें महाराष्ट्राच्या इतिहासकारांना नमूद करतां आलें म्हणजे आपल्या आयुष्याचें सार्थक झालें असें समजा. 'वेदान्त' म्हणतात तो हाच. ब्राह्मणास तर हें बाळकडूच आहे."

(२) १९३१ साली केसरी संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाच्या वेळीं केसरी-मराठ्याच्या ट्रस्टींनीं जो तीन लाख रुपयांचा स्वतंत्र ट्रस्ट केला, त्याबद्दल तात्यासाहेबांच्या ६१ व्या वाढदिवसाच्या दिवशीं मीं एक अभिनंदनपर पत्र त्यांना पाठविलें होतें. त्यासंबंधानें तात्यासाहेब मला म्हणाले, "विष्णुपंत, पैशाचा कांहीं प्रश्न मजसमोर आला कीं, मला तुमची आठवण होते. कारण माझ्या ६१ व्या वाढदिवसाच्या दिवशीं माझ्या अनेक गुणांबद्दल अभिनंदन करणारीं अनेक पत्रें मला आलीं; पण लोकमान्यांच्या पश्चात् केवळ दहा वर्षांत वर्तमानपत्रें चालवून त्यांतून पैसा निर्माण करून मीं तीन लाख रुपये बाजूस काढून त्याचा ट्रस्ट केला याबद्दल मला धन्यवाद देणारे जे फारच थोडे लोक आहेत त्यांत प्रमुखत्वानें तुम्ही आहांत. याचे कारण तुम्हांला उपजतच द्रव्यदृष्टि आहे. द्रव्य निर्माण करणें म्हणजे किती यातायातीची, श्रमाची गोष्ट आहे याची खरीखुरी जाणीव महाराष्ट्रांत फारच थोड्यांना आहे आणि यामुळेंच महाराष्ट्र द्रव्याच्या दृष्टीनें मागें पडला आहे. ही द्रव्यदृष्टि ज्या वेळेस बहुतांना येईल त्या वेळींच महाराष्ट्र सधन होईल. विष्णुपंत, तुमचें पत्र मीं प्रामुख्यानें माझ्या स्नेह्यांना दाखविलें, आणि म्हटलें, अशीं द्रव्योत्पादन करणारीं व द्रव्योत्पादन करणारांचें कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देणारीं माणसेंच महाराष्ट्राचा आर्थिक दृष्टीनें उद्धार करतील."

❋

रघुनाथशास्त्री कोकजे

(पंडित, तर्कतीर्थ, लोणावळें)

(१) चौदा वर्षांपूर्वीची गोष्ट. त्या वेळीं लेखक, कार्यकर्ता अथवा वक्ता यांपैकीं कोणत्याहि रूपानें माझें कार्य सुरू झालेलें नव्हतें. पण योगायोग असा कीं, त्या वेळीं विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झालेला माझा एक लेख वाचून तात्यासाहेब यांनीं मला एक विस्तृत पत्र पाठविलें. 'मराठींत प्राचीन शास्त्रांची दुर्दशा' या शीर्षकाचा माझा एक लेख एप्रिल १९३३ च्या विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध झाला होता. हा लेख तात्यासाहेबांच्या वाचनांत येतांच तत्परतेनें "विविधज्ञानविस्तार मासिकाच्या गेल्या अंकांत जुन्या शास्त्रांच्या दुर्दशेसंबंधाचा आपला लेख वाचला; तो मला फार आवडला," असा आरंभ करून त्यांनीं एक

विस्तृत पत्र मला पाठविलें. या पत्रांत "माझ्या मतें मीमांसादि षट्शास्त्रें व शिवाय साहित्यशास्त्र, गायनशास्त्र, वैद्यशास्त्र इत्यादि शास्त्रांवर मराठींत एकेक उत्तम ग्रंथ हवा. पुस्तकें तयार करण्याचें काम सहकारी पद्धतीनें कोणी अंगावर घेतल्यास तीं छापून काढण्याचें काम अंगावर घेण्यास मी तयार आहें. तरी एक वेळ तुमची माझी गांठ पडेल असें करा" इत्यादि मजकूर होता. माझ्यासारख्या अप्रसिद्ध व्यक्तीचा कोठें तरी प्रसिद्ध झालेला लेख राजकारणी प्रमुखवृत्तपत्र-संपादकाच्या अवलोकनांत यावा, त्यानें तो वाचून मजकडे पृच्छा करावी हें सर्व पाहून मी त्यांस त्वरित भेटण्यास गेलों. सुमारें दोन-अडीच तास मनमोकळी चर्चा झाली. राजकारण आणि संपादकीय व्यवसायांत वावरत असून प्राचीन शास्त्रांबद्दल तात्यासाहेबांनीं एवढी आस्था दाखविली हें पाहून त्यांच्याविषयीचा माझा आदर वरील पहिल्याच भेटींत दुणावला.

(२) जून १९४५ च्या पहिल्या आठवड्यांत पुण्यास एक विद्वत्परिषद भरविण्यांत आलेली होती. या परिषदेंत सनातनी आणि परिवर्तनवादी यांचा एकत्र वाद होणार असें प्रसिद्ध झालें होतें. परंतु परिवर्तनवाद्यांच्या प्रमुखांचें कोणत्याहि प्रकारें मत न घेतांच सर्व कार्यचक्रे हालूं लागलीं. वादाचे नियम कोणते आणि मध्यस्थ कोण याविषयीं अधिकृत माहिती मिळविण्याच्या मी केलेल्या प्रयत्नास यश आलें नाहीं. शेवटीं मला हा सर्व प्रकार अयोग्य वाटला म्हणून आमच्या पक्षांतील प्रमुखांची एक तांतडीची बैठक भरवून त्या परिषदेंत भाग घेऊं नये असा निर्णय एकमतानें केला गेला. अर्थात् दुसऱ्या दिवशीं मी आणि इतर परिवर्तनवादी पंडित कोणीच मंडपाकडे फिरकलें नाहीं. तात्यासाहेब या परिषदेचे एक प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांच्या-देखत जेव्हां आमच्या नव्या पक्षाची बाजू सावरण्यास कोणीच नाहीं असा प्रसंग येऊन ठेपला, तेव्हां 'त्या पक्षाचे पंडित आले नसले तरी मी स्वतःस परिवर्तन-वादीच समजतों,' असें स्पष्ट सांगून तात्यासाहेबांनीं आमच्या पक्षाची बाजू मोठ्या हिरीरीनें मांडली. परिवर्तनवादाचा या वेळीं त्यांनीं केलेला पुरस्कार मी कधींहि विसरणार नाहीं.

(३) गेल्या वर्षी श्रीरामनवमीला भोर-दरबारांत 'हिंदूंच्या अवनतीची मीमांसा' या माझ्या ग्रंथास तेथील राजेसाहेबांच्या हस्तें शंकराजी नारायण पारि-तोषिक मला मिळावयाचें होतें म्हणून मी भोरास गेलों होतों. तेथील त्रिधिमंडळाचे अध्यक्ष या नात्यानें तात्यासाहेबहि तेथें उपस्थित होते. दरबारांत आम्हां दोघांचीं भाषणें झालीं. त्यांत तात्यासाहेबांचेंच भाषण खरोखरी महत्त्वाचें व चिंतनीय होतें. असें असतां 'आज माझें भाषण मुख्य नाहीं; मुख्य भाषण पं. कोकजेशास्त्री यांचें होणार आहे,' असें त्यांनीं सांगितलें. दुसऱ्यास मोठेपणा

देण्याचें तात्यासाहेबांचें उदार धोरण प्रसिद्धच आहे. हा सर्व कार्यक्रम संपल्यानंतर तात्यासाहेब स्वतंत्र मोटारीनें पुण्यास जाणार होते. मलाहि पुण्यास लवकर जाणें अवश्य होतें म्हणून त्यांच्या मोटारींत जागा होईल काय हें विचारण्यासाठीं मी त्यांच्याकडे गेलों, तों त्यांनीच माझ्या पुण्यास जाण्याच्या सोई-विषयीं प्रश्न केला. माझा हेतु मीं सांगतांच 'अहो, हें मीच तुम्हाला विचारणार होतों,' असें म्हणून बरोबर निघण्याविषयीं सुचविलें. मोटारींत आम्ही दोघेच असल्यामुळें अनेक विषयांवर मनमोकळी चर्चा झाली. त्या वेळीं सर्व बोलणें अगदीं बरोबरीच्या नात्यानें चाललें होतें. स्वतःच्या मोठेपणाचा अभिमान न धरतां सामान्य माणसाशीं देखील बरोबरीच्या नात्यानें वागण्याच्या या त्यांच्या पद्धतीचा ठसा माझ्या अंतःकरणावर चिरकाल रहाणारा आहे.



नीलकंठ महादेव केळकर

(बी. ए., प्रसिद्ध चित्रकार, मुंबई)

(१) तात्यासाहेबांचे ज्येष्ठ चिरंजीव बापूसाहेब यांस शाळेंतील दिवसांत चित्रें काढण्याचा नाद होता व त्यांस तात्यासाहेबांचें प्रोत्साहन होतें. पण तो भाग केवळ सर्वच बाप आपल्या मुलांचें कौतुक करतात तशांत मोडेल. पण आम्हां चित्रकारांस, विशेषतः पळनिटकर बंधु, रावसाहेब पिंपळखरे, चिंतामणराव ओक, व मी स्वतः तात्यासाहेबांच्या सहानुभूतिपूर्वक साहाय्यानें उपकृत झालों आहोंत. तात्यासाहेबांना संगीत शास्त्राची बरीच चांगली माहिती होती, तसा चित्रकलेशीं तात्यासाहेबांचा दृढ परिचय नव्हता. चित्रकलेंतील अनेक पंथ व त्यांची स्पर्धा यांत त्यांनीं फारसें लक्ष घातलें नाहीं. परंतु पुण्यांत जें चित्रकार-मंडळ आज गेलीं अठरा वर्षें कार्य करीत आहे त्या महाराष्ट्र चित्रकार-मंडळास तात्यासाहेबांनीं टिळक-स्मारक-मंदिराची जागा वापरावयास देऊन, स्वतः सभासंमेलनांस हजर राहून मदत केली. ती मदत विस्तारशः चित्रकार-मंडळाचे मुख्य कार्यकर्ते रा. गोडबोले आपल्या आठवणींत नमूद करतीलच. फक्त एक वेळा 'हिंदी पद्धतीचें पुनरुज्जीवन आपणांस दुर्बोध वाटतें, वास्तवासारखीं चित्रें सर्वांस सुबोध वाटत असतां हे दुर्बोध कलेंतील प्रयोग फुकट होत आहेत,' इतपत वरवरची चर्चा तात्यासाहेबांनीं मजजवळ केली व मुंबईच्या स्कूल ऑफ आर्टचें धोरण 'मुक्तद्वार' अथवा कोणत्याहि चांगल्या पद्धतीचा पुरस्कार करण्याचें आहे हें ऐकून त्यांस समाधान वाटलें.

(२) १९३१ साली तात्यासाहेब दिल्लीच्या राजकीय वाटाघाटींसाठीं दिल्लीस गेले असतां तेथील महाराष्ट्र समाजापुढें त्यांचें भाषण झालें. मला व्हाइसरॉयचें

बक्षीस मिळून साऱ्या हिंदी चित्रकारांत 'प्रतिमालेखनां'त अग्रपूजेचा मान मिळाला, याबद्दल महाराष्ट्र समाजानें माझें अभिनंदन केलें. तें तात्यासाहेबांच्यातर्फे करविण्यांत आलें. त्या वेळचें भाषण तात्यासाहेबांच्या चरित्रावर महत्त्वाचा प्रकाश पाडते. 'इंग्रजांचे स्वभावविशेष' हा त्यांच्या भाषणाचा विषय होता. इंग्रज हा व्यक्तिस्वातंत्र्यवादी असला तरी तो संस्थानिष्ठ व राष्ट्रनिष्ठ असतो. या गुणामुळेंच इंग्लंडची बँक सात शतकांहून अधिक काळ इभ्रतीनें भरभराटीस आली. इतर अनेक संस्थांची उदाहरणें घेऊन अनेक कर्तृत्ववान् अधिकारी आले व गेले तरी इंग्रजी संस्था चिरंजीव राहतात व त्यांचा उत्कर्ष होतो. उलट अनेक हिंदी संस्था एकेका व्यक्तीच्या कार्यावर अवलंबून असतात व त्या व्यक्तीची शक्ति आटली कीं संस्था विरून जातात! हा विरोध तात्यासाहेबांनीं अतिशय मार्मिक उदाहरणांनी व्याख्यानांत सांगितला. तात्यासाहेबांनीं संस्था केवळ जगविल्या एवढेंच नव्हे तर त्यांना कायम कर्तृत्ववान् बनविण्याचे जे प्रयत्न केले त्यांबद्दल अनेक संस्थांची साक्ष मिळूं शकेल.

(३) असहकारितेच्या चळवळीत मी कॉलेज सोडण्याचा संकल्प केल्यानंतर तात्यासाहेबांस विचारावयास गेलो. ज्यांची राष्ट्रीय कार्यासाठीं स्वार्थत्याग करण्याची तयारी असेल, पुढे कांहींहि नुकसान झालें तरी तें निमूटपणें सोसण्याची तयारी असेल, अशा व्यक्तीनीं स्वतःच्या हिमतीनें त्याग करावा; मी व्यक्तिशः कोणालाहि भरोस घालीत नाहीं, असें त्यांनीं रोज जें जाहीर सभांतून सांगितले तेंच मला व्यक्तिशः सांगितलें. आम्ही सर्व विद्यार्थी भावनावश होऊन राष्ट्रीय कार्याच्या जाणिवेनें स्वतःचें शिक्षण अर्धवट सोडण्यास प्रवृत्त होत आहोंत, ही गोष्ट पूर्णपणें जाणवल्यामुळें तात्यासाहेबांनीं टिळक-विद्यापीठाची चटकन स्थापना करविली. पण ही असहकाराची चळवळ टिकाऊ नाहीं, राष्ट्रीय चळवळीच्या झंझावातानें भावनावश होऊन लोक महात्माजींचें प्रत्येक वचन मानीत आहेत, त्यांचें कमीत कमी नुकसान व्हावें ही जबाबदारी त्यांनीं आपणहून स्वतःच्या शिरावर घेतली व अनेकांच्या मदतीनें टिळक-विद्यापीठ स्थापन केलें व तेथें ते स्वतः शिकवीत. इमर्सनचे निबंध एखाद्या शाळामास्तराप्रमाणें ते आम्हांस शिकवीत. त्या वेळीं त्यांचें असामान्य अध्यापनपटुत्व प्रतीत झालें.



बाबूराव वामन कुलकर्णी

(जमीनदार, न्हावी-बुद्रुक, जिल्हा सातारा)

(१) १९२१ सालची गोष्ट. आमच्या गांवीं फॉरेस्ट अधिकारी रेंजर आयंगार यानें ग्रेझिंग फी देण्याबद्दल गांवांतील सर्व गुरें अडविलीं व चराई-कर दोन

आण्यांच्याऐवजीं चार आणे दिल्याशिवाय गुरं सोडणार नाहीं, अशी धमकी दिली. रेंजरसाहेबांची मजल खटले करूं असें सांगण्यापर्यंत देखील गेली. हा निव्वळ अत्याचार होता. माझ्याकडे ग्रामस्थ मंडळी येऊन त्यांनी याची दाद लावा असें मला सांगितलें. मी एक खेड्यांत राहणारा सामान्य माणूस. शिवाय सरकाराविरुद्ध वागून आमची दाद कोण घेणार ! अर्थात् आमचे हितचिंतक व कैवारी तात्यासाहेब यांच्याकडे धाव घेतली. त्यांना सर्व हकीकत सांगितल्यावर त्यांनीं लगेच केसरींत स्फुट-सूचना लिहून आमची बाजू निर्भीडपणें मांडली व अधिकाऱ्यांचा नक्षा उतरविला. केसरींत लिहिलेल्या या स्फुट-सूचनेचा योग्य परिणाम होऊन रेंजर मि. आयंगार यांस डि. मॅ. साहेब यांनीं खासा जाब विचारला व मि. डोमिंगो, प्रांत व डिव्हिजनल फॉरेस्ट ऑफिसर मोस्टरसाहेब यांनीं गांवीं येऊन लोकांची तक्रार ताबडतोब मिटविली. केळकर व केसरी यांचा हा केवढा प्रताप !

(२) १९२८ सालची गोष्ट. तात्यासाहेब औंध येथें श्रीमंत बाळासाहेब पंत-प्रतिनिधि यांच्या निमंत्रणावरून चालले होते. तात्यासाहेबांना आणण्याकरितां लॅबोरेटरीचे सुपरिंटेंडेंट मुळेसाहेब यांना स्पेशल मोटार देऊन पुण्यास पाठविलें होतें. मोटार आमच्या गांवाजवळ आल्यावर पेट्रोल अचानक संपलें. आमचें गांव औंध रस्त्यावर अगदीं सडकेनजिक असल्यामुळें, रा. मुळे माझ्या घरीं आले व म्हणाले, " तात्यासाहेब केळकर मोटारींत आहेत. पेट्रोल संपलें आहे. मला एकादी बैलगाडी पाहून द्या. येथून औंध पांच मैल आहे. आतां सात वाजले आहेत. रात्रीची वेळ आहे. दहा वाजेपर्यंत औंधास सहज जाऊं वगैरे..." हें ऐकतांच मी ताबडतोब सडकेवर मोटार उभी होती तेथें गेलों. नंतर तात्यांना नमस्कार करून म्हणालों, ' तात्या, घरीं चलायचें ना ! ' ते ताबडतोब उठले व म्हणाले, " चला; यावत् तैलं तावत् आख्यानम्. केव्हांहि बैलगाडीच बरी ! ह्या यांत्रिक सुधारणांमुळें प्रवासाच्या बाबतींत जितका स्टार्ट तितकाच होल्ट ठरलेला असतो. " तात्या मोटारींतून उतरून रस्त्याने घरीं जातांना मी त्यांना म्हणालों, " आज आपल्या एका लेखाची प्रचीति पाहण्याचा योग आला आहे. " अर्थात् तात्यांनीं तो कोणता लेख अशी पृच्छा केली. मी म्हणालो, तो लेख ' माझी आगगाडी कशी चुकली ' हा होय. मी त्यांच्या लेखाची वरीलप्रमाणें आठवण देतांच तात्यासाहेब म्हणाले, " तुम्हीं योग्य टोला दिलात ! तुम्हीं मला केसरींतिल लेखावरून ओळखले असतें, तर त्याचें मला इतकें वाटलें नसतें. पण माझ्या इतर लेखांवरून तुम्हीं मला ओळखलेलें पाहून, माझें इतर वाङ्मय इतकें आस्थापूर्वक तुम्हीं वाचलेलें पाहून व मी थोडीबहुत वाङ्मयसेवा करीत आहें तिचें लोण खेडेगांवांपर्यंत पोहोंचलेलें पाहून मला समाधान वाटतें."

(३) तारीख २६।९।३१ रोजीं आमच्या गांवीं तात्यासाहेब केळकर व नाना-

साहेब वैद्य यांना मानपत्रें देऊन त्यांचा गौरव केला. ही सभा सातारचे सरदार अण्णासाहेब मुतालिक यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. मानपत्राच्या समारंभाच्या वेळीं शृंगारलेल्या खुर्च्यांवर बसण्याची उभयतांना विनंती केली. त्याप्रमाणें दोघेहि खुर्चींवर जाऊन बसले. आरंभ होण्यापूर्वी नानासाहेब वैद्य तात्यासाहेबांना म्हणाले, "तात्या, केवळ तुमच्यामुळेंच माझा हा येथें गौरव होतो आहे. एरवीं ह्या खेडेगांवांत आम्हाला कोण विचारतो!" या नानासाहेबांच्या प्रश्नास उत्तर देतांना तात्यासाहेब म्हणतात, "पूजा करणाऱ्या व्यक्तींना मूर्तीचे दोन्ही नेत्र लागतात व त्या दोन्ही नेत्रांकडे पूजक आदरानें पाहातो. सध्या ह्या समारंभांत महाराष्ट्र-वाङ्मयरूपी शारदेची पूजा चालूं आहे. त्यांत स्वतः देवतेनें भाग घ्यावयाचा नसतो! नुसते होणारे उपचार देवतेने पाहावयाचे असतात! ह्या वेळीं येथील समारंभाच्या दृष्टीनें दोन्ही व्यक्ति, चालकांना श्रेष्ठच आहेत. उपास्य-देवतेच्या पूजकांना दोन्ही नेत्रांची योग्यता सारखीच!"

(४) तात्यासाहेब आमच्या येथें येणार असून त्यांना मानपत्र देण्याच्या कामीं मी पुढाकार घेतलेला होता. आमच्या तालुक्यांतील एक × × × वकील गांधी-भक्त असल्यामुळें केसरी संस्थेबद्दल नाराज असत. माझी गांठ पडली असतां वकीलसाहेब म्हणाले, "काय हो, तुमच्या तात्यासाहेबांना मानपत्र देणार आहांत वाटतं?" "हो, देणार आहोंत, आपलें म्हणणें काय?" वकीलसाहेब म्हणाले, "मानपत्र दिल्यावर त्याकरितां कोणीहि येईल!" योगायोग असा कीं, तात्यासाहेबाचें प्रत्यक्ष पत्रच त्या वेळी माझ्या खिशांत होतें. तें वकीलमहाशयांना दाखविलें. तात्यांच्या पत्रांत पुढील वाक्यें होतीं – "मी फक्त एका अटीवर आपल्या गांवीं मुक्काम करीन! ती अशी कीं, माझा मानपत्रादिकांनीं आपण जाहीर सन्मान करतां कामा नये. मी केवळ एक स्नेही ह्या खाजगी नात्यानें कांहीं वेळ तुमच्याकडे राहीन व आपण गप्पागोष्टी बोलूं. तुमच्याकडे इतर चार मंडळी आल्यास ओळखी करून घेऊ. वगैरे –". वकीलसाहेबांनीं तात्यांचें स्वदस्तुरचें हे पत्र पाहिल्यावर ते अगदीं गारच झाले!



शां. वि. अवळसकर

(इतिहाससंशोधक, अलिबाग)

(१) १९३१ च्या नाताळांत उज्जयिनीस मालव-कविसंमेलन भरलें. त्याचें अध्यक्षपद तात्यासाहेबांनीं स्वीकारलें; तेव्हां ते १।२ दिवस इंदूर येथें होते. त्यांनीं क्रिश्चन कॉलेजमध्यें येऊन 'तरुण महाराष्ट्र मंडळास' भेट द्यावी व आमच्या 'अभिनव विचारमाला' मासिकाच्या खास अंकावर आपला अभिप्राय नमूद

करावा अशी त्यांस विनंती करण्यांत आली. त्यांनीं अंकाचें अंतर्बाह्य स्वरूप पारखून अभिप्राय दिला व सदर अंकांतील कवि, चित्रकार व लेखक भविष्यकालीं मराठी वाङ्मयाची चांगली सेवा करतील असें भविष्य वर्तविलें. तात्यासाहेबांचे हे शब्द अक्षरशः खरे ठरले आहेत !

(२) उज्जयिनीच्या संमेलनांत काव्यगायनास खूप वाव होता व तरुण मालव-कवि यांनीं आपल्या सुरेल आवाजानें व भावपूर्ण काव्यांनीं वातावरण निःशब्द केलें. रात्रीच्या त्या कार्यक्रमप्रसंगीं तात्यासाहेबांनी आपल्या दोन कविता म्हटल्या. कवितेची भूमिका थोडक्यांत सांगून गांभीर्याचा ताण कमी करून वातावरणांत त्यांनीं खेळकरपणा निर्माण केला.

(३) त्या संमेलनांत चौदा वर्षांचा एक बालकवि व्यासपीठाजवळ जाण्यासाठीं घुटमळत होता. त्यास वाट मिळेना. तात्यासाहेब उभे राहिले व त्यास जवळ बोलावून कविता म्हणण्यास त्यांनी त्यास उद्युक्त केलें. कवीची उंची चार फूट, डोक्यावर पिवळ्या रंगाची पगडी; धीर चेपून कवीनें कविता म्हटली. तात्यासाहेबांनीं टाळी वाजविली. संमेलनानंतर छायाचित्राच्या प्रसंगी तात्यासाहेब बालकवीस विसरले नाहीत. खुर्च्यांच्या रांगांत मध्यभागी हे कवि विराजमान झाले !

(४) १९४५ च्या नोव्हेंबरमध्यें संशोधक कै. द. वि. आपटे यांच्या पुण्यतिथीनिमित्त भा. इ. सं. मंडळाच्या सभागृहांत कार्यक्रम होता. अध्यक्ष म्हणून श्रीमंत मालोजीराजे निंबाळकर, अधिपति फलटण, यांची योजना झाली होती. सदर प्रसंगी तात्यासाहेबांनी प्रास्ताविक भाषणांत म्हटलें, 'संस्थानिक म्हटला कीं त्यालां एक तरी व्यसन असावयाचेच ! आजचे नियोजित अध्यक्ष श्रीमंत राजे निंबाळकर यांनाहि एक जबरें व्यसन आहे.' श्रोत्यांची उत्सुकता वाढली. तात्यासाहेबांनीं पुढे म्हटलें, 'आजच्या अध्यक्षांचें व्यसन विद्याव्यसन होय !'

(५) १९४६ मध्यें कोंकणच्या इतिहासाचीं साधनें क्रमशः खण्डशः प्रसिद्ध करण्याचें मीं निश्चित ठरविलें. पहिल्या पुस्तकाची तयारी झाली, पण आर्थिक अडचणी ओलांडतां येईनात. त्यांच्या यशोदा-चिंतामणि-निधीकडे धाव घेतली. तात्यासाहेबांना कोंकणाबद्दल प्रेम आणि आंग्र्यांबद्दल आदर. त्यांनीं यशोदा-चिंतामणि-निधीचा सक्रिय पाठिंबा जाहीर केला. पुस्तकाच्या प्रसिद्धीनंतर तात्यासाहेबांच्या सहीचा चेक हातीं आला. तात्यासाहेबांनीं स्वतःच्या निधींतून पुरस्कार केलेलें माझें पुस्तक 'आंग्रेकालीन अष्टागर' हें त्यांच्या हयातींतलें शेवटचें ठरलें. त्याकर अभिप्राय देण्याचा हेतु त्यांनीं प्रकट केला होता; त्या मानास सदर पुस्तक आतां अंतरलें; पण अभिप्राय देण्याचा विचार प्रकट केला होता, हाच अभिप्राय सामान्य नव्हे !

❋

पु. शं. पतके

(चिटणीस, महाराष्ट्र मंडळ, दिल्ली व डालमिया शेठजींचे खासगी कारभारी, दिल्ली)

(१) तात्यासाहेब हे बृहन्महाराष्ट्र चळवळीचे जनक होत. १९२५ मध्ये कानपूर येथें काँग्रेस व हिंदुमहासभा यांची अधिवेशनें एकाच वेळीं भरलेलीं होतीं. त्या संधीचा फायदा घेऊन तात्यासाहेबांनी महाराष्ट्राबाहेरील महाराष्ट्रियांच्या विस्कलित चळवळीला संघटित स्वरूप देऊन बृहन्महाराष्ट्र मडळ या संस्थेस जन्म दिला. त्याच संस्थेनें पुढें आतांपर्यंत पंधरा अधिवेशनें पार पाडून बृहन्महाराष्ट्रसंघटनेची ज्योत तेवत ठेवली. बृहन्महाराष्ट्र मंडळाचा चिटणीस या नात्यानें गेलीं नऊ वर्षे या चळवळी-संबंधी ज्या ज्या वेळीं मी तात्यासाहेबांच्याकडे गेलों त्या त्या प्रसंगी त्यांनी आस्थेने सर्व चौकशी करून योग्य मार्गदर्शन केलें हे कृतज्ञतेनें नमूद करणे मी माझे कर्तव्य समजतो.

(२) गतवर्षी नोव्हेंबरमध्यें तात्यासाहेबांनीं 'टाईम्स ऑफ इंडिआ'च्या एकंदर धोरणावर 'केसरी'त खास लेख लिहून कडक टीका केली होती व शेठ डालमिया यांच्या हातीं हे वृत्तपत्र येऊन इतकें हिंदविरोधी धोरण कां असावें अशी त्यांनी शंका व्यक्त केली होती. तात्यासाहेब केळकरांच्यासारख्या पुढाऱ्यांनीं ही शंका प्रकट करतांच मला डालमिया शेठजींनी त्यांना भेटून खुलासा करण्यास सांगितलें. त्या वेळीं मी पुण्यास होतों. तात्यासाहेबांनीं शेठजींची सर्व बाजू ऐकून घेऊन त्याप्रमाणें केसरीत खुलासाहि केला. राष्ट्रसंघ बद झाल्यामुळे तेथील बारा वर्षांची नोकरी सोडून मी डालमिया शेठजींच्या विनंतीवरून त्यांच्याकडे गेलों होतों, व याच सुमारास मला नव्या राष्ट्रसंघाच्या नोकरीचें निमंत्रणहि आलें होतें. तेव्हां मी वरील भेटीचा फायदा घेऊन तात्यासाहेबांचा सल्ला विचारला व त्यांनीं मला जो उपदेश केला तो या निमित्तानें सर्वांना कळल्यास तात्यासाहेबांचा महाराष्ट्राभिमान, दूरदृष्टि व व्यवहार्य धोरण समजून येईल. ते म्हणाले, "अहो, राष्ट्रसंघांत तुम्ही गेलां नाहींत तर कांहीं अडणार नाहीं. तुमच्याऐवजीं पुष्कळ हिंदी व महाराष्ट्रीयहि तेथें जाऊं शकतील; पण मारवाड्याच्या घरांत शिरलेला महाराष्ट्रीय एकदां बाहेर आला तर पुनः तेथें महाराष्ट्रियाचा शिरकाव होणें अशक्य आहे. तुमची हल्लीची जागा हा बालेकिल्ला आहे. त्यांतून तुम्ही महाराष्ट्रियांचें पुष्कळ हित करूं शकतां. पैशाचा प्रश्न म्हणाल, तर राष्ट्रसंघानें तुम्हांला जरी जास्त पैसे दिले, तरी अमेरिकेसारख्या ठिकाणीं ते तुम्हांला पुरणार नाहींत. माणसाचें धन तो जितकी रक्कम शिल्लक टाकूं शकतो त्यावर मोजणें योग्य आहे, मिळवतो किती याच्यावर नाही. तिसरी गोष्ट अशी कीं, लवकरच ब्रिटिशांचे राज्य खलास होणार आहे. तेव्हां विलायतेचा मोहहि आजच्यासारखा पुढें टिक-

णार नाहीं." यानंतर त्यांनीं डालमियाशेठसारख्या प्रथमश्रेणीच्या धनाढ्याजवळ राहून महाराष्ट्राचें, महाराष्ट्रीय सस्था, व्यक्ति व व्यापाराचें कसें हित करतां येईल यासंबंधीं आपले थोर विचार मनमोकळेपणें व्यक्त केले. तात्यासाहेबांनीं दिलेला सल्ला मी पितृसमान मानून चाललों आहें व आज या गोष्टीस वर्ष होत आलें तरी त्यांतील प्रत्येक शब्द माझ्या कानांत अद्याप घुमत असून त्याची सत्यता पटत आहे.

❋

द. गो. दीक्षित

(शिक्षक, हायस्कूल, वसई)

(१) मी धुळें येथील गरूड हायस्कुलांत सरकारी नोकरीवर असतां, " राजा रविवर्मा यांची चित्रकला " या नांवाचा एक लेख केसरींत प्रसिद्ध करण्यासाठीं पाठविला होता. तो तात्यासाहेबांना विशेष पसंत पडल्यामुळें तो केसरीकडे पाठविल्याबरोबर, त्यांचें स्वतःचें पत्र मला पुढें दिल्याप्रमाणें आलें :–

श्री. केसरी–मराठा ऑफिस,
ता. १०-८-३०

सा. न. वि. वि. – आपला 'राजा रविवर्मा यांची चित्रकला' हा लेख पोहोंचला. तो चांगल्या चिकित्सक बुद्धीनें लिहिला असल्यामुळें मला तो फार आवडला. तरी मी तो परत न करतां शक्य तितक्या लौकर केसरींत घालीन. आपल्यासारख्या चिकित्सकांचे अशा प्रकारचे लेख वाचून, इतरांनाहि जर तसेच सुंदर लेख लिहिण्याची बुद्धि झाली, तर त्यांत मला आनंदच वाटेल. कळावें.

– नरसिंह चिंतामण केळकर

या पत्रांत लिहिल्याप्रमाणें तात्यासाहेबांनीं तो लेख लगेच केसरीच्या तीन अंकांत ओळीनें प्रसिद्ध केला व बक्षिसादाखल एक पुस्तकहि मला पाठवून दिलें.

(२) मी त्यांना एकदां असें विचारलें कीं, लो. टिळकांनीं काकासाहेब खाडिलकरांना व वासुकाका जोशांना अनुक्रमें नेपाळांत व अफगाणिस्तानांत कांहीं वर्षें राजकीय चळवळ करण्यासाठीं म्हणून पाठविलें होतें, त्या बाबतींत आपल्याला काय माहिती आहे ? कारण सामान्यतः लोकांची समजूत अशी आहे कीं, या दोघांना तिकडे पाठविण्यांत लोकमान्यांचा हेतु त्यांच्यां करवीं नेपाळच्या राण्याला व अफगाणिस्तानाच्या अमिरालाहि हिंदुस्थानावर स्वारी करण्याची चिथावणी देण्याचा होता, व अशी स्वारी त्यांनीं केली, म्हणजे ब्रिटिश सरकार आयतेंच

पेंचांत सांपडून त्यामुळें स्वातंत्र्यप्राप्तीचा आपला मार्ग सुलभ होईल अशीहि त्यांची खात्री होती. तरी या बाबतींत आपलें काय मत आहे ? तेव्हां ते म्हणाले, "या प्रवादांत फारसें तथ्य नाहीं. कारण माझ्या माहितीप्रमाणें, त्या दोघांना लोकमान्यांनीं जे जिकडे पाठविले होते, ते जागतिक राजकारणासंबंधीं व्यापक दृष्टि (Broad outlook) त्यांना प्राप्त व्हावी, म्हणूनच होय. कारण स्वातंत्र्य-प्राप्तीच्या कामीं बाहेरच्या सत्ताधिशांची आपल्याला फारशी मदत होण्याजोगी नाही, हें इतरांप्रमाणेंच लोकमान्यांनाहि कळून चुकलें होतें." तात्यासाहेबांच्या या उत्तरावरून मोठ्या लोकांच्या राजकीय हेतूविषयी सामान्य लोकांत कित्येक वेळां कसे निराधार प्रवाद प्रचलित होतात, तें वाचकांना कळून येईल.

(३) त्यानंतर मी त्यांना, त्यांनी लिहिलेल्या टिळक-चरित्रासंबंधीं कांहीं प्रश्न विचारले. कारण या चरित्रांत टिळकांच्या खाजगी जीवनाची माहिती जितकी सूक्ष्म व विस्तृत यावयास पाहिजे होती, तितकी ती आली नाहीं, असें अनेक वाचकांप्रमाणेंच माझेंहि मत होतें. म्हणून "तुम्ही टिळकांविषयी आणखी कांहीं माहिती, त्यांच्या चरित्रांत न आलेली अशी दुसरीकडे कोठें प्रसिद्ध करणार आहां काय ?" असें मीं त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, "त्यांचा शेवटचा म्हणजे नागपूर-वऱ्हाडकडे त्यांनीं आपल्या आयुष्याच्या शेवटीं जो जंगी दौरा काढला होता, त्या दौऱ्यासंबंधीं व त्यांच्या खाजगी आयुष्यासंबंधीहि मी त्यांच्या चरित्रांत शक्य तितकें सविस्तर विवेचन केलेंच आहे. त्यापेक्षां त्यासंबंधी जास्त कांहीं लिहिण्याजोगें आहे, असें मला वाटत नाही."

(४) त्यानंतर माझ्या या राजकारणविषयक पृच्छा ऐकून, ते मला म्हणाले कीं, "तुम्हांला महाराष्ट्राच्या राजकारणाबद्दल बरीच जिज्ञासा व आस्था दिसते. मग तुम्ही स्वतःच कां राजकारणांत पडत नाहीं ? तुमच्यासारखे तरुण व उत्साही लोक जर राजकारणांत पडले, तर त्यापासून माझ्यासारख्यांना आनंदच होईल." तेव्हां मीं उत्तर दिलें, "माझी सांपत्तिक परिस्थिति अशा कामाला विशेष अनुकूल नाहीं. आपल्याप्रमाणें एखादें वर्तमानपत्र माझ्या हाताशीं असतें किंवा आपल्या अथवा लो. टिळकांच्या मुलांइतकी जर आनुवंशिक लोकप्रियतेची किंवा संपन्नतेची बैठक मला लाभली असती, तर मी खात्रीनें राजकारणांत पडलो असतों." हें ऐकून ते म्हणाले, "माझ्या मुलांनीं तरी राजकारणांत असें विशेष काय केलें आहे ? आतां यशवंतानें व काशिनाथानेंहि राजकारणविषयक कांहीं लेख लिहिले आहेत व यशवंतानें तर कांही ऐतिहासिक पुस्तकें व कविताहि प्रसिद्ध केल्या आहेत, नाहीं असें नाहीं. पण ते दोघेहि राजकारणांत विशेष चमकले नाहींत." त्यावर मी त्यांना म्हणालों कीं, "आपल्याइतकें जरी ते राजकारणांत चमकले नसले तरी निदान त्यांनीं आपलें नांव न घालवितां आपलें वाङ्मयसेवेचें

उदात्त व्रत पुढे चालू ठेवलें आहे हें तरी काय थोडें झालें ? कारण आपल्यासारख्या मोठ्या लोकांचीं मुलें बहुधा नादान निपजतात, असाच आजपर्यंतचा अनुभव आहे; परंतु आपलीं मुलें या नियमाला अपवाद अशीं असून, त्यांनीं आपली परंपरा कायम ठेवली आहे, हें आपल्याला खरोखरीच भूषण आहे. मला वाटतें, अशी परंपरागत मोठेपणाची उदाहरणें पंडित मोतीलाल नेहरू, दादासाहेब खापर्डे यांच्यासारख्यांच्या घराण्यांतच काय ती आपल्याला सांपडतील, बाकी इतर ठिकाणीं त्यांचा बहुधा अभावच दिसून येईल." तेव्हां तात्यासाहेब खूप हंसून म्हणाले, "तुमच्या या बोलण्याचा अर्थ मला तरी असा दिसतो की, एक माझीं मुलें तरी खरोखरीच माझी परंपरा चालविणारी नसावींत किंवा मी तरी नेहरू, खापर्डे यांच्या पंक्तीला बसण्याइतका मोठा नसलों पाहिजे; त्याशिवाय तुमच्या बोलण्याची मला बरोबर संगति लावतांच येत नाहीं !" हें त्यांचें उत्तर ऐकून मीहि मोठ्यानें हंसलों व अशा रीतीनें त्यांची व माझी ही विनोदप्रचुर मुलाखत समाप्त झाली.

❋

पां. मो. गोगटे

(जामसंडे, जि. रत्नागिरी)

(१) तात्यासाहेब यांनी आमच्या गांवीं १२ वर्षांच्या मक्त्यानें घर घेतलें होतें. त्यामध्यें ते दरवर्षी कांहीं दिवस तरी बहुधा येत असत. सुमारें १९४० पासून प्रकृति थकल्यामुळें त्यांना इकडे येणें शक्य झालें नाहीं. त्यांच्या गैरहजेरींत सदर वाड्याची व्यवस्था मी पहात असे. तसेंच ते येथें असत त्या मुदतींत त्यांना लागणारे जिन्नस वगैरे आमच्यामार्फत पैदा करीत असत. त्यांचा आमचा घरोबा फार असे व ते कुटुंबियाप्रमाणें आमची आस्थेनें विचारपूस करीत असत. ते येथे असल्यावेळीं मिरजेचे महाराज त्यांजकडे आले होते. त्या वेळीं त्यांनीं मुद्दाम त्यांना आमच्याकडे आमची कलमी आंब्यांची बाग वगैरे पाहण्याकरितां आणलें होतें. बाग पहात असतां महाराजांनीं सदर जागेस एकूण खर्च किती झाला व त्यामध्यें नफा काय होतो असा प्रश्न केला. आमच्याकडे बागेचा जमाखर्च नव्हता व त्या वेळीं आंकडेवारीनें सांगणें मला मुळींच शक्य नव्हतें. ही अडचण तात्यांनीं नेमकी ओळखून त्यांनीं याचें उत्तर मी देतों असें सांगून म्हणाले, "ज्यानें अगदीं ओसाड जागेचें नंदनवन केलें व सर्व लोकांस कलमी आंब्यांच्यासारख्या बागा करणें फायदेशीर आहे हें दाखवून दिलें, त्याच्या कल्पकतेची व स्वतःच्या मेहनतीची तुम्ही काय किम्मत धरतां ? सदर बाबतींत नुसत्या झालेल्या जमाखर्चाच्या रकमेवरून हिशेब करणें चूक ठरेल" असें सांगून त्यांनीं माझी बाजू सावरली.

(२) तात्यांनीं वाडी घेतली त्यास त्यांच्या मर्जीप्रमाणें त्यांनीं अंगण वगैरे तयार करून घेतलें. त्या वेळीं अंगणाचे दगड तात्यांनीं नुसत्या नजरेनें चारहि कोनावर बसवून घेतले व मागाहून कामकऱ्यांनीं काटकोन लावून पाहतां अगदीं बिनचूक आढळले !

(३) त्यांजकडे आम्हीं कांहीं सामान वगैरे देऊन इसम पाठविला तर त्याच्या डोकीवरून ओझें उतरण्यास त्यास ते स्वतः मदत करीत व उन्हांतून आल्यास गूळपाणी देण्याची तजवीज करीत. त्या वेळीं ओझेवाल्याची अगर उन्हांतून आलेल्या इसमाची काय स्थिति होते याची कल्पना त्यांच्या चेहेऱ्यावर दिसे !

म. ग. सोमण

(चिपळूण)

आपला मोठेपणा जगांत दिसावा व इतरांस आपल्यापेक्षां किंचित् तरी कमी समजावें अशी प्रवृत्ति मोठ्या माणसांतहि असते व त्यासाठीं ते लोक प्रयत्नहि करीत असतात; पण ही वृत्ति तात्यासाहेब केळकरांच्यामध्यें अणुमात्रहि नव्हती. जें कांहीं असेल तें स्पष्ट व जाहीरपणें ते बोलून दाखवीत. याचें एक उदाहरण खाली देतों. रत्नागिरी जिल्हा परिषदेचें पहिलें अधिवेशन तात्यासाहेब यांच्या अध्यक्षतेखालीं १९२२ सालीं रत्नागिरी येथें झालें. त्या वेळीं रत्नागिरी जिल्ह्याचे पुढारी कै. बाबासाहेब नानल वकील हे स्वागताध्यक्ष होते. त्यांचें भाषण आटोपून ते खालीं बसले. नंतर सूचना व अनुमोदन झाल्यानंतर अध्यक्ष या नात्यानें भाषण करण्यासाठीं तात्यासाहेब उभे राहिले. नित्याप्रमाणें अध्यक्ष नेमल्याबद्दल त्यांनीं सर्वांचे आभार मानून भाषणास सुरुवात म्हावयाची; परंतु तसें करण्यापूर्वी कै. बाबासाहेब नानल यांच्याबद्दल तात्यासाहेब यांनीं सांगितलें कीं, " बाबासाहेब नानल यांस प्रख्यात वकील म्हणून सर्वजण ओळखतात हें मला माहीत आहे. त्यांनी वकिली सुरू करण्याच्या सुमारास त्यांच्या लायकीची नेमकी पारख करून लोकमान्यांनीं त्यांना पुण्यास बोलाविलें व 'मराठा' पत्र चालविण्याविषयीं विचारलें. कांहीं दिवस बाबासाहेबांनीं तें काम केलें असावें; परंतु बाबासाहेब हे पुढें रत्नागिरीस आले व वकिली करूं लागले. ते जर पुण्यासच असते तर आजचा देखावा तुम्हांला निराळा पाहावयास सांपडला असता; म्हणजे केसरीकार या नात्यानें बाबासाहेब आज अध्यक्ष असते व मी कोठें तरी वकिलीचा अगर दुसरा कोठला तरी धंदा पत्करून राहिलों असतों ! एवढी बाबासाहेबांची योग्यता होती व ती लोकमान्यांनीं जाणली होती. हें कोणास माहीत नसेल म्हणून आज मी मुद्दाम याचा उल्लेख करीत आहें. बाबासाहेब गेल्यानंतरच मला लोकमान्यांनीं

बोलावितिले व पुण्यास राहून मीं 'केसरी' चालविला व म्हणूनच मी आज अध्यक्ष या नात्यानें आपल्यापुढें उभा आहें." दुसऱ्याच्या गुणांचा जाहीरपणें व अंतःकरणपूर्वक उल्लेख करण्यानें तात्यासाहेबांचें थोर व उदार अंतःकरणच दिसून आलें.



नानासाहेब भिडे

(पुणेंवाडी, मुंबई)

(१) क्रिकेटर प्राध्यापक देवधर यांच्या सत्कार-समारंभाचे नियोजित अध्यक्ष डिमेलोसाहेब हजर राहूं शकले नाहींत म्हणून त्या जागेवर तात्यांची योजना झाली. "पाणपोईवर पाणी पीत असेल तर तो माझा पिता हरिश्चंद्र नव्हे" असें रोहिदासानें म्हटल्याप्रमाणें भाषणांत विनोद नसेल तर तें तात्यांचे नव्हें! तात्या म्हणाले, "क्रिकेटरच्या स्वागत-समारंभाचा अध्यक्ष होण्याची माझी लायकी मी तपासूं लागलों तेव्हां मला आठवलें कीं, मीहि शाळेत असतांना मोडक्या फळीनें चेंडू उडविलेला नाहीं असें नाहीं, व पुढील आयुष्यांतहि देवधरांसारख्या क्रिकेट पटूंचा खेळ मीं कॉलेजच्या तबूंतून केव्हां तरी पाहिलेला आहेच कीं!"

गौरव झाला, भाषणें झालीं, देवधरांनीं क्रिकेटमधून वस्तुतः निवृत्त व्हावें कीं न व्हावें ह्याबद्दलहि बरीच भवति-न-भवति झाली. समारोपाचें भाषण संपवून तात्या घरीं जाण्यास निघाले; एवढ्यांत त्यांची व माझी दृष्टादृष्ट झाली. मीं म्हटलें, "तात्यासाहेब, देवधर रिटायर होतों म्हणतात. माझे म्हणणे आपण त्यांस री-टायर करूं. शाब्दिक वाद कशाला?" हा श्लेष तात्यांना इतका आवडला कीं, "समारंभ आटोपण्यापूर्वी तुम्ही बोललां असतां तर मी सभेंत तसें जाहीरच केलें असतें," असें कौतुकानें म्हणत तात्यांनीं मला शाबासकी दिली. गुणीच गुणांचें चीज करूं शकतो; ह्यास सौजन्य लागतें.

(२) तात्यांनीं सांगितलेली गोष्ट. ते म्हणाले, "जुनी गोष्ट आहे. मी एका पुनर्विवाहाला गेलों होतों, पानसुपारीला म्हणून. प्रघात नवीन म्हणून ह्या गोष्टीची साहजिकच चर्चा झाली. ब्रह्मवृंदाकडे बातमी गेली व त्यांनीं आमच्या घरावर बहिष्कार घातला. माझे वडील तेव्हां हयात होते व दोन दिवसांवर आजोबांचें श्राद्ध आलेलें. आतां श्राद्ध टळणार अशी माझ्या वडिलांस शंका येऊन वाईट वाटलें. रात्रीं मीं स्वतःशींच विचार केला व आमच्या गुरुजींस उदईक माझ्या प्रायश्चित्ताची तयारी करण्याविषयीं निरोप पाठविला. सशास्त्र प्रायश्चित्त घेतलें. वडिलांचा मार्ग श्राद्धाकरितां मोकळा झाला. त्यांना समाधान वाटलें. त्यांच्या समाधानाकरितां मला थोडी मुरड घालावी लागली. 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं

माचरणीयम् ' म्हणतात; मग इथें तर 'जनक-विरुद्धम्' अशी स्थिति." ह्याच्या उलट अलीकडे कांहीं लोकांस जनकविरुद्ध वागण्यांत 'भूषणं न तु दूषणम्' असें वाटतें. "कालाय तस्मै नमः"



भा. वा. धडफळे
(पुणें)

(१) १९१७ सालीं एकदां दुपारी गायआळींतून आम्ही जात असतांना कै. राम गणेश गडकरी 'मास्तरना' केळकरांकडे जाण्याची लहर लागली. दारांत शिरतांच त्यांनीं मोठ्या आवाजांत तात्यांची चौकशी सुरू केली. तात्यासाहेबांची ती वेळ म्हणजे नेहेमींच्या वामकुक्षीची. जेवण संपवून नुकतेच ते अंथरुणावर जाऊन पडले होते. बाहेरच्या खोलींत गडकऱ्यांशीं त्यांचे चिरंजीव काशिनाथपंत बोलत होते. हेतु हा कीं, तात्यांची झोंप तर मोडूं नये व गडकऱ्यांनी तात्यांना भेटल्याशिवाय तर जाऊं नये. बाहेरची गडबड ऐकून तात्यासाहेब जागे झाले व त्यांनीं काशिनाथपंतांस सांगितलें कीं, "अरे, गडकरी आले असतील तर मला माझा नित्यक्रम मोडलाच पाहिजे. त्यांना ताबडतोब आंत आण." झालें. गडकरी आंत गेले व दोघेहि जण तब्बल दोन तास गप्पा मारीत बसले. तात्यांचे "तोतयाचें बंड" हाच गप्पांचा मुख्य विषय होता. गडकऱ्यांनींहि आपल्या "राजसंन्यासा'ची त्रोटक हकीकत त्यांना सांगितली. ही हकीकत सांगतांना नाटकाच्या भाषेचा प्रश्न निघाला. तात्यासाहेबांनीं पुष्कळ मार्मिक सूचना करून मराठी बखरीचीं दोन-तीन जाडीं पुस्तकें आपल्या ग्रंथालयांतून काढून गडकऱ्यांच्या हवालीं केलीं व त्यांचा अभ्यास करून नाटकाची भाषा ठरवावी असे सुचविलें. त्या बखरी बरोबर घेऊन व दुपारचा चहा तेथेंच घेऊन आम्ही चारच्या सुमारास घरीं जेवणास तांतडीनें निघालों! कै. गडकऱ्यांनीं त्या बखरींतूनच आपल्या "राजसंन्यासा"ची भाषा बरोबर उचलली व पुढें कित्येक महिन्यांनी ते ग्रंथ तात्यासाहेबांकडे साभार परत पाठविले.

(२) कै. गडकऱ्यांच्या निधनानिमित्त पुण्यांत किर्लोस्कर नाटकगृहामध्यें तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं एक प्रचंड सभा झाली. मीं गडकऱ्यांचा मित्र म्हणून त्या सभेंत बोलावें असें ठरलें. त्याच्या अगोदर 'डिबेटिंग क्लब' शिवाय मीं सभेंत कधींच भाषण केलें नव्हतें. सभेस जमलेला विद्यार्थ्यांचा एवढा प्रचंड समुदाय पाहून मी प्रथमच घाबरलों व आपण जें बोलणार तें 'पुणेकर' मान्य करतील कीं नाहीं ही शंका वाटूं लागली. मीं माझें भाषण लिहून काढिलें होतें व तें श्री. अत्रे यांसः आगाऊ दाखविलें व त्यांनीं मला उत्तेजन दिलें, म्हणून मीं बोल-

ण्याचा निश्चय केला. ठरल्याप्रमाणें माझें नांव अध्यक्ष तात्यासाहेबांनीं पुकारलें. मी अध्यक्षांच्या टेबलाजवळ जाऊन उभा राहिलों. समोरच ओळखीचे कांहीं विद्यार्थी-मित्र 'अरे, हा तर आपला भाक्या' अशा हंसतमुखानें माझ्याकडे निरखून पहात आहेत असें दृश्य दिसलें. झालं! "सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति" अशा स्थितींत मी एक-दोन मिनिटें मेषपात्राप्रमाणें उभा राहिलों! तें पाहून तात्यासाहेब मदतीला धावले व मला म्हणाले, "तुम्हीं भाषण लिहून आणलंय का? असलं तर तेंच वाचा." मी गोंधळून बावरून गेलों होतों. मग मला भाषण लिहून आणल्याची आठवण झाली व खिशांतून कागद काढून वाचण्यास सुरवात केली. नंतर धीर आल्यावर १०-१२ मिनिटें बोललोंहि! पण मी आतां केव्हांहि बोलावयास उठलों म्हणजे तात्यासाहेबांची मला आठवण होते!

(३) कै. पंडित मालवीय यांच्या अध्यक्षतेखालीं हिंदुमहासभेचें पुण्यांतील १९३७ चें अधिवेशन फारच मोठे झालें व गाजलेंहि. पण मुंबई प्रांतिक हिंदुसभे-तर्फे आमच्यांतील पुरोगामी मंडळींनी पुढाकार घेऊन अस्पृश्यता-निवारणाबद्दल एक ठराव करून तो विषयनियामक कमिटीपुढें चर्चिला जावा म्हणून पुण्यास अगोदर धाडिला. आमचा हा ठराव पुण्याच्या मंडळींना सोसणारा नव्हता. कारण ठरावाची भाषा फारच कडक होती. पुण्याच्या सूत्रचालकांनीं त्यावर "नियमबाह्य" हा शिक्का मारून आम्हांस तो ठराव परत पाठविला. त्यावर कै. डॉ. उदगांवकर हे बॅ. जयकरांस भेटून त्यांनीं त्यांचा सल्ला विचारला. हिंदुमहासभेचे उद्देश व नियमावली वाचून बॅ. जयकरांनीं असें सांगितलें कीं, ठरावांतील एकंदर भाषेवरून तो नियमांत बसूं शकणार नाहीं. परंतु ठरावाची भाषा सुधारून व थोडीशी बदलून आमच्या 'सूत्रानुरूप' तो नियमांत आणतां येईल. त्यांनीं आम्हांस दुसरा एक ठराव तयार करून दिला व सांगितलें, जर हा दुसरा ठराव नियमबाह्य ठरविला गेला तर मी स्वतः येऊन तो ठराव नियमबाह्य होऊं शकत नाहीं हें प्रतिपादन करण्यास कचरणार नाहीं. विषय-नियामक कमिटीपुढें हा दुसरा ठराव सभेच्या खुल्या अधिवेशनाच्या आदल्या दिवशीं ठेवण्यांत आला. श्री. भोपटकर, माटे, बॅ. अग्रवाल यांनींहि त्या ठरावास "नियमबाह्य" म्हणून हरकत घेतलीच! अध्यक्ष ह्या नात्यानें पंडितजींनीं त्यावर "नियमबाह्य" म्हणून आपलें 'रूलिंग' दिलें. हें सर्व होतें न होतें इतक्यांतच बॅ. जयकर सभेमध्यें उपस्थित झाले. पंडितजींनीं आग्रहपूर्वक त्यावर त्यांचें मत विचारलें. पहिल्याप्रथम बॅ. जयकरांनीं अध्यक्षांनीं रूलिंग दिल्यानंतर बोलण्याचें नाकारलें. परंतु पंडितजींनीं फारच आग्रह केल्या-वरून ते त्यावर बोलावयास उठले. बॅ. जयकरांच्याइतकें प्रभावी बोलणें मी अजूनपर्यंत कधींच ऐकलें नाहीं. त्यांचें वक्तृत्व अगदीं शिगेस पोहोंचलें होतें. त्यांनीं सर्व सभा एकदम जिंकली व सभेचा एकंदर नूर पालटला! हें दृश्य दिसतांच

तात्यासाहेब अध्यक्षांच्या रूलिंगचा मान राखण्यास व बॅ. जयकरांचें म्हणणें सयुक्तिक व नियमांस धरून असल्यामुळें प्राप्त म्हणून दोघांचा समन्वय करण्यास एकदम फार जोरानें पुढें सरसावले व उत्तम भाषण करून त्यांनी अशी तोड सुचविली कीं, डॉ कुर्तकोटि, राधाकुमुद मुकर्जी, अस्पृश्यांचे दोन प्रतिनिधि व इतर तीन बडी मंडळी मिळून त्यांनी एक अशाच धर्तीचा नवा ठराव तयार करून उद्यांच्या खुल्या अधिवेशनांत आणावा व तो ठराव खुद्द अध्यक्षांनींच सभेपुढें मांडून पसार करून घ्यावा. त्यांच्या या समयसूचकतेमुळें विषय-कमिटी-पुढील तो पेचप्रसंग टळला व खुल्या अधिवेशनांत स्वतः पंडितजी व डॉ. कुर्तकोटी यांनीं बॅ. जयकरांस मान्य असलेला तो ठराव सभेपुढें मांडला व तो पसारहि झाला. तात्यासाहेबांच्या 'सुवर्णमध्यानें' अखेर त्या अडचणीच्या प्रसंगावर मात केली!



गो. शां. कोवाडकर

(डॉक्टर, बेळगांव)

(१) लोकमान्य टिळक गेले. गांधी-युगाची सुरवात झाली. बहिष्कार-त्रयींचें रणशिंग फुंकलें गेलें. विद्यार्थीवर्गानें शिक्षणाची पर्वा न करतां शाळा व कॉलेजें ओस पाडण्यास सुरवात केली. अशा वेळीं अभ्यासाकडे आमचें लक्ष लागेना. त्या वेळीं मीं पुण्याच्या मेडिकल स्कूलमध्यें होतों. पुढारी-वर्गांत मतभेद होते. काय करावें तें आम्हांला समजेना. कोणाचा सल्ला घ्यावा हेंहि कळेना. शेवटीं तात्यासाहेब हेच योग्य तें मार्गदर्शन करतील असें आमचें सर्वानुमतें ठरलें. तात्यासाहेब म. गांधींना भेटून पुण्याला नुकतेच आले होते. यापूर्वी आम्ही पुण्यांतील इतर पुढारी मंडळींना भेटून आलों होतों. आमचें समाधान झालें नव्हतें. प्रत्येकानें आम्हांला मार्गदर्शन करण्याऐवजी स्वतःच्या मताचें एकएक भलें मोठें व्याख्यानच आम्हांला ऐकविलें. अखेर आम्ही तात्यासाहेबांकडे गेलों. मुखवटीलाच आम्हांला आम्ही योग्य ठिकाणीं आलों असें वाटलें. अपत्यप्रेमानें आमचें त्यांनी स्वागत केलें. राजकीय परिस्थितीमुळें आमच्यावर होत असलेले परिणाम व गोंधळलेली मनःस्थिति त्यांच्यासमोर आम्हीं ठेवली व आम्हांला योग्य तो मार्ग दाखविण्याची त्यांस विनंती केली. ते मोठ्या आस्थेनें व तळमळीनें म्हणाले, "आजचा विद्यार्थीवर्ग हा भावी कालाचा पुढारीवर्ग आहे. आजच्या राजकारणाचा प्रश्न जर विद्यार्थ्यांच्या त्यागावांचून सुटत नाहीं असें तुम्हांला वाटत असेल तर जरूर त्याप्रमाणें तुम्ही त्यागा. शाळाकॉलेजांवर बहिष्कार घालणें व पुढें कांहीं कार्य न करणें एवढेंच कार्य जर तुम्हांला करावयाचें असेल तर तें देशकार्य होईल कीं काय याचा अवश्य विचार करा. आपला देश परकीयांच्या गुलामगिरींतून सोडविला

पाहिजे याबद्दल दुमत नाही; पण बहिष्कार घालून विद्यार्थ्यांनीं पुढें काय करावें व त्यांना काय करतां येईल याचा निर्णय न घेतां, फक्त त्यांनीं शिक्षणसंस्था बंद पाडल्या एवढेंच दाखवावयाचें असेल तर हे व्यवहाराला व तर्काला सोडून होतें, असें मला प्रामाणिकपणानें वाटतें. तुम्हांला विद्यार्जनापेक्षां देशकार्य अधिक महत्त्वाचें वाटत असेल व तुम्हीं हें कार्य केलें नाहीं तर देशाचें मिळणारें स्वातंत्र्य दूर जाणार आहे असें आपणांस वाटत असेल तर तुम्ही तसें खुशाल करावे. मात्र पुढारी सांगतात म्हणूनच अगर पुढारी मदत करणार आहेत या कल्पनेनें मात्र कोणतेंहि कार्य करूं नका. नाहींतर उद्या असें म्हणाल कीं, आम्हीं पुढाऱ्यांचें ऐकून आमची 'करिअर' बाद केली व आयुष्यांत भरून न येणारें असें नुकसान झालें."

थोडा वेळ आम्ही स्तब्ध बसलों. भावनावश होऊन आम्ही काय करणार होतों हें आम्हांला समजलें. आम्हांला आमचें उत्तर मिळालें. "आणखी कांहीं विचारावयाचें आहे?" असा प्रश्न तात्यासाहेबांकडून आला. 'कांहीं नाही' असें आम्हीं उत्तर दिलें. एकंदरींत जणूं काय भेटीला जाण्यापूर्वी प्रश्नमालिका पाठविली होती व तिचें उत्तर तात्यासाहेबांनीं तयारच ठेविलें आहे, अशा तऱ्हेनें ते उत्तरें देत होते. इतर पुढाऱ्यांचा निरोप घेत असतांना आम्ही नमस्कार करूनच घेत होतों; पण तात्यासाहेबांचा निरोप घेण्यास आम्ही उठलों तेव्हा आम्हांला न कळत आमची मान त्यांच्यापुढे अति नम्रतेनें वांकली!

(२) तात्यासाहेब कोल्हापूर राजाराम कॉलेजचे माजी विद्यार्थी. त्यांना गॅदरिंगकरितां पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांनीं बोलाविलें. त्यांच्या व्याख्यानप्रसंगीं थोडासा अनुचित प्रकार घडला, तरी तात्यासाहेब अगदी शांत होते. पाहुण्यांचे आभार मानण्यांत आले, कार्यक्रम संपला. तात्यासाहेब आपल्या निवासस्थानीं आले. झाल्या प्रकाराबद्दल क्षमा मागावी या इराद्यानें पुष्कळ विद्यार्थी त्यांच्या भेटीला आले. झालेला सर्व प्रकार अत्यंत खिलाडू वृत्तीनें त्यांनीं घेतला होता असें पाहून विद्यार्थ्यांना मोठें नवल वाटलें. नंतर इतर विषय निघाले. दाखले, दृष्टान्त व उपमा यांवर चर्चा सुरू झाली. तात्यासाहेब म्हणाले, "जो तो आपआपल्या व्यवसायानुसार दाखले देत असतो. उदाहरणार्थ, वकील घ्या; तो बोलतांना नेहमी कुळ, अशील, कोर्ट हा-व शब्दप्रयोग करील. मोटार-ड्रायव्हर आज जेवणाला किती मंडळी आहेत असें न म्हणतां किती 'सीट' आहेत असें विचारील. फार कशाला? आज माझे आभार मानतांना म्हणाले ... कीं, 'तात्यासाहेबांचें आजचें व्याख्यान ऐकत असतांना द्राक्षरसाचा प्याला मी पीत आहें असें न वाटतां मी द्राक्षरसाचें पिंपच्या पिंप पीत आहें असें वाटलें!' त्यांच्या जागीं मी असतों तर 'प्याला' व 'पिंप' या शब्दांऐवजीं 'चंदीचें रामपात्र' व 'हेडा' या शब्दांचा उपयोग केला असता!"

दत्तात्रय विष्णु पारखे

(निफाड)

(१) तात्यासाहेब मिरजेस आल्यावर ते आपले बालपणचे स्नेही कै. गोविंदराव पटवर्धन यांच्याकडेच बहुधा उतरत असत. केळकरांचे वडील मिरज संस्थानांत नोकर होते. ते गोविंदराव पटवर्धनांच्या वाड्यानजीकच्या घरांत राहात असत. गोविंदराव व नरसोपंत समवयस्क विद्यार्थी मिरज हायस्कुलांत शिकत असत. दोघेहि मोठेपणीं एकमेकांस एकेरी नांवानें संबोधीत असत. गोविंदरावांच्या तोंडीं नेहमी 'आमचा नरसू' हा शब्द बसलेला पाहून तर मला गंमत वाटे. मी एकदां "तुम्ही 'नरसू' म्हणून हांक कां मारतां" असा त्यांस प्रश्न केला असतां त्यांनी उत्तर दिलें, 'नरसोपंत हें नांव माझ्या तोंडांतून येतच नाहीं, त्यास मी काय करूं?' गोविंदरावांच्या ठायी नरसोपंतांविषयीं नितान्त प्रेम होतें. लहानपणींच्या नरसोपंताविषयींच्या गोष्टी सांगतांना ते रंगून जात. त्यांच्या तोंडावर विलक्षण तेज चढे, कधी कधी तर त्यांचे डोळे प्रेमादराच्या अश्रूंनीं डबडबत असलेलें दृश्य मीं पाहिलें आहे. नरसोपंतांविषयीं गोविंदरावांच्या ठिकाणची गाढ निष्ठा, विलक्षण प्रेम व नितान्त आदर पाहून ते 'नरसू' या एकेरी नांवानें कां संबोधितात हें मला पटे व तसा तो अधिकार चालविण्याचा त्यांचा हक्कच आहे असें माझ्या प्रत्ययास येई.

(२) सुमारें वीस वर्षांपूर्वी एकदां मिरज हायस्कूलच्या स्नेहसंमेलनाच्या वेळीं तात्यासाहेबांचें भाषण झालें. कै. श्रीमंत बाळासाहेब अधिपति अध्यक्षस्थानीं होते. तात्यासाहेबांपुढें शाळेचे विद्यार्थी, संस्थानाचे अंमलदार व गांवांतील प्रतिष्ठित गृहस्थ असा समाज होता. हायस्कुलांत उपस्थित झाल्यापासून याच इमारतींत आपण शिकलों ना? याच पटांगणांत आपण खेळलों-बागडलों ना? आपल्या संवगड्यांशीं याच ठिकाणीं आपण चेष्टामस्करी केली ना? अशा तऱ्हेच्या गतकालीन स्मृति त्यांना झाल्या व त्याचें प्रत्यंतर तात्यासाहेबांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीसच काढलेल्या उद्गारावरून आलें. केळकर म्हणाले, "आज मी तुम्हांपुढे भाषण करण्यास उभा राहिलों असतांना मला यांची (मजकडे बोट करून) व अध्यक्ष अधिपतींची भीति वाटते. ... त्यांनीं आपल्या आयुष्यांतील गतगोष्टींचा प्रामुख्यानें उल्लेख केला. मी एल्‌एल्. बी. ची परीक्षा पास झाल्याबरोबर साताऱ्यास वकिली करण्यास प्रारंभ केला. नंतर शिरोळास आपणांस मुनसफची जागा देऊं करण्यांत आली होती. मिरज संस्थानांतील एका प्रमुख अधिकाऱ्याकडून मिरजेस तुम्हांस संस्थानचा न्यायाधीश नेमावयाचा आहे तरी तुम्ही आपली संमति द्या, असें मला विचारण्यांत आलें होतें. पण त्याच वेळीं लो. टिळकांकडून आपणास एक मदतनीस पाहिजे आहे; तेव्हां

तुम्ही पुण्यास या, असें पत्र आलें. तेव्हां आपण काय करावें असा प्रश्न माझ्या मनापुढें उभा राहिला. संस्थानाची नोकरी सोडली तरी खालसांतील नोकरी मिळून निदान सबूजज्ज झालों असतों. पगारहि ७००–८०० रुपये मिळाला असता; पण अंतःस्फूर्तीनें मला पुण्यास खेचलें. तसेंच माझ्या साताऱ्याच्या मित्रांनीं मला पुण्यास जाण्याचा सल्ला दिला. माझ्याहि मनामध्यें लेखन-वाचनाची हौस अनिवार. यामुळें मी पुण्यास गेलों व लो. टिळकांचा मदतनीस म्हणून राहिलों. मला लोकमान्यांनीं मदतनीस होण्याबद्दल पाचारण करावें ही माझ्या आयुष्यांतील एक विधिघटना नव्हे का? यालाच मी दैव – नशीब – म्हणतों. दैववाद व प्रयत्नवाद याविषयीं आपण खूप चर्चा करतों व वाद घालतों; आणि प्रसंगीं प्रयत्नवादाची सरशी होते; पण मानवी आयुष्यांत अशा कांहीं घटना होत असतात कीं, त्यांचा प्रयत्नांशीं बादरायणी संबंधहि पोचत नाहीं. त्या घटनांस मी दैव मानतों. मला माझ्या दैवानेंच हात दिला; म्हणूनच मी पुण्याला गेलों व लोकमान्यांचा मदतनीस झालों; व त्यांचा सहवास मला लाभला. लोकमान्यांकडून मला स्फूर्ति मिळाली. त्यांची गाढ विद्वत्ता, अलोट बुद्धिमत्ता, लोकहिताविषयीं तळमळ, देशावरील अढळ प्रेम, कमालीचा स्वार्थत्याग व मुख्यतः त्यांचें सच्छील व शुद्धाचरण या त्यांच्या अंगच्या गुणांमुळें ते मला सूर्याचा प्रकाश वाटत. त्यांच्या चतुर मार्गदर्शनाप्रमाणें मी देशाची अल्पस्वल्प सेवा करीत आलों आहें. माझ्याकडून जी कांहीं बरी-वाईट सेवा झालेली असेल त्याचें सर्व श्रेय लो. टिळकांना आहे. मी केवळ निमित्त कारण आहें, अशी माझी भावना आहे."

❋

गो. म. भिडे

(वकील, अमळनेर)

भोर येथें मी शिकत असतांना तात्यासाहेब कांहीं कारणास्तव भोरला आले होते व त्यांचा त्या वेळीं सरकारी अतिथिगृहांत मुक्काम होता. मला थोरामोठ्यांच्या स्वाक्षरी व संदेश घेण्याची फार हौस आहे. मला तात्यासाहेब आल्याची बातमी कळतांच तत्क्षणीं माझी वही घेऊन तात्यासाहेबांची सही घेण्यास अतिथिगृहाकडे दौडलों. तात्यासाहेबांनीं माझ्या वहींत असणारे इतर पुढाऱ्यांचे संदेश व स्वाक्षऱ्या चांगल्या आस्थेनें पाहिल्या व शेवटीं वहींत माझ्या आईवडिलांची स्वाक्षरी नसल्याचें माझ्या निदर्शनास आणून मला त्यांनीं 'आधीं स्वतःच्या आईवडिलांची सही घे व ती त्यांत पाहिल्यावरच मी संदेश लिहीन' असें मला निक्षून सांगितलें. मला त्या वेळेस फार वाईट वाटलें; पण लगेच माझ्या आईची व वडिलांची सही घेऊन मी त्यांच्याकडे गेलों. त्यांनीं त्या स्वाक्षऱ्या पाहिल्या

तेव्हांच त्यांनीं मला स्वाक्षरी दिली. ही आठवण फारच क्षुल्लक वाटेल, पण त्यावरून तात्यासाहेबांना आपल्या मातापितरांबद्दल किती आदर व पूज्यभाव वाटत होतो हे दिसून येतें.



दामोदर दत्तात्रेय जोशी

(आयुर्विद्याविशारद, सांगली)

(१) टिळक महाविद्यालयाचा मी विद्यार्थी. प्रथम वर्षास इंग्रजी विषयाला 'पार्लमेंटरी स्पीचेस' हें पुस्तक लावलें होतें. इंग्रजी विषयाला तात्यासाहेब 'प्रोफेसर' लाभले होते. ते आठवड्यांतून दोन दिवस प्रत्येक दिवशीं एक तास याप्रमाणें इंग्रजी विषय शिकवीत. महाविद्यालयाची वेळ दुपारीं २ ते ५ अशी होती. तात्यासाहेब दुपारीं २ ते ३ आमचा तास घेत. ते विनावेतन स्वखुषीनें भर दुपारीं आपल्या आवडत्या विश्रांतीलासुद्धा फांटा देऊन आम्हांला शिकवीत, हें आमचें केवढें मोठें भाग्य! त्यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व आम्हां विद्यार्थ्यांना त्या वेळीं चांगलेंच प्रत्ययास आलें. तात्यासाहेब आपले तास न चुकतां घेत हे त्यांच्या नियमितपणाचें ठळक उदाहरण होय. आम्हांस नेमण्यांत आलेलें पुस्तक साधारणतः रुक्ष विषयांतच गणलें जाई; पण तो रुक्ष विषयहि तात्यासाहेब साधा व सोपा करून आम्हां विद्यार्थ्यांचें मन त्यांच्या शिकवण्यांत तल्लीन करून सोडीत. ते अव्वल दर्जाचे प्राध्यापकहि होते.

(२) तात्यासाहेबांनीं अनेक संस्थांना देणग्या देऊन आर्थिक साह्य केल्याचें पुष्कळांच्या लक्षांत असेल. 'यशोदा-चिंतामणी ट्रस्ट' स्थापन करून त्यांतून शिष्यवृत्तीहि चालू केल्याचें सर्वांना माहीत आहे; पण विद्यार्थ्यांनासुद्धा ते प्रोत्साहनार्थ बक्षिसें देत हें फारसें कोणाच्या लक्षांत नसेल. मी १९३१ सालीं 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा'ची 'आयुर्विद्याविशारद' ही पदवीपरीक्षा उत्तीर्ण झालों. तारीख ५ जुलै १९३१ ला आमचा पदवीदान समारंभ झाला. या प्रसंगीं आम्हां सर्व पदवीधरांना त्यांनीं स्वतः लिहिलेल्या ग्रंथांपैकीं वीस रुपये किंमतीचीं पुस्तकें बक्षीस म्हणून दिली. त्यांनी आम्हां सर्वांना विद्यादान देऊन वर हे उपकार केले. त्यांचें गुरुऋण मात्र आम्ही फेडूं शकलो नाही.

बी. एन्. सहस्रबुद्धे

(डेक्कन जिमखाना, पुणे)

(१) सन १९०८ मध्यें नामदार गोखल्यांचीं दोन व्याख्यानें पुण्यांत रविवारांतील फडके यांच्या दिवाणखान्यांत झालीं. दोन्ही व्याख्यानांस तात्यासाहेब हजर होते. १९०८ सालासारख्या परिस्थितींत गोखल्यांच्या व्याख्यानास तात्यासाहेब केळकरांनीं हजर राहणें व व्याख्यानानंतर बोलणें म्हणजे परम धाष्टर्य. त्या वेळीं तात्यासाहेबांना शिव्या न देणारा त्यांच्या जहाल पक्षांत जवळजवळ कोणी नव्हता व तात्यासाहेबांच्याबद्दलहि जवळजवळ गोखल्यांच्याइतकाच अनादर जहाल लोकांत होता. गोखले व केळकर या दोघां थोर पुढाऱ्यांबद्दल जहाल-मतवादी लोक काय वाटेल तें बडबडतांना प्रत्यहीं दिसत. याच वर्षी येथील डेक्कन जिमखाना सुरू झाला व जिमखान्याच्या एका मॅचमध्यें तात्यासाहेब खेळले. तात्यासाहेब पहिल्यापासूनच जिमखान्याचे आधारस्तंभ व अलीकडे बरीच वर्षें ते जिमखान्याचे अध्यक्ष होते. मॅच पहाण्यास हजर असलेल्या प्रेक्षकांत क्रिकेटप्रेमी व प्रसिद्ध साहित्यिक कै. 'रामगणेश गडकरी' होते व त्यांनीं तात्यासाहेबांच्या खेळण्याच्या कौशल्याबद्दल वाहवा केली.

(२) सन १९३२ सालीं मद्रासमधील 'स्वदेशमित्रम्' ह्या तामीळ दैनिकाचा पंचविसावा वाढदिवस तात्यासाहेबांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. त्या वेळीं केलेलें तात्यासाहेबांचें इंग्रजी भाषण नितान्तरम्य सुंदर झालें. स्वभावांतील गोडव्यामुळें तात्यासाहेबांनीं मद्रासमधील सर्व महाराष्ट्रीय मडळी आपलीशी केली. एवढा मोठा महाराष्ट्रीय पुढारी आपल्यांत आहे याची जाणीव आमची आम्हांसच करून घ्यावी लागत होती, इतके तात्यासाहेब समरस होत व अत्यंत आपलेपणानें सर्वांची चवकशी करीत. तेथील महाराष्ट्र-मंडळानें तात्यासाहेबांस मानपत्र दिलें. स्वागतपदें ४-५ महाराष्ट्रीय मुलींनीं म्हटलीं. तात्यासाहेब येणार ही सूचना २-४ दिवसच आगाऊ कळली होती, यामुळें पद चांगलें बसलें नव्हतें. मानपत्र-समारंभ संपल्यावर तात्यासाहेब ह्या ४-५ मुलींसह एका खोलीत जाऊन बसले व पद कसें म्हणावयास पाहिजे होतें ते त्यांनीं मुलींस स्वतः गाऊन दाखवीत दाखवीत त्यांजकडून बसवून घेतलें! ही हकीकत मला माझ्या मुलींच्याकडूनच त्या संध्याकाळीं कळली. मद्रासच्या महाराष्ट्र-भुवनाला तात्यासाहेबांनीं स्वतःचे १०० रुपये व केसरी ट्रस्टतर्फे ३००० रुपयांची देणगी दिली. एवढेंच नव्हे तर, तेथील प्रमुख महाराष्ट्रीय मंडळींच्या विनंतीला मान देऊन १-२ वर्षें ते ट्रस्टीहि होते.

❋

गोपाळ कृष्ण वेलणकर

(नाडण, जि. रत्नागिरी)

(१) तात्यांचा व आम्हां वेलणकर मंडळींचा परिचय झाल्यानंतर आम्ही बोलाविल्यावरून तात्यांनीं आमच्या गांवीं येण्याचें कबूल केलें. तात्यांच्या देवगडच्या रहात्या घरापासून आमचें घर सहा मैल दूर आहे. सहा मैलांपैकी तीन मैल खाडीतून होडीनें जातां येतें. पुढें पायवाट आहे. तेथून तात्यांना आणण्यासाठीं आम्ही मेण्याची सोय केली होती. आमच्या घराजवळ गड्यांनीं मेणा उतरतांच तात्यांनीं कोटाच्या खिशांत हात घातला व पैसे बाहेर काढले. त्या वेळीं मी म्हणालों, " तात्या, गडी आमच्या घरचे आहेत. त्यांना मजुरी देण्याची जरुरी नाही. " त्यावर तात्या निश्चयपूर्वक स्वरांत म्हणाले, " मी मजुरी देत नाहीं, त्यांना बक्षीस देत आहें. तुम्ही माझ्याआड येऊं नका. अगदीं बोलूं नका. " गडी नको नको म्हणत असतांहि तात्यांनी त्यांच्या हातांत तीन रुपये ठेवले! आमचे वडील अगदीं टापटिपीनें वागणारे गृहस्थ. पायांतील जोडे-वहाणा ठेवण्याची जागासुद्धां अगदीं ठरीव अशी आहे. तात्या जेव्हां प्रथम आले त्या वेळीं जोडे काढण्यापूर्वी त्यांनी इकडेतिकडे पाहिलें व दूर असलेल्या वहाणा ठेवण्याच्या जागीं जाऊन त्या ठिकाणीं आपले जोडे नेऊन ठेवले! इतक्या क्षुल्लक बाबतींतसुद्धा ते किती व्यवस्थितपणें वागत हें पाहण्यासारखें आहे.

(२) आमचा नि तात्यांचा परिचय वाढल्यानंतर आम्ही भेटीदाखल त्यांच्याकडे फणस पाठवीत असूं. अर्थात् ही भेट घेऊन जाण्याचा प्रसंग आमच्या गडीमंडळीवर येत असे. आमचा गडी त्यांच्या घरीं गेल्याबरोबर, दुसरा कोणी पुढें होतो कीं नाहीं हें न पहातां, तात्या स्वतः गड्याच्या डोक्यावरील ओझें उतरण्यास पुढें होत. हें पाहून आमच्या गडीमंडळींना चमत्कार वाटे. एक तर तात्या इतके जवळ आल्याबद्दल त्यांना आनंद वाटे; शिवाय एवढे मोठे गृहस्थ आपल्या डोक्यावरील ओझें उतरण्यास येतात कसें याचें नवल वाटे. कारण त्यांना इतर ठिकाणचे अनुभव अगदीं याच्याउलट येत असत.

(३) तात्या नि त्यांचे वडील बंधु अप्पासाहेब असे मिळून एकदां नाडणला आमच्या घरीं आले होते. त्या वेळीं तात्यांचे गुडघे फार दुखत होते. परंतु जातांना विजयदुर्ग ते वाघोटण या सडकेवर मोटारकरितां त्यांना जाणें भाग होतें. आम्हीं मेण्याची सोय केली असतांहि तात्यांनीं मेण्यांत बसण्याचें अगदीं साफ नाकारलें. वाटेच्या वरच्या बाजूची घाटी चढत असतांना त्यांचे गुडघे फार दुखूं लागले. थोडीशी वाट चढून गेल्यानंतर जरा थांबून तात्या आम्हांस म्हणाले, " जसें आपण एखाद्या लहान मुलास सांगतों कीं, जरा हें काम कर म्हणजे तुला मी खाऊ देईन

तसें मी माझ्या गुडघ्यांना सांगत आहे कीं, जरा चला म्हणजे तुम्हांस बसायला मोटार मिळणार आहे!" गुडघे दुखत असतांहि तें दुःख अशा खेळकरवृत्तीनें तात्यांनीं सहन केलें. मला वाटतें सुख हें त्यांच्या स्वभावांतच होतें; आणि म्हणून स्वतःविषयीं बोलतांना मी सुखी आहे असें ते नेहमीं म्हणत असत, त्याचें कारण हेंच असावें.

(४) व्यक्तिगत कायदेभंगाची चळवळ सुरू होती. त्या वेळीं एका महाराष्ट्रीय पुढाऱ्यानें नुसत्या महाराष्ट्रांतून एक लक्ष स्वयंसेवक मरण्यास तयार देतो, असें जाहीरपणें सांगितलें होतें. मी तात्यांना म्हणालों कीं, बघा, हे पुढारी किती जहाल बोलले तें! तेव्हां तात्या म्हणाले, "बोलले याला महत्त्व नसून काय घडतें इकडे लक्ष ठेवा! सबंध हिंदुस्थानांत कायदेभंगाची चळवळ झाली त्या वेळीं साठ हजार लोक तुरुंगांत गेले. तेसुद्धां मरणास तयार नव्हते. कित्येकांना मागाहून पश्चात्ताप झाला. मग नुसत्या महाराष्ट्रांतून एक लक्ष स्वयंसेवक मरण्यास तयार असे देतों या म्हणण्यांत काय अर्थ आहे? अशा बोलण्याने व तसें न घडण्यानें आमची किंमत काय हें सरकाराला मात्र कळून चुकतें."

(५) एकदां आम्ही मंडळी तात्यांच्याकडे देवगडला गेलों होतों. त्या वेळीं एक प्रसिद्ध पुढारी त्यांच्याकडे आले होते. ताल्या व ते भाई यांचा संवाद सुरू होता. संवाद प्रकट असल्यामुळें आम्हांला ऐकण्यास प्रत्यवाय नव्हता. तो संवाद पुढीलप्रमाणें: भाई:— मी राजकारणांत पडलों आहें, तरीसुद्धां मला लग्न करावें असें वाटतें. तरी याबद्दल तुमचें मत काय आहे! तात्या:— तुम्हांला मरण-मारणाचें राजकारण खेळावयाचें असेल तर मात्र तुम्ही लग्न करूं नका. कारण आज लग्न कराल व उद्यां जगांतून नाहींसे व्हाल अगर कायमचे तुरुंगांत जाऊन बसाल; मग तुमच्या बायकोची स्थिति काय! लग्न केलेंत तर आधीं तिची व संसाराची नीट व्यवस्था लावा. बायकोला तुमच्या नांवानें जन्मभर दुःख करीत बसण्याचा प्रसंग आणूं नका. मरण्या-मारण्याचें राजकारण करणाऱ्यांनीं लग्न न केलेलेंच बरें!

(६) तात्यांनीं देवगडच्या घरासमोर बसण्याकरितां कांहीं ओटे बांधून घेतले. ओटे बांधण्याचें काम सुरू असतांना आम्ही तात्यांच्या घरीं गेलों होतों. आम्ही गेलों त्या वेळीं गवंडी काम करीत होता व ताल्या त्याच्याजवळच उन्हांत उभे होते. त्यानें तात्यांना सांगितलें कीं, काटकोन साधण्यासाठी चारी कोनांना आधी चार खुंट्या मारल्या पाहिजेत. त्यावर तात्या म्हणाले कीं, अरे, खुंट्या कशाला? आपण नजरेनें काटकोन कसा साधतो तें पाहूं! मी सांगतों तसे दगड लाव, मग पाहूं काटकोन जमतो कीं नाहीं तें. त्यानंतर गवंड्यानें तात्यांच्या सांगीप्रमाणें दगड बसविले व नंतर ते काटकोनांत आहेत कीं नाहींत तें तो पाहूं लागला व

आश्चर्य असें कीं, काटकोनांत एका सुताचाहि फरक निघाला नाहीं! 'शेवटचें लढाऊ जहाज' या गोष्टींत त्यांनीं राजकारणाविषयीं जो अंदाज बांधला तो खरा ठरला म्हणून लोक त्यांची स्तुति करतात; परंतु साध्या गोष्टींतसुद्धां त्यांचा अंदाज किती अचूक ठरे, हें सदर प्रसंगावरून दिसून येतें. वास्तविक गवंडी याचा नेहमींचा तो धंदा; परंतु तात्यांनी त्यालासुद्धां चीत केल. तो गवंडी म्हणालाच कीं, "माझ्या आयुष्यांत अशा 'नजर पाहणीचा' मनुष्य मीं बघितला नाहीं!"



पु. ल. ओगले

(शहापूर, बेळगांव)

(१) १९१९ सालीं पत्रसृष्टींत प्रविष्ट होऊन आयुष्य व्यतीत करण्याचा विचार मी करीत असतां मुंबईस लोकमान्यांचे स्नेही श्री. छत्रे यांना भेटलों. तेव्हां त्यांचा ओढा श्री. खाडिलकरांकडे असतांहि तात्यासाहेबांनाच भेटण्याचा त्यांनीं सल्ला दिला. ही गोष्ट माझ्या मनावर कायमची ठसलेली आहे. पत्रसृष्टि व संपादकीय वकूब यासबधीं तात्यांनी या सल्ल्याच्या प्रसंगानें जे विचार ठसविले त्यांमध्यें विचारांचा प्रामाणिकपणा, परिश्रमांत निरलसपणा आणि व्यवसायसृष्टींतहि ममत्वाचा जोपासना करण्याची आवश्यकता, यांना किती प्रमुख स्थान होतें याचा विसर मला कधींहि पडणार नाही.

(२) १९२९ च्या बेळगांवच्या साहित्य-संमेलनाला तात्यासाहेब आले आणि त्यांनी त्या वेळच्या एकंदर वादविषयांत प्रामुख्यानें भागहि उचलला; त्या वेळचा एक प्रसग कधींहि न विसरण्यासारखाच आहे. बेळगांव जिल्हा प्रामुख्यानें कानडी असून कर्नाटकचा भाग आहे अशा आशयाच्या पत्रकावर श्री. बेळवी व गंगाधररावजी यांच्या स्वाक्षऱ्यांनंतर तात्यासाहेबांची स्वाक्षरी झाल्याचें बाहेर आलें होतें. वरील आशयाच्या श्री. गंगाधररावजींच्या ठरावाला तात्यासाहेब अनुमोदन देणार हें त्यांनीच मला सांगितलें! श्री. बेळवींचे चिरंजीव भाऊराव मजकडे 'जितं मया' दृष्टीनें पाहूं लागले.! मीं तात्यासाहेबांना बाहेर बोलावण्याचा लहानतोंडीं मोठा घास घेतला; तेहि तत्काल बाहेर आले. मी त्यांना १९२० पासून गुरुबंधु व स्नेही यांच्याबद्दलच्या आपलेपणाच्या आहारीं जाऊन, टिळकपक्ष व महाराष्ट्रीय राजकारण यांच्यांत फुटीरपणा उत्पन्न होण्यास आपण उघड्या डोळ्यांनीं कसा वाव दिला, याबद्दलचे माझे आक्षेप थोडक्यांत त्यांना ऐकवले व आम्हांस तुम्ही होऊन असे दूर कां लोटतां, असा बोचक प्रश्न केला. त्या वेळीं त्यांनीं मला माझ्यावर दृष्टि रोखून स्पष्ट व स्वच्छ सांगितलें, "होय, तुम्ही म्हणतां तें खरेंहि असेल; पण मीं माझ्या वागणुकींत बदल करणार नाहीं. बेळवी-देसाईंडे यांच्या

सह्या ज्या कागदावर होईल त्या कागदावर माझीहि सही होईल, असें मीं त्यांस वचन दिलें आहे. तुम्ही आतां माझा नाद सोडा, माझें मन वळविण्याचा प्रयत्न करूं नका." अत्यंत निराशाजनक असें हे त्यांचे शब्द ऐकत असतांनाच माझा त्यांच्याबद्दलचा आदरभाव मात्र अनेकशः वृद्धिंगत होत होता. कारण याच वेळीं ते म्हणाले कीं, "एक केळकरांचा मान्यता म्हणजे तुम्हां तरुणांची मुकटदाबी असें तुम्ही कां मानतां? तुमचा आग्रह न्याय्य असेल तर तो मी उलट गेलों तरी सोडूं नका."

(३) १९२० मध्यें माझ्या राहत्या व व्यवसायाच्या स्थलाचा त्याग करावयास उद्युक्त करणारा प्रसंग माझ्यावर आकस्मिक कोसळला. त्या वेळीं मी विश्वासानें तात्यांच्याकडे धाव घेतली. माझें सर्व म्हणणें ऐकून घेतल्यावर ते म्हणाले, "मला कळल्यापासून मीं या गोष्टीचा विचार केलाच आहे. तुम्ही याल असेंहि वाटलेंच होतें. येथें यायचेंच ठरविलेंत, तर केसरीचा दरवाजा उघडा आहे. तेथें तुमची सोय होणार नाही असें नाहीं; पण माझें ऐकावयाचें असेल तर तुम्ही त्याच गांवीं यापुढें पांच वर्षें प्रतिष्ठित सार्वजनिक संस्थेत बावरूं शकलांत तर तुम्हाला जें समाधान व भूषण वाटेल तें येथें येऊन केसरीच्या आश्रयानेंहि मिळणार नाहीं हें विसरूं नका. लोकमत हें जितकें अविवेकी असतें तितकेंच तें विसराळू आणि उदारहि असतें, याचा अनुभव तुम्हाला येईल व तोच शेवटीं सुखद ठरेल असें मला वाटतें." शेवटीं झालेंहि तसेंच!

(४) यापुढें अनेकदां माझी-त्यांची गांठ पडली; पण आतां लांबण लावत नाहीं. अगदीं अखेरला त्यांचें मला पत्र आलें. तें दि. २२-४-४७ चें. मीं त्यांना माझ्या चिरंजिवाच्या मुंजीचें निमंत्रण पाठवून येण्याचा अति आग्रह केला. निदान आशीर्वाद तरी धाडून द्या असा आग्रह केला होता. "या दिवसांत आशीर्वाद देणारापेक्षां आशीर्वाद मागण्याची बुद्धि होऊन तो प्रेमपुरःसर मागणारा हाच मला अधिक माणुसकी असणारा माणूस वाटूं लागला आहे!" असें वाक्य या पत्रांत त्यांनीं लिहिलें आहे!

❋

नारायण विनायक जोशीराव
(मुंबई)

(१) १९२९ सालीं मी तात्यासाहेबांना भेटलों; तो त्यांच्याशीं वादविवाद करण्याकरितां. वादाचे मुद्दे दोन. एक असा कीं, कांहीं लोक त्या वेळीं मजजवळ म्हणत कीं, "केळकरांनीं टिळक-चरित्र लिहिलें खरें; पण केळकर मूळचे दुष्टच. त्यांनीं टिळक-चरित्रांत टिळकांचें गुणवर्णन केलें, त्याबरोबर टिळकांवर प्रच्छन्न टीकाहि

केली व आपला दुष्टावा साधला. उदाहरणार्थ, टिळक-चरित्रांतील चिरोल-प्रकरणाच्या प्रस्तावनेंतील मुख्य वाक्यच पहा. ' ... ... एखादा मनुष्य वीरश्रीच्या हट्टानें किंवा फाजील आत्मविश्वासानें डोंगराच्या अंगावर चढून जाऊन त्याच्या डोक्यावर पाय देईन अशी महत्त्वाकांक्षा धरतो; पण त्या प्रयत्नांत दमून जातो, घसरून खालीं पडतो आणि डोंगराला कांहींएक इजा न होतां मनुष्याचेंच अंग ठेचाळून रक्त निघतें, तशी स्थिति टिळकांची या चिरोल-प्रकरणीं झाली.' यावरून केळकरांना टिळकांचें गुणवर्णन करावयाचे होतें, का त्यांचें दोषदर्शन करावयाचे होतें ?" पण मला स्वतःला ही गोष्ट पटेना, म्हणून प्रत्यक्ष खुलासा करून घेण्याकरितां मी केळकरांना भेटलों व त्यांस विचारलें. ते म्हणाले, "लोकांचें म्हणणें एका अर्थानें खरें आहे. चिरोल-प्रकरणीं येथील हायकोर्टपर्यंत दाद मागणें ठीक होतें; पण हायकोर्टांतहि न्याय मिळाला नाहीं म्हणून फिर्याद पुढें प्रिव्ही कौन्सिलपर्यंत नेणें मला स्वतःला पसंत नव्हतें व त्याप्रमाणें त्या वेळींच मीं टिळकांना स्पष्टपणें माझें मत सांगितलें होतें. कारण, माझ्या मतें दोन हिंदी माणसांतच न्याय देण्याचा प्रश्न असला तर ब्रिटिशांच्या न्यायाचा कांटा समतोल असतो हें साधारणपणें मान्य होण्यासारखें आहे. पण एका हिंदी माणसाविरुद्ध एका ब्रिटिश माणसाची केस असेल तर त्यांच्या न्यायाचा कांटा केव्हांहि ब्रिटिश माणसाकडेच झुकेल याबद्दल शंकाच नको. कारण ब्रिटिश लोक हे कांहीं देवदूत किंवा देव-माणसें नव्हत; आणि त्याप्रमाणेंच घडलेंहि. म्हणून प्रिव्ही कौन्सिलकडे दाद मागणें, त्याबद्दल इतका खर्च करणें व दगदग सोसणें इष्ट नाहीं असें त्या वेळीं जें मीं म्हटलें तेंच आतां लिहिलें. आतां यांत कुणाला माझा दुष्टावा दिसत असला तर दिसो. आहे ती वस्तुस्थिति तुम्हाला मीं सांगितली." यावरून माझी तर त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल व प्रांजलपणाबद्दल पूर्ण खात्री झाली व त्यांच्याविषयींचा माझ्या मनांत अगोदरच असलेला आदर द्विगुणित झाला; आणि चरित्रवर्णन म्हणजे नुसती विभूतिपूजा नव्हे हें म्हणणें जसें केळकरांनीं टिळक-चरित्र लिहून खरें केलें, तसेंच आदर्श चरित्रलेखन कसें असावें हेंहि त्यांनीं दाखवून दिलें, असेंच शेवटीं सर्व लोक म्हणत आहेत.

(२) वादाचा दुसरा मुद्दा होता गीतारहस्याबद्दल. टिळकचरित्रांत गीतारहस्याविषयीं जे वर्णन आलें आहे त्यांत अर्जुन हा ज्ञानी होता का नव्हता याविषयीं टिळकांचें म्हणणें काय होतें तें आलें आहे. तें टिळकांचें म्हणणें बरोबर का चूक असा मीं केळकरांना प्रश्न केला. ते म्हणाले, "टिळकांचे काय म्हणणें होतें तें मीं लिहिले. तें बरोबर का चूक तें मी कसें सांगू ?" मीं म्हटलें, टिळक हयात असते तर त्यांनाच मीं विचारलें असतें. ते नाहींत म्हणून तुम्हांला विचारतों. गीतारहस्य हा शास्त्रीय ग्रंथ आहे. त्यांतील भाषा कांटेकोरपणेंच वापरली पाहिजे. वेदान्त-परिभाषेंत 'ज्ञानी' याचा अर्थ ब्रह्मज्ञानी. त्याप्रमाणें अर्जुनाला ज्ञानी म्हटल्यास

गीतेचें मग प्रयोजन काय? कारण 'येन ज्ञानेन सर्वं विज्ञात भवति।' यावर केळकर म्हणाले, "अहो, ज्ञान्याज्ञान्यांत कांहीं प्रकार, पर्याय, श्रेणी असतातच कीं नाहीं? त्यांत कुठेंतरी अर्जुन बसतो आणि तोच टिळकांचा अभिप्राय असावा." अर्थात् यानें माझें तितकेसें समाधान झालें नाहीं. पण मी लहान असतांनासुद्धां या विषयासंबंधी वाद करण्याची त्यांनीं तत्परता दाखविली, याचें मला आश्चर्य वाटलें.

दत्तात्रेय गोपाळ शिरगांवकर

(राधानगरी, कोल्हापूर)

(१) तात्यासाहेब यांस एकदां मी विचारलें, "तात्यासाहेब, मला आठ मुलगे आहेत. मी बुद्धीनें व आर्थिकदृष्ट्या साधारण मनुष्य; माझ्या मुलांना मी शिक्षण काय देऊं? आपण ज्ञानी आहांत, मला सांगा." ते म्हणाले, "असा प्रश्न करून तुम्ही मला गोंधळांत पाडलेंत; कारण मीं सुद्धां माझ्या स्वतःबद्दल ठाम असें कांहींच ठरविलें नव्हतें. प्रथम् वकिली करूं लागलों व पुढें लोकमान्यांनीं बोलाविल्याबरोबर पुण्यास येऊन आज अशा स्थितीप्रत आलों. माझ्या मुलांच्या बाबतींतहि ठराविक असें कांहींच ठरविलें नव्हतें; तथापि तुम्ही विचारतां म्हणून सांगतों कीं, कांहीं झालें तरी मुलांना निरुद्योगी ठेवूं नका. त्यांचा कल पाहून त्यांना जें आवडेल तेंच शिक्षण द्या व वीस वर्षें होईपर्यंत त्यांचें संगोपन करा. वीस वर्षांच्या पुढे त्यांची जबाबदारी त्यांच्यावर ठेवा. त्यांनीं स्वावलंबी बनून आपला जीवनक्रम चालवावा. पुढील जबाबदारी तुमच्यावर नाहीं. अशानें तुम्हांस समाधान मिळेल."

(२) एकदां मी तात्यासाहेबांना विचारलें कीं, "तात्यासाहेब, देव श्रेष्ठ कीं देश श्रेष्ठ?" ते हंसले व म्हणाले, "देवाचें श्रेष्ठत्व केव्हांहि आहेच; परंतु आज आपण देशाचें श्रेष्ठत्व प्रथम मानलें पाहिजे. थोडक्यांतच पहा कीं, देव व देश या दोन शब्दांत 'व' व 'श' अशीं अक्षरें आहेत. त्यांत व च्या पुढें श हें अक्षर मूळाक्षरांतच आहे. अर्थात् त्या दृष्टीनें देवापेक्षां देशच पुढें आहे!" याप्रमाणें विनोद करून थोडक्यांत त्यांनीं माझी समजूत केली.

(३) "देशांत उत्पन्न झालेले अनेक पक्ष, परस्परविरुद्ध संस्था, तट वगैर प्रकारांमुळें सर्वत्र अस्वस्थता, क्षोभ व अनेक चळवळी सुरू आहेत. स्वास्थ्य कोठेंच दिसत नाहीं, पुढें कसें होणार, मोठी काळजी वाटते. यास उपाय काय?" असें मीं त्यांस विचारिलें. त्यावर ते पांच मिनिटें स्तब्ध बसले व म्हणाले, "काळजीचें कारण नाहीं. व्यक्ति असो, समाज असो, राष्ट्र असो, त्यास चळवळ ही पाहिजेच. स्वास्थ्य हें घातक आहे. मात्र ध्येय उच्च असावें. स्वतः निरपेक्ष असावें,

म्हणजे यज्ञ ठेवलेलेंच. आळशीपणाचें समाधान मुळींच उपयोगी नाहीं. महत्त्वाकांक्षा पाहिजे. गीताग्रंथाचा उपदेश कृतींत आणिला पाहिजे. आमच्या लोकांस काय पाहिजे याबद्दल न्या. रानड्यांचें एक वाक्य सांगतों. तें असें – "What our people want, is discontent; but I am sorry to say that they always seem to be satisfied with everything." टिळकांना चिरोलनें 'The father of Indian unrest' असें म्हटलें हें त्यांचें वर्णन यथार्थ आहे."

(४) गेल्या वर्षी उन्हाळ्यांत सायंकाळीं मी फिरावयास जातांना वाटेंत ते मला भेटले. मला पहातांच ते म्हणाले, "केव्हां आलांत? घरीं आला नाहींत?" मीं विचारलें, आपली प्रकृति ठीक आहे ना? ते म्हणाले, "आहे त्या मानानें ठीक आहे. थोडा अस्वस्थपणा वाटतो. पण हें आतां चालावयाचेंच. होईल तोंपर्यंत काम करावें, उद्योग करावा व हांक आली कीं, चालते व्हावें. मरणाचें भय कधीहि मनांत बाळगूं नये. समर्थांनीं म्हटलें आहे, 'मरणाचें असावें स्मरण' त्यास तयार असावें." मीं म्हटलें, आपण असें बोलूं नका, मनास वाईट वाटतें. त्या वेळीं हंसत व आनंदावें त्यांनीं सांगितलें कीं, "हांकेची मी वाट पाहात आहे. महासाधु सॉक्रेटिसाप्रमाणें मी मृत्यूचें स्वागतच करीन." याप्रमाणें बोलून ते घाईघाईनें एका सभेस निघून गेले.

❋

नीलकंठ भाऊ गांधी

(चिपळूण)

लोकमान्य टिळकांनीं रायगडावर श्रीशिवजन्मोत्सव सुरू केला. डोंगर-चढण, वाट आकुंचित व फार कठीण, त्रासदायक. तरी त्या जंगली रानांतून, खड्या-धोंड्यांतून हजारों मंडळी वर शिवजयंती-समारंभ पाहण्यास मोठ्या उत्साहानें जमली होती. तो पहिलाच उत्सव होता. सांगावयाचें विशेष म्हणजे त्या वेळेस तात्यासाहेब सोंवळें नेसून काच्या मारून स्वतः भाताची रास परातींत घेऊन ब्राह्मणादि सर्व मंडळींस जेवण वाढीत होते! त्यांनीं अति मेहनत घेतली. लोकमान्य स्वतः सर्वांवर देखरेख करण्याचें काम फिरत राहून करीत होते. हाताशीं साहाय्यक असतांना तात्यांनीं व लोकमान्यांनीं स्वतः कामें करण्याची कमाल केली. तें दृश्य, चार तपें होत आलीं, तरी माझ्या नजरेसमोरून हलत नाहीं!

❋

गोविंद केशव पांडे

(मुळावा, जि. यवतमाळ)

सन १९३४ ची गोष्ट. आमच्या गांवीं श्रीदत्त संस्थान स्थापन होऊन कांहीं दिवस झाले होते. श्रीगुरूच्या शिष्यमंडळींपैकी एकानें आपली कांहीं इस्टेट या संस्थानास दिली. अर्थात् त्या इस्टेटीचा ट्रस्ट करण्याचा विचार होता. गांवीं जरूर असा कोणी तज्ज्ञ नसल्यामुळे बाहेर गांवच्या तज्ज्ञाचा सल्ला घेणें जरूर होतें. यवतमाळ येथील श्री. बापूजी अणे हे कांहीं महत्त्वाच्या कार्यार्थ बाहेर फिरतीवर असल्यामुळें त्यांच्या ज्ञानाचा लाभ होणें शक्य नव्हतें. केसरी संस्थेचा ट्रस्ट झाला असल्याचें वाचनांत होतें म्हणून तात्यासाहेब यांच्याकडेच पत्र पाठविण्याचें ठरलें. पण सर्वांना शंका ही कीं, हे एवढे मोठे गृहस्थ व बहुव्यवसायी हे आमच्यासारख्या सामान्य माणसाच्या पत्राला उत्तर देतील हें शक्य नाहीं. पण त्यावर एक उपाय म्हणून उत्तराकरितां तिकिटें घालून पत्र पाठविण्याचें ठरविले व तसें अखेर पत्र पाठविलें. पण आमचा अंदाज सर्वस्वी चुकून त्यांनीं आम्हांला त्वरित व योग्य उत्तर तर पाठविलेंच; पण आमची तिकिटें परत करून स्वतः पोस्टेज भरून उत्तर पाठविलें! त्यांचें उत्तर जसेंच्या तसेंच खाली दिलें आहे. हेतु हा कीं, तें वाचून वाचकांना त्यांच्या अंगच्या कांहीं गुणांची ओळख होईल.

तात्यासाहेबांचें उत्तर

कृ. सा. न. वि. वि. – आपलें पत्र पावलें. ट्रस्ट हा शब्द जरी सर्वसामान्य असला, तरी एका संस्थेचें ट्रस्टडीड दुसरीस सहसा उपयोगी पडत नाहीं. माझा आपणास सल्ला असा की, आपण कागदपत्र यवतमाळ येथील एखाद्या वकिलास दाखवून सल्ला विचारावा. मला सर्व कागदपत्र पाहिल्याशिवाय सल्ला देतां येणार नाहीं. श्री. बापूजी अणे हे आतां यापुढें बहुतेक यवतमाळ येथेंच असतील. तरी आपण त्यांचा सल्ला घ्यावा. या कामाला लागेल तो वेळ खर्च करण्यास मी नाखूष नाहीं. परंतु चांगलें काम चांगल्या प्रकारें व्हावें अशी इच्छा म्हणून आपणाला वरीलप्रमाणे लिहिलें आहे. तरी गैरसमज करून घेऊं नये. चांगल्या माणसाला विशेषतः वकिलाला विचारल्याशिवाय कोणतीहि गोष्ट करूं नका. कळावें.

– न. चिं. केळकर



नरहर हणमंत देशपांडे

(वतनदार कुळकर्णी, नंदगड, जि. बेळगांव)

(१) तात्यासाहेब यांच्या दर्शनास आम्ही घरच्या सर्व मंडळींसह गेलों असतांना त्यांनीं आपुलकीच्या भावनेनें आदरसत्कार, विचारपूस, गप्पागोष्टी यांत आम्ही कंटाळेपर्यंत आनंदानें आपला अमोलिक वेळ घालविला. कंट्रोलमुळें साखरेच्या कमतरतेनें काय तारांबळ उडे ! तरी त्यांनीं उपाहारास मेवामिठाई आणवून सर्व मंडळीस चहा दिला. या साध्या गोष्टींतील त्यांची गृहस्थाश्रमी पद्धत, लहानापासून थोरापर्यंत मनापासून विचारपूस करणें वगैरे पाहून आम्हांस आश्चर्य वाटलें ! आम्हां सर्वांची त्यांनीं चौकशी करून राजकीय, सामाजिक वगैरे अनेक विषयांचे अमोलिक विचार त्यांनीं फोड करून आम्हांस समजावून सांगितलें.

(२) उभ्या देशांत मागचा-पुढचा विचार न करितां विचित्र अशा एका विशिष्ट विचारसरणीच्या पाठीशीं उदोउदो करीत अवघा देश असतांना व आपल्या बाजूची कड घेणारा कोणी बलवत्तर नसतांना, झुंजार वृत्तीनें त्यांनी आपला पक्ष आपल्या पायावर उभा करून लढविला. त्यांची तत्त्वनिष्ठा आणि आत्मविश्वास हीं किती जाज्वल्य होती, याची त्यांनीं मला लिहिलेल्या प्रश्नोत्तरांवरून कल्पना होईल. ता. १४-७-३६ च्या बोधपर पत्रांत ते लिहितात, " आपण तत्त्वाप्रमाणें सरळ वागावें, त्याचें चीज कोणीना कोणी, कोठेंना कोठें, करणारा भेटतोच. त्यांतच समाधान मानलें पाहिजे. "



वा. ह. घारपुरे

(एम्. ए., कल्याण)

" शारदोपासक-संमेलन " या नांवाखालीं स्थानिक व उन्हाळ्याच्या सुटीमुळें पुण्यास जाणाऱ्या साहित्यसेवकांचें संमेलन जूनच्या पहिल्या आठवड्यांत भरविण्याचा उपक्रम सुरूं झाला होता. त्या मंडळाचे केळकर अध्यक्ष व म. म. पोतदार कार्याध्यक्ष होते. चिटणीस कोण होते तें मला माहीत नाहीं. पण त्या वर्षी त्या बैठकीलाच मी एक चिटणीस बनलों खरा ! लोकमान्यांच्या राजकारणांत सहकारी असलेले केळकर व शिवरामपंत परांजपे, या वेळीं फेरनाफेर पक्षांत सांपडून विरुद्ध गोटांत जाऊन राजकारणाचा लढा लढवीत होते. पण राजकारणांत प्रतिस्पर्धी असले तरी वाङ्मयप्रांतांत एकत्र येऊन कार्य करण्याला त्यांना हरकत नव्हती. म्हणून शिवरामपंत संमेलनाध्यक्ष व केळकर स्वागताध्यक्ष म्हणून एकत्र आणून २।३

ज्ञाप्यविषयांवर चर्चा घडवून आणावयाची असा आम्हीं विचार केला. कार्यक्रमपद्धति वगैरे, संमेलनाचे दिवस, चर्चाविषय वगैरे गोष्टींचा निर्णय होऊन केळकरांची संमति घेण्याची कामगिरी मजवर व शिवरामपंतांच्या संमतीची कामगिरी दुसऱ्या दोघांकडे सोंपविण्यांत आली. मी दुसऱ्याच दिवशीं सकाळीं केळकरांकडे भेटावयास गेलो. थोड्याच वेळांत डॉ. मुंजे, लोकनायक अणे आले व घरांत शिरले. मी पुढें सरकून केळकरांना नमस्कार करतों तों ती मंडळी घरांत गेली व केळकरांनीं मला दारांतच अडवून चौकशी केली. मीहि अगदीं थोडक्यांत महत्त्वाच्या गोष्टी त्यांना सांगितल्या आणि आपल्याला स्वागताध्यक्ष म्हणून निवडलें आहे, आपण संमेलनाच्या दिवशीं येथें असाल काय ? व आपली या गोष्टींना मान्यता आहे काय ? असें विचारलें. मी कोण, काय वगैरे न विचारतां तात्यासाहेबांनीं तत्काळ उत्तर दिलें, " मी त्या वेळीं येथेंच आहें, मजवर सोंपविलेलें काम मी करीन. " त्याच वेळीं मीं त्यांना सांगितलें कीं, " शिवरामपंतांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली आहे व त्यांनीं न स्वीकारल्यास 'आनंद'कर्ते वासुदेवराव आपटे यांना विचारावयाचें आहे. " त्याबरोबर त्यांनीं उत्तर दिलें, " कारभारी मंडळानें जें काय ठरविलें असेल तें मला संमत आहे व मी मजवर सोंपविलेलें काम करीन. " असें सांगून त्यांनीं मला निरोप दिला व दार बंद करून घेतलें. पहिल्या तडाख्याला एवढें यश मिळाल्याबद्दल मला फार आनंद वाटला. कै. शिवरामपंतांकडे मात्र त्या दोघांचीहि डाळ शिजली नाहीं. त्या वेळीं भारताचार्य नानासाहेब वैद्य तेथें असत. त्यांनीं आम्हांला आश्वासन दिलें आणि शिवरामपंतांना आणण्याचें कबूल केलें. इतकेंच नव्हे तर " शिवरामपंत न आले तर मीच तुमच्या संमेलनाचा अध्यक्ष होईन ! " असेंहि आश्वासन आम्हांला देऊन ठेवलें ! त्यामुळें आम्ही पुढील उद्योगाला लागलों. पूर्वीच्या संमेलनाप्रमाणेंच हें आमचें संमेलन " भारत इतिहास-संशोधन-मंदिरांत " भरावयाचें होतें. म्हणून आम्ही तिघेहि चिटणीस भारत इतिहास संशोधन-मंदिरांत येत होतों. मध्यंतरींच्या २-३ आठवड्यांच्या काळांत आमच्यापैकीं कोणीच केळकरांच्याकडे गेला नव्हता. पण केळकरांनीं मला बोलाविलें व शारदोपासक संमेलनाचा कार्यक्रम वगैरे माहिती विचारली. हा केळकरांचा थोरपणा मी अद्याप विसरलों नाहीं. छापील निमंत्रण त्यांच्याकडे गेलें असेल, कार्यक्रम 'केसरी'त प्रसिद्ध झाला असेल; पण आम्हांपैकीं कोणी तरी त्यांजकडे न जाणें रीतसर नव्हतें. असें असतां त्यांनीं आपण होऊन मला बोलाविलें, माहिती विचारली, अनुच्चारित अनुस्वार लेखनांत न वापरण्याच्या आपल्याच नव्या प्रथेवर चर्चा करीत असतां अत्यंत खेळीमेळीनें त्या विषयाची आपली बाजू मांडली, संमेलनाध्यक्ष शिवरामपंत व इतर विद्वान् यांचें स्वागत केलें व आमची मनांतली इच्छा पूर्ण केली ! ही केळकरांच्या निरभिमान वृत्तीची आणि लोकहित-तत्परतेची माझी आठवण मी अद्याप १९ वर्षांत विसरलों नाहीं;

आणि त्यापुढें जन्मभर विसरेन असें मला वाटत नाहीं. कारण ती अत्यंत पवित्र, उत्साहवर्धक आणि सार्वजनिक कार्याला प्रेरक अशी आहे !



हरी कृष्ण भडकमकर

(दादर, मुंबई)

केळकरांचा व माझा मुळींच परिचय नव्हता. १९३३ सालीं १ ऑगस्टला चौपाटीवरील लोकमान्यांच्या पुतळ्याच्या अनावरण-समारंभास ते आले होते. त्या वेळीं मीं त्यांना गांठलें व विचारलें कीं, मी लोकमान्यांचा उत्सव घरीं केला आहे, आपण पानसुपारीस त्यानिमित्त आमच्या घरीं यावें अशी माझी इच्छा आहे. तत्काळ ते मला म्हणाले कीं, समारंभ आटोपल्यावर मला भेटा व तुमच्या घरीं जायचें आहे, असें अंतुकाकांना अगोदर सांगून ठेवा. समारंभ रात्रीं ८ ला संपला. पाऊस मी म्हणत होता. त्यांनी सांगितल्याप्रमाणें मी त्यांना भेटलों व पुन्हां एकदां आमच्या घरीं येतां ना असें विचारलें. एक क्षणाचाहि विचार न करतां किंवा यत्किंचितहि अढंटळं न करतां तत्काल ते "हो" म्हणाले व आमच्या घरीं आले ! वास्तविक एवढा मोठा सार्वजनिक समारंभ झाला आहे, शिवाय पाऊसहि चिक्कार पडत आहे, तर आतां तुमच्या घरीं येण्याची काय आवश्यकता आहे, किंवा मला आतां वेळ नाहीं असें कारण देऊन माझी ब्याद त्यांना सहज टाळतां आली असती व मलाहि त्यांना दोष देण्यास मुळींच जागा नव्हती. माझ्यासारख्या अप्रसिद्ध व अपरिचित मनुष्याच्या विनंतीस मान देणें यांत त्यांचें पराकाष्ठेचें सौजन्य दिसून येतें !

नीळकंठ बाळकृष्ण खरे

(शेहेरा, जिल्हा पंचमहाल, गुजराथ)

१९३६ साल. श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांचा वाढदिवस होता. त्यानिमित्त तात्यासाहेब यांस सयाजी-ब्याख्यानमालेतर्फे पाचारण केलें होतें. तात्यासाहेबांकडे मी त्यांची स्वाक्षरी मागण्यास सरकारी अभ्यागतगृहांत गेलों होतों. तात्यासाहेबांची ती धीरगंभीर मूर्ति, पंचा नेसलेले, अंग उघडें आणि डोळ्यावर चष्मा अशा थाटांत एका खुर्चीवर बसून लेखनकार्य करीत असतांना दिसली. अतिशयोक्ति न करितां मी असें सांगू इच्छितों कीं, पंधरा मिनिटें मी दरवाजांत उभा होतों, खाकरलों, खोकलों,

पण त्याचा त्यांना पत्ता नाहीं! त्यांची ती 'सविकल्प समाधि' पाहून मला त्यांना त्रास देणें योग्य वाटलें नाही. अखेर मनाचा हिय्या करून मीं पुढें जाऊन "तात्यासाहेब" म्हणून हांक मारली. माणूस झोपीं गेला असतांना त्याच्या डोळ्यांवर पाणी टाकल्यावर जशी त्याची स्थिति होते तशी त्यांची झाली. मलाहि संकोच वाटला; पण माझा त्यांची स्वाक्षरी घेण्याचा निश्चय कायम होता. मीं स्वाक्षरी मागितली. मागें खुर्चीवर टेकून, मी कांहीं विचारीन अशी त्यांची समजूत म्हणून ते स्वस्थ बसले. मी त्यांचा अमूल्य वेळ खर्च केल्याबद्दल क्षमा मागितली. त्यानींहि "त्यांत काय, त्यांत काय" असें म्हणून चटकन् स्वाक्षरी दिली! नमस्कार करून मीं निरोप घेतला.

❋

भा. मो. भट

(साहित्य-विशारद)

प्रथम एक विद्यार्थी आणि त्यानंतर वृत्तपत्राचा प्रतिनिधि या भूमिकांवरून मीं तात्यासाहेब यांना पाहिले आहे. त्यांच्या भेटींचे, मुलाखतींचे आणि व्याख्यानांचे रिपोर्ट देण्याचें काम मी बरेच वेळां केलेलें आहे.

(१) विनोदनिर्मिति कशी होते यासंबंधीं एका सभेंत बोलतांना केळकर यांनीं जें एक उदाहरण दिलें तें फार मार्मिक आणि विनोदी असे होतें. ते म्हणाले, "मी एकदां कोंकणांत गेलों असतां कांहीं लोक रेड्यांची टक्कर पाहाण्यास चलण्यासाठीं आग्रह करूं लागले. म्हणून मी गेलों. मैदानावर दोन बाजूंनीं दोन सजवलेले रेडे मिरवीत आणण्यांत आले होते. टक्कर पाहण्यास आलेली मंडळी बरीच लांबवर बसली होती. फक्त कांहीं थोडी मंडळी पुढें गेली. दोन्ही रेडे समोरासमोर आले, पण मध्यें एक लांब तांबडें फडकें होतें. लोकांनीं आरडाओरड केली, फडकें काढलें आणि टकरीला सुरुवात झाली." केळकर पुढें म्हणाले, "लगेच दोन-तीन दिवसांनीं मला एका लग्नाचें निमंत्रण आलें, म्हणून गेलों. नवरदेव मिरवीत आला. वधूला समोर उभें करण्यांत आलें. पण मध्यें अंतरपाट होता. टाळ्या वाजविण्याकरिता लोक तयार राहिले. ब्राह्मण अंतरपाट दूर करण्याच्या तयारीत होते. दोनतीन दिवसांपूर्वी पाहिलेल्या टक्करीची मला आठवण झाली. मीं मनात म्हटलें हें लग्न कीं ... ... !" श्रोत्यांत मोठा हंशा पिकला हें सांगावयास नकोच.

(२) नवीन संशोधन अथवा कलानिर्मिति करणाऱ्या तरुण मंडळींना केळकरांच्या आशीर्वादाची फारच आवश्यकता वाटे. माझे स्नेही जी. के. दाबके यांनीं मराठी लघुलिपी तयार करण्याकरिता बरेच परिश्रम केले होते आणि त्याची

स्वतःची तयारी मराठींत मिनिटाला १२० शब्द लिहून घेण्याइतकी होती. त्यांना केळकरांना भेटून आपल्या कलेचें प्रात्यक्षिक दाखवायचें होतें. माझ्या वृत्तपत्र-व्यवसायामुळें मला माहीत होतें कीं, केळकर ग्रंथलेखनांत गुंतल्यामुळें काम जमणें कठीण आहे. तरी पण एकदां जाऊन यावें म्हणून त्यांच्या घरीं दुपारीं आम्ही दोघेहि गेलों. ते त्या वेळीं अति महत्त्वाच्या कामांत होते. यामुळें आमच्या येण्यानें प्रथम ते नाखुष दिसले. पण दाबके यांनीं आपले मराठी लघुलिपीवरील संशोधन सांगतांच आपलें काम बाजूला ठेवून केळकर यांनीं उतारे वाचले. नंतर दाबके यांनीं आपल्या लघुलेखनांतून कांहीं भाग बिनचूक वाचून दाखविला. तात्यासाहेबांनीं शाबासकी दिली आणि सर्टिफिकिटाकरितां पुन्हां एकदां भेटण्यास सांगितलें.

(२) मिरजेचे अधिपति श्री. बाळासाहेब वारले असतां त्यांच्या चरित्राविषयीं माहिती विचारण्याकरितां मी त्यांच्या घरीं रात्री १०–३० वाजतां गेलों होतों. अंथरुणावरून उठून डोक्यावरून उपरणें पांघरून ते माझ्यासमोर येऊन बसले व त्यांना अगदीं शांतपणें मला पाहिजे असलेली यथासांग माहिती दिली. अशा अवेळीं तर राहोच, पण वेळीं जाऊनसुद्धां " तुम्हाला दुसरा उद्योग नाहीं काय, नाहीं तर उद्यां या " अशा उत्तरांनीं वाटेस लावणारे पुष्कळ पुढारी मला आढळले होते. म्हणूनच रात्रीं १०–३० वाजतां जाऊनहि शांतपणें वागण्याच्या त्यांच्या सौजन्याचें महत्त्व वाटल्याशिवाय कसें राहील?



व्यंकटेश विष्णु वैद्य

(कुंकळी, गोवा)

(१) सन १९२८ सालची गोष्ट. गोमंतकीय गावड्यांच्या शुद्धीकरणामुळें उत्पन्न झालेला पेचप्रसंग सोडविण्यासाठी श्री. केळकर, डॉ मुंजेप्रभृति पांच गृहस्थांचें एक शिष्टमंडळ पोर्तुगीज सरकारशी शिष्टाई करण्यासाठीं गोमंतकांत आलें होतें. सर्व गोमंतकीय हिंदु जनतेच्या वतीनें मडगांवच्या श्रीदामोदर-विद्याभुवनांत त्या शिष्टमंडळाचें अभूतपूर्व स्वागत करण्यांत आलें होतें. डॉ. मुजे हे त्या शिष्टमंडळाचे प्रमुख अशी कल्पना करून प्रथम दोन-चार संस्थांतर्फे त्या त्या संस्थांच्या प्रतिनिधींनीं डॉ. मुंज्यांच्याच गळ्यांत पुष्पहार घातले. वास्तविक पाहतां तात्यासाहेबच त्या शिष्टमंडळाचे अध्वर्यु होते. त्यामुळें आमच्या ज्ञानप्रसारक समाजातर्फे पुष्पहार अर्पण करण्याच्या वेळीं तो हार मी तात्यासाहेबांच्या गळ्यांत घालावयास गेलों, तेव्हां त्यांनीं हळूच डॉ. मुंज्यांच्याकडे बोट दाखविलें. त्यांच्या इशाऱ्याचा अर्थ मला समजून आल्यामुळें तोहि हार मग मी डॉ. मुंज्यांच्याच गळ्यांत घातला. दुसऱ्या दिवशीं शिष्टमंडळाचा

मुक्काम होता तेथें मी गेलो, तेव्हां तात्यासाहेब मुद्दाम मला एकीकडे नेऊन म्हणाले, "लोकहिताचें कार्य असेल तर त्या वेळीं कोणाचाहि अनुयायी म्हणविण्यांत मला कसलाहि कमीपणा वाटत नाहीं. आम्हां दोघांच्यांच गळ्यांत हार पडले असते तर उरलेल्या तिघांना त्यांत वैषम्य वाटलें असतें कीं नाहीं? त्या प्रसंगीं तुमचा विरस झाला याबद्दल मी दिलगीर आहें." माझ्यासारख्या सामान्य मनुष्याच्या भावनेकडे लक्ष देऊन स्मरण ठेवल्याबद्दल आणि अनुयायी होण्याच्या त्यांच्या निरहंकार वृत्तीबद्दल मला अत्यंत कौतुक वाटलें.

(२) कॉंग्रेस व हिंदुमहासभा यांच्या धोरणाकडे लक्ष देतां आम्हां गोमंतकीयांस पोर्तुगीज सरकारविरुद्ध राजकीय चळवळ करण्यास हिंदुमहासभेचें साहाय्य मिळूं शकेल, कॉंग्रेसकडून तें मुळीच मिळणार नाहीं, असा आम्हां कांहीं गोमंतकीय आंदोलकांचा अनुभवान्तीं समज झाला होता. म्हणून १९४५ सालीं मी तात्यासाहेबांचें मत अजमावण्यासाठी त्यांना मुद्दाम भेटावयास गेलों. प्रथम साधकबाधक चर्चा करून शेवटी ते म्हणाले, "तुम्हांला हिंदुमहासभा शक्य ती मदत करील, पण 'उद्धरेदात्मनात्मानम्' हींच गोष्ट खरी! मागें निजामीत हिंदुमहासभेनें निःशस्त्रप्रतिकार सुरू केला. परंतु स्थानिक हिंदु जनतेची कसलीच तयारी नाहीं, मग निःशस्त्रप्रतिकार यशस्वी होणार कसा? 'जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला।' हें समर्थांचे वचन लक्षांत ठेवून चळवळीला आरंभ करा."

(३) आमच्या गांवच्या कु. फुलाई गावड नामक एका मुलीच्या ख्रिस्तीकरणाचें प्रकरण १९४५ सालीं गोमंतकांत बरेंच गाजलें होतें. गोमंतकीय हिंदूंनीं महत्प्रयासांनीं ख्रिस्ती होण्यापासून तिचा बचाव केला होता. त्या सर्व हकीकतीचें एक चोपडे मी मुद्दाम तात्यासाहेबांच्या अवलोकनार्थ पाठवून दिलें होतें. पुढें कांहीं महिन्यांनी माझी भेट होतांच ते म्हणाले, "तुम्ही गोमंतकीय हिंदूंनीं या प्रसंगीं बरीच संवेदना दाखविली म्हणावयाची! ज्या प्रांतांत हिंदुता जास्त छळिली जाते, त्याच प्रांतांत हिंदुत्वाचा जास्त अभिमान आढळतो. पंजाब हिंदुत्वाबद्दल जागृत कां? आणि मद्रास उदासीन कां? यांचें हृच गमक आहे." तात्यासाहेबांची व्यापक दृष्टि, स्मरणशक्ति व हिंदुत्वाविषयींची आस्था पाहून त्यांच्याविषयींच्या माझ्या आदरांत जास्तच भर पडली.

❋

यशवंत पांडुरंग महाजन

(मुंबई)

सुमारें १९१२-१३ सालची गोष्ट. त्या वेळीं मी शाळेंत जाणारा विद्यार्थी होतों. 'माधवाश्रम' हा आमच्या घरचा धंदा असल्यामुळे फावल्या वेळांत मी आश्रमांतील थोडेंफार काम करीत असें. त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्यांची ओळख होई. तात्यासाहेब हे, त्यांनी लिहिलेल्या 'कृष्णार्जुनयुद्ध' नाटकाच्या तालमी नाटक कंपनीस देण्यासाठीं दर आठवड्यास 'माधवाश्रमां'त उतरत असत. तात्यासाहेबांचा केसरी मी नियमानें वाचीत असे. मुंबईला आल्यावर सुद्धा ते सतत लिहीत असलेले मला दिसायच; त्यामुळें त्यांच्या लेखनशक्ती-बद्दल मला फार अचंबा वाटत असे. म्हणून हा थोर मनुष्य एवढें लिखाण कसं करूं शकतो हें जाणून घेण्याची मला फार उत्कंठा लागली. एके दिवशीं खोलींत ते एकटेच असलेले पाहून, मनाचा धीर करून, मीं त्यांना विचारलें, "आपण एवढा मोठा केसरी लिहिता, तसा मला कधी लिहितां येईल का?" हा प्रश्न ऐकल्यावर ते रागावतील कीं काय अशी मला भीति वाटत होती. परंतु उलट माझ्या पाठीवर हात ठेवून अत्यंत प्रेमळपणानें ते म्हणाले, "बाळ, हो हो, तुलाहि लिहितां येईल. मी सांगतों तसे नियमानें करीत जा. दर आठवड्याचा केसरी आला कीं, त्याचा अग्रलेख तीनचार वेळां वाचून काढ व नंतर केसरी बाजूस ठेवून तुला जें काय त्यांपैकीं आठवेल तें लिहून काढीत जा व असें नियमानें केलेंस कीं तुलाहि केसरी लिहितां येईल!" एवढे म्हणाल्यावर तात्यासाहेब पुन्हां म्हणाले, "मी जेव्हां येथें येतों तेव्हां मला तूं लिहिलेलें दाखवीत जा, म्हणजे मी तुला तें तपासून देत जाईन, म्हणजे पुढें तूं 'एवढा' केसरी लिहिशील!"

नागेश दत्तात्रय कशाळकर

(बी. ए., एलएल. बी., वकील, पांढरकवडा, वऱ्हाड)

(१) १९२८ सालीं फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असतांना मीं मराठी वाङ्मय-मंडळातर्फे "श्री. न. चि. केळकर याची भाषाशैली" हा निबंध वाचला व तो ज्ञानप्रकाशांत छापण्यांत आला. भाषाशैली घडवितांना लेखक स्वतः कोणत्या रीतीनें प्रयत्न करतो हें लेखकाच्या तोंडून ऐकण्यांत विशेष लज्जत आहे असें मला वाटत असल्यावरून मी केळकर याच्याकडे गेलो, व माझ्या निबंधवाचनाच्या प्रसंगीं त्यांनी अध्यक्ष व्हावें म्हणून विनंती केली. परंतु ती त्यांनीं मान्य केली नाहीं. ते मला म्हणाले, "तुम्ही माझ्या भाषाशैलीबद्दल गुणदोषाची चर्चा करणार

त्या वेळीं मी अध्यक्ष असलों तर तुमची व माझी दोघांचीहि कुचंबणा होणार! कसें तें पाहा. तुम्ही माझे गुण वर्णू लागला तर मला तें ऐकतांना संकोच वाटेल; उलट तुम्ही माझे दोष दाखवूं लागाल, तर मी अध्यक्ष असल्यामुळें तुम्हांस संकोच वाटणार! आपल्या दोघांच्याहि संकोचामुळें श्रोत्यांची जी कुचंबणा होईल ती वेगळीच! शिवाय मी अध्यक्ष झालोंच, तर तुम्ही जें कांहीं बरें-वाईट माझ्या भाषाशैलीबद्दल बोलाल ते अखेरपर्यंत मुकाट्यानें ऐकून घेणे मला भाग आहे. श्रोत्यांस जर प्रतिपाद्य विषय आवडला नाहीं तर सभा सोडून जाण्याची जी सवड मिळते, तीहि मला उरणार नाहीं." यावर मीहि अधिक आग्रह धरला नाहीं.

(२) ज्ञानप्रकाशकर्ते श्री. आंबेकरांच्या म्हणण्यावरून हा निबंध मी ज्ञान-प्रकाशमध्यें छापण्यास दिला व तो छापण्यांत आला. केळकरांच्या नजरेस तो आल्यावर त्यांनी मला बोलावलें व माझी पाठ थोपटली. मीं हळूच त्यांना म्हटलें कीं, 'आपल्या तोंडून मला आपल्या भाषाशैलीबद्दल काय प्रयत्न आपण केले हे ऐकावयाचें राहूनच गेलें.' तेव्हां त्यांच्या संभाषणांतून जे विचार मला ऐकावयास मिळाले ते मी संक्षिप्त रीतीनें पुढें देत आहें. केळकर म्हणाले, "लेखनास सुरवात केली त्या वेळीं माझ्या डोळ्यासमोर विष्णुशास्त्री चिपळूणकरांची भाषाशैली प्रामुख्यानें असे. माझी व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची भाषा संस्कृत शब्दप्रचुर व सामान्य वाचकांस न झेपण्यासारखी असे. कारण भाषेस प्रौढपणा व भारदस्तपणा येण्यास संस्कृत शब्दांचा अवलंब करावयास पाहिजे असें मला पूर्वी वाटत असे. कोल्हट-करांनीं कोटी-विनोदयुक्त भाषापद्धति स्वीकारल्यामुळें व नाटकें निर्माण करण्या-कडेच लेखणी चालवल्यामुळें त्यांच्या भाषेचा बोजडपणा जशाचा तसाच राहिला. माझ्या भाषेंत मात्र व्यवसायभेदामुळें फरक पडला. केसरीमध्यें मी लिहूं लागलों तेव्हां आपल्या लेखनाचा दर्जा उंच ठेवावा म्हणून मी सुरवातीस संस्कृतप्रचुर शब्द आणि पल्लेदार वाक्यें लिहीत असे. एक दिवस लो. टिळक माझा लेख तपासत असतां मला म्हणाले कीं, "आपला केसरी वाचणारे लोक ज्या भाषेंत बोलतात त्या भाषेंत त्यांच्याशीं आपल्याला बोलावयाचें आहे. ते कांहीं संस्कृत जाणणारे लोक नाहीत. तुमच्या लेखनांत जे संस्कृत शब्द येतात, त्यांच्या अर्थाचे शब्द मराठींत मुळीच मिळत नसले, तरच अपरिहार्य म्हणून संस्कृत शब्दांची कास धरावयाची हा विचार संपादकान नेहमी लक्षात ठेवावयास पाहिजे." लोकमान्यांचा हा कटाक्ष मला जन्माचा मार्गदर्शक झाला व माझ्या नंतरच्या लिखाणांत साधेपणा व सुटसुटीतपणा येत चालला. मी जें लिहूं-बोलूं लागलों, तें सामान्य मनुष्याच्या आटोक्यात कसें आणता येईल अशी मी नेहमी दक्षता घेऊं लागलों. सामान्य जनांच्या भाषेंत जर बोलतां आलें असतें, तर माझ्या मतानें, वामनराव जोशी अधिक लोकप्रिय कादंबरीकार, गडकरी व कोल्हटकर अधिक

लोकप्रिय नाटककार, आणि माधवराव पटवर्धन अधिक लोकप्रिय कवि झाले असते. लेखनाच्या उंचीप्रमाणें लेखनाची पातळीहि विस्तृत व्हावयास पाहिजे हें मला केसरीनें शिकविलें."

कृष्णशास्त्री नारायण कवडे

(बी. ए., वैद्यपंचानन, पुणें)

(१) श्री. बाबू अरविंद यांच्या संपादकत्वाखाली कलकत्त्यास प्रसिद्ध होणारें 'वन्दे मातरम्' हें इंग्रजी दैनिक पुण्यासारख्या ठिकाणीहि शेकडों प्रतीनीं खपत असे. त्यांच्या लेखांचा मराठींत अनुवाद करणारे मराठी 'वन्दे मातरम्' पुण्यांत माझे मित्र कै. हरिभाऊ भागवत आमच्या 'शारदा' छापखान्यांत छापून प्रसिद्ध करीत असत. माणिकतोळा बॉब-खटला कलकत्त्यास सुरू झाला. हा खटला सुरू असतांच त्या खटल्यांतील माफीचा साक्षीदार नरेन्द्रनाथ गोस्वामी याचा खून झाला. त्यावर इंग्रजी 'वन्दे मातरम्'मध्यें 'ए ट्रेटर इन् दि कॅंप' हा खळबळ करणारा लेख प्रसिद्ध होतांच इंग्रजी 'वन्दे मातरम्' पत्र ज्या छापखान्यांत प्रसिद्ध होत असे तो छापखाना जप्त केला गेल्याचें वर्तमान प्रसिद्ध होतांच, त्याच लेखाचा मराठी अनुवाद 'गोटांत फितूर' हा लेख मराठी 'वन्दे मातरम' पत्रांत प्रसिद्ध झाल्यामुळें आमचा 'शारदा' छापखानाहि जप्त होऊन सरकारजमा होण्याचा प्रसंग आला! अशा वेळीं काय केलें असतां हें अरिष्ट टळेल असा विचार सुरू झाला. अनेक पुढाऱ्यांचा सल्ला घेतला; पण उपाय सुचेना. अखेरीस तात्यासाहेब यांनीं उपाय सुचविला. दिपवाळीनिमित्त 'वन्दे मातरम्'चा अंक बंद होतांच त्यापुढें 'वन्दे मातरम्' कायमचे बंद करून 'शारदा' छापखानाहि कायमचा बंद करून त्याची विल्हेवाट लावून टाकावी असें त्यांनीं सुचविलें. त्याप्रमाणें 'शारदा' छापखाना कायमचा बंद करून जागेंतून हलविण्यांत आला व तसें सरकारी अधिकाऱ्यांस कळविण्यांत आलें. आठ दिवसांनंतर 'शारदा' छापखान्याच्या चौकशीसाठी पोलीस आले. परंतु जागा मोकळी दिसली. तात्यासाहेब यांच्या योग्य मार्गदर्शनानें आमचा 'शारदा' छापखाना वांचला. आपत्कालीं तात्यासाहेबांनी योग्य मार्गदर्शन केल्यामुळें आमच्यावरील संकट टळलें. योग्य मार्गदर्शन तात्यांनीच करावें!

(२) लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर कलकत्त्यास राष्ट्रीय सभेचें अधिवेशन झालें. एका वर्षांत स्वराज्य मिळवून देण्याची महात्मा गांधींची घोषणा झाली व या चळवळीचा प्रचार करण्यासाठीं बहुतेक पुढाऱ्यांनीं पांढऱ्या टोप्या घालण्यास सुरुवात केली. कै. शिवरामपंत परांजपे यांच्यासारख्यांच्या डोक्यावरील

पगडी जाऊन तिची जागा पांढऱ्या टोपीनें घेतलेली पाहून कसेसेंच वाटलें! तात्यासाहेबांच्याहि डोक्यावरील पगडी बाजूला होऊन काळसर रंगाची टोपी डोक्यावर कांहीं काळ येऊन बसली! मला फार वाईट वाटलें. मीं तात्यांना विचारलें कीं, "तात्या, तुम्ही पगडी कायमची टाकून दिली काय?" तात्यांना माझ्या प्रश्नांतील मर्म समजले व त्यांनीं लागलीच सांगितलें कीं, "नाहीं, मीं पगडी कायमची सोडली नाहीं. मी पगडी कायम ठेवणार आहें." राष्ट्रीय सभेच्या चळवळीचा ठराविक काळ लोटतांच तात्यांनीं पुन्हां पगडी घालण्यास सुरुवात केली व त्यांनी आपली पगडी अखेरपर्यंत कायम ठेवली. महाराष्ट्रीय पगडीचें रक्षण केल्याबद्दल त्यांचें अनेकांकडून कौतुक केलें गेलें.

(३) सन १९०८ साली जॅक्सनचा खून झाल्यावर व लोकमान्यांना शिक्षा झाल्यावर, त्यांनीं सुरू केलेले श्रीगणेशोत्सव, शिवाजी-उत्सव आदि कार्यक्रम पार पाडण्याची जबाबदारी विशेषतः तात्यासाहेब यांजवरच पडली. गणेशोत्सवांत आपल्या गणपतीपुढें तात्यासाहेबांचें व्याख्यान झालें पाहिजे अशी जो तो मागणी करूं लागला. गणेश-मंडळाचा चिटणीस या नात्यानें तात्यासाहेब यांस मीं ही हकीकत कळविली व व्याख्यानें देण्याची विनंती केली. क्षणाचाहि बिलंब न करतां लागतील तितकीं व्याख्यानें देण्याची विनंती त्यांनीं मान्य केली व उत्सवांत व्याख्यात्यांची उणीव मुळीच भासूं दिली नाहीं. श्रीगणेशोत्सव यथासांग पार पडला.



दत्तात्रय भिकाजी भिडे

(उपसंपादक, केसरी, पुणें)

(१) पुणें नगरपालिकेनें तात्यासाहेब यांचा षष्टयब्दपूर्ति समारंभ केला समारंभाची सभा नगरपालिकेच्या विश्रामबागवाड्यांतील एका मोठ्या चौकांत. भरली होती. सभेला स्त्री-पुरुष, मुलें-मुली यांचा मोठा समुदाय जमला होता. श्रोत्यांना उन्हाचा त्रास होऊं नये म्हणून वर छाया केली होती; पण श्रोत्यांची गर्दी फार झाल्यामुळें बऱ्याच स्त्रियांना आपल्या मुलांबाळांना घेऊन उन्हांत बसावें लागलें. समारंभाचा प्रास्ताविक कार्यक्रम झाल्यावर तात्यासाहेब यांच्या भाषणास सुरवात झाली; पण ते एक-दोन वाक्यें बोलत नि थांबत. असें दोन-तीन वेळां झालें. श्रोत्यांनाहि आज हे असें कां करीत आहेत हें समजेना. जो तो त्यांच्याकडे बघूं लागला. शेवटीं केळकरांनाहि रहावेना व भाषण करण्याचेंहि सुचेना. तेव्हां त्यांनींच असें सांगितलें कीं, "मी सावलींत उभा राहून बोलतों आहे; पण या भगिनी आपल्या लहानग्यांना घेऊन उन्हांत उभ्या राहिल्या

आहेत, हें पाहून माझ्या मनांत कालवाकालव होत आहे; तरी आपण यांच्याहि डोकीवर सावली केल्यास त्यांना बरें वाटेल आणि मलाहि भाषण करणें सुचेल." थोड्याच अवधींत तशी व्यवस्था करण्यांत आली. मौज अशी कीं, नंतर केळकरांचें भाषण सुमारें एक तास गंगौघाप्रमाणें झालें.

(२) एका सुप्रसिद्ध इंग्रजी वृत्तपत्राचा पुण्याचा वार्ताहर एक इंग्रज मनुष्य होता. हा इंग्रज वार्ताहर महिन्यांतून चार-दोन वेळां तरी तात्यासाहेबांची या ना त्या राजकीय प्रश्नावर मुलाखत घेण्यासाठी येत असे आणि तेहि त्याला मुलाखत देत. केळकरांची समजूत अशी कीं, या गृहस्थाला इंग्रजी लघुलेखन येत असल आणि तो आपलें वाक्य न् वाक्य लिहून घेत असेल. एकदोन वेळेस असें झालें की, केळकरांनी दिलेली मुलाखत आणि प्रसिद्ध झालेली मुलाखत यांत तफावत पडली. तेव्हां त्यांनीं या वार्ताहरास असें कां झालें म्हणून विचारलें. त्यानेहि त्याचें कांहीं कारण सांगितलें. पण झालेला फरक फारसा महत्त्वाचा नसल्यामुळे केळकरांनीं त्याकडे अधिक लक्ष दिलें नाही. कांहीं दिवसांनंतर हे वार्ताहरमहाशय पुनः केळकरांच्याकडे आले आणि त्यांनी त्यांच्याकडे एका महत्त्वाच्या राजकीय प्रश्नावर मुलाखतीची मागणी केली. केळकरांनीं त्यांना सविस्तर मुलाखत दिली आणि नीट व्यवस्थितपणें आपल्या पत्राकडे पाठवा असें त्यास बजावून सांगितलें. दुसऱ्या दिवशी ती मुलाखत त्या पत्रांत प्रसिद्ध झाली आणि केळकरांनीं ती वाचून पाहिली. ती वाचून होतांच ते इतके कांहीं संतापले कीं, तो वार्ताहर जर त्या वेळीं त्यांच्यासमोर असता तर काय झालें असतें याची कल्पनाहि मला करवेना. मुलाखत प्रसिद्ध झाल्यानंतर एक आठवड्यानें पुनः ते वार्ताहरमहाशय केळकरांच्याकडे मुलाखतीसाठीं आले. त्यांनीं प्रसिद्ध झालेल्या मुलाखतींतील आपल्या विधानांची उलटापालट किती झाली आहे, हें त्यास दाखविलें आणि त्याची इतकी निर्भर्त्सना केली कीं, हे महाशय आल्यापावलीं मान खालीं घालून परत गेले नि पुनः कधीं केळकरांची मुलाखत घेण्यास आले नाहींत. या इंग्रज वार्ताहरास इंग्रजी लघुलेखन तर येत नव्हतेंच, पण त्याची स्मरणशक्तीहि तितकीशी तीव्र नसल्यामुळें लिहून घेतलेल्या वाक्यांचा संबंध लावण्यांत त्याचा मोठा घोटाळा झाला होता. केळकरांच्या प्रसिद्ध झालेल्या मुलाखतींतील उलटापालट नि भलतीसलती विधानें जेव्हां सदर वृत्तपत्राच्या संपादकाच्या नजरेस आणून दण्यात आलीं तेव्हा त्यानीं आपल्या या वार्ताहरास पुण्याहून ताबडतोब हलविलें आणि केळकरांना दिलगिरीदर्शक पत्र पाठवलें.

(३) एक दिवस सकाळी मी तात्यासाहेब सागत असलेला मजकूर लिहून घेत होतों. मजकुरांतील एक वाक्य संपण्यापूर्वीच एका मोठ्या संस्थानचे दिवाण त्यांच्या भेटीसाठीं आले. अर्थातच दोघेहि दुसऱ्या खोलींत बोलणें करण्यासाठीं

गेले. सुमारें ४० मिनिटें त्यांचें बोलणें झालें आणि आलेले पाहुणे गेले. नंतर तात्यासाहेब पुनः परत आले नि त्यांनीं कांहीं शब्द उच्चारले. मला वाटलें, मला ते कांहीं कामच सांगत आहेत; म्हणून हातांत लिहिण्यासाठीं घेतलेला टाक मीं खालीं ठेवला. तें पाहून तात्यासाहेब म्हणाले, " अरे, मी तुला मजकुरांतील मघाशीं अर्धवट राहिलेलें वाक्यच पुढे सांगत आहें. " आणि खरेंच. अर्धवट राहिलेल्या वाक्याचाच तो उत्तरार्ध होता ! त्यांची ही स्मरणशक्तीची अजब करामत पाहून मी विस्मयचकित झालों.

❋

रा. द. पंतपराडकर

(मयूर-काव्य-प्रकाशक, पुणें)

(१) तात्यासाहेबांना मी आठवूं लागलों म्हणजे काय काय आठवावें व कागदावर तें कसें वठवावें असा गोंधळून जातों. अशा स्थितींत प्रस्तुत ग्रंथ-योजकांची स्थलमर्यादा जाणून आठविलें, पहिली आठवण, त्यांनीं माझ्या मयूर-प्रकाशनवार्षीत किती आपलेपणानें मन घातलें होतें, हीच पुढे येते. त्या वेळीं मयूर-काव्य-प्रकाशनासारख्या अवजड कार्यभाराच्या दृष्टीनें माझी व्यवहारस्थिति केवळ शून्य असल्यानें, घरचे बांधवहि बिचकून मला सावधगिरीचे इशारे देत होते; पण तात्यासाहेबांना माझें उद्दिष्ट इतकें पटलें होतें कीं, पंढरपुरांतील मयूर-दप्तर कारणपरत्वें पुण्यास आल्याबरोबर एक प्रहरांच्या आंत तात्या दप्तर-दर्शनार्थ मजकडे आले ! केवळ आपल्या केसरींतून माझ्या तद्विषयक लिखाणास प्रसिद्धि देऊन व अनुमोदूनच न थांबतां, माझी आर्थिक परिस्थिति जाणून त्यांनीं माझ्या चालू खर्चाची तर हस्तें-परहस्तें सोय केलीच, पण पुढें प्रत्यक्ष छपाईच्या कामाचा प्रश्न उभा ठाकतांच स्वतः पुढें होऊन बॉम्बे बँकिंग कपनीकडून चार हजार रुपये भांडवलहि मला मिळवून दिलें. या वेळीं तात्यांची गृहस्थितीहि अशा धाडसाला साजेशी नव्हती व माझा प्रत्यक्ष वैयक्तिक परिचयहि इतका होता कीं, बँकेतील कागदावर सह्या करतांनाच तेथें उघडपणें माझें सबंध नांव त्यांना विचारावें लागलें ! व्यक्तीपेक्षां व्यक्तीच्या कार्या-वरच त्यांचे लक्ष त्या वेळीं दिसून आलें.

(२) पुण्यांतील मराठी ग्रंथालयाच्या स्थापनेचा माझा त्या वेळचा उद्यो-गहि त्यांना पटल्यामुळें व प्राथमिक खर्चाचा बोजा सर्वस्वीं मजवर पडूं नये म्हणून ते कामीं आले. लक्षांत राहण्याजोगी गोष्ट अशी कीं, सदर संस्थेच्या स्थापनेच्या निमंत्रण-चिठ्ठ्या केसरी छापखान्यांत छापल्या तर तो एक खर्च कमी होईल हें जाणून, जरी त्या वेळी केसरी छापखान्यांतून बाहेरचीं कामें छापून देण्याची प्रथा नव्हती

तरी, हे सार्वजनिक व म्हणून केसरीच्या परंपरेप्रमाणें घरचेंच काम आहे हें मॅनेजर बाबासाहेब यांना पटवून देऊनें त्यांनीं निमंत्रण-चिठ्ठ्या छापावयास लावल्या. अशा कामाला जरूर ते ट्रेडल मशीनहि तेव्हां केसरी छापखान्यांत नव्हतें. साध्या हँडप्रेसवरच हें काम करावें लागलें! प्रयागच्या प्राथमिक अवस्थेंत जागाभाड्याचा प्रश्न जाचक होऊं लागला तेव्हां कांहीं दिवस गायआळींतील आपल्या घरांतील जागाहि त्यांनीं मोकळी करून दिली होती! संस्थेची स्वतःच्या इमारतीपर्यंत प्रगति झाल्यानंतर मी व कै. अण्णा पावगी, वकील हे चिटणिशीतून निवृत्त झालों. नव्या कार्यकर्त्यांचा ओळखपरिचयहि दुरावला. तथापि तात्यासाहेब इतके जागरूक कीं, संस्थेच्या ज्युबिली-महोत्सवाच्या वेळीं लोकविस्मृतीत गेलेल्या मला मूळ संस्थापक म्हणून आठवून अगत्यपूर्वक निमंत्रण्याची सूचना त्यांनींच नव्या चिटणिसांना दिली!

(३) लो. टिळक मंडालेस अडकून पडल्यानंतरच्या काळांत टिळकानुयायांना एक मोठीच सुबुद्धि सुचली. दर शुक्रवारीं आलटून-पालटून कोणाकडे तरी टिळकानुयायांचें स्नेहसंमेलन घडूं लागलें. यामुळें संघटना टिकण्यास बरीच मदत झाली. लोकमान्य सुटून आल्यावर तेहि या संघटनेंत सामील होऊन तिला उत्तेजूं लागले! ह्या बैठकी अगदी खेळीमेळींच्या होत; यामुळे टिळकांचें कोणाविषयीं काय धोरण व मत आहे याचा सहज बोध होत असे. अशी एक बैठक एकदां कसब्यांतील पेठकर वकिलांच्या घरीं भरली होती. लोकमान्यसुद्धां सर्व लहानथोर मंडळी जमली. उशीर झाला तरी नेहमीं वक्तशीर येणाऱ्या तात्यासाहेबांचा पत्ता नाहीं. तेव्हां कोणी म्हणाले, ते आज रेमाँकेटपुढे भरलेल्या मँडीसाहेबाच्या व्याख्यानसभेला गेले आहेत. पुण्यांतील ड्रेनेजची अधिकारीकृत सर्व घाण सप्रमाण उपसून केळकरांनीं मराठ्यांत प्रकट केली होती व तिच्या खंडनार्थच मँडीसाहेब सरसावून पुढे झाले होते. लोकमान्यांनीं हें सर्व प्रकरण नीट न्याहाळलें होतें. त्यामुळें केळकरांच्या खंडनोपद्व्यापांत मँडी फजीत पावणार अशी त्यांची खात्री होती. केळकर आले नाहींत याला उद्देशून टिळक म्हणाले, "अहो, ते मँडीसाहेबाचे पिंड पाडण्यांत गुंतले असतील! आमच्या तात्यांचा स्वभाव असा आहे कीं, शक्यतों ते वर्दळीवर न येतां सामोपचारानेंच आपली बाजू मांडतात. पण प्रतिपक्षी ताळतंत्र सोडूनच बरळूं लागला तर तात्याहि आपला सूर अष्टमांत चढवून खंडन करण्यास मागेंपुढें पाहात नाहींत. अशाच कांहीं तरी कारणानें तात्या आज येऊं शकले नसावेत." टिळक असें बोलत आहेत तोंच तात्यासाहेब घामेजल्या चेहऱ्यानें घाईघाईनें त्या बैठकींत दाखल झाले! चमत्कार असा कीं, टिळकांचें अनुमान अचूक ठरलें! मँडीसाहेब मराठ्यांतील लेखक, मराठ्यांतील लेखक, असा वारंवार उच्चार करून डिचवीत असतां श्रोत्यांत निमूटपणें बसलेले केळकर खवळून, "हा मी मराठ्यांतील लेखक

येथें माझ्या लेखांचें समर्थन करण्यास उभा आहें" असें म्हणून मँडीसाहेबांची तात्यांनीं अगदी रेवडी उडविली होती व त्यामुळेंच त्यांना विलंब झाला होता.

(४) चिरोल-केसच्या प्रतिकूल निकालाची विद्युद्वार्ता धडकून टिळकपक्षीयांना मोठाच धक्का बसला. या निकालामुळें लोकमान्यांवर कोसळलेल्या आर्थिक आपत्तीच्या कल्पनेनें मी तर जवळजवळ वेडावून गेलों व त्या भरांत तडक तात्यांच्या पुढें जाऊन उभा रांहिलों. त्या वेळीं त्यांच्या-माझ्यामध्यें झालेला संवाद माझ्या हृदयावर कोरल्यासारखा झाला असल्यानें इतक्या कालावधीनंतरहि तो जशाचा तसा मी व्यक्त करूं शकत आहें. तो संवाद असा :—

तात्या – का हो ! कां आलांत ?

मी – विलायतची तार कळली म्हणून.

तात्या – हो ! बळवंतरावांवर मोठाच आघात झाला !

मी – पण, या आघातापासून आपल्या पुढाऱ्याला सुरक्षित राखणें अनुयायांचें काम नाहीं का ?

तात्या – हो, तें सर्व खरें. पण आघात सामान्य नाहीं !

मी – लोकमान्यांची लोकमान्यताहि कांहीं सामान्य नाहीं. लोकांनी मनावर घेतल्यास लोकमान्यांवरील आघात सहज निवारतां यावा.

तात्या – अहो ! हें सर्व तुम्हीं बोलतां आहां; पण तुम्ही व्यक्तिशः काय करूं शकतां तें बोला.

मी – मी आज माझ्या मनाला धक्का बसलेल्या दिवशीं माझ्या धंदाव्यवहारांतील असलेली सर्व रोकड टिळकार्पण करीन. असेंच सर्व टिळकभक्तांनीं मनावर घेतल्यास लोकमान्यांवरील आर्थिक आपत्तीचें सहज निवारण होईल.

तात्या – अशी कितीशी रोकड आज तुमच्याजवळ असेल ?

मी – पुणें व मुंबई मिळून दोन ठिकाणची सुमारें दीड हजार तरी भरेल.

तात्या – ही सर्व रोकड तुम्ही देणार ! मग पुढें काय करणार ?

मी – पुढचें पुढें ! आजचा संकल्प असा आहे.


माझें हें इतकें निग्रहाचें उत्तर ऐकतांच तात्या ईझी-चेअरवर सावरून बसून जरा विचारमग्न झाले; व माझ्यासमोरच त्यांनीं प्रथमतः मुंबईच्या श्री. यशवंतराव नेने, डॉ. डी. डी. साठे वगैरे मंडळींना विचारविनिमयार्थ तांतडीनें पुण्यास येऊन जाण्याविषयीं पत्रें पाठविलीं. हें पाहून मीहि माझ्या मुंबईतील व्यवहाररक्षक मित्रांना (बुकसेलर कै. बळवंतराव परचुरे व कै. मनमोहनदास

रामजींचे विश्वासू दक्षिणी हस्तक कै. वामनराव हेरलेकर) पत्रें पाठवून ताबडतोब यशवंतराव नेने यांच्याकडे १५०० रु. चा चिरोल खटल्याच्याकरिता भरणा करण्यास कळविलें. त्याप्रमाणें यशवंतराव पुण्यास येण्यापूर्वीच ही रक्कम जमा धरून आले व अशा प्रकारें माझ्या भावनावेडांत चिरोल-फडाची प्राणप्रतिष्ठा झाली !

(५) सुगंधशाळेच्या धूपोद्योगाच्या प्रथमावस्थेंतील अडीअडचणींनी मी व्यग्र झाल्यानें पुण्यांतील राष्ट्रीय क्लबाच्या बैठकींतील प्रायः न चुकणारी माझी उपस्थिति कांहीं काळ घडेनाशी झाली. त्यामुळें तात्यांच्या माझ्या भेटींतहि अंतर पडलें, हें जाणून त्यांनीं मला भेटीस बोलावून चौकशी केली. मी सर्व परिस्थिति निवेदून म्हैसूरला धूपव्यवहार-निरीक्षणाला जाण्याचा माझा मनोदय व्यक्त केला. ते म्हणाले, " ठीक आहे. सोलापूर जिल्हा परिषदेच्या तुमच्या पंढरपूरच्या बैठकीचा अध्यक्ष म्हणून मला जावयाचें आहे, माझ्याबरोबरच पंढरपूरला चला व परिषद आटोपतांच तेथून पुढं मार्गस्थ व्हा." त्याप्रमाणेंच घडलें. मी म्हैसूरच्या दौऱ्यावरून सफलतेनें परत येऊन त्यांस भेटलों व मगच केसरीच्या अभिप्रायानें " पुण्यांत म्हैसूर सुगंधशाळा " खरी उदयास आली ! अशा प्रकारच्या व्यवसायाला पूरक म्हणून तात्यांनीं कोंकणांत अनुभविलेल्या दंतमंजनाच्या एका प्रक्रियेची मला ओळख करून देऊन माझ्या धंद्यास तीहि एक जोड द्या असें सुचविलें; पण त्यांच्या हयातींत माझ्याच हलगर्जीपणाने तात्यांचें दंतमंजन माझ्यापाशींच राहिलें !

(६) वाङ्मयसेवेची माझी कुवत व मर्यादा मी जाणून होतों. लेखनकलेच्या उपासनेपेक्षां व्यावहारिक ओढ्यानें कलावस्तूच्या शोधचिंतनांतच मी रमत असें. हें जाणून तात्या त्याहि प्रकारच्या माझ्या उलाढालींत आपलेपणानें लक्ष घालून तदनुकूल लेखन करण्यास मला उत्तेजित असत. यामुळें चरखा-काळे यांचें यंत्रचरित्र-लेखन त्यांनीं मजकडून करवून केसरींत प्रसिद्ध केलें. गया कॉंग्रेस बरोबरच्या प्रदर्शनाचा सविस्तर अहवाल केसरीसाठीं तयार करण्याची कामगिरी मजवर सोंपविली, इतकेंच नव्हे तर, त्या प्रदर्शनांत वैद्य नामक एका कोंकणच्या इसमानें एका कारागिराकरवीं मूर्तस्वरूपास आणलेल्या शिवणयंत्राच्या पेटंटोद्योगांत उत्तेजनार्थ हजारभर रुपये खर्चून त्याला पुढील वाटेस लावलें !

(७) तात्या माझ्याशीं कशा व किती समरसतेनें मिळून जात याचा खुद्द त्यांच्या हातचा साक्षीभूत असा हा कागद त्यांच्या मृत्यूनंतर रद्दी म्हणून अग्नये स्वाहा होण्याचा प्रसंग आला असतां, प्राथमिक शाळेंतील माझ्या लहान मुलाची जिज्ञासा जागृत होऊन त्यानें जाणून माझ्या हातीं आणून दिला, म्हणून तो वाचकांपुढें ठेवणें आज शक्य होत आहे ! माझ्या किन्हईनिवासकालीन घरच्या व्रतबंधप्रसंगींचें हें तात्यांचें मयूरभक्तोचित सदिच्छापत्र आहे. त्या पत्राचा ठसाच पुढें दिला आहे. अशा समरसतेचेंच जणुं दैवी अंतिम पर्यवसान



म्हणून माझ्या तृतीय कन्येच्या विवाहाचा योग त्यांचे मावसबंधु प्रि. गं. नी. गोखले, इंजिनिअर यांच्या ज्येष्ठ पुत्राशी कल्पनातीतपणें जमून, प्रिन्सिपॉलसाहेब त्या वेळीं बनारसहून येऊं शकत नव्हते तरी त्यांच्या जागीं तात्यांच्याच दांपत्याला पुढें होऊन धार्मिक संस्कारविधि उरकावे लागले ! तात्यांचें उभयान्वयित्व या वेळीं माझ्या इतकें कामीं आलें कीं, विवाहविधि उरकून आम्ही दोघं 'व्याही' सुखसंवाद करीत बसलों असतां, " दैव म्हणून मनुष्यप्रयत्नापलीकडील कांहीं अदृष्ट असतें, असें या तुमच्या-माझ्यामधील संबंधयोगानें मानावें लागतें " असे भाविकपणाचे उद्गारहि त्यांच्या तोंडून निघाले ! म्हणून म्हणतों –

भावतिल वियोगाश्रुंत मिळवुनि तात्या ! तिलांजली देतां ।
जीवितसाफल्याचा भवदाशीर्वाद मागुनी घेतों ॥

❋

यशवंत गणेश कुलकर्णी

(मुख्य हिशेबनीस, केसरी-मराठा कचेरी, पुणें)

लोकमान्यांची कार्यपद्धति ही उसाच्या चरकासारखी असे. त्यांत एकदां बोट सांपडलें कीं सबंध माणूस आंत ओढला जाई. मग चिरोल केस असो कीं ताईमहाराज प्रकरण असो. टिळकांबरोबरची सर्व मंडळी त्या कामांत गुंतली जावयाची व याच धकाधकींत मूळचे गुणाचे पैलू घासले पुसले जाऊन त्यांचें खरें तेज प्रकट होई. तात्यासाहेब हे तर लोकमान्यांचे उजवे हात !

(१) ज्या ताईमहाराज-प्रकरणानें वीस वर्षें लोकमान्यांची बुद्धि व शक्ति खाल्ली त्या प्रकरणांतीलच ही हकीकत आहे. फौजदारी स्वरूपाच्या खटल्यांत

औरंगाबाद-कमिशनपुढें फक्त लोकमान्यांनींच आपल्यातर्फे साक्षीदार दिले होते. त्यांत महत्त्वाची साक्ष श्री. जगन्नाथमहाराज यांचे जनक वडील भाऊसाहेब देव, निधोनेकर यांची होती. लोकमान्य औरंगाबादेहून दत्तविधानाचें काम आटोपून पुण्यास परत आल्यानंतर ताईमहाराजांनीं भाऊसाहेब यांना जें पत्र लिहून दिलें होतें त्यांत 'त्यांच्याशिवाय दुसरा दत्तक घेणार नाहीं' असें एक वाक्य होतें. या वाक्याचा उपयोग करून मुलगा पसंत केला; पण दत्तक घेतला नाही असें उलटतपासणींत काढण्याचा सरकारी बॅरिस्टर मि. स्ट्रॅंगमन यांचा विचार होता. त्या हेतूनें त्यांनीं वरील वाक्याचा अर्थ काय होतो, असा प्रश्न भाऊसाहेबांना टाकला. पण भाऊसाहेब यांनीं 'माझा मुलगा जगन्नाथ दत्तक घेतलाच आहे. आतां दुसरा दत्तक घेऊन तंटे करणार नाहीं' असाच त्याचा अर्थ आहे, असें स्पष्ट शब्दांत सांगितलें व त्याचबरोबर पत्रांत असलेलें 'जगन्नाथ यास औरस पुत्राचे सर्व हक्क प्राप्त झाले आहेत' हें वाक्यहि दाखविलें. भाऊसाहेबांच्या या उत्तरानें मि. स्ट्रॅंगमन यांचा हेतु साध्य न झाल्यानें चिडून, त्यानें केळकर हे शेजारीं बसले होते, त्यांनी भाऊसाहेबांना सावधानतेची सूचना दिली असा आरोप केला. आपल्यावरील असत्य आरोप मुकाट्यानें ऐकून घेण्याचा तात्यांचा स्वभाव नव्हता ! ते ताडकन उभे राहिले व त्यांनीं कोर्टासच सरळ प्रश्न केला कीं, "मी व भाऊसाहेब दोघेहि कोर्टासमोर बसलों आहोंत, कोर्टास तसा संशय आला का ?" यावर कोर्टानें 'नाहीं' असें म्हणतांच स्ट्रॅंगमनचा आरोप त्याच्या गळ्यांत घालून त्यास माफी मागण्यास त्यांनीं भाग पाडलें !

(२) असाच प्रसंग या प्रकरणांत आणखीहि एकदां घडला. श्रीमान् दादासाहेब खापर्डे यांच्या साक्षीसाठीं अमरावतीस जावयाचें होतें. लोकमान्य, तात्या व मी असे तिघे पुण्याहून निघालों होतों. लोकमान्यांच्या अंगावर सतराशें कामें. त्यामुळे खटल्याचे कागद पाहण्यास सवडच झाली नव्हती. तेव्हां गाडींत कागद वाचावयाचें असें ठरवून मूळचीं सेकंड क्लासचीं तिकिटें बदलून फर्स्ट क्लासचीं तिकिटें काढलीं. पण योगायोग असा कीं, ज्या फर्स्ट क्लासच्या डब्यांत आम्हीं शिरलों त्याच डब्यांतून नेमका बॅ. स्ट्रॅंगमन हाहि चालला होता ! आमचे कागद वाचण्याचे बेत त्यामुळें मनांतच जिरले. त्यांत एकदां आंत शिरलेलों, परत डबा बदलणेंहि वाईट दिसलें असतें. पण सुदैवानें श्रीमान् खापर्डे हे बाहेरगांवीं गेले असल्यामुळें कोर्टांत हजर राहूं शकले नाहींत. यावर मि. स्ट्रॅंगमन यानें खापर्डे यांना आम्हीं मुद्दाम गैरहजर ठेवलें अशी कोर्टाकडे तक्रार केली. या वेळींहि केळकर पुन्हा उभे राहिले व त्यांनीं स्ट्रॅंगमन यांच्याकडून त्यांच्याच डब्यांतून आम्हीं प्रवास केला याचें अगोदर होकारार्थी उत्तर घेऊन कोर्टास सरळ प्रश्न केला कीं, "खापर्ड्यांना जर आम्ही गैरहजर ठेवणार होतों तर नाहक येवढा खर्च आम्हीं कशासाठीं केला ?" यावेळींहि कोर्टानें मि. स्ट्रॅंगमन यांना आपले शब्द मागे घेण्यास लावले. तात्या-

साहेब हे स्वभावानें शांत पण मोठे मानी असत. कोणताहि आरोप मुकाट्यानें ऐकून घेणें त्यांना जमत नसे. टोल्यास सणसणीत प्रतिटोला देण्याचें शिक्षण तर त्यांना लोकमान्यांपासूनच मिळालेलें; मग त्यांत ते कमी कसे पडतील! कित्येकांना जन्मभर आठवण राहील अशी झणझणीत चपराक त्यांच्याकडून मिळाली आहे.



जयंत श्रीधर टिळक

(बी. एस्सी., लोकमान्यांचे नातू, उपसंपादक, केसरी, पुणें)

(१) ती. तात्यासाहेबांची टिळकभक्ति ही शब्दातीत होती. लोकमान्यांच्या संस्था, पत्रें, पक्ष आणि राजकारण यांचें त्यांनीं लोकनिंदेची तमा न बाळगतां जिवापाड मेहनत करून संगोपन केलें हा इतिहास सर्वश्रुत आहेच. परंतु टिळक-घराण्यावरील तात्यासाहेबांच्या पितृतुल्य प्रेमाची कल्पना फारच थोड्यांना असेल. कारण त्यासंबंधी व्यर्थ गैरसमजच फार माजले. माझ्या सुदैवानें त्यांच्या सहवासाचा लाभ मला नेहमीच मिळाला. त्यांपैकी कोणते संस्मरणीय प्रसंग निवडावेत हेच कठिण होऊन बसलें आहे. एक प्रसंग माझ्या स्मृतिपटलावर ठसठशीत कोरला गेला आहे. तात्यासाहेबांच्या अनिर्वचनीय टिळकभक्तीची आठवण होतांच मन कावरेंबावरें होतें. तो माझ्या विवाहाचा दिवस होता. सकाळपासूनच तात्यासाहेब आमच्या घरीं येऊन समारंभाच्या सर्व तयारीवर जातीने देखरेख करीत होते. आल्यागेल्याची विचारपूस आणि सर्व व्यवस्था तर त्यांनीं स्वतः केलीच; पण पानसुपारीच्या वेळीं दरवाज्यावर इतक्या वृद्धापकाळीं उभे राहून त्यांनी घरच्याप्रमाणें कार्य पार पाडलें! तसेंच होमहवन चालूं असतांनाहि ते सारखे दक्षतेनें सर्वत्र नजर ठेवीत होते. त्यांच्या आशीर्वादानें समारंभ व्यवस्थित पार पडला. शेवटीं ते वाड्यांतल्या गच्चीवर विश्रांति घेण्यासाठी आराम खुर्चीत बसले होते. इकडे तिकडे बघून त्यांच्या नेत्रांत अश्रु उभे राहिले; जुन्या आठवणींनीं त्यांचा कंठ दाटून आला. त्यांच्या मनांत चाललेल्या विचारांची व भावनांची खळबळ त्यांच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झाली होती. पुनरपि एकदां सर्व गोष्टी मार्गाला लागल्या याचें समाधान त्या वेळीं त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतें.

(२) चार वर्षांपूर्वी महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभेच्या कामाला पुनः एकवार जोरानें चालना देण्यासाठीं टिळक-मंदिरांत कार्यकर्त्यांची एक खाजगी बैठक घेण्यांत आली होती. ज्या हिरीरीनें व जोमानें हिंदुसभेचें कार्य व्हावयास पाहिजे तितकें होत नाहीं, पुढारी मंडळी प्रांतांतून फिरत नाहींत, हिंदुसभेचें राजकारण केवळ बैठें झालें आहे असे प्रवाद चालू होते. तात्यासाहेब हे विशेष निमंत्रणावरून

त्या बैठकीस हजर होते. मंडळींचें बोलणें झाल्यावर तात्यासाहेब तळमळीनें म्हणाले, "पोकळ टीका कोणीहि करतो; काम करण्यास कोणी पुढें येतो आहे का? जो पुढे येईल त्यास हिंदुसभेचा कार्याध्यक्ष करतों, पीठ देतों, त्याच्या हातीं जमविलेला पैसा देतो, वृत्तपत्रांतून कार्याला प्रसिद्धि देतों, व मी स्वतः त्याच्या डोक्यावर हात ठेवतों व पायालाहि हात लावतों! आम्ही आतां वृद्ध झालों. पीठ, पैसा, प्रसिद्धि व प्रतिष्ठा या चार गुणांनीं युक्त असें त्यानें पक्षाचें कार्य जोमानें करावें. यापेक्षां आणखी काय पाहिजे!" तात्यासाहेबांच्या या उद्‌गारांनीं सर्वजण स्तब्ध झाले. पुढे याच बैठकींतून त्रिकाळचे संपादक श्री. शिवरामपंत करंदीकर हे अध्यक्ष, महाडचे सुप्रसिद्ध निरलस कार्यकर्ते श्री. बापूराव जोशी हे कार्याध्यक्ष व श्री. वा. ब. गोगटे हे कार्यवाह असा हिंदुसभेच्या त्या वर्षीच्या पदाधिकाऱ्यांचा उत्तम संच जमला. तात्पर्य, कार्याची जबाबदारी अंगावर घेऊन कार्य करण्यास तत्पर असलेल्या कोणाहि कार्यकर्त्यांस आपलें सर्व साहाय्य देण्यास तात्या नेहमीं तत्पर असत. ते आपल्या ह्याच निरलस लोकसेवेच्या वृत्तीनें लोकमान्यांचे उजवे हात होऊन बसले होते ते उगच नव्हे!

❋

मधुकर केशव केळकर

(एफ्. वायू. कॉम., तात्यासाहेबांचे नातू, पुणें)

तात्यांच्याकडे माझीं लहान भावंडें – सुधा, अरविंद वगैरे वरचेवर गप्पा मारण्यास जात असत. मी मात्र तसा गप्पा मारण्यास जात नसे. वास्तविक मी माझ्या भावंडांपेक्षां फार मोठा नव्हतों; पण लहान मुलांसारख्या गोष्टी काय बोलावयाच्या असें मला वाटे, म्हणून मी त्यांच्याकडे फार जातसा नसे; पण आतां मात्र मी त्यांच्या सहवासाला कायमचा मुकलों हें लक्षांत आलें म्हणजे मी त्यांच्याकड जास्त वेळां गेलों असतों तर बरें झालें असतें अशी चुटपूट माझ्या मनाला लागून राहिली आहे. असो. तात्यांची एक आठवण मात्र माझ्या चांगली लक्षांत आहे. मी इंग्रजी चवथीमध्यें होतों, त्या वेळची ही आठवण आहे. आमच्या वर्गाचें एक 'झुंजार' नांवाचें हस्तलिखित मासिक काढलें होतें. मी त्या मासिकाच्या संपादक-मंडळांत नव्हतों; परंतु माझ्या वर्गांतील मित्रांनीं तात्यांच्याकडून मासिकाकरितां अभिप्राय मिळवून आणण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली. अर्थात् ही गोष्ट तडीस नेणें भाग पडलें. मीं तात्यांना कोणता वेळ मोकळा आहे हें विचारलें व त्याप्रमाणें माझ्या संपादक-मंडळांतील दोन मित्रांना दुसऱ्या दिवशीं बोलाविलें. त्या दिवशीं सकाळीं मी माझ्या मित्रांना घेऊन तात्यांच्या माडीवर गेलों. त्या वेळीं तात्या कांहीं तरी वाचत होते. त्यांनीं माझ्याकडे पाहतांच मीं सांगितलें, "हे माझे

वर्गमित्र, माझ्या वर्गाच्या मासिकावर अभिप्राय मागण्यासाठीं आले आहेत." हंसत हंसत त्यांनीं आमचें स्वागत केले व म्हणाले, "बरें! कुठें आहे मासिक!" त्यावर माझे मित्र म्हणाले, "अंक तयार जाहे; पण त्यावरील मुखपृष्ठ काढावयाचें राहिल्यानें सबंध अंक उद्यां दाखवावयास आणतों." खरोखर अभिप्राय मागावयाचा म्हणजे मासिक आधीं दाखवावयास पाहिजे होतें; परंतु तसें न होतां त्यांना त्याची फक्त स्थूल कल्पनाच दिली. परंतु तात्यांच्या स्वभावांतील विशेष हा कीं, योग्य कारणाकरितां आलेला माणूस नाराज होऊन परत जाऊं नये असें त्यांना वाटे. त्यामुळें ते हंसत हंसत म्हणाले, "बरें! कशावर लिहून देऊं अभिप्राय!" यावर माझ्या मित्रांनीं अभिप्रायार्थ आणलेला विशिष्ट कागद पुढें केला. तात्यांनी चटकन त्यावर चारच ओळी अभिप्राय लिहून दिला; किती अर्थपूर्ण तो होता पहा. तो असा :–

"ही कळी उमलण्याच्या आधींच तिचा वास मी घेत आहें; व ही कळी उमलल्यावर आपल्या सुगंधानें लोकांना आनंदित करील अशी इच्छा प्रकट करतों!"

केशव ऊर्फ विठ्ठल नारायण केळकर

(तात्यासाहेबांचे पुतणे, पण मानलेले मुलगे, पुणें)

तात्यांच्या आठवणी लिहिण्याचें काम अवघड कसें आहे याबाबत मीं 'वाङ्मयशोभा' मासिकाच्या ऑगस्ट १९४८ च्या अंकांतील लेखांत उल्लेख केला आहे. आमच्या कुटुंबियांच्या तात्यांच्याबद्दल कितीतरी आठवणी आहेत. पण श्री. बापट यांनीं ग्रंथ-विस्ताराच्या अडचणीमुळे अगदी मोजक्या आठवणी द्याव्या असें सांगितल्यावरून खालील मजकूर लिहीत आहे.

(१) भांडारकर इन्स्टिटयूटच्या कॉलनींत आमचा एक प्लॉट होता. तो जरा वेडावांकडा होता. त्याच्या शेजारीं कै. रंगाचार्य रट्टीशास्त्री यांचा प्लॉट होता. एकदां तात्या, रंगाचार्यशास्त्री व मी असे या प्लॉटची पाहणी करीत असतां सहज घरें बांधण्याची दगदग, व्यवहारांतील सरळपणा वगैरे गोष्टी निघाल्या. रंगाचार्य म्हणाले, "माझा प्लॉट चौरस आंखीव आहे. तुमचा जरा तिरकस आहे." त्यावर तात्या हंसून चटकन् म्हणाले, "जागेचा मालक 'सरळ' असला म्हणजे मग जागा 'तिरकस' असली तरी बिघडत नाहीं! पण शास्त्रीबोवा, हें तुमच्याबद्दल नाहीं हो! दुसऱ्या अनुभवांतील ही गोष्ट सांगितली."

(२) १९३२ सालीं तिसऱ्या गोलमेज परिषदेकरितां तात्यांचें लंडनला जाण्याचें ठरलें. त्या सुमारास कै. मुरुडकरबुवा हरदास एकदां घरीं आले होते.

मुरुडकरबुवा, तात्या व ती. ताई यांच्या गप्पा सुरू झाल्या म्हणजे ताईच्या धार्मिक भावना संभाळून बुवांच्या मार्मिक प्रश्नोत्तरांवर तात्या उत्तरें देत, तें सर्व ऐकण्यासारखें असे. या वेळीं पुढील संवाद झाला. मुरुडकरबुवाः—"तात्या! ही विलायतची दुसरी खेप.पहिल्या खेपेस खाण्यापिण्याचा सराव झाला आहेच;ताईला कांहीं काळजीचें कारण नाहीं." तात्या :— "कांहीं काळजी नको. पहिल्या खेपेस विलायतेस गेलों तेव्हांची गंमत तुम्हांस माहीत आहेच. बोटीवर शाकाहारी व मांसाहारी लोकांच्या जेवणाची सोय असते खरें. पण वाढपी लोक एकाद्या वेळीं शाकाहारी माणसाला वाढतांना, मांसाहारी लोकांच्या पदार्थांच्या भांड्यांतील चमचाच शाकाहारीना वाढतांना वापरत! बुवा! ब्रह्म आणि माया इतकी जवळजवळ आहेत; दुसरें काय!" बुवा :— "भले! पण तात्या, तुम्ही कांहीं मायेंत गुरफटणारे नाहींत ही आमची खात्री आहे हं."

(३) अलीकडे कांहीं वर्षे तात्यांचें इन्कमटॅक्सचें स्टेटमेंट भरून ते कचेरीत दाखल करण्याचें काम मीच करीत असे. तात्या याबाबत सर्व आंकडे व माहिती देत; पण तपशील लिहिण्याचा त्यांना फार कंटाळा वाटे. पण कांहीं उणीव राहूं नये म्हणून शेवटीं किरकोळ खातीं पांचपन्नास रुपयांची रक्कम लिहीत जा, असें ते मला सांगत. एकदां मीं तशी रक्कम घातली होती. तेव्हां इन्कमटॅक्स ऑफिसरनें त्याचा खुलासा विचारला. मीं त्यांस तात्यांचें म्हणणें याबाबत काय असें तें सांगितलें. तेव्हां सदर ऑफिसर म्हणाला, "अहो, हें एन्. सी. केळकरांचें रिटर्न आहेना? मग त्यांत उणीव काय असावयाची! आणि समजा, कांहीं रक्कम राहिली तरी, आम्ही आहोंतच वसूल करावयाला! असें झुकतें माप देण्याचें कांहींच कारण नाहीं!"

(४) लहानपणापासून मला तात्यांच्याबरोबर प्रवासास जाण्याची फार इच्छा असे. एकदां मीं हट्ट धरल्यावर त्यांनीं मला मुंबईस नेलें होतें व मुद्दाम दोन तास खर्च करून ट्रॅमनें 'मुंबई' दाखविली होती! पुढेंहि जमखंडी, कुरुंदवाड, मिरज या ठिकाणीं मी तात्यांच्याबरोबर गेलों होतों. पण मी १९२४ ते २८ मध्यें कराचीस असतांना त्यांनी तिकडे यावें अशी माझी व प्रि. ती. तात्यासाहेब गोखले यांची इच्छा असतांनाहि तो योग आला नाहीं. तात्यांच्या सर्व प्रवासांत कराची व सिंधमधील इतर गांवीं ते जाऊं शकले नाहींत. १९२८ मध्यें त्यांनीं कराचीस डिसेंबरमध्यें येण्याचें योजून निघण्याचा दिवसहि ठरला होता. पण याच वेळीं माझी बदली मुंबईस झाल्याची तार त्यांच्या हातीं पडतांच त्यांनीं तो बेत रहित केला. योगायोग असाच होता असें म्हटलें पाहिजे! अशीच गोष्ट तात्यांच्या अंतसमयीं घडली. दिवाळीकरितां म्हणून मी ता. १२ आक्टोबरला मुंबईहून पुण्यास आलों व ता. १३ ला दुपारीं एक्सप्रेसनें परत जावयाचें ठरलें होतें. पण त्याच दिवशीं

दुपारीं एक-दीड वाजतां त्यांच्या छातींत दुखूं लागून ते अस्वस्थ झाले होते, म्हणून मी गेलों नाहीं. आम्हीं औषधोपचार केले व बरें वाटल्यावर तात्या माडी-वर जाऊन कामकाजहि करूं लागले होते. म्हणून मग मी संध्याकाळच्या गाडीनें जातों म्हणून सांगण्याकरितां माडीवर त्यांच्या खोलींत गेलों. "जातोस? ठीक आहे; जा. कांही हरकत नाहीं. मला आतां बरें वाटते आहे." हेच त्यांचे शेवटचे शब्द व तेंच त्यांचें शेवटचें दर्शन!

❋

मौ. मालतीबाई केशव ऊर्फ विठ्ठल केळकर

(तात्यासाहेबांच्या स्नुषा, पुष्करणी, पुणें)

माझें लग्न १९२५ साली झालें. ते ठरविण्याच्या वेळीं माझे वडील कै. ती. र. न. भिडे व कै. ती. तात्या यांच्यामध्यें जें बोलणें वगैरे झालें त्याची मला पक्की आठवण आहे. ती हकीकत थोडक्यांत देतें :– माझे वडील तात्यांच्या घरीं गेले व म्हणाले, "मी स्थळाविषयी चौकशी करण्याकरितां डॉ. गणपुले यांच्या सांगण्या-वरून आपल्याकडे आलो आहें. आपले मुलगे लग्नाचे आहेत असें कळतें." तात्या म्हणाले, "माझा मुलगा व पुतण्या दोघेहि लग्नाचे आहेत. तुम्ही पुतण्याकरितां बघतां की मुलाकरितां? मला दोघांचीहि लग्नें एकदमच करावयाचीं आहेत." माझे वडील म्हणाले, "आम्ही मध्यम स्थितीची मंडळी; मुलाकरितां म्हणावें तर आम्हांला झेपणार नाहीं; तेव्हां पुतण्याची चौकशी करतों." तात्या म्हणाले, "खर्चाचा मुळींच प्रश्न नाही. पुतण्या असला तरी मीं त्याचें माझ्या मुलाप्रमाणेंच संगोपन वगैरे केलें आहे व पुढेंहि तसेंच करीन. शिवाय माझ्या बाबतीत हुंड्याचा वगैरे प्रश्नच नाही. मी कोणाकरितांच हुंडा घेणार नाही. पुतण्याचे वडील, आई त्याच्या लहानपणींच वारलीं; पण तेव्हांपासून मीं मला तीन मुलगे आहेत असेंच मानलें व त्याप्रमाणेंच सर्व कांहीं करीत आहे." तात्यांचें हें कळकळीचें बोलणें ऐकल्या-वर माझ्या वडिलांना जास्त कांहींएक विचारण्याची इच्छा झाली नाहीं. ते घरीं परत आले व आम्हांस सर्व हकीकत सांगितली व त्याप्रमाणें माझें लग्न होऊन मी 'केळकर' झालें. मी कराचीहून एकदां परत आल्यावर तात्यांनीं माझ्या कराचीच्या बिऱ्हाडाबाबत सर्व चौकशी केली. 'त्यांना' पगार किती, खर्च किती, याची चौकशी केली व मग म्हणाले, "हें पाहा, दोन पैसे कमी किंवा जास्त मिळण्याचा प्रश्न नाहीं; पण मिळकतीच्या आंत खर्च असला पाहिजे हें जन्मसूत्र लक्षांत ठेव व हेंच मी सर्वांना सांगत असतों." केळकर-घराण्यांत आल्यावर खरोखर माहेर आणि सासर याबाबत आम्हां सुनांना कधींहि फरक वाटला नाहीं, इतक्या ममतेनें तात्या आणि ताई यांनीं आम्हांस वागविलें. त्यांचा केव्हांहि उल्लेख करतांना मामंजी


आणि सासूबाई हे शब्दच आमच्या तोंडांत येत नाहींत! माझ्या वडिलांच्या जवळ तात्यांनी काढिलेले शब्द अक्षरशः खरे ठरले आहेत हें तर सांगण्याचें कारणच नाहीं!



सौ. शांताबाई केळकर

(तात्यासाहेबांच्या धाकट्या स्नुषा, पुष्करणी, पुणें)

माझी ही आठवण दिसायला अगदी साधी आहे; परंतु तिनें ती. सासूबाईंच्या व ती. मामंजींच्या स्वभावाची बरोबर परीक्षा होईल. सासूबाईंची मामंजींवरील निष्ठा आणि मामंजींची सासूबाईंवरील भक्ति एकासारखी एक होती. मामंजींनीं खाल्ल्याशिवाय सासूबाईंनीं कधीं खाल्लें नाहीं. बारीकसारीक का खाण्याचा पदार्थ असेना, तो मामंजींना आधीं देऊन झाल्यावरच त्यांनीं तो तोंडांत घातला तर घालावा. मामंजा गेले त्याच्या आदल्या वर्षींची गोष्ट आहे. त्या वेळीं सासूबाई आजारी झाल्या होत्या. त्यामुळें फार अशक्त झाल्या. पण डॉक्टर-वैद्यांचें औषध न घेण्याचा त्यांचा निश्चय होता. त्यांची मनापासून इच्छा कीं, आतां औषध घ्यावयाचें नाहीं. या दुखण्यांतच आपलें सोनें व्हावें! पण त्यांची प्रकृति इतकी क्षीण होऊं लागली होती कीं, अखेर मामंजींनीं आग्रह धरून त्यांचें मन वळविलें. एक दिवस ते स्वतः त्यांना घेऊन डॉ. ढमढेरे यांच्याकडे गेले व चांगली परीक्षा करून त्यांच्याकरितां औषध चालू केलें. डॉक्टरांच्या म्हणण्यांत त्यांनीं खाणें-पिणें जास्त वाढविलें पाहिजे, व त्यांनीं मुख्यतः शक्तीवर औषध घेतलें पाहिजे. म्हणून त्यांनीं शक्तीच्या औषधाच्या गोळ्या लिहून दिल्या. त्या गोळ्या सकाळी चहाच्या वेळी एक एक याप्रमाणें घ्यावयाच्या होत्या. आमच्या येथल्या सगळ्या मंडळींचा सकाळचा चहा मामंजींच्याबरोबर व्हावयाचा. नेहमीची पद्धत अशी असे कीं, चहाच्या आधीं एका चांदीच्या वाटींत दुधांत कांहीं औषध सासूबाई मामंजींपुढें ठेवीत व कांहीं अधिक चौकशी न करतां सासूबाईंच्याकरितां मुकाट्यानें तो घोट ते पिऊन मग चहा घेत. एक दिवस 'यांनीं' सहज मामजींना विचारलें कीं, "गोळी कसली घेतां! कोयनेलची कीं काय!" त्यावर ते म्हणाले, "छे बुवा! तें मला ठाऊक नाहीं. तिनें गोळी व दूध आणून ठेवलें, ते मी प्यालों!" यावरून गोळी कसली व कशाकरितां याची सहज बोलणीं सुरू झालीं. तेव्हां सासूबाईंनींच मग बाहेर येऊन सांगितलें कीं, "कोयनेलची गोळी नाहीं. मी घेतें शक्तीच्या गोळ्या, त्यांपैकी इकडे एक गोळी देतें." तेव्हां मात्र मनोमन सर्वांना काय समजावयाचें ते समजलें! सर्वांनाच तो कांहीं वेळ हंसण्याचा विषय झाला होता. "शक्तीच्या गोळ्या मला आतां घेऊन काय करावयाच्या आहेत आणि मला शक्तीच्या गोळ्या हव्यात तरं, माझ्यापेक्षां इकडेच



तात्यासाहेब केळकर आणि सौ. दुर्गाताई केळकर

त्या आधीं दिल्या पाहिजेत" हीच मनांतली त्यांची इच्छा! आणि म्हणून त्या स्वतः गोळी घेण्याआधी मुकाट्यानें मामजीच्या पुढें चहाच्या वेळीं ठेवीत, व मगच त्या स्वतः घेत!!



तात्यासाहेब केळकर यांचें पत्र

(परस्परं भावयन्तः —

[ती. तात्यासाहेब यांनी आपल्या 'गतगोष्टीं'त आपल्या कुटुंबियांचें वर्णन करतांना आपल्या सहधर्मचारिणी दुर्गाताई ह्यांच्यासंबंधी काढलेले हार्दिक उद्गार सुप्रसिद्धच आहेत. ती. मातोश्री ताईसाहेब यांनीं ती. तात्यासाहेब यांना लिहिलेलें एक खाजगी नमुनेदार पत्रहि तेथें त्यांनीं उद्धृत केलें आहे. उलट, तात्यासाहेब यांनीं लिहिलेलें एक खाजगी पत्र खालीं उद्धृत करीत आहें. हें पत्र २३ नोव्हेंबर १९४४ चें असून तें अहमदाबादेस तात्यासाहेब यांचे नातू श्रीयुत श्रीधरपंत देशपांडे (डॉ. कमलाबाईचे चिरंजीव) एअरो-ड्रोम ऑफिसर असतांना, त्यांस त्यांनी लिहिलेलें आहे. त्या वेळीं घरांतील कांहीं मंडळींचीं दुखणीबाणी काढून थकल्यामुळें ताईसाहेब विश्रांतीसाठीं अहमदाबादेस आठ-पंधरा दिवस राहण्यास गेल्या होत्या. रा. देशपांडे यास तात्यासाहेब यांनीं लिहिलेल्या पत्रांत ताईसाहेब ह्यांच्याबद्दल तात्यासाहेब ह्यांच्या जिव्हाळ्याच्या गाढ भावना व्यक्त झाल्या आहेत. तो मजकूर पुढें देत आहें. – संपादक.]

"ता. १ डिसेंबरला मालिनी व मुले तेथून गेलीं तर ताईची करमणूक कमी होईल म्हणून त्यांचें जाणें आणखी पुढें ढकलतां आलें तर पाहा ती गेलीं तर ताई इकडे परत फिरण्याची घाई करील म्हणून मुद्दाम सुचविलें आहे. ताईला येथें अलीकडे इतकें काम पडलें कीं, मी तें पाहूनच थकलों; म्हणून तिला खरा कंटाळा तेथें राहण्याचा येईपर्यंत तिला तूं तेथून सोडूं नको. ती येथें घरीं नसतां, आमच्या घराच्या 'खानावळी'च्या किंवा 'पथिकाश्रमाच्या' व्यवस्थेची घडी अधिक अंगवळणीं सर्वांना बसण्याचा संभव आहे! तात्पर्य, ताईनें इकडे येण्याची घाई करूं नये; किंवा दुसरा पर्याय, इकडे आल्यास मोजकें ठरीव काम पत्करण्याचें तिनें शिकावें. मी नाही का, जेवण्याच्या व चहाच्या दोन वेळांशिवाय खालीं न जाण्याचें व्रत सांभाळीत! तसें ताईनेंहि खालच्याखालीं थोडें करावें. आमच्या पंक्तीला बसून तिनें जेवावें अशी माझी फार इच्छा; पण दोन प्रहरीं दोन वाजतां मी वामकुक्षी घेऊन उठतों तेव्हां तिला कोठें थोडें लवंडायला सांपडते. दोघां मुलींच्या प्रकृति बऱ्या नव्हत्या हें खरें; परंतु काम अगाबाहेर थोडें टाकलें तर टाकतां येणारच नाहीं असें नाहीं. आमच्या × × × पहाना! स्वतः जगाचा कांहीं उपयोग न करतां

लोकांवर रागावण्याचें व टाकून बोलण्याचें अवसान केवढें ! ताईला म्हणावें तें थोडें शीक ! !

ताईला सांग कीं, घरची देवपूजा, नंदादीप व्यवस्थित चालू आहेत. नंदादीपाचें लिहिण्याचें कारण असें कीं, परवां अहमदाबादेस जाण्यास निघतांना, घरांतून बाहेर पडतांना, तिनें शेवटचें जें एक काम केलेलें मीं पाहिलें तें नंदादीपाची वात ठाकठीक करणें ! ताई नसल्यानें मांजरीला मात्र दुःख होत असेल. कारण एक माझ्याशिवाय जें कोण तिला पाहील तें तिच्यावर छडी उगारते. गोवर्धन संस्थेच्या गोदूबाईची फेरी मात्र झालेली पाहिली नाहीं. त्यांना आमच्या घरीं 'आई' आहे, पण इतर कोणी आप्त नाहीं ! परक्याहि माणसांना अगत्यानें वागविण्यांत ताईची बरोबरी कोणी करील असें मला वाटत नाहीं. हो विसरलों ! केळ्यांचे घड निघायला एकदम चार-पांच झाले आहेत. ताईला म्हणावें, तुझी आठवण करीत आम्ही सर्व खाऊं ! पण ती येथें असली तरी काय ? तिनें आम्हां सर्वांना दिलेला जिन्नस आपल्या हातानें घेऊन आपल्या तोंडांत घातलेला मीं कधीं पाहिल्याचें स्मरत नाहीं. तसेंच या घरच्या जिनसाचें ! "



दुर्गाताई केळकर

— श्रेयः परमवाप्स्यथ ।)

[ती. तात्यासाहेब यांचें घर म्हणजे साहित्यिकांचें छोटेसें संमेलनच ! तात्यासाहेबांच्या एकषष्टि-समारंभाच्या वेळीं अध्यक्ष लोकनायक बापूजी अणे यांनीं यासंबंधीं एक फार मार्मिक दृष्टान्त देऊन वर्णन केलें होतें. ते म्हणाले, " मंडनमिश्राचें घर कोणतें म्हणून एकजण कोणाजवळ चौकशी करीत असतां, त्यानें खूण सांगितली कीं, ज्याच्या दरवाजांत टांगलेल्या पिंजऱ्यांतील राघू-मैनाहि काव्याची चर्चा करीत असतील किंवा ज्याच्या येथील गडीमोलकरणीहि वेदान्ताच्या प्रश्नावर वाद करीत असतील तें मंडनमिश्राचें घर ! असेंच आपल्या तात्यासाहेबांच्या घरांत आबालवृद्धांच्या व्यवसायाकडे पाहिलें म्हणजे असाच अनुभव येतो." तात्यासाहेबांचे मुलगे, मुली, पुतणे, भाऊ, नातू सर्वच कमी अधिक प्रमाणांत लेखक म्हणून माहीत आहेत. पण सर्वांत तात्यासाहेबांच्या निकट असूनहि लेखणीला कधींकाळींच स्पर्श केला असेल, तर तो तीं. मातोश्री दुर्गाताईनीं; पण असें असतांहि त्यांनीं ती. तात्यासाहेबांना लिहिलेलें जें एक पत्र तात्यासाहेब यांनीं आपल्या 'गतगोष्टीं'त छापलें आहे, त्यावरून ताईंच्याहि भक्तिभावयुक्त लेखनाला उत्तम वाङ्मयाची लज्जत आलेली दिसतेच. ती. दुर्गाताईना क्वचितच पत्र लिहिण्यास बसण्याइतकी फुरसत सांपडावयाची; व तसा फुरसतीचा वेळ बहुधा त्यांच्या आवडीच्या धार्मिक व

वेदान्तपर वाचनपठनांतच जावयाचा. यामुळें त्यांना लिहिण्याचा बहुधा प्रसंगच येत नसे. अलीकडे त्यांचे धाकटे चिरंजीव रा. यशवंतराव हे त्यांच्या नेहमीं पाठीमागें लागून म्हणत कीं, "ताई, आतां तू फावल्या वेळांत आपल्या घरच्या जुन्या जुन्या आठवणी लिहून कां काढीत नाहींस! तसें केल्यास ती एक हरिवंशासारखी सुंदर बखरच तयार होईल; म्हणजे तुलाहि करमणूक होईल व आम्हांलाहि कितीतरी जुनी माहिती मिळेल!" पुढें ताईंच्या कन्या डॉ. कमलाआक्का यांनीं ताई आजारी असतां त्यांना अनेक पुस्तकें रोज वाचून ऐकविलीं. त्यांत लक्ष्मीबाई टिळकांचें आत्मचरित्रहि वाचलें. त्या वेळीं पुनः हा आठवणी लिहून ठेवण्याचा प्रश्न निघाला होता. तेव्हां त्यांनीं कधी नव्हे तें आळेंबळें लिहून पाहण्याचा निश्चय केला, व आपल्या पठनाच्या पदांच्या जुन्या वहींतच दोन-चार कलमें लिहिलींहि; पण तें काम तितकेंच झालें. तेथेंच थांबलें. मला स्वतःला मातोश्री ताईंच्याकडून ती. तात्यासाहेबांसंबंधीं थोडाबहुत आठवणीवजा मजकूर प्रस्तुत ग्रंथाकरितां मिळावा अशी फार इच्छा होती. आज चाळीस वर्षें ह्या उभयतांनीं मला प्रत्यक्ष मुलासारखेंच, वागविलेलें आहे. त्या परस्परांची परस्परांविषयीची भावना मला माहीत असल्यामुळें ताईंच्याकडून असा मजकूर मिळावा असा मला मोह पडणें स्वाभाविकच होय; परंतु सध्यांसारख्या अत्यंत नाजूक व कठिण स्थितींत त्यांच्याजवळ असा शब्द काढणें माझ्या अगदीं जिवावर आलें; कारण असें करणें म्हणजे त्यांच्या दुःखाची खपली काढण्यासारखें आहे, हें जाणून मीं माझी जिज्ञासा दाबून धरली; परंतु सुदैवानें वर उल्लेखिलेल्या ती. तात्यांच्याविषयींचा ती. ताईंच्या हातचा थोडा मजकूर प्रिन्सिपॉल कमलाबाआक्कांच्या कृपेने उपलब्ध झाला; तोच शिरोधार्य मानून पुढें देत आहे. – संपादक]

"मागील सिंहावलोकन. मी मनःपूर्वक व कृतज्ञतापूर्वक आमच्या उभयतांच्या कांही आठवणी लिहीत आहें. मला लिहावेसें पुष्कळ वाटतें, परंतु लिहितां येत नाहीं. मनांतले विचार मनांतच जिरतात. आमचा आयुष्यक्रम साठ वर्षें ईश्वराच्या कृपेनें चांगल्या रीतीनें गेला. आमच्यामध्यें केव्हांहि तिरस्कार, कुरबूर अगर कडवटपणा आला नाहीं. याला कारण तिकडला मोठेपणा, यांत संशय नाहीं. मी कांहीं शिकलेला नाहीं. इकडल्या विद्वत्तेला आपण बायको म्हणजे शालजोडीला ठिगळच असें मला नेहमी वाटतें. पण खरीं सुसंस्कृत माणसें, दुसरें माणूस अडाणी असलें तरी, त्याबद्दल त्रास देत नाहींत व आपल्या वागणुकीनें त्यालाहि ते सुशिक्षित व विचारी करतात व तशीच माझी निःसंशय परिस्थिति झाली आहे. मी कोणास म्हटलें तर खोटें वाटतें; पण आतां लोकांना मी पूर्ण सुशिक्षित आहे असें वाटतें. कारण यांचा सहवास व आचरणाची शिकवण!

माझें सासर-माहेर हेंच असल्यानें सासूबाईंचें व मामंजींचें वागणें माझ्याबरोबर

मुलीप्रमाणें असे. त्यामुळें ते घरांत यांना रागावयाचें किंवा बोलावयाचें असल्यास स्यांना न बोलतां माझ्याजवळ बोलत. पहिल्या वेळीं तीर्थरूप टिळक तुरुंगांत गेले. त्या वेळेस त्यांच्या पाहुण्यांची ये-जा आमच्याकडे व्हायची व खर्चाची कशी तरी तोंड-मिळवणी करावी लागे. मामंजींना यांच्या खर्चाची फार काळजी वाटे. एक दिवस ते मला म्हणाले, "अग, हा सुजेचा मोठेपणा आहे! यापुढें यांचे सांसारिक खर्च उभे राहिले म्हणजे यांना कळेल!" पुढें स्वतःहि मला म्हणावयाचें झालें, "पहा बोवा, एवढ्या पैशांत सर्व कांहीं केलें पाहिजे. खर्च बेतानें करा." परंतु त्या वेळे-पासून आतांपर्यंत देवदयेनें आम्हांला पैसा प्रपंचाला कमी पडला असें कधींहि झालें नाहीं व मींहि कधीं वायफळ खर्च केला नाहीं.

आमच्या घरीं लोकांच्या कल्पनेप्रमाणें स्वैपाकी, आचारी वगैरे हवा; पण माझ्या स्वभावाला तें आवडत नाहीं. आपण आपल्या माणसाला काळजीनें हवें तसें चांगलें करून घालूं, तसें दुसऱ्याच्या हातून होणार नाहीं. या कल्पनेमुळें विशिष्ट प्रसंगाशिवाय मी कधीं आचारी ठेवूं दिला नाहीं. अजूनहि आपल्या हातून होईल तसा स्वयंपाक करून आपण वाढावें यातच समाधान वाटतें."

❋

संपूर्णानन्दजी

(साहित्य वाचस्पति, शिक्षणमंत्री, संयुक्तप्रांत)

मुझे न. चिं. केलकर से ऐसा घनिष्ट परिचय कभी भी प्राप्त न हुआ कि कोई संस्मरण लिख सकूं। मैंने उनकी रचनाओं को मराठी और हिन्दी में देखा है और उन के सार्वजनिक जीवन के स्वरूप से परिचित हूँ। भारतकी राजनीतिक समस्याओं के संबंधमें समय समयपर उनका जो दृष्टिकोण होता था उससे कोई भले ही पूर्णतया सम्मत न हो परन्तु यह बात तो मैं समजता हूँ सर्वसम्मत है कि वह उदात्त देशभक्त, निष्ठावान सार्वजनिक कार्यकर्ता, आदरणीय विद्वान् और भारतीय संस्कृति और परम्परा के अनन्य प्रेमी थे।

मैं इतना ही लिखने में अपने को समर्थ पाता हूं!

❋

डॉ. बाबूरामजी सक्सेना

(एम्. ए., प्रिन्सिपॉल, के. पी. महाविद्यालय, प्रयाग)

स्वर्गीय श्री. नरसिंह चिन्तामणि केलकर महोदय के दर्शन मुझे हिन्दी साहित्य सम्मेलन के १९४० वाले पूना अधिवेशन में हुए थे। उस समय भी हिन्दु-

स्तानी और हिन्दी का सघर्ष चल रहा था। श्री. केलकर साहब ने जिन जोरदार शब्दों में हिन्दी के पक्ष का समर्थन किया था उन से हमें बहुत बल मिला। आज भी हमारा संघर्ष जारी है। महाराष्ट्रका लोकमत एकनिष्ठा से हिन्दीका समर्थक है। इस लोकमत को जागरूक करने में केलकर जी का सक्रिय सहयोग बराबर मिलता रहा। इसके लिए उनका आभार मानते हुए अपनी श्रद्धांजलि अर्पित करते हैं।

❋

नरदेवशास्त्री

(आचार्य, गुरुकुल-महाविद्यालय, हरद्वार)

(१) मेरा और केलकर जी का अच्छा परिचय था। मैं १९२० से १९३२ तक ऑल इण्डिया कांग्रेस कमिटी का सदस्य था, उस समय श्री केलकरजी भी सदस्य थे तभी से परिचय हो गया। ऑल इण्डिया काँग्रेस कमिटी में जो भिन्न भिन्न विषयों पर वाद-विवाद चल पडते थे उनमें श्री केलकर भाग लेते थे तब इनकी तर्कशैली, वाद-विवाद-पटुता देखनेयोग्य होती थी। ऑल इण्डिया कांग्रेस कमिटी अथवा कांग्रेस के महाधिवेशन में मराठाशाही पगडीवाले दो ही व्यक्ति दिखालायी पडते थे। एक श्री केलकर, दूसरे श्री अणे। इन दोनों को देखकर स्व. राष्ट्र-सूत्रधार लोकमान्य बाल गंगाधर तिलक का स्मरण हो आता था। कानपूर कांग्रेस के अवसर पर एक वादविवाद में श्री केलकरजीने महात्मा गांधीजीसे स्पष्ट शब्दों में कहा था कि गुलाब के जलसे प्लेग के कीटाणु दूर नहीं किये जा सकते। इसी प्रकार अहिंसा से राज्यप्राप्ति अथवा राज्यशकट-संचालन भी असम्भव है। लोकमान्य तिलक के निधन के पश्चात् केसरी की कीर्ति को अक्षुण्ण बनाये रखनेमें श्री केलकर जी की दूरदर्शिता तथा लेखनचातुर्यही कारण है। श्री केलकर जैसा स्पष्टवादी क्वचित विरले ही होगे। महात्मा गांधीजी भी इन की टीका-टिप्पणी को सुनकर चुप रहते थे। वैसे महात्मा गांधी तथा श्री केलकर जी का उग्र मतभेद रहा; पर दोनों परस्पर आदरभाव रखते थे। यदि श्री केलकर थोडासा गरम बनकर महात्मा गांधी का साथ दे देते तो वे कभी के कांग्रेस के अध्यक्ष अथवा राष्ट्रपति बन गये होते।

श्री. केलकर जी दो एक बार बृहन्महाराष्ट्र परिषद् में मिले थे। उनके मराठी के भाषण सुनने योग्य थे। वे बोलते थे तो ऐसा प्रतीत होता था कि साक्षात् मूर्तिमान् महाराष्ट्र बोल रहा है। वे लिखते थे तो, ऐसा भान होता था कि महाराष्ट्र का हृदय लिख रहा है। श्री. केलकर जी संस्कृत वाङ्मय के भी प्रकाण्ड पण्डित थे। कानपुर के कांग्रेस के अवसर पर कानपुर तथा काशी के पण्डित

उनसे मिलने आये थे – तब संस्कृत में वार्तालाप प्रारम्भ हुआ – क्यों कि पण्डितों को अंगरेजी नहीं आती थी और केलकर हिन्दी समजते तो थे, पर बोल नहीं सकते थे। कैसी सुन्दर सरल संस्कृत थी श्री केलकरजी की! बात-बातमें श्री केलकर संस्कृत श्लोक बोलते थे। पण्डितगण केलकर के पाण्डित्य पर मुग्ध हुएं।

जबतक संसारमें महाराष्ट्र और मराठी भाषा जीवित रहेगी तबतक श्री केलकरजी के नामें को कोई मिटा नहीं सकता।

❋

य. सी. आगरकर

(संपादक, 'हिन्दी स्वराज्य', खंडवा)

'हिन्दी स्वराज्य' के भू. पू. संपादक तथा संस्थापक स्व. सी. मा. आगरकरजी का उनसे परिचय रहा है। सदियों से परदास्य की शृंखला में आबद्ध भारत का विमोचन तथा उत्थान करने में भारत की जिन इनी गिनी संस्थाओं तथा व्यक्तियों ने, प्रतिकूल परिस्थितियों के होने पर भी, प्रमुखता से भाग लिया तथा उन्नति की, उनमें 'केसरी-मराठा' संस्था तथा श्री तात्यासाहब केलकरजी का स्थान काफी ऊंचा है। और मुझे आशा है इतिहास इसे अवश्य योग्य स्थान देगा। पूना की केसरी-मराठा संस्था तथा श्री केलकरजी का संबंध व्यष्टि और समष्टी के समान अविभाज्य था, और यही कारण है कि श्रद्धेय केलकरजी के स्वर्गवास से उपरोक्त संस्था की जो हानी हुई है, शायद ही कोई दूसरा उसकी पूर्ति कर सके।

(२) श्री केलकरजी के प्रभावशाली व्यक्तित्व का मूल कारण है आपकी दुर्दम्य उद्योगप्रियता, प्रगाढ विद्वत्ता तथा किसी भी समय मार्गदर्शन करनेवाली पूर्ण विकसित प्रज्ञा। गत प्रथम महायुद्ध के बाद स्वतंत्रता प्राप्तिके लिए आपने जो दरख्वास्त कमसे कम समय में तैयार की थी, वह तथा (इन्टरनॅशनल कमिटी ऑफ बर्थ राइट्स्) के सामने पेश करने के लिए आपके द्वारा तैयार की गयी प्रश्न-मालिका आपके राजनैतिक बुद्धि की भी परिचायक है।

